CC0. In Public Domain. Digitized

ॐ श्रीपरमात्मने नमः

1071

श्रीनामदेवांची गाथा

गीताप्रेस गोरखपुर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

1071

॥ ॐ श्रीपरमात्मने नमः ॥

श्रीनामदेवांची गाथा

मराठी

आम्नाय–ग्रन्थालय, भारतनिधि, काशी वाराणसी-१

त्वमेव माता च पिता त्वमेव
त्वमेव बन्धुश्च सखा त्वमेव।
त्वमेव विद्या द्रविणं त्वमेव
त्वमेव सर्वं मम देवदेव॥

गीताप्रेस, गोरखपुर

यशवंत ग्रंथ भांडार
७५३-सदाशिव पेठ,
पुणे शेअर मार्केट शेजारी, पुणे-४११०३०
फोन : २४४७०५३३/९३२५४०९७६

[1071] ना० दे० गा० (मराठी) 1 A

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सं० २०५६ से २०५८ तक २०,०००
सं० २०६० पाँचवाँ संस्करण ४,५००
योग २४,५००

मूल्य—साठ रुपये

© गीताप्रेस, गोरखपुर

पुस्तकें यहाँ भी उपलब्ध हैं—

१- गीताप्रेस, गोरखपुरकी पुस्तक-दूकान;
वैभव एपार्टमेन्ट, भटार रोड, सूरत—395001,
✆ (0261) 2237362, 2238065

२- गीताप्रेस, गोरखपुरकी पुस्तक-दूकान;
282, सामलदास गाँधी मार्ग (प्रिन्सेस स्ट्रीट),
मरीन लाइन्स स्टेशनके पास, मुम्बई—400002,
✆ (022) 22072636

३- गीताप्रेस, गोरखपुरकी पुस्तक-दूकान;
851, न्यू इतवारी रोड, नागपुर—440002,
✆ (0712) 2734354

प्रकाशक एवं मुद्रक— गीताप्रेस, गोरखपुर—२७३००५
'गोबिन्दभवन-कार्यालय' का संस्थान
फोन : (०५५१) २३३४७२१; फैक्स २३३६९९७
website : www.gitapress.org | e-mail : booksales@gitapress.org

[1071] ना० दे० गा० (मराठी) 1 B

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

॥ श्रीगणेशाय नमः ॥

निवेदन

महाराष्ट्रको चिरकालसे संतोंकी भूमि होनेका गौरव प्राप्त है। भूवैकुण्ठ कहे जानेवाले श्रीक्षेत्र पण्ढरपुरमें प्रत्येक वर्ष आषाढ़ी व कार्तिक-एकादशीको लाखों लोग विट्ठल भगवान्‌के दर्शनार्थ आते हैं। पुण्यसलिला चन्द्रभागा नदीके तीरपर सभी भक्तजन भगवन्नाम-सङ्कीर्तन करते हुए जत्थे-जत्थेके रूपमें आते हैं। मृदंग, वीणा, टाप आदि वाद्योंके साथ भगवन्नाम एवं भक्तोंके नामके कीर्तनसे सारा क्षेत्र तथा आकाश निनादित होता है। मानो स्वयं भगवान् ही नादब्रह्मके रूपमें अवतरित हो रहे हों। मानो भक्तिरानी स्वयं ही सबके हृदयमें स्थिर हो गयी हों। यह अबाध परम्परा जबसे भक्तराज पुण्डरीकने स्वयं भगवान् विठ्ठलनाथको प्रकट किया तबसे चल रही है। सन्त ज्ञानेश्वर महाराजसे लेकर सन्त निळोबारायतक अनेक सन्तोंने महाराष्ट्रमें भक्तिका जो विकास किया उसकी किसीसे तुलना नहीं हो सकती। उस सन्त शृंखलामें श्रीनामदेवजी महाराजका स्थान अग्रगण्य है। उनके साथ भगवान् नित्य प्रेमालाप करते तथा उनका योगक्षेप वहन करते थे। श्रीनामदेवजी महाराजके समय में भक्तोंमें अपूर्व उत्साह था। भगवान् स्वयं उनके कीर्तनमें नाचते थे और उन्हें अपने वस्त्रोंतकका भान नहीं रहता था। उनका पीताम्बरतक छूट जाता था। इतना ही नहीं, उनके घरके सभी परिजन भी उसी तरह से भगवत्सांनिध्य लाभ करते थे। विशेषकर जनाबाई (उनके घरमें दासीरूपसे)-से भगवान्‌का इतना लगाव था कि उनके साथ भगवान् स्वयं गेहूँ पीसते थे। क्यों न हो, भगवान् तो भक्तोंके वशमें रहते ही आये हैं। भगवान् छोटे-से-छोटा काम करनेमें भी अपना गौरव समझते हैं।

महाराष्ट्रसे कुछ भावुक भक्तोंने गीताप्रेससे सम्पर्क कर आग्रह किया कि इस वर्ष श्रीनामदेवजी महाराजकी ६५०वीं पुण्यतिथि है। अतः गीताप्रेसद्वारा उनकी एवं उनके परिकरकी वाणी प्रकाशित हो जाय तो स्वल्प मूल्यमें भगवत्परायण जनता लाभान्वित हो सकेगी। गीताप्रेस जैसे ज्ञानश्वरी (गूढार्थ-दीपिका), एकनाथी भागवत, हरीपाठ, गीताटीका, साधक-संजीवन तथा अन्य पुस्तकें प्रकाशित की हैं, वैसे इसे क्यों न किया जाय। इसी बातको ध्यानमें रखते हुए प्रस्तुत पुस्तक 'श्रीनामदेवांची गाथा' (श्रीनामदेवजी महाराजकी गाथा) प्रकाशित की जा रही है। इतना ही नहीं, हमारे गीताप्रेसके संस्थापक, संरक्षक ब्रह्मलीन पूज्य श्रीसेठजी जयदयालजी गोयन्दका एवं नित्यलीलालीन भाईजी श्रीहनुमानप्रसादजी पोद्दारका भक्तोंकी अनुभवपूर्ण वाणीका प्रकाशक सदासे चाहते थे। परम श्रद्धेय स्वामी श्रीरामसुखदासजी महाराजका विशेष आग्रह तो आये दिन बना ही रहता है।

हमें तो भगवान् श्रीविट्ठलनाथजीके चरणोंमें श्रीनामदेव महाराज एवं उनके परिकर जनाबाई तथा भक्तिपरायण जनोंके चरणोंमें यह ग्रन्थ-कुसुम अर्पित करते हुए असीम प्रसन्नता हो रही है जो उन्हीं संतोंका ही कृपाप्रसाद है।

—प्रकाशक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रीनामदेवमहाराजांचे चरित्र

नामदेवाचें घराणें मूळचें मराठवाड्यांतील नरसीब्राह्मणी गांवचे. पण नामदेवांच्या आधींच दोन तीन पिढ्या ते पंढरपुरास येऊन राहिले होते.

नामदेवांचें घराणें पहिल्यापासूनच भगवद्भक्त होते. ते जातीनें शिंपी होते. त्यांचे वडील दामाशेटी हे विठ्ठलाचे परम भक्त होते. त्यांच्या बायकोचें नांव गोणाई. तिनें पुत्रप्राप्तीसाठीं केशवराजाला नवस केला होता. त्याप्रमाणें तिला पुढें पुत्र झाला तोच नामदेव होय. नामदेव महाराजांचा जन्म कार्तिक शुद्ध एकादशी रविवारीं इ. स. १२७० मध्यें झाला.

नामदेव पांच वर्षांचें झाल्यावर देवळांत जाऊन नैवद्य दाखविण्याचें काम एक दिवस दामाशेटींनीं त्याच्याकडे सोपविलें. त्याप्रमाणें नामदेव नैवद्य घेऊन देवळांत गेले. नैवेद्याचें दूध देवापुढें ठेवून तें पिण्याचा देवास आग्रह करूं लागले. पण मूर्ति दूध कशी पिणार? देव आपण आणलेलें दूध आज पीत नाहीं म्हणून छोट्या नामदेवाला फार वाईट वाटलें, शेवटीं अगदीं निकरावर येऊन तो देवाला म्हणाला, 'पांडुरंगा, तूं तर हें दूध ग्रहण केलें नाहींस, तर मी तुझ्या पायावर डोकें आपटून जीव देईन.'

तें ऐकून देवाला भीति वाटली. त्यानें निमूटपणें ते दूध पिऊन टाकलें, नामदेव रिकामी वाटी घेऊन घरीं आला. गोणाईनें त्याला विचारलें, 'अरे, नैंवेद्याचें दूध कुठें आहे?'

'देवानें दूध पिऊन टाकले.' नामदेव म्हणाला.

त्यावर गोणाई म्हणाली, 'चल, लबाड कुठचा? दगडाचा देव काय दूध पितो? तूंच प्यायलास ना? का सांडलंस कुठें?'

'नाहीं, देव खरंच दूध प्यायला.' नामदेव म्हणाला.

ते ऐकून गोणाईस फार आश्चर्य वाटलें. तिनें ती हकीकत दामाशेटीला सांगितली. तेव्हां दुसरे दिवशीं दामा शेटीनें पुन्हा नामदेवाला दूध देऊन देवळांत पाठविलें. हे स्वतः त्याला न कळत त्याच्या मागून गेले. आदल्या दिवशीप्रमाणेच देव त्याहि दिवशीं दूध प्यायला ते पाहून दामाशेटींनां फार आश्चर्य वाटलें आणि आपला मुलगा देवाचा प्रिय झाल्याबद्दल त्यांना आनंद झाला.

त्या काळच्या पद्धतीप्रमाणें नामदेवांचें लग्न लवकरच झालें. त्यांच्या बायकोचें नांव राजाई. लहानपणीं थोडेसें लिहिणेंवाचणें झालें असेल असें त्यांच्या अभंगावरून दिसतें.

दिवसेंदिवस नामदेव विठ्ठलाच्या भजनांत रंगत गेला पण त्याच्या आईला मात्र तें पसंत पडले नाहीं. कारण तो संसाराकडे बिलकुल लक्ष देत नसे. सदा देवळांत जाऊन टाळ कुटत बसण्याबद्दल गोणाईनें त्याची कानउघाडणी केली. पण नामदेवांच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं.'

एक दिवस गोणाई फारच रागावून देवळांत गेली व नामदेवाला तिनें घरीं चलण्यास सांगितलें. ती फारच कटकट करूं लागली तेव्हां पांडुरंगानें नामदेवाचा हात तिच्या हातांत दिला आणि तो म्हणाला, 'घे आपला नाम्या. आम्हाला काय करायचें आहे तुझ्या नाम्याशीं?'

पण गोणाईची थोडी गम्मत करण्याकरितां पांडुरंग स्वतः नामदेवाचें रूप घेऊन तिच्याबरोबर चालूं लागला. नामदेवाला हाताला धरून गोणाई चालली असता तिनें सहज त्याच्याकडे पाहिलें, तों तिला पांडुरंग दिसला. त्याबरोबर ती म्हणाली, 'अरे तूं कोणाला हवा आहेस? मला तुझी मुळीच जरूरी नाहीं. मला माझा नामदेव पाहिजे आहे.

असें म्हणूत तिनें पाहिलें तों तिला पुन्हा तो नामदेव दिसूं लागला. ती पुन्हा देवळांत आली आणि मग नामदेवाला घेऊन ती घरीं गेली. घरीं दामाशेटींनींहि त्याला चार गोष्टी सांगितल्या. राजाईनेहि त्याला सांगून पाहिलें. पण नामदेव शांतपणें ऐकून उलट त्यांनाच परमार्थाच्या गोष्टी सांगून त्यांची समजूत करण्याचा प्रयत्न करीत असे.

दामाशेटी वृद्ध झाल्यावर संसाराचा सर्व भार नामदेवावरच पडला. पण नामदेव संसारोपयोगी कांहींच करीत नसल्यामुळे त्यांच्या घरीं नेहमीं सगळ्याची वानवाच असे.

नामदेवांचें पांडुरंगाशीं अगदीं सख्य होतें. पांडुरंगांला त्याच्यांवांचून अगदीं चैन पडत नसे. पांडुरंग त्याचे एखाद्या लाडक्या मुलाप्रमाणें कोडकौतुक पुरवीत असे. त्यामुळें देव आपल्याशीं दोस्तासारखा बोलतो याचा नामदेवांना थोडासा अहंकार झाला होता. हा अहंकार गुरूपदेशाशिवाय जाणारा नव्हता. ही एवढीच उणीव त्याच्यांत राहिली होतीं.

एकदा ज्ञानदेव वगैरे चारी भावंडं पंढरपुरांत आली असतां मुक्ताईला त्याचा अहंकार जाणवला आणि तिनें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गोरोबाकाकांकडून नामदेवाला कच्चा घट ठरविला. तेव्हां नामदेव रुसून पांडुरंगाकडे गेला आणि त्यानें ती सर्व हकीकत पांडुरंगाला सांगितली. तेव्हां देवानें त्याला सांगितलें, 'अरे नाम्या, गोरोबांनीं केलेली परीक्षा बरोबर आहे. जो सद्गुरूला शरण गेला नाहीं, तो कितीहि मोठा असला तरी तो कच्चाच! तेव्हां तूं आतां सद्गुरूकडे जा. आवंढ्या नागनाथ येथें विसोबा खेचर राहतात. ते तुला उपदेश देतील.'

त्याप्रमाणें नामदेव आवंढ्या नागनाथाला गेले. तेथें विसोबा खेचर देवळांत आहेत असें त्याला समजलें, त्याप्रमाणें नामदेव देवळांत गेला. तो तेथें एक गलितकुष्ठ वृद्ध पुरुष सरळ शंकराच्या पिंडीवरच पाय ठेवून पडलेला त्याला दिसला. त्याच्या पायांत वहाणा होत्या व त्याच्या सकट त्यानें पिंडीवर पाय ठेवले होते. ते पाहून नामदेवाला आश्चर्य वाटलें. तो त्यांच्यापाशीं जाऊन म्हणाला, 'अहो महाराज, आपले पाय शंकराच्या पिंडीवर आहेत, ते खालीं काढून घ्या.'

'बाबारे', विसोबा म्हणाले, 'मी म्हातारा झालों आहे. माझी इंद्रियें माझ्या स्वाधीन नाहींत, तूंच माझे पाय पिंडीवरून काढून जेथें देव नाहीं तेथें ठेव.'

नामदेवांनीं त्याप्रमाणें त्यांचे पाय उचलून खालीं ठेवले. पण खालीं पाहतांत तो पायाखालीं दुसरें शिवलिंग! आश्चर्यचकित होऊन नामदेवांनीं त्यांचे पाय पुन्हा उचलून दुसरीकडे ठेवलें तों तेथेहि शिवलिंग! हा चमत्कार पाहून नामदेवांनीं विसोबांच्या पायावर डोकें ठेवलें.

त्याबरोबर विसोबांनीं आपला वरदहस्त त्यांच्या डोक्यावर ठेवला. त्याबरोबर नामदेवांना ज्ञान प्राप्त झालें. विसोबा म्हणाले, 'देव नाहीं अशी जागा नाहीं हें तुला आतां समजलें ना! पंढरपुरांत असलेला सगुण विठ्ठल सर्वव्यापी आहे.

नंतर विसोबांनीं नमादेवाला अध्यात्माचा उपदेश केला. कांहीं दिवस त्यांच्या सहवासांत घालवून नामदेव पंढरपुरला परत गेले. गुरूचा उपदेश नामदेवानें कितपत आत्मसात केला आहे हें पाहण्याकरितां एक दिवस पांडुरंग कुत्र्याचें रूप घेऊन नामदेव जेवत होता, तेथें गेले. एकाएकी झडप घालून त्या कुत्र्यानें नामदेवांच्या ताटांतली भाकरी पळविली, त्याबरोबर नामदेव तुपाची वाटी घेऊन त्याच्यामागें धावले आणि म्हणाले. 'देवा कोरडी भाकर खाऊं नका. तुमचें पोट दुखेल', तें ऐकून पांडुरंगाची खात्री झाली कीं, सर्वांभूतीं भगवद्भाव आहे हें लक्षण नामदेवाच्या अंगीं पूर्णपणें बाणलें आहे.

एकदां पांडुरंग नामदेवाला म्हणाला, 'नाम्या, तूं माझा प्रिय भक्त आहेस यांत शंका नाहीं. पण केवळ माझ्याच नादीं लागून तूं आपल्या संसाराविषयीं आणि कुटुंबाविषयीं अगदी उदासीन राहावेंस हें बरें नाहीं. आतां थोडेंतरी संसाराकडे लक्ष देत जा.'

देवाच्या या उपदेशांचा नामदेवांना फार राग आला. ते म्हणाले, देवा, आतां कसला संसार आणि कसलं काय? मी संसारावर केव्हांच पाणी सोडलें आहे. आतां पुन्हा मला तूं संसारांत कां गुंतवूं पाहातोस? तुला माझा कंटाळाच आला असेल तर तसं स्पष्ट सांग. मी आपला कोठें तरी निघून जातों.'

असें म्हणून नामदेव खरोखरच पंढरपूर सोडून निघाले. त्याबरोबर त्याची समजूत घालण्याकरितां पांडुरंग त्यांच्या मागून पळत सुटला. त्यानें नामदेवांची पुष्कळ समजूत घातली. पण ते मागे फिरेनात. तेव्हां पांडुरंगानें प्रेमानें त्यांचा हात धरून त्यांना ओढतच पंढरपुरला आणले.

पंढरपुरांत परिसा भागवत नांवाचा एक ब्राह्मण रहात होता. तो रुक्मिणीचा भक्त होता. पुष्कळ वर्षें उपासना केल्यावर तिनें प्रसन्न होऊन त्याला एक परीस दिला. तो त्यानें आपल्या कमळजा नांवाच्या बायकोजवळ दिला, आणि म्हणालां, हा नीट जपून ठेव आणि कोणाजवळ याबद्दल बोलूं नकोस.'

नंतर रोज थोडेसें लोखंड घेऊन तो त्याचें सोनें करीत असे आणि त्या पैशावर तो व्यवस्थित रीतीनें चरितार्थ चालवीत असे. आपली श्रीमंती लोकांना दिसूं नये म्हणून तो फार काळजी घेत असे. एक दिवस चंद्रभागेवरून परिसा भागवताची पत्नी कमळजा आणि नामदेवाची पत्नी राजाई दोघी बरोबर बोलत येत होत्या. बोलतां बोलतां कमळजानें विचारलें, 'राजाई, तुमचा संसार कसा काय चालला आहे?'

'काय सांगूं तुम्हांला? 'राजाई म्हणाली, 'हें सगळी लाजलज्जा सोडून विठ्ठलाच्या भजनीं लागले आहेत. अष्टौप्रहर दुसरं कांहीं नाहीं. घरांत काय आहे पहात नाहींत. लौकीकाची चाड नाहीं. मानापमानाची पर्वा नाहीं. सदा विठ्ठलाजवळ भजनांत दंग! आमची स्थिति अत्यंत वाईट आहे.'

तें ऐकून कमळजा म्हणाली, 'तुझे यजमान विठ्ठलाचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मोठे भक्त असून पांडुरंग त्यांना प्रसन्न आहे असें लोक बोलतात. मग पांडुरंगानें त्यांना चरितार्थांचें कांहीं साधन कसें दिलें नाहीं, तुमचें दारिद्र्य ज्याला दूर करतां येत नाहीं त्या देवाची भक्ति करून काय उपयोग? आमच्या ह्यांना रुक्मिणीनें एक परीस दिला आहे, त्यामुळें आमचें उत्तम चालतें.'

'असं!' राजाई म्हणाली, 'तो परीस असतो तरी कसा, मला दाखवाल का?'

त्याप्रमाणें दुसरे दिवशीं राजाई कमळजेकडे गेल्यावर तिनें परीस दाखविला, मग एक दिवसांत परत करण्याच्या बोलीनें तिनें तो परीस आपल्या घरीं आणला. घरीं आल्यावर राजाईनें थोड्या लोखंडांचें सोनें केलें आणि ते बाजारांत विकून अन्नसामग्री आणली. नामदेव घरीं येतो तों त्याला श्रीमंती थाट दिसला. त्यानें विचारलें, 'आज हे काय?' प्रथम राजाई कांहीं सांगेना. शेवटी नामदेव म्हणाले, 'खरें काय आहे तें समजल्याशिवाय मी अन्नग्रहण करणार नाहीं.'

तें ऐकून सर्व हकीकत सांगून राजाईनें त्याला परीस दाखविला. परीस हातात पडतांच नामदेवानें धूम ठोकली आणि परीस चंद्रभागेच्या डोहांत फेकून दिला. मग घरीं येऊन आरामात भजन करीत बसला. पण आतां काय होणार म्हणून राजाई मानांतून घाबरून गेली.

इकडे परिसा भागवतानें परिस नाहीं असें पाहून बायकोला विचारलें ती म्हणाली, 'परीस राजाईन जरा बघायला नेला आहे, मीं घेऊन येतें तिच्याकडून.'

असें म्हणून ती राजाईकडे आली. तिथे परीसाचीं हकीकत समजतांच ती मटकन खालींच बसली. भानावर येतांच ती मोठमोठ्यानें रडूं लागली. हळूहळू तिथें लोक जमा होऊं लागले. कोणीतरी परिसा भागवतला तें सांगतांच तोहि तेथें आला. नामदेवाच्या घरांत एकच हलकल्लोळ माजून राहिला. परिसा भागवत म्हणाले, 'या लबाड नाम्यानें माझा परीस बघण्याकरितां मागितला आणि आतां खोटंच सांगतो आहे चंद्रभागेंत टाकला म्हणून! यानें माझा परीस चोरला आहे.'

त्यावर नामदेव शांतपणें म्हणाले, मला काय करायचाय तुझा परीस! मी खरंच तो चंद्रभागेच्या डोहांत फेकून दिला. हवं असलं तर पहा डोहांत उतरून.'

तें ऐकून परिसा भागवत फारच चिडला आणि लोकहि हंसूं लागले, तेव्हां नामदेव म्हणाले, 'मीच काढून देतों तुला पाहिजे तर.'

असें म्हणून नामदेवांनीं डोहांत उडी टाकली. आणि एक ओंजळभर दगड घेऊन तें वर आलें. मग ते परिसा भागवताला म्हणाले, 'महाराज, यांतला तुमचा' परीस कोणता तें घ्या ओळखून.'

त्याबरोबर परिसा भागवताने त्यांतला एक दगड उचलून लोखंडाला लावला, तों त्याचें सोनें झालें, दुसरा दगड दुसऱ्या लोखंडांच्या तुकड्याला लावला तर त्याचेंहि सोनें झालें. नमादेवाच्या हातांतले सारेच दगड परिस होते.

तें पाहातांच भाविक लोकांनीं विठ्ठलाचा जयजयकार केला. ज्याचा हस्तस्पर्श होतांच कोठलाहि दगड परीस होतो तो आपल्या परिसाचा कशाला लोभ करील, हा विचार परिसा भागवताच्या मनांत येऊन त्यानें नामदेवास साष्टांग नमस्कार घातला आणि तो म्हणाला, 'महाराज, तुमची योग्यता मला समजली नाहीं. आतां मला परिसाची जरूर नाहीं, तुमचा वरदहस्त माझ्या डोक्यावर ठेवा. मला आतां दुसऱ्या कशाशीच गरज नाहीं.'

मग नामदेवानें हातांतले सगळे परिस चंद्रभागेंत फेकून दिले आणि परिसा भागवताला अनुग्रह देऊन त्याचा उद्धार केला.

नंतर ज्ञानदेव पंढरपूरला आले आणि पांडुरंगाची परवानगी घेऊन ते नामदेवाला घेऊन भारताच्या तीर्थयात्रा करून आले. नंतर श्रीविठ्ठलाची परवानगी घेऊन नामदेव, सोपानदेव, चांगदेव, मुक्ताबाई व निवृत्तिनाथ या सर्वांनीं समाधि घेतल्या. या सर्वं ठिकाणी नामदेव हजर होते. पुढें ते चौपन्न वर्षें जगले. या काळांत त्यांनी भागवतधर्माचा प्रचार केला आणि बरीच अभंगरचना केली. शेवटीं त्यांनीं ई. स० १३५० मध्यें समाधि घेतली. पांडुरंगाच्या देवळांत जाणाऱ्या सर्वं संतांचे पाय आपल्याला लागावें म्हणून नामदेवांनीं महाव्दाराच्या पहिल्या पायरीखालीं समाधि घेतली. त्यांची पुण्यतिथि आषाढ वद्य द्वादशीला होत असते. त्यांची सून लाडाई ही गरोदर असल्यामुळें तिच्याशिवाय नामदेवाच्या कुटुंबांतील बाकीच्या लोकांनांहि तेथेंच समाधि घेतली असे म्हणतात.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जनाबाई

जनाबांई ही नामदेवांच्या घरची दासी. गोदावरीच्या तीरावर गंगाखेड गांवांत दमा नांवाचा एक शूद्र भक्त होता. त्याची मुलगी जनाबाई. स्वप्नांत दृष्टान्त झाल्यानें त्यानें पांच वर्षांच्या जनीला पंढरपूरला नेऊन दामा शेटींच्या स्वाधीन केली. दामाशेटीच्या घराण्यांतील माणसांच्या सहवासामुळेंच जनाबाई मोठी भगवद्भक्त झाली. प्रत्यक्ष नारदांनीं तिला मंत्रोपदेश दिला अशी अख्यायिका आहे.

जनीच्या कामांत देव तिला मदत करीत असे. एकदां देवाचा पीतांबर आणि पदक चोरल्याचा आळ जनीवर आला. त्याबद्दल शिक्षा म्हणून तिला सुळी देण्याकरितां नेलें असतां सुळाचें पाणी झालें. जनाबाईच्या अभंगाचा लेखक खुद्दपांडुरंग होता असें म्हणतात.

जनाबाईचे तीनशें अभंग उपलब्ध आहेत. जनाबाईची भाषा अगदीं सोपी आहे. तीनें ई० सं० १३५० त समाधि घेतली.

बिसोबा खेचर

विसोबा खेचर हे नामदेवांचे गुरु, त्यांचा जन्म इ० स० १३२५ च्या जवळपास झाला. त्यांचें मूळ स्थान आळंदी होते. पण पुढें ते औंढ्या नागनाथ या क्षेत्री स्थायिक झालें. विसोबांचें नांव चाटी. यांनीं ज्ञानदेव वगैरेंचा छळ केला. त्यावेळीं ज्ञानदेवांनी यांना 'या खेचर' म्हणून हांक मारली. तेव्हांपासून यांचें नांव विसोबा खेचर असें पडलें.

पांडुरंगाच्या सांगण्यावरून नामदेव औंढ्या नागनाथांला जाऊन विसोबा खेचरांचा गुरूपदेश घेऊन आला. नामदेवास उपदेश देण्याकरिता यांनीं दोन अभंग केले. यांचे सध्यां पाचपंचवीस अभंगच उपलब्ध आहेत.

विसोबा खेचर बरेच वृद्ध होऊन वारले असें दिसतें. त्याची समाधि औंढ्या नागनाथालाच आहे.

परिसा भागवत

पंढरपुरांत परिसा भागवत नांवाचा एक ब्राह्मण राहात होता. तो नामदेवाच्या समकालीन होय. तो रुक्मिणीचा उपासक होता. त्यानें निष्ठापूर्वक रुक्मिणीची उपासना केल्यावर रुक्मिणीनें त्याला एक परिस दिला. त्यानें तो काळजीपूर्वक जतन करून ठेवला. रोज थोडेसें लोखंड त्याला लावून तो सोनें करीत असे व बाजारांत तें विकून आपला प्रपंच मोठ्या थाटांत चालवीत असे.

एक दिवस परिसा भागवत पुराण सांगत असतां लंकेचा उल्लेख आला. तेव्हां लंका कशी असते असें श्रोत्यांनीं विचारलें. त्यावर 'शास्त्रांत पाहून सांगतो. म्हणून त्यानें सांगितलें. नंतर रुक्मिणीचें ध्यान करून त्यानें लंका पाहण्याची आपली इच्छा व्यक्त केली. रुक्मिणीनें दैवी सामर्थ्यानें त्याला लंकेंत नेऊन सोडलें. फिरत फिरत तो बिभीषणाच्या वाड्यापाशीं आला. तेथें पंढरपूरच्या नामदेवाचें कीर्तन चाललें आहे असें दिसलें. कीर्तनांत नामदेवांनीं सांगितलें, 'जे पंढरीनाथाला शरण गेले, त्यांना अशक्य काय आहे?'

तें ऐकून परिसा भागवताची नामदेवांच्या सामर्थ्याबद्दल खात्री होऊन चुकली. मग त्यानें पंढरपुरांत परत जाण्याची इच्छा व्यक्त केली तेव्हां रुक्मिणीनें त्याला पंढरपुरांत परत आणून सोडलें. दुसऱ्या दिवशीं पुराण सांगतांना त्यानें लंकेचें सर्व वर्णन केलें. त्यावर नामदेव त्याला म्हणाले, 'बिभीषणासारख्या भगवद्भक्ताचें प्रत्यक्ष दर्शन झालें असतां तुम्हीं त्याला नमस्कार सुद्धां न करतां परत कसे आलांत?'

नामदेवांचीं ही स्पष्टोक्ति ऐकतांच परिसा भागवत शरमला. पण त्याचा अभिमान शिल्लक असल्यामुळें तो नामदेवाला शरण गेला नाहीं, नंतर त्यानें रुक्मिणीचें ध्यान केलें, तेव्हां ती आली. परिसा भागवतानें तिला पांडुरंगाचें दर्शन करविण्याबद्दल विनंती केली, तेव्हां ती म्हणाली, 'भगवंताचें दर्शन करविणें माझ्या हातांत नाहीं, तूं अभिमान सोडून नामदेवाला शरण जा तो तुला पांडुरंगाचें दर्शन करवील.'

त्याप्रमाणें परिसा भागवत शेवटीं नामदेवास शरण गेला व त्याच्या उपदेशानें कृतार्थ झाला. त्यांची संतमंडळांत गणना होऊं लागली.

नारा, महादा, गोंदा, विठा, लाडाई, आऊबाई व लिंबाई यांचें चरित्र.

नारा, महादा गोंदा आणि विठा हे नामदेवाचे चार मुलगे, यांचे अभंग प्रसिद्ध आहेत. नामदेवासारख्या थोर सत्पुरुषाच्या मुलांना साजेल अशीच यांची रचना आहे. त्यांत विठाचे अभंग फारच प्रेमळ आहेत. आऊबाई ही नामदेवांची बहीण. लिंबाई ही त्याची मुलगी व लाडाई ही त्यांची सून नारायणाची बायको. यांचेहि अभंग सरस आहेत.

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विषयानुक्रमणिका

भाग पहिला

मंगलाचरण १

बालक्रीडास्तुति-देवाची नामदेवावर कृपा-हरिगुण वर्णन श्रवणफल-धर्मग्लानीसंबंधीं ब्रह्मादि देवांचे क्षीराब्धीशीं गमन-आकाशवाणी-भगवान आणि शेष यांचा संवाद-वसुदेवदेवकी-विवाहसमयीं झालेली आकाशवाणी आणि नारदाचें कंसाशीं भाषण-भगवंताचा देवकीहृदयीं प्रवेश-भगवान प्रगटतेसमयींची आनंद परिस्थिति-भगवद्रूप-वर्णन-देवकी वसुदेव चिंता-श्रीभगवान व वसुदेव यांचें गोकुळीं नंदाघरीं प्रयाण व मथुरेस-बंदिखानीं मायेचें आगमन-कंसाचें कारागृहीं आगमन, कंसविचार-जातक कर्मसंस्कार-बाळलेणें संस्कार-नंदवसुदेवभेट-भगवंत पालथा पडूं लागला त्या वेळीं नंदानीं केलेला उत्साह, तृणावर्तवध-गर्गवर्णितभविष्य-श्रीकृष्ण व बलराम यांची बाललीला-मंथनपात्र ताडण-उखळीबंधन-विमलार्जुनोद्धार-यशोदेशीं मायाच्छादन-श्रीकृष्ण गोपी-संवाद-यशोदासंकटचतुर्थी व्रत-वनविहार-वत्सासुर व बकासुरवध-अघासुरवध-धेनुकासुरवध-प्रणवाप्रलंबासुर-वध-यज्ञान्न मागण्याविषयीं आज्ञा-इंद्रगर्वपरिहार-गोपास वैकुंठदर्शन-श्रीकृष्ण गोपीखेळ-श्रुतिरूपी गोपींचा श्रीकृष्ण शोध-गोपींची प्राणांतिक अवस्था-श्रुतिरूपी गोपींनीं भगवंताची केलेली स्तुति-श्रुतिरूपी गोपींवर भगवंताची दया-जलक्रीडा-शंखचूडाचा वध-वृषभ-रूपधारी रिठासुराचा वध-नारदाचें कृष्णनंदादिकांस सांगणें-व्योमासुर वध-अक्रुराचे मनाशीं उद्गार-बलराम व अक्रूर यांची भेट-श्रीकृष्णाचें मथुरेशीं प्रयाण व तन्निमित्त गोपींचा शोक-रजकवध, कुब्जा-प्रसाद, सुदामा माळ्याची विनवणी-कुवलयपीड हत्तीचा उद्धार-कंसवध-उग्रसेनराज्यस्थापना-रामकृष्णाचें मौंजि-बंधन-गुरूची बुडालेल्या पुत्राची मागणी व पांचजन्यवध, गोकुळाची उदासस्थिति-उद्धवाचें गोकुळीं प्रयाण-गोकुळाचा शोकाकुल देखावा-यशोदास्थिति-गोकुळींचें समाधान-अक्रूराचा धृतराष्ट्रास उपदेश-कुंतीचा कृष्णास निरोप-कुंतीचें अक्रुरानें केलेलें शांतवन १ — ३१

श्रीकृष्णलीला-विहरिणी-जातें-हुंबरी ३१ — ४३

श्रीराममाहात्म्य-रामचरित्र ४३ — ४८

श्रीविठ्ठलमाहात्म्य-श्रीविठ्ठल-पुंडलिक-संवाद ४८ — ५७

पंढरीमाहात्म्य-पंढरीची युगसंख्या ५७ — ६५

श्रीविठ्ठलस्तुति आणि भक्तवत्सलता ६५ — ७७

शिवरात्रमाहात्म्य ७७ — ८४

तुळशीमाहात्म्य ८४ — ८५

चोवीस नामांचा महिमा-गंगामाहात्म्य ८५ — ८८

नाममहिमा ८८ — १०७

संतमहिमा १०७ — ११२

भाग दुसरा

श्रीज्ञानदेवमहाराजांची आदि ११३ — ११८

तीर्थावळी ११८ — १३६

श्रीज्ञानेश्वरसमाधिमहिमा-[१] १३६ — १५६

श्रीज्ञानदेवमहाराजांची समाधि-[२] १५६ — १६३

श्रीसोपानदेवमहाराजांची समाधि १६३ — १७०

श्रीचांगदेवमहाराजांची समाधि १७० — १७४

श्रीमुक्ताईची समाधि १७४ — १७६

श्रीनिवृत्तिनाथमहाराजांची समाधि १७६ — १८०

श्रीज्ञानदेवमहाराजांच्या भेटीविषयी नामदेवाची आळ १८० — १८२

भाग तीसरा

श्रीज्ञानदेवचरित्र-कुलजन्मवृत्त-श्रीविठ्ठलानें मातृदैवता-विषयीं नामदेवास केलेला बोध-दामाशेटी व नामदेव यांचा संवाद-रखुमाईकडून विठोबाला राजाईचा निरोप-राजाईचा निश्चय-नामदेव, राजाई व विठ्ठल यांचा संवाद-नामदेव भक्तिगर्वपरिहार-श्रीविसोबा खेचर यांचा नामदेवास बोध-गुरुस्तुति-नामदेवाचा निश्चय पाहून पांडुरंग स्वत: अभंग लिहिण्यास बसले-नामदेवाची शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा-चौऱ्यांशी कोटी साठ लक्ष पुरी झाली- १८२ — २११

आत्मसुखाविषयी आर्त्तोद्गार- २११ — २१३

नवविधाभक्ति—

श्रवण-कीर्तन-भावभक्त्युद्गार २१३ — २१९

स्मरण-नाम-प्रेम २१९ — २२४

अर्चन, वंदन-भेट २२४ — २२८

पादसेवन-चरणसेवा २२८ — २३२

दास्य-शरणागतस्थिति-प्रेमकलह २३१ — २३८

सख्य-करुणा, मागणें २३८ — २४८

आत्मनिवेदन-कृपादान-आत्मज्ञानप्राप्ति २४८ — २५९

भाग चौथा

उपदेश-कलिप्रभाव २५९ — २६१

भक्तिस्तोम माजविणाऱ्या वेषधाऱ्यांस उपदेश २६१ — २६६

अन्यदैवतांच्या उपासकांस उपदेश २६६ — २६८

खलदुर्जनांस उपदेश २६८ — २६९

जनांस उपदेश २६९ — २७४

सांसारिकांस उपदेश २७४ — २७८

मुमुक्षूंस उपदेश २७८ — २८८

मनास उपदेश २८८ — २९१

समाधियोगनिषेध २९१ — २९२

प्रारब्धगति २९२ — २९३

रूपकरूपी उपदेश— २९३ — ३००

हिंदुस्थानी पदें ३०० — ३१२

भाग पांचवा

पौराणिक चरित्रें व कथानकें— ३१२ — ३५०

उपदेश-कलिप्रभाव ३५१ — ३६८

भूपाळ्या, आरत्या— ३६८ — ३७१

भाग सहावा

जनाबाईचे अभंग— ३७१ — ४०५

नाराचे अभंग— ४०५ — ४०६

महादाचे अभंग— ४०६

गोंदाचे अभंग— ४०६—४११

विठाचे अभंग— ४११—४२०

आऊबाईचा अभंग ४२०

लिंबाईचा अभंग ४२०

लाडाईचा अभंग ४२०

परिसा भागवताचे अभंग ४२०—४२४

विसोबा खेचराचे अभंग ४२४

अभंगाचा वर्णानुक्रम १—१६

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

॥ श्री ॥

॥ श्रीनामदेवांची गाथा ॥

॥ श्रीगणाधिपतये नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥
श्रीगणपतीला नमस्कार असो. श्रीसरस्वतीला नमस्कार असो. श्रीगुरूंना नमस्कार असो.

मंगलाचरण

१. प्रथम नमन करूं गणनाथा। उमाशंकराचिया सुता। चरणावरी ठेवूनि माथा। साष्टांगीं आतां दंडवत॥ १ ॥ दुसरी वंदूं सारजा। जे चतुराननाची आत्मजा। वाक्सिद्धि पाविजे सहजा। तिच्या चरणवोजा दंडवत॥ २ ॥ आतां वंदूं देव ब्राह्मण। ज्यांचेनि पुण्यपावान। प्रसन्न होऊनी श्रोतेजन। त्यां माझें नमन दंडवत॥ ३ ॥ आतां वंदूं साधु सज्जन। रात्रंदिवस हरिचें ध्यान। विठ्ठल नाम उच्चारिती जन। त्यां माझें नमन दंडवत॥ ४॥ आतां नमूं रंगभूमिका। कीर्तनीं उभें होती लोकां। टाळ मृदंग श्रोते देखा। त्यां माझें दंडवत॥ ५॥ ऐसें नमन करोनि सकळां। हरिकथा बोले बोबड्या बोला। अज्ञान म्हणोनि आपल्या बाळा। चालवी सकळां नामा म्हणे॥ ६ ॥

२. प्रथम नमूं गजवदनु। गौरीहराचा नंदनु। सकळ सुरवरांचा वंदनु। मूषकवाहनु नमियेला॥ १ ॥ त्रिपुरावधीं गणाधिपति। हरे पूजिला भावें भक्ति। एके बाणे त्रिपुर पाडिला क्षितीं। तैं पशुपति संतोषला॥ २ ॥ इंद्रादिकी अष्टलोकपाळी। लंबोदरू पूजिला कनककमळीं। त्यासी प्रसन्न झाला तयेवेळीं। म्हणवूनी सकळीं पूजियेला॥ ३ ॥ सटवें रात्रीं मदनु शंभरें नेला। प्रद्युम्न समुद्रामाजी टाकिला। तैं कृष्णें विघ्नहरु पूजिला। प्रद्युम्न आला रतीसहित॥ ४॥ पूजिला साही चक्रवर्ती। त्यांचिया पुरती आर्ती। युधिष्ठिरें पूजिला चतुर्थी। राज्य प्राप्ति झाली तया॥ ५ ॥ म्हणवूनि सुरवरीं केली पूजा। त्रिभुवनीं आणिक नाही दुजा। विष्णुदास नामा म्हणे स्वामि माझा। भावे भजा एकदंता॥ ६ ॥

३. गणेश नमूं तरी तुमचा नाचणा। म्हणोनि नारायणा नमन माझें॥ १ ॥ सारजा नमूं तरी तुमची गायणी। म्हणोनि चक्रपाणि नमन माझें॥ २ ॥ इंद्र नमूं तरी तुमचिया भुजा। म्हणोनि गरुडध्वजा नमन माझें॥ ३ ॥ ब्रह्मा नमूं तरी तुमचिये कुसी। म्हणोनि हृषिकेशी नमन माझें॥ ४॥ शंकर नमूं तरी तुमची विभूति। म्हणोनि कमळापति नमन माझें॥ ५॥ वेद नमूं तरी तुझाचि स्थापित। म्हणोनि लक्ष्मीकांत नमन माझें॥ ६ ॥ गंगा नमूं तरी तुमच्या अंगुष्ठीं। म्हणोनि जगजेठी नमन माझें॥ ७॥ लक्ष्मी नमूं तरी तुमच्या पायांतळीं। म्हणोनि वनमाळी नमन माझें॥ ८॥ ऐसें नमन माझें सकळिकां देवा। नामा म्हणे केशवा नमन माझें॥ ९॥

४. गाण जरी म्हणों तरी गणेश सारजा। आणिक नाहीं दुजा तयावांचूनी॥ १॥ नाचणू म्हणों तरी तांडववनीं महेश्वरू। तो एक नृत्यकारू करूं जाणे॥ २॥ बोलका म्हणों तरी बोलके वेद चारी। त्याणें काय उरी जें मी बोलों॥ ३॥ जाणु म्हणों तरी अठराही जाणे। त्यापैं काय उणें जें मी जाणों॥ ४॥ कलावंत म्हणों तरी चंद्र सूर्य दोन्ही। बारा सोळा गगनीं दाविताती॥ ५॥ नामा म्हणे सर्व अवघे वंचले। केशवें आपुलें म्हणावें मातें॥ ६॥

बालक्रीडा.

स्तुति.

५. लंबोदरा तुझा शोभे शुंडादंड। करितसे खंड दुश्चिन्हांचा॥ १॥ चतुर्थ आयुधें शोभताती हातीं। भक्ताला रक्षिती निरंतर॥ २॥ भव्य रूप तुझें उंदीरवाहना। नमन चरणा करीतसे॥ ३॥ तुझें नाम घेतां दोष जळताती। कळिकाळ कांपती तुझ्या नामें॥ ४॥ चौदा विद्या तुझे कृपेनें येतील। मुके

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बोलतील वेदघोष॥ ५ ॥ रूणझुण पायीं वाजताती वाळे। ऐकोनि भुललें मन माझें॥ ६ ॥ भक्तवत्सला ऐकें पार्वतीनंदना। नमन चरणां करितसे॥ ७॥ नामा म्हणे आतां देई मज स्फूर्ती। वर्णितसे कीर्ति कृष्णजीची॥ ८॥

६. सरस्वती माते द्यावी मज स्फूर्ती। येतों काकुळती तुजलागीं॥ १ ॥ लाडकें लडिवाळ मागतसें तुज। वंदीन हे रज चरणींचे॥ २ ॥ त्वरें येवोनियां मस्तकीं ठेवीं हात। जाईल ही भ्रांत तेव्हां माझी॥ ३ ॥ आपुल्या बाळासी धरी आतां हातीं। न करी फजिती जनामध्यें॥ ४॥ विश्वात्मा जो हरि त्याची वर्णीन कीर्ति। आवडीचा ओती रस यातें॥ ५ ॥ ऐकोनियां स्तव झालीसे प्रसन्न। नाम्या तुझा अभिमान मजलागीं॥ ६ ॥

७. प्रल्हाद नारद पराशर पुंडरीक। व्यास आणि वाल्मिक नमीयले॥ १ ॥ बगदालभ्य तो भीष्म अंबरीष शौनक। ब्रह्मनिष्ठ शुक नमीयले॥ २॥ रुक्मांगद अर्जून वसिष्ठ बिभीषण। केलेंसे नमन याजलागीं॥ ३ ॥ टीकाकार श्रीधर बहिरंभट चतुर। करा निरंतर कृपा मज॥ ४॥ साधुसंतसिद्ध शिरीं ठेवा हात। वर्णीन समस्त कृष्ण लीला॥ ५ ॥ नामा मनीं आठवी खेचरचरण। तयाच्या कृपेनें सिद्धि जावो॥ ६ ॥

८. देवा आदिदेवा सर्वत्रांच्या जीवा। ऐके वासुदेवा दयानिधी॥ १ ॥ ब्रह्मा आणि इंद्रा वंद्य सदाशीवा। ऐकें वासुदेवा दीनबंधु॥ २॥ चौदा लोकपाळ करिती तुझी सेवा। ऐकें वासुदेवा कृपासिंधु॥ ३ ॥ योगियांचे ध्यानीं नातुडसी देवा। ऐकें वासुदेवा जगद्गुरु॥ ४॥ निर्गुण निर्विकार नाहीं तुज माया। ऐकें कृष्णराया कानडिया॥ ५ ॥ करुणेचा पर्जन्य शिंपी मज तोया। ऐकें कृष्णराया गोजरीया॥ ६ ॥ नामा म्हणे जरी दाखविशील पाया। तरी वदावया स्फूर्ति चाले॥ ७॥

९. क्षीरसागरांत असासी बैसला। धांवोनि मजला भेटी देई॥ १ ॥ कैलासी शीव पूजितसे तुजला। धांवोनी मजला भेटी देई॥ २॥ शेषावरी जरी असासी निजला। धांवोनी मजला भेटी देई॥ ३॥ गहिंवरोनि नामा बाहात विठ्ठला। धांवोनी मजला भेटी देई॥ ४॥

१०. चक्रवाक पक्षी वियोगें बाहाती। झालें मजप्रती तैसें आतां॥ १ ॥ चुकलिया माय बाळकें रडती। झालें मजप्रती तैसें आतां॥ २॥ वत्स न देखतां गाई हुंबरती। झालें मजप्रती तैसें आतां॥ ३॥ जीवनावेगळे मत्स्य तळमळती। झालें मजप्रती तैसें आतां॥ ४॥ नामा म्हणे मज ऐसे वाटे चित्तीं। करीतसे खंती फार तुझी॥ ५॥

११. काय माझा आतां पाहातोसी अंत। येई बा धांवत देवराया॥ १॥ माझ्या जीवा होय तुजविण आकांत। येई बा धांवत देवराया॥ २॥ असे जरी काम भेटूनियां जात। येई बा धांवत देवराया॥ ३ ॥ येरे देवा आतां नामा तुज बाहात। येई बा धांवत देवराया॥ ४॥

१२. न वर्णवे वाचे जन्ममरण दुःख। दावीं आतां मुख पांडुरंगा॥ १ ॥ कुरळिया केश भाळीं शोभे टिळक। दावीं आतां मुख पांडुरंगा॥ २॥ भोवया व्यंकटा शोभती सुरेख। दावी आतां मुख पांडुरंगा॥ ३॥ कमलाकार नेत्र सुंदर नासीक। दावीं आतां मुख पांडुरंगा॥ ४॥ कर्णींचीं कुंडलें न वर्णवे हाटक। दावीं आतां मुख पांडुरंगा॥ ५॥ आधर आरक्त दंत इंदुहूनि अधिक। दावीं आतां मुख पांडुरंगा॥ ६॥ विष्णुदास नामा तुझेंचि बाळक। दावीं आतां मुख पांडुरंगा॥ ७॥

१३. बाहुबळें तुवां काढिलें अमृत। ठेवीं बा तो हात शिरावरी॥ १ ॥ जननी माझी जेव्हां ज्याकडे बाहात। ठेवी बा तो हात शिरावरी॥ २॥ देवा बैसवोनि शुद्ध तें वाढीत। ठेवीं बा तो हात शिरावरी॥ ३॥ क्षीराचा सागर उपमन्यूशीं देत। ठेवीं बा तो हात शिरावरी॥ ४॥ घेवोनियां चक्र परीक्षिता रक्षति। ठेवी बा तो हात शिरावरी॥ ५॥ कवटाळूनी धरिलें ध्रुवासी वनांत। ठेवीं बा तो हात

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शिरावरी ॥ ६ ॥ विदुराच्या घरीं कण्या सांभाळीत। ठेवीं बा तो हात शिरावरी ॥ ७ ॥ चिरंजीव करूनिया नगरी सुवर्ण देत। ठेवीं बा तो हात शिरावरी ॥ ८ ॥ नामा म्हणे युद्धीरक्षियेला पार्थ। ठेवीं बा तो हात शिरावरी ॥ ९ ॥

१४. रुणझुण पायीं वाजताती वाळे। दावीं तीं पाऊलें दयानिधी ॥ १ ॥ जनक याचे घरी चालूनियां गेले। दावीं तीं पाऊलें दयानिधी ॥ २ ॥ गजा धरिलें नक्रें तेव्हां जे धांवले। दावीं तीं पाऊलें दयानिधी ॥ ३ ॥ वस्त्रहरणीं ज्यातें द्रौपदीनें चिंतीलें। दावी तीं पाऊलें दयानिधी ॥ ४॥ देखोनियां ज्यांतें कौरव भ्याले। दावीं तीं पाऊलें दयानिधी ॥ ५ ॥ धर्म आणि भीष्म विदुरादिक धाले। दावीं तीं पाऊलें दयानिधी ॥ ६ ॥ स्वयंवराशी जातां शीळे उद्धरिलें। दावीं तीं पाउलें दयानिधी ॥ ७ ॥ नामा म्हणे ज्यातें बळीनें पूजिलें। दावीं तीं पाऊलें दयानिधी ॥ ८ ॥

१५. अडखळूनी पडशी घालूं नको जोडा। धांवत दुडदुडा येई आतां ॥ १ ॥ बैसावयासाठीं घेऊं नको घोडा। धांवत दुडदुडा येई आतां ॥ २ ॥ भोजना बैसलासी येथें घेई विडा। धांवत दुडदुडा येई आतां ॥ ३ ॥ बाहुबळे काढिला देवांचा जो खोडा। धांवत दुडदुडा येई आतां ॥ ४ ॥ कृपाळु बहुत लक्ष्मीचा जोडा। त्याला बाहतसे वेडा नामदेव ॥ ५ ॥

१६. येरे येरे देवा तुला देईन मी पेडा। वेगी वाहे वेडा नामदेव ॥ १ ॥ ज्याचे पायी असे बिरुदाचा तोडा। त्याला वाहे वेडा नामदेव ॥ २ ॥ जनी पुसे सुखी रखुमाईचा जोडा। त्याला बाहे वेडा नामदेव ॥ ३ ॥ यावयासी येथें आळस तुम्हीं सोडा। घेईन इडापिडा नामा म्हणे ॥ ४ ॥

देवाचें गुणवर्णन करतांना नामदेवाची समाधि

१७. युगा ऐसें पळ तुजविण जाय। पाहातोसी काय अंत माझा ॥ १ ॥ कोमळ हृदय तुझें पंढरीच्या राया। कठिण सखया कैसें झालें ॥ २ ॥ विचारिलें चित्तीं दुर्लभ हरिहरा। जाऊं कैसा घरा रंकाचिया ॥ ३ ॥ अंगिकारावरी अव्हेराची मात। नव्हे हें उचित देवराया ॥ ४ ॥ मागें जे कां आळी केली वासुदेवा। उदारा केशवा पुरविली ॥ ५ ॥ नुपेक्षिसी आतां भरंवसा चित्तास। आशेची निरास झाली दिसे ॥ ६ ॥ वांचोनिया दुःख भोगावें म्यां आतां। प्राणांसी मुक्तता हेंचि भलें ॥ ७ ॥ वर्णितां नामा झाला समाधिस्त। जहालें विदित पांडुरंगा ॥ ८ ॥

देवाची नामदेवावर कृपा.

१८. त्वरें धांवोनियां आलासे गोविंद। सावध सावध नामदेवा ॥ १ ॥ रुसलासे नामा देवासी न बोले। करें कुर्वाळिलें वदन तेव्हां ॥ २ ॥ समजावूनि देवें धरिला पोटासीं। बोलें मजपाशीं नामदेवा ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा उशीर कां केला। किंवा माझा आला राग तुला ॥ ४ ॥

नामदेवाची हरिगुणवर्णनाची उत्सुकता.

१९. वेळोवेळां तुज बाहे वेडा भक्त। राहोनि निवांत क्षण एक ॥ १ ॥ मागें बहुतांनीं केले रे प्रबंध। तुझे पाहुनि छंद वेडावलों ॥ २ ॥ माथां ठेऊनि हात बोले विश्वाचा जो बाप। वर्णी रे प्रताप नामदेवा ॥ ३ ॥

हरिगुणवर्णनश्रवणफल.

२०. करील जो प्रश्न सांगेल जो कथा। श्रवण करितां उद्धरती ॥ १ ॥ कथा भागिरथी स्नान जे करिती। त्याचे उद्धरती पूर्वज ते ॥ २ ॥ भागिरथी स्नाना श्रम लागे फार। करावें एकाग्र मन येथें ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसें बोले भागवत। शुक सांगतसे परीक्षिती ॥ ४ ॥

धर्मग्लानीसंबंधी ब्रह्मादि देवांचें क्षीब्धीशीं गमन.

२१. पापी जे अभक्त दैत्य ते माजले। धरणीसी झालें ओझें त्यांचें ॥ १ ॥ दिधलासे त्रास ऋषि मुनि सर्वां। न पूजिती देवा कोणी एक ॥ २ ॥ राहियेले यज्ञ मोडिलें कीर्तन। पळाले ब्राह्मण दैत्यां भेणें ॥ ३ ॥ वत्सरूपीं पृथ्वी ब्रह्मयापाशीं जाय। नेत्रीं वाहे तोय सांगतसे ॥ ४ ॥ बुडविला धर्म अधर्म झाला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

फार। सोसवेना भार मज आतां॥ ५॥ ब्रह्मा इंद्र आणि बरोबरी शीव। चालियेले सर्व क्षीराब्धीशीं॥ ६॥ नामा म्हणे आतां करितील स्तुति। सावधान चित्तीं परिसावें॥ ७॥

ब्रह्मादि देवांनीं भगवंताची केलेली स्तुति.

२२. वासुदेवा हृषिकेशा माधवा मधुसुदना। करिताती स्तवना पुरुषसूक्तें॥ १॥ पद्मनाभ त्रिलोकेशा वामना शेषशायी। आम्हां कोणी नाहीं तुजवीण॥ २॥ जनार्दना हरि श्रीवत्स गरुडध्वजा। पाव अधोक्षजा आतां आम्हां॥ ३॥ वराहा पुंडरीका नृसिंह नरांतका। वैकुंठनायका देवराया॥ ४॥ अच्युता शाश्वता अनंता अज अव्यया। कृपेच्या अभया देई आम्हां॥ ५॥ नारायणा देवाध्यक्षा कैठभभंजना। करीरे मर्दना दुष्टाचिया॥ ६॥ चक्रगदाशंखपाणि नरोत्तमा। पाव पुरुषोत्तमा दासा तुझ्या॥ ७॥ नामा हयग्रीवा भीमा रौद्रोद्भवा। आश्रय भूतां सर्वां तुझा असे॥ ८॥ श्रीधरा श्रीपति चतुर्बाहो मेघःशामा। लेकुरें आम्ही आम्हा पाव त्वरें॥ ९॥ नामा म्हणे ऐसें करितां स्तवन। तोषला भगवान क्षीराब्धित॥ १०॥

आकाशवाणी

२३. आकाशीची वाणी सांगे सकळांसी। तळमळ मानसीं करूं नका॥ १॥ देवकीच्या गर्भा येईल भगवान। रक्षील ब्राह्मण गाई भक्त॥ २॥ उतरील भार मारील दैत्यांसी। आनंद सर्वांसी करील तो॥ ३॥ रोहिणी उदरीं शेषबळिभद्र। यादव समग्र व्हारे तुम्ही॥ ४॥ ऐकोनिया ऐसे आनंद मानसी। येती स्वस्थळासी नामा म्हणे॥ ५॥

अवतारविचार-भगवान आणि शेष यांचा संवाद.

२४. शेषाप्रती बोले लक्ष्मीच तो वर। चला अवतार घेऊं आतां॥ १॥ पृथ्वीवरी दैत्य माजिले ते फार। गान्हाणें सुरवर सांगू आले॥ २॥ शेष म्हणे मज श्रम झाले फार यालागीं अवतार मी नघेचि॥ ३॥ राम अवतारी झालों लक्ष्मुमण। सेविलें अरण्यतुम्हासवें॥ ४॥ चौदा वर्षावरी केलें उपोषण। जाणतां आपण प्रत्यक्ष हें॥ ५॥ नामा म्हणे ऐसे वदे धरणीधर। हांसोनी श्रीधर काय बोले॥ ६॥

शेष आणि लक्ष्मी यांस भगवंताची आज्ञा.

२५. पूर्वीं तूं अनुज झालासी कनिष्ठ। सोसियेले कष्ट मजसवें॥ १॥ आतां तूं वडील होईगा सर्वज्ञा। पाळीन मी आज्ञा तुझी बारे॥ २॥ देवकी उदरीं राहावें जावोनी। मायेसी मागूनि पाठवितो॥ ३॥ योगमाया तुज काढील तेथून। घालील नेऊन गोकुळासी॥ ४॥ लक्ष्मीशीं सांगे तेव्हां हृषीकेषी। कौंडण्यपुराशी जावें तुम्ही॥ ५॥ नामा म्हणे ऐसा करूनि विचार। घ्यावया अवतार सिद्ध असे॥ ६॥

वसुदेव देवकी विवाहसमयीं झालेली आकाशवाणी आणि नारदाचें कंसाशीं भाषण.

२६. वासुदेवा देत देवकी बहीण। लग्नामध्यें विघ्न झालें ऐका॥ १॥ आकाशीची वाणी सांगतसे कंसा। मानी भरंवसा हा बोलण्याचा॥ २॥ आठवा इचा पुत्र वधील तुजसी। ऐकोनि मानसीं क्रोधावला॥ ३॥ घेऊनिया खड्ग माराया धांवला। हात तो धरीला वसुदेवें॥ ४॥ देईन मी पुत्र सत्य माझें माना। ठेवा बंदीखानीं दूता सांगे॥ ५॥ पुण्य सारावया भेटे देवऋषी। वधी बाळकांसी ठेवूं नको॥ ६॥ होतांचि प्रसूत नेऊनिया देत। साहाही मारीत दुराचारी॥ ७॥ धन्य त्याचें ज्ञान न करीच शोक। वधिता बालक नामा म्हणे॥ ८॥

भगवंतांची योगमाया-सातवा गर्भ रोहिणी उदरीं घालणें.

२७. सातवा जो गर्भ योगमाया नेत। आश्चर्य करीत मनामाजीं॥ १॥ रोहिणी उदरीं नेवोनि घातला। न कळे कोणाला देवावीण॥ २॥ कंसाचिया भेणें यादव पळाले। ब्राह्मण राहिले अरण्यांत॥ ३॥ नाहीं कोणा सुख तळमळ मानसीं। वधील दुष्टासी कोण आतां॥ ४॥ विश्वाचा जो आत्मा कळेल तयाला। दावितसे लीला संभूतीची॥ ५॥ अहर्निशीं ध्यान भक्ताचे मानसीं। स्थापील धर्मासी नामा म्हणे॥ ६॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भगवंतांचा देवकी हृदयीं प्रवेश.

२८. देवकीचें तेज दिसे जैसा सूर्य। कंसाचें हृदय जळतसे॥ १॥ हरणें पळती देखोनिया व्याघ्र। कांपे थरथर तयापरी॥ २॥ अजासर्पन्यायें कीटकभ्रमर। दिसती नारीनर कृष्णरूप॥ ३॥ जेवितां बोलतां शेजेसी तो निजे। आला आला मज मारावया॥ ४॥ नासील हा आतां दैत्यांचें तें बंड। फाटलीसे गांड तेव्हां त्याची॥ ५॥ नामा म्हणे भय लागलेंसें ध्यान। चराचरी कृष्ण दिसतसे॥ ६॥

देवकीगर्भस्तुति.

२९. विमानांची दाटी अंतरिक्षी देव। करिताती सर्व गर्भस्तुति॥ १॥ सत्रा अक्षरांत असे तुझी मूर्ती। यज्ञेशा तुजप्रती नमो नमो॥ २॥ साहाजणें भांडती नवजणी स्थापिती। न कळे कोणाप्रती अंत तुझा॥ ३॥ अठराजणें तुझी वर्णिताती कीर्ति। गुणातीत श्रीपती नमो तुज॥ ४॥ चौघां जणां तुझा न कळेचि पार। श्रमसी वारंवार आम्हांसाठीं॥ ५॥ अठ्यांशी सहस्र वर्णिताती तुज। ब्रह्मांडाचें बीज तुज नमो॥ ६॥ जन्ममरणाचें नाहीं तया भय। आठविती पाय तुझे जे कां॥ ७॥ नवजणी तुझ्या पायीं लोळताती। परब्रह्म मूर्ति तुज नमो॥ ८॥ नामा म्हणे ऐशी करिताती स्तुती। पुष्पें वाहुनि जाती स्वस्थळासी॥ ९॥

भगवान प्रकटते समयींची आनंद परिस्थिति.

३०. मयूरादि पक्षी नृत्य करिताती। नद्या वाहताती दोही थड्या॥ १॥ भूमीवरी सडे केशर कस्तुरी। आनंद अंतरीं सकळांच्या॥ २॥ विमानांची दाटी सुरवर येती। गंधर्व गाताती सप्तस्वरें॥ ३॥ मंदमंद मेघ गर्जना करिती। वाद्यें वाजताती नानापरी॥ ४॥ नामा म्हणे स्वर्गी नगारे वाजती। अप्सरा नाचती आनंदानें॥ ५॥

अवतीर्णकालपरिस्थिति व श्रीभगवान प्रगटता.

३१. दशरथें मारिला तोचि होता मास। वर्षा ऋतु असे कृष्णपक्ष॥ १॥ वसूनाम तिथीं बुधवार असे। शुक सांगतसे परीक्षिती॥ २॥ रोहिणी नक्षत्र दोन प्रहररात्र। माया घाली अस्त्र रक्षपाळा॥ ३॥ नवग्रह अनुकूल सर्वांचें जें मूळ। वसुदेव कपाळ धन्य धन्य॥ ४॥ जयाचा हा वंश तयासी आनंद। माझ्या कुळीं गोविंद अवतरला॥ ५॥ अयोनीसंभव नोहे कांहीं श्रमी। नामयाचा स्वामी प्रगटला॥ ६॥

भगवद्रूपवर्णन.

३२. कोटिशा आदित्य गोठे एके ठायीं। तेजें दिशा दाहि उजळल्या॥ १॥ घाबरा होऊनी वसुदेव पाहे। हृदयीं आश्चर्य करितसे॥ २॥ मुकुटावरी रत्न नक्षत्रांचा मेळा। भाळीं शोभे टिळा केशराचा॥ ३॥ व्यंकटा भ्रुकुटी कमलाकार नेत्र। नासिक विचित्र शुकचंचु॥ ४॥ विद्युल्लते ऐसी झळकती कुंडलें। अधर कोवळें अरुणोदय॥ ५॥ कंबुग्रीव कंठ हृदयीं वच्छलांच्छन। ब्रह्मयासी सीण न कळे अंत॥ ६॥ चतुर्भुज शंखचक्रगदापद्म। चिमणा मेघःशाम वर्ण ज्याचा॥ ७॥ कौस्तुभ निर्मळ वैजयंती माळा। कासे सोनसळा हाटकवर्ण॥ ८॥ रुणझुण रुणझुण वाजताती वाळे। आरक्त वर्तुळ नखीं शोभा॥ ९॥ ध्वजवज्रांकुश जैसी रातोत्पळें। नामा म्हणे डोळे दिपताती॥ १०॥

वसुदेव संकल्प.

३३. अयुत गायी ब्राह्मणासी। सोडी संकल्प मानसीं॥ १॥ ओळखिलें तुज। आतां कळलासी मज॥ २॥ धर्म स्थापावया। येथें येसी देवराया॥ ३॥ आलिंगितां दोहीं बाही। नामा म्हणे डोई पायीं॥ ४॥

देवकीवसुदेव चिंता.

३४. सोडी सोडी मिठी। लपवा लपवा जगजेठी॥ १॥ झणी कंसासी कळेल। माझ्या बाळासी मारील॥ २॥ वसुदेव चिंता मनीं। तेज न माये गगनीं॥ ३॥ नामा म्हणे आलें हासें। देव तेव्हां सांगतसे॥ ४॥

भगवंताची वसुदेवास आज्ञा.

३५. नंदाच्या घराला। मज नेई गोकुळाला॥ १॥ माया उपजली तेथें। ठेवी मज आणी येथें॥ २॥ म्हणसी असे रक्षपाळ। ते म्यां मोहिले सकळ॥ ३॥ आच्छादित रूप। नामा म्हणे माझा बाप॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रीभगवान व वसुदेव यांचे गोकुळीं नंदाघरीं प्रयाण व मथुरेस बंदिखानीं मायेचें आगमन.

३६. उचलिला कमळापती। पायींचीं बंधनें गळती॥ १॥ त्रैलोक्यांत जो न माय। त्यासी बंधन करील काय॥ २॥ कवाडें उघडती। देखतांची देवाप्रती॥ ३॥ मंद मंद पडे पाऊस। शिरीं छाया करी शेष॥ ४॥ पूर चढला अचाट। त्यासी लाविला अंगुष्ठ॥ ५॥ त्वरें आला नंदाघरीं। निद्रिस्त त्या नरनारी॥ ६॥ ठेवी तेथें कृष्णजीला। माया घेऊनि निघाला॥ ७॥ रडे माया करी आकांत। नामा म्हणे उठती दूत॥ ८॥

नंदसुकृतसामर्थ्य.

३७. पूर्णब्रह्म मानी कंसाच्या भयासी। वाटेल मानसी कोणाचिया॥ १॥ इच्छामात्रें करी सृष्टीचा प्रलय। त्यासी असे भय कवणाचें॥ २॥ नंदाचें सुकृत झालें अगणीत। म्हणोनी भगवंत आला तेथें॥ ३॥ सर्वां होय सुख तरतील लोक। नामा म्हणे शुक सांगतसे॥ ४॥

कंसाचें कारागृहीं आगमन, मायेची सुटका आणि वसुदेव—देवकीची बंधमुक्तता.

३८. तांतडीनें जाती। कंसा सेवक सांगती॥ १॥ उपजला वैरी। त्यासी तूं रे त्वरें मारी॥ २॥ त्वरें धांव घाली। पाहे कन्या उपजली॥ ३॥ ज्याचा धोका तुज। नव्हे कन्या द्यावी मज॥ ४॥ मारायाशीं खड्ग घाली। हातींची निसटूनिया गेली॥ ५॥ तुजलागीं वधी। उपजला मज आधीं॥ ६॥ सांगे ब्रह्मज्ञान। देवकीचें समाधान॥ ७॥ नामा म्हणे तयेवेळीं। त्यांची बंधनें काढिली॥ ८॥

कंसविचार.

३९. बोलावूनी अवघीयातें। कंस पाहे विचारातें॥ १॥ कोणीएक रे बोलती। आम्हां ठावी देववस्ती॥ २॥ जेथें पुराण कीर्तन। गाईब्राम्हण करिती यज्ञ॥ ३॥ तेथें असे नारायण। वधूं तयासी जाऊन॥ ४॥ वैरी सहजची मरेल। ऐसे बोलताती बोल॥ ५॥ कंसा मानवलें जाण। करा मजसाठीं यत्न॥ ६॥ नामयाचा छंद। नंद करितो आनंद॥ ६॥

नंदगृहीं पुत्रोत्साह.

४०. शुक म्हणे राया ऐक परिक्षिती। श्रवण करितां तृप्ति नाहीं तुज॥ १॥ माया जातां मथुरे सावध निद्रिस्त। देखिला भगवंत यशोदेनें॥ २॥ ब्रह्मांडें उदरी न कळे कोणाला। वाजविती थाळा जन्मकाळीं॥ ३॥ यज्ञभोक्ता कृष्ण त्यासी देती बोळा। ध्यानीं ध्याय भोळा सदाशिव॥ ४॥ गौळणी बाहाती नंदालागीं तेव्हां। पुत्रमुख पाहा नामा म्हणे॥ ५॥

४१. विश्वाचा जो बाप हाती ज्याच्या सूत्र। म्हणवितो पुत्र नंदजीचा॥ १॥ तीथें ज्याच्या चरणीं करीताती न्हाणी। यशोदा जननी म्हणताती॥ २॥ वेडावला शेष शिणले वेद चारी। निजे मांडीवरी यशोदेच्या॥ ३॥ शरणागता देत क्षीरसिंधु जाण। चोखीतसे स्तन आवडीनें॥ ४॥ त्रैलोक्याचा राजा वर्णू काय रंक। ऐकावें जातक नामा म्हणे॥ ५॥

जातककर्मसंस्कार.

४२. करुनियां स्नान। वस्त्रें घेतलीं नूतन॥ १॥ पाचारा ब्राह्मण। शृंगारावें देवसदन॥ २॥ बाहा बाहा दशग्रंथी। त्यासी सांगा आणा पोथी॥ ३॥ त्वरें बाहारे ज्योतिषी। नंद करी जातकासी॥ ४॥ केलें देवतार्चन। द्विज सांगती तर्पण॥ ५॥ फार त्याला सुख। पाहे कृष्णजीचें मुख॥ ६॥ करी पुण्याहवाचनें। नामा म्हणे आनंदानें॥ ७॥

दानधर्म.

४३. आला जगदोद्धार। त्याचे भरलें भांडार॥ १॥ सुशोभित दिसे मही। दोन लक्ष दिधल्या गायी॥ २॥ तिळ तांदूळ पर्वत। द्रव्यें वांटी अगणित॥ ३॥ एक जाती एक येती ओझें उचलितां कुंथती॥ ४॥ भाट वर्णिताती। नामा म्हणे ज्याची कीर्ति॥ ५॥

४४. तुतारे भोंवारें वाजंत्री वाजती। अप्सरा नाचती थैय-थैया॥ १॥ झणझणा झणझणा झांजा गर्जताती। नौबदा वाजती धो धो धो धो॥ २॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सुरवर येती विमानाची दाटी। करिती पुष्पवृष्टि देवावरी॥ ३॥ नारद तुबर गंधर्व किन्नर। गाती सप्त स्वर सर्व तेव्हां॥ ४॥ कीर्तनाचा घोष टाळांचा गजर। मृदंग सुस्वर वाजताती॥ ५॥ केशरी गंध टिळा लावीतसे भाळा। घाली पुष्पमाळा द्विजाकंठीं॥ ६॥ घरोघरी नंद धाडी शर्करेशी। वस्त्रें सुहृदांसी नामा म्हणे॥ ७॥

बाळलेणेंसंस्कार.

४५. ब्राह्मण आशिर्वाद देती। नंदा पुसोनि निघती॥ १॥ चलाचला म्हणती लोक। पाहूं नंदाचें बालक॥ २॥ नरनारी अलंकार। शृंगारिलें हो नगर॥ ३॥ दैन्य दारिद्र अपेश। पळती मानूनियां त्रास॥ ४॥ आणिताती बाललेण। स्त्रिया पाहताती कृष्ण॥ ५॥ नामा म्हणे पाहता मुख। हरपली तहान भूक॥ ६॥

अक्षवाहणसंस्कार.

४६. पाटावरी बैसविती। गोपी अक्षवाणें करिती॥ १॥ ब्रह्मादिक न देखती माया। त्यासी लाविती अक्षता॥ २॥ नव्हे प्राकृत बालक। परस्परें म्हणती लोक॥ ३॥ ध्वज वज्रांकुश चिन्हा। आला वैकुंठीचा राणा॥ ४॥ लोक येती वेळोवेळां। नामा म्हणे पाहती डोळा॥ ५॥

नंदवसुदेव भेट.

४७. द्रव्य द्यावयासी। नंद गेला मथुरेसी॥ १॥ तेथें भेटे वसुदेव। सांगितलें गुह्य सर्व॥ २॥ कंसाचे मानसीं। घात इच्छी गोकुळासी॥ ३॥ जाई जाईरे त्वरित। होती गोकुळी आघात॥ ४॥ नामा म्हणे ऐसें सांगे। नंद तेथुनिया निघे॥ ५॥

पूतनाप्राणशोषण.

४८. कंसें पाठविली मायावी पूतना। देवोनिया स्तना बाळे मारी॥ १॥ दीन दुर्बळांची मारीत बालकें। करीताती शोक मायबाप॥ २॥ गहिंवरोनि तेव्हां पुसे परीक्षिती। भगवंताची मूर्ती बाळरूप॥ ३॥ अभय देतसे बापा नको रडूं। तें काय घुंगर्डु मारूं शके॥ ४॥ जेथें पुराणें कीर्तन होत नामघोष। तेथें यम त्रास घेत असे॥ ५॥ पळती तेथुनी असुरादिक वैरी। तेथें नाहीं थोरी पाप तापा॥ ६॥ नामा म्हणे आली नंदाचिये घरीं। स्वरूपें सुन्दरी देवांगना॥ ७॥

४९. कृष्णा लावितसे स्तनीं। तिसी मारी चक्रपाणि॥ १॥ भयाभीत प्रेत। जन विस्मय करीत॥ २॥ रडे तेव्हां माया। वांचलासी बा तान्हया॥ ३॥ मिळोनियां समस्त। भाळीं आंगारा लावीत॥ ४॥ वसुदेवें सांगितलें। नंद म्हणे तैसें झालें॥ ५॥ कुऱ्हाडी आणिती। शस्त्रें करूनि तोडिती॥ ६॥ नामा म्हणे दिला अग्नी। वास न माये गगनीं॥ ७॥

भगवंत पालथा पडूं लागला त्यावेळीं
नंदांनीं केलेला उत्साह.

५०. पुण्यवंता दावी बाळलीला देव। पालथा केशव पडे तेव्हां॥ १॥ नंदे उत्साहासी केले तेव्हां फार। दिधलें अपार द्रव्य द्विजां॥ २॥ यशोदा घेतसे देवाचें चुंबन। तुजला न्हाणीन तान्ह्या माझ्या॥ ३॥ चोंगईचा मुका घेताती गौळणी। हांसे चक्रपाणि आनंदानें॥ ४॥ नामयाचा स्वामी मंदमंद हांसे। यशोदा करितसे लिंबलोण॥ ५॥

वनभोजनसमयी शकाटसूरनाश.

५१. करावया वनभोजन। जाती गोकुळीचे जन॥ १॥ भोजन करिती। कोणी देवा खेळविती॥ २॥ डोळे झांकीत श्रीपती। दावी निद्रेची आकृति॥ ३॥ बहुत खेळलासे खेळा। आतां निजवा गे बाळा॥ ४॥ वस्त्रें घालूनी शकटातळी निजवितो वनमाळी॥ ५॥ क्षणएक निजला देव। रडे उठे वासुदेव॥ ६॥ मुलांलागीं म्हणे तेव्हां। माझा कान्होबा खेळवा॥ ७॥ रागेंरागें झाडी लात। गाडा मोडोनी पडत॥ ८॥ नामा म्हणे वाटी धन। नंद वांचला नंदन॥ ९॥

५२. मांडीवरी घेत यशोदा सुंदरी। आळवी श्रीहरी नाना युक्ती॥ १॥ तूंचि माझा प्राण तूं माझी माउली। तूं माझी बहिणुली कान्हाबाई॥ २॥ गणगोत भाऊ तूंचि माझा सखा। संसार लटिका

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुजवीण ॥ ३ ॥ तूंचि माझा धनी तूंचि माझें जीवन। चुंबीत वदन वेळोवेळां ॥ ४ ॥ नामा म्हणे भार घाली मांडीवरी। ठेवी भूमीवरी कृष्णलीला ॥ ५ ॥

तृणावर्तवध.

५३. कंसें पाठविला तेव्हां तृणावर्त। धुळीनें समस्त व्यापियेलें ॥ १ ॥ दुष्टबुद्धि तेव्हां उचली देवासी। धरियेलें त्यासी कंठीं देवें ॥ २ ॥ यशोदा पाहात न दिसे श्रीकृष्ण। ऊर बडवून शोक करी ॥ ३ ॥ गौळणींचा मेळा मिळाला समस्त। कोणी कृष्णनाथ नेला सये ॥ ४ ॥ न लगे घरदार बुडाला संसार। दावा गे श्रीधर तान्हें माझें ॥ ५ ॥ ठावें असतें ऐसें बांधित्यें पोटासी। कोठें गुंतलासी बाळा माझ्या ॥ ६ ॥ धांवा गे धांवण्या पाहा गे लेंकरूं। शोक अनिवारू करीतसे ॥ ७ ॥ शिणल्या भागल्या येता तुम्हां घरां। मुख हें उदारा दावी कृष्णा ॥ ८ ॥ सोडूं पाहे प्राण यशोदा सुंदरी। हंबरडा फोडी कृष्णालागीं ॥ ९ ॥ चेपोनी नरडी गतप्राण केला। भूमीसी पाडिला दैत्य तेव्हां ॥ १० ॥ नामा म्हणे वरी खेळत गोविंद। पाहोनी आनंद सकळांसी ॥ ११ ॥

गर्गागमन व नंदप्रार्थना.

५४. आला गोकुळासी। हर्ष न माये मानसीं ॥ १ ॥ नंदें गर्गातें देखिलें। पूजा स्तवनीं तोषविलें ॥ २ ॥ भूतभविष्यवर्तमान। तुम्हां कळे हो संपूर्ण ॥ ३ ॥ पाहा सामुद्रिक लक्षण। याचें काय सांगा चिन्ह ॥ ४ ॥ बोले तेव्हां गर्गऋषि। झणी कळेल कंसासी ॥ ५ ॥ रोहिणीनंदादि बैसती। गर्ग घेउनी एकांतीं ॥ ६ ॥ घालूनिया मंगलस्नान। आरंभीं पुण्याहवाचन ॥ ७ ॥ ऐसी वदे शुकवाणी। नामा म्हणे ऐका कानीं ॥ ८ ॥

गर्गवर्णीत भविष्य.

५५. जन्मजन्मांतरीं झाला तुज श्रम। म्हणोनियां ब्रह्म आले येथें ॥ १ ॥ राखतील गाई मारतील दुष्ट। नकरी बोभाट जनामध्यें ॥ २ ॥ द्वाद्दश गांव अग्नि करील प्राशन। वांचवील प्राण सकळांचे ॥ ३ ॥ चोरोनियां गाई नेईल सौंगडे। लावील हा वेड ब्रह्मयासी ॥ ४ ॥ उचलील पर्वत हरील हा गर्व। तारील हा सर्व नाममात्रें ॥ ५ ॥ समुद्रीं हा नगरीं रचील क्षणांत। चरित्र अद्भुत करील हा ॥ ६ ॥ सोळा सहस्त्र शत अष्ट त्या नायका। करील बाईका तुझा कृष्ण ॥ ७ ॥ त्रैलोक्यांत हाची उदराचा राणा। देईल ब्राह्मणा हेमपुरी ॥ ८ ॥ सांगुनिया ऐसें आशीर्वाद देऊनि। नामा म्हणे मुनि जाता झाला ॥ ९ ॥

महाबळभट विटंबना.

५६. श्रीकृष्ण जन्मला वार्ता ही ऐकोनि। चिंता कंसा मनीं प्रवर्तली ॥ १ ॥ उद्विग्न मानसीं कंस तो बैसला। सन्मुख देखिला महाबळ ॥ २ ॥ गौरवोनि त्यासी सांगे वर्तमान। शत्रूशीं जाऊनि कोण मारी ॥ ३ ॥ महाबळ दैत्य प्रतिज्ञा बोलत। शत्रुसी त्वरित मारीन मी ॥ ४ ॥ नामा म्हणे ऐसा बोलूनि निघाला। वेष धरियेला कपटाचा ॥ ५ ॥

५७. विप्र वेष तेव्हां घेऊनि निघाला। गोकुळासी आला लागवेगें ॥ १ ॥ पुत्रोत्सव कोठें लोकांस पुसत। भाविक सांगत नंदाघरीं ॥ २ ॥ ऐकोनियां ऐसें आला अकस्मात। यशोदा देखत सन्मुख त्या ॥ ३ ॥ श्रीकृष्णासी तेव्हां वोसंगी घेतलें। दंडवत केलें ब्राह्मणासी ॥ ४ ॥ सन्मुख बैसोनी वर्तमान पुसे। बाळाचें या कैसे चिन्ह सांगा ॥ ५ ॥ पंचांग त्या वेळीं काढिलें कपटानें। मान तुकावोनि पाहातसे ॥ ६ ॥ नामा म्हणे मैदें पंचांग पाहून। यशोदे लागून बोलतसे ॥ ७ ॥

५८. तुझिया पुत्रासी लागलेसें मूळ। करील निर्मूळ सर्वत्रांचें ॥ १ ॥ बाळकाचें अंगीं अवचिन्हें बहुत। नेऊनि गर्तेंत टाका यासी ॥ २ ॥ लोभ धरूनियां ठेवाल बाळकासी। ग्रासील सर्वांसीं एकदांची ॥ ३ ॥ ऐकोनि यशोदा गहिंवरोनि बोले। गर्गांनी कथियेलें उत्तम गुण ॥ ४ ॥ अमंगळ वाणी पुनरपि बोलिला। गर्ग तो चुकला गाणितासी ॥ ५ ॥ स्तनपान करीत असतां श्रीकृष्ण। मांडिलें विंदान नामा म्हणे ॥ ६ ॥

५९. ठाईहुनि जाती उखळें उडताती। मस्तकीं आदळती येवोनियां ॥ १ ॥ पाटेवरवंटे वसुपात्रालागीं।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जीव त्या प्रसंगीं येता झाला॥ २॥ घाबरे दुर्जन पळाया पाहत। आडव्या ठाकत बाजा पुढें॥ ३॥ जानवें तुटलें पंचांग फाटलें। धोतरही गळालें ढुंगणाचें॥ ४॥ पृष्ठीवरी होती बदबदा मार। तेथून सत्वर पळतां झाला॥ ५॥ आयुष्याची कांहीं बाकी उरली होती। म्हणुनी श्रीपती सोडी त्यातें॥ ६॥ नामा म्हणे जीव घेऊनि पळाला। मथूरेसि आला कंसापाशी॥ ७॥

श्रीकृष्ण व बलराम यांची बाललीला.

६०. परीक्षिती राया सांगतसे शुक। वैकुंठनायक रांगतसे॥ १॥ दुडदुडा पळती मुखीं घाली माती। शेणांत लोळती दोघेजणें॥ २॥ नंदाच्या पुढील ओढीताती ताट। मिटक्या मटमट वाजविती॥ ३॥ कटीं कडदोरा वांकी घुंघुरुवाळा। पिंपळपान भाळां शोभतसे॥ ४॥ देवातें झोंकिती वर्जिल्या रडती। घडोघडीं येती बिंदीमाजी॥ ५॥ वत्साचिये पुच्छें बळें ओढीताती। खोडी न सोडिती दोघेजण॥ ६॥ विमानांची दाटी येताती सुरवर। नाम्याचा दातार पाहावया॥ ७॥

६१. मृगाचिये श्रृंगें धरोनि नाचती। जन हांसताती खदखदां॥ १॥ भोजनां बैसती घांस घेती हातीं। मांजरें देखती दुरोनिया॥ २॥ गळां त्यांच्या तेव्हा धरी मेघःशाम। पुच्छ बळिराम ओढीतसे॥ ३॥ यशोदा धांवत खदखदां हांसत। गौळणी समस्त पाहताती॥ ४॥ पुसतांची माता चोंगई दाविती। मर्कटाचे धरिती दोन्ही कान॥ ५॥ रोहीणी म्हणे डसतील बाळा। किती म्यां याजला सांभाळावें॥ ६॥ पाणी उडविती प्रतिबिंब पाहाती। गोरस सांडिती भूमीवरी॥ ७॥ नामा म्हणे स्वामी सर्वांचा जो साक्षी। धरितसे पक्षी चुकवुनि॥ ८॥

६२. मुतुनिया हातें भूमी सारविती। पोटासी पुसती दोघेजण॥ १॥ घेऊनियां काष्ट घाशिताती दांत। वाकुल्या दावीत नंदालागीं॥ २॥ जेवितां जेवितां बाहेर पळती। श्वानासी बाहाती युयु करुनी॥ ३। तयापुढें दोघें ठेवुनियां वाटी। घालिताती मिठी गळां त्याच्या॥ ४॥ देखोनियां जन खदखदां हांसती। यशोदे सांगती कौतुकानें॥ ५॥ भिंती धरूनियां उभे राहाताती। आधार जगतीं ज्यांचा असे॥ ६॥ उभयतां जातीं बिदी खेळावया। कुरवंडी काया नामयाची॥ ७॥

६३. मिळवुनि सौंगडे सांगती तयासी। चला गोरसासी देतो तुम्हां॥ १॥ गेली असे एक गौळण जळाला। सांगे गोपाळाला तेथें जाऊं॥ २॥ न पुरेची हात दूध शिंक्यावरी। करावें मुरारी कैसें तेथें॥ ३॥ पाटावरी पाट रची वनमाळी। पाडीतसे डुळी मोहोरीजें॥ ४॥ बडवोनि टिरी नाचतसे पेंदा। भलीले गोविंदा युक्ती केली॥ ५॥ उगलाले बेते कलुं नका गलबला। थांबालीले गोला लोनियाचा॥ ६॥ कोणी पिती दूध कोणी ख़ाती दहीं। आली लवलाही गौळण ते॥ ७॥ अहर्निशीं धरूं मी जपतसे तुज। जासी कैसा आज चोरटीया॥ ८॥ मुखीहुनि पय टाकी तिच्या डोळां। नामा म्हणे पळा सांगतसे॥ ९॥

गोपींची गाऱ्हाणीं

६४. गाऱ्हाणें सांगाया। आल्या गोकुळीच्या स्त्रिया॥ १॥ यशोदा ऐकत। पळे बाहेरी भगवंत॥ २॥ एक म्हणे लोणी। माझे भक्षी चक्रपाणि॥ ३॥ फोंडितसे भांडें विर्जिलिया म्हणे रांडे॥ ४॥ गाई वासरें सोडितो। येऊन आम्हांसि सांगतो॥ ५॥ अष्टदळ काढिलें अंगणीं। वरी मुते चक्रपाणी॥ ६॥ घेऊनिया आला अग्र। तुझ्या घरासी लावीन॥ ७॥ देईन मी तोंडावर। तुझ्या बापाचें हें घर॥ ८॥ घेतसे वरखडे। शिव्या देऊनियां रडे॥ ९॥ देखोनिया गरोदर। म्हणें केवढें उदर॥ १०॥ सांगती गाऱ्हाणीं। नामा म्हणे ऐका कानीं॥ ११॥

६५. एक म्हणे धरी स्तन। त्याचे उपटीन कान॥ १॥ यशोदे तुला येईल राग। आपुल्या पोरा काहीं सांग॥ २॥ अंधारीं लपत। पोरें करिती आकांत॥ ३॥ सांगतसों शिकवणा। खोडी नको करूं कान्हा॥ ४॥ तोंड करुनि वांकडें। मला म्हणे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तशीच रडे ॥ ५ ॥ पोरां शिकवीत। गोरस आणारे समस्त ॥ ६ ॥ आम्हीं निजलों समस्त। काजळ मुखासी लावीत ॥ ७ ॥ मेले आणूनिया सर्प। माझ्या पोरा दावी दर्प ॥ ८ ॥ योगियांचे नये लक्षा। त्यासी लावूं म्हणती शिक्षा ॥ ९ ॥ अनंत गाऱ्हाणीं। नामा म्हणे कीर्ति वानीं ॥ १० ॥

मृत्तिकाभक्षण.

६६. मुलें सांगताती। माती खातो गे श्रीपती ॥ १ ॥ लांकुड घेऊन हातांत। माती खातो कां पुसत ॥ २ ॥ भावा भुललासें खरा। कांपतसे थरथरा ॥ ३ ॥ मुख तिये उघडोनि। दावी तेव्हां चक्रपाणि ॥ ४ ॥ ब्रह्मांडे देखिलीं। नामा म्हणे वेडी झाली ॥ ५ ॥

मंथनपात्रताडन.

६७. यशोदा घुसळीत। स्तन मागे भगवंत ॥ १ ॥ घालोनि पदर। पाजीतसे जगदीश्वर ॥ २ ॥ दूध जातसे उतोन। उठे कृष्णासी टाकून ॥ ३ ॥ मंथन पात्रातें फोडीत। पळे तेथूनि त्वरित ॥ ४ ॥ मागे धांवली यशोदा। धरावया त्या गोविंदा ॥ ५ ॥ हाती न लगे जगजेठी। नामा म्हणे होय कष्टी ॥ ६ ॥

उखळीबंधन.

६८. कृपा उपजली। उभा राहे वनमाळी ॥ १ ॥ धरूनि आणिला। आजी बांधीन मी तुला ॥ २ ॥ दावे सोडुनियां। बांधितसे देवराया ॥ ३ ॥ फार करितोसी खोड्या। गोपी दाविती वांकुल्या ॥ ४ ॥ दावीं अनंत लावीत। दोन बोटें उणे येत ॥ ५ ॥ करिताती चोज। परी नव्हेचि उमज ॥ ६ ॥ श्रमतसे वारंवार। पुरती करी जगदोद्धार ॥ ७ ॥ विष्णुदास नामा पुढें। आला जेथें उभीं झाडें ॥ ८ ॥

विमलार्जुनोद्धार.

६९. कुबेराचे पुत्र मदोन्मत्त झाले। म्हणूनि शापिले नारदानें ॥ १ ॥ व्हाल तुम्हीं वृक्ष ऐकोनि सावध। झाला अपराध ऋषिराया ॥ २ ॥ विमलार्जुन वृक्ष व्हाल गोकुळांत। उश्शाप वदत कृपाळुवा ॥ ३ ॥ कृष्णाचा चरण लागेल तुम्हांसी। आपुल्या स्थळासी याल वेगीं ॥ ४ ॥ मोडितसे तेव्हां वृक्ष लक्ष्मीचा पती। दोघे निघताती दिव्य पुरुष ॥ ५ ॥ नामा म्हणे तेव्हां करिताती स्तुति। पापें दग्ध होती ऐकतांची ॥ ६ ॥

विमलार्जुनानें केलेली भगवंतस्तुति.

७०. दामोदरा केशवा वामना देवा कृष्णा। परंज्योति नारायणा तुज नमो ॥ १ ॥ विश्वव्यापका जनार्दना वासुदेवा निर्गुणा। अव्यया जगजीवना तुज नमो ॥ २ ॥ अनंत अवतार घेसी भक्तांसाठीं। कृपाळु जगजेठी तुज नमो ॥ ३ ॥ यज्ञेशा सर्वेशा दयानिधी हृषिकेशा। पुराणपुरुषा तुज नमो ॥ ४ ॥ धन्य हा दिवस देखिलें तुझे पाय। कृपादृष्टी पाहें आम्हांकडे ॥ ५ ॥ जोडोनियां हात करिती विनंती। देई तुझी भक्ति जन्मोजन्मीं ॥ ६ ॥ करूनि नमस्कार हळूहळू चालती। वेळोवेळां पाहती कृष्णाकडे ॥ ७ ॥ मोडतांचि वृक्ष धांवोनिया येती। मग पाहताती नामा म्हणे ॥ ८ ॥

यशोदेशी मायाच्छादन.

७१. समस्ता सांगती लहानाली मुलें। नवल देखिलें आम्हीं आतां ॥ १ ॥ वृक्ष मुळींहुनि दोघे निघताती। पायासी लागती कान्होबाच्या ॥ २ ॥ यशोदेचे मनीं झालासे विवेक। वैकुंठनायक येथें आला ॥ ३ ॥ नामा म्हणें तिशी घालितसे माया। अपराध तया काय असे ॥ ४ ॥

नंदयशोदा संवाद.

७२. नंदें सोडविलें तेव्हां त्या कृष्णासी। नासूंदेगे यासी दही दूध ॥ १ ॥ मजला लेकरें नाहींतगे फार। विश्रांतीसी थार एवढेंचि ॥ २ ॥ निवारिलें विघ्न देवें हें केवढें। पडती जरी झाडें याजवरी ॥ ३ ॥ आजपासूनि यासी बोलसी कठिण। देईन मी प्राण तुजवरी ॥ ४ ॥ स्फुंदस्फुंद रडे तेव्हा नारायण। देई यासी स्तन भुकेलासे ॥ ५ ॥ यशोदा बाहात तये वनमाळी। धांवोनि कूरवाळी वदन त्याचें ॥ ६ ॥ समजावोनि देवा पाजितसे स्तन। घालीत भोजन नामा म्हणे ॥ ७ ॥

गोपनवसलीला.

७३. एक गोप तेव्हां स्त्रियेसी सांगत। सांठवी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समस्त नवनीत॥ १ ॥ देवाचा नवस आहे पुरवणें। धरावें येथून अनसुट॥ २ ॥ सांगोनियां ऐसें राहिला तो स्वस्थ। मागें स्त्रीनें कृत्य काय केलें॥ ३ ॥ चोरोनियां घृत भरोनि घागरीं। नेवोनि शेजारीं ठेवियेल्या॥ ४ ॥ गौळियानें तेव्हां संकल्प सोडिला। नवस फेडिला नामा म्हणे॥ ५ ॥

७४. गोपीनें घृतासी चोरूनी ठेविलें। देवासी कळलें अंतर्यामीं॥ १ ॥ सेजे घरीं होतें ठेविलें चोरून। सौंगडे घेऊन गेला तेथें॥ २ ॥ आज्य घेऊनियां गोपाळासी देत। आपण भक्षीत आनंदानें॥ ३ ॥ तृप्त होवोनियां गेला क्रीडायासी। पूर्ण नवसासी केलें त्याच्या॥ ४ ॥ नामा म्हणे ऐसा वैकुंठनायक। दावीन कौतुक नानापरी॥ ५ ॥

७५. कांहीं दिवस लोटलियापरी। गोपी तिचे घरीं प्रवेशली॥ १ ॥ म्हणे माझा कुंभ देई वो आणून। येरीनें सदन धुंडाळिलें॥ २ ॥ म्हणे सयें येथें नाहीं तुझें घृत। ऐकोनियां मात क्रोधावली॥ ३ ॥ चोरी नवनीत नाहीं तुझें गेलें। माझे काय झालें पुसतसे॥ ४॥ नष्टे अभिलाष केला सांग सत्य। बोलोनि निवांत राहिली ते॥ ५ ॥ कलह करावा भ्रतारा कळेल। तों शिक्षा करील यथास्थित॥ ६ ॥ न मिळे जाणोन म्हणे कृष्णार्पण। आली तें बोलोन मंदिरासी॥ ७ ॥ नामा म्हणे शुक सांगे परीक्षिती। ऐशा किती ख्याति तुज सांगो॥ ८ ॥

श्रीकृष्ण गोपी संवाद.

७६. एकदां श्रीकृष्ण खेळत असतां। प्रवेश अवचिता गोपीगृही॥ १ ॥ दोहीं करें तेव्हां नेत्र चोळीतसे। गोपी पुसतसे काय झालें॥ २ ॥ कृष्ण म्हणे माझे दुखताति डोळे। उपाय न कळे करूं काय॥ ३ ॥ पुत्राची जननी तिचें दूध मिळे। घालितांचि डोळे बरे होती॥ ४॥ गोपी म्हणे दूध देतें मी काढून। तें नेत्रीं घालून बरें करी॥ ५ ॥ देव म्हणे दूध काढून तूं देसी। कैसा गुण त्याशीं येईल सांग॥ ६ ॥ माझिया करानें पिळूं देसी स्तन। तरी येईल गुण लवकरी॥ ७ ॥ ऐकतांचि गोपी धांवे मारावया। पळे उठोनिया नामा म्हणे॥ ८ ॥

गोपीगर्वपरिहार.

७७. यशोदे भोंवत्या मिळाल्या गौळणी। सांगती गान्हाणीं नानापरी॥ १ ॥ गोरस भक्षोनी फोडितो भाजन। गोकुळ सोडोनि जाऊं सये॥ २ ॥ एक गोपी म्हणे माझ्या घरां येसी। बांधीन खांबासी तुजलागी॥ ३ ॥ यशोदेशी ऐसी सांगोनि गान्हाणीं। चालिल्या कामिनी गृहाप्रती॥ ४॥ नामा म्हणे गोपी बोलिली बांधीन। तिजवरी विघ्न करी देव॥ ५ ॥

७८. निशीं प्राप्त होतां भ्रताराचे शेजे। गोपिका ती निजे आनंदानें॥ १ ॥ संधी पाहोनियां प्रवेशला देव। करीत लाघव काय तेव्हां॥ २ ॥ भ्रताराची दाढी कांतेची ते वेणी। एकत्र करोनी ग्रंथी देत॥ ३ ॥ करूनि कौतुक निघोनिया गेला। अरुणोदय झाला तयेवेळीं॥ ४ ॥ गोदोहनालागीं गोपी ते उठत। वेणी आंसडीत दाढीसंगें॥ ५ ॥ भ्रतारासी तेव्हां बोले ते कामिनी। न धाय अजूनी मन कैसें॥ ६ ॥ भ्रताराची दाढी ओढतांच जाण। सक्रोध होऊनि बोलतसे॥ ७ ॥ मस्त होवोनियां माजली थांगडी। करिसी ओढाओढी मजलागी॥ ८ ॥ नामा म्हणे तेव्हां उठोनि बैसती। आश्चर्य करिती मनामाजी॥ ९ ॥

७९. उभयतां तेव्हां कलह करिताती। आन वाहताती परस्परें॥ १ ॥ सोडूं जो पहाती सत्वर ग्रंथिका। न सुटे ब्रह्मादिका कदाकाळीं॥ २ ॥ सोडितां सुटेना जाळिता जळेना। कापिता कापेना कांहीं केल्या॥ ३ ॥ स्त्रियेलागीं तेव्हां भ्रतार बोलत। तुजसंगें मृत्यु मज आला॥ ४॥ दोघेंहि रडत बिदीमाजी येती। कोल्हाळ करिती तयेवेळीं॥ ५ ॥ गोकुळीचे जन डोळां पाहताती। जाऊन सांगती नंदालागीं॥ ६ ॥ नामा म्हणे नंद बैसला चावडी। घेऊन आवडी कृष्णजीला॥ ७॥

८०. गोपीगोप तेथें पातली त्वरित। हांसती समस्त देखोनिया॥ १ ॥ कृष्ण म्हणे कैसी बांधिसी मजला। बांधिलें तुजला भगवंतें॥ २ ॥ पायां पडताती रडोनी बोलती। सोडवा म्हणती आम्हां लागीं॥ ३ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पाहोनी कीव त्याची दया आली चित्ता। कृपेनें पाहातां मुक्त झाली॥ ४॥ नामा म्हणे तेव्हां वंदोनी देवासी। गेली निजधामासी आनंदानें॥ ५॥

नंद-चंपाषष्ठी-नेम.

८१. नंदाचिये घरीं चंपाषष्ठी नेम। कुळी कुलधर्म मार्तंडाचा॥ १॥ पक्वान्नेंही नाना रोटिया भरीत। केली अपरिमित यशोदेनें॥ २॥ वाघियामुरळी सांगितली दोन्ही। आला चक्रपाणि खेळतची॥ ३॥ मातेलागीं म्हणे लागलीसे क्षुधा। थांबरे गोविंदा म्हणे माता॥ ४॥ घेतलीसे आळी करी लगबग। विस्तारिले सांग नैवेद्यासी॥ ५॥ नेवोनिया पुढें देवाच्या ठेविलें। बोलवा वहीलें आमंत्रिक॥ ६॥ तों वरी मागे तो भक्षी नारायण। यशोदा आपण रागावली॥ ७॥ दुरळ हा देव होय आतां कैसें। मार्तंडाचें पिसें लागे तुज॥ ८॥ करी क्षणामाजी वांकडेंचि मुख। हरी खात वीख कालवलें॥ ९॥ जाणीतला भाव मायेचें अंतर। करूनिया खरें दावी देव॥ १०॥ वाकडिया हातें ग्रास घाली मुखें। मुख तेंहि सुखे तैसें दावी॥ ११॥ पिसाळल्या परी करी वेडेचार। भय वाटे फार मायेलागीं॥ १२॥ पूर्वी म्या सांगता नायकसी कैसा। पुढें हा वोळसा वोढवला॥ १३॥ पाचारिले देवऋषि हालविती सुपें। त्याचिया न वापे देव निघे॥ १४॥ वासोनिया डोळे तयाकडे पाहे। कांपे तया भयें थरथरां॥ १५॥ मंत्रूनियां पाणी आणिला अंगारा। तयाचा मातेरा केला देवें॥ १६॥ नवसा न पावती गोकुळींच्या देवता। उपाय मागुता राहिलासे॥ १७॥ चिंतावली माय मूर्च्छा आली तीसी। झाली पोरपिसी मोहजाळें॥ १८॥ जाणोनी अंतर म्हणे कृष्णार्पण। तेव्हां आलें विघ्न दूर होय॥ १९॥ नामा म्हणे देव पाहे कृपादृष्टी। जाणवलें पोटीं हाचि देव॥ २०॥

यशोदासंकष्टचतुर्थीव्रत.

८२. गोपिका म्हणती यशोदा सुंदरी। करितो मुरारी खोडी बहु॥ १॥ यशोदेप्रति त्या गौळणी बोलती। संकष्टचतुर्थी व्रत घेई॥ २॥ गणेश देईल यासी उत्तम गुण। वचन प्रमाण मानावें हें॥ ३॥ गजवदनासी तेव्हां म्हणत यशोदा। माझिया मुकुंदा गुण देई॥ ४॥ ऐसें हें वचन ऐकून कृष्णनाथें। सत्य गणेशातें केलें तेव्हां॥ ५॥ एक मास खोडी देवें नाहीं केली। प्रचीत ते आली यशोदेसी॥ ६॥ धन्य धन्य देव गणपती पाहे। यशोदा ती राहे उपवासी॥ ७॥ इंदिराबंधूचा उदय होऊं पाहात। यशोदा करीत पूजनासी॥ ८॥ शर्करामिश्रित लाडू येकवीस। आणीक बहूवस मोदक ते॥ ९॥ ऐसा नैवेद्याचा हारा तो भरुनी। देव्हारा घेऊनि ठेवी माता॥ १०॥ मातेसी म्हणत तेव्हां हृषीकेशी। लाडू केव्हां देसी मजलागीं॥ ११॥ यशोदा म्हणत पूजीन गजवदन। नैवेद्य दाऊन देईन तुज॥ १२॥ ऐसें म्हणूनियां माता बाहेर गेली। देव्हाऱ्याजवळी हरि होता॥ १३॥ एकांत देखोनी हारा उचलिला। सर्व स्वाहा केला एकदांची॥ १४॥ घेऊनिया ग्रास ऊगीच बैसला। भक्तांलागीं लीला दावीतसे॥ १५॥ धूप घेवोनियां आली सदनातें। रिता हारा तेथें देखियेला॥ १६॥ विस्मय बहुत मातेसी वाटला। नैवेद्य हरीला पुसतसे॥ १७॥ कृष्ण म्हणे सत्यवचन मानी माते। एक सहस्त्र उंदीर आले येथें॥ १८॥ त्यांत एक थोर होता तो मूषक। वरी विनायक बैसलासे॥ १९॥ सकळीक लाडू सोंडेनें उचलीले। सर्व अकर्षिले एकदांची॥ २०॥ सर्वांगासी त्याणें चर्चिला शेंदूर। सोंड भयंकर हालवितसे॥ २१॥ उंदीर भ्यासूर भ्यालों मी देखून। वळली वदनीं बोबडी ते॥ २२॥ न बोलवे कांहीं माझेनी जननी। क्षुधा मजलागोनी लागलीसे॥ २३॥ लाडू मज देईं म्हणे जनार्दन। माता क्रोधें करून बोलतसे॥ २४॥ माता म्हणे कृष्णा पाहूं तुझें वदन। लाडू त्वांचि पूर्ण भक्षियेले॥ २५॥ हरि म्हणे माते लाडू ते बहुत। मातील मुखांत कैसे माझ्या॥ २६॥ गणपति सर्व लाडू गेलासे घेऊन। आलें विहरण मजवरी॥ २७॥ हरी म्हणे मज मारूं नको माते। तुज वदनातें दावीतों मी॥ २८॥ कृष्णनाथें तेव्हां

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मुख पसरिलें। ब्रह्मांड देखिलें मुखामाजी॥ २९॥ असंख्य गणपती दिसती वदनीं। पाहातसे नयनीं यशोदा ते॥ ३०॥ मुखांत गणपति मातेसी बोलत। पूजावें त्वरित हरिलागीं॥ ३१॥ ऐसें देखोनियां समाधिस्थ होत। चहूंकडे पाहात तटस्थ ते॥ ३२॥ योगमाया तेव्हां हरीनें घालून। मातेपुढें जाण उभा असे॥ ३३॥ यशोदा हरीसी कडेवरी घेत। मुखासी चुंबित आवडीनें॥ ३४॥ हरि घेऊनियां घरांत ती गेली। भोजना बैसली नामा म्हणे॥ ३५॥

राधाविलास.

८३. कोणी एके दिवशीं श्रीकृष्ण अंगणीं। विलोकी नयनीं प्रतिबिंब॥ १॥ मातेप्रती तेव्हां म्हणतसे हरी। काढोनि झडकरी देई मज॥ २॥ माता म्हणे बाळा नये ते काढितां। आणीक अनंता माग कांहीं॥ ३॥ ऐसें ऐकोनियां मागतसे हरी। त्यासी नानापरी समजावित॥ ४॥ बहुत खेळणीं पुढें ठेवी माता। परी तो रडतां न राहेची॥ ५॥ पालखी नेऊनि हरीसी निजवीत। यशोदा ते जात स्वकार्यासी॥ ६॥ तेच समयीं राधा आलीसे मंदिरीं। देखिला श्रीहरी रडतां तिनें॥ ७॥ पालखीं जवळी जाऊनि सत्वर। घेत कडेवरी हरिलागीं॥ ८॥ राधा म्हणे कां तूं रडतोसी चाटा। गोष्टी त्या अचाटा सांगतोसी॥ ९॥ ऐसें ऐकोनिया उगाची राहिला। खेळवी हरिला प्रेमें राधा॥ १०॥ मागुति नेऊनि पालखीं घातला। रडाया लागला हरी तेव्हां॥ ११॥ राधेसी म्हणत यशोदा सुंदरी। यासी क्षणभरी नेई आतां॥ १२॥ आपले मंदिरा घेऊनि जाय यासी। ऐकोनि मानसीं संतोषली॥ १३॥ नामा म्हणे राधा घेऊन हरीसी। गेली मंदिरासी आपुलिया॥ १४॥

८४. मंदिरा नेवोनि पलंगी बैसविला। म्हणत हरीला तयेवेळीं॥ १॥ ऐसिया समयीं थोर तूं असती। तरी हृषिकेशी बरें होतें॥ २॥ देखोनि तिचा भाव थोर झाला हरी। पाहूनि सुंदरी आनंदली॥ ३॥ सुखशयनीं राधा एकांतीं असता। अनया अवचिता आला तेथें॥ ४॥ सक्रोध होऊनि बोलला राधेसी। कोणासी बोलसी गुजगोष्टी॥ ५॥ भ्रताराचा शब्द ऐकता श्रवणीं। दचकली मनी राधिका ते॥ ६॥ हात जोडोनियां विनवित हरीसी। होई हृषीकेशी सान आतां॥ ७॥ ऐकोनि करुणा बाळ झाला हरी। दहिंभात झडकरी ठेवी पुढें॥ ८॥ कवाड उघडून बोलत अनयासी। घरांत हृषीकेशी जेवितसे॥ ९॥ कावड ठेऊनि घरांत तो आला। जेवितां देखिला कृष्णनाथ॥ १०॥ नामा म्हणे अनया आनंदला मनीं। हृदयीं चक्रपाणि धारियेला॥ ११॥

८५. राधेप्रती अनया बोले तयेवेळीं। घरांत एकली अससी तूं॥ १॥ एकलें हें तुज कर्मेना मंदीरीं। खेळावया हरी आणीत जाई॥ २॥ भ्रतार वचन राधेनें ऐकोनी। आनंद तो मनीं थोर तिच्या॥ ३॥ स्वामी तुमची आज्ञा मजलागीं प्रमाण। म्हणोनि चरण वंदियेले॥ ४॥ सुखशयनीं राधा भोगित अनंता। गोकुळांत वार्ता प्रगटली॥ ५॥ राधेचिया घरीं थोर होता हरी। गोकुळींच्या नारी गुजगुजती॥ ६॥ यशोदे मातेसी सांगती सुंदरी। आवरी मुरारी आपुला हा॥ ७॥ तैसीच जाऊन राधेच्या गृहासी। सांगती सासूसी तिच्या तेव्हां॥ ८॥ राधेलागीं वृद्धा म्हणे तयेवेळीं। घरासी वनमाळी आणूं नको॥ ९॥ नामा म्हणे लोकीं पडियेली तुटी। तीसी जगजेठी अंतरला॥ १०॥

८६. प्रातःकालीं राधा उठोनियां जाण। नंद-सदनावरून पाण्या जात॥ १॥ इकडे गोदोहन करीतसे हरी। पाहे उभी द्वारीं राधिका ते॥ २॥ विसरे गोदोहन वृषभाखालीं बैसत। कृष्णाजीचें चित्त वेधियेलें॥ ३॥ भरणा रिचवोनी बाहेर आली माता। वृषभ दोहतां हरि देखे॥ ४॥ माता म्हणे काय करीसी घननीळा। प्रत्युत्तर त्यावेळां हरि देत॥ ५॥ दारांकडे पाहे राधेसी न्याहाळून। मातेसी वचन बोलतसे॥ ६॥ भरणा भरला आतां जाई तूं घेऊन। माता क्रोधायमान झाली तेव्हां॥ ७॥ कृष्णासी यशोदा म्हणे खाली पाहे। वृषभ की गाय दोहतोसी॥ ८॥ कृष्ण खाली पाहे वृषभ देखिला। म्हणे यशोदेला ऐक एक॥ ९॥ देवाचा नवस

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चुकलीस बहुतेक। चौथानांचें थान एक झालें॥ १०॥ वचन ऐकोनी हांसत यशोदा॥ द्वारीं उभी राधा देखियेली॥ ११॥ कांगे येथें उभी घेऊनि घागर। जातसे सत्वर राधा तेव्हां॥ १२॥ नामा म्हणे ऐसें झालें गोदोहन। मुख प्रक्षाळून हरी जेवी॥ १३॥

८७. मंथना आरंभ करीतसे राधा। आठवी गोविंदा मनामाजी॥ १॥ मेळवोनि मुलें खेळे तिचे द्वारीं। देखिला श्रीहरी राधिकेनें॥ २॥ विसरोनि मंथन रित्या डेरियांत। रवी फिरवित गरगरां॥ ३॥ डेरा खडबडा वाजतां ऐकोन। वृद्धा ते धांवोन बाहेर आली॥ ४॥ सासू म्हणे काय गेले तुझे नेत्र। देतसे उत्तर राधा तीसी॥ ५॥ डेरा धड किंवा फुटका म्हणुनी। रवी घुसळोनी पाहतसे॥ ६॥ वृद्धा म्हणे तुझें चित्त नाहीं स्थीर। द्वारीं हो श्रीधर देखियेला॥ ७॥ रागें भरोनियां बोलत म्हातारी। येथें कारे हरी खेळसी तूं॥ ८॥ कृष्ण म्हणे आम्ही खेळतो बिदिशी। तूं का दटाविसी थेरडिये॥ ९॥ ऐसें बोलोनियां श्रीहरी पळाला। घरासी तो गेला नामा म्हणे॥ १०॥

८८. मध्यान्हकाळीं मग हरीसी घेऊन। करीतसे भोजन यशोदा तें॥ १॥ भोजन करूनि पलंगीं निजत। श्रीकृष्णासी घेत पुढें तेव्हां॥ २॥ यशोदेसी सुखनिद्रा हो लागली। राधिका ते गेली यमुनेसी॥ ३॥ नेत्रासी पदर लावोनि रडत। अंतरीं अनंत आठवोनि॥ ४॥ करुणा शब्द तिचा ऐकोनी श्रवणीं। उठला चक्रपाणि तेथोनिया॥ ५॥ जावोनियां राधा धरली पदरी। तिजलागीं हरि समजावित॥ ६॥ संसारासी माझ्या पडियेलें पाणी। ऐसें चक्रपाणि तुवां केलें॥ ७॥ इकडे यशोदा ती जागी जंव होत। हरिसी धुंडीत तयेवेळीं॥ ८॥ एखादी कळी घेऊन येईल आतां। पाहातसे माता चहुंकडे॥ ९॥ पाउलाचा मार्ग चालली काढीत। पावली त्वरित यमुना तीरा॥ १०॥ राधा तयेवेळीं म्हणे रे अनंता। पैल तुझी माता येत असे॥ ११॥ मातेसी देखुनि गडबडां लोळत। यशोदा ते घेत कडेवरि॥ १२॥ मातेसी म्हणे चोरोनी कंदूक। घेऊनिया देख आली येथें॥ १३॥ माता म्हणे कां वो यासी रडविसी। चेंडू तूं हरिसी देई वेगीं॥ १४॥ मा मीसें हा मजवरि घेई गे तुफान। मजपाशीं जाण चेंडू नाहीं॥ १५॥ कृष्ण म्हणे माते झाडा घेई आतां। कंदूक तत्वतां निघेल पैं॥ १६॥ वस्त्र जंव झाडीत राधा तयेवेळी। घडिला भूतळीं कंदूक तो॥ १७॥ ऐसें देखोनियां लज्जित जहाली। हांसत वनमाळी नामा म्हणे॥ १८॥

८९. चेंडू देखोनियां यशोदा कोपली। म्हणे तयेवेळीं राधिकेसी॥ १॥ महा नष्ट तुम्ही अवघियां गवळणी। माझा चक्रपाणि ब्रह्मचारी॥ २॥ इतुकें ऐकोनि राधा ते चालिली। स्वगृहासी गेली आपुलिया॥ ३॥ राधेचिया मनीं समजलें पूर्ण। ब्रह्मसनातन श्रीकृष्ण हा॥ ४॥ इकडे यशोदा घेऊनि हरीसी। गेली मंदिरासी नामा म्हणे॥ ५॥

गोकुळजनाचें वृंदावनीं प्रयाण

९०. गोकुळीं अनर्थ होताती बहुत। मिळोनी समस्त विचारिती॥ १॥ वृद्ध ते म्हणती येतें आमुच्या मना। जाऊं वृंदावना सकळीक॥ २॥ समस्तां मानला तयांचा विचार। निघती नारीनर शीघ्र तेव्हां॥ ३॥ अहर्निशीं देवा करिती जतन। नामा म्हणे मन गोविंदा पैं॥ ४॥

वनविहार.

९१. विचारित हो श्रीपती। जे म्यां जावें वनाप्रती॥ १॥ राखावया गायी। भार उतरावया मही॥ २॥ एके दिनीं सायंकाळीं। नंदा पुसे वनमाळी॥ ३॥ उद्यां जाईन मी रानां। घेऊनियां जी गोधना॥ ४॥ बुद्धीचा चालक। नामा म्हणे हाचि एक॥ ५॥

९२. प्रातःकाळीं मुलें येताती सकळ। ऊठरे गोपाळ म्हणताती॥ १॥ आळस देवोनी उठे देवराणा। बळिराम गोधना सोडीतसे॥ २॥ देऊनियां स्तना काकुळती येत। सांभाळा भगवंत वनामध्यें॥ ३॥ जवळींच खेळा जाऊं नका दूरी। सांभाळा मुरारी प्राण माझा॥ ४॥ होताती उत्पात याजवरी मोठे।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मोडतील कांटे सांभाळावें ॥ ५ ॥ आसनीं शयनीं भोजनीं जतन करा । नामया दातारा केशिराजा ॥ ६ ॥

वत्सासूर व बकासूरवध.

९३. चालियेले तेव्हां गडी आणि देव । खेळताती सर्व आनंदानें ॥ १ ॥ वत्साचिया वेषें वत्सासूर आला । माराया कृष्णाला परीक्षिती ॥ २ ॥ पाहोनियां ऐसें तयासी मारिलें । झोंकोनियां दिल्हें आकाशातें ॥ ३ ॥ चला आतां जेवूं बसूं एके ठायीं । काढारे लवलाही शिदोरीया ॥ ४ ॥ गोपाळ मिळोनी आनंदें जेविले । ब्रह्मरसें धाले कृष्णासंगें ॥ ५ ॥ उदक प्राशन करावया आले । बकानें देखिलें कृष्णजीला ॥ ६ ॥ दुष्टबुद्धि तेव्हां देवासी गिळीत । हृदय जाळीत उगाळीला ॥ ७ ॥ धरूनियां हातें उभाचि चिरीला । आनंद देवाला न समाये ॥ ८ ॥ नामा म्हणे आले घरासी सकळ । सांगताती बाळें वर्तमान ॥ ९ ॥

गौळणी दर्शनोत्सुकता.

९४. उठोनी प्रातःकाळीं गौळणी बोलती । जाईल श्रीपती वना आतां ॥ १ ॥ चला जाऊं त्याचें पाहूं गे श्रीमुख । हरेल ही भूक डोळियांची ॥ २ ॥ तातंडीनें येती नंदाचिया घरा । पहाती उदारा कृष्णराया ॥ ३ ॥ कुरळे हे केश सुहास्य वदन । आकर्ण नयन शोभताती ॥ ४ ॥ अरुणोदय प्रभा अधर दिसती । हिरे झळकती दंत तुझे ॥ ५ ॥ भोंवया व्यंकटा सुंदर नासिक । पाहोनिया सुख फार होय ॥ ६ ॥ लल्लाटीं शोभत केशराचा टिळा । वर बिंदु रेखिला कस्तुरीचा ॥ ७ ॥ वैजयंती माळा किरीट कुंडलें । नामयानें केलें लिंबलोण ॥ ८ ॥

९५. उठोनिया प्रातःकाळीं । देवें मुरली वाजविली ॥ १ ॥ गडी मिळोनी समस्त । घ्यारे शिदोऱ्या सांगत ॥ २ ॥ अलंकार घालिताती । दिसे सुशोभित मूर्ति ॥ ३ ॥ नामा म्हणे स्वामी माझा । आला भक्ताचिये काजा ॥ ४ ॥

९६. अनेक पुष्पांच्या साजताती माळा । गुंजाहार गळां शोभताती ॥ १ ॥ रक्त पीतांबर आरक्त अधर । चरणीं सुंदर चालताती ॥ २ ॥ रक्त चंदनाची घेतलीसे उटी । मयूर पत्रवेठी शोभताहे ॥ ३ ॥ शिंगें रंगविती देऊनियां रंग । चालती श्रीरंग मागें मागें ॥ ४ ॥ चित्तीं सर्वकाळ राहे ऐसें ध्यान । नामा म्हणे धन्य तोचि एक ॥ ५ ॥

९७. शिवादिक ज्याचे वंदी पायवणी । पायांवरी न्हाणी यशोदा ते ॥ १ ॥ नंद पुण्य लेखां नव्हे आम्हाप्रती । शुक परिक्षिती सांगतसे ॥ २ ॥ सनकादिक ज्याचे ध्यानीं झाले पिसें । गायी चारीतसे गोकुळांत ॥ ३ ॥ गडियांसी काला वांटीत श्रीधर । कौतुक सुरवर पाहातातीं ॥ ४ ॥ नामा म्हणे सुख देईल भक्ताशीं । वधील दुष्टांसी स्वामी माझा ॥ ५ ॥

आघासूरवध.

९८. कंस धाडी आघासूर । मारी नंदाचा कुमर ॥ १ ॥ एक ओठ घाली खालीं । दुजा मेघाच्या मंडळीं ॥ २ ॥ गाई गोपाळ उदरीं । देवा कळलें अंतरीं ॥ ३ ॥ आंत प्रवेशला कृष्ण । रूप धरीत वामन ॥ ४ ॥ क्षणार्धेंचि मारी । भक्तजनांचा कैवारी ॥ ५ ॥ भेणें गोपाळ पडियेले । कृपादृष्टी उठविलें ॥ ६ ॥ तेज अद्भुत निघालें । कृष्णमुखीं प्रवेशलें ॥ ७ ॥ भक्तासी रक्षित । नामा म्हणे कृष्णनाथ ॥ ८ ॥

ब्रह्मदेवगर्वपरिहार.

९९. गडी आणि रमापती । तेव्हां आनंदें जेवती ॥ १ ॥ कोणी मांडिताती पानें । वरी ठेविताती अन्नें ॥ २ ॥ कोणी ठेवि मांडिवरी । कोणी जेवी भूमिवरी ॥ ३ ॥ कोणी पसरिती चवाळें । कोणी अंथरती जाळें ॥ ४ ॥ गोळे घेऊनिया हातीं । येरयेरातें हाणिती ॥ ५ ॥ पाहताती देव । धन्य धन्य त्याचा भाव ॥ ६ ॥ मिटकीया देती । देवा वाकुल्या दाविती ॥ ७ ॥ माया मोही ब्रह्मादिका । नामा म्हणे तेंचि ऐका ॥ ८ ॥

१००. गौळियांचीं पोरें वांकुल्या दाविती । क्रोधावला चित्तीं ब्रह्मदेव ॥ १ ॥ चोरोनिया नेत गोवत्स गोपाळ । पाहूं यांचें बळ किती आहे ॥ २ ॥ जाणोनि अंतर देव हांसतसे । सामर्थ्य पाहातसे पुत्र

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझा ॥ ३ ॥ तेथून आणावी नव्हे हें उचित। म्हणेल किंचित पराक्रम ॥ ४॥ नामा म्हणे ऐसें विचारिलें चित्तीं। करीतसे श्रीपती काय तेव्हां ॥ ५ ॥

१०१. गायीवत्सगोपाळ केलीसे निर्माण। न लागतां क्षण परीक्षिती ॥ १ ॥ पूर्ववत सर्व न्यून्य कांहीं नोहे। न करी आश्चर्य मनामाजीं ॥ २ ॥ इच्छामात्रें करी ब्रह्मांडाच्या कोटी। त्यासी काय गोष्टी अपूर्व हे ॥ ३ ॥ सायंकाळीं गेलें गोकुळाभीतरीं। आपुलाल्या परी घरी सर्व ॥ ४॥ ब्रह्मादिका ज्याचा नकळेचि पार। मानवा विचार न कळे कांहीं ॥ ५ ॥ ऐसा हा समर्थ नामयाचा धनी। वंदी पायवणी सदाशीव ॥ ६ ॥

१०२. एक संवत्सर सकळ जाहला। पाहावया आला ब्रह्मदेव ॥ १ ॥ पूर्ववत गाई गोपाळ देखिले। आश्चर्य वाटलें तेव्हां त्यासी ॥ २ ॥ ब्रह्मांडांत ब्रह्मा दुजा असे कोण। केलेंसे उत्पन्न याजलागी ॥ ३ ॥ घेवोनिया गेलों तेंची आहे येथें। जावोनियां तेथें पाहातसे ॥ ४॥ भ्रांतीनें व्यापिलें तयाचें तें मन। देखतों मी स्वप्न किंवा सत्य ॥ ५ ॥ नामा म्हणे एके ठायीं उभा राहे। न्याहाळून पाहे सकळांसी ॥ ६ ॥

१०३. चतुर्भुज दिसे शंखचक्र हातीं। मुकुट शोभती सर्वांलागीं ॥ १ ॥ कर्णीचीं कुंडलें वैजयंती माळा। देखतसे डोळां ब्रह्मा तेव्हां ॥ २ ॥ कौस्तुभ हृदयीं श्रीवत्सलांच्छन। बाहूचीं भूषणें पाहातसे ॥ ३ ॥ चरणीं तोडर पीत पीतांबर। तेजें दिवाकर लोपतसे ॥ ४॥ आपादपर्यंत तुळशीच्या माळा। मुद्रिका दशांगुळा रत्नाचिया ॥ ५ ॥ केशराचे टिळे नेत्र कमळाकार। दंतीं इंदुकर बैसलेती ॥ ६ ॥ कोटीकृष्ण मूर्ति कोटी ब्रह्में दिसती। स्तवनीं स्तविताती सुरवर ॥ ७ ॥ नामा म्हणे ऐसें दावीत गोविंद। झालासे सावध ब्रह्मा तेव्हां ॥ ८ ॥

१०४. ओळखे बापाला। ब्रह्मा तेव्हां धावित्रला ॥ १ ॥ नेत्रीं अश्रूचिया धारा। कांपतसे थरथरा ॥ २ ॥ घाली नमस्कार। म्हणे अपराधी मी फार ॥ ३ ॥ जोडोनियां हात। नामा म्हणे स्तुति गात ॥ ४ ॥

१०५. श्रवणमात्रें जळती पापांचे पर्वत। ऐकें ब्रह्मगीत शुक म्हणे ॥ १ ॥ धरूनि विश्वास करी जो पठण। तरेल तो जाण भवसिंधु ॥ २ ॥ आपण तरेल नव्हे हें नवल। कुळें उद्धरतील सकळांची ॥ ३ ॥ एकेक अक्षर टाळी महा पाप। करा याचा जप सात्विक हो ॥ ४॥ नाम घेतां धांवे अनवाणीच पाय। कोमळ हृदय कृष्णजीचें ॥ ५ ॥ विचारितां याति कुळ अमंगल। न विचारी काळ वेळ धांवे ॥ ६ ॥ शरणागता नेदी काळाचिये हातीं। नामा म्हणे चित्तीं दृढ धरा ॥ ४ ॥

१०६. मेघःशाम वर्ण झालासी सगुण। कार्य आणि कारण तुज नमो ॥ १ ॥ गुंजाहार गळां मयुरपुच्छें वेठी। कृपाळु जग जेठी तुज नमो ॥ २ ॥ वनपुष्पमाळा आपाद शोभती। लक्ष्मीच्या पति तुज नमो ॥ ३ ॥ वेणू वाजविसी गायी त्या चारसी। न कळे कोणासी तुझी लीला ॥ ४ ॥ हातीं तुझ्या कमल शोभे पीतांबर। चरण सुंदर तुज नमो ॥ ५ ॥ घेवोनि अवतार दुष्टांसी मारिसी। भक्तासी रक्षिसी निरंतर ॥ ६ ॥ रावण कुंभकर्ण मारीसी आत्मारामा। सोडविलें आम्हां बंदीहुनी ॥ ७॥ तुझें मी बाळक वेडें अविचारी। नामा म्हणे करी कृपा आतां ॥ ८ ॥

१०७. भवसिंधु तराया एकचि उपाय। ध्यावे तुझे पाय वासुदेवा ॥ १ ॥ गोविंद गोपाळ वाचेसी निखळ। उद्धरे तात्काळ कलीमाजी ॥ २ ॥ नारायण नारायण करी जो पारायण। तो उद्धरे जाण इहलोकीं ॥ ३ ॥ तुटती यातना कर्मांच्या भावना। जडजीवा उद्धरणा नाम स्मरा ॥ ४॥ अहर्निशी कीर्ति गाती भाविक भोळे। त्यांनीं तुज जिंकिलें ब्रह्मा म्हणे ॥ ५ ॥ नामा म्हणे ऐसें दाविलें सुगम। नलगे तुम्हा नेम नाना कोटी ॥ ६ ॥

१०८. कृष्णभक्तीविण तरला आहे कोण। द्यावा निवडून एक तरी ॥ १ ॥ कार्य आणि कारण लटकाची शीण। वर्म न कळोन वायां गेलें ॥ २ ॥ नामा म्हणे माझी खेचर माउली। कृपेनें दाविली वाट मज ॥ ३ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१०९. धन्य त्या गोपिका धन्य त्यांच्या गायी। धन्य हेचि मही ब्रह्मा म्हणे॥ १॥ विश्वात्मा जो हरी क्रीडे या वनांत। तृणादि समस्त धन्य धन्य॥ २॥ धन्य गोवर्धन धन्य वृंदावन। वृक्षादि पाषाण धन्य धन्य॥ ३॥ धन्य हें गोकुळ धन्य हे गोपाळ। व्रजवासी सकळ धन्य धन्य॥ ४॥ धन्य ही यशोदा स्तन दे मुकुंदा। धन्य तूंची नंदा त्रैलोक्यांत॥ ५॥ ब्रह्मसनातन वेदासी नकळे। गड्यांसंगें खेळे अरण्यांत॥ ६॥ विश्वाचा जो बाप नंद त्याचा पिता। यशोदेसी माता म्हणतसे॥ ७॥ सद्‌गदित कंठ नेत्रीं जळ वाहे। नामा म्हणे काय मागतसे॥ ८॥

११०. इतुकें मागतसे तुज। वनीं जन्म देईं मज॥ १॥ सुखें करूनी राहीन। तुझें चरण पाहीन॥ २॥ बहुत शीणलों। आतां तुजपाशीं आलों॥ ३॥ न करीं अव्हेर। दास तुझा मी किंकर॥ ४॥ ब्रह्मा येतो काकुलती। नामा म्हणे देवाप्रती॥ ५॥

१११. काय देशील यांजला। ब्रह्मा म्हणे न कळे मला॥ १॥ म्हणसी देईन मी मुक्ति। तरी ऐक रमापति॥ २॥ मारायासी आले। त्यांसी स्वरूपीं मिळविलें॥ ३॥ न फिटे याचें पुण्य। तुजवरी झालें ऋण॥ ४॥ येथोनियां नवजासी। मज कळलें मानसीं॥ ५॥ आणोनियां देत। गायी गोपाळ समस्त॥ ६॥ घाली पोटामध्यें डोई। क्षमा करी माझे आई॥ ७॥ आज्ञा घेऊनियां गेला। नामा म्हणे स्वस्थळाला॥ ८॥

धेनुकासूरवध.

११२. आनंदें खेळत। राम गडी कृष्णनाथ॥ १॥ गडी म्हणती रामा। ताडफळें देईं आम्हां॥ २॥ सकळ मिळोनि। आले धेनूकांचे वनीं॥ ३॥ वृक्ष हालवोनी। फळें पाडिती मेदिनी॥ ४॥ येत धांवोनी असुर। करी तयाचा संहार। भक्तांचा अंकित। नामा म्हणे कृष्णनाथ॥ ५॥

कालियामर्दन.

११३. कालिंदीचे डोहीं कालियाची वस्ती। ऐक परिक्षिती चरित्र हें॥ १॥ पक्षीश्वापदांनीं सोडियेलें स्थळा। निघताती ज्वाळा तया डोहीं॥ २॥ विषाचिया-योगें झाडें जळताती। जीवन न घेती कोणी त्याचें॥ ३॥ वैकुंठनायक तया वनीं आला। गोपाळांचा मेळा बरोबरी॥ ४॥ हुतुतु हमामा लपंडाई खेळती। देवासी म्हणती लपें आतां॥ ५॥ तृषाक्रांत गाई जाहले गोपाळ। पिती तेव्हां जळ कालियाचें॥ ६॥ लहानाली मुलें नाहीं तया ज्ञान। झाले गतप्राण सकळांचे॥ ७॥ नामा म्हणे तेव्हां कृपादृष्टी पाहात। उठवी समस्त गायी गडी॥ ८॥

११४. जगजेठी तेव्हां क्रोधावला चित्तीं। करीन मी शांति तुझी आतां॥ १॥ माझिया लेकरा दिधलासे त्रास। करीन मी नाश आतां तुझा॥ २॥ त्रैलोक्यांत कोण ऐसा हो समर्थ। माझे शरणागत मारील जो॥ ३॥ माझिया भक्तांसी जो दुःखदायक। करीन प्रळय त्याजवरी॥ ४॥ स्फुरताती दंड कांपती अधर। उठला सत्वर जगदीश॥ ५॥ कळंबाचे वृक्षीं देव चढतसे। पीतांबर गोसे खोवियले॥ ६॥ जगद्गुरु तेव्हां पुष्पमाळा काढी। टाकितसे उडी जळामध्यें॥ ७॥ नामा म्हणे शोकें व्यापिलें समग्र। करूनि एकाग्र मनें ऐका॥ ८॥

११५. घालीतसे वेढे दिसतसे जळीं। आकांत सकळीं मांडियेला॥ १॥ गडी रडताती वत्से पडताती। कपाळ पिटिती सकळीक॥ २॥ तुजवांचोनिया रक्षी कोण आम्हां। काय सांगूं रामा सकळीक॥ ३॥ रुसल्या आमुचें करी समाधान। तुजवीण वन ओस वाटे॥ ४॥ आम्हांसाठीं तुवां दुष्टांसी मारिलें। कोण आतां लळे पुरवील॥ ५॥ तुजवांचोनिया आम्हीं सर्व दीन। न जाऊं येथून गोकुळांसी॥ ६॥ वियोगानें तेव्हां पक्षी रडताती। आतां कृष्णमूर्ति कैची आम्हां॥ ७॥ बोलोनियां ऐसें निस्तेज पडती। नदी वाहत होती स्थीरावली॥ ८॥ नामा म्हणे होती दुश्चिन्हें बहुत। गोकुळीं समस्त विचारिती॥ ९॥

११६. यशोदा व्याकुळ जाहालीसे प्राणें। सुखी असो तान्हें वनामाजी॥ १॥ उठती तिडका स्तनीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझ्या फार। लवतसे नेत्र वेळोवेळां ॥ २ ॥ जीव तळमळी दाटे माझा घसा। पाहीन पाडसा माझ्या केव्हां ॥ ३ ॥ गोकुळीचे जन निघाले सकळ। पाहताती गोपाळ वनामध्यें ॥ ४ ॥ कालिंदीच्या तीरीं पडिले सकळ। पाहोनि कोल्हाळ करिताती ॥ ५ ॥ कपाळ पिटिती यशोदा रोहिणी। आतां चक्रपाणि कैचा आम्हां ॥ ६ ॥ धांव धांव कृष्णा दावीरे वदना। पाजूं आतां पान्हा कोणालागीं ॥ ७ ॥ तुझिया कौतुकें कंठीं मी संसार। जळतें अंतर तुजसाठीं ॥ ८ ॥ कोणावरी आतां घालूं अलंकार। बुडालें हें घर माझें आतां ॥ ९ ॥ नामा म्हणे शोकें जाऊं पाहे प्राण। सकळांचें जीवन कृष्ण-नाथ ॥ १० ॥

११७. नंद म्हणे माझें बुडालें जहाज। अभाग्यासी मज कृष्ण कैचा ॥ १ ॥ काय माझें तप संपूर्ण सरलें। म्हणोनी बुडालें तान्हें माझें ॥ २ ॥ चिंतेनें व्याकुळ पिटी वक्षस्थळा। दावरे सांवळा प्राण माझा ॥ ३ ॥ आलिया अतीता त्रासें दवडीलें। म्हणोनी बुडालें बाळ माझें ॥ ४ ॥ प्रातःकाळीं पाहूं कोणाचें मी मुख। येथूनियां सुख नाहीं नाहीं ॥ ५ ॥ समस्तांची दृष्टी करी तुज कष्टी। म्हणोनि जगजेठी टाकियेलें ॥ ६ ॥ गोकुळीचे जन देऊं पाहाती प्राण। वांचाया कारण काय आतां ॥ ८ ॥ अभय देतसे बळिभद्र सर्वांसी। मारून दुष्टांसी येईल आतां ॥ ८ ॥ अंतर्यामीं जाणे जन झाले वेडे। नामा म्हणे वेढे काढितसे ॥ ९ ॥

११८. तयाचे मस्तकीं नाचे नारायण। आरंभी गायन जगदीश ॥ १ ॥ त्रैलोक्याचा भार घाली हृषीकेशी। दमीत दुष्टासी स्वामी माझा ॥ २ ॥ होता एक क्षण झाला तेव्हां क्षीण। जाऊं पाहे प्राण कालीयाचा ॥ ३ ॥ तेव्हां त्याच्या स्त्रीया येती काकुळती। लक्ष्मीच्या पती कृपाळूवा ॥ ४ ॥ यज्ञेशा अच्युता गोविंदा माधवा। दयानिधि केशवा कृष्णनाथा ॥ ५ ॥ श्रीधरा वामना अगा वासुदेवा। ऐकावी ही देवा विज्ञापना ॥ ६ ॥ आम्हांलागीं आतां देईं चुडेदान। धरिती चरण कृष्णजीचें ॥ ७ ॥ दीनाचा दयाळ दासाचा कैवारी। नामा म्हणे हरि उतरला ॥ ८ ॥

११९. राहूं नका येथें जावें समुद्रासी। सांगे हृषीकेशी सकळिकां ॥ १ ॥ तुझिया मस्तकीं असती चरण। न भक्षीच जाण पक्षीराज ॥ २ ॥ दिव्य सुमनांच्या घालिताती माळा। पूजिती सांवळा बाप माझा ॥ ३ ॥ अनर्घ्य रत्नांचे देती अलंकार। श्रीमुख सुंदर पाहाताती ॥ ४ ॥ जांबुनदातटीं घालिती भोजन। निघती तेथून सकळिक ॥ ५ ॥ आला भगवान आनंदले गडी। उभारिती गुडी जन तेव्हां ॥ ६ ॥ कालिया आख्यान स्मरे जो मानसीं। न डंखिती तयासी सर्पकुळें ॥ ७ ॥ अहर्निशीं याचें करी जो पठण। नामा म्हणे विघ्न नाहीं तेथें ॥ ८ ॥

१२०. आला वनमाळी। मग भेटती सकळी ॥ १ ॥ यशोदा रोहिणी। पोटीं धरिती चक्रपाणि ॥ २ ॥ गायी धांवताती। कृष्ण अंगातें चाटती ॥ ३ ॥ उड्या मारताती। गडी आनंदें नाचती ॥ ४ ॥ न वर्णवे तो आनंद। नामयाची बुद्धि मंद ॥ ५ ॥

वणवा.

१२१. झाला अस्तमान तेथेंचि राहती। ऐके परिक्षिती अद्भुत तें ॥ १ ॥ निद्रेनें व्यापिलें असे तेव्हां सर्वां। लागला वणवा तया वनीं ॥ २ ॥ गायी पडताती पक्षी रडताती। पिलीं पडताती कृष्णापुढें ॥ ३ ॥ हाहाःकार झाला धांव धांव कृष्णा। वांचवीरे प्राणा सकळांच्या ॥ ४ ॥ तुझीं आम्हीं बाळें वांचवींरे आम्हां। धांव धांव रामा म्हणताती ॥ ५ ॥ आक्रोशें रडती मारिताती हांका। वैकुंठनायका रक्षीं आम्हां ॥ ६ ॥ दीनांचा दयाळ मनाचा कोमळ। घाली अग्निज्वाळ मुखामाजी ॥ ७ ॥ होतां प्रातः-काल सकळ उठले। नामा म्हणे आले गोकुळांत ॥ ८ ॥

प्रलंबासुरवध.

१२२. दुष्ट दुराचारी। गोपाळाचा वेष धरी ॥ १ ॥ दैत्य ओळखिला। रामें प्रलंब मारिला ॥ २ ॥ देव करिती जयजयकार। पुष्पें वर्षती अपार ॥ ३ ॥ सूर्य आलासे माध्यान्हा। देवा बाहाती भोजना ॥ ४ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामा म्हणे पाचारती। गडी एकत्र बैसती॥ ५॥

काला.

१२३. एके ठायीं करुनि अन्न। हातें वाढी नारायण॥ १॥ हें पाहोनी सुरवर। चित्तीं करिती विचार॥ २॥ धन्य पुण्य गौळीयांचें आम्हां अन्न मिळे कैचें॥ ३॥ एक असे युक्ति। हात धुवील श्रीपती॥ ४॥ उच्छिष्टाचे मिषें। देव जळीं झाले मासे॥ ५॥ हें कळलें घननीळा। सांगतसे हें गोपाळा॥ ६॥ चला वृंदावना जाऊं। नामा म्हणे उदक घेऊं॥ ७॥

१२४. तृणाचीया लाभें गायी गेल्या दुरी। पाचारी मुरारी नामें त्यांची॥ १॥ चंद्रभागे, गंगे, भागिरथी, यमुने। येई ताम्रपर्णे धांवोनियां॥ २॥ सरस्वती, प्रवरे, कालिंदी, नर्मदे। येई तुंगभद्रे धांवोनियां॥ ३॥ देवाजीचा शब्द ऐकोनियां कानीं। येताती धांवोनी नामा म्हणे॥ ४॥

वेणुवादन.

१२५. त्रिभंगी देहुडे उभे वृंदावनीं। वेणु चक्रपाणि वाजवितो॥ १॥ तयावरी गायी टाकिताती माना। बाळें स्तनपाना विसरती॥ २॥ सर्प आणि नाग मुंगुसे बैसती। जळेंही वाहाती विसरली॥ ३॥ हस्ती सिंह एके ठायीं बसताती। भ्रमर भुलली वेणुनादें॥ ४॥ विंचरिती वेणी तेथें राहे फणी। करितां भोजनीं ग्रास मुखीं॥ ५॥ उदकाचे कुंभ गोपिकांचे शिरीं। यमुनेच्या तीरीं वेडावल्या॥ ६॥ जाहले तटस्थ त्रिलोकींचे जीव। विसरला शीव देहभाग॥ ७॥ नामा म्हणे व्योमीं उभ्या देवांगना। पाहोनियां कृष्णा भुलताती॥ ८॥

कात्यायनीव्रत.

१२६. मार्गशीर्ष मासीं कात्यायनी व्रत। कुमारी समस्त आचरती॥ १॥ अरुणोदयीं येती कालिंदीचे तीरीं। गाती त्या सुंदरी कृष्णजीला॥ २॥ सिकतेची मूर्ति करूनि देवीची। पूजाअर्चा तिची करिताती॥ ३॥ जोडोनियां कर करिताती स्तवना। ऐके विज्ञापना आदिमाये॥ ४॥ नंदाचा नंदन देईं आम्हां पती। नामा म्हणे येती स्वस्थळासी॥ ५॥

१२७. कालिंदीचे तीरीं वस्त्रें ठेविताती। जळांत रिघती सकळीक॥ १॥ गड्यासमवेत आला तेथें कृष्ण। करावया पूर्ण व्रत त्यांचें॥ २॥ वस्त्रें घेवोनियां चढे वृक्षावरी। घाबरल्या नारी पाहोनियां॥ ३॥ वस्त्रें देईं आतां आमुचीं मुकुंदा। जाऊनियां नंदा सांगों आतां॥ ४॥ अच्युता अनंता कृष्णा गरुडध्वजा। दासी आम्ही तुझ्या सकळिया॥ ५॥ वाजतसे सीत जाऊं पाहे प्राण। यशोदेची आण तुज असे॥ ६॥ ऐकोनियां ऐसें नामा म्हणे हांसे। धर्म सांगतसे तयालागीं॥ ७॥

१२८. नग्न होवोनियां स्नान जे करिती। त्यांचीं व्रतें होतीं निरर्थक॥ १॥ त्वरें करूनियां या गे मजपाशीं। सांगतों तुम्हांसी प्रायश्चित्त॥ २॥ एकी आड एक गुह्यस्थानीं हात। आनंद बहुत मनामध्यें॥ ३॥ करा नमस्कार सांगे वनमाळी। एक हस्त भाळी लाविताती॥ ४॥ देवां द्विजां ऐसा करितां नमस्कार। पाप याचें फार धर्मशास्त्रीं॥ ५॥ ऐकोनियां ऐसें लाज सोडोनियां। पडताती पायां आदित्याच्या॥ ६॥ वस्त्रें देत तेव्हां तयां जगजीवन। मनोरथ पूर्ण करीन मी॥ ७॥ नामा म्हणे येती गोकुळासी नारी। चालिला श्रीहरी तेथूनियां॥ ८॥

यज्ञान्न मागण्याविषयीं गोपांस आज्ञा.

१२९. प्रातःकाळीं सांगे सकळांसी कृष्ण। नका घेऊं अन्न आज कोणी॥ १॥ सोडोनियां गायी चालीले वनासी। गडी हृषीकेशी खेळताती॥ २॥ वर्जियलें आम्हां नका घेऊं अन्ना। खावें काय कृष्णा आजी आतां॥ ३॥ गडीयांसी सांगे वैकुंठीचा राणा। सांगावें ब्राह्मणा जावोनियां॥ ४॥ वनीं उपवासी आहेत रामकृष्ण। द्यावें त्यांसी अन्न कृपा करोनी॥ ५॥ गोपाळासी तेव्हां धाडी वासुदेव। पाहावया भाव याज्ञिकांचा॥ ६॥ जोडोनियां हात वंदिती द्विजांसी। धाडिलें आम्हांसी कृष्णनाथें॥ ७॥ नामा म्हणे ऐसें सांगती गोपाळ। यासि कां सबळ अभिमान॥ ८॥

१३०. पडे प्रायश्चित्त बोलों नका कोणी।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ऐकूं नये कानीं शब्द यांचा ॥ १ ॥ स्वर्गसुखासाठीं करिताती यज्ञ। टाकिती अवदानें अग्निमुखीं ॥ २ ॥ भोक्ता वनीं आला न कळेचि त्याला। पूर्ण ब्रह्म याला न जाणती॥ ३॥ कृपाळु बहुत परीक्षिती राया। उद्धार कराया पाठविलें॥ ४॥ इच्छामात्रें पाडी अन्नाचे पर्वत। काकुळती येत अन्नासाठीं ॥ ५ ॥ गडियांसी कळे तेथील आकार। निघती सत्वर तेथुनियां ॥ ६ ॥ येवोनियां कृष्णा सांगितलें त्यांनीं। हांसे चक्रपाणि नामा म्हणे॥ ७॥

१३१. कृष्णा पांच खाणी उथळ दिसती। लहानाल्या भिंती त्याजवरी ॥ १ ॥ विस्तु घालिताती गवत आंथरती। बडबड करिती अवघेजण ॥ २ ॥ घालुनियां तूप हातीं घेती चाटू। करीत ॐ फट् अस्कावेळ ॥ ३ ॥ लांकडाचें पाळें घेऊनि बैसला। मिळालासे मेळा त्याजपुढें ॥ ४ ॥ एवढेंसें भांडें तांदूळ शिजविती। तुजला काय देती त्यांतूनियां ॥ ५ ॥ घडिघडी उठती घडिघडी बैसती। तें काय श्रीपती आम्हां सांग ॥ ६ ॥ काय चतुराई असे त्या गोपाळा। भावासी भुलला नामा म्हणे॥ ७॥

ऋषिपत्न्यांकडे अन्नाची मागणी.

१३२. गडियांसी तेव्हां सांगितलें देवें। स्त्रियांसी सांगावें जाऊनियां ॥ १ ॥ नको कृष्णा द्विज आम्हांसी मारिती। अभय श्रीपती त्यांसी देत॥ २॥ त्वरें-करोनियां गेले स्त्रियांपाशीं। सांगितलें त्यांसी वर्तमान॥ ३ ॥ ऐकोनियां ऐसें उठिल्या सत्वर। वर्जिती भ्रतार तेव्हां त्यांचे॥ ४॥ एका ब्राह्मणानें स्त्रियेसी बांधिलें। प्राणासी सोडिलें परिक्षिती ॥ ५ ॥ सुकुमार सांवळा राजीवलोचन। पाहाताती कृष्णमुख तेव्हां॥ ६॥ आनंदाचे नेत्रीं वाहातें जीवन। पुसे वर्तमान नामा म्हणे॥ ७॥

१३३. घरा जावें ऐसें सांगे पुरुषोत्तम। ऐकोनियां भ्रम फार होय ॥ १ ॥ दयानिधि ऐके अगा मेघःश्यामा। धाडूं नको आम्हां येथूनियां ॥ २ ॥ तुजसाठीं आम्हीं सोडिलें भ्रतारां। चरणीं देईं थारा देवराया ॥ ३ ॥ देव ना संसार आम्हां झालें कृष्णा। सांगावें हें कोणा दुःख आतां॥ ४॥ तुमचे भ्रतार वंदिती आम्हांसी। सांगे हृषीकेशी भिऊं नका ॥ ५ ॥ सांगतांची ऐसें चालियेल्या त्या सर्व। पाहाती केशवा वेळोवेळीं ॥ ६ ॥ द्विजांचे मानसीं होय अनुताप। निंदिती आप आपणातें॥ ७॥ भोजन करूनी गडी रामकृष्ण। निघती तेथून नामा म्हणे॥ ८॥

इंद्रगर्वपरिहार.

१३४. इंद्राचा विभाग भक्षी चक्रपाणि। रूप गोवर्धनीं धरूनियां ॥ १ ॥ क्रोधावला इंद्र गौळियां निंदीत। दावीन सामर्थ्य तुम्हां आतां ॥ २ ॥ पोरांच्या बुद्धीनें वर्तताती सर्व। धरूनियां गर्व तेची करी ॥ ३ ॥ प्रळय मेघाच्या काढिल्या शृंखला। वर्षावे गोकुळां जाऊनियां ॥ ४॥ आज्ञा म्हणोनियां वंदियेला इंद्र। कोपे जैसा रुद्र प्रळयींचा॥ ५॥ मुसळाच्या धारा मेघ वर्षताती। गारा पडताती शिळा ऐशा॥ ६॥ मरताती पक्षी श्वापदें अपार। हिंवें नारीनर कांपताती ॥ ७ ॥ नामा म्हणे गायी हंबरडा फोडिती। येऊनि पडती कृष्णापुढें॥ ८॥

१३५. काकुळती येती सकळिक लोक। पाहासी कौतुक काय आतां ॥ १ ॥ मागें बहुतापरी रक्षियेलें आम्हां। अगा पुरुषोत्तमा दीनबंधु॥ २॥ कोण तुजविण आम्हांसि रक्षिता। उदारा अनंता जग-जेठी॥ ३ ॥ शरण शरण अगा वासुदेवा। अच्युता माधवा दीनबंधु॥ ४॥ विलंब केलिया जातील रे प्राण। धरिती चरण नामा म्हणे॥ ५॥

१३६. सकळिकां तेव्हां देवें आश्वासिलें। इंद्रें हें मांडिलें विघ्न येथें॥ १॥ महेंद्राचा रंक करीन क्षणांत। पाहा पुरुषार्थ दावीन मी॥ २॥ रक्षिणार यांसी आहें मी गोविंद। उतरीन मद तुझा आतां ॥ ३ ॥ शरणागता मारी ऐसा कोण थोर। मशक पामर पाहूं आतां॥ ४॥ यासाठीं करीन सृष्टीचा उभारा। लागो नेदी वारा दुःखाचा मी ॥ ५ ॥ गोवर्धना तुम्ही चलारे सकळ। दावितों मी बळ इंद्रा आतां ॥ ६ ॥ उचलिला गिरी प्रथम अंगुळीं। नामा म्हणे बळी बाप माझा॥ ७॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

.CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१३७. राहा याजतळीं आनंदें करूनी। मानूं नका मनीं भय याचें॥ १॥ पाहूं किती दिवस पडतो पाऊस। धरीन निःशेष प्रलयांत॥ २॥ सांगतांचि ऐसें राहाती सकळ। वर्णिताती बळ परस्परें॥ ३॥ सौंगडे म्हणती पडेल अवचिता। लावा कीरे हात सकळीक॥ ४॥ उगेची श्रमती बालकें अज्ञान। म्हणे नारायण काढा हात॥ ५॥ सप्त दिन होती सांगतो योगींद्र। पाहावया इंद्र येता झाला॥ ६॥ अद्भुत चरित्र पाहून गेली भ्रांत। मेघासी सांगत पुरे करा॥ ७॥ नामा म्हणे इंद्र मनीं तो शंकला। अपराध घडला समर्थाचा॥ ८॥

१३८. राहिला पाऊस निघावें बाहेर। सांगे विश्वंभर सकळांसी॥ १॥ दीनबंधु तेव्हां ठेवी पर्वतासी। भेटती देवासी सकळीक॥ २॥ आयुष्य बहुत तुज होवो कृष्णा। वांचविले प्राणा सकळांच्या॥ ३॥ विष्णुदास नामा ओवाळून जाय। ये गे माझे माय भेटी देई॥ ४॥

१३९. वाहातसे नेत्रीं इंद्राचिये नीर। अपराधी थोर देवराया॥ १॥ क्षमा करीं आतां अच्युता अनंता। अगा कृष्णनाथा दीनबंधु॥ २॥ तुझिया दासासी दुःख म्यां दिधलें। भ्रांतीनें मोहिलें मन माझें॥ ३॥ दावीं तुज थोरी न करीच सेवा। करा दंड देवा मजलागीं॥ ४॥ तूंचि माझा बाप तूंच माझी आई। क्षमा कृष्णाबाई करी आतां॥ ५॥ दैत्य मारावया भूतळीं आलासी। भक्तांला रक्षिसी निरंतर॥ ६॥ जगद्गुरु माझा धनी वनमाळी। जोडोनि आंजुली उभा असे॥ ७॥ चतुर्भुज गळां वैजयंती माळा। पहातसे डोळां नामा म्हणे॥ ८॥

१४०. गोविंदा माधवा केशवा वामना। मायातीता कृष्णा तुज नमो॥ १॥ गोवर्धनोद्धरा देवा विश्वंभरा। निर्गुण निराकारा तुज नमो॥ २॥ जनार्दना हरि कृपाळू हृषीकेशा। पुराणपुरुषा तुज नमो॥ ३॥ अव्यक्ता क्षेत्रज्ञा अचिंत्या कूटस्था। भुवनत्रयनाथा तुज नमो॥ ४॥ अनंत ब्रह्मांडें तुझिये उदरीं। घनःश्यामा हरि तुज नमो॥ ५॥ देवराया तुझें कोमळ हृदय। कृपादृष्टी पाहे मजकडे॥ ६॥ तुझा मी किंकर आहे वासुदेवा। अभय या जीवा देई आतां॥ ७॥ नामा म्हणे घाली चरणांसी मिठी। बोले जगजेठी स्वामी माझा॥ ८॥

१४१. तुझा मोडिला म्यां यज्ञ। ऐक तयाचें कारण॥ १॥ न करिसी रे स्मरण। सुखारूढ तुझें मन॥ २॥ विसरलासी मज। अनुग्रह केला तुज॥ ३॥ ऐसें सांगें नारायण। नामा म्हणे समाधान॥ ४॥

१४२. आणूनि सूरभि करी अभिषेक। येती सकळिक मरुद्गण॥ १॥ सुरवरांची दाटी करिती नमस्कार। होतसे अपार पुष्पवृष्टी॥ २॥ वेदमंत्रघोष ऋषि करिताती। अप्सरा नाचती थैयथैयां॥ ३॥ नारद तुंबर गंधर्व गायन। वर्णिताती गुण कृष्णजीचे॥ ४॥ यथाविधि इंद्र पूजी विश्वंभरा। जोडोनियां करा उभा राहे॥ ५॥ आज्ञा घेऊनियां जाय स्वस्थळासी। येती गोकुळासी सकळीक॥ ६॥ चरित्र जो कोणी उच्चारील वाचें। जळती पापांचे पर्वत हे॥ ७॥ नामा म्हणे ऐसें सांगतसे शुक। सूत पुराणीक शौनकाशी॥ ८॥

असुरासुरवध.

१४३. अहर्निशीं कंस बसे चिंताक्रांत। विचार पुसत प्रधानासी॥ १॥ प्रतिज्ञा करूनि शत्रुवधा जाती। ते मागें न येती परतोनी॥ २॥ आतां पुरुषार्थी कोण पाठवावा। तो मज सांगावा निवडोनि॥ ३॥ सांगती प्रधान धाडा असुरास। तंव तो असुर उभा राहे॥ ४॥ म्हणे मृत्यु नसे मज कोणा हातीं। द्वापारीं मारुती गुप्त झाला॥ ५॥ ऐकोनियां ऐसें आनंद मानसीं। गौरविलें त्यासी नानापरी॥ ६॥ नामा म्हणे काळें बोलाविलें त्यासी। सत्वर वनासी येता झाला॥ ७॥

१४४. आनंदें वनांत खेळताती गोप। गायींचे कळप चरताती॥ १॥ अकस्मात दैत्य देखती दुरोन। म्हणती कृष्णा विघ्न थोर आलें॥ २॥ लपे तूं कान्होबा म्हणताती गडी। घालितों घोंगडी तुजवरी॥ ३॥ घाबरले तेव्हां समस्त गोपाळ। पाहोनी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घननीळ बोलतसे ॥ ४ ॥ तुम्ही कांही चिंता न करा मानसीं। मारितों मी यासी क्षणामाजीं ॥ ५ ॥ राहोनियां उभा पाहात अंतरीं। यासी मृत्यु करीं कोणाचिया ॥ ६ ॥ वातात्मजा हातीं मरण असे यासी। कळलें देवासी नामा म्हणे ॥ ७॥

१४५. गायी गोप तेव्हां लपवोनी क्षणेक। जानकीनायक झाला देव ॥ १ ॥ आकर्ण नयन हातीं धनुष्यबाण। करितसे ध्यान मारुतीचें ॥ २ ॥ स्वामीचा तो धांवा ऐकोनियां कानीं। हडबडिला मनीं कपींद्र तो ॥ ३ ॥ निघोनी त्वरित वनामाजीं आला। चरणासी लागला प्रेमभावें ॥ ४ ॥ म्हणे स्वामी कांहीं सेवकासी आज्ञा। करावी सर्वज्ञा दयानिधी ॥ ५ ॥ देव म्हणे बारे काय सांगूं फार। पैल तो असूर येत आहे ॥ ६ ॥ तुझ्या हातें आहे तयासी मरण। म्हणोनि स्मरण केलें तुझें ॥ ७ ॥ तयासी जावोनी मारी त्वां आतां। चरणीं ठेवूनि माथा निघाला तो ॥ ८ ॥ दुर्जनें ते वेळीं मारुती पाहिला। म्हणे काळ आला कोठोनियां ॥ ९ ॥ धरूनियां नरडी केला गतप्राण। पुनरपि येऊन वंदीतसे ॥ १० ॥ नामा म्हणे दोन्ही जोडोनियां कर। बोलिला उत्तर काय आतां ॥ ११ ॥

१४६. त्रेतायुगीं ख्याती करोनियां थोर। वधिलें असूर रावणादी ॥ १ ॥ कोण्या हेतुस्तव पुन्हां आगमन। सांगा कृपा करून दासालागीं ॥ २ ॥ ऐकोनियां वचन बोले सर्वेश्वर। द्वापारीं अवतार आठवा हा ॥ ३ ॥ तुझे हे भेटीस्तव रूप हें धरिलें। दावी तें वहिलें कपी म्हणे ॥ ४ ॥ कृष्णलीला पाहूं हेत आहे चित्ता। दावी सीताकांता दीनालागीं ॥ ५ ॥ चतुर्भुज रूप दाविलें प्रगट। शिरीं मोरमुगुट शोभतसे ॥ ६ ॥ गुंजाहार गळां वैजयंती माळा। कांसेसी पिवळा पीतांबर ॥ ७ ॥ नवलक्ष गाई गोपही तितुके। खेळती कौतुकें करोनियां ॥ ८ ॥ नामा म्हणे तेव्हां स्तुति ते करीत। न कळे तुझा अंत ब्रह्मादिकां ॥ ९ ॥

१४७. द्वापाराची ठेव संपूर्ण पाहून। विनवी जोडून करालागीं ॥ १ ॥ रामरूप धरूंन मज बोळवावें। तें रूप पाहावें हृदयामाजीं ॥ २ ॥ मनोरथ त्याचा ऐकोनी श्रवणीं। झाला चापपाणि तात्कालीक ॥ ३ ॥ पाहोनियां ध्यान करूनि नमन। निघाला तेथून वायुसुत ॥ ४ ॥ घेवोनियां आज्ञा सेतुबंधा गेला। ध्यानस्थ बैसला नामा म्हणे ॥ ५ ॥

गोपीस वैकुंठदर्शन.

१४८. गौळी म्हणती हृषीकेशी। दावी आपुल्या स्थळासी ॥ १ ॥ सखा तूंचि कृष्णा। आमुची पुरवावी वासना ॥ २ ॥ दावी वैकुंठ सकळां। क्षणएक पाहूं डोळां ॥ ३ ॥ नामा तेथील रहिवासी। आला स्थापाया धर्मांशी ॥ ४ ॥

वृंदावन रासक्रीडा.

१४९. लोपतां आदित्य पडे चंद्रप्रभा। वृंदावनीं उभा सुशोभित ॥ १ ॥ देहुडा पाउलीं उभा तये वनीं। वेणू चक्रपाणि वाजवितो ॥ २ ॥ ऐकतांचि नाद गोकुळींच्या नारी। पाहावया हरि निघताती ॥ ३ ॥ भ्रतार सेजेसी टाकुनी उठती। वाढिता पंगती निघताती ॥ ४ ॥ स्तन देतां बाळें टाकिलीं भूमीसी। मोकळिया केशी निघताती ॥ ५ ॥ नामा म्हणे ऐशा गेल्या देवापाशीं। आनंद मानसीं न समाये ॥ ६ ॥

श्रीकृष्णगोपीखेळ.

१५०. वनामध्यें कां गे आलाती सकळ। विनोदें गोपाळ म्हणतसे ॥ १ ॥ निशीमाजीं व्याघ्र फिरताती रानीं। जावें सकळांनीं घरां आतां ॥ २ ॥ ऐकोनियां ऐसें कठीण वचन। चालिलें जीवन नेत्रींहूनि ॥ ३ ॥ वेणुनाद दूत धाडिला आम्हांसी। आलिया म्हणसी जावें आतां ॥ ४॥ शहाणा चतुर आहेसी नेटका। वैकुंठनायका विचारावें ॥ ५ ॥ कामाग्नीनें कृष्णा पीडिलों सकळ। मांडियेला खेळ मन्मथाचा ॥ ६ ॥ एक एक नारी एक एक कृष्ण। करावया पूर्ण इच्छा त्यांची ॥ ७ ॥ प्रकृतीसी ऐसा भुलला गोविंद। करिती आनंद नामा म्हणे ॥ ८ ॥

गोपीगर्व.

१५१. झाला अभिमान धन्य आम्ही आतां। लक्षुमीच्या कांता भोगीतसों ॥ १ ॥ गुप्त झाला तेव्हां वैकुंठनायक। करिताती शोक सकळीक ॥ २ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

निघाल्या तेथूनि फिरताती वनें। यशोदेचें तान्हें धुंडावया॥ ३॥ वृक्ष आदि पक्षी पुसती तयांसी। तुम्ही हृषीकेशी देखियेला॥ ४॥ मृगासी पुसती देखियेला डोळां। सांगाना सांवळा कोणीतरी॥ ५॥ आम्हांवरी तुम्ही काय रे कोपतां। सांगा रे भगवंता पुसतसों॥ ६॥ कुरवंडी करूं सकळांचे प्राण। देऊं त्या भूषण अंगावरी॥ ७॥ नामा म्हणे जेथें असे अभिमान। तेथें नारायण नाहीं नाहीं॥ ८॥

श्रीकृष्णाचें एका गोपीवरील प्रेम व श्रुतिरूपी गोपींचा श्रीकृष्ण-शोध.

१५२. ऐकावें चरित्र परिक्षितिराया। बरोबरी जाया एक असे॥ १॥ तोडोनियां पुष्पें करी अलंकार। घालीत श्रीधर तिजवरी॥ २॥ नये क्षणभरी योगियांचे ध्यानीं। घालितसे वेणी आवडीनें॥ ३॥ वंदियेली शिवे चरणींची गंगा। करीतसे भांगा नीट तिच्या॥ ४॥ गोपिकांच्या वेषें प्रगटल्या श्रुती। गुह्य हें तुजप्रती सांगितलें॥ ५॥ घेवोनियां तिसी गेला कुंजवना। वज्रांकुश चिन्हा उमटती॥ ६॥ गोपिकांचा मेळा येतसे तांतडी। युगाऐसी घडी झाली तयां॥ ७॥ नलगेचि शोध शीणती सकळा। न जाती गोकुळा नामा म्हणे॥ ८॥

प्रेमी गोपींचा गर्वनिरास.

१५३. चंद्राच्या प्रभेनें चमकती पाऊलें। दुरोनि देखिलें गोपिकांनीं॥ १॥ कृपणाचें धन होतें जें चळलें। तयासी लाधलें अवचिता॥ २॥ एकीमागें एक धांवताती नारी। आहे येथें हरी ऐसें वाटे॥ ३॥ घेवोनियां रज लाविताती भाळा। पाहती सकळा न्याहाळूनि॥ ४॥ बरोबरी नारी कोणीतरी असे। पाउलाचे ठसे उमटले॥ ५॥ पापिणी गे तुम्ही आम्ही सकळिक। पुण्याची अधिक म्हणुन भोगी॥ ६॥ बरोबरी तिसी होय अभिमान। झालासे स्वाधीन माझ्या देव॥ ७॥ कडे घेसी तरी येते बरोबरी। चालवेना हरी मज आतां॥ ८॥ जाणोनि अंतर ठकविलें भगवंतें। नामा म्हणे तेथें रडतसे॥ ९॥

प्रेमी गोपींचा व श्रुतीरूपी गोपींचा भेटीसमयीं संवाद.

१५४. मागोनियां गोपी आल्या तिजपासी। कोठें हृषिकेशी सांग आम्हां॥ १॥ टाकोनियां गेला मज पूतनारी। तेथेंची मुरारी गुप्त झाला॥ २॥ वैकुंठनायका अगा नारायणा। दावींरे वदना एक वेळा॥ ३॥ कृष्णाचें चरित्र सकळ करिती। मन रंजविती नामा म्हणे॥ ४॥

गोपींची प्राणांतिक अवस्था.

१५५. जोडोनियां हात येती काकुळती। पाव कृपामूर्ति आम्हांलागीं॥ १॥ अवतार घेसी दुष्ट वधायासी। येसी गोकुळासी म्हणोनियां॥ २॥ पाहोनियां तुला लक्ष्मुमी पातली। दरिद्रें पळाली येथोनियां॥ ३॥ सकळांसी सुख द्यावया आलासी। आम्ही वनवासी दुःखी होतों॥ ४॥ नामा म्हणे कंठीं धरियेला प्राण। दाखवी चरण दयानिधी॥ ५॥

श्रुतिरूपी गोपींची मागणी.

१५६. सरोवरीं कमळें तैसे तुझे नेत्र। त्याहूनि विचित्र दिसताती॥ १॥ कृपाळुवा ऐकें अगा हृषिकेशी। आम्ही तुझ्या दासी मोलाविण॥ २॥ कामरूपदैत्य मारितो आम्हांसी। भक्तांसी रक्षिसी कीर्ति जगीं॥ ३॥ दीनासी रक्षिसी दुष्टासी मारिसी। धर्माला स्थापिसी निरंतर॥ ४॥ घेवोनियां शस्त्र मारावें सकळां। आलासे कंटाळा नामा म्हणे॥ ५॥

श्रुतिरूपी गोपींनीं भगवंताची केलेली स्तुति.

१५७. सुकुमार सांवळे जैसीं रातोत्पळें। दावीं तीं पाऊलें कृष्णराया॥ १॥ ध्वजवज्रांकुश पद्म तें शोभलें। दावीं तीं पाउलें कृष्णराया॥ २॥ दमोनियां दुष्टां बाहेर काढिलें। दावीं तीं पाउलें कृष्णराया॥ ३॥ रांगता रांगतां विमलार्जुन मोडिले। दावीं तीं पाउलें कृष्णराया॥ ४॥ अघासुरा उदरीं उभीं जीं राहिलीं। दावीं तीं पाउलें कृष्णराया॥ ५॥ नामा म्हणे ज्यांतें वरुणानें पूजिलें। दावीं तीं पाउलें कृष्णराया॥ ६॥

१५८. सकळांचें तुझ्या हातीं असे सूत्र। यशोदेचा पुत्र न होशील॥ १॥ नंदाचिया ऋणा फेडाया

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आलासी। कळलें आम्हांसी तुझ्या कृपें॥ २॥ तेहेतीस कोटी देव ब्रह्मा सदाशिव। प्रार्थिताती सर्व तुजलागीं॥ ३॥ यादवकुळटिळका वैकुंठनायका। विधीच्या जनका भेट आतां॥ ४॥ नामा म्हणे मुख दाखवीं कृष्णनाथा। हरेल ही व्यथा वियोगाची॥ ५॥

१५९. शरणांगता तारी भवसिंधु त्वरित। ठेवावा तो हात शिरावरी॥ १॥ अरण्यांत दुष्ट दैत्यांसी मारीत। ठेवावया तो हात शिरावरी॥ २॥ वेणू पावा जया हातांत शोभत। ठेवावा तो हात शिरावरी॥ ३॥ घेवोनी शिदोऱ्या गड्यांसी वांटीत। ठेवावा तो हात शिरावरी॥ ४॥ रक्षावया प्रजा उचलिला पर्वत। ठेवावा तो हात शिरावरी॥ ५॥ सुवर्णाचीं कडीं भूषणें अमूप। पाहतां निष्पाप नामा म्हणे॥ ६॥

श्रुतिरूपी गोपींचा अनुताप व भगवंताचें गुणवर्णन.

१६०. अभिमानें घाला घातला आम्हांसी। म्हणूनि लपलासी देवराया॥ १॥ तुजवांचोनियां जाऊं पाहे प्राण। दाखवी वदन एक वेळां॥ २॥ मुकुट कुंडलें श्रीमुख सांवळें। केशरी लाविलें गंध भाळीं॥ ३॥ पाहोनियां जीवीं होय फार सुख। हरेल ही भूक डोळियांचीं॥ ४॥ तुजवांचोनी आम्हां नाहीं कोणी। तिन्हीं त्रिभुवनीं नामा म्हणे॥ ५॥

१६१. चरणासीं शरण तुझिया जे येती। तेचि उतरती भवसिंधू॥ १॥ लक्ष्मीनें ज्यातें असे आराधिलें। ठेवीं तीं पाउलें स्तनावरी॥ २॥ आवडीनें शिवें मस्तकीं वंदिलें। ठेवीं तीं पाउलें स्तनावरी॥ ३॥ नामा म्हणे ऐशी करिताती स्तुति। शिंपीयेली क्षिती अश्रुपातें॥ ४॥

श्रुतिरूपी गोपींचें भगवंताशीं निष्काम बुद्धीनें अनुतापयुक्त भाषण.

१६२. आम्हांवरी कां रे धरियेला राग। काय तुझें सांग आम्हीं केलें॥ १॥ रडतसों आम्ही मारितसों हांका। विश्वाच्या जनका नायिकसी॥ २॥ कामाग्नीनें आम्ही जळतों सकळ। करावें शीतळ अधरामृतें॥ ३॥ नामा म्हणे देईं एक वेळ भेटी। तुजसाठीं कष्टी फार होतों॥ ४॥

१६३. वाजवोनी वेणू पसरिलें जाळें। आम्हांसी न कळे कपटिया तूं॥ १॥ दुखवोनी सर्वां टाकियेलें वनीं। गेलासी वधुनी पारधियां॥ २॥ धरूनियां धीर राहूं एक क्षण। देऊं मग प्राण सकळिक॥ ३॥ सकळांच्या हत्या येती तुजवरी। नामा म्हणे हरि भेट आतां॥ ४॥

१६४. त्रिविधतापें प्राणी होताती संतप्त। शीतळ करीत कथामृतें॥ १॥ अमृतापरीस कथा ते अधिक। सांगतसे ऐक देवराया॥ २॥ स्वर्गी जें अमृत प्राशन करिती। पुण्य सरल्या येती मृत्युलोकां॥ ३॥ तुझी कथा देत अच्युत पदासी। न विचारी मानसीं याति कांहीं॥ ४॥ नाहीं चतुराई बोबडे हे बोल। लिहीत विठ्ठल नामा म्हणे॥ ५॥

१६५. गायी घेवोनियां जासी जेव्हां राना। आमुचिया मना दुःख वाटे॥ १॥ सुकुमार सांवळीं जैसीं रातोत्पळें। त्याहूनि कोंवळे पाय तुझे॥ २॥ खडे कांटे बहू कठिण तृण मुळें। ठेवीसी पाउलें तयावरी॥ ३॥ पावतोसी क्लेश अगा वासुदेवा। म्हणोनियां जीवा दुःख वाटे॥ ४॥ सांगतसे आम्हीं नित्य यशोदेसी। धाडूं नको यासी वनामध्यें॥ ५॥ नामा म्हणे होय सकळांचा उद्धार। म्हणोनी श्रीधर वना जाय॥ ६॥

१६६. तुजवांचोनियां वैकुंठनायका। आम्हांसी घटिका युग होय॥ १॥ अस्तमान होतां येसी तूं गोकुळीं। मुखावरी धुळी गोरजांची॥ २॥ कुरळ हे केंस सुंदर नासिक। पाहोनियां सुख फार होय॥ ३॥ लवती पापण्या न सोसती आम्हां। अहर्निशीं नामा हेंचि गाय॥ ४॥

१६७. टाकियेलें आम्हीं पतिबंधुसुतां। आलों त अच्युता तुजपाशीं॥ १॥ आमुची ही इच्छा करिशील पूर्ण। आहेसी कठीण ठावे नाहीं॥ २॥ घालोनियां कूपीं कापियेले दोरा। साधियेलें वैरा आपुलिया॥ ३॥ वरोनियां टाकी मोठासा पर्वत। म्हणती समस्त नामा म्हणे॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रुतिरूपी गोपींवर भगवंताची दया.

१६८. तुझें भेटीविण। जाती सकळांचे प्राण॥ १॥ दया तुझिया मना। कां रे नयें नारायणा॥ २॥ बोलवेना आतां। कंठ शोषला अनंता॥ ३॥ ऐसें पाहोनियां। नामा म्हणे आली दया॥ ४॥

श्रुतिरूपी गोपीगर्वनिरास व भगवत्‌दर्शन.

१६९. देतसे दर्शन। सकळांसी नारायण॥ १॥ झाला सकळां आनंद। हृदयीं धरिला गोविंद॥ २॥ टाकोनियां आम्हां। कां गेलासी पुरुषोत्तमा॥ ३॥ तुम्हां झाला अभिमान। नामा म्हणे सांगे खूण॥ ४॥

जलक्रीडा.

१७०. सकलांची इच्छा करीतसे पूर्ण। भुलला श्रीकृष्ण त्यांच्या भावा॥ १॥ विमानीं बैसोनी सुरवर पाहाती। गंधर्व गाताती सप्तस्वरें॥ २॥ विणे वाजताती मृदंगाचे घोष। वाचे तो उल्हास वर्णवेना॥ ३॥ न जाय चंद्रमा न जाती नक्षत्रें। पाहाती सर्वत्र रासक्रीडा॥ ४॥ जलक्रीडा करी लक्ष्मीचा पती। लाल घोटिताती देवस्त्रिया॥ ५॥ धन्य त्या गोपिका धन्य त्यांचें पुण्य। भोगिताती कृष्ण पूर्णब्रह्म॥ ६॥ नामा म्हणे होय कामाची ते मूर्ती। नव्हे वीर्यच्युती गोविंदाची॥ ७॥

१७१. होतां प्रातःकाळ सांगतसे तया। जावे येथोनियां शीघ्र आतां॥ १॥ क्षणोक्षणीं पाहाती देवाजीचें मुख। येती सकळीक गोकुळासी॥ २॥ परिक्षिती ऐके एका कौतुकासी। होत्या त्याजपाशीं त्याच्या स्त्रिया॥ ३॥ म्हणोनियां कोणी नाहीं विचारिलें। अंतरीं न कळे दुजियाला॥ ४॥ यथामति रास वर्णिला देवाचा। संपूर्ण हे वाचा काय करी॥ ५॥ चरित्र श्रवण करील जो कोणी। धन्य तोचि प्राणी नामा म्हणे॥ ६॥

सुदर्शन नांवाच्या विद्याधराची सर्पयोनींतून मुक्तता.

१७२. सरस्वती तीरीं अंबिकेचें स्थान। गोकुळींचे जन जाती तेथें॥ १॥ करोनी पूजन करिती प्रार्थना। नंदाच्या नंदना सुखी राखी॥ २॥ सारितां भोजन लपाला आदित्य। नामा म्हणे तेथें राहताती॥ ३॥

१७३. निद्रिस्त सकळ तये वनीं व्याल। गिळितसे बळें नंदालागीं॥ १॥ कृष्णा धांव वेगी मज गिळी सर्प। काळावरी दर्प तुझा देवा॥ २॥ माझिया पाडसा येईं रे धांवोनी। दाखवी वदन अंतकाळीं॥ ३॥ आली काय तुज निद्रा रे कान्हया। माझिया तान्हया ऊठ वेगीं॥ ४॥ ऐकोनियां ऐसें बोलती सकळ। घालिती मुसळ सर्पावरी॥ ५॥ श्रमले सकळ सोडिला नंदाला। पिटी वक्षस्थळा नंदपत्नी॥ ६॥ उठे जगद्गुरु काय झालें माय। लावीतसे पाय तयालागीं॥ ७॥ टाकियेले तेव्हां सर्पे कलेवर। पुरुष सुंदर निघतसे॥ ८॥ नामा म्हणे वाचे स्तवी विश्वंभरा। करुनि नमस्कारा जाता झाला॥ ९॥

शंखचुडाचा वध.

१७४. करिती गायन रामकृष्णहरी। गोकुळीच्या नारी जाती तेथें॥ १॥ शंख नामा तेथें आलासे गुह्यक। नाहीं त्या विवेक पापियासी॥ २॥ उपजला काम तयाचिया मना। घालोनि विमाना स्त्रिया नेत॥ ३॥ धांव धांव रामा नेतसे हा आम्हां। अगा मेघश्यामा कृष्णनाथा॥ ४॥ नेतो स्त्रिया काय नकळेचि देवा। यासी करूं द्यावा अपराध॥ ५॥ हातीं वृक्ष दोघे ऐसें पाहोनियां। टाकोनि तो स्त्रिया पळतसे॥ ६॥ घालिताची वृक्ष प्राणासी मुकला। मणी त्याचा दिला बळीभद्रा॥ ७॥ भक्तांसाठीं मारी दुष्टां जगजेठी। नामा म्हणे तुटी विसरेना॥ ८॥

वनविहारानंतर गोपगोपिकांचें नंदागृहीं आगमन.

१७५. गोपिकेचा मेळा आला गृहाप्रती। काय त्या म्हणती नंदालागीं॥ १॥ परब्रह्म साक्षात क्षीरसागरवासी। त्या कैसा धाडसी वनामध्यें॥ २॥ ब्रह्मा आणि इंद्र आले गोकुळासी। वर्णिती कृष्णाशीं तुम्ही देखा॥ ३॥ तेहतीस कोटी देव जयाते प्रार्थित। तयासी अरण्यांत रुतती काटे॥ ४॥ दैत्यांचा हा भार जाहला पृथ्वीसी। वधाया कंसासी आला येथें॥ ५॥ त्याजसाठीं फार श्रमताती योगी। कैलासाचा जोगी ध्यान करी॥ ६॥ भ्रांती कां रे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुज पडे वेळोवेळां। पाहतोसी डोळां चरित्रास॥ ७॥ नामया सुकृत झालें असे फार। म्हणोनी विचार नाठवेची॥ ८॥

वृषभरूपधारी रिठासुराचा वध

१७६. वृषभाच्या वेषें आला रिठासूर। इंद्रादि सुरवर भीती जया॥ १॥ बहु देतो त्रास गोकुळीच्या जना। धांव धांव कृष्णा मारी याला॥ २॥ जगजेठी तेव्हां धरितसे शिंगें। मारितसे मागें भुजाबळें॥ ३॥ पाडोनियां खालीं दिला पाय वर। मारिला असुर नामा म्हणे॥ ४॥

नारदाची कंसाशीं मसलत.

१७७. कंसाचिया घरां आला नारदमुनी। एकांतीं बैसोनी सांगतसे॥ १॥ सातवा जो गर्भ जिराला म्हणती। रोहिणी प्रसवती बळीराम॥ २॥ आठवा जो पुत्र देवकीसी झाला। वसुदेवें नेला नंदाघरीं॥ ३॥ यशोदेची कन्या घेऊनियां येत। गेली आकाशांत मारितां जे॥ ४॥ तुझिया मानसीं अशंका येईल। होते रक्षपाळ माझे तेथें॥ ५॥ ईश्वराची माव न कळे कोणाला। कळलें मजला त्यांच्या कृपें॥ ६॥ घेवोनियां शस्त्र उठला त्वरित। करितो मी घात वसुदेवाचा॥ ७॥ तयेवेळीं म्हणे ब्रह्मयाचा सूत। ऐक तुज मात सांगतों मी॥ ८॥ शत्रु वधी आधीं मग मारी यासी। आहे तुजपासी कारागृहीं॥ ९॥ सांगोनियां ऐसें शांतविलें त्यासी। गेला गोकुळासी नामा म्हणे॥ १०॥

नारदाचें कृष्णनंदादिकांस सांगणें.

१७८. गोकुळा येवोनी भेटे नंदादिकां। वैकुंठनायका सांगतसे॥ १॥ कंसानें मांडिला अधर्म बहुत। मारावें त्वरित तयालागीं॥ २॥ लावोनियां आग आपण विझविली। तेचि परी केली नारदानें॥ ३॥ सांगोनियां ऐसें विणा सांवरोन। निघाला तेथून नामा म्हणे॥ ४॥

केशी दैत्याचा वध.

१७९. मारावया कृष्णासी। कंसें पाठविला केशी॥ १॥ बहु असे तो प्रतापी। आला अश्वाचिये रूपी॥ २॥ देवा डसाया धांवला। धरूनि पायां झुगारिला॥ ३॥ मुखीं देऊनियां हात। श्वास कोंडी जगन्नाथ॥ ४॥ नामा म्हणे पडलें प्रेत। हर्ष सुरवरां बहूत॥ ५॥

व्योमासुरवध.

१८०. शेळया मेंढियांचा खेळ। आतां खेळूं रे सकळ॥ १॥ कोणी मेंढ्या होती। कोणी चोर म्हणताती॥ २॥ म्हणती रात्र झाली। आतां निजवा वनमाळी॥ ३॥ कोणी श्वान होती। चोरी डसाया धांवती॥ ४। तेथें व्योमासुर येत। गोपाळाचा वेष धरीत॥ ५॥ करोनियां चोरी। नेऊन ठेवी पर्वतदरीं॥ ६॥ हें तों देवासि कळलें। नामा म्हणे संहारिलें॥ ७॥

अक्रूराचें गोकुळीं गमन.

१८१. कंसासुर सारे करोनि विचार। धाडिती अक्रुर गोकुळासी॥ १॥ अक्रुरा आनंद झाला असे फार। पाहीन श्रीधर डोळेभरी॥ २॥ आजि होईल माझ्या जन्माचें सार्थक। वैकुंठनायक पाहीन मी॥ ३॥ उजवे जाती काक वाम जाती मृग। पाहीन श्रीरंग स्वामी माझा॥ ४॥ शुभ हे शकून मार्गी हे होताती। पाहीन भूपती वैकुंठीचा॥ ५॥ येथूनियां माझी सरली येरझार। कंसानें उपकार केला मोठा॥ ६॥ आजी माझे पितर उद्धरती सकळ। पाहीन गोपाळा कृपासिंधू॥ ७॥ नामा म्हणे आला गोपाळ सन्निध। हृदयीं आनंद न समाये॥ ८॥

अक्रुराचे मनाशीं उद्गार

१८२. चौदाजणी ज्याच्या चरणातें पूजिती। त्याची घेईन माती आपुल्या शिरीं॥ १॥ एकांतीं अर्चन करिती धूर्जटी। त्यासी बोलेन गोष्टी आवडीच्या॥ २॥ सप्तऋषि ज्याचे वर्णिताती गुण। करीतसे ध्यान ब्रह्मा ज्याचें॥ ३॥ चारी वेद ज्याची वर्णिताती कीर्ति। करिताती स्तुति साहीजण॥ ४॥ तेहेतीस कोटि देव जयाते पूजिती। श्रुति वर्णिताती गुण ज्याचे॥ ५॥ लक्ष्मीचा पति ध्याती सनकादिक। पाहीन श्रीमुख एक वेळां॥ ६॥ पृथ्वीचा हा भार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करावया दूर। म्हणोनि अवतार घेत असे॥ ७॥ नामा म्हणे आला यमुनेजवळी। उतरला खालीं रथाचिया॥ ८॥

१८३. धन्य ही यमूना धन्य हें गोकुळ। वृक्षादि सकळ धन्य धन्य॥ १॥ धन्य ह्या गोपिका धन्य हे गोपाळ। पक्षादि सकळ धन्य धन्य॥ २॥ धन्य गोवर्धन धन्य वृंदावन। नंदाचा नंदन क्रीडतसे॥ ३॥ धन्य ती यशोदा धन्य तिचा पति। अखंड पाहाती मुख ज्याचें॥ ४॥ गायी घेवोनियां देव गेला रानां। ध्वजवज्रांकुश चिन्हां उमटती॥ ५॥ नेत्रीं अश्रुपात उतरे रथाखालीं। गडबडोनी लोळे तयावरी॥ ६॥ ब्रह्मादिकां दुर्लभ तेथीलही माती। घेवोनियां हातीं मुखीं घाली॥ ७॥ नामा म्हणे पुढें चालिला त्वरित। देखे गडियांत परब्रह्म॥ ८॥

अक्रुराची व श्रीकृष्णाची भेट.

१८४. तनु हें आकाश चंद्रमा तें मुख। ऐसे निष्कलंक परीक्षिती॥ १॥ पूर्णिमेचा चंद्र त्याहुनी अधीक। शोभत श्रीमुख कृष्णजीचें॥ २॥ भोंवता हा शोभे नक्षत्रांचा मेळा। खेळत सांवळा जगद्गुरू॥ ३॥ वैजयंती माळा किरीट कुंडलें। अक्रुरे देखिले दोघेजण॥ ४॥ जोडोनियां हात घाली नमस्कार। वाहतसे नीर क्षणोक्षणीं॥ ५॥ नामा म्हणे त्वरें धांवे हृषिकेशी। धरीत पोटाशीं अक्रूरातें॥ ६॥

बळिराम व अक्रूर यांची भेट व नंदगृहीं अक्रूर पूजन.

१८५. भेट देई मज म्हणे बळिराम। न वर्णवे प्रेम अक्रुराचें॥ १॥ पेंद्यासी पुसती अवघे गडी तेव्हां। कोण रे हा बाबा आला येथें॥ २॥ आपुल्या कान्होबाच्या पायां कां पडतो। काय हा मागतो सांग आम्हां॥ ३॥ अक्रूर बळिराम घरीं आले गोपाळ। नंदादि सकळ भेटीयेले॥ ४॥ मधुपर्कविधि करिती पूजन। म्हणे धन्य दिन आजीचा हा॥ ५॥ अक्रुरा-बरोबरी करिती भोजन। पुसे वर्तमान मग त्यासी॥ ६॥ भक्त माझें दैवत जगा दावी मात। कृपाळु बहुत नामा म्हणे॥ ७॥

श्रीकृष्णाचें मथुरेसीं प्रयाण व तन्निमित्त गोपींचा शोक.

१८६. प्रातःकाळीं मात झाली गोकुळांत। जातो भगवंत मथूरेसी॥ १॥ गौळणींचा मेळा मिळाला सकळ। पिटीती कपाळ आपुले हातें॥ २॥ एकी त्या घालिती केसामध्यें माती। एक त्या लोळती भूमीवरी॥ ३॥ आम्हां सोडूनियां तूं रे कैसा जासी। तुजविण पीशी आम्ही सर्व॥ ४॥ कोणी रथापुढें जाऊनि पडती। आक्रोशें रडती सकळीक॥ ५॥ अक्रुर नव्हे बाई मोठा असे क्रूर। नामीं निरंतर क्रीया वसे॥ ६॥ अक्रुरा आम्ही सर्व पसरितों पदर। नेऊं नको श्रीधर मथुरेसी॥ ७॥ नामा म्हणे शोक न वर्णवे आतां। झाला तो हांकिता रथ त्वरें॥ ८॥

अक्रूराची चिंतातुर स्थिति.

१८७. ब्रह्मनिष्ठ तेव्हां स्थिरावला चित्तीं। अक्रुराचे गळती दोन्ही नेत्र॥ १॥ दही दूधतुपें भरिल्या कावडी। चालती तांतडी सकळीक॥ २॥ चिंतेनें व्यापिलें अक्रुराचें मन। काय वर्तमान होईल नेणों॥ ३॥ नरनारी शोक करिती सकळ। दुराचारी खळ कंस आहे॥ ४॥ मार्गीं स्नानासी उतरला अक्रूर। रथावरी किशोर नंदजीचे॥ ५॥ सोडोनियां घोडीं चालिला तांतडी। दिली असे बुडी जलामध्यें॥ ६॥ दावोनि कौतुक निरसी त्याचा धाक। सांगतसे शुक परिक्षिती॥ ७॥ जुंपूनियां घोडी चालिला सत्वर। लोपे दिनकर नामा म्हणे॥ ८॥

अक्रुराची श्रीकृष्णास प्रार्थना.

१८८. जोडोनियां करा विनवी विश्वंभरा। चलावें मंदिरीं सकळिकीं॥ १॥ अनाथावर कृपा करीं कृष्णनाथा। ठेवितसे माथा पायांवरी॥ २॥ मारुनियां कंस येईन तुझ्या घरां। आग्रह अक्रुरा करूं नको॥ ३॥ सकल समुदाय मथुरेचे वर्नीं। साह्य चक्रपाणि म्हणे नामा॥ ४॥

रजकवध, कुब्जाप्रसाद, सुदामा माळ्याची विनवणी, यागधनुष्यभंग आणि धनुष्यरक्षकवध.

१८९. प्रातःकाळीं गडी उठे कृष्णराम। पाहावया

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ग्राम चालियेले ॥ १ ॥ मागती रजका देईना तो वस्त्रें। वधी नख शस्त्रें पापियासी ॥ २ ॥ ती ठायी वांकडी नीट केली तिसी। तीनें चंदनासी लावियेलें ॥ ३ ॥ जोडोनियां हात विनवी सुदामा। चला मेघःश्यामा घरा माझ्या ॥ ४ ॥ वस्त्रें देती तेव्हां मथुरेचे लोक। नरनारी मुख पाहाताती ॥ ५ ॥ मोडितां धनुष्य येती रक्षपाळ। नामा म्हणे खळ वधियेले ॥ ६ ॥

कुवलयपीड हत्तीचा उद्धार.

१९०. इच्छामात्रें मोडी ब्रह्मांडाच्या कोटी। चालिला जगजेठी कंसद्वारा ॥ १ ॥ मदोन्मत्त हत्ती देखोनियां हांसे। पीतांबर कांसे खोवियेला ॥ २ ॥ सांवरोनियां हातें केंसा देत गांठ। खोवितसे नीट वैजयंती ॥ ३ ॥ खंब ठोकोनियां राहे पुढें उभा। सांवळी ही सुप्रभा अंगकांति ॥ ४ ॥ पोहोनियां शुक झाला समाधिस्त। ऋषिमुनि समस्त वेडावले ॥ ५ ॥ दुष्ट पापी हत्ती घाली अंगावरी। क्षणार्धेंचि मारी गजालागीं ॥ ६ ॥ उपडोनियां दांत घेतसे श्रीधर। जाहला उद्धार कुवलयाचा ॥ ७ ॥ नामा म्हणे पुढें चालिला गोविंद। सावध सावध परिक्षिती ॥ ८ ॥

श्रीकृष्ण-चाणूर व बलराम-मुष्टिक यांचें मल्लयुद्ध.

१९१. चौदा भुवनें वसतीं जयाचिये पोटीं। त्यासी आणि जेठी मारावया ॥ १ ॥ इंद्रादि सुरवर जयाचे किंकर। त्यासी आणी पामर झोंबीसाठीं ॥ २ ॥ अतुर्बळी तेव्हां दिसे नारायण। जळताती मनें वैरियांचीं ॥ ३ ॥ कंसाचे अंगणीं उभा असे देव। जैसा ज्याचा भाव तैसा भासे ॥ ४ ॥ कृष्णातें देखोनी वल्गना करिती। चोळिताती माती दंडालागीं ॥ ५ ॥ बळिभद्रासी खूण दावियेली तेव्हां। उशीर न लावावा मारायासी ॥ ६ ॥ नामा म्हणे एक उरला असे कंस। वधिती सकळांस दोघेजण ॥ ७ ॥

कंसवध.

१९२. रमेच्या वल्लभें देखियेलें कंसा। धरोनी आवेशा बैसलासे ॥ १ ॥ त्वरें जाऊनियां धरीयेला केशीं। पाडिला भूमीसी दुष्टबुद्धि ॥ २ ॥ वज्रप्राय मुष्टी वोपी नारायण। सोडियेला प्राण कंसें तेव्हां ॥ ३ ॥ देव वर्षताती सुमनांचें भार। भक्त जयजयकार गर्जताती ॥ ४ ॥ गान्हाणी सांगती ऋषिमुनी सर्व। गाताती गंधर्व सप्तस्वरें ॥ ५ ॥ नामा म्हणे पुढें अप्सरा नाचती। वर्णिताती कीर्ति कृष्णजीची ॥ ६ ॥

उग्रसेनराज्यस्थापना.

१९३. राज्यीं स्थापियेला उग्रसेन तेव्हां। देवकी वसुदेवा सोडविले ॥ १ ॥ देवकीच्या स्तनीं फुटलासे पान्हा। वसुदेव दर्शना करीतसे ॥ २ ॥ वसुदेवें केलें त्याचें समाधान। गायी दिल्या दान ब्राह्मणांसी ॥ ३ ॥ समस्तांची क्रिया करी उग्रसेन। झालासे दिवाण देव त्याचा ॥ ४ ॥ पळोनियां गेले होते जे यादव। आणियेले सर्व रामकृष्णें ॥ ५ ॥ आनंद न माये सकळ लोकांला। मथुरेंत राहिला नामा म्हणे ॥ ६ ॥

नंदादि गोपांस गोकुळीं जाण्याची आज्ञा.

१९४. नंदालागीं तेव्हां म्हणे चक्रपाणि। जावें तुम्ही सकळांनीं गोकुळासी ॥ १ ॥ अहर्निशीं माझें करावें चिंतना। दुःख सांडी मना नंदराया ॥ २ ॥ ऐसें ऐकोनियां निराश वचन। जाईल माझा प्राण तुजविण ॥ ३ ॥ गडी म्हणती देवा आम्हांसि टाकिलें। काय आमुचें सरलें पुण्य देवा ॥ ४ ॥ कोणासवें आम्ही खेळूं यमूनेते। रक्षील आम्हांते कोण आतां ॥ ५ ॥ ब्रह्मादिक तुझ्या वंदिताती पाया। दिल्या आम्हीं शिव्या क्षमा करीं ॥ ६ ॥ यशोदेसी सांगा माझा नमस्कार। देईन सत्वर भेटी सर्वां ॥ ७ ॥ कंठ सद्गदीत नेत्रीं अश्रुपात। निघती समस्त नामा म्हणे ॥ ८ ॥

रामकृष्णांचें मौंजीबंधन.

१९५. चारी वेदां ज्याचा नयेचि उमज। करीतसें मुंज वसुदेव ॥ १ ॥ कर्दळीसे स्तंभें वाडे श्रृंगारिले। गर्गासी धाडिलें आणावया ॥ २ ॥ देशोदेशीं चिठ्या लिहिल्या वसुदेवें। मुंजीसाठीं यावें कृष्णजीच्या ॥ ३ ॥ मथुरेचे लोक आणिती आहेर। होतसे गजर वाजंत्र्यांचा ॥ ४ ॥ उग्रसेनें तेव्हां फोडिलें भांडार। द्विजांसी अपार द्रव्य दिलें ॥ ५ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विष्णुदास नामा वांटितो सुपारी। झाले ब्रह्मचारी राम कृष्ण॥ ६॥

रामकृष्णांचें गुरुगृहीं अध्ययन.

१९६. घालितसे पंथ तरावया जना। गेले सांदीपना घरीं दोघे॥ १॥ गुरुसेवा करिती वंदिती चरण। जाहली संपूर्ण विद्या तेव्हां॥ २॥ जोडोनियां हात करिती प्रार्थना। मागावी दक्षणा गुरुराया॥ ३॥ नामा म्हणे द्विज म्हणत स्त्रियेसी। असे जें मानसी इच्छा तुझ्या॥ ४॥

गुरूची बुडालेल्या पुत्राची मागणी व पांचजन्य वध.

१९७. समुद्रांत पुत्र बुडाला रे माझा। पराक्रम तुझा ठावा असे॥ १॥ अवश्य म्हणोनी तेथोनी निघाले। समुद्रांत आले रामकृष्ण॥ २॥ करोनियां पूजा पुसे वर्तमान। देई रे आणून गुरुपुत्र॥ ३॥ पांचजन्य दैत्य येथें बळी राहे। बंधु तेथें पाहे कृष्णनाथा॥ ४॥ टाकोनियां उडी वधिले तयासी। पाहे हृषिकेशी उदरांत॥ ५॥ नाहीं ऐसें कळों आलें विश्वंभरा। घेवोनी शरीर आला वरी॥ ६॥ परिक्षिती काय न कळे तयाला। दावीतसे लीला नामा म्हणे॥ ७॥

सांदीपन गुरूस पुत्रदक्षिणा.

१९८. यमाचिया नगरी दोघेजण गेले। शंखातें स्फुरिलें कृष्णनाथें॥ १॥ ऐकोनियां नाद कांपतसे काळ। उठिले सकळ पाहावयां॥ २॥ जोडोनियां हात आणी अधोक्षजा। करोनियां पूजा पुसतसे॥ ३॥ सांदीपन पुत्र आहे तुजपाशीं। आणींरे तयासी शीघ्र आतां॥ ४॥ तुमचा मी किंकर निरोप मज द्यावा। रामा वासुदेवा पुसतसे॥ ५॥ घेवोनियां पुत्र तेथोनी चालिले। नामा म्हणे आले गुरुगृहीं॥ ६॥

१९९. काढीतसे दृष्टी सांदीपनपत्नी। न वर्णवे वाणीं हर्ष तिचा॥ १॥ असे कांहीं इच्छा मागावें आणीक। दिलें हें बाळक म्हणती दोघे॥ २॥ अहर्निशीं तुम्हां असावें कल्याण। आले रामकृष्ण मथुरेसी॥ ३॥ कृतांतासी धाक नामा म्हणे ज्याचा। आहें मी तयाचा शरणांगत॥ ४॥

गोकुळाची उदास स्थिति.

२००. युगांबरोबरी जातातील घटिका। गोकुळींच्या लोकां तैसें झालें॥ १॥ उदास दिसती वनें दाही दिशा। काय रे जगदीशा आम्हां केलें॥ २॥ रोडावल्या गायी करितातील खंती। वत्सें न करिती स्तनपान॥ ३॥ अन्नपाणी तेव्हां वर्जिती गौळणी। आतां चक्रपाणि कैंचा आम्हां॥ ४॥ यमुनेचे तीरीं वृक्ष ते सुकले। पाषाण उलले तया दुःखें॥ ५॥ प्रातःकाळीं गडी अवघेचि बोलती। मारूनि श्रीपती गेला नाहीं॥ ६॥ जीवनाविण मत्स्य जैसे तळमळती। नामा म्हणे चित्तीं धन्य प्रेमा॥ ७॥

गोकुळवासी जनांस श्रीकृष्णाचा संदेश.

२०१. अंतरयामी जाणे सर्वांचा जो साक्षी। रडताती पक्षी मजसाठीं॥ १॥ पाहूनियां प्रेमा भुलला गोविंद। रडतसे मंद मंद तेव्हां॥ २॥ उच्चारितां नामें तरताती पापी। न विसरती गोपी कांहीं केल्या॥ ३॥ विश्वाचा जो आत्मा शोक तया नाही। भुललासे तोहि भक्तीप्रेमें॥ ४॥ चिंतनें व्यापिला तेव्हां हृषीकेशी। पाठवूं कोणासी गोकुळांत॥ ५॥ तयेवेळीं पुढें देखिलें उद्धवा। बाहातसे तेव्हां तयालागीं॥ ६॥ नामा म्हणे आतां करील एकांत। सावधान चित्त अवधारा॥ ७॥

उद्धवाचें गोकुळीं प्रयाण.

२०२. शुकादिक ज्याची वर्णिताती कीर्ति। तो ये काकुळती उद्धवासी॥ १॥ दयेचा सागर बोले तयेवेळां। मजसाठीं गोकुळां तुवां जावें॥ २॥ मजवरी त्यांनीं ठेवियेला प्राण। संसाराचें भान नाहीं कोणा॥ ३॥ यशोदा आणि नंद झालेती तटस्थ। गडी माझे समस्त समस्त पिसे झाले॥ ४॥ गाई मजविण न घेतीच तृण। बाळें स्तनपान विसरलीं॥ ५॥ चालतांना पंथ चुकती नारीनर। पक्ष्यांनी आहार सांडियेला॥ ६॥ शाहाणा चतूर आहेसी नेटका। बोधाव्या गोपिका ब्रह्मज्ञानें॥ ७॥ नामा म्हणे ठेवी चरणावरी माथा। जुंपूनियां रथा निघतसे॥ ८॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गोकुळाचा शोकाकुल देखावा.

२०३. सारथ्यासी सांगे हांकी हा रहंवर। पाहियेलें तीर यमूनेचें॥ १॥ उभा राहोनियां पाहे चहूंकडे। बोलताती कोडें पक्षीराज॥ २॥ व्याघ्र आणि गायी एकत्र बैसती। कोकिळा बोलती कृष्ण कृष्ण॥ ३॥ मुंगूस आणि नाग निस्तेज पडती। चिमण्या बोलती कृष्ण कृष्ण॥ ४॥ वियोगानें तेव्हां मयूरें रडती। शुक बोलताती कृष्ण कृष्ण॥ ५॥ कृष्णाच्या कृपेनें कळलें उद्धवासी। धन्य धन्य त्यांसी म्हणे तेव्हां॥ ६॥ ब्रह्मज्ञान सांगो देवें पाठविला। तो रडूं लागला तयेवेळीं॥ ७॥ नामा म्हणे आला नंदाचिया घरा। पुढील अवधारा निरोपण॥ ८॥

नंदस्थिति.

२०४. धांवोनियां नंदें धरिले चरण घालूनि आसन बैसविला॥ १॥ सुकुमार सांवळा राजीवलोचन। सुखी आहे कृष्ण मथुरेंत॥ २॥ रोहिणीचा पुत्र सुखी आहे राम। स्मरे पुरुषोत्तम कधीं आम्हां॥ ३॥ गोकुळांत गौळी आहे एक नंद। आठवी गोविंद कधीं तरी॥ ४॥ काय माझें पुण्य उद्धवा सरलें। म्हणोनि टाकिलें कृष्णनाथें॥ ५॥ परब्रह्म पूर्ण धाडी मी वनासी। म्हणोनि हृषीकेशी कोपलासे॥ ६॥ मेघःश्याम मूर्ति सुकुमार पाउलें। न देखती डोळें आतां माझे॥ ७॥ ऊठ नंदा जेऊं कोण म्हणे आतां। दुःख माझ्या चित्ता फार वाटे॥ ८॥ नेत्रीं अश्रुधारा कंठ सद्गदित। पडीला मूर्च्छित नामा म्हणे॥ ९॥

यशोदास्थिति.

२०५. पाडियेली जेव्हां यशोदेशी भ्रांती। ऐके परीक्षिती प्रेम तिचें॥ १॥ खोडी नको करूं म्हणे दटाविलें। म्हणोनि रूसलें तान्हें माझें॥ २॥ नंदासी म्हणत पाहूं कोठें कृष्णा। दाटलासे पान्हा स्तनीं माझ्या॥ ३॥ उद्धव चित्तांत करीतसे खेद। यशोदे सावध होई माते॥ ४॥ निर्दय पापीण बांधी मी उखळासी। म्हणोनि रुसलासी देवराया॥ ५॥ माती खातां वेळे तुज म्यां मारिलें। म्हणोनि टाकिलें मजलागीं॥ ६॥ नामा म्हणे त्यांचें करी समाधान। सांगे ब्रह्मज्ञान दोघांजणा॥ ७॥

गोपीस्थिति.

२०६. प्रातःकाळीं उद्धव स्नानासी चालिला। मिळालासे मेळा गोपिकांचा॥ १॥ परस्परें म्हणती कोण आतां आला। न्यावया नंदाला पाठविलें॥ २॥ सकळांच्या प्राणा घेऊनियां येई। म्हणोनियां पाही धाडी यासी॥ ३॥ भ्रमरासी स्त्रिया कुशब्दें ताडिती। आवडीनें बोलती नाना शब्द॥ ४॥ धांवून उद्धवाचे धरिती चरण। आमुचें स्मरण करितसे॥ ५॥ स्वरूपहीन आम्हीं सुंदर कंसदासी। म्हणोनि तुजसी पुसतसों॥ ६॥ आम्हांसाठीं तेथें जाऊनियां म्हण। एकदां चरण दावी सर्वां॥ ७॥ मेल्या गोपिका त्यांची राख झाली। वाजवी मुरली तया जागां॥ ८॥ नामा म्हणे त्यांसी सांगे ब्रह्मज्ञान। श्रीकृष्ण कृपेनें स्थिरावल्या॥ ९॥

गोकुळीचें समाधान

२०७. समस्तांचें त्यानें केलें समाधान। सारिलें भोजन सकळिकीं॥ १॥ यशोदा आणि नंद देती अलंकार। कृपा दीनावर असों द्यावी॥ २॥ गोपाळ गौळणी पुसत उद्धवा। मिळोनिया सर्व बोळविती॥ ३॥ पक्षी श्वापदांसी सांगत उद्धव। असो द्यावा भाव कृष्णापायीं॥ ४॥ आला मथुरेसी सांगे वर्तमान। नामा म्हणे धन्य श्रोते वक्ते॥ ५॥

अक्रूरास हस्तीनापुरीं जाण्याची आज्ञा.

२०८. अक्रूराच्या घरा आले रामकृष्ण। संतोषले मन फार त्यांचें॥ १॥ घालोनि आसन प्रक्षाळी चरण। म्हणे धन्य दिन आजीचा हा॥ २॥ जोडोनियां हात घाली नमस्कार। जाहला उद्धार पूर्वजांचा॥ ३॥ हस्तीनापुरासी अक्रूरा त्वां जावें। सांगितलें देवें नामा म्हणे॥ ४॥

अक्रूराचा धृतराष्ट्रास उपदेश.

२०९. अवश्य म्हणोनि चालिला अक्रूर। पाहियेलें पूर कौरवांचें॥ १॥ धृतराष्ट्रा सांगे विवेकाच्या गोष्टी। फार तुझ्या पोटीं दुष्टबुद्धि॥ २॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बंधूचिया पुत्रा धरितोसी दूर। होती लोभापर पुत्रांवरी॥ ३॥ करिसील द्वेष पंडूच्या पुत्रांचा। होशील नरकाचा अधिकारी॥ ४॥ स्वर्गीचें पूर्वज हांसतील तुज। धरावा उमज येथोनियां॥ ५॥ सांगोनियां ऐसें येथूनि उठला। कुंतीसी भेटला नामा म्हणे॥ ६॥

कुंतीचें अक्रूराशीं भाषण.

२१०. देवकी रोहिणी बळीराम वसुदेव। सखे सुखी सर्व आहेत कीं॥ १॥ पाहोनि तुज झालें समाधान। सुखी आहे कृष्ण मथुरेंत॥ २॥ आमुची एक कुंति आहे हस्तीनापुरीं। स्मरे तो अंतरीं किंवा नाहीं॥ ३॥ बहुता दिवसा तुज धाडिलें अक्रुरा। म्हणोनि अंतरा सुख वाटे॥ ४॥ माझिया बाळासी फार देती दुःख। नाहीं मज सुख क्षणभरी॥ ५॥ राजा पंडू आम्हां टाकूनियां गेला। रक्षी बालकाला कोण आतां॥ ६॥ नामा म्हणे ऐसें सांगतसे कुंती। शिंपियेली क्षिती अश्रुपातें॥ ७॥

कुंतीचा श्रीकृष्णास निरोप.

२११. निरोप हा माझा सांगरे कृष्णाला। भरंवसा मजला आहे तुझा॥ १॥ अच्युता अनंता श्रीधरा वामना। अगा नारायणा शरण तुज॥ २॥ जनार्दन हरी त्रिविक्रम केशवा। अगा वासुदेवा शरण तुज॥ ३॥ गोविंदा माधवा हरी मेघःश्यामा। अगा पुरुषोत्तमा शरण तुज॥ ४॥ चक्रपाणी अगा वैकुंठनायका। रक्षी या बालका दासा तुझ्या॥ ५॥ त्रिविधतापें माझी जळतसे काया। दावी मज पायां एक वेळां॥ ६॥ विदूर अक्रूर करिती समाधान। करावें श्रवण नामा म्हणे॥ ७॥

कुंतीचें अक्रूरानें केलेले सांत्वन.

२१२. परब्रह्म पूर्ण तुझा आहे सखा। मानिसी कां दुःखा जननीये॥ १॥ इंद्राचा अवतार आहे हा अर्जुन। घेईल हा प्राण कौरवांचा॥ २॥ करील गे युद्ध धरोनियां धीर। न देखें मी वीर त्रैलोक्यांत॥ ३॥ सांगूनियां ऐसें पुसोनि सर्वांसी। आला मथुरेसी नामा म्हणे॥ ४॥

श्रीकृष्णलीला.

२१३. कृष्णराम लीला सवें त्या गोपाळां। जन्मासीं सांवळा कैसा आला॥ १॥ विस्तार बोलाया बैस तूं अंतरा। करीं तूं पामरा कृपादान॥ २॥ म्हणोनि विनवी पायां पै निगुती। ऐकावें श्रीपति नामा म्हणे॥ ३॥

२१४. भूमिभार झाला चालली उदकांत। धरूनियां रूप गाईचें हो॥ १॥ विधीपाशीं गेली रडूं ते लागली। समग्र वहिली कथा सांगे॥ २॥ नको भिऊं म्हणोनि अश्वासिलें विधीनें। सवें तीस घेऊनी गेला ठायां॥ ३॥ नामा म्हणे तेचि आधार सर्वांसी। रूप नाम त्यासी कांहीं नाहीं॥ ४॥

२१५. देव क्षिराब्धीसी आले हो सकळ। करूनि निश्चळ मनामाजी॥ १॥ प्राणायाम मुद्रा लावूनि अंतरीं। इंद्रादि श्रीहरि चिंतुनियां॥ २॥ विराट जें पाही संस्कृतें वर्णियेलें। तेंचि चिंतियेलें नामा म्हणे॥ ३॥

२१६. अकस्मात तेथें उठली ते वाणी। नका भिऊं म्हणोनि मेघरूपा॥ १॥ ऐकतांचि कानीं हरुषलें मनीं। देवाचिया श्रेणी नामा म्हणे॥ २॥

२१७. गौळियाचे घरीं रहिवास गोकुळीं। तेथें तुम्ही सकळी वास कीजे॥ १॥ वसुदेव देवकी उदरीं जन्मेन। कंसभयें राहीन गोकुळीं हो॥ २॥ तेथें आहे काज कळेल सकळां। आनंद सोहळा पुरवीन॥ ३॥ नामा म्हणे ऐसें देव बोलियेले। आपण ते गेले निजधामा॥ ४॥

२१८. तयेकाळीं देव गोकुळीं भरले। अगोचर रूप झालें ठायीं ठायीं॥ १॥ सकळ संपत्ति भरूनि उरल्या। दिगंतरीं गेल्या विपत्ति त्या॥ २॥ नामदेवा तेव्हां आनंद तो झाला। गोकुळीं भरला पांडुरंग॥ ३॥

२१९. शेषशायी हरी उठोनि लवकरी। म्हणे सख्या धरी मनुष्यरूप॥ १॥ तुजविण मज न गमे घटिका। म्हणोनि नेटका रूप धरी॥ २॥ देवकी उदरी जाऊन रिघावें। अंतरीं वसावें रोहिणीच्या॥ ३॥ तुझियेचें सेवें येतों मी माघारा। नामया दातारा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कळों आले ॥ ४ ॥

२२०. देवकी कवण वसुदेव कवण। सांगावी हे खूण नागवळा ॥ १ ॥ ऐकोनि उत्तर देव मनीं पाही। बोलतो लवलाही चित्त देईं ॥ २ ॥ सुतपाप्रती तें अनुष्ठानी दोघे। करूनिया तपे वर मागें ॥ ३ ॥ तया दिला वर पुत्र मी होईन। यालागीं कारण आहे तेथें ॥ ४ ॥ तींचि दोघे झालीं वसुदेव देवकी। म्हणोनि यादवी जन्म घेणें ॥ ५ ॥ तयाचा वृत्तांत आतां कोठें आहे। सांगेन लवलाहे नामा म्हणे ॥ ६ ॥

२२१. अवतरले हरी नंदाचे मंदिरीं। जाणोनियां सुरी तोषिजेत ॥ १ ॥ आतां गेली सर्व आमुची ही चिंता। भूभार सर्वथा उतरील ॥ २ ॥ यज्ञ दान तप होतील अपार। आमुचा आहार आम्हांलागीं ॥ ३ ॥ दुष्ट दुराचारी मातले राक्षस। यांचा करील नाश क्षणामाजीं ॥ ४ ॥ नीति न्याय धर्म वाढेल अपार। भाविकांसी पार उतरील ॥ ५ ॥ नामा म्हणे ऐशा आनंदानें सुर। वर्षताती भार सुमनांचे ॥ ६ ॥

२२२. बरवें बरवें बाळ कोडीसवाणेरे। यशोदा म्हणे दृष्टी होईल बारे ॥ १ ॥ बरवी बरवी डोळस सांवळी। लोण उतरोनि हरीची पाउली ॥ २ ॥ चंदन पोटाळा कांसे सोनसळा। विष्णुदास नामा चरणाजवळा ॥ ३ ॥

२२३. दोंदील दोंदील टमकत चाले। गोजिरीं पाउलें घालोनियां ॥ १ ॥ पायीं रुणझुण रुणझुणति वाळे। गोपी पाहतां डोळे मन निवे ॥ २ ॥ सांवळे सगुण मानसमोहन। गोपीमनरंजन म्हणे नामा ॥ ३ ॥

२२४. कंसा हातीं विडा पाहे चहूंकडा। पूतना त्या पुढां काय बोले ॥ १ ॥ जाईन गोकुळा वधीन त्या बाळा। ऐसी त्या चांडाळा बोलतसे ॥ २ ॥ विष भरूनि स्तन निघाली पूतना। तीतें देखुनि कान्हा दूध मागे ॥ ३ ॥ येऊनि द्वारीं थोकली तव यशोदा देखिली। कृष्ण आली माऊली राहें उगा ॥ ४ ॥ तंव अधिकचि आळी करी वनमाळी। येरी म्हणे दे जवळी पाजीन दूध ॥ ५ ॥ पूतने वोसंगा दिधलासे कान्हा। घटघट पय पाना करितसे ॥ ६ ॥ शोषियलें विख न धायची भूक। नामया स्वामी न राखे प्राण तिचा ॥ ७ ॥

२२५. वाढों लागे हरि नंदाचे मंदिरीं। नाना क्रीडा करी नित्य नवी ॥ १ ॥ देखोनिया चीज भुलल्या नरनारी। देहभावें वरी ओवाळिती ॥ २ ॥ साजिरें गोजिरें दिसें नेत्रालागीं। म्हणोनि वोसंगी सदा घेति ॥ ३ ॥ नाचे उडे बोले मंजूळ बोबडें। तेणें वेदा पडे मौन सदा ॥ ४ ॥ नित्य नवी लीला दाखवी अपार। मन तेथें स्थिर लांचावलें ॥ ५ ॥ नामा म्हणे गोप त्यासंगें रतलें। प्रेमानें मातले एकसरें ॥ ६ ॥

२२६. प्रातःकाळीं मोठा आनंद पैं झाला। नभीं उगवला पूर्ण चंद्र ॥ १ ॥ तेव्हां गोप आले विनविती गोपाळा। आतां जाऊं चला चोरीलागीं ॥ २ ॥ कोठें काय असे तें आम्हां ठाऊकें। जाऊं एकमेकें मिळोनियां ॥ ३ ॥ तुझियें संगती वाढतो आनंद। दाविसी विनोद ब्रह्मादिकां ॥ ४ ॥ नामा म्हणे ऐसें गोपाळ बोलिलें। ऐकोनियां झालें देवा गोड ॥ ५ ॥

२२७. देव सांगे तुम्ही सामुग्री हे करा। सांगेन प्रकारा जाणोनियां ॥ १ ॥ तेणें सर्व कार्य साधेल तुमचें। ठेविलें ठायीचें ठायीं पडे ॥ २ ॥ घ्यारे जातां वरी मृत्तिका गाळूनी। सराटें वेंचुनी वोटीं भरा ॥ ३ ॥ डांगा एक आणा वेंचूनिया खडे। निघावें रोकडें एकसरा ॥ ४ ॥ नामा म्हणे ऐसें ऐकतां गोपाळ। नाचती सकळ कृष्णापुढें ॥ ५ ॥

२२८. जेथें नाहीं कांहीं नाम रूप गुण। बोलती निर्गुण तयालागीं ॥ १ ॥ तोचि गोकुळांत होऊनि गोवळ। म्हणवितो बाळ यशोदेचा ॥ २ ॥ चिन्मय चिद्रूप अक्षई अपार। परेहूनि पर म्हणतां ज्यातें ॥ ३ ॥ सर्वां भूताचे फुटकिया खोळे। भरलें न गळें आत्मपणें ॥ ४ ॥ आनंदी आनंद मातला अपार। वेदालाही पार नाहीं ज्याचा ॥ ५ ॥ नामा म्हणे सर्वरूपें जें रूपस। गोकुळीं विलास मांडियेला ॥ ६ ॥

२२९. आई मज म्हणशील अवगुणांचे। तरी मी काय करितों कोणाचें। जें जें होणार जयाचें।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तें कां मजवरी घालिसी ॥ १ ॥ भट आलासे माभळ। तेणें वर्णिला जन्मकाळ। तो चुकला ग्रहमूळ। तेणें त्यासीं पीडीलें ॥ २ ॥ माये तीच मावशीं। तिनें मज घेतलें वोसंगाशीं। तिचे अंगीं होती विवशी। तिनें तिसीं ग्रासिलें ॥ ३ ॥ दहीं भात रत्नताटीं। कालवूनी लावीं माझें ओंठीं। जेवितां कां ग घाली मिठी। धरुनि मुष्टीं रगडिला ॥ ४ ॥ कैसी पाठविली रिठागांठी। ती घातली माझे कंठीं। तेणें माझ्या गळां मिठी। मग म्यां दाढे रगडिला ॥ ५ ॥ खेळत होतो यमुनेतटीं। बक लागला माझे पाठीं। मग मी धरूनि चंचु उपटीं। धरणीवरी आपटिला ॥ ६ ॥ आई म्यां तुझें काय केलें। त्वां मज उखळासी बांधिलें। रांगत रांगत अंगणीं आलों। तेणें वृक्ष उन्मळिले ॥ ७ ॥ ऐसा नाटकी हृषीकेशी। परब्रह्म दावी यशोदेसी। विष्णुदास नामा अहर्निशीं। हृदयकमळीं पहातसे ॥ ८ ॥

२३०. मोर पिसा कुंचे ढळताती अपार। येताती कुमार यशोदेचे ॥ १ ॥ शिंगें पावे मोहऱ्या वाजती कुसरी। हुंबरी आखरी गगन गर्जे ॥ २ ॥ मोतियांचे घोस चांदवे झळकती। कनक दंड ढाळिती रामकृष्ण ॥ ३ ॥ गौरज डौरज पीतांबर भिनला। स्वेद जो दाटला मुखकमळीं ॥ ४ ॥ रुळती वनमाळा कंठीं गुंजाहार। तरू घोस अपार खोंविलें शिरीं ॥ ५ ॥ गजगती पाउलें ठेविती भूमीवरी। धन्य ते संसारी डोळे देती ॥ ६ ॥ कुंकुंम केशर रंगलें रातोत्पल। ध्वज वज्रांकुश कमळ ऊर्ध्व रेखा ॥ ७ ॥ विमानें आकाशीं झाली पै सकळ। धन्य ते गोकुळ म्हणती देवा ॥ ८ ॥ देव पुष्पवृष्टि करिती कृष्णावरी। अंबर जयजयकारी गर्जतसे ॥ ९ ॥ माडिया गोपुरी पाहती सुंदरी। यशोदेच्या करी लिंबलोणा ॥ १० ॥ ओंवाळिला नाम्या शिंप्याचा दातार। रखुमादेवीवर श्रीविठ्ठला ॥ ११ ॥

२३१. खांद्यावरी पांवा कस्तुरीचा टिळा। चालत गोंपाळ गाईमागें ॥ १ ॥ यमुने पावली गोपा पाचारीत। सिदोऱ्या शोभत पाठीवरी ॥ २ ॥ अंतीं पंक्ति करी त्या गोपाळांच्या। संगे गोविंद त्यांच्या अखंडित ॥ ३ ॥ नामा म्हणे बोनें विटों देऊं नका। वैकुंठीनायका संभाळावें ॥ ४ ॥

२३२. श्रीमुख सुंदर वाटोळें। कैसे नीलोत्पल सांवळें ॥ १ ॥ पै शेंडी गडी धाकुटा। होय घोंगडें खांदा मोठा ॥ २ ॥ थिरूं वासरें होकरी। पुढें वाहती पावे मोहरी ॥ ३ ॥ हातीं घेऊनि वेताटी। कैसा लागे वासुरा पाठीं ॥ ४ ॥ बाळागोपाळांसहित मुरारी। खेळू खेळे नानापरी ॥ ५ ॥ विष्णुदास नामयाचा दातारु। ब्रह्मादिकां त्याचा न कळे पारु ॥ ६ ॥

२३३. गांवळे म्हणती काहीं आम्हां भितो। ब्रह्मादी वंदिती पायधूळी ॥ १ ॥ गाई तृप्त करी कळंबाच्या तळीं। सोडियेल्या शिदोरी दावितसें ॥ २ ॥ हमामा घालितां नव्हती माघारे। नाहीं भीत पोरें येत संगे ॥ ३ ॥ नामा म्हणे काय भिऊनि राहिले निवांतचि ठेलें ब्रह्मादिक ॥ ४ ॥

२३४. हुंबरीच्या मिषें हुतुतु खेळती। गड्यांशीं श्रीपति सर्वकाळ ॥ १ ॥ कळंबाचे झाडाखालीं कुंकुमाचे सडे। गोपाळा पवाडे दावितसे ॥ २ ॥ काय काय सोंग घेसी नाना परी। गोपिकांचें घरीं काम सारीं ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसी अगाध जे कीर्ति। भोळ्या भक्तांप्रति दावीतसे ॥ ४ ॥

२३५. डोहामाजीं वास होता बहुत दिवस। आतां कासावीस काय सांगूं ॥ १ ॥ विक्राळ होऊनि आला चक्रपाणी। कालिया निर्वाणा ध्यान करी ॥ २ ॥ नको कांढूं मज उदका बाहेरी। दंडवत करी कालिया तो ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसा काढिला विखरी किर्ती। वानूं तरी किती देवा ॥ ४ ॥

२३६. ब्रह्मादिकां पाहतां ठक पडियेलें। पहाहो कैवल्य गौळिया जोडलें ॥ १ ॥ कोण्या ऋणें या केला नकळे। परब्रह्म आमचें आहे सोहळें ॥ २ ॥ या गोकुळाचेनि पाडे पाहतां। सुख वैकुंठीं न दिसे सर्वथा ॥ ३ ॥ ऐसा अभिनव आनंदु जाणतो। गोकुळाचें तृण तरुवर तरी होतो ॥ ४ ॥ कामक्रोध लावियेला येणें निवे। तेणें सुखें शुद्ध लागलीसें सवें ॥ ५ ॥ नामया स्वामी हृदयींचा विसांवा। आपुलें सर्वस्व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देऊनियां जोडावा॥ ६॥

२३७. आकाश गडगडी विद्युल्लता तळपती। अनिवार मेघ सणसणां वरुषती॥ १॥ राखियलें येणें देवकीनंदनें। गोपाळ म्हणती आमुचें कान्हें॥ २॥ गोवर्धनगिरी उचलोनी निज करीं। राखिले यावरी नामा म्हणे॥ ३॥

२३८. जन्म गेले याचे राखतां गाई। याचिया बोला विश्वास काई॥ १॥ गोधनें राखितो आपण पेंढारा। तुझ्यानी मिळती पाणियाचा थारा॥ २॥ हातीं डांगा खांदीं कांबळा। तुझ्या गाई आम्ही राखों गोपाळा॥ ३॥ आठ कोटी नव बहात्री गाई। गोधनें बसलीं आपुले ठायीं॥ ४॥ धाली गोधनें बसली वाडां। संत पाहों आले तंव झोंपा उघडा॥ ५॥ गोधनें चरती बाराही रानें। माझें मन तुझें वासरूं तान्हें॥ ६॥ गोधनें चारितां कृष्ण सांगाती। विष्णुदास नामा देतुसे वळती॥ ७॥

२३९. त्रिभुवनीचें जीवन कीं अमरांचें ठेवणें। कैसें भाग्य लहाणें लक्ष्मीचें॥ १॥ धन्य गौळियांचें धन्य जिणें। ज्या घरीं खेळणें परब्रह्म॥ २॥ अंगें खेळवणें परब्रह्म गोळुजणें। लीला सामावणें रोमरंध्रीं॥ ३॥ नामा म्हणे तें दैवचि कारण। झालें खेळवणें परब्रह्म॥ ४॥

२४०. कृष्णातें चैतन्य गौळिया गोपाळा। जिवींचा जिव्हाळा कृष्ण एक॥ १॥ न गमेचि तया कृष्ण संगाविणें। कृष्णीं चरणीं मन सर्वकाळ॥ २॥ कृष्ण सुख जीवीं कोंदलें सर्वांसी। उभे कृष्णापाशीं मागेंपुढें॥ ३॥ नामा म्हणे कृष्ण भक्तांचें जीवन। कृष्णीं समाधान भक्तांलागीं॥ ४॥

२४१. आणा उचित उचित्। भाणा भात आईतें॥ १॥ भात सारा भात सारा। हरिहर-स्मरणीं॥ २॥ गाई गोपाळापें हरी। आणा तरी सिदोऱ्या॥ ३॥ नामा म्हणे काळ मिसें। श्रीनिवास स्मरावा॥ ४॥

२४२. गड्यांनो राजा कीं रे झाला। कृष्ण सिंहासनीं बैसला॥ १॥ पांवा मोहरी घोंगडी। आम्ही खेळू यमुने थडीं। नाचा पाउला देहुडी। कृष्ण आमुचा कीं रे गडी॥ २॥ खेळूं हुतुतु हुंबरी। थडक हाणों टिरीवरी। आतां चालिला दळभारी। आमचे यशोदेचा हरी॥ ३॥ कुस्ती खेळतां कासाविसी। शेंबुड खरकटें नाकासी। कडे घेऊं सावकासी। आतां बहु भितो यासी॥ ४॥ आम्ही तुम्ही सर्वे जाऊं। गाई वळावया जाऊं। त्याचे मानेंत बुक्या देऊं। जवळी जावयासी भिऊं॥ ५॥ नामा म्हणे चला जाऊं। हात जोडोनी उभे राहूं। पाया पडून मागून घेऊं। जनीवनीं तोचि कृष्णाची ध्याऊं॥ ६॥

गौळणी.

२४३. परब्रह्म निष्काम तो हा गौळियां घरीं। वाक्या वाळे अंदु कृष्ण नवनीत चोरी॥ १॥ म्हणती गौळणी हरीचीं पाउलें धरा। रांगत रांगत येतो हरी हा राजमंदिरा॥ २॥ लपत छपत येतो हरी हा राजभुवनीं। नंदासी टाकूनि आपण बैसे सिंहासनीं॥ ३॥ सांपडला देव्हारीं यासी बांधी दाव्यांनीं। शंख चक्र गदा पद्म शार्ङ्गपाणी॥ ४॥ बहुता कष्टें बहुता पुष्पें जोडिलें देवा। अनंत पवाडे तुमचे न कळती भावा॥ ५॥ नामा म्हणे केशवा अहोजी तुम्ही दातारा। जन्मोजन्मीं द्यावी तुमची चरणसेवा॥ ६॥

२४४. यशोदे घराकडे चाल मला जेवूं घाल॥ धृ०॥ साध्या गव्हाची पोळी लाटीं। मला पुरण पोळी करून दे मोठी। नाहीं अडवीत गुळासाठीं। मला जेवूं घाल॥ १॥ तूप लावून भाकर करीं। वांगें भाजून भरीत करीं। वर कांद्याची कोशिंबिरी। मला जेवूं घाल॥ २॥ आईग खडिसाखरेचे खडे। लवकर मला करून दे वडे। बाळ स्फुंदस्फुंदोनी रडे। मला जेवूं घाल॥ ३॥ आई लहानच घे गे उंडा। लवकर भाजून दे मांडा। लांब गेल्या गाईच्या झुंडा। मला जेवूं घाल॥ ४॥ आई मी खाईन शिळ घांटा। दह्याचा करून दे मठ्ठा। नाहीं माझ्या अंगीं ताठा। मला जेवूं घाल॥ ५॥ भाकर बरीच गोड झाली। भक्षुनी भूक हारपली। यशोदेनें कृपा केली।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मला जेवूं घाल॥ ६॥ आई मी तुझा एकुलता एक। गाई राखितों नऊ लाख। गाई राखून झिजली नख। मला जेवूं घाल॥ ७॥ नामा विनवी केशवासी। गाई राखितो वनासी। जाऊन सांगा यशोदेसी। मला जेवूं घाल॥ ८॥

२४५. तळवे तळहात टेंकीत। डाव्या गुडघ्यान रांगत। रंगणी रंगनाथ। तो म्यां देखिला सये॥ १॥ गवळण जसवंती पै सांगे। आले या कृष्णाचेनि मागें। येणें येणें वो श्रीरंगें। नवनीत माझें भक्षिलें॥ २॥ एक्या हातीं लोण्याचा कवळु। मुख माखिलें अळुमाळु। चुंबन देतां येतो परिमाळु। नवनीताचा गे सये॥ ३॥ येणें माझें कवाड उघडिलें। येणें शिकें हो तोडिलें। दह्यादुधातें भक्षिलें। उलंडिलें ताकातें॥ ४॥ ऐसें जरी मी जाणतें। यमुनापाणीया नच जातें। धरूनि खांबासी बांधितें। शिक्षा लावितें गोविंदा॥ ५॥ ऐसा पुराण प्रसिद्ध चोर। केशव नाम्याचा दातार। पंढरपुरीं उभा विटेवर। भक्त पुंडलिकासाठीं॥ ६॥

२४६. गेलिया वृंदावना तेथें देखिला कान्हा! संवगडिया माजी उभा ध्यान लागलें मना॥ १॥ हरिनाम गोड झालें काय सांगो गे माय। गोपाळ बाहती पावे मन कोठें न राहे॥ २॥ त्याचें मुख साजिरें वो कुंडलें चित्त चोरें। सांडुनी अमृत धनी लुब्धलीं चकोरें॥ ३॥ सांडुनी ध्रुवमंडळ आली नक्षत्रमाळा। कौस्तुभा तळवटीं वैजयंती शोभे गळां॥ ४॥ सांडुनी मेघराजु कटिसूत्रीं तळपे विजू। भुलला चतुराननू तया नव्हे उमजू॥ ५॥ सांडुनी लक्ष्मी निज गोपाळासी बोले गुज। अचोज हा चोजवेना ब्रह्मांदिकां सहज॥ ६॥ वांजट धीट मोठी ऐसी कवण असे खिळू। भेदली हरिचरणीं पायीं मुरडीव वांकी सोज्वळू॥ ७॥ त्याचें पायींची नेपुरे वाजती वो गंभीरें। लुब्धलीया पक्षयाती धेनु पाचारीं स्वरें॥ ८॥ आणिक एक नवल कैसें स्वर्गी देव झाले पिसे। ब्रह्मादिक उच्छिष्टालागीं देखा जळीं झाले मासे॥ ९॥ आणि़क एक नवल परी करीं घेऊनि शिदोरी। सवंगड्या वांटितसे नामया स्वामी मुरारी॥ १०॥

२४७. हरिनाम गोड काय सांगूं गे माये। गोपाळ वाहताती वेणूं आर्ते पाहे॥ १॥ गेलें होतें वृंदावना तेथें भेटला कान्हा। गोपाळासी वेध माझा छंद लागला मना॥ २॥ आणिक एक नवल कैचें ब्रह्मादिकांलागीं पिसें। उच्छिष्टा लागोनियां देव जाहले जळीं मासे॥ ३॥ आणिक एक नवल चोज गोपाळांसी सांगे गुज। आजळ जळीं चोजवेना पाहतां नेत्र ते अंबुज॥ ४॥ आणि एक नवलपरि करी धरिली सिदोरी। गोपाळांसी वाढीतसे नामयाचा स्वामी हरि॥ ५॥

२४८. जाऊं पाण्या निसुरवाण्या। आळवीती गोड राण्या॥ ध्रु०॥ गोविंद गीतीं गाऊं गोविंद गीतीं गाऊं। आनंदें जाऊं पाण्या॥ १॥ खाऊं कंदमुळें आम्ही असो वनीं। देखों श्रीकृष्ण न ऐकों कानीं॥ २॥ आम्ही गोड भिल्लिणी काय ऐसी बोली। तुझिया नामाची लागली आवडी॥ ३॥ आजीचा दिवस आम्हां झालासे आनंदु। विष्णुदास नामा यानें लावियेला छंदु॥ ४॥

२४९. येत येत उभा राजविर्दी। सवें चाले गोपाळांची मांदी। नारी पाहती उभया बिर्दी। एकीच्या धरूनि बाहुबा खांदी॥ १॥ हरिहरनंदना सादृश्य लोचना। डोळ्या वेगळा न बा जासी कान्हा। अरे कान्हा मनमोहना। गोपी भुलल्या तुझिया गुणा॥ ध्रु०॥ चतुर्वेद नागवी भाट सांगतें। उभया वर्णितां रामकृष्णातें। श्रुति स्मृति विद्यावंतें। जय जय म्हणति कृपानिधितें॥ २॥ येत येत उभा रहात। सुदाम्याच्या खांद्यावरी हात। समदृष्टी गोपिका न्याहाळित। चैतन्य चोरूनि आनंदें डुल्लत॥ ३॥ ऐसा कृष्ण सौभाग्य-सुंदर। लावण्य गुण रत्नाकर। विष्णुदास नामयाचा दातार। भक्ति भावें वोळंगा शारंगधर॥ ४॥

२५०. जाये जाये जाये परतोनि पाहे। लाचवले जीव पर न लगे सोय गे माय॥ १॥ नावेक विठ्ठल पाहूं द्या साजणी। न पुरे गे धणी डोळियांची॥ २॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देखिला गे माय लावण्य-सागर। नामया दातार केशिराज॥ ३॥

२५१. मल्हार महूडें गगनीं दाटलें। विजु खळें गर्जिन्नलें गे माय॥ १॥ गोविंद पाहाया लौकरी। कैसे वरुषताहे मधू धारी गे माय॥ २॥ आनंदें मयूरें नाचती आपैसे। प्रेमें निळकंठ झाले ते कैसें॥ ३॥ नामया स्वामी दृष्टी सोज्वळ। जीव लागला गोपाळ गे माय॥ ४॥

२५२. ध्यान सांवळें गोकुळीचें। धांव पाव वेगीं हरी सावळियां॥ धृ०॥ सांवळिसी आंगीं उटी। सांवळी कस्तुरीं लल्लाटीं। सांवळीसी कांसे कसियला कटीं। गोवळिया॥ १॥ सांवळीसी तनू बरवीं। सांवळें वृंदावन मिरवी। सांवळ्याशा तुळसी कानीं। मंजुरिया कोंवळीया॥ २॥ सांवळीशी कंठीं माळा। सांवळें हृदयीं पदक विशाळा। सांवळ्याशा गोपी केल्या ओंवळ्या। गोंवळिया॥ ३॥ सांवळीसी हातीं काठीं। सांवळासा कांबळा पाठीं। नामयाचा स्वामी गायी राखी। धवळ्या आणि पिवळ्या॥ ४॥

२५३. कोकिळे चित्तकळा रत्नाची ते कीळा। मान कीं सोज्वळा वर्णुं हरीचा॥ १॥ वृंदावनीं वेणु वाजे रुणझुणु। वेंध तनूमनू गोंपाळांचा॥ २॥ देहूडा पाऊलीं हरि गोपाळा गोजिरीं। वाहाती ते लालोरी हरी छंदें॥ ३॥ वेधलीं वनचरें गोधनें अपारें। पक्षीकुळें साचारें तल्लिन झालीं॥ ४॥ यमुनेचें उदक जळचरें सम्यक। पाताळीं पन्नग एको ठेली॥ ५॥ ऐसे कृष्ण वेधें तल्लिन झालें बोधें। नामा म्हणे वेणूछंदें स्थिर झाली॥ ६॥

२५४. ध्यानीं ध्यातां मनीं हाचि येऊनी बैसे। गीतीं गातां वसे हृदयकमळीं॥ १॥ बाहेरी भीतरीं वेधिलें वो येणें। रुक्मिणीरमणें पांडुरंगें॥ २॥ याविण दुसरें मज कांहींच नाठवे। लागलीसे सवे गोपाळाची॥ ३॥ भाग्यें जात जीवा कांहींच नावडे। वाचोनि पवाडे गोपाळाचे॥ ४॥ निद्रा आणि जागृतीं स्वप्नीं आणि सुषुप्तीं। देखें कृष्णमूर्ति सर्वगत॥ ५॥ ऐसा अखंड विदेही लौकिकाविरहित। नामा जीवन्मुक्त होउनी ठेला॥ ६॥

२५५. रात्री काळी घागर काळी। यमुनाजळें ही काळीं वो माय॥ १॥ बुंथ काळी बिलवार काळी। गळां मोतीं एकावळी काळी वो माय॥ २॥ मी काळी कांचोळी काळी। कांस कांसिली ते काळी वो माय॥ ३॥ एकली पाणीया नचजाय साजणी। सवे पाठवा मूर्ति सांवळी वो माय॥ ४॥ विष्णुदास नाम्याची स्वामिणी काळी। कृष्णमूर्ति बहु काळी वो माय॥ ५॥

२५६. यशोदेचा बाळ अलगट। रूपें राजस भरवा वरवंट॥ १॥ वेधीं लावूनि वेधिलें येणें मानस। आड घालूनियां आपुला प्रकाश॥ २॥ आपणासींच खेळें विनोदें। विश्व निववी तेणें सुखें निजबोधे॥ ३॥ दृष्टी याची पावे देखणीया। आड रिघोनि तेज सांवळें भरिलें डोळियां॥ ४॥ मन मारोनि आर्त पुरविलें। रूप दावूनि चित्त माझें भुलविलें॥ ५॥ नामया स्वामी आसनीं शयनीं। दुरी नवजे डोळ्यांपासोनी॥ ६॥

२५७. दुःखाची निवृत्ति सुखाचें तें सुख। पाहतां श्रीमुख गोविंदाचें॥ १॥ रंगणीं रांगत गुलगुल बोलत। असुर रुळत चरणांतळीं॥ २॥ नामा म्हणे हातीं लोणियाचा उंडा। गौळणी त्या तोंडा भुललिया॥ ३॥

२५८. चंद्रबिंबासरी देखो जरी मुखा। कोटी चंद्रप्रभा देखा कृष्णमूर्ति॥ १॥ धवळलें चांदणें रांगतां रांगणें। धन्यवो गौळणी सुखी तुम्ही॥ २॥ कानींचीं कुडलें गुरुशुक्र बिंबलें। शिरीं तें शोभलें पिंपळपान॥ ३॥ कटीं वाघनखें साजिरी ते सरी। कडदोरा वरी राजसासी॥ ४॥ सुकुमार दोंदिलें किंकीणी कटीतटीं। चरणी नाद उठी नूपुरांचा॥ ५॥ श्रुति समागमें नाद ऐके कानीं। संतोषोनि मनीं डुले हरी॥ ६॥ देखोनिया माते होय समाधान। उतरी निंबलोण मुखावरूनि॥ ७॥ सच्चिदानंदघन तान्हुलें आपण। विष्णुदास नामयानें वोवाळिलें॥ ८॥

२५९. घागरिया छंद चरण घवघवी। अरुणा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दाखवी चरणतळीं॥ १॥ अरुता येई कान्हा देई आलिंगन। उतरी निंबलोण मुखावरुनी॥ २॥ वाघनखे कडदोरा कंठी घालुनि सरी। झणी तुज मुरारी दृष्टी लागो॥ ३॥ अंबुलें लोळिया कटीं रिठे गांठीं। छंदें जगजेठी हालवी मान॥ ४॥ भाळीं चंदन वरी मसीचा टिळकला। झणीं तुज गोपाळा दृष्टी लागे॥ ५॥ नामयाचा स्वामी हरि माझें चिंतणें। छंदे गीत गाऊं नाचूं मी सदा जाणे॥ ६॥

२६०. कृष्ण डोलतु रांगतु रंगणीं। इडापीडा धांवोनि घेती गौळणी॥ १॥ जीवापरीस हें वाल्हें बालक। शिणलिया विसांवा त्याचें पाहे श्रीमुख॥ २॥ सर्व सुख याचेनी मनोहरें। तेचि खेळवितां धनीं मन न पुरे॥ ३॥ देह गेह नाठवे सर्वथा। सुत पतीची मावळली वार्ता॥ ४॥ सुख न सांगवे वैखरी कोंदली। रूपीं रमतां मनें बुडी दिधली॥ ५॥ नामया स्वामी सुखाचा सागरू। कृष्ण खेळवितां सुफळ हा संसारू॥ ६॥

२६१. चाल सखिये वेगु करीं वाहिला। दिन सरला काळ थोडा उरला॥ १॥ आवडी घेऊं गे निजसुख धनीचें। आर्त पुरोनी जें उरलेंसें मनीचें॥ २॥ कृष्णमुख पाहे दृष्टी भरोनी। चित्त सांडी करवंडी करोनी॥ ३॥ झणीं विसरसी हे खूण निरुती। मग अंतरलें सर्व सुख पुढती॥ ४॥ हाचि निर्धार करूनियां मानसीं। आंत बाहेरी हरिरूप देखसी॥ ५॥ नामया स्वामी राजीवलोचनु। रमारमणू तो जीवींचा जीवनु॥ ६॥

२६२. हातीं घेऊनियां काठी। शिकविते श्रीपती। यमुनेची माती। खासी कां कां कां कां॥ १॥ हरी तूं खोडी नको करूं। माझ्या बा बा बा बा॥ धृ०॥ धांऊनियां धरिला करीं। बैसविला मांडीवरी। मुख पसरोनि करी। आ आ आ आ॥ २॥ विष्णुदास नामा म्हणे। मरोनियां जन्मा येणें। कृष्ण सनातन पाहुं। या या या या॥ ३॥

२६३. गौळणी ठकविल्या। गौळणी ठकविल्या। एक एक संगतीनें। मराठी कानडीया। एक मुसलमानी। कोंकणी गुजरणी। अशा पांचीजणी गौळणी ठकविल्या॥ धृ०॥ गौळणी सुंदरी। गौळणी सुंदरी। गेल्या यमूनेतीरी। वस्त्रें फेडुनियां स्नान करिती नारी। गोविंदानें वस्त्रें नेलीं कळंबावरी। स्नान करोनियां। त्या आल्या बाहेरी॥ १॥ लडोबा गोविंदा। लडोबा गोविंदा। निरवाणी आज। आडचाल्ले पडचाल्ले शिर फोड्या न कोडो। मारी कन्हय्या। पानी खेळ्या न खेळो॥ २॥ देखरे कन्हय्या देखरे कन्हय्या। मैं इज्जतकी बडी। कदम पकडूंगी। मैयां कूटोजुडी। मेरी चुनरी दे। मेरी ले दुल्लडी॥ ३॥ देवकी नंदना। देवकी नंदना। तूं एक श्रीपती। उघडी हिंवाची। तुज विनवुं किती। पायां पडत्यें बा। मी येत्यें काकुळती। माझी साडी दे। घे नाकाचें मोतीं॥ ४॥ पावगा दाताला पावगा दाताला। तूं नंदाचा झिलो। माकां फडको दी। मी हिवानं मेलो। घे माझे कोयतो। देवा पायां पडलों॥ ५॥ ज्योरे माधवजी ज्योरे माधवजी। मे शरण थई। तनका काकैपी। बाप दयाळ तूंही। मारी साडी आपो। हातणी ले कंकणी॥ ६॥ इतुकें ऐकोनी। इतुकें ऐकोनीं देव बोले हांसोनी। सुर्या दंडवत करा कर जोडोनी। नामा विनवितो। म्हणे शारंगपाणी। गौळ्या ऐक तूं। धन्य तुझी करणी॥ ७॥

२६४. लांचावले ब्रह्म भक्तीचेनि सुखें। गोकुळीं गोपाळवेशें गाई राखे॥ १॥ त्रिभूवनीं न समाये ब्रह्मादिकी लक्षा नये। ती दास्यत्व करिताहे गौळीयांचें॥ २॥ नवलाव गे माये देखियला। तें सुख काय सांगो तुला॥ ३॥ कैसें गोवळेपणाची बुंथी घेऊनिया साजिरा। परब्रह्म जालेंसे पिसें गे माये॥ ४॥ निगमा निर्धारितां अमरा दर्शनाची आस। मुनिजनां ध्यानीं आभास तोही नाहीं॥ ५॥ तें हें नित्य पुर्ण लाडेंकोडें खेळविती गौळणी। मा मुख चुंबन देउनी गौळणी हृदयीं आलिंगिती॥ ६॥ क्षीर-सागरीचें सुख सांडुनी अशेष। रुक्मिणी सेजेचे विलास तैहि नावडती॥ ७॥ तें हें गोधना गोठणी लोळे शुद्ध चैतन्य सांवळे। तें सुखही न कळे साचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चतुरानना॥ ८॥ भक्ती प्रेम भाव देखे आहे जेथें हरी। वोरसला जाये तेथें कैचें नैश्वरत्व॥ ९॥ न विचारी जातीकुळ शुची अथवा चांडाळ। हृदय देखुनी निर्मळ प्रीति धरी तेथें॥ १०॥ ऐसें त्रिभुवन सुखाचें सार की अनाथाचें माहेर। अव्यक्त परि साकार झालें असें तें॥ ११॥ भक्ताचेनि वियोगें श्रमलें म्हणोनि गोकुळासी आलें। तेणें प्रेम सुख दिधलें नामयासी॥ १२॥

२६५. बाळ सगुण गुणाचें तान्हें गे। बाळ दिसतें गोजिरवाणें गे। काय सांगतां गाऱ्हाणें गे। गोकुळीच्या नारी॥ १॥ श्रीरंग माझा वेडा गे। याला नाहीं दुसरा जोडा गे। तुम्ही याची संगत सोडा गे। गोकुळींच्या नारी॥ २॥ पांच वर्षांचें माझें बाळ गे। अंगणीं माझ्या खेळे गे। कां लटकाच घेतां आळ गे। गोकुळींच्या नारी॥ ३॥ सावळागे चिमणा माझा गे। गवळणींत खेळे राजा गे। तुम्ही मोठ्या ढालगजा गे। गोकुळींच्या नारी॥ ४॥ तुम्ही खाऊन लोण्याचा गोळा गे। आळ घेतां या गोपाळा गे। तुम्ही ठाईच्या वोढाळा गे। गोकुळींच्या नारी॥ ५॥ तुम्ही लपवूनी याची गोटी गे। लागतां गे याचे पाठी गे। ही एवढीच रीत खोटी गे। गोकुळींच्या नारी॥ ६॥ तुम्ही लपवूनी याचा भवरा गे। आळ घेतां शारंगधरा गे। तुम्ही बारा घरच्या बारा गे। गोकुळींच्या नारी॥ ७॥ हा ब्रह्मविधीचा जनीता गे। तुम्हीं याला धरूं पाहतां गे। हा कैसा येईल हातां गे। गोकुळींच्या नारी॥ ८॥ नामा म्हणे यशोदेसी गे। हा तुझा हृषिकेशी गे। किती छळितो आम्हांसी गे। गोकुळींच्या नारी॥ ९॥

२६६. वारी वो दशवंती आपुला तूं बाळा। विकटू हा खेळ खेळतसे॥ १॥ धाकुटिया मुळां घेतो हा चिमोरे। काय करूं धुरे हा भीत असो॥ २॥ घरींचा म्हातारा हाणितला येणें। काय सांगू उणें तुजपाशीं॥ ३॥ मी वो लटिकी तरी नामयासी पुसा। तुझा बाळू कैसा आ संदत॥ ४॥

२६७. कान्हा तूं आजि कां झालासि बैमान॥ धृ०॥ तूं तो आमुचा गडी। म्हणोनि मी केली खोडी। घालूं हुंबर यमुनेची मोडूं मान॥ १॥ होसी तूं आमुचा बळी। म्हणोनि म्यां केली कळी। तेथे कशाचा काय गुमान॥ २॥ जरी तूं होसी सखा। होऊं दे जाला वाखा। चल रूपवती घरीं घेऊं मान॥ ३॥ समजूनियां देव। येक नामा नामदेव। जाले तें हरपलें। या द्वैत भान॥ ४॥

२६८. हरी तुझी ऐसी कैसी हे खोड॥ धृ०॥ घेउनी चिमुटे मुसळी पळसी। गोपी तुज म्हणती हा दोड॥ १॥ सोडुनी वासरें गाईसी पाजिती। यांत तुज काय मिळती जोड॥ २॥ आडवा होउनी गोपी धरिसी। चुंबिता वदन मज म्हणसी सोड॥ ३॥ अशा ह्या चेष्टा नाम्यासी करिसी। हरी तुझी ऐसी कैसी हे खोड॥ ४॥

२६९. सोडी कान्हा रविदोर। मथिल्या देतें। बया मज तें दे। आई मज तें दे डेरां घुमघुमतें॥ १॥ यशोदा उचलोनी। कडे त्यासी घेऊनी। दाविती चित्रशाळेतें॥ २॥ करीं कर धरूनी नेऊनी अंगणीं। दावी कुप वावी तें॥ ३॥ दावीत आरशांत। म्हणे पाहे कृष्णनाथ। मुखमुखा चुंबितें॥ ४॥ चिमण्या या गौळणी। आल्या त्याहो मिळोनी। राधे उरीं मज तें दे॥ ६॥

२७०. मला तूं हरी कळलासी रडीवाला॥ ध्रु०॥ विधीचें अक्षर खरें हें असतां। अजासुताचे कां जाले हाल॥ १॥ पाराशरसुत वरचढ जाला। म्हणून कां त्वां फुगविले गाल॥ २॥ बळीनें तुज पाहे खरीद केलें। खर्चून तो धनमाल॥ ३॥ नामा मनीं निर्भय। गुरुवर कृपें। तुजलागी देतों हे प्रतिख्याल॥ ४॥

२७१. मुक्ताफळ नथ नाकीं। चरणीं ल्याली वर वांकी। पितांबरें अंग झांकी। कृष्णाई माझी॥ १॥ खांद्यावरी कांबळी। पायघोळ लांबली। पांघरली धाबळी। कृष्णाई माझी॥ २॥ गाई पाठी लागली। पळतां नाहीं भागली। मायबहिण चांगली। कृष्णाई माझी॥ ३॥ देहुडा पाउली। उभी माझी माउली।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विश्रांतीची साउली। कृष्णाई माझी॥ ४॥ कर ठेवुनी कटावरी। उभी भीवरेचे तीरीं। नामयाची कैवारी। कृष्णाई माझी॥ ५॥

२७२. रावणा मारून माझे माये गे। बिभीषण लंकेस स्थापिलास काय गे। अयाध्येस आलीस काय गे। माझे हृदयमंदिरीं राहे गे। विठ्ठल माये गे॥ १॥ रुसुनी आली रखुमाबाई गे। तिच्या मागें तूं धांवलीस काय गे। संगें घेऊनिया गोपाळ गाय गे। मम हृदयमंदिरीं राहे गे॥ २॥ सत्त्ये राधिकेचे पायीं गे। सोडूनी द्वारकेचा ठाव गे। आलीस काय गे। माझे हृदयमंदिरीं राहें गे॥ ३॥ धन्य पुंडलिक भक्त माय गे। त्यानें विटेवर उभा केला काय गे। नामा म्हणे माझे माय गे। माझे हृदयमंदिरा राहें गे॥ ४॥

२७३. चिदानंद दोंदिल बाळ डोळस। कृष्ण खेळवीत निवे मानस॥ १॥ सये आन कांहीं या जीवा नावडे। चित्त गुंतलें तया सुखी न निवडे॥ १॥ देहा गेहा आठव नाहीं सर्वथा। स्थिति बाणली सहज रूप पाहतां॥ ३॥ तेज सांवळें दृष्टींत कोंदलें। तेणें प्रकाशें सबाह्य मन माझें वेधलें॥ ४॥ वृत्तिसहित इंद्रियें परतलीं। कृष्णरूपीं मिळोनियां गेलीं॥ ५॥ नामया स्वामी आदि परंपरा। आवडता आहे तो माझा सोयरा॥ ६॥

२७४. चिदानंदा दोंदिलें बाळ सांवळें। कृष्ण पाहतां नयनीं मन मावळे॥ १॥ तें सुख कवणें वाचें बोलिजे। चित्त चैतन्य समरसें भोगीजे॥ २॥ परा परतली पश्यंति तन्मया। मध्यमा वैखरी पावली हो लया॥ ३॥ आलिंगना लागुनी बाह्या स्फुरती। देह न दिसे पाहतां कृष्णमूर्ति॥ ४॥ तेथें आर्तीचा आनंदू गोठला। तो हा कृष्णरूपें अंकुर उठिला॥ ५॥ नामया स्वामी सबाह्याभ्यंतरी। गेले रसरंग गोकूळाभीतरीं॥ ६॥

२७५. चिदानंद चिद्रुप चित्त चिन्मय। बाळ यशोदेचें आनंद अद्वय॥ १॥ सत्य अभिनव सुख याच्या दर्शनीं। मिठी पडली पाहता रूप नयनीं॥ २॥ दृष्टीया डोळियां आड रिघोनी। तनु मनासी केली भुलवणी॥ ३॥ आतां बाहेरी निजसुख वावरे। नित्य नूतन जीववूनि विसरे॥ ४॥ आपरूपी रूप सकळां केलें। गोपी गोपाळा धेनु वत्सां भूलविलें॥ ५॥ नामया स्वामी आनंद उदधि। माजी बुडोनियां नेली देहबुद्धि॥ ६॥

२७६. चिदानंदघन चिन्मय बाळकृष्ण। खेळवितां मन होय उन्मन॥ १॥ सुख अनुभवी अनुवाद खुंटला। विश्वंभरी तोचि अनुवाद गोठला॥ २॥ दुजें न दिसे उपमेसीं द्यावया। मन न मिळे आन सुख घ्यावया॥ ३॥ ज्ञाता ज्ञान हेंचि अद्वय। ध्याता ध्यान ध्येय हेंचि निरामय॥ ४॥ जन्मोजन्मीचें पुण्य संचित। झालें गौळियांचें काय मूर्तिमंत॥ ५॥ नामया स्वामीची अनुपम्य आवडी। चित्तें दिधली प्रेमरसी बुडी॥ ६॥

२७७. जो भक्तजन करुणाकर क्षीरसिंधुचा दानी। तो चोरोनी खाय लोणी नवल देखा॥ १॥ जो न माये भूतळीं वेदार्थेहि न कळें। तो बांधिला उखळे नवल देखा॥ २॥ एका पादें करूनि आक्रमी मेदिनी। त्यासी चालूं सिकविती गवळणी नवल देखा॥ ३॥ ज्याचे मायेचेनि कुवाडें ब्रह्मादिकां वेडें। तो बागुल म्हणतां दडे नवल देखा॥ ४॥ दानवांची कोटी हेळांचि निवटि। त्यातें माता भयें दावीं सीपटी नवल देखा॥ ५॥ नामा म्हणे हरी विश्वीं विश्वंभरीं। तों म्हणती नंदाघरीं नवल देखा॥ ६॥

२७८. गोपाळांशीं खेळती। आनंदें डोलती। कृष्ण आमुचा सांगाती। डो डो डो डो डो॥ १॥ कान्होबाची संगती। ब्रह्मादिक इच्छिती। धन्य आम्हां म्हणविती। अ ल ल ल ल॥ २॥ कृष्णाप्रती गोपाळ। म्हणताती सकळ। अकळसी नाकळ। हा त त त त॥ ३॥ मामा मारूं गेलासी। आपटिलें गजाशीं। मल्लयुद्ध खेळलासी। हू तु तु तु तु॥ ४॥ अजगर मारिला। वडवानळ गिळिला। गोवर्धन उचलिला। अ ब ब ब ब॥ ५॥ पुतनेसी शोषिलें। नारदासी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मोहिलें। गणिकेसी उद्धरिलें। अ रे रे रे रे॥ ६॥ गौळियाचें घरां जाशीं। दही दूध लोणी खासी। त्यांच्या सुना भोगिसी। छि छी छी छी छी॥ ७॥ सोळा सहस्त्र भोगिसी। ब्रह्मचारी म्हणविसी। लटिकेची ठकविशी लु लु लु लु॥ ८॥ सोडोनियां मीपण आम्हां घाली लोटांगण। परब्रह्म नारायण। आ हा हा हा हा॥ ९॥ ऐसे तुझे पवाडे। वर्णिताती वाडेंकोडें। विष्णूदास नामा म्हणे। यु यु यु यु यु॥ १०॥

२७९. प्रातःकाळीं प्रहरा रात्रीं उठिल्या गौळणी बाळा। घुसळण मांडियेलें घरोघरीं सकळां। नित्यानंदें परमानंदें गाती गोपाळा। सहस्त्रापरी कैशा गाती मदन सांवळां॥ १॥ घुम घुम करिती घुम घुम करिती डेरे बुमती। आनंदल्या गौळणी छंदें छंदें डोलती॥ धृ०॥ एक म्हणती साजणी तुम्ही लपवागे लोणी। नकळे नकळे हो बाई कृष्णाची करणी। कोणी कडून हा गे येईल सखये चक्रपाणि। खास खादुनि तुम्ही आतां लपवा दुधाणी॥ २॥ बोलतां चालतां इतुक्यामध्यें हरी आला। कवणेंहि नाहीं देव दृष्टि देखिला। सूक्ष्म रूप धरूनि डेऱ्यामध्यें प्रवेशला। वरच्यावरी देव लोणी खाऊनियां गेला॥ ३॥ उन्हवणी शिळवणी घालिती परतें लोणी येईना। काय झाले ढोण सासूबाई कळेना॥ ४॥ हा हा गे बायांनों तुमचे जाणते चाळे। यशोदेच्या मुला देतसां गीळे। उगेंचि मग पाहातां आतां फिरगे निराळे। मारी ठोसरें दोन्ही गाल्हीरे घेतले॥ ५॥ डेऱ्यांमधून मार माझा जगजीवन पाहे। नामा म्हणे धन्य धन्य वर्णूं मी काये॥ ६॥

२८०. मस्तकीं ठेवोनियां डेरा। करूं निघाली विकरा। साच करितसे पुकारा। म्हणे गोविंद घ्यावो॥ १॥ बोल बोलती आबळा। तंव त्या हांसती सकळा। मुखीं पडियेला चाळा। तो गोपाळाचा॥ २॥ दही म्हणावासे ठेले। वाचे गोविंद पै आलें। चित्त चैतन्य रंगलें। कान्हु चरणीं बाई वो॥ ३॥ उन्नतीये बोलती नेती। चालता गजगती। कान्हु वांचुनी चित्तीं। आणीक नेणें बाई वो॥ ४॥ जाऊनियां बळीच्या द्वारां। त्रिपांड केली वसुंधरा। कैसा सामावला तुमच्या डेरा। दाखवी बाई वो॥ ५॥ वृद्धा गौळणी पाचारिती। आणी वो अरुता श्रीपती। कोठें गोविंदु विकीती। नाहीं देखियला बाई वो॥ ६॥ श्रीरंगीं रंगला जीवु। म्हणे घ्यावो हा माधवु। बरवा रमापती गौरवु। साच आणियला कैसा॥ ७॥ बाळा भरूनियां बाळा देखें श्रीरंगु सावळा। वेधी वेधल्या सकळां गोपी गोविंदासवें॥ ८॥ गोविंद गोविंद म्हणा वाचें। गोविंद स्मरण करा साचे। दोष हरती जन्माचे। छंद लागला तयाचा॥ ९॥ नामया स्वामी हो मुरारी। मज पाहतां अभ्यंतरीं। शेखी व्यापिले निर्धारीं। मनुष्यपण॥ १०॥

विरहिणी.

२८१. रूपें श्यामसुंदर निलोत्पल गाभा। सखीयें स्वप्नीं शोभा देखिली॥ १॥ नेत्र विशाळ भाळ दंत हिरया ज्योती। बाईये मदमूर्ति देखियेला॥ २॥ शंख चक्र गदा शोभती चहूं करीं। सखीये गरुडावरी देखियेला॥ ३॥ शयन शेषापृष्ठीं नभी परमेष्ठी। गंगा वामांगुष्ठी देखियेला॥ ४॥ पीतांबर कटीतटी दिव्य चंदन उटी। सखीये जगजेठी देखियेला॥ ५॥ विचारीतां मानसी नये जो व्यक्तीसी। नामा केशवेसी लुब्धोनी ठेला॥ ६॥

२८२. अव्यक्त परब्रह्म कैसें आलें वो व्यक्ती। अकळू न कळेचि तो हा अमूर्ती। पुंडलिकाचे भक्ती येऊनियां वाळवंटी। उभा राहे विटेवरी कर ठेवुनि कटीं॥ १॥ जिवाचा जीवनु वो मज भेटवा हरी। लागलें प्रेम पिसें होऊनि दासी कामारी॥ धृ०॥ कोस कासिला पितांबर तयावरी मेखळा। अंगीं उटी चंदनाची शोभती वनमाळा। बाहू बाहूवाटे तें रूप खुंतलें डोळां। मन माझें मोहिलें दृष्टि देखतां घननिळा॥ २॥ अधर जे पोंवाळियाचे दंत हिऱ्याची ज्योति। विशाल नयन वो भोंवया व्यंकटा अति। टिळक जो रेखिला मृगनाभीं लल्लाटीं। उपमा नये व्यक्ती चंद्रा पडियेली तुटी॥ ३॥ माथां मुगुट जो

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रत्नें जडियेली वरी। त्याखालीं मयूरपत्रीं वेंटी साजे मुरारी। माथा त्या विरगुंठी पुष्पें तुरंबिली वरी। तेणें भाळलियें भेटवावो झडकरी॥ ४॥ इंद्रनीळ कीळ उभा घनश्यामु हा दिसे। पाहा तूं एक दृष्टी चकित केलें वो हांसे। तेचि ते कामबाण जिवा लागलें पिसें। नामया विष्णुदासा व्यापिलें हृषिकेशें॥ ५॥

२८३. संसार परजनीं। दुर दिधलें मज साजणीं। द्वारकापुर पाटणीं। माझें माहियेर॥ १॥ थोर उत्कंठा मनीं। वाट पाहें प्रतिदिनीं। मज नेत कां न कोणी। तया माहियेरा॥ २॥ चित्तीं न लागती व्यापार। मनीं हेंच वारंवार। आड ठाकलें गिरी डोंगर। तया माहियेरा॥ ३॥ माझिया सासुयें निष्ठुरें। दुरळ बोलिलीं उत्तरें। तंव तंव मी तुंतें स्मरें। विठू बापु माहियेरा॥ ४॥ येथें कोणी नाहीं माझें एक। जें त्यासीं बोलूं सुखदुःख। हें मन उतावेळ देख। तया माहियेरा-साठीं॥ ५॥ कामक्रोध भावें दीर। बोलती अति निष्ठुर। तेवेळीं त्यजिजें संसार। ऐसें वाटतसे मना॥ ६॥ या वो संसारीं नासिजे। संगु अवघाची सांडिजे। निःसंग होऊनि राहिजे। तया माहियेरा॥ ७॥ या वो प्राणाचे संकटीं। आत्मा ठेऊनिया कंठीं। मग चालवी घररहाटी। म्हणिजे काम रात्रंदिवस॥ ८॥ याचे क्रुर बोल न होती। तेणें मी असें निर्बूज चित्तीं। निरोप धाडूं कवणाहातीं। तया माहियेरा॥ ९॥ तंवचि वो शिणीजे। जंव यातें न वोळंगिजे। याचें बीज पाविजे। नामें एकें विठ्ठलें॥ १०॥ आतां बहु काय बोलिजे। यासि सुवेळा न पुसिजे। पुण्यमार्गें जाईजे। तया माहियेरा॥ ११॥ माझी सखी जे कां भक्ति। मज तेंचि संबोखीती। तियें लाविलें शुद्धमति। साह्य ते मम चुको नेदी॥ १२॥ सत्य भावो मज सांगाती। येर लटकिया व्युत्पत्ति। मी वो जाईन हरखें जतीं। तया माहियेरा॥ १३॥ कृष्ण माऊली भेटेल। शीण अवघाचि हरेल। सुख आनंदू न मायेल। या या त्रिभुवनीं॥ १४॥ या बहु जन्माचा शीण वो जाईल। विठोदर्शनें दुःख हरेल। नामा सुखिया होईल। केशव चरणीं॥ १५॥

२८४. कृष्ण अनुसंगें रंगली कामिनी। कामधामें गेली गुणा विरोनी॥ १॥ होती बहुत जन्में वियोगें शिणली। आप नाठवें पर सुखें मिनलीं॥ २॥ मनें करूनियां ये विषयाचे संकल्प। तंव तें अवघे होय कृष्णरूप॥ ३॥ दृष्टीं देखणें जें जें आवडे। वेणू बाहे तेथें उभें देहूडें॥ ४॥ सुखशयनीं स्वप्नीं देखें सांवळा। कंठीं कौस्तुभ रुळें वरी वनमाळा॥ ५॥ जीवें धांवूनी आलिंगीं प्रीती। तंव ते आर्ती होय कृष्णमूर्ति॥ ६॥ देह परतोनी मागुते सांभाळी। तंव स्वयें सिद्ध आपण वनमाळी॥ ७॥ नामया स्वामी जीविचा जीवलगू। कृष्णसुखाचा सुखबोध अंतरंगु॥ ८॥

२८५. भिन्न रात्रीं माध्यान्हीं वो सेजे सुदली नारी। आपआपणा विसरूनिया। सुशोभित अंधारीं॥ १॥ त्यामाजीं चारी भूजा। शंख चक्र वो करीं। पद्म गदा हातीं शोभती। दिसे सर्व शृंगारी॥ २॥ येऊनि हंस तुळीके। कैंसे धरियलें करीं। देऊनि आलिंगन। वोरसनें वो दुरी॥ ३॥ पालवीं धरितां धरितां। निघाला बाहेरी। त्यालागीं प्राण जातो। भेटवा झडकरी॥ ४॥ कवण ते प्राणसखी। भेट करी विठोसी। सांडूनि वीरंगुठी। चरण न झाडी केशी॥ ५॥ कवण मी कैंचा नेणें। जाती कूळ तयाचें। कवणा पांसाव झाला। तें मी नेणें वो साचें॥ ६॥ इंद्र चंद्र नीळ कीळ। घन नभ रूप तयाचें। चरणीं तोडर रुळे। वरि नूपुरें साचे॥ ७॥ नख चंद्रमंडित वो। जन्मस्थान गंगेचें। जानू जघन नीट। पीतांबर वो कासे॥ ८॥ त्यावरी नाग मुरडी। रत्न मेखला साजे। माजू जो मुष्टी माय। त्या मन वेधलें माझें॥ ९॥ नाभीं सरोवरी वो। दिसे ब्रह्मकाळ। अनुपम्य उदर ज्याचें। विशाळ वक्षस्थळ॥ १०॥ कौस्तूभ वरी शोभें। करितो झळपळ। कुंडलांचेनि रत्नें। कैसेनि फांकतांती कीळ॥ ११॥ वदनीं मी काय वानूं। प्रसिद्ध निर्मळ। भाळीं तो अर्ध चंद्र। मृगनाभीचा टिळ॥ १२॥ सरळ ज्या अंगोळिका। नवरत्नें जडीत। कंकिणें मनगटीं बाहुवटी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सुशोभित ॥ १३ ॥ त्यावरी कीर्तिमुखें। भुजादंड मिरवत। वैजयंती पदक हीरे। मुगुटीं झळकत ॥ १४ ॥ मयूरपत्रें शिरीं। शोभा दिसे अमित। चंद्र मंडळ लोपलीं वो। महातेज अद्भुत ॥ १५ ॥ व्यापिलें वनमाळियें। लावण्य तेज अमित। तें रूप देखावया। माझा जीव उल्हासत ॥ १६ ॥ ऐसी तापली विरहज्वरें। थोर होतो उबारा। चंदन पोळतसे। न घाला विंजण वारा ॥ १७ ॥ चंद्रमा दाहतसे। उष्ण तो खडतरा। तंव येरी जाणितला। वेध नंदकुमरा ॥ १८ ॥ हा येईल केशीराजा। पाहे द्वारकापुरा। भक्ति ही विरहा माता। तिणें आणिला घरा ॥ १९ ॥ नामया विष्णुदासा। भेटी शारंगधरा। तनु मन जीवें त्याला। सुख झालें अंतरा ॥ २० ॥

पाळणे.

२८६. स्त्री गरवार पति उदरीं। पतिव्रतापण साजे तिये नारी ॥ १ ॥ अबला खेळवी मोहे। कडीये घेवो देतसे पाहे ॥ २ ॥ समस्तीं मिळोनि पाळणा घातला। विष्णुदास नामयानें अनुभव गाईला ॥ ३ ॥

२८७. जो जो जो जो रे मधुसुदना। बाळा जगजीवना। हालवी यशोदा पाळणा। निज बा नारायणा। जो जो जो जो रे ॥ धृ० ॥ प्रथम अवतारीं। स्तवन करितांचि पै विथी। करुणासागर गुणनिधी। शंखासुर वधोनि ॥ १ ॥ द्वितीये संकष्टीं इंद्रासी कूर्मरूप होसी। सिंधू मंथुनियां श्रमलासी। सौख्य समस्तां देसी ॥ २ ॥ तृतीये वराह हिरण्याक्षी। धरूनी त्याची कुक्षी। पळतां धरियेला अनुलक्षी। फोडुनि त्याची वक्षी ॥ ३ ॥ चतुर्थ नरसिंह विशाळ। अग्नीचा कल्होळ। निवडूनि असुराचे तेजाळ। काढी अंतमाळ ॥ ४ ॥ पंचम वामन सुंदर। क्षीराब्धीचा वर। जेणें भूलंविला दिनकर। हरिला दानासुर ॥ ५ ॥ षष्टम भार्गव अभिदानीं। पिता जमदग्नी। पृथ्वी निःक्षेत्री त्रिवाणी। दिधली विप्रा दानीं ॥ ६ ॥ सप्तम अयोध्यापुरवासी। राजाराम होसी। पितृवचनाचे नेमासी। राहुनियां वनवासीं ॥ ७ ॥ अष्टम अवतार गोकुळीं। जन्मला वनमाळी। चाणुर कंसाची मंडळी। जाळूनि केली होळी ॥ ८ ॥ नवम बौध्य अवतार। पुढें येती युगांतर ॥ ९ ॥ दशम कलंकी होणार। नामा म्हणे संत ॥ १० ॥

जात.

२८८. संसार घन घनदाट। कैं होईल शेवट जातियाचा ॥ १ ॥ जीव हेंचि जातें कर्म हाचि खुंटा। वोढिती वरवंटा चौघीजणी ॥ २ ॥ जातां वैर वैरणें जंव आहे लहाणे। जातां साई जणे जाईल जाणा ॥ ३ ॥ एकोत्तरशें कौरव वैरिले वैरणा। याचा पांडवा जाणा तेचि झालें ॥ ४ ॥ नळनीळ मांधाता वैरियेले जातां। निमिष न लागतां पीठ झालें ॥ ५ ॥ संसाराचा वोढा वोढ़ितां न वोढे। बैस पलीकडे लावी हात ॥ ६ ॥ नामा म्हणे विठोबा दिनाचें माहेर। सदा पंढरपुर गाऊं गीतीं ॥ ७ ॥

बागुल.

२८९. पाहिला बागुल तो ऐसा। त्यांचें नांव म्हणती मासा। शंखासुर वधिला कैसा। चारी वेद आणीले ॥ १ ॥ कृष्णा राहेरे उगला। नाहीं तर सांगेन त्या बागुला। घुसळणासी उशीर झाला। रवि सोड गोविंदा ॥ धृ० ॥ दुसरा बागूल बोलती। नाम कांसव म्हणती। जेणें सृष्टी धरली पृष्ठीं। पाय पोटीं धरियेलें। कृष्णा० ॥ २ ॥ तिसरा बागुल बोलती। नाम वराह म्हणती। जेणें दाढें धरिली क्षिती। दैत्य थोर मारिले। कृष्णा० ॥ ३ ॥ चवथा बागुल नरहरी। थोर खांबांत गुरगुरी। दैत्य वधोनि मांडीवरी। भक्त प्रल्हाद रक्षिला ॥ कृष्णा० ॥ ४ ॥ पांचवा बागुल ब्रह्मचारी। उभा असे बळीचे द्वारीं। भिक्षा मागोनि निर्धारी। बळीचे द्वार रक्षिले ॥ कृष्णा० ॥ ५ ॥ सहावा बागुल बोलती। नाम परशुराम म्हणती। ज्यानें वधिलें मातेप्रती। पितृवचन मानुनी ॥ कृष्णा० ॥ ६ ॥ सातवा बागुल सत्त्वाचा। राम म्हणती दशरथाचा। रावण वधोनि दशमुखांचा। जानकिसी आणिलें ॥ कृष्णा० ॥ ७ ॥ आठवा बागुल बोलती। गोकुळीं थोर आहे ख्याती। त्यानें वधिलें कंसाप्रति। देव सुखी केले ॥ कृष्णा० ॥ ८ ॥ नववा बागुल बोलती। नांव

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बौद्ध म्हणती। कोणा न कळे त्याची गती। बौद्ध रूपें राहिला॥ कृष्णा०॥ ९॥ हाता कलंकीचा रथू। वेगीं येईबा धांवतु। नामा म्हणे पंढरीनाथु। बागुल तूं झालासी॥ कृष्णा०॥ १०॥

हुंबरी.

२९०. समस्त मिळोनि गोपाळी। तया यमुनेच्या पाबळीं। कृष्णें मांडिली धुमाळी। कळंबा तळीं आनंद॥ १॥ वळुनि कांबळ्या वेटी। त्याही बांधिल्या मनगटी। विवाद मांडिला निकटी। धूर्जटी कान्होसी॥ २॥ आतां कृष्णा कवणे ठायीं। जासी तुजवरी आली डाई। आमची हमामा हुंबरी देई। उभा राहे पै कां गा॥ ३॥ कृष्ण म्हणे मी एकवटु। तुम्ही आम्ही गडी वाटूं। गोवळी घातलासे हाटु। अति निकटू कान्हूसी॥ ४॥ म्हणे बळीराम पहागा। बोल नव्हे तुम्हाजोगा। तुम्ही समर्थ श्रीरंगा। आम्हां कांगा भेटविसी॥ ५॥ ऐसा सकळीं मान केला। तेव्हां कृष्ण संतोषला। आनंद चित्तासी पावला। म्हणे भला भला नाम्या॥ ६॥

कुस्ती.

२९१. कुस्ती खेळतां कासाविसी। शेंबूड खरकटें नाकासी। करें घेऊनि सावकाशी। आतां बहु भितो यासी॥ १॥ आम्ही तुम्ही सेंव जेवूं। गाई वळावया जाऊं। त्याच्या मानेवर बुक्या देऊं। जवळ जावयासी आतां भिऊं॥ २॥ नामा म्हणे चला जाऊं। हात जोडोनि उभे राहूं। पायां पडूनी मागूनि घेऊं। जनीं वनीं तो कृष्ण ध्याऊं॥ ३॥

२९२. कान्होबा निवडी आपुली गोधनें॥ धृ०॥ पांच पांच पोळ्या तीन भाकरी। दीड कानवला एक पुरी। आम्हा धाडिलें वैल्या दुरी। आमची ठकवुन खाल्ली शिदोरी॥ कान्हो०॥ १॥ परि येसी शारंगधरा। तुझा बैल चुकला मोरा। सांगूं गेलों तुझ्या घरा। पाठी लागला तुझा म्हातारा॥ कान्होबा०॥ २॥ परियेसी हृषीकेषी। गाई म्हशीचें दूध पिशी। वासरें प्यालीं म्हणून सांगशी। उद्यां ताक नाहीं आम्हांसी॥ कान्हो०॥ ३॥ कान्होबा ओढाळ तुझ्या गाई। होत्या नव्हत्या कळंबा ठायीं। शिव्या देती तुझी आई॥ कान्होबा०॥ ४॥ विष्णुदास नामा साहे। देवा तूंचि बाप माये। अखंड माझें हृदयीं राहे॥ कान्होबा०॥ ५॥

२९३. अरे अरे कन्हया वेल्हाळा। तूंरे बरविया गोपाळा। तुज देखियेलें डोळां। रे धेनुवा हुंबरती॥ १॥ माते देवो शिदोरी। ऐसे म्हणतसे मुरारी। मी जाईन वो दुरी। धेनु चारावयालागीं॥ २॥ अलें बेलें चिलें मेकें। सुरण मिरगोडी पै तिखें। दह्यावाचोनी नव्हें निकें। शिदोरी ताकें कालवूं निकें॥ ३॥ वडजा वाकुडा पेंदा सुदामा। हेचि पांतिकर आम्हां। तेंथें विष्णुदास नामा। उच्छिष्ट शितें वेंचितसें॥ ४॥

श्रीराममाहात्म्य.

रामजन्म.

२९४. कुळगुरु वशिष्ट सांगे नृपवरा। असती गरोदर तुझ्या कांता॥ १॥ धर्मशास्त्र ऐसे डोहाळे पुसावें। त्यांचे पुरवावे मनोरथ॥ २॥ ऐकोनियां ऐसें आनंद मानसी। कैकई सदनासी जाता झाला॥ ३॥ मंचकीं बैसली होती तें पापिणी। देखतां नयनीं पहूडली॥ ४॥ सुंदरपणाचा अभिमान मनीं। त्यावरी गर्भिणी नामा म्हणे॥ ५॥

२९५. राजा म्हणे इच्छा तुझिये मानसीं। डोहाळे मजसी सांग आतां॥ १॥ येरी म्हणे ऐसें वाटतसे जीवा। कनिष्ठासी द्यावा राज्यपट॥ २॥ ज्येष्ठासी धाडावें दुरी दिगंतरा। नये समाचार त्याचा आम्हां॥ ३॥ जनांत हें निंद्य वेदबाह्य कर्म। करितां अधर्म पाप बहू॥ ४॥ माझिये मस्तकी ठेवावा हा दोष। तुम्हांकडे लेश नाहीं नाहीं॥ ५॥ निंदीतील जन मज वाटे सुख। ऐकतांची दुःख राया झालें॥ ६॥ वृश्चिकाचे पेंवी तक्षक पडत। घालिताती घृत अग्निमुखीं॥ ७॥ ऐशी व्यथा होय नामा म्हणे त्यासी। उठिला त्वरेसी तेथूनियां॥ ८॥

२९६. येतसे दशरथ सुमित्रा मंदिरीं। देखतां सामोरी येती झाली॥ १॥ न माये आनंद तियेचे मानसीं। ठेवी मस्तकासी चरणांवरी॥ २॥ घालोनी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आसन प्रक्षाळी चरण। सर्वांशी लेपन तीर्थोदकें॥ ३॥ गंध धूप दीप पुष्पांचिया माळा। अर्पूनी तांबुला उभी राहे॥ ४॥ कैकयीचें दुःख विसरला राव। पाहोनियां भाव सुमित्रेचा॥ ५॥ होती जे डोहाळे तुझिये मानसीं। सांग मजपाशीं पतिव्रते॥ ६॥ प्राणनाथा ऐसी वाटतसे जीवा। वडिलांची सेवा अहर्निशी॥ ७॥ आवडे हें एक नावडे आणिक। द्यावें मज एक हेंचि आतां॥ ८॥ ऐकतांची ऐसें कांतेचें वचन। आनंदें निमग्न मन होय॥ ९॥ घेऊनिया हातीं रत्नाचें भूषण। टाकी ओवाळून नामा म्हणे॥ १०॥

२९७. दशरथ राजा उठिला तेथूनि। कौसल्ये सदनीं जातां झाला॥ १॥ पाहातसे दृष्टी तेव्हां श्रावणारी। न माये अंतरीं तेज तिचें॥ २॥ तुझिये मानसीं होती जे डोहाळे। सांग वो वेल्हाळे मजपाशीं॥ ३॥ उदरांत असे भक्तांचा कैवारी। तेथें कैंची उरी देहभावा॥ ४॥ सदा समाधिस्थ रामरूप झाली। कौसल्या माउली नामा म्हणे॥ ५॥

२९८. न बोलेची कांहीं इसी काय झालें। भूतें झडपिलें निश्चयेसी॥ १॥ माझिये अदृष्टीं नाहीं हा नंदन। म्हणोनियां विघ्न ओढवलें॥ २॥ निवारी हें विघ्न वैकुंठनायका। रक्षी या बाळका सुदर्शनें॥ ३॥ तुझा मी किंकर आजी अंबुजाक्षा। द्यावी मज भिक्षा हेंचि आतां॥ ४॥ नामाचा उच्चार ऐकतांचि कानीं। नेत्र उघडोनी पाहती झाली॥ ५॥ राजा म्हणे कांहो ऐसी अवस्था। कांहो भ्रम चित्ता झाला असे॥ ६॥ विश्वाचा मीं आत्मा स्वयें असे राम। मजपाशीं भ्रम कैंचा असे॥ ७॥ अवतार महिमा वाणी वेद माझा। सुरवरांच्या काजा नामा म्हणे॥ ८॥

२९९. रावणें हें केलें लग्नामाजीं विघ्न। असे कीं स्मरण तुजलागी॥ १॥ आणीरे धनुष्य मारीन रावणा। लंका बिभीषणा देईन मी॥ २॥ अंगद सुग्रीव जांबुवंत वीरा। हनुमंत पाचारा लवकरी॥ ३॥ टाकोनी पर्वत बुजवारे सागरा। पायवाट करा जावयासी॥ ४॥ लंके पुढें मोठे माजवीन रण। तोडीन बंधन सुरवरांचें॥ ५॥ विश्वामित्र याग नेईन मी सिद्धी। मारीन कुबुद्धि दोघांजणां॥ ६॥ खर दूषणांचा घेईन मी प्राण। धनुष्य मोडीन भुजाबळें॥ ७॥ ध्याती मज त्याची बहुत आवडी। न विसंबें घडी त्यासी एक॥ ८॥ बोलिला वाल्मिक तैसेंची करीन। वर्तोनि दावीन नामा म्हणे॥ ९॥

३००. परब्रह्म पूर्ण आलें माझे घरीं। न कळे अंतरीं नृपाचिया॥ १॥ करीति बडबड होती भूतचेष्टा। पाचारा वसिष्ठा लवकरी॥ २॥ येऊनि वसिष्ठ पाहे कौसल्येसी। नावरती तियेसी अष्टभाव॥ ३॥ राजा म्हणे कैसें विपरीत झालें। वसिष्ठा झडपिलें महाभूतें॥ ४॥ श्रावणवधाचें अघ नाहीं जळालें। दुजें हें निर्मिलें प्रारब्धासी॥ ५॥ ऐकतांचि हांसे सावध होऊनि। बोलतसे झणी नामा म्हणे॥ ६॥

३०१. विरंचीचा बाप क्षीरसागरवासी। ध्याती योगी त्यासी निरंतर॥ १॥ परेहूनिपर वैखरीहूनि दुरी। कौसल्येचे उदरीं तोचि असे॥ २॥ बोलियेलें जें जें नव्हे असत्य वाणी। न येऊं दे मनीं शंका कांहीं॥ ३॥ माझें हें संचित धन्य धन्य आतां। पाहीन मी कांता लक्ष्मीच्या॥ ४॥ धन्य धन्य धन्य अयोध्येचे लोक। वैकुंठनायक पाहातील॥ ५॥ धन्य पशुपक्षी श्वापदें तरुवर। राजा रघुवीर पाहातील॥ ६॥ त्रैलोक्यांत धन्य तूंचि एक नृपा। नामयाच्या बापा पाहाशील॥ ७॥

३०२. उत्तम हा चैत्रमास। ऋतु वसंताचा दिवस॥ १॥ शुक्लपक्षी ही नवमी। उभे सुरवर ते व्योमीं॥ २॥ माध्यान्हासी दिनकर। पळभरी होय स्थिर॥ ३॥ धन्य मीच त्रिभुवनीं। माझे वंशीं चक्रपाणि॥ ४॥ सुशोभित दाही दिशा। आनंद नरनारी शेषा॥ ५॥ नाहीं कौसल्येसी भान। गर्भी आले नारायण॥ ६॥ अयोनी संभव प्रगटला हा राघव॥ ७॥ नामा म्हणे डोळां। पाहीन भुवनत्रयपाळा॥ ८॥

३०३. सुवर्णाचा शोभे मस्तकीं मुगुट। हीरे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घनदाट तयावरी ॥ १ ॥ विस्तीर्ण कपाळ व्यंकटा भ्रुकुटी। टिळक लल्लाटीं केशराचा ॥ २ ॥ कमळाकार नेत्र आकर्ण शोभती। कुंडलें झळकती कर्णी ज्याच्या ॥ ३ ॥ सरळ नासिक लावण्य मुखचंद्र। हनुवटी सुंदर राघवाची ॥ ४॥ कंठाचा आकार कंबुग्रीवा ऐसा। हृदयावरी ठसा द्वीजपद ॥ ५ ॥ सुकुमार सुरेख जयाचें उदर। ब्रह्मांडें अपार वसती जेथें ॥ ६ ॥ नाभीं कमळींचा ब्रह्मा नेणे अंत। कडदोरा शोभत कटीं ज्याच्या ॥ ७ ॥ दंडी पेट्या करी जडित मुद्रिका। पिवळा नेटका पीतांबर ॥ ८ ॥ केशराची उटी सरळ बाहुदंड। चिमणा कोदंड हातीं ज्याच्या ॥ ९ ॥ गर्जती नूपुरें कोमळ चरणीं। वज्रांकुश चिन्हीं विराजीत ॥ १० ॥ कौस्तुभ मुक्तमाळा रुळे वैजयंती। भ्रमर भुलती नामा म्हणे ॥ ११ ॥

३०४. सांगताती दाया। तुम्हां पुत्र झाला राया ॥ १ ॥ ऐकतांचि ऐसें कानीं। हर्ष न समाये मनीं ॥ २॥ उठा उठा वो त्वरेसी। पाचारावें वसिष्ठासी ॥ ३ ॥ ब्राह्मणासी पाचारा। सांगा सर्व नारीनरा ॥ ४॥ फोडा फोडारे भांडारें। आणवा गाईचीं खिल्लारें ॥ ५ ॥ उभवा उभावारे गुढी। सोडा वस्त्रांची गाठोडीं ॥ ६ ॥ झाडोनिया टाका खडे। घाला केशराचे सडे ॥ ७॥ नामा म्हणे भूमंडळा। स्वामी माझा पहा डोळां ॥ ८ ॥

३०५. अनंत ब्रह्मांडें जयाचे उदरीं। ध्यातसे त्रिपुरारी अहर्निशीं ॥ १ ॥ पाहातसें मुख दशरथ त्याचें। भाग्य मी तयाचें काय वर्णूं ॥ २ ॥ गंध पुष्प वस्त्रें अर्पोनियां द्विजां। समभावें पूजा सकळांसी ॥ ३ ॥ साखरेच्या गोण्या घाला हत्तीवरी। धाडी घरोघरीं नामा म्हणे ॥ ४ ॥

३०६. करितसे स्नान अजाचा बाळक। वस्त्रें अमोलिक परिधान ॥ १ ॥ लावोनियां भाळीं कस्तुरी केशर। करी नमस्कार वसिष्ठासी ॥ २ ॥ पुण्याहवाचनी बैसे दशरथ। त्रिभुवनीं समर्थ तूंचि एक ॥ ३ ॥ वेदमंत्र घोष करिती ऋषेश्वर। पुष्पें सुर वरुषती ॥ ४ ॥ आणिती बाहेर अयोध्येचे जन। करिती गायन गायक जे ॥ ५ ॥ नाचती अप्सरा वाजती नगारे। वाजंत्री तुतारे भोंवारें ही ॥ ६ ॥ गुलालाची धूम रंग वस्त्रावरी। बंदीजन द्वारीं गर्जताती ॥ ७ ॥ नामा म्हणे इंद्रें पाहोनियां सभा। नाहीं ऐसी शोभा चित्तीं म्हणे ॥ ८ ॥

३०७. बाई कशाच्या नवबता। पुत्र झाला दशरथा ॥ १ ॥ चला चला तेथें जाऊं। कौसल्येचें बाळ पाहूं ॥ २ ॥ नवसे बहुत। तिशीं पावला भगवंत ॥ ३ ॥ घ्याग घ्याग त्वरें वाण। झगा फडकीं पेहरण ॥ ४॥ करूनि श्रृंगारा। येती राजयाच्या घरा ॥ ५ ॥ पाहतां सुकुमार सांवळा। लवूं विसरला डोळा ॥ ६ ॥ सार्थक जन्माचें। नामा म्हणे झालें त्यांचें ॥ ७ ॥

३०८. भांडारीं येऊनि करिती प्रार्थना। द्विजांसी दक्षणा काय द्यावी ॥ १ ॥ जया लागे जितुकें तितुकें त्यानें घ्यावें। तुम्हीं न रहावें उभे तेथें ॥ २ ॥ धांवताती तेव्हां विप्र सकळिक। एकावरी एक पडताती ॥ ३ ॥ करूं नका घाई सर्वांसी पुरेल। न राहे दुर्बळ यांत कोणी ॥ ४॥ नामा म्हणे ऐसें धन वाटी राजा। सुखी केल्या प्रजा सकळीक ॥ ५ ॥

३०९. ब्राह्मणांची इच्छा पूर्ण झाली जेव्हां। आशीर्वाद तेव्हां वदताती ॥ १ ॥ कल्पकोटी यासी नाहीं नाहीं भय। सकळांचें ध्येय हेंचि असे ॥ २ ॥ तपाचिया राशी जाहल्या बहुत। म्हणोनियां सुत झाला तुज ॥ ३ ॥ तथास्तु म्हणोनि जोडीत अंजुळ। पायांवरी भाळ नामा म्हणे ॥ ४ ॥

३१०. बाई कौसल्येचा पुत्र। दिसे सर्वांही विचित्र। ऐसें वाटे माझ्या चित्तीं। प्रगटली विष्णूमर्ती ॥ २ ॥ क्षणी होईल या दृष्ट। मोडताती कानीं बोट ॥ ३ ॥ तिच्या भाग्यें असो सुखी। नामा म्हणे सर्वांमुखीं ॥ ४ ॥

श्रीरामचरित्र.

३११. धन्य ते संसारीं पवित्र ते वाणी। अखंड उच्चारणी रामनाम ॥ १ ॥ तयांचीच एक सरली येरझार। उतरले पार भवनदी ॥ २ ॥ वधोनी ताटीका सुबाहुही देख। सिद्धि नेला मख कौशिकाचा ॥ ३ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पहावया यावें स्वयंवर सीतेचें। आलें जनकाचें पत्र तेथें॥ ४॥ मार्गी चालतां ब्रह्मीयाची बाळा। उद्धरली शिळा पदरजें॥ ५॥ मोडील धनुष्य तया हें देईन। केला होता पण जनकानें॥ ६॥ रावणादि राजे आले थोर थोर। त्यांचा उतरला नूर पाहातांची॥ ७॥ अहर्निशी जया ध्यानीं ध्यान भोळा। तो उठला सांवळा बाप माझा॥ ८॥ सुरा असुरा असाध्य ऐसें तें प्रचंड। तें तीं ठायीं कोदंड मोडियलें॥ ९॥ पाहोनीया ऐसें नामा म्हणे बळ। सीता घाली माळ रघुवीरा॥ १०॥

३१२. संत समागम चाले दळभारू। आशा तृष्णा देशधडी अहंकारू॥ १॥ दुम दुम दुम दुम भेरी वाजे। आले अयोध्येसी श्रीरघुनाथ राजे॥ २॥ भक्तभद्रजाती दोही बाही चालत। विष्णुदास नामा कीर्ति वाखाणित॥ ३॥

३१३. पैल आला रामराणा। लंका दिधली बिभिषणा॥ १॥ नळनील जांबूवंत। मध्यें चाले रघुनाथ॥ २॥ मागे वानराचे थाट। पुढें गर्जताती भाट॥ ३॥ केला अयोध्या प्रवेश। म्हणे नामा विष्णुदास॥ ४॥

३१४. राम पिता सीता माता। लक्ष्मण सोयरा चूलता॥ १॥ तयांसी भेटो जाऊं आतां। चित्रकुटीच्या पर्वता॥ २॥ नामा म्हणे माझें गीत। चित्रकुटीं असे नांदत॥ ३॥

३१५. काळे गोरे धनुर्वांडे। ते चालताती रामापुढें॥ १॥ राम निळिये गुढारी। कनक दंड चवरे वरी॥ २॥ चला चित्रकुटीं जाऊं। राम दशरथाचा पाहूं॥ ३॥ अयोध्ये केला अवतारू। राम नामया दातारू॥ ४॥

३१६. गोरे सांवळे घनवटे। एक चालती एकापुढें॥ १॥ राम निळीय पुढारी। कनकदंड चौरेवरी॥ २॥ राम लक्ष्मण विजयी झाले। आनंदें अयोध्ये आले॥ ३॥ चंद्रगिरीचे तळवटीं। राम सीतेसी झाली भेटी॥ ४॥ चंद्रगिरी चला जाऊं। राम दाशरथी पाहूं॥ ५॥ चंद्रगिरी केला वास। म्हणे नामा विष्णूदास॥ ६॥

३१७. म्हणसी विभिषण शाहणा। परि तो महामूर्ख जाणा॥ १॥ काय तो रामासी भेटला। भेटून रामचि नाहीं झाला॥ २॥ राम दृष्टी देखतांची पदवी न घेववेचि त्याची॥ ३॥ कोण हित केलें तेणें। राम नाकळी चिंतनें॥ ४॥ जरी तो झाला लंकापती। नाश पावेल कल्पांतीं॥ ५॥ नामया स्वामी तें जाणोन। अवघा रामचि होईन॥ ६॥

३१८. गुंडाळिल्या जटा तोचि माथा फेटा। गोजिरा गोमटा रामचंद्र॥ १॥ वैकुंठीचा राजा म्हणवितो योगी। दावावया जगीं योग करी॥ २॥ आकर्ण लोचन हातीं चापबाण। वल्कलें भूषणें नेसोनियां॥ ३॥ पितृवचनालागीं मानोनि साचारी। झाला पादचारी वनीं हिंडे॥ ४॥ देवांचिया काजीं ठेवोनियां निज। सर्वांपरी सज्ज झाला अंगें॥ ५॥ नामा म्हणे त्यांचें न कळे कौतुक। आपुलिया सुख वाढावया॥ ६॥

३१९. श्रीराम सोयरा आला माझ्या घरा। दिधला म्यां थारा हृदयीं माझ्या॥ १॥ पावलों विश्रांति धालें माझें मन। न लगे आतां ध्यान शिकावया॥ २॥ ज्यासाठी हिंडणें जटामौन नग्न। धरिलें तेणें ठाणें हृदयीं माझ्या॥ ३॥ योग याग तप करावें साधन। तोहि जाण ओठीं सदा वसे॥ ४॥ तीर्थयात्रा देव ज्यासाठीं करावें। ते ब्रह्म बरवें नांदे देही॥ ५॥ ब्रह्मचर्यादिक आश्रम साधावें। केली तया देवें देहीं वस्ती॥ ६॥ वेदशास्त्र पुराण ज्यासाठीं पठण। तो नांदें परिपूर्ण हृदयीं माझ्या॥ ७॥ ऐसा तो सज्जन जिवलग सांगाती। दिधली मज विश्रांती नामसंगें॥ ८॥ तैसें नव्हें ज्ञान फुटक्या हांडोरयाचें। धरूनिया साचे खोखावाजे॥ ९॥ स्वधर्मी विचार वेंचाचें अन्वयें। लाधले हे पाय गुरुकृपें॥ १०॥ अभंग भंगेना फोडिता फुटेना। गुरुकृपें जाणा प्राप्त झालें॥ ११॥ चावळी वटवट बोलणें बासर। हें तंव अवघें चार मर्कटाचें॥ १२॥ परनिंदा परद्रोहो करणें या संतांचा। जाळावी ते वाचा ज्ञान

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्याचें ॥ १३ ॥ न लगे सोंग धरणें देह ताप करणें। ऐसें निज ध्यान आतां आलें ॥ १४ ॥ नाम घेतां रूप हृदयीं बिंबलें। सर्वत्र देखे तेचि डोळां ॥ १५ ॥ नाममंत्र बीज नाहीं जंववरीं। केशव तंववरी प्राप्त नाहीं ॥ १६ ॥ नामाचें धारक तें केशवरूप। वैकुंठीचें सुख रुळें पायीं ॥ १७ ॥ नामेंविण ज्ञान नपुंसक ऐसें। नातळती कैसे साधुसंत ॥ १८ ॥ नाम तेंचि रूप रूप तेंचि नाम। नामरूपा भिन्न नाहीं नाहीं ॥ १९ ॥ आकारला देव नाम रूपा आलें। म्हणुनि स्थापिलें नामदेवें ॥ २० ॥ नामापरता मंत्र नाहीं वो आणिक। सांगती ते मूर्ख ज्ञानहीन ॥ २१ ॥ नामा म्हणे ज्ञान केशव केवळ। जाणती प्रेमळ भले भले ॥ २२ ॥

सीताशोध.

३२०. हनुमंत गेला सीताशुद्धिलागीं। लंका मध्यभागीं घेऊनियां ॥ १ ॥ माता जानकीच्या करीत शुद्धीसी। हिंडे गृहदेशीं राक्षसांच्या ॥ २ ॥ न देखे तो सती सीतादेवी माया। अकस्मात तया वनामाजीं ॥ ३ ॥ शिंसीवा वृक्षाचे असे तळवटीं। समीप निकटीं राक्षसाचे ॥ ४ ॥ न चले उपाय कांहीं तो बोलाया। स्मरे रामराया तये काळीं ॥ ५ ॥ श्रीरामें मुद्रिका दिली होती संगें। तयासी अव्यंग सोडावया ॥ ६ ॥ वृक्षाचिया माथां बैसोनियां बळी। देत करकमळीं सोडूनिया ॥ ७ ॥ जानकी अवलोकी श्रीरामाची मुद्रा। कोठोनी कपींद्रा आणलीसे ॥ ८ ॥ सुखी रामराणा कवणिये वना। माझिया तूं प्राणा बोले वेगीं ॥ ९ ॥ ऐकोनी कपींद्र चरणासी वंदी। म्हणे रामचंद्र सुखी असे ॥ १० ॥ सहितसौमित्र वनामाजीं आहे। शुद्धीलागीं पाहे पाठविलें ॥ ११ ॥ तुझेनि वियोगें रामराजा दुःखी। यालागीं तुज देखी पाठविलें ॥ १२ ॥ ऐकतांचि वाणी करीत आक्रोशा। म्हणे राम कैसा सोडियेला ॥ १३ ॥ नानापरी खेद आलाप करूनी। हा हा रामवाणी बोलतसे ॥ १४ ॥ समीप जे होते रक्षपाळ बळी। ऐकोनि आरोळी दूर झाले ॥ १५ ॥ तये संधीमध्यें हनुमंत खलौता येवोनियां माता वंदितसे ॥ १६ ॥ क्षुधाक्रांत भारी म्हणे काय खाऊं। सांगसी उपाऊ तरी येथें ॥ १७ ॥ वनामाजीं मेवा घेऊनियां कांहीं। क्षुधेसी तें पाही शांतवावी ॥ १८ ॥ म्हणे सीता दूता रक्षपाळ होती। निरोध करिती तुजलागीं ॥ १९ ॥ म्हणोनिया पाही भूमिगत कांहीं। घेऊनि स्वदेही विश्रांतीसी ॥ २० ॥ पडलें तें घेई ऐसी आज्ञा पाही। वंदोनिया पायीं संतोषला ॥ २१ ॥ करोनी उड्डाण वृक्षमाथां बैसे। उपडोनि झाडास हालवीत ॥ २२ ॥ खालीं पाडी फळें तयांचें भोजन। करूनियां वन विध्वंसिलें ॥ २३ ॥ रक्षपाळ सारे मिळोनी कपींद्रा। धरावया सारा यत्न केला ॥ २४ ॥ न चढे हातासी बहुबळ त्यासी। राक्षसां विध्वंसी हातपायीं ॥ २५ ॥ वृक्षाचेनि घायें मारिले उपायें। ऐसी बळ सोय दाखवीत ॥ २६ ॥ जंबूमाळी बागीं तया अधिकार। धांवोनी सत्वर रायापाशीं ॥ २७ ॥ मात ते घेऊनि आला तो धांवूनि। कपीराज वनीं आला एक ॥ २८ ॥ त्यानें सर्व वन पाडिलें उपडोन। कोणाचा तो कोण कळेना हो ॥ २९ ॥ राजा करी आज्ञा धरा बांधा त्याला। मारा वानराला वेगा जारे ॥ ३० ॥ ऐकतांचि वाणी भूपामुखीची हो। उठिले लवलाही राक्षसगण ॥ ३१ ॥ जावोनि वेढिला कपीराज राणा। धनुष्यासी बाणां लावूनियां ॥ ३२ ॥ मारितां बाणासी न लागे कपीसी। तेव्हां युक्ति कैसी आरंभिली ॥ ३३ ॥ करूनि फांसासी धरूं म्हणती त्यासी न ये तो फांसासी आटोपितां ॥ ३४ ॥ धरिती जरी बाही निघोनियां जातां। न चढे तो हातां कवणाच्या ॥ ३४ ॥ थोर जरी फांसा होत तो लहान। जाय तो निघोन फांशांतुनी ॥ ३६ ॥ लहान जरी केला तरी होतो थोर। फांशाचा विचार व्यर्थ करिती ॥ ३७ ॥ ऐशापरी झाले श्रमातुर भारी। कपि तो विचारी कार्य पुढें ॥ ३८ ॥ म्हणून फांशांत पडे तो तेधवां। धरोनी वानरा नेती दूत ॥ ३९ ॥ सन्मुख रावणें देखुनि कपीसी। करी कौतुकासी अपूर्व हो ॥ ४० ॥ कधीं नाहीं ऐसें स्वरूप देखिलें। येणें फार केलें नाशालागीं ॥ ४१ ॥ पुसत तूं कोण कवण कार्यालागीं।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पातलासी वेगीं याच ठायीं॥ ४२॥ वानर म्हणे आलो मूर्खा रावणा रे। रामदूत खरे सीता-शुद्धि॥ ४३॥ ऐकोनि रावण म्हणे यासी जाळा। शेंपूट गुंडाळा अग्नि लावा॥ ४४॥ कपीसी पुसिले मरण कोणे ठायीं। येरू पुच्छ दावी म्हणोनियां॥ ४५॥ समग्र लंकेची आणोनियां वस्त्रें। कपी पुच्छ पुरें न होयची॥ ४६॥ तेव्हां राजधानी आणोनि वेष्टितां। परी तो पुरतां न होयची॥ ४७॥ तेव्हां तेल घाला म्हणे तो रावण। दूत ते धांवोन टाकिताती॥ ४८॥ लावूनि अग्निसी केला मोठा ज्वाळ। वानर तत्काळ उडालाहो॥ ४९॥ लंकेची ते केली सारी तेणें होळी। सहित मंडळी राजघरें॥ ५०॥ भुभुक्कार केला वानर उडाला। लंकेमाजीं झाला प्रळयहो॥ ५१॥ अग्नीचा उबाळा धुरानें दाटला। देखे कपी त्याला सुखरूप॥ ५२॥ मुखासी लागला पाहतांचि डोळां। म्हणोनि तो झाला शामवर्ण॥ ५३॥ येवोनी लवलाही श्रीरामाते पाही। नमूंनि सर्वही सांगितलें॥ ५४॥ तेव्हां नामा म्हणे होतों मी जवळा। चरणकमळां ध्यात तेथें॥ ५५॥

श्रीविठ्ठलमाहात्म्य.

३२१. निर्गुणींचें वैभव आलें भक्तिमिषें। तें हें विठ्ठल वेषें ठसाविलें॥ १॥ बरविया बरवें पाहतां नित्य नवें। हृदयीं ध्यातां निवे त्रिविधताप॥ २॥ चोवीसांवेगळें सहस्त्रांआगळें। निर्गुणा निराळे शुद्धबुद्ध॥ ३॥ वेदां मौन पडे श्रुतीसी कानडे। वर्णितां कुवाडे पुराणांसी॥ ४॥ भावाचें आळुक भुललें भक्तिसुखें। दिधलें पुंडलिके साधूनियां॥ ५॥ नामा म्हणे आम्हां अनाथां लागुनी। निडारलें नयनीं वाट पाहे॥ ६॥

३२२. निर्विकल्प निराकारू। निःशून्य निराधारू। निर्गुण अपरंपारू। चिदानंद सांवळें॥ १॥ तया पुंडलिकासाठीं। येऊनि उभें वाळवंटीं। दोन्ही कर ठेवूनि कटीं। प्रसन्न दृष्टी पाहातसे॥ २॥ म्हणऊनि उठा घ्यारे वाट। ठाका पंढरी वैकुंठ। येर वाउगे काय कष्ट। ब्रह्मी भेट पंढरीये॥ ३॥ मूळग्राम मायापूर। पडिलें भूत ग्रामाचार। म्हणऊनि कर जघनावर। उभा राहुनि दावितसे॥ ४॥ विठ्ठलनाम हृदयीं धरा। हाचि उतार पैलपारा। मग नाहीं येरझारा शंभू कुमार सांगतसे॥ ५॥ भेटी चौघे मुरडले। अठरा धांवतां भागले। पंथी साहि भांडले। ते अद्यापि बुझले नाहीं॥ ६॥ जो सहस्त्रा माजी न दिसे। चोविसांत न भासे। दो सहस्त्र अनारिसे। पाहतां अरे न दिसेचि॥ ७॥ लयलक्ष लावूनि समाधि। योगियां हेचिं उपाधि। उघडा डोळा प्रेमपदी। रे विठोजी न्याहाळा॥ ८॥ येर वाउगि खटपट। ठाका पंढरी वाळूवंट। हरूनि मनुष्यपण दृष्ट। चतुर्भुज करील॥ ९॥ जना ऐहिक पाहारे हित। हें पंढरीचें कुळदैवत। येर वाउगे खेचर भूत। रे संगीत चित्रींचें॥ १०॥ पूर्वज उद्धरावयाचि चाडु। तरी वेणुनादीं जेवण करा गोडु। कोटिकुळें उद्धरती सुरवाडू। तुम्ही रे पावाल कैवल्य॥ ११॥ धन्य धन्य तो संसारी। जेणें देखिली पंढरी। जेणें सप्रेम होऊनि महाद्वारीं। लोटांगण घातलें॥ १२॥ केलें चंद्रभागे स्नान। आणि संतचरणीं दर्शन। नामघोषें निवे मन। समाधान जीवासी॥ १३॥ पंढरी हें वैकुंठ भुवन। म्हणऊनि करी कारे दरूषन। मग नाहीं आवा गमन। रे सुरगण वंदिती॥ १४॥ भुक्ति मुक्तिचा दातारू। तो हा वोळगा सारंगधरु। नामया स्वामीचा दातारू। रुक्मादेवीवरू पंढरिये॥ १५॥

३२३. अनिर्वाच्य ब्रह्म निगम म्हणती। शिणले वेवादती अठरा साही॥ १॥ तें हें पुंडलिके चोहोंटा उभें केलें। भावें भुलविलें पंढरिये॥ २॥ घ्यारे घ्यारे तुम्हीं कैवल्याचें पीक। देतो पुंडलिक सकळ जीवां॥ ३॥ उपनिषदांचे मथितार्थ जें साराचें यथार्थ। तो हा पंढरीनाथ प्रगट जगीं॥ ४॥ हरिहर विरंची त्रिमूर्ती हाची। माऊली दीनांची लाभा पर॥ ५॥ जो श्रवणांचा श्रवण नयनांचा नयन। ज्ञानाचा दर्पण दृष्ट होय॥ ६॥ आदिमध्यें अंतीं व्यापक सर्वांभूतीं। तो हा झाला व्यक्ति भक्तिभावें॥ ७॥ सदा चित्ता आनंदघन परिपूर्ण। कारणें महाकारण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रभा हेचि॥ ८॥ चित्ता चेतवितां बुद्धीतें पाळितां। मनादि चाळितां इंद्रियासी॥ ९॥ तो या चराचरीं जीवलग सोईरा। म्हणोनि अनुसरा पांडुरंगा॥ १०॥ नामा म्हणे काया वाचा मनें त्याचें। नाम जपा कैचें जन्म मरण॥ ११॥

३२४. ज्ञानियांचें ज्ञेय ध्यानियांचें ध्येय। पुंडलिकाचें प्रिय सुखवस्तु॥ १॥ तें हें समचरण उभें विटेवरी। पहा भीमातीरीं विठ्ठल रूप॥ २॥ जें तपस्वियांचें तप जें जपकांचें जाप्य। योगियांचें गौप्य परम धाम॥ ३॥ जें तेजकांचें तेज जें गुरुमंत्राचें गुज। जें पूजकांचें पूज्य कुळदैवत॥ ४॥ जें जीवनातें जीववितें पवनातें निववीतें। जें भक्तांचें उगवितें मायाजाळ॥ ५॥ नामा म्हणे तें सुखची आयतें। जोडलें पुंडलिकातें भाग्य योगें॥ ६॥

३२५. वेदांसी अगोचर परब्रह्म कारण। योगिया हृदयी ते ममत्व निर्वाण। आकळू न कळेचि शेखी धरियेलें मौन। तें रूप पंढरिये विटे समचरण॥ १॥ कानडा विठ्ठलवो उभा भिवरेतीरीं। भक्तांचें आर्तवो जीवा लागलें भारी॥ धृ०॥ भूवैकुंठ पंढरी हे दैवें रचियेली पै गा। शिवें ती वंदियेली विठो सम चरणांची गंगा। सदाचा नामघोषु कलिमल जाय भंगा। काय वानूं सुख तेथिचें भेटलिया पांडुरंगा॥ २॥ विठ्ठल नाम वाचे जना हाचि उपचारू। म्हणवूनि दावी तुझे कटीं ठेवूनियां करूं। येरासी मायानदी काम क्रोध मगरू। ठेवा हा नामयाचा स्वामी विठ्ठल विरू॥ ३॥

३२६. वेडावली वाचा वेदाची बोलतां। देवा पाहूं जातां अनिर्वाच्य॥ १॥ अनिर्वाच्य वाचा बोलावया गेली। जिव्हा हे चिरली भूधराची॥ २॥ भूधराची जिव्हा झालीसे कुंठित। नामा म्हणे अंत नलगे त्याचा॥ ३॥

३२७. हवा हवा म्हणताती श्रुति। परि त्या नेणती भुललीया॥ १॥ तुझिया रूपा नेणती अगा कमळापती। बाळक म्हणती गौळियांचें॥ २॥ विष्णुदास नामयानें दावियेल्या खुणा। पंढरीचा राणा श्रीविठ्ठल॥ ३॥

३२८. जेथें नाहीं कांहीं नाम रूप गुण। बोलती निर्गुण तयालागीं॥ १॥ तोचि गोकुळांत होऊनि गोंवळ। म्हणवितो बाळ यशोदेचा॥ २॥ चिन्मय चिद्रूप अक्षय अपार। परेहूनि पर म्हणती ज्यातें॥ ३॥ सर्वां भूतांचे फुटकाये खोळें। भरलें न गळे आत्मपणें॥ ४॥ आनंदी आनंद मातला अपार। वेदालाहीं पार नाहीं ज्याचा॥ ५॥ नामा म्हणे सर्व रूपें जें रूपस। गोकुळीं विलास मांडियेला॥ ६॥

३२९. पुष्पासी परिमळु दुध घृत मेळु। ऊंस तो रसाळु बीज नाहीं॥ १॥ तैसें परब्रह्म आहे तें निर्वाण। वर्णितां पुराण नपडे ठायीं॥ २॥ दीपाचीही दीप्ति दर्पणाची कांति। तैसी ब्रह्ममति कवण जाणे॥ ३॥ नामा म्हणे जैसें सर्वांघटी आकाश। केशव परमहंस तैसा जाणे॥ ४॥

३३०. निर्गुण सगुण नाहीं ज्या आकार। होऊनि साकार तोचि ठेला॥ १॥ जळीं जळगार दिसे जैसा परी। तैसा निराकारीं साकार हा॥ २॥ सुवर्ण कीं धन धन कीं सुवर्ण। निर्गुण सगुण ययापरी॥ ३॥ ऐसा पूर्णपणें सहजीं सहज। सखा केशिराज प्रगटला॥ ४॥ पांडुरंगी अंगे सर्व झालें जग। निववी सर्वांग नामा म्हणे॥ ५॥

३३१. आपणची कर्ता आपणची मित्र। आपण सर्वत्र हरी झाला॥ १॥ साधन साधितां हरि दिसे पूर्ण। प्रपंच हें भान न देखे डोळां॥ २॥ किमर्थ हें टवाळ मायामोह जाळ। वांयांच पाल्हाळ कोरडे करा॥ ३॥ नामा म्हणे सखोल विठ्ठल पूर्ण बोल। उच्चारितां मोल नलगे कांहीं॥ ४॥

३३२. एक तत्त्व एकाकार सर्व देशी। एक तो नेमेसी सकल जनी॥ १॥ ऐसें ब्रह्म पहा आहे सर्व एक। नलगे विवेक करणें कांहीं॥ २॥ मिथ्या हें डंबर माया मथितार्थ। हरि हाचि स्वार्थ वेगीं करी॥ ३॥ नामा म्हणे समर्थ बोलिला तो वेद। नाहीं भेदाभेद ब्रह्मपणीं॥ ४॥

३३३. ज्ञान सत्य मुक्त शुद्ध बुद्ध युक्त।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कारण रहित निरंजन॥ १ ॥ तें आम्हीं देखिलें चर्मचक्षु दृष्टी। उभा वाळवंटी पंढरीये॥ २ ॥ वेदां अगोचर तयां सहस्त्रमुखा। तें झालें पुंडलिका लोभापर॥ ३ ॥ परतल्या श्रुती म्हणति नेती नेती। आम्हां गातां गीतीं सांपडलें॥ ४॥ स्वरूपाचा निर्धार बोलती पुराणें। शिणली दरूशनें वेवादती॥ ५॥ नामा म्हणे यासी भावची कारण। पावावया चरण केशवाचे॥ ६॥

३३४. ब्रह्मी ब्रह्म एक मुळीं नाहीं जग। सर्व माया योग कल्प जाणा॥ १ ॥ स्थावर जंगम सर्व मायोपाधि। जाणपां त्रिशुद्धि आत्मज्ञानें॥ २ ॥ रवीच्या कीरणें जैसें मृगनीर। तैसें ब्रह्मी कीर विश्व झालें॥ ३ ॥ नामा म्हणे वाचा ऐका निज खूण। स्वरूपीं तल्लिन होऊनि राहे॥ ४॥

३३५. वंदावें तें काय निंदावें तें काय। सर्वांठायीं पाहे कोंदाटलें॥ १ ॥ आहे कवणा ठायीं नाहीं कवणा ठायीं। ठायींच्या पैं ठायीं कोंदाटलें॥ २ ॥ रविरश्मीचें तेज सर्वांठायीं असे। त्या परि अनायासे बुजतु जाय॥ ३ ॥ भाव तेंचि ब्रह्म ब्रह्म तेंचि कर्म। जाणोनियां वर्म म्हणे नामा॥ ४॥

३३६. हात पाय सर्व मिळोनियां मेळा। चला पाहूं डोळां म्हणतातो॥ १ ॥ देखणें तें नव्हें देखतील कैसें। देखण्याची असे सर्व डोळां॥ २ ॥ चंचुभुत अंश अशांत मिळाली। निर्गुणाची खोली देव जाणे॥ ३ ॥ नामा म्हणे तेव्हां तुज पाहों आला। पाहोनि तो ठेला सर्वांभूतीं॥ ४॥

३३७. देख देख देख पैल पैल। पैल उभा असे विटेवरी॥ १ ॥ खोळे बुंथीचा आकारु झळके पीतांबरु। सौभाग्य सुंदरू विठ्ठल देव॥ २ ॥ दान दीक्षा गुरू नामया दातारू। धरावया नागरू केशिराज॥ ३ ॥

३३८. काष्ठी अग्नी असे प्रगटे नयनीं। काष्ठांही असोनि वेगळाची॥ १ ॥ तैसें निर्धारितां जैसे पैं सकळां। दावितां निराळा पांडुरंग॥ २ ॥ तरु बीजीं जैसें सर्व व्यापक असे। जळाविण नसे फळ पहा कीं॥ ३ ॥ नामा म्हणे बीज नासिलें तें भोग। तूंचि पांडुरंग आम्हांसाठीं॥ ४॥

३३९. वैकुंठीं पाहें तंव चतुर्भुज दिसे। परि सुंदर रूप तेथें नाहीं॥ १ ॥ क्षीरसागरीं पाहें तो तेथें निद्रिस्त। परि सुंदर रूप तेथें नाहीं॥ २ ॥ द्वारकें पाहें तव पाताळीं चरण। परि सुंदर रूप तेथें नाहीं॥ ३ ॥ हृदयीं तव अव्यक्तची दिसें। परि सुंदर रूप तेथें नाहीं॥ ४॥ नामा म्हणे ऐसा सर्व गुण संपूर्ण। पंढरिये उभा शोभतसे॥ ५॥

३४०. निर्गुण सगुण नव्हे ते समान। तैसें तेहि जाण योगाभ्यासी॥ १ ॥ प्रल्हादासी हरी शंख चक्र गदा। सगुण गोविंदा शोभतसे॥ २ ॥ अर्जुनासी देव उभा पाचारासी। सखा उद्धवासी साक्ष दावी॥ ३ ॥ नामा म्हणे माझा केशिराज भोळा। दाविसी गोपाळा बाललीला॥ ४॥

३४१. अमराचें ठेवणें विश्वाचें जीवन। सौभाग्य लावण्य रखुमाईचें॥ १ ॥ धन्य गौळिया जीणें कृष्ण बाळपण। यशोदा नंदन क्रीडा करी॥ २ ॥ अंगें स्थूलपणें ब्रह्म खेळा येणें। लीला सामावणें रोमरंध्रीं॥ ३ ॥ विष्णुदास नामा दैवेंचि लाहाणें। ज्या घरीं खेळणें परब्रह्म॥ ४॥

३४२. धन्य गोकुळ महींतळीं मंडळ। सुखावलें ब्रह्म जेथें झालें सगुण॥ १ ॥ काय न कळे आवडी त्याचा भाव। सुख नेले रे गोवळीं म्हणती देव॥ २ ॥ आलें वैकुंठभुवनी विकृति। ते हे पाहवी गौळियांची विश्रांती॥ ३ ॥ योगियांचें ध्यानीं उगवलें। तया गौळियांचे अनुरागीं रंगलें॥ ४॥ वेद श्रुतीसी पारू न कळे। कोण सुख सर्वांहूनि आगळें॥ ५ ॥ नामया स्वामी आमुचें कुलदैवत। शरण जाऊनि गौळिया मागु उच्छिष्ट॥ ६ ॥

३४३. डोलत डोलत टमकत चाले। गोजिरीं पाऊलें टाकूनिया॥ १ ॥ पायीं रुणझुण वाजताती वाळे। गोपी पाहताती डोळे मन निवे॥ २ ॥ सांवळें सगुण मानस मोहन। गोपी रंजवण नामा म्हणे॥ ३ ॥

३४४. उपाधि निर्मळ शोभती चरण। नादबिंदु

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पूर्ण मध्यभागीं॥ १॥ कदंबावरती चढे वनमाळी। शोभती निढळा ऊर्ध्वपुंड॥ २॥ श्रवणीं कुंडलें शोभती नक्षत्र। श्रीमुख पवित्र दिसो येत॥ ३॥ नामा म्हणे मज ढापवेना डोळे। करुणा कल्लोळे देखूनियां॥ ४॥

३४५. यमुने पाबळी देखियेली मूर्ति। तळपती दिसी तेजोमय॥ १॥ सांवळें सुंदर ओंकार वर्तुळ। मध्यें घननीळ पाचारितो॥ २॥ सुरंग ओतली प्रेमतनु छाया। तेणें तुझी माया काय वाणूं॥ ३॥ नामा म्हणे विठो चातुर्य करुणा। गुणागुणीं किरणा प्रभा भासे॥ ४॥

३४६. विटेवरी समचरण सुंदर। बाळ सुकुमार यशोदेचे॥ १॥ वाळे वांकी गर्जे तोडर चरणीं। नाद झणझणी वाजताती॥ २॥ कांसे कसियेला पीत पीतांबर। लोपे झणकर तेणें प्रभा॥ ३॥ नामा म्हणे नाही तुझ्या रूपा पार। तेथें मी किंकर काय वानू॥ ४॥

३४७. कमळगर्भा मनीं थोर चिंता करी। पद्म ठसेवरी उमटताती॥ १॥ नीलोत्पल जैसें चरण वानूं कैसें। सुकुमार राजस विठ्ठलाचे॥ २॥ लावण्यसागरु रूप पाहों ठेली। दृष्टी पैं खुंटली रुक्मिणीची॥ ३॥ नामा म्हणे विठोचे चरण सुकुमार। तेथें वाहे धार गंगादेवी॥ ४॥

३४८. काळा गे दादुला पाहतां आकळू। तो झाला गोवळू नंदाचा॥ १॥ काळागे दादुला काळागे दादुला। पंढरी पहा चला विठ्ठलगे॥ २॥ काळा म्हणोनी पाहों गेलों जवळां। सुनीळु सांवळा दिसतसे॥ ३॥ नामा म्हणे सर्व भक्षितो हा काळु। भक्तांचा कृपाळु श्रीविठ्ठल॥ ४॥

३४९. सहस्त्रदळांत आकाशाच्या परी। राहोनी शरीरीं शोभा दावी॥ १॥ तेंचि नटे थाटे उभा विटेवरी। कर कटावरी ठेऊनियां॥ २॥ जयाचिये नाभीं जन्मला विधाता। तेथोनी वाढता लोक झाला॥ ३॥ श्रुतीचिये वाचे नोहे गोचर। जेथें अवतार तिही देवा॥ ४॥ नामा म्हणे विश्वंभरू आणिक। अंगुळ दशक आहे जें कां॥ ५॥

३५०. परब्रह्ममूर्ति सांवळे सगुण। पंढरी निधान वाळुवंटी॥ १॥ आनंद अमृत वोळला दरुशनें। तुटेल बंधन हेळामात्रें॥ २॥ नामा म्हणे नको नामीं सदा मन। उभा नारायण भेटी पुरे॥ ३॥

३५१. कस्तुरी कुंकुम रेखे लाल टिळा। केशराची उटि सर्वांगासी॥ १॥ पाहिला पाहिला माझा पांडुरंग। जीवीं जिवलग डोळे भरी॥ २॥ हार शोभे गळां मंजुरीचा तुरा। कर्ण रत्नफळा झळाळित॥ ३॥ विटेवरी नीट गोमटीं पाउलें। त्यांवरी ठेविलें मस्तक म्यां॥ ४॥ नामयाची धणी भुकेली ते धाली। आनंद दिवाळी आजि झाली॥ ५॥

३५२. सुखाचें हें सुख श्रीहरि मुख। पाहतांही भूक ताहान गेली॥ १॥ भेटली भेटली विठाई माउली। वासना निवाली जिवांतील॥ २॥ चंद्रासी चकोर मेघासी मयूर। वाटे तैसा भर आनंदाचा॥ ३॥ नामा म्हणे पाप ताप आणि दुःख। गेले झालें सुख बोलवेना॥ ४॥

३५३. माझ्या मनें तुझ्या चरणीं दिली बुडीं। इन्द्रियें बापुडीं वेडावलीं॥ १॥ आतां विषयसुख जाणावें हें कोणें। जाणोनी भोगणें कोणें स्वामी॥ २॥ देह सहज स्थिति राहिलें निष्काम। हृदयीं सदा प्रेम वोसंडत॥ ३॥ नामा म्हणे केशवा कृपेच्या सागरा। तूं आम्हां सोयरा आदि अंती॥ ४॥

३५४. शांति भीमातीरीं भक्ति पंढरपुरीं। प्रेम विटेवरी देखियलें॥ १॥ देखिला गे माय देखिला गे माय। देखिला गे माय पंढरीये॥ २॥ नामा रूपातीत नित्य सदोदित। जेथें विरे चित्त योगियांचें॥ ३॥ दुरी ना जवळी त्रिपुटीं वेगळा। केशव भेटला नामा म्हणे॥ ४॥

३५५. योगियांचें ब्रह्म शून्य व्योमाकार। आमुचें साकार विटेवरी॥ १॥ दादुगें नागर कटीं ठेऊनि कर। सर्वस्वें उदार भक्तांलागीं॥ २॥ ज्ञानीया सिद्धांती लक्षापरी नये। आमुची वाट पाहे अनाथाचा॥ ३॥ पुंडलिका भावा वोळलें वोरसें। नेणों काय कैसें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रेम त्याचें॥ ४॥ जाप्यकाचें जाप्य नाम मंत्रमय। आमुचें भक्तीप्रिय संसारीं कां॥ ५॥ नामा म्हणे जीवें करीन ओंवाळणी। क्षणीं चक्रपाणि दिठावसी॥ ६॥

३५६. श्रीमुख साजिरे कुंडलें गोमटीं तेथें माझी दृष्टी बैसलीसे॥ १॥ कटीवरी कर समचरण साजिरे। देखावया झुरे माझें मन॥ २॥ माहेरीची आस दसरा दिवाळी। बाहे ठेवीं निढळी वाट पाहे॥ ३॥ बंदिजन नामा उभा महाद्वारीं। कीर्ति चराचरीं वर्णितसे॥ ४॥

३५७. चाळक माझें मन पांगुळ पैं झालें। साक्षात्कारें मन हारपोनी गेलें॥ १॥ मन हारपलें करुं आतां काय। पहावया गेलें तंव परतोनी कांहीं नये॥ २॥ भक्ति ज्ञान वैराग्य नोहे। अवघेंचि आहे अवघें तो आहे॥ ३॥ नामा म्हणे जनाबाई आहे वो कैसा। बाबा उदकीं घट बुडोनी ठेला जैसा॥ ४॥

३५८. केशवाच्या नामीं लागलेसें ध्यान। देखिल्या नयन तदाकार॥ १॥ जया तया म्हणे माझा चक्रपाणि। जाय लोटांगणीं सर्व भावें॥ २॥ प्रेम वोथरत नामाचेनि छंदें। हृदय प्रेमानंदें वोसंडत॥ ३॥ धांवूनि येऊनि चरणांजवळीं। वंदी पायधुळी सर्वभावें॥ ४॥ घनःश्याम मूर्ति सुंदर सांवळी। ध्यान हृदयकमळीं नित्य राहे॥ ५॥ भाग्यवंत नामा भक्तां शिरोमणी। अखंड उन्मनी भोगितसे॥ ६॥

३५९. वेणू वाहुनि चित्त दुहिलें। रूप देऊनि मज मनें मोहियलें॥ १॥ वेधु वेधकू गोपाळ लाघवी। जीवा लावियली आवडी नित्य नवी॥ २॥ दृष्टीपुढें माझें ध्यान ठेवियेलें। वृत्तिसहित मन तेथें माझें गोविलें॥ ३॥ शुद्ध शामकमळदळ लोचनु। पावा वाजवितसे देहुडा रुणझुणु॥ ४॥ तया प्रभा दिसती दिशा निर्मळ। कृष्ण पाहतां मन झालें व्याकुळ॥ ५॥ नामया स्वामीचें अनुपम्य रूपडें। पाहतां मन फिरलें माघारें॥ ६॥

३६०. शाममूर्ति डोळस सुंदर सांवळी। तें ध्यान हृदयकमळीं धरूनि ठेला॥ १॥ सकळ स्थिति सुखाचा अनुभव झाला। सकळ विसरला देहभाव॥ २॥ पांगुळलें मन स्वरूपीं गुंतलें। बोलणें खुंटलें प्रपंचाचें॥ ३॥ सबाह्याभ्यंतरीं स्वरूप कोंदलें। द्वैत निसरलें चंद्राकारें॥ ४॥ निजरूप निर्धारितां नयन सोज्वळ झाले। रोमांच दाटलें रवरवीत॥ ५॥ नामामृताचा घन वोळला अंबरीं। वर्षाव सहस्त्रधारीं होत असे॥ ६॥ तें क्षीर सेवितां समाधान। चुकले जन्ममरण कल्पकोडी॥ ७॥ सहस्त्र सुखें निवाला भवदुःख विसरला। विसांवा भेटला पांडुरंगा॥ ८॥ नामा म्हणे देवादृष्टीं लागो झणी। पुंडलिका धर्में करूनि जोडिलासी॥ ९॥

३६१. जीव विठ्ठल आत्मा विठ्ठल। परमात्मा विठ्ठल विठ्ठल॥ १॥ जनक विठ्ठल जननी विठ्ठल। सोयरा विठ्ठल सांगाती॥ २॥ अहिक्य विठ्ठल परत्र विठ्ठल। निरंतर विठ्ठल तारिता॥ ३॥ नाम विठ्ठल रूप विठ्ठल। पतित पावन विठ्ठल विठ्ठल नामा॥ ४॥

३६२. तीर्थ विठ्ठल क्षेत्र विठ्ठल। देव विठ्ठल देवपूजा विठ्ठल॥ १॥ माता विठ्ठल पिता विठ्ठल। बंधु विठ्ठल गोत्र विठ्ठल॥ २॥ गुरु विठ्ठल गुरुदेवता विठ्ठल। निधान विठ्ठल निरंतर विठ्ठल॥ ३॥ नामा म्हणे मज विठ्ठल सांपडला। म्हणोनि कळिकाळां पाड नाहीं॥ ४॥

३६३. मातापिता बंधु भगिनी इष्टमित्र विठ्ठला तूंरे॥ धृ०॥ बापा यावें भेटावें विसावा माझा गा तूं। माझा कुळाचार माहेर रे जिव्हार विठ्ठला तूं॥ १॥ माझें विद्याधन आयुष्य आरोग्यता विठ्ठला तूं गा। माझें तप व्रत तीर्थ दान पुण्य बिठोवा तूं गा॥ २॥ माझा गुरुमंत्र दैवत आगम निगम विठ्ठला तूं गा। भूपति सुरपति ब्रह्ममूर्ति विठोबा तूं गा॥ ३॥ माझा आचार विचार सत्यवाद धीर धर्म विठोबा तूं गा। यश कीर्ति निवृत्ति आतां माझी तृप्ति विठोबा तूं गा॥ ४॥ माझे यम नियम प्राणायाम प्रत्याहार विठोबा तूं गा। नामा म्हणे विठोबा केशव परमात्मा माझा तूं गा॥ ५॥

३६४. बरवेपण बरवा बाप मदनाचा। तो

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्वामि आमुचा पंढरिराव॥ १॥ उदारपणें उदार दाता त्रैलोक्याचा। तो स्वामि आमुचा पंढरिराव॥ २॥ झुंजार आणि शूर अरी त्या दैत्यांचा। तो स्वामि आमुचा पंढरिराव॥ ३॥ चतुरपणें चतुर बाप ब्रह्मयाचा। तो स्वामि आमुचा पंढरिराव॥ ४॥ पवित्रपणें पवित्र उद्धार तीर्थाचा। तो स्वामि आमुचा पंढरिराव॥ ५॥ नामा म्हणे आधार सकळां जीवांचा। तो स्वामि आमुचा पंढरिराव॥ ६॥

३६५. विटेवरी उभा दीनांचा कैवारी। भेटाया उभारी दोन्ही बाह्या॥ १॥ गुण दोष त्याचे न पाहेचि डोळां। भेटे वेळोवेळां केशिराज॥ २॥ ऐसा दयावंत घेत समाचार। लहान आणि थोर सांभाळितो॥ ३॥ सर्वांलागीं देतो समान दरुषन। उभा तो आपण सम पायीं॥ ४॥ नामा म्हणे तया संतांची आवडी। भेटावया कडाडी उभाची असे॥ ५॥

३६६. दीनाची माउली। आजि म्यां देखिली॥ १॥ कटी ठेऊनियां कर। उभी राहे विटेवर॥ २॥ मुगुट रत्नांचा साजिरा। वरी मोतियांचा तुरा॥ ३॥ रूप लावण्य गोजिरें। हृदयीं पदक साजिरें॥ ४॥ कांसे पिवळा पीतांबर। चरणीं ब्रिदाचा तोडर॥ ५॥ भक्तां कृपेची सावली। नामा वंदी पायधुळी॥ ६॥

३६७. आषाढी कार्तिकी हेचि आम्हां सुगी। शोभा पांडुरंगीं घनवटे॥ १॥ संतांचीं दर्शनें हेंचि पीक जाण। देतां आलिंगन देह निवे॥ २॥ देह निवे किती नवल सांगावें। जीवासी दुणावे ब्रह्मानंद॥ ३॥ नामा म्हणे यासी मूळ पांडुरंग। त्याचेनि अव्यंग सुख आम्हां॥ ४॥

३६८. आवडे जें जीवा तें पंढरीये उभें। पुंडलिकें लोभें राहविलें॥ १॥ जोडूनि पाऊलें ठेवियलीं विटे। करद्वय गोमटें कटावरी॥ २॥ कान मुख डोळे न म्हणती पुरे। सेवितां न पुरे धणीं मना॥ ३॥ गोड लागे पोट न भरे न धाय। भुकेलीच राहे भूक सदा॥ ४॥ नामा म्हणे संतसंगती विश्वास। घेऊं अनुभवास फार फार॥ ५॥

३६९. जयालागीं हृदय उले। तें म्यां जीवेंसि धरिलें॥ १॥ विठ्ठलाचीं पाऊलें। म्यां मस्तकीं वाहिलीं॥ २॥ नामा म्हणे मुनि रंगलें। तें म्यां जीवेंसि धरिलें॥ ३॥

३७०. आमुचा विठ्ठल प्रचंड। इतरा देवांचें न पाहूं तोंड॥ १॥ एका विठ्ठलावांचुन। न करूं आणिक भजन॥ २॥ आम्हां एकविध भाव। कदा न म्हणूं इतरां देव॥ ३॥ नित्य करूं हा अभ्यास। म्हणे नामा विष्णुदास॥ ४॥

३७१. भजू एका विठोबास। आणिक न करूं अभ्यास॥ १॥ येथें साधन आहे एक। पाहों विठोबाचें मुख॥ २॥ वर्णूं हरीचे पवाडे। काळ लावूं देशधडे॥ ३॥ नामा विष्णुदास म्हणे। ऐसें करूं हरी कीर्तन॥ ४॥

३७२. जीवप्राणें एक विठ्ठलची व्हावा। ऐसिया मी भावा रातलिया॥ १॥ आवडे पंढरी आवडे चंद्रभागा। येती यमुना गंगा प्रतिदिनी॥ २॥ आवडे पद्मतीर्थ आवडे गरुडपार। राउळीं माहेर पांडुरंग॥ ३॥ नामा म्हणे अहा विठाई रुक्माई। आणिकांपाशी नाहीं चित्त माझें॥ ४॥

३७३ न पाहें गे माय विठाईविण डोळां। सर्वस्वें कंटाळा आणिकांचा॥ १॥ विठोबाविण कांहीं नायकें मी कानीं। जडली चरणीं चित्तवृत्ती॥ २॥ आणिकांचे मार्गी न चालोत पाय। जीव वोढे सयें पांडुरंग॥ ३॥ नामा म्हणे करीं आणिकांची पूजा। न करीं गरुडध्वजा वांचूनियां॥ ४॥

३७४. विठ्ठल कानडे बोलू जाणे। त्याची भाषा पुंडलिक नेणें॥ १॥ युगें अठ्ठावीस झालीं। दोघां नाहीं बोलाबोली॥ २॥ कर ठेवूनि कटावरीं। उभा भिंवरेच्या तिरीं॥ ३॥ नामा म्हणे स्वामी माझा। उभा भक्तांचिया काजा॥ ४॥

३७५. मान तोडावया कर शस्त्रांचे। कठिण बहुतांचें उभारिले॥ १॥ तरी न वदे न वदे आन। आन कांहीं या विठोबावांचून॥ २॥ विठोबा परते

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दैवत आहे म्हणती। ऐसें श्रुती स्मृती जरी बोलती॥ ३॥ तरी ते अपशब्द कानीं पडो न द्यावें। पाखांडी म्हणती जरी उगेंचि असावें॥ ४॥ ब्रह्म देवेसी जालिया भेटी। तोहि जरी वदेल ऐसिया गोष्टी॥ ५॥ या विठोबापरतें दैवत म्हणेल सृष्टी। चळला पोटीं निभ्रांत जाणा॥ ६॥ कोटी कोटी ब्रह्मांडे एक एक रोमीं। व्यापूनियां व्योमी वर्ततसे॥ ७॥ तो हा माझा विठोबा सर्वांघटी सम। न सांडावें वर्म म्हणे नामा॥ ८॥

३७६. बांधिलें राहीना वैरलें खाईना। दवडिलें जाईना जाणते हो॥ १॥ तया खुंटा नांदावें सौरसें बांधावें। कशानें करावें वोढाळे वो॥ २॥ तया नेत्र वा पाय तिन्हीं एक पाहे। न देखावें ते ठाय देखताहे॥ ३॥ नामा म्हणे श्रोता विचारावें ज्ञानी। केशवाचे नयनीं उतरला॥ ४॥

३७७. ध्यान धारणा न लगे टाळी। विठो पाहावा उघडें डोळीं॥ १॥ विठो समाधीचें सुख। पाहतां हरे तहानभूक॥ २॥ नामा म्हणे न करीं कांहीं। चित्त रंगलें हरीचें पायीं॥ ३॥

३७८. येतियां पूसें जातियां धाडी निरोप। पंढरपुरीं आहे माझा मायबाप॥ १॥ येई विठाबाई आई माउलीये। निढळावरी कर ठेऊनि पालवीये॥ २॥ पिंवळा पितांबर गगनीं झळकला। गरुडावरीं बैसोनि माझा कैवारी आला॥ ३॥ डोळ्यातील बाहुली माझी विठाई झालीं। घनानंद मूर्ति माझ्या ध्यानासी आली॥ ४॥ विठोबाचें राज्य आम्हां नित्य दिवाळी। विष्णुदास नामा जीवेंभावें ओंवाळीं॥ ५॥

३७९. विठ्ठलेंविण जया न जमे एक घडी। सर्वस्व आवडी विठ्ठलाची॥ १॥ विठ्ठलचि माता विठ्ठलचि पिता। भगिनी आणि भ्राता विठ्ठलचि॥ २॥ विठ्ठलचि क्रिया विठ्ठलचि कर्म। विठ्ठल सकळ धर्म कुळदैवत॥ ३॥ गुज गौप्य जीवीचें विठ्ठला सांगावें। विठ्ठलें पुरवावें कोड त्याचें॥ ४॥ सर्वकाळ करणें विठ्ठलाची कथा। विठ्ठल जडला चित्ता जयाचियां॥ ५॥ विठ्ठल जागृती स्वप्न आणि सुषुप्ति। अखंड वदती विठ्ठल विठ्ठल॥ ६॥ ऐसे सर्वस्वेसी विठ्ठल भजतां। सुख आलें हातीं विठ्ठलाचें॥ ७॥ नामा म्हणे त्याचें चरणरज होऊन। जाहलोंसें पावन म्हणे आतां॥ ८॥

३८०. विठ्ठल विसावां सकळिका। विठ्ठल आधार तिही लोकां। विठ्ठल नकळे ब्रह्मादिकां। विठ्ठल देखा पंढरीये॥ १॥ विठ्ठल डोळस सांवळा। विठ्ठल पाहाती अबलाबाळा। विठ्ठल ध्यावा वेळोवेळां। विठ्ठल कमलावल्लभ॥ २॥ विठ्ठल धरारे मनासी। विठ्ठल सोडविल अहर्निशीं। विठ्ठलावीण मुक्ती कैची। कुंटणी गणिकेसी उद्धरिलें॥ ३॥ विठ्ठल उभा भिमा तिरीं। कर ठेवूनि कटावरी। विठ्ठल भक्तकाज कैवारी। विठ्ठल हरी महादोष॥ ४॥ विठ्ठल अनाथ कोंवसा। विठ्ठल नुपेक्षी भरंवसा। विठ्ठलेंविण शून्य दाही दिशा। विठ्ठलाविण नाहीं हे अनेक॥ ५॥ श्रीविठ्ठल धन्य दिवस। श्रीविठ्ठल भक्तीरस। श्रीविठ्ठल परम पुरुष। विष्णुदास म्हणे नामा॥ ६॥

३८१. दोन्हीं हात ठेवोनि कटा। उभा भिंवरेच्या तटा॥ १॥ हरि बरवया बरवया। विठोबा पंढरीच्या राया॥ २॥ नामा म्हणे वेगी धांवा। देव आले याची गांवा॥ ३॥

३८२. अवघें तीर्थ तीर्थरूप। परि तें विठ्ठल चरणींचें स्वरूप। विठ्ठल देखिलिया निःपाप। जीव जंतू होताती॥ १॥ एवढें क्षेत्र पांडुरंग। सर्वा तीर्थांमाजी अभंग। धरिलिया संतसंग। महादोष हरताती॥ २॥ हरि कीर्तन करीं वेगी। हेंचि उद्धरील जगालागीं। जें जें सरलें पांडुरंगीं। तें तें गेलें वैकुंठा॥ ३॥ नामा जपे सदा काळीं। रामकृष्ण नामावळीं। विठ्ठल विठ्ठल हृदयकमळीं। जपतसे सर्वदा॥ ४॥

३८३. केशव आराध्य देवाचाहि देव। पंढरीचा राव पांडुरंग॥ १॥ पांडुरंगाविण नाहीं त्रिभुवनीं। भोळ्या चक्रपाणी वांचूनियां॥ २॥ नामा म्हणे ध्यानीं ध्यावें विठोबासी। अखंड मानसी भजा देवा॥ ३॥

३८४. अनंत म्हणती माझिया स्वामीतें। अनंत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गुण त्यांते म्हणोनियां ॥ १ ॥ पतित पावन म्हणती माझिया स्वामीतें। उद्धरी पतितातें म्हणोनियां ॥ २ ॥ विश्वंभर म्हणती माझिया स्वामीतें। पोशितो विश्वातें म्हणोनियां ॥ ३ ॥ जगजीवन म्हणती माझिया स्वामीतें। जीवन जगातें म्हणोनियां ॥ ४ ॥ हृषिकेश म्हणती माझिया स्वामीतें। चाळी इंद्रियांते म्हणोनियां ॥ ५ ॥ नामा म्हणे केशव म्हणती स्वामीतें। नासितो क्लेशातें म्हणोनियां ॥ ६ ॥

३८५. संपूर्ण विश्वाचा आत्म्याचा जो निज आत्मा। तोचि हा परमात्मा विटेवरी ॥ १ ॥ द्वादश लिंगाचे जे कां आत्मलिंग। ते हें पांडुरंग विटेवरी ॥ २ ॥ अनंत सूर्याची ज्योतीची निजज्योती। तीहि उभीं मूर्ति विटेवरी ॥ ३ ॥ अनंत शक्तीची जी निजशक्ति। ती ही उभीं मूर्ति विटेवरी ॥ ४ ॥ अनंत ब्रह्माचें जे कां निजब्रह्म। तें हें परब्रह्म विटेवरी ॥ ५ ॥ अवघ्या चैतन्याचें जे कां निजचैतन्य। तें हें समाधान विटेवरी ॥ ६ ॥ अनंत विराटाचें स्वरुपाचे निजरूप। तें हें चिद्रूप विटेवरी ॥ ७ ॥ अनंत वेदांचा अर्थाचा निज अर्थ। तोचि महा सिद्धांत विटेवरी ॥ ८ ॥ अनंत शास्त्रांचें पुराणांचें सार। त्याचेहि जिव्हार विटेवरी ॥ ९ ॥ अनंत सिद्धींची जी कां निज सिद्धी। ते हे महासिद्धी विटेवरी ॥ १० ॥ चहुंवाचेनि जी निज वाचा। ते हे अनिर्वाच्य विटेवरी ॥ ११ ॥ भक्तीची निज भक्ति मुक्तिची निजमुक्ति। शांतीची निज शांती विटेवरी ॥ १२ ॥ क्रोधाचा महाक्रोध बोधाचा महा बोध। शुद्धाचाहि शुद्ध विटेवरी ॥ १३ ॥ काळाचा महाकाळ वेळेची महावेळ। फळाचें महा फळ विटेवरी ॥ १४ ॥ अनंत पिंडाचें ब्रह्मांड सहीत। सांठवण सत्य विटेवरी ॥ १५ ॥ अनंत सत्वाचे जें कां निज सत्व। तत्त्वाचें निज तत्त्व विटेवरी ॥ १६ ॥ सर्व संबंधाचा जो कां निज संबंध। आनंदाचा कंद विटेवरी ॥ १७ ॥ नामा म्हणे सर्व सुखाचा आराम। धामा परम धाम विटेवरी ॥ १८ ॥

३८६. अहो त्रिभुवना माझारीं। भूवैकुंठ पंढरी। चंद्रभागा सरोवरीं। विटेवरी नीट उभा ॥ १ ॥ उभा कैवल्य नायक। दृष्टी सन्मुख पुंडलीक। ज्याचे ब्रह्मादिक सेवक। इतरां कोण पाड ॥ २ ॥ सुरंग रंगे चरणतळें। रातलीं रातोत्पळें। जिंकिली माणिक निळें। मज पाहतां बाई ॥ ३ ॥ पद अंकुश पताका। ध्वज वज्रांकित रेखा। तेथें लक्ष्मी रतली देखा। सिंधुतनया बाई ॥ ४ ॥ अनुपम्य गे माय अनुपम्य सार। परब्रह्म वो साकार। मंत्रमय त्रिअक्षर। विठ्ठलनाम बाई ॥ ५ ॥ तें गा प्रत्यक्ष ध्यान। सर्व सुखाचें निधान। दृष्टी पाहतांचि मन। माझे परतेना ॥ ६ ॥ न लागे पातयासी पातें। लक्ष लागलें निरुतें। सुख झालें बा मनातें। तें मी काय सांगों वो माय ॥ ७ ॥ मन इंद्रियें वेधलीं। घर वृत्तीचे रिघालीं। काय स्वानंदा मुकलीं। वेगळेपणें ॥ ८ ॥ पदद्वयाची ठेवणी। इंद्रनीळ गुल्फमणी। गंगा मिरवत चरणीं। वांकी तोडर पायीं ॥ ९ ॥ सरळ अंगोळियावरी। नखे वर्तुळ साजिरीं। चंद्र देखोनि अंबरी। झाला कळाहीन ॥ १० ॥ पोटरिया जानु जंघ। मर्गज मणीचे ते स्तंभ। कैसें वोळलें स्वयंभ। ओघ जैसें कालिंदीचे ॥ ११ ॥ पितांबर माळ गांठीं। रत्नकिळा वरवंटी। विद्युलतेच्या थाटीं। जैशा मेघमंडळीं ॥ १२ ॥ वीरकंकणें मनगटीं। कांडोवांडी मुद्रिका दाटी। माज सामावे जो मुठीं। वरी कटी कटिसूत्र ॥ १३ ॥ नाभीं सरोज गहन। ब्रह्मयाचें जन्मस्थान। वरी त्रिवळी लक्षण। कैसें शोभे रोमराजीं ॥ १४ ॥ काय वाणूं तें उदर। सांठवलें चराचर। ब्रह्मगाळा निरंतर। जया रोमरंध्री ॥ १५ ॥ तनु मृदु शाम निर्मळ। प्रभा दिसती सोज्वळ। जेवीं ओळेलेंसे जळ। जैसें धनमंडळीं ॥ १६ ॥ शुद्ध चंदन पातळ। आंगीं चर्चिला निर्मळ जेवीं इंद्रनील किळ। गुल्फ मोतियांचे ॥ १७ ॥ पदक बाहुभूषणें। नवरत्नांचें खेंवणें। कैसें सर्वां झालेंपणें। लेणें लेणियासी ॥ १८ ॥ कौस्तुभ मिरवे कंठीं। माजी रत्नांचिये दाटी तेथें सुरवरांच्या दृष्टी। भाळलिया ॥ १९ ॥ श्रवणीं कुंडलें झळकती। जैशा विजुवा तळपती। कंठीं माळ वैजयंती। सह तुळसीदळेसी ॥ २० ॥ विशाल नयन दृष्टी। ठेऊनियां नासापुटीं। दावी योग कसवटी।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

योगियांसी गे माये॥ २१॥ लिंग स्वयंभू शीर स्थळीं। रश्मी मुकुट झळाळी। वेटी मोर पिसातळीं। मृग नाभी तिळक॥ २२॥ स्मित अधर सुरेख। कैसे निमासुर मुख। तेथें मदन पर्यंक। कोटी कुरवंड्या॥ २३॥ विष्णुदास नामा जिवें। ओंवाळी सर्व भावें। अनुभव अनुभवें। अनुभविजे सदा॥ २४॥

श्रीविठ्ठल-पुंडलिक संवाद

३८७. पितयाची भक्ति पुंडलिकें केली। मात हे ऐकिली देवरायें॥ १॥ नवलक्ष गोधनें पांचसें सवंगडे। रामकृष्ण पुढें चालताती॥ २॥ उठा चला जावो पुंडलिक पाहो। देव म्हणे भावो पाहो त्याचा॥ ३॥ गोकुळिंहुनि देव पंढरपुरा पातला। त्वरित पावला वेणूनादीं॥ ४॥ तेथुनि परतला वाळवंटीं आला। तंव देव देखिला पुंडलिकें॥ ५॥ देव उभा आहे पुंडलिक पाहे। चतुर्भुज स्वयें देखियेला॥ ६॥ देखियेला हरी शंख चक्र करीं। आयुधें तीं चारीं झळकती॥ ७॥ चतुर्भूज मूर्ती देखियेली दृष्टी। पुंडलिकें इट टाकियेली॥ ८॥ इटेवरी उभा राहिला विठ्ठल। ठसा मिरवला त्रिभुवनीं॥ ९॥ पुंडलिक भाव पाहूं आला देव। प्रसन्न झाले सर्व पुंडलिका॥ १०॥ वैकुंठ कैलास आणिक हा येथें। नामा म्हणे हित झालें आम्हां॥ ११॥

३८८. पुंडलीकालागुनी म्हणे पांडुरंग। सखा जीवलग तूंचि माझा॥ १॥ न पाहासी वास बोलसी उदास। सांडोनियां आस सर्वस्वाची॥ २॥ वैकुंठ सोडोनी आलों तुजपाशीं। कां गा न बोलसी भक्तराया॥ ३॥ पितृभजनाचा झालासी अधिकारी। केली बा पायरी वैकुंठासी॥ ४॥ माग बापा कांहीं आवडे तें घेई। मज वाटतें हृदयीं घालावाची। नामा म्हणे देवा स्वामि मुगुटमणी। उभा कर ठेवुनी कटीवरी॥ ६॥

३८९. एक वेळ भेटीं आलों भक्तराया। स्फुरती माझ्या बाह्या क्षेमालागीं॥ १॥ ऊठ पुंडलीका परतोनियां पाहें। जीवांचें आर्त काय सांग मज॥ २॥ जीवाची पारणीं फेडी डोळ्याची। वास श्रीमुखाची पाहूं देई॥ ३॥ हेंची आर्त धरोनी आलों असें जीवीं। तें तूं सर्व पुरवीं भक्तराया॥ ४॥ नामयाचा स्वामि कृपेचा कोंवळा। म्हणऊनि उतावळा। भक्तालागीं॥ ५॥

३९०. सांडूनि वैकुंठ न धरत पातलों। तुज भेटावया आलों पुंडलिका॥ १॥ प्रीतिचा वोरसु हृदयीं दाटला। नुठेची कां वहिला आलिंगना॥ २॥ भक्त शिरोमणि आमचा जीवलग। म्हणे पांडुरंग पुंडलिका॥ ३॥ स्फुरती भुजादंड आणि वक्षस्थळ। हरुषें नयनकमळ विकासलें॥ ४॥ आनंदें रोमांच उद्भवले आंगीं। क्षेमा देई वेगीं भक्तराया॥ ५॥ मज नामा रूप तुमचेनी संभ्रमें। केली जन्मकर्मे असंख्यात॥ ६॥ तुमचीया आवडी असें म्यां विकिला। सांग कोण्या बोला रुसलासी॥ ७॥ हृदयींचें निजगुज सांगरे सकळीक। तेंणें मज सुख होईल जीवा॥ ८॥ परतोनियां दृष्टि पाहे आळुमाळ। तेणें हरेल सकळ श्रम माझा॥ ९॥ ऐसा भक्त जनवत्सलु भक्तांचा विसावा। भक्तांचिया भावा भाळलासे॥ १०॥ कटावरी दोन्ही हात उभा पुंडलिका द्वारीं। नामया स्वामी हरि विनवितसे॥ ११॥

३९१. माझिया पितयाची होईल निद्राभंग। न घडे प्रसंग बोलायाचा॥ १॥ क्षण एक मौन धरुनिया रहा। शरणागत पहा कृपादृष्टि॥ २॥ करूनि निर्धार आले ती जेणें भावें। जतन करावें वचन देवा॥ ३॥ नच जावें देवा माझे गांवेंहुनि। मागतों प्रार्थुनी हेंचि तुम्हां॥ ४॥ माझें सुख पहावें मागेन तें द्यावें। माझें गांवीं व्हावें अधिपती॥ ५॥ नामयाचा स्वामी भक्तीसी भुलला। पुंडलिके राहविला पंढरीये॥ ६॥

३९२. आलासी आरते धरिलासी चित्ते। आतां तुज मागुतें जावों नेदी॥ १॥ शरीर प्राणाचा देईन मी बळी। तुज हृदयकमळीं सांठवीन॥ २॥ धरिलासि तूं एक वैकुंठनायक। म्हणे पुंडलिक पांडुरंगा॥ ३॥ इहलोकीचें सुख न मागी सकळीक। आणिक परलोकीं चाड नाहीं॥ ४॥ पंढरीस राही रखुमाई समवेत। तेणें मनोरथ पूर्ण होती॥ ५॥ तुझें रूप

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दृष्टी नामस्मरण पुटी। मना चरणीं मिठी पडोनि गेली॥ ६ ॥ तुझें चरणीं आर्त हृदयीं नामामृत। तेणें मी समर्थ मिरवे जगीं॥ ७॥ संता सोयरियांची व्हावया भेटी। म्हणोनि वाळवंटी वस्ती केली॥ ८॥ परब्रह्म पुतळा देखिलासि डोळां। समाधि सुख सोहळा पांडुरंगा॥ ९ ॥ कटी ठेवूनि हात आपण पंढरीनाथ। भक्तांचा एकांत श्रवण करी॥ १०॥ उभारे म्हणोनि दिधलें आपणांतें। संबोधून नाम्याचें प्रेम दिलें॥ ११ ॥

३९३. म्हणे पुंडलिक देवा शिरोमणी। परिसावी विनवणी एक माझी॥ १ ॥ संसार-बंधन तोडींरे दारुण। हें एक मागणें तुजपाशी॥ २॥ ऋद्धि सिद्धि मोक्ष संपत्ति विलास। सांडियेली आस त्यांची जीवें॥ ३ ॥ पंच महापातकी विश्वासघातकी। त्यासी यमादिकीं गांजियले॥ ४॥ ऐसिया पतीता करीरे सनाथ। पुरवी माझें आर्त पंढरीया॥ ५॥ हेंचि माझें काज अंतरीचें गुज। उद्धरी सहज महादोषी॥ ६ ॥ नामा म्हणे वर दिला नारायणें। विठ्ठल दर्शनें मोक्ष जीवा॥ ७॥

३९४. तंव पुंडलिक पुढारला। कर जोडोनियां वदला। म्हणे वेदादिका अबोला। तुझिया स्वरूपाचा॥ १ ॥ तो तूं प्रगट श्रीरंगा। येऊनि आमुच्या लोभा। स्थिर राहूनी चंद्रभागा। भक्तजनां तारीसी॥ २॥ नेणो कोण भक्तपण। नेणो तुमचें महिमान। कोणे जन्मी साधन। कोण केलें हें नेणवें॥ ३ ॥ नीरे भीवरे संगमी। चंद्रभागेचे उगमीं। वेणुनाद परब्रह्मी। गोपाळ गजर गर्जती॥ ४॥ तरी स्वामी दीनदयाळा। महाविष्णु गा गोपाळा। भक्तालागी कृपाळा। तारावया तयासी॥ ५ ॥ माझे करोनियां मीस। वास केला युगें अठ्ठावीस। करुनियां रहिवास। माझे भक्ति लाधलासी॥ ६ ॥ तूं नियंता ईश्वरमूर्ती। सकळा गोसावी श्रीपती। तुजवांचूनि नेणें मती। दया मूर्ती परब्रह्मा॥ ७॥ नामा म्हणे पुंडलीके। ऐसें स्तवन केलें निकें। तंव म्हणितलें पुण्य श्लोकें। पुरे पुरे करी आतां॥ ८॥

पंढरीमाहात्म्य.

३९५. सहस्र अठ्ठ्यांशीं ऋषि। स्कंद उपदेशी तयांसी। तिन्हीं एक पुसिली पुसी। ते तयासी अकळ॥ १ ॥ आतां जाऊं कैलासा। सकळ पुसूं त्या महेशा। मग निघाले आकाशा। पितृदेशा पातले॥ २ ॥ बरे होऊनियां सावध। ऐका भक्तीचा संवाद। विनविता झाला स्कंद। तो अनुवाद शंभूचा॥ ३ ॥ स्कंदें विनविला त्रिपुरारी। सहित वामभागीं गौरी। स्तुति स्तवनें केलीं भारी। हृदासनीं नमियेला॥ ४॥ मग निघाला लोटांगणीं। म्हणे त्राहे त्राहे शूळपाणि। करें उचलिला धांवोनि। मग आसनीं बैसविला॥ ५॥ ऋषींसि आसनें देऊनि वेगां। जवळी बैसविलें पैं गा। ते म्हणती झडकरी सांगा। जें वेदशास्त्रांसी प्रिय॥ ६ ॥ तव स्कंद म्हणे ताता। ऋषिंनीं पुसिली जे वार्ता। ते आकळ माझिया चित्ता। वेदशास्त्रार्थ विरहित॥ ७॥ बरवीं तीर्थें पुण्यरासी। माहात्म्यें सांगत होतों त्यांसी। परी तीर्थ क्षेत्र देवांसी। नाहीं चहूंसी एक मेळा॥ ८ ॥ जे जे क्षेत्रीं करितां विचार। ते ते ठायीं तेंचि थोर। परि तयां माजी असे सार। जें माहेर सकळिकां॥ ९ ॥ पाप घडे जे जे मेदिनीं। तयांसी तें तीर्थ करी धुणी। तीर्थां वर्णी शूळपाणि। सांगा हानि जें करी॥ १०॥ जळती पातकांचिया कोडी। ऐसीं तीर्थें आहेत गाढी। तयां सकळिकां तीर्थां आहे खोडी। तें मी उघडी सांगेन॥ ११ ॥ हिमकाळीं कीजे स्नान। हेचि प्रयागासी न्यून। काशीं इच्छी जो मरण। थोर निर्वाण पाविजे॥ १२ ॥ पितृस्मरण आचमन। करोनि देईजे पिंडदान। तेणें पूर्वज होती पावन। हेंचि न्यून गयेसी॥ १३॥ गाढें कुरुक्षेत्र जाण। तेथें किजे हिरण्यदान। केदारीचें उदकपान। करी पीडन देहासी॥ १४॥ उपमाद्वारकेहुनी। अरुच गोमतीचें पाणी। सहा मास सेविल्यावांचुनी। नव्हे दाटनी चक्राशी॥ १५॥ गंगा बारा वरुषें करी। सकळिकांमध्यें गोदावरी। सिंहस्थीं महिमा थोरी।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हें न्यून भारी तयासी ॥ १६ ॥ अयोध्या माया मथुरा। कांची अवंतिका करवीरा। लोण्हार हाटकेश्वर तुंगभद्रा। आणि पुष्करा कावेरी ॥ १७ ॥ कलिमाजी वैकुंठ साक्षात। गाढें क्षेत्र जगन्नाथ। त्या देवासी नाहीं पाय हात। उणीव बहुत तयासी ॥ १८ ॥ गाढें श्रीशैल्यपर्वत। लक्षावया उदित। तेथें जीवासी करीजे घात। हा उणाव बहुत तयासी ॥ १९ ॥ गाढें क्षेत्र परियेसा। गोकर्ण सेतुबंधु महेशा। तयासी उणाव ऐसा। जे यमदिशा म्हणताती ॥ २० ॥ ऐसी तीर्थें कोटीरासी। परि लांछन आहे सर्वांसी। पहिलें राहिजे उपवासी। मग डोईसी मुंडन ॥ २१ ॥ सकळ तीर्थांचा पारू। जोगा देखिला सागरू। तयासी उणाव आहे थोरु। योग येतो अमावास्ये ॥ २२ ॥ म्हणोनि पुसों आलों तुज। सकळ तीर्थांचें बीज। तें झडकरी सांग मज। देवा तुज जें प्रिय ॥ २३ ॥ ऐसी करोनि विनवणी। मग स्कंद लागला चरणीं। येरें उचलिला झडकरुनी। मग शूळपाणि हे बोलिले ॥ २४ ॥ पुत्रां तुवां जे केली विनंति। हेंचि गिरिजा पुसत होती। तरी सांगेन तुजप्रती। चित्त देऊनि परियेसी ॥ २५ ॥ महिमा दरुशनाचा पूर्ण। एक लक्ष्मी जाणे खूण। शुक सनकादिक मुनि सज्जन। आणि वैष्णव जन प्रेमळ ॥ २६ ॥ जैसा कृपणाचा ठेवा। तैसें आर्त रे माझिया जीवा। पुत्रां पुसिलें तुवां। तरी वृत्तांत बरवा सांगेन ॥ २७ ॥ मी बैसोनियां स्मशानीं। जयाचें नाम जप ध्यानीं। तें दैवत आहे जये स्थानीं। चित्त देऊनि परियेसा ॥ २८ ॥ युगा अठ्ठावीसांवरी। आहे पुंडलिकाच्या द्वारीं। विठ्ठल उभा भीमातीरीं। विश्व तारी दरुशनें ॥ २९ ॥ घेऊनि तरुवरांची बुंथि। देव सेवा जाणवीती। आदिकरोनी पार्वती। आम्हां वस्ति तये ठायीं ॥ ३० ॥ तेजें झळाळें वैकुंठ। तयापरी चोखट। पहा पंढरपूर नीट। महिमा अद्भुत तिन्हीं लोकीं ॥ ३१ ॥ जेणें पीडिलें तिन्हीं लोकां। त्यासि वधावया पावलों देखा। ओढी काढोनी त्र्यंबका। श्रीहरी सखा स्मरिला ॥ ३२ ॥ घात करोनी त्रिपुरा। वधियेलें तिन्हीं असुरां। तेंचि तीर्थ भिवरा। सचराचरा तारक ॥ ३३ ॥ प्रतिदिनीं मध्यान्हीं। सकळ तीर्थें तिये स्थानीं। भिवरे सुस्नात होऊनि। विठ्ठलचरणीं लागती ॥ ३४ ॥ तये क्षेत्रीं पाप घडे। ऐसें बोलतां जीव्हा झडे। काय तुज सांगूं पुढें। ब्रह्म उघडें असे जेथें ॥ ३५ ॥ लोहा लागलिया परीसे। सोनें झालें एक सरिसें। आतां पालटेल कैसें भलतें। तैसें जरी झालें ॥ ३६ ॥ एक वेळ पंढरीये जाऊन। मग भलतिये ठायीं राहो कां जन। तो राहे वैकुंठींच जाण। कर्महीन जरी झाला ॥ ३७ ॥ ऐसें ऐकोनी उत्तर। स्कंद हरुषें निर्भर। आदि करोनी ऋषीश्वर। पंढरपूर ठाकिती ॥ ३८ ॥ विष्णुदास नामा म्हणे। एक वेळ पंढरीये जाणें। विठ्ठल धन्यावरी पाहणें। नाहीं येणें संसारा ॥ ३९ ॥

३९६. जगीं पेठा जाण असती अनेका। अति सुरंगा वाखाणिती ॥ १ ॥ जंव तूं न देखसी पेठ द्वारकेची। श्रीरंगरायाची राजधानी ॥ २ ॥ द्वारकेची पेठ तेथें स्वरूप चोखट। बरवी बरवंट शोभत असे ॥ ३ ॥ तैसेंचि पंढरीचें सोपें बहु ठाणें। संत सुलक्षण जाणताती ॥ ४ ॥ तयाचें दर्शनें लाभ कोटी गुणें झाला। भवसिंधु आटला हेळामात्रें ॥ ५ ॥ ऐसी पेठ निर्मिली देवें ही पंढरी। पुंडलीक द्वारीं उभा असे ॥ ६ ॥ या पेठेचा शेट्या पुंडलीक भक्त। नामा शरणागत केशवासी ॥ ७ ॥

३९७. पंढरी हें क्षेत्र पावन पवित्र। महिमा विचित्र त्रिभुवनीं ॥ १ ॥ पाहिलिया क्षणीं नासती पातकें। ऐसियासी तुके दुजे कोण ॥ २ ॥ तृण पक्षी सर्व झाले ऋषिदेव। पहाती वैभव पंढरीचें ॥ ३ ॥ भूमि ते राहिली विष्णु चक्रावरी। वैकुंठीची परी सर्व येथें ॥ ४ ॥ टाळ नृत्य घोष पताकांचे भार। गर्जे भीमातीर सर्वकाळ ॥ ५ ॥ पुंडलिकासाठीं ठाके केशीराज। भेटीनें सायुज्य त्यास देती ॥ ६ ॥ स्नानें उद्धरती दर्शनें प्रशस्ती। वाचे नाम किर्ती विठोबाची ॥ ७ ॥ नामा म्हणे लाभ थोर हा जोडतो। पंढरिसी येतो प्राणी त्यासी ॥ ८ ॥

३९८. पंढरीचें सुख आनंदें गर्जती। ध्यातसे

 Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पार्वती अखंडित॥ १॥ भीमातीरीं उभा सखा पांडुरंग। देई अंगसंग अखंडित॥ २॥ उशीर झाला काय कामकाजा। यावें अधोक्षजा अनिरुद्धा॥ ३॥ नामा म्हणे पाहा पंढरी माझारीं। केशीराज तारी एकसरा॥ ४॥

३९९. निंबलोण करूं पंढरीच्या सुखा। आणिक पुंडलिका मायबापा॥ १॥ पाहतां भूमंडळी नाहीं आणिक रे। पांडुरंग क्षेत्रावांचोनीयां॥ २॥ अणिमादि सिद्धि भक्ताचिये द्वारीं। होऊनि कामारि वोळंगति॥ ३॥ परलोकीं येती परतोनि मागूते। सर्व सुख तेथें भोगावया॥ ४॥ मुक्तिपद कोणी नघे फुकासाठीं। हिंडें वाळवंटी दीनरूप॥ ५॥ भक्ताचियां पाया पडतो पुढतां पुढती। मज करा सांगाती मोक्ष म्हणे॥ ६॥ सत्य लोकीं जया सुखाची शिराणी। तें आम्हां अनुदिनीं प्रत्यक्ष दिसे॥ ७॥ वंदी जन नामा उभा महाद्वारीं। कीर्ति चराचरी वर्णितसे॥ ८॥

४००. पंढरीचें सुख जिहीं अनुभविलें। भावें अनुसरलें विठ्ठलपायीं॥ १॥ काया वाचा मन रंगलें चरणीं। धरियेला मनीं पांडुरंग॥ २॥ नामाचेनि बळे उडविलीं साधनें। तोडीलीं बंधनें संसाराचीं॥ ३॥ मुक्तिपद कोणी नेघे फुकासाठीं। हिंडे वाळवंटीं दीनरूप॥ ४॥ योगियांचें घर रिघे काकुलती। आव्हेरिलें संतीं म्हणोनियां॥ ५॥ दोन्ही कर जोडोनि मोक्ष पाहे वास। म्हणे होईन दास हरिदासाचा॥ ६॥ तंव तुच्छ करोनी न पाहाती दृष्टि। आषंगिले शेवटीं ब्रह्मज्ञानें॥ ७॥ अष्ट महासिद्धि म्हणती कवण गति। यावे काकुलती कवणा आम्ही॥ ८॥ मोक्ष मुक्ति जिहीं हाणितल्या पायीं। आमुची तें सोयी काय धरिती॥ ९॥ ऐसे भक्तराज देवां वंद्य झाले। ते एक राज्य केलें पुंडलिकें॥ १०॥ हर्षे निर्मल नामा नाचे महाद्वारीं। कीर्ति चराचरी वर्णितसे॥ ११॥

४०१. पंढरीचें सुख पाहतां एक घडी। वास कल्प कोडी वैकुंठीचा॥ १॥ आणितां अनुमाना न पवे सरी। महिमा न कळे थोरी सहस्त्रमुखा॥ २॥ हें सुख सुरवरां स्वप्नीं नाहीं दृष्टि। जैसें वाळवंटी तुम्हां आम्हां॥ ३॥ धन्य चंद्रभागा पुण्य सरोवर। धन्य भीमातीर पुण्य भूमी॥ ४॥ धन्य नरनारी गर्जती हरिनामें। ऐकोनि प्रेमें डोले शूलपाणी॥ ५॥ धन्य वेणुनाद धन्य वृंदावन। धन्य तें महिमान क्षेत्रावासी॥ ६॥ धन्य पंचक्रोशी धन्य आसपासी। दुमदुमी अहर्निशीं नामघोष॥ ७॥ धन्य पशु पक्षि कीटक आणि भृंग। जयां अंगसंग पांडुरंगीं॥ ८॥ धन्य ते तरुवर अवघे लहान थोर। अवतरलें अमर गुप्तरूपें॥ ९॥ धन्य ते संसारी वर्तती जीवन्मुक्त। जया आर्त असे पांडुरंगीं॥ १०॥ धन्य त्याचा वंश ज्या नामीं विश्वास। धन्य विष्णुदास नामा तेथें॥ ११॥

४०२. ऐका पंढरीचें महिमान। राउळें तितुकें प्रमाण। तेथील तृण आणि पाषाण। तेहि देव जाणावे॥ १॥ ऐसी पंढरी मनीं ध्याती। त्यांसी तिही लोकीं गति। ते आणिका तीर्थां जाती। ती वंदिती तयांसी॥ २॥ वाराणासीं चालिजे मासा। गोदावरी एक दिवसा। पंढरी पाऊल परियेसा। ऐसा ठसा नामाचा॥ ३॥ ऐसें शंकर सांगें ऋषीजवळी। सकळ तीर्थें माध्यान्हकाळीं। येती पुंडलिकाजवळी। करिती अंघोळी वंदिती चरण॥ ४॥ ऐसेनि तिर्थी पाप घडे। असत्य बोलतां जिव्हां झडे। नामा विनवी संतांपुढें। पंढरी पेठ वोसंडावी॥ ५॥

४०३. अगाध भवजळ तरावया दुस्तर। रची पंढरपूर कलीमाजी॥ १॥ तारू पंढरीनाथ मोलेंविण उतरी। उभा भिमातीरी वाट पाहे॥ २॥ बुडण्याचें भय नाहीं पै संसारीं। कलीमाजी पंढरी थोर नांव॥ ३॥ जया नावेवरी आठराही आवलें। साही खण भले मिरवती॥ ४॥ चहुंमुखी जिचा न कळोचि पार। पाहतां विचार सहस्त्रमुख॥ ५॥ सड्या लावी कांसें कुटुंबीं नावेवरी। उतरिलें तीरीं केशिराजें॥ ६॥ प्रेमाचिया पेटी बांधोनियां पोटीं। उतरी जगजेठी पांडुरंगीं॥ ७॥ अंगें घाली उडी बुडतियां काढी। ऐसे कल्पकोडी तारियेले॥ ८॥ तारियेले सत्य हाचि पै निर्धार। नामा पैल पार उतरला॥ ९॥

४०४. धन्य पंढरीचे सकळही जन। जिही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सख्य केलें जाण विठ्ठल पायीं॥ १॥ विठ्ठल हा ध्यानीं विठ्ठल हा मनीं। विठ्ठल चिंतनीं रात्रंदिवस॥ २॥ विठ्ठलविण जया न गमे एक घडी। सर्वस्वें आवडी विठ्ठलची॥ ३॥ विठ्ठलची माता विठ्ठलची पिता। भगिनी आणि भ्राता विठ्ठल ज्यांचा॥ ४॥ विठ्ठलचि मित्र विठ्ठलचि पुत्र। विठ्ठल कुळगोत्र केला जिहीं॥ ५॥ विठ्ठलचि क्रिया विठ्ठलचि कर्म। विठ्ठल सकळ धर्म कुळदैवत॥ ६॥ गुज गौप्य जीवीचें विठ्ठला सांगावें। विठ्ठलें पुरवावें कोड त्यांचें॥ ७॥ सर्वकाळ करणें विठ्ठलाची कथा। विठ्ठल जडला चित्ता जयाचिया॥ ८॥ विठ्ठल जागृती स्वप्नीं आणि सुषुप्ती। अखंड बोथरती विठ्ठल विठ्ठल॥ ९॥ ऐसा सर्वस्वेंसी विठ्ठल भजतां। सुख आलें हातां विठ्ठलाचें॥ १०॥ नामा म्हणे त्यांचें चरणरेणु होऊन। झालों मी पावन म्हणे आतां॥ ११॥

४०५. पंढरीचे जन अवघे पावन। ज्या जवळी निधान पांडुरंग॥ १॥ विठ्ठलनामें घेणें विठ्ठलनामें देणें। विठ्ठलनामें करणें सकळ काम॥ २॥ विठ्ठलनामें क्रिया। विठ्ठलनामें कर्म। हाचि प्रिय धर्म जया चित्ता॥ ३॥ सबराभरित विठ्ठल मागें पुढें। जिकडे जाती तिकडे विठ्ठलचि॥ ४॥ निरंतर गर्जती विठ्ठल पवाडे। ऐत निवाडे विठ्ठलरूप॥ ५॥ विठ्ठलनाम सरतें विठ्ठलनामें पुरतें। विठ्ठल नाम ज्यातें भांडवल॥ ६॥ विठ्ठलनाम करिती अवघा योगक्षेम। नित्य ज्यांचें प्रेम विठ्ठलनामीं॥ ७॥ सदा हृदयीं भरित विठ्ठलाचें प्रेम। हर्षें विठ्ठलनाम गर्जताती॥ ८॥ विठ्ठलनामीं गोडी धरोनी आवडी। विठ्ठलनामीं बुडी दिली जेणें॥ ९॥ नामा म्हणे अवघें विठ्ठलचि झालें। विठ्ठलें दिधलें प्रेमसुख॥ १०॥

४०६. नित्य हे दिवाळी असे पंढरपुरीं। ओंवाळिती नारी विठ्ठलासी॥ १॥ पावा वाजे वेणु बरविया नादें। नामघोष आनंदें नाचतसे॥ २॥ नामा म्हणे आम्ही पंढरीये जावें। कवतुकें पहावें विठ्ठलासी॥ ३॥

४०७. अवघी हे पंढरी सुखाची मांदुस। माझा स्वप्रकाश रत्न हरी॥ १॥ धन्य संतजन तेथिचें पारखी। ज्या झाली ओळखी विठ्ठलनामीं॥ २॥ अनुभवुनी चित्तीं पाहिलें विवेकें। धरिलें पुंडलिकें हृदयकमळीं॥ ३॥ त्रिभुवन खेळण प्रेमाचें कोंदण। करोनि भूषण भोगितसे॥ ४॥ युगें गेलीं परी पालटचि नाहीं। नित्य शुद्ध पाही तेजःपुंज॥ ५॥ पाहतां नित्य नवे ध्यातां चित्त निवे। म्हणोनि नामा जिवें विसंबेना॥ ६॥

४०८. अनंत तीर्थांचें माहेर। अनंत रूपांचें सार। अनंता अनंत अपार। तो हा कटीं कर ठेवूनि उभा॥ १॥ धन्य धन्य पांडुरंग। सकळ दोषां होय भंग। पूर्वज उद्धरती सांग। पंढरपूर देखिलिया॥ २॥ निरा भिवरा पडतां दृष्टी। स्नान करितां शुद्ध सृष्टि। अंतीं तों वैकुंठप्राप्ति। ऐसें परमेष्टि बोलिला॥ ३॥ तेथें एक शीत दिधल्या अन्न। कोटी कुळांचें होय उद्धरण। कोटि याग केलें पूर्ण। ऐसें महिमान ये तीर्थीचें॥ ४॥ नामा म्हणे धन्य जन्म। जे धरिती पंढरीचा नेम। तया अंतीं पुरुषोत्तम। जीवें भावें न विसंबे॥ ५॥

४०९. ऐसें तीर्थ कोणी दाखवा गोमटें। जेथें प्रत्यक्ष भेटे परब्रह्म॥ १॥ कोठें ऐसें क्षेत्र आहे त्रिभुवनीं। सकळां शिरोमणि चंद्रभागा॥ २॥ ऐसें तीर्थ कोणी दाखवावे एक। देखतांचि सुख पावें मन॥ ३॥ ऐसें तीर्थ कोणी दाखवा साजिरें। सदा प्रेमपुरें वोसंडत॥ ४॥ ऐसें तीर्थ कोणी दाखवा सुलभ। जेथें समारंभ हरिकथेचा॥ ५॥ ऐसें तीर्थ कोणी दाखवा निर्मळ। परब्रह्म केवळ सकळां जीवा॥ ६॥ नामा म्हणे आम्हां दीनांचें माहेर। धन्य पंढरपूर गीतीं गातां॥ ७॥

४१०. काय सांगू तुझी करणी नारायणा। वेदपारायणा केशिराजा॥ १॥ पृथ्वीवरी तीर्थें आहेत अपार। परी पंढरिची सर एका नाहीं॥ २॥ जन्मोजन्मींचिया पातकां दरारा। चुके येरझारा एके खेपें॥ ३॥ ब्रह्मज्ञानेंविण मोक्ष आहे भूतीं। वाचेसी ते घेती विठ्ठलनाम॥ ४॥ बेचाळीसांसहित जातील वैकुंठा। नामा म्हणे भेटा विठ्ठल देवीं॥ ५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४११. सांडूनि पंढरी जासी आणिका तीर्थां। लाज तुझ्या चित्ता कैशी नये॥ १॥ त्रिभुवनाची तीर्थें झालीं तीं मळीन। व्हावया पावन आलीं येथें॥ २॥ एवढा ब्रह्मानंद कैंचा आणिका ठायीं। जो या आहे पाहीं विठोबाच्या॥ ३॥ काळ मृत्यु दोन्हीं घालोनि पायांतळीं। वाजलिया टाळीं कीर्तनसंगें॥ ४॥ नित्य नवी दिवाळी सुखाचा सोहळा। भोगिजे अवलीला संतसंगें॥ ५॥ धर्म अर्थ काम मोक्ष मुक्ति चारी। देतो हा मुरारी नामें एका॥ ६॥ नामा म्हणे चला जाऊं पंढरिये। पाहूं बापमाये पांडुरंग॥ ७॥

४१२. काशी हे पंढरी। प्रयाग नीरा नृसिंहपुरी। पिंड ठेवा पुष्पवती संगमपदावरी। पूर्वज होती चतुर्भुज॥ १॥ सकल तीर्थें वाराणसी मध्यान्हकाळीं येती पंढरीसी। ओवाळिती विठोबासी। विश्वनाथ म्हणोनियां॥ २॥ म्हणऊनि वेगीं चला पंढरपुरा। विठोबारायाच्या नगरा। चंद्रभागा सरोवरा। देव कौतुक पाहती॥ ३॥ वाराणसी मनिकर्णिका। चंद्रभागा पुंडलिका। वाराणसी भागीरथी देखा। पांडुरंगीं भीमरथी॥ ४॥ वाराणसी पंचगंगा। पुष्पावती पांडुरंगा। महा पातकें जाती भंगा। तीर्थें मस्तकीं वंदिल्या॥ ५॥ वाराणसी दंडपाणि। क्षेत्रपाळ हे हनुमंत दोन्ही। सकळ तीर्थें विठोबाचे चरणीं। काशी होय पंढरी॥ ६॥ वाराणसी माधवबिंदू। पांडुरंगीं वेणूनादू। पंचक्रोशी तीर्थ उदंडू। पांडुरंगीं पद्मतीर्थ॥ ७॥ वाराणसी मोक्षपंथा। विठ्ठलाचेनि सायुज्यता। एवढें तीर्थ त्रिभुवनीं पाहतां-तीर्थ नाहीं यापरतें॥ ८॥ वाराणसी चंद्रमौळी। पांडुरंगीं वनमाळी। विश्वनाथ नंदीजवळी। विठोबा जवळी गरुड असे॥ ९॥ वाराणसी गौरी खुणा। पांडुरंगी रुक्मिणी जाणा। वाराणसी अन्नपूर्णा। पांडुरंगीं जाणा सत्यभामा॥ १०॥ वाराणसी त्रिशुळावरी। सुदर्शनावरी पंढरी। कांहीं संदेह मनीं न धरी। काशी होय पंढरी॥ ११॥ ऐसें सकळ तीर्थांचें माहेर। तीर्थ नाहीं यापरतें थोर। विष्णुदास नामयाचा दातार। पुंडलिकासहित असे॥ १२॥

४१३. पाहतां देऊळाची पाठ। तीर्थें घडलीं तीनशें साठ॥ १॥ स्नान करितां पन्हाळें। उद्धरती सर्व कुळें॥ २॥ सन्मुख पाहतां विठाई। त्यासी उपमा द्यावया नाहीं॥ ३॥ ऐसा पंढरीचा महिमा। काय वर्णूं म्हणे नामा॥ ४॥

पंढरीची युगसंख्या

४१४. कृत त्रेता द्वापार कली। ऐसा चौयुगांचा मेळीं। तें महायुग शब्द आढळी। वेदांत शास्त्रीं॥ १॥ ऐसा ब्रह्मयाचा दिनांतर। तैसीच रात्र एक सहस्त्र। तीसा दिवसांचा प्रखर। एक मास॥ २॥ ऐसें बारा मास। त्याचें एक वरुष। शतभरी आयुष्य ब्रह्मयाचें॥ ३॥ ऐसा ब्रह्मयाचा दिनांत। शत वरुषें गणीत। ज्या प्रळयीं पोहत। मार्कंडेय उदकीं॥ ४॥ ऐसी अठ्ठावीस युगें जाण। पंढरपुरासी झाली पूर्ण। जो की ब्रह्मयाचा दिन। प्रळय केला॥ ५॥ नामा म्हणे पंढरीची संख्या। सांगितलीं संत महंत लोकां। लक्षूनि पादुका। विठोबाच्या॥ ६॥

४१५. श्रोते म्हणती विष्णुदासा। या ब्रह्मांडीचा प्रळय कैसा। पंढरीच्या भासा। नाश की नाहीं॥ १॥ तंव नामा म्हणे सुदर्शनावरी। देवें रचिली पंढरी। भक्तासहित राज्य करी। रुक्मिणीवर॥ २॥ तो परमात्मा गुणातीत। अपरोक्ष भक्तांसहित। तेथें प्रळय हात जोडीत। जयालागीं॥ ३॥ जें ब्रह्मयाचें आयुष्य सारें। तें लया जाय चराचरें। तें मिळे पंढरपूर। वस्तु माझी॥ ४॥ नामा म्हणे या खुणा। कळती संतजना। इतर मायिक जना। नेणवती॥ ५॥

४१६. आधीं रचिली पंढरी। मग वैकुंठ नगरी॥ १॥ जेव्हां नव्हतें चराचर। तेव्हां होतें पंढरपूर॥ २॥ जेव्हां नव्हती गोदा गंगा। तेव्हां होती चंद्रभागा॥ ३॥ चंद्रभागेंचें तटीं। धन्य पंढरी गोमटीं॥ ४॥ नासिलिया भूमंडळ। उरे पंढरी मंडळ॥ ५॥ असे सुदर्शनावरी म्हणूनि अविनाश पंढरी॥ ६॥ नामा म्हणे बा श्रीहरि। ते म्या देखिली पंढरी॥ ७॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४१७. अवघी हे पंढरी सुखाची वोवरी। अवघ्या घरोघरीं ब्रह्मानंद॥ १॥ अवघा हा विठ्ठल सुखाचाचि आहे। अनुसर तो लाहे सर्व सुख॥ २॥ पहावा नयनीं ऐकावा श्रवणीं। अवघा ध्यावा ध्यानीं अवघ्या मनें॥ ३॥ अवघिये आवडी अवघा गावा गीतें। अवघा सर्वांभूतीं तोचि आहे॥ ४॥ अवघा हा जाणावा अवघा हा मानावा। अवघा वाखाणावा अवघी वाचा॥ ५॥ अवघा ओळखुनी अवघा गिळिजे मनें। अवघा हाचि होणें म्हणे नामा॥ ६॥

४१८. अवघें हें पवित्र पांडुरंग क्षेत्र। सुखचि सर्वत्र भरलें असें॥ १॥ अवघा हा विठ्ठल गीतीं गातां गोड। अवघे पुरवी कोड नामें एक॥ २॥ अवघें जे सांडोनी अनुसरलें यातें। अवघे देतो त्यांतें आपलें प्रेम॥ ३॥ अवघी चित्तवृत्ति ठेविति याच्या पायी। त्यांतें अवघ्या बाहीं आलिंगतो॥ ४॥ अवघें आपलें मन दिल्हे जिहीं यातें। असें त्या सांगातें मागें पुढें॥ ५॥ अवघ्यासि अनुसरला अवघेंचि विसरला। अवघा नामा झाला सुखरूप॥ ६॥

४१९. तूं जाऊं नको जेथें तेथें। जरी तुज मुक्तीचें आर्तें। तुज मी सांगेन हीत। देऊनि चित्त परियेसें॥ १॥ शंभु अडसष्टी तीर्थांचें माहेर। सकळ सिद्धी ऋषीश्वर। माध्यान्हकाळीं सुरवर। पंढरपूर ठाकती॥ २॥ जाई जाई आलियारे। पांडुरंगीं राहे स्थिर रे। न लगती आणिक दैवतें रे। एक पुरे विठ्ठलची॥ ३॥ तीर्थ क्षेत्र दैवतें। ऐसें नाहीं जेथें तेथें। तिन्ही सर्वोत्तम जेथें। तें पैं क्षेत्र सांगेन॥ ४॥ श्रीहरीच्या चोविस मूर्ति। विठ्ठल प्रेमदृष्टीं प्रीति। सहस्त्र नामांवरती कीर्ति। विठ्ठल दैवत जाणावें॥ ५॥ रुद्रार्धांगी गौरी। जान्हवी असे शिरीं। सर्वांग व्यापिनी भीमा सुंदरी। आले त्रिपुरारी ठाकोनी॥ ६॥ कोटि जन्मांचें पातक। नासे स्नान केलिया देख। एवढें क्षेत्र अलौकिक। पांडुरंग भीवरा॥ ७॥ काशीं त्यागिजें शरीर। हिवें शिणलें केदार। पाणी गोमतीचें क्षार। म्हणवोनि महिमा सम नाहीं॥ ८॥ जन्ममरणा-वेगळें। वैकुंठ तुकिलें सगळें। परि त्याहुनि आगळें। एक अक्षर जाणावें॥ ९॥ गया भोंवूनि चौदापदीं। तीं अनंतें वेणुनादीं। काला केला गोविंदी। हा दृष्टांत पहा पां॥ १०॥ ज्याचेनि नांवें पिंडदान। त्यासी गयेसी गति जाण। येथें करितां नामस्मरण। सर्व पूर्वजां मुक्ति॥ ११॥ कार्तिकिये आदित्यावारीं। जो पद्माला स्नान करी। त्यांसी नाहीं येरझारी। नये पुढती संसारा॥ १२॥ इंद्र येवढे परमेष्ठी। तेथें मनुष्याच्या काय गोष्टी। धन्य धन्य तो एक सृष्टी। पंढरी दृष्टी जो देखे॥ १३॥ बरवे पुंडलीकें केलें। हें परब्रह्म रे अर्चिलें। जगांत शांतवन केलें। परि नेटके सर्वथा॥ १४॥ तीर्थ सोपारें सधर। कष्ट न लगती अपार। उपवासी निराहार। कीं क्षौर करणेची नलगे॥ १५॥ येथें सुखें येणें जाणें। घेणें नलगे धरणें। मनीचें मनोरथ पुरवणें। एके भेटीसाठीं॥ १६॥ पूर्वजन्मीचा तापसी। तीर्थें केलीं पुण्यराशी। सहस्त्र शतें भोजनासी। देवां द्विजा भजिन्नला॥ १७॥ शाळिग्रामाची पूजा करी। त्यासी प्रसन्न झाले हरि। त्यासी दावितो पंढरी। पूर्व संस्कारी म्हणोनिया॥ १८॥ जयासी नावडे पंढरी। तो पापिया दुराचारी। उपजोनियां संसारीं। येरझारी शिणतो॥ १९॥ त्यासी श्वान सुकर हांसती। म्हणती यासी कैसी पडली भ्रांती। उपजोनियां मनुष्ययाती। पंढरपूरपती नोळखे॥ २०॥ जो विन्मुख पंढरपुरा। त्याचा संग क्षणीं धरा। मोडोनी सुकृताचा थारा। पाप शरीरासी तो गेला॥ २१॥ जो पंढरीसी आर्तु। त्याची करा बरवी मातु। अंतःकाळीं पंढरीनाथु। यमपंथु चुकवील॥ २२॥ बरवें समतुल्य वाळुवंट। वरी वैष्णव मिळाले घनदाट। करिती हरिनामाचें बोभाट। वीर उद्भट विठ्ठलाचें॥ २३॥ जें येथें प्रेमासी आतुर। ते चतुर्भुज होती नर। येवढें क्षेत्र पंढरपूर। महिमा थोर तिहीं लोकीं॥ २४॥ अन्य क्षेत्रीं पाप किजे। ते पुण्यक्षेत्रीं विनसिजे। पुण्यक्षेत्रीं पाप किजे। तें त्यागिजे पंढरीसी॥ २५॥ पंढरीचें पातक। पंढरीस नासे देख। एवढें क्षेत्र अलौकीक। त्रिभुवना-माझारी॥ २६॥ पैल इटेवरी सांवळा। विठोबा पहा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पहा रे डोळा। विघ्न घालोनि पायातळा। आणिक कळिकाळा दमेना॥ २७॥ जप तप अनुष्ठान। नलगे जीवासी रे बंधन। आणिक न करावें साधन। पहावें चरण विठोबाचें॥ २८॥ देवा सांगे वसुंधरा। मी न भीये सप्तसागरा। स्थावर जंगमादि सारा। नाहीं भार तयाचा॥ २९॥ ज्यासी नावडे विठ्ठल वीरू। त्याचा मज भार थोरू। त्यासी नरकीं होय थारू। तो आसुर प्राणिया॥ ३०॥ ऐसा हा पंढरपूरपति। जीवंतु असतां देतो मुक्ति। मेलिया देतो ब्रह्मप्राप्ति। दोहींकडे सौरस॥ ३१॥ येरां प्राणि कष्ट थोर। परी ते न भरे उदर। मेलिया यम किंकर। अष्टौप्रहर जाचिती॥ ३२॥ ऐसा कैलासीचा राणा। गिरीजे स्कंदा सांगें खुणा। तुम्ही आणिक मंत्र नेणा। या पाडुरंगा वाचुनी॥ ३३॥ विठ्ठल विठ्ठल म्हणतां। तुटती महापातक चळथा। विष्णुदास नामा विनवी संता। सावधान व्हा जी म्हणतसे॥ ३४॥

४२०. सुखालागी जरी करिसी तळमळ। तरी तूं पंढरीसी जाय एक वेळ॥ १॥ तेथें अवघाची सुखरूप होसी। जन्मोजन्मीचे श्रम विसरसी॥ २॥ चंद्रभागेसी करितां स्नान। तुझे दोष पळती रानोरान॥ ३॥ लोटांगण घालोनी महाद्वारीं। कान धरोनि नाच गरुडपारीं॥ ४॥ नामा म्हणे उपमा काय द्यावी। माझ्या विठोबाची इडा पीडा घ्यावी॥ ५॥

४२१. यारे नाचों प्रेमानंदें। विठ्ठल नामाचिया छंदें॥ १॥ जाऊं म्हणती पंढरी वाटें। कळिकाळा भय वाटे॥ २॥ चंद्रभागें घडलें स्नान। यमलोकीं पडली हान॥ ३॥ झालीं पुंडलिका भेटी। पूर्वज आनंदले वैकुंठीं॥ ४॥ आतां राउळासी जातां। झाली जीवाची मुक्तता॥ ५॥ विष्णुदास नामा म्हणे। आतां नाहीं येणें जाणें॥ ६॥

४२२. पैल ते पंढरी पैल ते पंढरी। पांढरीवरी काळीं वसविली॥ १॥ सोंवळें हें ब्रह्म सुनिळ हे ब्रह्म। विद्युल्लता ब्रह्म पाहूं चला॥ २॥ नामा म्हणे माझा विठ्ठल हा डोळा। अर्धमात्रे जवळां पाहूं चला॥ ३॥

४२३. झळकतीं पताका। कळस दिसतो नेटका॥ १॥ बरवें बरवें पंढरपूर। विठोबा रायाचें नगर॥ २॥ अरे हें माहेर संतांचें। नामया स्वामी केशवाचें॥ ३॥

४२४. काय पुण्य केलें इही जीवा जनीं। पंढरी नयनीं देखियेली॥ १॥ अनंता जन्माचें हेंचि प्रायश्चित्त। वाचे जपे नित्य रामनाम॥ २॥ कोटी कुळें केली क्षणेची पावन। केल्या एक स्नान चंद्रभागें॥ ३॥ शोक मोह ताप विध्वंसिला हेळा। अवलोकितां डोळा पांडुरंग॥ ४॥ महापापराशी तींही केल्या होळी। वाजविल्या टाळी विठ्ठल-नाम॥ ५॥ नामा म्हणे धन्य धन्य संसारी। चालविती वारी पंढरीची॥ ६॥

४२५. काशीराज क्षेत्रीं जुंपिलें आऊत। अष्ट धान्यें तेथें पेरियेलीं॥ १॥ मेघःशामघोष वर्षे सर्वांधारी। बीज विटेवरी सासिन्नलें॥ २॥ जगाचें जीवन पंढरी पिकली। चारया सोकली भूतजातें॥ ३॥ घालूनियां माळा रक्षि कळीकाळा। न विटों विठ्ठला संसारासी॥ ४॥ पाप सोकरण भक्ति हें गोफण। भुस कांडी कण नाम घायी॥ ५॥ वेदस्मृती श्रुति ऐसे बोलवितां। गूढ उगवितां लाभ होतीं॥ ६॥ नामा म्हणे स्वामी केशव सुकाळ। अन्न ब्रह्म फळ नाम बीज॥ ७॥

४२६. कार्तिकी एकादशी। पोहा मिळाला पंढरीसी। येथील महिमा वर्णूं कैसी। ब्रह्मांदिका न वर्णवे॥ १॥ दिंड्या गरुडटक्याचें भार। मृदंग वाजती अपार। वैष्णव नाचती जयजयकार। नादें अंबर गर्जतसे॥ २॥ उपजोनियां संसारीं। वेळोवेळां पाहारे पंढरी। विठ्ठलराज भीमातीरीं। वाट पाहे भक्तांची॥ ३॥ कल्पतरू चिंतामणी। घरीं कामधेनूची दुभणीं। मोतियांचें चौक राजांगणीं। वृंदावनें शोभती॥ ४॥ संत बैसले पद्मासनीं। राया विठ्ठल तुझे चरण ध्यानीं। हरिकीर्तन ऐकोनी कानीं। अंतःकरणीं निवाले॥ ५॥ जें जें चिंतन मानसीं।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४१७. अवघी हे पंढरी सुखाची वोवरी। अवघ्या घरोघरीं ब्रह्मानंद॥ १॥ अवघा हा विठ्ठल सुखाचाचि आहे। अनुसर तो लाहे सर्व सुख॥ २॥ पहावा नयनीं ऐकावा श्रवणीं। अवघा घ्यावा ध्यानीं अवघ्या मनें॥ ३॥ अवधिये आवडी अवघा गावा गीतें। अवघा सर्वांभूतीं तोचि आहे॥ ४॥ अवघा हा जाणावा अवघा हा मानावा। अवघा वाखाणावा अवघी वाचा॥ ५॥ अवघा ओळखुनी अवघा गिळिजे मनें। अवघा हाचि होणें म्हणे नामा॥ ६॥

४१८. अवघें हें पवित्र पांडुरंग क्षेत्र। सुखचि सर्वत्र भरलें असें॥ १॥ अवघा हा विठ्ठल गीतीं गातां गोड। अवघे पुरवी कोड नामें एक॥ २॥ अवघें जे सांडोनी अनुसरलें यातें। अवघे देतो त्यांतें आपलें प्रेम॥ ३॥ अवघी चित्तवृत्ति ठेविति याच्या पायी। त्यांतें अवघ्या बाहीं आलिंगतो॥ ४॥ अवघें आपलें मन दिल्हे जिहीं यातें। असें त्या सांगातें मागें पुढें॥ ५॥ अवघ्यासि अनुसरला अवघेंचि विसरला। अवघा नामा झाला सुखरूप॥ ६॥

४१९. तूं जाऊं नको जेथें तेथें। जरी तुज मुक्तीचें आर्ते। तुज मी सांगेन हीत। देऊनि चित्त परियेसें॥ १॥ शंभु अडसष्टी तीर्थांचें माहेर। सकळ सिद्धी ऋषीश्वर। माध्यान्हकाळीं सुरवर। पंढरपूर ठाकती॥ २॥ जाई जाई आलियारे। पांडुरंगीं राहे स्थिर रे। न लगती आणिक दैवतें रे। एक पुरे विठ्ठलची॥ ३॥ तीर्थ क्षेत्र दैवतें। ऐसें नाहीं जेथें तेथें। तिन्ही सर्वोत्तम जेथें। तें पैं क्षेत्र सांगेन॥ ४॥ श्रीहरीच्या चोविस मूर्ति। विठ्ठल प्रेमदृष्टीं प्रीति। सहस्त्र नामांवरती कीर्ति। विठ्ठल दैवत जाणावें॥ ५॥ रुद्रार्धांगी गौरी। जान्हवी असे शिरीं। सर्वांग व्यापिनी भीमा सुंदरी। आले त्रिपुरारी ठाकोनी॥ ६॥ कोटि जन्मांचें पातक। नासे स्नान केलिया देख। एवढें क्षेत्र अलौकिक। पांडुरंग भीवरा॥ ७॥ काशीं त्यागिजें शरीर। हिवें शिणलें केदार। पाणी गोमतीचें क्षार। म्हणवोनि महिमा सम नाहीं॥ ८॥ जन्ममरणा-वेगळें। वैकुंठ तुकिलें सगळें। परि त्याहुनि आगळें। एक अक्षर जाणावें॥ ९॥ गया भोंवूनि चौदापदीं। तीं अनंतें वेणुनादीं। काला केला गोविंदी। हा दृष्टांत पहा पां॥ १०॥ ज्याचेनि नांवें पिंडदान। त्यासी गयेसी गति जाण। येथें करितां नामस्मरण। सर्व पूर्वजां मुक्ति॥ ११॥ कार्तिकिये आदित्यावारीं। जो पद्माला स्नान करी। त्यांसी नाहीं येरझारी। नये पुढती संसारा॥ १२॥ इंद्र येवढे परमेष्ठी। तेथें मनुष्याच्या काय गोष्टी। धन्य धन्य तो एक सृष्टी। पंढरी दृष्टी जो देखे॥ १३॥ बरवे पुंडलीकें केलें। हें परब्रह्म रे अर्चिलें। जगांत शांतवन केलें। परि नेटके सर्वथा॥ १४॥ तीर्थ सोपारें सधर। कष्ट न लगती अपार। उपवासी निराहार। कीं क्षौर करणेची नलगे॥ १५॥ येथें सुखें येणें जाणें। घेणें नलगे धरणें। मनीचें मनोरथ पुरवणें। एके भेटीसाठीं॥ १६॥ पूर्वजन्मीचा तापसी। तीर्थें केलीं पुण्यराशी। सहस्त्र शतें भोजनासी। देवां द्विजा भजिन्नला॥ १७॥ शाळिग्रामाची पूजा करी। त्यासी प्रसन्न झाले हरि। त्यासी दावितो पंढरी। पूर्व संस्कारी म्हणोनिया॥ १८॥ जयासी नावडे पंढरी। तो पापिया दुराचारी। उपजोनियां संसारीं। येरझारी शिणतो॥ १९॥ त्यासी श्वान सुकर हांसती। म्हणती यासी कैसी पडली भ्रांती। उपजोनियां मनुष्ययाती। पंढरपूरपती नोळखे॥ २०॥ जो विन्मुख पंढरपुरा। त्याचा संग क्षणीं धरा। मोडोनी सुकृताचा थारा। पाप शरीरासी तो गेला॥ २१॥ जो पंढरीसी आर्तु। त्याची करा बरवी मातु। अंतःकाळीं पंढरीनाथु। यमपंथु चुकवील॥ २२॥ बरवें समतुल्य वाळुवंट। वरी वैष्णव मिळाले घनदाट। करिती हरिनामाचें बोभाट। वीर उद्धट विठ्ठलाचें॥ २३॥ जें येथें प्रेमासी आतुर। ते चतुर्भुज होती नर। येवढें क्षेत्र पंढरपूर। महिमा थोर तिहीं लोकीं॥ २४॥ अन्य क्षेत्रीं पाप किजे। ते पुण्यक्षेत्रीं विनसिजे। पुण्यक्षेत्रीं पाप किजे। तें त्यागिजे पंढरीसी॥ २५॥ पंढरीचें पातक। पंढरीस नासे देख। एवढें क्षेत्र अलौकीक। त्रिभुवना-माझारी॥ २६॥ पैल इटेवरी सांवळा। विठोबा पहा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पहा रे डोळा। विघ्न घालोनि पायातळा। आणिक कळिकाळा दमेना॥ २७॥ जप तप अनुष्ठान। नलगे जीवासी रे बंधन। आणिक न करावें साधन। पहावें चरण विठोबाचें॥ २८॥ देवा सांगे वसुंधरा। मी न भीये सप्तसागरा। स्थावर जंगमादि सारा। नाहीं भार तयाचा॥ २९॥ ज्यासी नावडे विठ्ठल वीरू। त्याचा मज भार थोरू। त्यासी नरकीं होय थारू। तो आसुर प्राणिया॥ ३०॥ ऐसा हा पंढरपूरपति। जीवंतु असतां देतो मुक्ति। मेलिया देतो ब्रह्मप्राप्ति। दोहींकडे सौरस॥ ३१॥ येरां प्राणि कष्ट थोर। परी ते न भरे उदर। मेलिया यम किंकर। अष्टौप्रहर जाचिती॥ ३२॥ ऐसा कैलासीचा राणा। गिरिजे स्कंदा सांगें खुणा। तुम्ही आणिक मंत्र नेणा। या पाडुरंगा वाचुनी॥ ३३॥ विठ्ठल विठ्ठल म्हणतां। तुटती महापातक चळथा। विष्णुदास नामा विनवी संता। सावधान व्हा जी म्हणतसे॥ ३४॥

४२०. सुखालागी जरी करिसी तळमळ। तरी तूं पंढरीसी जाय एक वेळ॥ १॥ तेथें अवघाची सुखरूप होसी। जन्मोजन्मीचे श्रम विसरसी॥ २॥ चंद्रभागेसी करितां स्नान। तुझे दोष पळती रानोरान॥ ३॥ लोटांगण घालोनी महाद्वारीं। कान धरोनि नाच गरुडपारीं॥ ४॥ नामा म्हणे उपमा काय द्यावी। माझ्या विठोबाची इडा पीडा घ्यावी॥ ५॥

४२१. यारे नाचों प्रेमानंदें। विठ्ठल नामाचिया छंदें॥ १॥ जाऊं म्हणती पंढरी वाटें। कळिकाळा भय वाटे॥ २॥ चंद्रभागें घडलें स्नान। यमलोकीं पडली हान॥ ३॥ झालीं पुंडलिका भेटी। पूर्वज आनंदले वैकुंठीं॥ ४॥ आतां राउळासी जातां। झाली जीवाची मुक्तता॥ ५॥ विष्णुदास नामा म्हणे। आतां नाहीं येणें जाणें॥ ६॥

४२२. पैल ते पंढरी पैल ते पंढरी। पांढरीवरी काळीं वसविली॥ १॥ सोंवळें हें ब्रह्म सुनिळ हे ब्रह्म। विद्युल्लता ब्रह्म पाहूं चला॥ २॥ नामा म्हणे माझा विठ्ठल हा डोळा। अर्धमात्रे जवळां पाहूं चला॥ ३॥

४२३. झळकतीं पताका। कळस दिसतो नेटका॥ १॥ बरवें बरवें पंढरपूर। विठोबा रायाचें नगर॥ २॥ अरे हें माहेर संतांचें। नामया स्वामी केशवाचें॥ ३॥

४२४. काय पुण्य केलें इही जीवा जनीं। पंढरी नयनीं देखियेली॥ १॥ अनंता जन्माचें हेंचि प्रायश्चित्त। वाचे जपे नित्य रामनाम॥ २॥ कोटी कुळें केली क्षणेची पावन। केल्या एक स्नान चंद्रभागें॥ ३॥ शोक मोह ताप विध्वंसिला हेळा। अवलोकितां डोळा पांडुरंग॥ ४॥ महापापराशी तींही केल्या होळी। वाजविल्या टाळी विठ्ठल-नाम॥ ५॥ नामा म्हणे धन्य धन्य संसारी। चालविती वारी पंढरीची॥ ६॥

४२५. काशीराज क्षेत्रीं जुंपिलें आऊत। अष्ट धान्यें तेथें पेरियेलीं॥ १॥ मेघःशामघोष वर्षे सर्वांधारी। बीज विटेवरी सासिन्नलें॥ २॥ जगाचें जीवन पंढरी पिकली। चारया सोकली भूतजातें॥ ३॥ घालूनियां माळा रक्षि कळीकाळा। न विटों विठ्ठला संसारासी॥ ४॥ पाप सोकरण भक्ति हें गोफण। भुस कांडी कण नाम घायी॥ ५॥ वेदस्मृती श्रुति ऐसे बोलवितां। गूढ उगवितां लाभ होतीं॥ ६॥ नामा म्हणे स्वामी केशव सुकाळ। अन्न ब्रह्म फळ नाम बीज॥ ७॥

४२६. कार्तिकी एकादशी। पोहा मिळाला पंढरीसी। येथील महिमा वर्णूं कैसी। ब्रह्मांदिका न वर्णवे॥ १॥ दिंड्या गरुडटक्याचें भार। मृदंग वाजती अपार। वैष्णव नाचती जयजयकार। नादें अंबर गर्जतसे॥ २॥ उपजोनियां संसारीं। वेळोवेळां पाहारे पंढरी। विठ्ठलराज भीमातीरीं। वाट पाहे भक्तांची॥ ३॥ कल्पतरू चिंतामणी। घरीं कामधेनूची दुभणीं। मोतियांचें चौक राजांगणीं। वृंदावनें शोभती॥ ४॥ संत बैसले पद्मासनीं। राया विठ्ठल तुझे चरण ध्यानीं। हरिकीर्तन ऐकोनी कानीं। अंतःकरणीं निवाले॥ ५॥ जें जें चिंतन मानसीं।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तें फळ पावलें अहर्निशी। मुक्ति देऊनि तयासी। अढळपदीं बैसविलें॥ ६॥ सकळ तीर्थें मध्यानकाळीं। येती चंद्रभागेजवळी। विमानें येती अंतराळीं। देव स्नानें करीताती॥ ७॥ धन्य धन्य ऐसे चंद्रभागा तीर्थ। तेथें चतुर्भुज होती प्राणिमात्र। ऐसें आणिक नाहीं क्षेत्र। भूवैकुंठ पंढरी॥ ८॥ मणिकर्णी वैतरणी। स्नान करिजेती अंतःकरणीं। लीन होईल विठ्ठल चरणीं। पापधुणी होईल॥ ९॥ अनंत जन्मांचा उपाव। नामया स्वामी पंढरीराव। देईल वैकुंठीं ठाव। पुनर्जन्म चुकविल॥ १०॥

४२७. एक एकादशी होय पंढरीसी। सुकृताच्या रासी ब्रह्मा नेणें॥ १॥ चंदभागेंतीरीं चतुर्भुज नरनारी। विठ्ठल कैवारी उभा असें॥ २॥ परतून येथें न येसी मागुता। आणिकां सर्वथा ऐसें नाहीं॥ ३॥ क्षीरसागरीचें जिव्हार वैकुंठीचें सार। पुंडलिकें उपकार केला लोकां॥ ४॥ नामा म्हणे आम्हां थोर लाभ झाला। तापत्रय गेला पांडुरंगा॥ ५॥

४२८. अरूप रूपासी आलें। परब्रह्म ठसावलें। भक्ता पुंडलिका फावलें। गौप्य झालें प्रगट॥ १॥ धन्य धन्य भिंवरातट। चंद्रभागा हे निकट। धन्य धन्य वाळुवंट। मुक्तिपेठ पंढरी॥ २॥ धन्य धन्य प्रेमळ। सबराभरित स्वानंद जळ। स्नान केलिया निर्मळ। कोटिकुळें उद्धरती॥ ३॥ धन्य गा हा देशु। जेथें विठ्ठलें केला रहिवासु। नामा विनवी विष्णुदासु। देह समरसु भक्तीचा॥ ४॥

४२९. पांडुरंगाचें नाम बरवें। आवडी घेतली माझ्या जीवें॥ १॥ कैसा देहुडा पाउली उभा। वेणुनादीं गोपाळ वेणु वाहे॥ २॥ आंगीं चंदन चर्चित माळा गळां। भाळी शोभताहे कस्तुरीचा टिळा॥ ३॥ नामा म्हणे धन्य धन्य जिणें। एकवेळां पंढरी पाहणें॥ ४॥

४३०. उठाउठी जावो पंढरीस राहो। आनंदें क्षेत्र पाहों विठ्ठलाचें॥ १॥ नाम वदनीं घ्यावो। चरण हृदयीं ध्यावो। रूप डोळां पाहों विठ्ठलाचें॥ २॥ जीवें भेटी घेवों आनंदभावें गावों। प्रेमसुख घेवों म्हणे नामा॥ ३॥

४३१. बिठोवाच्या गांवा जाईन धांवोनी। घालीन लोळणी चरणांवरी॥ १॥ शिणभाग दवडिला म्हणेल। जीविंचें पुसेल जडभारी॥ २॥ हरुषें लोळत जाईन महाद्वारां। भेटाया सामोरा येईल मज॥ ३॥ उचलोनी सीस पुसील आदरें। मुख पीतांबरें पुसिल माझें॥ ४॥ धरोनि हनुवटी उठवील हस्तकीं। ठेवीन मस्तकीं अभयकर॥ ५॥ राही रखुमाई माता सत्यभामा। कडें घेऊनि नामा स्तनीं लावी॥ ६॥

४३२. धाऊनियां मिठी घालीन संतचरणीं। सांगेन वचनीं मनिंचें गुज॥ १॥ विठोबाचे गांवा न्या रे एकवेळां। फार आहाळला जीव माझा॥ २॥ आनंदाचें जीवन पाहेन श्रीमुख। शोक मोह दुःख हरती माझे॥ ३॥ विटेसहित चरण देईन आलिंगनु। तेणें माझी तनु ओल्हावेल॥ ४॥ तुम्ही आवडते हरीचें अंतरंग। माझे जीवलग प्राणसखे॥ ५॥ नामा म्हणे विठोबा कृपेची माउली। तेव्हां ते साउली करील मज॥ ६॥

४३३. ऐसें तीर्थ कोणी दाखवा सुलभ। जेथें समारंभ हरिकथेचा॥ १॥ तें एक पंढरी विख्यात त्रिभुवनीं। सकळां शिरोमणी चंद्रभागा॥ २॥ ऐसें तीर्थ कोणी दाखवा सुखरूप। जेथें त्रिविध ताप हारपती॥ ३॥ ऐसें तीर्थ कोणी दाखवा सुंदर। गरुड टक्केभार विराजती॥ ४॥ ऐसें तीर्थ कोणी दाखवा निर्मळ। जेथें नासे मळ दुष्टबुद्धि॥ ५॥ नामा म्हणे संतजनांचें माहेर। गात मनोहर गोड वाटे॥ ६॥

४३४. सर्व सुखरासी भींवरेचे तीरीं। आमुची पंढरी कामधेनु॥ १॥ प्रेमामृतें दुभे सदा संतजनां। वोसंडतो पान्हा नित्य नवा॥ २॥ धर्म अर्थ काम मोक्ष चाऱ्ही थानें। दोहोणार धन्य पुंडलीका॥ ३॥ जीयेचें दुभत नित्य नवें वाढें। बहुं पंढरीत पूर्वपुण्य॥ ४॥ भक्तिचेनि बळें भावाचेंनि मेळें। देखोनियां बोले बहु फार॥ ५॥ भाग्यवंत नामा तें क्षीर लाधला। प्रेमें वोसंडला गर्जे नामा॥ ६॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

४३५. पंढरीच्या सुखा अंत पार नाहीं लेखा। शेषा सहस्त्रमुखा न वर्णवेची॥ १॥ पंढरीच्या सुखा तोचि अधिकारी। जन्मोजन्मीं वारी घडली तया॥ २॥ पंढरीस जातां प्रेम उचंबळत। आनंदें गर्जत नामघोष॥ ३॥ विश्वमूर्ति विठो विश्वंभर देखें। विसरला दुःखें देहभाव॥ ४॥ नामा म्हणे त्याचा होईन चरणरज। नुपेक्षील मज पांडुरंग॥ ५॥

४३६. पंढरीची वारी जयाचियें कुळीं। त्याची पायधुळी लागो मज॥ १॥ तेणें त्रिभुवनीं होईन सरता। नलगे पुरुषार्थ मुक्ति चारी॥ २॥ नामाची आवडी प्रेमाचा जिव्हाळा। क्षण जीवा वेगळा न करी त्यासी॥ ३॥ नामा म्हणे माझा सोयरा जिवलग। सदा पांडुरंग तया जवळीं॥ ४॥

४३७. पंढरीचें प्रेम आहे ज्याचे जीवीं। त्याची नित्य नवी करीन आशा॥ १॥ ते माझे सोयरे सुखाचे सद्गुरु। भवसिंधूचा पारु उतरतो॥ २॥ माझ्या विठोबाच्या नामीं ज्या विश्वास। होईन त्यांचा दास आवडीचा॥ ३॥ माझ्या विठोबाच्या चरणीं ज्यांचा भाव। दारवंटा पाय धरीन त्यांचे॥ ४॥ माझ्या विठोबाचे ध्यान ज्याचे मनीं। सांडोवा अंगणीं होईन त्याचे॥ ५॥ ऐसें सर्वभावें माझ्या विठोबा शरण। त्यांचें वंदीन चरण नामा म्हणे॥ ६॥

४३८. अभिमानें लोक जाती वाराणसी। आमुची मिरासी पंढरीये॥ १॥ तीर्थ व्रत नेम मज केशिराजा। पंढरीचा राजा बोळवया॥ २॥ पाउला पाऊली चालती मारग। उभा पांडुरंग मागें पुढें॥ ३॥ नामा म्हणे मज पंढरी विसांवा। दर्शन केशवा पुरे मज॥ ४॥

४३९. जाऊं म्हणतां पंढरी। यम थोर चिंता करी॥ १॥ धरितां पंढरीची वाट। पापें पळालीं सपाट॥ २॥ कळस देखता नयनीं। होय पातकांची धुणी॥ ३॥ घेतां विठोबाची भेटी। दोष जाती उठाउठी॥ ४॥ करितां चंद्रभागें स्नान। सर्व पापा घडे हान॥ ५॥ नामा म्हणे रे केशवा। आम्ही करूं तुझी सेवा॥ ६॥

४४०. वांकडे पाहणें जया लौकिकासी। मज पंढरीसी वास पूरे॥ १॥ उदंड उपास कासया करावे। पुरे एका भावें भाविकांसी॥ २॥ तीर्थक्षेत्र मूळ जाणा वाळुवंट। कटीं कर नीट भक्तासाठीं॥ ३॥ नामा म्हणे माझी वैकुंठ पंढरी। तेथें निरंतर जन्म देई॥ ४॥

४४१. आम्ही स्वर्गसुख मानूं जैसा ओक। देखोनियां सुख पंढरीचें॥ १॥ नलगे वैकुंठ न वांछूं कैलास। सर्वस्वाची आस देवा पायीं॥ २॥ नलगे संतति आणि धन मान। एक असें ध्यान विठोबाचें॥ ३॥ सत्य कीं मायिक आमुचें बोलणें। तुझी मज आण सांग हरी॥ ४॥ जीवभाव आम्ही सांडूं ओंवाळुनि। नामा लोटांगणीं महाद्वारीं॥ ५॥

४४२. वैकुंठासी आम्हां नको धाडू हरी। वास दे पंढरीं सर्वकाळ॥ १॥ वैकुंठ कोपट जुनाट झोंपडी। नको अडाअडी घालूं आम्हां॥ २॥ वैकुंठीं जाऊनि काय बा करावें। उगेंचि बैसावें मौनरूप॥ ३॥ नामा म्हणे मज येथेंच हो ठेवी। सदा वास देई चरणांजवळी॥ ५॥

४४३. नित्य प्रेमाचे पेटे बांधी माझे पोटीं। उतरी जगजेठी पैलपार॥ १॥ निरेभिवरे ऐक्य तीरीं। कां पद्माळा पंढरपुरीं॥ २॥ केलिया रविवारीं आंघोळी। महा दोषां होय होळी॥ ३॥ पाप जायाचे। पद पावाल अच्युताचें॥ ४॥ म्हणाल बोलणें कोणाचें। नामया स्वामी केशवाचें॥ ५॥

४४४. देव गुज सांगे पंढरीसी यारे। प्रेमें चित्तीं घ्यारें नाम माझें॥ १॥ काया वाचा मन दृढ धरा जीवीं। सर्व मी चालवी भार त्यांचा॥ २॥ भवसिंधू तारीन घ्यारे माझी भाक। साक्ष पुंडलीक करूनि बोले॥ ३॥ लटकें जरी असे नामयासी पुसा। आहे त्या भरंवसा नामी माझ्या॥ ४॥

श्रीविठ्ठलस्तुति आणि भक्तवत्सलता

४४५. अवताराची राशी तो हा उभा विटेवरी। शंखचक्रगदापद्मसहित करीं॥ १॥ देखिला देखिला देवा आदि देव बरवा। समाधान जीवा पाहतां वाटे गे माये॥ २॥ सगुण चतुर्भुज रूपडें तेज पुंजाळती।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वंदी चरणरज नामा विनवी पुढती गे माये ॥ ३ ॥

४४६. भक्तांसाठीं देव अवतार धरी। कृपाळू श्रीहरि साच खरा॥ १ ॥ तो हा महाराज चंद्रभागे तीरीं। उभा विटेवरी पांडुरंग॥ २ ॥ ब्रह्मयाचे वेद चोरी शंखासुर। मत्स्य अवतार तयालागीं॥ ३ ॥ समुद्र मंथनीं मंदर बुडाला। कूर्मरूप झाला तये वेळीं॥ ४॥ हिरण्याक्ष धरा नेतां रसातळा। वराहरूपें त्याला वधियेलें॥ ५ ॥ प्रल्हादासी पिता गांजी नानापरी। स्तंभीं नरहरी प्रगटला॥ ६ ॥ देवकाजी झाला वामन भूतळीं। बळीसी पाताळीं घातियेला॥ ७॥ भूमिभार झाला क्षत्रियांचे कुळ। केलेंसे निर्मूळ परशुरामें॥ ८ ॥ सीतेचिया काजा रावण मर्दिला। सूर्यवंशीं झाला रामचंद्र॥ ९ ॥ गोकुळीं जन्मला श्रीकृष्ण आठवा। होऊनि पांडवा साह्यकारी॥ १० ॥ व्रतभंगासाठीं बौद्ध अवतार। झाला दिगंबर अवनिये॥ ११ ॥ कलंकि अवतार होणार श्रीहरि। तेव्हां पृथ्वीवरी तृण न उरे॥ १२ ॥ नामा म्हणे तुझे अनंत अवतार। तेथें मी पामर काय वर्णूं॥ १३ ॥

दश-अवतार-स्थानें.

४४७. होसि भक्तांचा कोंवसा। तुझीं ब्रीदें हृषिकेशा। निवविलें सायासा। कृपासिंधु मुरारी॥ १ ॥ अंबऋषिकारणें। दहा वेळ गर्भवासा येणें। अवतार धरिला नारायणें। गजापूर नगरीं॥ २ ॥ अंदुरायाच्या घरीं। वाळ जळसेनाच्या कुमरीं। मत्स्यरूप अवतार धरी। वेद हरणकैवारी नारायण॥ ३ ॥ विद्यापूर नगरीं। अंधरु राजा राज्य करी। श्रियादेवी त्या सुंदरी। उदरीं कुमरु जन्मला॥ ४॥ पृथ्वी रसातळवटीं। जातां थोर अंदोळली सृष्टी। धांवण्या धांवले जगजेठी। धरा पृष्ठीं सावरिली॥ ५ ॥ मर्गजपुरीं पुरपती। हिरण्याक्ष चक्रवर्ती। अग्नि असे जनवंती। घरीं बाळ वराह॥ ६ ॥ त्रिदशदेवश्रिया चाडा। हिराण्याक्ष वधिला गाढा। भूगोल धरूनियां दाढा। केला निवाडा स्वर्गींचा॥ ७॥ कर्पूर-पुरपाटण। हरिभक्तीचें हें स्थान। सदयादेवी प्रिया नंदन। उदरीं नृसिंह जन्मला॥ ८ ॥ पित्या पुत्रा झाली कळी। स्तंभीं प्रगटला तये वेळीं। असुर मारिला करकमळीं। भक्त प्रल्हाद रक्षिला॥ ९॥ कश्यपनंदनवर्धन। कोंवळादशाचा वामन। खुजट रूप धरून। महेंद्रपुरीसी आला॥ १० ॥ दानें तपें व्रतें बळी। तोही घातला पाताळीं। अद्यापि राहिला जवळी। चरणतळीं पद देउनी॥ ११ ॥ रेणापुरीं देवी रेणुका। लाधली जमदग्नीस देखा। तिचे उदरीं विश्वतारका। परशुराम जन्मला॥ १२॥ असुरीं वधियेली माया। म्हणे धांवें पुत्रराया। अवचित पातला धांवया। सहस्त्रार्जुन मारिला॥ १३ ॥ अयोध्या नाम नगरीं। जन्म कौसल्ये उदरीं। देवभक्तांचा कैवारी। दशरथनंदन राघव॥ १४ ॥ राम त्रैलोक्यीं वीर दारुण। तेणें वधियेला रावण। अढळपद देऊन। राज्यीं बिभीषण स्थापिला॥ १५ ॥ मथुरा नामें नगरीं। वसुदेव देवकी उदरीं। कृष्ण आठवा अवतारी। लीला विग्रहि जन्मले॥ १६ ॥ कंस चाणूर मर्दिले। विमळार्जुन उन्मळिले। सप्त गर्भांचे सूड घेतले। रक्षिलें गाईगोपाळां॥ १७॥ बौद्ध श्रीवत्साच्या घरीं। जन्म शांभवीच्या उदरीं। राजा कांतिये नगरीं। निरंतर रूपें राहिला॥ १८ ॥ ध्यान मुद्रा मांडूनियां। वस्त्रें वस्त्रें त्यजूनियां। राहिला पैं निरंजनिया। भक्तिभाव ओळखे तो॥ १९ ॥ कल्कि जसरायाचा पुत्र। सावित्री देवीचा कुमर। शंभलापुरीं करील अवतार। दाही रूपें प्रगटला॥ २० ॥ ऐसा अमूर्त मूर्ति विटेवर। उभा राहिला निरंतर। विष्णुदास नाम्याचा दातार। वर विठ्ठल पंढरीये॥ २१ ॥

४४८. देवा तूं प्रथम गर्भवास भोगिसी। सागरीं जळचरु मत्स्य झालासी। कर्मठ पाठी न संडी कैसी। कूर्मे कासाविसी केलें तुज॥ १ ॥ अपवित्र नाम आदि वराह। याहूनि थोर कूर्म कांसव। अर्ध सावज अर्ध मानव। हे भवभाव कर्मांचे॥ २॥ खुजेपणें बळीस पाताळीं घातलें। तेणें कर्मे तयाचें द्वार रक्षिलें। पितयाचे वचनें मातेसी वधिलें। तें कर्म जडलें परशुरामा॥ ३ ॥ श्रीरामा झाल्या आपदा बहुता। कर्मे भोगविलें अंतरली सीता। भालुका

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तीर्थी वधियलें अवचिता। नाम अच्युता तुज झालें॥ ४॥ ऐसा कष्टी होऊनि बौद्ध राहिलासी। तूं कलंकिया लोकां मारिसी। आपल्या दोषासाठीं आणिकां दंडिसी। निष्कळंक होसी नारायणा॥ ५॥ ऐसा तूं बहुता दोषी बांधिलासी। पुढिलाचि जन्में अवगतोसी। विष्णुदास नामा म्हणे हृषिकेशी। तुझी भीड कायसी स्वामियाहो॥ ६॥

४४९. प्रथम अवतारीं देव मच्छ झाले सागरीं। वधोनि शंखासुर वैरी आणिले वेद॥ १॥ कूर्म अवतारीं सांवरीली सृष्टी। वराहद्विज नेहटी धरणीधरु॥ २॥ प्रल्हाद कैवारा स्तंभाभीतरीं। बळी बंधन हरी प्रगट झाला॥ ३॥ रेणुका द्विजकुळ पाळण। त्रिंबक भजन रघुनाथ॥ ४॥ गोकुळीं अवतारु सोळा सहस्त्र वरु। आपण योगेश्वरु बौध्यरूपीं॥ ५॥ कल्की अवतारु वदतसे वरु। नामया दातारु केशिराज॥ ६॥

४५०. मत्स्य कच्छ क्रीड मृग ते खुजट। जेथूनि प्रगट झालीं रूपें॥ १॥ तेंचि ब्रह्म उभें भिंवरेच्या तीरीं। हात कटावरी ठेवूनियां॥ २॥ मातृघाती हिंडे वनीं जो रडित। चोर जार घात करी दुष्ट॥ ३॥ दिगंबर अश्वारूढ खड्गधारी। पृथ्वीचा जो करी ग्रास एक॥ ४॥ नामा म्हणे मुंगी आदि ब्रह्मवरी। नाना अवतारीं एकलाचि॥ ५॥

४५१. अंगाचीये सेज फणि छाया धरी। सहस्त्रमुखीं करी स्तुति शेष॥ १॥ परि तयातें तुझें चरित्र अकल्पित। तेथें माझें गीत कोणीकडे॥ २॥ कैशापरी तुज आम्ही ध्यावें देवा। हें वर्म केशवा सांग मज॥ ३॥ मार्कंडेयो भूशुंडी लोमहर्ष अगस्ति। करितां तुझी स्तुति कल्प गेले॥ ४॥ ध्यानीं पाहतां तुज न पवती योगी। तेथें मी तो रोगी कोणीकडे॥ ५॥ ब्रह्मचर्यव्रत आचरती देव। ऋषिमुनि सर्व करिती सेवा॥ ६॥ परि तुवां गर्व हरिला तयांचा। तेंथें माझी वाचा कोणीकडे॥ ७॥ इतुकें ऐकोनि बोले केशिराज खुणें। आरुता येई म्हणे नामयासी॥ ८॥ मुखीं माझें नाम हृदयीं धरूनि प्रेम। हेंचि तुज वर्म सांगितलें॥ ९॥

४५२. चारी वेद तुझ्या नांदती नगरीं। तेथें मीं भिकारी काय वानूं॥ १॥ वर्णितां पार नेणें चतुरानन। तेथें मीं अज्ञान काय जाणें॥ २॥ अंगलग सेवक शेषाच्या सारिखा। तेथें माझ्या लेखा कोणीकडे॥ ३॥ कैलासीचा राणा करितसे ध्यान। तेथे भ्रांत मन कोठें रिघे॥ ४॥ इंद्रासहित देव जेथें ओळंगणें। तेथें दास्य करणें घडे कांहीं॥ ५॥ नामा म्हणे केशवा काय म्यां करावें। तुझे पायीं रहावें कैशापरी॥ ६॥

४५३. वेदां नकळे पार श्रुती अगोचर। उपनिषदां सार नकळेचि॥ १॥ तो हरि गोकुळीं वसुदेवा कुळीं। यशोदेजवळी बाळकृष्ण॥ २॥ ब्रह्मादिक वंदिती शिवादिक ध्याती। शास्त्रांसी तों गति नकळेचि॥ ३॥ योग्यांचें चिंतन मुनींचें अंजन। शेषादिकां ध्यान सदा ज्याचें॥ ४॥ पुराणें भागलीं आचारें श्रमलीं। बोलतां राहिलीं साधुवृंदें॥ ५॥ नामा म्हणे तो हा विठ्ठल पंढरी। नाममात्रें तारी सकळांसी॥ ६॥

४५४. सहस्त्र तोंडाचा तोहि भागियेला। अंत नाहीं ज्याला गुणालागीं॥ १॥ तेथें मीं पामर काय बोलूं वाणी। तुझी कीर्ति जनीं कांय कैसी॥ २॥ यथामति कांहीं बोलियलों बोल। तोचि हा विठ्ठल नामा म्हणे॥ ३॥

४५५. अगणित गुण वर्णिती पुराणें। पंढरीचे राणे ख्याती जगीं॥ १॥ अलक्ष भेटी लक्षिताची नाहीं। पुंडलिकें कांहीं तप केलें॥ २॥ युगें गेलीं अठ्ठावीस ते अझुनी। उभा चक्रपाणि राहिलासी॥ ३॥ वेद म्हणती नेति पुराणें तें किती। भांबावल्या मती म्हणे नामा॥ ४॥

४५६. खोल बुद्धीचा तो देवकीनंदन। उभा तो गे बाई॥ १॥ नंदनंदन संतांचें जीवन। उभा तो गे बाई॥ २॥ कामिनी मनोहर नामया दातार। उभा तो गे बाई॥ ३॥

४५७. फेडूनि पीतांबर उभा दिगंबर। कटी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ठेवूनि कर वाळवंटीं ॥ १ ॥ मोतियांचे हार सांडूनि रत्नकीळा। तुळशीच्या माळा गळां घाली॥ २॥ पर्यंक शयन शेषाचें आसन। सांडूनि निधान उभा विटे॥ ३॥ सांडूनियां भक्त सनकादिकीं प्रेमा। कलियुगीं नामा आवडला॥ ४॥

४५८. पुंडलिकाचे भेटीं आणि भीवरेचे तटीं। परब्रह्म उभें वाळुवंटीं माये॥ १॥ उभा वीटेवरी कर ठेवूनि कटावरी। उभा भीमातीरीं जगजेठी गे माय॥ २॥ विठ्ठल कान्हा चरणीं वांकी तोडर। कासे पीतांबर पदकलीळा मनोहर गे माय॥ ३॥ कान्हा विठ्ठल कान्हा प्रसन्नवदन थोरा। जो आथी करुणाकरा हरि नामया दातारा॥ ४॥

४५९. देहुडा चरणु वाहातुसे वेणु। गोपिकारमणु स्वामी माझा॥ १॥ देखिला गे माय यमुनेचें तीरीं। हात खांद्यावरीं राधिकेच्या॥ २॥ गुंजावर्ण डोळे शिरीं बाबर झोटी। मयूर पिच्छ वेष्टी शोभतसे॥ ३॥ सगुण मेघःश्याम लावण्य सुंदर। नामया दातार केशवराज॥ ४॥

४६०. हरि भोळा हरि भोळा। आम्हीं डोळां पाहिला॥ १॥ हरि श्रेष्ठ हरि श्रेष्ठ। आम्हां कष्ट नाहीं ते॥ २॥ हरि उदार हरि उदार। आम्हां धीर होईना॥ ३॥ नामा म्हणे हरि दाता। आम्हां दासां रक्षितो॥ ४॥

४६१. अधरीचें अमृत सेविसी एकलारे। काय पुण्य केलें नेणों पावया॥ १॥ तुळशीच्या माळा शोभति गोपाळा। तयाहूनि आगळा पावया तूं॥ २॥ सोळासहस्र गोपी बोलतील प्रौढी। अधरींचीं गोडी नेली तुवां॥ ३॥ विष्णुदास नामा केशवीं सौरस। उद्धरिला वंश पावया तुवां॥ ४॥

४६२. वैकुंठ तें घर। सांडूनियां निरंतर॥ १॥ तो हा पुंडलिका द्वारीं। उभा कर कटावरी॥ २॥ क्षीर सागरींची मूर्ती। तो हा रुक्मिणीचा पती॥ ३॥ नये योगियांचे ध्यानीं। छंदें नाचतो कीर्तनीं॥ ४॥ नामा म्हणे आला। सवें परिवार आणिला॥ ५॥

४६३. अनंता श्रीधरा गोविंदा केशवा। मुकुंदा माधवा नारायणा॥ १॥ देवकीतनया गोपिकारमणा। भक्त उद्धरणा त्रिविक्रमा॥ २॥ मकर कुंडलें श्रवणीं शोभती। एकावळी दीप्ति तेजें भारी॥ ३॥ नामा म्हणे तुझा नकळेचि पार। भजा निरंतर सर्वकाळ॥ ४॥

४६४. उभा विटेवरी भक्तांचा कैवारी। भेटावया उभारी दोन्ही बाह्या॥ १॥ गुण दोष त्याचें न पाहेची डोळां। भेटे वेळोवेळां केशिराज॥ २॥ ऐसा दयावंत घेतो समाचारु। लहान आणि थोरु सांभाळितो॥ ३॥ सर्वांलागीं देतो समान दर्शन। उभा तो आपण समपायीं॥ ४॥ नामा म्हणे तया भक्तांची आवडी। भेटावया कडाडी उभा ठेला॥ ५॥

४६५. सत्यसंकल्पाचा कर्ता जो विश्वाचा। अनाथ जीवांचा मायबाप॥ १॥ पुंडलिकें तया आणिलें रंगणीं। कटावरी पाणि ठेवूनियां॥ २॥ अणुरेणुमाजि व्यापूनि राहिला। आनत्व जाहला एकलाचि॥ ३॥ नामा म्हणे वेद त्यालागीं बोभाय। जोडोनियां पाय उभा ठाके॥ ४॥

४६६. तुझिया सत्तेनें वेदासी बोलणें। सूर्यासीं चालणें तुझिया बळें॥ १॥ ऐसा तूं समर्थ ब्रह्मांडाचा धनी। वर्म जाणूनि शरण आलों॥ २॥ मेघांनीं वर्षावें पर्वतीं बैसावें। वायूनें विचरावें सत्ते तुझे॥ ३॥ नामा म्हणे कांहीं न हाले साचार। प्रभु तूं निर्धार पांडुरंगा॥ ४॥

४६७. अच्युता अनंता। श्रीधरा माधवा। देवा आदिदेवा पांडुरंगा॥ १॥ कृष्णा विष्णु हरि गोविंदा वामना। तूंचि नारायणा नामधारी॥ २॥ मुकुंदा मुरारी प्रद्युम्ना केशवा। नामा सदाशिवा शांतरूपा॥ ३॥ रूपातीत हरी दाखवी सगुण। निरंतर ध्यान करी नामा॥ ४॥

४६८. पंढरीचा देव सत्सच्चित अद्वय। तूंचि बापमाय पांडुरंगा॥ १॥ सगुण निर्गुण दाविसी प्रकार। दाही अवतार निमित्तासी॥ २॥ ऐसा माझा स्वामी समर्थ गोविंद। निरंतर छंद हरिनामीं॥ ३॥ नामा म्हणे कांहीं न धरिसी लाज। भाविकांसी गुज कानीं सांगे॥ ४॥

४६९. दुःखाची निवृत्ति सुखाचें तें सुख।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पाहतां श्रीमुख गोविंदाचें ॥ १ ॥ रंगणी रांगत गुलगुला बोलत। असूर रुळत चरणातळीं ॥ २ ॥ नामा म्हणे हातीं लोणियाचा उंडा। गौळणी त्याच्या तोंडा भुललिया ॥ ३ ॥

४७०. श्रीधरा अनंता गोविंदा केशवा। मुकुंदा माधवा नारायणा ॥ १ ॥ देवकी तनया गोपिकारमणा। भक्त उद्धरणा केशिराजा ॥ २ ॥ मकरकुंडल श्रवणीं शोभती। येकावळी दिप्ति सृष्टि लोपे ॥ ३ ॥ नामा म्हणे तुझा न कळेचि पार। भजे निरंतर भक्तजन ॥ ४ ॥

४७१. केशिराजा आदि सकळा अनादि। तूंचि कृपानिधि नारायणा ॥ १ ॥ अव्यक्ता अक्षरा सर्व अविनाशा। अगा पंढरीशा पांडुरंगा ॥ २ ॥ तूंचि ब्रह्मचारी गोपिकांचे घरीं। सर्वस्वें उद्धरी सर्व जीवां ॥ ३ ॥ लटिकें दाविसी गोकुळाभीतरीं। नामा म्हणे शिरीं भार वाही ॥ ४ ॥

४७२. अनंत हे कळा अनंत हे लीळा। अनंत जयाला वेद गाती ॥ १ ॥ तोचि पांडुरंग पंढरीचा राजा। धणी झाला वोजा भावबळें ॥ २ ॥ अनंत तयाच्या सेवा वोजावणी। नामरूप गुणीं नामातीत ॥ ३ ॥ नामा म्हणे अंत असेना तो कांहीं। सांपडतो पाहीं पंढरीये ॥ ४ ॥

४७३. देव दाखवी असा नाहीं गुरु। जेथें जाय तेथें दगड शेंदरु ॥ १ ॥ देव दगडाचा बोलेल कैचा। कोणे काळीं त्यास फुटेल वाचा ॥ २ ॥ देव देव करितां शिणलें माझें मन। जेथें जाय तेथें पूजा पाषाण ॥ ३ ॥ नामा तोचि देव हृदयीं पाहे। नामा केशवाचे न सोडी पाय ॥ ४ ॥

४७४. वाळवंटीं उभा करें कुरवाळिलें। जीवीचें पुसेल जडभारी ॥ १ ॥ हरुषे लोळणी घालूं महाद्वारीं। येईल सामोरी केशिराज ॥ २ ॥ शोभतसे पायीं भक्त ब्रिदावळी। जिवासी सांभाळी दीनानाथ ॥ ३ ॥ माझा अभिमान धरून मानसीं। नामा म्हणे होसी भक्ता साह्य ॥ ४ ॥

४७५. करुणा बहुत तुझ्या चरणापाशीं। धांवोनि हृषीकेशी आलो सर्व ॥ १ ॥ वाळुवंटीं उभे पताकांचे भार। पाहोनि शंकर वेडावला ॥ २ ॥ सूर्य चंद्रादिक घालिती लोटांगण। करी प्रदक्षिणा स्वयें गंगा ॥ ३ ॥ नामा म्हणें ऐसें सांगतां बहुत। वेदशास्त्र ग्रंथ ठकावले ॥ ४ ॥

४७६. देव आपण नाटक। भक्तां दाखवी वैकुंठ ॥ १ ॥ देव आपण संसारीं। होसी भक्तांचा साहकारी ॥ २ ॥ देव आपण निराळा। भक्तां दावितो सोहळा ॥ ३ ॥ नामा म्हणे भक्तांसाठीं। हात जोडी जगजेठी ॥ ४ ॥

४७७. गोविंद गुणाचें निधान। गोविंद नयनींचें अंजन। गोविंद बाळकाचें स्थान। गोविंद चिंतन योगियांचें ॥ १ ॥ गोविंद पांघुरे कांबळा। गोविंद कृपेचा कोवळा। गोविंद भवालागीं भोळा। गोविंद अजामेळा उद्धरिले ॥ २ ॥ गोविंद बुद्धीची बुद्धि। गोविंद एकली मांदी। गोविंदें हरिली विघ्नव्याधि। गोविंद सिद्धि स्मरलिया ॥ ३ ॥ गोविंद गोकुळपाळक। गोविंद अंगवणें एक। गोविंदें दैत्या लावियेला धाक। गोविंद शेष शयनीं ॥ ४ ॥ गोविंद आडलिया काजा कैवारी। गोविंद बुडतियांतें तारी। गोविंद सोळा सहस्त्र नारी। गोविंद बाळ ब्रह्मचारी ॥ ५ ॥ गोविंद दान दीक्षा गुरु। गोविंदें अढळ केला धुरु। गोविंद नामया दातारु। रुक्मिणीवरु गोविंदु ॥ ६ ॥

४७८. विठ्ठल माउली कृपेचि सावली। आठवितां घाली प्रेम पान्हां ॥ १ ॥ न सांगतां सर्व जाणे तहान भूक। जवळी व्यापक न विसंबे ॥ २ ॥ माया मोह कैसा करावा सर्वथा। अंतरींची व्यथा तोचि जाणे ॥ ३ ॥ सुखशांति रूपें लेवविली अंगीं। लागो नेदी धगी संसाराची ॥ ४ ॥ देऊनि अभय करें कुरवाळी। करीत सावली पीतांबरें ॥ ५ ॥ मुखीं नाम माळा कीर्तन श्रवणीं। लेवविली लेणीं नवविध ॥ ६ ॥ नयनीं अंजन सूदलें सांवळें। समाधान झालें सर्व अंग ॥ ७ ॥ अच्युत अनंत सुवर्णाची पेटी। घातलीसे कंठीं निर्विकार ॥ ८ ॥ चतुर्भुज शोभा रूप मध्यें मणि। प्रभा त्रिभुवनीं विराजित ॥ ९ ॥ मुक्तलग शुद्ध बिंदुली गोजिरी। पद्महस्त शिरीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्थापितसे ॥ १० ॥ संत पायरज कपाळीं टिळका। नाहीं भय शंका कलिकाळा ॥ ११ ॥ सगुण साजिरा कटीं कडदोरा। अवर्ण दुर्भरा दृढ बोधू॥ १२ ॥ काम क्रोधादिक करूनि पुतळे। पाय जे घातले पायवाट ॥ १३ ॥ वासनेचि दृष्टी लागेल त्या झणीं। उभा चक्रपाणि मागें पुढें॥ १४॥ संतपायीं नामा शृंगार मंडितु। अखंड क्रीडतु महाद्वारीं॥ १५ ॥

४७९. एक गोक्षीर धाम धवळा। एक तो सहज मेघ सांवळा। एक कंठीं रुंडमाळा। एक गळां वैजयंती॥ १॥ एक तो वृषभारूढ जाण। एका साजे गरुडवाहन। एक स्मशानीं भस्मोद्धूळण। एका शयन क्षीरसागरीं॥ २॥ एक भोळा कैलासीं चक्रवर्ती। एक तो वैकुंठाधिपती। एका सुरवर मुगुटीं वंदीती। एका अंगुष्ठीं गंगा वाहे॥ ३ ॥ एकाचे चरणीं नेपुरे झणत्कारू। एका पायीं रुळें तोडरु। एका परिधान व्याघ्रांबरु। एका पीतांबरू कसियेला ॥ ४॥ एका नरकपाल खट्वांग डमरु त्रिशूळ। एका शंख चक्र गदा कमळ। एका अर्धांगी हैमवती बाळ। एका कमळा वामभागीं ॥ ५ ॥ एक त्रिपुर संधानीं लक्ष न चुके। एकबाणें वाली वधिला कौतुकें। विष्णुदास नामा एक रूप देखे। हरिहर कौतुके वर्णीतसे॥ ६ ॥

४८०. अपराधाविण बळी। घातला पाताळीं। सवें कणव उपजली। द्वार राखिसी तयाचें॥ १ ॥ गाऱ्हाणें सांगावें कवणा। केशव सुजाणा। कोणी आणिक तुजविणा। नाहीं दुसरा आम्हांतें॥ २ ॥ बाळमित्र सुदामा सवें जेवी। धान्य जो मागें गांवोगांवीं। विपत्ति त्याची दूर व्हावी। म्हणून दिधली राणीव॥ ३ ॥ तुझें नाम न तोंडीं। वसुदेव देवकीं बांधोडीं। कंसा केली धांदडीं। ऐसी विपत्ति दाखवूनि॥ ४॥ इंद्र वर्षे शिळा धारा। पर्वत केला सामोरा। इंद्रा लाविला दरारा। एवढी विपत्ति दाखवूनि॥ ५॥ जो हरी सुदलें पांडवा। सवेंचि उपजली कणवा। त्यासी केला त्वां रिधावा। आंगीं पाहण्या धांवसी॥ ६ ॥ सभा पिशूनाची दाटलीं। द्रौपदी काया आंसुडलीं। तिये वस्त्रें पुरविलीं। येवढी आपदा दाखवूनी॥ ७॥ दैत्यें गांजिला प्रल्हादू। तुझ्या नामाचा प्रसादु। ऐसा करूनि विनोदु। तया दैत्या वधियेला॥ ८ ॥ बिभीषण हाणितला लाथां। लंका दिधली त्या उचिता। कृपा करें रघुनाथा। समर्थ केला तये वेळीं॥ ९ ॥ गजेंद्र पानेडी। धरिला यमदूत सुसरी। वैकुंठीहूनि घालिसी उडी। येवढी आपदा दाखवूनि॥ १०॥ आम्हां डिंगराचें बोलणें। अनाथनाथा परिसणें। विष्णुदास नामा म्हणे। शहाणें व्हावें यापरतें॥ ११॥

४८१. दुरोनि ओळंगील्या अविनाश देताहे। तो जवळीं जाता काय देईल नेणो॥ १ ॥ ऐसा तूं कृपाळू लक्ष्मीचा कांत। सांडूनि होतात कष्टी झणी॥ २॥ सेवा माझा स्वामी वैकुंठनायक। भुक्तिमुक्तिनायक पांडुरंग॥ ३॥ साधिलें नगर देऊनियां शिर। कष्ट दशशिरें एवढें केलें॥ ४॥ तें दिलें बिभिषणा एका नमस्कारा। त्या माझ्या उदारा कां न भजा॥ ५॥ मांडीवरी बैसो नेदी सापत्न माता। म्हणे राजसुता नव्हसी तूं॥ ६ ॥ हे ऐकोनि वना जाय तो तत्वता। सकळ देवा माथां वरिष्ठ केला॥ ७॥ दुर्योधनें भोजना बहु केलें सायास। परि न घे ग्रास तया घरीं॥ ८॥ विदुराचे घरी न पुसतां जाय। भक्ति प्रिय होय स्वामी माझा॥ ९॥ अर्जुनाचे कार्जी सांडीं निज पैजा। सुदर्शन वोजा धरियले॥ १०॥ आपण लटिका झाला भीष्म साच केला। काळाचा अमुला स्वामी माझा॥ ११॥ दीक्षित अवदान देती निज करीं। परि मुख न करी तयांकडे॥ १२॥ सुदाम्याचे पोहे देखे दृष्टिभरी। तयासी श्रीहरी पसरी हात॥ १३॥ म्हणोनि हा गावा म्हणूनियां ध्यावा। तोचि आराधावा हृदयकमळीं॥ १४॥ हरिगुण नाम हेंचि प्रिय आम्हां। कीर्ति गाय नामा होऊनि भाट॥ १५॥

४८२. अज्ञान बाळकें तुझा हाकारा केला। तेणें तये वेळां स्वर्ग भेदिला। ऐकुनि तो धाविन्नला। अहो देवि खेचरें॥ १॥ स्तंभीं प्रगटलीसें हाक। कापिन्नलें तिन्ही लोक। भेणें पळती शंखादिक।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आणि कैलास आंदोळले ॥ २ ॥ आली त्रिभुवनदेवता। नाभी नाभीरे म्हणता। माझा प्रल्हाद केउता। तों कवणें रे गांजीला ॥ ३ ॥ वदन पसरुनि विक्राळ। झरझरीत झरे लाळ। नेत्र जैसे वड़वानळ। शोषूं पाहे जळनिधि ॥ ४ ॥ संहार झाला नागकुळ। भ्याले अष्टहि लोकपाळ। स्वर्गी सुटली खळबळ। अमरावति इंद्रासी ॥ ५ ॥ मग दैत्यातें पाचारित। लोह खणखणा वाजत। हाकीं अंबर गर्जत। तेणें कांपे मेदिनी ॥ ६ ॥ कवटाळुनि चहूं हातीं। विदारिलें चपेटघातीं। जैसा रुद्र प्रळयांतीं। तैसा हरी दिसतसे ॥ ७ ॥ दैत्य न मरे कवणे परी। मग तो धरिला जान्हुवरी। देखें उदर फोडूनि सत्वरी। अस्थि चूर्ण केली या ॥ ८ ॥ मौजे नाचती देवता। मुक्ति दिल्ही दैत्यनाथा। नामया स्वामी वरदहस्ता। अभयदाता भक्तांसी ॥ ९ ॥

४८३. अणिमादि सिद्धी जयाचिया दासी। उणें तयापासीं काय आहे ॥ १ ॥ आणिकाचे द्वारीं सांडोवा पै हौसी। धिग धिग न लाजसी अरे जना ॥ २ ॥ सुलभ सोपारा सेवा माझा स्वामी। म्हणता जोडे नामीं एक वाचे ॥ ३ ॥ अजामेळ वैकुंठा एक नेला नामें। गणिका विमानें स्वयें नेली ॥ ४ ॥ ऐसा हा कृपाळू आसनीं शयनीं। न विसंबावा मनीं भाग्यवंतीं ॥ ५ ॥ जटायु पक्षियाचें स्वयें झाला लेकरू। त्याचा क्रियापारु केला रामें ॥ ६ ॥ शबरीचीं फळें उच्छिष्टेंही खाय। ना विसरती पाय कैसे प्राणी ॥ ७ ॥ शाहाणिया द्वारपाळ म्हणतां लाज थोरी। जरी झाला भिकारी न साहे ॥ ८ ॥ तो बळीचा द्वारपालु सारथी पार्थाचा। तो गोसावी आमुचा देवराणा ॥ ९ ॥ गर्भवास तया न होतीरे जना। म्हणोनि लोक भजना प्रवर्तले ॥ १० ॥ अंबऋषिराया सांपडले सायास। साहिला गर्भवास सकळ देवें ॥ ११ ॥ उच्छिष्ट हेंचि खातां प्रायश्चित असे। तो गोपाळाचें कैसें खाय हरी ॥ १२ ॥ त्या सुखा सुरवर जन्म इच्छिताती। म्यां ऐसा लक्ष्मीपति कां न सेवावा ॥ १३ ॥ म्हणोनि सोइरा आन दुजा नाहीं। गुरु पिता पाहीं हाचि बंधु ॥ १४ ॥ सज्जन सांगती अनेक नाहीं आम्हां। कीती वर्णी नामा होउनि भाट ॥ १५ ॥

४८४. देवा तूं जया होसी प्रसन्न। तया न लगे कर्मबंधन। निकें म्हणती सकळ जन। नीच लोक वंदिती ॥ १ ॥ तुझी दृष्टी कृपावंता। जयावरी पडे अनाथनाथा। तया न बाधी संसारव्यथा। सर्वस्व त्याचें हरीसीं ॥ २ ॥ माती धरिल्या होय कनक। भोग भोगिती परममूर्ख। नाढळती महादोष। मुखीं नाम गर्जतां ॥ ३ ॥ धन्य धन्य ते संसारीं। पुरुष अथवा हो नारी। दरिद्र नाहीं त्यांचे घरीं। तूं श्रीहरि सानुकुळ झालिया ॥ ४ ॥ ऋद्धि सिद्धी द्वारा वोळंगती। वैरी दास्यत्व करिती। विषें अमृतें होती। तूं श्रीपति सानुकूल झालिया ॥ ५ ॥ येथूनि नेसील परते। नामा म्हणे वैकुंठातें। लक्षा नये चहूं वेदां तें। नाना मतें धुंडाळितां ॥ ६ ॥

४८५. पांडव भाग्याची वर्णावया थोरी। शेषाची वैखरी न वर्णवे ॥ १ ॥ पीतांबर कास घालूनि वनमाळी। काढी उष्टावळी आवडीनें ॥ २ ॥ विधीचा जनक रमा ज्याची दासी। ध्यान अहर्निशीं करी शिव ॥ ३ ॥ रोमीं जयाचे ब्रह्मांडें अनंत। चारी वेदां अंत न कळे ज्याचा ॥ ४ ॥ नामा म्हणे राबे भक्तांचिया घरीं। भाव देखोनि हरि भुलतसे ॥ ५ ॥

४८६. नेणें साही शास्त्रें तुज केशिराजा। स्वरूपें कुबजा काय होती ॥ १ ॥ न मागें मी तैसा न मागें मी तैसा। न मागें मी तैसा कदा काळीं ॥ २ ॥ कौरवांचें काजीं घेसीं गाढेपण। धर्मा घरीं पूर्ण घोडे धुसी ॥ ३ ॥ नामा म्हणे आम्हीं कीर्ती वाखाणावी। भक्तांसी गोसावी होसी देवा ॥ ४ ॥

४८७. पाला खाऊनियां धाला बहिणी घरीं। भक्ति लागीं हरि वेडा झाला ॥ १ ॥ सुदाम्याचे पोहे कोरडेचि खाय। मटमटां पाहे चहूंकडे ॥ २ ॥ विदुराच्या कण्या खाय धणीवरी। झाला बळिचे द्वारीं द्वारपाळ ॥ ३ ॥ नामा म्हणे हरिचे न कळती पवाडे। नेणों भक्तांपुढें वेडा झाला ॥ ४ ॥

४८८. काय वाणूं आतां पायाचा महिमा। जेथें झाली सीमा बोलायाची ॥ १ ॥ विठोबाचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पाय आठवितां मनीं। गेलें हरपूनि भवभय॥ २॥ पाय नारदाचे हृदयीं धरितां। ब्रह्मांडी मान्यता झाली त्याची॥ ३॥ सनकादिकां लागीं पाय वज्र कवच। ब्रह्मादि देवांस पद जेणें॥ ४॥ लागतांचि पाय शिळा दिव्य झाली। पाषाण तारिले उदकावरि॥ ५॥ पाय ते रमेचें सौभाग्य साजिरें। योगि ऋषीवर थोर जेणें॥ ६॥ नामा म्हणे मनीं पाय सर्वकाळ। म्हणोनि सुकाळ आनंदाचा॥ ७॥

४८९. उभा भीमातीरीं कर कटावरी। राहे निरंतर भक्तांपुढें॥ १॥ भक्तभाग्य थोर नव्हें कधीं प्राप्ती। जाणोनी श्रीपती गुज बोले॥ २॥ गणिका गजेंद्र उद्धव नारद। आपण गोविंद मिळोनियां॥ ३॥ समुद्रमंथनीं उभा करोनिया। लागतसे पायां नामा म्हणे॥ ४॥

४९०. गगनीं ध्रुव तुंवा अढळ पै केला। तो बाळ धाकुला न म्हणसी॥ १॥ अजामेळाचे तुवा चुकविलें संकट। ब्राह्मण तो नष्ट न म्हणसी॥ २॥ प्रल्हादाचा तुवां केला कैवारु। वैऱ्यांचा कुमरु न म्हणसी॥ ३॥ गजेंद्रपशु सोडविला पानडिये। मृगखोडी ऐसिये न म्हणसी॥ ४॥ रुक्मांगदाची तुवां उद्धरिली नगरी। विषयीं मुरारी न म्हणसी तया॥ ५॥ ऐसे अपराधी न म्हणसी देवा। नामा तो केशवा विनवीतसे॥ ६॥

४९१. खगावरी स्वारी करूनियां देवा। धांवसी केशवा भक्तांसाठीं॥ १॥ रामा परशुरामा कृष्णा नारायणा। हरि संकर्षणा भक्तासाठीं॥ २॥ बिभीषण तारी रावणाशी मारी। दावी भाव हरी भक्तांसाठीं॥ ३॥ नामा म्हणे भक्ताकारणें गोविंदा। घेऊनियां गदा उभा ठासी॥ ४॥

४९२. कौस्तुभ सोज्वळ कंठीं शोभताहे। भक्तांसाठीं बाहें उभारिली॥ १॥ आन हितासाठीं करिसी धांवण्या। विदुराच्या कण्या गोड करी॥ २॥ ब्रह्मचारी साक्ष सत्यत्वें करिसी। पुढें तूं धांवसी आवडीनें॥ ३॥ वचना अंतर पडो नेदी सत्य। नामा म्हणे भृत्य होसी देवा॥ ४॥

४९३. दर्दुराचें पिलूं म्हणे रामकृष्ण। नाहीं उदक उष्ण झालें तेथें॥ १॥ कढईमध्यें बाळ करी तळमळ। गोविंद गोपाळ पावे वेगीं॥ २॥ तये काळीं आज्ञा केली पावकासी! झणीं तापविसी तयालागीं॥ ३॥ ऐसा तो कृपाळु आपुलिया दासा। आमुचा कोंवसा नामा म्हणे॥ ४॥

४९४. देवा पांडुरंगा वासुदेवा हरी। गोविंदा मुरारी नारायणा॥ १॥ नारायणा कृष्णा कमळलोचना। माधवा प्रद्युम्ना रावणारी॥ २॥ रावणारि होसी जानकी टाकूनी। हिंडसी अंगणीं अर्जुनाच्या॥ ३॥ अर्जुनाच्या घरीं अंगें घोडे धुसी। लज्जा द्रौपदीची राखियेली॥ ४॥ राखशील द्वार भक्ती बळिवंता। नामा म्हणे आतां काय सांगूं॥ ५॥

४९५. भरतें त्यागिली जननी। ख्याती झाली त्रिभुवनीं॥ १॥ ऐसी भक्ति तुझी हरि। जगीं करंटा न करी॥ २॥ बंधु अवज्ञी बिभिषणा। प्रकट झाला रामराणा॥ ३॥ प्रल्हाद पितृ आज्ञा न करी। स्तंभीं प्रगटला नरहरी॥ ४॥ पति अवज्ञा ऋषिपत्न्यांसी। कृष्णदर्शन पूर्ण त्यासी॥ ५॥ नामा म्हणे भक्ता अवरोधी पाही। त्यासी त्यजिल्या दोष नाहीं॥ ६॥

४९६. पंढरीचा देव बहुत कोंवळा। सगुण सांवळा सारथि हा॥ १॥ सारथि सर्वांचा साक्षिभूत असे। संकटीं सायासें गजेंद्रासी॥ २॥ गजेंद्रासी रक्षी गणिका उद्धरी। भिल्लीणीचे करीं फळें भक्षी॥ ३॥ भक्षी सुदाम्याचे पोहे मुष्टिभरी। नामा म्हणे हरि गोड मानी॥ ४॥

४९७. पंढरीचा देव पाहतां सगुण। प्रल्हादाकारणें सिद्ध झाला॥ १॥ पंढरीचा देव पतित पावन। उभा नारायण विटेवरी॥ २॥ पंढरीचा देव प्रत्यक्ष उदार। बाळ्या भोळ्या पार दावितसे॥ ३॥ नामा म्हणे देवा कीर्ति वानूं काय। आम्हांसाठीं सोय लावी बापा॥ ४॥

४९८. सगुण तें ब्रह्म विटेवरी नीट। कोण्या प्राणी कष्ट होऊं नेदी॥ १॥ देऊनियां क्षेम देह पालटिसी। वृद्ध रूप होसी कर्णासाठीं॥ २॥ भजन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भक्तांचें मानिसी वचन। नाम नारायण म्हणे कारे॥ ३॥ उफराटी वदवी वाल्मिका नामाच्या। शतकोटी संख्या प्रविस्तार॥ ४॥ नामा म्हणे देवा भक्तीचें पैं पिसे। त्यालागीं हव्यासें होसी जाण॥ ५॥

४९९. शिशुपाळादिकां कोठें शुद्ध भाव। उद्धरी केशव उंच नीच॥ १॥ काय कामा पुत्रा कोण आले जाणा। सेखीं त्या रावणा कैवल्यदानीं॥ २॥ महादुष्ट शंखासुरें नेले वेद। शेवटीं गोविंदें सोडविलें॥ ३॥ पित्याचिये हातीं पुत्र वध करी। कृपाळू वा हरी नामा म्हणे॥ ४॥

५००. पांडुरंगा नमूं परस्परा नमूं। सगुणासी नमूं साक्षिभूता॥ १॥ समस्त संबंध साधियेले हरी। रावणादि वैरी उद्धरीले॥ २॥ नामरूपातीता नाहीं भेटाभेट। म्हटलें आहे नीट नामा म्हणे॥ ३॥

५०१. सगुण समान भजती अंतरीं। सर्व भूतांतरीं असे एक॥ १॥ पहा कोळीयाची काय सांगो कीर्ति। विद्या अभ्यासिती मूर्ती पुढें॥ २॥ द्रौपदीचे घरीं होते उपवासी। देठहि लावीसी अकस्मात॥ ३॥ नामा म्हणे जाण प्रारब्ध कारण। पांडुरंगाविण गति नाहीं॥ ४॥

५०२. सहस्रनामाची घालितां लाखोली। तरला हा कोळी वाल्मिक तो॥ १॥ पुराण-प्रसिद्ध गोष्टी ह्या ऐकाव्या। प्रत्यक्ष देखाव्या कोणे ठायीं॥ २॥ अंगें अनुभवा आपण आणाव्या। तरीच वाणाव्या संतांपुढें॥ ३॥ नाहीं तरी मज वाटे कानकोंडे। सुधा म्हणे तोंडें चवी नेणें॥ ४॥ नामा म्हणे असे पोटामध्यें भूक। तृप्तीचें तें सुख बोलों कैसें॥ ५॥

५०३. प्रल्हादा रक्षिलें पांडवा प्रतिपाळिलें। तया उभे केलें पुंडलिकें॥ १॥ बिभीषणा स्थापिलें ध्रुवासी अढळ केलें। तया उभें केलें पुंडलिकें॥ २॥ दैत्यादि मर्दिले सुरवर तारिले। तया उभें केलें पुंडलिकें॥ ३॥ अहिल्या उद्धरिलें गजेंद्रा उद्धारिलें। तया उभें केलें पुंडलिकें॥ ४॥ गयासूरा वधिलें बळिस पाताळीं घातलें। तया उभें केलें पुंडलिकें॥ ५॥ नामा म्हणे केशवा भक्तांचें ठेवणें। घेऊनि केंवि जाणें घडे तुज॥ ६॥

५०४. एक अंजनीं उत्पन्न। एका खांबीं अवतरण॥ १॥ ते पावले दोघे जण। नरसिंह हनुमंत आपण॥ २॥ एक सिंहनाद करी। एक भुभुःकार करी॥ ३॥ एक सीताशुद्धी करी। एक प्रल्हादा कैवारी॥ ४॥ एक बाळ ब्रह्मचारी। एक अर्धांगी सुंदरी॥ ५॥ एक रुद्राचा अवतारु। दुसरा नामया दातारू॥ ६॥

५०५. निर्गुण सगुण नव्हे तें सगुण। तैसें तेंहि जाण योगाभ्यासी॥ १॥ प्रल्हादासी हरी शंख चक्र गदा। सगुण गोविंदा शोभतसे॥ २॥ अर्जुनासी देव उभा पाचारिसी। सखा उद्धवासी साक्ष दावी॥ ३॥ नामा म्हणे माझा केशिराज भोळा। दावितो गोपाळां बाळलीला॥ ४॥

५०६. उचितानुचिता भजे पंढरीनाथा। न बोलें सर्वथा वर्मे तुझीं॥ १॥ बिभीषणा तुवां दिधली नगरी। कीर्ति चराचरीं वाखाणिती॥ २॥ ध्रुव प्रल्हाद अंबऋषि नारद। हरिश्चंद्र मुचकुंद करोनियां॥ ३॥ नामा म्हणे आता जन्मजन्मांतरीं। करीन ऋणी हरी तुज आतां॥ ४॥

५०७. निरंतर नाम जपे। पिता प्रल्हादास कोपे। उदरा आला वैरिरूपें। म्हणवूनि घायीं त्रासिला॥ १॥ कोपें कोपला नरहरी। कवण तयातें सांवरी। खटखटा वाजती दांतोरी। दैत्यावरी उठावला॥ २॥ हांक देऊनि अवचितीं। आंदोळली त्रिजगती। समुद्रपाणी उसळती। उलथों पाहाती गिरिवर॥ ३॥ सिंहवदन प्रगटला। मर्गजू अवचिता उठला। भेणें वासुकी मोवाळला। गजबजिला पाताळीं॥ ४॥ जैसा प्रळयांतकाळिंचा मेघु। तैसा गडबडिला वेगु। अरे मर्गजाच्या खांबीं सवेगु। क्षणामाजीं प्रगटला॥ ५॥ केला भक्ताचा कुडावा। शिक लाविली दानवा। नामया स्वामी वोळंगावा। नरहरि विसांवा भक्तांचा॥ ६॥

५०८. वैकुंठाहूनि केलें येणें। भक्त प्रल्हादा-कारणें॥ १॥ नरहरि पावला महापापा पळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सुटला॥ २॥ शंख चक्र पद्म गदा। महापापा पळ सुटला॥ ३॥ पावला गरुडध्वज। नामया स्वामी केशवराज॥ ४॥

५०९. तडक फुटला अंबरीं। आला प्रल्हाद कैवारी॥ १॥ आला आला हाक देतु। सिंहनादें रे गर्जतु॥ २॥ दैत्यां दचकु नरहरि। नामया स्वामी नरकेसरी॥ ३॥

५१०. कायरे गडगडित दुमदुमीत। ब्रह्मकटाह उलथूं पहात॥ १॥ तो देव आलारे नरहरी। आतां कवण सांवरी॥ २॥ प्रल्हादासी दिधलें जैत्य। हर्षें नामा गुढी उभारीत॥ ३॥

५११. पहाहो कडकडिलें गगनीं। भेणें कांपते मेदिनी॥ १॥ तो देव दैत्यां अंतकु। होय भक्तांसी नायकु॥ २॥ भोजें प्रल्हाद नाचतु। नामया स्वामी रे अनंतु॥ ३॥

५१२. वैकुंठीहूनि धांवत आला। खांबा आड उभा ठेला॥ १॥ खांब गडगडिला गडगडिला। वीर नरसिंह पावला॥ २॥ पावला नामया स्वामी। जग उद्धरिलें याचे नामीं॥ ३॥

५१३. अंबऋषि रुक्मांगद। नारद महामुनि प्रल्हाद॥ १॥ मिळोनि सनकादिकां भारू। पांडुरंगीं हरि जागरु॥ २॥ शंख भेरी नादाकार। नादें गर्जत अंबर॥ ३॥ योगनिद्रेसी पहुडला। आदिपुरुष उपवर झाला॥ ४॥ देवी उतरोनी विमानीं। आदि क्षीरसागर भुवनीं॥ ५॥ सुरवर वोळंगती जगन्निवास। गातो नामा विष्णुदास॥ ६॥

५१४. पैल गरुडाचे वारिकें। गगनीं कृष्ण येतां देखे॥ १॥ दुडवा दुडवी हरि धांवतु। नाभीं नामयातें म्हणतु॥ २॥ वैकुंठाहूनि आले वेगीं। नामयाच्या भक्तिलागीं॥ ३॥

५१५. दिसंदिस कैसा झालासी शहाणा। गोवळांसी खेळसी पंढरीच्या राणा॥ १॥ विश्वामाजी तुझे वोभाट मोठे। जन्ममरणाचे संकल्प तुटे॥ २॥ अकळ करणी न कळे लिहितां धरणी। सिंधुमणि करूनि नाम तुझें॥ ३॥ नामा म्हणे कीर्ति काय वानूं देवा। भक्तांचा कुडावा ब्रीद तुझें॥ ४॥

५१६. वेदां जन्मस्थान शास्त्रां समाधान। काय बुझावण दाखविसी॥ १॥ जगादि अनंत अवतार घेसी। चरित्रें दाविसी भक्तांपुढें॥ २॥ पतीतपावन तूंचि नारायण। सत्वर धांवणें दामोदरा॥ ३॥ नामा म्हणे भवबंधविमोचका। वैकुंठनायका पांडुरंगा॥ ४॥

५१७. चोरूनि खादलें दहीं दुध लोणी। जिहीं चक्रपाणि खेळविला॥ १॥ अखंड उन्मत्तें मतिमंद मूढें। गौळणीपाशीं रडे रूपें दावीं॥ २॥ शकुनीचा पुत्र शिव द्वेष करी। संकट मुरारी निवारिसी॥ ३॥ उद्धरिल्या सर्व गोप गवळणी। लीला दाखवूनि नामा म्हणे॥ ४॥

५१८. तुझे कीर्तना कोण जाय आतां। सख्या भगवंता कृपा करी॥ १॥ भीष्म पहुडला शरांचे पंजरीं। तया प्रश्न करी युधिष्ठिर॥ २॥ महाभयेश्वरी विघ्नें निवारितां। सकळां देखतां दांत पाडी॥ ३॥ नामा म्हणे तुझी भक्ति अघटित। पवाडे अनंत दाविना कां॥ ४॥

५१९. अगम्य सामर्थ्य नयेचि गणना। तारूनि पाषाणा केलें सम॥ १॥ तारिसी वानर अवघेचि सेना। तोडिसी बंधना पांडुरंगा॥ २॥ काय वनचर जाणती प्रत्यक्ष। परिक्षिती साक्ष दिस सातां॥ ३॥ कृतत्रेतद्वापारांचे आदि अंतीं। नामाचि ते ख्याति म्हणे नामा॥ ४॥

५२०. सर्व देवांमाजी विठ्ठल वरिष्ठ। बोलतसे स्पष्ट वेदशास्त्रीं॥ १॥ अच्युता अनंता माधवा मुकुंदा। गोपाळा गोविंदा गोपवेषा॥ २॥ कृष्णा कमलाक्षा कस्तुरीचा टिळा। नेसला पाटोळा खोंचे शिरीं॥ ३॥ नामा म्हणे रामकृष्ण नारायण। तारिसी पाषाणां सिंधूमाजीं॥ ४॥

५२१. षड्गुणसंपन्न पंढरीच्या राया। आमुच्या स्वामिया केशिराजा॥ १॥ रामकृष्ण हरी श्रीधरा मुकुंदा। सज्जनी स्वानंदा सर्वातीता॥ २॥ गोविंदा गोपाळा गोप वेषधारी। गोवर्धन धरी नखावरी॥ ३॥ दुष्ट दुर्जनाच्या दुखवीना चित्ता। पावन पतिता नामा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणे॥ ४॥

५२२. संतोषाकारणें सज्जन जीवासी। साहाकारी होसी नारायणा॥ १॥ समान करिसी सर्वा भुतीं जाण। पतीत पावन भाक तुझी॥ २॥ भक्तिभाव ज्यांचा भाग्यें आगळीया। होसी देवराया सर्वविध॥ ३॥ समर्थपणासी कोणा विचारावें। नामा म्हणे भावें कारण हा॥ ४॥

५२३. अलक्ष्या अच्युता सख्या भक्त राया। तूंचि देवराया पांडुरंगा॥ १॥ परात्परतरा पार नेणें ब्रह्मा। तूंचि निजधामा स्वयें देसी॥ २॥ विश्वामित्रासाठीं विलंब न करी। बळिचिया द्वारीं भृत्य होसी॥ ३॥ नामा म्हणे तुझी माव नेणे कोणी। धांवें चक्रपाणी त्वरें नेटें॥ ४॥

५२४. योगी मुनिजन तपस्वी याज्ञिक। ते तव पादुका वंदिती शिरीं॥ १॥ हरिहर ब्रह्मा सूर्य चंद्रादिक। ओढवी मस्तक रजरेणु॥ २॥ गंगा भागिरथी होती शूचिमंत। आणिकांची मात काय सांगों॥ ३॥ नामा म्हणे नेणों पार तुझा देवा। कृपाळू केशवा केशिराज॥ ४॥

५२५. भक्त पुंडलिका देखोनि निकटा। आलासि वैकुंठाहूनि आजी॥ १॥ नारद वचन ऐकोनियां मनीं। सुखें चक्रपाणि सुखावला॥ २॥ सुखरूप सदा देव दूरी ठेला। मुनीश्वर काला स्वयें दावी॥ ३॥ नामा म्हणे तुज भक्ति पिसें फार। साधिलें नगर क्षणमात्रें॥ ४॥

५२६. चातुर्यसागरा आमुची जननी। जाणते रुक्मिणी प्रेमकळा॥ १॥ चरणींची प्रभा जाणे मणिग्रीव। नकुळ वैष्णव सखे माझे॥ २॥ कुबेर गौतम वधू अहिल्या। चक्रपाणी तया मुक्त केलें॥ ३॥ नामा म्हणे तुझे पाय संजीवन। सदाशिव ध्यान तेंचि करी॥ ४॥

५२७. चारी वेद गात जयासी अखंड। नेणवे प्रचंड कीर्ति ज्याची॥ १॥ तोचि भीमातीरीं उभा दिगांबर। ठेवी कटीं कर भक्तांसाठीं॥ २॥ युद्धीं अर्जुनातें सांगितली गीता। सहस्त्रशा कांता केल्या ज्यानें॥ ३॥ नामा म्हणे शिवा दिलें शिवपण। ब्रह्मया लागोन उपदेश॥ ४॥

५२८. विश्वाच्या मोहना कपट नाटका। पंढरीनायका पांडुरंगा॥ १॥ अवतार धरूनि होऊनि निमित्त। बुजविसी दैत्य सर्प खाणी॥ २॥ गोपिकांचे घरीं कामासी लंपट। करिसी धीट गवळियांसी॥ ३॥ भाव अभावांचा न करी कंटाळा। दावि बाळलीला म्हणे नामा॥ ४॥

५२९. गोकुळीं गोपिका गोपाळ सकळ। मध्यें घननीळ क्रीडा करी॥ १॥ करी खेळ मोठा स्थापिलें निशाण। स्वयें नारायण हाका मारी॥ २॥ मारियेला कंस दुर्घट दुर्जन। पुरवी वासना पांडवांची॥ ३॥ पांडवाचें ध्यान धरूनि अंतरीं। नामा म्हणे हरि साह्य करी॥ ४॥

५३०. सर्वांभूतीं नांदे सर्व नारायण। सर्व संस्थापन पांडुरंग॥ १॥ अगा देववंद्या अगा गोपवेशा। पावन परेशा परमार्थासी॥ २॥ मूर्त अमूर्ताचा मुक्त परांगता। सर्व मायातीता साक्षिरूपा॥ ३॥ नामा म्हणे देवांदानवां जिंकिसी। ते भाके आम्हांसी सांभाळावें॥ ४॥

५३१. प्रल्हादादिकांचें अंतरीचें ध्यान। तें पंढरीये निधान उभे असे॥ १॥ सर्व जन जया नेणते जाहलें। सुख दाखविलें पुंडलिका॥ २॥ वेदांचें जें सार। श्रुतीचें जिव्हार। तेंचि कटी कर उभे असे॥ ३॥ ज्ञानाचें जीवन वैराग्या भूषण। तें सुख निधान विटेवरी॥ ४॥ शुद्धबुद्ध मुक्त समाधीचें सुख। तें उभें प्रत्यक्ष वाळवंटीं॥ ५॥ हृदयीं धरूनि नामा निजबोधें निमाला। शीण हारपला संसाराचा॥ ६॥

५३२. एक वाहूं तुळसीपत्र। तें देवासी प्रिय होत॥ १॥ रखुमाईनें देव। सोडविला कृष्णाराव॥ २॥ नामा म्हणे पूर्ण होती। प्राप्त राधिकेचा पती॥ ३॥

५३३. संतांची विश्रांति ज्ञानियांचे गुज। मुक्तिचें हें बीज मोक्षदानीं॥ १॥ कृष्णा विष्णु हरी मुकुंद मुरारी। अच्युता नरहरी नारायणा॥ २॥ गोवर्धनधर गोपी मनोहर। भक्त करुणाकर पांडुरंगा॥ ३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तूंचि हें सकळ आदि मध्य अंतीं। निज सुख संपत्ति सज्जनांची॥ ४॥ सकळ नारायण पातकभंजन। हरि जगज्जीवन परमानंद॥ ५॥ तूंचि माझा श्रोता तूंचि माझा वक्ता। तूंचि घेतां देतां प्रेमसुख॥ ६॥ नामदेव ऐसें नाम त्वां ठेविलें। येणें अनुभविलें प्रेमसुख॥ ७॥ विष्णुदास नामा विनवी पुरुषोत्तमा। सोडवी भवभ्रमा पासोनियां॥ ८॥

५३४. देऊनि भातुकें गळां घाली मिठी। सखा जगजेठी भक्तिभावा॥ १॥ आधार करोनि राहिले पंढरीं। तेथें निरंतरीं प्रेम दावी॥ २॥ नामा म्हणे सेवा करोनियां शुद्ध। संसार संबंध नाहीं तया॥ ३॥

५३५. कोल्हीं काय कोल्हीं होती जड। तैसें तुझें मज मिळालें असे वाड॥ १॥ आंधळें मुकें कानीं नायके। त्यासी काय जननी पोसूं न शके॥ २॥ नामा म्हणे केशव कृपेचा सागरू। जयाचा जारू तयासिच भारु॥ ३॥

५३६. योगी हे शिणती तुझिये प्राप्तीलागीं। नातुडसी जगीं कवणासी॥ १॥ एक जटा नखें स्वयें वाढविती। दिगंबर होती एक देवा॥ २॥ त्यांसी तुझी भेटी नव्हेचि कल्पांतीं। अखंड सिणती साधनानें॥ ३॥ आमचे सन्निध सर्वदा राहसी। आमच्या भाग्यासी पार नाहीं॥ ४॥ धन्य झालों आम्ही तुझिया प्रसादें। नाचे तुझ्या छंदे नामदेव॥ ५॥

५३७. मजसाठीं काय लाजतोसि देवा। तृणा आणि जीवा साच होसी॥ १॥ ते काय पवाडे गमाविली ब्रीदें। ब्रह्मादिके वृंदे ध्याती कैसी॥ २॥ जाणतां नेणतां सर्वांसी उद्धार। भवसिंधु पार पावविसी॥ ३॥ नामा म्हणे तुझे उपकार ऐसे। दावीं जगदीशा हेळामात्रें॥ ४॥

५३८. उपमन्यु बाळा स्थापी क्षीरसिंधु। अनाथाचा बंधु नारायण॥ १॥ तुझें नाम मुखीं जपे सर्वकाळ। दिधलें अढळपद त्यासी॥ २॥ अनेक वृत्तांत सांगों देवा। अन्याय केशवा कोण मानी॥ ३॥ नामा म्हणे तैसें मी नाहीं मागत। ऐकोनियां मात आलों जन्मा॥ ४॥

५३९. हरि गातां बरवा ऐकतां बरवा। हृदयीं ध्यातां बरवा बाइयांनो॥ १॥ केशव पैं देणें केशव पैं घेणें। केशव करणें धंदा आम्हीं॥ २॥ चंद्रबिंबाची कुरवंडी ओवाळूं श्रीमुखावरी। मदन हा जिव्हारीं लाजिन्नला॥ ३॥ नामा म्हणे निववविलें सकळ इंद्रियांतें। म्हणोन त्या केशवातें शरण जारे॥ ४॥

५४०. आशा तृष्णा माया नाहीं लिथाडिल्या। म्हणावा तो भला कासयानें॥ १॥ अमृत सेवितां मृत्यु पळे दुरी। सुख होय तरी तेंचि नाम॥ २॥ तेव्हां कोणी तरी धरावा सत्संग। होय पांडुरंग प्राप्ति सर्वां॥ ३॥ अविश्वास नर सर्वस्व पतीता। तारिसी अनंता म्हणे नामा॥ ४॥

५४१. केशव पैं मुक्ति केशव पैं भक्ति। केशव विश्रांति पंढरीये॥ १॥ केशव लौकिकीं केशव व्यवहारीं। केशव निर्धारीं नाम तुझें॥ २॥ नामा म्हणे अगा केशव वोळला। भावासि भुलला वाळवंटीं॥ ३॥

५४२. वेदासी कानडा श्रुतीसी कानडा। विठ्ठल उघडा पंढरीये॥ १॥ नाम बरवें रूप बरवें। दर्शन बरवें कानडीयाचें॥ २॥ नामा म्हणे तुझें अवघेंचि बरवें। त्याहूनि बरवें प्रेम तुझें॥ ३॥

५४३. देवाधिदेव सर्वत्रांच्या जीवा। ऐके वासुदेवा दयानिधी॥ १॥ ब्रह्मा आणि इंद्र वंद्य सदाशिवा। ऐके वासुदेवा दीनबंधु॥ २॥ चवदा लोकपाळ करिती तुझी सेवा। ऐकें वासुदेवा कृपासिंधु॥ ३॥ योगियांचे ध्यानीं नातुडसी देवा। ऐकें वासुदेवा जगद्गुरू॥ ४॥ निर्गुण निराकार नाहीं तुज माया। ऐकें कृष्णराया कानडीया॥ ५॥ वेडा अविचारी करी मजवर दया। ऐकें कृष्णराया शहाणिया॥ ६॥ करुणेचा पर्जन्य शिंपी मजवरता या। ऐकें कृष्णराया गोजिरिया॥ ७॥ नामा म्हणे जरी दाविसील पाया। तरी वदावया स्फूर्ति चाले॥ ८॥

५४४. तुटोनि आकाश पडेलहि शिरीं। न सोडी मी हरी पाय तुझे॥ १॥ तुझे पाय गोड तुझे पाय गोड। तुझे पाय गोड सर्वकाळ॥ २॥ डोंगरा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सांगातें कोण करी वाद। वाउगी उपाद आहे आम्हां॥ ३॥ नामा म्हणे तुझे थोरपण काय। कायसे उपाय सांग आम्हां॥ ४॥

५४५. निर्धन धनातें कीं आंधळे लोचनातें। मयूर घनातें जेवीं भावी॥ १॥ पारधियें पाडस धरियलें वनीं। तें चिंती जननि रात्रंदिवस॥ २॥ तैसा तुझा छंद लागो कां गा देवा। माझिया बा जीवा केशिराजा॥ ३॥ सर्पे डंखिलें तें स्मरतो गारोडी। पुरी जातां सांगडी मन चिंती॥ ४॥ रोगी वैद्यातें बोलावूं धाडी। पडिले बांदवडी सुटका इच्छी॥ ५॥ बोळविली बाला ते मनीं वाहे कुवसा। कां रसज्ञू जैसा औषध गिवसी॥ ६॥ धेनुकारणें व्याकुळ होय वत्स। तें दशदिशेस अवलोकितें॥ ७॥ निचेतन देह प्राण असें अलक। धायवट उदक स्मरे वनीं॥ ८॥ चकोरे मिळोनि चंद्रा जेवि ध्याती। इंद्रीया निवृत्ति कैं होईल॥ ९॥ पक्षिणीचें पिलूं येऊनि द्वाराजवळें। मुख पसरी कोंवळें अलोहित॥ १०॥ नामा म्हणे म्यां आन नाहीं जाणितलें। मज पुरें इतुकलें केशिराजा॥ ११॥

५४६. नव जावें तेथें लागे जाणें। न करावें तेंचि लागे करणें। न बोलावे त्यासि लागे बोलणें। पडे मागणें नेदी तया॥ १॥ कृष्णें देवकीये उदरा येणें। कंसा त्यागोनि गोकुळासि जाणें। तेथें नंदाच्या गाई राखणें। संगती असणें गोंवळयाच्या॥ २॥ राम वानराची सेवा करी। पांडव कौरवांचे घरीं। हरिश्चंद्र डोंबा घरीं पायकी करी। हें अपूर्व परियेसा॥ ३॥ रुद्रें अंजनी उदरां येणें। रामाची सेवा वानरपणें। प्रसंग पडे तैसें वर्तणें। रुसणें न लगे कवणासी॥ ४॥ स्वामीनें सेवकाची सेवा करणें। नुपेक्षी कदान्न भक्षणें। म्हणवूनि अहंकार न धरणें। विषम संसार असे जना॥ ५॥ अवचट घडविती तुझिया भावा। घोर विस्मय होतो माझिया जीवा। विष्णुदास नामा विनवी केशवा। देवा तूं करिसी तें बरवें॥ ६॥

५४७. सर्व पाप पुण्य हींचि दोन्हीं भांडीं। विवेक न सांडी येतां जातां॥ १॥ तुझें नाम तारूं। तुझें नाम तारूं। तुझें नाम तारूं श्रीविठ्ठला॥ २॥ विष्णुदास नाम्यानें उभारिली शिडी। टाकावया पेढी वैकुंठींची॥ ३॥

५४८. पंढरी ज्ञानिया ध्यातां लक्षा नये। आम्हां वाट पाहे अनाथांची॥ १॥ जपकांचे जाप्य नानामंत्रमय। आम्हां भक्ति प्रिय भावें सारी॥ २॥ पुंडलिकासाठीं बोलला वोरसें। नेणों काय कैसें प्रेम त्याचें॥ ३॥ नामा म्हणे जीवें करूं निंबलोण। झणी नारायणा दिठावसी॥ ४॥

५४९. नित्य आम्हां सुख तुझ्या पायापासीं। शरण कोणासी जाऊं आम्ही॥ १॥ सकाळीं उठोनि ऐकतों कीर्तन। तेणें समाधान मज होय॥ २॥ उभा महाद्वारीं वैष्णव भेटती। सांखळ्या तुटती चौऱ्यांशींच्या॥ ३॥ नामा म्हणे सदा पंढरीं रहिवास। मागुता जन्मास येतो कोण॥ ४॥

५५०. सगुण संपन्न पंढरीच्या राया। आमुच्या स्वामिया केशिराजा॥ १॥ रामकृष्ण हरी श्रीधरा मुकुंदा। सज्जनीं स्वानंदा सर्वातीता॥ २॥ गोविंद गोपाळ गोपवेषधारी। गोवर्धन धरी नखावरी॥ ३॥ दुष्ट दुर्जनासी दुःख फार चित्तां। पावन पतितां नामा म्हणे॥ ४॥

५५१. जय विठ्ठल श्रीविठ्ठल। जय जय विठ्ठल विठ्ठल॥ १॥ परब्रह्म विठ्ठल मूर्ति विठ्ठल। निरंजन विठ्ठल विठ्ठल॥ २॥ जोचि नाम तोचि देवो। ऐसें म्हणों तरी नाहीं संदेहो॥ ३॥ म्हणे विष्णुदास नामा। तो नेईल परत गामा॥ ४॥

शिवरात्रमाहात्म्य.

५५२. कैलासींचा देव भोळा चक्रवर्ती। पार्वतीचा पति योगिराज॥ १॥ तयाचिया पाया माझे दंडवत। घडो आणि प्रीत जडो नामीं॥ २॥ जटाजूट गंगा अर्धचंद्र भाळीं। तिजा नेत्रज्वाळी जात भेद॥ ३॥ कंठीं काळकूट डौर त्रिशूळ हातीं। सर्वांगीं विभूति शोभतसे॥ ४॥ गळां रुंडमाळा खापर हस्तकीं। रामनाम मुखीं सर्वकाळ॥ ५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

व्याघ्रचर्मधारी स्मशानीं राहिला। संगें भूतमेळा विराजित॥ ६॥ नामा म्हणे नामें नासोनियां पाप। करीं सुखरूप भक्तांलागीं॥ ७॥

५५३. डवरला गिरी कैलास ढवळा। सिंहासन ज्याला ढवळेची॥ १॥ पाहतां पाहतां निवाले लोचन। भव्य ज्याचें ध्यान एकरूप॥ २॥ ढवळा सर्वांगीं देव तो आपण लेइला भूषण तेंहि तैसें॥ ३॥ पर्वताची बाळा पार्वती ढवळी। अर्धांगी शोभली एकरूप॥ ४॥ सर्वांगी लाविली ढवळी विभूति। माळा विराजती स्फटिकांच्या॥ ५॥ पांढरीया जटेमध्यें गंगा आहे श्वेत। गळ्यात शोभत श्वेत सर्प॥ ६॥ शंखपाळ श्रवणें कुंडलें ढवळीं। देखतां भूतळीं दुजा नाहीं॥ ७॥ नामा म्हणे ऐसें दाऊनियां ध्यान। भाविकांचें मन तोषवित॥ ८॥

५५४. एके दिनीं रत्नसिंहासनावरी। कैसा त्रिपुरारी शोभतसे॥ १॥ सांगो जातां चाऱ्ही वाचा विसावती। तेथें माझी मति काय सांगों॥ २॥ वामभागीं साजे सुंदरी भवानी। सिद्ध ऋषि मुनी करिती सेवा॥ ३॥ नारद तुंबर गर्जती गायन। तेथें कर जोडोन उभे देव॥ ४॥ गणेश सन्मुख ढाळिती चामरें। ऋद्धिसिद्धि द्वार राखिताती॥ ५॥ नामाचा गजर मृदंगाची घाई। पाहाती नवाई ब्रह्मादिक॥ ६॥ नामा म्हणे करी देतसे विडिया। लागोनियां पायां वारंवार॥ ७॥

५५५. तेव्हां प्रश्न करी पार्वती आदरें। शिवाप्रती कर जोडोनियां॥ १॥ सांगावाजी स्वामी ऐसा इतिहास। गातां जोडे वास तुझे पायीं॥ २॥ जाळोनियां पापें सुखाची उन्नति। विश्व सुखी होती जेणें योगें॥ ३॥ नामा म्हणे सुटे काळासी दरारा। विश्वासिया नरा मुक्ति जोडे॥ ४॥

५५६. ऐकोनियां वाणी संतोषला शूळपाणी॥ १॥ देवी चांगले पुसिलें। तुझ्या बोलें चित्त धालें॥ २॥ बोल नव्हती साचार। जड जीवाचा उद्धार॥ ३॥ बोल तुझे गोडावले। जगीं सुदिन पाहिले॥ ४॥ शिवरात्रीचें महिमान। नामा म्हणे ऐका जन॥ ५॥

५५७. ऐका सावधान कथा शिवरात्र। पावन पवित्र तिहीं लोकीं॥ १॥ भाव धरोनियां आचरती जरी। वास शिवपुरी घडे त्यासी॥ २॥ उपवास आणि शिवाचे पूजन। रात्रीं जागरण विधि त्याचा॥ ३॥ एक पसा पाणी एक बिल्वदळ। पूजन केवळ सोपें बहु॥ ४॥ नामा म्हणे करा नामाचा गजर। मुखीं हरहर शब्द मात्रें॥ ५॥

५५८. शिव ऐसा शब्द कल्याणदायक। जाणती भाविक साधुजन॥ १॥ तारक हें नाम भोळ्या भाविकांसी। नेणतें जाणत्यासी लाभ एक॥ २॥ उपमन्यु बाळक दूध मागों गेला। क्षीराब्धि दिधला उचितासी॥ ३॥ दुष्ट दुराचारी पतित तारिले। नाहीं अव्हेरिले दीनानाथें॥ ४॥ नामा म्हणे शिव विष्णु एकरूप। ताराया अमूप अवतार॥ ५॥

५५९. भेदवादी जन वदतसे भिन्न। नव्हें ते लक्षण भजनाचें॥ १॥ विश्वीं विश्वंभर कोंदलासे एक। भेदाचें कौतुक कैसें सांगा॥ २॥ ब्रह्मीं नाहीं ठाव एकपणाचाही। तेथें दुजे कांहीं समावतें॥ ३॥ आदि मध्यें अंतीं खेळूनियां खेळ। उरलें तें निखळ अविनाश॥ ४॥ हेमीं जैसें केलें तैसें होती नग। तरी तें अव्यंग सोनेपणीं॥ ५॥ केली जैसी भक्ति शैव कां वैष्णव। पाहतां तो देव नाहीं दुजा॥ ६॥ शिवविष्णु दोघे एकचि अवतार। वेदांनीं निर्धार हाचि केला॥ ७॥ नामा म्हणे येथें दुजा नको भाव। विष्णु तोचि शिव शिव विष्णु॥ ८॥

५६०. कांचीपुरी राजा नामे सोमदत्त। तयाचे संपत्ती पार नाहीं॥ १॥ पूर्वपुण्यबळें लाधलें तयासी। देतां उपमेसी उणा शक्र॥ २॥ पांचशतें तया कामिनी सुंदरा। करितां नाहीं पुरा झाला काम॥ ३॥ ऋद्धि सिद्धि घरीं कामारि हिंडती। धैर्य शौर्य कीर्ति ज्याची जगीं॥ ४॥ नामा म्हणे जेथें उणें कांहीं नाहीं। ऐसें असोनिही न सुटे भोग॥ ५॥

५६१. भोगाची नव्हाळी न सुटे कोणे काळीं। वासना वोंगळी तेचि करी॥ १॥ वासनेचि थोरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सांगवेना कांहीं। न सुटिजे कांहीं कोण्या काळीं॥ २॥ तारुण्याच्या भरें आवडी स्त्रियेची। वृद्धपण होय तेंचि पुढें॥ ३॥ म्हणतसे पोरे वांचतील कैसी। हाचि अहर्निशीं ध्यास करी॥ ४॥ मेलियाही पुढें तेंचि उभें राहे। जन्मोजन्मीं पाहे लागलेसे॥ ५॥ मृगाचिया ध्यासे भरतां मृगपण। जन्मल्यावांचून सोडिना तें॥ ६॥ नामा म्हणे जया जैसी जे वासना। जन्मकर्मे जाणा तैसी होती॥ ७॥

५६२. पंचशतामाजी दोघी पतिव्रता। जारणी सर्वथा सर्व कांहीं॥ १॥ करूनियां ऐसीं जाती नरकासी। नाडिलें पतीसी त्यांच्या पापें॥ २॥ करिती एक वेळ झांकिती लोचन। शेवटीं बंधन यमाहातीं॥ ३॥ नामा म्हणे बरें नव्हें हें कोणासी। घडेल तयासि जाच बहू॥ ४॥

५६३. राष्ट्र करी पाप राजानें भोगावें। राजियाचें तें सर्व पुरोहितां॥ १॥ बोले धर्मशास्त्र जाणती सर्वही। परी तें कोणाही न कळे वर्म॥ २॥ शिष्यें केलें पाप भोगावें गुरूनें। स्त्रीनें केलें घेणें पुरुषासी॥ ३॥ नामा म्हणे जन मायेंत गुंतलें। सेखीं खाती झोले संसाराचे॥ ४॥

५६४. ऐसें बहुत काळ लोटलियावरी। पुण्यासी सामुग्री हारपली॥ १॥ मरोनियां जन्म हरणाचा पावला। पतिव्रता झाल्या कुरंगिणी॥ २॥ प्रारब्धाचा भोग सुटेना कोणासी। केली जैसीं तैसीं घ्यावीं फळें॥ ३॥ नामा म्हणे देव कृपा करील जरी। सुटेना तोंवरी भोग खरा॥ ४॥

५६५. होऊनि हरण राहिला तो वनीं। दोघी त्या हरिणी स्त्रिया झाल्या॥ १॥ जातीच्या स्वभावें करिती विहार। चित्त झालें स्थिर एकमेका॥ २॥ धाकुटीला दोन्हीं पाडसें गोजिरी। दुजी गरोदरी पूर्ण मास॥ ३॥ नामा म्हणे पुढें काय झाली गती। कथेची संगति ऐका बरी॥ ४॥

५६६. देवलोकीं इंद्र सेवेसी सादर। भूतसेन चाकर होता तेथें॥ १॥ सेवेसी चुकतां होय तूं किरात। ऐसे इंद्रें त्यातें शापियेलें॥ २॥ शेज सज्ज करितां अंतर पडिलें। म्हणोनि घडलें भोग त्यासी॥ ३॥ नामा म्हणे सेवा करणें हें कठीण। त्यानें व्हावें जाण सावधान॥ ४॥

५६७. ऐकतांचि शब्द होऊनि किरात। राहिला निवांत एके ग्रामीं॥ १॥ पाळणपोषण विषयांची वोढी। करीतसे जोडी पातकांची॥ २॥ चण्ड भिल्ल नाम घेतलें ठेऊनि। दुष्टभाव मनीं वाढविला॥ ३॥ कासेसी वाघुरा हातीं शूळ दंड। सामोग्री उदंड मेळविली॥ ४॥ मारीतसे फार जीवजंतू॥ ५॥ जातीचा स्वभाव लागला तयासी। कष्टें अहर्निशीं म्हणे नामा॥ ६॥

५६८. ऐसें असतां तो सरूं आला काळ। प्रारब्धाचें बळ कैसें पहा॥ १॥ हिंडतां हिंडता फार कष्टि झाला। दृष्टीस तयाला न पडे कांहीं॥ २॥ कडे दरी मोठ्या पर्वताचे वरी। रिघोनियां करी नाना युक्ति॥ ३॥ झाली सांजवेळ न मिळे आमीष। होऊन उदास राहिलासे॥ ४॥ नामा म्हणे मग काय त्यानें केलें। ऐकावें निश्चळें साधुजनीं॥ ५॥

५६९. मार्गही राहिला जाऊं कोणीकडे। आमीष न जोडे काय कीजे॥ १॥ चिंताज्वरें फार तापलें अंतर। क्षुधेचा आडदर पोटामध्यें॥ २॥ रिक्त जाऊं तरी नाहीं कांहीं घरीं। वाट पाहे घरीं दारापुत्र॥ ३॥ पाहूं जातां कांहीं नाठवे विचार। तेणें स्थिरस्थिर पाय टाकी॥ ४॥ नामा म्हणे तेव्हां देखें सरोवर। कांहींसा विचार करूं लागे॥ ५॥

५७०. भोवतालें जाळें घाली नेटें पाटें। हस्तकीं तिखट बाण धरी॥ १॥ येतील उदकपानासी सावजे। पाहे त्याचे व्याजे रोखोनियां॥ २॥ तेथें एक बिल्ववृक्ष महाथोर। वेधेनियां वर बैसलासे॥ ३॥ डोळ्याआड आली म्हणोनियां तोडी। अंतरीं आवडी आमीपाची॥ ४॥ बकाचियेपरी ध्यानस्थ राहिला। जीविंचा जिव्हाळा वेगळाची॥ ५॥ नामा म्हणे ऐसी दैवाची नव्हाळी। न करितां झाली देवपूजा॥ ६॥

५७१. लक्षवरी बिल्व दळें माथा वाहे। आनंद न समाये महादेवा॥ १॥ बहुता काळाचें तेथें एक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लिंग। होतें भूमिभाग होऊनियां॥ २॥ भोळा महादेव तेणें संतोषला। म्हणे करी मला कोण पूजा॥ ३॥ नामा म्हणे पाहे निमित्याची वाट। पुराणीं बोभाट असे त्याचा॥ ४॥

५७२. पुराणीं पवाडे जयाचें अपार। ऐकतांचि फार सुख वाटे॥ १॥ भोळा महादेव पाहे भोळा भाव। एक सरे जीव उद्धराया॥ २॥ रावण मागों गेला पार्वती कारणें। देव वेळें नेणें कैसें द्यावें॥ ३॥ जातीची चांडाळी गोकर्णासी गेली। दरुशनें ते नेली कैलासासी॥ ४॥ नामा म्हणे कैसें दैव या भिल्लाचें। आलें पूजनाचें फळ हातां॥ ५॥

५७३. माथां पडतां पाला। सांव तेणें संतोषला॥ १॥ होता प्राचिनाचा ठेवा। बहु दुर्लभ मानवा॥ २॥ काय भक्तीचा जीव्हाळा। काय त्याचे अंगीं कळा॥ ३॥ बहु केली दुष्ट कर्म सेखी तोचि झाला धर्म॥ ४॥ नामा म्हणे भोळा देव। सांगायाचा हाचि भाव॥ ५॥

५७४. इतुकियासाठीं। बहु तुष्टला धूर्जटी॥ १॥ काय सांगावा विचार। दैव पारध्याचें थोर॥ २॥ झाली तीन प्रहर निशी। पूजा पावली देवासी॥ ३॥ धाडियेला यमाला। सुखी कराया तयाला॥ ४॥ आला तो धांवत। माग म्हणे अपेक्षित॥ ५॥ त्याची विषयक भक्ति। पुढती झाली तया गती॥ ६॥ जें जें याचकें मागावें। तें तें दातयानें द्यावें॥ ७॥ काय मागितलें तेणें। तेचि नामा ऐका म्हणे॥ ८॥

५७५. येऊनियां यम ठाकला पुढारी। पाहे दुराचारी दुरोनियां॥ १॥ घाबरला मनीं कोण असें नेणें। विचारितां मनीं भांबावला॥ २॥ पुसो लागे त्याला कोण तूं आलासी। आणिक म्हणसी माग कांहीं॥ ३॥ देव किंवा यक्ष राक्षस किन्नर। करितां निर्धार न पडे ठायीं॥ ४॥ नामा म्हणे मूर्ख पारधी तो खरा। दैव त्याच्या घरा आले जाण॥ ५॥

५७६. जाणोनियां यम संतोषला मनीं। मंजुळ वचनीं काय बोले॥ १॥ केलीं देवें कृपा पाठविलें मज। वरदान तुज द्यावयासी॥ २॥ सर्वहीं जीवाचा नियंता मी यम। इच्छिसी तो काम पूर्ण करूं॥ ३॥ शिवरात्री आजी उपवास केला। शंकर तोषला बिल्वदळीं॥ ४॥ नामा म्हणे ऐसें ऐकतां वचन। पारध्याचें मन सुखावलें॥ ५॥

५७७. जोडोनियां हात वंदिला कृतांत। म्हणे माझा हेतु इतुकाची॥ १॥ सर्व सुखाहूनि हेंचि वाटे गोड। संसाराची ओढ मोडवेना॥ २॥ मृग पक्षीयाचें कळावें बोलणें। सर्व कांहीं येणें कार्यसिद्धि॥ ३॥ इतुकी आहे हो माझी ही वासना। पुरवूनि स्वस्थाना जावें तुम्ही॥ ४॥ नामा म्हणे ज्याची जे कांहीं वासना। तेचि पुढें जाणा उभी ठाके॥ ५॥

५७८. देऊनियां वर दंडपाणि गेला। ध्यास पारध्याला मृगाचाची॥ १॥ लाऊनियां चित्त ऐके चळवळ। दृष्टीची तळमळ लक्ष तेथें॥ २॥ उगवला दीन जाहला प्रकाश। मृग पक्षीयास दृष्टि झाली॥ ३॥ तोचि मृग पाहा आला उदकासी। उड्डाण गगनासी साधीतसे॥ ४॥ तृषाक्रांत मोठा चालीला निःसंग। प्रारब्धाचा भोग ओढवला॥ ५॥ उदकाचिये हांवें दृष्टि झाली दुरी। पाश तो सामोरी देखेचिना॥ ६॥ येऊनियां पडे जाळिया माझारी। लोळे पृथ्वीवरी एकसरा॥ ७॥ नामा म्हणे भिल्लें पाहातां लोचनीं। काढोनियां गुणीं बाण लावी॥ ८॥

५७९. घाव घालूं जातां देखिलें नवल। पाहातसे खळ दुष्टभावें॥ १॥ परी तें होणार कदापि चुकेना। तैसीच वासना धांव घाली॥ २॥ धाकुटी हरणी पाडसें धाकुटीं। सांडीं उठाउठीं आली तेथें॥ ३॥ पाहों जातां पाशीं गुंतला तो मृग। तेव्हां काय मग केलें तिनें॥ ४॥ मुखाप्रती मुख लाऊनि चुंबिलें। हृदय फुटलें देखतांचि॥ ५॥ सुख दुःख बोल बोलती ते वेळीं। म्हणती कपाळीं भोग होता॥ ६॥ सोडविता कोणी न दिसे ये काळीं। काळाची पडली उडी आतां॥ ७॥ नामा म्हणे खळा कळे त्याची वाणी। ऐकाया लागूनि स्थिर झाला॥ ८॥

५८०. धर्मशास्त्रीं ऐसें बोलताती बोलें। तेणें चोजवलें चित्त त्याचें॥ १॥ आश्चर्याच्या डोहीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बुडाला पारधी। म्हणे कैसी बुद्धि याची पाहा॥ २॥ रानींचीं रानवटें तया एवढें ज्ञान। प्रेमाचें जीवन वोसंडत॥ ३॥ चाकाटली वृत्ति चित्त केलें स्थिर। दोघांचीं उत्तरें ऐकतसे॥ ४॥ नामा म्हणे हरणीहरणाचा संवाद। ऐकतां भवबंध तुटतसे॥ ५॥

५८१. बंधनीं गुंतला देखोनियां पती। उडालीसे वृत्ति हरणीची॥ १॥ देहाची ते आस सांडोनि लवलाही। पडे रडे कांहीं बोल बोले॥ २॥ म्हणे तुम्ही आतां नव जावें एकलें। संगें आम्हां नेलें पाहिजे जी॥ ३॥ बहुता जन्मांची तुम्हां आम्हां गांठी। आतां कैसी तुटी पाडितसां॥ ४॥ भोग जे भोगलें स्वप्नप्राय झाली। नाहीं ते पुरली वासना हे॥ ५॥ नामा म्हणे विषयवासना वोंगळ। तेणें कोण्या काळें सुटिजेना॥ ६॥

५८२. देखतांचि कांता दुःखी झाली फार। डोंगर तिजवर कोसळला॥ १॥ बोलतां तियेसी न निघती बोल। ऐसाचि तो वेळ अवधारी॥ २॥ नको आतां पडू मायेचिये भरी। जाये वो सुंदरी स्वस्थळासी॥ ३॥ माझी गति मज तुझी गति तुज। काय काय व्यर्थ प्राण द्यावा॥ ४॥ घरीं तुझी बाळें गोजिरीं गोमटीं। जाऊनियां पोटीं धरीं त्यांसी॥ ५॥ न लावी उशीर जाई वो माघारी। जंव तो दुराचारी न देखतां॥ ६॥ बाळा पाळणा हाचि स्त्रियांचा धर्म। सांगतसे वर्म जाई आतां॥ ७॥ माझिया प्रारब्धी होते तैसें झालें। तूं कां येथें बळें प्राण देसी॥ ८॥ नामा म्हणे ऐसें सांगे तिच्या हिता। परी तें नाइकतां कष्टी होय॥ ९॥

५८३. नेत्रीं अश्रुधारा पडती अपार। तेणें पृथ्वीवर पूर वाहे॥ १॥ म्हणे तुम्हांविण कैसा प्राण धरूं। वांचूनियां करूं काय आतां॥ २॥ माझिया भारानें दाटेल मेदिनी। तुम्हां अव्हेरूनि गेलें जरी॥ ३॥ सुखाचें सांगाती होतों दोघीजणीं। दुःख म्हणूवूनि सांडी केली॥ ४॥ सांडिलिया तुम्हां देवा न मानेल। वेदशास्त्र बोल हाकारिती॥ ५॥ तुजविण क्षण कंठवेना काळ। मीना जैसें जळ तैसें आम्हां॥ ६॥ तुजविण जिणें व्यर्थ या संसारीं। नामा म्हणे खरी गोष्ट बोले॥ ७॥

५८४. चंडभिल्ल तेणें ऐकिलें बोलणें। सावधान मनें करोनियां॥ १॥ तेव्हां चित्तीं होती वासना जे खोटी। जिरऊनि पोटीं चाकाटला॥ २॥ भीतिल यालागीं वृक्षाआड झाला। ऐको जो लागला शब्द त्यांचे॥ ३॥ नामा म्हणे ऐसा राहिला पारधी। ऐंकावें ते संधि काय झालें॥ ४॥

५८५. दुसरीं जे होती गर्भिण कुरंगी। तेहि लागवेगीं आली तेथें॥ १॥ आहा ऐसे काय केलें वो साजणी। नयेसी अजूनि कोंपटासी॥ २॥ लहान पाडसें आक्रंदती भुकें। कैसी येथें सुखें राहिलीसी॥ ३॥ जाई लवलाही त्यांसी स्तन देई। सांगूं आतां कांहीं बोलवेना॥ ४॥ नामा म्हणे धन्य तयाचे सौजन्य। नाहीं भाव भिन्न कोणामाजी॥ ५॥

५८६. येरी म्हणे काय करूं वो सुंदरी। आतां आहे घरीं काय माझें॥ १॥ प्राणनाथें पेणें केलें स्वर्गलोकां। जाईन मी देखां तयासंगें॥ २॥ वडिलपणें तुम्ही लोभ असो द्यावा। सांभाळ करावा बाळकांचा॥ ३॥ वागुरे माझारी गुंतलासे कांत। कायसे जीवित विचारी पां॥ ४॥ न लावी उशीर जाईं येच क्षणीं। असशी गर्भिणी पूर्ण दिवस॥ ५॥ जरी देसी प्राण पतन गर्भासी। होय ते दोषासी पात्र होसी॥ ६॥ पोसोनियां बाळे वाढवी वंशाला। द्यावें चित्त बोला माझ्या आतां॥ ७॥ पळावया तुज नाहीं अंगीं बळ। न देखतां खळ जाईं वेगीं॥ ८॥ नामा म्हणे ऐसी उत्तरें ऐकिली। तेही घाबरली तये वेळी॥ ९॥

५८७. ऐकतांची जीव झाला कासावीस। म्हणे झाले कैसें अकस्मात॥ १॥ आम्हां कपाळींचा भोग वोढवला। कांत तो निघाला सांडोनियां॥ २॥ कैंची बाळें कोण कोणाची सांगाती। पाहातां हे भ्रांति वाउगीची॥ ३॥ ठायींची हे काया जायाची जाईल। वांचलियां फोल पतिविण॥ ४॥ पतिविण सुख काय या संसारीं। दुःख कल्पवरीं भोगावें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कीं ॥ ५ ॥ नामा म्हणे ऐसें चिंतोनियां मनीं। आली तत्क्षणीं हरणापाशीं ॥ ६ ॥

५८८. कपाळीं कपाळ लावी चुंबी रडे। आक्रंदोनी पडे पृथ्वीवरी ॥ १ ॥ आवडीचें चिन्ह सांगवेना वाचे। जाणावे जयांचे त्यांचे त्यांनीं ॥ २ ॥ मानेवरी मान टाकूनि राहिली। वाचाही खुंटली बोलवेना ॥ ३ ॥ आम्ही तुजविण न राहूं क्षणभरीं। उदास न करीं चित्त आतां ॥ ४ ॥ नामा म्हणे मृगजन्म त्यांचा खरा। लक्षितां विचारा ज्ञानी बहु ॥ ५ ॥

५८९. पट्टाची मी राणी वडील मानाची। जे गति मृगाची तेचि मज ॥ १ ॥ जाईन सांगातें न सोडी संगती। निश्चय हा चित्तीं दृढ केला ॥ २ ॥ तुझीं बाळें घरीं कष्टती क्षुधेनें। जाई वेगीं स्तनें पान देई ॥ ३ ॥ बाळांकडे जाई पाहे कंठीं काळ। न करीं उतावीळ मन आतां ॥ ४ ॥ नामा म्हणे ऐसें संवादले फार। तिघांचें अंतर एकविध ॥ ५ ॥

५९०. ऐशा दोघीजणी एकविध भावें। द्यावयासी जीव उभ्या ठेल्या ॥ १ ॥ धन्य धन्य त्यांचा संसार सुफळ। सत्त्वाचेंचि बळ अंगामध्यें ॥ २ ॥ पाजूनियां येईं बाळकासी स्तन। आम्ही दोघेजण जेथें असों ॥ ३ ॥ न टाका मजला सांगोनि निघाली। बिऱ्हाडासी आली लागवेगें ॥ ४ ॥ घेवोनियां अंकीं पाडसें तीं दोन्ही। लावूनियां स्तनीं शोक करीं ॥ ५ ॥ एकमेकें सुखें राहावें अनन्य। तुटलें सौजन्य तुह्मां आम्हां ॥ ६ ॥ पति पडिलासे फांसी सांडितसे प्राण। आम्हांलागीं जाणे त्याच्यासंगें ॥ ७ ॥ हृदयीं धरोनी दिधलें चुंबन। तीं म्हणती कोण पोशी आम्हां ॥ ८ ॥ येऊं तुह्मांसंगें देऊं आधीं प्राण। पुढील कारण तुम्ही पाहा ॥ ९ ॥ नामा म्हणे ऐसें पांचही ते एक। देखोनि कौतुक वाटतसे ॥ १० ॥

५९१. निघोनियां देखा आली त्या तटाका झाली एकमेकां भेटी तेथें ॥ १ ॥ परस्परें दुःख देखतां वाढलें। धैर्याचेंचि बळ केलें त्यांनीं ॥ २ ॥ देहभाव कांहीं नाठवे तयांसी। गुंतोनी मोहासी जीव देती ॥ ३ ॥ नामा म्हणे देवें सोडवावें त्यांसी। हे तो अनेकासी आटोपेना ॥ ४ ॥

५९२. पारधी तो झड घालोनी पातला। घालावया घाला एकसरें ॥ १ ॥ भयाभीत झालीं पांचही तै काळीं। वासना गुंतली एकमेकां ॥ २ ॥ वडील कुरंगी येऊनि त्यापाशी। लागोनी पायांसी काय बोले ॥ ३ ॥ नको मारूं पति तृषेनें पीडिला। मारीं तूं मजला तया आधीं ॥ ४ ॥ आहेवपणानें धाडी स्वर्गलोका। येतुल्यानें सुखा पात्र होशी ॥ ५ ॥ इतुकींयामाजी दुसरीही आली। ती म्हणे उगली थांब आतां ॥ ६ ॥ तृषेनें पीडीलों पाजीं आधीं पाणी। मग जैसें मनीं तैसें करी ॥ ७ ॥ नामा म्हणे भिल्ल विसरला घात। राहिला निवांत त्यांच्या बोलें ॥ ८ ॥

५९३. वडील कुरंगी काय बोले त्यासी। सांगते धर्मासी पूर्वीलीया ॥ १ ॥ बांधोनी मारितां घडे महादोष। पाजी उदकास सोडोनियां ॥ २ ॥ पिऊनियां जळ येऊं तुजपाशीं। मग सावकाशी करीं काज ॥ ३ ॥ आमुचा विश्वास नाहीं तुज जरी। मागसी त्यापरी भाक देऊं ॥ ४ ॥ पर उपकारीं पडतसे देह। लोभ आतां काय वांचूनियां ॥ ५ ॥ भुकेलियां अन्न तान्हेल्या जीवन। पुण्यासी कारण इतुकेंची ॥ ६ ॥ पांचजणीं तुज वोपीयेले देह यालागीं संदेह न धरावा ॥ ७ ॥ नामा म्हणे ऐसा प्रार्थितां किरात। द्रवला मनांत काय बोले ॥ ८ ॥

५९४. होऊनियां तुम्ही वनींचीं वनचरें। बोलतसां फार धर्माधर्म ॥ १ ॥ येणें कांहीं कांहीं द्रव आला मना। तुमची भावना कोण जाणे ॥ २ ॥ सोडिल्या पाण्यासी ठकवूनि आम्हांसी। गेलिया तुम्हांसी काय कीजे ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसें बोलोनि किरात। करावया घात शस्त्र काढी ॥ ४ ॥

५९५. देखती तीं दोन्ही पाडसें त्या काळीं। भिल्लापुढें आलीं लागवेगें ॥ १ ॥ सांभाळोनि हात ऐकावी विनंती। धरीं कृपा चित्तीं आमुचिया ॥ २ ॥ अतितालागोनि चिलिया वोपी देहे। तेणेंचि तो लाहे परमधाम ॥ ३ ॥ मातापितरांसी न करावा घात। मारावें आमुतें आधी आतां ॥ ४ ॥ कोंवळें शरीर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गोड बहु मांस। लागो सार्थकास तुझे काजीं॥ ५॥ नामा म्हणे सत्त्व मोठें त्या पांचांचें। होती कैलासीचें अधिकारी॥ ६॥

५९६. हरणी सांगे कांहीं कर्मविपाकासी। ऐशा ऐशा दोषीं ऐसें होती॥ १॥ ठकवूनियां आम्हीं तुज जाऊं जरी। अंधतमाभितरीं वास पावों॥ २॥ गुरु स्वामी द्रोही विश्वासघातकी। तयास तो नरकीं वास सदा॥ ३॥ परद्रोही परनिंदेसी रतला। तो होय कावळा जन्मोजन्मीं॥ ४॥ पंक्तिभेदकेची मरतील पोरें। किंवा पती मरे बाळपणीं॥ ५॥ सदासर्वकाळ दुष्ट कर्मी रत। शूकरादि होत नीच योनी॥ ६॥ अतीत अभ्यागत पूजा नाहीं ज्याला। घूस सर्प बिळामाजी होती॥ ७॥ नामा म्हणे केलें तैसें तें भोगावें। सावधान व्हावें जाणत्यांनीं॥ ८॥

५९७. पापिष्ठाचें जिणें काय तें जियालें। गळां स्तन झाले शेळियेचे॥ १॥ येथेंचि जो खोटा तेथें तो करंटा। व्यर्थ आला पोटा माउलीच्या॥ २॥ तप्त ताम्र भूमि लोळविती नरा। लोटिती अघोरा नरकामाजी॥ ३॥ लोहोचंचुकाग टोंचिती येवोनी। मारिताती घर्णी माथां घाव॥ ४॥ बांधोनियां गळां टांगिती उफराटें। हाणताती सोटे वरिच्यावरी॥ ५॥ आसीपत्रावरी वोढिती धरोनी। लोटितीं नेउनी कुंभपाकीं॥ ६॥ जळतिया खांबा भेटविती बळें। खैराच्या इंगळें नाहाविता॥ ७॥ प्रळय क्रूर सर्प झोंबविती कंठासी। ओढोनि जिव्हेसी खंडे करिती॥ ८॥ नामा म्हणे ऐसी पापिष्ठाची गती। जन्म लक्ष शतीं हेंचि फळ॥ ९॥

५९८. न करूं आम्ही तैसे घेई आतां भाक। अंतरीं निःशंक झालों सर्व॥ १॥ तुम्हां आम्हां साक्षी असे सदाशीव। येथें दुजा भाव धरुं नको॥ २॥ पिऊनियां पाणी न येऊं तुजपाशीं। तरी घडे आम्हांसी सर्व पापें॥ ३॥ जातीचा ब्राह्मण न करी ब्रह्मकर्म। तो जैसा अधम तैसे आम्ही॥ ४॥ स्वामिद्रोही आणि विश्वासघातकी। तो पडे ज्या नरकीं तेथें पडों॥ ५॥ नामा म्हणे ऐसी वाहोनियां आण। धरीलें चरण पारध्याचें॥ ६॥

५९९. पारधियासी जेव्हां दाटला गहिंवर। लोटलें अपार प्रेम तेव्हां॥ १॥ जीवनदान दिलें जावें तुम्ही आतां। न करावी चिंता कांहीं येथें॥ २॥ इंद्राचा मी दूत चुकलो सेवेसी। यालागीं जन्माशीं आलों जाणा॥ ३॥ तुमचिया बोलें निवालें अंतर। घात इतःपर न करी कांहीं॥ ४॥ नामा म्हणे शुभकाळ त्याचा आला। म्हणवोनी झाला पश्चाताप॥ ५॥

६००. सोडोनियां गळां मुक्त केलें त्यासी। पिऊनि उदकासी आली पुढती॥ १॥ क्षुधेलासी फार न लावी उशीर। घेऊनियां शस्त्र पाणि वेगें॥ २॥ घर तुझें दूर वाहावेना भार। आम्ही तेथवर येत असो॥ ३॥ सत्यत्व देखोनि म्हणितले पारधी। तुम्हासी न वधीं जावे आतां॥ ४॥ पाठोपाठी त्याच्या घरालागीं आली। चरणीं घातली मिठी त्यानीं॥ ५॥ नामा म्हणे सत्व आगळें तयांचें। वर्णावया वाचे नये शेषा॥ ६॥

६०१. हरिश्चंद्र राजा सत्त्वनिष्ठ मोठा। स्त्रीपुत्र चोहटामाजी विकी॥ १॥ तेसेंचि येथें मृगाअंगीं सत्व। वोपियेला जीव पारध्यासी॥ २॥ शिबीराजा अंग कापी नेटपाटें। सत्त्वासी पालट होऊ नेदी॥ ३॥ ताम्रध्वजा शिरीं कर्वत घातला। नाहीं पालटला मनोधर्म॥ ४॥ नामा म्हणे मागें बहुती केली कीर्ति। तयां ऐसी रीति येथें दिसे॥ ५॥

६०२. आधीच कृपाळू भोळा महादेव। जाणितला भाव कुरंगांचा॥ १॥ कृपा केलीं देवें मांडिला सन्मान। धाडिलें विमान दूतहातीं॥ २॥ लखलखित टके पताका डोलती। तयामाजीं होती गीत नृत्यं॥ ३॥ नाना सुमनांची शय्या आरुवर। करिती उपचार सिद्धि आड॥ ४॥ आले अकस्मात तयाचिये-पाशीं। पाहतां सर्वांसी नवल वाटे॥ ५॥ दिव्य देह झाले पांचांचे ते काळीं। विमानीं बैसली लागवेगें॥ ६॥ पारधी देखोनी तटस्थ राहिला। दूर्ती तया केला उपदेश॥ ७॥ शिवरात्रीं आजी जागरण उपवास। केला तेणें दोष सर्व गेला॥ ८॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करोनी पारणें होई शिवभक्त। आशापाशीं चित्त गोवूं नको॥ ९॥ अखंड कीर्तन शिवनामाचें करी। तेणे मोक्षपुरीं पावशील॥ १०॥ पुढिल्या शिवरात्रीं नेंऊ कैलासासी। सांगोनिया त्यासी गेले वेगीं॥ ११॥ नामा म्हणे मोक्ष झाला त्या पांचांशीं। वस्ती चंद्रापाशीं केली त्यांनीं॥ १२॥

६०३. तेणें उपदेशें पारध्यासी ज्ञान। करी तो कीर्तन नामघोषे॥ १॥ संचिताचा नाश क्रियमाण बुडविलें। त्या सहज जोडलें मोक्षसुख॥ २॥ दुसऱ्या शिवरात्रीं पूजिलें शंकरा। करोनियां बरा भाव शुद्ध॥ ३॥ विमानीं वाहोनि स्वस्थानीं स्थापिला। येथूनि संपला कथाभाग॥ ४॥ नामा म्हणे शिवविष्णु एकरूप। जाणोनियां जप करा त्यांचा॥ ५॥

६०४. शिवरात्री कथा धन्य जे ऐकती। इच्छिलें पावती सर्व काहीं॥ १॥ पातकांचा नाश पुण्य वाढे फार। शेखीं विश्वंभर कृपा करी॥ २॥ भोग भोग्य ज्ञान वाढेल संतान। काळ करी चरण सेवा त्यांची॥ ३॥ नामा म्हणे शिव अक्षरें हीं दोन्हीं। जपावीं सज्जनीं वारंवार॥ ४॥

६०५. नामाचा महिमा कोण जाणे सीमा। चतुर्मुख ब्रह्मा नेणे कांहीं॥ १॥ संसारा आलिया हेचि आहे जोडी। अखंड घ्यावी गोडी हरिनामें॥ २॥ सहस्त्रमुखें शेष वाखाणितां कीर्ति। नाहीं तया तृप्ति आजीवरी॥ ३॥ पशु पक्षी तृण कीटक अपार। नामें गेलें पार उतरोनि॥ ४॥ कापुराचे राशी पडे अग्निकण। तैसे नाम जाण पातकासी॥ ५॥ नामाग्नीनें दोष जळती एकसरा। कैवल्य ये घरा बसल्या ठायीं॥ ६॥ नामा म्हणे धन्य नामाचा प्रताप। ध्याती एकरूप देवभक्त॥ ७॥

६०६. लिंगपुराणीं हा बोलिला इतिहास। तोचि म्यां तुम्हांस निवेदिला॥ १॥ अनेक पुराणीं अनेक प्रकार। तारावया नरनारी लोक॥ २॥ मुख्य हेचि कथा शिवरात्रीची जाणा। कैलासींचा राणा तोष पावे॥ ३॥ नामा म्हणे मन करोनि निश्चळ। करा गदारोळ नामघोष॥ ४॥

शिवस्तुति.

६०७. अहो सदाशिवा। देसी भुक्ति मुक्ति भावा॥ १॥ करावी ते तुम्ही सेवा। ऐसें धरावें या जीवा॥ २॥ नामा म्हणे महादेवा। चुकवी चौऱ्यांशीचा हेवा॥ ३॥

६०८. बरवें गा शंकरा नाम तुझें। हरहर बरवें गा देवा नाम तुझें॥ १॥ गाईल्या ऐकिल्या होय वैष्णवा गती। रामनामें तरले नेणों किती॥ २॥ ऐसा सदा आनंद राउळीं। विष्णुदास नामा पंढरपुरीं॥ ३॥

६०९. साठीसहस्त्र विघ्नांवरी। शिवनाम पंचाक्षरी॥ १॥ तो राजा देखेन। पर्वतु जेथें असे मल्लिकार्जुन॥ २॥ भक्तिभावाचें अंजन। साधावया निधान॥ ३॥ मन मारूनि देईन बळी। साधावया चंद्रमौळी॥ ४॥ भ्रांति पाटा फिटला। शिव मार्ग देखिला॥ ५॥ विष्णुदास नामा पायाळ भला। तेणें मलयानिळ देखिला॥ ६॥

६१०. सदा सोमवारीं। विभुति लावुनि शिरीं। तुमच्या मंदिरीं। आलाप करीं॥ १॥ शंकर त्रिपुरारी। हरि उच्चारी। म्हणती षडाक्षरी पावें मज॥ २॥ ॐ नमः शिवाय। हरहर जय जय। नाहीं भवमय। तुझेनि नामें॥ ३॥ करिती शिवरात्री। वाहाती बेलपत्री। प्रगट होऊनि गाती। भक्तिभावें॥ ४॥ बोलती सत्कीर्ति। जिंतिलें पवित्रीं। हरहर नाम मंत्री। तुज पूजिती॥ ५॥ रुद्राक्षाच्या माळा। घालूनियां गळां। तो तुम्हां जवळां। सर्व मान्य॥ ६॥ शिवशंभु भोळा। बहुतां पुण्यें जोडला। पावे जाश्वनीळा। म्हणे नामा॥ ७॥

तुळसीमाहात्म्य.

६११. तुळसीविण ज्याचें घर। तें तंव जाणावें अघोर। तेथें वसती यम किंकर। आज्ञा आहे म्हणोनि॥ १॥ तुळसीवृंदावन ज्याचें घरीं। त्यासी प्रसन्न श्रीहरी। तें वर्जिलें यमकिंकरीं। आज्ञा आहे म्हणोनि॥ २॥ तुळसीवृंदावना जे करिती प्रदक्षणा। अंतकाळीं होता स्मरण। जन्ममरण नाहीं नामा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणे॥ ३॥

६१२. तुळसीवृंदावन दर्शन। त्यासीं वैकुंठी गमन। लटिकें म्हणे कोण। त्यासी आण केशवाची॥ १॥ तुळसीमाळा घाली गळां। त्या भेंटे घनसांवळां। चतुर्भुज सहित कमळा। केशिराज प्रत्यक्ष॥ २॥ तुळसीरोपा घाली उदक। त्याचे हरतीं महादोष। ब्रह्मादिकां न कळे निःशेष। जन्ममरण त्या नाहीं॥ ३॥ तुळसीची देवा बहु प्रीति। आणिक पुष्पें न लागती। नामा म्हणे जी श्रीपती। हेचि भक्ति द्यावी मज॥ ४॥

६१३. तुळसी पुष्पाहूनि आगळी। वृंदावनीं ते मिरवली। देवें मस्तकीं वंदिली। वंद्य झाली तिन्हीं लोकां॥ १॥ तुळसी वंदावी माउली। अरे हे संतांची साउली। तुळसीपासीं वनमाळी। सदा रहात असे॥ २॥ तुळसीदळ भूमीवरी पडिलें। तें जरी मस्तकीं वंदिलें। कोटी तीर्थस्नान केलें। एवढें फळ नामा म्हणे॥ ३॥

६१४. उभें वृंदावन ज्याचिये द्वारीं। होय तो श्रीहरि प्रसन्न त्या॥ १॥ तुळसीचें रोप लावील जो आणोनि। तया चक्रपाणि न विसंबे॥ २॥ तुळसीचें काष्ठ जपमाळ करी। तयासि श्रीहरी प्रसन्न तो॥ ३॥ तुळसीची कीर्ति अगाध पैं आहे। पंढरीसी पाहे म्हणे नामा॥ ४॥

६१५. तुळसीची सेवा घडे। रंगमाळा घालूं सडे॥ १॥ दूत न येती तयाकडे। हरिनामाची घरटी पडे॥ २॥ नामा म्हणे हरिएवढें। ब्रह्म वृंदावनीं सांपडे॥ ३॥

६१६. फुकाचिया तुळसी वहारे। ध्रुवासारखें पद मागारे॥ १॥ एका विठ्ठला शरण जारे। जन्म वायां कां दवडारे॥ २॥ नामा म्हणे हा पहारे। विठ्ठल भक्तांचा ऋणियारे॥ ३॥

६१७. तुळसीचें हत्यार। वृंदावन थोर॥ १॥ तुळसीच्या दळी। यम जिंकिला महाबळी॥ २॥ नामा म्हणे बळिरे बळी। विठ्ठल आमचा भुजबळी॥ ३॥

६१८. उठोनियां प्रातःकाळीं। तुळस वंदावी माउली। तुळस संतांची साउली। मुगुटीं वाहिली विष्णूनें॥ १॥ तुळस असे ज्याचे द्वारीं। लक्ष्मी वसे त्याचे घरीं। येवोनि श्रीहरि। क्रीडा करी स्वानंदें॥ २॥ तुळसीसी मंजुरा येतां। पळ सुटे यमदूतां। अद्वैत तुळस कृष्ण स्मरतां। नासे दुरित चित्तांचें॥ ३॥ जे जे तुळसी घालिती उदक। ते नर पावती ब्रह्मसुख। नामा म्हणे पंढरिनायक। तुळसीजवळी उभा असे॥ ४॥

चोवीस नामांचा महिमा

६१९. येई गे केशवे मज तुझी सवे। तुजविण नुगवे दीनू माय॥ १॥ तूं माय जननी कांसवी कौसल्या। दिन बहुसाळ मज पावें॥ २॥ न मागे केवळ विषयाचें टवाळ। तूं माझी कृपाळ विठ्ठल माय॥ ३॥ बोळली गगनीं केशव कामधेनू। लवतां लोचनु स्फुरे बाह्या॥ ४॥ वाजवील वाद्य गोपाळांची मांदी। आल्हाद गोविंदीं नित्य माझा॥ ५॥ नामा म्हणे केशव येई कामधेनु। तेणें माझी तनु तृप्त सदा॥ ६॥

६२०. येगे नारायणी अमृत संजीवनी। चिंतितां निर्वाणी पावें वेगीं॥ १॥ तूं माझे जीवन नाम नारायण। नित्य अनुष्ठान तुझ्या नामें॥ २॥ बाह्य अभ्यंतरीं तूंचि सर्वांठायीं। तुजविण सृष्टि शून्य दिसे॥ ३॥ चाल लवलाह्या कृपाळू तूं माये। मज हें न साहे मोह जंजाळ॥ ४॥ तुटेल बिरडे सुटतील गांठी। जंव तूं जगजेठी नये माये॥ ५॥ नामा म्हणे धन्य तुझें नाम साचे। उच्चारितां वाचे निवती अंगें॥ ६॥

६२१. येई गे माधवे पाजी प्रेमपान्हा। विषयाचा आंदणा नको करूं॥ १॥ धांव तूं मधुकरें माधवे उदारे। येई तूं सोइरे जननिये॥ २॥ कष्टलों मी भारी शीण दूर करी। येई तूं झडकरी माधवे वो॥ ३॥ अनंता वो नामें पुराणें पढती। पावसी आकांती विठ्ठल वो॥ ४॥ नामा म्हणे लाहो करावा माधवे। माझेनि वो जीवें लाहे चाड॥ ५॥

६२२. येई तूं गोविंदे नामामृतधारी नित्य हें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

उच्चारी गोविंदातें॥ १॥ गोविंद नित्य हाचि छंद। पावे तूं हृद्‌गद आदिरूपें॥ २॥ गोविंद हो ध्यानें निवती अष्टांगें। गोविंदे गे वेगे वेष धरूं॥ ३॥ गोविंद गोपाळ मुकुंद केशरी। येई तूं लवकरी सांवळीये॥ ४॥ गोविंद हें नाम जनीं वनीं दिसे। प्रत्यक्ष ते ठसे पंढरीसी॥ ५॥ वेणूनादे काला गोविंदे पै केला। धांवतचि आला पेंद्यापाशीं॥ ६॥ ती हीच वो माय उभी बाळमूर्ति। नाम जे जपती पांडुरंग॥ ७॥ नामा म्हणे पांग गोविंद हा दवडी। वेगें लवडसवडी करीत माये॥ ८॥

६२३. विष्णु विष्णु हरि पावे लवकरी। ब्रिद चराचरीं सांगे मुनी॥ १॥ वैकुंठवासिनी कृष्णविष्णुदेव। नामा तें गौरव आम्हांलागीं॥ २॥ धन्य हाचि दिनु विष्णुमाय पावे। गगनीं उगवे सूर्य जैसा॥ ३॥ आदि ब्रह्मा हरी विष्णु कृष्णगंगा। भागिरथी पै गा पदीं पावें॥ ४॥ गया ते प्रयाग काशी ते सर्वांस। विश्वेश्वर लिंग चराचर॥ ५॥ विष्णुगंगाधर विष्णुनाम पाठ। उच्चारितां वाट वैकुंठीची॥ ६॥ नामा म्हणे भागिरथीमाजी। पंढरीये माझी विठ्ठलमाय॥ ७॥

६२४. येई तूं मधुकरे मदनसुंदरे। मज गे न धरे प्रेम पोटीं॥ १॥ तूं माझी जननी मधुसूदन गाय। कामधेनु होय कांसवीची॥ २॥ आनंद निजघने जुनाट मधुसूदने। शुकस्तनपान पाजीं पान्हा॥ ३॥ केशव कांसवी पद रानगाय। आत्माराम होय निःसंदेह॥ ४॥ विठ्ठलमुकुंदें स्वरूपें गोमटीं। आकांतली सृष्टी मधुसूदनें॥ ५॥ शंखचक्रांकित आयुधें मंडित। मुकुट शोभत तुझा शीरीं॥ ६॥ भक्तवरदायिनीं मधुसूदन गंगा। व्हावे तूंवो वेगा कामधेनु॥ ७॥ नामा म्हणे माये मधुसूदन गाय। ते संजीवनी होय आम्हांलागीं॥ ८॥

६२५. येई वो त्रिविक्रमे पूर्ण पान्हा देई। कामधेनु होई विठ्ठलराजे॥ १॥ त्रिविक्रम धरे येई तूं सावळे। मुकुंद गोपाळे केशवें वेगीं॥ २॥ तूं माझें निजधन त्रिविक्रम धरे। गंगानाममात्रें भंगी पाप॥ ३॥ त्रिपदागायत्री त्रिविक्रममुखें। जनाची वो दुःखें हरती नामें॥ ४॥ त्रिजटा त्रिफणी भागीरथी वेणी। प्रयाग वो धूनी पाप जाळी॥ ५॥ त्रिस्थळीं त्रिमाये त्रिविक्रम होय। विश्वेश्वर दोहे तारक ब्रह्म॥ ६॥ काशीकांति माये अयोध्या द्वारका। मथुरा अवंतिका तूंचि माये॥ ७॥ नामा म्हणे माझी त्रिविक्रम गाय। भक्तीसी पान्हाये पंढरपुरीं॥ ८॥

६२६. येई वो वामने खुजीयखुजटे। पंढरीचे पेठे उभी राहे॥ १॥ येई वो डोळसे सांवळें तेजसे। वामनेबहु वसे ब्रह्मचारी॥ २॥ अनंत विद्‌गदे अनंत अपार। कैवल्य वोसरे पदकमळें॥ ३॥ तुझें नाम धन्य वामन साजिरें रूप हें गोजिरें बळीच्या द्वारीं॥ ४॥ तुझ्या चरणीं तीर्थें उद्धरती सर्व। येई तूं सत्वर वामनाई॥ ५॥ नामा म्हणे पावें वामन ब्रह्मांडे। स्वरूप वितंडे ब्रह्मचरें॥ ६॥

६२७. येई वो श्रीधरे सर्व रूपसारे कैवल्य उत्तरे अभिनव॥ १॥ श्रीधर श्रीरंगे नाम पांडुरंगे। प्रगट वो सांगे पूर्णघन॥ २॥ श्रीकरे श्रीधरे शोभे ते साचारे। चक्रांकित करे शंख तुझा॥ ३॥ सुंदर श्यामळ नाम हें अढळ। मुखीं हो वेल्हाळ हस्त तुझें॥ ४॥ प्रकाशे हा पूर्ण श्रीधरें पैं जाण। सांगितली खूण खेचरानें॥ ५॥ नामा म्हणे माता श्रीधर उच्चारू। तरेन साचारू तिन्हीं लोकीं॥ ६॥

६२८. येई हृषीकेशी दिव्य रूप दिसे। मन हें उल्हासे भेटीलागीं॥ १॥ त्राहे हृषीकेशी नामें तरले संभ्रमें। नित्य रामनामें भवसिंधु॥ २॥ आराधनें धन ऋषीसी संपूर्ण। नाम कोटी यज्ञ झालें तया॥ ३॥ पावन हृषीकेशी हेंचि ध्यान मन। नाम सनातन हृषीकेसी॥ ४॥ विश्वा करी कळा विश्व जनलीळा। त्राहे वेळोवेळां हृषीकेशी॥ ५॥ नामा म्हणे माय येई हृषीकेश। झालों कासावीस तुजवीण॥ ६॥

६२९. येई वो पद्मनाभे पंकजलोचनें। विश्व पूर्णघने देखे तुज॥ १॥ त्राहे पद्मनाभा वाचा सिद्ध पावे। मज हें नुगवें मायाजाळ॥ २॥ पद्मांकित रेखा पद्म हें सुरेख। पावे वो निमिष्य एकामय॥ ३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विचरे हे पृथ्वी नाम पद्मनाभ। स्वयंभावो बिंब विठ्ठलेसी॥ ४॥ रिकामा मी नसे दिननिशीं निमिष्य। पद्मनाभ साक्ष हृदयीं भोगी॥ ५॥ नामा म्हणे पद्मनाभ हें हो नाम। जपतुसें प्रेम देई मज॥ ६॥

६३०. येई वो दामोदरे पवित्र हे करे। मना हो नावरे प्रेमलोट॥ १॥ पाहे कृपादृष्टी साहे जगजेठी। पूर्ण पान्हा घोटी ऐसें करी॥ २॥ दामोदरें नाम मदन परिकरे। हाचि वो विचार मनें केला॥ ३॥ येई तूं निर्धारें पावें तूं झडकरी। येई वो लवकरी दामोदरे॥ ४॥ दामोदर माता पाहे वो समता। पावे वो निवांता पावें वेगीं॥ ५॥ नामा म्हणे लोटूं प्रेमामृत निवटूं। नामेंचि वैकुंठे दामोदर॥ ६॥

६३१. येई तूं कृपाळे संकर्षण माते। पवित्र पूर्णभरिते गुणनिधि॥ १॥ त्राहे त्राहे वेगीं पावे वो झडकरी। ब्रीद चराचरीं वर्णिताती॥ २॥ संकर्षण गंगा सर्वांगीं तूं असें। जनीं वनीं दिसें रूप तुझें॥ ३॥ कटावरी कर सांवळी सुंदर। मनाचा विचार इच्या चरणीं॥ ४॥ निर्धारु सांगतां न मायें वो घेतां। संकर्षण माता पाव वेगीं॥ ५॥ विष्णु संकर्षण नाम हें गहन। पतितपावन चरणरजे॥ ६॥ नामा म्हणे माय संकर्षण गाय। हरिदासा पान्हावे पंढरीसी॥ ७॥

६३२. येई तूं शारंगे वासुदेवे त्वरें। वासुदेवो सारे गोपाळ वो॥ १॥ त्राहे वासुदेवा पावे झडकरी। त्वरें वेगूं करी आर्त भेटीं॥ २॥ वासुदेवनामें साधन सुगम। योगिया विश्राम स्थान झालें॥ ३॥ द्वादश अक्षर जपिन्नला गुरु। तयासी साचार अढळपद॥ ४॥ बळी भीष्मदेवी वासुदेवी भाव। रोहिणीची माव ऐसे झाले॥ ५॥ नामा म्हणे भक्त वासुदेवीं रत। सायुज्य पावे तो एक्यानामें॥ ६॥

६३३. येई तूं प्रद्युम्ने ध्यान तूं धरणें। माझिये कल्पने निर्धारुसा॥ १॥ त्राहे झडकरी पावे वो लवकरी। प्रद्युम्ने फुत्कारी वेळोवेळां॥ २॥ सांवळे सुंदरे वेणु वाहे करीं। ध्यान हें सुंदरी यमुनातटीं॥ ३॥ प्रवाह प्रद्युम्ने नामघोष दाट। जिंकिलें जुनाट पापराशी॥ ४॥ नामा म्हणे नाम धन्य हे प्रद्युम्न। होईल संपन्न नाम घेतां॥ ५॥

६३४. येई वो अनिरुद्धे सांवळे प्रबुद्धे। विराटे गोविंदे पाव वेगीं॥ १॥ त्राहे माउलीये मना तुझी सोय। चुकती अपाय नाम घेतां॥ २॥ अनिरुद्ध पाठें जाईन वैकुंठे। पुंडलीक पेठे उभा असे॥ ३॥ कटावरी कर सांवळी सुंदर। मनाचा विचार इच्या चरणीं॥ ४॥ अनिरुद्धसार अनु नाहीं आधार। सर्वही विचार अनिरुद्धे॥ ५॥ नामा म्हणे येई अनिरुद्धे माये। आणिक उपाय न लगे मज॥ ६॥

६३५. येई तूं पुरुषोत्तम संजीवनी रामे। योगिया विश्रामे पुरुषश्रेष्ठे॥ १॥ त्राहे मनोधर्म नाम पुरुषोत्तम। साधन अगम ऐसी माये॥ २॥ येई वो सांभाळीं लवलाहे मनें। जुनाट हो जुने पुरुषोत्तमें॥ ३॥ तुझें नाम धन्य पुरुष हें सौजन्य। द्वैत हे अभिन्न अद्वैत हें॥ ४॥ एकाक्षरी नाम पुरुष। आत्माराम पुरुषोत्तम॥ ५॥ नाम शुचिसम। नामा म्हणे पावें पुरुषोत्तम माते। सर्वत्र अद्वैत एकरूप॥ ६॥

६३६. येई वो अधोक्षजे वैकुंठ विराजे। नाम गे सहजे अमृतरासी॥ १॥ अधोक्षज नामें घालीन गोंधळ। रिता एक पळ जाऊं नेदी॥ २॥ अधर रंगीव अर्धोर्ध सोशनि। सर्वत्र पाहीन अधोक्षज॥ ३॥ अरिष्ट हें निरसी माये अधोक्षजे। ऐसी या पाविजे संकटीं त्वां॥ ४॥ अरि हे मर्दन अधोक्षज जाणें। स्वीकारावें पूर्ण प्रगटतां॥ ५॥ नामा म्हणे धांवे अधोक्षज पावे। दिशाद्रुम भावें तुज मग॥ ६॥

६३७. येई वो केसरी नरसिंह उच्चारी। पवित्र सदाचारी तिहीं लोकीं॥ १॥ नरसिंह वामन प्रल्हाद रक्षण। आमुचें तें धन नाम तुझें॥ २॥ शंखचक्र करीं पावे वो लवकरी। येई तूं केसरी लवलाहे॥ ३॥ नरसिंह हें नाम नरसिंह हें प्रेम। उत्तमोत्तम तिन्ही लोकीं॥ ४॥ त्रिपुररक्षक। दानवमर्दन। विकट वदन पंचाक्षरी॥ ५॥ नामा म्हणे हरि नाम नरकेसरी। नरसिंह उच्चारी तरती जीव॥ ६॥

६३८. येई वो अच्युते नामामृत रसे। सुंदर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

डोळसे जान्हवीये ॥ १ ॥ अमृताची खोटी अच्युतनाम पेठीं। पावे जगजेठी अच्युत सार ॥ २ ॥ अच्युत अच्युत नामें हेंचि सत्य। हें पियूष त्वरित उच्चारितां ॥ ३ ॥ वैकुंठींची मूर्ति अच्युतनाम पाठे। प्रत्यक्ष वो भेटे विटेवरी ॥ ४ ॥ पुंडलीक दृष्टी नयनाची भेटी। निवारितां दृष्टी न्याहाळितां ॥ ५ ॥ नामा म्हणे अच्युत नाम हेंचि आम्हां। दिननिशीं राम जपतसें ॥ ६ ॥

६३९. येईं जनार्दन जनवनसंपन्ने। माझे वो चिद्घने पांडुरंगे ॥ १ ॥ त्राहे जनार्दने पूर्णानंदघने येईं वो संपन्ने विश्वंभरे ॥ २ ॥ नाम हें दुर्लभ जनकजननी। राम जनार्दनीं विनटली ॥ ३ ॥ सांवळी डोळस रवि एकासनी। तेज प्रकाशनी हिरियाची ॥ ४ ॥ जननी ते जननी निकट ते जीवनी। जग प्रगटिणी हरीयाची ॥ ५ ॥ नामा म्हणे जन नाम जनार्दन। सनकादिक जाण सेवताती ॥ ६ ॥

६४०. येईं तूं उपेंद्रे विठ्ठल महिंद्रे। देवामाजीं भद्रे सिंहासनीं ॥ १ ॥ त्राहे वो जननी शिणलों गे माये। तुजविण आहे कवण मज ॥ २ ॥ तूं माझें कारुण्य प्रत्यक्ष सौजन्य। विचारितां प्रवीण प्रबुद्ध हो ॥ ३ ॥ पावे वो तूं वेगीं उपेंद्रे गे माते। पुंडलीक सांगातें पंढरीसी ॥ ४ ॥ दीपकु लाविला दीन उगवला। दीपकें फळला पांडुरंग ॥ ५ ॥ नामा म्हणे नाम उपेंद्र ऐसें शम। पावेन विश्राम नाम घेतां ॥ ६ ॥

६४१. येईं तूं हरिरूपें विठ्ठल स्वरूपें कळिकाळ कांपे नाम घेतां ॥ १ ॥ नामें हरि हरि त्राहे वो झडकरी। शिणलों मी भारी जननीये ॥ २ ॥ हरिनामधन सर्व जनार्दन। हरी हें आठवण जिव्हे सदा ॥ ३ ॥ हरि हरि म्हणतां हरिरूप संता। नाम हें अनंताक्षर विलसे ॥ ४ ॥ येईं तूं गंगे सांवळे सुरंगे। हरि हरि संगें रतलोंसे ॥ ५ ॥ नामा म्हणे हरी पांडुरंग माझा। चरण हो भोजा राज्यधरू ॥ ६ ॥

६४२. येईं वो तूं कृष्णे हरि माझिये तृष्णे। दिननिशीं कृष्णे वाट पाहें ॥ १ ॥ त्राहे कृष्ण अंगे सांवळे सारंगे। नामस्मरण वेगें पुरे आम्हां ॥ २ ॥ रामकृष्ण टाहो नामें लवलाहो। फिटला संदेहो संसाराचा ॥ ३ ॥ उद्धव अक्रूर यादव सादर। कृष्णातें अपार तयालागीं ॥ ४ ॥ अर्जुन द्रौपदी स्मरण गोविंदा। पावावें निजपदीं नामा म्हणे ॥ ५ ॥

गंगामहात्म्य.

६४३. वाचे म्हणतां गंगा गंगा। सकळ पापें जाती भंगा ॥ १ ॥ दृष्टी पडतां ब्रह्मगिरी। त्यासि नाहीं यमपुरी ॥ २ ॥ कुशावर्ती करितां स्नान। त्याचें वैकुंठीं राहणें ॥ ३ ॥ नामा म्हणे प्रदक्षिणा। त्यासी जन्म नाहीं पुन्हां ॥ ४ ॥

नाममहिमा.

६४४. नामाचा महिमा नेणेची पैं ब्रह्मा। म्हणोनियां कर्मा अनुसरला ॥ १ ॥ नाम हेंचि कर्म नाम हेंचि धर्म। केशव हेंचि वर्म सांगितलें ॥ २ ॥ नाम शुद्ध स्नान नाम शुद्ध संध्या। नामाविणें वेद आणिक नाहीं ॥ ३ ॥ करितां आचमन केशव नारायण। करिती उच्चारण आधी हेंचि ॥ ४ ॥ लग्नाचिये काळीं म्हणती सावधान। लक्ष्मीनारायण चिंतन करा ॥ ५ ॥ देहाचिये अंतीं प्रायश्चित्त देती। शेवटीं वदविती रामनाम ॥ ६ ॥ ऐसिया नामापरतें नाहीं सार। गिरिजेसी शंकर उपदेशी ॥ ७ ॥ करिती पितृश्राद्ध कर्म आचरती। शेवटीं म्हणती एकोविष्णु ॥ ८ ॥ नामें होय गति नामें होय मुक्ति। नामयाचें चित्तीं रामनाम ॥ ९ ॥

६४५. म्हणतां वाचे नाम वंदी तया यम। काळादिकासम तुज एका ॥ १ ॥ ऋद्धि सिद्धि दासीं अंगण झाडिती। उच्छिष्टें काढिती मुक्ति चारी ॥ २ ॥ चारी वेद भाट होऊनि गर्जती। सनकादिक गाती कीर्ति तुझी ॥ ३ ॥ सुरवरांचे भार अंगणीं लोळती। चरणरज क्षितीं शिव वंदी ॥ ४ ॥ नामा म्हणे देव ऐसा हो कृपाळु। करितो सांभाळू अनाथांचा ॥ ५ ॥

६४६. नामें सदा शुद्धि प्राणिया होतसे। नामापाशीं असे भुक्तिमुक्ति ॥ १ ॥ नामा ऐसें सोपें नाहीं त्रिभुवनीं। नाम संजिवनीं साधकांसी ॥ २ ॥ नामें भक्ति जोडे नामें कीर्ति वाढे। नामें सदा चढे मोक्ष हातां ॥ ३ ॥ यज्ञ दान तप नामें आली हातां।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामें सर्व सत्ता प्राप्त होय॥ ४॥ नामा म्हणे सदा नाम ज्याचे मुखीं। नाहीं याच्या तुकीं दुजा कोणी॥ ५॥

६४७. नामें तो सरता नामें तो परता। नामें पंढरिनाथा भेटविलें॥ १॥ नाम हेंचि तारी नाम भवसागरीं। उतरीं पैलतिरीं नाम तुझें॥ २॥ नाम तें अंजन नामें बोधे मन। नामेंचि निधान चांगया झाला॥ ३॥ मार्गीं जातां तुम्ही उगेंचि नसावें। वाचेसी म्हणावें रामकृष्ण॥ ४॥ रामकृष्ण हरि मुकुंदमुरारी। केशव नरहरि नारायण॥ ५॥ ऐसा हा सतत आठव नामाचा। नामा म्हणे कैंचा दोष तया॥ ६॥

६४८. चिंतातुर देहीं न साहे काजळी। मनाची पाजळी उभय दिवीं॥ १॥ प्रकाश पडेल ब्रह्म हें दिसेल। वैकुंठ जोडेल भजनभक्ती॥ २॥ नाहीं यातीवर्ण नाहीं या वेदोक्त। नामेंचि संतृप्ति होती जीवा॥ ३॥ नामा म्हणे नाम हेंचि बीजसार। तुटेल येरझार भवबंधासी॥ ४॥

६४९. गोक्षीर लाविलें अंधळिया मुखीं। तेथील पारखी जिव्हा जाणे॥ १॥ तैसें देवा तुझे नाम निरंतर। जिव्हेसी पाझर अमृताचे॥ २॥ सोलूनियां केलें साखरें घोळिलें। अंधारी खादलें तरी गोड॥ ३॥ द्राक्षफळां घड सेवितां चोखड। तयाहूनि गोड नाम तुझें॥ ४॥ आळूनियां क्षीर तुपाचिये आळें। कालविलें गुळें गोड जैसें॥ ५॥ जाणोनिया नामा करीं विनवणी। अमृताची खाण नाम तुझे॥ ६॥

६५०. नामचि हे आहे पंचतत्त्वां ठाव। नाहीं दुजा भाव देखावया॥ १॥ देखणारा जाहाली कर्पुराची वाती। नामाग्नि विश्रांती ठाईं जाहाली॥ २॥ द्वैताद्वैत तेथें नेणे जाणपण। गेलें हरपोन नामें सर्व॥ ३॥ नामदेव म्हणे अनाम तें नाम। नाना नामभ्रम तेथें दुजा॥ ४॥

६५१. हडबडली पातक। घेतां रामनाम एक॥ १॥ नाम घेतां तत्क्षणीं। चित्रगुप्तें सांडिली लेखणी॥ २॥ घेऊनि पूजेचा संभार। ब्रह्मा येतसे समोर॥ ३॥ नामा म्हणे जरी हें लटकें। तरी माझें छेदावें मस्तक॥ ४॥

६५२. असत्याचे मळ बैसले ये वाचे। ते न फिटती साचे तीर्थोदकें॥ १॥ हरी नामामृत प्रक्षाळी जिव्हेतें। पाणीये बहुते काय करिती॥ २॥ गंगासागरादी तीर्थे कोडीवरी। हरिनामाची सरी न पवती॥ ३॥ हरिनामगंगें सुस्नात पैं झाला। नाम्याजवळी आला केशिराज॥ ४॥

६५३. वैष्णव तो बळी। सदाशिव चंद्रमौळी॥ १॥ त्याचा भक्त तो रावण। मारूनि छेदिला अभिमान॥ २॥ आणिक तो बाणासूर। छेदिला शिवासमोर॥ ३॥ अनिरुद्धा समयीं ख्याती। केली तयाची फजिती॥ ४॥ भस्मासुर भस्म झाला। जाळूनियां भस्म केला॥ ५॥ मारूनियां मुक्त केलें। परि ते भक्त नाहीं झाले॥ ६॥ नामा म्हणे देवादि देव। भजावया पंढरीराव॥ ७॥

६५४. भक्ति करूनियां कोण वायां गेला। सांगा हो विठ्ठला निवडूनि॥ १॥ द्वापाराचे अंतीं नामची सुकृत। अद्यापि निश्चित चालतसे॥ २॥ नाम ऐकतां तरती निर्धारी। व्याख्यान श्रीधरी टीकाकार॥ ३॥ नामा म्हणे नाम व्यापी त्रिभुवन। नाम तें निधान कलियुगीं॥ ४॥

६५५. देवाचें हें गुज सकळ मंत्रमय। जें का नित्य ध्येय शंकराचें॥ १॥ तें हें रामनाम सेवितां सर्वभावें। रामरूप व्हावें निश्चयेसी॥ २॥ नष्ट अजामेळाचें पतितत्व गेलें। दिव्य रूप झालें वाल्मिकाचें॥ ३॥ शरीरसंपत्ति बळीनें देऊनि सकळ। केला द्वारपाळ नारायण॥ ४॥ कृष्णाविण दुजे नेणती कायावाचा। झाला पांडवांचा साहाकारी॥ ५॥ नामा म्हणे केशव भावाचा लंपट। भक्तार्शी निकट रतलासे॥ ६॥

६५६. नामाचें सामर्थ्य नेणें वेदशास्त्र। शेषाची वक्त्रें मौनावलीं॥ १॥ गंगा गणपति चंद्र सूर्य श्रेष्ठ। शंकर वरिष्ठ मौनावले॥ २॥ भीष्म पराशर उद्धव अंगद। ब्रह्मा मुचकुंद मौनावले॥ ३॥ नामा म्हणे येरे काय जाणे स्तुति। दाटोनी श्रीपती उभा केला॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

६५७. करीं घेऊनि ब्रह्मविणा। नारद वोळगे नारायणा॥ १ ॥ हेंचि हेंचि तत्त्वसार। नामा म्हणे निरंतर॥ २ ॥ आपण शिव आणि शक्ति। रामनाम ते जपती॥ ३ ॥ गात नाचत प्रल्हाद वीर। खांबीं केलासे अवतार॥ ४॥ कुंटिणीं पक्षिया म्हणे रामा। तिसी नेलें निजधामा॥ ५ ॥ अहल्येसी लागता चरण। तिसी आले मनुष्यपण॥ ६ ॥ अजामेळ पातकी अपार। नामें पावला पैलपार॥ ७॥ गजेंद्रें केलें स्मरण। त्याचें तोडिलें बंधन॥ ८ ॥ द्रौपदी स्मरे हृषीकेशी। वस्त्रें पुरविली तियेसी॥ ९ ॥ परिक्षितासी घडलें स्मरण। त्यासी झाले सुलभ चरण॥ १० ॥ नामा म्हणे निरंतरु। गगनीं अढळ केला धुरु॥ ११ ॥

६५८. अग्नी जाळी तरी न जळती पांडव। हृदयीं माधव धरिला म्हणोनी॥ १ ॥ अग्नी जाळी तरी न जळती गोपाळ। हृदयीं देवबोल धरिला म्हणोनी॥ २ ॥ अग्नी जाळी तरी न जळे हनुमंत। हृदयीं सीताकांत म्हणोनियां॥ ३ ॥ अग्नी जाळी तरी न जळे प्रल्हाद। हृदयीं गोविंद म्हणोनियां॥ ४ ॥ अग्नी जाळी तरी न जळे पैं सीता। हृदयीं रघुनाथ धरीलें म्हणोनी॥ ५ ॥ लंकेसी उरलें बिभिषणाचे घर। हृदयीं सीतावर धरिला म्हणोनि॥ ६ ॥ नामा म्हणे स्वामी स्मरावें गोविंदा। चुके भवबाधा संसाराची॥ ७ ॥

६५९. नामाचा प्रताप जाणवेना कोणा। समुद्रीं पाषाण तारीयेले॥ १ ॥ आवडीनें कोणी चिंतिता उल्हास। काय तो तयास उपेक्षील॥ २ ॥ कुंटिणी ते नीच राव्यासाठीं नेली। वैकुंठीं ठेविली सन्निधची॥ ३ ॥ अजामिळ खळ पुत्राचिया मिषें। उद्धरिलें त्यास दिनानाथें॥ ४॥ नामा म्हणे ऐसें सांगों आतां किती। नामापाशीं मुक्ति उभी असे॥ ५ ॥

६६०. आणिक ही मंत्र मोक्षदानी खरे। अशौचाचा थार असूं नये॥ १ ॥ नाममंत्र कांहीं बाधीना कोणासी। जसा अहर्निशीं रामकृष्ण॥ २ ॥ तपाची मांडणी आकाशाचें खेव। इंद्रियांची हांव राहे तरी॥ ३ ॥ यज्ञ तो आचार धनांचें सांकडें। तरी जाण द्वाड स्वर्ग सुख॥ ४॥ नामा म्हणे नाम साधकाचि माता। जैसें तैसें घेता भक्ति जोडे॥ ५॥

६६१. नामचि तो जाणे अनु कांहीं नेणें। संसार नामाविणें जाईपणा॥ १ ॥ नाम स्मरे त्यांसी संसार नाहीं। खुंटली ते पाही येरझार॥ २ ॥ नाम न होय त्याचे जळो जालेपण। आळसी वायांविण संसाराची॥ ३ ॥ नामा म्हणे मज नामीच सौरसु। नाम स्मरे हृषीकेशु त्यासी पावे॥ ४॥

६६२. साराचेंहि सार भक्तीचें भांडार। नाम निरंतर गातां वाचे॥ १ ॥ कासया करावें आणिक साधन। नामाविण क्षण जाऊं नेदी॥ २ ॥ दया शांति क्षमा हेंचि पैं भूषण। नामसंकीर्तन अहर्निशीं॥ ३ ॥ नामा म्हणे जप अखंड नामाचा। काळ हा सुखाचा सदोदित॥ ४॥

६६३. दग्धही होतसे आलें जें आकारा। असोनि निर्धारा नाम नाहीं॥ १ ॥ नाम अनुभवे प्रपंचचि ब्रह्म। जाहला सर्वोत्तम संतकृपें॥ २ ॥ म्हणोनिया संता जाऊनि शरण। साधावें निधान नाम ब्रह्म॥ ३ ॥ नामदेव म्हणे संताचिया कृपें। माजी नाम सोपें नांदतसे॥ ४॥

६६४. नांदतसे नाम आकाश पाताळीं। सर्व भूमंडळीं घनदाट॥ १ ॥ पाताळ फोडोनि किती आहे पुड। नाहीं आंत वाड नभ वरी॥ २ ॥ चौऱ्यांशी भोगिती दुर्मति पामर। नाहीं सारासार जाणत तें॥ ३ ॥ नामदेव म्हणे नाम अविनाश। तेथें नाना वेष नाम सर्व॥ ४॥

६६५. तरले तरती हा भरंवसा। पुढती न येती गर्भवासा॥ १ ॥ वाट सांपडली निकी। विठ्ठल नाम ज्याचे मुखीं॥२॥ तीर्थें इच्छिती चरणीचें। रज नामधारकाचे॥ ३ ॥ प्रायश्चित्त सांडोनी प्रौढी। झाली दीन रूपें बापुडी॥ ४॥ ऋद्धी सिद्धी महाद्वारीं। मोक्ष वोळंगण करी॥ ५ ॥ नामा म्हणे सुखनिधान। नामा पतितपावन॥ ६ ॥

६६६. तीर्थ तपरासी जप ऋषीकेषी। नाम अहर्निशीं रामराम॥ १ ॥ तीर्थांचें पैं तीर्थ नाम हें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समर्थ। होईल कृतार्थ रामनामें॥ २॥ साधेल साधन तुटेल बंधन। वाचे जनार्दन सुफल सदा॥ ३॥ नामा म्हणे हरी उच्चार तूं करी। उद्धारसी निर्धारी इहलोकीं॥ ४॥

६६७. तपें दानें व्रतें यज्ञाचिया कोडी। तुकिया झाली थोकडी हरिनामें॥ १॥ न पुरे त्यांसी घातलीं त्रिभुवनींचीं तीर्थें। नयेची पुरतें रामनामेंसी॥ २॥ नाहीं या जीवाचें बोलणें शिवाचें। उपदेशीलें वाचे शक्तिप्रती॥ ३॥ नाम नाहीं वाचे हाचि पैं निषेधु। विधी हा गोविंदु स्मरलिया॥ ४॥ श्रेष्ठ सर्व नाम शिवाचें बोलणें। युक्ति अनुमानें न बोलें कांहीं॥ ५॥ नामेंचि भक्त ते पावले अपार। नामें पतित नर उद्धरलें॥ ६॥ नामें पशु गजेंद्राचा तो उद्धार। वाल्मिके विचार हाचि केला॥ ७॥ गगनीं ध्रुरु केला अढळनामें देखा। नामेंचि गणिका उद्धरली॥ ८॥ नामें ते आपदा न बाधी प्रल्हादा। मुखीं नाम सदा उच्चारितां॥ ९॥ कृपाळु नाम पैं मेघ हाचि सार। भीष्में युधिष्ठिरा उपदेशिलें॥ १०॥ हरिनामापरतें नाहीं विचारितां। नवमाध्यायीं गीता कृष्ण सांगे॥ ११॥ सकल अमृत श्रीहरीचें नाम। त्यामाजीं उत्तम रामनाम॥ १२॥ म्हणोनी सदाशिवें धरिलें मानसीं। हेंचि गिरजेसी उपदेशिलें॥ १३॥ तारक ब्रह्ममंत्र रामनाम जाण। विश्वनाथ श्रवण करीतसे॥ १४॥ कीर्तन श्रवण हेंचि पै हो काशी। म्हणोनी मानसीं राम जपा॥ १५॥ विरंची सकल शास्त्र विचारिती। हरिनामापरता मंत्र नाहीं॥ १६॥ कळिकाळा त्रास हरिनामकीर्तनें। पतितपावन प्राणी होय॥ १७॥ कलियुगीं धर्म हरीचें हें नाम। शुकदेवें म्हणोन वाखाणिलें॥ १८॥ नामयाचा स्वामी पंढरीचा रावो। रुखमाईचा नाहो गाऊं गीतीं॥ १९॥

६६८. चंद्रतारीगण नैऋति भास्कर। तटस्थ निर्धार ब्रह्मादिक॥ १॥ ब्रह्मादि सकळ भजनीं तत्पर। तेव्हां हरिहर नाचतसे॥ २॥ कृष्ण विष्णु नाम अच्युत अनंत। सगुण निश्चित स्मरा वेगीं॥ ३॥ नामा म्हणे नको उदंड सायास। तोडी भवपाश रामनामें॥ ४॥

६६९. सुखाचा सोहळा वाटतसे जीवा। भेटणें केशवालागीं आजी॥ १॥ पावलां पाउलीं याचिया वाटे। पताकांचे थाट दिसताती॥ २॥ पैल तो कळसू पाहे पां साजणी। नामघोष कानीं पडतसे॥ ३॥ नामा म्हणे नामी पारणें जो करी। तयासि श्रीहरि उपेक्षिना॥ ४॥

६७०. नामापरता मंत्र नाहीं त्रिभुवनीं। ऐसे बोले वाणी वेदशास्त्रीं॥ १॥ पहा विचारोनि अनुभव मनीं। नका आडरानीं झडी भरो॥ २॥ नामावांचोनि तरले जे म्हणति। ते आधीं बुडती भवसागरीं॥ ३॥ नामा म्हणे नाम ॐकाराचें मूळ। ब्रह्म तें केवळ विटेवर॥ ४॥

६७१. कां करिसी सोस मायेचा असोस। नव्हे तुज सौरस नामेंविण॥ १॥ नामचि हा मंत्र नामचि हो तंत्र। नामेंविण पवित्र न होसी देखा॥ २॥ तिही लोकीं पाहतां नामेंविण सर्वथा। अच्युत म्हणतां पुण्य कोटी॥ ३॥ नाम म्हणे ब्रह्म आदिअंती नेम। तें विटेवरी सम उभें असे॥ ४॥

६७२. सार पैं सांगत उपनिषद तुम्हां। वाचे रामनामा जप करा॥ १॥ हेंचि पैं मथित सांगोनियां गेलें। उच्चारितां ठेले ब्रह्मरूप॥ २॥ ज्योतिसी ते ज्योति भजन करील। आपणचि होईल हरी स्वयें॥ ३॥ नामा म्हणे कैसे विपरीत करणें। भूतदया धरणें सर्वांभूतीं॥ ४॥

६७३. अखंड मुखीं रामनाम। धन्य तयाचाचि जन्म। स्नानसंध्येसी नेम। तो पुरुष महापवित्र॥ १॥ धन्य धन्य तयाचा जन्म। रामार्पण अवघें कर्म। तोचि तरला हाचि नेम। रामकृष्ण उच्चारणी॥ २॥ अनंत जन्मांचें सांकडें। तेणेंचि उगविलें कोडें। जप तप येणें नावडे। रामकृष्ण उच्चारणीं॥ ३॥ नामा म्हणे नाममात्रें। अवघीं निवारलीं शस्त्रें। रामकृष्ण नाम वक्त्रें। उच्चारी तो धन्य॥ ४॥

६७४. सहस्त्र दळांमधुन अनुहात ध्वनि उठी। नामाचेनि गजरें पातकें रिघालीं कपाटीं॥ १॥ जागा रे गोपाळांनों रामनामीं जागा। कळिकाळ एका

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामें महादोष जाति भंगा॥ २॥ दशमी एक व्रत दिंडीचें करा दर्शन। एकादशी उपवास तुम्ही करा जागरण॥ ३॥ द्वादशी साधनें जळती पातकांच्या कोटी। नामा म्हणे केशव ठाव देईल वैकुंठीं॥ ४॥

६७५. मायेचें भूचर रज तम सात्विक। रामनाम एक सोडवणें॥ १॥ राम हेंचि स्नान राम हेंचि ध्यान। नामें घडे यज्ञ कोटी देखा॥ २॥ न लगती साधन नाना मंत्र विवेक। रामनामीं मुख रंगीं कारे॥ ३॥ नामा म्हणे श्रीराम हेंचि वचन आम्हां। नित्य ते पौर्णिमा सोळा कळी॥ ४॥

६७६. माझें मी करितां गेले हे दिवस। न धरीच विश्वास रामनामीं॥ १॥ अंतीं तुज उद्धरती रामनाम हरी। राम पंचाक्षरी मंत्रसार॥ २॥ कां करशील सांठा प्रपंच विस्तार। न तुटे येरझार नामेंविण॥ ३॥ नामा म्हणे कैसें रामनामीं पिसें। तो उद्धरेल अपैसे इहलोकीं॥ ४॥

६७७. कृष्णकथा सांग जेणें तुटे पांग। न लागे तुज उद्वेग करणें कांहीं॥ १॥ समर्थ सोईरा राम हा निधान। जनीं जनार्दन एक ध्याई॥ २॥ नामा म्हणे उच्चार रामकृष्ण सार। तुटेल येरझार भवाब्धीची॥ ३॥

६७८. स्मरण करितां रामनाम ध्वनी। ऐकतांची कर्णी पळती यम॥ १॥ ऐसें पाठ करी रामनाम हरी। होतील कामारी ऋद्धि सिद्धि॥ २॥ साध्य तेंचि साधी न करीं उपाधि। जन्मांतरीच्या व्याधि हरती नामें॥ ३॥ नामा म्हणे सर्व राम हाचि भाव। नाहीं आणिक देव रामेंविण॥ ४॥

६७९. सर्वांभूतीं हरी आहे हेचि साच। मायाजाळ न छळे भाविकांसी॥ १॥ सर्व ब्रह्म ऐसें वेद बोले गाढा। ब्रह्मीचा पवाडा अगम्य तो॥ २॥ जाणतां नेणतां हरीनाम उच्चार। मार्ग तो साचार सुफल सदा॥ ३॥ नामा म्हणे कारण जिव्हा होय स्मरण। सर्व नारायण हरी दिसे॥ ४॥

६८०. जप तप अनुष्ठान हरी। एकचि तो नमस्कारी। भूतद्वेष कदा न करी। तप सामुग्री हेचि तुझी॥ १॥ हरी माधव यादवा। कृष्णा गोविंदा केशवा। येणें करोनियां जीवा। सर्वकाळ रंजवी॥ २॥ स्मरतां हरीचें नाम। पळोनि जाति काळयम। तुटती नाना योनी जन्म। गर्भवासा मग नये॥ ३॥ नामा जपे नामावळी। अखंड तप हेंचि सदा काळीं। हरीनामें पिटोनि टाळी। हाचि तरणोपाय सकळांचा॥ ४॥

६८१. सर्वकाळ हरी जप। हेंचि तपामाजी तप। न लागती घालावे संकल्प। नाना मंत्राचे परियेसी॥ १॥ मंत्रामाजी मंत्रसार। रामकृष्ण हा उच्चार। नित्यानित्य निर्विकार। हरी जोडेल साचारे॥ २॥ मागें कृतायुगीं सांगो। त्रेतायुगीं काय ओळगों। द्वापारीं कृष्ण रंगे रंगों। परी कलीमाजी नामतारक॥ ३॥ नामा म्हणे ग्रंथीं। पाहेपा यथानिगुती। नाम जपतांची तरती। हें व्यासाचें वचन ऐसें॥ ४॥

६८२. नाम वाचे उच्चारितां। हरे संसाराची व्यथा। जाती दोषाचिया चळथा। रामकृष्ण उच्चारणीं॥ १॥ हरी माधव गोविंद। याची नामाचा जया छंद। तोचि पावेल परमपद। निजभुवन वैकुंठीं॥ २॥ जन्मजन्माची तपरासी। तेणें नाम आलें मुखासी। स्मरतां हरी हृषिकेशी। सकळ पूर्वजां उद्धार॥ ३॥ नामा जपे ध्यानीं मनीं। अखंड विठ्ठल हरी कीर्तनीं। तेणें जपें ये मेदिनी। कोटी यज्ञ घडलें॥ ४॥

६८३. रूपासी रूपस नाम हृषीकेश। पंढरी निवास जप करी॥ १॥ विठ्ठल श्रीहरी मुकुंद श्रीहरी। नामेचि बोहरी प्रपंचाची॥ २॥ विठ्ठल नामामृत हेंचि जीवन होत। नाम हें मुखांत केशवाचें॥ ३॥ नामा म्हणे देव अमृताचा लाटा। मुखामाजी पैठा होत नामें॥ ४॥

६८४. सर्वांग साजिरी आहे तीं इंद्रिये। तंव सावध होय हरी कथे॥ १॥ कीर्तन नर्तन वाचे जनार्दन। न पावसी पतन येरझारीं॥ २॥ पूर्ण मनोरथ घडती एका नामें। दाटलें सप्रेमें जीवनहेतु॥ ३॥ नामा म्हणे विलास न करी तूं आणिक। सर्वां सर्वीं

 Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येक नाम असे ॥ ४ ॥

६८५. ऐकतां कीर्तन होती जीवन्मुक्त। दाविसी अनंत नाममात्रें ॥ १ ॥ मृत्युलोकी जो जन्म इच्छी नर। त्याच्या पुण्या पार कोण वाणी ॥ २ ॥ भक्तिसारामृत श्रेष्ठ कलियुगीं। उद्धरिले योगी ब्रह्मादिक ॥ ३ ॥ नामा म्हणे मज नाहीं चिंता भय। हृदयीं तुमचें पाय पुरे आतां ॥ ४ ॥

६८६. कीर्तनाच्या सुखें सुखी होतो देव। कोणतें वैभव वाणी आतां ॥ १ ॥ अंत्यज आणि जातिवंता। मुखीं नाम घेतां उडी घाली ॥ २ ॥ बैसोनी आसनीं आळवितां नाम। उभा सर्वोत्तम तयापुढें ॥ ३ ॥ प्रेमाचिया भरें उभ्यानें गर्जतां। नाचे हा अनंत तयासवें ॥ ४ ॥ नामा म्हणे तया कीर्तनाची गोडी। घालीतसे उडी नेटेपाटे ॥ ५ ॥

६८७. काळवेळनामसंकीर्तनीं। उंच नीच योनी हेंहि नसे ॥ १ ॥ धरा नाम कंठीं सदा सर्वकाळ। मग तो गोपाळ सांभाळील ॥ २ ॥ कृपाळू कोवसा सुखाचा सागर। करील उद्धार भाविकांसी ॥ ३ ॥ नामा म्हणे फार सोपें हें साधन। वाचे नाम घेणें इतुकेंचि ॥ ४ ॥

६८८. गीता हेंचि गंगा गुह्यभाव पै गा। नाम हेंचि वेगा सोडवण ॥ १ ॥ सर्व ब्रह्म हरी सांगतसे मुरारी। विश्वरूप श्रीहरी आपण झाला ॥ २ ॥ उपदेश अर्जुना जनीं जनार्दना। अखंड भावना भूतदया ॥ ३ ॥ नामा म्हणे सर्व आहे हाचि देव। उदार माधव सर्वांभूतीं ॥ ४ ॥

६८९. नामाचें चरित्र सदा अति गोड। तीर्थी काय चाड नाममात्रें ॥ १ ॥ ऐसा दृढ मनीं करावा विचार। नाम परिकर कलियुगीं ॥ २ ॥ नामा म्हणे नाम अनादि अक्षर। उभा कटीं कर भक्तासांठीं ॥ ३ ॥

६९०. नाम तेंचि रूप रूप तेंचि नाम। नामरूपा भिन्न नाहीं नाहीं ॥ १ ॥ आकारला देव नामरूपा आला। म्हणोनि स्थापिला नामवेदीं ॥ २ ॥ नामापरता मंत्र नाहीं हो आणिक। सांगती ते मूर्ख ज्ञानहीन ॥ ३ ॥ नामा म्हणे नाम केशव केवळ। जाणती प्रेमळ भक्त भले ॥ ४ ॥

६९१. अनंत जन्में मेळवितां दुर्लभ। तो प्राणवल्लभ शंकराचा ॥ १ ॥ वेदशास्त्र मंथुनी काढियेलें सार। ब्रह्मादिकां पार रामनामें ॥ २ ॥ स्वर्गींचे देव चिंतिताती मनीं। एकवेळां झणी भेटी देईं ॥ ३ ॥ नामा म्हणे केशवाचें नाम उच्चारितां। विघ्नासी भंगिता नवल काय ॥ ४ ॥

६९२. विठ्ठलाचें नाम जे माउलिचे ओठीं। विठो तिचें पोटीं गर्भवासी ॥ १ ॥ जयाचिये कुळीं पंढरीची वारी। विठो त्याचे घरीं बाळलीळा ॥ २ ॥ नामा म्हणे जिव्हे काढीन मी रवा। असत्य केशवा वचन होता ॥ ३ ॥

६९३. अनंत ब्रह्मांडें व्यापक तें नाम। अनादि निष्काम विश्वंभर ॥ १ ॥ तोचि कृष्ण परब्रह्म द्वारकेसी। पांडवां मानसीं ठसावला ॥ २ ॥ ठसावला तोचि पाहावा अनुभव। पांचालागीं ठाव मग कैसा ॥ ३ ॥ नामदेव म्हणे संपूर्ण अघवा। नामाचिया गांवा सींव नाहीं ॥ ४ ॥

६९४. ज्ञान व्हावें आधीं ओळखावें नांवा। मग जावें गांवा तयाचिया ॥ १ ॥ या नामाचें मूळ त्या माजी जो धाला। प्रपंच्याचा घाला मग नाहीं ॥ २ ॥ नाम गावें प्रपंच सर्व आहे नाम। ब्रह्मानंदें प्रेम घनदाट ॥ ३ ॥ नामदेव म्हणे नंदाचिया घरीं। होता एक हरि दुजें नाम ॥ ४ ॥

६९५. साधनांत सोपें नाम हें केवळ। यावीण सकळ शीण वायां ॥ १ ॥ धरारे धरा नाम विठोबाचें। तेणें अज्ञानाचें मूळ नासे ॥ २ ॥ नाम तारी फार पुराणीं वर्णिलें। नामचि केवळ आत्मसत्ता ॥ ३ ॥ नामा म्हणे नामीं रंगला सुरंग। अंगें स्वयमेव पांडुरंग ॥ ४ ॥

६९६. एकट येकला सर्व हें सकळा। आपणची झाला विश्वहरी ॥ १ ॥ न कळे याची माव कैसा आहे भाव। सर्वांभूतीं देव गीता सांगे ॥ २ ॥ भूतदया धरा भजावें श्रीधरा। नामा एक स्मरा विठ्ठल ऐसें ॥ ३ ॥ नामा म्हणे देव पंढरीपाटणीं। पावेल निर्वाणीं नाम घेतां ॥ ४ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

६९७. जीव शिव ग्रामीं मीतूंपण पाही। हा गौरव कांहीं नाहीं नामीं॥ १॥ नाहीं चतुर देह तूर्या हे उन्मनी। स्वयंभु ते खाणी निजनामाची॥ २॥ नामीं जडे चित्त तेथें काय उणें। लज्जित साधनें नाना जाहालीं॥ ३॥ नामा म्हणे नामीं मीतूंपण। नाहीं काहीं आन सर्व तेचि॥ ४॥

६९८. पवित्र परिकर नाम हा उच्चार। उद्धरण साचार जगा या॥ १॥ गोविंद केशव उच्चार श्रीराम। न लगती नेम अमूप जप॥ २॥ तें हें विठ्ठलरूप पिकलें पंढरीं। नाम चराचरीं विठ्ठल ऐसें॥ ३॥ नामा म्हणे विठ्ठल सर्वांत सखोल। उच्चारितां मोल नलगे तुज॥ ४॥

६९९. आकारिक नाम जीवानें ठेविलें। शिवानें तें केलें निर्विकल्प॥ १॥ जीव शिव दोन्ही विराले ज्यामाजी। तें नाम सहजी आद्य आहे॥ २॥ तया नामाविण जावयासी ठाव। नाहीं दुजा भाव तिळभरी॥ ३॥ नामदेव म्हणे नाम घनदाट। प्रपंच निघोट नामापरी॥ ४॥

७००. कृष्णनाम श्रेष्ठ गाती देव ऋषी। नाम अहर्निशी गोपाळाचें॥ १॥ हरी हरी हरी तूंचि बा श्रीहरी। वसे चराचरीं जनार्दन॥ २॥ आदि ब्रह्मा हरि आळवी त्रिपुरारी। उमेप्रति करि उपदेश॥ ३॥ नामा म्हणे ब्रह्म हा जप उत्तम। शंकरासी नेम दिननिशीं॥ ४॥

७०१. भजन करारे हरिहरा। नारायण शिवशंकरा। माझें बोलणें अवधारा। भेद न करा दोघांचा॥ १॥ तुम्हांसी सांगेन सत्य वृत्तांत। पाहें पां तेथींचा दृष्टांत। नारायणें सेविलें अमृत। झाला श्वेत महादेव॥ २॥ शंभूनें गिळिलें हलहला। म्हणोनि विष्णु झाला निळा। देखत देख आंधळा। झणीं होसी गव्हरा॥ ३॥ लक्ष्मी रूपें आपण हरू। देवें वरिला शारंगधरू। गरूडरूपें महेश्वरू। वदन झाला विष्णूचें॥ ४॥ शक्तिरूपें शारंगपाणी। नारायण झाला भवानी। शारंगधर नंदी होऊनि। सन्मुखासनीं बैसला॥ ५॥ एक तो एका वेगळा नाहीं। दृष्टांत तूं आगमीं पाही। नामा म्हणे एक केशव ध्यायीं। हरिहर पाहीं ज्याचें अवतार॥ ६॥

७०२. म्हणतां नाम वाचे वैकुंठ जवळी। नित्य वनमाळी भक्तांसंगें॥ १॥ होईल साधन विठ्ठलीं परिपूर्ण। निवती नयन मूर्ति पाहतां॥ २॥ शंखचक्रांकित आयुधें शोभतीं। भाग्योदयीं दिसती भाव शीळा॥ ३॥ नामा म्हणे तें रूप पंढरीस आहे। न सांडी ते सोय केशवाची॥ ४॥

७०३. आपुली पदवी सेवकासी द्यावी। तो एक गोसावी पांडुरंग॥ १॥ भावाचा आलुका भुलला भक्तिसुखा। सांपडला फुका नामासाठीं॥ २॥ प्रेमाचा जिव्हाळा नामाची आवडी। क्षणएक न सोडी संग त्याचा॥ ३॥ नामा म्हणे आम्हां दीनांचें माहेर। तो एक उदार पांडुरंग॥ ४॥

७०४. सोयरा सुखाचा विसांवा भक्तांचा। विठोबा निजाचा मायबाप॥ १॥ कृपाळु दीनाचा पडिभर नामाचा। तोडर ब्रीदाचा साच तया॥ २॥ काया मनें वाचा संग करा त्याचा। अनंत जन्माचा हरेल शीण॥ ३॥ नामा म्हणे आम्हां दीनांचें माहेर। हरी निरंतर न विसंबे॥ ४॥

७०५. देव दयानिधि भक्तांचा कैवारी। नाममात्रें तारी सर्वांलागीं॥ १॥ तया देवराया गावें हो आवडी। लागे मनीं गोडी सर्वकाळ॥ २॥ नाहीं यातिकूळ उंच नीच भेद। भाव एक शुद्ध पाहातसे॥ ३॥ नामा म्हणे काय सांगावें नवल। अखंड दंडलें व्योमाकार॥ ४॥

७०६. नाम फुकाचें चोखट। नाम घेतां नलगे कष्ट॥ १॥ पडशील ज्या सागरीं। रामनामें आत्मा तारी॥ २॥ पुत्रभावें स्मरण केलें। तया वैकुंठासी नेलें॥ ३॥ नामा हें महिमान जाणे। घेतो विठ्ठलाची आण॥ ४॥

७०७. साधावया स्वरूपसिद्धी। सिद्ध साधक समाधि। बैसोनी ध्यान बुद्धि। परी तो हरी न सांपडे॥ १॥ धन्य धन्य वैष्णव संग। अखंड तेथें पांडुरंग। कीर्तनीं नाचतसे अभंग। अखंड काळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सर्वदा ॥ २ ॥ नाम घेतां धांवें विठ्ठल। न लगे तप नलगे मोल। कष्ट न लगती बहुसाल। हा कृपाळु दीनाचा ॥ ३ ॥ नामा म्हणे भक्तीचें कारण। भक्तीसी तुष्टे नारायण। याचें करितां कीर्तन। आपें-आप तुष्टेल ॥ ४ ॥

७०८. दया हेचि दाता मन करी उदार। सर्व हा श्रीधर ऐसें भावी ॥ १ ॥ तुटेल यातना होईल वैकुंठ। पंढरी मूळपीठ सेवी कारे ॥ २ ॥ इच्छिती अमर नित्य काळ नेमें। दाटताति प्रेमें सनकादिक ॥ ३ ॥ तें हें विठ्ठलनाम पवित्र चोखडें। अंतरामाजीं चढें नित्य करी ॥ ४ ॥ होतील कामारि ऋद्धिसिद्धि अपार। आपण श्रीधर कुरवाळील ॥ ५ ॥ नामा म्हणे येथें न लगेचि मोल। विठ्ठल निमोल सर्वांभूतीं ॥ ६ ॥

७०९. पोसीशी शरीर इंद्रियांचा बांधा। सेखी ते आपदा करील तुज ॥ १ ॥ नव्हे तुझें हित विषय पोषितां। हरी हरी म्हणतां उद्धरसी ॥ २ ॥ वायांच पाल्हाळ चरित्र सांगसी। परी राम हें न म्हणसी अरे मूढा ॥ ३ ॥ नामा म्हणे हेंचि पंढरीये निधान। उच्चारिता जन तरले ऐसें ॥ ४ ॥

७१०. कां करिसी हव्यास इंद्रियांचा सोस। वायां कासावीस कोण्या काजे ॥ १ ॥ सर्वहि लटिकें माया मोहबंधन। सत्य हें निधान विठ्ठल एक ॥ २ ॥ उगवेल प्रपंच सर्व हें आहाचें। रामकृष्ण वाचें बांध जिव्हे ॥ ३ ॥ नामा म्हणे करणी करावी पैं ऐसी। जेणें त्या विठ्ठलासी पाविजेसा ॥ ४ ॥

७११. नामाचा महिमा कोण करी सीमा। जपा श्रीरामा एक्याभावें ॥ १ ॥ न लगती स्तोत्र नाना मंत्र तंत्रें। वर्णिजे वक्त्रें श्रीरामनाम ॥ २ ॥ अनंत पुण्यरासी घडे ज्या प्राण्यासी। तरीच मुखासी नाम येत ॥ ३ ॥ नामा म्हणे राम हा जप परम। तो देह उत्तम मृत्युलोकीं ॥ ४ ॥

७१२. कांसवीचे दृष्टी जैं होईजे भेटी। तैं अमृताची सृष्टी घडे त्यासी ॥ १ ॥ तैसें हें भजन श्रीरामाचें ध्यान। वाचे नारायण अमृतमय ॥ २ ॥ धन्य त्याचें कुळ सदा पैं सकळ। दिननिशीं पळ रामनाम ॥ ३ ॥ नामा म्हणे चोखडा भक्त तो उत्तम। वाचेसी सुगम रामनाम ॥ ४ ॥

७१३. मी माझे भावितां न फिटे हें ओझें। कर्मकांड दुजे आड येत ॥ १ ॥ न तुटें हें कर्म न चले हा धर्म। सर्वत्र हें ब्रह्म न कळे तया ॥ २ ॥ मी माझें हें ओझें अहंताची वाहे। परतोनी न पाहे मी कवण ॥ ३ ॥

७१४. उपदेश विव्हळ न कळे याचा अर्थ। वांयांची हा स्वार्थ प्रपंचाचा ॥ १ ॥ सांडी हा प्रपंच मिथ्या लवलाहो। विठ्ठल हा टाहो नित्य करी ॥ २ ॥ हरी हरी भजन भज दयाशीळ। होसील निर्मळ ब्रह्मरूप ॥ ३ ॥ सर्व हा आकार हरीचें शरीर। मायेचा विकार भुलों नका ॥ ४ ॥ आप तेजीं ब्रह्म हरी माझा सम। आदि अंतीं नेम विठ्ठल हरी ॥ ५ ॥ नामा म्हणे उपमा काय द्यावी यासी। नाम तारी सर्वांसी कलिमाजी ॥ ६ ॥

७१५. धिग् धिग् तो ग्राम धिग् धिग् तो आश्रम। संत समागम नाहीं जेथें ॥ १ ॥ धिग् धिग् ते संपत्ति धिग् धिग् ते संतति। भजन सर्वांभूति नाहीं जेथें ॥ २ ॥ धिग् तो आचार धिग् तो विचार। वाचे सर्वेश्वर नाहीं जेथें ॥ ३ ॥ धिग् तो वक्ता धिग् तो श्रोता। पांडुरंग कथा नाहीं जेथें ॥ ४ ॥ धिग् ते गाणें धिग् तें पढणें। विठ्ठल नाम बाणें नाहीं जेथें ॥ ५ ॥ नामा म्हणे धिग् धिग् त्यांचें जिणें। एका नारायणें वांचूनियां ॥ ६ ॥

७१६. सुख तें आपुलें चोरांशी वांटिलें। पालटें घेतलें दुःख त्याचें ॥ १ ॥ नित्य नवी त्याची सोसितां सोसिणा। नयेचि अझोनी वीट मना ॥ २ ॥ ऐसा तूं निर्लज्ज पाहे आत्मघातीं। कैसी तुझी खंती न वाटे तुज ॥ ३ ॥ लक्ष या चौऱ्यांशी सोसितां यातना। भोगिसी पतना ज्याच्या संगे ॥ ४ ॥ त्यांते भजती सांग पुढती कोण्या मोहे। विचारूनि पाहे तुझा तूंचि ॥ ५ ॥ सदा चिंतातूर होऊनि दीनरूप। संकल्प विकल्प करिसी किती ॥ ६ ॥ नाथिलाची छंदु नाहीं त्या दुराशा। भोंवसी दाही दिशा तळमळीत ॥ ७ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्यांची इंद्रियें बापुडी दिसती केविलवाणी। विषया लागोनी लोलिंगत॥ ८ ॥ तूं हें आशा करिसी निरंतरी। झालासी भिकारी कृपणाचा॥ ९ ॥ आलें काळभय हाकीत टाकीत। मूढा तुझें हीत कोण करी॥ १०॥ त्रिभुवनीं समर्थ बळी जगजेठी। रिघें त्याचे पाठी म्हणे नामा॥ ११॥

७१७. अभ्यासिले वेद झाला शास्त्रबोध। साधिल्या विविध नाना कळा॥ १ ॥ प्रेमाचा जिव्हाळा जंव नाहीं अंतरीं। तंव कैसा श्रीहरि करील कृपा॥ २ ॥ हित ते आचरा हित तें विचारा। नामीं भाव धरा जाणतेनो॥ ३ ॥ प्रसंगीं पुराणें ऐकिली श्रवणी। त्यांतील कोण मनीं धरील अर्थ॥ ४॥ काय तें सांडिलें काय तें मांडिलें। काय तें दंडिलें प्रवृत्तीसी॥ ५ ॥ अनंत ह्या मूर्ति पाहिल्या लोचनीं। यांतील कोण ध्यानीं प्रतिबिंबली॥ ६ ॥ स्वप्नीचिया परी देखती अभ्यास। न धरीच विश्वास चित्त तुझें॥ ७ ॥ वांझेचिये स्तनीं अमृताची धनी। मृगजळ पाणी तान्हावोलो॥ ८॥ तरी प्रेमेविण कळती क्रियाकर्में। हातीं येतीं वर्में विठोबाचीं॥ ९ ॥ दृष्टीचें देखणें श्रवणीचें ऐकणें। मनाचें बैसणें एक होय॥ १०॥ नामा म्हणे तरी विठो येऊनि भेटे। कायाच पालटे कैवल्य होय॥ ११॥

७१८. नामामृत गोडी आहे वैष्णवासी। येरां प्राकृतासी कळेनाची॥ १ ॥ प्राकृत हे जन भुललें विषयीं। नामाचिया गांवीं कैसें जाती॥ २ ॥ नामीं चित्त व्हावें जावें तेव्हां गांवा। मग नाम गोवा तेथें कैंचा॥ ३ ॥ नाम तेंचि जाहालें वर्ण रूपातीत। अनाम स्वतंत्र स्वयंभ तो॥ ४॥ नामदेव म्हणे नाम हें सुलभ। अभक्ता दुर्लभ नानापरी॥ ५॥

७१९. अवघिया आचार निष्ठा। चित्त जरी जाय वैकुंठा। तरीच निस्तारिलें कष्टां। भवपाशा-पासोनीं॥ १ ॥ धन्य धन्य चित्तवृत्ति। विठ्ठल भक्तीसी पुढत पुढती। त्याचे पूर्वज उद्धरती। गीत गाती रामकृष्ण॥ २ ॥ हेंचि जप तप ध्यान। हरी चरणीं ठेवूनि मन। साधलें कार्यांचें कारण। रामकृष्ण उच्चारणीं॥ ३ ॥ नामा जपे ठेऊनि चित्त। अखंडचरणीं झाला रत। पुरलें आमचें मनोरथ। सर्व कृतार्थ पैं झालों॥ ४॥

७२०. सर्वांमाजी सार नाम हें देवाचें। सर्व साधनाचें सार जें कां॥ १ ॥ चार साहा आणिक आठरा वर्णिती। नामें निजप्राप्ती अर्धक्षणीं॥ २॥ व्यासादिक नाम साधियलें दृढ। प्रपंच काबाड निरसेल॥ ३ ॥ नामदेव म्हणे निजधामा ब्रह्म। घेतां नेम धर्म सर्व साधे॥ ४॥

७२१. मन करी आपुलें वासना ते निवारी। सर्व हेंचि हरी भजत जाय॥ १ ॥ ब्रह्मनाम गोविंद नाहीं भेदाभेद। तुटे भवबंध हरीनामें॥ २ ॥ सांडी लगबग न करी तूं आळस। विठ्ठलीं विश्वास असों देणें॥ ३ ॥ नामा म्हणे ब्रह्म हेंचि निरूपण। सर्व काम पूर्ण याच्या नामें॥ ४॥

७२२. व्रत तप दान हवन पूजन। न लगे साधन नाम म्हणतां॥ १ ॥ रामकृष्ण हरी मुकुंदा मुरारी। जिव्हे क्षणभरी न विसंबें॥ २ ॥ कळिकाल दारुण करीतसे विघ्न। परजी नारायण नाम जिव्हें॥ ३ ॥ शरण आलों जिव्हें तुवां नुपेक्षावें। नामा म्हणे गावें हरिनाम॥ ४॥

७२३. नित्य सर्वगत अखंड सगुण। केशवाचें ध्यान करी ब्रह्म॥ १ ॥ ब्रह्मा सर्वकाळ सांगें साधूपाशीं। आणि हे ऋषी तेंचि मानी॥ २ ॥ मनीं जो मानसी नामामृत सार। सेविती सादर नामा म्हणे॥ ३ ॥

७२४. नामाचा धारक विष्णुरूप देख। वैकुंठीचें सुख रुळे पायीं॥ १ ॥ निराकार देव आकारासी आला। भक्ती पैं स्थापिला नामरूपा॥ २ ॥ नाममंत्र बीज जोंवरी नाहीं जया। तोंवरी केशवदया नाहीं प्राप्त॥ ३ ॥ नामा म्हणे नाम केशव केवळ। जाणती प्रेमळ हरिभक्त॥ ४॥

७२५. सदा पैं परिपूर्ण जयाचें रूपडें। तेथेंचि माजीवडे मन करी॥ १ ॥ होईल उद्धार सुटेल संसार। सर्व मायापूर. दुरी होय॥ २ ॥ कंटाळा कायेचा दुरावा मायेचा। हेंचि जप वाचा स्मरे नाम॥ ३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामा म्हणे करी सर्व हरी हरी। राम हें उत्तरीं वाखाणीं पां॥ ४॥

७२६. रकार मकार बांधी कांरे तुळी। तापत्रय होळी होऊनि जाय॥ १॥ गोविंद मुकुंद हरि परमानंद। केशव छंद नित्य वाचे॥ २॥ जपे जगद्‌बंधु हरिकथा छंदू। बिघडे भवबंधु येणें गात्रें॥ ३॥ नामा म्हणे केशवा न करी निर्वाण। माझा अभिमान आहे त्यासी॥ ४॥

७२७. जन्माचें कारण रामनाम पाठे। जाईजें वैकुंठें एक वेळां॥ १॥ रामनाम ऐसा जिव्हे उमटे ठसा। तो उद्धरेल अपैसा इहलोकीं॥ २॥ दोअक्षरी राम हा जप परम। नलगे तुज नेम नाना पंथ॥ ३॥ नामा म्हणे पवित्र श्रीरामाचें चरित्र। उद्धरसि गोत्र पूर्वजेसी॥ ४॥

७२८. गोविंद गोपाळ वाचेसि निखळ। तो उद्धरे तात्काळ कलिमाजी॥ १॥ नारायण नारायण हेंचि पारायण। उद्धरले जन इहलोकीं॥ २॥ तुटती यातना कर्माच्या भावना। जड जीव उद्धरणा नाम स्मरा॥ ३॥ नामा म्हणे राम हा जप परम। न लगती नेम नानाकोटी॥ ४॥

७२९. शंभु उपदेशी भवानिसी। रामनाम जपे मानसीं॥ १॥ दोन्ही अक्षरें रसाळें। महा पातकां करी निराळें॥ २॥ बीजमंत्र रामनाम। फळ शतकोटी रामायण॥ ३॥ नामा विनवितो रघुनंदना। विनंती परिसा दशरथनंदना॥ ४॥

७३०. संसार पाल्हाळ सांगसी परिकर। नाम तें श्रीधर न म्हणसी॥ १॥ कैसें तुज उद्धरण होईल गव्हारा। भजन त्या हरिहरा करी वेगीं॥ २॥ योनी नानाविधा पावसी आपदा। हाचि खेळ सदा स्मरतोसि॥ ३॥ नामा म्हणे लटिकें प्रपंचासी मुके। राम हेंचि मुखें जप करी॥ ४॥

७३१. नामावांचूनि कांही दुजें येथें नाहीं। वेगीं लवलाहीं राम जपा॥ १॥ गोविंद गोपाळ वाचेसी रसाळ। पावसी केवळ निजपद॥ २॥ ध्रुव प्रल्हाद बळी अंबऋषि प्रबुद्ध। नामेंचि विदग्द पावले देखा॥ ३॥ नामा म्हणे राम वाचे जया नाम। संसाराचें श्रम हरे नामें॥ ४॥

७३२. गाणें गातीरे सुगड। तयां हांसति दुघड॥ १॥ नाम गोड नाम गोड। होय जन्माचा निवाड॥ २॥ हांसे त्यासी हांसूं द्यावें। गात आपण असावें॥ ३॥ नामा म्हणे जे हांसती। त्यांची कुळें नरका जाती॥ ४॥

७३३. नाम एकचि तारक। रामनामें शुद्ध मुख। येणें उद्धरती तिन्ही लोक। कुळांसहित वैकुंठ॥ १॥ धन्य धन्य तें कुळ। रामनामें नित्य निर्मळ। जो उच्चारी सर्वकाळ। धन्य जन्म तयाचा॥ २॥ एक हरी एक तत्त्व। तेथें धरोनिया शुद्ध सत्त्व। नाना काय करिसी कवित्व। राम नाम उच्चारी॥ ३॥ नामा जपे नाम मंत्र। हातीं न घे आणिक शस्त्र। रामकृष्ण हें वक्त्रें। उच्चार इतुकेचि पुरे आम्हां॥ ४॥

७३४. तूं तंव नेणता परी हरि जाणता। आहे तो समता सर्वांभूतीं॥ १॥ सर्व ब्रह्म हरी येकचि निर्धार। होसील झडकरी ब्रह्म तूंचि॥ २॥ अच्युत माधव अमृताच्या पाठें। लागतांचि वाटे वंदी यम॥ ३॥ नामा म्हणे होसील जिवलग विष्णूचा। दास त्या हरीचा आवडता॥ ४॥

७३५. न लगती कथा व्युत्पत्ति उलथा। वाउग्या चळथा ग्रंथाचिया॥ १॥ हरि हरि भजन जनीं जनार्दन। सर्वत्रीं समान भूतदया॥ २॥ भावेंचि भजावें हरीतें पुजावें। नित्य हें सेवावें रामनाम॥ ३॥ नामा म्हणे गोड नको तें हें वाड। विठ्ठलाचें वेड इतुकें पुरे॥ ४॥

७३६. मंत्राचा पैं मंत्र हरी हरी उच्चार। न लगे तो विचार करणें कांहीं॥ १॥ सुफळ नाम गाढें वाचेसि उच्चारूं। केशव हाचि करूं सर्वांभूतीं॥ २॥ नाहीं यासी पतन न होईल बंधन। नित्य हेंचि स्नान रामनामें॥ ३॥ नामा म्हणे भाव सर्वांभूतीं करा। आणिक पसारा घालूं नको॥ ४॥

७३७. नाचतां उडतां रडतां पडतां। नाम्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अवचितां हातां आला ॥ १ ॥ येतां जातां हरि हरि हरि वाटे। नाम तें चोखटें स्मरा मुखीं ॥ २ ॥ हसतां खेळतां घरीं दारीं पारीं। मुखीं हरि हरि म्हणे कारे ॥ ३ ॥ खातां जेवितां अन्नतृप्ति सारी। सांडी मांडी हरी सर्वकाळ ॥ ४ ॥ नामा म्हणे नामीं आस्ति नास्ति ठसा। केशव हरि सन्मुख तुम्हां दिसे ॥ ५ ॥

७३८. करितां हरिकथा नाम सुखरासी। उद्धार जीवाशीं एका नामें ॥ १ ॥ तें हें रामनाम जप तूं सप्रेम। जप हा सुगम सुफळ सदा ॥ २ ॥ नामेंचि तरलें नामेंचि तरलें। नाम म्हणतां गेले वैकुंठास ॥ ३ ॥ नामा म्हणे एक नामेंसी विनटे। ते वैकुंठीचे पेठे पावले देखा ॥ ४ ॥

७३९. हरिविण देह मळीण सर्वथा। मंगळाची कथा रामकृष्ण ॥ १ ॥ कथा करी कोणी ऐकती जे मन। वैकुंठभुवन हातां आलें ॥ २ ॥ वेदशास्त्रां सार नामाचा उच्चार। अंतीं पैल पार दाखवितो ॥ ३ ॥ जन्मोनियां जगीं अलिप्त असावें। नाम तें स्मरावें म्हणे नामा ॥ ४ ॥

७४०. विष्णुनाम श्रेष्ठ गाताती देवऋषी। नाम अहर्निशीं गोपाळांचें ॥ १ ॥ हरि हरि हरि तूंचि बा श्रीहरी। वसे चराचरीं जनार्दन ॥ २ ॥ आदि ब्रह्म हरी आळवी त्रिपुरारी। उमेप्रती करी उपदेश ॥ ३ ॥ नामा म्हणे पूर्ण ब्रह्म जप उत्तमोत्तम। शंकरासी नेम दिननिशीं ॥ ४ ॥

७४१. सर्वकाळ पुण्याच्या राशी। हरिनाम आलिया जिव्हेसी। नित्य तप अनुष्ठानाच्या राशी। कोटी यज्ञासी लाभ झाला ॥ १ ॥ धन्य धन्य त्यांचा वंश। जे जे रतले नामास। रामनामी नित्य सौरस। ते विष्णुदास पवित्र ॥ २ ॥ पवित्र ते स्वधर्मी। ज्यांसी सर्वकाळ नामीं। तयाचें नाम पूर्ण कामीं। मनोरथ पुरतील ॥ ३ ॥ नामा जपे नाम हरीचें। सार्थक केलें संसाराचें। ओझें फेडिलें पूर्वजन्माचें। हरी स्मरण केलिया ॥ ४ ॥

७४२. नामीं नारायण। होय भक्तांचे आधीन ॥ १ ॥ न मागतां भक्ति। नामापासी चारी मुक्ति ॥ २ ॥ भुलों नये जाण। नाम वैकुंठीं निशाण ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसे प्राणी। सम होती नारायणीं ॥ ४ ॥

७४३. सदा फळ सुफळ वाचेसी गोपाळ। वंदी कळिकाळ शास्त्र सांगे ॥ १ ॥ ब्रह्मांडनायक ऐसें जें कवतुक। तेंचि नाम एक श्रीकृष्ण ऐसें ॥ २ ॥ आदी अंत पाहतां नाहीं पैं सर्वथा। परिपूर्ण सरीता अमृताची ॥ ३ ॥ नामा म्हणे अनंत कां करिसी संकेत। उद्धरिले पतीत युगायुगीं ॥ ४ ॥

७४४. आतां आहे नाहीं पाहतां क्षण एक। संपत्तीचें सुख विषय हा ॥ १ ॥ हित तें आचरा हित तें विचारा। नामीं भाव धरा जाणतेनो ॥ २ ॥ संपत्तीच्या बळें एक झाले आंधळे। वेढिलें कळिकाळें स्मरण नाहीं ॥ ३ ॥ एक विद्यावंत जातीच्या अभिमानें। नेलें तमोगुणें रसातळा ॥ ४ ॥ मिथ्या माया करोनि मोह हव्यास। वेचिलें आयुष्य वांयाविण ॥ ५ ॥ नामा म्हणे कृपा करूनि ऐशा जीवा। सोडवी केशवा मायबापा ॥ ६ ॥

७४५. आम्ही विठोबाचे दूत। यम आणूं शरणागत ॥ १ ॥ मुखें नाम हातें टाळी। महापापा करूं होळी ॥ २ ॥ करूं हरिनामाचा घोष। कुंभपाक पाडूं वोस ॥ ३ ॥ करूं हरिकथा कीर्तन। तोडूं यमाचें बंधन ॥ ४ ॥ एवढा प्रताप नामाचा। रिघ नव्हें कळिकाळाचा ॥ ५ ॥ ऐसा नामा यशवंत। विठोबाचा शरणागत ॥ ६ ॥

७४६. ज्यासी विन्मुख संसार। तो करी मोक्षाचा विचार ॥ १ ॥ आम्ही पंढरीचे लाठे। न जावो वैकुंठींचे वाटे ॥ २ ॥ सांडोनि पंढरीची वारी। मोक्ष मागतो भिकारी ॥ ३ ॥ जन्मोजन्मींचा आळसी। तो मुक्तितें अभिलाषी ॥ ४ ॥ ताट ओगरिलें निकें। सांडोनी कोण जाय भीके ॥ ५ ॥ जो कां नेणे नाम गोडी। तो मुक्तितें चरफडी ॥ ६ ॥ नामा म्हणे विष्णुदासां। झणीं भ्याला गर्भवासा ॥ ७ ॥

७४७. हरिकथाश्रवण श्रवणाचेनि द्वारें। माझिया दातारें केशवें दिलें ॥ १ ॥ तीर्थाचें सुख

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चरणाचेनि द्वारें। माझिया दातारें केशवें दिलें॥ २॥ पूजनाचें सुख कराचेनि द्वारें। माझिया दातारें केशवें दिलें॥ ३॥ नामा म्हणे ऐसे जयाचे उपकार। तो विठ्ठल दातार विसरले॥ ४॥

७४८. ब्राह्मण हो तुम्ही सर्व नारीनर। सर्वांसी आधार नाम सत्य॥ १॥ नामाविण गति न सरे आणिक। वैकुंठनायक बोले मुखें॥ २॥ परि तेंचि नाम पहावें शोधुनी। चौऱ्यांशीची खाणी तेव्हां चुके॥ ३॥ नामा म्हणे आतां सद्‌गुरु वंदुनी। नाम घ्या शोधूनि सत्य मुक्त॥ ४॥

७४९. ब्राह्मणा न कळे आपुलें तें वर्म। गवसे परब्रह्म नामें एका॥ १॥ लहान थोरांसी करितों प्रार्थना। दृढ नारायणा मनीं धरा॥ २॥ सर्वांप्रति माझी हेचि पैं विनंति। आठवा श्रीपति आपुले मनीं॥ ३॥ केशव नारायण करावें आचमन। तेंवी संध्या स्नान कर्म तया॥ ४॥ नामा म्हणे हेंचि करा नित्य भजन। ब्रह्मार्पण साधन याचे पायीं॥ ५॥

७५०. नव्हे तुज हित विषय पोशितां। हरी हरी म्हणतां तरशील॥ १॥ माधव श्रीहरी कृष्ण नरहरी। वेगीं हा उच्चारी लवलाही॥ २॥ घडतील यज्ञ पापें होतील भग्न। प्रपंच सर्वज्ञ होईल ब्रह्म॥ ३॥ नामा म्हणे हरिकथा हरी भवव्यथा। उद्धरसी सर्वथा भाक माझी॥ ४॥

७५१. ब्राह्मण व शूद्र वैश्य नारीनर। सर्वांसी आधार नाम सत्य॥ १॥ नामाविण गति नाहीं हो आणीक। वैकुंठनायक बोले मुखें॥ २॥ परी तेंचि नाम पाहावें शोधून। चौऱ्यांशी खाणी चुके तेव्हा॥ ३॥ नामदेव म्हणे सद्‌गुरुपासोनी। नाम घ्या शोधूनि भावमुक्त॥ ४॥

७५२. सदाशिवापुढें कोण अनुष्ठानी। अष्टांग लावूनि नमस्कारीं॥ १॥ नाम यज्ञ जन ऋषेश्वर ध्याती। शीतळ ते होती काळकूट॥ २॥ सर्वांमाजी श्रेष्ठ नाम कलियुगीं। रामकृष्ण जगीं नामनौका॥ ३॥ नामा म्हणे नाम अखंडित स्मरा। पांडुरंग धरा भजा वेगीं॥ ४॥

७५३. ब्रह्मांडनायक विश्वाचा गोसावी। तो केला पांडवीं म्हणियारा॥ १॥ भावाचा लंपट भक्तां पराधीन। सोडोनी अभिमान दास्य करी॥ २॥ भाजीचिया पाना संतोषला हरी। जयाचे उदरीं चौदा भुवनें॥ ३॥ जनक श्रुतिदेवें धरियेला करीं। दोघांचिये घरीं घेतो पूजा॥ ४॥ पुंडलिकें बैसों टाकियली वीट। तेथेंचि वैकुंठ वसविलें॥ ५॥ नामा म्हणे तुम्ही विठ्ठलचि धरा। चरणीं तुम्हां थारा देईल देखा॥ ६॥

७५४. केशव कैवल्य कृपाळ। नारायणें उद्धरिला अजामेळ। माधव मनीं धरा निश्चळ। गोविंद गोपाळ गोकुळींचा॥ १॥ विष्णु विश्वाचा जिव्हाळा। मधुसूदन माउली सकळां। त्रिविक्रमें रक्षिलें गोकुळा। वामनें पाताळीं बळी नेला॥ २॥ श्रीधरें सृष्टि धरिली पृष्ठीं। हृषिकेश उभा भीवरेतटीं। पद्मनाभ पुंडलिकासाठीं। दामोदरें गोष्टी पांडवांशी॥ ३॥ संकर्षणें अर्जुनासी संवाद केला। वासुदेवें अवचितां वालीं वधिला। प्रद्युम्न समुद्रावरी कोपला। अनिरुद्धें छेदिला सहस्त्रबाहो॥ ४॥ पुरुषोत्तमें केला पुरुषार्थ। अधोक्षजें हिरण्यकश्यपा मारिली लाथ। नरहरि प्रल्हादा रक्षित। स्मरावा अच्युत स्वामी माझा॥ ५॥ जनार्दनें रावणादि वधिलें। उपेंद्रें अहिल्येसी उद्धरिलें। हरि हरि म्हणतां दोष जळाले। कृष्णें तारिलें गणिकेसी॥ ६॥ या चोवीस नामांचें करितां स्मरण। जन्म-मरणांचें होय दहन। विष्णुदास नामा करी चिंतन। चरण ध्यान मज देईं॥ ७॥

७५५. येऊनि संसारा। हित वेगीं विचारा॥ १॥ स्मरा हृषिकेशी। तो नेईल परलोकासी॥ २॥ गणिका नाम उच्चारी वाचे। जन्म-मरण चुकलें तिचें॥ ३॥ अजामेळ पापराशी। नामें पावला मोक्षासी॥ ४॥ दूध मागों गेलें लेकरूं। तया दिधला क्षीरसागरू॥ ५॥ सापत्नी धुरू दवडिला। तो अढळपदीं बैसविला॥ ६॥ गजेंद्र स्मरत तांतडी। त्याची चुकविली सांकडी॥ ७॥ नामा म्हणे नामबळें। उद्धरती कोटी कुळें॥ ८॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

७५६. हरिनाम गातां पवित्र। सेविती हरिहर ब्रह्मादिक॥ १॥ नाम तारी नाम साहाकारी। नामें उच्चारी रूपें तुझीं॥ २॥ ऐसी अनंत नामें तुझीं न वर्णिविती देवा। नामा म्हणे केशवा विनवीतसे॥ ३॥

७५७. नाम घेतां भगवंताचें। पाश तुटती भवाचे॥ १॥ जे जे नामीं रत झाले। ते ते केशवीं तारिले॥ २॥ गणिका दुराचारी। नामें तारिली अहिल्या नारी॥ ३॥ महा पापी अजामेळ। तोहि तारिला चांडाळ॥ ४॥ नामें गजेंद्र तारिला। देवें मोक्ष पदासी नेला॥ ५॥ नाम घेतसे पांचाळी। उभा बाप वनमाळी॥ ६॥ नामा सांगे भाविकासी। नाम घ्यारे अहर्निशीं॥ ७॥

७५८. कुटिल कुबुद्धि कुपात्र कठोरी। अंगिकारी हरी अश्वत्थामा॥ १॥ अश्वत्थामा अंबऋषि दुर्योधन। शेवटीं अर्जुन हितकारी॥ २॥ मानीं भावभक्ति आश्चर्य सकळ। शंकर शीतळ होय नामें॥ ३॥ नामा म्हणे आधीं नाममंत्र घोका। नाहीं भय धोका किमपिही॥ ४॥

७५९. नामाचा प्रताप काय सांगूं वाचे। अक्षय सुखाचें स्थान दावी॥ १॥ नामाविण कांही नाही नाही सार। साधावें सत्वर भलेनो हें॥ २॥ अजामेळ पाहा आजन्म पातकीं। नामें गेला सेखीं वैकुंठासी॥ ३॥ कुंटिणी ज़ारणी शुकामिसें गाय। वैकुंठासी जाय तत्क्षणीं॥ ४॥ पाहा वाल्ह्या कोळी उफराट्या नामें। भविष्य संभ्रमें वाखाणिलें॥ ५॥ नामा म्हणे किती सांगावा निर्धार। साधन सोपारें नाम एक॥ ६॥

७६०. नाम न म्हणे आवडी। व्यर्थ वाचे बडबडी॥ १॥ जिव्हा नव्हे ती वाचक। भोगी आळसें नरक॥ २॥ करी आरालिया निंदा। परी न म्हणे गोविंदा॥ ३॥ असत्या आवडी। सदा वाचेसी रोकडी॥ ४॥ निंदेवांचूनि पातक। सत्य जाणा माझी भाक॥ ५॥ गर्जे नामाचे पवाडे। पायां कळिकाळ पडे॥ ६॥ नित्य सहज चैतन्य। नामा म्हणे नाम जाण॥ ७॥

७६१. जयासी लागली रामनामाची गोडी। त्यानें केली प्रौढी परमार्थाची॥ १॥ कलिमाजी नाम सुलभ सोपारें। यालागी आदर नामीं धरा॥ २॥ आणिक साधनें आहेती उदंड। सेवितां वितंड कष्ट तेथें॥ ३॥ सोवळें ओवळें उंच नीच वर्ण। नाहीं येथें गुण दोष कांहीं॥ ४॥ नामा म्हणे सर्व सिद्धांताचा भाव। प्राणियांचें दैव कोण जाणे॥ ५॥

७६२. नाम जींही उच्चारण केलें। तींही वैकुंठ साधिलें। भवसागर पार पावले। उद्धरले हरीभक्त॥ १॥ नाम दुर्लभ दुर्लभ। तारील ह्रा पद्मनाभ। पुंडलिकें करोनियां स्वयंभ। केशव मूर्ति केली उभी॥ २॥ ऐसें अगाध हरी रूपडें। प्रत्यक्ष पुंडलिकापुढें। भक्ती काज कैवाडें। भीमातीरीं उभा असे॥ ३॥ वर्णावया न पुरे शेष। वदां न घालवे कास। तेथें शास्त्र काय घेती भास। रूप वर्णावया हरीचें॥ ४॥ उद्धव अक्रूर द्वापारीं। त्यासवें खेळले हरी। मग ते उद्धरिले अवधारी। ज्ञान देऊनि श्रीकृष्णें॥ ५॥ नामा म्हणे ऐसें नाम। हरीकथेसी धरी प्रेम। तरी तुझा धन्य होईल जन्म। मनुष्य जन्मीं असता॥ ६॥

७६३. हरिनाम पाठ हाचि भाव। हरी हरी हाचि देव। हरीविण न फिटे संदेह। सर्व जिवाचा जाण पां॥ १॥ हरीतत्त्व ज्याचे देहीं तोचि तरला येथें पाही। हरीविण या डोहीं। भवसागर कैसा तरेल॥ २॥ रामकृष्ण वासुदेवा। हाचि सर्व जिवांचा विसांवा। येथें पोकारूनियां धांवा। विठ्ठलनाम उच्चारी॥ ३॥ नामा जपे हृदयीं सदा। रामकृष्ण हाचि धंदा। हरीनाम परमानंदा। हाचि जप जपतसे॥ ४॥

७६४. भवाब्धि तारण रामकृष्ण नांव। रोहिणीची माव सकळ दिसे॥ १॥ नाम हेंचि थोर नाम हेंचि थोर। हेंचि वैकुंठीं बिढार रामनामें॥ २॥ राम हे निशाणी जपताची अढळ। वैकुंठ तत्काळ तया जीवा॥ ३॥ नामा म्हणे वैकुंठ नामेंचि जोडेल। अंती तुज पावेल नाम एक॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

७६५. पद तीर्थ दान हें सर्व कुवाडें। नाम एक वाड केशवाचें॥ १ ॥ मुमुक्षु साधकीं सदा नाम गावें। तेणेंचिया व्हावें अखंडित॥ २ ॥ विपत्तीचे बळें न होतां विन्मुख। नाममात्र एक धरा वाचे॥ ३ ॥ जीवन्मुक्त शुक मुनि ध्रुवादिक। तयासी आणिक घ्यास नाहीं॥ ४॥ नामयाची वाणी अमृताची खाणी। घ्यावी आतां धणी सर्वत्रांहि॥ ५॥

७६६. केशव नाम गाय केशव नाम गाय। केशव नाम गाय कामधेनु॥ १ ॥ वेणुनादीं चरे पाणी पी भीवरें। ती गाय हंबरे भक्तालागीं॥ २॥ भक्तीसुखें धाय प्रेमें तें पान्हाय। भुकेलिया खाय पातकासी॥ ३ ॥ नामा म्हणे गाय पंढरीसी आहे। पापिया न साहे पाठीलागे॥ ४॥

७६७. आदरें जपतां केशवाचें नाम। वैकुंठ हें धाम पायां पडे॥ १ ॥ आणीक सायास करूनि कदापि। चौऱ्यांशीच्या सिंपीं गुंफों नका॥ २॥ याजसाठीं हरिनाम निरंतरी। तारील निर्धारी भाक माझी॥ ३॥ भावभक्ति क्रिया न लगे आणिक। कीर्तन तारक म्हणे नामा॥ ४॥

७६८. केशव म्हणतां क्लेश जाताती परते। त्याहुनि सरतें आणिक नाहीं॥ १ ॥ वेद कां पढसी शास्त्रे कां शिणसी। उदंड वाचेसी हरी म्हणा॥ २॥ याहुनि पैं सार नाहीं हो दुसरें। भीष्में युधिष्ठिर उपदेशिला॥ ३ ॥ नामा म्हणे धरा केशवीं विश्वास। तुटे गर्भवास नामें एके॥ ४॥

७६९. शेतीं बीज नेतां थोडें। मोटें आणिताती गाडे॥ १ ॥ एक्या नामें हरि जोडे। फिटे जन्माचें सांकडें॥ २॥ बाळें भोळे जन। सर्व तरती कीर्तनें॥ ३॥ नामा म्हणे नेणें मूढे। नाम स्मरावें साबडें॥ ४॥

७७०. तोडीं हें बिरडें मोह ममता आधी। विषय बाधा व्याधी गुंफों नको॥ १ ॥ असे घराश्रमीं भजे सर्वांभूतीं। मी माझें पुढती म्हणो नको॥ २॥ तूं तंव लटिका आलासी कोठुनि। मी माझे म्हणोनि म्हणतोसी॥ ३॥ नामा म्हणे मूळ राम परब्रह्म। जगाचा विश्राम त्यासी भजे॥ ४॥

७७१. मी म्हणतां अहंता होईल पूर्णता। भजन सर्वथा न घडे येणें॥ १ ॥ आपुलें आपण विचाराचें धन। हरि हाचि पूर्ण भजे कारे॥ २॥ हेंचि भजन थोर करी निरंतर। नाम हें सधर मनें गिळी॥ ३॥ नामा म्हणे अपार नाम पारावार। श्रीराम सुंदर जप करी॥ ४॥

७७२. विषय खटपट आचार सांगसी। विठ्ठलीं न भजसी अरे मूढा॥ १॥ पूर्णब्रह्म हरी विठ्ठल श्रीहरी। अंतीं हा निर्धारी तारील सत्य॥ २ ॥ न लगे सायास करणें उपवास। रामाचा विश्वास ऐसा धरी॥ ३॥ नामा म्हणे प्रेम धरी तूं सप्रेम। विठ्ठल हाचि नेम दिननिर्शीं॥ ४॥

७७३. एकांत एकला सर्व आहे हरी। ऐसेंचि अहर्निशीं ध्याइजे तूं॥ १ ॥ सर्वांभूतीं विठ्ठल आहे आहे साचे। हे तंव वेदींचें वचन जाण॥ २॥ मार्ग हाचि सोपा गेले मुनिजन। जनीं जनार्दन हाचि भावो॥ ३॥ नामा म्हणे नाम प्रेम उच्चारण। सर्वही कारण होईल तुझें॥ ४॥

७७४. उपदेश सुगम आईकरे एक। नाम हें सम्यक विठ्ठलाचें॥ १॥ जनीं जनार्दन भावचि संपन्न। विठ्ठल उद्धरण कलीमाजी॥ २॥ साधेल निधान पुरेल मनोरथ। नामेंचि कृतार्थ होसी जनी॥ ३॥ नामा म्हणे नाम घेई तूं झडकरी। पावसी निर्धारी वैकुंठपद॥ ४॥

७७५. एकचि क्षरलें एकचि देखिलें। ब्रह्म हें संचलें हरिनामें॥ १ ॥ एक एकाकार सर्वही आकार। राम हा साकार सर्वांघटीं॥ २॥ असोनि निराळा सुमनाचा वास। तैसा हृषिकेश जीवां सकळा॥ ३॥ नामा म्हणे सुमन कळिकाळें एक। तेंचि निजसुख घेई जना॥ ४॥

७७६. प्रसन्न वदन सदा वीळ आहे। कां करिसी उपाय कर्म जाड॥ १ ॥ मंत्रांचा पै मंत्र बीज नाम हरीचें। तेंचि हें शिवाचें रामनाम॥ २॥ तुटेल भवकंद जासील निजपंथें। झणी तूं दुश्चिंतें करिसी चित्त॥ ३॥ नामा म्हणे भजन सर्व हरीचें करी।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होईल बोहरी प्रपंचाची ॥ ४ ॥

७७७. एकतत्त्व हरी निर्धार तूं धरी। प्रपंच बाहेरी एका नामें ॥ १ ॥ अच्युत गोविंद परमानंद छंद। नित्य तो आल्हाद हरि नामीं ॥ २ ॥ ऐसा तूं विनटें हरी नामपाठें। जासील वैकुंठें नश्वरिता ॥ ३ ॥ नामा म्हणे तत्त्व नाम गोविंदाचें। हेंचि धरी साचें येर वृथा ॥ ४ ॥

७७८. शरीर संपत्ती मायेचें टवाळ। वांयांची पाल्हाळ मिरवितोसी ॥ १ ॥ नाम हेंचि तारी विठ्ठल निर्धार। म्हणे हरी हरी एकी हेळा ॥ २ ॥ स्मरतां गोपाळनाम वंदील काळयम। न लगती नेम मंत्रबाधा ॥ ३ ॥ नामा म्हणे सार मंत्र तो उत्तम। राम हेंचि नाम स्मरें कां रे ॥ ४ ॥

७७९. सर्वांमाजी सार नाम श्रीहरीचें। अखंडीत वाचे जप करी ॥ १ ॥ निशीदिनीं हृदयीं ध्यातो शूळपाणी। पाविजे निर्वाणीं मोक्षप्रद ॥ २ ॥ नामा म्हणे ऐसें स्मरे कां निधान। पावेल साधन वैकुंठींचें ॥ ३ ॥

७८०. विठ्ठलासी पाहे विठ्ठलासी ध्याये। विठ्ठलासि गाये सर्वकाळ ॥ १ ॥ विठ्ठल हा वृत्ति विठ्ठल जपणें। चित्त वित्त मनें सर्वकाळ ॥ २ ॥ सबाह्य विठ्ठल दाटे घनवट। दशदिशा अफाट विठ्ठलचि ॥ ३ ॥ नामा म्हणे तुम्ही विठ्ठल होऊन। अभंग भजन करीतसां ॥ ४ ॥

७८१. सार पैं नाम विठ्ठलाचें आहे। दिनदिशीं सोय मना लावी ॥ १ ॥ गुंपेजेल मन जोडती पाउलें। तुटती घेतले मायाजाळ ॥ २ ॥ नामचि कारण जप पैं सफळ। उद्धार निर्मळ सकळ जीवां ॥ ३ ॥ नामा म्हणे तो हा विठ्ठल पंढरीये। नाम अमृतमय चराचरीं ॥ ४ ॥

७८२. विठ्ठलनामीं आळस न करी गव्हरा। वांयांचि येरझारा शिणतोसी ॥ १ ॥ हरी उच्चारण करी हा विचार। नामचि साचार उद्धरण ॥ २ ॥ मी म्हणतां अहंता वाढे हे सर्वथा। परी भजनापरता नाहीं मार्ग ॥ ३ ॥ मायाजाळ विषय तोडी तोडी सांठा। विठ्ठलनाम पाठा वोळगे जना ॥ ४ ॥ सर्व हें लटिकें मोहजाळ फिकें। नामेंविण एके नाहीं दुजें ॥ ५ ॥ नामा म्हणे उपदेश भजें केशवास। वैकुंठनिवास वोळगे तुज ॥ ६ ॥

७८३. तुझें तुज सांकडें पडलें थोर कोडें। तें करी माजीवडे ब्रह्मार्पण ॥ १ ॥ ब्रह्म हरी ध्याई मन ठेवीं ठायीं। विठ्ठलाच्या पायीं दिननिशीं ॥ २ ॥ अनुभव रहणीं विठ्ठल निशाणी। घडेल पर्वणी नित्यकाळ ॥ ३ ॥ नामा म्हणे सुघड मन करी वाड। इंद्रियांची चाड धरूं नको ॥ ४ ॥

७८४. नामाचेनि पाठें जातील वैकुंठें। तो पुंडलीक पेठे प्रगट असे ॥ १ ॥ विठ्ठल विठ्ठल मंत्र सांगतसे शास्त्र। आणिक नाहीं शस्त्र नामेंविण ॥ २ ॥ पुराण व्युत्पत्ति न लगती त्या श्रुती। हरिनाम पंथीं मुनि गेले ॥ ३ ॥ नामा म्हणे हरी नामेंचि उद्धरी। जन्माची येरझारी हरे नाम ॥ ४ ॥

७८५. ज्याचे मुखीं नाम तोचि एक धन्य। त्याचें शुद्ध पुण्य इये जनीं ॥ १ ॥ नामसंकीर्तन नित्य नाम वाचे। दहन पापाचें एका नामें ॥ २ ॥ ऐसा जो अखंड जपे रामनाम। नाहीं तयासम दुजें कोणी ॥ ३ ॥ नामा म्हणे नाम विठ्ठलाचें जपा। हाचि मार्ग सोपा परब्रह्मीं ॥ ४ ॥

७८६. सकळ साधनांचें सार। रामकृष्ण हा उच्चार ॥ १ ॥ म्हणा गोविंद नरहरी। सकळ जीवा तोचि तारी ॥ २ ॥ नाम घेतां हरी माधव। तरताती सकळ जीव ॥ ३ ॥ नामा म्हणे केशव वाचे। धन्य जीवित वैष्णवांचें ॥ ४ ॥

७८७. रामकृष्ण माळ घाली कां अढळ। तुटेल भवजाळ मायामोह ॥ १ ॥ होशील तूं साधु न पवसी बाधु। पूर्ण ब्रह्मानंदु पावेल तुज ॥ २ ॥ जपतां रामनाम पुरती सर्व काम। आदि अंतीं नेम साधेल तुज ॥ ३ ॥ नामा म्हणे कृतार्थ पूर्ण मनोरथ। न लगती ते अर्थ माया फांसे ॥ ४ ॥

७८८. नको नको माया सांडी लवलाह्या। पुढील उपाया झोंबे कां रे ॥ १ ॥ रामनाम म्हणे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुटेल बंधन। भवबंध मोचन एकानामें॥ २॥ स्मरतां पतीत उद्धरले यथार्थ। नाम हाचि स्वार्थ तया झाला॥ ३॥ नामा म्हणे हा जप करी तूं अमूप। रामनांमें खेप जाय जनीं॥ ४॥

७८९. करूं हें कीर्तन राम नारायण। जनीं जनार्दन हेंचि देखें॥ १॥ जगाचा जनक रामकृष्ण एक। न करितां अविवेक स्मरें राम॥ २॥ तुटेल भवजाळ कां करिसी पाल्हाळ। सर्व मायाजाळ इंद्रीय बाधा॥ ३॥ नामा म्हणे गोविंद स्मरें तूं सावध। नव्हे तुज बाध नानाविघ्नें॥ ४॥

७९०. तपाचें पैं तप राम हें अमुप। करी कां रे जप रामनामीं॥ १॥ रामकृष्ण म्हणे वाचे नारायण। तुटेल बंधन यमपाश॥ २॥ साधेल साधन होती कोटी यज्ञ। नाम जनार्दन जप करी॥ ३॥ नामा म्हणे जिव्हे नामें स्मरण करी। म्हणे नरहरी एक भावें॥ ४॥

७९१. म्हणा श्रीराम जयराम। भवसिंधु तारक नाम॥ १॥ नाम पतित पावन। नाम जीवांचें साधन॥ २॥ नाम शिवाचें ध्यान। नाम नारदा गायन॥ ३॥ नामा म्हणे हरीचें नाम। नाम तारक परब्रह्म॥ ४॥

७९२. सोपा हा उगम उपावो परीस। धरीं तूं विश्वास नाम महिमें॥ १॥ नाम हेंचि गंगा नाम हेंचि भीमा। अंतरीं श्रीरामा जपिजेसू॥ २॥ अमृत सुरस रामनाम एक। वाचेचें वाचक मन करी॥ ३॥ नामा म्हणे सुरस सेवी सुधारस। ध्यायी केशवास दिननिशी॥ ४॥

७९३. भावेंचि भजन जनी जनार्दन। नित्य हें वचन रामनाम॥ १॥ खुंटतील योनी तुटेल यातना। भक्ति नारायणा पावेल तुझी॥ २॥ स्मरे सदा कां रे न लगती पाल्हाळ। वसीजे गोपाळ सर्वांभूतीं॥ ३॥ नामा म्हणे ब्रह्म सर्व हरी। येकु चराचरीं जनार्दन॥ ४॥

७९४. सर्वांभूतीं भजन हेंचि पैं चोखडें। ब्रह्म माजीवडे करोनि घेई॥ १॥ सफळ सर्वदा जप हा गोविंदा। न पावाल आपदा नाना योनी॥ २॥ नाम संजीवनी अमृत सरिता। परिपूर्ण भरिता सिंधु ऐसा॥ ३॥ नामा म्हणे चोखडे नाम हेंचि गाढे। चुकवील कोडें जन्ममरण॥ ४॥

७९५. जळाचा जळबिंदु जळींच तो विरे। तैसे हें विघरे पांचा ठायीं॥ १॥ जीव शीव हे उच्चार राम हें मधूर। जिव्हेसी उच्चार रामनाम॥ २॥ रामनाम तारक शिव षडाक्षरी। तैसी वाचा करी अरे मूढा॥ ३॥ नामा म्हणे ध्यान शिवाचें उत्तम। मंत्र हा परम रामनाम॥ ४॥

७९६. निसुगा नीदसुरा झणीं तूं बा होसी। नाम हृषिकेशी घालीं मुखीं॥ १॥ गोविंद हरे कृष्ण विष्णु हरे। अच्युत मुरारे जनार्दन॥ २॥ करितां नामपाठ चुकती भवजाळ। तुटतील ते वेळ मायामोह॥ ३॥ नामा म्हणे ऐसा उपाव सुगम। दिननिशी नेम राम म्हणे॥ ४॥

७९७. केशवाचे प्रतापें गोसावी होसी। दास्यत्व करोनि सर्वस्व पोशी॥ १॥ अर्जुनाचा सारथी बळीचा सांगाती। द्रौपदीच्या आकांती धांवोनि पावे॥ २॥ चातका जलधरू मच्छा जीवन नीरू। प्रल्हादा कैवारू दास म्हणोनी॥ ३॥ नामा म्हणे तुम्ही न करा आळसु। नाम मंत्र दिवसु अश्वासिजे॥ ४॥

७९८. कां करितोसी शीण वाचे नारायण। जपतां समाधान होईल तुज॥ १॥ कृष्णा हरी गोविंद हरे गोविंद। वाचेंसी हा छंद नामपाठ॥ २॥ वंदितील यम कळिकाळ सर्वदा। न पवसी आपदा असतां देहीं॥ ३॥ नामा म्हणे वोळगे सीण झाला सांगें। प्रपंच वाउगे टाकी परतें॥ ४॥

७९९. पांडुरंगें प्राप्त होईल सकळ। चरण-कमळ ध्यारे मनीं॥ १॥ मनीं मानसीक न करावा कधीं। नाम घ्या रे आधीं केशवाचें॥ २॥ केशवाचें नाम पावन पवित्र। महाभाष्यसूत्र हेंचि सांगे॥ ३॥ नामा म्हणे तुम्हीं करावें कीर्तन। पंढरीचें ध्यान चुको नका॥ ४॥

८००. केशव नारायण हा जप आमुचा। सर्व

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हा मंत्राचा आत्माराम॥ १॥ माधव गोविंद सर्वशास्त्रीं आहे। उभारूनियां बाहे वेदु सांगे॥ २॥ नामाचेनि पाठें तरूं हा भवसागरू। आणिक विचारू नेणों आम्ही॥ ३॥ विष्णू मधुसूदन हें दैवत आमुचें। नित्य पैं नामाचें सार आम्हां॥ ४॥ त्रिविक्रम वामन सर्व ब्रह्मांड नायकु। हाचि जप सम्यकु आम्हा घटीं॥ ५॥ श्रीधर हृषिकेश मंत्रराज जपा। पावाल स्वरूपा विष्णुचिया॥ ६॥ पद्मनाभ दामोदर हा नामाचा विस्तार। करितां विचार तरले जीव॥ ७॥ संकर्षण वासुदेव पंढरीचा राणा। सांगितल्या खुणा खेचररायें॥ ८॥ प्रद्युम्न अनिरुद्ध दैवत कुळीचें। पुंडलीक तयाचें तप सार॥ ९॥ पुरुषोत्तम अधोक्षज वैकुंठ निर्मळ। जपतां सकळ पापें जातीं॥ १०॥ नरसिंह अच्युत नामाचें कवच। जपतां होय वेच संसारासी॥ ११॥ जनार्दन उपेंद्र नाम हें अमृत। शंकर निवांत जपे सदा॥ १२॥ हरी कृष्ण विष्णू सर्वा घटीं नांदे। तोचि पैं आल्हाद उच्चारिजेसु॥ १३॥ ऐसा नाम महिमा उपदेश गोमटा। नामेंचि वैकुंठा भक्त गेले॥ १४॥ नामा म्हणे ते मूर्ति पंढरीये गोमटी। नाम उठाउठीं भेटी देसी॥ १५॥

८०१. माया पुरातनु तूंचि वो जननी। नाम संजीवनी विठ्ठल वो॥ १॥ तेंचि हें बोलणें पूर्ण प्रेम आम्हां। वोळंगित ब्रह्मा पंढरीये॥ २॥ धांव पाव वेगीं येई संभाळी तूं। नाम हा संकेतु पांडुरंगें॥ ३॥ क्षुधा तृषा आशा तुजलागीं चिंतिती। जीवन हे मागुती नाम तुझें॥ ४॥ अनंत अच्युत नाम हेंचि नित्य। तेणें कृतकृत्य प्राण माझा॥ ५॥ नामा म्हणे देवा तूं जीवन आमुचें। आतां मज कैचें क्रियाकर्म॥ ६॥

८०२. मायेचा कळवळा मायाची जाणे। तैसें मी तान्हें माऊलिये॥ १॥ विठ्ठल श्रीरंग डोळस प्रसन्न। नित्य अमृतघन बोलला सदा॥ २॥ जननी जनक तूंचि वो मुकुंदा। नाम हें गोविंद शुद्ध रसु॥ ३॥ येई वो केशवे नित्य नामरूपें। मी तुज आलापे आळवीत॥ ४॥ माधवा श्रीधरा वेगीं येई त्वरें। मज वो नावरे प्रेम वेधु॥ ५॥ नामा म्हणे तूं जीवन आमुचें। नित्य केशवाचें प्रेम मज॥ ६॥

८०३. केशवासी पाहे केशवासी ध्याये। केशवासी गाये सर्वकाळ॥ १॥ केशव हाचि वृत्तिसह मन। केशवासी ध्यान सर्वकाळ॥ २॥ सबाह्य अंतरीं सांडिना कोणासी। जाणों अंतरासी साक्षभूत॥ ३॥ नामा म्हणे तुम्हीं केशव होऊनि। पंढरी पाटणी नांद बापा॥ ४॥

८०४. वेदाचें महिमान जनीं जनार्दन। आणिक वचन तेथें नाहीं॥ १॥ भूतदया धरा भक्तिभावें करा। भजन हरिहरां वेद सांगे॥ २॥ सर्व हेंचि सार ब्रह्ममय खरें। आणिक दुसरें न दिसे आम्हां॥ ३॥ नामा म्हणे समर्थ वेद तो आमुचा। सांगे नित्य जपा रामकृष्ण॥ ४॥

८०५. पाहतां ये परिपाठी आणिक नाहीं सृष्टि। नामेविण दृष्टि न दिसे माझे॥ १॥ नामचि समर्थ नामचि मथीत। शंकरास हेत रामनामीं॥ २॥ पुरती सर्व काम वाचे रामनाम। न लगती ते नेम कर्मजाल॥ ३॥ नामा म्हणे उच्चार न करी तूं विचार। तुटेल येरझार नाना योनी॥ ४॥

८०६. साधन साधितां होताती आपदा। म्हणोनि गोविंदा स्मरें कारे॥ १॥ कृष्णकथा सार सांगे कां सधर। तुटेल येरझार जन्ममरणा॥ २॥ निष्फळ निखळ भावीं तूं सफळ। भजन केवळ सर्वांभूतीं॥ ३॥ नामा म्हणे भक्ति होईल विरक्ति। तुटेल यातायाती जन्ममरण॥ ४॥

८०७. भवसिंधुचा पार तरे तो पोहणार। बळियापरम धीर धन्य तोचि॥ १॥ नामाचि सांगडी लावूनि अभ्यास। हृदयीं प्रेमरस वोसंडती॥ २॥ सत्त्वाचा सुभट असंग एकट। वैरागें उद्धट निर्वासन॥ ३॥ कामक्रोध जेणें घातले तोरडीं। निर्दाळिले वैरी लोभदंभ॥ ४॥ रजतमाचे जेणें तोडिले अंकूर। केला अहंकार देशधडी॥ ५॥ नामा म्हणे जया नामीं अनुसंधान। तोचि परम धन्य त्रिभुवनीं॥ ६॥

८०८. भवसिंधुचा पार तरावयालागीं। साधन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कलियुगीं आणिक नाहीं॥ १॥ अहर्निशी नाम जपा श्रीरामाचें। जें सकळ धर्मांचें मुगुटमणी॥ २॥ न चले वर्णाश्रम धर्म आचरण। न घडे व्रत दान तप कोणा॥ ३॥ नव्हे तीर्थाटन पुराण श्रवण। नव्हे ब्रह्मज्ञान शास्त्रबोध॥ ४॥ नव्हे ध्यान स्थिती भावेविण वोजा। न घडे देवपूजा एकनिष्ठ॥ ५॥ नामा म्हणे नाम राघोबाचें गातां। ब्रह्म सायोज्यता घर रिघे॥ ६॥

८०९. तुटे मायाजाळ विघडे भवसिंधू। जरी लागे छंदू हरिनामाचा॥ १॥ येर कर्मधर्म करितां या कली। माजी कोण बळी तरला सांगा॥ २॥ न पढवे वेद नव्हे शास्त्रबोध। नामाचे प्रबंध पाठ करा॥ ३॥ नव्हे अनुष्ठान न कळे ब्रह्मज्ञान। करावी सोपान कृष्णकथा॥ ४॥ न साधे हा योग न करवे वैराग्य। साधा भक्तिभाग्य संतसंगें॥ ५॥ नामा म्हणे साधन न लगे आणिक। दिधली मज भाक पांडुरंगें॥ ६॥

८१०. पंढरीचा राजा उभा भक्तकाजा। उभारूनि भुजा वाट पाहे॥ १॥ घ्यारे नाम सुखें प्रेमें अलोलिक। साधनें आणिक करूं नका॥ २॥ मनाचेनि मनें हृदयीं मज धरा। वाचेनें उच्चारा नाम माझें॥ ३॥ बोलोनिया ऐसा उभा भिमातीरीं। नामा निरंतरी चरणापाशीं॥ ४॥

८११. हरिहर ब्रह्मा इंद्रादिकां देवां। इच्छिताती केशवा पायधुळी॥ १॥ यांवरी गोपाळ आनंदें नाचती। भुषणें श्रीपती शोभायमान॥ २॥ पाहोनिया सुख आले सर्व देव। पंढरीचा राव पाहावया॥ ३॥ नामा म्हणे मिषें गोपाळकाल्याचे। निरंतर वाचे घेत नाम॥ ४॥

८१२. वदनीं तुझें नाम अमृत संजीवनी। असतां चक्रपाणि भय कवण॥ १॥ या जन्ममरणाची कायसी मग चिंत्ता। तुझिया शरणागता पंढरीनाथा॥ २॥ हृदयीं तुझें रूप बिंबलें साचार। तेथें कवण पार संसाराचा॥ ३॥ नामा म्हणे तुझें नाम वेळोवेळ। म्हणतां कळिकाळ पायां पडे॥ ४॥

८१३. नाहीं भक्ती नामीं तो चांडाळ पातकी। तोचि जाणावा लोकीं दुष्ट नष्ट॥ १॥ प्रपंचीं कुकर्मी गढोनिया ठेले। न निघती बोले संताचिया॥ २॥ काढितां त्या वाटे प्रपंचाचें दुःख। विषयाचें सुख हर्ष बहू॥ ३॥ पुत्र वित्त कांता मानी भरंवसा। पडे मोह फांसा जन्मवरी॥ ४॥ नामदेव म्हणे अंतीं आहे कोण। कळा नामाविण नानापरी॥ ५॥

८१४. नाम हें अमृत भक्तांसी लाधलें। आपण घेतलें बौध्यरूप॥ १॥ नाम हें आळवा नाम हें आळवा। होईल दोहावा कामधेनु॥ २॥ न बाधेल विघ्न प्रपंच हें भान। नाम हेंचि खूण वैकुंठींची॥ ३॥ नामा म्हणे जड जीव ब्रह्म असे सर्व। हा गीतेमाजी भाव सांगितला॥ ४॥

८१५. आलिया संसारीं आत्माराम मुखीं। घेतलिया सुखी त्रिभुवनीं॥ १॥ जाणोनियां नाम आपुलेंचि आधीं। मग सोमसिद्धि सर्व साधे॥ २॥ सर्व हरी मग नाहीं दुजा भाव। प्रपंचिक गर्व दिसेचिना॥ ३॥ नामदेव म्हणे सर्वदा साधनें। भरे जन वन नानापरी॥ ४॥

८१६. व्यापक तें नाम तेव्हांच होईल। जेव्हां ओळखेल मीपणासी॥ १॥ आपुलेंचि नाम न ओळखिलें। व्यापक साधिलें जायाचिना॥ २॥ आपुलीच ओळख आपणासी पडे। मग सर्वत्र जोडे नाम तेव्हां॥ ३॥ नामाविण नाम तेंचि होय विभ्रम। नामदेव म्हणे संता पुसा॥ ४॥

८१७. आसनीं शयनीं जंपतां चक्रपाणि। लाविलीं निशाणीं वैकुंठींची॥ १॥ कैंचेरे बंधन आम्हां जीवन्मुक्तां। गाणीं गुण गातां विठोबाचे॥ २॥ भवसिंधूची जिवां झाली पायवाट। जे गर्जती उद्धट नामघोष॥ ३॥ प्रेमें वोथरत नामें पिटूं टाळी। नाम हृदयकमळीं विठोबाचें॥ ४॥ नाहीं कांहीं क्लेश न करी सायास। दृढ धरी विश्वास हरिनामीं॥ ५॥ नामा म्हणे साधन न लगे अनेक। दिली मज भाक पांडुरंगें॥ ६॥

८१८. राम मंत्राचिया आवृत्ति। घडती जयासी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पुढतपुढती। त्याचा जन्म धन्य ते क्षितीं। सर्व कुळाशीं तारक॥ १॥ राममंत्र आवडे जीवा। हाचि उद्धार सर्व जीवा। शिवासही विसांवा। पार्वती-सहित॥ २॥ रामकृष्ण उच्चारे तरती जड पामरें। ऐसें हें व्यासें निर्धारिं। नानाग्रंथीं सांगितलें॥ ३॥ नामा जपे नाम मंत्र। आणिक नेणे नाना शास्त्र। रामनामें नित्य वक्त्र। हरी रंगें रंगलें॥ ४॥

८१९. हाचि नेम सारी साधेल तो हरी। नाम हें मुरारी अच्युताचें॥ १॥ गोविंद हरे गोविंद हरे। यादव मुरारे रामनाम॥ २॥ न लगती कथा नाना विकलता। नामचि स्मरता नाम वाचे॥ ३॥ नामा म्हणे राम आम्हां हाचि नेम। नित्य तो सप्रेम जप आम्हां॥ ४॥

८२०. विठोबाचे पाय जन्मोनि जोडावे। संबंधी तोडावे कामक्रोध॥ १॥ ऐक्य सुख घ्यावें एकविध भावें। प्रेम न संडावें आवडीचें॥ २॥ अनंत जन्मा यावें ऐसें भाग्य व्हावें। एक वेळां जावें पंढरीसी॥ ३॥ वृत्तिसहित मन पायींच ठेवावे। अद्वैत भोगावें प्रेमसुख॥ ४॥ देहीं देहभाव प्रकृति दंडावें। सांडणें सांडावें ओवाळुनी॥ ५॥ नामा म्हणे ऐसें घेतलें माझ्या जिवें। विठोबा पुरवावें आर्त माझें॥ ६॥

८२१. तुझाचि अहंकार तुजचि नाडील। मागुता मांडील संसारू हा॥ १॥ सांडी सांडी मोहो विषय टवाळ। वाचेसी गोपाळ उच्चारींरे॥ २॥ सर्व हें भूल मायेचें घरकुलें। अहंकारें नाथिलें नानायोनी॥ ३॥ नामा म्हणे भजन हरीचें करीन। नित्य ते सेवीन चरणरज॥ ४॥

८२२. देहीं धर्मी हित करी। द्वैतभाव चित्तीं न धरी। सर्वांभूतीं नमस्कारी। एक आत्मा म्हणोनिया॥ १॥ एक तत्त्व एक हरी। एक चित्तें नमस्कारी। आदि अंतीचा नरहरी। सकळ कुळासी तारील॥ २॥ पवित्र त्याचें हें कुळ। आचार त्याचाचि सुशिल। अखंड जप सर्व काळ। रामकृष्ण नरहरी॥ ३॥ नामा जपे नाममंत्र। अखंड हरीनाम सहस्त्र। हाचि आमुचा निजमंत्र। रामकृष्ण गोविंद॥ ४॥

८२३. सुलभ सोपारें नाम केशवाचें। आठवितां वाचें दोष जाती॥ १॥ अनाथाचा सखा उभा नामापासीं। ऐसा तो प्रेमासी भुललासे॥ २॥ जातिवंत आम्ही वेदाचे पाठक। तरी सर्व फिकें नामाविण॥ ३॥ नामा म्हणे नामीं रंगलों सतत। म्हणोनी अनंतें दिधली भेटी॥ ४॥

८२४. विसांवा विश्वाचा जो प्राण जीवाचा। तोचि नित्य वाचा जपों आम्ही॥ १॥ गोविंद वामन भावयुक्त भजन। सर्व जनार्दन हाचि भाव॥ २॥ चैतन्य अचेतन ग्राम हेंचि सत्य। नित्यता कृतार्थ विठ्ठलनामें॥ ३॥ नामा म्हणे उद्धरण आणिक नाठवे। केशवचि सर्वे पुरे आम्हां॥ ४॥

८२५. राम हेंचि स्नान राम हेंचि ध्यान। रामें घडे यज्ञ कोटी देखा॥ १॥ न लगती साधनें नाना मंत्र विवेक। रामनामीं मुख रंगी कां रे॥ २॥ नामा म्हणे नाम हेंचि वचन आम्हां। नित्य ती पौर्णिमा सोळा कळी॥ ३॥

८२६. शास्त्राचें हें सार वेदाचें गव्हर। उतरावया पार आणिक नाहीं॥ १॥ विठ्ठल विठ्ठल म्हणा उघडा मंत्र जाणा। कळिकाळ अंकणा होईल तुम्हां॥ २॥ न करावें खंडन अखंड उच्चारण। तप अनुष्ठान न लगे तुम्हां॥ ३॥ सिद्धीचें हें सार मुक्तीचें माहेर। उतरावया पार दुजें नाहीं॥ ४॥ विठ्ठलापरतें काय करिसी दैवत। परब्रह्म निरुते पंढरीये॥ ५॥ सिद्धीचें सहज भक्तीचें हें बीज। केशवीं दिलें मज म्हणे नामा॥ ६॥

८२७. मुक्तिप्रद आहे एक विठ्ठल नाम। आतां क्रियाकर्म कवणालागीं॥ १॥ राहें राहें राहें तूं मना निवांत। ध्याई अखंडित नारायणा॥ २॥ संत समागम साधी हें साधन। पावसी निर्वाण नित्य सुख॥ ३॥ नामा म्हणे भज श्रीगुरूच्या पायीं। तरी वर्म ठायीं पडेल जाण॥ ४॥

८२८. करितां वेदाध्ययन ज्योतिष। नामाचा तो लेश नये हातां॥ १॥ बहुत व्युत्पत्ति पुराण।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

व्यर्थ तें स्मरण नाम नव्हे॥ २॥ अनंत हें नाम जयांतूनि आलें। त्यांतचि जिरालें जळीं जळ॥ ३॥ सद्‌गुरु ते नाम सद्‌गुरुकृपेविण कोणा। साधन साधेना जपें तपें॥ ४॥ नामदेव म्हणे स्वतःसिद्ध नाम। गुरूविण वर्म हातां नये॥ ५॥

८२९. ज्ञान ध्यान जप तप साधन। तें नाम प्रत्ययातें नये कोणा॥ १॥ गुरुपदीं जावें आधीं हो शरण। मी हें माझें ओळखून घ्यावें नाम॥ २॥ तयाचें तें मूळ पाहोनियां त्यांतें। मिळवावें द्वैत अद्वैतातें॥ ३॥ द्वैत द्वैतातीत तें स्वयंभ संचलें। तेंचि नाम आलें त्रिभुवनीं॥ ४॥ नामदेव म्हणे परब्रह्म तें नाम। द्वैत क्रियाकर्म नाहीं तेथें॥ ५॥

८३०. सद्‌गुरुवांचूनि नाम न ये हातां। साधन साधितां कोटी गुणें॥ १॥ जैसा कांतेविण करणें संसार। तैसा हा व्यापार साधनांचा॥ २॥ जंव सद्‌गुरु नाहीं केला भ्रतार। साधन विचार व्यर्थ गेला॥ ३॥ नामदेव म्हणे सद्‌गुरुपासोनी। नाम घ्या जाणोनी नाना कांहीं॥ ४॥

८३१. चंद्रभागातीरीं उभा राहिलासी। भक्तांचे मानसीं भाव मात्र॥ १॥ काय पुंडलिकें केल्या तपरासी। जाणोनी मानसी भावमात्रें॥ २॥ भावेंविण देवा सर्मथा नातुडे। नेणती बापुडे बद्धजन॥ ३॥ नामा म्हणे माझें माहेर पंढरी। भेटती महाद्वारीं संतजन॥ ४॥

८३२. देवाचे हे आत्मे ते हे जाणावे संत। त्यांचे पदीं व्हावें रत सदा दृढ॥ १॥ श्रीहरीची भेटी सहजचि होय। श्रम लया जाय झाला आधी॥ २॥ पापाचे पर्वत भस्म नामाग्नीनें। अभक्तांसी हाण नामाविण॥ ३॥ नामदेव म्हणे नामाग्नीच्या पोटीं। नाना पाप कोटी दग्ध होती॥ ४॥

८३३. अवघे ते दैवाचे विठ्ठल म्हणती वाचें। अवघें कुळ त्यांचें पुण्यवंत॥ १॥ अवघेचि संसारीं जाणावे ते धन्य। ज्यांचें प्रेम पूर्ण पांडुरंगीं॥ २॥ अवघा विठ्ठल भोगिती दिनरातीं। वोळणे किंकरवृत्ति नामा त्यांतें॥ ३॥

८३४. सर्वांभूतीं भज नमन करी संता। नित्य त्या अच्युता स्मरण करी॥ १॥ ऐसें भजनीं विनट सांपडेल वाट। रामकृष्ण नीट वैकुंठींची॥ २॥ न लगती साधनें वायाचि बंधनें। एक नामें होणें चतुर्भुज॥ ३॥ नामा म्हणे थोर नामेंचि सधर। वैकुंठीं बिढार तयां भक्तां॥ ४॥

८३५. म्हणतां वाचें नाम वंदी तया यम। काळादिका सम वंदी तया॥ १॥ ऐसें नाम श्रेष्ठ सकळांसी वरिष्ठ। उच्चारितां नीट वैकुंठ गाजे॥ २॥ तो हा नाममहिमा वाखाणित ब्रह्मा। न कळे तया उपमा आदिअंती॥ ३॥ नामा म्हणे पाठें नामाचेनि वाटे। तरी प्रत्यक्ष प्रगटे विठ्ठल हरि॥ ४॥

८३६. म्हणे दीनबंधु तुम्ही सावध व्हावें। संतांशीं नमन नाम वाचें पावे॥ १॥ नामाविण साधन नाहीं या कलियुगी। व्यर्थ श्रम भोगी पाहतां मत्तें॥ २॥ मत्ताभिमान करोनि तुम्ही जाल आडवाटां। अभिमानें ठकविले नारदादि श्रेष्ठा॥ ३॥ आलिया जन्मास आतां न करी आळस। नामदेवालागीं सांगे जगन्निवास॥ ४॥

८३७. सकळ संतजन देखोनि नयनीं। टाळिया पिटोनी गाती नाम॥ १॥ म्हणती धन्य भक्त निधडा वैष्णव। ब्रह्मादिकां माव न कळे याची॥ २॥ कैसा ॠणिया केला पंढरीनाथ। आहे सदोदित याचे जवळी॥ ३॥ पूर्वी तो प्रल्हाद श्रवणीं ऐकिला। किंवा हा देखिला संतांमधीं॥ ४॥ नामा येऊनियां चरणासी लागला। हृदयीं आलिंगिला भक्तराज॥ ५॥

संतमहिमा.

८३८. ब्रह्ममूर्ति संत जगीं अवतरले। उद्धरावया आले दीन जनां॥ १॥ ब्रह्मादिक त्यांचे वंदिती पायवणी। नाम घे वदनीं दोष जाती॥ २॥ हो कां दुराचारी विषयीं आसक्त। संतकृपें त्वरित उद्धरतो॥ ३॥ अखंडित नामा त्याचा वास पाहे। निशिदिनीं ध्याय सत्संगती॥ ४॥

८३९. संतांचा महिमा कोण जाणे सीमा। सीणला हा ब्रह्मा बोलवेना॥ १॥ संतांची हे कला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पाहतां न कळे। खेळोनिया खेळ वेगळाची॥ २॥ संतांचिया पारा नेणें अवतारा। म्हणती याच्या पारा कोण जाणे॥ ३॥ नामा म्हणे धन्य धन्य भेट झाली। कल्पना निमाली संतांपायीं॥ ४॥

८४०. कर्दळी फळ कर्पूर परिमळें भिन्न। परि दोहींचें जन्म ते एकत्र जाण। आत्मा कीं परमात्मा अभेद कीं भिन्न। चंद्र सोमकांत शून्य महाशून्य॥ १॥ सूर्य सूर्यकांतु प्रकाश एकु। साधुसंत आरति रावो ना रंकु॥ २॥ भ्रमरांच्या रुंजी मकरंद उधळती। असाध्य साधनीं लागल्या ज्योती। लयाचें लक्ष हरपली स्थिति। म्हणोनि साधुचरणीं नित्य पंचारती॥ ३॥ गोदेचा उगमु तो ठाईच्या ठाई। आणिके उदकें ती चाली प्रवाहीं। तैसी साधुसंत कृपा उन्मत्त देहीं। सागरा भेटली क्षीरसिंधु तेही॥ ४॥ सागराचें उदक जगा विनवीत। निवळुनि मागुतें पूर्ण भरीत। तैसे अंतरींचें नीर ओघें हे साधुसंत। परि सागरा अंतरीं न वर्णवे मुक्त॥ ५॥ तेथें अनुपम्या ऐकिजे शब्दाचि रचना। हें जाणतेनो जाणा अमृत खुणा। हें रत्न कीं माणिक ऐसें अनुमाना। तें पानबुडिया परसोबा लाधले निधाना॥ ६॥ दुधावरील साय वरी साखरा मेळवणी। जैसी जिव्हा लोधली मधु लागुनि। तेथील गौलता तें रहस्य लागलें ध्यानीं। तें परसोबा लाधलें येरां मुर्खा भुलवणी॥ ७॥ तापलें लोहो तेणें शेखियेलें जीवन। तैसें अंतरीं निवालें आपोआप आपण। परसा भागवत हें सकळांचें जीवन। विष्णुदास नामा त्याचे चरणीचे रजरेण॥ ८॥

८४१. वैष्णवा घरीं सर्वकाळ। सदा झणझणिती टाळ॥ १॥ कण्या भाकरींचें खाणें। गांठीं रामनाम नाणें॥ २॥ बैसावयासी कांबळा। द्वारीं तुळसी रंगमाळा॥ ३॥ घरीं दुभे कामधेनु। तुपावरी तुळसी पानु॥ ४॥ फराळासी पीठ लाह्या। घडीघडी पडती पाया॥ ५॥ नामा म्हणे नेणती कांहीं। चित्त अखंड विठ्ठलपायीं॥ ६॥

८४२. रवि रश्मि धरोनि स्वर्गी जाऊं येईल। परी साधुसंगतीचा पार नकळे नकळे॥ १॥ वैतरणी उतरोनि वैकुंठा जाऊं येईल। परि साधुसंगतीचा पार नकळे नकळे॥ २॥ स्वप्नींचा ठेवा साचहि होईल। परि साधुसंगतीचा पार नकळे नकळे॥ ३॥ मायबाप बंधु भगिनी मिळे योनी। परि साधुची मिळणी भाग्ययोगें॥ ४॥ तपें व्रतें दानें गोविंद पैं भेटे। परि साधु तंव न भेटे भाग्येविण॥ ५॥ नामा म्हणे केशवा वरा साधुसंग। यावेगळा भवरोग न तुटे न तुटे॥ ६॥

८४३. आजी महासुखें सृष्टी भरली भाग्यवंती। जालीसे विकृती पापा तापा॥ १॥ चालिले देखोनि वैष्णव जगजेठी। उभविती वैकुंठीं गुडिया देव॥ २॥ आले आलेरे हरीचें डिंगर। वीर वारीकर पंढरीचे॥ ३॥ ज्याची चरण धुळी उधळे गगनपंथें। ब्रह्मादिकां तेथें झाली दाटी॥ ४॥ एकमेकापुढें उडविती माथें। म्हणती आम्हांतें लागो रज॥ ५॥ भक्ति प्रेम भाव भरले ज्यांच्या अंगीं। नाचती हरिरंगीं नेणताती लाजू॥ ६॥ हर्षे निर्भर चित्तीं आनंदें डोळती। हृदयीं कृष्णमूर्ती भेटो आली॥ ७॥ कोंदलें हरिरूप देखती विश्वाकार। सुटले पाझर नयन कमळीं॥ ८॥ गुढिया रोमांकुरी सात्विकें दाटले। गर्जती विठ्ठले नामघोष॥ ९॥ मोरपिसा कुंचे भाट गरुडटके। भार तें नेटके मिरविताती॥ १०॥ तेथें केशवाचें नामें तनु हे तुळिका केली। पायघडी घातली हरिच्या दासा॥ ११॥

८४४. ध्वजा कुंचे गरुडटके। वैष्णव चालिले नेटिके॥ १॥ आलें वैष्णवांचें दळ। भेणे पळे कळिकाळ॥ २॥ तुळसी मंजरीचे भाले। देखोनि यमदूत पळाले॥ ३॥ ऐकोनी नामाचा गजर। प्रेमें डुलतो शंकर॥ ४॥ नामा म्हणे भक्ति गाढी। सेवा न सोडी अर्ध घडी॥ ५॥

८४५. आला वैष्णवांचा मेळ। पळाला हो कळिकाळ॥ १॥ आले आले हरिदास। कळिकाळावरी घाला कास॥ २॥ कलमषा पडिला धाक। ते पळाली देऊनि हाक॥ ३॥ पैल नामा केशवाचा। सवें मेळू वैष्णवांचा॥ ४॥

८४६. भक्त केशवाचे आले। दूत यमाचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पळाले ॥ १ ॥ भक्त हरीचे चालिले। हातीं हरिनामाचे भाले ॥ २ ॥ तळपे शांतीचें ओढण। घेती स्वानंदें उड्डाण ॥ ३ ॥ नामा म्हणे निजदास। कळिकळाचे भंवसे ॥ ४ ॥

८४७. यम सांगूं गेला वैकुंठा। देवा सांभाळाजी आपुल्या मठा। आम्ही नव जाऊं तयाचिया वाटां। वैष्णव दूत नागवती ॥ १ ॥ कुंभिपाक पडला ओस। दूतां लागला त्रास। देवा कोपेल महेश। म्हणोनी सांगावया आलों ॥ २ ॥ देवा तुम्ही एक वोखटें केलें। गंगेसि मृत्युलोकासी पाठविलें। तेणें थोर कार्य नाशिलें। हा प्रसाद गौतमाचा ॥ ३ ॥ ऐसें वैष्णवदूतीं गांजिलों। तुजप्रति सांगावया आलों। देवें पाहिजे मना आणिलों। माझें साह्य करावें स्वामी ॥ ४ ॥ विशेष शिंपी नामा तो पंढरीये पुरुषोत्तमा। हाचि बोल ऐकूनि प्रेमा। त्याच्या शिवाणा न जावें ॥ ५ ॥

८४८. यम सांगे दूतां कानीं। तुम्ही जाता मेदिनी। विष्णुभक्त चुकवूनि। येर बांधोनि आणा ॥ १ ॥ दूत सांगती यमा। दिंडीपुढें चाले नामा। ते नागविती आम्हां। विष्णुदूत म्हणोनी ॥ २ ॥ जे नेणती धर्मवेळां। वाचे न उच्चारिती गोपाळा। तयांसि जाचवावें वेळोवेळां। एकविस कुळांसहित ॥ ३ ॥ जे न करिती हरीची भक्ति। तयांसी जाचवावे पुढता पुढतीं। रघुनाथनाम ज्याच्या कंठीं। त्याच्या वाटें नवजावें ॥ ४ ॥ दिंडी पताका गजर टाळघोषांचा। नाद उमटतो अंबरीचा। तेथें पाड नाहीं काळाचा। शिंपी नामा। तळपति केशवरायाचा ॥ ५ ॥

८४९. सांडोनि नित्य नेम कर्म। बोलती कळिकाळाचें वर्म ॥ १ ॥ नामधारक नामाचें। झाले डिंगर केशवाचे ॥ २ ॥ टाळ मृदंग वाजती। टके पताका शोभती ॥ ३ ॥ कंठी तुळसीच्या माळा। वज्र पंजराचा टिळा ॥ ४ ॥ शंख चक्र मुद्रा धरणें। अंगीं मिरवती भूषणें ॥ ५ ॥ संतरज उधळले। तेणें सर्वांग डवरलें ॥ ६ ॥ सहस्त्रनामें गर्जित। तेणें पळाले यमदूत ॥ ७ ॥ नामा म्हणे ते माझे सखे। स्वामी विठोबासारखे ॥ ८ ॥

८५०. वैष्णवांचे घरीं मांडिला पाहुणचार। नामाचा वोगर वाढियेला ॥ १ ॥ घ्यारे ताटभरी जेवा पोटभरी। आनंद गजरी रामनाम ॥ २ ॥ होईल पाइराव दुर्जना न सांगावे। एकांति सेवावे नामा म्हणे ॥ ३ ॥

८५१. सर्वांभूतीं पाहे एक वासुदेव। पुसोनियां ठाव अहंतेचा ॥ १ ॥ तोचि संतसाधु ओळखावा निका। येर ते आईका मायाबद्ध ॥ २ ॥ देखिलिया धन मृत्तिकेसमान। नवविधा रत्नें जैसे धोंडे ॥ ३ ॥ काम क्रोध दोघे घातले बाहेरी। शांति क्षमा घरीं राबवीत ॥ ४ ॥ नामा म्हणे नाम गोविंदाचें वाचे। विसंबेना त्याचे क्षणमात्र ॥ ५ ॥

८५२. नावडे निजांगना शेजेवरी रुचेसी। कीं पतिसेजे जेविं व्यभिचारिणी अप्रीत जैसी ॥ १ ॥ गांधी विष संग्रहीत भक्षणाची नाहीं प्रीत। चकोरा देखत सिद्धी अमावास्या ॥ २ ॥ याचपरी संत वर्ते प्रपंच देह कर्मां। समुळ बुडे ब्रह्मीं ब्रह्मपणें ॥ ३ ॥ पोसणा पुत्र लटकेंचि बाबा म्हणे। स्वपितयातें अंतरुनि पिंडदान करणें ॥ ४ ॥ बहूरूपी स्त्रियेचे कटाक्ष इतरा दावी। आपण जाणत जीवीं हे मी नव्हे ॥ ५ ॥ शत्रुसभे नाना उपचार होती। ते न लगती कांहीं चित्तीं भूपा ॥ ६ ॥ नामा म्हणे हृदयभानीं योगी निरंजन मनीं। मिथ्या विनोद कानीं क्षणिक जैसा ॥ ७ ॥

८५३. आशा नाहीं ज्याला। देव कां मारी तयाला ॥ १ ॥ जेव्हां सुखाची उन्नति। मोह पायासी लागती ॥ २ ॥ सर्वां चित्तीं समभाव। सर्व मानीं वासुदेव ॥ ३ ॥ नामा म्हणे अंगीं प्रेम। मुखीं विठोबाचें नाम ॥ ४ ॥

८५४. धन्य महाराज जन्मले संसारीं। जे ध्याती अंतरीं नारायणा ॥ १ ॥ नारायण गाय नारायण ध्याय। धन्य त्यासि माय प्रसवली ॥ २ ॥ प्रसवली तया कुळाचा उद्धार। तो तरे निर्धार नामा म्हणे ॥ ३ ॥

८५५. प्रतिदिनीं स्वधर्म करी। हरिमूर्ति नमस्कारी। भावें भजन वसे शरीरीं। तोचि भक्त हरीचा ॥ १ ॥ अनंत जन्मींचे कांट। तेणेंचि केलें सपाट। स्वधर्में करोनियां नीट। शुद्धपक्ष हरि हरि ॥ २ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तेंचि तापसा सामर्थ्य। तेणेंचि जोडिलें तीर्थ। त्याचे धरोनि मनोरथ। हरिभजन पथीं लागला॥ ३॥ देवो त्याचा आखिला। सत्वा न टळे तो कष्टविला। अकर्मी तोचि भला। त्याचें धन्य जीवित्व॥ ४॥ तोचि सफळ सकळीं। सदा निर्मळ सर्वकाळीं। जो हरिनामें वाजवी टाळी। तोचि समर्थ त्रिभुवनीं॥ ५॥ नामा हरिरंगीं रंगला। तेणें विठ्ठल संतोषला। येऊनियां राहिला। हृदयकमळीं आमच्या॥ ६॥

८५६. शुक सनकादिक जन चक्रवर्ती। प्रल्हाद परिक्षिति बिभिषण॥ १॥ बळि भीष्म नारद आणि उद्धव। रुक्मांगद श्रुतिदेव इत्यादिक॥ २॥ शास्त्रांचें हें सार वेदांचें गहिंवर। नामा परिकर कलियुगीं॥ ३॥

८५७. वैष्णवांमाजी एक बळी। पृथु झाला दुजा महीतळीं। हरि नांदे प्रल्हादाजवळी। नारदें वनमाळी दान घेतला॥ १॥ बिभिषणें पूजिला लंके हरी। भीष्में देखिला द्वारके भितरीं। अर्जुनें केला साहकारी। सारथि हरि पांडवांचा॥ २॥ उद्धवें तप केलें समर्थ। अक्रूर नित्य वंदनार्थ। गाई गोपिका गोपाळांत। तो स्तन पीत यशोदेचें॥ ३॥ नंदा वसुदेव लाधलें। बळिदेवें ऐसेंचि पुण्य केलें। उग्रसेनें तप साधिलें। रत्न साधिलें रुक्मिणीनें॥ ४॥ गरुड हनुमंत शेषादिक। नित्य झाले हरीचे सेवक। चरणींच्या उदका शिवादिक। नित्य मस्तक रेषा लाविती॥ ५॥ ऐसा दुर्लभ हरिराजा। वर्णितां होती चतुर्भुजा। जड जीवां तारिल केशव माझा। उभारोनि भुजा सांगे नामा॥ ६॥

८५८. सदा विचरती जनीं वनीं रानीं। मुखीं चक्रपाणि जपतसे॥ १॥ विरक्तीची मात असे कोण्या गुणें। नामाचें चिंतन योगिराज॥ २॥ तेव्हां योगियासी कीर्तनाचे ध्यास। मुक्ती चारी त्यास हात जोडी॥ ३॥ पंढरीस उभा राहे पांडुरंग। तीर्थ चंद्रभागा नामा म्हणे॥ ४॥

८५९. जयाचेनि तीर्था आलें तीर्थपण। केली सांठवण हृदयीं ती॥ १॥ नवल महिमा हरिदासां जीवीं। तीर्थे उपजवी त्यांचे कुसीं॥ २॥ वाराणसी प्राणी मरे अंतीं कोणी। तया चक्रपाणि नामें तारी॥ ३॥ नामा म्हणे तीर्थे तया येती भेटी। वोळंगती दृष्टी त्रिभुवना॥ ४॥

८६०. सत्त्वसमाधानी कर्मनिष्ठ जाण। अखंडित ध्यान रामकृष्ण॥ १॥ सत्संग सर्वदा साक्ष सर्व देहीं। सर्वांभूतीं पाही अंशमात्रें॥ २॥ आपणासमान सर्वत्र पाहाती। अन्य सर्वांभूतीं रामविष्णु॥ ३॥ नामा म्हणे ऐसें सकळिकें संमत। नामीं सदोदित भक्ति मार्ग॥ ४॥

८६१. गौतम वसिष्ठ आणि विश्वामित्र। भारद्वाज अत्रि कश्यपादि॥ १॥ बळी हनुमंत बिभिषण नळ। दुष्ट अजामिळ वाल्हा श्रेष्ठ॥ २॥ उद्धव अर्जुन अंगद अगस्ति। सर्वांभूतीं भक्तिभाव ऐक्य॥ ३॥ नामा म्हणे सदा साधु संत जन। जनीं जनार्दन आम्हां एक॥ ४॥

८६२. तोचि पुराणिक जो होय कृतार्थ। विषयीं विरक्त विधि पाळी॥ १॥ मानी तो हरिदास ज्या नामीं विश्वास। सर्वस्वें उदास देहभावी॥ २॥ नामा म्हणे ऐसे संत भेटावे गा देवा। त्यालागीं केशवा हृदय फुटे॥ ३॥

८६३. पत्रावळी काढी वैकुंठनायक। धांवूनियां शुक आला तेथें॥ १॥ दाटी पाहूनि द्वारीं मानसीं विचारी। जावया भितरीं काय काज॥ २॥ हा वाहे प्रसाद स्वहस्तें अनंत। वेचोनिया शीत घाली मुखीं॥ ३॥ घंटानाद वाजे लक्ष द्विजपंक्ती। अक्षयी वाजती वेळोवेळां॥ ४॥ ऐकोनि विस्मित ऋषिसमुदाव। पुसे धर्मराव देवाजीसी॥ ५॥ सांगतसे खुण वैकुंठनायक। ब्रह्मनिष्ठ एक आला तेथें॥ ६॥ येथुनि उठले धर्म नारायण। बाहेर येऊन पाहाताती॥ ७॥ शुकाचिया मिषें व्यासाचा नंदन। सांगतसे खूण जगदीश॥ ८॥ धरूनिया करीं नेला तो भितरीं। नामा म्हणे करी पूजा त्याची॥ ९॥

८६४. नित्य सर्वकाळ पुण्याचिया राशी। हरिनाम आलिया जिव्हेसी। नित्य तपानुष्ठानाच्या राशी। कोटि यज्ञासी लाभ झाला॥ १॥ धन्य धन्य त्यांचा वंश। जे जे रतले नामास। रामनामीं नित्य सौरस। ते विष्णुदास पवित्र जाणा॥ २॥ पवित्र

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ते स्वधर्मी। ज्यांसी सर्व काळ नेम नामीं। तयाचें नाम पूर्णकामीं। मनोरथ पुरतील॥ ३॥ नामा जपें नाम हरीचें। सार्थक केलें संसाराचें। ओझें फेडिलें पूर्वजन्मींचें। हरी स्मरण केलिया॥ ४॥

८६५. एक भानू अवघा सृष्टीचा सोहळा। व्यापूनि सकळा आकाशासी॥ १॥ पवनसिंधु वरी मन वेगें पाखरी। मार्गुं षट्चक्री वैकुंठासी॥ २॥ तोचि भोगी सुख चिदानंदी वासू। संतसंगें प्रकाशु सफळ मग॥ ३॥ नामा म्हणे यासी गुरुकृपा पाहिजे। संतसंगें पाविजे केशवचरण॥ ४॥

८६६. धन्य नरदेहीं संतसंग करी। त्रैलोक्य उद्धरी हेळामात्रें॥ १॥ नेणे सुख दुःख शरीराचें भान। अखंड भजन केशवाचें॥ २॥ कर्म करूनियां होय शुचिष्मंत। नामामृतीं प्रीत सर्वकाळ॥ ३॥ नामा म्हणे ऐसे वर्ते देहभावीं। मूढजनां दावी भक्तिमार्ग॥ ४॥

८६७. धन्य तोचि देश जेथें संतवास। तापत्रयदोष जाती सत्य॥ १॥ धन्य मातापिता उभयकुळशुद्धता। तोचि भजे संतां निर्धारेंसी॥ २॥ तीर्थरूपीं जळ विलंबें करी निर्मळ। संतदर्शनें तत्काळ शुद्ध होती॥ ३॥ धातुमय मूर्ति चिरकाळें फळती। संतांचे संगतीं निजस्वार्थ॥ ४॥ नामा म्हणे मुक्ति जे नर इच्छिती। संतांचे संगती धरती भाव॥ ५॥

८६८. कपटाचें कुपथ्य झालें तुझें पोटीं। स्मरावा जगजेठी कृपाळु तो॥ १॥ नाम औषध घ्यावें नाम औषध घ्यावें। संतांचे लागावें समागमीं॥ २॥ त्यापाशीं औषध आहे नानाविध। रामकृष्ण गोविंद म्हणती वाचे॥ ३॥ पुत्रस्त्रेहें कैसा अजामेळ स्मरला। तेणें तो उद्धरला क्षणमात्रें॥ ४॥ राम राम म्हणतां तारिली कुंटिणी। वैकुंठभुवनीं तये वासु॥ ५॥ तेंचि हें औषध प्रल्हादें घेतलें। तें तूं घे उगलें म्हणे नामा॥ ६॥

८६९. संतपायीं माथा धरितां सद्भावें। तेणें भेटे देवे आपेंआप॥ १॥ म्हणवूनि संतां अखंड भजावें। तेणें भेटे देवे आपेंआप॥ २॥ साधुपाशीं देव कामधंदा करी। पीतांबर धरी वरी छाया॥ ३॥ नामा म्हणे देव इच्छी संतसंग। आम्हां जीवलग जन्मोजन्मीं॥ ४॥

८७०. बहुरुप्या ब्राह्मणा पडियेलें मित्र। दोहींचें तें गोत्र एक झालें॥ १॥ वेश्या पतिव्रते पडियेला शेजार। दोहींचा आचार एक झाला॥ २॥ संग तोचि बाधी संग तोचि बाधी। कुसंग तो बाधी नारायणा॥ ३॥ नामा विष्णुदास सत्संगति बोधला। आत्मा हा लाधला पांडुरंग॥ ४॥

८७१. जायाचें सोंवळें जायाची ही चोळी। जायाची गरसोळी तीहि जाय॥ १॥ जिणें हें जायाचें जिणें तें जायाचें। तें पैल कोणाचें देणें आहे॥ २॥ जायाचा आचार जायाचा विचार। जायाचा भ्रतार क्षणभरी॥ ३॥ नामा म्हणे अवघें जिणें तें जायाचें। संतसंगतीचें सुख घ्यावें॥ ४॥

८७२. संतसंगतीचें काय सांगूं सुख। आपण-पारिखें नाहीं तेथें॥ १॥ साधु थोर जाणा साधु थोर जाणा। साधु थोर जाणा कलियुगीं॥ २॥ इहलोकीं तोचि सर्वांभूतीं सम। शरीराचा भ्रम नेणें कदा॥ ३॥ नामा म्हणे गाय दूध एक सरे। साधु निरंतर वर्ते तैसा॥ ४॥

८७३. भोळ्या भाविकांचें वचन नुलंघी। फिरतसे संगे तया मागें॥ १॥ मी एक अभक्त मी एक अभक्त। मी एक अभक्त पापराशी॥ २॥ नाममाळा दृढ न करी जतन। परि जाणे वर्म खूण संतसंगें॥ ३॥ नामा म्हणे नाहीं तुम्हांसी उपमा। आमुचे स्वधर्म शुद्ध नाहीं॥ ४॥

८७४. परिसाचेनि संगें लोह होय सुवर्ण। तैसा भेटे नारायण संतसंगें॥ १॥ कीटकी ध्यातां भृंगी झाला तोचि वर्ण। तैसा भेटे नारायण संतसंगें॥ २॥ वनस्पति परिमळु चंदन झाला जाण। तैसा भेटे नारायण संतसंगें॥ ३॥ अग्निस मिळे तें नये परतोन। तैसा भेटे नारायण संतसंगें॥ ४॥ सरिता ओघ जात सिंधूसि मिळून। तैसा भेटे नारायण संतसंगें॥ ५॥ नामा म्हणे केशवा मज देई संतसंग। आणिक कांहीं तुज न मागें बापा॥ ६॥

८७५. येतां जातां थोर कष्टलों गर्भवासी।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पडिलों गा उपवासी प्रेमेंविण ॥ १ ॥ बहुतांचा सेवकु झाला काकुळती। न पावे विश्रांति कधीं काळीं ॥ २ ॥ ऐसें माझें मन सिणलें नानापरी। घालीन आभारी संतांचिया ॥ ३ ॥ वियोगें संतांच्या व्याकुळ चिंतातुर। हिंडे दारोदार दीन रूपें ॥ ४ ॥ परि कोणी संतांच्या न घालिती चरणीं। तळमळी अनुदिनीं श्रांत सदा ॥ ५ ॥ माझें माझें म्हणवूनि जया घाली मिठी। दिसे तेंचि दिठी नाहीं होय ॥ ६ ॥ तया शोकानळें संतप्त अंदोळ। गेलें तें न मिळे कदा काळीं ॥ ७ ॥ न देखत ठायीं देखावया धांवें। भ्रांति भुले भावें नाना मार्गीं ॥ ८ ॥ तुझा स्वरूपानंदु नाहीं ओळखिला। जाहली विठ्ठला हानि थोर ॥ ९ ॥ लोहाचा कवळु लागल्या परिसातें। पढिये सर्वांतें होय जेंवी ॥ १० ॥ नामा म्हणे तैसी भेटी संतचरणीं। करूनि त्रिभुवनीं होईन सरता ॥ ११ ॥

८७६. सुख सांगावें संतांपुढें। जेणें सुख अधिक वाढे ॥ १ ॥ आणिक न करावें शहाणे। प्रेम दिठावेल झणें ॥ २ ॥ खंडितां कल्पनेचा लाग। त्यासि असावा अनुराग ॥ ३ ॥ तोडितां वासनेचा तंतु। त्यासि असावा एकांतु ॥ ४ ॥ गिळिलें अहंतेचें बीज। त्याचे व्हावें चरणरज ॥ ५ ॥ नामा म्हणे त्याचे संगतीं। चित्ता आपेंआप येईल निवृत्ति ॥ ६ ॥

८७७. वासनेविरहित होवोनि एकवट। असावें निकट संतसंगें ॥ १ ॥ हेंचि माझें तीर्थ हेंचि माझें व्रत। करावें दास्यत्व हरिभक्तांचें ॥ २ ॥ नामा म्हणे केशवा तरीच शरणांगत। नाहीं तरी पतित म्हणा मातें ॥ ३ ॥

८७८. भस्म तो होतसे आला जो आकारा। नासे प्रपंच सारा नाममय ॥ १ ॥ झाला अनुभव प्रपंचीच ब्रह्म। मना झाला निश्चय संतकृपें ॥ २ ॥ म्हणोनिया संतां जावोनि शरण। साधुनि निजधन नामब्रह्म ॥ ३ ॥ नामदेव म्हणे संताचेनि कृपें। हृदयीं नाम सोपें नांदतसे ॥ ४ ॥

८७९. संतांच्या चरणा द्यावें आलिंगन। जीवें निंबलोण उतरावें ॥ १ ॥ तेथें तूं निश्चळ राहें माझ्या मना। मग तुज यातना नव्हती कांहीं ॥ २ ॥ संतांचे द्वारीचा होईं द्वारपाळ। तुटे मायाजाळ मोहपाश ॥ ३ ॥ संतांचे प्रसाद सेविसी उरले। आयुष्य सरलें दुणावेल ॥ ४ ॥ नामा म्हणे संत आहेत कृपासिंधु। देती भक्तिबोधु प्रेमसुख ॥ ५ ॥

८८०. आपुलें शरीर घालूनियां पुढें। पडे वाडेंकोडें सर्वभावें ॥ १ ॥ नाम आवडती नानाभूत सृष्टी। देखेन मी दृष्टीं ब्रह्ममय ॥ २ ॥ विष्णुरूप सर्व भवीं अखंडित। मानी सर्वभूत आत्मा माझा ॥ ३ ॥ नामा म्हणे सत्य सत्य जे बोलती। त्यांचें पायींची माती इच्छितसें ॥ ४ ॥

८८१. संतांचें लक्षण ओळखावया खूण। जो दिसे उदासीन देहभावा ॥ १ ॥ सतत अंतरीं प्रेमाचा जिव्हाळा। वाचे वसे चाळा रामकृष्ण ॥ २ ॥ त्या संताचे चरण देखिलें मी दृष्टीं। जळती कल्पकोटी पापराशी ॥ ३ ॥ जयाच्या हृदयीं प्रेमाचा जिव्हाळा। जीवेंभावें गोपाळा न विसंबती ॥ ४ ॥ त्याचे अंगणीचा होईन सांडोवा। मग तूं केशवा नुपेक्षिसी ॥ ५ ॥ तुझ्या ध्यानीं ज्याचें सदा भरलें मन। विश्व तूंचि म्हणोन भजती भावें ॥ ६ ॥ त्याच्या उष्टावळीचा होईन मागता। तरीच पंढरीनाथा भेटी देसी ॥ ७ ॥ ऐसें नित्यानंदें बोधें जे निवाले। ते जीवावेगळे न करी नाम्या ॥ ८ ॥

८८२. माझे मायबाप साधुसंतजन। माझे जीवप्राण अंतरीचें ॥ १ ॥ भवभयाहूनि तारियेलें मज। बाळेभोळे गुज प्रेम दावी ॥ २ ॥ रंकाहूनि रंक झालों मी सेवक। ब्रह्मादिक देख इच्छिती सुख ॥ ३ ॥ नामा म्हणे संत भाग्य अलौकिक। शुद्ध निष्कलंक पुण्यरूप ॥ ४ ॥

८८३. आकल्प आयुष्य व्हावें तयां कुळा। माझिया सकळां हरिच्या दासां ॥ १ ॥ कल्पनेची बाधा न हो कोणे काळीं। हे संतमंडळी सुखी असो ॥ २ ॥ अहंकाराचा वारा न लागो राजसां। माझ्या विष्णुदासां भाविकांसी ॥ ३ ॥ नामा म्हणे तया असावें कल्याण। ज्या मुखीं निधान पांडुरंग ॥ ४ ॥

॥ पुंडलीक वरदे हरीविठ्ठल ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भाग दुसरा

श्रीज्ञानदेवमहाराजांची आदि.

८८४. जगत्रय जीवन अंतर्निष्ठ ज्ञान। तरी संतांसी शरण रिघीजे भावें॥ १॥ हेंचि भक्तिज्ञान वैराग्याचे निधी। विवेकेसी बुद्धि नांदे माझी॥ २॥ श्रवणाचें श्रवण मननाचें मनन। हेंचि निजध्यासन वैराग्याचें॥ ३॥ म्हणोनि बैसलों संतांचे संगतीं। गोविंदा विश्रांति गहिनीनाथ॥ ४॥

८८५. बैसोनि एकांती गुरुगम्य गोष्टी। वेदांत परिपाठी शास्त्र बोध॥ १॥ नित्य शुद्धबुद्ध निर्विकार पूर्ण। उमेसी जें ज्ञान शिव सांगे॥ २॥ तेंचि सच्चिदानंद साकार जीव प्राण। शरीर जाय क्षीण जयापरी॥ ३॥ तेंचि हें सर्व विठोबाचें नाम। निराईस प्रेम गहिनीनाथीं॥ ४॥

८८६. बैसलीं दोघें भ्रतार वल्लभें। उदरींच्या गर्भें सेवी ध्यान॥ १॥ भक्ति नवमास भरले पूर्ण दिवस। आलें वैराग्य डोळस मूर्तिमंत॥ २॥ विठ्ठल आवडी ठेवियेलें नाम। निराईस प्रेम गहिनीनाथीं॥ ३॥

८८७. व्रतबंध दीक्षा उपदेश गायत्री। ॐकार मूळ मंत्री स्वर सोळा॥ १॥ केलें वेदपठण काव्य आणि व्याकरण। झालासे निपुण शास्त्रवक्ता॥ २॥ मग पुष्करादि तीर्थें पाहावीं समस्त। अनुताप चित्तें धरियेला॥ ३॥ वैराग्य पुतळा ज्ञानगम्य मूर्ति। निघालासे भक्ति तीर्थाटणा॥ ४॥ विठ्ठल वंदूनी मातापिता दोन्ही। संग तीर्थाटणीं मुहूर्त केला॥ ५॥

८८८. आला द्वारावती पाहिली कृष्णमूर्ति। जे मोक्ष विश्रांति मुमुक्षूंची॥ १॥ धरी मत्स्यावतार केला शंखोद्धार। देव मुक्त माहेर पांथिकाचें॥ २॥ तेथून सत्वर आला पिंडारका। मंगळवेढ्याहुनी द्वारका देखियेली॥ ३॥ सुवर्णाची नगरी ब्राह्मणा दिधली। ते पुरी पाहिली सुदामयाची॥ ४॥ मंडनाकार शोभे तो माधव। रुक्मिणी विवाह झाला जेथें॥ ५॥ संपादुनी 'गेला अवतारकृत्य। तें भालुका तीर्थ देखियेलें॥ ६॥ पश्चिमे प्रभास तीर्थ देखियेलें। सोरटी देखिले सोमनाथ॥ ७॥ मुचकुंदादि गुंफा काळयवन उभा। विश्रांती पद्मनाभा धवलपुरी॥ ८॥ मार्गींचीं तीर्थें करुनी समस्तें। आला शक्ति जेथें सप्तशृंगा॥ ९॥ अरुणा वरुणा प्राची गोदावरी। ते कपाळेश्वरीं पूजा केली॥ १०॥ पुढें ज्योतिर्लिंग देखिलें त्र्यंबक। कुशावर्ती उदक स्विकारिलें॥ ११॥ वंदूनिया गंगाद्वार सव्य ब्रह्मगिरी। मग भीमाशंकरीं आनंदला॥ १२॥ देखोनियां भीमा आठवें पंढरी। विठ्ठला अंतरीं पांडुरंग॥ १३॥

८८९. ऐसा नित्यानित्य चालतां सुपंथीं। पदोपदीं कीर्ति नाम घोष॥ १॥ आला अलंकापुरीं इंद्रायणी तीरीं। स्नानसंध्या करी देवपूजा॥ २॥ देखोनी सुब्राह्मण केलेंसे नमन। वंदिले चरण शिदोपंतीं॥ ३॥ कोण तुमचा गांव आलेति कोठुनी। काय अभिधानी गमन कोठें॥ ४॥ विठ्ठलाचें नाम रामेश्वरीं भाव। वृत्ति आपेगांव गोदातीरीं॥ ५॥ मातापिता वृद्धें वसताती तेथें। द्वारकादि तीर्थें करूनी आलों॥ ६॥ आजि धन्य भाग्य स्वामीचें आगमन। आश्रम पावन कीजे माझा॥ ७॥ आणुनी मंदिरीं सारुनी भोजन। निद्रा करविली पूर्ण तया हातीं॥ ८॥ तंव स्वप्नावस्थेमाजी येउनि पंढरिनाथें। म्हणे कन्या सालंकृत द्यावी यासी॥ ९॥ प्रातःकाळ झाला नित्य नेम सारिला। मग नमस्कार केला शिदोपंतीं॥ १०॥ वंदोनियां, चरणा सांगितलें स्वप्न। कन्या पाणिग्रहण कीजे तुम्ही॥ ११॥ हांसोनी उत्तरे बोले पैं सारांश। आज्ञा श्रीनिवासें केली नाहीं॥ १२॥ आजिचा सुदीन स्वस्थ करूनी मन। वंदिले चरण शिदोपंतीं॥ १३॥ ऐसे सुसंकल्प हेलावती मनीं। तुळसी वृंदावनीं निद्रा केली॥ १४॥ मग विश्वीं विश्वंभरें व्यापूनियां स्थानीं। येऊनियां स्वप्नीं काय बोले॥ १५॥ भक्ति

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आणि ज्ञान वैराग्य आवडी। वसती उघडी तुझ्या अंगीं॥ १६॥ मूर्तिमंत चारी जन्म इच्या उदरीं। म्हणोनि स्विकारी आज्ञा माझी॥ १७॥ उठोनी विठ्ठलें स्वप्न सांगितलें। हरुषें वंदिलें शिदोपंतीं॥ १८॥ पाचारोनी जोशी घटितार्थ पाहिला। गुण उतरला छत्तीस ही॥ १९॥ निर्धारिलें लग्न मिळाले ब्राह्मण। निर्विघ्न पूजन केलें आधीं॥ २०॥ देवकप्रतिष्ठा ब्राह्मण भोजन। घटिका झाली पूर्ण म्हणती द्विज॥ २१॥ कुळदेवस्मरण म्हणती सावधान। उभयतांचें मन पांडुरंगीं॥ २२॥ झालें पाणिग्रहण विधीसी अर्पण। वंदिले चरण शिदोपंतीं॥ २३॥ पंढरीये क्षेत्रा मिळालीसे यात्रा। आले पंढरपुरा भक्तराज॥ २४॥ गरुडटके पताका मृदंग वाजती। वैष्णव गर्जती जयजयकारें॥ २५॥ गरुडपारी उभे दाटी वैष्णवांची। उपमा वैकुंठीची पंढरीये॥ २६॥ राउळाभितरी प्रवेशली दोघे। देखियेलें उभे पांडुरंग॥ २७॥ काया वाचा मनीं पारुषले नयनीं। मस्तक चरणीं ठेवियेला॥ २८॥ विठ्ठलास ध्यान रामकृष्ण माळा। हृदयीं जिव्हाळा श्रीमूर्ति राया॥ २९॥

८९०. आश्रमविधि करावें पालन। परी विठ्ठलाचें मन तीर्थाटणीं॥ १॥ जाणोनि अंतर म्हणे शिदोपंत। आपुलें मनींचा हा हेत पुरता कीजे॥ २॥ जावें हो सत्वर यावें स्वस्ति क्षेम। पावलें आश्रम शिदोपंत॥ ३॥ गमन केलें तेणें तेव्हां तीर्थाटणा। मुख्य मुख्य स्थाना अनुक्रमें॥ ४॥

८९१. पाहिलें श्रीशैल्य निवृत्ती संगम। पापराशी भस्म देखतांची॥ १॥ चालतां सुपंथीं हृदयीं विठ्ठलमूर्ति। मुखीं नाम कीर्ति गात चाले॥ २॥ अभोळ नरसिंह श्रीवासुदेव। सकळ देवराव व्यंकटाद्री॥ ३॥ गेला अरुणचळा करुनी नमन। चिदांबरा दक्षिण मथुरा कावेरी॥ ४॥ वंदुनी जनार्दन गेला रामेश्वरा। हेत झाला पुरा विठ्ठलाचा॥ ५॥

८९२. जानकी शुद्धी करावया गेला। हनुमंत उडाला जेथुनियां॥ १॥ आनंद भरीत चालतसे मार्गीं। हृदयीं अनुरागीं आवडीचा॥ २॥ ते स्थान वंदुनीं पावला गोकर्ण। हटकेश्वरीं स्नान करूनियां॥ ३॥ आला कोल्हापुरीं लक्ष्मुमी दर्शन। पंचगंगें स्नान करूनियां॥ ४॥ प्रीतीचा संगम देखिला कऱ्हाटकीं। थोर झाला सुखी अंतरींच॥ ५॥ कृष्णेचिया स्नानें कृतकृत्य झाला। माहुली देखिला संगम डोळां॥ ६॥ आला अळंकावती हर्षयुक्त चित्तीं। दिधलें शिदोपंतीं आलिंगन॥ ७॥ विठ्ठल अंतरीं मातापिता पाहावी। आज्ञा म्हणे द्यावी शिदोपंता॥ ८॥

८९३. कुटुंबासहित जावें जी दर्शना। केलीसे प्रार्थना शिदोपंतीं॥ १॥ सहज बोळवण संतांचें दर्शन। म्हणे केलें मान्य शीघ्र चला॥ २॥ मग विठ्ठलानें मातापिता वंदिली। स्थिति सांगितली शिदोपंतीं॥ ३॥ चिरंजीव नांदा म्हणती मातापिता। सुख आमुच्या चित्ता थोर झालें॥ ४॥ वस्त्रें अलंकार शिदोपंतीं दिधलें। मग नमन केलें शिदोपंतीं॥ ५॥

८९४. असतां सुखरूप मातापिता वृद्ध। वैकुंठा स्वानंदें निघोनी गेलीं॥ १॥ संसाराची चिंता नाहीं विठ्ठलासी। अखंड वृत्तीसी समाधान॥ २॥ झालें वर्तमान ऐकिलें शिदोपंतीं। परम तेणें चित्तीं खेद केला॥ ३॥ येउनी परामर्ष घेतला दोघांचा। म्हणे सांभाळ तुमचा करितो देव॥ ४॥ उदासीन वृत्ति तुमची सर्वकाळ। पदार्थ सकल पाहिजे तो॥ ५॥ दया करोनी मज आतां सांभाळावें। अळंकापुरीं राहावें सुखरूप॥ ६॥ पुत्रसंतती कांहीं होईल तुम्हांसी। मग येईल चित्तासी तें करा सुखें॥ ७॥ मानुनी विठ्ठलें वचन तयाचें। म्हणे हें देवाचें करणें हो॥ ८॥

८९५. येऊनि अळंकावती केला क्षेत्रवास। देउनी चित्तास समाधान॥ १॥ नित्य हरिकथा नामसंकीर्तन। संतांचें दरुशन सर्वकाळ॥ २॥ पंढरीची वारी आषाढी कार्तिकी। विठ्ठल एकाएकी सुखरूप॥ ३॥ ऐसा बहुत काळ क्रमिलियावरी। पुत्र अपत्य उदरीं होत न दिसे॥ ४॥ मग विठ्ठल म्हणे ऐकतेसी कांते। मज ऐसें वाटते संन्यास घ्यावा॥ ५॥ देसी आज्ञा तरी जाईन वाराणसी। ऐसें रखुमाईसी म्हणितलें॥ ६॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

८९६. रखुमाई म्हणे ऐकतां जी ताता। संन्यास घ्यावा आतां म्हणताती॥ १॥ संतती वांचूनि न घ्यावा हा संन्यास। ऐसें सांगा त्यांस म्हणितलें॥ २॥ निरोपाची वाट पाहे भलत्या मिषें। रखुमाई असें सावधान॥ ३॥ असतां दुश्चितपणें निरोप पुसिला। जा जा म्हणें दिधला अवसरु॥ ४॥ जाऊनी विठ्ठलें घेतला संन्यास। चिंता रखुमाईस पडली भारी॥ ५॥

८९७. करावें सार्थक रखुमाईनें तेव्हां। आरंभिली सेवा अश्वत्थाची॥ १॥ जाणोनि पैं देवें उग्र अनुष्ठान। तेंथें झालें येणें श्रीपादाचें॥ २॥ देखोनि सत्पात्र केला नमस्कार। सारांश उत्तर बोलियेलें॥ ३॥ पुत्रवती होईं दिधला आशिर्वाद। रखुमाईसी विनोद वाटिन्नला॥ ४॥ माते तूं हांससी श्रीपाद पुसती। स्वामी पुत्र कैसी होती पतीवीण॥ ५॥ भ्रतारें जाऊनी घेतला संन्यास। स्वामीच्या वचनास नलगे बोल॥ ६॥ पुसतां खाणाखूण निश्चय बाणला। श्रीपाद बोलिला सत्य सत्य॥ ७॥ रखुमाईसी पुसे असे तुझे कोणी। येरी कर जोडूनी बोलियेली॥ ८॥

८९८. मातापिता घरीं आहेती समस्तें। वर्तमान तयातें श्रुत केलें॥ १॥ कृपा करुनी यावें तुम्हीं आश्रमासी। सनाथ करावयासी कृपादृष्टी॥ २॥ नेउनि आश्रमा दिधलें आसन। केलें श्रुत वर्तमान शिदोपंतीं॥ ३॥ अर्घ्यपाद्यपूजा भोजन सारिलें। मग वर्तमान पुसिलें शिदोपंती॥ ४॥ श्रीपाद म्हणती रामेश्वरीं भाव। येथें हा अभिप्राय झाला ऐसा॥ ५॥ आतां फिरोनियां जाणें वाराणसी। घेउनी रखुमाईसी तुम्ही यावें॥ ६॥

८९९. श्रीपाद म्हणती इच्या दोषास्तव। माझें पुण्य सर्व लया जातें॥ १॥ शिदोपंत म्हणे तुम्ही दयावंत। शीघ्र गमनार्थ कीजे स्वामी॥ २॥ जाउनि वाराणसीं मठीं प्रवेशले। मग पाचारिलें चैतन्यासी॥ ३॥ तुझे कोणी होते सत्य सांग आतां। अन्यथा बोलतां उरी नाहीं॥ ४॥ चैतन्यें चरणीं ठेवियेला माथा। म्हणे त्यागुनी कांता आलों स्वामी॥ ५॥ उठवुनी श्रीपादें दिधलें आश्वासन। म्हणतां करीं ग्रहण इचें आतां॥ ६॥ अविधी कर्माचें न धरावें भय। यासी आहे साह्य जगदीश॥ ७॥ स्वदेशा जाउनी करावा आश्रम। सुखरूप स्वधर्म चालवावा॥ ८॥ श्रीपादें मस्तकीं हात ठेवियेला। निरोप दिधला चैतन्यासी॥ ९॥

९००. चैतन्याश्रम संन्यासी झाले गृहवासी। मुळींच्या प्रकृतीसी ऐक्य केलें॥ १॥ हासिन्नले लोक बरवा हा संन्यास। करिती उपहास दर्शनाचा॥ २॥ द्विजीं वाळियेलें जगीं सांडियेलें। शेखीं उपेक्षिलें आप्तवर्गी॥ ३॥ ऐसी बारा वर्षें क्रमिलीं निगुती। झालीसे संतती चौघेजण॥ ४॥ निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान मुक्ताबाई। हांसती सकळही ऐकूनि नांवें॥ ५॥ झाली उपवर व्रतबंधा योग्य। उभयतां उद्वेग चिंतातुरे॥ ६॥ जाती कुळावेगळीं पडियेली निराळीं। माझी वंशावळी प्रायश्चित्त॥ ७॥ मिळविलें द्विज केली ब्रह्मसभा। क्षमा अपराधा करा दीना॥ ८॥ निबंधीं निर्णय पाहती धर्मशास्त्रीं। तुम्ही अति श्रौती परायण॥ ९॥ सांगाल तें मान्य म्हणती साहीजणें शुची हें करणें पतितांसी॥ १०॥ निवृत्ति म्हणे तुम्ही भूदेव प्रत्यक्ष। दर्शनेंची मोक्ष जडमूढा॥ ११॥

९०१. पाहतील ग्रंथ सभाश्रेष्ठ महाजन। वैदिक शास्त्रज्ञ पुण्यश्लोक॥ १॥ देहांत प्रायश्चित्त असे या बोलिलें। विचारूनि भले हित करा॥ २॥ म्हणती द्विजवर आणीक नाहीं उपाव। संस्कारें वैश्वदेव केला शुद्ध॥ ३॥ श्रीपाद म्हणती अवश्य करीन। देह हे दंडीन अनुतापें॥ ४॥ त्रिवेणी संगमीं घालीन कर्वती। गेला पूर्वस्थिती वीतरागें॥ ५॥ दारा पुत्र गृह त्यजूनी निघाला। नमस्कार केला द्विजवृंदा॥ ६॥ झडझडा जाती परतोनी न पाहती। नाहीं पुनरावृत्ति म्हणती द्विज॥ ७॥ त्याग आणि वैराग्य हेंचि प्रायश्चित्त। झाला शुचिर्भूत गुरुकृपें॥ ८॥ निवृत्ति म्हणती आम्हां कवण गती। सांगावें श्रीमंतीं विचारूनि॥ ९॥

९०२. म्हणती सकळ द्विज जावें प्रतिष्ठाना।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तेथुनी पत्र आणा तें वंद्य करूं॥ १ ॥ नाहीं जाती कुळ वर्ण अधिकार। क्षेत्रीं वैश्य शूद्र द्विज नव्हे॥ २ ॥ नव्हे देवगण यक्ष ना किन्नर ऋषि निशाचर तेही नव्हें॥ ३ ॥ ते आम्ही अविनाश अव्यक्त जुनाट। निजबोधें इष्ट स्वरूप माझें॥ ४ ॥ नव्हे आप तेज वायु व्योम मही। महत्तत्त्व तेंही विराट नव्हें॥ ५ ॥ नव्हें मी सगुण नव्हें मी निर्गुण। अनुभूतीं भजन होउनी नव्हें॥ ६ ॥ निवृत्ति म्हणतसे ऐक ज्ञानेश्वरा। माझी परंपरा ऐसी आहे॥ ७ ॥

९०३. विधि वेद विरुद्ध संपर्क संबंध। नाहीं भेदाभेद स्वस्वरूपीं॥ १ ॥ अविधि आचरण परम दूषण। वेदोनारायण बोलियेला॥ २ ॥ स्वधर्म अधिकार जातीपरत्व भेद। उचित ते शुद्ध ज्याचें तया॥ ३ ॥ म्हणोनियां संतीं अवश्य आचरावें। जना दाखवावें वर्तोनियां॥ ४ ॥ कुळींचा कुळधर्म अवश्य पाळावा। सर्वथा न करावा अनाचार॥ ५ ॥ प्रत्यवाय आहे अशास्त्रीं चालतां। पावन अवस्था जरी झाली॥ ६ ॥ ज्ञानदेव म्हणे ऐकाजी निवृत्ति। बोलिली पद्धती धर्मशास्त्रीं॥ ७ ॥

९०४. हेंचि आम्हां श्रेष्ठ बोलिले परमनिष्ठ। असतां दुर्घट परी सेव्य॥ १ ॥ पांडवांचें कुळ शोधितां निर्मुळ। कुंडजार गोळ बुद्धिकासी॥ २ ॥ भक्ति हे सरती जाति न सरती। ऐसी आत्मस्थिति स्वसंवेद्य॥ ३ ॥ दुर्वास वसिष्ठ अगस्ति गौतम। हे ऋषि उत्तम कुळींचे कैंसे॥ ४ ॥ व्यास आणि वाल्मिकि कोण कुळ तयांचें। तैसेंचि आमुचें सोपान म्हणे॥ ५ ॥

९०५. देऊनियां पत्र निघाले सत्वर। करूनि नमस्कार सकळांसी॥ १ ॥ जाउनी राहिले भोगावती तीरीं। तीर्थयात्रा विधी संपादिली॥ २ ॥ अनाथें पतीतें शरणागत दीनें। सनाथ करणें कृपादृष्टी॥ ३ ॥ केली ब्रह्मसभा बैसले वरिष्ठ। होतें तैसें स्पष्ट निवेदिलें॥ ४ ॥ पत्र वाचूनियां सकळां झालें श्रुत। संन्याशाचे पुत्र कळों आलें॥ ५ ॥ नाहीं प्रायश्चित्त उभयतां कुळभ्रष्ट। बोलियेले श्रेष्ठ पूर्वापार॥ ६ ॥ या एक उपाय असे शास्त्रमतें। अनन्य भक्तीनें अनुसरावें॥ ७ ॥ तीव्र अनुतापें करावें भजन। गो खर आणि श्वान वंदूनियां॥ ८ ॥ वंदावें अंत्यज ब्रह्मभावनेसी। ऐसे पद्धतीसी बोलियले॥ ९ ॥ ऐकोनी निवृत्ति संतोषला चित्तीं। धन्य तुमची वदती तीर्थरूप॥ १० ॥ ज्ञानदेव म्हणे सांगाल तें मान्य। मुक्ताई सोपान आनंदिली॥ ११ ॥

९०६. ऐकोनी ऐसीं नांवें हासिन्नलें ब्राह्मण। नामाचें अभिधान सांग आम्हा॥ १ ॥ एक म्हणती नामापाशीं काय आहे। ज्ञान वाहात आहे पखालीसी॥ २ ॥ ज्ञानदेव म्हणे तोही माझा आत्मा। वेगळीक आम्हां तया नाहीं॥ ३ ॥ मारिती आसुड म्हैशियाचे पाठीं। तोंचि वळ उठी ज्ञानदेवा॥ ४ ॥ म्हणती द्विजवर अहो ज्ञानदेवा। यापासोनी उच्चारावा वेदध्वनी॥ ५ ॥ तरीच तुमची सत्ता आम्हां येईल कळों। नाहीं तरी बोलों नका कांहीं॥ ६ ॥ ज्ञानदेव म्हणे बोले रे ऋग्वेद। ओंकार मूळ शब्द प्रणवाचा॥ ७ ॥ वेदाचा आरंभ करितां झाला पशू। विधी उपन्यासु सांग पुढें॥ ८ ॥ करिती आश्चर्य सकळ द्विजवर। हे तिन्ही अवतार दीन देवांचे॥ ९ ॥ आदिमाता मुक्ताई मुक्तपणें अवतरली। आम्हांपासूनि झाली थोर चुकी॥ १० ॥ कर्मठ अभिमानें ठकलों देहबुद्धि। गोवियेलीं विधि निःसंदेह॥ ११ ॥ नेणों भक्तिज्ञान वैराग्याचा लेश। कुटुंबाचे दास होउनी ठेलों॥ १२ ॥ आणीकांसी सांगों आपण नाचरों। लटिकेंच हुंबरों प्रतिष्ठेसी॥ १३ ॥ धन्य याचा वंश धन्य याचें कुळ। धन्य पुण्यशील अवतार हे॥ १४ ॥ सकळ द्विजवर करिती नमस्कार। आनंदें जयजयकार करिताती॥ १५ ॥ ज्ञानदेव म्हणे तुमच्या चरणांचा महिमा। सामर्थ्य हें आम्हां अंगीं नाहीं॥ १६ ॥ तुम्ही वेदरूप भूदेव प्रत्यक्ष। तुमच्या दर्शनेंचि मोक्ष जडमूढां॥ १७ ॥ सकळही तीर्थें तुमच्या वसतील पायीं। तेथें आमुचें कायीं उरती दोष॥ १८ ॥ धन्य दिवस आजी झालों कृतकृत्य। भेटलिया संतवृंदें आम्हां॥ १९ ॥ ज्ञानदेव ध्यान

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ब्राह्मणाचे चरण। कलीमळ छेदन निवृत्ति म्हणे॥ २०॥

९०७. जयाचें दर्शन होतांची दुरुनी। सर्व जाय पळोनी पापताप॥ १॥ तीर्थांसी पावन कलिमळ छेदन। देवाचें कल्याण जयाचेनी॥ २॥ ते पाय सादृश्य देखिले आजि दृष्टी। याग सहस्त्र कोटी न तुकती॥ ३॥ जयाच्या हृदयीं वेदाचा निवास। शास्त्रें रहिवास केला होय॥ ४॥ जयांच्या वचनें देवपितर तृप्त। स्वाहा स्वधा होत ज्यांच्या सुखें॥ ५॥ जोडोनियां कर विनवितो सोपान। निश्चयेंसी वचन द्यावें आम्हां॥ ६॥ शेष उच्छिष्टा करावें विभागी। बंधुपणालागीं अधिकारी॥ ७॥ अध्यात्म ग्रंथ पाहती पैठणी। गीता संबोधनी जवळी असे॥ ८॥ भोगावती स्नान कालिका दरुशन। वेदांत व्याख्यान परिमिती॥ ९॥ धन्य हा सोपान धन्य ज्ञानदेव। धन्य निवृत्तिराव ब्रह्मरूप॥ १०॥ सांगती पुराण रात्रीं हरिकीर्तन। पैठणीचे जन वेधियेले॥ ११॥ तंव काव्ययज्ञ झाला गृहस्थाचे घरीं। पितर मंत्रोच्चारीं आव्हानिले॥ १२॥ अवघे द्विजवर म्हणती धन्य धन्य। यासारिखे ब्राह्मण नाहीं कोणी॥ १३॥ उपनिषद्द्वार पढिलों वेदांत। परि हे सामर्थ्य नाहीं आम्हां॥ १४॥ नाहीं आइकिलें ना कोठें वर्तलें। ये सृष्टी देखिलें आजी दृष्टी॥ १५॥ पशुमुखें वेद दृश्य पितरलोक। थोर हें कवतुक दाखविलें॥ १६॥ मिळोनी समस्त सोडियेलीं शास्त्रें। विचारोनी पत्र लिहियेलें॥ १७॥ हे परलोकीचे तारू देवत्रय यासी। प्रायश्चित्त काय यासी द्यावें कोणी॥ १८॥ लिहोनियां पत्र दिधले तया हातीं। समस्तांसी निवृत्ति नमस्कारिले॥ १९॥

९०८. घेऊनियां पत्र केली प्रदक्षणा। साष्टांगीं ब्राह्मणां नमन केलें॥ १॥ मागोनियां ह्मशा नेवाशासी आले। प्राकृत पैं केलें गीतेलागीं॥ २॥ निवृत्ति म्हणती ऐक ज्ञानदेवा। अनुभव करावा अमृता ऐसा॥ ३॥ आदि शक्ति माता वंदूनियां म्हाळसा। मग तेथूनी सरिसा चालियेले॥ ४॥ क्रमिताती मार्ग अनुभव कुशळ। हरिनाम सरळ कवित्वकळा॥ ५॥ येऊनी उतरली आळाचिये वनीं। पशु तये स्थानीं शांत झाला॥ ६॥ करुनी तया पूजन सेंदूर तेलें लेपून। आळंकावती निजस्थान प्रवेशली॥ ७॥ सान थोर सकळ तेथील निवासी। निवृत्ति तयांसी नमस्कारिले॥ ८॥

९०९. तिन्ही देव जैसे परब्रह्मीचे ठसे। जगीं सूर्य जैसे प्रकाशले॥ १॥ धन्य तो निवृत्ति धन्य तो सोपान। धन्य तो निधान ज्ञानदेव॥ २॥ उपजतांचि ज्ञानी हे वर्म जाणोनी। आले लोटांगणीं चांगदेव॥ ३॥ प्रत्यक्ष पैठणीं भटीं केला वाद। बोलविला वेद म्हैशीपुत्रा॥ ४॥ सोहंसुकृताच्या सोडोनियां गांठी। केलीसे मराठी गीता देवी॥ ५॥ नामा म्हणे सर्व सुकृत लाहिजे। एक वेळां जाइजे अळंकावती॥ ६॥

गीतामाहात्म्य.

९१०. गीता गीता गीता त्रिवार बोलतां। पाप जाय तत्त्वता मोक्ष जोडे॥ १॥ गीता महिमा बोलवेना वाचे। बंधन जीवाचे दूर होती॥ २॥ एके अक्षरीं कोटी अश्वमेध। फळ हें प्रसिद्ध पुराणोक्त॥ ३॥ एकची तो श्लोक वाचिलिया नेमें। अंतीं परमधाम प्राप्त होय॥ ४॥ नामा म्हणे गीता संपूर्ण वाचितां। परम त्याचे आर्ता बोलवेना॥ ५॥

९११. गीता गीता म्हणतां पापा होय नाश। कैवल्यहि त्यास प्राप्त होय॥ १॥ गीतेचीं अक्षरें पडतां श्रवणीं। जाय तत्क्षणीं भवभय॥ २॥ एक एक श्लोकीं कोटी अश्वमेध। पुण्यही अगाध म्हणतां गीता॥ ३॥ नामा म्हणे गीता नित्य जो वाचिता। तयाच्या सुकृता पार नाहीं॥ ४॥

९१२. ज्ञानराज माझी योग्यांची माउली। जेणें निगमवल्लि प्रगट केली॥ १॥ गीता अलंकार नाम ज्ञानेश्वरी। ब्रह्मानंदलहरी प्रगट केली॥ २॥ अध्यात्म विद्येचें दाविलेंसे रूप। चैतन्याचा दीप उजळिला॥ ३॥ छपन्न भाषेचा केलासे गौरव। भवार्णवीं नाव उभारीली॥ ४॥ श्रवणाचे मिषें बैसावें येउनी। रामराज्य भुवनीं सुखी नांदे॥ ५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओंवी अनुभवावी॥ ६॥

तीर्थावळी.

९१३. नामयाचे भेटी ज्ञानदेव आले। लोटांगण घातलें नामदेवें॥ १॥ देउनी आलिंगन प्रीतीच्या पडिभरें। पूजिलें आदरें यथाविधी॥ २॥ धन्य तो अवसरु संत समागमु। करीतसे संभ्रमु आवडीचा॥ ३॥ नामदेव म्हणे सुफळ माझें जिणें। स्वामीच्या दर्शनें धन्य जालों॥ ४॥ पूर्व पुण्य माझें फळासी हें आलें। प्रत्यक्ष भेटलें पांडुरंग॥ ५॥ संसारीं आसक्त मायामोहें रत। तापत्रय संतप्त झाले जीव॥ ६॥ ऐसिया पतीताचा करावया उद्धार। यालागीं अवतार तुमचा जगीं॥ ७॥ तरी मी एक दीन मूढ मतिहीनु। चरणाचा रजरेणू संतांचिया॥ ८॥ म्हणोनी पंढरीनाथ पाळीतसे मातें। प्रेमजीवनमातें देवोनियां॥ ९॥ आजि स्वामींनीं पाहिलें कृपादृष्टि। केली सुखवृष्टि अनिवार॥ १०॥ नामा म्हणे तुमच्या चरणाचा आधार। टाकीन पैलपार भवनदीचा॥ ११॥

९१४. ज्ञानदेव म्हणे तूं भक्त शिरोमणी। जोडिले जन्मोनी केशवचरण॥ १॥ प्रेमसुख गोडी तुजची फावली। वासना मावळली समूळ तुझी॥ २॥ धन्य तुझें जन्म धन्य तुझें कुळ। धन्य तुज राऊळ जवळी असे॥ ३॥ भक्तिप्रेम धन्य साधिलें तुवां सार। केला पैं संसार देवधडी॥ ४॥ क्षणएक एकांतीं बैसोनी सहज। अंतरींचें गुज बोलों कांहीं॥ ५॥ जीवन्मुक्त ज्ञानी जरी जाले पावन। तरि देवतीर्थभजन न सांडिती॥ ६॥ भक्तशिरोमणी धन्य तूं संसारीं। परि एक अवधारीं वचन माझें॥ ७॥ भूतळींचीं तीर्थें पहावीं नयनीं। असे आर्त मनीं विष्णुदासा॥ ८॥ तुझिये संगतीचें नित्य सुख घ्यावें। सार्थक करावें संसाराचें॥ ९॥ ऐसी ही उत्कंठा बहुत माझें पोटीं। भाग्यें झाली भेटी तुजसी आजी॥ १०॥ ज्ञानदेव म्हणे पुरवी मनोरथ। करावा मुहूर्त प्रयाणासी॥ ११॥

९१५. ऐसें ऐकोनी बोलणें नामा विचारी मानसीं। म्हणे काय द्यावें यासी प्रतिवचन॥ १॥ मग विठोबाचे पाय आठविले मनीं। बोले अमृतवचनीं तयाप्रति॥ २॥ सर्व सुख मज आहे पांडुरंगीं। जावे कवणालागीं कवण्या ठाया॥ ३॥ आहिक्य परत्रीं मज चाड नाहीं सर्वथा। न लागती पुरुषार्थ मुक्ति चारी॥ ४॥ रंग होऊनियां पंढरी चोहटा। राखेन दारवंटा महाद्वारीं॥ ५॥ या सुखाकारणें शरीर कर्वतीं फोडिलें। दुर्जय तोडिलें मायाजाळ॥ ६॥ त्रिभुवनींचें वैभव सांडोनियां दुरी। जालोंसे भिकारी पंढरीचा॥ ७॥ कल्पतरूची छाया कामधेनूचें दुभतें। संपूर्ण आईतें सर्वकाम॥ ८॥ विठोबाचे पायीं मज काय उणें। परि वासनाची मनें गिळीली माझी॥ ९॥ जन्मोनी पाळिलों पोशिलों जयाचा। विकिलों कायावाचामनें त्यासी॥ १०॥ नामा म्हणे स्वामी विठोबासी पुसा। आज्ञा देईल शिरसा वंदीन त्यासी॥ ११॥

९१६. मग ज्ञानदेव म्हणे भला भक्तराज। कळलें गौप्यगुज सर्व तुझें॥ १॥ धीर आणि चतुर सर्वस्वें उदार। साजे तुज अधिकार प्रेमभक्ति॥ २॥ धन्य तूं संसारीं भक्तिभावशीळ। साधिलें तुवां केवळ प्रेमसुख॥ ३॥ देउनी आलिंगन नामा धरिला करीं। वंदियेले शिरीं चरणरज॥ ४॥ राउळा भीतरीं चला जाऊं वेगें। आज्ञा मागों दोघे तीर्थयात्रे॥ ५॥ सत्वर उठोनी आले स्वामीजवळा। मस्तक ठेवियला चरणावरीं॥ ६॥ जीवींचा निजभावो सांगे ज्ञानदेव। ऐकोनी पंढरीरावो हांसिन्नले॥ ७॥ म्हणे तूं ज्ञानशीळ चिद्रूप केवळ। सबाह्यनिर्मळ स्फटिक जैसा॥ ८॥ सहज तीर्थरूप तूंचि निरंतर। असतां हा विचार काय करिसी॥ ९॥ येरू म्हणे स्वामी बोलिलेती बरवें। परि सार्थक करावें देहाचें या॥ १०॥ प्रसंगें नामयाचें संगति सुख घ्यावें। म्हणोनी ज्ञानदेवें धरिले चरण॥ ११॥

९१७. हांसोनी पंढरिनाथ पाहे नाम्याकडे। म्हणे नवल केवढें भाग्य तुझें॥ १॥ प्रत्यक्ष परब्रह्म मूर्ति ज्ञानेश्वर। करीतसे आदर संगतीचा॥ २॥ ऐसें भाग्य जेणें सर्वस्वें साधावें। तरीच जन्मा यावें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विष्णुदासा ॥ ३ ॥ जावें स्वस्ति क्षेम यावें शीघ्रवत। करावें स्वहित कळेल तैसें ॥ ४ ॥ सर्वभावें आमुचा विसरु न पडावा। लोभ असों द्यावा मजवरी ॥ ५ ॥ परियेसीं ज्ञानराजा बोले जगजीवनु। तूं तंव सर्वज्ञ सुखमूर्ति ॥ ६ ॥ परि एक मागणें आहे तुजप्रती। आठवण चित्तीं असों द्यावी ॥ ७ ॥ हें कृपेचें पोसणें माझें आवडतें। क्षण एक जीवापरतें न करीं कदा ॥ ८ ॥ परी तुवां सांकडें घातलें सर्वथा। दाटलें अवस्था हृदय माझें ॥ ९ ॥ आरूप साबडें नामें माझें वेडें। मार्गी मागें पुढें सांभाळावें ॥ १० ॥ ताहान भूक तुवां जाणावी जीवींची। मज चिंता याची थोर वाटे ॥ ११ ॥ मग नामयाचा हातु धरोनी. श्रीपती। देतु असे हातीं ज्ञानदेवा ॥ १२ ॥ रानीं वनीं जनीं विसंबसी झणी। धाडितों देखोनी आर्त तुझें ॥ १३ ॥ चरणीं ठेवुनी माथा निघते झाले दोघे। आले चंद्रभागे केलीं स्नानें ॥ १४ ॥ पुंडलिकाचे चरण वंदूनियां नामा। उतरले भीमा पैल तीरीं ॥ १५ ॥

९१८. तीर्थयात्रेप्रती बोळविला नामा। आले निजधामा देवरावो ॥ १ ॥ चरण प्रक्षाळाया रुक्मादेवी आली। श्रीमुख न्याहाळी भरोनी दृष्टी ॥ २ ॥ तंव ते निडारले नयन स्वेदें भिजलें वदन। हृदय झालें पूर्ण करुणारसें ॥ ३ ॥ बाप कृपेचा सागरू सुखाचा सुखतरू। आर्त लोभापरू दीनालागीं ॥ ४ ॥ चरणीं ठेवुनी माथा पुसे जगन्माता। आजी कां अवस्था विपरीत देखों ॥ ५ ॥ म्हणे वाटतें जडभारी नाम्याच्या वियोगें। दाटले उद्वेगें चित्त माझें ॥ ६ ॥ कवण्या सुखें स्थीर न राहे माझें मन। केधवा डोळां देखेन प्राण माझा ॥ ७ ॥ इष्टमित्र बंधु मायबाप सखा। हीं नामें मज देखा ठेविलीं तेणें ॥ ८ ॥ तो कैसा मजवीण राखिल आपुला प्राण। हे चिंता दारुण वाटे मज ॥ ९ ॥ तंव ती महामाया म्हणे जी यादवराया। झणी तुमच्या नामया दिठी लागे ॥ १० ॥ शोक मोह दुःख क्षणामाजी जाळी। तें जीवन त्याजवळी नाम तुमचें ॥ ११ ॥

९१९. माझे भक्त मज अनुसरले चित्तें। त्याहुनि पढियंते मज आणिक नाहीं ॥ १ ॥ व्यक्तीस येणें मज तयाचीये आवडी। युगायुगीं प्रौढि हेचि मिरवी ॥ २ ॥ त्याचेनि कृतार्थ असें मी पूर्णकाम। ते माझे परम प्राणसखे ॥ ३ ॥ ते माझे आश्रम मी त्यांचा विश्राम। जीहीं रूपनाम केलें मज ॥ ४ ॥ मी त्यांचा सोयरा ते माझे सांगाती। करीं त्यांसी एकांति सुख गोष्टी ॥ ५ ॥ जीहीं तनुमन प्राण लाविला मजकडे। मी तया आवडे जीवाहुनि ॥ ६ ॥ ते माझ्या भाग्याचे अधिकारी विभागी। वैकुंठ त्यालागी वसतें केलें ॥ ७ ॥ त्यांचें गुज गौप्य मीची एक जाणें। माझी प्रेमखूण कळली तयां ॥ ८ ॥ मनाची साउली करोनियां माते। भोगिती आतां ते प्रेम सुख ॥ ९ ॥ आपुलियाची किरणें विराजे गभस्ती। परी किरणें तीं नव्हती आन जेंवी ॥ १० ॥ तैसें माझें दास मजमाजी उदास। असती समरस दुजेनवीण ॥ ११ ॥ मी तों भक्तरूप भक्त माझें स्वरूप। प्रभा आणि दीप जयापरी ॥ १२ ॥ हे खूण अनुभवी जाणती ते ज्ञानी। ज्या नाहीं आयणी कासयाची ॥ १३ ॥ त्यांचीये चरणींचें रज रेणु माझें नामें। जींही सांडिलें रज तमें सत्वशीळ ॥ १४ ॥ त्याचे भेटीलागीं हृदय माझें कळवळे। कैं देखेन डोळे निवती माझे ॥ १५ ॥

९२०. तंव ते आवडते भक्त अंतरंग आपुलें। देवें बोलाविलें एकांतासी ॥ १ ॥ म्हणे त्या नामापरतें मज दुजें नावडे। सांगे तयापुढें केशीराजु ॥ २ ॥ त्या देखतांची दृष्टी मन माझें निवे। वाटे त्या घालावें हृदयामाजीं ॥ ३ ॥ त्याचेनि लोभें मन माझें मोहिलें। अखंड राहिलें त्याचेपाशीं ॥ ४ ॥ मजपरतें दुजें नेणें तो नामा। नित्य माझा प्रेमा पढिये त्यासी ॥ ५ ॥ मी भक्तकाजकैवारी म्हणवितां वाटे लाज। परि म्यां कांहीं नाहीं काज केलें त्याचें ॥ ६ ॥ धर्म अर्थ काम त्या नाहीं दिधलें। जन्मोनि बांधलें मज सेवाऋणें ॥ ७ ॥ तेणें आपुलेनि पुरुषार्थें जिंकिला संसार। केला मदमत्सर देशधडी ॥ ८ ॥ लोभ दंभ दुरळ माया मोह वैरी। घातलें तोडरीं काम क्रोध ॥ ९ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तो न मनीं आणिकां देवां न करी त्यांची सेवा। मजपरता विसांवा नाहीं त्यासी॥ १०॥ तें मार्गीं शिणले असेल कोमाईलें। सुखदुःख आपुलें सांगेल कवणा॥ ११॥ त्याचिया जीवींचें मीच जाणे सर्व। हा माझा अनुभव आहे त्यासी॥ १२॥ ते माझे दास आवडते अंतरंग। त्यजिला सर्व संग मजसाठीं॥ १३॥ देखोनि ते आवडी अभिन्नव वाटलें। सप्रेमें दाटलें सकळ भक्त॥ १४॥ परसा भागवत आनंदें नाचत। लोटांगणी येत गरुडपारीं॥ १५॥

९२१. ऐसे सुखरूप दोघे चालताती मार्गीं। परी चित्त पांडुरंगीं नामयाचें॥ १॥ क्षणाक्षणा वास परतोनी पाहे। वियोग न साहे पंढरीचा॥ २॥ म्हणे कां गा केशीराजा बोळविलें मातें। न येसीच सांगाते सांभाळीत॥ ३॥ चिंतातूर थोर पडिलो ये परजनीं। न दिसे माझे कोणी जीवलग॥ ४॥ फुटोनि हृदय होती दोनी भाग। बहु मज उद्वेग वाटताती॥ ५॥ तूं माझी जननी तूं माझा जनीता। तूं बंधु चुलता पंढरीराया॥ ६॥ तूंचि इष्टमित्र तूंचि गणगोत। तूंचि कुळदैवत आवडतें॥ ७॥ तूंचि माझें व्रत तूंचि माझें तीर्थ। तूंचि धर्म अर्थ काम देवा॥ ८॥ तूंचि ज्ञानचक्षु तूंचि माझा लक्षु। तूंचि माझा साक्षु स्वभावासी॥ ९॥ साच कीं लटिकें हें माझें बोलणें। तुजवांचुनि जाणें कवण दुजा॥ १०॥ नामा म्हणे आपुलें अनाथा सांभाळीं। येऊनी हृदयकमळीं राहे माझ्या॥ ११॥

९२२. ज्ञानदेव म्हणे परियेसी विष्णुदासा। तूं सुखसंतोषा पात्र होसी॥ १॥ प्रेमाचा जिव्हाळा तुझ्या हृदयीं आला। तूं कां वेळोवेळां खंती करिसी॥ २॥ विचारी सावध होऊनि भक्तराजा। सुखानंदु तुझा तुजची जवळीं॥ ३॥ (ना.) मी नेणें ज्ञानगती नेणें योगयुक्ति। न देखें विश्रांति एकेविण॥ ४॥ सर्वभावें मज तेंचि रूप आवडे। जें पुंडलिक पुढें उभें असे॥ ५॥ तो माझा विठ्ठलु दावी दृष्टीभरी। आस मी न करी आणिकांची॥ ६॥ (ज्ञा.) व्यापकु विठ्ठलु आहे सर्व देशीं। जरी सांडोनियां पाहसी भेदभ्रमु॥ ७॥ तो नाहीं ऐसा ठाव उरलासे कवण। सर्वत्र संपूर्ण गगन जैसे॥ ८॥ (ना.) काया वाचा मनें मज तोचि व्हावा। गीतीं गाता जीवा सुख वाटें॥ ९॥ ऐकावा श्रवणीं पाहावा तोचि नयनीं। नवजावा जवळोनी दूर कोठें॥ १०॥ (ज्ञा.) जें अक्षर अव्यक्त देशकाळरहित। ज्ञानी उपासीत सोहंभावें॥ ११॥ सर्वेंद्रियांसहीत आवरोनि चित्त। भोगिती अद्वैत नित्य सुख॥ १२॥ (ना.) सर्व सुख मज आहे त्याच्या पायीं। आणिकांच्या वाही न पडे कदां॥ १३॥ तेथें माझें मन रंगलेसें भावें। सुख येणें जीवें देखिलें डोळा॥ १४॥ (ज्ञा.) सर्वगत संपूर्ण सर्वकाळ असणें। होणें आणि जाणें नाहीं जया॥ १५॥ ते तुज माझारी तूं तयाभीतरी। अनुभवीं निर्धारी ठेवूनी मन॥ १६॥ (ना.) मी न मनीं न मनीं लटिकी हे कहाणी। परि जळधरावांचोनि चातक तैसा॥ १७॥ तैसें माझें मन स्मरे रात्रंदिवस। पंढरीनिवास जीवन माझें॥ १८॥ ऐसें ऐकोनी बोलणें म्हणे ज्ञानदेव। धन्य तुझा भाव एकविध॥ १९॥ नामा म्हणे माझ्या सुखाचा विसांवा। आवडे या जीवा पंढरीरावो॥ २०॥

९२३. ऐसें नित्यानंदभरीत क्रमिताती मार्गु। हृदयीं तो अनुरागु आवडींचा॥ १॥ प्रेमें वोसंडत करिती स्वहित गोष्टी। दाविती कसोटी अनुभवाची॥ २॥ व्यापक तें सुख वृष्टी होतसे अनिवार। ब्रह्मरसें पूर वोसंडत॥ ३॥ ज्ञानदेव म्हणे परियेसी नामया। अद्वैत आत्मया प्रेम मूर्ती॥ ४॥ भक्तिभावें तुवां साधिलें अविनाश। सांग पा सविलास मार्ग त्याचा॥ ५॥ कैसा तो साधावा सांग भजनविधी। कैसी नमनबुद्धि सत्त्वशीळ॥ ६॥ कैसा निर्विकार ध्यानाचा प्रकार। हा सर्व विचार सांगे मज॥ ७॥ कैसें तें श्रवण कैसें तें मनन। कैसें निजध्यासन दृढ होय॥ ८॥ कवण ते भक्ति कवण ते धृति। कवण तें विश्रांति दावी मज॥ ९॥ बहुत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

उत्कंठीत या सुखा कारणें। तें मज पारणें करवी आजी॥ १०॥ सांगे हो अनुभवो साधन उपावो। विनवी ज्ञानदेवो नामयासी॥ ११॥

९२४. परिसुनी ते गोष्टी घाली चरणां मिठी। दाटलासे कंठीं सद्‌गदीत॥ १॥ कृपेचें पोसणें मी पंढरीरायाचें। येवढें भाग्य कैंचें मज जाणिवेचे॥ २॥ नव्हे बहुश्रुत नव्हें ज्ञानशीळ। दास मी दुर्बळ वैष्णवांचा॥ ३॥ नेणतें नेणतें कांहींच मी नेणतें। म्हणोनी देवें तुम्हांतें निरविलें॥ ४॥ येतां माझा हात दिधला तुमच्या करीं। घातलें आभारी मायबापें॥ ५॥ आतां त्याचे कृपावसें येईल वाचे सरिसें। कळेल कांहीं तैसें निवेदीन॥ ६॥ परी भानूसी देखणें करिजे अनुतेजें। तैसें ज्ञान माझें स्वामीप्रती॥ ७॥ कल्पतरु याचक कृपणाचे द्वारीं। कां दैन्य भाकी थोरी कामधेनु॥ ८॥ तैसी तुमची यांच्या मज दीनाप्रती। नकळे काळगति समर्थाची॥ ९॥ मातेचिया स्नेहें बाळक बोबडे। खेळवी लाडें कोडें नेणे लाजो॥ १०॥ नामा म्हणे तैसें तुम्ही माझें कवतुक। करुनी सुखेंसुख वाढवितां॥ ११॥

९२५. ज्ञानदेव म्हणे शंका न धरिजे मनीं। दृष्टि दुजेपणीं न ठेवावी॥ १॥ सुखें सुख घ्यावें अनुभवोनि अनुभवावें। आहे तें अवघें ब्रह्मरूप॥ २॥ त्या सुखाचा अनुभव करी सुखरूपा। सुख वस्तुच्या दीपा नामदेवा॥ ३॥ सुखाचिये ताटीं सुखची वोगरी। तृप्ती होईल थोरी क्षुधातुरा॥ ४॥ पंढरीरायाचा तूं प्रेम भांडारी। आशा पूर्ण करी मज याचकाची॥ ५॥ विश्रांतीसी पात्र तूंचि विष्णुदासा। हा मज भरंवसा आहे तुझा॥ ६॥ म्हणोनि तुझा संगू धरिली थोर आस। झणी होसी उदास भक्तराया॥ ७॥ सिंधुहूनि सखोल सुरस तुझे बोल। आनंदाची वोल नित्य नवी॥ ८॥ ते मज सादर ऐकवीं सत्वर। श्रवण क्षुधातुर झाले माझे॥ ९॥ जाणीव नेणीव तरीच शोभे सर्व। जरी होय आयुर्भाव वैराग्याचा॥ १०॥ ज्ञानदेव म्हणे तूं भक्त अंतरंग। नलगे तुज पांग बहुज्ञतेचा॥ ११॥

९२६. ऐसीं ऐकोनी उत्तरें प्रेमा झाला पोटीं। म्हणे बोलावी ते गोष्टी अनुभवाची॥ १॥ येर कर्मधर्म सर्वही पाल्हाळ। श्रमुची केवळ जाणिवेचा॥ २॥ ऐसा संत भेटे विरळा भाग्ययोगें। जो आथिला वैराग्यें सप्रेमळू॥ ३॥ सर्वभूतीं दया सर्वभावें करुणा। जेथें मीतूंपणा मावळला॥ ४॥ भजन तयां नांव वाटे मज गोड। येर ते काबाड वांयांविण॥ ५॥ नमन तें नम्रता न देखें गुणदोष। अंतरीं प्रकाश आनंदाचा॥ ६॥ येर ते दांभिक जाणावे मायावी। विश्वास मी जीवीं न धरीं त्यांचा॥ ७॥ ध्यान तया नांव निर्विकार निकें। जें विश्वीं माझ्या देखे विठोबासी॥ ८॥ अखंड हृदयीं तेचि आठवण। साजिरें समचरण विटेवरी॥ ९॥ नादीं लुब्ध जैसे आसक्त हरिण। जाय विसरोन देहभाव॥ १०॥ यापरि तल्लीन दृढ राखें मन। या नांवें श्रवण आवडीचें॥ ११॥ व्यवसायी चित्त ठेवुनी कृपण। लाभाचें चिंतन सर्वकाळ॥ १२॥ यापरि अखंड स्वहित विचारण। करिजे तें मनन सत्वशीळ॥ १३॥ परपुरुषीं जैसी आसक्त व्यभिचारिणी। न लागे तिच्या मनीं कामधाम॥ १४॥ कीटकी भृंगुटीये जैसें अनुसंधान। निकें निजध्यासनएकविध॥ १५॥ सर्वभावें एक विठ्ठलुचि ध्याये। सर्वांभूतीं पाहें रूप त्याचें॥ १६॥ सर्वांहूनि निराळा रजतमा वेगळा। भोगी प्रेमकळा तेची भक्ति॥ १७॥ सत्त्वाचा सुभटू असंग एकटू। वैराग्य उद्भटू एकनिष्ठ॥ १८॥ प्रारब्धाचा भोगी नेणों देहस्मृति। अखंड ते धृति निर्विकार॥ १९॥ निर्वासना मन निजलाभें संपूर्ण। नेणों स्वरूपज्ञान विकल्पाचे॥ २०॥ अनुरागें गोविंद ध्यायीजे एकांतीं। यापरती विश्रांति आणिक नाहीं॥ २१॥ कायावाचामनें हा माझा अनुभव। सांगितला सर्व आवडीचा॥ २२॥ नामा म्हणे हेंहि बोलविलें तेणें। उदार सर्वज्ञें पांडुरंगें॥ २३॥

९२७. भक्त भागवत बहुसाल ऐकिले। बहु

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होउनि गेले होती पुढें ॥ १ ॥ परी नामयाचें बोलणें नव्हे हें कवित्व। हा रस अद्भुत निरोपमु ॥ २ ॥ हे सुखविश्रांति नाही हो कल्पांतीं। विचारावें संतीं दूर दृष्टि ॥ ३ ॥ हो तूं शास्त्रवक्ते व्युत्पत्तीचे माथे। हो तूं बहुश्रोते बुद्धिवंत ॥ ४ ॥ हो तूं कर्मनिष्ठ विधीचे उद्भट। हो तूं सर्वश्रेष्ठ पूज्य लोकां ॥ ५ ॥ हो तूं कलावंत कवित्व कुशळ। हो तूं कां वाचाळ-चतुरतेचे। हो तूं कां पाठक हो तूं कां साधक। हो तूं कां वाचक ग्रंथकार ॥ ७ ॥ हो तूं आत्मज्ञानी हो तूं निजध्यानी। हो तूं वज्रासनीबैसकेचे ॥ ८ ॥ हो तूं योगयुक्त हो तूं जीवन्मुक्त। हो तूं कां विरक्त सर्वसंगी ॥ ९ ॥ ऐसे हो तूं कां सभाग्य संपन्न सर्वज्ञ। परी मी न मनी तुजवीण विष्णुदासा ॥ १० ॥ हे खूण जाणता एक पंढरिरावो। रुक्मादेवी नाहो श्रीविठ्ठलु ॥ ११ ॥

९२८. पश्चिम प्रभास आदिकरोनि द्वारका। पाहिल्या सकळिका मोक्षपुऱ्या ॥ १ ॥ पंथीं पावन तीर्थें करोनि सकळिकें। प्रक्षाळलीं पातकें वासनेचीं ॥ २ ॥ परी पंढरीचें प्रेम नामयाचे जीवीं। माउली आठवी पांडुरंग ॥ ३ ॥ जीवन्मुक्त दोन्ही भक्त आणि ज्ञानी। परतोनि तेथोनि येती मार्गी ॥ ४ ॥ तृषाक्रांत वनीं होतसे पीडणी। पडले चिंतवनी जीवनालागी ॥ ५ ॥ तंव दृष्टि एक कूप देखिला अवचिता। उदक तेथें पाहातां न लगे अंतु ॥ ६ ॥ कवणेपरी येथें करूं रिघवणी। प्राण संतर्पणीं वांचवावे ॥ ७ ॥ मग त्या नाम्याप्रती बोले ज्ञानदेवो। मज एक उपावो साध्य असे ॥ ८ ॥ लघिमेचे लाघव करूनि ते अवसरी। उतरोनी भीतरीं घेतलें उदक ॥ ९ ॥ घेऊनि उदक निघाला बाहेरी। मग म्हणे अवधारी नामदेवा ॥ १० ॥ आणोनि उदक देईन तुझ्या हातीं। न दिसे अनुगति आणिक कांही ॥ ११ ॥ पडिल्या संकटीं विचारावें मनीं। सोडोनी आयनी अभिमानाची ॥ १२ ॥ आत्मा तो विठ्ठल सर्व निरंतरीं। निरोप दे झडकरी उशीर झाला ॥ १३ ॥ आत्मा तो विठ्ठलु असतां सर्वदेहीं। माझी काय नाहीं चिंता त्यासी ॥ १४ ॥ नामा म्हणे धीर करावा नावेक। दावीन कवतुक स्वामीजवळी ॥ १५ ॥

९२९. मग लावूनियां नेत्र निर्धारु पैं केला। हृदयीं आठविला केशीराज ॥ १ ॥ तूं इष्टमित्रबंधु सोयरा जननी जनकु। नेणें मी आणिकु तुजवांचोनी ॥ २ ॥ येईं पंढरीराया मजलागीं धांवतु। झणी पहासी अंतु कृपाळुवा ॥ ३ ॥ तुझिये भेटीची बहु खंती वाटली। आसुवें दाटलीं नेत्रकमळीं ॥ ४ ॥ धीर न धरवे जीवा पोकारितो धांवा। ये माझ्या केशवा मायबापा ॥ ५ ॥ कायावाचामनें विनटलों चरणासी। तो मी शरण आणिकांसी जाऊं कोणा ॥ ६ ॥ जन्मोनी पोसणा तुझाची म्हणती। मोकलितां अंती लाज कोणा ॥ ७ ॥ अनाथा कैवारी नामाची आयणी। वर्णिजे पुराणीं कीर्ति तुझी ॥ ८ ॥ तें काय लटिकी वाणी करिशील आजी। अझुनी तुजमाजी करुणा नये ॥ ९ ॥ गजेंद्राकारणें ज्या वेगीं धांवणें। केलें तंव स्मरणें कळवळोनी ॥ १० ॥ द्रौपदीचे आकांतीं येसी सोडविणें। तें मजकारणें विसरलासी ॥ ११ ॥ येतां निरविलें ज्ञानदेवा प्रती। दिधला त्याचे हातीं हात माझा ॥ १२ ॥ तो तूं कैसा मजलागीं करिशील उदास। धांव कासावीस थोर झालों ॥ १३ ॥ सर्वभावें तूं मजलागीं लोभापर। मी तुझा डिंगर आवडता ॥ १४ ॥ नामा म्हणे हांसें आलें पिसुणाचें। न करीं मज दीनाचें अव्हेरण ॥ १५ ॥

९३०. तंव निजभुवनीं भूवैकुंठी सुखें पंढरीनाथ। नित्य जीवीं आर्त निजभक्ताचे ॥ १ ॥ कृपेचा वोरसु होता देवा पोटीं। तेची करी गोष्टी रुक्माईसी ॥ २ ॥ क्षेम माझा नामा यावा एक वेळां। मग मी जीवावेगळा जाऊं नेदी ॥ ३ ॥ आजि माझा डावा कां लवतो लोचन। करितसे स्फुरण वामबाहू ॥ ४ ॥ उद्वेग उपसर्ग वाटती जीवांशी। कवणा जीवलगाशीं कष्ट होती ॥ ५ ॥ वाजतां पैं वारा न लागावा राजसा। माझ्या विष्णुदासा भाविकासी ॥ ६ ॥ वाटे तानभूक झाली त्या पीडणी। तरीच माझ्या मनीं ऐशी दशा ॥ ७ ॥ तंव ती विश्वमाता विचारी नावेक।

 Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अवचिता शोक पडिला कानीं ॥ ८ ॥ म्हणे तृषाक्रांत नामा करीतसे धांवा। वेगीं जाऊनि देवा सांभाळावें ॥ ९ ॥ तंव तो आर्तबंधु ऐकोनी वचन। मनाचेनी मनें वेगू केला ॥ १० ॥ तंव गडगडीत कूप उदकें वोसंडला। कल्पांतीं खवळला सिंधु जैसा ॥ ११ ॥ ज्ञानदेव म्हणे झालें अभिनव। कैसा ऋणीया देव केला येणें ॥ १२ ॥ सावध करोनियां दिलें आलिंगन। जीवें निंबलोण उतरिलें ॥ १३ ॥ तों येरें चरणावरी ठेवियेला माथा। म्हणे माझी आहे चिंता विठोबासी ॥ १४ ॥ नामा म्हणे माझें बहु लळे पुरविले। कैं देखेन पाउलें विटेवरी ॥ १५ ॥

९३१. योगी परम ध्यानीं बैसलिया जाणा। कांहीं या रे मना विश्रांतिनुपजे ॥ १ ॥ तुजवीण दुसरें कांहींच नाठवे। लागली तुझी सवे विष्णुदासा ॥ २ ॥ कवण कुळीं तूं जन्मलासी नामा। केशव परमात्मा तुज जवळी ॥ ३ ॥ धेनु वसे वनीं वत्स असे घरीं। चित्त तयावरी ठेवुनी चरे ॥ ४ ॥ ते तया देखोनी संतोषली मनीं। तैसा तुझ्या गुणी वोल्हावलों ॥ ५ ॥ तीर्थयात्रें जाणें नलगे कांहीं करणें। ऐकोनी तुझें गाणें सुखरूप ॥ ६ ॥ वेडावल्या श्रुतिस्मृति आणि पूराणें। योगियांची ध्यानें विसर्जिलीं ॥ ७ ॥ तुझें प्रेम सांडावें आणि मनें कोठें जावें। जावोनियां पाहावें काय कोठें ॥ ८ ॥ समाधि सोहळा लय लक्ष वैराग्य। आम्हांलागीं भाग्य आणियेलें ॥ ९ ॥ ऋषि गणगंधर्व ब्रह्मादिक सर्व। लक्षिताती ठावो अरूपाचा ॥ १० ॥ तो तुवां आम्हां सन्मुख उभा केला। चरणासी लागला ज्ञानदेव ॥ ११ ॥

९३२. तीर्थें करोनीं नामा पंढरीये आला। जिवलगा भेटला विठोबासी ॥ १ ॥ सद्गदीत कंठ वोसंडला नयनीं। घासली लोळणी चरणांवरी ॥ २ ॥ शिणलों पंढरीराया पाहें कृपादृष्टी। थोर झालों हिंपुटीं तुजवीण ॥ ३ ॥ अज्ञानाचा भाग होता माझे मनीं। हिंडविलें म्हणोनि देशोदेशीं ॥ ४ ॥ परि पंढरीचें सुख पाहतां कोटि वाटे। स्वप्नीहीं परि कोठें न देखेंची ॥ ५ ॥ उदंड तीर्थांची ऐकों जाय प्रौढी। परि चित्त माझें वोढी चंद्रभागा ॥ ६ ॥ म्हणोनी चरणांची टाकोनी साउली। आलों मज सांभाळीं मायबापा ॥ ७ ॥ तया देवाची वास न पाहती माझे नयन। न करिती पूजन कर त्यांचे ॥ ८ ॥ तेणें पंथें माझें न चलती चरण। नायकती श्रवण कीर्ति त्यांची ॥ ९ ॥ कटीतटीं जेणें कर नाहीं ठेविले। न देखें पाउलें विटेवरी ॥ १० ॥ त्यातें म्हणतां देव लाजे माझें मन। ते कष्ट दारुण कवणा सांगूं ॥ ११ ॥ जये गांवीं नाहीं वैष्णवांचा मेळु। न देखे सुकाळु हरिकथेचा ॥ १२ ॥ कुंचे गरुडटके न देखो पताका। त्या देवाची शंका वाटे थोर ॥ १३ ॥ हें जेथें न देखें तेथें खंती वाटे जीवीं। ते वेळीं आठवी रूप तुझें ॥ १४ ॥ इष्टमित्रबंधु तूं कुळदेवता। नामा म्हणे आवडता प्राण माझा ॥ १५ ॥

९३३. केशव म्हणे नाम्या खंती वाटे माझ्या मनीं। निद्रा नलगे नयनीं पाहतां वाट ॥ १ ॥ तुजवीण उदास वाटे ही पंढरी। न पडे क्षणभरी विसरु तुझा ॥ २ ॥ डोळिया वेगळा नवजे कोठें दुरी। चित्त मजवरी ठेवूनि राहें ॥ ३ ॥ तुज माझी सवे मज तुझी आवडी। गुळासी न सोडी गोडी जैसी ॥ ४ ॥ तैसें तुम्ही आम्ही एकमेकांमाजी। विचारितां सहजी दुजें नाहीं ॥ ५ ॥ येतया जातया पुसे तुझी गोष्टी। म्हणे माझें नामें दृष्टि पडिलें होतें ॥ ६ ॥ वाटे तहानभूक पीडिल्या जाणें कोण। एका मजवीण गूज त्याचें ॥ ७ ॥ रात्रंदिवस खेद करूनि आपुल्या जीवा। असेल माझा धांवा पौकारीत ॥ ८ ॥ मजवीण कोणाचिये साउली बैसेल। कोण त्या पुसेल शीणभागु ॥ ९ ॥ संतांपासीं सांगे शिणलें मजवीण। कंठीं धरिला प्राण मजलागीं ॥ १० ॥ धरुनी हनुवटी दिधलें आलिंगन। कुरवाळोनी वदन नेत्र पुशी ॥ ११ ॥ मग काढोनी कंठींची सुमनतुळशीमाळा। घातलिसे गळां नामयाच्या ॥ १२ ॥ सर्वांगसुंदर पाहे कृपादृष्टी। पुसे जीवींची गोष्टी कृपासिंधू ॥ १३ ॥ निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान खेचर। नरहरि सोनार आदिकरोनी ॥ १४ ॥ समस्त भक्त मिळोनी लोटांगणी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येती। आलिंगन देती नामयासी॥ १५॥ अनिवार सुमनें वर्षती सुरवर। गगनीं जयजयकार शब्द होती॥ १६॥ ऋषिगण गंधर्व मिळोनी सकळिक। येती दृष्टिसुख घ्यावयासी॥ १७॥ रुक्माई आरती घेऊनी आली वेगें। ओंवाळिलें दोघे देवभक्त॥ १८॥ कवतुकें नाम्याची धरिली हनुवटी। पाहे कृपादृष्टी घडीये घडीये॥ १९॥

९३४. केशव म्हणे नाम्या धन्य तुज फावलें। बरवें तुवां केलें आत्महित॥ १॥ पुण्यपावन तीर्थें पाहिलीं सकळिक। प्रक्षाळिलीं पातकें वासनेचीं॥ २॥ धन्य तुवां केलें जन्मोनि सार्थक। शोक मोह दुःख निवारिलें॥ ३॥ तीर्थयात्रा सफळ व्हावया संपूर्ण। करीं का उद्यापन विधियुक्त॥ ४॥ केलिया कष्टाचें होईल सार्थक। सांगेन तें ऐक वचन माझें॥ ५॥ महा मुक्तिक्षेत्र वैकुंठ महीवरी। विख्यात पंढरी भूवैकुंठ॥ ६॥ एक शीत अन्न अर्पे द्विजमुखीं। राहे सदा सुखी कल्पवरी॥ ७॥ क्षेत्रवासी भावें पुजावे ब्राह्मण। षड्रस भोजन द्यावें त्यांसी॥ ८॥ सुगंध चंदन सुमन तुळसीमाळा। समर्पी तांबुला सदक्षणा॥ ९॥ ऐसें बोलोनियां देवें नामा धरियेला करीं। राउळा भीतरीं घेउनी गेलें॥ १०॥ मग रुक्माईसी सांगे वैकुंठींचा राणा। आजी आराधना नामयाची॥ ११॥

९३५. तंव ते जगन्माता म्हणे जी कृपावंता। कर्ता करविता कोण याचा॥ १॥ हा तुमचा दास आहे अंतरंग। काय या उद्वेग करणें असे॥ २॥ सर्व भार याचा लागे चालवणें। ऋणवई केलें येणें जन्मोजन्मीं॥ ३॥ तुम्हांपरते यासी जीवलग सोयरे। कोण आहेत दुसरे लोभपर॥ ४॥ दृढ चरण धरोनी राहिला अंतरीं। जालासे अधिकारी सर्वस्वाचा॥ ५॥ जन्मोनियां येणें जोडिलें जें कांहीं। तितुकें तुमच्या पायीं निक्षेपिलें॥ ६॥ म्हणोनी याचें कोड करावें परिपूर्ण। व्हावें पैं उत्तीर्ण ऋणीयाचे॥ ७॥ मायबापें याचीं सखी जीवलग। सांडोनी तुमचा संग धरिला सुखें॥ ८॥ म्हणोनी याचें हित लागें विचारावें। उचित करावें देवराया॥ ९॥ आपुल्या दासाचा संभ्रम सोहोळा। करणें हें गोपाळा ब्रीद तुमचें॥ १०॥ रुक्माई म्हणे हा भाग्यवंत नामा। न कळे याचा प्रेमा नित्य नवा॥ ११॥

९३६. आतां जावें वेगीं नामया घेउनी। सांगावीं आंवतणी ब्राह्मणांसी॥ १॥ सकळकामपूर्ण असती तुमच्यापायीं। विचारावें कांही नलगे देवा॥ २॥ काय काय न लभे तुमचे कृपादृष्टी। सदा सुखवृष्टि हरीच्या दासां॥ ३॥ नामयाचा हात धरोनी पंढरीनाथ। निघाले अक्षत द्यावयासी॥ ४॥ निवृत्ति ज्ञानेश्वर जनमित्र सोपान। सांवता जाल्हण घेउनी सरिसे॥ ५॥ चोखामेळा बंका काठीकर पुढें। दोहीं बाहीं देव्हडे सनकादिक॥ ६॥ नामयाचे पाठीं चाले केशीराज। लागावया रज चरणींचें॥ ७॥ आपुल्या दासाचा सिद्धि न्यावा पणु। म्हणोनी यजुमानु झाला देव॥ ८॥ तेणें मिसे करीतसे क्षेत्रप्रदक्षिणा। प्रार्थित ब्राह्मणां परम प्रीति॥ ९॥ ऐसा अनाथाचा नाथ दीनाचा गोसावी। आवडी नित्य नवी सेवकाची॥ १०॥ तो या नामयाचा सुखाचा श्रृंगारू। रुक्मादेविवरु श्रीविठ्ठलु॥ ११॥

९३७. तंव आध्यात्मिक पंडित अग्निहोत्री। एक म्हणविती श्रोत्री सदाचार॥ १॥ आम्हांसी तें नाहीं तुमचें स्वरूपज्ञान। अपूर्व दर्शन देखिलें आजी॥ २॥ सुखाचें पारणें करविलें या रूपें। तेणें त्रिविधताप निवारलें॥ ३॥ कवण वृत्ति काय चालाविजे व्यापार। योजिलें बिढार कवणे ठायीं॥ ४॥ आजीचें निमित्त काय उपस्थित। ऐकोनी पंढरीनाथ बोलते झाले॥ ५॥ माझी कुळवृत्ति हरिदासां ठाउकी। मज यासी ओळखी निकट असे॥ ६॥ मज असंगा संगु सर्वकाळीं याचा। अनंत जन्माचा ऋणानुबंध॥ ७॥ साक्ष तुमचे चरणा करुनी बोले वाचा। मी मैत्र नामयाचा अंतरंगु॥ ८॥ करोनियां स्नानविधी यावें शीघ्रवत। करावें सनाथ कृपादृष्टि॥ ९॥ बिढार तरी असे राउळा भीतरीं। नांव सांगों तरी अनंत जाणा॥ १०॥ जीवींचें गुजगौप्य संतांसीं

 Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पुसावें। निःसंदेह यावें भोजनासी ॥ ११ ॥ ऐसी ते अमृतवाणी ऐकोनी श्रवणीं ।आनंदले मनीं भूदेव ते॥ १२ ॥आज्ञा देती देवा जावें निजमंदिरा।शीघ्रवत करा पाकसिद्धी ॥ १३ ॥ मग रुक्माईसी सांगे सकळ विवंचना। प्रार्थिले ब्राह्मणां सकळिकांसी ॥ १४ ॥ कर्मठ अभिमानी नोळखती मज। देखोनियां चोज वाटे त्यांसी ॥ १५ ॥ कुळवृत्ति नाम पुशिलें मज तिहीं। सांगितलें म्याहीं सर्व त्यांसी ॥ १६ ॥ सांगाती संतांचा मी मैत्र नामयाचा। अनंत जन्मांचा निकट म्हणोनी ॥ १७ ॥ बिढार तरी असे राउळाभीतरीं। सांगे खूण परी न कळे त्यांसी ॥ १८ ॥ नाम तरी अनंत दाविला संकेत। परी नेघे त्यांचें चित्त आठवण ॥ १९ ॥ तंव ते विश्वमाता म्हणे जी कृपानिधी। सदा भेदबुद्धि त्यांचे ठायीं ॥ २० ॥ विद्या वयसा जाति कुळाचा अभिमान। त्या कैंचे चरण प्राप्त तुमचे ॥ २१ ॥ उदार चक्रवर्ती भक्तांचा विसांवा। त्याच्या निजभावा वेळाईतु ॥ २२ ॥ तो भाग्यें जोडला वैकुंठींचा ठेवा। उजरी झाली दैवा नामयाच्या ॥ २३ ॥

९३८. तंव अणिमादि सिद्धि उभ्या महाद्वारीं। तिहीं सर्व सामोग्री सिद्ध केली ॥ १ ॥ सडासंमार्जनें गुढीया तोरणें। श्रृंगारिलीं भुवनें परिचारिकें ॥ २ ॥ म्हणती काय पुण्य केलें येणें विष्णुदासें। देवा लोभ पिसें लावियेलें ॥ ३ ॥ द्वारीं दिपावळी चौक रंगमाळा। अभिनव सोहळा आरंभिला ॥ ४ ॥ हरुषें मंगळ तुरे वाजती विनोदें। भक्त जय जय शब्दें गर्जताती ॥ ५ ॥ मंगळमार्जन नामयातें करविलें। मग ते आरंभिलें पुण्याहवाचन ॥ ६ ॥ देवें अंगवस्त्रें आपुलेनीहातें। वाहिलीं अनंतें विष्णुदासां ॥ ७ ॥ सत्यभामा राही रुक्माई जननी। वेगी अक्षवाणी घेउनी येती ॥ ८ ॥ आनंदें नरनारी कवतुक पाहती। जीवें वोवाळीती नामयासी ॥ ९ ॥ आपुलिया दासाचा करी समारंभु। दीनानाथ प्रभु कृपासिंधू ॥ १० ॥ धन्य हा नामा म्हणती सकळ लोक। नेणती याचें सुख ब्रह्मादिक ॥ ११ ॥

९३९. मग झाला स्वयंपाक स्नानविधि सारा। सकळां हांकारा जाणविला ॥ १ ॥ आले महाद्वारीं दिधलीं असनें। पूजा नारायणें आरंभिली ॥ २ ॥ तंव ठकलों म्हणती देव पहावो कैसें जालें। सर्व सुख नेलें इहीं भक्तीं ॥ ३ ॥ रत्नजडित पाट सत्वरी आणिले। वरी द्विज बैसविले पृथक्कारें ॥ ४ ॥ प्रक्षाळोनी चरण पुसिले पीतांबरें। मस्तकीं आदरें तीर्थ वंदी ॥ ५ ॥ कस्तुरीचे टिळे दिव्य चंदन उटी। घातलिया कंठीं तुळशीमाळा ॥ ६ ॥ दशांग धूप रत्नाचा दीपक। ओवाळी नायक वैकुंठीचा ॥ ७ ॥ दोही बाही पंक्ती मांडिल्या देव्हडी। राही रुक्माई परवडी वाढितसे ॥ ८ ॥ चतुर्विधअन्नें आथिलीं बहुगुणें। षड्रस पक्वान्नें सर्वांठायीं ॥ ९ ॥ मग संकल्प सोडिला नामयाचे करें। भक्त जयजयकारें गर्जिन्नले ॥ १० ॥ भोक्ता नारायण लक्ष्मीचा पती। म्हणोनी प्राणाहुती घेतल्या वेगीं ॥ ११ ॥ भर्ता भोक्ता कर्ता करविता आपण। सहज तेथें पूर्ण सकळ काम ॥ १२ ॥ विश्वंभर कृपादृष्टि न्याहाळीत। प्रार्थना करीत ब्राह्मणांची ॥ १३ ॥ देखोनी ते समृद्धि हरिखले द्विज। झालें नवल चोज पहा कैसें ॥ १४ ॥ कोण हा गृहस्थु केव्हडा भाग्यवंतु। नेणवे अद्भुत महिमा याचा ॥ १५ ॥ ऐसे जेविले आनंदें धालें परमानंदें। मुखशुद्धि गोविंदें दिधली करीं ॥ १६ ॥ कर्पूरेंसहित समर्पिले विडे। कर जोडोनी पुढें विनवीतसे ॥ १७ ॥ ऐसा भक्तजन कृपाळु दीनाचा दयाळु। आनंदें गोपाळु उभा असे ॥ १८ ॥ तया नामदेवें भुलविलें लोभें। वेडावलें उभे चिदानंद ॥ १९ ॥

९४०. सकळिकां नमस्कार करुनी यादवरावो। सांगें जीवींचा भावो तयांप्रती ॥ १ ॥ तुमचे कृपादृष्टि करावें भोजन। येणें होईल संपूर्ण व्रतसिद्धी ॥ २ ॥ हेचि आवडी आहे बहु माझ्या जीवीं। ते आजी गोसावी पूर्ण कीजे ॥ ३ ॥ क्षण एक बैसावें स्वस्थ अंतःकरणें। संकल्पिलें नारायणें तुळसीदळ ॥ ४ ॥ संतुष्ट मानसें यातें अंगीकारा। मग निजमंदिरा जावें स्वामी ॥ ५ ॥ आजि तुमचा लाभु जाला भाग्ययोगें।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामयाच्या प्रसंगें घडली सेवा ॥ ६ ॥ तुम्ही ब्रह्मबीज ब्रह्मादिकां पूज्य। सांभाळिलें मज कृपादृष्टी ॥ ७ ॥ मज निरालंबासी करोनी अबलंबून। निष्कामासी पूर्ण केलें काम ॥ ८ ॥ अकर्ता असंगु तुमचेनी कृतार्थ। जालों पैं यथार्थ वचन माझें ॥ ९ ॥ मग ते चतुर्वेदी महामंत्रेश्वर। द्विज जयजयकार करिताती ॥ १० ॥ विजय सर्वकाल व्हावें पुढत पुढती। आशिर्वाद देती मंत्राक्षता ॥ ११ ॥ पितांबराचे अचळी घेउनी मंत्राक्षता। घालीतसे माथा नामयाच्या ॥ १२ ॥ हेंचि तुझें प्रेम राहों हे चिरंतन। मुखीं नाम ध्यान हृदयीं सदा ॥ १३ ॥ तंव म्हणती धरामर तुम्ही श्रमलेती थोर। लागला उशीर भोजनासी ॥ १४ ॥ सर्वांठांई तुम्ही सर्वच होउनीएक। कारण सार्थक केलें निकें ॥ १५ ॥ स्वामीचा आदर सांगतां अभिनव। नम्रता गौरव निरुपम ॥ १६ ॥ अकल्प आयुष्य चिरंजीव व्हावें। आम्हां सांभाळावें पुढतापुढती ॥ १७ ॥ आतां संतांचिया पंक्ती सारावें भोजन। करावें परिपूर्ण जीवींचें कोड ॥ १८ ॥ उच्छिष्ट प्रसाद द्यावा नामयातें। आस करूनि पाहात वाट तुमची ॥ १९ ॥

९४१. सुवर्णाचें ताट पक्वान्नें वोगरूनी परीकर। रुक्माईनें सत्वर आणियेलें ॥ १ ॥ कनक कळस घेउनी सत्यभामा आली। आपोशन घाली देवराया ॥ २ ॥ सुखाचा सुरतरू भक्त चिंतामणी। पुरवितो आयणी निजभक्ताची ॥ ३ ॥ तेथें उद्धव अक्रुर नारद तुंबर। आणिक अपार भक्त येती ॥ ४ ॥ महाद्वारीं होता उभा नामा ठेला। तो जवळी बोलाविला केशिराजें ॥ ५ ॥ देवाचा वोरसु देखोनी गौरव। देहीं देहभाव विसरला ॥ ६ ॥ निजबोध निवृत्ति राहिली निवांत। हृदयीं वोसंडीत प्रेमरसें ॥ ७ ॥ देखोनी पंढरीनाथ धाविन्नला वेगीं। जैसी वत्सालागीं तान्हे धेनू ॥ ८ ॥ उचलोनि चहूं भुजीं दिलें आलिंगन। आणिलें उमजून देहावरी ॥ ९ ॥ धरोनी बाहुवटीं वैसविला ताटीं। स्फुंदतां हिंपुटी होत असे ॥ १० ॥ कुर्वाळोनी माथा घास घाली मुखीं। तंव तो परलक्षी तन्मय होतु ॥ ११ ॥ अंतरीचे गुज बोले कृपा सिंधु। करूनि सावधु नामयासी ॥ १२ ॥ म्हणे जिवलगा बोलें सुख गोष्टी। आर्त आहे पोटी बहु दिवसांचे ॥ १३ ॥ अंतरींचे सुख बाहेरीं तूं पाहे। गगना काय आहे पाठी पोट ॥ १४ ॥ तैसा तूं आनंदु आहे पैं निर्मळ। चिद्रूप केवळ सदोदित ॥ १५ ॥ तुझे तेंचि माझें माझें तेंचि तुझें। आहे सहजी सहजे एकविध ॥ १६ ॥ परतोनियां दृष्टि घाली मजवरी। मी तंव गा निरंतरीं तूंचि होसी ॥ १७ ॥ हा तुझा सोहळा पाहें उघडा डोळां। मी आहें तुज जवळां ज्ञानदीपू ॥ १८ ॥ आर्त तुझिये भेटी आले भक्तराणे। सुखाचें पारणें करवी त्यांसी ॥ १९ ॥ परमानंद मूर्ति धन्य हा निवृत्ति। सुखाचा सांगाती ज्ञानदेव ॥ २० ॥ पवित्र हा सोपान परलोकींचें तारूं। करी याचा आदरू भाग्यवंता ॥ २१ ॥ म्हणोनि पंढरीनाथें आश्वासिलें करें। मिठी दिली येरें चरणकमळीं ॥ २२ ॥ नामा म्हणे तुझे कृपेचा ओलावा। विश्रांति या जीवा झाली असे ॥ २३ ॥

९४२. नामयाचे मुखीं घालुनी कवळु। पुसतसे गोपाळु शिणभागु ॥ १ ॥ जें करकमळ सनकादिकां शिरीं। नामा तिहीं करीं कुरवाळिला ॥ २ ॥ सांडी सर्व खंती जीवींची काजळी। विश्रांति मजजवळी आहे तुज ॥ ३ ॥ वियोगाचेनि शोकें शिणलासी मार्गीं। देह मजलागीं वाळविला ॥ ४ ॥ कोमाईलें वदन निडारला नयनीं। नेणें तुझी कोणी तानभूक ॥ ५ ॥ गेलासी जवळुनी ज्या दिवसापासोनी। न दिसे माझें कोणी आवडतें ॥ ६ ॥ धीर न धरवे जीवा पाहें दाही दिशा। माझा विष्णुदास येईल केव्हां ॥ ७ ॥ तुज पाहे गरुडपारीं पाहे महाद्वारीं। पाहे भीमातीरीं चंद्रभागे ॥ ८ ॥ पाहे पद्मतीर्थीं पाहे वेणुनादीं। नलगे तुझी शुद्धी खंत वाटे ॥ ९ ॥ अनुदिनीं भोजन करिता उदकपान। तेव्हां आठवण होय तुझी ॥ १० ॥ मी म्हणे धांवत येसी न धरत। प्रसादाचें आर्त बहु तुज ॥ ११ ॥ धांवोनियां येसी आलिंगन देसी। पुसेन सांगसी सुख गोष्टी ॥ १२ ॥ तेणें हर्षें निघती डोळियासी दोंदे। हृदय माझें कोंदे करुणारसे ॥ १३ ॥ आवडतें आळुकें जननीयेचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बाळ। जाणे ते कृपाळ भूक त्याची॥ १४॥ तैसा पंढरीनाथ मोहें वोसरला। नाम्यातें पाजिला प्रेमपान्हा॥ १५॥

९४३. ऐसी ते जेवणी ब्रह्मरसाची धणी। पुरविली आयणी निजभक्तांची॥ १॥ नाम्याचें उच्छिष्ट स्वीकारिलें देवें। कवतुक अवघें पाहती द्विज॥ २॥ म्हणती आम्हां येणें कैसी केली माव। बुडविलें सर्व क्रियाकर्म॥ ३॥ नेणवे हा कोण दिसे सुलक्षण। नव्हे क्षत्रिय ब्राह्मण वैश्य शूद्र॥ ४॥ चहूंवर्णां वेगळी दिसे याची लीला। विस्मृति सकळां पडली कैसी॥ ५॥ निर्धारें नाम्याचा होय मायबापु। सोडविलें संकल्पू त्याच्या हातीं॥ ६॥ कायावाचामनें लोभ याचेवरी। घातलिया शिरीं मंत्राक्षता॥ ७॥ एक म्हणती झाले होते तें निर्माण। आतां आपुलें आपण गौप्य करा॥ ८॥ लौकिकीं ही मात प्रकट करा झणी। न बोलावी कोणी कोणापाशी॥ ९॥ एक म्हणती आतां यासीच बाळावें। आपुलें टाळावें लोकनिंद्य॥ १०॥ अज्ञानासी दोष नाहीं प्रत्यवाय। शास्त्रीं हा उपाय सिद्ध असे॥ ११॥ आत्मशुद्धिलागीं करा विचारणा। करा मंत्रस्नाना त्रिपदा जप॥ १२॥ म्हणोनि सत्वर चालिले अवघे। प्रार्थुनियां देवें बोलाविलें॥ १३॥ संकोचित मनें दिसती कवण्या गुणें। कोमाईलीं वदनें सकळिकांची॥ १४॥ काय शंका वाटे तुमच्या मनीं स्वामी। ते कृपा करूनि सांगा मज॥ १५॥ मनाचे मवाळ तुम्हीं ब्रह्मबीज। गौप्य नये गुज करूं कांही॥ १६॥ मी तुम्हां सकळांचें असें कृपापात्र। सांगा जीवींचें आर्त करीन पूर्ण॥ १७॥ मग संपूर्ण दक्षणासहित तुळशीदळ। वरी त्या पुण्यजळ प्रोक्षूनियां॥ १८॥ चरणावरी नामा घालोनि निरवी। म्हणे कृपा असों द्यावी याजवरी॥ १९॥

९४४. जातीचे हे शिंपी विश्व जाणे यातें। आणि प्रत्यक्ष सांगाते जेवविलें॥ १॥ उच्छिष्ट निजमुखीं स्वीकारिलें याचें। उरलें तें तुम्हां कैचें क्रियाकर्म॥ २॥ न कळे हा निर्धार भ्रांति वाटे आम्हां। काय तुमचा नामा अंगभूत॥ ३॥ नवल हें आवडी लौकिका वेगळी। बुडविले सकळीं समूळ धर्म॥ ४॥ कोणा लोभे तुम्हां लावियेला चाळा। कृपेचा कळवळा निरोपमु॥ ५॥ विचारितां तुम्हीं आम्हां वेषधारी। लीला वोडंबरी दिसे तुमची॥ ६॥ वर्णाश्रमधर्म न दिसे तुमच्या ठायीं। निर्धारूचि कांहीं न कळे आम्हां॥ ७॥ वंद्य निंद्य तुम्हां न दिसेची कोणी। दृष्टी दुजेपणा न पडे तुमची॥ ८॥ विश्व आपरूप दिसे तुम्हां सर्व। नेणवे हे भाव ब्रह्मादिका॥ ९॥ आम्ही विश्वासलों बरवेषा तुमच्या। परी भाव अंतरीचा न कळे कांही॥ १०॥ आपुलें स्वहित देखोनि आपण। पाप अथवा पुण्य विचारावें॥ ११॥ सर्वभावें करूनि विधीतें पाळावें। नित्य सांभाळावें वेदवचन॥ १२॥ वर्णाश्रमपरत्वें बोलिले जे धर्म। तें तें विहितकर्म आचरावें॥ १३॥ स्वामीचें वचन स्वामींनीं पाळावें। यश मिरवावें उभयलोकीं॥ १४॥ तरी हा तुमचा जीवलग नामा। निर्धारें हें आम्हां कळों आलें॥ १५॥

९४५. नामयातें आम्हीं जेवविलें सांगाते। हा दोष आम्हांतें ठेवा झणी॥ १॥ सर्वत्र चाळक एकचि चैतन्य। वंद्य निंद्य कोण म्हणे स्वामी॥ २॥ पुण्यपाप बाधा आम्हां नाहीं कदा। असो शुद्धबुद्धा निरंतर॥ ३॥ देह म्हणाल जरी वोडंबर पाचांचें। अंबरीं अभासाचें अभ्र जेवीं॥ ४॥ नामा ऐसें नाम कवणिया अवयवां। सांगा तुम्ही देवा साच करोनी॥ ५॥ तेजी कीं जीवनीं गगनीं कीं पवनीं। कीं दोष धरणीमाजी होता॥ ६॥ तो तुम्हांसी गोचरू झाला कवणे युक्ती। हे खूण निरूती सांगा मज॥ ७॥ तुम्हीं वेदवक्ते सर्वशास्त्र द्रष्टे। परी नाहीं आत्मनिष्ठे पावलेती॥ ८॥ भेद भ्रम तुमचा नाहीं मावळला। भ्रमुची उरला संदेहेसी॥ ९॥ जे वेळीं संकल्प सोडिला पैं येणें। तुम्हीं आपोशनें घेतलीं कैसीं॥ १०॥ तें वेळीं नाहीं केली ही विचारणा। अधिकार अन्ना आहे कीं नाहीं॥ ११॥ याचिलागीं तुम्हां प्रार्थूनि खूण सांगे। नामयाच्या प्रसंगें घडली सेवा॥ १२॥ आशिर्वाद तुम्ही दिल्या मंत्राक्षता। त्या त्याचे माथा टाकियेल्या॥ १३॥ मज निरालंबासी तुम्हीं करोनि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अवलंबन। निष्कामासी पूर्ण केलें काम॥ १४॥ हें माझें बोलणें तुम्हीं ऐकोनि सकळिकीं। परी अझुनी ओळखी न धरा माझी॥ १५॥ निःसंदेह भोजन केलें आधि तुम्हीं। उरले शेष आम्हीं स्वीकारिलें॥ १६॥ यासी विधियुक्त कोण प्रायश्चित्त। सांगा कोण ग्रंथ साच करुनी॥ १७॥ या हरिदासाचे रज आणि तुमचें चरणतीर्थ। तेणेंचि पवित्र तनु माझी॥ १८॥ येरु तुमचा भावो तोचि फळला तुम्हां। नामा तरी आम्हां निष्कलंकु॥ १९॥

९४६. मग केशव म्हणे माझें परिसा वचन। गुज मी सांगेन अंतरीचें॥ १॥ व्रत तप दान सकळ कर्मक्रिया। एक भूतदया असे जेथे॥ २॥ तोचि सत्य मानी भक्त आणि ज्ञानी। न विसंबें निर्वाणीं जीवें त्यासी॥ ३॥ ज्ञानाचें सौभाग्य भक्ति आणि वैराग्य। तयाचें आरोग्य प्रेमरस॥ ४॥ त्यासी संजीवनु सदा संत संगू। त्यावरी अनुरागू वज्र कवच॥ ५॥ धर्म अर्थ काम मोक्षदृष्टि नाणी। वोळगती आंगणीं मुक्ति चारी॥ ६॥ अनुहात गजरू होतसे नामाचा। दीप अलक्षाचा पाजळीतु॥ ७॥ इंद्रपदादिकें नाशिवंत होतीं। म्हणोनी आसक्ती न धरावी त्यांची॥ ८॥ हें जाणोनी साच न धरावी त्यांची आस। अखंड माझा वास हृदयीं त्यांच्या॥ ९॥ कामक्रोध वैरी दुराविले दुरी। मज हृदयमंदिरीं सांठविले॥ १०॥ तेणें त्याच्या उच्छिष्टा झालोंसे अधिकारी। ब्रह्मरसा सरी नपवी जेथें॥ ११॥ म्हणोनी ये संसारीं धन्य एक नामा। जेणें माझा प्रेमा अनुभविला॥ १२॥

९४७. महा मुक्ति क्षेत्र तीर्थांचे तारक। उपमेसी आणीक नाहीं दुजें॥ १॥ तें हें पंढरपूर प्रेमाचें भांडार। नामें निरंतर गर्जतसे॥ २॥ येवढें तीर्थ जवळी असतां पैं समर्थ। कोण भाग्यहत दैन्य भाकी॥ ३॥ जीवन्मुक्त ज्ञानी येथें पुंडलिक मुनि। बैसलासे ध्यानीं पर लक्षी॥ ४॥ योग्यांचे हृदयींचें निजध्यान नेटकें। तें जयाचें सुखें वेडावलें॥ ५॥ पुण्यपावन भीमा दक्षण वाहिनी। अमृत संजीवनी पुण्यराशी॥ ६॥ आनंद रस कूपीका प्रत्यक्ष चंद्रभागा। दर्शनें न या गा गर्भवासा॥ ७॥ स्वर्गी मंदाकिनी लाजोनी राहिली। पाताळीं प्रवेशली भोगावती॥ ८॥ सहस्त्रभाग भेणें होउनी भागीरथी। सागरा मिळती झाली वेगीं॥ ९॥ भक्तजन भाग्याची कीं सुख आरोग्याची। जें कां वैराग्याची जन्मभूमी॥ १०॥ तेथें हरिखे निर्भर नामा संतांचे संगतीं। गीतीं गाय कीर्ति विठोबाची॥ ११॥

९४८. सकाम निष्काम वाचें म्हणे राम। माझा परम प्राणसखा॥ १॥ जीवाहूनि आवडता न करी जीवापरता। पूजी परम देवता भावें त्यासी॥ २॥ हे माझी प्रसिद्धी जगीं ब्रीदावळी। हरिदासाचे कुळी वोळंगे सदा॥ ३॥ जन्मोनी ज्याचे कुळीं एक हरिदास। धन्य त्याचा वंश पुण्यशील॥ ४॥ काया वाचा मनें न विसंबे त्यासी। ते माझ्या दैवासी दैव झालें॥ ५॥ नामधारकाचें उच्छिष्ट जेथें पडे। उभा राहोनी पुढें झेली मुखें॥ ६॥ तें मज गोमटें सेवितां सुख वाटे। म्हणोनी धाटें मोठें शरीर माझें॥ ७॥ बहु कांति पुष्टि यश कीर्ति प्रभा। नित्य नवी शोभा होय तेणें॥ ८॥ ते संत सोयरे भेटती जे वेळीं। ते माझी दिवाळी दसरा सण॥ ९॥ म्हणोनी नामयातें जेवविलें सांगातें। बहु दिवस होतें आर्त पोटीं॥ १०॥ झालें तें सर्वथा नव्हे पैं अन्यथा। पुढती सांगा आतां काय करणें॥ ११॥

९४९. तंव म्हणती द्विज परियेसी गुणनिधी। प्रतिपादिले वेदीं जे जे धर्म॥ १॥ तें तें आचरावे विहित जे जे धर्म॥ १॥ तें तें आचरावे विहित क्रियाकर्म। जें जें वर्णाश्रमें आले जया॥ २॥ तेचि एक धन्य जगीं देहधारी। असतां संसारीं जीवन्मुक्त॥ ३॥ आचार प्रथम ब्राह्मणांचा धर्म। शौच नित्यनेम सत्यवाणी॥ ४॥ तप शम दम भूतदया पूर्ण। अखंड अनुसंधान स्वस्वरूपीं॥ ५॥ स्नानसंध्या जप होम अध्ययन विधि। देवतार्चन सिद्धि करुनी भावें॥ ६॥ वैश्वदेव आणि अतिथीपूजन। नववें ब्रह्मयज्ञ आवश्यक॥ ७॥ संपादुनि हे विधि सारावें भोजन। त्यावरी श्रवण पुराणांचें॥ ८॥ सर्व काळ व्हावें संतुष्ट मानस। असावा विश्वास वेदवचनीं॥ ९॥ तुम्हीं तंव सर्वज्ञ संपन्न चतुर। देखावा विचार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विशुद्धीचा ॥ १० ॥ सांडुनि अभिमान व्हावें शुद्धमती। जोडावी ते कीर्ति उभय लोकीं ॥ ११ ॥ जावें चंद्रभागें करावें मंत्र स्नान द्यावें हेमदान सत्त्वशुद्धी ॥ १२ ॥ पुण्यजना एकी क्षेत्रप्रदक्षणा। करूनियां जाणा पवित्र कुळ ॥ १३ ॥ ऐकोनि पंढरिरावो बोलते झाले वाचा। आज्ञा ते शिरसा स्वामीयांची ॥ १४ ॥ परी काया वाचा मनें मागेन तें द्यावें। माझ्या सांभाळावें नामयासी ॥ १५ ॥

९५०. तुम्ही सदाचार महंत ब्रह्मवादी। तुमची वागनदी ब्रह्मरूप ॥ १ ॥ सत्य वचन जळ पवित्र तें निर्मळ। कृतार्थ तेणें केवळ झालोंसे मी ॥ २ ॥ हा तुमचा विश्वास दृढ आहे मज। तुम्ही माझें पूज्य परम देव ॥ ३ ॥ स्नानाचा प्रकार आहे पंचविध। सांगेन विद्‌गद भाव त्याचा ॥ ४ ॥ अर्थी ठेवूनी दृष्टी विवेक ध्यावा पोटीं। प्रत्यया येईल गोष्टी अनुभवाची ॥ ५ ॥ उत्तमाहूनी उत्तम सत्य वाग्स्नान। यापरतें पावन आणिक नाहीं ॥ ६ ॥ काया वाचा मनें हें दृढ धरीजे। हेळाची तरीजे भवसागरू ॥ ७ ॥ बाहेजु भीतरीं शुद्ध सर्वकाळ। हें दुजें निर्मळ शुद्धस्नान ॥ ८ ॥ हें जया सदैवा घडे भाग्ययोगें। मग तया नलगे साधन कांही ॥ ९ ॥ सकळ इंद्रियांचा करोनि निग्रहो। दंडावा विग्रहो वासनेचा ॥ १० ॥ हें तिजें निर्मळ घडे जया स्नान। नलगे अनुष्ठान करणें त्यासी ॥ ११ ॥ सर्वांभूती करुणा हेंचि पैं चवथें स्नान। साधितो सज्जन विरळा कोण ॥ १२ ॥ त्याचेनी दर्शनें जळती पापराशी। तो सर्वां तीर्थांसी तीर्थरूप ॥ १३ ॥ पांचवे स्नान काया प्रक्षाळावी जळीं। करणें ते आंघोळी लौकिकार्थ ॥ १४ ॥ काम क्रोध लोभ दंभ मद मत्सर। हे दोष दुर्धर देहामाजी ॥ १५ ॥ विवेक वैराग्य धरावे मानसीं। रहावें संगतीसी संतांचिया ॥ १६ ॥ अनंत जन्माचें हेंचि प्रायश्चित। ज्याचे वाचे नित्य रामकृष्ण ॥ १७ ॥ शांति क्षमा दया निजबोध निवृत्ती। अखंड खेळती जयापाशीं ॥ १८ ॥ तो एक संसारी धन्य शिंपी नामा। आवडता आम्हा जोवाहीनी ॥ १९ ॥

९५१. प्रार्थुनी सकळिकां बोलें यादवरावो। फेडावा संदेहो वासनेचा ॥ १ ॥ स्नानविधीलागीं जावें चंद्राभागें। संताचेनि संगे आम्ही तुम्ही ॥ २ ॥ बाप भक्तप्रिया कैवारिया मुरारी। लीला वोडंबरी खेळ खेळु ॥ ३ ॥ नामयाचा हात धरोनि करकमळीं। चाले वनमाळी समारंभें ॥ ४ ॥ नरनारी कवतुक पाहती सकळिक। स्वर्गी ब्रह्मादिक ठकले ठेले ॥ ५ ॥ सकळ संतमेळासहित शारंगधरू। पाठीं दळभारू ब्राह्मणांचा ॥ ६ ॥ आले चंद्रभागे हरिनाम गर्जत। केला प्रणिपात पुंडलिकासी ॥ ७ ॥ प्रक्षाळोनी चरण केले प्राणायाम। बाप सकळ धर्म जनिता स्वयें ॥ ८ ॥ समस्त द्विजकुलां करोनी प्रदक्षिणा। आरंभिलें स्नानविधी देवें ॥ ९ ॥ चाचर कुरळ केश शिरीं रूळती पाठीवरी। पितांबरधारी शामतनू ॥ १० ॥ सुंदर कमळनयन मुख प्रभाराशी। तें ध्यान मानसीं सनकादिकां ॥ ११ ॥ गोमयमृत्तिका आणोनियां देखा। प्रक्षाळूनी उदका वेदमंत्रें ॥ १२ ॥ करूनी प्रयोग सारियेलें स्नान। केला परिधान सोनसळा ॥ १३ ॥ ब्राह्मणाचें तीर्थ मस्तकीं वंदिलें। अभिवंदन केलें हरीच्या दासां ॥ १४ ॥ सारोनियां संध्या नित्य नेम सर्व। पूजिले भूदेव दिधलीं दानें ॥ १५ ॥ म्हणे कृपादृष्टी मज केलें सनाथ। पुरविलें आर्त हृदयींचें ॥ १६ ॥ येथुनी संशयो न धरावा मानसीं। मानावें आम्हांसी आत्मरूप ॥ १७ ॥ चालिले सत्वर आले महाद्वारां। आज्ञा द्विजवरां दिधली देवें ॥ १८ ॥ तेथें हरिखें निर्भर नामा निजबोधें। नाचतो आनंदें गरुडपारीं ॥ १९ ॥

९५२. समस्त भक्तमंडळीसहित वनमाळी। प्रवेशले राउळीं परमानंदें ॥ १ ॥ राही रखुमाई सत्यभामा वेगीं। देवातें अष्टांगीं नमस्कारिती ॥ २ ॥ बाप सुखसिंधु स्वामी आर्तबंधु। प्रीति परमानंदु निजभक्तां ॥ ३ ॥ सत्यभामेनें केलें प्रक्षाळण चरणां। रुक्माई विंजना जाणविती ॥ ४ ॥ विडा देती राही उभी उजव्या बाही। दृष्टी ठेवूनि पायीं कवळीं मनें ॥ ५ ॥ शुक सनकादिक नारद तुंबर। करती जयजयकार नामघोषें ॥ ६ ॥ आले बंदीजन पडती ब्रीदावळी।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ध्यान हृदयकमळीं चंद्रचूडा ॥ ७ ॥ निवृत्ती ज्ञानदेव सोपानसांवता । जवळी त्या जनमित्रा बोलाविलें ॥ ८ ॥ सकळिक संतां परमानंदें तृप्ती । सारोनि श्रीपति आरोगणां ॥ ९ ॥ बैसोनि एकाती पंढरी राणा । करीतसे विचारणा निजभक्तांसी ॥ १० ॥ सकळिक ब्राह्मण आणावें भोजना । निरसावी वासना संदेहाची ॥ ११ ॥ उठोनी प्रातःकाळीं यावें शीघ्रवत । द्यावया अक्षत ब्राह्मणांसी ॥ १२ ॥ निजबोधें आनंदें हर्षे खेळेमेळे । भोगावे सोहळे स्वानंदाचे ॥ १३ ॥ फेडवी तयांची भेदभ्रमदृष्टी । द्यावी तया भेटी निजरूपाची ॥ १४ ॥ संतसंगतीचा प्रगट व्हावा महिमा । द्यावा भक्तिप्रेमा नामयासी ॥ १५ ॥

९५३. सुख शेजारीं देव पर्यंकी पहुडले । विश्रांतीशी गेले सकळ भक्त ॥ १ ॥ ब्रह्मवीणा करीं घेऊनि ब्रह्मसुत । जाणवी एकांत नारदमुनी ॥ २ ॥ बाप पंढरीनाथ सुखाचा सुखसिंधु । नित्य नवा आनंदु सोहळा करी ॥ ३ ॥ विश्रांति विसावा जें विश्व मंगळ । तें नाम निर्मळ विठोबाचें ॥ ४ ॥ तो भक्तशिरोमणी वैराग्य पुतळा । गातो प्रेमकळा धरुनी कंठीं ॥ ५ ॥ तेणें श्रवणामृतें हृदय कोंदाटलें । प्रेमाचे सुटले पाझर नयनीं ॥ ६ ॥ हर्षे निर्भर दोनी देव नारदमुनी । प्रीति आलिंगनीं एकमेकां ॥ ७ ॥ जाती चंपक सुमनें माजी तुळसीमिश्रित । दिधल्या त्या उचित कंठी माळा ॥ ८ ॥ नमस्कार करूनि केलें विसर्जन । भरलें त्रिभुवन ब्रह्मरसें ॥ ९ ॥ मग चालिले तेथोनि ऋषी नारदमुनी । हृदयी संजीवनी कृष्णनाम ॥ १० ॥ तेणें त्या विश्रांति नित्य तृप्ती मनीं । नामा जीवें चरणीं विनटला ॥ ११ ॥

९५४. जीवींचें गुज राही रुक्माईसी पुसे । न धरवे मज हांसें नवल वाटे ॥ १ ॥ काय अभिश्राप आला देवराया । केली आपणया आत्मशुद्धी ॥ २ ॥ हें मज बाई सत्य सांगा वाणी । कवणें चक्रपाणि भुलविलें ॥ ३ ॥ सूर्य आणि अंधारु वर्ते एके ठायीं । हें भूतभविष्य नाहीं वर्तमान ॥ ४ ॥ ऐसें हे अघटित जरी घडेल प्रसंगी । तरीच दोष संसर्गी देवराया ॥ ५ ॥ अग्निमाजी वीज पाल्हेजती सुरवाडे । कीं बुडालें सांपडें लवण जळी ॥ ६ ॥ ऐसें हे अभिनव जरी घडेल प्रसंगीं । तरीच संसर्गी पडती देवो ॥ ७ ॥ ज्योतिसी अळमाळु मिळाल्या कर्पुरीं । पुढती त्यासी उरी उरे जरी ॥ ८ ॥ ऐसें होय जरी या त्रिभुवनामाझारीं । तरीच श्रीहरी वसती दोष ॥ ९ ॥ तरी हे न कळे माते सांगावें साचार । सर्वज्ञ चतुर वडील तुम्ही ॥ १० ॥ रुक्माई म्हणे या नामयाचे चाडे । अनंत पवाडे केलें देवें ॥ ११ ॥

९५५. रुक्माई म्हणे परियेसी वो आरजे । सांगेन सकळ जें वर्म तुज ॥ १ ॥ अनाथा माहेर एक चक्रपाणि । बहु दिनालागोनी लोभापर ॥ २ ॥ म्हणोनी भुलला देव नाम्याचेनि लोभें । कर्मे शुभाशुभें अंगिकारी ॥ ३ ॥ आवडीचा वोरसु न करी कायकाय । हा प्रसिद्ध अनुभव आहे लोकां ॥ ४ ॥ विषयीं विषम सुख विषयीचें गळालें । तयाचे सोहळे करिती लोक ॥ ५ ॥ आंधळे पांगुळे मुके अनर्गळ । परी जीवापरीस बाळ पढियंतें मातें ॥ ६ ॥ अंतरीच्या कळवळें खेळवी लाडेंकोडें । परि विलासाचे नावडे चोख चांग ॥ ७ ॥ प्रीतीच्या पडिभरें नेघे पैं विकृती । देखोनी विश्रांति थोर मानी ॥ ८ ॥ म्हणे माझे अळिवे दिठावेल झणी । इडा पीडा घेउनी वदन चुंबी ॥ ९ ॥ स्नेहाच्या संभ्रमें नेणें लोकलाज । उचलोनी भूज घाली कंठीं ॥ १० ॥ तनू मन प्राणाची करुनी ओंवाळणी । जावें हें माझेनी म्हणे जीवें ॥ ११ ॥ तैसीच परी आहे या विठ्ठलाच्या ठायीं । चित्त याच्या पायीं ठेविलें जेणें ॥ १२ ॥ न पाहे तयाचें जाती कुळ कर्म । वर्णाश्रमधर्म शुद्ध वाणी ॥ १३ ॥ अनंत जन्माचा काया मनें वाचा । आहे या दोघांचा ऋणानुबंधू ॥ १४ ॥ तो नकळे न सुटे कोणीये कल्पांती । जीवलग सांगाती झाला नामा ॥ १५ ॥

९५६. मग नारदातें पुसे सत्यभामा देवी । विस्मयो माझ्या जीवीं फार वाटे ॥ १ ॥ सांडोनियां थोरी देव मुगुटमणी । नाचतो कीर्तनीं संतापुढें ॥ २ ॥ तरी कोणीये जन्माचें काय काय याचें । घेतलें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाम्याचें ऋण देवें ॥ ३ ॥ एका पुंडलिकाचेनि पांगें येणें हो श्रीरंगें। अठ्ठावीस युगें उभ्यां गेलीं ॥ ४ ॥ न पाहे परतोनी अझुनी पाठीमोरा। न बोले निष्ठुरा वचन कांहीं ॥ ५ ॥ तरी कोणें प्रीति देवा कोण्या ऋणानुबंधें। राखितो आनंदें बळीचें द्वार ॥ ६ ॥ विकिला पायकु कायामनें वाचा। झाला पांडवांचा वेळाइतु ॥ ७ ॥ जें जें जया आवडे तें तें धरोनी रूप। पाववी संकल्प सिद्धी त्यांचे ॥ ८ ॥ एकला एकटु एकलेनि जीवें। भक्तांचे करावें सकळ काज ॥ ९ ॥ ऐसे भक्त अपार आहेत भूमंडळीं। किती लागावळी असेल त्यांची ॥ १० ॥ म्हणोनि माझ्या जिवीं वाटे थोर खंती। स्वामीतें शिणविती युगायुगीं ॥ ११ ॥ भक्तांचे आवडी त्यजिलें वैकुंठभुवन। चित्तीं अमृतपान न वाटे गोड ॥ १२ ॥ अखंड आवडे संतांची संगती। बैसोनी एकांतीं घेती सुख ॥ १३ ॥ ऐसीं इहीं चाळविलें वैष्णवीं। आमुचें घर गोसावी भुलविलें ॥ १४ ॥ त्यां सकळांहूनि पढीयंता देवा एकु नामा। भक्तीभावें प्रेमा दिधला त्यासी ॥ १५ ॥

९५७. तंव म्हणती नारदमुनि परियेसी वो माते। सांगेन मी तूंते सत्य मानी ॥ १ ॥ हा निर्विकल्प देव येतसे रूपा। करावया कृपा भक्तजनां ॥ २ ॥ हा शरणांगता वत्सलु अनाथा कृपाळु। मिखी दीन दयाळु ब्रीद जगीं ॥ ३ ॥ जो शब्दब्रह्मजनिता सकळ विधिकर्ता। धर्मांचा, पाळिता पक्षपाती ॥ ४ ॥ म्हणोनी जन्मकर्में असंख्यात जगीं। केलीं याचलागीं नारायणें ॥ ५ ॥ अंबऋषीचे येणें सोसले गर्भवास। राखितो उदास बळीचें द्वार ॥ ६ ॥ विकिला पाइकु कायामनें वाचा। झाला पांडवांचा मोलेंवीण ॥ ७ ॥ गोकुळीं नंदाची राखिलीं गोधनें। प्रीति उच्छिष्ट खाणें गौळियांचें ॥ ८ ॥ विघ्न पडे तेथें आपणा वोडवी। संकटीं सोडवी माझीं म्हणोनी ॥ ९ ॥ सांडोनी अभिमान न्यून कामें करी। झालासे अधिकारी दास त्याचा ॥ १० ॥ आज्ञा वाहे शिरीं जीवीं जतन करी। मानिलीं सोयरी जिवलगें ॥ ११ ॥ एके अपमानिती दावेवरी बांधिती। उपहास करिती हर्ष मानी ॥ १२ ॥ केले अपराध नेघे आपुले चित्ती। दुणावितो प्रीति नित्य नवी ॥ १३ ॥ ऐसे ब्रह्मांडनायकु देवा मुगुटमणी। हे त्याची करणी ख्याती जगीं ॥ १४ ॥ आम्ही सकळ भक्त याचे पूर्ण अंशु। वरणींचा सौरसु नामयासी ॥ १५ ॥

९५८. निज गुज रुक्माई पुसे पंढरीनाथा। ठेवूनियां माथा चरणावरी ॥ १ ॥ सर्वांहूनि पढीयंते काय स्वामियातें। ते मज निरुतें सांगा स्वामी ॥ २ ॥ हे माझ्या जीवींचि फेडावी आशंका। ब्रह्मांड नायका कृपाळूवा ॥ ३ ॥ न रिगें तुमचें चित्त योगियांचे ध्यानीं। वैकुंठभुवनीं प्रीति नाहीं ॥ ४ ॥ तेथींचे सुखभोग सकळ विलास। नावडती उदास कवण्या गुणें ॥ ५ ॥ सायोज्यता मुक्ति आपुली देऊनी। ज्ञानी तें निर्गुणीं बुडविलें ॥ ६ ॥ त्याहूनि जिवलग कोण तुमचे सखे। जे त्याचेनि पैं सुखें वेडावलेती ॥ ७ ॥ चतुरानना ऐसा स्तविता चतुरपणें। आठराही पुराणें वेद चारी ॥ ८ ॥ परि तेही उबगलीं म्हणती नेती नेती। शिणली वेवादती साहीजणें ॥ ९ ॥ ऐकुनी पंढरीनाथ बोले रुक्माईसी। तूं कां वो नेणसी गुज माझें ॥ १० ॥ कायावाचामनें सर्व निरंतरीं। आहे नाम्यावरी लोभ माझा ॥ ११ ॥

९५९. जीवींचें गुजगौप्य सांगेन वो तूंतें। ऐक एकचित्तें मनोधर्में ॥ १ ॥ आवडते हे माझे भक्त परम सखे। जे सबाह्य सारिखे सप्रेमळ ॥ २ ॥ त्यापरिस थोर नाहीं मज दुजें। मज त्याचेनि काजें नांवरूप ॥ ३ ॥ भक्त सर्वांहोनी पढियंते माझिया हो जीवा। भक्त हा विसांवा ज्ञानीयांचा ॥ ४ ॥ भक्त योगियांच्या सुखाचा शृंगारू। भक्त अलंकारू वैराग्याचा ॥ ५ ॥ भक्त वो माझिया जीवींचें निजध्येय। भक्त परम प्रिय कुळदैवत ॥ ६ ॥ भक्तसंगें सुखें विश्रांति विसांवा भक्त माझा ठेवा सर्व धन ॥ ७ ॥ भक्त हे माझिया भाग्याचें भूषण। भक्त ते निधान निक्षेपींचें ॥ ८ ॥ भक्त यश कीर्ति भक्त सुख मूर्ति। भेटे तरी पुरती सकळ काम ॥ ९ ॥ भक्त माझ्या सर्वसुखाचा अधिकारी। भक्ताचिया घरीं वस्ती माझी ॥ १० ॥ मज आणि भक्तां नाहीं वेगळीक। घ्यावें सर्व सुख भक्तें माझे ॥ ११ ॥ भक्तें नाम

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ध्यावें भक्तें रूप ध्यावें। भक्तें मुख पहावें घडिये घडिये॥ १२॥ भक्तें हृदयीं माझे चिंतावे चरण। भक्तें आलिंगन द्यावें मज॥ १३॥ धर्म अर्थ काम मोक्ष मुक्ति चारी। देतां न धरी करीं भक्त माझा॥ १४॥ भक्त न मागें कांहीं न घाली मज भार। मजहूनि उदार भक्त माझा॥ १५॥ पत्रपुष्प फळ जळ तें सर्वभावें। भक्तांचें मज व्हावें भलतैसें॥ १६॥ आस करुनी वास पाहे घडिये घडिये। भक्ताचे ते पढिये सर्व मज॥ १७॥ तरी मी भक्तांचा कीं भक्त आमुचे। सोईरे निजाचे एकमेक॥ १८॥ म्हणोनी नामयाचें आर्त थोर जीवा। जवळोनी नवजावा दूर कोठें॥ १९॥

९६०. तंव तें सकळीक भक्त आले शीघ्रवत। आनंदें गर्जत नामघोषें॥ १॥ प्रेमे उचंबळत अंतरीं बोधले। सप्रेमें लोटले चरणावरी॥ २॥ त्या सुखाचा आनंदु न वर्णवे वाचे। एवढें भाग्य कैंचें बोलावया॥ ३॥ आलिंगोनी देवें धरिलें हृदयकमळीं। सादर सांभाळी कृपादृष्टी॥ ४॥ श्रीमुखाची वास पाहती वेळोवेळां। झाला एकवळा आनंदाचा॥ ५॥ मग उदार चक्रवर्ती ज्ञानियाचा रावो। सांगे जीवींचा भावो रुक्माईसी॥ ६॥ केला चंद्रभागे संकल्प संपूर्ण। तो व्हावा उत्तीर्ण सर्वभावें॥ ७॥ क्षेत्रवासी द्विज सुशील सदाचार। जे पुण्यसागर भूदैवत॥ ८॥ ज्याचेनि दर्शनें पाप ताप जाय। यशकीर्ति होय चरणीतीर्थें॥ ९॥ तरी ते प्रार्थूनियां आजी आणावे निजभुवना। द्यावें त्या भोजना भक्तिभावें॥ १०॥ तेणें सकळ काम होतील परिपूर्ण। घ्यावें आशीर्वचन ब्राह्मणांचें॥ ११॥ तंव म्हणे रुक्माई ब्रह्मांडनायका। अक्षत सकळिका द्यावी देवा॥ १२॥ सकळही सिद्धि असती सदोदित। कर जोडुनि तिष्ठत सकळ काम॥ १३॥ हांसोनी पंढरीनाथ बोले कवतुकें। जीवलगा आईके विष्णुदासा॥ १४॥ पुढती कवतुक करणें तुजलागीं। नामयासी वेगी कळली खूण॥ १५॥

९६१. केशव म्हणे नाम्या सुखाच्या निधाना। देरे अलिंगना आवडत्या॥ १॥ जीवलगा जवळोनी नवजे कोठें दुरी। वाटे तुज अंतरीं घालावासी॥ २॥ न पुरे माझें आर्त घेतां तुझें सुख। मज नित्य तृप्ती भूक वाटे थोरी॥ ३॥ उत्कंठित चित्त अखंड तुजकारणें। तुज देखिल्या पारणें होय नयनीं॥ ४॥ अनंत जन्माचा हा ऋणानुबंधू। तरीच प्रीतिवादू न तुटे तुझा॥ ५॥ तूं वो मजलागोनि देह कवतीं दिधलें। उग्र तप साधिलें जन्मोजन्मीं॥ ६॥ त्यजोनी सर्व माया चित्त निरोधिलें। हृदयीं मज बांधिलें वश करोनी॥ ७॥ तुज काय देइजे उतराई होइजे। ऐसें न देखिजे त्रिभुवनीं॥ ८॥ शरीर प्राणाचें त्वां देउनी बळिदान। केलें पैं निर्वाण भक्तराया॥ ९॥ करावें म्यां दास्यत्व आपुलेनि आंगें। तुज तरी कांही नलगे देणें घेणें॥ १०॥ नामा म्हणे देवा तूं दीनाचा कैवारी। म्हणोनी मजवरी करिसी मोहो॥ ११॥

९६२. भक्तजनवत्सल सुखसिंधुराशी। निर्भर मानसीं परमानंदे॥ १॥ सरिसे सकळ भक्त घेउनी पंढरिनाथ। चालिले अक्षत द्यावयासी॥ २॥ बाप तो कवतुकी अनाथाचा नाथ। भोगिया श्रीमंत खेळु खेळे॥ ३॥ तंव ते उदित भाग्य भाग्यवंत। दर्शनाचें आर्त होतें त्यासी॥ ४॥ सकळही मिळोनी गेले कुंडलतीर्थी। तंव आले कमळापति दर्शनासी॥ ५॥ तेथें देखोनियां सकळांचा मेळा। केला द्विजां सकळां प्रणीपातु॥ ६॥ सांडोनी देहबुद्धि निःसंदेह व्हावें। कृपा करोनी यावें भोजनासी॥ ७॥ पाळावें आपुल्या दिधल्या सत्य वचना। करावी वासना तृप्त माझी॥ ८॥ स्नानसंध्या विधि सारोनी समस्त। यावें शीघ्रवत नैवेद्यासी॥ ९॥ ते निघाले दर्शनें तृप्त झाले मनें। परिसोनी वचनें अमृतोत्तम॥ १०॥ आम्ही तरी आश्रित हेंचि जाणा सत्य। आशिर्वाद नित्य देतों तुम्हां॥ ११॥ सर्वभावें आमुचा करावा सांभाळ। स्वामी दीनदयाळ विश्व बोले॥ १२॥ तुम्ही महाराज राजराजेश्वर। पाहावें निरंतर कृपादृष्टी॥ १३॥ तुमचा हा आदर निरूपम सर्वथा। दिधलीसे मान्यता वेदवचना॥ १४॥ तें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भाष्य आपुली जतन सर्वभावें। साक्ष करुनी द्यावें प्रेम नाम्या॥ १५॥

९६३. बाप आर्तबंधु सकळ जीवन कंदू। भक्तांचा सुखसिंधु पंढरीरावो॥ १॥ हर्षे निर्भर चित्तीं आले निजभुवना। सांगे विवंचना रुक्माईसी॥ २॥ धन्य दिवस झाला आजि सोनियाचा। सोहळा भक्तांचा आरंभिला॥ ३॥ प्रार्थिलें ब्राह्मणां भोजनालागुनी। येताती सारोनी स्नानविधी॥ ४॥ आजीचें कवतुक पाहावें अभिनव। हांसोनियां देव बोलते झाले॥ ५॥ तंव म्हणे रुक्माई अहो जी पूर्णकामा। स्वामी मेघश्यामा कृपानिधी॥ ६॥ त्यांचें पूर्व पुण्य आजि आलें फळा। देखिलें गोपाळा चरण तुमचे॥ ७॥ तंव ते नित्यनेम सारोनी आपुले। वेगीं द्विज आले राउळांगणा॥ ८॥ नमस्कारुनी देवें बैसविलें आसनीं। पूजा चक्रपाणि आरंभिली॥ ९॥ चरण प्रक्षाळूनि गंध तुळसी माळा। घातलिया गळां ब्राह्मणाच्या॥ १०॥ उजळोनि दीपक ओंवाळिले प्रीति। मग ते पात्रपंक्ति मांडियेल्या॥ ११॥ रत्नजडित सकळां सुवर्णाचीं ताटें। षड्रस बरवंटें तयामाजी॥ १२॥ विस्तारोनी वेगी वोगरिलीं चांगें। संकल्प श्रीरंगे सोडियेला॥ १३॥ देउनी आपोशन अमर चूडामणी। प्रार्थितो जोडोनी करकमळ॥ १४॥ कवळोकवळीं घ्यावें नाम अच्युताचें। भोजन भक्ताचें सुखरूप॥ १५॥ ऐसे जेविले आनंदें धालें परमानंदें। मुखशुद्धि गोविंदें समर्पिली॥ १६॥ रत्नाचे दीपक उजाळोनी आरती। साष्टांग श्रीपति नमस्कारिलें॥ १७॥ जोडोनी दोन्ही कर विनवीतो श्रीरंग। म्हणेआजीचा प्रसंग पुण्यकाळ॥ १८॥ आम्हां तुम्हां भेटी झाल्या सुख गोष्टी। भरली सकळ सृष्टी परमानंदें॥ १९॥ अवघे संतजन आमुचे सांगाती। जेवूं एकापांती सरीसे आम्ही॥ २०॥ म्हणोनी सकळिकां पाचारिलें देवें। कवतुक अवघे पाहाती द्विज॥ २१॥ ब्रह्मादिक देव तिष्ठत पाहाती व्योमीं। वंचलों रे आम्ही भक्तिसुखा॥ २२॥ सप्रेम देउनी बुझाविला नामा ऐसें भाग्य आम्हां स्वप्नीं नाहीं॥ २३॥

९६४. निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान सांवता। जनमित्र पढियंता जीवलगू॥ १॥ आसंद सुदामा विसोबा खेचर। नरहरीसोनार आदिकरुनी॥ २॥ बाप आर्तबंधु कृपाळू दीनाचा। अभिमान भक्तांचा न संडी कदा॥ ३॥ चोखामेळा बंका भक्तवत्सल लाडका। तो बोलविला देखा आरोगणें॥ ४॥ वैराग्याचा मेरू तो गोराकुंभारू आवडता डिंगरु केशवाचा॥ ५॥ ऐसें थोरसानें सकळ भक्तराणे। देवें आरोगणें बोलाविलें॥ ६॥ सधूप आणि दीप तुळशीच्या माळा। पूजिलें सकळां देवरायें॥ ७॥ तंव राहीरखुमाबाई सत्यभामा सती। विस्तारोनी आणिती विविध बोणीं॥ ८॥ भोंवती भक्तमंडळी मध्यें वनमाळी। शोभे नभमंडळी चंद्र जैसा॥ ९॥ सकळांमुखीं कवळ देतसे निजकरें। उच्छिष्ट पितांबरें सांवरीतो॥ १०॥ त्या सुखाचा पारु देखोनी वैकुंठीं। होती लुलुमिठि सुरवरांशी॥ ११॥ ऐसें तें भोजन झालें खेळेंमेळें। ब्रह्मरसें धाले सकळ भक्त॥ १२॥ तंव विमानें आकाशीं दाटलें सकळ। करिती कल्लोळ पुष्पवृष्टी॥ १३॥ तें देखोनी द्विजवर पडिलें चिंतवणी। म्हणती पैं झाली हानी जीवित्वाची॥ १४॥ नव्हे हा ज्ञानमार्ग नव्हे हें वैराग्य। नवल भक्तिभाग्य आवडीचें॥ १५॥ एक म्हणती हा पांडुरंग होय साचें। येव्हढें भाग्य कैंचें मानवीयां॥ १६॥ हा नव्हे गुणिवंतु क्रियाकर्मातीतु। यासी प्रायश्चित्तु काय घडे॥ १७॥ नाहीं यासी आप नाहीं यासी पर। नाहीं या आचार जातीकूळ॥ १८॥ षड्मार्ग संबंध नाहीं याच्या ठायीं। विकल्पाचें नाहीं वळण कदां॥ १९॥ कृपेचा कोवळा सोयरा दीनांचा। उदार मनाचा लोभापर॥ २०॥ अनसुरे त्याचें मायाजाळ तोडी। बैसणें तो मोडी संसाराचें॥ २१॥ या नामयाची माता आम्हा तुम्हा देखतां। शिणली वेवादतां नानापरी॥ २२॥ नेदी तिच्या हाती घातिला पाठीसी। धरिला जीवेंसी माझा म्हणुनि॥ २३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देहाचा विसरु याच्या रूपाच्या दर्शनें। चरणाचेनि स्मरणें चित्त निवे॥ २४॥ सुख गोष्टी यासी केलिया एकांत। तेणें पुरतसे अंत जन्ममरणा॥ २५॥ ऐसें त्याचें बोलणें ऐकोनी पंढरीनाथें। दिलें सकळिकातें अभयदान॥ २६॥ मग निजरूप दाविता झाला तयावेळीं। नामा हृदयकमळीं आलिंगिला॥ २७॥

९६५. तंव दिव्य रत्नमणी मस्तकीं किरीटी। मळवट लल्लाटीं कस्तुरीचा॥ १॥ माथां मोरपिसावेठीं कुंडलें गोमटीं। पाहात कृपादृष्टी सकळ भक्तां॥ २॥ तो पुंडलीकाचा ठेवा पूर्वपुण्यराशी। वैकुंठनिवासी देवरावो॥ ३॥ वदन निर्मळ भाळ सुस्मित वेल्हाळ। दर्शनीं रत्नकीळ तेज फांके॥ ४॥ त्या सुखाचे अधिकारी भक्त सप्रेमळ। हृदयीं सर्वकाळ हरीचें ध्यान॥ ५॥ कौस्तुभ वैजयंती पदक हृदयावरी। शोभत साजिरी तुळसीमाळा॥ ६॥ श्रीवत्सलांछन प्रीतीचें भूषण। चर्चिला चंदन श्यामतनु॥ ७॥ शंखचक्र करीं ते कर कटावरी। पितांबरधारी जलदनील॥ ८॥ समचरण स्वयंभ उभा विटेवरी। रुळती तोडरीं दानव दैत्य॥ ९॥ तेणें दिव्य तेजें ब्रह्मांड धवळलें। प्रकाशें लोपलें दिग्मंडळ॥ १०॥ सकळ संत द्विज देखती चतुर्भूज। शंख चक्रांबुज गदापाणी॥ ११॥ कीटकपक्षी पशुपाषाणा तरुवर। देखती द्विजवर विठ्ठलरूप॥ १२॥ परमानंद बोधें निवाले आनंदें। भेदाभेद द्वंद्वें विसरोनी गेलीं॥ १३॥ एकाविण दुजें तेथें न दिसे पैं आन। नाहीं आठवण देहभावा॥ १४॥ सबाह्य कोंदली अवघी विठ्ठलमूर्ति। मुखाची विश्रांति योगियांच्या॥ १५॥ प्रेमें वोसंडत सकळ भक्तजन। देती आलिंगन एकमेकां॥ १६॥ हर्षें निर्भर चित्तीं आनंदें गर्जती। पावले विश्रांति सकळ द्विज॥ १७॥ ऐसा ब्रह्मानंद सोहळा भोगवी सकळां। आपुल्या प्रेमळा निजदासां॥ १८॥ करोनी सावध वैकुंठींचा राणा। नामा घाली चरणावरी त्यांच्या॥ १९॥

९६६. बाप भक्तप्रीय पाहे कृपादृष्टी। करितसे सुखगोष्टी ब्राह्मणांसी॥ १॥ सर्वभावें शरण सर्वकाळीं मज। ते हे भक्तराज सखे माझे॥ २॥ याचेनि उपकारें दाटलों संपूर्ण। भक्तपराधीन झालों तेणें॥ ३॥ निवृत्ति ज्ञानेश्वर आणि हा सोपान। हे मुगुटमणी जाण सुख मूर्ति॥ ४॥ सर्वभूतीं भजती सर्वभावें सर्वथा। केला पैं अपैता त्याचे बुद्धी॥ ५॥ हा जनमित्र जिवलग आमचा सोयरा। सांडिला संसारा ओवाळुनी॥ ६॥ माझे नामीं दृढ धरोनी विश्वास। अखंड उदास देहभावी॥ ७॥ जिवाहोनी पढियंता हा भक्त सांवता। निर्धार सांगतां नवलाव याचा॥ ८॥ हृदय विदारोनी आपुलेनि हातें। ठाव दिला मातें लपावया॥ ९॥ बारा दिवसांचा हा भक्तवत्सला। माये सांडियेला वेणूनादीं॥ १०॥ म्हणती वो माझा त्या दिवसापासोनि। नेणें मज वांचून आणिक कांहीं॥ ११॥ हा विसोबा खेचर आणि नरहरि सोनार। हा गोरा कुंभार अंतरनिष्ठ॥ १२॥ समाधिस्थ सदा निवाले निश्चित। सबाह्य देखत मजलागीं॥ १३॥ सुखाचा सुजाण आसंद सुदामा। हा माझा आत्मा आवडता॥ १४॥ घरदार संसार त्यजिला मजकारणें। तोडिलें पैं येणें मायाजाळ॥ १५॥ चोखामेळा बंका भक्त परम सखा। विसोबा हा देखा प्राण माझा॥ १६॥ त्यजुनी सर्व संग एकविध भावें। अनुसरले जिवें माझे ठायीं॥ १७॥ ऐसे या भक्तांचे सांगता उपकार। आहेत बहुत फार कल्पकोडी॥ १८॥ त्या सकळांच्या चरणींचा रजरेणु माझा नामा। भक्तिभाव प्रेमा दिधला त्यासी॥ १९॥

९६७. तंव ते भाग्याचे सागर विनविती द्विजवर। म्हणती तूं माहेर जोडलासी॥ १॥ चरणींचा वियोग न व्हावा सर्वथा। तोडावी ममता प्रपंचाची॥ २॥ नलगे मोक्षमुक्ति नलगे धनसंपती। देईं सत्संगती जन्मोजन्मीं॥ ३॥ वेदशास्त्र पठणें बहिर्मुखवनें। केली अभिमानें छळण बुद्धी॥ ४॥ धिक् तें जाणपण धिक् तो सन्मान। नाहीं प्रेमखूण कळली तुझी॥ ५॥ कुळाचेनि अभिमानें अंतरलों गा तेणें। पूर्ण देहाभिमानें भुलोनियां॥ ६॥ हे सकळ तुझी माया भुललों पंढरिराया। म्हणोनि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जन्म वायां गेलें होतें ॥ ७ ॥ अपराधांच्या कोडी घडल्या पैं आमुतें। निषेधिलें तूंतें मायबापा ॥ ८ ॥ परी त्वां दीनानाथें ब्रीद सत्य केलें। आम्हां तारियेलें पतितांसी ॥ ९ ॥ नकळे काय होतें संचित आमुचें। अनंत जन्माचें पूर्वपुण्य ॥ १० ॥ तें आजि फळलें तुझिया कृपादृष्टी। भाग्यें झाली भेटी संतजनां ॥ ११ ॥ दुर्जय तोडिलें माया मोहपाश। केला पैं सौरस आपुल्या रूपीं ॥ १२ ॥ तापत्रया वणवा विझविला अवचिता। दिले प्रेमामृता जीवन आम्हां ॥ १३ ॥ आतां सर्वकाळ अविट हे दृष्टी। यासाठीं संतभेटी निरंतर ॥ १४ ॥ घरदार संसार त्यजिला मजकारणें। तोडिलें पैं येणें मायाजाळ ॥ १५ ॥ चोखामेळा बंका भक्त परम सखा। विसोबा हा देखा प्राण माझा ॥ १६ ॥ त्यजुनी सर्व संग एकविध भावें। अनुसरले जिवें माझे ठायीं ॥ १७ ॥ ऐसे या भक्तांचे सांगता उपकार। आहेत बहुत फार कल्पकोडी ॥ १८ ॥ त्या सकळांच्या चरणींचा रजरेणु माझा नामा। भक्तिभाव प्रेमा दिधला त्यासी ॥ १९ ॥

९६७. तंव ते भाग्याचे सागर विनविती द्विजवर। म्हणती तूं माहेर जोडलासी ॥ १ ॥ चरणींचा वियोग न व्हावा सर्वथा। तोडावी ममता प्रपंचाची ॥ २ ॥ नलगे मोक्षमुक्ति नलगे धनसंपती। देईं सत्संगती जन्मोजन्मीं ॥ ३ ॥ वेदशास्त्र पठणें बहिर्मुखवनें। केली अभिमानें छळण बुद्धी ॥ ४ ॥ धिक् तें जाणपण धिक् तो सन्मान। नाहीं प्रेमखूण कळली तुझी ॥ ५ ॥ कुळाचेनि अभिमानें अंतरलों गा तेणें। पूर्ण देहाभिमानें भुलोनियां ॥ ६ ॥ हे सकळ तुझी माया भुललों पंढरिराया। म्हणोनि जन्म वायां गेलें होतें ॥ ७ ॥ अपराधांच्या कोडी घडल्या पैं आमुतें। निषेधिलें तूंतें मायबापा ॥ ८ ॥ परी त्वां दीनानाथें ब्रीद सत्य केलें। आम्हां तारियेलें पतितांसी ॥ ९ ॥ नकळे काय होतें संचित आमुचें। अनंत जन्माचें पूर्वपुण्य ॥ १० ॥ तें आजि फळलें तुझिया कृपादृष्टी। भाग्यें झाली भेटी संतजनां ॥ ११ ॥ दुर्जय तोडिलें माया मोहपाश। केला पैं सौरस आपुल्या रूपीं ॥ १२ ॥ तापत्रया वणवा विझविला अवचिता। दिले प्रेमामृता जीवन आम्हां ॥ १३ ॥ आतां सर्वकाळ अविट हे दृष्टी। यासाठीं संतभेटी निरंतर ॥ १४ ॥ प्रेमाचा जिव्हाळा नामांची आवडी। मग होत कल्पकोडी गर्भवास ॥ १५ ॥ करता करविता तूंचि पैं एक। ब्रह्मांडनायक सर्वगत ॥ १६ ॥ आमुचे अवगुण न धरावें मानसीं। निरवावे संतांसी माझें म्हणुनी ॥ १७ ॥ तुझिया दासाचें द्यावें पैं दास्यत्व। तयाची वंदीत चरणधुळी ॥ १८ ॥ हेंचि व्रततीर्थ क्रियाकर्म आम्हां। द्यावा नित्य प्रेमा नामयासी ॥ १९ ॥

९६८. कृपेच्या सागरें भक्तजन करुणाकरें। देऊन आलिंगन करें निवविलें तयातें ॥ १ ॥ सर्व ज्ञानाचा रावो आत्मा ज्ञानदेवो। सांगेल अनुभवो तुम्हाप्रती ॥ २ ॥ ते खूण अंतरीं धरा सर्वभावें। दृढ धरोनी जीवें जतन करा ॥ ३ ॥ नलगे तीर्थाटन काया क्लेश जाण। नलगे अनुष्ठान करणें बहू ॥ ४ ॥ नलगती सायास न करणें उपवास। धरावा विश्वास संतसंगें ॥ ५ ॥ नलगे वज्रासनीं बैसावें नेहटी। नलगे गिरीकपार्टी करणें वास ॥ ६ ॥ नलगे उग्रतप नानामंत्र जप। भेणें जाय पाप संतसंगें ॥ ७ ॥ नलगे भस्म उधळणें वाहणें जटाभार। न घालावा पसार लोकचारीं ॥ ८ ॥ सर्वभूतीं करुणा जिव्हें नाम स्मृती। मन येईल निवृत्ति आपेंआप ॥ ९ ॥ क्रियाकर्म धर्म प्रेमेंविण खटपटा। करितां आला वांटा दीर्घ दोषांचा ॥ १० ॥ साधनावांचुनी मार्ग सोपा जाण। करावें कीर्तन रामकृष्ण ॥ ११ ॥ सर्वकाळ कथा संतांची संगती। वाचे नाम कीर्ति सर्वकाळ ॥ १२ ॥ तो हा राजमार्ग सर्वांहोनी चांग। सदा संतसंग वाचे नाम ॥ १३ ॥ संकल्प विकल्प न धरावे मानसीं। मनोभावें संतांस शरण जावें ॥ १४ ॥ ज्ञानदेव म्हणे पुढती ऐका एक। सांगेन प्रत्यक्ष अनुभव सिद्ध ॥ १५ ॥

९६९. परमामृत सागरू मंथुनियां पुरता। काढिला तत्त्वतां ज्ञानबोधु ॥ १ ॥ या सुखाचा पारु जाणते विरळे। घेताती गळाळे संतजन ॥ २ ॥ प्रेमाचिये ताटीं वोगरू सुखामृत। हें सुख त्वरित सेवा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आधी॥ ३॥ हें सुख सेवितां परमानंद धनी। कृपा संतजनी केली पूर्ण॥ ४॥ ज्ञानाचें अंजन लेईले संतजन। जनीं जनार्दन देखती सदां॥ ५॥ नाहीं भिन्न भेद सर्व ब्रह्म एक। ब्रह्मांडनायक अनंत कोट॥ ६॥ दीपांचा दीपक हृदय आत्मज्योती। विश्वीं विठ्ठलमूर्ती देखती सदां॥ ७॥ हें सुख दिधलें भक्तांसी विश्रांति। नामाची हे ख्याती परमानंद॥ ८॥ पढतां नाम मंत्र ब्रह्मचि अवघें। पाहातां अनुभवें वेदमतें॥ ९॥ तें हें विठ्ठलनाम वेदाचें गव्हार। जाणती साचार संतजन॥ १०॥ युगें अठ्ठाविस विठ्ठलनामें जपतु। हा पुंडलीक भक्तु महामुनी॥ ११॥ उघडली मांदूस भक्तिभव तारूं। विठ्ठल उद्धारू कलियुगीं॥ १२॥ न लगती सायास करणें उपवास। विठ्ठलनामें पाश तुटती जाणा॥ १३॥ आदि ब्रह्म जुनाट जपत सिद्ध मुनी। तें दिलें मंथोनि पुंडलिकें॥ १४॥ केशवनाम मंत्र नामयासी सांगितलें। विस्तारोनि केलें मंथन ऐसें॥ १५॥

९७०. वेदाचें हें सार वैराग्याचें जीवन। चिदाकाशीची खूण परम गुज॥ १॥ जें शुद्धज्ञान गुह्य मोक्ष मुक्ति बीज। सकळ मंत्रराज मंगलनिधी॥ २॥ तें या नामयाचें होते हृदयकमळीं। कथा भूमंडळीं प्रकट केली॥ ३॥ ते हे विठ्ठलनाम साराचेंहि सार। कलियुगीं उध्दार सकळ जनां॥ ४॥ जें श्रवणाचें श्रवण मननाचें मनन। जें निजध्यासन निजध्यासाचें॥ ५॥ जें विचाराचें सार वृत्तीचा निर्धार। स्वरूप साक्षात्कार उघडा केला॥ ६॥ जें भक्तीचें सौभाग्य ज्ञानाचें आरोग्य। शास्त्राचें तें चांग मथीत नाम॥ ७॥ नामापरतें थोर नाही पैं आणिक। जनासी तारक हेंचि एक॥ ८॥ जे सकळ धर्म जनक पवित्राचें पावन। जें कां अधिष्ठान आनंदाचें॥ ९॥ जें योगसिद्धीचें जीवन पीयुष। जेणें पूर्ण आयुष्यकामनेचें॥ १०॥ पुण्यपावन देवा भक्तांचे सोहळे। प्रत्यक्ष गळाले आनंदाचे॥ ११॥ भक्तिभावें यांचें करितां श्रवण। मग नाहीं दर्शन गर्भवासा॥ १२॥ म्हणोनी कीर्तन करावें आवडी। घ्यावी अर्थगोडी अनुभवें॥ १३॥ नव्हें हें प्राकृत पाठांतरकवित्व। हा उपनिषद मथितार्थ ब्रह्मरस॥ १४॥ येथें जाणीव शाहणीव न करावी सर्वथा। न पहावी योग्यता व्युत्पत्तीची॥ १५॥ हे सात्त्विकाचें धन भोक्ते संतजन। नामदेवें पूर्ण ग्रंथ केला॥ १६॥

९७१. ज्ञानदेव आले काशी। विश्वेश्वर आडवे येती॥ १॥ रामनगरा वेशीपाशीं। भेटी झाल्या उभयतांसी॥ २॥ परस्परें आलिंगन। नामा वंदी उभयचरण॥ ३॥

९७२. पुढें उभे वेशीपाशीं। त्याला लोटांगण काशी॥ १॥ स्वर्गीं देवा जाल्या भेटी। भोंवत्या पताकांच्या थाटी॥ २॥ नामा म्हणे विठ्ठल बोला। ज्ञानोबासी म्हणे चला॥ ३॥

९७३. ज्ञानोबाचा हात। प्रेमें धरी विश्वनाथ॥ १॥ ऐसें बोलत चालत। दोघे आले गंगे आंत॥ २॥ ज्ञानोबाचे पायीं मिठी घाली गंगाबाई॥ ३॥ नामा म्हणे सोडा बाई। ज्ञानदेव सर्वांठायीं॥ ४॥

श्रीज्ञानेश्वरसमाधिमहिमा

(१)

९७४. ज्ञानदेव म्हणे विठ्ठलासी। समाधान तूंचि होसी। परि समाधि हे तुजपाशीं। घेईंन देवा॥ १॥ नलगे भुज मुक्ति। नलगे मज मुक्ति। तुझ्या चरणीं आर्ती। थोर आथी॥ २॥ विठोजी म्हणे ज्ञानदेवा। ज्ञानसागरा स्वानुभवा। वचनेंचि विसांवा। झाला मज॥ ३॥ ऐकें ज्ञान चक्रवर्ती। तूं तंव ज्ञानाचीच मूर्ती। परि पुससी जे आर्ती ते कळली मज॥ ४॥ एक एक अनुभव कृपा। पद पदांतरें केला सोपा। परी यांत माझिया कृपा। सकळही बोलली॥ ५॥ ज्ञानदेवो चरणीं मिठी। मनेंसी पडली एके गांठी। दृश्यादृश्य झाली एक दृष्टी। प्रत्यक्ष भेटविलेंसी॥ ६॥ कर ठेवुनी कुरवाळी। सर्वांग न्याहारुनी न्याहाळी। म्हणे तुवां घेतली जे आळी। ते सिद्धीतें पावेल॥ ७॥ नामा उभा असे सन्मुख। ऐकतां थोर खेद दुःख। म्हणे ज्ञानांजन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

महासुख। समाधि मागतसे॥ ८॥

९७५. ज्ञानदेव उभा जोडोनि हस्त। भक्त पाहती समस्त। विठोजी म्हणे सकळा स्वार्थ। या ज्ञानांजनाचा॥ १॥ कैंसे ओळले त्या ज्ञाना। समाधान तया ध्याना। मन नाठवे मीतूंपणा। समाधिखुणा ज्ञानासी॥ २॥ मग म्हणे विठोजी दातार। समाधि तुज निरंतर। आतां प्रस्थान करी साचार। मज निरंतर आठवी॥ ३॥ कैसें परिपूर्ण वोळले। आपण समाधिरूप झाले। मनातें मन समरसलें। विठ्ठल स्वरूपीं॥ ४॥ दशमी प्रस्थानाचा समयो। एकादशी जागर उत्सावो। द्वादशी क्षीरापती महोत्सवो। ज्ञानदेवें केला॥ ५॥ त्रयोदशी म्हणे पांडुरंग। कांही न करीं गा उद्वेग। अलंकापुरीं समाधि प्रसंग। करी करी लवलाही॥ ६॥ माता रुक्मिणी वाढी ताटीं। विठोजी म्हणे उघडी दृष्टी। तुज मज आहे नित्य भेटी। येई पंढरीये॥ ७॥ नामा म्हणे ज्ञान उदयो। अलंकापुरी सिद्ध समयो। परी विठ्ठलीं मुराला भावो। या ज्ञानदेवाचा॥ ८॥

९७६. विठोजी म्हणे ज्ञानदेवा। तुझी विश्रांति मज ठेवा। ते मुराली आमुचिया भावा। निःसंदेहें॥ १॥ कैसें समाधान ज्ञानदेवा। अलंकापुरीं समाधि ठेवा। विठ्ठल ओळला वोल्हावा। नित्यरूप समाधि॥ २॥ संत करिती महा खेद। म्हणती ज्ञानांजन सिद्ध। मग चालिले विद्वद। अलंकापुरीं॥ ३॥ महावल्ली वृक्ष अजान। तो निक्षेपिला पूर्णघन। मग विठोजी म्हणे आपण। ज्ञानदेवासी॥ ४॥ धन्य धन्य ज्ञानेश्वरा। पुण्यभूमि समाधि स्थिरा। कृष्ण पक्षीं तुज निर्धारा। भेट देत जाईन॥ ५॥ कार्तिक शुद्ध एकादशी। पंढरीयात्रा होईल सरिशी। दुसरी कृष्णपक्षीं निर्धारिसी। तुज दिधली असे॥ ६॥ हें ऐकोनि संतजनीं। जयजयकार केला ध्वनी। दिंडी पताका मेळ गगनीं। सुमनें वर्षताती॥ ७॥ नामा म्हणे आले वैष्णव। अलंकापुरीं मिळाले देव। समाधिसुखें ज्ञानदेव। बैसते जाहले॥ ८॥

९७७. महा उत्साह त्रयोदशी। केला त्या ज्ञानदेवासी। मग नामा म्हणे विठोबासी। चरण धरूनियां॥ १॥ समाधिधन दिधलें देवा ज्ञानांजन अलंकापुरीं ठेवा। अजानवृक्षीं बीज वोल्हावा। भक्तजनासी॥ २॥ कृपा आली विठ्ठलासी। म्हणे ज्ञानदेवा परियेसी। तीर्थ भागीरथी अहर्निशीं। तुज नित्य स्नानासी दिधली॥ ३॥ इंद्रायणी दक्षिण वाहिनी। भागीरथी मणिकर्णिका दोन्ही। इया मिळालिया त्रिसंगमीं। पुण्यभूमि तुझिये॥ ४॥ येथें जरी नित्य स्नान घडे। तरी नित्य वैकुंठवास जोडे तुज नाहीं नाहीं कुवाडे। मी कोडें उभा असे॥ ५॥ येथें हरिकथा नाम वाचे। जो उच्चारील विठ्ठलाचें। तयासी पेणें वैकुंठींचें। दिधलें साचे अक्षयीं॥ ६॥ आणिक ऐकेरे ज्ञानराजा। जो या सिद्धेश्वरीं करी पूजा। तो अंतरंग पैं माझा। मुक्ती सहजा जाहली त्यासी॥ ७॥ नामा म्हणे ऐसें अंतरंग। कैसा ओळला पांडुरंग। ज्ञानदेवी समाधि सांग। हरे पांग कीर्तनें॥ ८॥

९७८. सनकादिकीं मंत्रघोष। केले विधिपूर्वक पांच दिवस। मग पांडुरंग यथावकाश भक्ता वास महिमेचा॥ १॥ धन्य भूमि अलंकापुरी। ज्ञान समाधि खेचरी। पूर्ण परिपूर्ण श्रीहरी। आपण उभा असे॥ २॥ संत भागवत देव्हडे। अमर उभे चहुंकडे। नारद तुंबर पुढें। वीणा वाजविती॥ ३॥ एकीं केला जयजयकार। ज्ञानदेवीं धरूनिया कर। विठ्ठलचरणासमोर। निकट बैसते जाहले॥ ४॥ करें कुरवाळिलें ज्ञाना। कांसवी अवलोकिला पान्हा। आंसुवें येताती नयना। तया ज्ञानदेवाचिया॥ ५॥ विठोजी म्हणे ज्ञानांजना। तुझेनि कवित्वें हरे दारुणा। उच्चारितां महा विघ्ना। सकळ पळती॥ ६॥ तुज आठवील जो भक्त। तो होईल विरक्त। ऐसें विठोजी बोलत। येरु चरणीं रुळे॥ ७॥ नामा म्हणे सकळ तीर्थराजा। तया कृपा कैसी केली सहजा। एकादशीं दिधली पूजा। तया ज्ञानदेवासी॥ ८॥

९७९. स्नानविधि केली भक्ति। नाममंत्राचिया आवृत्ति। मग प्रत्यक्ष पूजिली मूर्ति। विठोबाची॥ १॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

धन्य धन्य तो ज्ञान। राजा निवृत्ति निधान। विठोजी आपण। भक्तां साह्य॥ २॥ मग सकळहि भक्तमेळीं। सहीत देव वनमाळी। बैसले तयापाळीं। इंद्रायणीचे॥ ३॥ एकीं केलें स्तुतिस्तोत्र। एक जपताती नानामंत्र। एक गाताती वेदवक्त्र। विठोबासी॥ ४॥ तंव पुढारा झाला नारा। तो नामयाचा पुत्र सैरा। तो पुसतसे विचारा। नामयासी॥ ५॥ ये संतसभेमाजी। राऊळ बैसले असे सहजीं। यातें पुसे जो कांजी। कोण क्षेत्र म्हणोनी॥ ६॥ उठिला नामा प्रेमें डुले। वंदिलीं विठ्ठलपाउलें। मग करद्वयें जोडुनी बोले। साशंकित॥ ७॥ नामा म्हणे पूर्ण ब्रह्म। तें कैसें सभासदि सम। तें बोलतसे परम। ज्ञानदेवा भाग्यें॥ ८॥

९८०. मग सकळ प्रेमपुतळे। बैसले माजी ब्रह्ममेळे। तेथें नामा वचन बोले स्वामीप्रति॥ १॥ वोळलें चैतन्य सतरावें। पूर्ण ओघ नाम विठ्ठलदेवें। पव्हें घालुनी ज्ञानदेवें। जग तारिलें कीर्तनें॥ २॥ नामा म्हणे स्वामी सर्वज्ञ। परि आमुचें मन निमग्न। चरणरजें पाप भग्न। पवित्र जाहलें॥ ३॥ तरी स्वामिराजा विनंती। परियेसी गा माझी पुढती। हे अलंकापुरी होती। कवणिये युगीं॥ ४॥ हें सांगिजे जी समर्था। कवण क्षेत्र कवण तीर्था। येथें क्षेत्रज्ञ हा सर्वथा। कवण धर्म असे॥ ५॥ तूं आत्माराम संपन्न। युगादि जुनाट नारायण। तुजप्रति हें वचन। न साहे माझें॥ ६॥ कांसवीचा तूं सार गाढा। तैसा तुझा पवाडा। हें पुसणें कवणिया चाडा। तें तूंच जाणसी॥ ७॥ नामा उभा तिष्ठत प्रेमें। संत दाटले सप्रेमें। आपण तेथें अनुक्रमें। सांगतसे देव॥ ८॥

९८१. देवासी कळलें गौप्यगुज। म्हणे रे नामया हेंची चीज। तो निजभाव सहज। प्रगट सांगू आतां॥ १॥ कृतायुगीं क्षेत्र आदि। ज्ञानदेवा तेथें समाधि। देव सांगतसे शुद्धी। योगबुद्धी जुनाट॥ २॥ ऐसे भक्तराज श्रेष्ठ। भूमिनामें वैकुंठपीठ। तें हें अलंकापुरी श्रेष्ठ। आदि वरिष्ठ पीठ आठरा॥ ३॥ आणिक ऐक रे वचन। हें पंचक्रोशी पुरातन। यासी युगें सांगतां संपन्न। चतुरानन जाणतसे॥ ४॥ कांहीएक किंचित सांगों। युगसंख्या मार्गात रिघो। तरी वैवस्वत हाचि मागो। पूर्ण वोळंगो या पासोनी॥ ५॥ मनु सहस्त्र युगें संख्या। तें अलंकापुरीं आदि लक्ष्या। कोटी याग असंख्या। सहस्त्र दक्ष येथें झाले॥ ६॥ आदि क्षेत्र संख्यारहित। ऋषिमुनी तपी तपत। आणि नारदमुनि असें सांगत। हेंचि पुरी पुरातन॥ ७॥ नामा म्हणे कैसें दिधलें। हें ज्ञानासी सिद्ध लाधलें। हेंचि आम्हासी जोडलें। पूर्ण लाधलें पीयूष॥ ८॥

९८२. देव म्हणे नामया। ऐके येथें उचित दया। एक तीर्थ सांगावया। हें तों पुराणीं असे॥ १॥ नकळे देवाची थोरी। कैसें पुढारिले मुरारी। गौप्यगुज श्रीहरी। सांगतसे नामया॥ २॥ पुराणीं म्हणसी कोण कथा। तरी ऐके गा तूं सकळार्था। शैवशास्त्र हा ग्रंथ सर्वथा। सिद्ध मार्ग असे॥ ३॥ जें जें जुनाट क्षेत्रतीर्थ। जें जें ब्रह्मनामें परमार्थ। तो तो सांगितला हेत। चतुराननें॥ ४॥ ऐसें देवमुखीचें वचन। ऐकतां संतोषले पूर्ण। मग देताती आलिंगन। एकमेकांसी॥ ५॥ जयजयकाराची ध्वनि। विठ्ठलनामें गर्जे वाणी। प्रेम वोसंडत नयनीं। स्फुंदन रोमांच दाटले॥ ६॥ स्फुंदत नामा नाचे गाये। परिसा म्हणे वोळली माये। तो ज्ञानासीं पान्हा होये। पूर्ण बोधाचा॥ ७॥ नामा म्हणे संतमेळीं। कथा सांगितली रसाळीं। तंव ज्ञानदेवा करतलामळीं। समाधि शेज घातली॥ ८॥

९८३. मग म्हणे सर्वज्ञ विठ्ठल। न लावावा वाढ वेळ। मग पातले निर्मळ। सिद्धेश्वरलिंगीं॥ १॥ धन्य धन्य हरि दिवस। धन्य धन्य हा निवास। आपण हृषिकेश। भक्ता साह्य॥ २॥ वैष्णव मिळाले संपन्न। गाती हरिनाम कीर्तन। तंव पातले सोपान। प्रेमें वोसंडत॥ ३॥ चरणीं घातली मिठी। विठोजी म्हणे उठी उठी। लवलाहे उघडी दृष्टी। भेट ज्ञानदेवासी॥ ४॥ येरू म्हणे मी कृतकृत्य। नामस्मरण तुझें नित्य। तेणें सकळ हित। आमुचें झालें॥ ५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तूंचि गा जनक जननी। तूंचि एक त्रिभुवनीं। पाहतां नित्य उन्मनी। लागे आम्हां॥ ६॥ समाधि शेज ज्ञानेसी। तुवां घातली अहर्निशी। ते कर्णी परिसत जिवेंसी। तुवां चरण धरित आलों॥ ७॥ नामा म्हणे ज्ञान सोपान। एक झाले जनीं जनार्दन। समाधि संग संतजन। अलंकापुरीं आले॥ ८॥

९८४. तंव निवृत्तीसी उन्मनी। बैसका होती सप्तदिनीं। ते पालटोनी तत्क्षणीं। मूर्ति ते न्याहाळी॥ १॥ निवृत्ति हें निधान। सोपान निजधन। ज्ञानदेव आपण। तिन्हीं मूर्ती॥ २॥ कोण भाग्याचे संतुष्ट। जेथें प्रगटलें वैकुंठ। विठ्ठलनामें पूर्ण पाठ। अलंकापुरीसी॥ ३॥ आदिक्षेत्र जुनाट। युगें सांगतां उद्धट। जें कां पुण्यरूप प्रगट। सांगतसे महिमा॥ ४॥ ऐसा उत्साह गमला। निवृत्ति ध्यानीं निवाला। सोपानें आलिंगला। ज्ञानराज॥ ५॥ निवृत्ति पाहे ज्ञानाकडे। येरू धावें लवडसवडे। तंव चरणरजामाजीं बुडे। मन निमग्न केलें॥ ६॥ तिन्ही देव एकत्र। सत्त्वरजतमादि मंत्र। हे गाताती नर जे स्तोत्र। उद्धरती सर्वदा॥ ७॥ नामा म्हणे तिन्ही देव। मिळाले गुणसागर वैभव। समाधि सेज माधव। देतु असे ज्ञानदेवा॥ ८॥

९८५. हस्त ठेविला माथया। ज्ञानदेव लागे पाया। विठोजी म्हणे लवलाह्या। समाधीस बैसावें॥ १॥ इंद्र चंद्र देव येती। ब्रह्मादिक गीतें गाती। यम वरुण बृहस्पती। विमानें दाटती अंतरिक्षीं॥ २॥ तंव पातले गरुडदेव। रुक्मिणी सत्यभामा भाव। राही माता गोपी सर्व। समाधि ज्ञानदेव पहावया॥ ३॥ ब्रह्मा इंद्र प्रजापति। सर्व अंतरिक्षीं पाहाती। अलंकापुरीं ये श्रीपती। हरुष चित्तीं ज्ञानदेवा॥ ४॥ ऋषिमुनी गणगंधर्व। पिशाच गुह्यक सर्व। ध्रुव अंबऋषि माधव। चित्तीं भाव पाहावया॥ ५॥ ऐसी दाटलीं विमानें। संत जाणताती ज्ञानें। ज्ञानदेव ब्रह्म होणें। हें विंदान विठ्ठलाचें॥ ६॥ जयजय शब्दें ध्वनि गर्जे। तेणें स्वर्ग मृत्यु पाताळ गाजे। पाताळीं शेष म्हणे भुंजे। प्रेमें भुंजे न समाये॥ ७॥ नामा म्हणे शिवादिकां। सिद्धेश्वरीं मिळाले सकळिकां। पाहाती विठ्ठल कौतुकां। ज्ञानदेव समाधीचें॥ ८॥

९८६. वेदाध्ययन केलिया मुनी। गंधर्व गायनें होतीं गगनीं। ब्रह्मादिक इंद्र विमानीं। इंद्रायणी ज्ञानदेवी॥ १॥ लागलिया मंगळतुरे ध्वनी। तीर्थे असतीं उभीं कर जोडुनी। विठ्ठलदेव ज्ञानसंजीवनी। नयनीं न्याहाळिती॥ २॥ राही रखुमाई माता। सत्यभामा गोपी समस्ता। आरतिया ओवाळिती निभ्रांता। ब्रह्मत्वरिता ज्ञानदेवा॥ ३॥ देवऋषिगण सकळ। जयजयकार ध्वनि मंजुळ। स्तुति स्तोत्रें सकळ। नक्षत्रादि गाती॥ ४॥ वरुषती दिव्य सुमनें। निवृत्ति सोपान नारायणें। संबोखिले संजीवनें। नित्य पारणें हरिपाठें॥ ५॥ परिसा भागवत डुल्लत। विठ्ठल झाला कृतकृत्य। नामा असे शोकाकुलित। चरणीं रत विठ्ठलाच्या॥ ६॥ शेज घालुनी सुमनीं। विठ्ठल पाहे रुक्मिणी। ज्ञानदेवाचे गुण मनीं। आठवित म्हणे हरी॥ ७॥ नामा झाला भयभित चित्तें। ज्ञानासारखें रत्न मागुतें। न देखों ऐसें विठ्ठलातें। पुसे त्वरित रुक्मिणी॥ ८॥

९८७. देवो म्हणती रुक्मिणी। हा एकची योगी देखिला नयनीं। हेंचि ज्ञान संजीवनी। जाण त्रैलोक्यासी॥ १॥ धन्यधन्य धरातळीं। जो यातें दृष्टी न्याहाळी। तो वाहात येईल टाळी। वैकुंठ भुवनासी॥ २॥ जो करील याची यात्रा। तो तारील सकळ गोत्रां। सकळही कुळें पवित्रा। याचेनि दर्शनें होती॥ ३॥ अलंकापुरी हें शिवपीठ। पूर्वी येथें होतें नीलकंठ। ब्रह्मादिकी तप वरिष्ठ। येथेंचि पैं केलें॥ ४॥ इंद्र येऊनियां भूमीसी। याग संपादिले अहर्निशीं। इंद्रायणी इंदोरिसी। पंचक्रोशी या पासुनी॥ ५॥ येथें त्रिवेणी गुप्त असे। भैरवापासुनि भागीरथी वसे। पूर्ववटि जे माया दिसे। ते प्रत्यक्ष जाणा पार्वती॥ ६॥ भोवतीं वनवल्ली वृक्षी। येथें देव येऊनी होती पक्षी। हे असे नित्य साक्षी। अस्थी नासती उदकीं॥ ७॥ पंढरीहूनी हें सोपें। जनाचीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हरावया पापें। कळिकाळ कोपलिया कोपें। न चले अलंकापुरासी॥ ८॥ ऐसें सांगता हरिसी। प्रेम ओसंडलें रुक्मिणीसी। म्हणे धन्य धन्य जयाची कुसी। ज्ञानदेव जन्मले॥ ९॥ नामा म्हणे माझा स्वामी। वसे संतसमागमीं। ऐसें सांगितलें ग्रामीं। अलंकापुरीसी॥ १०॥

९८८. तंव पुसती होय माता। तुम्ही झणे खेद करा चित्ता। तरी ज्ञानासारिखा कां आतां। समाधीसी बैसवितां॥ १॥ हें सांगावें सविस्तर। याचे कोण कोण अवतार। बंधु त्रिवर्ग हे साचार। आणि ते भगिनी॥ २॥ देव म्हणती ब्रह्मा होय। सोपानदेव नेणसी काय। निवृत्ति शिव ज्योतिर्मय। ज्ञानदेव ब्रह्मनिघोट॥ ३॥ ऐसे ब्रह्मा विष्णु हर। मुक्ताई ते मूळमाया साचार। तारावया चराचर। कलिमाजी अवतरले॥ ४॥ रुक्मिणी पुसे देवासी। कां कलिमाजी जन दोषी। हे घातली देवा पुसी। ते सांगती महाविष्णु॥ ५॥ तरी ऐके हे साचार चित्तें। तूं काय नेणसी न्यासातें। ग्रंथीं सांगितलें भारतें। कलिमाजीं जन दोषी॥ ६॥ कृष्ण अवतार झाला। पांडवी निजठाव टाकिला। तेथून एक शक झाला। जनमेजयापासुनि॥ ७॥ तया मागें विक्रमशक। पुण्य पवित्र सकळ लोक। कलियुगीं पुण्यश्लोक। उज्जनीये नांदती॥ ८॥ तेणें एक शत पंच तीस। हरिले कळिकाळा दोष। पुढें शालिवाहन व्हावयास। अवतार जाण पैठणीं॥ ९॥ तो हा शालिवाहन। अठरा हजार जाण। ते क्षेत्र प्रतिष्ठान। गंगातीरीं प्रत्यक्ष॥ १०॥ या शकामाजी प्रथम। राजा भोज उत्तम। मग पुण्यपुरुष जन्म। थोडे घेती कलियुगीं॥ ११॥ राजे भ्रष्ट यवन झाले। ठायीं ठायीं दोष जडले। मग इहीं अवतार घेतले। कलिदोष हरावया॥ १२॥ रुक्मिणी म्हणे स्वामी। सत्य सांगितलें तुम्ही। पुराण प्रसिद्ध आम्ही। अवतार चरित्रें जाणतसों॥ १३॥ नामा म्हणे पुढें हें जग। यवन संसर्गें कठिण। होता गाती हरीचे गुण। उद्धरती सर्वथा॥ १४॥

९८९. पुष्पक विमानातळीं। हरि उतरले भूतळीं। तंव उदयो पूर्वमेळीं। सूर्याचा जाहला॥ १॥ धन्य धन्य प्रश्नोत्तर। धन्य धन्य ते तरुवर। धन्य ज्ञानदेव अवतार। तिन्ही देव प्रगटले॥ २॥ संत सनकादिक देव। आणि भक्त आले सर्व। स्नानें करूनियां भाव। हरिचरणीं ठेविला॥ ३॥ विलाप मांडिला भक्तीं। खंति करिती त्रिजगती। ज्ञानदेवासारिखी मूर्ती। न देखो म्हणती देवराया॥ ४॥ देव म्हणती निवृत्ति। तूं प्रत्यक्ष शिवमूर्ति। तारावया क्षितीं। अवतार धरिला॥ ५॥ सोपानें घातलें लोटांगण। मुक्ताईनें धरिले चरण। संत करिताती स्तवन। पांडुरंग रायाचें॥ ६॥ मग संबोखोनियां हरी। ज्ञानदेवा देवो धरिला करीं। निवृत्ति मस्ताकवरी। करकमळ ठेवीतसे॥ ७॥ नारा विठा पुढें चाले। ऐसें इंद्रायणी गेले। सौंदडी वृक्षातळी बैसले। सहपरिवारें सकळही भक्त॥ ८॥ न्याहाळिती कांसव दृष्टी। ऐसा हरि चालत सृष्टीं। नामा होतसे हिंपुटीं। ज्ञानदेवा कारणें॥ ९॥

९९०. तंव अंतरिक्ष गगनीं। अवचिती झाली वाणी। भक्त तरतील मेदिनी। ज्ञानदेव दर्शनें॥ १॥ ऐसी खवाणी वदली। जयजयकारें टाळी पिटली। तंव स्नानसंध्या सारिली। देवभक्ति सकळिकीं॥ २॥ धन्य धन्य वृक्ष अजान। धन्य धन्य सिद्धेश्वरस्थान। ज्ञानदेवा समाधान। धन्य अलंकापुरी॥ ३॥ मग पाहोनियां शुभदिन। देवें करूं आदरिलें प्रयाण। नामा होतसे खेदें क्षिण। ज्ञानदेवा कारणें॥ ४॥

९९१. मम प्रश्न आदरिला। नामा स्फुंदो जो लागला। कां गा ज्ञानदेवो गेला। मज सांडूनियां॥ १॥ कैसा होय तुझा दास। कैसी पाहो तुझी वास। ज्ञानाकारणें कासावीस। जीव माझा होतसे॥ २॥ देव म्हणे नामयासी। तूं झणी कासावीस होसी। तूं रे तयातें नेणसी। तें कैसें आईक॥ ३॥ ज्ञानदेव भवसिंधु तारू। प्रत्यक्ष रूपें पैं असें॥ ४॥ ज्ञानदेव ज्ञानगम्य। ज्ञानदेव ज्ञानधर्म्य। ज्ञानदेव ज्ञाननेम। सर्वथैव पैं असे॥ ५॥ ज्ञानदेव हाचि देव। ज्ञानदेवी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

धरलिया भाव। ज्ञान होईल जीवां सर्व। यासी संदेह नाहीं॥ ६॥ ज्ञानदेवीं धरितां ध्यान। ध्यातां होय समाधान। जीव शिवीं परिपूर्ण। एके रात्रीं कीर्तन केलिया॥ ७॥ झणें तूं व्याकुळ चित्तें। मनीं आठवीं गा मातें। नामस्मरणें एकाग्र चित्तें। रामकृष्ण गोविंद॥ ८॥ नामा म्हणे तूं समर्थ होसी। अर्जुना प्रीति करिसी। हें सांगितलें व्यासीं। एकादशाध्यायीं॥ ९॥ तैसा पावे तूं विश्वेशा। विश्वरूपा जगन्निवासा। मी होतसे कासावीसा। ज्ञानदेवाकारणें॥ १०॥ तरी तूं गा युगानयुगीं। असशी भक्तांचिया संगीं। आम्ही विनटलों पांडुरंगीं। रंगारंगीं विठ्ठलीं॥ ११॥ एक वेळा माझा शोक। दुरी जाय हरे विख। तें करी निर्विशेष। नामा येतसे काकुळती॥ १२॥

९९२. तंव नावेक श्रीहरी। तटस्थ घटिका चारी। ध्यान धरूनी अंतरीं। निश्चल राहिला॥ १॥ जयशब्दें नामा बोभाये। केशवा गा त्राहे त्राहे। मी व्याकूळ होताहे। ज्ञानदेवाकारणें॥ २॥ नारायणा त्राहे त्राहे। कृपादृष्टि तूं रे पाहे। मी व्याकुळ होत आहे। ज्ञानदेवाकारणें॥ ३॥ तुझेनि दर्शनें। ज्ञानाचेनि अवलोकनें। मज पंढरी असणें। तुझे चरणीं गा विठ्ठला॥ ४॥ आतां मज तूं सांभाळी। ज्ञानदेवावीण सदाकाळीं। मज न कंठे निशी। मंडळीं भानुसहित वर्ततां॥ ५॥ तूं माझी जनक जननी। परि ज्ञानदेवावीण मेदिनी। शून्य वाटे मजलागुनी। जैसे मत्स्य जीवनेवीण॥ ६॥ तूं रक्षिता सर्व जीवासी। तरी कां दुःख दिधलें आम्हांसी। तूं जवळी असतां हृषीकेशी। ऐसी दशा हे प्राप्त॥ ७॥ नामा खेदें क्षीण झाला जीवें। तंव नेत्र उघडिले देवें। आलिंगिला केशवें। चारी भुजा पसरुनी॥ ८॥

९९३. नामा न राहे खेद करूं। केशव ठेवी अभयकरू। म्हणे तूं दुःखिया थोरू। ज्ञानदेवा कारणे॥ १॥ धन्य धन्य तुम्ही भक्त। नित्य विष्णुचरणीं रत। पुण्यशील भाग्यवंत। ज्ञानदेवा नामया॥ २॥ तुमचेनि जन हे कृतार्थ। कवित्वें तरेल हें सत्य। माया मोहें निरस समस्त। नामस्मरणें तुमचेनी॥ ३॥ धन्य ज्ञानदेव ज्ञानशिळ। ज्ञानदेवा ऐसा सुढाळ। मी न देखें भूमंडळ। सकळी पाहतां॥ ४॥ तूं करिसी खेद त्याचा। तरी तो नामा आत्मा साचा। भाव सांडी सांडी द्वैताचा। निखळ रूपें पाहे पां॥ ५॥ तुम्ही भक्त अवघे उदिते। तुमचेनि साजिरे पूर्णचित्तें। मज पंढरीसी येणें आवडतें। नाम गाताती प्रीती॥ ६॥ पुंडलिक माझा भक्तसखा। परी प्रेमळ तुम्ही विशेषा। तुमचेनि सर्व दुःखा। हरिलों हें जाणावें॥ ७॥ नामा म्हणे ज्ञानदेवाचें। मज दर्शन होईल साचें। तरीच रंगणीं मी नाचें। श्रीहरिकीर्तनीं पंढरीसी॥ ८॥

९९४. ऐसें परिसलें विठ्ठलें। तव रुक्मिणीनें विनविलें। याचें करी जा जें म्हणितलें। हाकारिजे पुंडरिक॥ १॥ धन्य धन्य धरातळीं। वोळले वोळले वनमाळी। वैष्णवीं पिटिली टाळी। जयजय शब्दें करूनिया॥ २॥ गरुडासी सांगें केशव। कैसा यासी भेटेल ज्ञानदेव। पुंडरिकासी जाउनी सर्व। वृत्तांत सांगेयेथींचा॥ ३॥ तेणें नमस्कारूनि हरी। निघाला पक्षाच्या फडत्कारी। भेटला पुंडरिकासी झडकरी। यथाविधीने सांगितलें॥ ४॥ पुंडरिक विस्मित चित्तीं। म्हणे धन्य धन्य ज्ञानमूर्ती। ज्या कारणें वैकुंठपती। अलंकापुरीस गेले॥ ५॥ धन्य धन्य विठोबाचे चरण। धन्य धन्य माझे नयन। धन्य नामा ऋषि संपन्न। विष्णुभक्त सखा माझा॥ ६॥ मग गरुडासि पुसिलें। ज्ञानदेवा हाकारिलें। दिव्य विमानीं बैसविलें। चला म्हणितलें अलंकापुरीसी॥ ७॥ नामा असे खेद करीत। केशव तयासी संबोखित। तुम्हां दोघांचा एकांत। माझेनि संगें पुरेल॥ ८॥

९९५. पुढें चालिला गरुड। आक्रमित अवघें ब्रह्मांड। मागें विमान शुभ्र प्रचंड। पुंडलिक आणितसे॥ १॥ धन्य हरिभक्तांचा मेळ। धन्य धन्य ते गोपाळ। धन्य धन्य अलंकापुरी सुढाळ। ज्ञानदेव येतसे॥ २॥ दुरोनी लक्षित रुक्मिणी। हरुषें सांगे चक्रपाणि। पैल विमान येतसे गगनीं। दाखवीतसे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामया॥ ३ ॥ मग नामयासी सावध। करूनियां तो गोविंद। म्हणे तुझा पुरविला छंद। पैल ज्ञानदेव येताहे॥ ४॥ नेत्र विकासीत पाहे। तंव गगनीं विमान दिसताहे। पुंडरिक गरुड आहे। दिव्य देहीं विमानीं॥ ५॥ ऐसा जंव तटस्थ घटिका। तंव उतरलें निमिष्य एका। नामा पावला संतोषा। ज्ञानदेवा देखोनी॥ ६॥ विमान घटिका गर्जत। ज्ञानदेवपुढारा चालत। जी जी रुक्मिणी म्हणत। वेगु कीजे ज्ञानदेवा॥ ७॥ नामा ज्ञानदेव भेटले। पुंडरिकें विष्णु नमस्कारिले। भक्ती जयजय शब्द केले। देवीं पुष्पवृष्टि केलिया॥ ८॥

९९६. आलिंगन पडिलें दृढ। मिठी न सुटे पडिलें गूढ। पुंडरिक म्हणे मज चाड। या विठ्ठलचरणाची॥ १॥ तुझे दरुषनें माझा लाभ। जैसा ज्ञानदेवावरी लोभ। नामदेवावरी स्वयंभ। तैसाचि करी विठ्ठला॥ २॥ नामदेवा आलिंगिलें प्रीतीं। शिर चरणावरी अवचितीं। ज्ञानदेवाच्या ठेवी पुढती। म्हणे धन्य क्षितीं मी एक॥ ३॥ पुंडलिक म्हणे नामया। धन्य धन्य तुझा थाया। क्षितीं आणिलें वैकुंठराया। ज्ञानदेवाचेनि स्मरणें॥ ४॥ धन्य धन्य युगानयुगीं तुम्ही। धन्य देखिलें तीं आम्ही। धन्य अलंकापुरी जन्मीं। उपजोनी जो देखेल॥ ५॥ पंढरीहुनी हें मूळपीठ। जुनाट पैं वैकुंठ। पूर्वी येथें होते नीळकंठ। ब्रह्मा विष्णु रुद्र इंद्र॥ ६॥ तें हें शिवक्षेत्र प्रत्यक्ष। पूर्वें मातुलिंग साक्ष। तेथेंही केशव प्रत्यक्ष। चतुर्भुज रूपें असे॥ ७॥ दक्षिण पुण्येश्वर देवो। नागेश्वर महादेवो। मूळपीठीं नागेंद्री पहावो। त्रिवेणीरूपें वाहातसे॥ ८॥ पश्चिमे इंदुरिये देवो। ब्रह्मेश्वर उत्तम ठावो। उत्तरे सिद्धेश्वर देवो। खेटक ग्रामीं भागीरथी॥ ९॥ मध्यस्थळीं हे इंद्रायणी। सरसी भागीरथी वाहिनी। सिद्धेश्वर शोभे स्थानीं। ज्ञानदेवो सहित॥ १०॥ ये दक्षिण वाहिनीसी। स्नान घडतां अहर्निशीं। कोटि तीर्थ प्रयाग काशी। प्रसन्न होती हरिहर॥ ११॥ ऐशी ये तीर्थी देवा। समाधि दिधली ज्ञानदेवा। पुंडरिक विनवीतसे केशवा। धन्य भाग्य नामयाचें॥ १२॥

९९७. स्वर्ग मृत्यु पाताळ तिन्ही ताळें उदार। विराटले थोर विश्वरूप॥ १॥ समाधि-संजीवन निवृत्ती फावलें। तें निधान देखिलें आम्हीं तुम्हीं॥ २॥ निवृत्ति सोपान ज्ञानदेव निधी। मुक्ताई सिद्धि अलंकापुरीं॥ ३॥ पंढरी प्रत्यक्ष केली ज्ञानदेवें। उभारूनि बाहे सांगे आम्हा॥ ४॥ कलिकाळासीं त्रास विठ्ठल उच्चारीं। हरि चराचरीं भरला असे॥ ५॥ सर्वत्र सबाह्य अंतरंग रूपडे। तें रूप फाडोवाडो पारखिलें॥ ६॥ चिंतामणीचें सार कल्पतरु उघडें। दावूनियां मूढां तारियेलें॥ ७॥ सुवर्णाचा पिंपळ तिन्ही लोकीं ठाउका। त्या त्या समीप देखा कल्पतरू॥ ८॥ सिद्धेश्वरलिंगी सिद्धिबुद्धि दाता। जड जीवा मुक्तता देतु हरी॥ ९॥ ऐशीये स्थान कीं ज्ञानदेव राहिले। राहुनी तारिलें मूढजनां॥ १०॥ नामा म्हणे ज्ञानदेव हा दातार। जड जीवा उध्दार विठ्ठल हरी॥ ११॥

९९८. तंव तेथें नवल वर्तलें। आकाश असे विमानीं दाटलें। म्हणती मूळपीठ वैकुंठ देखिलें। पुंडलिक सकट॥ १॥ पंढरीहूनि आलें कैसें। पुंडलिक देव सरसे। ज्ञानदेवासवें नामा असे। आणि विष्णुभक्त अपार॥ २॥ राहि रुखमाई सत्यभामा। गाई गोपाळ मेघश्यामा। म्हणती पहा हो महिमा। या विष्णुभक्तांचा॥ ३॥ सवे ध्रुव प्रल्हाद अंबऋषी। रुक्मांगद सूर्यवंशी। आणि ऋषिमुनी तापसी। ऐसे सहित वनमाळी॥ ४॥ बळी भीष्म नारद। उद्धव अक्रूर विद्गद। आणि बिभिषण सुबुद्ध हनुमंतादि करूनि॥ ५॥ हा हा हूहू गंधर्व गाती। रुणुझुणु रुणुझुणु विणे वाजती। देवांगना आरती ओवाळिती। देवभक्तांसहित॥ ६॥ ऐसा शुभ काळ समयो। झाला भाग्याचा उदयो। ज्ञानदेव नामदेव पहा हो। धन्य धन्य धरातळीं॥ ७॥ नामा उघडी दृष्टीसी। हृदयीं ध्यातुसे हृषीकेशी। ज्ञानदेवो निजमानसीं। विष्णुमूर्तीशीं लीन झाला॥ ८॥

९९९. तंव बोलत उद्धव। धन्य धन्य हा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देवाधिदेव। धन्य धन्य ज्ञानदेव। प्रियभक्त आवडता॥ १॥ धन्य तीर्थ इंद्रायणी। धन्य धन्य प्रत्यक्ष शूळपाणी। तारक ब्रह्म त्रिवेणी। मिश्रित रूपे वहातसे॥ २॥ चिंतामणी हे पाषाण। दिव्य वनवल्ली जाण। जेथें लागले हरीचे चरण। ते धन्य अलंकापुरी॥ ३॥ येथें समाधीसी बैसतां। इंद्रादि सामोरे येती तत्त्वतां। वैकुंठा जाईल निभ्रांता। रामकृष्ण उच्चारीत॥ ४॥ यम न पाहे इकडे। काळ नमस्कारी वाडेंकोडें। म्हणती पाहा हो केव्हढें। भाग्य या ज्ञानदेवाचें॥ ५॥ ऐसें उद्धव सांगे रुक्मिणी। होय म्हणती चक्रपाणि। पंढरीहूनि हे जुनाट पुराणीं। शैवागमीं बोलिलेंसे॥ ६॥ ज्ञानदेवें नमस्कार केला। नाम हृदयीं धरिला। प्रीतीनें पुढती आलिंगिला। म्हणे धन्य धन्य रे सखया॥ ७॥ नामा लोळत गडबडां। चरणरजालागीं झाला वेडा। केशव म्हणे तूं धडफुडा। विष्णुभक्त साचार॥ ८॥

१०००. ऐशी प्रदक्षणा करूनी विष्णुभक्तां। नामा जाहलासे सरता। रुक्मिणी म्हणे तत्त्वतां। निजभुवनासी न्यावें॥ १॥ नामा म्हणे नेघे मुक्ति। मज पंढरीची आर्ती। विठ्ठलनामें करीन कीर्ति। नित्यकाळ जीवन्मुक्त॥ २॥ मज नित्य मुक्ति जन्म नाहीं। केशवासी माते पुसोनि पाही। युगायुगीं अवतार दाही। याचेनि संगें मज घडती॥ ३॥ तिहीं त्रिभुवनीं उदार। मुक्ति तुम्हांपाशीं साचार। परि भक्तिविण मुक्ति असार। कोण पामर इच्छिल॥ ४॥ मुक्ति फलकट नैश्वर। फळ एक विठ्ठल सागर। विष्णुभक्तिसी ज्यांचा निर्धार। त्यांचे चरण वंदीन माथां॥ ५॥ विष्णुवीण कीर्तन न करी। भक्तिविण नसे क्षणभरी। कीर्तन करीन गजरीं। राम कृष्ण गोविंद॥ ६॥ मज नामामृत हरी। माझें मुक्ति दास्य करी। तूं मूळमाता जाणसी जरी। तरी तुजसी हें गुह्य बोलिलों॥ ७॥ नामदेव परतोनी पाहे। तंव ज्ञानदेवें उभारिले बाहे। म्हणे विष्णुभक्ति ऐसी आहे। ऐक माते साचार॥ ८॥

१००१. भक्त अमर स्वर्गिक्षेम। चरणरजें डौरलें व्योम। मग कैलासीं मंदाकिनी सोम। नीळकंठे शिरीं धरिला॥ १॥ धन्य विष्णुचरणींची गंगा। स्नपन होत महालिंगा। भीमरथीं मृत्युलोकीं सर्वांगा। इंद्रायणी समरस॥ २॥ भोगावती पाताळा गेली। मग विष्णुचरणीं गुप्त ठेली। मग पुरोनिया उरली। त्रिंबकशिखरीं॥ ३॥ मग किती काळी भागीरथी। भगीरथें आणिली सारथी। सगर उद्धरिले त्वरिती विष्णुतीर्थे करूनियां॥ ४॥ ऐसी त्रिभुवनीं ज्यासी थोरी। तो मुकुटमणी हा हो श्रीहरी। त्यांतें सोडलिया मुक्ति चारी। काय आम्हां तारितील॥ ५॥ सर्वतीर्थे ज्याचे रंक। आम्ही तयाचे सेवक। ज्याचेनि नामें हें त्रैलोक्य। नाम घेतां तरती॥ ६॥ तो पूर्ण बीज मंत्र आम्ही जाणों। विष्णुवीण कांहीं नेणों। पूर्ण ब्रह्म काय म्हणो। हा महिमा तूं जाणसी॥ ७॥ ज्ञानदेवें नमस्कारिलें हरी। निवृत्ति सोपान झडकरी। मुक्ताई भेटली लवकरी। ज्ञानदेवा करीं धरियेलें॥ ८॥

१००२. मग संतोष झाला हरिभक्तां। ज्ञादेव झाला बोलता। निवृत्तीसी म्हणे तुम्ही जावें आतां। त्रिंबकशिखरासी॥ १॥ करा नमस्कार हरीसी। वेगीं जावें वैकुंठासी। नित्य हरिचरणापाशीं। तुम्ही आम्ही सोपान॥ २॥ मुक्ताई म्हणे ज्ञानदेवा। मज विठोबासी निरवा। मजवरी लोभ असो द्यावा। रुक्मिणी माता आदिकरून॥ ३॥ पुंडलिकासी निरवावें। समस्तांसी क्षेम सांगावें। कृपादृष्टि अवलोकावें। मजलागीं ज्ञानदेवा॥ ४॥ ज्ञानें करूनि विज्ञान। भक्तीसी करावें निरोपण। द्यावें समाधि संजीवन। तुम्ही यावें शीघ्रवत॥ ५॥ निवृत्तीनें दिधलें उत्तर। आम्ही जाऊं वेगवत्तर। सोपानासी मार्गी निरंतर। समाधीसी बैसवूनि॥ ६॥ तंव बोलिला यादवराणा। तुम्ही समाधीच्या मागितल्या खुणा। परी नामयावरी जाणा। माझी कांसवदृष्टी॥ ७॥ नामा म्हणे विठोबासी। तूं स्वामी दीनाचा होसी। गेलें निधान ज्ञानदेव दाखविशी। मज नयनीं प्रत्यक्ष॥ ८॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१००३. ऐसे बोलोनियां हरी। रुक्मिणीसी विचार करी। यासी भोजनें परोपरी। अन्नें निपजावीं॥ १ ॥ संतोष झाला हरिभक्तां। जेथें स्वयें हरि भोक्ता। कर्ता आणि करविता। सर्व चालक विठ्ठल॥ २ ॥ तंव दिव्यग्राम उभवुनी। भक्तीं देखिले नयनीं। विश्वकर्मा येउनी। उत्तरापंथें निर्मिलें॥ ३ ॥ तंव अष्टमहासिद्धी। सर्व सामग्रीची समृद्धी। कर जोडोनी कृपानिधी। विनवीती आनंदें॥ ४ ॥ दिव्यवनें दिव्यवल्ली। दिव्यसुमनें समग्र झालीं। वैकुंठीहूनि आलीं। महाविष्णु कारणें॥ ५ ॥ तेथें सुगंध परिमळ। जवादीकस्तुरी निर्मळ। चिंतामणी देती ढाळ। नानाकीळ दीप्तीचे॥ ६ ॥ चंदनाचे खांब उभारिले। पवळ वेलीचे शोभले। मुक्ताफळांचे घोस मिरवले। रत्नखचित चामरें॥ ७ ॥ चंपक सुमनाची हारी। सेवंती बटमोगरे नानापरी। नानापुष्पीं परिमळ आगरीं। दिव्यवनें कीं शोभती॥ ८ ॥ आंबे खजुरिया पोफळी। फणसें नारिंगें नारळी केळी। कर्दळी वाढीनलीया सरळी। उदक पाट वाहताती॥ ९ ॥ तेथें भ्रमर रुणझुणती। गोपाळ वेणु वाजविती। नानापरी बागडे धरिती। देव पाहती विमानीं॥ १० ॥ तेथें थकलीं योगियांचीं ध्यानें। निश्चल राहिलीं आसनें। निवृत्ति सोपानें। तेथें देवडे उभे असती॥ ११ ॥ नामा जातो लोटांगणीं। वैकुंठ उतरलें मेदिनीं। अलंकापुरी पाटणीं। उत्तरामुख देखिलें॥ १२ ॥

१००४. ऐसें देखिलें वैष्णवीं। वैकुंठ नगरीं चिरंजीवी। आणि ज्ञानदेव गोसावी। विष्णुमूर्ती चतुर्भुज॥ १ ॥ तलालोरी वाजविती पांवा। समाधान होतसे जीवा। नामा विनवितो केशवा। तुझ्या दरुषनें निवालों॥ २ ॥ तंव रुक्मिणीनें विनविलें। यासी भोजन सारा कीं वहिले। तंव अक्रूरें पाचारिलें। समस्तांसी देखा॥ ३ ॥ उद्धव घालीत आसनें। ताटें विस्तारिलीं बोणें। राही रुक्मिणी विचक्षणें। पंचामृतें वाढिती॥ ४ ॥ समस्त भक्त दाटले। पांथीकर एकवटले। नानापरी भात विस्तारिले। परिमळीत घमघमा॥ ५ ॥ वरी मिरवे मुगांचें वरण। कथिका वाढिली संपूर्ण। नाना कोरिके विस्तीर्ण। रुक्मिणी वाढितसे॥ ६ ॥ कामधेनूचें घृत। पयोदधिक्षीर वाढित। नानापत्र शाखा शोभत। वैष्णवांच्या ताटीं॥ ७ ॥ ऐसें समस्तांसी संपूर्ण। ताटें जालीं विस्तीर्ण। तंव देव बोलती आपण। ज्ञानदेवासी॥ ८ ॥ निवृत्ती सोपान बोलवा। मुक्ताईस वेगीं आणवा। पांथिकरासी रिघावा। ताटीं बैसवासमस्तांसी॥ ९ ॥ विष्णुमूर्ती चतुर्भुज। पूजी ब्राह्मण द्विभुज। तुळसी मंजिरी केसीराज। त्यांचे मस्तकीं वाहतसे॥ १० ॥ चरणतीर्थ घेतलें। तेणें समस्त मंदिर शिंपिलें। आपण मुखीं घातलें। म्हणे कृतकृत्य झालों मी॥ ११ ॥ नामा तिष्ठत उभा द्वारीं। त्यासीही रुक्मिणी ताट करी। ऐशी भोजनें परोपरी। वैष्णवांची झालीं॥ १२ ॥

१००५. ऐसे भक्त जेवुनि धाले। समस्त पांथिक उठिले। गोपाळें विडे दिधले। आपुलेनि करकमळें॥ १ ॥ धन्य धन्य तें भोजन। धन्य धन्य तें अंजन। धन्य नारायण अलंकापुरीं॥ २ ॥ विठ्ठलें दिधलें वचन। यांसी घाला रे आसन। तंव उद्धवें आपण। समस्तां बैसकार दिधले॥ ३ ॥ पूजिले गंधाक्षता लावुनी। टिळे उटी कर्पुर चंदनीं। ऐसे तिये वैकुंठभुवनीं। वैष्णवांसी पूजी हरी॥ ४ ॥ तंव म्हणे रुक्मिणी। नामा आणा बुझावूनी। आपलेनि हातें चक्रपाणि। त्यासी ग्रास घालावे॥ ५ ॥ ऐसें सांगतां हरीसी। बुझाविती नामयासी। तो स्फुंदत उकसाबुकसी। मग चहूंकरीं उचलिला॥ ६ ॥ सवें संतांचा मेळा। तयामाजीं परब्रह्म सांवळा। नामा बुझावोनि तात्काळ। देहावरी आणिला॥ ७ ॥ तंव विस्तारूनी आणिलीं ताटें। षड्रस अन्न बरवंटें। रुक्मिणी आणी जेथ वैकुंठ। भक्तांसहित उभा असे॥ ८ ॥ नामयातें संबोखोनि हरी। बैसविला मांडियेवरी। कवळ घ्यावया मुख पसरी। चहूंकरीं हरी घालीतसे॥ ९ ॥ नामा आनंदें डुल्लत। तृप्त झाला प्रेमें ओसंडत। सकळ संतां कवळ देत। आपले निज करें॥ १० ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१००६. ऐसा कळवळा भक्तांचा। भोक्ता हरी वैकुंठीचा। उतरोनी अलंकापुरीं साचा। करी भक्तांचा उत्सव॥ १॥ ऐसे जेवुनी धाले। हरी करीं निवाले। मग सुखें रहिवासले। सकळ भक्त वैकुंठीं॥ २॥ देव म्हणती निवृत्तीसी। तुम्हीं जावें त्रिंबकशिखरासी। मग समाधी सरशी। गंगोदकें करूनि घ्यावी॥ ३॥ तंव सोपान म्हणे स्वामी। पूर्वी बोलिलेते तुम्ही। करेपाठार संवत्सर ग्रामीं। समाधी देवा म्हणोनी॥ ४॥ देव म्हणती संतांसी पुसा। हा ज्ञानदेव असे सरिसा। हाही दिव्यदेही आम्हांसरिसा। येईल तेथवरी॥ ५॥ मुक्ताई म्हणे देवाधिदेवा। आम्ही करावी चरणसेवा। तुझेनि विचारें जी केशवा। समाधीधन भक्तांसी॥ ६॥ ऐसा करिती विचार। तंव पातले राजा इंद्र। भक्तीं केले जयजयकार। देवें दुंदुभी वाजविल्या॥ ७॥ संतसनकादिकीं स्तोत्रें। मुखीं आरंभिलीं पवित्रें। गाती हरिनाम चरित्रें। ऋषिगण सकळीक॥ ८॥ धन्य अलंकापुरी ग्राम। जेथें प्रत्यक्ष पुरुषोत्तम। उतरोनि वैकुंठधाम। सोहळा करी भक्तांचा॥ ९॥ नामा नाचे हरिचे द्वारीं। ब्रह्मांड गरजे जयजयकारी। निवृत्ति सोपान म्हणे हरी। आम्हां निरंतरीं सांभाळी॥ १०॥

१००७. नानागंधें तुळसी माळा। वैष्णवीं घातलिया गळा। नमस्कार करिती गोपाळा। चरणरजा वंदिती॥ १॥ दोहा बाही दुहुडे। संतसनकादिक गाढे। जयजयकार पुढें। महाशब्द गर्जिन्नले॥ २॥ ऐसे इंद्रायणीच्या तटीं। हरी रुक्मिणी जगजेठी। संतसनकादिकांची गोमटी। मांदी मिळाली असे॥ ३॥ तंव पुंडरीकें नमस्कार केला। म्हणे तूं कां गा येथें विठो उगला। बहुत दिवस येथेंचि राहिला। या ज्ञानदेवाकारणें॥ ४॥ तरी पंढरीहुनि हें श्रेष्ठ। तूं येथें उभा अससी प्रगट। भूमीं उतरलें वैकुंठ। ज्ञानदेवाकारणें॥ ५॥ बहुत दिवस येथेंचि जालें। मी न देखें विटेवरीजंव पाउलें। तंव नयन माझे भुकेले। न राहाती देवराया॥ ६॥ देव म्हणती पुंडरिका। तूं भक्त माझा निजसखा। आणि हा ज्ञानदेव देखा। दुजा न देखों त्रिभुवनीं॥ ७॥ हे संतसनकादिक माझे। यांचेनि समागमें माझे बिजें। नामा डौरिन्नला यांचे चरणरजें। मग जावें पंढरीसी॥ ८॥

१००८. सर्व तीर्थे मिळालीं अनंतें। ते सुखी करुनी कृतार्थे। संवत्सरां जावोनी सोपानातें। समाधीसी बैसवूं॥ १॥ अनंतसुखाचिया रासी। उदेल्या भक्तांचिया मानसीं। आनंद झाला पुंडरिकासी। मग न बोलें कांहीं॥ २॥ सोपान म्हणे वैकुंठा। बीजें किजो जी श्रेष्ठा। संवत्सर ग्राम कऱ्हे तटां। वैकुंठासहित चालावें॥ ३॥ इंद्र चंद्र ब्रह्मादि देव। आणि गण मिळाले सर्व। तेहतीस कोटी देव। विमानीं आरूढले देखा॥ ४॥ निवृत्ति सोपान ज्ञानदेव। त्रिमूर्ति तिन्ही देव। धर्मरक्षणार्थ पहा हो। मनुष्यरूपें अवतरले॥ ५॥ तिघेही उभे सन्मुख। तिघांही थोर संतोष। विनविती केशवास। स्वामी विनंति अवधारिजे॥ ६॥ ये अलंकापुरीसी। स्थापावें कोटी तीर्थांसी। जो जो भक्त येईल स्नानासी। तया वैकुंठा आणावें॥ ७॥ ऐसें ऐकोनी श्रीहरी। म्हणे धन्य धन्य तुमची वैखरी। जगदोद्धार केला संसारीं। बावीस वरुषें असतां पैं॥ ८॥ जो जो दिवस उगवला। तो तो ज्ञानदेवें सफळ केला। पद पदांतर कथिला। जेणें आत्माराम संतोषे॥ ९॥ पूर्वी अनंत भक्त जहाले। पुढेंही भविष्य बोलिलें। परी निवृत्ती ज्ञानें सोडिविलें। अपार जीव जंतु॥ १०॥ जो अभक्त मनुष्यगण प्राणी। ज्याचा भार न साहे मेदिनी। मग इहीं अवतार घेउनी। जग तारिलें कीर्तनें॥ ११॥ नामा पंढरीस नाचत। ज्ञानेश्वर अलंकापुरीं शोभत। सोपान संवत्सरीं मिरवित। निवृत्ति त्रिंबकशिखरीं॥ १२॥

१००९. ऐसें पांडुरंग बोलिले। मग सकळ तीर्थांसी सांगितलें। अलंकापुरीं वसिजे वहिले वहिले भक्त तारावया॥ १॥ जो जो करील कीर्तन। तो तो तरेल जाण। अलंकापुरीं नारायण। स्वयें उभे असती॥ २॥ ऐसा निरोप तीर्थांसी। ते तिष्ठति

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अहर्निशीं। कीर्तन करितां गजरेंसी। वैकुंठासीं नेवो म्हणती॥ ३॥ देव म्हणे यमुना नर्मदा। त्रिवेणी भागीरथी त्रिविधा। गंगा कृष्णा तुंगभद्रा। इंद्रायणीस मिळावे॥ ४॥ जो जो भक्त येईल स्नाना। तो पवित्र करावा येसणा। वैकुंठ कैलासापर्यंत जाणा। त्यासी घेउनी यावें॥ ५॥ हो म्हणती तीर्थे सकळें। मग मिनली आपुलेनि मेळें। गुप्त राहोनी यथाकाळें। आज्ञा शिरसा वंदिती॥ ६॥ गया काशी त्रिवेणी। त्या शोभती विठ्ठलचरणीं। ज्ञानदेव समाधि रंगणीं। अखंड वाहो लागल्या॥ ७॥ सुवर्णाचा अश्वत्थ। द्वारीं स्थापूनि निवास। भोंवते देव्हडे तापस। समाधीस बैसले॥ ८॥ देव म्हणे जो करील तप। तो होईल निष्पाप। केवळ होईल शिवरूप। आत्माराम साक्षात॥ ९॥ जप तप नेम मंत्र जाण। कोटि याग घडेल जाण। अथवा द्विजीं दिधलिया अन्न। चतुर्भुज नर होती॥ १०॥ ऐसें वचन सांगे हरी। ज्ञानदेवासी धरिलें करीं। निवृत्ति सोपान अंतरीं। ध्यान धरोनी राहिले॥ ११॥ नामा म्हणे कोटि तीर्थांचें। तीर्थ ओळलें पैं साचें। पाप जाईल अनंत जन्मांचें। एक स्नान केलिया॥ १२॥

१०१०. मग अष्टदिशा व्यापुनी। तीर्थे राहिलीं स्थानीं स्थानीं। अलंकापुरीं पाटणीं। इंद्रायणीच्या तटीं॥ १॥ धन्य धन्य सृष्टीतळीं। अलंकापुरी महीतळीं। कीर्तन करितां वैष्णव मेळीं। ते चतुर्भुज नर होती॥ २॥ मग पुंडरिकासी सांगितलें। कृष्णपक्षीं येथें पाहिले आलें। येरू म्हणे स्वामीनें सांगितलें। तें शिरसा वंदीन॥ ३॥ देव म्हणे आम्ही तुम्ही। पंढरीहूनि समागमीं। येऊनि अलंकापूर ग्रामीं। सकळ तीर्थांसहित॥ ४॥ मग व्यास वाल्मिक बोलाविले। त्यांसही हें तीर्थ सांगितलें। तिहीं शिवपीठ ऐसें म्हणितलें। जुनाट असे केशवा॥ ५॥ या शिवतीर्थाचा महिमा। कवणा वर्णवेल पुरुषोत्तमा। पंढरी पांडुरंग महात्मा। भीमातीरही उत्तम॥ ६॥ आणिक आईके वो सर्वोत्तमा। येथें अधिक अष्टतीर्थ महिमा। पंचक्रोशीची उपमा। सिद्धि होती तात्काळ॥ ७॥ ब्रह्मा विष्णु इंद्र तप। आणि योगेश्वर उमप। पाताळीं शेष समीप। याज खालता आहे॥ ८॥ स्कंदासी उपदेशस्थान। लोहोगिरीसी येऊन। पुरुरवा पुण्यक्षेत्र महिमान। पूर्वी येथूनीचि जालें॥ ९॥ येथून भीमरथी नदी। भीमाशंकरा घेऊनि गेला नंदी। तेथुनि उगमीं पडली सर्वां आधीं। मग शंकरें तेथें स्नान केलें॥ १०॥ तें हें भीमा माहात्म्य प्रसिद्ध। तो हा सिद्धेश्वर अगाध। महा योगेश्वर निजबोध। अलंकापूर पाटणी॥ ११॥ ऐसें व्यासें बोलतां ते क्षणीं। नामा गेला लोटांगणीं। समाधी मूळपीठ स्थानीं। अलंकापुरीं ज्ञानदेव॥ १२॥

१०११. मग व्यासपूजा सारिली। तैसीच वाल्मिकाची केली। वसिष्ठादिकीं अंगिकारिली। समस्त ऋषि पूजियले॥ १॥ धन्य धन्य धरातळीं। येऊनियां देवीं सकळी। माजी सहित वनमाळी। अलंकापुरीं नगरीये॥ २॥ मग साठीं तीनशें गंगा। माजी शीव द्वादशलिंगा। अष्टोत्तरशें तीर्थे पैं गा। तिहीं तप आरंभिलें॥ ३॥ कोटी तीर्थांचा रहिवासा। वसती कोटी गणेश। अष्टभैरव सावकाश। साठीसहस्त्र गणांसहित॥ ४॥ ऐसे रहिवासले षण्मास। दिव्य द्रुम फळें प्रतिदिवस। दिव्य अन्नें सावकाश। अमृत भक्षिती देव॥ ५॥ ऐसा सकळ तीर्थांचा मेळा। तयामाजी परब्रह्म पुतळा। करी ज्ञानदेवाचा सोहळा। अलंकापुर नगरीये॥ ६॥ गरुड हनुमंता ऐसे। पुढें कामारी हृषीकेशें। साक्षात वसिजे महेशें। गौरीसहित अलंकापुरीं॥ ७॥ नंदिभृंगी शंख त्राहाटण। प्रतिदिनीं विभूतीचें उधळण। जयजय शंकर शिवपूर्ण। ऐशीं स्तोत्रें गाताती॥ ८॥ महा सभास्थळ वैकुंठ। सभे श्रेष्ठ वैकुंठपीठ। आणि शिवमूर्ती घनदाट। निळकंठ सभेसी॥ ९॥ रंभा उर्वशी नाचती। नारद तुंबर विणे वाजविती। गणेश सारजा आळविती। सहा रागएकवीस मूर्च्छना॥ १०॥ ऐसा रंग स्थिरावला। जयजयकारें घोष केला। तेणें चवकला उठिला। पाताळींचा तो शेष॥ ११॥ ऐकोनी विष्णुकीर्तन। तयासी आलें पैं स्फुंदन। मग उच्चारित रामकृष्ण।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मृत्युलोकाशीं आला॥ १२॥ सहस्त्र वदनें स्तुति करी। हरें नमस्कारिलें हरी। वाहूनि तुळसीमंजिरी। ज्ञानदेवा पूजियेलें॥ १३॥ नामा म्हणे ज्ञानउदयो। ज्ञानदेवा भाग्याचा पहा हो। आपण येऊनि वैकुंठरावो। समाधि दिधली निज हस्तें॥ १४॥

१०१२. ऐसे स्वर्गवासी अमर। ते आपापलाल्या ठायीं स्थिर। राहोनी करिती जयजयकार। पुष्पवृष्टी ज्ञानदेवावरी॥ १॥ धन्य धन्य विष्णुभक्ता। ज्ञानदेवा तूं समर्था। म्हणोनी पडती पुष्पचळथा। पांडुरंगावरी॥ २॥ अनंत तीर्थांचा मेळ। उदकें शिंपती ब्रह्मगोळ। लोहगिरी सुवर्णाचळ। त्यावरी अलंकापुरी॥ ३॥ म्हणती धन्य धन्य हे जन। येथें जो करील कीर्तन। तया जोडे वैकुंठस्थान। चतुर्भुज होऊन जाईल॥ ४॥ देव म्हणती इंद्रासी। तूं पूर्वी येथेंच होतासी। आणि ब्रह्मारुद्र तापसी। पूर्वापर हे पुरीं असे॥ ५॥ कृत त्रेत द्वापारादि। येथें सकळांची समाधी। धन्य ज्ञानदेव गोविंदीं। रतोनी येथें बैसले॥ ६॥ इंद्र म्हणे विष्णुभक्त थोर। प्रत्यक्ष हेही हरिहर। निवृत्ती सोपान ज्ञानेश्वर। हेही अवतार हरीचे॥ ७॥ ऐसें सांगितलें समस्तां। मग उदित जाहले उभयतां। शक्र जाहला निघतां। ब्रह्माआदि करूनी॥ ८॥ शेषही पाताळासी गेला। पुंडरिक गोपाळ राहिला। अलंकापुरीं स्थिरावला। सकळैक भक्तांसहित॥ ९॥ सर्वे संतांचा मेळ। ऐसा राहिला गोपाळ। नामा म्हणे चक्रचाळ। पुढें कैसें वर्तलें॥ १०॥

१०१३. गगनपंथें शुभ्र विमानें। देव लक्षिती अधोवदनें। तंव अलंकापुरीं कीर्तनें। टाळ मृदंग झणत्कार॥ १॥ जयजयकार क्षितीं होत। महादोषा संहारघात। नामा असे नाचत। पांडुरंगापुढें॥ २॥ रामकृष्ण अवतार। चरित्र गाती सविस्तार। वैष्णवीं केला जयजयकार। पांडुरंगें म्हणितलें॥ ३॥ ज्ञानदेव बैसले समाधीं। पुढें अजानवृक्षधी। वामभागीं पिंपळ क्षिती। सुवर्णाचा शोभत॥ ४॥ निवृत्ती सोपान खेचर। ज्ञानदेव मुक्ताई निरंतर। करूनि अंतःकरण स्थिर। उत्तरद्वारीं बैसली॥ ५॥ देव म्हणे ज्ञानेश्वरा। चंद्र तारा जंव दिनकरा। तंव तुम्ही समाधिस्थिरा। राहो रे निरंतर॥ ६॥ जंववरी हें क्षितिमंडळ। जंववरी हें समुद्रजल। मग कल्पक्षयीं यथाकाळ। माझ्या हृदयीं ठसावें॥ ७॥ आणिक एक सोपारें। ज्ञानदेव हीं चारी अक्षरें। जो जप करील निर्धारें। त्यासी ज्ञान होईल॥ ८॥ ऐसा दिधला आशीर्वाद। मग संतांसीं बोले गोविंद। ज्ञानदेवा ऐसा उद्बोध। दुजा न देखो सृष्टीसी॥ ९॥ नामा म्हणे स्वामी माझा। अंगिकार केला वोजा। पावला भक्ताचिया काजा। गरुडारूढ होऊनी॥ १०॥

१०१४. ऐसे संतोषले देव। प्रसन्नरूपें माधव। मग बोलती ज्ञानदेव। विठ्ठलाप्रती॥ १॥ धन्य धन्य तूं विठ्ठला। धन्य धन्य प्रत्यक्ष देखिला। धन्य समारंभ येथिला। सोहळा करी भक्तांचा॥ २॥ तुझेनि आम्ही धन्य। हे जगत्रयीं देवा मान्य। म्हणती भक्तासमान। न देखों त्रिभुवनीं॥ ३॥ तूं विश्वात्मा विश्वरूप। तूं जगाचें स्वरूप। तुज न लिंपे पुण्यपाप। सदा शुद्ध बुद्ध अससी॥ ४॥ तूं आम्हां भक्तां सरिसा। सवें हिंडसी जगदीशा। तुजवीण अष्टदिशा। मज शून्य वाटती॥ ५॥ तरी तूं पाळिसी भक्तलळा। केला समाधीचा सोहळा। तो दाखविला मज डोळा। दिव्य दृष्टि देवोनी॥ ६॥ तूं सत्त्वरजतमात्मक। तूं सकळ जीवांचा चालक। तूंचि त्रिमूर्ति अवघा एक। विठ्ठलस्वरूप सकळ॥ ७॥ भक्तभाग्य भूमीतळीं। याकारणें तूं वनमाळी। दहा अवतार भूमंडळीं। नाना चरित्रें खेळसी॥ ८॥ ऐसें महिमान अगाध। तें तुझें विश्वरूप प्रसिद्ध। कोण भाग्याचा प्रबुद्ध। तो तूं मजकारणें आलासी॥ ९॥ नामा म्हणे ज्ञानदेवें। ऐसी स्तुती केली स्वभावें। तंव कृपा करूनियां देवें। अभय कर ठेविला॥ १०॥

१०१५. चतुर्भुज श्याममूर्ति। शंखचक्राची आकृति। पीतांबराची दिव्य दीसि। पडिली सृष्टीवरी॥ १॥ धन्य धन्य ज्ञानदेव। धन्य धन्य तो माधव। मग आरंभिला अनुभव। ज्ञानदेवाचेनि मुखें॥ २॥ देव म्हणे ज्ञानेश्वरा। तूं अवतारोनि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माजि चराचरा। हरिला महादोष थारा। तुझेनि कवित्वें॥ ३॥ तुझें कवित्व माझ्या गोष्टी। जो परिसेल हे सृष्टीं। जो येईल माझे भेटी। वैकुंठपीठीं विष्णूच्या॥ ४॥ तुवां जो ग्रंथानुभव। गीतेसी दाविला भाव। तें मुख्य ठेवणें राणीव। अनुभवी जाणती॥ ५॥ तैसाची अमृतानुभव। सिद्ध पीठे केलें भाव। दाऊनि मनोहर राणीव। निज गुह्य आमुचें॥ ६॥ वसिष्ठगीतेची टीका। ग्रंथ संचिला नेटका। भावार्थ काढिला श्लोका। ग्रंथरचना दाविली॥ ७॥ तूं महाब्रह्मींचा अंश। पदपदांतरी केला प्रकाश। दाऊनिया उदास विशेष। या जीवांसी तारिलें॥ ८॥ तरी तूं आतां एक वेळ। माझी स्तुति करी निर्मळ। जेणें करूनि तरती सकळ। वक्ते श्रोते ग्रंथकार॥ ९॥ नामा म्हणे परमानंद। दावोनियां उद्बोध। केला ज्ञानदेव सावध। स्तुति उपरती मांडिली॥ १०॥

१०१६. ऐसें अलंकापुर पीठींचे। भक्त नांदती दैवाचे। जे कां सागर भाग्याचे। ज्ञानउदयो प्रकासिते॥ १॥ मग षोडशोपचारी। पूजा ज्ञानदेव आदरीं। दिव्यवाद मंगळतुरीं। ओवाळिती पंचआरतीया॥ २॥ ज्ञान सोपान निवृत्ती। मुक्ताई प्रत्यक्ष ज्योती। ओंवाळिती विष्णुमूर्ती। चतुर्भुज पैं॥ ३॥ पीतांबरधारी श्याममूर्ति। शंखचक्राची आकृती। उद्धव अक्रुर ढाळिती। चवरें वरी॥ ४॥ प्रत्यक्ष लक्ष्मी आपण। दिव्य स्वरूप प्रसन्न वदन। माजी मिरवे दिव्य सिंहासन। त्यावरी आरूढली॥ ५॥ पुढें गरुड जोडूनी करीं। उभा पक्षांचा फडत्कारी। सूर्य लोपे तेजाकारी। अमृतकरु नाम एक॥ ६॥ गोपाळ दंव्हडे उभे। मंजूळ पावे वेणुप्रभे। शुभकाळ सुप्रभे। माझी स्तुति मांडिली ज्ञानदेवें॥ ७॥ नामा म्हणे ऐका। पुढें ग्रंथाची पीठिका। तो तारील सकळ लोकां। एकएक अक्षर आईकतां॥ ८॥

नमन

१०१७. नमो कालकौतूहल। नमो चक्रचालक गोपाळ। नमो विश्वप्रतिपाळ। प्रभंजन॥ १॥ नमो शिवशिवेशा। नमो शिवादी विश्वेशा। नमो रूपा अष्टदिशा। व्यापक नारायणा॥ २॥ नमो सकळगर्भोद्भवा। नमो चित्तचालक भावा। नमो विष्णुमूर्ती देवाधिदेवा। श्रीविठ्ठला॥ ३॥ नमो भजनशील व्यापका। नमो ज्योतिर्लिंग दीपका। नमो नमो तुज एका। आत्मव्यापका जगद्गुरु॥ ४॥ नमो श्रीये श्रीनिवासा। नमो आगमपरेशा। नमो ज्ञानगम्याधीशा। प्रतिकूळा॥ ५॥ नमो स्वलीलाविनटा। नमो स्तुति वैकुंठपीठा। नमो रूपादि श्रेष्ठा। वैकुंठींचिया॥ ६॥ नमो दर्शनस्पर्शना। नमो उपरती निधाना। नमो तितिक्षा दारुणा। कमळालया॥ ७॥ त्रिगठी आदटा। नमो त्रिगुणा तूं उद्धटा। नमो सत्त्वरूप सदटा। ब्रह्म नामा॥ ८॥ नमो रजेश्वरी हरी। नमो विगळित संहारी। नमो वाचा वक्ता करी। वाचाळ वाक्पुष्पी॥ ९॥ नमो तम हर्ताकर्ता। नमो सकळ संहर्ता। नमो काळकौळू दाता। रक्षिता हरिभक्ता॥ १०॥ तुज नमो हरहरेश्वरा। नमो न देखों दुसरा। नमो वेदांत सागरा। सर्वेश्वरा तुज नमो॥ ११॥ श्रुति निरामय नमो। नमो ज्ञानरूप गमो। नमो द्वैतनिरसन समो। करी तूं निजकरें॥ १२॥ नमो व्यक्ताव्यक्त हरी। नमो माया संहारकेसरी। नमो सर्वांच्या माजघरीं। नांदसी तूं आत्मारामा॥ १३॥ जिव शिव नमो तुज। नमो सर्व जीवबीज। नमो तूंचि सहज। गरुडध्वजा श्रीविठ्ठला॥ १४॥ लीलेस्तव नटारंभ। नमो जगदादि अखिलस्तंभ। उभा राहोनी प्रतीभ। भीमातीरीं पंढरीये॥ १५॥ नमो ऐशिया रूपेशा। नमो त्रैलोक्य विस्तार ठसा। नमो आदि परेशा। जगदादीशा जुगादी॥ १६॥ नमो पुरुषोत्तम परेशा। नमो सकळही उदासा। करूनि जीवरूप ठसा। नांदसी तूं चराचरीं॥ १७॥ मधुसूदना तुज नमो। मधु माधवा हृदय रमो। नमो मधुर गीत समो। माजघरीं आत्मयाचिये॥ १८॥ त्रिविध त्रिमिर नाशा। परम परमानंद उल्हासा। नमो पुरविसी आशा। हरिभक्ताची श्रीहरी॥ १९॥ नमो वासना चक्रचाळी। नमो तुंडवितंड गेली। नमो सर्वही हरिली। प्रपंचरचना॥ २०॥ नमो श्रीधर श्रीकर। नमो

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सर्वसंगी निर्विकार। नमो विकृति विकार। हरिसी नामें एके॥ २१॥ नमो शांति दया क्षमा। नमो कृपाकर पुरुषोत्तमा। नमो कांसवदृष्टि रमा। निष्कलंकनाथा॥ २२॥ नमो द्विविध छेदका। नमो एकार्णवपावका। नमो द्वादश अर्का। सुभाषका वेदवक्त्या॥ २३॥ नमो चित्तचकोर हर्त्या। नमो सर्व कारण कार्यकर्त्या। नमो तुजवांचोनी सत्या। विवेक प्रत्यया पैं नये॥ २४॥ नमो अद्वैत अनंता। नमो निर्द्वंद्व भोक्ता। नमो नित्यानित्य सरता। तुज नमो नमो॥ २५॥ नमो दुर्गतीहरणा। नमो सर्वहरण भरणा। नमो सर्वदुष्टनिवारणा। भय हरणा जगदीशा॥ २६॥ नमो शिवशक्ति समलिंगा। नमो भक्षक काळवेगा। रुद्रादित्या वसु पैं गा। सम सर्वांगा परमपरेशा॥ २७॥ नमो कृत्रिम दहना। नमो कृशकरणहरणा। नमो प्रतिपाळकरणा। नारायणा तुज नमो॥ २८॥ नमो इंद्रियें नियंत्या। नमो प्रपंच अकृत्या। नमो दीनादित्या। सकळ वृद्धि तूंची॥ २९॥ नमो अवधूत दत्ता। नमो अपरमितमिता। नमो सर्वारिष्ट सत्ता। तूं चाळिता हृषीकेशी॥ ३०॥ नमो दुष्ट दर्पादर्पा। नमो चमत्कार गांग सर्पा। नमो हरण पापा। नमो स्वल्पा रामकृष्णा॥ ३१॥ नमो चतुर वेददीप्ता। नमो हरणकारण तूं सुप्ता। जागृती स्वप्न सुप्ता। सत्य सुप्ता महाविष्णु॥ ३२॥ नमो देवेश्वरे सूक्ता। नमो महामोहा हर्ता। मंदमंद नियंता। नमो नारायणा॥ ३३॥ स्थिर निर निर्झरा। नमो विद्‌गद अनुकारा। नमो विवेकसारा। महानाद॥ ३४॥ नमो सुखदंत सदना। नमो भक्षकभुवना। शुक्लांबर शुक्लवर्णा। दयाघना गुणनिधी॥ ३५॥ मृतामृता नमो नमो। नमो श्रुतिशास्त्रसमो। नमो हा गर्व गमो। पद्मगर्भानंतानंदा॥ ३६॥ नमो चिदाकाशव्याप्ता। चित्सत्ता चळण सत्ता। चित्स्वरूपादि रूपा। भुवनदीपा महामूर्ति॥ ३७॥ नमो एक एकार्णव। नमो कल्पादि गुणवैभव। नमा सकळ हें दैव। ते भाव पैं तुझे॥ ३८॥ गो गोपाळा नमो नमो। गोविंद गुण विष्णुधर्मो। नमो चित्त चिंतनी रमो। सर्वकाळ तुझ्या चरणीं॥ ३९॥ ध्वज वज्रांकुशा। ध्वज नीळविकाशा। ध्वजांबरा अष्टदिशा। निळिमा भासती श्यामांकिता॥ ४०॥ सुषुप्तीचें जें सत्य। तें नमो तुज कृत्य। असोस जे अमितय। तें क्षमा करी स्वामी॥ ४१॥ नमो निर्धारनियंता। नमो सुस्वरूप दाता। नमो आलिया पदार्था। क्षमा करी स्वामी॥ ४२॥ नमो चित्तविभ्रमा। नमो धार्य धैर्य नमा। नमो कृपाकर पुरुषोत्तमा। पाहे कांसव दृष्टी॥ ४३॥ पसायदाना नमो। परमपरेशा नमो। ध्यानांतर गमो। तुझ्या चरणीं केशवा॥ ४४॥ आग्रह निहंत्या नमो। सुग्रह परी नमो। अनंता नित्य धर्मो। वैकुंठ गुणग्राम नमो नमस्ते॥ ४५॥ आत्मादृश्य दृश्यमाना। द्रष्टादृश्य नित्य घना। सुस्वरूपा जगज्जीवना। तुज नमो स्वामी॥ ४६॥ द्वीप्ता दृश्य अदृश्य। जीवन दिससी सादृश्य। जीवमय हे भाष्य। तुज नमो॥ ४७॥ परम परब्रह्मा। आदिब्रह्मा तूं रामा। भक्तालागीं तूं साउमा। तुज नमो॥ ४८॥ नमो नमो एकतत्त्वा। बाह्यमुद्रा शुद्धसत्त्वा। योगारूढ परतत्त्वा। सबाह्य पावसी तुज नमो॥ ४९॥ वेदादि परम वक्ता। वेदादि तूंचि कर्ता। तुजवांचोनी सर्व सत्ता। नमो भोक्ता न देखों॥ ५०॥ ज्योतिर्मय रूप तुझें। सर्व तत्त्वा तूंच बीज। नमो तूंचि सहज। पुढती नमो नमो॥ ५१॥ परब्रह्म परात्पर। परम तत्त्व परमसार। परम गुह्य परम विचार। तुज नमो नारायणा॥ ५२॥ दिघड विघड सुघड। जाडा जाड अवघड। द्वैताद्वैत जोड। कर्ता कार्यता तुज नमो॥ ५३॥ संख्यारहित जीवना। असंख्य जीव पाळणा। नमो तुज संजीवना। पुंडलिकधना पांडुरंगा॥ ५४॥ निर्गुणसगुण रूपा। देवा देव तूं सोपा। तुझी झालिया कृपा। नमनबापा तुझिया चरणां॥ ५५॥ नमो नमो तारका। तूं ब्रह्मनाम निशेखा। नमो तुजवांचोनी सखा। योगियांसी पैं नाहीं॥ ५६॥ जुगादि जुगत्रय। जुग जोग योगमय। हे तुज पासाव होय। ऐशिया तुज नमो॥ ५७॥ नमो नमो नम। नाहीं नाहीं तुजसी सम। ऐसा परापश्यन्ति

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नेम। वदलिया चारी॥ ५८॥ चहूं मुक्ति परतत्त्वा। पंचमु जो निजसत्त्वा। घडूमार्ग गुणसत्त्वा। ग्रास न करिसी तुज नमो॥ ५९॥ विद्वद चिद्विलासा। भानुबिंबा प्रतिप्रकाशा। नमो तेज तेजसा। आदिसूर्या॥ ६०॥ ऐसा चहूं ग्रंथींचा क्लेशु। वाउगाची वाहे सोसु। तिमिर त्रिगुण असोसु। तो तूं सत्यांशु तोडी माझा॥ ६१॥ साही नाडी चक्रभ्रमें। वाहतां इंद्रियांचीं ग्रामें। ते आडखळोनी साउमे। नये ऐसें करी स्वामी॥ ६२॥ बाध्य बाधा कर्माची। सर्व सत्ता या भ्रमाची। नमन करूनि तुमची। तुम्हांसी अर्पिली स्वामी॥ ६३॥ मानव धर्मांचिया सत्ता। कर्मधर्मांचिया पंथा। कर्म धर्म तो विधाता। ऐशिया नेमिता तुज अर्पिला॥ ६४॥ दमशम समान। इडा पिंगळा सुषुम्न। साही चक्रें दरुषण। तुझीं तुज अर्पिलीं॥ ६५॥ मन पावन योग धारण। तूं याशीं पैं कारण। समतुकें अवघे गुण। तुझ्या चरणीं निक्षेपिले॥ ६६॥ हे भूतभौतिक प्रचंड। जन्मउत्पत्ती अंड। जन्मजुगादि ब्रह्मांड। खंड विखंड तूं जाणता॥ ६७॥ प्रचुरचर्या चित्ताची। धावन वळण आकोचनाची। सूचना जे चमत्काराची। तेही अर्पण तुज सदा॥ ६८॥ निर्वासना वासनायुक्त। गुंतलें राहिलें जेथें चित्त। तेथें तूं धांवोनी अनंत। सोडविसी वासनामय॥ ६९॥ सूक्ष्म अविचारा बोला। बोलि नातुडे व्यर्थ गेला। तो म्यां बुझावोनि संबोखिला। मग लाविला तुझ्या पंथीं॥ ७०॥ नित्य धर्मांचिया वोळी। चळल्या चुकल्या कोण चाळी। त्यासी वेद तुझा प्रतिपाळी। त्या तूं सांभाळीं परब्रह्मा॥ ७१॥ श्रुतिस्मृतींची वचनें। त्याची आंगरागमार्ग स्थानें। स्वर वर्ण उच्चारणें। तेंही नारायणें अंगिकारावीं॥ ७२॥ उदंड विदंड वितंड। देहद्वारा अभंड। जे जे दिसे भ्रंश अंडांड। ते शुभ्रचंड सांभाळीं॥ ७३॥ देहभरणाची ममता। देह पोखिती जे सत्ता। त्याही वरील सूक्ष्मता। तें कृपावंता सांभाळीं॥ ७४॥ तिमिर त्रिगुण अवघें। जें जें आलें असेल वोघे। तें तें मी नेघें। तें सकळ वेगें सांभाळीं॥ ७५॥ योनीचिया कष्टा। वरी वासना होती भ्रष्टा। त्या त्या करूनि प्रविष्टा। रतलों तुझ्या चरणीं॥ ७६॥ विद्या वयसा कुल। ब्रह्मकर्म आचारशीळ। गेले आले विठ्ठल। तें तूं दयाळ सांभाळीं॥ ७७॥ नाना जन्म अवतार। नाना शाखांचे निर्धार। नाना गोत्र उच्चार। तुझा विचार तूं जाणसी॥ ७८॥ पाठ वेदादि वचनें। शास्त्रदृष्टि अवलोकनें। कीर्तनीं गुण वानणें। तें नारायणें अंगिकारावीं॥ ७९॥ सर्वमय सर्व सपाट। त्यावरी करूनि चालिलों वाट। चंद्र सूर्य नक्षत्रें घनदाट। करूनि एकवट पायरी॥ ८०॥ सर्व अंडांचें ब्रह्मांड। मी न म्हणे अंडाअंड। खंडें करूनियां विखंड। प्रचंड मी तुजसी बोले॥ ८१॥ रोमरंध्रीं ब्रह्मांडें। सकल विराटमय खंडें। ऐसी महत्भूतें प्रचंडें। तुझ्या अंगीं दातारा॥ ८२॥ तूं विश्वरूपपटाची घडी। तारक ब्रह्मचि उघडी। मी या निजदृष्टीनें चोखडी। तुझी मूर्ति न्याहाळिली॥ ८३॥ तें न सुटे निजकळे। येऱ्हवी हें नाकळे। तुझिया कृपागुणें आकळे। तुझिया दासा निजभक्ता॥ ८४॥ अनंत नामाचा संकेत। मन मुरालें जेथें निर्धुत। तूंपणें परमाद्भूत। परमानंदा॥ ८५॥ गुणाग्र गोसावी राम। गुणसमुद्र तूं गुणग्राम। सकळ भूतांचा विश्राम। तुज नमो॥ ८६॥ नमन केलिया विभूतीं। चित्त रमलें झाली विश्रांति। तुज देखिलिया श्रीपती। न राहे चित्तीं तळमळ॥ ८७॥ नमन हेंचि थोर दिसे। एरव्हीं तरंगाकार भासे। देखिलें तितुकें नासे। नैश्वर्य ऐसी श्रुति बोले॥ ८८॥ नमन हेंचि परम। नमन हें सुवर्म। नमन हेंचि आत्माराम। करूं निघाली॥ ८९॥ नमन हाचि अनुभव। नमन हाचि मुख्य भाव। नमन हाचि पैं देव। देवाधिदेव तूं पावसी॥ ९०॥ नमन हेंचि श्रेष्ठपीठा। नेतसे तुझिया वाटा। तुज ऐसा श्रेष्ठा। मग काय वाटा कराविया॥ ९१॥ नमन हेंचि तारक। नमन हाचि विवेक। नमनेवीण त्रैलोक्य। आडमार्गें रिघताती॥ ९२॥ नमन लटिकें नव्हे नव्हे। नमन भलतियासी न साहे। जैसा साह्य सखा होय। श्री

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

निवृत्ति॥ ९३॥ नमनाएवढा मंत्र। नाहीं नाहीं धुंडितां शास्त्र। विचारलक्षणपात्र। तोचि जाणें येथींचें॥ ९४॥ नमन करी ब्रह्मां श्रेष्ठ। नाभिकमळीं धरी वैकुंठ। नमन करी नीळकंठ। तीर्थें मस्तकीं वंदिती॥ ९५॥ इंद्र चंद्र महेंद्र थोर। नमनेंवीण नैश्वर। अंडामध्यें चराचर। नमनेंवीण न तरती॥ ९६॥ श्रीगुरुकृपा जैं होय। तैं नमनाची ऐसी सोय। पाऊनि सुगम उपाय। नमो नमस्ते तुज॥ ९७॥ नमस्ते नमस्ते नमस्ते। पुढती पुढती नमस्ते। समाधिसुख आस्ते। नमो नमः करितां॥ ९८॥ नमो नमो आदिपीठा। शिवादी गुणवरिष्ठा। येथें येऊनि वैकुंठा। समाधिशेज घातली॥ ९९॥ महाविष्णु तूं योगरूपा। महारूपाचिया स्वरूपा। महादित्या अमूपा। कोटिसूर्य तेजसा॥ १००॥ शंखचक्रानें मंडित। करकमळ तुझें मिरवत। पदक हृदयावरी शोभत। आणि श्रीवत्सलांछन॥ १॥ अनंत बाहुचा मेळ। तो तूं चतुर्भुज गोपाळ। मुकुट विराजित तेजाळ। कोटिसूर्यांहूनि प्रभा॥ २॥ पितांबर माळ कंठीं। सर्वांगी चंदनाची उटी। हिरे माणिकें कटींतटीं। अनेक किळा फांकती॥ ३॥ क्षुद्र घंटिकांच्या बोळी। घणघणाट तया तळीं। देहुडा पाऊली निश्चळीं। वेणु वाजविसी सुस्वरें॥ ४॥ रुणुझुणु रुणुझुणु। ऐसा वाजविसी वेणु। सुंदर तूं श्यामतनू। अलंकापुरीं उभा अससी॥ ५॥ सभोंवतें गोपाळ तुझे। ते अंतरंग सखे माझे। पुंडरिक तरी सहजें। प्राणसखा पैं माझा॥ ६॥ ऐसा ज्ञान उद्‌बोध बोले। ज्ञानांजन निरसलें। विज्ञानहि हारविलें। दृश्यद्रष्टेपणेंसी॥ ७॥ बापरखुमादेवीवरु। समाधि देऊनिया स्थिरु। वरी ठेऊनियां अभयकरु। वर देऊनि राहिला॥ १०८॥

१०१८. ऐसी स्तुति नमनाची। केली तया भगवंताची। ऐकता झाली रुची। म्हणे धन्य धन्य ज्ञानेश्वरा॥ १॥ कैसी स्तुति परिकर। जपतां नामावळी साचार। वेगीं तुष्टले हरिहर। निज ब्रह्मस्वरूप॥ २॥ वैष्णव सभोंवते उभे। तींही जयजयकार प्रतीभे। करुनि रुक्मिणीवल्लभें। तया प्रसाद दिधला॥ ३॥ मागुता ज्ञानदेव बोले। म्हणे धन्य धन्य तुझीं पाउलें। जेथें योगेश्वर रातले। तुझे चरण धन्य धन्य॥ ४॥ पुंडलिकें स्तवन। मांडावें तंव नारायण। म्हणे सन्मुख उभा सोपान। यासी समाधि देणें लागेल॥ ५॥ निवृत्ति मुक्ताई दोघे। ते बुझाविली पांडुरंगे। उद्धव अक्रूर वेगें। तया संगें निरविलीं॥ ६॥ ज्ञानदेवासी उद्धव। बोले एकांतीचा भाव। तुष्टला देवाधिदेव। धन्य धन्य वैष्णव तुम्ही॥ ७॥ ज्ञानदेव म्हणे स्वामी। दीन विठोबाचे आम्ही। धन्य धन्य भाग्याचे तुम्ही। जे निरंतर विष्णुसंगें॥ ८॥ उद्धव म्हणे ज्ञानेश्वरा। आम्ही जाणों कृष्णावतारा। परी पांडुरंग मूर्ति निर्धारा। तूं आणि पुंडरिक जाणसी॥ ९॥ नामा म्हणे ज्ञानदेवें। मागुतें स्तवन आरंभिलें भावें। तें ऐकावया देवें। एक चित्त केलें॥ १०॥

१०१९. कर जोडोनियां पुढें। लोटांगण टाकिलें गाढें। म्हणे स्तवन करावया मी वेडे। काय जाणें तुझा महिमा॥ १॥ तरी पांडुरंगा तूं दयाळु। भक्त भाविक कृपाळु। भीमातटीं उभा गोपाळु। पुंडलिका कारणें॥ २॥ चंद्रभागा सरोवरीं। निरे भिवरेच्या तिरीं। वाट पाहासी हरी। भक्त साह्याकारणें॥ ३॥ तरी उदार शूर महीमेचा। खुंटल्या चारी वाचा। येणें पवाड मज कैंचा। वर्णावया सामर्थ्य॥ ४॥ शेषा ऐसा स्तुति करी। तया नाकळसीच हरी। जिव्हा चिरलिया भग्न धारी। मग मौन्यची राहिला॥ ५॥ तो तूं अलंकापुरी येसी। मज दीना समाधी देसी। देव म्हणे तूं आहेसी। साक्षात्-ज्ञानरूप॥ ६॥ ज्ञानदेवो नाम तुझें। तें ज्ञान हृदयींचें माझें। हे जन तरावया काजें। तुवां अवतार घेतला॥ ७॥ नामा म्हणे देव हरी। पुढतोपुढती अंगिकारी। वर देऊनि साहाकारी आपणची झाला॥ ८॥

१०२०. तंव अंतरिक्षीं गगनीं। देव बैसोनी विमानीं। वर्षाव करिती दिव्यसुमनीं। पांडुरंगा-वरी॥ १॥ विठोजी कृपाळु गुणनिधि। सवें पुंडलिक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सुबुद्धि। लघिमा अणिमादी सिद्धि। सवे असती॥ २॥ मग नेमिलिया तिथि। कृष्णपक्ष अष्टमी समर्थी। नामसंकीर्तन संतसंगतीं। तो ब्रह्मप्राप्ति पावला॥ ३॥ नवमी गजर हरिनामाचा। तोचि वैष्णव काया मन वाचा। तो प्रत्यक्ष विष्णुरूप साचा। सत्य त्रिवाचा बोलिले॥ ४॥ जोडे जया वद्य दशमी। स्नान विष्णुपूजन स्वधर्मीं। तो सत्वर पावेल निजधामीं। नाम संभ्रमीं नाचत॥ ५॥ व्रत एकादशी श्रेष्ठ गाढी। कीर्तनश्रवणीं कोटी याग जोडी। एक एक घडी कल्पाएवढी। भूषणप्रौढी कीर्तीची॥ ६॥ एकादशी दिननिशीं। जागरणी हृषीकेशी। कीर्तन करीत अहर्निशीं। तरी तो तारील सर्वजनां॥ ७॥ द्वादशी पारणें क्षीराब्धी। हरिकीर्तनीं परमानंदीं। तो पद पावला अनादी। ज्ञानदेवीं विष्णूच्या॥ ८॥ वद्य त्रयोदशी महाथोर गजर। कुंचे गरुडटके दिंडी संभार। वाजविती टाळ मृदंग झणत्कार। हरिनामें अपार उद्धरिले॥ ९॥ नामा म्हणे वद्य चतुर्दशी। पुढती अमावास्येचे दिवशीं। ज्ञानदेवा जो दृढ धरी मानसीं। तो कृतनिश्चयें तरलासे॥ १०॥

१०२१. ऐसें वदोनी पांडुरंगें। समस्तांसी वस्त्रें दिव्यांगें। देऊनि भूषणें अनेगे। रत्नमुक्ताफळें अलंकार॥ १॥ धन्य जन्मले भूमंडळीं। कीर्तनीं नाचती गदारोळी। ते विष्णुसन्निध सर्वकाळीं। ऐसें वनमाळी बोलिले॥ २॥ राही रुक्मिणी सत्यभागा। विचारिती पुरुषोत्तमा। बहुत अगाध येथींचा महिमा। भूमिवरी वैकुंठ॥ ३॥ म्हणे बिठोजी जंववरी धरा। तंववरी समाधि स्थिरा। हरिकीर्तन करिती सैरा। चतुर्भुज होईल॥ ४॥ हें शिवपीठ शिवाचें। हेंचि पूर्व स्थान अगस्तीचें। जाणोनि जन्म झाले चौघांचें। सर्व क्षेत्राची आदिभूमि॥ ५॥ पूर्वापार युगायुगीं। अनेक पुण्य घडलें यागीं। तपें तपन्निले महायोगी। तो हा अलंकापुरीं ठावो॥ ६॥ येथें रामकृष्ण कथा। जो करील सर्वथा। तो पुढें पावल व्यथा। भवबंधापासुनी सुटेल॥ ७॥ सप्तद्वीप नवखंड। आणि अवघें गणितां ब्रह्मांड। त्याहूनि हें हो उदंड। पुण्य जोडेल नामें॥ ८॥ ऐसें उत्तमोत्तम थोर। सकळ जीवांचें माहेर। नाम घेतां तरती चराचर। दिला वर रुक्मिणीवरें॥ ९॥ नामा म्हणे देवराव। महिमा सांगतसे भाव। धन्य अलंकापुरी गांव। आदि ठाव वरिष्ठ॥ १०॥

१०२२. नित्य अनुष्ठान ये तीर्थी। त्याचे पूर्वज उद्धरती। जे कां अन्नदान करिती। ते पावती वैकुंठी॥ १॥ ऐसें तीर्थक्षेत्र सर्वोत्तम। आणिक नाहीं यासी सम। शिवपीठ हें मनोरम। अलंकापुरी हे देख॥ २॥ न वर्णवे येथींची थोरी। साक्षात् येऊनि श्रीहरी। ज्ञानदेवा कीर्तन गजरीं। समाधि दिधली सुखरूप॥ ३॥ अनंत पुण्य ज्याचे गांठी। तरीच ज्ञानदेव पडे दिठी। जोडे तप कोट्यानुकोटी। ऐसे धूर्जटी बोलिले॥ ४॥ हेंचि महासिद्धीचें स्थळ। सर्व तीर्थांचें हेंचि मूळ। वास केलिया सर्व काळ। तरी महादोष हरतील॥ ५॥ अजान वृक्षातळीं हरिकथा। नित्य जो नर करी तत्त्वतां। तो न जाय यमपंथा। ऐसें जगन्नाथ बोलिले॥ ६॥ द्वारीं सुवर्णाचा अश्वत्थ। नित्य पूजलिया स्वस्थ। लक्ष्मी न सांडी तया सत्य। आर्तपुण्य होती॥ ७॥ नित्य प्रदक्षिणा सप्त। तरी अगाध पुण्य त्वरित। पूर्वज वैकुंठासी जात। बेचाळीसां सहीत॥ ८॥ नित्य विष्णूचें पूजन। नित्य नाम-संकीर्तन। नित्य वैष्णव संतभोजन। धन्य पावन इहलोकीं॥ ९॥ नामा म्हणे अलंकापूर। सर्व क्षेत्रामाजीं मनोहर। पवित्राशीं परम परिकर। त्रिभुवनीं दुर्लभ॥ १०॥

१०२३. ऐसें तीर्थ सर्वोत्तम। सांगतसे पुरुषोत्तम। शंकरादि परमधाम। ब्रह्मनाम वर्णित॥ १॥ क्षेत्रमहिमा अति अद्भुत। आदि सिद्धेश्वर कुळदैवत। समर्थ महाभागवत। नामें गर्जत सर्वकाळ॥ २॥ म्हणे पुंडलिक पूर्वीचें स्थळ। आणि शिवाचें मूळपीठ निर्मळ। तेथें निर्विकल्प सोज्वळ। तप विशाल जोडिलें॥ ३॥ क्षेत्र पंढरीहूनि अधिक। ऐसें बोलती ब्रह्मादिक। म्हणती धन्य येथींचे लोक। शुद्ध भाविक प्रेमळ॥ ४॥ घडे महाविष्णूचें पूजन। तीर्थ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

व्रत संध्यास्नान। वाचें हरीनाम कीर्तन। श्रवणीं गुण विष्णूचे॥ ५॥ विठोजी म्हणे ऐक भक्ता। तपोनिधि महंत तूं सर्वथा। ज्ञानदेवासारिखा वक्ता। मज आवडता न दिसे॥ ६॥ तुम्ही दोघे असा या सृष्टीं। जग उद्धारी पाटोवाटी। कीर्तन करितां उठाउठी। तों वैकुंठीं पावावें॥ ७॥ पुंडलिकें नमस्कारिले हरी। चरणरजवंदिले शिरीं। म्हणे मी भाग्याचा उजरी। तूं कैवारी आमुचा॥ ८॥ नामा म्हणे देवभक्त। एक होऊनि समस्त। निवृत्तिराज स्तुति बोलत। प्रेम अद्भुत दाटलें॥ ९॥

१०२४. परब्रह्म परममूर्ती। परमधाम परात्परकीर्ति। परम प्रीयो परंज्योती। श्रुति स्मृति स्वानुभव॥ १॥ अकळ विकळ निरंजन। ज्ञाताज्ञेय विवेकधन। संशय दृश्य निरसन। विश्वप्रियो॥ २॥ नलिनीकमलविकाशा। नयनघन विश्वेशा। नमन चरणलेशा। चित्सुखा॥ ३॥ चराचर सच्चिदानंदांग। शुद्धस्नान शंकर दिव्यांग। विष्णुमूर्ति पांडुरंग। सगुणरूप भीमातटीं॥ ४॥ सुजळ जळदघना। दशन कोटी सूर्यकिरणा। मुक्ताहार जडित रत्ना। किरिटी मुगुट विराजित॥ ५॥ नीलोत्पल नीलवर्णा। श्यामसुंदरा मूर्तिघना। स्तवितां सहस्त्र वदना। नकळे पार तुझा॥ ६॥ रजतमाचे मेढुडे। पाहतां तूं न सांपडे। नाहीं तुझिया पडिपाडे। भूमंडळीं दैवत॥ ७॥ अनंत ब्रह्मांडधीशा। गुण न वर्णवे परेशा। तुंवा ज्ञानदेव सर्वेशा। आपणामाजी सामावला॥ ८॥ निवृत्ति म्हणे आम्ही दीनें। तारावीं तुम्हीं नारायणें। मग काये आदरिले सोपानें। तेथवरी येणें घडेल॥ ९॥ ऐशी निवृत्ति देवाची स्तुती। ऐकूनियां श्रीपती। नामा म्हणे देव तयाप्रती। बोलते जाले॥ १०॥ नारायणें स्तुति परिसिली। ऐकूनियां अव्यक्त बोली। म्हणे तुंवा गीतेची टीका केली। तें प्रमाण आम्हांसी॥ ११॥ नामा म्हणे हरी देवें। जाणोनियां अंतर्भावें। तुष्टले गुणगौरवें। निवृत्तीशीं दिधलें॥ १२॥

१०२५. म्हणे विठोजी शंकराचा। प्रत्यक्ष अवतार तुझा साचा। स्तुति केली असे वाचा। विरम याचा पूर मज॥ १॥ वस्ती सप्तद्वीप नवखंड। त्यामाजी अनंत ब्रह्मांड। रोमरंध्रीं ज्या अखंड। तो मनुष्यरूपें मेदिनी॥ २॥ निवृत्तिनाथ नाना अवतारीं। तुमच्या सेवेशी श्रीहरी। जें जें प्रेरसी कामारी। सांगितलें करी उगाची॥ ३॥ म्हणे देवाधिदेव आतां। सांगाल तें करूं तत्त्वतां। हरूं भवार्णवाची चिंता। या त्रैलोक्याची॥ ४॥ तंव निवृत्तीनें लोटांगण। म्हणे नाहीं नाहीं तुज समान। आम्हांकारणें नारायण। साहाकारी होसी॥ ५॥ आमुचीं तपें समर्थें। तुंवा सिद्धी पावविलीं जगन्नाथें। सरते करूनियां आम्हांतें। विष्णु मार्गे लाविलें॥ ६॥ देव म्हणे तूं आदि। विष्णुमार्गीची सकळ सिद्धी। जाणतां तूं एकत्र शुद्धी। निवृत्ति होसी॥ ७॥ नामा म्हणे ऐसें लळे। पाळिले तयाचे गोपाळें। देऊनियां समाधिसोहळे। विष्णुधर्म प्रतिष्ठिला॥ ८॥

१०२६. ऐसा निवृत्ति स्थिरावला। महाविष्णु संतोषला। मग सोपानदेवें आरंभिला। स्तुतिवाद परियेसा॥ १॥ जयजया तूं रामकृष्णा। भक्ता भाविक हरी तृष्णा। देहीं दीपक सहिष्णा। रामकृष्ण म्हणताती॥ २॥ नरहरि नरकेसरी। टाळी वाजुनियां गजरीं। टाळ मृदंग झणत्कारीं। जयजय हरी म्हणों आम्ही॥ ३॥ एक हरी आम्हां सखा। त्रिभुवनीं आत्मा देखा। समाधिसुखा विशेखा। चरणरजें डौरवावें॥ ४॥ धन्य धन्य भूमिका देश। स्वयें आपण जगन्निवास। ज्ञानदेवें केला वास। समाधिसुख घेउनी॥ ५॥ निवृत्ति महाराज श्रीगुरु। समाधिकारणें जाहले स्थिरु। पुढें कोण निर्धारु। तो सांगा स्वामिया॥ ६॥ देव म्हणे ब्रह्म अवतार। अव्रधियासी तूं चराचर। श्रेष्ठपणें तुम्ही निर्धार। आले आकारा सगुण रूप॥ ७॥ सकळ असे तूं व्यापक। स्वर्गलोक आणि मृत्युलोक। अधर्म झालिया चाळक। पुढती एकरूप धरिलें॥ ८॥ ऐसें बोलोनि पांडुरंग। सोपान निवाला सर्वांग। सांकडें फेडितो श्रीरंग। आमुचे अंतरंग जाणोनी॥ ९॥ नामा म्हणे सोपानदेवें। आरंभिली स्तुति सद्भावें। निजस्वहित स्वानुभवें।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

समाधि ठाव संस्थित॥ १०॥

१०२७. मुक्ताई म्हणे देवा। तूं विसावा जीवशिवा। गुणगौरवा अनुभवा। आम्ही जाणों तुज॥ १॥ सत्य सत्य जनार्दन। सत्य सत्य नारायण। सत्य सत्य तूं आमुचें धन। जगज्जीवन जगदाकार॥ २॥ तुजवांचोनी त्रिभुवनीं। दुजा न देखों नायकों कानीं। वेदशास्त्रपुराणीं। अगाध महिमा तुझा॥ ३॥ तूं देवाधिदेवो उत्तम। तूं निजभक्तांचा विश्राम। शंकराचा आत्माराम। ऐसा नेम वेदाचा॥ ४॥ तरी भक्तांचा कोवसा। पावसी तूं हृषीकेशा। नाहीं तुजवीण भरंवसा। निश्चय ऐसा साच तूं॥ ५॥ तूं परत्रीयें तारू। तुझा आगम निगम विचारू। तुझ्या चिंतनें पारू। उतरे संसारू दुर्घट॥ ६॥ विठोजी म्हणे मुक्ताबाई। मन समर्पिलें माझे ठायीं। तयासी जन्ममरण नाहीं। सत्य पाहीं निर्धारें॥ ७॥ नामा म्हणे करुनी स्तुती। मुक्ताबाई। चरण वंदिती। तंव संत महंता विनविती। आदिमूर्ति विष्णूची॥ ८॥

१०२८. तंव पुंडलिक पुढारला। कर जोडोनि बोलिला। वेदादिकां तुझा अबोला। अनंत लीला स्वरूपाची॥ १॥ ऐसा तूं समर्थ श्रीरंगा। भीमातटीं पांडुरंगा। प्रगट आमुचिया भागा। मूढजना तारावया॥ २॥ न वर्णवे भक्तपण। न कळे तुमचें महिमान। न बोलबे तंव साधन। जन्मीं कोण केलें होतें॥ ३॥ निरेभिवरेचे संगमीं। चंद्रभागेचे उगमीं। वेणुनादीं नारदस्वामी। प्रेमनामीं डोलतसे॥ ४॥ तरी तूं स्वामी दयाळा। महाविष्णू तूं गोपाळा। भक्तालागीं तूं कृपाळा। तारावया दीनासी॥ ५॥ माझें करूनियां मिस। राहिलास युगीं अठ्ठावीस। धरूनि सगुण रूपास। ऐसा भक्तीं भुललासी॥ ६॥ तूं नियंता ईश्वरमूर्ति। सकळ गोसावी श्रीपती। तुजवांचोनी नेणें मती। दयामूर्ति सागरा॥ ७॥ नामा म्हणे पुंडलिका। देवें म्हणती पुण्यश्लोका। स्तुति आदर केला निका। धैर्य विवेक तूंचि होसी॥ ८॥

१०२९. मग सारोनी संध्यास्नान। देवभक्ति विष्णुपूजन। पंक्ति आदरिलें आपोशन। मागुती भोजन करिताती॥ १॥ धन्य धन्य तूं ज्ञानराजा। तुझी आवड केशवराजा। पंक्ति परवडी द्विजा। वाढिती द्विजा रुक्मिणी॥ २॥ उभी राही सत्यभामा। वाढिती पंचामृत उत्तमा। पुंडलिक बोलावूनि साउमा। ज्ञानदेवा पंक्ति बैसविलें॥ ३॥ निवृत्ति सोपान मुक्ताबाई। गोपाळ देवढे दोन्ही बाहीं। रुक्मिणी सत्यभामा राही। चतुष्ट ठाय वाढिती॥ ४॥ वैष्णव प्रेमळाचे पंक्तीं। प्रार्थना करितसे श्रीपति। सोपान ज्ञानदेव निवृत्ति। एकचि वृत्ति बैसले॥ ५॥ गरुड तिष्ठत होता द्वारीं। त्यासी रुक्मिणी ताट करी। आनंदें गर्जती जयजयकारी। रामकृष्ण हरिगोविंद॥ ६॥ देवगण गंधर्व पाहाती। ब्रह्मादिक वंचलों म्हणती। केवढें भाग्याचिया मूर्ति। भक्त आवडती जिवलग॥ ७॥ नामा म्हणे अलंकापूर। धन्य धन्य मनोहर। आपण येऊनि सारंगधर। समाधि देती ज्ञानदेवा॥ ८॥

१०३०. मग विनवी ज्ञानदेव। सकळांचा जाणोनी ठाव। शुद्धभक्ति प्रेमळ वैष्णव। सर्वभाव सख्य घेती॥ १॥ मग पाचारिला गरुड। भक्त पुंडलिक प्रौढ। सोपानदेव जगारूढ। पुरे कोड सकळांचें॥ २॥ बैसोनियां एकासनीं। देवभक्त चक्रपाणि। तांबुल घेऊनि वदनीं। संतोष होऊनि बोलती॥ ३॥ केलें प्रयाण सुमुहूर्त। पंढरीस जावयाचा आर्त। संवत्सरीं जाउनि त्वरित। समाधी देऊं सोपानदेवा॥ ४॥ ऐसा निर्धार करुनी। समस्तांचें भोजन सारुनी। सिद्ध झाली माता रुक्मिणी। अस्तमानीं दिन गेला॥ ५॥ जावोनी तया पुष्पकावरी। शयन आरंभिलें हरी। नारद तुंबर वैकुंठाभीतरीं। मंजुळ सुस्वरीं गातसे॥ ६॥ भक्त भागवत भाग्याचे। घोष गजर केला वाचें। ऐसें चतुर प्रहर निशीचें। जागरण हरीचें क्रमिलें॥ ७॥ नामा म्हणे चालिला हरी। ज्ञानदेव प्रार्थना करी। देवा तूंचि निरंतरीं। रहावें हृदयीं आमुच्या॥ ८॥

१०३१. उगवला दीन प्रभात। स्नानसंध्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सारोनी समस्त। उद्धव कर जोडोनी बोलत। पूर्ण आर्त सर्वांचें॥ १ ॥ अनुपम इचा महिमा। न बोलवे जाहली सीमा। आतां चला वेगीं पुरुषोत्तमा। आपले आश्रमा पंढरीसी॥ २॥ गरुड सामोरा तिष्ठत। भक्त भागवत समस्त। मुनी पुंडलीक विनवीत। केलें दंडवत साष्टांगें॥ ३ ॥ म्हणे ज्ञानदेव यजुर्वेदी। वागस्नेहो वाक्बुद्धी। परापश्यंति मध्यमा वैखरी समाधी। त्या मंत्रोदकें दिधली॥ ४ ॥ ऐसाचि सोपान मार्ग। तूंचि करितां पांडुरंग। ग्राम लेखनाचा प्रसंग। निरोपिला सांग कुळयाती॥ ५ ॥ सकळवंश परंपरा। न सोडावें तुम्ही आचारा। आम्ही जातों पंढरपुरा। या विठोबा सांगातें॥ ६ ॥ सकळां आलिंगन दिधलें। मग गरुडावरी आरूढले। ज्ञानदेवांनीं हरीचीं पाउलें। दृढ धरिलीं निरंतर॥ ७॥ नामा नाचे हरिद्वारीं। आनंद झाला अलंकापुरीं। विठ्ठलदेवो निघाले पंढरी। ज्ञानदेवा समाधि देवोनी॥ ८॥

१०३२. क्षणक्षणा पंढरीनाथ। नामयाचा धरुनी हात। ज्ञानदेवासी आठवीत। कंठ सद्गदित होऊनि॥ १ ॥ उद्धवासी म्हणे पांडुरंग। या सज्जनाचा न व्हावा वियोग। हें हृदय होतसे दोन भाग। सखे अंतरंग तुम्ही माझे॥ २ ॥ मज याहूनि गोड़ न वाटे। ऐसे जिवलग न भेटे। समूळ जीवाचें दुःख आटे। संतोष वाटे मानसीं॥ ३ ॥ धन्य चौघेजण। मुक्ताबाई ब्रह्मपूर्ण। यांनी तारिले सकळ जन। दुःखें दारुण नासलें॥ ४ ॥ यांचेनिपडिपाडें। उपमेसी दिसे थोकडें। ज्ञानासारिखें रत्न जोडे। हें तंव न घडे कल्पांतीं॥ ५ ॥ माझ्या अंतरींचें गुज। उद्धवा सांगितलें तुज। कीं नामदेव आवडता सहज। आणिक मज नावडतें॥ ६ ॥ घडीघडी रुक्मिणीपाशीं। बैसोनी सांगे हृषीकेशी। माता रुक्मिणी निजमानसीं। आठवीतसे॥ ७ ॥ निवृत्ति तुम्हां नाहीं भिन्नता। त्याचा आत्मा तुम्ही अनंता। शिव विष्णु ऐक्यता। असे स्वभावतां मूळची॥ ८॥ ज्ञानदेव तुमचाचि अंश। केवळ स्वयंप्रकाश। स्वात्मसुख निज रहिवास। स्वानंद असे उद्बोध॥ ९ ॥ गोडीसवे जैसा गूळ। सुवर्ण रत्नजडित तेजाळ। जैसें पुष्पासवे परिमळ। कैंचें वेगळें स्वामिया॥ १० ॥ सोपानदेव तरी पोटींचा। तो सखा प्राण असे तुमचा। येथें शब्द भिन्नपणाचा। कोठवरी वाचा मिरवेल॥ ११ ॥ सकळ संत महंत मिळोनी। माथा ठेविला हरिचरणीं। जगन्माता बोले रुक्मिणी। तुम्हांपासोनी दूर नाहींत॥ १२ ॥ नामदेवांनीं धरिले चरण। साष्टांग घालोनि लोटांगण। तूं स्वामी सर्वांचें जीवन। मी रंक दीन कैंचें बोलूं॥ १३ ॥

१०३३. भगवंत म्हणे नामयासी। तूं यथार्थ बोलिलासी। क्षणक्षणा आठव मानसीं। न पडे विसर मजसी॥ १ ॥ आवडी भक्ति ज्ञान वीतरागी। ज्ञानदेव युगायुगीं। न देखे सकळ ब्रह्मांड जगीं। मजलागीं खंती वाटे॥ २ ॥ उद्धव चरणावरी ठेवोनी माथा। एक विनंति परिसावी जगन्नाथा। गुज अंतरींचें सांगा समर्था। कृपावंता स्वामिया॥ ३ ॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपानासी। तिघां बैसविलें समाधिसी। मुक्ताबाई इची स्थिति कैशी। ती सांगावी स्वामिया॥ ४॥ म्हणे विठोजी तूं काय नेणसी। प्रीति करूनि आम्हां पुससी। तरी ऐका स्थिति हृषीकेशी। ऐसें उघड तुजसी बोलतो॥ ५ ॥ निवृत्तीचा कर अभय शिरीं। सत्य सनातन निर्धारीं। महाकल्पाच्या अंतिवरी। देह अवसरीं ठेविला॥ ६ ॥ तंववरी बाईचें शरीर। चिरकाळ निरंतर। मुक्ताबाई ब्राह्मणी साचार। जाण निर्विकार उद्धवा॥ ७॥ देवगण बैसोनि विमाना। गेले आपुलिया भुवना। सकळ महामुनि स्थाना। हरिचरणा वंदोनी॥ ८ ॥ म्हणती सभाग्य केवढें। जिहीं केलें ब्रह्म उघडें। संवत्सर गांवीं वाडें कोडें। देखिलें रोकडें सकळीं॥ ९ ॥ निवृत्तिनाथ पायाळ पूर्ण। ज्ञानदेव ज्ञानांजन। सोपानदेव ब्रह्म जाणोन। जिहीं निधान जोडिलें॥ १०॥ शुद्धि भक्तिभावज्ञान। जोडिला विठोबा निधान। तेथिचे विभागीं संपूर्ण। प्रेम जीवन ओसंडत॥ ११ ॥ वैष्णव महंतासी कुरोंडी। मुक्ताई ओंवाळुनि सांडी। सद्भावें उभारिली गुडी। आनंद परवडी नाचती॥ १२ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

नामा म्हणे पंढरीसी। स्वामी चालिले शीघ्र गतीसी। सवे भक्त मांदी सरसी। नाम वाचेसी गर्जंती॥ १३॥

१०३४. ऐसियांचें जो चरित्र आवडी ऐकें। तो या भक्तांबरोबरी तुके। भोगी वैकुंठ निजसुखें। स्वयंमुखें बोलिले॥ १॥ धन्य धन्य तो पुंडलिक भक्त। जया कारणें हरि तिष्ठत। ऐसे पोवाडे गर्जत। जग तारीत नामेंकरूनियां॥ २॥ जन्मोजन्मीं सभाग्य होती। तयालागीं निजपद प्राप्ती। कदा काळीं पुनरावृत्ति। नये मागुती संसारीं॥ ३॥ नामा म्हणे नामस्मरण। तुटती प्रपंचधरण बंधन। सुख पावती निदान। समचरण देखलिया॥ ४॥

श्रीज्ञानदेवमहाराजांची समाधि.

(२)

१०३५. मंगळमूर्ति सुखधामा। भक्तांचिया कल्पद्रुमा। निवृत्तीचिया पुरुषोत्तमा। नमो तुज॥ १॥ विद्यासागरा वैरागरा। संकटीं माउली ज्ञानेश्वरा। भरित दाटलें अंबरा। तो तूं योगेश्वरा मोक्षदायी॥ २॥ मति चालविली रसाळ। संत श्रोतियां केला सुकाळ। दिधलें पुरुषार्थाचें बळ। तें तूं केवळ संजीवन॥ ३॥ अमृतानुभव आनंदलहरी। ग्रंथ सिद्ध केला ज्ञानेश्वरी। संस्कृत प्राकृत वैखरी। वदविली माझी॥ ४॥ आतां मोक्षाचिया वाटा। पाहिला षड्चक्र चोहटा। आज्ञा द्यावी वैकुंठा। ज्ञानदेव म्हणे॥ ५॥

१०३६. आतां पदपदांतराची सेवा। संपादिली स्वामी केशवा। धन्य आमुचिया दैवा। जोडिलां तुम्ही॥ १॥ आत्मविद्या बोलावया कारणे। सुख पावले श्रोते सज्जने। आतां जें आरंभिलें मनें। तें आपण सिद्धि न्यावें॥ २॥ भूवैकुंठ एक पंढरी। त्याहूनि आगळी अलंकापुरी। सिद्धेश्वरा शेजारी। इंद्रायणी॥ ३॥ त्रिपुटी पश्चिम मोक्षाची वाट। प्रत्यक्ष कैलास सिद्धपेठ। गोपाळपुरीं केली गोष्ट। चौघीजणी॥ ४॥ नलगे कलियुगींचा वारा। जें जें बोलिलों जगदोध्दारा। मागितला थारा। पदीं तुझ्या॥ ५॥ आतां वैराग्याचें बळ। सिद्धि प्राप्तीचें फळ। ज्ञानदेवें घेतली आळ। जाणा स्थळ आवडीचें॥ ६॥

१०३७. अष्टोत्तरशें तीर्थे सारीं। ओघें आलीं अलंकापुरीं। वाद्यें वाजताती गजरीं। कीर्तन लहरी अमृताची॥ १॥ जैसा कस्तुरीचा सुगंधु। अनुभवी न म्हणतीच बद्धु। तैसा औटपिटाचा नादु। आठवी गोविंदु आवडीने॥ २॥ बौद्ध चक्रपाणि। सत्रावी कळा माय रुक्मिणी। जाणत असे अंतःकरणीं। भक्त इच्छा॥ ३॥ भावें विठ्ठलें केली गोष्टी। ज्ञानदेवें अपूर्व इच्छिलें पोटीं। जावें उठाउठीं। समुदायेंसी॥ ४॥

१०३८. विठ्ठल रुक्मिणी सहित गरुड हनुमंत। आणिक संत महंत जमा झाले॥ १॥ परिसा भागवत नामा पुंडलिक। पताकासहित उठावले॥ २॥ गंधर्व आणि देव आले सुरगण। चाललीं विमानें अलंकापुरीं॥ ३॥ लहान थोर सारे आले ऋषीश्वर। उतरले भार वैष्णवांचे॥ ४॥ नामा म्हणे देवा दिसती तातडी। जाती मज घडी युग ऐसी॥ ५॥

१०३९. पंढरीचा पोहा आला अलंकापुरीं। पंच कोसावरी साधुजन॥ १॥ पांडुरंगा संगे वैष्णवांचे भार। दिंड्या ते बाहेर निघाल्यासे॥ २॥ पताकांचे भार निघाले बाहेर। भेटती ऋषीश्वर पांडुरंगा॥ ३॥ अवघिया भेटी झाल्या त्या बाहेरी। मग अलंकापुरीं येते झाले॥ ४॥ सोपानानें मग केला नमस्कार। उतरिलें पार पांडुरंगा॥ ५॥

१०४०. हरिहर विधाता आले अलंकापुरीं। इंद्रायणी तीरीं एक थाटी॥ १॥ योगियांचा सखा कोठें ज्ञानेश्वर। जाती ऋषीश्वर भेटावया॥ २॥ शून्याचिया पोटीं निरंजन गुंफा। ज्ञानयज्ञ सोपा सिद्ध केला॥ ३॥ उन्मनीं निद्रा लागलीसे फार। स्वरूपीं ज्ञानेश्वर जागा झाला॥ ४॥ नामा म्हणे देवा भली केली बुद्धी। लागली समाधि ज्ञानदेवा॥ ५॥

१०४१. लागली उन्मनी वैराग्याची धुणी। जागा निरंजनी निरंतर॥ १॥ भूचरी खेचरी चाचरीच्या छंदें। अगोचरीच्या नादें सहस्त्र दळीं॥ २॥ औटहातध्वनी चित्तवृत्ति जेथें। उजळली ज्योत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

तन्मयाची ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा करा सावधान। नाहीं देहभान ज्ञानदेवा ॥ ४ ॥

१०४२. धन्य इंद्रायणी पिंपळाचा पार। धन्य ज्ञानेश्वर पुण्यभूमी ॥ १ ॥ धन्य भागिरथी मनकर्णिका वोघा। आणिक हो गंगा त्रिवेणी त्या ॥ २ ॥ धन्य ऋषीश्वर धन्य पांडुरंग। मिळाले ते सांग अलंकापुरीं ॥ ३ ॥ नामा म्हणे धन्य भाग्याचे हे संत। झाला पहा एकांत ज्ञानोबाचा ॥ ४ ॥

१०४३. अल्याड पल्याड पताकांचे भार। मध्यें मनोहर इंद्रायणी ॥ १ ॥ पिवळ्या पारव्या आणिक हिरव्या। नीळवर्ण साऱ्या लखलखीत ॥ २ ॥ जरी जर्तारी झाल्या रानभरी। विजा त्यावरी खेळताती ॥ ३ ॥ सर्पाकार दंड तारांगणावाणी। पताका तिकोनी दाटताती ॥ ४ ॥ नामा म्हणे तेथें पताकांचे भार। केव्हडें भाग्य थोर ज्ञानोबाचें ॥ ५ ॥

१०४४. कैलासाचा वास अधिक सिद्ध बेट। विष्णूचें वैकुंठ पुरातन ॥ १ ॥ भूमिवरी पंढरी तैसी अलंकापुरी। पंच कोशावरी पुण्यभूमी ॥ २ ॥ सुखाची हे मूर्ति नीलकंठलिंग। चक्रतीर्थ सांग मोक्ष भेटे ॥ ३ ॥ परमार्थ सुअर्थ देखतांची संत। सांगितली मात अनुभवाची ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा हें स्थळ चांगलें। चित्त मन रंगलें ज्ञानोबाचें ॥ ५ ॥

१०४५. पुसताती संत सांगा देवा मातें। पूर्वी येथें होतें कोण क्षेत्र ॥ १ ॥ देव म्हणे स्थळ सिद्ध हें अनादी। येथेंच समाधि ज्ञानदेवा ॥ २ ॥ अष्टोत्तरशें वेळां साधिली समाधी। ऐसें हें अनादी ठाव असे ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा सांगितलें उत्तम। ज्ञानअंजन सुगम देखों डोळां ॥ ४ ॥

१०४६. स्वानंदें स्वभावें देवभक्तां भेटी। वोरसोनि कंठीं आलिंगावें ॥ १ ॥ देव म्हणे भले आठवलें तुज। ते हे संधी मज कळली असे ॥ २ ॥ पदपदांतरें केला मार्ग सोपा। त्यांत माझी कृपा वोळली असे ॥ ३ ॥ देव म्हणे तुझी पुरवीन आळी। सुखी सही मंडळी वैष्णवांची ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा आज्ञा देगा यासी। नेणूं काय आम्हांसी आरंभिलें ॥ ५ ॥

१०४७. उदित झालें मन आतां काय अनुमान। करी शीघ्र प्रस्थान आज्ञा माझी ॥ १ ॥ देवाचा हो कर धरोनी ज्ञानेश्वर। निघाला बाहेर योगिराज ॥ २ ॥ मागें पुढें संत चालिले मिरवित। कौतुक पहात इहलोकीं ॥ ३ ॥ नारा विठा गोंदा माहादा विरक्त। परसा भागवत उभे तेथें ॥ ४ ॥ समुदाय वैष्णव मिळालासे भारी। महोत्सव गजरीं आरंभिला ॥ ५ ॥ नामा म्हणे गुज दाविलें श्रीहरी। धन्य अलंकापुरी पुण्यभूमी ॥ ६ ॥

१०४८. सारासार विचार करिती अवघे जन। हें ज्ञान अंजन दाविलें डोळां ॥ १ ॥ पाहिलें गे माय अंतरींचें सुख। वैकुंठनायक उभा असे ॥ २ ॥ ज्ञानदेवायोगें सकळांशीं दर्शन। परब्रह्म निधान डुल्लतसे ॥ ३ ॥ वोसंडले देव पाहोनियां प्रेम। डुल्लती सप्रेम अनुभवें ॥ ४ ॥ अवघे जन कोडें घालिती सांकडें। सांगावें निवाडे नामयाचे ॥ ५ ॥ देव म्हणे नामा विचारिलें आम्हां। ते कां संधी तुम्हा कळली नसे ॥ ६ ॥

१०४९. देव म्हणे नामया ब्रह्मक्षेत्र आदी। येथेंचि समाधि ज्ञानदेवा ॥ १ ॥ चौयुगां आदि स्थळ पुरातन। गेले तें नेमून मुनिजन ॥ २ ॥ चालिले सकळ झाले ते विकळ। अनादि हें स्थळ ज्ञानदेवा ॥ ३ ॥ नामा म्हणे सुख आम्हा सांगितलें हरी। दीर्घ ध्वनि करी वोसंडोनी ॥ ४ ॥

१०५०. खेद दुःख करी मनाचा कळवळा। प्रेमाश्रु डोळां दाटताती ॥ १ ॥ नारा विठा गोंदा पाठविला महादा। साहित्या गोविंदा सांगितलें ॥ २ ॥ काय काय आणूं सांगा हें प्रमाण। नेमियेला नेम पांडुरंगें ॥ ३ ॥ तुळसी आणि बेल दर्भ आणि फुलें। उदक हें चांगलें भागिरथीचें ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा साहित्य करितां। आठवितें चित्ता खेद दुःख ॥ ५ ॥

१०५१. साडेतीन पाउलें टाकिलीं निश्चळ। नेमियेलें स्थळ उत्तरायणीं ॥ १ ॥ देव म्हणे ज्ञाना होईं सावधान। माग वरदान मज कांहीं ॥ २ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ज्ञानदेव म्हणे शुद्ध कार्तिक मासीं। व्रत एकादशी स्वामींकडे ॥ ३ ॥ कृष्णपक्षीं व्रत हरिदीन परिपूर्ण। मागितला मान ज्ञानदेवें ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा आवडीनें देतां। जोडलें हें संतां पियूष जें ॥ ५ ॥

१०५२. वोसंडोनी हरि आनंदला तेथें। पुण्य हें अगणित सांगितलें ॥ १ ॥ सर्वांगालागीं न्याहाळिलें परिपूर्ण। केलें निंबलोण आवडीनें ॥ २ ॥ अलंकापुरीं कोणी करील कीर्तन। तयालागीं येणें वैकुंठींचें ॥ ३ ॥ आस्थि नास्ति उदकीं करील ब्रह्मरूप। कोटी कुळांसहित उद्धरीन ॥ ४ ॥ जेथें ज्ञानदेव तेथें मी निशिदिनीं। येथें सुखें ज्ञानी डुल्लताती ॥ ५ ॥ नामा म्हणे आतां वोसंडले हरी। जडमूढावरी कृपा केली ॥ ६ ॥

१०५३. वन वृक्ष वल्ली ईश्वरासमान। ऋषि मुनिजन राहाती जेथें ॥ १ ॥ होऊनियां पक्षी कमोद कोकिळा। वेष्टियेलें स्थळा ब्रह्माबोधें ॥ २ ॥ मृत्तिका पाषाण पंचक्रोशीचे खडे। झाले पहा धडफुडे ब्रह्मरूप ॥ ३ ॥ पंचमहापातकी गेले अलंकापुरीं। न चाले त्याजवरी काळ यम ॥ ४ ॥ सांगताती देव ऐकता रुक्मिणी। नामा म्हणे चक्रपाणि वर दिला ॥ ५ ॥

१०५४. चक्रतीर्थी पाहा उभा तो गोपाळ। पुढें विणे टाळ वाजताती ॥ १ ॥ स्वर्गीहूनि पुष्पें वर्षती सुरवर। उभे ऋषीश्वर समुदायेंसी ॥ २ ॥ आणिक वाद्यें तेथें वाजती अपार। जाती ज्ञानेश्वर समाधीसी ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा चुको नेदी संधी। पोंहोचवितां सिद्धि बाळकासी ॥ ४ ॥

१०५५. कोण जाणे माझे जीवींचा कळवळा। प्रेमाश्रु डोळां लोटताती ॥ १ ॥ अवघियांचें मन दूषित तटस्थ। लहान थोर संत वोसंडती ॥ २ ॥ तारियेले जड बा माझ्या कीर्तनीं। आठवती मनीं गुण तुझे ॥ ३ ॥ नामा म्हणे येथें बोलवेना मज। जातेसे निजगुज आवडीचें ॥ ४ ॥

१०५६. काय सांगों देवा ज्ञानोबाची ख्याती। वेद म्हैशा मुखीं वदविले ॥ १ ॥ कोठवरी वानूं याची स्वरूप स्थिती। चालविली भिंती मृत्तिकेची ॥ २ ॥ अविद्या मायेचा लागों नेदी वारा। ऐसें जगदोद्धारें बोलाविलें ॥ ३ ॥ नामा म्हणे यांनीं तारीले पतित। भक्ति केली ख्यात ज्ञानदेवें ॥ ४ ॥

१०५७. अनुभव हा सागर गुह्य आणि ब्रह्म। उघडे अध्यात्म बोलियेलें ॥ १ ॥ प्रगट हें गुह्य उकलीलें गाबाळ। केलें करतळमळ ज्ञानयानें ॥ २ ॥ कोणाची कल्पना नुरेचि बा येथें। उघडा गुह्यार्थ सिद्ध केला ॥ ३ ॥ करणें न करणें सांगितला पंथ। तिहीं लोकीं कीर्त वाढविली ॥ ४ ॥ ज्ञान हें अंजन साधी संजीवनी। नामा म्हणे यांनीं ख्याती केली ॥ ५ ॥

१०५८. अहंकार पोटीचे उतरिलें जहर। केला उपकार जगामाजीं ॥ १ ॥ कामक्रोध उतें उतरिले डंभ। करपले कोंभ संशयांचे ॥ २ ॥ विकल्पाचे पायीं घातियेली बेडी। केली तडातोडी इंद्रियांची ॥ ३ ॥ स्वर्गादिक सुखें कमाविलीं रोकडीं। वैकुंठासी शिडी लावियेली ॥ ४ ॥ नामा म्हणे धन्य उभारिल्या ध्वजा। घातियेल्या शेजा सुखधामीं ॥ ५ ॥

१०५९. कासाविस प्राण मन तळमळी। जैसी कां मासोळी जीवनावीण ॥ १ ॥ दाही दिशा वोस वाटती उदास। करिताती सोस मनामाजीं ॥ २ ॥ घातियेली घोण प्राण आला कंठीं। ज्ञानदेवासाठीं तळमळी ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा वाटतसे खंती। चालली विभूति योगियांची ॥ ४ ॥

१०६०. नानापरी मन आवरितो भारी। कांहीं केल्या हरि विसर न पडे ॥ १ ॥ दृश्या अदृश्याच्या दूर केल्या गोष्टी। उघडिली दृष्टि ज्ञानदेवें ॥ २ ॥ गीतेवरी टीका ग्रंथ केला सार। केवळ ईश्वर ज्ञानाचा हा ॥ ३ ॥ नामा म्हणे आतां देहासी विटला। स्वरूपी पालटला ज्ञानदेव ॥ ४ ॥

१०६१. गंध आणि अक्षता पंचामृत उदक। धूप आणि दीप आणियेले ॥ १ ॥ संत सज्जनांचा मिळाला समुदावो। मध्यें ज्ञानदेवों चालतसे ॥ २ ॥ क्षेत्र प्रदक्षणा करावया उद्देशी। मुहूर्त देवापाशीं विचारिला ॥ ३ ॥ दशमीचे दिवशीं रिघावें बाहेर।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हरिदिनीं जागर निशिदिनीं ॥ ४ ॥ द्वादशीं पारणें सोडावें निश्चळ। नेमियेलें स्थळ सिद्धेश्वरीं ॥ ५ ॥ नामा म्हणे हरि नेमिला सिद्धांत। काय माझा अंत पाहातसां ॥ ६ ॥

१०६२. ज्ञानेश्वरापाशीं आनंदी आनंद। नाचतो गोविंद कीर्तनासी ॥ १ ॥ दशमीच्या दिवशीं महोत्सव अलंकापुरीं। करीतसे हरि आवडीनें ॥ २ ॥ हरिदिन जागरण होत सारी रात्र। बसोनी पंढरीनाथ स्वअंगें ॥ ३ ॥ द्वादशी पुण्यतिथी केली ज्ञानेश्वरा। पांच दिवस सारा महोत्सव ॥ ४ ॥ अमावास्येचे दिवशीं केला गोपाळकाला। मग वैष्णवाला लाभ मोठा ॥ ५ ॥ नामा म्हणे देवा आनंद अलंकापुरीं। कांहीं दिवस हरि राहा येथें ॥ ६ ॥

१०६३. विनविती संत आणिक सज्जन। नव्हे समाधान कांहीं केल्या ॥ १ ॥ नानाचि प्रकार करितसे घोर। कांहीं केल्या स्थिर चित्त नव्हे ॥ २ ॥ काय पाहावें याला विरक्त पुरुषाला। स्वरूपीं मिळाला ज्ञानदेव ॥ ३ ॥ नामा म्हणे याचें उचंबळलें प्रेम। म्हणोनि परब्रह्म मागें पुढें ॥ ४ ॥

१०६४. निवृत्ति सोपान आणिक मुक्ताई। जाताती पाहीं कोणीकडे ॥ १ ॥ देवासी गुह्यार्थ केला पा एकांत। ज्ञानदेवें हित आरंभिलें ॥ २ ॥ नामा म्हणे अवघे बसा एकीकडे। ऐको द्या निवाडे गुज यांचें ॥ ३ ॥

१०६५. निवृत्ति सोपान मुक्ताई धाकुटी। धरियेली कंठीं पांडुरंगें ॥ १ ॥ कळवळली मनीं करिती दीर्घ ध्वनी। आठविती मनीं ज्ञानदेव ॥ २ ॥ विकळ झालें चित्त संत हे दुश्चित। नामा विकळ तेथ होत असे ॥ ३ ॥

१०६६. तिघांजणांलागीं केलें समाधान। सांगितली खूण अंतरींची ॥ १ ॥ कलियुगीं जग आत्याती करिती। साहवेना कीं यासी कांहीं केल्या ॥ २ ॥ पापी उद्धरिले पतित तारिले। जड पावविले मोक्षपंथीं ॥ ३ ॥ नामा म्हणे यांचें करितां समाधान। कळलें अंतःकरण मन यांचें ॥ ४ ॥

१०६७. निसंगासी संग नलगे आणिकाचा। परमार्थ हा साचा गहन केला ॥ १ ॥ जड या जीवाचें हरविलें अज्ञान। नेलें उतरून भवसिंधु ॥ २ ॥ ज्ञानियासी केली सिंधुसंजीवनी। झालें जनीं वनीं एक तारूं ॥ ३ ॥ नामा म्हणे सत्य बा माझ्याचें बोलणें। करी निंबलोण पदीं त्याचें ॥ ४ ॥

१०६८. फार आठवतें निवृत्तीचे चित्तीं। सोपान स्फुंदती मुक्ताबाई ॥ १ ॥ आम्हां माता-पिता नित्य ज्ञानेश्वर। नाहीं आतां थार विश्रांतीसी ॥ २ ॥ छळीलें ब्राह्मणें प्रतिष्ठानीं जातां। रेड्यामुखीं वेदांता बोलविलें ॥ ३ ॥ आला चांगदेव व्याघ्र वहान घेऊन। नेला अभिमान ज्ञानदेवें ॥ ४ ॥ नाना प्रकारचे आठविती शब्द। नामा म्हणे बोध भाविकाला ॥ ५ ॥

१०६९. देव म्हणे असे आठवाल फार। लागे उशीर समाधीसी ॥ १ ॥ रुक्माबाई म्हणे याजलागीं जाण। ब्रह्मा ब्रह्म खूण मेळविली ॥ २ ॥ अवतार हे चौघे झाले कैशापरी। सांगा आम्हां हरि उकलोनी ॥ ३ ॥ शीव तो निवृत्ति सोपान ब्रह्मस्थिती। ज्ञानदेव मूर्ति विष्णूची हो ॥ ४ ॥ ब्रह्मनी हे कळा माय मुक्ताबाई। विचारूनि पाहीं स्वयं मुक्ता ॥ ५ ॥ नामा म्हणे याला नाहीं पां उपाधी। पूर्ण हे समाधि ज्ञानदेवा ॥ ६ ॥

१०७०. अंतर बाहेर कळलें स्वरूप। स्वयें नंदादीप उजळिला ॥ १ ॥ येणें जाणें कोठें योगी पहा अवीट। सान वैकुंठ करूनि ठेवी ॥ २ ॥ ज्ञानीयाला मरण म्हणती अज्ञान। वायां तुम्ही शीण करूं नका ॥ ३ ॥ घटाचिया योगें प्रतिबिंब भासे। काय म्हणे नासे निरालंब ॥ ४ ॥ दर्पणाचे योगें दुसरें देखणें। काय मुखें दोन त्यांचीं झालीं ॥ ५ ॥ दृश्याचियामुळें जीव दिसे येथें। काय पां परमार्थ विटंबळें ॥ ६ ॥ तंतूचियामुळें पटाला विस्तार। काय निराकार वायां गेलें ॥ ७ ॥ रुक्मादेविवरें केलें समाधान। धरूनि ठेले मौन्य अवघेजण ॥ ८ ॥

१०७१. छत्र चामरें उभा सन्मूख भोंवतीं। रुक्माईचा पति मध्यभागीं ॥ १ ॥ निंबें आणि नारळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गोण्याचीं पोफळें। उदंड तींही केळें आणियलीं ॥ २ ॥ आणिक बहुता परी घेतली सामग्री। पीत पीतांबरी मृगझाला ॥ ३ ॥ भगवीं आभरणें घेतलें भस्म। अंगें परब्रह्म साह्य त्यासी ॥ ४ ॥ नामा म्हणे स्वामी तिष्ठताती अंगें। मेळविली सांगें साहित्यासी ॥ ५ ॥

१०७२. उगमापासुनी गंगा सागरासी गेली। काय दोन जालीं उदकें त्यांची ॥ १ ॥ तैसा ज्ञानदेव जाला अनुभव। काय आम्हां देव दुरावला ॥ २ ॥ सरिता सरोवराचे एके ठायीं झरे। लहान थोर सारे स्वरूपीं माझ्या ॥ ३ ॥ रुक्मादेवीवरें उगविलें गाबाळ। संत कृपाळ डुल्लताती ॥ ४ ॥ नामा म्हणे येणें मोहिलें चित्त। राहिले तटस्थ चौघेजण ॥ ५ ॥

१०७३. आणिक वाद्यें तेथें वाजताती अपार। उठावले भार वैष्णवांचे ॥ १ ॥ चिद्रत्नमंडप दिधला कल्लोळ। जैसे दीपमाळ दीप ठेले ॥ २ ॥ नक्षत्र गोंधळ उसळती भारी। चक्रें त्याजवरी उल्लाळती ॥ ३ ॥ मोतियें तोरणें लाविलीं अपार। झळकती तारे विभु ऐसें ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा नवल केलें गहन। पुंजाळिलें गगन ज्ञानदेवें ॥ ५ ॥

१०७४. निवृत्ति ज्ञानदेव उभे दोहींकडे। सोपान तो पुढें मुक्ताबाई ॥ १ ॥ देहुडे सुरगण थक्क पडिलें लोकां। सुरू केला डंका वैकुंठींचा ॥ २ ॥ चक्रतीर्थी उभे देव साधुजन। करविले स्नान ज्ञानदेवा ॥ ३ ॥ देवाचें हें तीर्थ घेतलें ज्ञानेश्वरें। केला नमस्कार पादपद्मीं ॥ ४ ॥ विठ्ठल रुक्मिणी ऋषि सुरवर। पूजा ज्ञानेश्वर करीतसे ॥ ५ ॥ नामयाच्या हातीं गंध अक्षता। पूजा महंता मान्य झाली ॥ ६ ॥

१०७५. टाळ विणे मृदंग वाजती अपार। नारद तुंबर गीत गाती ॥ १ ॥ शुक नामदेव अंबऋषि सादर। मध्यें ज्ञानेश्वर ब्रह्मरूप ॥ २ ॥ पिपिलिकेसी मार्ग जावया न मिळे। जाती भार मेळे वैष्णवांचे ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा दाविली नवाळी। पुरविली आळी ज्ञानोबाची ॥ ४ ॥

१०७६. दशमीचे दिवशीं केली प्रदक्षिणा। आणिक कीर्तना संत उभे ॥ १ ॥ रात्रंदिवस त्यांहीं केला हरिजागर। हरिदिनी थोर कृष्णपक्षीं ॥ २ ॥ मग केलें स्नान भागिरथीचे तीरीं। संत महंता भारी पूजियेलें ॥ ३ ॥ अवलोकिलें डोळां अंतर बाहेरी। मग सिद्धेश्वरीं येते झाले ॥ ४ ॥ सिद्धेश्वरालागीं पूजिले निवळ। मागितलें स्थळ समाधीसी ॥ ५ ॥ गंगा आणि गिरजा निलकंठ ईश्वर। केला नमस्कार नामा म्हणे ॥ ६ ॥

१०७७. अष्टोत्तरशें वेळ समाधि निश्चळ। पूर्वी तुझें स्थळ वहनाखालीं ॥ १ ॥ उठविला नंदी शिवाचा ढवळा। उघडिली शिळा विवराची ॥ २ ॥ आसन आणि धुनी मृगछालावर। पाहाती ऋषीश्वर वोसंडोनी ॥ ३ ॥ बा माझी समाधि पाहिली जुनाट। केवळ वैकुंठ गुह्यगौप्य ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा पुरातन स्थान। ऐसें नारायणें दावियेलें ॥ ५ ॥

१०७८. नारा विठा गोंदा महादा पाठविला। झाडविली जागा समाधीची ॥ १ ॥ हरिदिनीं जागर केला निशिदिनीं। उदईक पारणीं द्वादशीचीं ॥ २ ॥ गंगा गिरजा राही रुक्माबाई भामा। उठिल्या रांधण्या पारण्याच्या ॥ ३ ॥ नाना प्रकारचे पाक ते अपार। मुनि ऋषीश्वर बोलाविले ॥ ४ ॥ वैष्णव देव आणि आले सुरगण। करोनियां स्नान इंद्रायणी ॥ ५ ॥ पिंपळाचे पारी बैसविल्या पंक्ती। पात्रें ते श्रीपति वाढूं लागे ॥ ६ ॥ नामा म्हणे देवा करणें साहित्यासी। येतो कासाविसी प्राण माझा ॥ ७ ॥

१०७९. सोंवळ्याने हरि वाढितो सकळां। मनींचा कळवळा कोण जाणे ॥ १ ॥ रुक्माईचे कानीं सांगितली गोष्ट। विस्तारावें ताट ज्ञानदेवा ॥ २ ॥ राही रुक्माबाई वाढिती आवडीनें। सोडितो पारणें ज्ञानदेव ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा परब्रह्म अन्न। जातों बोलावण ज्ञानदेवा ॥ ४ ॥

१०८०. निवृत्ति सोपान मुक्ताई चवथी। अनेक विभूति ज्ञानेश्वरा ॥ १ ॥ नामा पुंडलिक गरुड हनुमंत। परसा भागवता बोलविले ॥ २ ॥ विठ्ठल रुक्माई सत्यभामा राही। इतुके तयेठायीं जमा झाल्या ॥ ३ ॥ विसोबा खेचर चांगा वटेश्वर। सांवता कुंभार

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

एकेठायीं ॥ ४ ॥ गंगा गिरजा दोघी निळकंठ ईश्वर। मध्यें ज्ञानेश्वर घेतियेला ॥ ५ ॥

१०८१. निवृत्ति मुक्ताईचें करिती समाधान। घेतला सोपान मध्यभागीं ॥ १ ॥ ऐक्य अहिक्याची बैसली एकवटें। विस्तारिलीं ताटें रुक्माईनें ॥ २ ॥ एक एकालागीं देताती प्रसाद। आतां ज्ञानराज पाहूं डोळां ॥ ३ ॥ नामा म्हणे स्वस्थ जेवितां पंगती। घृतपात्र हातीं विस्तारीतु ॥ ४ ॥

१०८२. ज्ञानदेवालागीं चंदनाची उटी। पंचारती होती आनंदाच्या ॥ १ ॥ गंध आणि अक्षता पुष्पपरिमळा। घेती वोसंगळा नामदेव ॥ २ ॥ ज्ञानदेव स्वस्थ देवा वोसंगळा। माळा घालीं गळां नामदेव ॥ ३ ॥

१०८३. जेवूनियां स्वस्थ उठिले परिपूर्ण। केलें आचमन वैष्णवांनीं ॥ १ ॥ वैकुंठींचा प्रसाद पावले निवाडे। गोंदा माहादा विडे वांटिताती ॥ २ ॥ दोन प्रहरपावेतों आटोपलें भोजन। तृतीय प्रहरीं कीर्तन आरंभिलें ॥ ३ ॥ कीर्तनाच्या नादें मोहिला गोविंद। करावा उद्वेग समाधीचा ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा करितां उशीर। विकळ ज्ञानेश्वर जात असे ॥ ५ ॥

१०८४. मुगुट मनोहर कुंडलें मकराकार। कासे पितांबर कसीयेला ॥ १ ॥ खोविले गोशे स्वार गरुडावर। उठविले भार वैष्णवांचे ॥ २ ॥ केलें आचमन तीर्थी त्या तांतडीं। आले उठाउठी सिद्धेश्वरीं ॥ ३ ॥ परमार्थ स्वार्थ झाल्या गुह्य गोष्टी। होताती भेटी ज्ञानदेवा ॥ ४ ॥ नामा म्हणे भेटा लहान थोर सारे। जातो ज्ञानेश्वर समाधीसी ॥ ५ ॥

१०८५. ब्रह्मादिक तेथें करिताती पूजा। घालिताती सेजा समाधीसी ॥ १ ॥ चिद्रत्न आसन उन्मनीची धुनी। समाधि सज्जनीं पाहियेली ॥ २ ॥ धुवट वस्त्राची घडी ते अमोल। तुळसी आणि बेल आंथरिले ॥ ३ ॥ दुर्वा दर्भ वरी टाकिले मोकळे। पुष्पें तीं सकळ समर्पिलीं ॥ ४ ॥ नामा म्हणे येथें छाया निरंतर। सखीं ज्ञानेश्वर सुखावला ॥ ५ ॥

१०८६. लावियेला दीप निरंजन ज्योति। प्रकाशल्या दीप्ती तन्मयाच्या ॥ १ ॥ पुजूनि समाधि निघाले बाहेर। प्रेमें ज्ञानेश्वर डुल्लतसे ॥ २ ॥ अनुमानिलें स्थळ सभोंवतीं सारें। धन्य ज्ञानेश्वरें कृपा केली ॥ ३ ॥ देव आणि नामा रुक्माई राही। स्फुंदती ठायीं संतजन ॥ ४ ॥

१०८७. निवृत्ति सोपान पुढें मुक्ताबाई। देवा सांगा कांहीं निजगुज ॥ १ ॥ देव ज्ञानेश्वर बैसले जवळीं। घेतियेली आळी सोपानानें ॥ २ ॥ ज्ञानदेवें खूण सांगितली देवा। पूर्ण तूं विसांवा सज्जनांचा ॥ ३ ॥ सोपानाचे हात देवाचिये हातीं। तेव्हां अपमूर्ति कासावीस ॥ ४ ॥ म्लान वदनें निवृत्ति सद्गुरु सागर। येउनी ज्ञानेश्वर चरणीं लागे ॥ ५ ॥ नामा म्हणे याचें अंतर परिपूर्ण। नाहीं देहीं भान निवृत्तीसी ॥ ६ ॥

१०८८. पांडुरंग निवृत्ति उभे दोघेजण। आरंभिलें नमन ज्ञानदेवें ॥ १ ॥ नामा पुंडलिक उभे दोहोंकडे। ज्ञानराज पुढें उभे ठेले ॥ २ ॥ गंध आणि अक्षता पुष्प परिमळ। आणियेलें जळ भागिरथीचें ॥ ३ ॥ अनंत स्वरूपाचीं अनंत हीं नांवें। नमन ज्ञानदेवें आरंभिलें ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा नमनाची रीती। नमन सर्वांभूतीं मान्य झालें ॥ ५ ॥

१०८९. पुढें ज्ञानेश्वर जोडोनियां कर। बोलतो उत्तर स्वामिसंगें ॥ १ ॥ पाळिलें पोसिलें चालविला लळा। बा माझ्या कृपाळा निवृत्तिराजा ॥ २ ॥ स्वामिचीया योगें झालों स्वरूपाकार। उतरलों पार मायानदी ॥ ३ ॥ निवृत्तीनें हात उतरिला वदना। त्यागिलें निधाना आम्हांलागीं ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा देखवेना मज। ब्रह्मीं ज्ञानराज मिळविला ॥ ५ ॥

१०९०. वोसंडोनि निवृत्ति आलिंगों लागला। आणिकांच्या डोळां अश्रु येती ॥ १ ॥ अमर्यादा कधीं केली नाहीं येणें। शिष्य गुरूपण सिद्धि नेलें ॥ २ ॥ गीतार्थाचा अवघा घेतला सोहळा। गुह्यगौप्यमाळा लेवविल्या ॥ ३ ॥ फेडिलीं डोळ्याचीं अत्यंत पारणीं। आतां ऐसें कोणी सखे नाहीं ॥ ४ ॥ काढोनियां गुह्य देवें केलें फोल। आठवती बोल मनामाजी ॥ ५ ॥ नामा म्हणे संत कासावीस सारे।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लाविती पदर डोळियांसी ॥ ६ ॥

१०९१. देव म्हणे ऐसें आठवाल कोठवर। होईल उशीर समाधीसी ॥ १ ॥ निरंजनीं समाधि निरंतर तुम्हांसी। व्यर्थ कासाविसी होऊं नये ॥ २ ॥ निवृत्तीसी पोटीं धरिलें देवानें। केलें समाधान अवघियांचें ॥ ३ ॥ ब्रह्मणीही कळा पुढें मुक्ताबाई। देवा सांगा कांहीं आम्हांलागीं ॥ ४ ॥ देव म्हणे तुज येणें जाणें नाहीं। अनुभवोनी पाही जीवन्मुक्ति ॥ ५ ॥ म्हणे मुक्ताबाई सख्या ज्ञानेश्वरा। प्रार्थना तुम्ही करा देवालागीं ॥ ६ ॥ ज्ञानदेवे वचन घातलें देवांवर। विश्वाचें माहेर पांडुरंग ॥ ७ ॥ नामा म्हणे स्वामी प्रेमाचिया रंगें। बोलावणें स्वांगें करूं आम्ही ॥ ८ ॥

१०९२. ज्ञानदेव देवा घातलें वचन। करा समाधान सोपानाचें ॥ १ ॥ समुदायेंसी तुम्हां करूं बोळवण। ऐसाची सोपान ब्रह्म करूं ॥ २ ॥ तीर्थावळी वेळे नेमियेलें स्थान। तेथें पोंचविणें मजलागीं ॥ ३ ॥ विठ्ठल रुक्माई उभीं समाधान। दिधलें वचन ज्ञानदेवा ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा स्थिरावलें मन। करितां समाधान अवघियांचें ॥ ५ ॥

१०९३. निवृत्तिदेव म्हणे सांगतों या वाचें। राहाणें चौघांचें एकरूप ॥ १ ॥ त्रिवेणीचा ओघ जैसा एके ठायीं। तैसी मुक्ताबाई आम्हांमध्यें ॥ २ ॥ ब्रह्माविष्णुहर जैसे एके ठायीं। तैसी मुक्ताबाई आम्हांमध्यें ॥ ३ ॥ रज तम गुण सत्त्व गुणाठायीं। तैसी मुक्ताबाई आम्हांमध्यें ॥ ४ ॥ भूचरीं खेचरीं चांचरी ते पाही। अगोचरी ठायीं मुक्तगंगा ॥ ५ ॥ प्रथम ज्ञानेश्वरें काढियेली वाट। धरियेलें वैकुंठ अलंकापुरीं ॥ ६ ॥ इंद्रनील पर्वत नेमिला सोपाना। निवृत्तीसी जाणा त्रिंबकेश्वर ॥ ७ ॥ चौथी मुक्ताबाई नेमियेली तापी। नामा म्हणे ख्याती केली यांनी ॥ ८ ॥

१०९४. निवृत्तिदेव म्हणे करितां समाधान। कांहीं केल्या मन राहात नाहीं ॥ १ ॥ बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट। ओघ बारा वाट मुरडताती ॥ २ ॥ बांधल्या पेंढीचा सुटलासे आळा। तृण रानोमाळा पांगलेसें ॥ ३ ॥ हरिणीवीण खोपी पडियेली वोस। दशदिशा पाडस भ्रमताती ॥ ४ ॥ मायबापें आम्हां त्यागियेलें जेव्हां। ऐसें संकट तेव्हां झालें नाहीं ॥ ५ ॥ नामा म्हणे देवा पेटला हुताशन। करा समाधान निवृत्तीचें ॥ ६ ॥

१०९५. देव रुक्माबाई आणिक साधुजन। करिती समाधान निवृत्तीचें ॥ १ ॥ ज्ञानीयांनीं ऐसी करावी जंव खंती। अज्ञानाचा किती पाड आला ॥ २ ॥ धन्य तुमचा महिमा बोलती पुराणीं। दृश्य कांहीं मनीं आठवूं नये ॥ ३ ॥ आकाशाचे ठायीं अभ्रें येतीं जातीं। कोण त्यांची खंती करूं पाहे ॥ ४ ॥ अवतारादिक गेले आले अपार। जैसा का विस्तार मृगजळाचा ॥ ५ ॥ नामा म्हणे देवें धरियेलें हातीं। उठविली विभूति निवृत्तिराज ॥ ६ ॥

१०९६. गरुड हनुमंत मुक्ताई सोपान। देव साधुजन आनंदले ॥ १ ॥ मागें पुढें संत पताकांचे भार। मध्यें ज्ञानेश्वर मिरवतो ॥ २ ॥ टाळ आणि विणे मृदंग गायन। करिती कीर्तन सुस्वरेंसी ॥ ३ ॥ जयजयकार ध्वनि करिती सुरगण। वर्षती सुमन स्वर्गीहुनी ॥ ४ ॥ हरिपाठ गजर करिती अपार। नामा म्हणे भार उठविले ॥ ५ ॥

१०९७. सर्व स्वस्ति क्षेम वैष्णव मंडळी। बैसलेती पाळी समाधीच्या ॥ १ ॥ पताकांची छाया दुणावली फार। सिद्ध ज्ञानेश्वर तेव्हां झाले ॥ २ ॥ अजानवृक्षदंड आरोग्य अपार। समाधीसमोर स्थापियेला ॥ ३ ॥ कोरड्या काष्टीं फुटियेला पाला। तेव्हां अवघियाला नमस्कारी ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा घार गेली उडोन। बाळें दानादान पडियेली ॥ ५ ॥

१०९८. मुंग्यांचिये विवरीं लागलीसे आग। पुढें आणि मागें झालें नाहीं ॥ १ ॥ राही रुक्माई आणि सत्यभामा। ओंवाळिती प्रेमा ज्ञानेश्वरा ॥ २ ॥ उभारिल्या गुडीया आणि तोरणें। छाया सुदर्शन धरियेलें ॥ ३ ॥ नारा विठा गोंदा भेटला महादा। उभे जागोजागां राहिलेती ॥ ४ ॥ विसोबा खेचर चांगा वटेश्वर। केला नमस्कार अवघियांनीं ॥ ५ ॥ गोरा कुंभार सांवता माळी। नामा तळमळी वत्सा ऐसें ॥ ६ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१०९९. परसा भागवतें केला नमस्कार। सारे लहान थोर जमा झाले॥ १॥ सकळांचिया पायीं नमियेलें नमना। केली प्रदक्षिणा समाधीसी॥ २॥ प्रथम पायरी बाहेरील जेथें। उभा पंढरिनाथ भेटावया॥ ३॥ देव म्हणे बापा अमृत नेदी पाट। फार केले कष्ट जगासाठीं॥ ४॥ नामा म्हणे यांनीं अनुभवाच्या नौका। पार केले लोकां जडमूढां॥ ५॥

११००. देव निवृत्ति यांनीं धरिले दोन्ही कर। जातो ज्ञानेश्वर बैसावया॥ १॥ नदीचिया माशा घातलें माजवण। तैसें जनवन कालवलें॥ २॥ दाही दिशा धुंद उदयास्तावीण। तैसेंची गगन कालवलें॥ ३॥ जाऊनि ज्ञानेश्वर बैसले आसनावरी। पुढें ज्ञानेश्वरी ठेवियेली॥ ४॥ ज्ञानदेव म्हणे सुखी केलें देवा। पादपद्मीं ठेवा निरंतर॥ ५॥ तीन वेळां तेव्हां जोडिलें करकमळ। झांकियेले डोळे ज्ञानदेवें॥ ६॥ भीममुद्रा डोळा निरंजन मैदान। झाले ब्रह्मपूर्ण ज्ञानदेव॥ ७॥ नामा म्हणे आतां लोपला दिनकर। बाप ज्ञानेश्वर समाधिस्थ॥ ८॥

११०१. निवृत्तीनें बाहेर आणिलें गोपाळा। घातियेली शिळा समाधीसी॥ १॥ सोपान मुक्ताई सांडिती शरीरा। म्हणती धरा धरा निवृत्तीसी॥ २॥ आणिकांचीं तेथें उद्विग्न तीं मनें। घालिताती सुमनें समाधीसी॥ ३॥ नामदेवें भावें केली असे पूजा। बापा ज्ञानराजा पुण्यपुरुषा॥ ४॥

११०२. अवघी जयजयकारें पिटियेली टाळी। उठली मंडळी वैष्णवांची॥ १॥ सह मंडळी सारे उठले ऋषीश्वर। केला नमस्कार समाधीसी॥ २॥ पंचद्वारें संत रिघाले बाहेर। सखा ज्ञानेश्वर अलंकापुरीं॥ ३॥ इंद्रायणी केलें अवघ्यांही आचमन। करिती समाधान निवृत्तीचें॥ ४॥ सोपानासी पोटीं धरिलें देवानें। संवत्सरगांवीं जाणें नेम केला॥ ५॥ मुक्ताबाईलागीं सांगितली खूण। जाय तो सोपान स्थीर असा॥ ६॥ त्रिवर्ग तीं ऐसीं राहिलीं एकमनें। जाणोनियां खूण नामा म्हणे॥ ७॥

११०३. देवसमागमें परतले भार। केला हरिगजर समाधसी॥ १॥ नव दिवस संत समाधी-जवळी। देव चंद्रमौळी कीर्तनासी॥ २॥ शुद्ध मागेश्वर दशमी भोजनें। विधि नारायणें संपादिली॥ ३॥ एकादशीं कीर्तन द्वादशीं पारणीं। मग ऋषि मुनि संतोषले॥ ४॥ त्रयोदशीं देव रिघाले बाहेरी। धन्य अलंकापुरीं ज्ञानराज॥ ५॥ नामा म्हणे धन्य पलाटण पाउलीं। पंचक्रोश ठेलीं सकळ तीर्थें॥ ६॥

११०४. धन्य अलंकापुरी शिवपीठ शिवाचें। अगस्ति ऋषींचें पूर्वस्थळ॥ १॥ त्रिवर्गीं म्हणितलें जातां जातां हरी। आम्हां कौंडण्यपुरीं आज्ञा द्यावी॥ २॥ इंद्रनीळ पर्वत नेमिला सोपानदेवा। तोंवरी करूं सेवा अंबिकेची॥ ३॥ देव म्हणे भलें आरंभिलें तुम्ही। आज्ञा घेतों आम्ही पंढरीसी॥ ४॥ इंद्रनीळ पर्वतीं समाधि सोपान। पर्वत आमंत्रण देवें दिलें॥ ५॥ देव भक्तालागीं झालें समाधान। मग सुरगण आंवतिलें॥ ६॥ नामा पुंडलिक निघाले बाहेरी। गरुडावरी देव स्वार झाले॥ ७॥

११०५. समाधीं परिपूर्ण बैसले ज्ञानेश्वर। उठविले भार वैष्णवांचे॥ १॥ अलंकापुरीं सव्य घेतली ते संतीं। दिली भागीरथी ज्ञानालागीं॥ २॥ भैरवापासूनि उगम निरंतर। रानोमाळ झरे तीर्थ गंगा॥ ३॥ सैंध इंद्रायण वाहाती मिळोनी। अखंड क्षणीं वोघ जाती॥ ४॥ चालिलें विमान गंधर्व सुरगण। यात्रा परिपूर्ण झाली म्हणती॥ ५॥ तीर्थ महोत्साव झाला म्हणती सारासार। देव ऋषीश्वर परतले॥ ६॥ वैष्णवांचे भार निघाले बाहेर। केला जयजयकार सर्वत्रांनीं॥ ७॥ पंढरीचा पोहा निघाला बाहेर। गरुडावरी स्वार देव झाले॥ ८॥ नामा म्हणे ऐसा सुखी ज्ञानेश्वर। झाला असे स्थिर ब्रह्मबोधें॥ ९॥

श्रीसोपानदेवसमाधि.

११०६. मग उड्डाण साधिलें गरुडें। गगन क्रमित गेला चंड। वरी आरूढले प्रचंड। भक्त पुंडलिकासहित॥ १॥ पक्षाचेनि फडत्कार। ग्राम

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ठाकिला संवत्सर। पाठारावरी कऱ्हे तीर। जयजयकारें गर्जिन्नले॥ २॥ त्या काळीं समारंभ केला। महा उत्सव हरिसी झाला। आनंदा गजर प्रवर्तला। दिव्य विमानें मेळा उतरला॥ ३॥ दृष्टी देखावया कौतुक। शिवगण आले सकळिक। कर्ता ब्रह्मांडनायक। महिमा अधिक संतांचा॥ ४॥ मुनि पुंडलिक उतरला। संगतीं वैष्णवांचा मेळा। समाधिसुखाचा सोहळा। सकळ कळा वर्ततसे॥ ५॥ हातें खाणोनि भूमिका। अमृत शिंपूनि सुगंधिका। ध्वज उभारोनी पताका। गरुडटका कुंचे डोलती॥ ६॥ नामा म्हणे सुखसंगती। वैष्णव हरिनाम गर्जती। लक्ष्मुनी नारायण प्रीति। उतरोनी क्षितीं समाधी॥ ७॥

११०७. भक्तांसमागमें हरी। सत्वर आले संवत्सरीं। ब्रह्मानंद परोपरी। चरण धरी सोपानदेव॥ १॥ भागीरथीसवें सरिता। धांवोनि आली गंगामाता। यमुना सरस्वती उभयतां। एकात्मता कऱ्हेमाजीं॥ २॥ इंद्र चंद्र तेहतीस कोटी। नवनाथ सिद्ध सौंगडी। भक्त सनकादिक प्रौढी। वेद परवडी गर्जती॥ ३॥ गगनामाजीं देवांगना। वर्षाव करिती दिव्यसुमना। म्हणे निवृत्तिनाथ सोपाना। चरणावरी ठेवीं तूं॥ ४॥ पुष्पकारूढ झाले देव। आणिक मागुती आले सर्व। पांडुरंग देव सदैव। सोपानदेव बाळमूर्ती॥ ५॥ इंद्रनीळ पर्वत आहे। तेथोनी ठाव जावया पाहे। सप्तपाताळीं शेष वाहे। दीर्घ देह फणी असे॥ ६॥ जावोनी त्यासी श्रुत करावें। गरुडासी बोलिलें देवरावें। मार्गीं चालिला लवलाहे। क्रमित जावें सप्तपाताळीं॥ ७॥ नामा म्हणे अमृतकरी। मुख कुरवाळोनी श्रीहरी। सोपान समाधिभीतरीं। आपण पुढारी बैसले॥ ८॥

११०८. नमो अगणित गुणा। नमा आगमगुणनिधाना। नमो कलिविध्वंसगहना। कालहनना तुज नमो॥ १॥ प्रेमळ वैष्णव नैष्ठिक पूर्ण। गाती नामसंकीर्तन। हां हां हूं हूं गंधर्व देवगण। करिती गायन सुस्वर॥ २॥ हर्षें मंगळ वाद्यें वाजविती। वैष्णव सप्रेमें नाचती। नामा म्हणे पुढतापुढतीं। समाधिस्थिति अखंड॥ ३॥

११०९. ऐसा सोपान संबोखिला। महा उत्सव आनंद झाला। अभय वर दिधला। गर्जिन्नला देवराणा॥ १॥ विठोजी म्हणे तूंतें न विसंबे। संवत्सरीं असेन स्वयंभें। या विटेश्वरीं सगुण सुलभे। समारंभ प्रतिवर्षीं॥ २॥ महासिद्धसाधकाचें स्थळ। तो हा वटेश्वर सानुकूळ। यासी नीळकंठ म्हणती सुचळ अचळ। शीतळ प्रथम नाम॥ ३॥ पूर्ण ब्रह्मयाचें स्थान। येथें तप साधिलें गहन। प्रत्यक्ष शंकर सुप्रसन्न। आशीर्वचन बोलिले॥ ४॥ इंद्रनीळ पर्वत रूप। प्रत्यक्ष नारायण स्वरूप। असे कौंडिण्यपुर समीप। माता साक्षेपें॥ ५॥ ऋषिगण गंधर्व। क्षेत्रपाळ मल्हारी देव। इंद्र चंद्र ब्रह्मदेव। शुद्ध ठाव नेमिला॥ ६॥ नामा म्हणे जनार्दन। बहुत संतोषला सोपान। अंगें ब्राह्मण सनातन। शुद्ध अधिष्ठान दिधलें॥ ७॥

१११०. सोपान म्हणे देवोत्तमा। पूर्वीं येथें होता ब्रह्मा। आणि तुम्ही सर्वोत्तमा। कोणे स्थळीं होतां देवा॥ १॥ म्हणे कथा परिस। कोट्यानुकोटी युगांस। आम्ही होतों पंढरीस। अनंत कल्प गेलीं॥ २॥ अनंत भक्तांचिया मेळीं। अनंत वैष्णवें भूमंडळीं। माजीं गवसले सकळी। केली आगळी पुंडलिकें॥ ३॥ येणें प्रसन्न केलें शंकरा। शंकरें मज दाखविलें निर्धारा। आपण राहोनि पाठमोरा। जग उद्धारा कीतीनीं॥ ४॥ भक्तीचेनि आधारानें। साधियेलें बहुत पुण्यें। माझे झालेसें येणें। एक कारण पुंडलिकाचें॥ ५॥ पूर्वापर पंढरीसी। होती विष्णुमात ऐशी। निर्धार करोनी मानसीं। अहर्निशीं अनुष्ठान॥ ६॥ येथोनि पूर्वभाग पंढरी। पश्चिमभागीं ब्रह्मा अवधारीं। झाला अवतार कऱ्हेपठारीं। महादेव शिखरीं मान देती॥ ७॥ तेहतीस कोटी देवस्थळीं। पूर्व पश्चिम वैश्य मंडळी। उग्र तप साधिलें चंद्रमौळी। या इंद्रनीळ पर्वतावरी॥ ८॥ द्रोणाचळ इंद्राचळ। हनुमंतें आणिला विशाळ। त्याच्या शाखा अधोमूळ। तो हा इंद्रनीळ पर्वत॥ ९॥ येथें वल्ली सुवर्णाकार। गुप्त असती त्या निर्धार। दिसे अस्तमानीं अंधार। दीप

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आकार जगाप्रती ॥ १० ॥ येवोनियां दक्षिणद्वार। गोंकर्ण महाबळेश्वर पाठार। पाताळद्वारीं पूजा शंकर। बेलपत्र अद्यापि निघती ॥ ११ ॥ नामा म्हणे देवाधिदेव। सांगितला स्वानुभाव। अधिष्ठान गुढाव। सोपानदेव निवांत ॥ १२ ॥

१११११. पूर्वकथा संवत्सरनगरीं। सांगितली असे अवधारीं। मग शेषाद्रि पर्वतावरीं। गरुड शिखरीं उभा असे ॥ १ ॥ धन्य धन्य हा सोपान। धन्य समाधि संपूर्ण। प्रत्यक्ष येऊनि नारायण। अभयदान दिधलेंसे ॥ २ ॥ अनंत वैष्णव प्रेमळ। दिंडी पताका टाळ घोळ। रामकृष्ण नाम सरळ। भक्त सर्वकाळ नाचती ॥ ३ ॥ दिव्य उतरलीं विमानें। देव वर्षती सुमनें। इंद्र चंद्र देवगणें। लोटांगण घालती ॥ ४ ॥ समाधिसुखाचा आनंद। अंगें करीतसे गोविंद। कथा सांगितली अभेद। श्रोते सन्निध सकळीं ॥ ५ ॥ म्हणती धन्य धन्य सोपान। देव पुरुष चतुरानन। संत महंत वैष्णव प्रमाण। रामकृष्ण गाताती ॥ ६ ॥ नामा म्हणे देवराव। मनोरथ पूर्ण करोनी सर्व। अपार गुणकीर्तिलाघव। न कळे माव कोणाशी ॥ ७ ॥

१११२. सोपान समाधीं बैसला। सकळीं पुण्यवर्षाव केला। जयजयकारें भूगोल कोंदला। आनंद दाटला महीवरी ॥ १ ॥ धन्य धन्य हा सोपान। वर्णितसे श्रीभगवान। क्षणोक्षणीं माझी आठवण। उद्विग्न मन होतसे ॥ २ ॥ नारद तुंबर अक्रूर उद्धव। पुंडलिकादि करूनि सर्व। मुनिदेवगण गंधर्व। स्तुतिस्तव बोलती ॥ ३ ॥ म्हणती चौघेजण भाग्याचे। जें निदान ब्रह्मादिकांचें। तें निजध्यान शंकराचें। सकळ जीवांची जीवनकळा ॥ ४ ॥ तो प्रत्यक्ष येऊनि अनंत। याची परिचर्या करीत। भक्ता साह्य होऊनि भगवंत। पूर्ण आर्त करावया ॥ ५ ॥ निजभक्तांचें कौतुक। करोनी ब्रह्मांडनायक। तया वर्णिती सनकादिक। वरकड मशक बापुडें ॥ ६ ॥ पुंडलिक विस्मय बोलती। हे चौघे भाग्याच्या मूर्ती। यांच्या नामें जग उद्धरती। पावे विश्रांति जगासी ॥ ७ ॥ नामा म्हणे सकळ जगाचा। उदय जाहलासे दैवाचा। सुकाळ केला स्वानंदाचा। ब्रह्मविद्येचा मृत्युलोकीं ॥ ८ ॥

१११३. सद्गुरु सागरा दीनबंधु। अनाथनाथा सुरैकसिंधु। चातकातें कृपाबिंदु। प्रसाद द्यावा ॥ १ ॥ गुरु आणि गणपति पुरातना। सिद्धांत वेदांत जुनाट जुना। दयाळा पातकहरणा। रक्षीं रक्षीं स्वामिया ॥ २ ॥ तूं अंतरीचें जाणता। तूं इच्छेचा दाता। तूं हृदयीं प्रेरक होता। कमळालया ॥ ३ ॥ दृश्यादृश्य करितां पार। चौऱ्यांशीं लक्ष योनी दुर्धर। चुकवूनि उतरसी पार। संकटीं स्वामिया ॥ ४ ॥ निवृत्ति प्रवृत्ति दोन्ही थडी। मधीं माया नदी उघडी। बोधभावें घालिसी सांगडी। पार उतरिसी स्वामिया ॥ ५ ॥ सोपान आपला अंकित। पद्महस्तें करावें मुक्त। जो मनें इच्छिला अर्थ। सिद्धि न्यावा स्वामिया ॥ ६ ॥

१११४. तूं सद्गुरु आनंदभरित। तुझा आदि ना अंत। तूं प्रकाशा प्रकाशमंत। तुज नमो स्वामिया ॥ १ ॥ बुद्धिपालका वैभवा। तूं देवाधिदेवा। तूं जाणसी अंतरींचा गोवा। उगवीं उगवीं स्वामिया ॥ २ ॥ तूं सत्स्वरूपाची चौघडी। आणि परेची पैलथडी। बोधभावें कर उघडी। पार उतरी स्वामिया ॥ ३ ॥ तूं विश्रांतीचें स्थळ। तूं निर्गुणा-निर्गुण निर्मळ। निवृत्तिमतीचा विषाळ। पुरवी आळ सोपानाची ॥ ४ ॥

१११५. स्पष्ट जोडोनियां कर। मी दासानुदास अपार। प्रार्थना करूनि नमस्कार। उतरीं पार भवाब्धि ॥ १ ॥ निवृत्ति मुक्ताई परियेसी। योगिराज झाला उदयासी। वद्य कार्तिक मासीं। अलंकापुरीं जावें लागे ॥ २ ॥ ज्ञानदेवें मागितला मान। देवे वैष्णवांचें आगमन। येऊनि गंधर्वांचें विमान। विधि नारायण संपादिला ॥ ३ ॥ इंद्रनीळ पर्वत पुरातन। पूर्वी येथें ब्रह्मयाचें स्थान। कौंडण्यपुरीं अंबिकाभुवन। महाब्रह्म योगमाया ॥ ४ ॥ तिचीं भावें केली पूजा। परमार्थ साधिला स्वहित काजा। मुक्ताई आणि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

निवृत्तिराजा। सोपान सहजा सिद्ध झाले॥ ५॥

१११६. धन्य कऱ्हेचे पाठारीं। इंद्रनीळ पर्वत महागिरी। जैसे अलंकापुरी। तैसें पुण्यक्षेत्र हें॥ १॥ ऐसें अनुमानिलें स्थळ। पूर्वापार निर्मळ। सिद्धी पाववी आळ। मायबापा॥ २॥ मग सुमुहूर्त अमृतयोग। सिद्ध संकेत ज्ञानमार्ग। पहिला चंद्र स्वांग। गमन केलें योगिराजें॥ ३॥ निवृत्ति सोपान मुक्ताई। अलंकापुरीहुनी आले पाही। मृदंग वाजती घाई कीर्तन नवाई काय सांगूं॥ ४॥ समाधि सावधान। सुखी ज्ञानेश्वर निधान। झाला पां स्थिर सोपान। भेटीलागीं॥ ५॥ केलें समाधिस नमन। विज्ञापिले सर्वजन। करा आमुची बोळवण। शेवटींची॥ ६॥

१११७. देव म्हणे नाम्या मार्गशीर्ष गाढा। जावें सासुवडा उत्सवासी॥ १॥ सोपानासी आम्हीं दिधलें वचन। चला अवघेजण समुदाय॥ २॥ अलंकापुरीची यात्रा केली सांग। मग पांडुरंग सिद्ध झाले॥ ३॥ दुरोनि पताका दिसती मनोहर। उठावले भार वैष्णवांचे॥ ४॥ निवृत्ति मुक्ताई घेतला सोपान। जातो नारायण कऱ्हेतीरीं॥ ५॥ नामा म्हणे देव गंधर्व सुरगण। चालिले सोपान समाधीसी॥ ६॥

१११८. भक्तांचें तें साह्य करणें पांडुरंगा। म्हणोनि तीर्थ गंगा उगविलें॥ १॥ जान्हवी मंदाकिनी भागावती मिळुनी। दुजी हे त्रिवेणी या भूमीसी॥ २॥ निर्झर जीवन वाहती निरंतर। तेथें वटेश्वर उतरले॥ ३॥ दुरोनि हें स्थळ दिसे मनोहर। उतरले भार वैष्णवांचे॥ ४॥ नामा म्हणे देवा स्थळ आदि हें अनादि। येथेंची समाधी सोपानासी॥ ५॥

१११९. उतरिलीं विमानें स्वर्गीचें राउळ। पताका रानोमाळ मिरविताती॥ १॥ सोपान मुक्ताई सद्गुरु निवृत्ति। रुक्माईचा पति मध्यभागीं॥ २॥ टाळ मृदंग वाजताती वीणे। नारद गायन करीतसे॥ ३॥ नामा पुंडलिक चाहती आवडीनें। संत साधूजन मिरवती॥ ४॥ लहान थोर संत चालती मिळोन। करिती बोळवण नामा म्हणे॥ ५॥

११२०. भोगावती तीरीं दिधला मंडप। साधू आपरूप पांडुरंग॥ १॥ रखुमाई राही बैसल्या अनेक। सखा पांडुरंग उतरला॥ २॥ वद्य मार्गशीर्ष दशमी जागर। हरिदिनीं गजर कीर्तनाचा॥ ३॥ क्षेत्रप्रदक्षिणा केली असे संतीं। आले भोगावती अवघेजण॥ ४॥ निवृत्ति मुक्ताई दुश्चित्त अंतःकरण। साहित्य नारायण करीतसे॥ ५॥ नामा म्हणे देवा आधीं नेमा स्थळ। मग हें सकळ साहित्य करूं॥ ६॥

११२१. वटेश्वरें वृत्तांत सांगितला सकळ। पूर्वी आमुचें स्थळ याच क्षेत्रीं॥ १॥ येथूनियां वाट जातसे पाताळा। उघडिली शिळा समाधीची॥ २॥ आसन मनोहर मृगछालावर। पहाती ऋषीश्वर आनंदानें॥ ३॥ सोपान वटेश्वर करिती एकांत। कळलें मनोगत नामा म्हणे॥ ४॥

११२२. सोपान वटेश्वर पातले समोर। केला नमस्कार निवृत्तीसी॥ १॥ म्हणे मुक्ताबाई जाती दोघेजण। ऐसें नारायणें बुझविलें॥ २॥ गरुड हनुमंता परिसा भागवता। मग साधुसंता श्रुत केलें॥ ३॥ गंधर्वा आणि देवा कळला वृत्तांत। जाती उभय समाधीसी॥ ४॥ नामा म्हणे यांनीं आरंभिलें हित। करितो स्वहित पांडुरंग॥ ५॥

११२३. सोपान वटेश्वर उभे ठेले पुढती। पंचारत्या होती आनंदाच्या॥ १॥ गंध आणि अक्षता वाहियेल्या सहज। देव निवृत्तिराज पूजियेले॥ २॥ धूप आणि दीप आणिले संपूर्ण। पूजिलें गगन सोपानानें॥ ३॥ दाही दिशा दृष्टि अवलोकिली सारी। गगन अंकुरीं डवरिलें॥ ४॥ चक्र सर्पाकार विजा लखलखती। ज्योति प्रकाशती रानोमाळ॥ ५॥ नामा म्हणे देवा उदय झाला सकळ। सोपानदेवें मूळ दाखविलें॥ ६॥

११२४. शेंदूर पारवे नीळवर्ण ठसे। जनीं वनीं दिसे परब्रह्म॥ १॥ मुक्ताफळ भरित सबाह्य कोंदलें। रूप हें चांगलें विठोबाचें॥ २॥ श्वेत पीतवर्ण आंत तारांगण। अंकुरलें गगन नानारूप॥ ३॥ ज्योतिर्मय

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ब्रह्म एकांतींचें पहाणें। समाधि नारायणें उदय केली॥ ४॥ संत स्वरूप अवघें अवलोकिलें मनें। नमन नामा म्हणे आरंभिलें॥ ५॥

११२५. निवृत्ति म्हणे ऊर्मी तुटल्या शृंखळा। मार्ग हा मोकळा आम्हां झाला॥ १॥ पांडुरंगें पाश आवरिला आपला। म्हणोनि फुटला मार्ग आम्हां॥ २॥ आवरिली माया पुरातन आपुली। म्हणोनि आम्हां झाली बुद्धि ऐसी॥ ३॥ नामदेवें मस्तक ठेवियेलें पायीं। आतां खेद कांहीं करूं नका॥ ४॥

११२६. जाती ब्रह्मादिक जाती चराचर। मायीक व्यवहार ऐशापरी॥ १॥ प्रकृतिपुरुषाचा मांडियेला खेळ। जाईल सकळ नाशिवंत॥ २॥ चंद्र सूर्य जाईल जाईल मृगजळ। जाती तिन्ही ताळ शून्यापोटीं॥ ३॥ होईल निरामय अवघें चराचर। ब्रह्मींचा विस्तार होईल ब्रह्मीं॥ ४॥ नामा म्हणे स्वामी जाताती सकळ। ब्रह्मीं माया मूळ झाली कैसी॥ ५॥

११२७. धन्य आमुचें भाग्य परब्रह्म संगें। साहित्य स्वआंगें करीतसे॥ १॥ नाशिवंत देह जाईल कीं अंतीं। नीचाची संगति कोण काज॥ २॥ पाहिला गे माय ब्रह्मींचा आवर्तु। जीव आणि जंतु विस्तारिले॥ ३॥ निवृत्ति मुक्ताई केलासे विवेक। आपपर लोक दुजे नाहीं॥ ४॥ नामा म्हणे चित्त केलें स्थिर। देव ऋषेश्वर उठावले॥ ५॥

११२८. पांडुरंग म्हणे सख्या निवृत्तिराजा। झाडा आतां शेजा समाधीच्या॥ १॥ नारा विठा माहादा पाठविला गोंदा। झाडावया जागा समाधीच्या॥ २॥ परिसा भागवत चांगदेव हातें। आणिलें साहित्य समाधीचें॥ ३॥ तुळसी बुका बेल दर्भ आणि फुलें। उदक चांगलें भोगावतीचें॥ ४॥ भस्म पितांबर भगवीं तीं वस्त्रें। योगी दिगंबर समागमें॥ ५॥ नामा म्हणे देवा उठवा ऋषेश्वर। होईल उशीर समाधीस॥ ६॥

११२९. उठिले वैष्णव घेऊनि नारायणा। चालिले ते स्नाना अवघे जन॥ १॥ गंध आणि अक्षता विसोबाचे हातीं। पूजा ते करिती सोपानाची॥ २॥ सोपान वटेश्वर सोंवळे झाले सांग। निवृत्ति पांडुरंग पूजियेले॥ ३॥ गंधर्व आणि सुरगण पूजिती सोपान। यथाविधी प्रमाण संपादिलें॥ ४॥ नामा म्हणे पूजा केली हृषीकेशी। चला पारण्यासी अवघे जन॥ ५॥

११३०. राही रखुमाई ऋषि सिद्धि जेथें। पडले पर्वत पक्वान्नांचे॥ १॥ बैसल्या त्या पंक्ति भोगावतीतीरीं। पात्रें टाकी हरि वैष्णवांला॥ २॥ विसोबा खेचर पुंडलिक संगें। वाढी पांडुरंग वैष्णवांला॥ ३॥ संतसभेमाजी निवृत्ति सोपान। यथाविधी प्रमाण संपादिलें॥ ४॥ रखुमाईला देवें सांगितली खूण। सोडितो पारणें सोपानदेव॥ ५॥ नामा म्हणे स्वामी जातो बोलावण। आणितो सोपान भोजनासी॥ ६॥

११३१. चांगा वटेश्वर मुक्ता निवृत्तिश्वर। सांवता कुंभार ऐहिक ते॥ १॥ एकेठायीं मिळाले परब्रह्म गवसून। वटेश्वर सोपान मध्य भागीं॥ २॥ सोपान वटेश्वर घेतले वोसंगळा। माळा घाली गळां पुंडलिक॥ ३॥ सोपान वटेश्वर पूजिती आवडीनें। संगतीं निधान पांडुरंग॥ ४॥ आनंदानें सारे बैसले एकवटा। बिस्तारिलें ताट रखुमाईनें॥ ५॥ नारा विठा गोंदा बोलाविला महादा। नामा म्हणे पूजा अवघे जन॥ ६॥

११३२. उठिले वैष्णव आटोपलें भोजन। केलें आचमन भोगावती॥ १॥ अवघ्यांनीं घेतला सोपान वटेश्वर। गोंदा महादा साचार विडे देती॥ २॥ निशिदिनीं कीर्तन केलें द्वादशी। वद्य त्रयोदशी मार्गशीर्ष॥ ३॥ भोगावती केलें अवघ्यांनीं स्नान। चालिले सोपान समाधीसी॥ ४॥ नामा म्हणे देवा स्थळ मनोहर। उठावले भार वैष्णवांचे॥ ५॥

११३३. कळवळी मन नाहीं देहभान। वटेश्वर सोपान सोंवळे झाले॥ १॥ संत साधुजन होत कासाविसी। आले समाधीपाशीं तांतडीनें॥ २॥ समाधीभोंवतें कुंकुमाचे सडे। पाहाती निवाडे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अवघे जन॥ ३ ॥ वरी मृगछाला दिसताती लाल। दर्भ आणि फुलें समर्पिलीं॥ ४॥ दुर्वा आणि बेल टाकिले मोकळे। साहित्य सकळ समर्पिलें॥ ५॥ निवृत्ति पांडुरंग बैसले येऊन। नमन सोपान करितसे॥ ६॥

श्रीसोपानदेवमहाराजाचें नमन.

११३४. नमो अगणितगुणा। नमो अगण्य ध्याना। नमो कविविध्वंसगहना। कलापहा॥ १॥ नमो शून्यादि क्षरा। अक्षरा तूं हरा। हरिहर सर्वेश्वरा। नमो तुज नमो॥ २॥ वेदविदा विद्गदा। सहजबोधा परमानंदा। आनंदादि आनंदा। गोविंदा तुज नमो॥ ३॥ नमो चित्तविभ्रमा। नमो वृत्तिध्यानगमा। नमो आश्रमशामा। ऐशिया रामा तुज नमो॥ ४॥ नमो अनंता अशेषा। नमो सकळ महेशा। जीवशिवादि विश्वेशा। नमो तुज॥ ५॥ देवा देवोत्तमा सकळा। देवाधिदेवा वेगळा। नमो तुज गोपाळा। चक्रचाळा हरी॥ ६॥ नमो विष्णु कृष्णरूपा। नमो शुद्धादि रूपा। नमो नमो भुवनदीपा। नारायणा आदिनाथा॥ ७॥ नमो योगिया योगोत्तमा। नमो सर्वांचा तूं आत्मा। नमो नमो परब्रह्मा। सर्वारामा आत्मया॥ ८॥ नमो नमो नमन। तूं जगादि जगजीवन। जगज्जनकु जनार्दन। आनंदघन महामूर्ति॥ ९॥ नमो कौतुहलहळणा। नमो भक्तप्रेमपाळणा। परात्पर निधाना। परादि वाच॥ १०॥ परेहि परतत्त्वा। नाहीं जेथें रजतमसत्त्वा। वेदादिका देउनी महत्त्वा। पाळण करिसी धर्माचें॥ ११॥ अनंत योगाधीशा। अनंत नामाधिवासा। अनंत तप सहसा। जोडसी तूं स्वामी॥ १२॥ ऐशिया विश्वेश्वरादि शिवा। नमो तुज महादेवा। होय जयावरी कुपाहेलावा। तरी सर्व सुख देशी॥ १३॥ भुक्तिमुक्ति विशेषा। दवडुनी मी माझी आशा। सांडुनी रजतम दुराशा। चरणीं चित्त रमेल॥ १४॥ उद्बोध विषध। तया वरील जो बोध। वरी झळके प्रसिद्ध। तो शुद्धाशुद्ध रस देईं॥ १५॥ निर्विकाराचा विकार। सस्वरूपाचा निर्धार। सर्व रूप होऊनि निर्विकार। ग्रास न करिशी माझा॥ १६॥ शमदमादि समश्रेष्ठा। आदि अनादि वरिष्ठा। सकळ होउनी वैकुंठा। भुवनपदा दाखवी॥ १७॥ अनंत अनंतेश्वर। अरूपाचाही आकार। ग्रास न करुनी निर्धार। सांठवी हृदयीं॥ १८॥ नाथ दिनानाथ दीनेशा। चित्ताचित्त समरसा। नमो शिवादि शिवेशा। आदि प्रभु॥ १९॥ नमो नमो रामा। नमो नमो भवादिश्रमा। योगादि विश्रामा। आदिपती तुज नमो॥ २०॥ अवधूत महादत्ता। सकळ दुष्ट तूंचि हर्ता। नमो सकळ कर्ता। आदिसत्ता पैं तुझी॥ २१॥ नमो देशानंद परेशा। नमो तुज ऐशिया जगदीशा। तुजवीण व्यर्थ भरंवसा। आणिका देवाचा॥ २२॥ नमो नमो हरी मुकुंदा। नमो नमो पावविसी परमपदा। ऐशिया तुज सदा। पुढती नमो नमो॥ २३॥ वामदक्षिण परिपूर्णा। अधऊर्ध्व शून्यपणा। नमो तुज सर्वाभरणा। समाधि देशी तुज नमो॥ २४॥ वीर्य धैर्य संपन्नगुणा। निराशा आशा अवगुणा। तुज स्मरता पूर्ण निधाना। पावविसी परमपदा॥ २५॥ चतुराचतुर शून्या। वेदशास्त्र श्रुतिमौन्या। सकळजन सौजन्या। नांदसी सबरा भरित॥ २६॥ मंजुळ शब्दाचिया गुणा। मंजुळ नादाचिया ध्याना। विश्वरूप अनन्या। वैकुंठीं नांदसी सदा॥ २७॥ जगद्गुरु जगत्पालका। जगदादि जगन्नायका। वेदादि विवेका। कर्ताहर्ता जगदीशा॥ २८॥ नारायणा पूर्ण चैतन्या। पूर्णापूर्ण सौजन्या। श्रुति तुजमाजी मौन्या। मौनरूपी नांदसी सदा॥ २९॥ तूं परमेश्वर परेपरता। सकळ देहीं देहहर्ता। सकळ रूपें हे सत्य वार्ता। वेद बोलोनी गेले॥ ३०॥ ऐशिया नमो हो देवा। महामूर्ति निरंजन ठेवा। तो तूं पुंडलिक अनुभवा। रूपरेखे आलासी॥ ३१॥ वैकुंठीं विठ्ठलमूर्ति। युगें अठ्ठावीस कीर्ति। विटे नीट लक्ष्मीपती। भक्तालागीं तिष्ठसी॥ ३२॥ भक्तालागीं दयाळु। दीनदयानिधि गोपाळु। तूं द्वारकेचा भूपाळु। बाळलीला अवतरलाशी॥ ३३॥ निराभिवरा संगम। चंद्रभागेचा उगम। माजी सर्वात्माराम। वृंदावनीं खेळसी॥ ३४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वैकुंठादि वैकुंठवासा। वैकुंठरूपा जगदीशा। सर्वज्ञा हृषीकेशा। त्राहे त्राहे स्वामिया॥ ३५॥ समाधिधन देवा तूंचि। समाधि सेज तूंचि रची। समाधि हे जीवाची। शिवाशीं मेळवी॥ ३६॥ अनंत जन्मांचें संचित। अनंत दोष दुर्घटित। अनंत नामाचा संकेत। हारपे तुजमाजी॥ ३७॥ ऐशी सोपान स्तुति करीत। तेणें संतोषला पंढरीनाथ। त्वां जग तारिलें समस्त। कीर्तनें करूनी॥ ३८॥ नामा म्हणे ऐसें स्तवन। सोपानदेवें केलें संपूर्ण। मग बोले जगज्जीवन। तयाप्रती॥ ३९॥

११३५. आतां स्तुति पुरे परे सोपाना। प्रेमपाळक निधाना। संतुष्ट झालों रे वचना। एकएका तुझिया॥ १॥ तूं अवतार चतुरानन। ऐसें बोलिले जगज्जीवन। तंव स्तवन करितां सोपान। तो मौन्यचि राहिला॥ २॥ सर्वोत्तम म्हणे चतुरा। महा विचाराच्या सारा। पवित्ररूपा परिकरा। सकळ जनासी तूंची॥ ३॥ मग पाचारिलीं तीर्थें। जे जे तीर्थरूप समर्थें। म्हणे उदक द्यावें स्नानातें। सोपानदेवासी॥ ४॥ गंगा जान्हवी मंदाकिनी। भोगावती भागिरथी तिन्ही। येती झालिया माध्यान्ही। पंचारती घेऊनिया॥ ५॥ योगी सिद्ध प्रसिद्ध। नाथादि नारायण नवविध। आणि सनकादिक अगाध। नारद तुंबर पावले॥ ६॥ देवीं आदरिलें स्तवन। ऋषी वेदघोष आरंभिले पूर्ण। सनकादिकीं भाष्य जाण। हाहा हुहु गंधर्व॥ ७॥ मंगळतुरे वाजती। महावैष्णव हरिकथा करिती। नामा म्हणे पुढतो पुढती। चरणा लागे सोपान॥ ८॥

११३६. नमो ज्योतिर्मय ब्रह्मा। आनंद ईश्वर पुरातना। नमो नारायणा कमळकोंदणा। नमो नमो स्वामिया॥ १॥ नमो सद्गुरु निवृत्ति। नमो रखुमाईच्या पति। नमो ज्ञानमूर्ति। अगम्य पुरुषा॥ २॥ नमो भक्ति मुक्ति चैतन्य माया। नमो कर्ता हर्ता काया। नमो आदि पुरातन पाया। परब्रह्मा॥ ३॥ नमो विराट पुरुषा पुरातना। नमो जगज्जीवना करुणाघना। चराचरपालका आनंदघना। अंगिकारी नमना माझिया॥ ४॥ नमो ब्रह्मांडव्यापका। नमो गुणतीता मायांतका। चुकवीं जन्ममरण एका। तारी विश्व कृपेनें॥ ५॥ नमो जळस्थळ रक्षिता। आदि अवसानीं तारिता। नमो रोमारोम अव्यक्ता। नमो नमो दीनबंधू॥ ६॥ नमो विराट महद्ब्रह्म। निष्कलंक परब्रह्मा। योगियांच्या सुखधामा। नमो नमो दयाळा॥ ७॥ औट हात ध्वनी। नमो नमो अंतःकरणीं। नमो सत्रावी त्रिवेणी। त्रिपुटी जेथें॥ ८॥ नमो विटेवरी सदटा। नमो वैकुंठीचिये पीठा। आदी अंती एकटा। नमो आदिपुरुषा॥ ९॥ आदी अंतीं शेवटीं। सहस्त्रदहीं गुह्य पीठीं। नमो उघडी दृष्टी। स्वरूपीं तुझ्या॥ १०॥ नमो पायीं पडली मिठी। नमो बांधिली हृदयीं गांठी। तुझें स्वरूप हृदयसंपुष्टीं। धरून ठेविलें स्वामिया॥ ११॥ नमो गेलें आलें। नमो झालें तें झालें। नमो सांभाळूनी तुझें। ठेवी आम्हा॥ १२॥

वटेश्वरांचें नमन.

११३७. नमो नमो गणपती। नमो नमो सरस्वती। नमो नमो रमापती। दीनबंधु॥ १॥ नमो योगी दिगंतरा। नमो वैष्णवांचिया भारा। नमो गंधर्व ऋषीश्वरा। लहानथोरा॥ २॥ नमो नमो अंतरीं। नमो नमो दिशा चारी। नमो अंतर बाहेरी। एकत्व एक॥ ३॥ नमो अनंता अनंत नामा। जानकीश जगज्जीवना। जयजय रामारामा तुज नमो॥ ४॥ नमो मत्स्य कच्छ अवतार। नमो सिंह सूकर। नमो परशुराम फरशधर। वामना तुज नमो॥ ५॥ नमो रामा वेदपाळका। नमो इंद्रियेंचक्रचालका। नमो बोधभाविका। श्रीविठ्ठला॥ ६॥ नमो कलंकी विनटला। पटला विठ्ठला। सारासार नटला। तुज नमो॥ ७॥ निरामय निर्णय तुज। नमो नमो चतुर्भुज। नमो सर्व जगदात्मज। अनाथनाथा॥ ८॥ नमो बारा ज्योतिर्लिंगा। नमो पंढरी पांडुरंगा। नमो भिवरा चंद्रभागा। नमो वैकुंठपीठा॥ ९॥ मी काय जाणें नामस्थिती। नमन केलें भोळे भक्ती। नमन श्रीपती। मान्य झालें॥ १०॥ नमन निवृत्ति ज्ञानेश्वरा। नमो सोपान वटेश्वरा। नमन मुक्ताबाई निर्झरा।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सत्रावीच्या॥ ११॥ नमो हंसा सुअक्षरा। नमो व्यापक चराचरा। नमो नमो अव्यक्त विषयावरा। पांडुरंगा॥ १२॥ नमन तुमचें तुम्हीं केलें। नमन सहजासहज झालें। नेणों काय आलें गेलें। सद्‌गुरुनाथा॥ १३॥

११३८. उभयतांनीं नमन केलें यथासांग। अर्थी पांडुरंग साह्य केला॥ १॥ कळवळिले संत वैष्णवांचे भार। आणिक योगेश्वर स्फुंदताती॥ २॥ गरुड हनुमंत विसोबा खेचर। लाविती पदर डोळियासी॥ ३॥ निवृत्ति मुक्ताबाई चांगदेवासहित। परसा भागवत शोक करी॥ ४॥ नामा म्हणे देवा खेद सिंधू लोटा। उठा आतां भेटा सोपानासी॥ ५॥

११३९. सोपानदेवें ग्रंथ केला होता सार। ठेविला समोर निवृत्तीच्या॥ १॥ सवें मुक्ताबाई सद्‌गुरु निवृत्ति। लक्ष्मीचा पती घेतलिया॥ २॥ जयजयकार ध्वनि होताती अपार। जाती योगेश्वर समाधीसी॥ ३॥ राही रखुमाई निळकंठ जवळी। समाधिच्या पाळी अवघेजण॥ ४॥ समाधि पायरीवरी वटेश्वर सोपान। मागितला मान पांडुरंगा॥ ५॥ प्रतिवर्षी भेटीं देऊं उभयतां। अलंकापुरीं जातां उत्सवासी॥ ६॥ नामा म्हणे देवा कृपा केली फार। दिधला कीं वर भक्तराजा॥ ७॥

११४०. निवृत्ति मुक्ताईनें धरियेलें मौन। वटेश्वर सोपान त्यागियेला॥ १॥ समाधि पताकांची पडली सावली। उतरले खालीं योगीराज॥ २॥ पांडुरंगासंगें गेले ऋषेश्वर। सोपान वटेश्वरीं बैसविले॥ ३॥ शिवाचा अवतार सद्‌गुरु निवृत्ति। मुक्ताबाई सखी तुम्हांपाशीं॥ ४॥ अंतरीचें जाणतां बा पंढरीनाथ। आले अश्रुपात सोपानासी॥ ५॥ सोपानाची बोळवण करितसे हरी। दीर्घ ध्वनी करी नामदेव॥ ६॥

११४१. धूप आणि दीप उजळिल्या ज्योति। तेव्हां ओसंडती अवघे जन॥ १॥ वटेश्वरें केला नमस्कार। उतरले पार भवसिंधु॥ २॥ घेतियेलें तीर्थ तंव झाले विकळ। झांकियेले डोळे ब्रह्मबोधें॥ ३॥ निवृत्ति मुक्ताई राहिली बाहेरी। आतां तुम्ही हरि सांभाळावें॥ ४॥ देव ऋषेश्वर निघाले बाहेर। केला नमस्कार नामदेवें॥ ५॥

११४२. जयजयकारें टाळी पिटली सकळां। घातियेली शिळा समाधीसी॥ १॥ निवृत्तिमुक्ताईनें घातियेली घोन। करितो समाधान पांडुरंग॥ २॥ सोपान वटेश्वर सुखधामीं शेजा। करिताती पूजा समाधीची॥ ३॥ खेद दुःख झालें अवघ्या साधुजनां। केली प्रदक्षिणा समाधीसी॥ ४॥ निवृत्तिमुक्ताईनें वंदिली समाधि। देहभान शुद्धि हारपली॥ ५॥ नामा म्हणे देवा उठा अवघेजण। करूं आचमन भोगावती॥ ६॥

११४३. वैष्णवांनीं केली समाधि प्रदक्षिणा। गेले आचमना भोगावती॥ १॥ सारी रात्र कीर्तन केलें त्रयोदशी। चतुर्दशी दिवशीं भोजनें केलीं॥ २॥ अमावास्यें जागरण केलें परिपूर्ण। प्रतिपदे गमन वैष्णवांचें॥ ३॥ निवृत्ति मुक्ताई झाली उदासी। आतां हृषीकेशी बोळवावें॥ ४॥ चांगा म्हणे माझी करा बोळवण। घेऊनि नारायण समागमें॥ ५॥ नामा म्हणे देवा माघमास नेमा। चांगदेवा प्रेमा समाधि देऊं॥ ६॥

११४४. सव्य हातें नगर घेती ऋषेश्वर। केला नमस्कार समाधीसी॥ १॥ परतले देव आणि सुरगण। चाललीं विमानें वैष्णवांचीं॥ २॥ निवृत्ति मुक्ताबाई चांगदेव संगें। रुक्मिणी पांडुरंग समुदायेसी॥ ३॥ नामा म्हणे देव गंधर्व ऋषिमुनी। जाती उत्तरायणीं निवृत्तिराज॥ ४॥

११४५. निवृत्तिदेवासंगें देव ऋषीश्वर। उठावले भार वैष्णवांचे॥ १॥ प्रतिपदीं देव निघाले बाहेर। केला नमस्कार समाधीसी॥ २॥ अवधियासहित वैष्णव मंडळी। सवें वनमाळी चालताती॥ ३॥ गोदातीरा जया निवृत्ति उद्देशी। सह समुदायेशीं उठावले॥ ४॥ नामा म्हणे घेतला नारायण संगें। चालिले अनेगें भक्तराज॥ ५॥

श्रीचांगदेवमहाराजांची समाधि

११४६. निवृत्तिदेवा योग्य गंगेचें तें स्नान।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करूं अवघेजण आवडीनें ॥ १ ॥ तीर्थयात्रा होईल देवासमागमें। केवढा महिमा रामें सांगितला ॥ २ ॥ मार्गी चालताती भक्त आणि हरी। आले भुलेश्वरीं अवघेजण ॥ ३ ॥ भुलेश्वरालागीं पूजा केली सांग। भक्त पांडुरंगें तीन रात्रीं ॥ ४ ॥ तेथून वैष्णव चालियेले हरी। आले सिद्धेश्वरीं देवभक्त ॥ ५ ॥ पाराशर ऋषींचें स्थळ पुरातन। राहिले नारायण पंचरात्र ॥ ६ ॥ नामा म्हणे देवा जावें कपिलेश्वरा। आनंद ऋषीश्वरा झाला फार ॥ ७ ॥

११४७. कौतुकानें तेथें आले सावकाश। उभे हरीदास कीर्तनासी ॥ १ ॥ दहा दिवस तेथें राहियेले स्वस्थ। अवघ्यांचा मनोरथ पूर्ण झाला ॥ २ ॥ क्षेत्रींचा महिमा पुसिती देवासी। जना आगळी काशी सांगियेली ॥ ३ ॥ येथोनियां वाट जाते वाराणसी। मुनि आणि ऋषि आनंदले ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा दिवस झाले फार। लागेल उशीर समाधीसी ॥ ५ ॥

११४८. चालिले घेऊनि देव ऋषीश्वरा। अवधिया पुढारा गरुडदेव ॥ १ ॥ दिवसानुदिवस चालिले सत्वर। पहावे गोदातीर म्हणोनिया ॥ २ ॥ धन्य गोदातीर धन्य कचेश्वर। जाती ऋषीश्वर स्नानालागीं ॥ ३ ॥ सारा पौष मास गेला कचेश्वरीं। नित्य गंगातीरीं स्नानसंध्या ॥ ४ ॥ पाहिला कचेश्वर पाहिली ती गोदा। आली प्रतिपदा माघमास ॥ ५ ॥ नामा म्हणे देवा जावें पुण्यस्तंभा। मनोहर जागा सिद्धेश्वर ॥ ६ ॥

११४९. उठले वैष्णव कीर्तन गजरीं। आले सिद्धेश्वरीं आश्रमासी ॥ १ ॥ पौर्णिमेपावेतों राहिले निश्चळ। नेमा आतां स्थळ समाधीसी ॥ २ ॥ निवृत्ति मुक्ताई संगें आला चांगा। म्हणती पांडुरंगा उठा आतां ॥ ३ ॥ ज्ञानदेवासाठीं उत्सव अलंकापुरीं। तैसा कऱ्हेतीरीं सोपानासी ॥ ४ ॥ तैसी चांगयाची पुरवावी आळी। नामा वनमाळी उठावले ॥ ५ ॥

११५०. दशमीचे दिवशीं ठेविलें प्रस्थान। साधियेला येणें देव गुरु ॥ १ ॥ दिधला मंडप सिद्धेश्वरासमोर। उठावले भार वैष्णवांचे ॥ २ ॥ सर्व स्वस्थ तेथें बैसले मिळून। नारद कीर्तन पुढें होत ॥ ३ ॥ धन्य पुण्यस्तंभ धन्य गंगातीर। धन्य दिसती भार पताकांचे ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा निज भक्तीसाठीं। अंगें होसी कष्टी पांडुरंगा ॥ ५ ॥

११५१. गोदातीरीं उत्सव करिती जगजेठी। चांगदेवासाठीं समारंभ ॥ १ ॥ निवृत्ति मुक्ताबाई संगें पंढरिनाथ। आले मंडपांत समुदायेसी ॥ २ ॥ निवृत्ति पांडुरंग बैसले निवाडे। चांगदेव पुढें उभे ठेले ॥ ३ ॥ जोडियेले कर चांगदेवें पुढती। करिती विनंति वोसंडोनी ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा उठिलें अंतःकरण। नाहीं देहभान चांगयासी ॥ ५ ॥

११५२. चवदाशें वर्षें शरीर केलें जतन। नाहीं अज्ञानपण गेलें माझें ॥ १ ॥ अहंकारें माझें बुडविलें घर। झालों सेवा चोर स्वामीसंगें ॥ २ ॥ तापत्रयीं तापलों महाअग्नीं जळालों। अविवेकीं झालों मंदमती ॥ ३ ॥ काय माझा देह वायांवीण व्यर्थ। आलों शरणागत पांडुरंगा ॥ ४ ॥ अभिमानें आलों श्रीअलंकापुरीं। अज्ञान केलें दुरी मुक्ताईनें ॥ ५ ॥ नामा म्हणे योग दुःखाचें शरीर। काय याचा घोर करूनियां ॥ ६ ॥

११५३. नाना दुःख माया आठवती मना। आतां नारायणा कृपा करी ॥ १ ॥ माझ्या पातकांचा लागूं नेदी अंत। ऐसें माझें चित्त साक्ष असे ॥ २ ॥ ज्ञानाग्नि माझी करा तृणवत। होऊनि कृपावंत श्रीहरी ॥ ३ ॥ योगिराज यासी नाहीं पापदोष। केला उपदेश मुक्ताईनें ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा पेटलें अंतर। करा आतां स्थीर योगीराज ॥ ५ ॥

११५४. अवघ्या विद्येचा करुनी अभ्यास। पावलों मी क्लेश देवराया ॥ १ ॥ मुक्ताबाई योगें उतरलों भवसिंधु। तैशी दीनबंधु कृपा करीं ॥ २ ॥ पतितपावन नाम तुझें थोर। करीं अंगिकार अनाथाचा ॥ ३ ॥ धन्य आमुचें भाग्य जाहलें दर्शन। अंगें नारायण साहित्य करी ॥ ४ ॥ चांगदेवें ऐसें आठविलें फार। केला नमस्कार नामा म्हणे ॥ ५ ॥

११५५. कृपावंत झाली जेव्हां मुक्ताबाई।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

स्वरूप दिशा दाहीं दाखविलें॥ १ ॥ पाठीं पोटीं स्वरूप केलें सद्गुरूनें। तंव अभिमान गेला माझा॥ २ ॥ याच्या उपकाराची काय वर्णूं थोरी। ज्यांच्या संगें हरि जोडियेला॥ ३ ॥ पुरे पुरे आतां आठविसी फार। होईल उशीर समाधीसी॥ ४॥ नामा म्हणे देवा उठा संतजन। करूं आतां स्नान गौतमीसी॥ ५ ॥

११५६. हरिपाठ गजरें केला जयजयकार। उठावले भार वैष्णवांचे॥ १ ॥ टाळ आणि मृदंग वाजती अपार। मिरविती भार वैष्णवांचे॥ २ ॥ दोही बाहीं उभे पताकांचे भार। मध्यें मनोहर गौतमी ते॥ ३ ॥ विसोबा खेचरें पुंडलिका हातें। आणिलें साहित्य समाधीचें॥ ४॥ नामा म्हणे हरि चांगदेवा स्नान। घाली आवडीनें प्रेमयुक्त॥ ५ ॥

११५७. निवृत्ति मुक्ताबाई गोविंद गोपाळ। उठले सकळ स्नानालागीं॥ १॥ राही रखुमाई सहसमुदायेसी। मुनि आणि ऋषि उठावले॥ २ ॥ करूनियां स्नान निघाले सकळ। नाचती गोपाळ गोदातीरीं॥ ३ ॥ चांगदेवें सोंवळें होऊनियां त्वरें। देव ऋषीश्वर पूजियेले॥ ४॥ धन्य गोदातीर आदि हें अनादि। उकरिली समाधि यथासांग॥ ५ ॥ नामयाचे पुत्र नारा विठा गोंदा। जागा झाडी महादा समाधीची॥ ६ ॥

११५८. चांगदेव योगी निष्काम चांगला। स्वरूपीं रंगला केशवाच्या॥ १ ॥ सुगंध अक्षता पुष्पें परिमळ। पूजिले सकळ संतसाधु॥ २ ॥ राही रखुमाई आणि पांडुरंग। पूजियले सांग चांगदेवें॥ ३ ॥ पूजिली मुक्ताई सद्गुरु निवृत्ति। आणिक विभूति गौरविले॥ ४॥ नामा म्हणे आतां नका राहूं स्थीर। होईल उशीर समाधीसी॥ ५ ॥

११५९. उठियेले देव गोपाळ मंडळी। बैसले ते पाळी समाधीचे॥ १ ॥ निशीं सर्व कीर्तन वद्य माघमासी। व्रत एकादशी गोदातीरीं॥ २ ॥ द्वाद्वशीं पारणें वैष्णव सोडिती। बैसल्या त्या पंक्ती सिद्धेश्वरीं॥ ३ ॥ सिद्धेश्वरी पूजा केली चांगयानें। पात्रें नारायण टाकूं लागे॥ ४॥ राही रखुमाई करिती पक्कान्नें। सोडितो पारणें चांगदेव॥ ५॥ चांगदेवासंगें। निवृत्ति मुक्ताई। बैसली ते पाही वैष्णवांत॥ ६ ॥ नामा म्हणे आतां करावीं भोजनें। ताटें रखुमाईनें विस्तारिलीं॥ ७॥

११६०. एकमेळीं जेविती वैष्णव सकळ। वाढिती गोपाळ सकळांसी॥ १ ॥ पांडुरंगें केला चांगोबाचा सोहळा। माळ घाली गळां पुंडलिक॥ २॥ गंध आणि अक्षता विसोबाचे हातीं। महापूजा होती चांगोबाला॥ ३ ॥ आरत्या पंचारत्या करिती आनंदानें। नामा म्हणे प्रेमें वोसंडलें॥ ४॥

११६१. निवृत्ति मुक्ताईचे वोसंडले नयन। करितो समाधान पांडुरंग॥ १ ॥ विसोबा खेचराचे भरोनि येती डोळे। परिसा तळमळे पुंडलिक॥ २॥ नाना खेद करूनि सारिलें भोजना। जाती आचमना गंगेलागीं॥ ३॥ आंचवले देव वैष्णव ते ऋषी। जातो समाधीसी चांगदेव॥ ४॥ जेवूनियां संत बैसले निवाडे। गोंदा महादा विडे वांटिताती॥ ५॥ नामा म्हणे सवें उठे नारायण। आले अवघेजण समाधीपाशी॥ ६॥

११६२. मुक्ताईनें चांगा घेतलासे पोटा। उठा आतां भेटा लहान थोर॥ १॥ भेटले ऋषीवर वैष्णव सकळीं। बैसले ते पाळीं समाधीच्या॥ २॥ निवृत्ति मुक्ताईसी केला नमस्कार। उतरिले पार भवसिंधू॥ ३ ॥ विठ्ठल रखुमाईसी केली प्रदक्षिणा। मग शुद्ध नमना आरंभिलें॥ ४॥ नामा म्हणे देवा निवृत्ति मुक्ताबाई। चांगा लागे पायीं जाऊनियां॥ ५॥

श्रीचांगदेवमहाराजांचें नमन.

११६३. नमो अनादि चक्रपाणि। नमो निवृत्ति ज्ञानस्वामी। नमो सोपान संजीवनी। मुक्ताबाई॥ १॥ नमो सद्गुरु मुक्ताबाई। नमो स्वस्वरूप ठायीं ठायीं। नमो वंदितसे पायीं। नमो नमो परमपद॥ २॥ नमो सूर्येंधशनी। नमो भ्रूमध्य आटणी। नमो माय कुंडलणी। योगियांची॥ ३ ॥ नमो त्रिविधतापहरण। नमो विषयनिवारण। नमो स्वामी निष्काम। कर्ता

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हर्ता नमो ॥ ४ ॥ नमो अर्ध नासिक धसनी। नमो पाठीपोटीं दाटणी नमो जनीं वनीं। चिन्मयछत्र ॥ ५ ॥ नमो योगमाया दिगंबर। नमो व्यापक चराचर। नमो दाही अवतार। परब्रह्म नमो ॥ ६ ॥ कंद कळीकाळहरणा नमो। तुझ्यानें परब्रह्म गमो। शांति अव्यक्त क्षमो। श्रीहरी ॥ ७ ॥ नमो संसारनिरसिता। नमो मायाहर्ता। नमो अद्वय अनंता। पांडुरंगा ॥ ८ ॥ नमो पातकसंहारी। नमो परब्रह्म खेचरी। नमो योग अगोचरी। परमात्मा आत्मा ॥ ९ ॥ नमो शिवशिवेशा। नमो आदिगुरु जगदीशा। नमो प्रकाशप्रकाशा। परब्रह्मा ॥ १० ॥ पुरे पुरे येरझारा। नमो वेव्हार सारा। नमो शारंगधरा। अंतःकरण पाहासी ॥ ११ ॥ नमो मुक्ताईच्या उपदेशा। नमो आदि अनंता जगदीशा। स्वरूपाची परेशा। जगद्गुरु नमो नमो ॥ १२ ॥ नमस्ते नमस्ते निवृत्ति। नमस्ते नमस्ते ज्ञानमूर्ती। नमस्ते नमस्ते सोपान ज्योती। परेशा ॥ १३ ॥

११६४. लाविली कौपीन पितांबरी एक। त्यागिली अनेक महत्माया ॥ १ ॥ सव्य हातें घेतलें संतसाधुजनां। केली प्रदक्षिणा समाधीसी ॥ २ ॥ समाधीचे पाळी निवृत्ति वनमाळी। अंतरीं कळवळी मुक्ताबाई ॥ ३ ॥ आणिकांच्या डोळां अश्रुपात येत। होईल कीं गुप्त योगिराज ॥ ४ ॥ चांगदेवा दिधलीं विठोबाचीं पाउलें। तीर्थ तें घेतलें देवगुरूचें ॥ ५ ॥ नामा म्हणे हरि झाली आठवण। करा बोळवण चांगोबाची ॥ ६ ॥

११६५. पुंडलिकें धरिला चांगोबाचा हात। तंव सकळ संत कळवळती ॥ १ ॥ पताकांचे भार समाधी भोंवते। तेव्हां साधुसंत उठावले ॥ २ ॥ यांच्या या ज्ञानाचा अंतपार नाहीं। भली मुक्ताबाई ओसंडली ॥ ३ ॥ संतसमागम फळला तुजला। एकांत फावला मुक्ताबाई ॥ ४ ॥ मसुरेप्रमाणें दावियेली। तेंचि पूर्ण ब्रह्म योगियांचें ॥ ५ ॥ फार दिवस तुम्हीं रक्षिलें शरीर। मुक्ताईनें पार उतरिलें ॥ ६ ॥ नामा म्हणे देवा सद्गुरूचा महिमा। बाप पूर्ण आम्हां पांडुरंग ॥ ७ ॥

११६६. कुंकुम केशराचे समाधीसी सडे। पहाती निवाडे जन लोक ॥ १ ॥ गोदातीरीं महोत्सव चांगदेवा। पूर्ण तूं विसांवा पांडुरंगा ॥ २ ॥ समाधी-भोंवते उभे साधुसंत। उतरले आंत चांगदेव ॥ ३ ॥ निवृत्ति पांडुरंग गेले समागमें। वैष्णव रामराम बोलताती ॥ ४ ॥ राही रखुमाबाई उभ्या दोहीं बाहीं। मध्यें मुक्ताबाई संबोखिती ॥ ५ ॥ नामा पुंडलीक करिती समाधान। स्थीर करा मन बोधभावें ॥ ६ ॥

११६७. समाधीसी शेज घातली मनोहर। बैसविले वर चांगदेव ॥ १ ॥ आनंदानें टाळ्या पिटती वैष्णवभार। लाविती पदर डोळियांसी ॥ २ ॥ टाळ मृदंगाचा झाला झणत्कार। गेले योगेश्वर समाधीसी ॥ ३ ॥ सांडिलीं भूषणें भस्म आभरणें। झाले निमग्न परब्रह्मीं ॥ ४ ॥ झांकियेले नेत्र उन्मनीच्या संगें। निवृत्ति पांडुरंगें ओसंडले ॥ ५ ॥ नामा म्हणे झाला समाधिस्थ योगेश्वर। निघाले बाहेर देवभक्त ॥ ६ ॥

११६८. भूचरी खेंचरी चाचरी निश्चळा। अगोचरी डोळा स्थिरावली ॥ १ ॥ झांकिली समाधी संतसज्जनांनीं। तुलसी पुष्पें वरुनी वर्षताती ॥ २ ॥ निवृत्तीनें मिठी विठोबाच्या गळां। आणिकांच्या डोळां अश्रु येती ॥ ३ ॥ केलें समाधान विठ्ठल रखुमाईनें। निवृत्ति म्हणे राहणें काय आतां ॥ ४ ॥ गेले योगिराज राहिले ठायीं ठायीं। आतां मुक्ताबाई जाईल कीं ॥ ५ ॥ स्वरूपीचे ओघ जातील स्वरूपीं। नामा म्हणे निरोपी पांडुरंगा ॥ ६ ॥

११६९. देवें समाधान केलें अवघेजण। चला आचमना गौतमीसी ॥ १ ॥ वद्य त्रयोदशी दिधली समाधी। महोत्सव गोविंदीं समर्पिला ॥ २ ॥ गर्जती वैष्णव विठोबाचा नामा। थोर तुझा महिमा दीनबंधू ॥ ३ ॥ समाधि प्रदक्षिणा केली अवघेजणें। झाली बोळवण चांगयाची ॥ ४ ॥ कीर्तन करीत आले गौतमीसी। देव मुनि ऋषि आंचवले ॥ ५ ॥ अवघ्यांनीं आचमनें केलीं गोदातीरीं। नामा म्हणे हरि उठा आतां ॥ ६ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

११७०. आचमन करुनी आले सिद्धेश्वरा। हरि ऋषीश्वरा आर्जविती ॥ १ ॥ निवृत्ति मुक्ताईला त्यागूं नये कोणी। आतां उत्तरायणीं गमन करूं ॥ २ ॥ पांच रोज उत्सव केला चांगदेवा। विश्वाचा विसांवा श्रीहरी ॥ ३ ॥ वैष्णवांनीं समाधि बांधिली साजिरी। सुवर्णाचा वरी पिंपळ तो ॥ ४ ॥ केला नमस्कार वैष्णवांना जेव्हां। मुक्ताबाई तेव्हां वोसंडली ॥ ५ ॥ नामा म्हणे देवा तीर्थक्षेत्र चांगलें। चित्त मन रंगलें चांगयाचें ॥ ६ ॥

११७१. शुद्ध फाल्गुन मासीं वैष्णव हृषीकेशी। पंचमीचे दिवशीं सिद्ध झाले ॥ १ ॥ निवृत्तिराज म्हणे जावें म्हाळसापुरा। जेथें ज्ञानेश्वरी पूर्ण झाली ॥ २ ॥ उठावले भार देवऋषीश्वर। केला नमस्कार समाधीसी ॥ ३ ॥ सव्यहातें क्षेत्र घेतलें वैष्णवांनीं। चाललीं विमानें नेवाशासी ॥ ४ ॥ नामा म्हणे देव निघाले बाहेर। कीर्तन गजर पुढें होती ॥ ५ ॥

मुक्ताबाईची समाधि.

११७२. तेथोनि वैष्णव आले नेवाशासी। सहसमुदायेसी देवराव ॥ १ ॥ म्हाळसेलागीं पूजा केली असे निगुती। राहिले दहा रात्रीं हृषीकेशी ॥ २ ॥ येथोनि चलावें पुढती शारंगधरा। जावें टीकेश्वरा स्नानालागीं ॥ ३ ॥ चहूं युगा आदि स्थळ पुरातन। आले नारायण गोदातीरीं ॥ ४ ॥ नामा म्हणे येथें रहावें हृषीकेशी। विजयादशमीशीं सिद्ध होऊं ॥ ५ ॥

११७३. देव म्हणे राहणें न घडेचि येथें। जावे आतां पुढते उद्योगासी ॥ १ ॥ निवृत्तिराज म्हणे शुद्ध प्रतिपदा। जाऊं जी गोविंदा प्रतिष्ठाना ॥ २ ॥ अनादि जें स्थळ दाविलें नारायणें। मग प्रतिष्ठाना येते जाहले ॥ ३ ॥ चक्रतीर्थी पोहा म्हणती आला थोर। वैष्णवांचे भार उतरले ॥ ४ ॥ नामा म्हणे हरि सहज आली वाट। आपेगांव कोठें सांगा स्वामी ॥ ५ ॥

११७४. मायभूमि पाहूं यांची आम्ही डोळां। चलावें गोपाळा सहजासहज ॥ १ ॥ भक्त त्र्यंबकपंत मूळ पुरुष आदि। तयाची समाधि आपेगांवीं ॥ २ ॥ आपेगांवीं आले देव ऋषीश्वर। उतरले भार वैष्णवांचे ॥ ३ ॥ धन्य यांचें कुळ धन्य यांचा वंश। धन्य यांचे कुशीं योगीराज ॥ ४ ॥ नामा म्हणे आम्हां दाविलें नारायणें। झालीं चौघीजणें याचि क्षेत्रीं ॥ ५ ॥

११७५. निवृत्ति मुक्ताईनें पाहुनि स्थळ डोळां। आलासे उमाळा ओसंडोनी ॥ १ ॥ तात आणि मात गेलीसे येथून। तेव्हां आम्हीं लहान पांडुरंगा ॥ २ ॥ निवृत्ति ज्ञानेश्वर कोरान्नाचें अन्न। सांभाळी सोपान मजलागीं ॥ ३ ॥ तुझ्या योगें हरि क्रमियेले काळा। फुटलासे मेळा तापसांचा ॥ ४ ॥ नामा म्हणे यांचें कवळविलें मन। करी समाधान पांडुरंग ॥ ५ ॥

११७६. पाहिली गे माय पूर्वभूमि आपुली। बहुत सन्मानिली वैष्णवांनीं ॥ १ ॥ चैत्रमास शिवरात्र उत्सव आगळा। जावें पां वेरुळा घृष्णेश्वरा ॥ २ ॥ दशमीचे दिवशीं निघाले बाहेर। उठावले भार वैष्णवांचे ॥ ३ ॥ वेरुळ नगर असें पुरातन। विश्वकर्मा यानें कीर्ति केली ॥ ४ ॥ अगाध तें पुण्य बोलताती ऋषि। जावें वेरुळासी नामा म्हणे ॥ ५ ॥

११७७. मुक्ताई उदासी झाली असे फार। आतां हें शरीर रक्षूं नये ॥ १ ॥ त्यागिले आहार अन्नपाणी सकळीं। निवृत्तिराज तळमळी मनामाजी ॥ २ ॥ गंधर्व सुरगण उठले सहमेळां। गेले ते वेरुळा अवघेजण ॥ ३ ॥ वेरुळाचा महिमा सांगे हृषिकेशी। जना आगळी काशी म्हणोनियां ॥ ४ ॥ वेरुळाची यात्रा केली यथासांग। मग पांडुरंग निघते झाले ॥ ५ ॥ चालिले श्रीरंग वैष्णवांचे भार। पाहावें तापीतीर नामा म्हणे ॥ ६ ॥

११७८. निवृत्तिराज म्हणे आतां पंढरीनाथा। मुक्ताईला जपा अवघेजण ॥ १ ॥ वेधली चित्तवृत्ति स्वरूपीं निमग्न। नाहीं देहभान मुक्ताईला ॥ २ ॥ अवघेजण जपती जपे नारायण। चालती घेऊन मध्यभागीं ॥ ३ ॥ निवृत्तिराजें धरिली मुक्ताबाई हातीं। सांभाळीत जाती निशिदिनीं ॥ ४ ॥ पदोपदीं जपे निवृत्तिराज करें। आणिक ऋषीश्वर सांभाळिती ॥ ५ ॥ नामा म्हणे देवा जातां तांतडीनें।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पुढें स्थळ कोण नेमियेलें॥ ६॥

११७९. तापीचिये तीरीं महत् ग्राम थोर। असे सोमेश्वर पुरातन॥ १॥ वद्य वैशाख मास दशमी निर्मळ। उष्णकाळ फार तापतसे॥ २॥ तेथें परशुरामें मारियेला बाण। पाहती पुरातन पश्चिमेस॥ ३॥ पाहिलें माय आम्हीं तापीतीर। उतरले भार वैष्णवांचे॥ ४॥ धन्य तापीतीर दिसे मनोहर। दोहीं थडी भार पताकांचे॥ ५॥ नामा म्हणे हरि आवडीचें स्थळ। कण्हेर कमळ उदय झाला॥ ६॥

११८०. फुलले अनेक तरुवर तेथें। दुर्वा दर्भ आंत उगवले॥ १॥ करंज जांभळी लागली एक थाटी। वरी बहु दाटी तरुवरांची॥ २॥ अमृतफळें अपार विस्तारले फार। त्यामाजीं मयूर टाहो देती॥ ३॥ कंठ कोकिळा त्या सुस्वर गायन। तरुवर सुमनें परिमळ॥ ४॥ पारिजातकांची दाटी झाली भारी। आंत मैलागिरी डुल्लताती॥ ५॥ नामा म्हणे देवा भला हा एकांत। मार्कंडेयें येथें तप केलें॥ ६॥

११८१. सोनियाचीं झाडें अनेक कर्दळी। त्यांत रानकेळी फोंफावल्या॥ १॥ सिताफळी भरीत अवघी तापीथडी। दाट दिसती गाढी रामफळें॥ २॥ तापीतीरीं ऋषि आणि शारंगधर। पाठीमागें भार वैष्णवांचें॥ ३॥ धन्य महत्‌नगर सोमेश्वर। धन्य तापीतीर योगियांचें॥ ४॥ उष्णकाळीं छाया आवडती फार। म्हणती ऋषीश्वर रम्य स्थळ॥ ५॥ नामा म्हणे देवा रंगलें अंतःकरण। उतरतीं विमानें गंधर्वांचीं॥ ६॥

११८२. उदित कमळें नानावर्ण सुंदर। फुलले तरुवर नानारूपें॥ १॥ श्वेतपीतरक्त भ्रमर रुणझुण। होताती श्रवण वैष्णवांसी॥ २॥ गुंजारव भ्रमती रत्नकळा फांकती। मनोहर तापी दिसती सुरवरांला॥ ३॥ तरुवर गगनीं अंकुरले भारी। विजा तैं कोंदल्या बहुतांपरी॥ ४॥ गंधर्वें गायनें आलापित सुस्वरीं। केलें स्पष्ट नयनीं गुह्य गौप्य॥ ५॥ नामा म्हणे देवा मनझालें स्थीर। पडियेला विसर अविद्येचा॥ ६॥

११८३. निवृत्तीनें एकांत केला मुक्ताईशीं। गमन कोणे दिवशीं आरंभिलें॥ १॥ मुक्ताबाई म्हणे जावें यावें कोठें। अवघे निघोट स्वरूप स्वामी॥ २॥ गर्जतां गगन कडाडली वीज। स्वरूपीं सहज मिळयेली॥ ३॥ मावळला दीप ज्योत कोठें होती। सहज सामावती निरंजनीं॥ ४॥ नामा म्हणे हरि जाईल पाहतां। ऐसें माझें चित्ता कळों आलें॥ ५॥

११८४. आमुच्या स्वस्थानीं नाहीं पा अंधार। अवघीं चराचर प्रकाशत्वें॥ १॥ उदय आणि अस्तु नाही स्वरूपासी। ऐसें मुनिऋषि जाणताती॥ २॥ आम्ही कधीं आलों स्वरूप सोडोन। जावें पालटोन जेथिल तेथें॥ ३॥ अंतर बाहेर स्वामींचें स्वरूप। स्वयें नंदादीप उजळिला॥ ४॥ वद्य वैशाखमासीं दशमीचे दिवशीं। गेले ते स्नानासी तापीतीरीं॥ ५॥ नामा म्हणे गोविंदा मनोहर नभा। अंकुरला गाभा विराटाचा॥ ६॥

११८५. टाळ विणे मृदंग सुस्वर गायन। कोंदलें गगन दाही दिशा॥ १॥ प्रळयींच्या विजा वर्षती अपार। झाला धुंधकार दाही दिशा॥ २॥ करोनियां स्नान बैसले बाहेर। म्हणती अंधकार फार झाला॥ ३॥ झुंजाट सुटला वारा कांपू लागे धरा। नभची अंतरा कालवलें॥ ४॥ नामा म्हणे देवा झाली कैसी गती। पडलीसे भ्रांति अवघ्या जनां॥ ५॥

११८६. निवृत्तिराज म्हणे प्रळयींचा वारा। सुटला शारंगधरा ऐसें वाटे॥ १॥ हालतें गगन डोलतीं विमानें। गेलें देहभान अवघियांचें॥ २॥ अवघियांचे डोळे झांकले एकदां। माध्यान्हीं आंबुदा वळुनी आले॥ ३॥ निवृत्ति पांडुरंग राही रखुमाई। धरा म्हणती घाई मुक्ताईला॥ ४॥ नामा म्हणे केशवा जाहला उबाळा। कांहीं केल्या डोळा उघडों नेदी॥ ५॥

११८७. ऋषि म्हणती हरि पातलेसें विघ्न। आतां कैसे प्राण वांचतील॥ १॥ कोणाचिया शुद्धि नाहींचिया कोणा। म्हणती नारायणा मृत्यु

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आला॥ २॥ कडाडली वीज निरंजनीं जेव्हां। मुक्ताबाई जेव्हां गुप्त झाली॥ ३॥ वैकुंठीं लक्ष घंटा वाजती एकघाई। झाली मुक्ताबाई स्वरूपाकार॥ ४॥ एक प्रहर झाला प्रकाश त्रिभुवनीं। जेव्हां निरंजनीं गुप्त झाली॥ ५॥ गेलें निवारुनी आकाश आभुट। नामा म्हणे कोठें मुक्ताबाई॥ ६॥

११८८. उघडिल्या दिशा उघडिलें गगन। पाहिलें वदन भास्कराचें॥ १॥ निवृत्तिराजातें कळवळा वाटे भारी। आतां आम्हां हरि आज्ञा द्यावी॥ २॥ जयजयकारें टाळ्या पिटिती सकळ। नाचती गोपाळ तापीतीरीं॥ ३॥ सकळांचे चित्तीं येतो कळवळा। मुक्ताई डोळां पाहिली नाहीं॥ ४॥ नानापरी खेद करिती योगेश्वर। लाविती पदर डोळियांसी॥ ५॥ नामा म्हणे देवा कैसें आतां कांहीं। आम्हां मुक्ताबाई बोलली नाहीं॥ ६॥

११८९. ज्ञानेश्वर तुम्हीं निरविलें सोपान। केली बोळवण पांडुरंगा॥ १॥ तो आम्हीं उत्सव पाहिलासे डोळां। चांगोबाचा सोहळा दाविला हरी॥ २॥ होती ऐसी नाहीं झाली मुक्ताबाई। संत ठायीं ठायीं स्फुंदताती॥ ३॥ रम्य स्थळ म्हणोनि राहिले एक मास। युगा ऐसे दिवस क्रमियेले॥ ४॥ अर्ध मास वैशाख अर्ध मास ज्येष्ठ। फार होती कष्ट निवृत्तिराजा॥ ५॥ मुक्ताबाई मुक्त केली केशवराजें। नामा म्हणे पूजा तापीतीरा॥ ६॥

११९०. पूजियेली तापी पूजिला सोमेश्वर। उठावले भार वैष्णवांचे॥ १॥ कांहीं कोणावरी नाहीं पडलें ओझें। कष्टी निवृत्तिराज होत असे॥ २॥ आली गेली कैसी आम्हां कळलें नाहीं। कोठें मुक्ताबाई विसर्जिली॥ ३॥ नामा म्हणे देवा उठवा ऋषीश्वरा। निवृत्तीचें करा समाधान॥ ४॥

श्रीनिवृत्तिनाथमहाराजांची समाधि.

११९१. निवृत्तिराज म्हणे भलें केलें देवा। आतां जी केशवा सिद्ध व्हावें॥ १॥ निवृत्तिदास म्हणे सहजासहज हरी। बोळविलीं सारीं सुखधामा॥ २॥ दाही दिशा चित्त झालें असें सैरा। आतां शारंगधरा। सिद्ध व्हावें॥ ३॥ आतां माझे श्रम नको घेऊं हरी। जावें त्र्यंबकेश्वरीं समाधीसी॥ ४॥ फार माझा प्राण आला असे कंठीं। आतां जगजेठी सिद्ध व्हावें॥ ५॥ नामा म्हणे देवा दिवस नाहीं आतां। त्वरें वेगीं संतां सिद्ध करा॥ ६॥

११९२. विमानीं बैसली विठ्ठल सुखमूर्ती। घेतला निवृत्ति मध्यभागीं॥ १॥ राही रखुमाई बैसले सुरगण। उठलीं विमानें गंधर्वांचीं॥ २॥ गोपाळांचे भार उठले तांतडीनें। चालिलीं विमानें सुरवरांचीं॥ ३॥ आतां त्वरें चला तुम्ही सप्तशृंगा। कार्य हें गोविंदा सिद्धि न्यावें॥ ४॥ आदिमाया येथें होईल दर्शन। संत साधुजन भेटतील॥ ५॥ नामा म्हणे धन्य तुझ्यायोगें हरी। तीर्थयात्रा सारी घडली आम्हां॥ ६॥

११९३. टाळ हे मृदंग गायन पुढती। रंजविती निवृत्ति अवघेजण॥ १॥ गीतार्थ करिती योगी मुनिजन। रंजविती मन निवृत्तीचें॥ २॥ आत्मसुख एक बोलती बोलणीं। ज्ञानराज मनीं आठवतो॥ ३॥ ज्ञानराजें आमुचे निवविले डोळे। आतां ऐसे खेळे नाहीं कोणी॥ ४॥ ऐकावा हा अर्थ मुक्ताईच्या मुखीं। आतां ऐसी सखी नाहीं कोणी॥ ५॥ नामा म्हणे स्वामी सांगतां प्रमाण। ऐकतां श्रवण खेद वाटे॥ ६॥

११९४. अविट बोलणें बोलावें अनादि। जें गुह्य वेदीं सांपडेना॥ १॥ कीर्ति वैराग्य केलें सामराज्य। गुरुत्वासी लाज नाहीं आली॥ २॥ नाशिवंत शरीर केलें अविनाश। घडविला विलास अध्यात्मीचा॥ ३॥ अविट बोलणीं आठवती मनीं। आतां त्रिभुवनीं दिसेनात॥ ४॥ तुझ्यामुळें हरि चालतो उगला। देहा आधीं गेला प्राण माझा॥ ५॥ नामा म्हणे देवा करितां ऐसा घोर। सांडील शरीर निवृत्तिराज॥ ६॥

११९५. जें जें सुख आम्हीं अनुभविलें मना। त्याचा नारायणा आठव होतो॥ १॥ ऐसें पदोपदीं निवृत्तिराज कष्टी। कोणकोणाच्या गोष्टी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आठवाव्या ॥ २ ॥ ज्येष्ठाच्या आधीं कनिष्ठाचें जाणें। केलें नारायणें उफराटें ॥ ३ ॥ उफराटें फार फळलें माझे मनीं। वळचणीचें पाणी आढ्या गेलें ॥ ४ ॥ अवघ्यापरीस कष्टी केलें मुक्ताईनें। कांहींच बोलणें घडलें नाहीं ॥ ५ ॥ नामा म्हणे विठोबा ऐकशी बोलणें। अवधियांचीं मनें कळवळतीं ॥ ६ ॥

११९६. गहिनीनाथें मज सांगितलें सार। केली ज्ञानेश्वरें व्याख्या त्याची ॥ १ ॥ काढिला शोधून अनुभव मुक्ताईनें। तें ज्ञान सोपानें संपादिलें ॥ २ ॥ अनुभवें निववविला चांगा वटेश्वर। विसोबा खेचर सिद्ध झाला ॥ ३ ॥ त्या ज्ञानें झाला चांगदेव विकळ। त्यागियेली सकळ अविद्या माया ॥ ४ ॥ अज्ञानासी ज्ञान झालें तैं सहज। ऐसें निवृत्तिराज आठविती ॥ ५ ॥ सप्तशृंगीं आले देव सुरगण। उतरिलीं विमानें नामा म्हणे ॥ ६ ॥

११९७. देवीं देवेश शिवीं शिवेश। अगम्य सुरस आदिमाया ॥ १ ॥ अष्टदिशा अगोचरें अष्टभुजा संहारकरें। असुरादि मंथन विरे कुलस्वामिनीये ॥ २ ॥ वदताती देव आणि सुरगण। उतरिलीं विमानें ठायीं ठायीं ॥ ३ ॥ सकळांनीं पूजा केली आनंदानें। करती कीर्तनें अंबेपुढें ॥ ४ ॥ मंडपीं बैसले निवृति नारायण। नारद कीर्तनें पुढें होत ॥ ५ ॥ नामा म्हणे देवी पाहती सकळ। पूजिती गोपाळ आनंदानें ॥ ६ ॥

११९८. सप्तशृंगालागीं केली प्रदक्षिणा। आतां नारायणा सिद्ध व्हावें ॥ १ ॥ मार्गी आदिमाया पूजिली आनंदीं। म्हणती धन्य मांदी वैष्णवांची ॥ २ ॥ चालतां चालतां दिवस झाले फार। होईल उशीर समाधीसी ॥ ३ ॥ तीन रात्र तेथें राहिले गोपाळ। मग म्हणती सकळ चला आतां ॥ ४ ॥ नामा म्हणे देव बैसले गरुडावर। उठावले भार वैष्णवांचे ॥ ५ ॥

११९९. वंदिली अंबिका निघाले बाहेर। कीर्तन गजर पुढें होत ॥ १ ॥ गोदातीरीं क्षेत्र धन्य त्र्यंबकेश्वर। उतरले भार वैष्णवांचे ॥ २ ॥ म्हणती पांडुरंगें दावियेलें स्थळ। निवृत्तिराज विकळ फार झाले ॥ ३ ॥ पंचमीचे दिवशीं गेले पंचवटी। उतरले तटीं गौतमीचे ॥ ४ ॥ नामा म्हणे शेवट केला वनमाळी। रहाती ये स्थळीं निवृत्तिराज ॥ ५ ॥

१२००. सुंदर नारायण गौरविला फार। केला नमस्कार वैष्णवांनीं ॥ १ ॥ सुरस सर्व तीर्थें आदि पुरातन। केली नारायणें तीर्थयात्रा ॥ २ ॥ विसोबा खेचर परिसा भागवत। अनेक ते संत बैसविले ॥ ३ ॥ मध्यें निवृत्तिराज पांडुरंग पुंडलिक। पाहाती कौतुक गोमतीचें ॥ ४ ॥ दशमीचे दिवशीं केलें तें प्रस्थान। विधि नारायण सांगतसे ॥ ५ ॥ नामा म्हणे श्रीरंगा गौरविले सकळ। झालासे विकल निवृत्तिराज ॥ ६ ॥

१२०१. सहसमुदायेसी उठावें शारंगधरा। हरिहरेश्वरा जाऊं आतां ॥ १ ॥ उठले वैष्णव आणि हृषिकेशी। आले त्र्यंबकासी निवृत्तिराज ॥ २ ॥ एकादशी व्रत वद्य ज्येष्ठ मासीं। उत्सव निवृत्तीसी देवें केला ॥ ३ ॥ द्वादशीं पारणें सोडितां वैष्णव। समारंभ देव करीतसे ॥ ४ ॥ राहिली ते शक्ति गळालें शरीर। देह अहंकार त्यागियेला ॥ ५ ॥ कोणाची करावी पूजा कोणें कोणा। अवघें नारायणा करणें येथें ॥ ६ ॥ नामा म्हणे देवा मुक्ताईची गती। सांडिलें निवृत्ति शरीरासी ॥ ७ ॥

१२०२. आपुलिया अंगें साहित्य श्रीरंगें। पूजियेले सांग संतसाधू ॥ १ ॥ निवृत्तिदेवें केली विठोबाची पूजा। उभारिल्या ध्वजा पताकांच्या ॥ २ ॥ पश्चिमेसी स्थळ अनादि समूळ। उघडिली शीळ समाधीची ॥ ३ ॥ म्हणती योगेश्वर अनादि या शेजा। चिद्रत्नें ती पूजा केली असे ॥ ४ ॥ नामा म्हणे देवा जागा निरंजनीं। युगादि हे धुणी धुपतीये ॥ ५ ॥

१२०३. तुळसी बेल पुष्पें समर्पिलीं वर। पाहाती ऋषीश्वर पहिली पूजा ॥ १ ॥ नारा विठा गोंदा पाठविला महादा। झाडावया शेजा पुढें झाले ॥ २ ॥ सभोंवतीं जागा झाडिली निर्मळ। अनादि हें स्थळ निवृत्तिराजा ॥ ३ ॥ सभोंवतीं दीप लाविले समाधी। म्हणती पूजा आधीं केली असे ॥ ४ ॥ अनादि हे पूजा केली म्हणती संत। आतां कोणी आंत उतरूं नये ॥ ५ ॥ नामा म्हणे हरि काय स्थळ चांगलें। दुर्वा दर्भ फुलें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वाहियेलीं ॥ ६ ॥

१२०४. पुष्करणींच्या कांठीं वैष्णवांचे भार। देव ऋषीश्वर जेवताती॥ १॥ अवघियां पात्रें वाढिलीं नारायणें। सोडिती पारणें निवृत्तिराज॥ २॥ विठोबा रखुमाईनें घेतला निवृत्ति। जेविताती पंक्ति गोपाळांच्या॥ ३॥ जेवले वैष्णव आणि हृषीकेशी। गेले आचमनासी पुष्करणींतें॥ ४॥ अवघे संत तेथें बैसले निवाडे। पुंडलिक विडे वांटीतसे॥ ५॥ नामा म्हणे केशव बैसले कीर्तनास। होतो कासावीस निवृत्तिराज॥ ६॥

१२०५. निवृत्तिदेवासाठीं स्फुंदती ऋषीश्वर। लाविला पदर डोळियांसी॥ १॥ गरुडावर पुंडलिकें घातियेला साज। जाती निवृत्तिराज समाधीसी॥ २॥ चालतीं विमानें वाजतसे घंटा। उठा आतां भेटा अवघेजण॥ ३॥ समाधीभोंवते कुंकुमाचे सडे। पाहती निवाडे योगीराज॥ ४॥ कीर्तनगजरीं गेलीसे मंडळी। बैसली ते पाळी समाधीच्या॥ ५॥ नामा म्हणे पुढें उभे नारायण। आरंभिलें नमन निवृत्ति राजें॥ ६॥

निवृत्तिनाथमहाराजांचें नमन.

१२०६. नमो गणपति गजानना। नमो सरस्वती मंगलध्याना। नमो अगाध ब्रह्मपरायणा। नमो नमो स्वामी॥ १॥ नमो आदिमायादि सागरा। नमो चिदानंद दिगंबरा। एकत्व एक सारा। नमो नमो तुज॥ २॥ नमो मत्स्येंद्रनाथा अनादी। नमो सर्वव्यापका बुद्धी। नमो जुनाट युगादी। तुज नमो॥ ३॥ नमो सत्यकाळनाथ त्रिगती। नमो पुढत पुढती। योगेश्वरा आदि अंतीं। नमो नमो स्वामी॥ ४॥ नमो गहिनीनाथ अविनाशा। नमो सहजासहज प्रकाशा। नमो व्यापुनी दाही दिशा। आदि गुरु तुज नमो॥ ५॥ गुप्तनाथ तुज नमन। नमो सद्‌गुरु परब्रह्म पूर्ण। सदा स्वरूपीं अनुसंधान। नमस्ते नमस्ते॥ ६॥ नमो गहिनीनाथ आदिगुरु। तूं संकटीं आदि तारूं। नमो संहारहर्ता हरू। सद्‌गुरुनाथा तुज नमो॥ ७॥ नमो कर्ता कर्ता नारायणा। नमो उदयोअस्तु गगनघना। नमो विराटपुरुषा जगज्जीवना। नमस्ते नमस्ते कुळस्वामी॥ ८॥ नमो त्रिपुटी गुप्तधना। नीलवर्णा कलंकी कोंदणा। नमो ज्योतिर्मय दारुणा। नमो नमो जगद्‌गुरु॥ ९॥ नमो पांडुरंग दयाळा। नमो गोविंद गोपाळा। नमो वैष्णवां सकळां। योगियां ऋषीश्वरा नमो नमो॥ १०॥ नमो सर्व चराचर। नमो अंतरबाहेर। नमो दाहाही अवतार। जगद्‌भूषणा तुज नमो॥ ११॥ नमन नेणों कैसे रीती। नमन रंगलें विश्वरूपीं। नमन चिन्मय गुह्य गौप्यीं। नमो सर्व भूतीं निजगुरू॥ १२॥

१२०७. धूप पंचारती गंधाक्षता वाहती। पूजिला निवृत्ति वैष्णवांनीं॥ १॥ प्रेमें आसुवें येतीं सकळांचिये डोळां। माळ घाली गळां पुंडलिक॥ २॥ निवृत्तिदेवें ग्रंथ केला होता सार। ठेविला समोर विठोबाच्या॥ ३॥ अवघ्या जनालागीं केला नमस्कार। उठावले भार वैष्णवांचे॥ ४॥ गोविंद गोपाळ आले ते सकळ। प्रेंम होती विकळ निवृत्तिराज॥ ५॥ केलीं आचमनें पुष्करणींचे तटीं। आले उठाउठी समाधीपाशीं॥ ६॥ नामा म्हणे देवा निवृत्तिसारखा योगी। नाहीं आतां जगीं दावावया॥ ७॥

१२०८. समाधीच्या पाळीं बैसलीं सकळीं। केला या गोपाळीं जयजयकार॥ १॥ निवृत्तीच्या संगें पुंडलिक पांडुरंग। सिद्ध झाले सांग समाधीसी॥ २॥ निवृत्तिदेवीं वंदिलीं सकळांचीं पाउलें। तीर्थ तें घेतलें विठोबाचें॥ ३॥ पताकांची छाया समाधीसी आली। उतरले खालीं निवृत्तिदेव॥ ४॥ पुंडलिक पांडुरंग गेले बरोबरी। बैसले आसनावरी निवृत्तिराज॥ ५॥ नामा म्हणे देवा काय पाहावें आतां। गेला पंढरिनाथा चिद्‌भानु तो॥ ६॥

१२०९. निवृत्तिराज बैसले समाधी सुचित्त। चिन्मय ते ज्योत उजळली॥ १॥ पुंडलिकें मिठी निवृत्तीच्या गळां। अवघियांच्या डोळां आसुवें येतीं॥ २॥ विठोबाचें हृदय आलेसें भरून। झांकियेले नयन निवृत्तिराजें॥ ३॥ पुंडलिकें आणिलें विठोबासी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बाहेर। केला नमस्कार वैष्णवांनीं॥ ४॥ राही रखुमाई बैसल्या गहिंवरत। आणिक संत महंत वोसंडती॥ ५॥ नामा म्हणे हरि शुद्धि नाहीं सकळां। घाला आतां शिळा समाधीसी॥ ६॥

१२१०. नारा महादा गोंदा विठा झाला विकळ। झांकियेली शीळ समाधीची॥ १॥ गंधर्व आणि देव चिंतावले भारी। दीर्घ ध्वनि करी नारा विठा॥ २॥ गोंदा आणि महादा सांडिती शरीर। विसोबा खेचर फार कष्टी॥ ३॥ लोपलासे भानु पडला अंधार। गेला योगेश्वर निवृत्तिराज॥ ४॥ गेल्या त्या विभूति अनादि अवतार। आतां देवा फार आठवतें॥ ५॥ नामा म्हणे हरि धरवेना धीर। येती गहिंवर वोसंडोनी॥ ६॥

१२११. परिसा भागवत करितसे शोक। म्हणती देवा दुःख फार झालें॥ १॥ द्वादशीं समाधि दिधली निवृत्तीसी। झाले उदासी अवघेजण॥ २॥ देव म्हणे उठा करा आतां पूजा। घालूं पुष्पशेजा समाधीसी॥ ३॥ उठले सकळ होताती विकळ। गेले ते गोपाळ समाधीसी॥ ४॥ घेतली समाधि सव्य वैष्णवांनीं। पूजिताती सुमनीं समाधीसी॥ ५॥ नामा म्हणे अवघे करा प्रदक्षिणा। चला आचमना पुष्करिणीसी॥ ६॥

१२१२. पांच दिवस उत्सव केला निवृत्तीसी। काला आमावास्येसी त्र्यंबकेश्वरीं॥ १॥ प्रतिपदेसी हरि निघाले बाहेरी। कीर्तन गजरी पुढें होत॥ २॥ कांहीं ऋषीश्वर राहियेले तेथें। गेले ते बहुतेक अलंकापुरा॥ ३॥ गरुडावरी सिद्ध झाले नारायण। चाललीं विमानें गंधर्वांचीं॥ ४॥ नामा म्हणे देवा जावें आषाढीसी। आले एकादशी पंढरीये॥ ५॥

१२१३. जयजयकारें टाळी पिटिती सकळी। चालली मंडळी वैष्णवांची॥ १॥ पंढरीचा पोहा निघाला बाहेरी। कीर्तन गजरीं पुढें होत॥ २॥ विठोबा रखुमाई बैसलीं गरुडावर। केला नमस्कार वैष्णवांनीं॥ ३॥ म्हणती तीर्थयात्रा झाली यथासांग। पाहिले प्रसंग समाधीचे॥ ४॥ गेले योगिराज अनादि जे आदि। राहिल्या समाधि जगामाजीं॥ ५॥ नामा म्हणे देवा गेले मुनिजन। राहिले तें ज्ञान जगामाजीं॥ ६॥

१२१४. गेले दिगंबर ईश्वर विभूति। राहिल्या त्या कीर्ति जगामाजीं॥ १॥ वैराग्याच्या गोष्टी ऐकिल्या त्या कानीं। आतां ऐसें कोणी होणें नाहीं॥ २॥ सांगतील ज्ञान म्हणतील खूण। नयेचि साधन निवृत्तीचें॥ ३॥ परब्रह्म डोळां दावूं ऐसें म्हणती। कोणा नये युक्ति ज्ञानोबाची॥ ४॥ करतील अर्थ सांगतील परमार्थ। नये पां एकांत सोपानाचा॥ ५॥ नामा म्हणे देवा सांगूनियां कांहीं। नये मुक्ताबाई गुह्य तुझें॥ ६॥

१२१५. नानापरि खेद आठविती मना। आतां नारायणा सिद्धि न्यावें॥ १॥ समाधीसी केली आरति पंचारती। राहिलीं निवृत्ति स्वरूपीं तुझ्या॥ २॥ सुखाचें साधन झालीं चौघेजणें। केलीं नारायणें बोळवण॥ ३॥ पंचक्रोशावरी उभे ठेले भार। केला नमस्कार समाधीसी॥ ४॥ नामा म्हणे आतां जावें पंढरपुरा। समाधीचा सारा विधि झाला॥ ५॥

१२१६. शेवटची समाधि झाली जैशी तैशी तुज हृषीकेशी समर्पिली॥ १॥ आपुल्या सत्ताबळें चालविलें हरी। विष्णुदासावरी कृपा केली॥ २॥ नेणो कैसा होईल समाधीचा प्रसंग। बोलिलेती अंगें पांडुरंगा॥ ३॥ मुकियाला वाचा दिधली श्रीरंगें। इच्छिला प्रसंग सिद्धी नेला॥ ४॥ नामा म्हणे देवा माय बाप विठ्ठल। म्हणोनि माझे बोल स्वीकारीले॥ ५॥

१२१७. काय म्यां बोलावें किती माझी मति। तुम्ही रमापति गोड केलें॥ १॥ विश्वरूप घडी उघडिली धडफुडी। आतां काय थोडी कृपा म्हणूं॥ २॥ चिन्मय लहरी येती उन्मळूनी। दया नारायणीं थोर केली॥ ३॥ समाधिचरित्र केलें यथामति। रखुमाईचा पति आर्जविला॥ ४॥ समाधिचरित्र जो करील श्रवण। तयालागीं येणें वैकुंठीचें॥ ५॥ नामा म्हणे देवगुरु धरील चित्तीं।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

उद्धरील पति रुक्माईचा॥ ६॥

१२१८. समाधि श्रवण करिती निशिदिनीं। त्यांसी चक्रपाणि देईल भेटी॥ १॥ समाधि श्रवणाचा धरील जो विश्वास। नाहीं नाहीं दोष पातकाचा॥ २॥ समाधि विरक्ताची पतिताला वाराणशी। कोटि कुळें त्यासी उद्धरील॥ ३॥ जो कोणी बैसेल समाधिश्रवणा। तया प्रदक्षिणा पृथ्वीची हे॥ ४॥ स्वहित साधन सांगितलें येथें। परिसा भागवत लेखकु झाला॥ ५॥ नामा म्हणे हरि बोलिलों तुझिया बळें। वाहिलीं तुळसीदळें स्वामीलागीं॥ ६॥

श्रीज्ञानदेवमहाराजांच्या भेटीविषयीं श्रीनामदेवाची आळ.

१२१९. सद्‌गुरु सखया नाथा पंढरिराया। ठेवी डोई पायां कृपेसाठीं॥ १॥ नाहीं गांठी पुंजी तव कृपेजोगी। झालों हतभागी भक्तिवीण॥ २॥ हतभाग्या कैंची समर्थाची भेटी। घाली घट्ट मिठी संतापायीं॥ ३॥ भक्तशिरोमणी ज्ञानदेव नामा। चरित्र महिमा गाऊं त्यांचा॥ ४॥ इच्छी परि मन ज्ञानशक्तिक्षीण। धरितों चरण नाथजींचे॥ ५॥

१२२०. अलंकापुरीस पांडुरंग गेले। समाधिस्थ केलें ज्ञानदेवा॥ १॥ उरकोनी सोहळा संगें संतमेळा। विठोबा राहिला आळंदीस॥ २॥ पाहे चक्रपाणि नाम्या डोळ्यां पाणी। कंठ तो दाटूनि उगा आहे॥ ३॥ पुसे रुक्मिणीकांत कां रे तूं निवांत। नाम्या शोकाक्रांत कोण्या दुःखें॥ ४॥

१२२१. नामा म्हणे देवा ज्ञानदेव सृष्टी। पडले कां दृष्टी पुन्हां आतां॥ १॥ ज्ञानाचा वियोग जडला हृद्‌रोग। भेटीचा प्रयोग करा देवा॥ २॥ ज्ञानदेव माझा दाखवाया वेळीं। जीव तळमळी त्याच्यावीण॥ ३॥ संत अंतरला सखा झाला दूर। आतां पंढरपूर कैसें कंठूं॥ ४॥ तुमचें दर्शन ज्ञान कृपादान। पंढरीस येणें ह्याचसाठीं॥ ५॥

१२२२. तरीच येईन पंढरीस। दृष्टी देखेन ज्ञानेश॥ १॥ ज्ञानदेवा भेटी व्हावी। ऐशी सोय देवा लावी॥ २॥ ऐशियाच्या कृपादानें। तुम्हां सांगती नाचणें॥ ३॥ पंढरीचें जें कां सुख। जाणे तो एक भाविक॥ ४॥

१२२३. ज्ञानदेव पहावा डोळां। ऐसें वाटतें विठ्ठला॥ १॥ जगजेठी जगत्पाळ। माझी पुरवावी आळ॥ २॥ तुम्हां काय अवघड। लीळें झेला गिरिगड॥ ३॥ कल्पतरुतळीं वास। त्या घडे कां उपवास॥ ४॥ माझ्या कृपाळुवा देवा। हांकेसरसा घेशी धांवा॥ ५॥

१२२४. ज्ञानदेव माझें सौख्यसरोवर। त्यांत जलचर स्वस्थ होतों॥ १॥ दुर्दैव तापानें आटलें तें नीर। वर्षी रघुवीर कृपामेघ॥ २॥ ज्ञानदेवावीण व्याकुळ हे प्राण। तूं जगज्जीवन देवा होसी॥ ३॥ विठाबाई तूं ग जाणसी ना जाण। रक्षी मज कोण दुजें येथें॥ ४॥

१२२५. नामा हें वदतां डोळ्यां आलें पाणी। पडिला धरणीं देवापुढें॥ १॥ नामदेव स्थिती पाहून श्रीपती। विस्मित ते चित्तीं स्तब्ध झाले॥ २॥ कैशा रीतीं नाम्या संबोखूं मी आतां। कठीण अवस्था देव म्हणे॥ ३॥ प्रेम उचंबळे ऐकतां ही आळ। बुझावी गोपाळ नाम्यालागीं॥ ४॥

१२२६. देव म्हणे नाम्या पाहे। ज्ञानदेव मीच आहे॥ १॥ तो आणि मी नाहीं दुजा। ज्ञानदेव आत्मा माझा॥ २॥ माझ्या ठायीं ठेवीं हेत। सोड खंत खंडी द्वैत॥ ३॥ नाम्या उमज मानसीं। ऐसें म्हणे हृषीकेशी॥ ४॥

१२२७. ज्ञानदेवा पुढें कथा। करी वारील ह्या व्यथा॥ १॥ आत्मरूपीं ज्ञानेश्वर। तोचि ज्ञानाचा सागर॥ २॥ ज्ञानदेवीं धरीं भाव। स्वयें होय तूंचि देव॥ ३॥ राम कृष्ण रे गोविंद। जप म्हणे तो मुकुंद॥ ४॥

१२२८. प्रेमळ तूं भक्ता माझ्या नामदेवा। जीवींचा विसावा भक्त तूंची॥ १॥ तुमचेनी माझें देवपण सत्य। चंद्रें पाझरत सोमकांत॥ २॥ तुमचे भक्तीनें आणिलें रूपासी। अवाच्य अविनाशी अरूप तें॥ ३॥ पंढरीचा राणा सांगतो ह्या खुणा। भक्तांच्या कारणा येणें मज॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

१२२९. नग जों तें सोनें लेण्याजोगें होतें। मुदी कंकण तैं नामें त्यांचीं॥ १॥ मुशीमाजीं जेव्हां गेलें तें मुरोन। झालेसें सुवर्ण अभिन्न तें॥ २॥ तैसा ज्ञानदेव भक्त तो मी देव। लौकिक लाघव दासांसाठीं॥ ३॥ ज्ञानसमाधी हे नाशी रूप नांवा। अंतींचा मेळावा मजमाजीं॥ ४॥

१२३०. तेज स्पर्शें ज्योती कर्पुरीं निघाली। दोन्ही तीं निमालीं एकदांची॥ १॥ आघातानें नाद घंटेंतून उठे। शेवटीं तो मिटे घंटेमाजीं॥ २॥ ब्रह्मीं माया स्फुरे चैतन्यप्रकाशें। शेवटीं तें वसें ब्रह्मरूपीं॥ ३॥ पांडुरंग म्हणे ऐक नाम्या ज्ञान। वाटो समाधान तुझ्या जीवा॥ ४॥

१२३१. नामदेव म्हणे देवा। ब्रह्मज्ञान पोटीं ठेवा॥ १॥ तुम्ही माये संगें गूढ। ज्ञान जाणिवेचे आड॥ २॥ आम्हां नाहीं याची चाड। वाटे संतभेटी गोड॥ ३॥ संतभेटीं प्रेम फावे। प्रेमें देवाशीं भेटावें॥ ४॥ प्रेम आहे पोटभरी। देव त्यासी पोटीं धरी॥ ५॥ नामदेवा ठायीं प्रेम। मार्गीं आडविलें ब्रह्म॥ ६॥

१२३२. देई भक्तिरस प्रेमा। देवा घाली आम्हां जन्मां॥ १॥ प्रेम येई हातां जरी। जेथें नांदू ती पंढरी॥ २॥ ज्ञानदेवीं भेट व्हावी। ज्ञान गोष्ट कां सांगावी॥ ३॥ नामा न बुझावा जनीं। कोण नाचेल कीर्तनीं॥ ४॥ पुरवा नामयाच्या आर्ता। देवा सांगे जगन्माता॥ ५॥

१२३३. देव कळवळले चित्तीं। त्यासी मायेची संमती॥ १॥ मायबापांचा त्या लळा। नामा घेईना कां आळा॥ २॥ बाप जगताचा स्वामी। आई प्रत्यक्ष लक्ष्मी॥ ३॥ नामा थोराचें लेंकरूं। छंद त्याचा अनिवारू॥ ४॥ छंद नाम्याचा पुरविण्या। देव वेंची प्रेमनाण्या॥ ५॥ हाटीं उदमीं भाविक। विठुराजा त्या ग्राहीक॥ ६॥

१२३४. गरुडासी मग म्हणे पांडुरंग। साकल्य हें सांग पुंडलिका॥ १॥ नामदेव कष्टी ज्ञानदेवासाठीं। घेऊन या तो भेटी नामयाच्या॥ २॥ संतप्रेम भेटी देव गुजगोष्टी। जाणत्याच्या पोटीं सर्व वसे॥ ३॥ करी पांडुरंग येई त्याच्या मना। निमित्ताकारणा भक्त शोधी॥ ४॥

१२३५. ऐकतां निरोप पुंडलीक भक्त। झाला सद्गदित धन्य म्हणे॥ १॥ धन्य ती आळंदी धन्य विष्णुदास। धन्य हा दिवस देव भेटे॥ २॥ ज्ञानदेवा आलें वैकुंठींचें रूप। पोचतां निरोप पुंडलिका॥ ३॥ पुंडलिकें तेव्हां गरुड पूजियेला। ज्ञाना बैसविला विमानांत॥ ४॥ पुढें तो गरुड मागें ये विमान। रुक्मिणी दुरोन दावी देवा॥ ५॥

१२३६. आकाशीं पुष्पक शुभ्र दंड दिसे। बैसोनि येतसे ज्ञानदेव॥ १॥ शुद्धभावें इच्छी ज्ञानदेव भेटी। येई उठाउठी भेटूं त्यासी॥ २॥ पहाती नवल भक्त ते प्रेमळ। निश्चय निढळ आहे ज्यांचा॥ ३॥ देव म्हणे नाम्या घेई भेटीसुखा। ज्ञानदेव सखा उभा येथें॥ ४॥

१२३७. ज्ञानदेव पहातां डोळां। नामदेवा हर्ष झाला॥ १॥ घट्ट धरियेले पाय। तूं तो झाला सद्गुरुराय॥ २॥ नको करूं रे अव्हेर। मज धरूं नको दूर॥ ३॥ सदा आठवत मना। तुझ्या भक्तीच्या कल्पना॥ ४॥

१२३८. नाथा नको रे अंतरूं। तुझ्या कांसेचें वांसरूं॥ १॥ कळा दुभती तूं गाय। तुझा वियोग असह्य॥ २॥ देह भोगितां प्राक्तन। मना ठेवी तवाधीन॥ ३॥ ज्ञानदेवीं ही समाधी। जडो मनोवृत्ति अवघी॥ ४॥ नामा भेटे ज्ञानदेवा। जना प्रसाद मिळावा॥ ५॥

१२३९. हरीचिया दासा नामया उदासा। तुझी हृषीकेशा प्रीति बहु॥ १॥ हरिदासांमाजीं होसी तूं आगळा। प्रेमाचा पुतळा नामदेव॥ २॥ ज्ञानदेव म्हणे तूं विठोचा लडिवाळ। नामया तूं कृपाळ आम्हावरी॥ ३॥

१२४०. धन्य पुण्यभूमि आळंदी हें गांव। देवताचें नांव सिद्धेश्वर॥ १॥ चौऱ्यांशी सिद्धींचा सिद्धवटी मेळा। तो सुखसोहळा काय सांगूं॥ २॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विमानांची दाटी पाहती सुरवर। वर्षताती भार सुमनांचे॥ ३॥ नामा म्हणे देवा चला तया ठाया। विश्रांति घ्यावया कल्पवरी॥ ४॥

१२४१. अगा पांडुरंगा भक्तजन कैवारी। सेवकजन द्वारीं तिष्ठताती॥ १॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान हा पाही। आली मुक्ताबाई चांगदेव॥ २॥ खेचर विसोबा असंद सुदामा। चोखा पुरुषोत्तमा आला असे॥ ३॥ मैराळ जनक वत्सरा तो नारा। विठा सारंगधरा आला असे॥ ४॥ परसा भागवत सांवता नरहरी। चोखामेळा द्वारीं भानुदास॥ ५॥ नटनाट्यकुसरी कान्होपात्रा द्वारीं। चवरें विंजणें हरी जाणविती॥ ६॥ माचंगा अनंता नरसीपुरीं होता। तो हा पंढरीनाथा आला असे॥ ७॥ मच्छिंद्र गोरक्ष चरपटी चौरंगी। गोपीचंद योगी आला असे॥ ८॥ इडा ती पिंगळा सूक्ष्म ती आबळा। षड्रस गोपाळा घेऊनि आला॥ ९॥ तेथें आळ दिंडी घेऊनियां नामा। भेटी पुरुषोत्तमा आला असे॥ १०॥

१२४२. रखुमाई माता राही ओंवाळिती। नित्य पंचारती हरिच्या दासा॥ १॥ नित्य भक्तां यालागीं विनट। पंढरीची पेठ वसविली॥ २॥ धन्य हा निवृत्ति धन्य हा सोपान। धन्य हा निधान ज्ञानदेव॥ ३॥ खेचर सांवता धन्य जनमित्र। यांसी सकळ देत हरि ब्रह्मा॥ ४॥ पांडुरंग पिसा यालागीं जाहला। मुक्ताई पाजिला प्रेमपान्हा॥ ५॥ नामा म्हणे खूण जाणती सज्जन। अखंड ते ध्यान निवृत्तिदेवीं॥ ६॥

भाग तिसरा

श्रीनामदेव-चरित्र

[श्रीविठ्ठल, नामदेव, गोणाई, दामाशेटी, राजाई वगैरे यांचा संवाद]

हरिशरणता

१२४३. कां हो तुह्मी गर्वें जातां। हरी चरणीं ठेवा माथा॥ १॥ शंकर घाली लोटांगण। इतरांचा पाड कोण॥ २॥ सृष्टिकर्ता ब्रह्मदेव। तो हा चरणीं मागें ठाव॥ ३॥ शुक सनकादिक योगी। तेही पायीं जडले वेगीं॥ ४॥ रमेसारखी सुंदरी। झाली पायाची किंकरी॥ ५॥ नामा म्हणे विठ्ठल पायीं। जडलिया भय नाहीं॥ ६॥

*१२४३. नामाचा गजर गर्जे भीमातीर। महिमा साजे थोर तुज एका॥ १॥ ऋद्धीसिद्धी दासी अंगण झाडिती। उच्छिष्टें काढिती मुक्ति चारी॥ २॥ चारी वेद भाट होऊनि गर्जती। सनकादिक गाती कीर्ति तुझी॥ ३॥ सुरवराचे भार अंगणीं लोळती। चरणरज क्षितीं शिव वंदी॥ ४॥ नामा म्हणे देव ऐसा हा कृपाळु। करितो सांभाळु अनाथांचा॥ ५॥

कुलजन्मवृत्त.

१२४४. शिंपियाचे कुळीं जन्म मज झाला। परि हेतु गुंतला सदाशिवीं॥ १॥ रात्रिमाजि शिवीं दिवसामाजि शिवीं। आराणूक जीवीं नाहीं माझ्या॥ २॥ सुई आणि सातुळी कात्री गज दोरा। मांडिला पसारा सदाशिवीं॥ ३॥ नामा म्हणे शीवीं विठोबाचे अंगी। त्याचेनि मी जगीं धन्य झालो॥ ४॥

१२४५. कल्याणींचा शिंपी हरिभक्त गोमा। त्याची कांता उमा नरहरि भजनीं॥ १॥ सरिता सुकृताचि त्या पोटीं उत्पन्न। झाली संबोधन गोणावाई॥ २॥ गोणाई दामाशेटी झालें पाणिग्रहण। संसारीं असोन नरसी गांवीं॥ ३॥ गोत्र संज्ञा ऐका पूर्वजांची सहज। गाधिज भारद्वाज दोनी कुळें॥ ४॥ आऊबाई कन्या झाली गोणाईसी। पुढें देवा नवसी पुत्रासाठीं॥ ५॥ नामा म्हणे होतें विठोबाचे मनीं। तेंचि नित्य जननी नवस करी॥ ६॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

१२४६. केशवा माधवा गोविंदा गोपाळा। जेवीं तूं कृपाळा पांडुरंगा॥ १॥ अच्युता वामना दशरथनंदना। जेवीं तूं गा कृष्णा पांडुरंगा॥ २॥ कृष्णा विष्णु हरी मधुसूदन मुरारी। जेवीं तूं नरहरी पांडुरंगा॥ ३॥ ऐसी ग्लानि करितां विठ्ठल पावला। नैवेद्य जेविला नामयाचा॥ ४॥

१२४७. जेऊनियां हातीं देवें दिधली वाटी। आला उठाउठी नामा घरा॥ १॥ गोणाई म्हणे रे ऐकें नामदेवा। नैवेद्य आणावा माझे हातीं॥ २॥ तेव्हां नामदेवें हातीं दिधली वाटी। पाहूं गेली दृष्टी रिकामी ते॥ ३॥ काय तुज घरीं उणें होतें अन्न। नैवेद्य आपण तेथें खावा॥ ४॥ ते दोघे बोलतां दामाशेटी आला। पुसे त्या दोघांला काय गुह्य॥ ५॥ देखियेलें नाहीं नाहीं ऐकियेलें। ऐसें सांगितलें नामदेवें॥ ६॥ दामाशेटी म्हणे आतां असों द्यावें। सकाळीं पहावें प्रचीत हें॥ ७॥

१२४८. आम्ही हाटा जाऊं लवकरी येऊं। नैवेद्य पाठवूं नाम्या हातीं॥ १॥ दुसऱ्या दिवशीं नैवेद्य धाडिला। दामशेटी गेला त्याच्या मागें॥ २॥ जाऊनियां नामा उभा राहे सन्मुख। म्हणे विठोबास जेवीं बापा॥ ३॥ देव म्हणे नाम्या बसावें द्वारांत। लवकरी जेवितों पाहें आतां॥ ४॥ जेऊनियां देवें हातीं दिधली वाटी। तेव्हां दामशेटी काय बोले॥ ५॥ बारा वर्षे तुज उपवासी मारिलें। आजि जेवविलें नामदेवें॥ ६॥ देव म्हणे आतां ऐका दामशेटी। हें तों गुह्य गोष्टी बोलूं नका॥ ७॥ आम्ही न बोलतां आम्ही न सांगतां। कळे अवचिता आपणासी॥ ८॥ करसी चोरी तूं गुप्त गोकुळांत। पृथ्वींत मात कोणीं नेली॥ ९॥ गोकुळींच्या गोष्टी येथें बोलूं नये। मौन पंढरीये धरिलें आहे॥ १०॥ मौन धरियेलें सांगसी आम्हांसी। तरी कां जेवशी पांडुरंगा॥ ११॥ काय तुझें घर पडियेलें ओस। चोख्यासंगें कैसा जेवलासी॥ १२॥ चोखियाचें अन्न मिष्टान्न भोजन। मिळाया कारण येथें नाहीं॥ १३॥ राम अवतारीं वान्नरगणें। लंकेसी झोंबणें सीतेसाठीं॥ १४॥ पाला खाऊनियां वाहिले पर्वत। बांधियेला सेतु सिंधूवरी॥ १५॥ कृष्ण अवतारीं गोपाळ साचार। वळूं गायी फार देवासवें॥ १६॥ यमुनेचे तीरीं खेळूं चेंडुफळी। आपण दिधली नाहीं डायीं॥ १७॥ पसरितों पदर धरितों हनुवटी। अन्याय हा पोटीं घालीं नाम्या॥ १८॥ तेव्हां दामशेटी धरूनी हातासी। म्हणे नामयासी चाल घरा॥ १९॥ धन्य माझें भाग्य धन्य माझा वंश। परब्रह्म वेष प्रगटलें॥ २०॥ बौद्ध अवतारीं आम्ही झालों संत। वर्णावया मात नामा म्हणे॥ २१॥

१२४९. नामा शिंपे नामा शिपें। रोप लाविलें केशव बापें॥ १॥ एक उगवली आरडी दरडी। एक वाळुनी झाली कोरडी॥ २॥ एक पुष्पफळासि आली। एक कळींच निर्फळ झाली॥ ३॥ नामा उगवला केशव द्वारीं। न माये आंत बाहेरी॥ ४॥

१२५०. परिसासीं लोह लागती ते कनकचि होती। तया मागील ते गति बोलों नये॥ १॥ आड ओहोळ वाहती ते गंगेसि मिळती। तया मागिल ते गति बोलों नये॥ २॥ काक विष्ठा करिती तेथें पिंपळ होती। तया मागिल ते गति बोलों नये॥ ३॥ परद्वारीं होती पतिसरसें होय सती। तया मागिल ते गति बोलों नये॥ ४॥ नामा मध्यम जाति परिस प्रेमळ भक्ति। तया मागिल ते गति बोलों नये॥ ५॥

१२५१. लोखंडाचा विळा परिसीं लागला। मागिलिया मोला मागूं नये॥ १॥ दासी होती परि रायासी रतली। मागिल ते बोली बोलों नये॥ २॥ वेश्या होती तेचि पतिव्रता झाली। मागिल ते बोली बोलों नये॥ ३॥ विष्णुदास नामा विठ्ठलीं रंगला। तो शिंपी वहिला म्हणों नये॥ ४॥

१२५२. कुश्चळ भूमीवरी उगवली तुळसी। अपवित्र तियेसी म्हणों नये॥ १॥ काकविष्टेमाजीं जन्मे तो पिंपळ। तया अमंगळ म्हणो नये॥ २॥ दासीचिया पुत्रा राज्यपद आलें। उपमा मागील देऊं नये॥ ३॥ नामा म्हणे तैसा जातीचा मी शिंपी। उपमा जातीची देऊं नये॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१२५३. कागाचिये विष्ठे जन्म त्या पिंपळा। अपवाद तयाला बोलूं नये॥ १॥ परद्वारीण येति करूनि जाली सती। मागील त्या स्थिति बोलूं नये॥ २॥ विळा होता तो परिसासि लागला। मागिलिया मोला बोलूं नये॥ ३॥ गांव रस होता तो गंगेसी मिळाला। गंगाजळा-वांचुनि त्याला बोलूं नये॥ ४॥ श्वानाचिया अस्थि पडिल्या चक्रतीर्थी। चक्रांकिता वांचुनि त्यांसी बोलूं नये॥ ५॥ तैसी मज परी जाहली गा देवा। नामा म्हणे केशवा विनवितसे॥ ६॥

१२५४. माझें जन्मपत्र बाबाजी ब्राह्मणें। लिहिलें त्याची खूण सारू ऐका॥ १॥ अधिक ब्याण्णव गणित अकराशतें। उगवतां आदित्य रोहिणीसी॥ २॥ शुक्ल एकादशी कार्तिकी रविवार। प्रभव संवत्सर शालिवाहन शके॥ ३॥ प्रसवली माता मज मळमूत्रीं। तेव्हां जिव्हेवरी लिहिलें देवें॥ ४॥ शत कोटी अभंग करील प्रतिज्ञा। नाम मंत्र खुणा वाचुनी पाहे॥ ५॥ ऐशीं वर्षे आयुष्य पत्रिका प्रमाण। नामसंकीर्तन नामया वृद्धि॥ ६॥

१२५५. आम्हां कीर्तन कुळवाडी। आणिक नाहीं उदीम जोडी॥ १॥ वाचा पिकली पिकली। हरिनामाची वरो झाली॥ २॥ एकादशीचे दिवशीं। झाल्या कैवल्याच्या राशी॥ ३॥ संत म्हणती नामा आला। हरिनामाचा सुकाळ झाला॥ ४॥

१२५६. केशवाचें प्रेम नामयाचि जाणे। नाम्या हृदयीं असणें केशवातें॥ १॥ नामा तो केशव केशव तो नामा। अभिन्नत्व आम्हां केशवासी॥ २॥ नामा म्हणे केशवा दुजेपण नाहीं। परि प्रेम तुझ्या ठायीं ठेवियेलें॥ ३॥

१२५७. सुख दुःख दोन्ही आम्हांशीं सारिखीं। प्रतीति पारखी मना आली॥ १॥ अंतर्बाह्य एक ब्रह्मचि कोंदलें। दुजेपण गेलें निपटोनि॥ २॥ त्वचा टाकूनियां सर्प गेला बिळीं। मग तो सांभाळी कोण सांगा॥ ३॥ ओघ सोडूनियां गंगा सिंधू ठाये। विस्तराळी धाये खळाळाची॥ ४॥ नामा म्हणे रात्र जैसी कां पाहाले। धारणातें झालें तैसें आम्हां॥ ५॥

१२५८. भक्ताचिया भावा होऊनि ऋणायितु। उभा असे तिष्ठतु पंढरीये॥ १॥ महाद्वारींची हे तळींची पायरी। तो वैकुंठावरी कळस केला॥ २॥ भूतळींचें वैभव कायसें बापुडें। बोलतां लाज पडे देवराया॥ ३॥ त्या सुखाची नव्हाळी कैंची रसातळीं। बोलतां बोबडी जिव्हा पडे॥ ४॥ म्हणोनि पांडुरंग मौनचि राहिला। नाम्यानें धरिला दोन्ही चरणीं॥ ५॥

१२५९. उठोनि प्रातःकाळीं ओढितां कांचोळी। जातो वेळोवेळीं महाद्वारा॥ १॥ अहोजी दातारा विनंति अवधारा। तुम्हीं यावें घरा भोजनासी॥ २॥ रखुमाई माते तुम्हीं यावें तेथें। सामोग्री सांगतें चालवावी॥ ३॥ सडे संमार्जन हें माझें करणें। उदक भरीन सुगंधेसी॥ ४॥ शेषपत्रावळी काढीन उष्टावळी। नित्य वेळोवेळीं हाचि धंदा॥ ५॥ नामा म्हणे देवा तुमचे तुम्ही जेवा। प्रसाद तो द्यावा सेवकासी॥ ६॥

१२६०. आजि आंवतणें संतांचें। जेवण जेऊं हरिनामाचें॥ १॥ आम्ही जेविलों जेविलों नामामृतें पूर्ण धालों॥ २॥ बरवी परवडी हरिनामाची। आवडी पुरविली जीवाची॥ ३॥ नामा केशवाचा म्हणे। माझे हृदयीं नारायण॥ ४॥

१२६१. अगाध महिमा यात्रा कार्तिकिये। आला पंढरीये नामदेव॥ १॥ भक्तां शिरोमणी श्रीपंढरीनाथा। कृपाळुवा माता बाळकासी॥ २॥ धन्य नामदेव धन्य नामदेव। हृदयीं पंढरीराव न विसंबे॥ ३॥ प्रेमळ हरीभक्त मिळोनि अपार। करिताती गजर हरिनामाचा॥ ४॥ नटनाट्य कीर्तन झळकती गरुडटके। करिती ब्रह्मादीक पुष्पवृष्टी॥ ५॥ नामघोष श्रवण सकळां समाधान। चुकलें जन्ममरण कल्पकोटी॥ ६॥ नामा म्हणे जीव निवाला बा येथें। पहातां विठोबातें श्रम गेला॥ ७॥

१२६२. गरुडपाराजवळी नामदेव आला। सन्मुख देखिला पांडुरंग॥ १॥ मेघःश्यामामूर्ती डोळस

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सांवळी। तें ध्यान हृदयकमळीं धरोनि ठेला॥ २॥ धन्य नामदेव भक्त शिरोमणि। ज्याचा चक्रपाणि बेळाइतु॥ ३॥ पूर्वस्थितिसुखाचा झालासे अनुभव। सकळ देहभाव पारुषले॥ ४॥ मन पांगुळलें स्वरूपीं गुंतलें। बोलणें खुंटलें, प्रीतीमौन॥ ५॥ सबाह्य अभ्यंतरीं स्वरूप कोंदलें। द्वैत निरसलें दृश्याकार॥ ६॥ निजरूप निर्धारितां नयन सोज्वळ झाले। रोमांच दाटले खरबरीत॥ ७॥ आनंदघन वोळलासे अंबरीं। वर्षाव सहस्त्राधारीं होतो तेथें॥ ८॥ तें क्षीर सेवितां झालें समाधान। चुकलें जन्ममरण कल्पकोटी॥ ९॥ सहज सुखें निवाला भवदुःख विसरला। विसावा भेटला पांडुरंग॥ १०॥ नामा म्हणे दृष्टी लागेल पा क्षणीं। धन्य पुंडलिकाचेनी जोडलें सुख॥ ११॥

१२६३. दृष्टि उघडूनि नामा भोंवतीं जंव पाहे। तंव पुढे माय देखियली॥ १॥ म्हणे मजशीं नाम्या वैर कां साधिलें। बहुत दुःख झालें कोणा सांगों॥ २॥ भक्तजनवत्सला परियेसी केशवा। भेटवी केधवां पूर्वस्थिती॥ ३॥ भोजना बैसले जेवी क्षुधाक्रांत। ते कोणाशीं मात न बोलें कांहीं॥ ४॥ तें बळें उठविलें नव्हतां पैं तृप्ति। तैसी दुःखप्राप्ति झाली मज॥ ५॥ पूर्ण पान्हा धेनु घातला वोरसे। वत्स थोर हर्षें पान करी॥ ६॥ ते धनियें देखोनि बळें आसुडलें। तळमळित ठेलें थोर आशा॥ ७॥ कृपणें संपत्ति जोडिली सायासें। तळमळी तें कैसें नेलीयातें॥ ८॥ तैसी परी मज जाहली गा देवा। परियेसी केशवा मायबापा॥ ९॥ दुःखाचे सागरीं पडिलों गा श्रीहरी। सुखरूप मुरारी निववी मातें॥ १०॥ नामा म्हणे विठो कृपेचा सागरू। करावा अंगिकारू अनाथाचा॥ ११॥

गोणाई व नामदेव यांचा संवाद.

१२६४. माता वाट पाहे नामा अजून कां न ये। देखोन विठ्ठल काय भुलला तेथें॥ १॥ ऐसें मज पाहतां हेंचि घडे साचें। विठ्ठलीं मन त्याचें गुंतलें असे॥ २॥ काय सांगों माय जाल देवळासी। जपतो अहर्निशीं विठ्ठल नाम॥ ३॥ तहान भूक कांहीं आर्थीचना मनीं। विठ्ठल विठ्ठल म्हणोनि हाचि छंद॥ ४॥ नेणो कवण्या गुणें भुलविलें यातें। विंदान आमुतें न कळे कांहीं॥ ५॥ दिशा अवलोकितां प्राण नव्हे निश्चित। बहुत क्षुधाक्रांत झाली असे॥ ६॥ तेथून लवलाहें धांवत निघाली। महाद्वारा आली पहावया॥ ७॥ तो तंव पांडुरंगा सन्मुख देखिला। चित्रींचा लिहिला पुतळा जैसा॥ ८॥ नाहीं चळणवळण तटस्थ नयन। केलें निंबलोण योगिजनीं॥ ९॥ तें देखोनि मातेसी थोर द्वेष आला। क्रोधें आसुडिला करीं धरुनि॥ १०॥ तंव प्रेताचियेपरी पडिला भूमीवरी। देखोनि सुंदरी रुदना करी॥ ११॥ मग उचलोनि आसंगा धरिला पोटासी। म्हणे का रे रुसलासी सांग नाम्या॥ १२॥ निढळासी निढळ मिळवूनि ते रडे। माझीये कान्हाडे काय झालें॥ १३॥ दृष्टि उघडूनि नामा भोंवतें जंव पाहे। तंव सन्मुख माय देखियेली॥ १४॥ येरी उचलूनि दिधलें आलिंगन। झालें समाधान तयेवेळीं॥ १५॥ सुहृदें सोयरीं सकळिकें मिळोनि। करिती झाडणी नानापरी॥ १६॥ माउली नव्हेसि तूं वैरिणी जाण। माझ्या केशवाची खूण अंतरली॥ १७॥ शस्त्रेंविण वध केला अवचिता। जीव तळमळतां जाऊं पाहे॥ १८॥ आतां परतोनि माझी वाट पाहसी। साच रिपु होसी तरी जाण॥ १९॥ नामा म्हणे माते जाई हो येथूनि। मज जाईं निरवूनि विठोबासी॥ २०॥

१२६५. नवमास वरी म्यां वाहिलासी उदरीं। आस केली थोरी होसी म्हणोनी॥ १॥ शेखीं त्वां रे नाम्या ऐसें काय केलें। बनीं मोकलीलें निरंजनीं॥ २॥ का रे नामदेवा झालासी निष्ठुर। न बोलसी उत्तर मजसि कांहीं॥ ३॥ सज्जन सोयरीं सांडियली लाज। झालासि निर्लज्ज एकसरा॥ ४॥ प्रेमपिसें तुज लाविलें विठ्ठलें। रूप दावूनि केलें तद्रुप तुज॥ ५॥ यासी सेविलिया कैंची बाप माय। सर्व हाचि होय सर्वांठायीं॥ ६॥ ऐसियाचा संग धरियला तूंवा। परिणामीं अनुभवा जाणशील॥ ७॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संत सनकादिकां लावियेलें वेधीं। तींही संसार-उपाधि सांडियेली॥ ८॥ विठ्ठल विठ्ठल हेंचि पैं चिंतन। विटेसहित चरण धरियेले॥ ९॥ ऐसें शिकवितां नाम्याचें न मोहरे चित्त। पहातसे तटस्थ तन्मय दृष्टी॥ १०॥ नामा म्हणे माते वांयां कां कष्टसी। विठोबा जीवेंसि जडला जाण॥ ११॥

१२६६. माता म्हणे नामा राउळाशीं खेळतां। तुज कोण्या दैवता ओढियलें॥ १॥ लाजिरवाणें नाम्या तूंवा केलें जिणें। हांसती पिशुनें देशोदेशीं॥ २॥ सांडि देवपिसें नको करूं ऐसें। बळें घर कैसें बुडविसी॥ ३॥ जन्मा येऊनियां पराक्रम करी। कां होसी संसारीं भूमिभार॥ ४॥ सुदैवाचीं लेंकरें वर्तताति कैसीं। तूं मज झालासि कुळक्षय॥ ५॥ कैसी तुज नाहीं लौकिकाची लाज। हेंचि थोर मज नवल वाटे॥ ६॥ अभिमान अहंता सांडूनियां जगीं। नाचतोसि रंगीं गीत गातां॥ ७॥ तुजविण लोक अज्ञान नसती। क्षण न विसंबती मायबापा॥ ८॥ पुत्र आणि कलत्र घराची विपत्ति। तुज अभाग्याचे चित्तीं पंढरीनाथ॥ ९॥ यातें भजती त्याचें न उरेचि कांही। हाचि देव पाहीं घरघेणा॥ १०॥ जयाचें खुंटे तो लागे याच्या पंथें। तुजसि शिकवितें म्हणोनियां॥ ११॥ गोणाई म्हणे नाम्या हें नव्हे पैं भलें। विठोबाने केलें आपणा ऐसें॥ १२॥

१२६७. गोणाई म्हणे नाम्या सोडीं देवपिसें। बुडविसी कैसें घर बळें॥ १॥ तुज सईल लेंकुरें वर्तताती कैसीं। तूं मज झालासी कुळक्षय॥ २॥ धन धान्य पुत्र कलत्रें नांदती। तुज अभाग्या तों चित्तीं पांडुरंग॥ ३॥ शिवण्या टिपण्या घातलेसें पाणी। न पहासी परतोनि घराकडे॥ ४॥ कैसी तुझी भक्ती लौकिका वेगळी। संसाराची होळी केली नाम्या॥ ५॥ याची ,तूंवा कैसी धरलिसे कांस। हा तो कवणास झाला नाहीं॥ ६॥ यातें जे अनुसरती त्यांचें नुरे कांहीं। हा देव नव्हे पाहीं घरघेणा॥ ७॥ गोकुळीं करी चोरी आपुलें पोट भरी। तो तुज निर्धारीं देईल काय॥ ८॥ गोणाई म्हणे नाम्या हें तो नव्हे भलें। घर त्वां बुडविलें कुळासहित॥ ९॥

१२६८. जन्मासी येऊनि पराक्रम धरीं। कां होशी संसारीं भूमिभार॥ १॥ आणीकांचीं मुलें संसारिक कैसीं। तूं मज झालासी कुलक्षण॥ २॥ कैसी नाहीं तुज या लोकांची लाज। हेंचि तों मज नवल वाटे॥ ३॥ अभिमान अहंकार सांडोनियां जगीं। नाचतोसी रंगीं गीत गात॥ ४॥ तुजहुनि लोक आहेती अज्ञान। न विसंवती क्षण मायबापा॥ ५॥ याची कां रे तूंवा धरियेली आंस। हा तंव कवणास झाला नाहीं॥ ६॥ यातें जे भजती त्याचें नुरे कांहीं। हा देव नव्हे पाहीं घरघेणा॥ ७॥ याचें नांव चक्रपाळ। हा ब्रह्मादिका आकळ। तो कैसा कृपाळ दीनालागीं॥ ८॥ होणार सारिखी तुज रचिली बुद्धी। देव नव्हे त्रिशुद्धी मारकु जगीं॥ ९॥ ज्याचें खुंटतें तो लागे याची पंथें। माऊली म्हणूनी तूंतें सांगतें रे॥ १०॥ गोणाई म्हणे नाम्या हें नव्हें भलें। विठोबानें केलें आपणाऐसें॥ ११॥

१२६९. अरे नामदेवा नव्हेसी लेंकरूं। जरी जाणसी विचारू संसारिक॥ १॥ शिवण्या-टिपण्यासी त्वां घातलें पाणी। न पाहसी परतोनी घराकडे॥ २॥ कैसी तुझी भक्ति या देशावेगळी। संसाराची धुळी केली नाम्या॥ ३॥ उदंड पैं आम्ही देखियले भक्त। परि तूं आपुलें हित न विचारिसी॥ ४॥ अन्नेंसि उपवासी बैसलासि येथें। काय देईल तूंतें विठ्ठल हा॥ ५॥ थिता पुंडलिकें भाकेसी गोंविला। त्यासि प्रयत्न बळ न चले कांहीं॥ ६॥ गोकुळीं करूनि चोरी आपुलें पोट भरी। तो तुज निर्धारीं देईल काय॥ ७॥ तूं निलाजिरा पाहीं तुज लाज नाहीं। वेळोवेळां कायी सांगो तुज॥ ८॥ सांडून घरदार आपुला संसार। नाचतां विचार न करिसी मनीं॥ ९॥ काम कष्ट तूंवा सांडियलें आतां। संसाराची चिंता कोण करी॥ १०॥ गोणाई म्हणे नाम्या नव्हें रे हें भलें। विठ्ठलनामें केलें आपणा ऐसें॥ ११॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१२७०. कापड घेऊनी जाय बाजारासी। गोणाई नाम्यासी शिकवितसे॥ १॥ लोकांचे हे पुत्र संसार करिती। आमुची फजिती केली नाम्या॥ २॥ नाम्या विठोबाचा संग नव्हे बरा। मैंद हा खरा गळाकाटु॥ ३॥ याचे संगतीनें संसार जाळावा। भोपळा हा घ्यावा भीक मागूं॥ ४॥ नको संग धरूं नाम्या ऐक गोष्टी। गोणाई हनुवटी धरूनी सांगे॥ ५॥

१२७१. नामा म्हणे माते ऐक वो वचना। मी गेलों दर्शना नागनाथा॥ १॥ आंवढ्या देउळीं जाहला संचार। पारुषला धीर या देहाचा॥ २॥ तैंहुनि तुज मज तुटला संबंधु। विठ्ठलाचा छंदू घेतला जीवीं॥ ३॥ लौकिक व्यवहार नाठवेचि कांहीं। कल्पना ते देहीं आथीचना॥ ४॥ टाळ दिंडी घेऊनि नाचतो रंगणीं। तेणें माझ्या मनीं सुख वाटे॥ ५॥ या देहघरसंसाराचा आलासे कंटाळा। म्हणोनि गोपाळा शरण आलों॥ ६॥ पुत्र कलत्र येथें कायसीं बापुडीं। जेणें रौरव कुंडीं वास घडे॥ ७॥ तूं जरी म्हणसी हें सत्य संसारसुख। तरी हें केवळ विख विस्तारलें॥ ८॥ तेचि हें जाण म्हणोनि टाकियलें दुरी। तैं सेवितां उरी कैंची माते॥ ९॥ म्हणोनि मी झालों या संतांचा दीन। तेणें हरिला सीण जन्मांतरीचा॥ १०॥ नामा म्हणे आतां मीतूंपण कैंचें। मी या विठोबाचें शरणागत॥ ११॥

१२७२. जनिता जीववितां सर्वज्ञ प्रतिपाळिता। आडणी सांभाळिता चराचरीं॥ १॥ एक पांडुरंग दुजा नाहीं चांग। म्हणुनि याचा संग धरिला माते॥ २॥ माझी तुज कांहीं करणें नलगे चिंता। मज आहे पोसितां पांडुरंग॥ ३॥ हा शरणागतांचा जाणे कळवळा। हा पैं कळिकाळा पाहों नेदी॥ ४॥ केलें कोटिवरी न मानी अपराध। हें पै साजे ब्रीद पांडुरंगा॥ ५॥ आम्ही आपुल्या सुखें असों भलत्या ठायीं। प्रीति तया पायीं जडली असे॥ ६॥ तेणें उपकारें न विसंबे क्षण। हातीं सुदर्शन घेऊनि उभा॥ ७॥ जाणतां नेणतां राम गावों गीतीं। जन्माची विश्रांति होय जेणें॥ ८॥ ऐसी जिवलग होईल कैंचें आन। संचला परिपूर्ण सर्वांठायीं॥ ९॥ इष्टमित्र बंधु सज्जन सोयरा। माझिया संसारा हाचि एक॥ १०॥ नामा म्हणे माते मज न चले मोहोपिसें। तुम्हांसि मज ऐसें होईल कईं॥ ११॥

१२७३ साधावया आत्मसुख। तें हें विटेवरी। देख॥ १॥ को जाऊं परदेशीं। वास करी गे पंढरीसी॥ २॥ भाव धरूनि बळकट। मुखीं नाम एकनिष्ठ॥ ३॥ नामा म्हणे गोणाबाई। सर्व सुख याचे पायीं॥ ४॥

१२७४. वाघाचिया गळां बांधलिसे गाय। तैसी तूं गे माय लोभापर॥ १॥ तैसें मज संसारीं घालिसील खेवां। कैसें तुझ्या जीवा गोड वाटे॥ २॥ विषाचें गरळ पाजिसी केवळ। हृदय कोमळ कैसें तुझें॥ ३॥ नामा म्हणे मज आदिअंतीं एकु। जननी आणि जनकु पांडुरंग॥ ४॥

१२७५. गोणाई म्हणे नाम्या राहिलासी उदरीं। तैंहुनि मी करीं आस तुझी॥ १॥ उपजलासी तैं मज झाला संतोष। आनंद उल्हास वाटे जीवां॥ २॥ गणगोतामाजीं केलें बा रे नांव। पंढरीचा देव प्रसन्न केला॥ ३॥ रात्रंदिवस लेखी अंगोळी वरी। तूं मज संसारीं होसी म्हणोनि॥ ४॥ तंव तुज अवचिती उपजली बुद्धी। भोपळा हा खांदीं आवडला॥ ५॥ हातीं टाळ घेऊनी करीसी आळवणी। घागरीया चरणीं बांधोनियां॥ ६॥ सांडोनि घरदार आपुला संसार। नाचतां विचार न धरिसी॥ ७॥ नव्हे तें करितां कोण असे वारिता। परि त्वां आपुल्या हिता प्रवर्तावें॥ ८॥ मी एक आहे तंव करीन तळमळ। मग तुझा सांभाळ करील कोण॥ ९॥ या विठ्ठलावांचुनी तुज नाहीं रे संसार। हा बोल निर्धार सत्य माझा॥ १०॥ कोण्या गुणें तूंवा घेतलें धरणें। गोणाई म्हणे करणें फळासी आलें॥ ११॥

१२७६. आपणा वेगळा कशाला निवडीसी। कां मज दवडीसी सांग नाम्या॥ १॥ ब्रवें पुत्रपण झालासी उत्तीर्ण। आतां अभिमान पाहें माझा॥ २॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुज नेल्यावांचून नव जाय येथून। पंढरी गिळीन विठोबासहित॥ ३॥ जरी झालासी शाहाणा तरी माझें लेंकरूं। माझा आहे वेव्हारू या विठ्ठलासी॥ ४॥ हा दानवांतें छळी आपणा म्हणवी बळी। तें मज जवळी न चले कांहीं॥ ५॥ विटेसहित चरणीं बांधीन आपुला गळा। क्षण जीवा वेगळा जाऊं नेदी॥ ६॥ आसनीं शयनीं न विसंबे भोजनीं। घालीन मुरडोनी हृदयामाजीं॥ ७॥ या देहाचा संकल्प आलेंसें करोन। घातलेंसें पाणी घरादारां॥ ८॥ हा त्रिभुवनीं समर्थ मी असें जाणत। पाहीन पुरुषार्थ आजी याचा॥ ९॥ अठ्ठावीस युगें भरलीं तया बोला। धरोनी उभा केला पुंडलीकें॥ १०॥ गोणाई म्हणे देवा होईं कां शहाणा। वांयां कां परधना धरिसी लोभ॥ ११॥

गोणाई व श्रीविठ्ठल यांचा संवाद

१२७७. वढील वडील आमुचे बोलती ती परी। तुज ऐसा श्रीहरी देवो नाहीं॥ १॥ दर्शना आलिया पाडिसी आव्हांटा। मन मारुनी चोहाटा भुलविसी तूं॥ २॥ ऐसा कैसा कोणें केलासीरे देव। आमुच्या जाणीया खेंव आणियेला॥ ३॥ माझें बाळ तुझ्या दर्शनासीं आलें। तें त्वां भुलविले केशीराजा॥ ४॥ रात्रीं दिवस तुझ्या नामाचारे छंदु। गोविंद गोविंद म्हणतसे॥ ५॥ तान्ह भूक विसरला पिसाट पैं झाला। नोळखे मजला काय करूं॥ ६॥ परतोनी संसाराची सांडियेली आस। बोलतो उदास सर्वांपरी॥ ७॥ लोकांचीं लेंकुरें कां गा चाळविसी। आपणया ऐसें करसी भलत्यासी॥ ८॥ आणिक असता नाश वेगळा थोर। मग माझा विचार कळतां तुज॥ ९॥ तुज एक वर्म पुंडलिक आहे। जेणें जडविले पाय विठेवरी॥ १०॥ याहुनी आणिक अधीक पावसी। आम्हां दुबळ्यांसी कष्टवितां॥ ११॥ मागें पुढें तुज ऐसेंची फावलें। तें तंव न चले मजसी कांहीं॥ १२॥ जीव मी देईन नामा नेईन। नांव मी करीन गोतांमाजीं॥ १३॥ आतां बरवें विचारी अगा ये श्रीहरी। माझा नामा करीं मज आधीन॥ १४॥ नाहीं तरी जीवित्व वेंचीन तुझ्या पायीं। विनविते गोणाई केशीराजा॥ १५॥

१२७८. अगा ये विठोबा पाहें मजकडे। कां गा केलें वेडें बाळ माझें॥ १॥ तुझें काय खादलें त्वां काय दिधलें। भलें दाखविलें देवपण॥ २॥ आम्ही म्हणूं तूं रे कृपालु असली। आतां तूं कळलासि पंढरिराया॥ ३॥ करि देवपण आपुलें भोगूं पैं जाणावें। भक्तां सुख द्यावें हेळामात्रें॥ ४॥ देव देव होऊनियां अपेश कां ध्यावें। माझें कां बिघडावें एकुलतें बाळ॥ ५॥ तूं कैसा रे देव या देशावेगळा। बांधितें तुझा गळा परि संतां भ्यालें॥ ६॥ तुझी करणी अवघी आम्हां ठाउकीच आहे। बोलोनियां काय हलकट व्हावें॥ ७॥ जाणोनि पुंडलिक तुझी न पाहेचि वास। तूं भला नव्हेस घरघेणा॥ ८॥ तो बैस पैं न म्हणे तुज याचका कारणें। जडसी जीवेंप्राणें सात्त्विक भावें॥ ९॥ झणी तूं आपुला करिसी बोभाट। मग येईल वीट लोकाचारी॥ १०॥ थोरपणें नामा करीं मज आधीन। गोणाई म्हणे चरण धरीन तुझे॥ ११॥

१२७९. तुझा नामा तुज व्हावा जन्मोजन्मीं। काय यासी आम्ही करूं शकों॥ १॥ मर्यादा सांडोनी बोलसी कठीण। करिसी वांयांवीण इष्ट तुटी॥ २॥ ऐसें कांहीं सुख अनुपम्य दाखवीं। जया ओळखी जीवीं नीजरूपा॥ ३॥ जेणें लोभें त्याचें मन मागें मोहरें। वृत्तीसहित वीरे ठाईं ठाईं॥ ४॥ तेणें या जन्माचें विसरोनी संताप। सोय आपेंआप धरील तुझी॥ ५॥ जरी तूं देखतीस स्वहित पूर्वी याचें। तरी कां चित्त त्याचें त्रास घेतें॥ ६॥ संसार करितां कांहीं न देखेची सुख। म्हणोनी विन्मुख झाला तुज॥ ७॥ वरपंगाचें पेहें पाजिसिल काय। हा निजमुखीं धाय ऐसें करीं॥ ८॥ तरीच तूं निजाची लोभापार माता। म्हणोनि श्लाघ्यता जगामाजीं॥ ९॥ आतां असो सहज येणें वीण काय काज। मी बोलिलों तुज कळेल तें करीं॥ १०॥ नामा म्हणे देवा ऐसें काय केलें। काय तुज वेगळें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जीवन माझें॥ ११॥

१२८०. माझा नामा जंव नाम रूपासी आला। जो म्हणों लागला घरदार॥ १॥ तंव कैसें विघ्न उदेलें गे माये। नामा पंढरीरायें भुलविला॥ २॥ सांग बा विठ्ठला म्यां काय केलें। नाम्या कां भुलविलें कवण्या गुणें॥ ३॥ आम्ही गा शिंपीये अनाथें पैं दीनें। करूं शिवणें टिपणें पोट भरूं॥ ४॥ त्यासी देवा तूंवा आणियेला क्षयो। कैंचा आम्हां देवो निर्मिलासी॥ ५॥ असतां चराचर न बुडतां हे सृष्टी। कां गा घेसी पाठी दुर्बळीची॥ ६॥ एक बाळ माझें धरिली त्याची आस। त्या कैसी निराश मांडियेली॥ ७॥ दिसांमासां गर्भ जाणोनियां पोटीं। त्याची आस मोठी करिती लोक॥ ८॥ एवढा माझा नामा कैसेन विसरेन। देईं कृपादान दुर्बळीसी॥ ९॥ तूं अनाथा गोसावी दीनाचा कैवारी। तें ब्रीद श्रीहरी काय झालें॥ १०॥ विघडिलें पाडस करीं एके ठायीं। विनविते गोणाई केशीराजा॥ ११॥

१२८१. तुझीया नाम्यानें बळी देउनी चित्त। जन्मूनियां आप्त केलें मज॥ १॥ इष्ट मित्र बंधु जननी जनक। सर्व मीच एक करुनी ठेला॥ २॥ ऐसी याची करणी अजोनी नेणसी। बाळ माझें म्हणसी चाळविलें॥ ३॥ प्रेमाचें लाघव लाउनी माझ्या पायीं। बांधलें हृदयीं धरोनियां॥ ४॥ वृत्तिसहित मन लाविलें राखण। केलें जीवें जतन मजलागीं॥ ५॥ उचंबळले नयन अंतरींच्या अनुरागें। रात्रंदिवस जागे माझ्या ठायीं॥ ६॥ बोले चाल परी लक्ष मजवरी। बाहेरी भींतरी मज देखे॥ ७॥ सर्व सुख गुणा रूपा देउनी मिठी। आणि निर्गुणीं हिंपुटी होऊं नेदीं॥ ८॥ न मागे न घे न धरी सोय संसाराची। कल्पना देहींची मावळली॥ ९॥ ऐसें येणें मज विश्वासी गोंविलें। सर्वत्र लावीलें मजची कडे॥ १०॥ निर्गुणीं हा नामा न सोडी सर्वथा। सांपडला आतां एकरूपा॥ ११॥

१२८२. बुडविली क्रिया बुडविलें कर्म। बुडविला धर्म पाहा येणें॥ १॥ तुझिया नामाचें लागलेंसें पिसें। असोनी न दिसे लोकाचारीं॥ २॥ नेणो काय कळे तूंवा वागविला। संबंधु तुटला मज नाम्याचा॥ ३॥ बुडविला आचार बुडविला विचार। बुडविला संसार कुळासहित॥ ४॥ आपुलें पारिखें सर्वथा सारीखें। नेणों कवणा सुखें वेडावला॥ ५॥ बुडविला मोहो बुडविली ममता। बुडविली अहंता मीतूंपण॥ ६॥ हा नेणें वेव्हार कां इंद्रियांचें सुख। अखंड याचें लक्ष तुझे पायीं॥ ७॥ बुडविली कल्पना समुळीं वासना। बुडविली सेवा त्रिविध कैसी॥ ८॥ हांसे नाचे प्रेमें फुंदतु डुळ्ळतु। अहर्निशीं गातु नाम तुझें॥ ९॥ असोनी नसता केला ये संसारीं। म्यां वाहिला उदरीं तैसा नाहीं॥ १०॥ गोणाई म्हणे देवा त्वां केली निरास। चाळविलें उदास बाळ माझें॥ ११॥

१२८३. ऐकें गोणाई म्हणे केशिराज। सदा अरज तुझे नामदेवा॥ १॥ संसारादि यासी नावडेचि कांहीं। मिठीच वो पायीं घातलीसे॥ २॥ नेणों याच्या जीवें घेतलेंसें कांहीं। लोळणीच पायीं घातलीसे॥ ३॥ पुसे वो जीवीचें काय काय आवडे। उवगोनि कोडें नेईं यासी॥ ४॥ देतां कांहीं न मागें नसतां कांहीं नेघे। गुज पैं न सांगे अंतरींचें॥ ५॥ जन्मोनि सांकडें घातलें वो कैसें। गिळील मज ऐसें वाटतसें॥ ६॥ मी भावासी भुललों सांपडलों याचे हातीं। करील काय अंतीं नकळे कांहीं॥ ७॥ एक वेळ मज सोडवीं यापासोनी। दे कां मजलागोनि जीवदान॥ ८॥ माझिये पैं बोलें मजचि गोंविलें। यातें आपंगिलें अनाथ म्हणोनि॥ ९॥ अंगोळिये धरितां खांदीं बोळंगलें। आतां माझें केलें न चले कांहीं॥ १०॥ तूं आपुलिया मनीं विचारूनि पाहीं। नामा आपला नेईं आवडता॥ ११॥ माय लेंक दोघे साम्राज्य करा। घ्यावें धरणीवरी सुख याचें॥ १२॥ कठीण बोल तुझे बहुसाल ऐकिले। नाहीं त्वां गे पाहिलें मागें पुढें॥ १३॥ चित्त तुझें कैसें सांठविलें माया। कां करिसी वायां

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

इष्ट तुटी॥ १४॥ आतां तुझी कैसी झांकोळिली माया। मज करिसी वांयां इष्ट तुटी॥ १५॥ ऐसें देवाचें बोलणें ऐकोनि उदास। नाम्या झाले क्लेश तयेवेळीं॥ १६॥ नामा म्हणे देवा ऐसें कैसें घडे। सृष्टिही पैं बुडे तरी न सोडीं तुज॥ १७॥

१२८४. विश्वजन मोहना कपटिया नारायणा। काय देवपणा मिरवितोसी॥ १॥ दर्शना आलिया हृदयीं संचरसी। देहभाव घेसी हिरोनियां॥ २॥ या विश्वावेगळें नवल तुझें करणें। सांगावें गाऱ्हाणें कोणापासीं॥ ३॥ सर्वांग सुकुमार परी हृदयीं कठीण थोर। नेणसी जेव्हां रे मज दुर्बळीचें॥ ४॥ मज अनाथाचें बाळ वेधोनि मोहिलें। बहुत दुःख झालें सांगो कोणा॥ ५॥ कासया पितृभक्ति पुंडलिकें केली। विवसी अणिली पंढरीसी॥ ६॥ माया दुखऊनी मोहिसी वाळकें। देवपण निकें कैसें तुझें॥ ७॥ यातें अनुसरल्या कैंची बाप माय। नाठवेची सोय संसाराची॥ ८॥ ऐसीयानें संग धरिला तुझा देवा। प्रत्यक्ष अनुभवा आलें मज॥ ९॥ माझिया मनींचें जाणोनियां गुज। कांहींएक तुज सांगेन मी॥ १०॥ माझा नामा लावीं संसाराचे सोई। विनविते गोणाई केशवातें॥ ११॥

१२८५. त्या तूंवां कैसा आणिला एके मायें। येणें पंढरीये बुडविलें॥ १॥ असतां चराचरा न बुडतां सृष्टी। कां घेतली पाठी दुर्बळीची॥ २॥ एक बाळ माझें त्याची धरिली आस। तेथें कां बा निरास केलें देवा॥ ३॥ एवढा हा दान कशानें विसरेन। देईं कृपादान पांडुरंगा॥ ४॥ बिघडलें पाडस करीं एके ठायीं। विनविते गोणाई केशवराजा॥ ५॥

१२८६. बहुत दिवस भरले पैं गोपाळा। अगा ये विठ्ठला कणव नये॥ १॥ नामा माझा वेगीं देईं माझ्या हातीं। जाऊं दे परती अनाथनाथा॥ २॥ खाऊं जेऊं तुज असोस पै देऊं। कीर्ति तुझी गाऊं जगामाजीं॥ ३॥ तुज काय उणें ब्रह्मांडनायका। नव्हेसी मजसारिखा एकदेसी॥ ४॥ अनंत ब्रह्मांडें क्षणें घडामोडीसी। कां मज दुर्बळीसी कष्टविलें॥ ५॥ तुज दुजेपणाचा सहज आला वीट। तूं तंव एकटा एकलाची॥ ६॥ ऐसी कीर्ति वेद वर्णिती पुराणें। तें कां लाजिरवाणें करिसी देवा॥ ७॥ तूं कृपेचा कोंवळा म्हणति विश्वजन त्या तुझें निर्वाण कळलें नाहीं॥ ८॥ मैंद मुद्रा धरणें गळां तुळसीमाळा। निवटितोसी गळा न कळतां॥ ९॥ आतां आपुला भ्रमु राखे तो शहाणा। झणीं माझ्या निर्वाणा पहासी देवा॥ १०॥ गोणाई म्हणे माझा। नामा देऊनी हातीं अंगिकारीं कीर्ति पंढरीराया॥ ११॥

१२८७. थितें माझें प्रेम घेऊनि बैसला। अझुनि नुठी वाहिला नामा तुझा॥ १॥ जीवें भावें सर्वस्वें घेतलें धरणें। म्यां काय करणें ऐशियासी॥ २॥ कासया अपराध ठेविशील मज। शिकवितें तुज नाहीं कोणी॥ ३॥ संसारा गांजले जन्ममरणा उबगले। म्हणोनि शरण आले भयाभीत॥ ४॥ कृपा उपजली जीवें अनुसरला। जीव याचा गुंतला माझे ठायीं॥ ५॥ दवडितां वेगळे वोसंगा रिघालें बळें। बोलतां हें साळेंभोळें करुणावचनीं॥ ६॥ तेणें माझें हृदय कळवळलें। म्हणोनि देखतां डोळे निवती माझे॥ ७॥ शरण आलिया तें म्यां जरि अव्हेरावें। कोणें आपंगावें सांग सत्य॥ ८॥ शत्रुमित्र आदिकरुनी सकळ। दुःख अळुमाळ पडों नेदी॥ ९॥ संसाराची येणें सांडियेली सोयी। प्राणें माझ्या ठायीं अनुसरला॥ १०॥ आतां याची लटिकी करी दूर आसे। नामा म्हणे उदास सर्वस्वासी॥ ११॥

१२८८. निर्गुणपणाचा अभिमान सांडिला। निगम लाजविला नारायण॥ १॥ कपट करोनि भक्तांसी तारिसी। तुझा तूं ठाकसी पंढरीराया॥ २॥ ठकुनी पुंडलिकासी न्यावया वैकुंठासी। या बुद्धी आलासी पंढरीये॥ ३॥ तंव त्या भक्तराजें धरियेलें चित्तें। परतोनि मागुतें जाऊं नेदी॥ ४॥ अठ्ठावीस युगें गेलीं विचारितां। निर्मम सर्वथा नव्हे देवा॥ ५॥ मग कटावरी कर धरोनियां धीर। उभा निरंतर राहिलासी॥ ६॥ सर्व घे प्रेमें तें हिरोनि बांधिलें। विचारें साधिलें कोणें कोणा॥ ७॥ द्वारीं द्वारपाळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

झालासी अंकित। सांग बुद्धिमंत कोण ऐसा ॥ ८ ॥ नाथिलेचि करीसी आपणा गोंविसी। बोल कां ठेविसी नामयातें॥ ९ ॥ गोणाई म्हणे तुझें नकळे विंदान। देईं कृपादान बाळ माझें॥ १० ॥

१२८९. माझें घर त्वां पूर्वींच बुडविलें। जें दर्शनासी आलें बाळ माझें॥ १ ॥ नेणों काय वर्म तुझें सांपडलें हातीं। रिघालासी चित्तीं जेणें द्वारें॥ २ ॥ लौकिक परिहार देसील कासया। मी तुज ऐसीया बरें जाणें॥ ३ ॥ कटीं कर ठेउनी उभा गरुडपारीं। हें तंव अंतरीं हारपला॥ ४ ॥ नाहीं चळणवळण न लावी पात्या पातें। लागलें निरूतें लक्ष तुझें॥ ५ ॥ तुझी याची खूण अंतरींची एकी। दाविसी लौकिकीं भिन्नपण॥ ६ ॥ सांडियेली येणें लौकिकाची लाज। नव्हे माझा मज कांहीं केल्या॥ ७ ॥ तुझेनि सुखें धाला आनारिसा झाला। अभिमान मावळला समूळ याचा॥ ८ ॥ देहीं पैं असोनी विदेही दिसत। प्रेमें वोसंडत हृदयकमळीं॥ ९ ॥ तूं अनाथा कैवारी ऐसी वेदवाणी। परी कां नये आजोनी कणव तुज॥ १० ॥ गोणाई म्हणे माझा नामा देईं हातीं। लागेन पुढतां पुढतीं तुझे पायीं॥ ११ ॥

१२९०. वाचेचेनी बळें बोलसी आगळें। मर्यादेवेगळें वायांवीण॥ १ ॥ भ्रमलीसी आरजे न पाहसी आपणाकडे। धारिष्ट केवढें पाहें तुझें॥ २ ॥ नेईं आपला नामा काय चाड आम्हां। जरी आहे तुज भ्रम ममत्वाचा॥ ३ ॥ पाहेपां पूर्वींचा कवणीये जन्मींचा। नकळे तुझा याचा ऋणानुबंध॥ ४ ॥ तो सरला कीं उरला विचारितां आपुला। हा तुज अंतरला कवण्या गुणें॥ ५ ॥ येणें सांडिला संसार वेव्हार लौकिक। अविद्या अहंभाविक दोन्ही नाहीं॥ ६ ॥ हा प्रपंचावेगळा नकळे याची लीला। लागलासे डोळां प्रेममुद्रा॥ ७ ॥ ऐसी याची स्थिति देखोनियां डोळां। मज कां वेळोवेळां छळितेसी॥ ८ ॥ जाणसी त्या परी बुझावीं वो यातें। जेणें सुखें तूंतें ओळखिला॥ ९ ॥ याचेनी संसार चालवीन म्हणोनी। ऐसी भ्रांती मनीं धरिलीं वांया॥ १० ॥ नामा तरि निमाला आम्हां अनुसरला। तरंगु विराला जळीं जेवीं॥ ११ ॥

१२९१. लावोनी भवभय तुवां केलें साचें। देह नव्हे याचें ऐसें केलें॥ १ ॥ सुखभोग सर्व दिला टाकोनियां। नेणें तुझ्या पायां परतें कांहीं॥ २ ॥ ऐसें काय केलें नाम्या चाळविलें। समूळ बुडविलें आपणामाजीं॥ ३ ॥ आम्हां दुर्बळांचा करोनियां घात। केला वाताहात घराचार॥ ४ ॥ आतां तुजवीण कोणाचे साउली। पाळली पोसिली तुझी देवा॥ ५ ॥ संकटीं उदरीं वाहिली म्यां आशा। होता भरंवसा थोर याचा॥ ६ ॥ तंव त्वां आपुल्या लावियेली सोई। नव्हे मज कांहीं ऐसा केला॥ ७ ॥ काया वाचा मनें सांडोनियां मज। अनुसरला तुज मनोभावें॥ ८ ॥ नकळे तुझी माव काय या दाविलें। परतेनासे केलें चित्त याचें॥ ९ ॥ आतां माझा शीण निवारील कोण। एका तुजवीण पांडुरंगा॥ १० ॥ गोणाई म्हणे देवा देईं जीवदान। सुखाचें निधान नामा माझा॥ ११ ॥

१२९२. राही रखुमाई सत्यभामा माता। शिवाय त्या कांता बहुतां परी॥ १ ॥ संत सनकादिक साक्ष हे सकळ। येणें माझें बाळ चाळविलें॥ २ ॥ हा काय आमुचा धनी कीं गोसावी। नाहीं तें शिकवी लेंकुरासी॥ ३ ॥ झाला देव तरी पडों याच्या पायां। मैंदावें केलीया भलें नव्हे॥ ४ ॥ भीड तुटलीया नेईन चौघां चारीं। होईल समसरी याची मज॥ ५ ॥ देव कांहीं आम्हीं नसति ऐकीले। परी नाहीं नाहीं देखिलें ऐसें कोठें॥ ६ ॥ दर्शनेंची जेथें जीवित्वाची हानी। नाठवे परतोनी घराचार॥ ७ ॥ कैंची वो पंढरी मी वो काय जाणे। याच्या पुत्रपणें देखीयेली॥ ८ ॥ या देवासी भेटी जन्ममरण तुटी। मावळली गोष्टी संसाराची॥ ९ ॥ तुम्ही औघ्याजणी याच्या सांगातिणी। पुसा याचे मनीं काय आहे॥ १० ॥ देऊनियां नामा मज लावा वाटे। गोणाई म्हणे वोखटें न करा देवा॥ ११ ॥

१२९३. अरे विठोबा आतां पाहें मजकडे।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कां रे केलें वेडें बाळ माझें॥ १॥ तुझें उच्छिष्ट खादलें त्वां काय दिधलें। भलें दाखविलें देवपण॥ २॥ आधीं त्वां तयाचें भोगूं पैं जाणावें। भक्ता सुख द्यावें आनंदाचें॥ ३॥ गोणाई म्हणे देवा तुज बांधलें दावें। तरी तुज भ्यावें लागे संतां॥ ४॥

१२९४. हरी त्वां कोणाचें बरवें केलें। पूर्ण आम्हां कळों आलें॥ १॥ नारद वैष्णव जगजेठी। त्यासी लाविली लंगोटी॥ २॥ मयुरध्वज राजा भला। त्यासी करवतीं घातला॥ ३॥ बळी दानशीळ भला। तुवां पाताळीं घातला॥ ४॥ भीष्म वैष्णवांचा राव। त्याचा बाणें पूजिला ठाव॥ ५॥ रुक्मांगद हरिचा दास। त्याचा गांवच केला वोस॥ ६॥ बाळ एकुलतें एक। तें त्वां ज्ञानीच केला शुक॥ ७॥ उपमन्यु बाळक पाहें। क्षीरसागरी कोंडिलें आहे॥ ८॥ धुरु बाळक गोजिरवाणें। त्याचें खुंटलें येणें जाणें॥ ९॥ हरिश्चंद्र ताराराणी। डोंबा घरीं वाहे पाणी॥ १०॥ प्रल्हाद भक्तीचा भुकेला। त्याचा बाप त्वां वधिला॥ ११॥ हनुमंत भक्त निकट। त्यासी केलें तूं मर्कट॥ १२॥ पुण्यवंत राजा नळ। त्याचा केला तूंवा छळ॥ १३॥ श्रियाळ राजा भला। त्याचा बाळ त्वां खादला॥ १४॥ तुज कोणी न म्हणे भलें। बाळ पोटीचें कोंवळें॥ १५॥ जिकडे तिकडे तुम्ही दोघें। तिकडे तिसरा नामा मागें॥ १६॥ तुज नाहीं जाती कुळ। जेउनी भ्रष्टविलें बाळ॥ १७॥ जेणें तुझें नाम घेतलें। ते संसारावेगळे केले॥ १८॥ आतां जेविसी तरी तुज आण। ऐकोनि हांसे जगज्जीवन॥ १९॥ नामा दिला माते हातीं। नयन भरले अश्रुपातीं॥ २०॥ माय पाहे नामदेव। तंव तो झाला केशवराव॥ २१॥ माय म्हणे न ये कामा। तुझा ओपिला तुज नामा॥ २२॥ गोणाई म्हणे हरी। तुझी करणी तुजची बरी॥ २३॥

गोणाई व नामदेव यांचा संवाद.

१२९५. गोणाई म्हणे नाम्या वचन माझें ऐक। पोटीगें बाळक म्हणोनी सांगें॥ १॥ महिमेचा संसार सांडोनी आपुला। संग त्वां धरिला निःसंगाचा॥ २॥ या काय मागसी तो काय देईल। शीघ्रची नेईल वैकुंठासी॥ ३॥ सविल्याचीं लेंकुरें वर्तताती कैसीं। तूं मज झालासी कुळक्षय॥ ४॥ धनधान्य पुत्र कलत्रें नांदती। तुज अभाग्याचे चित्तीं पांडुरंग॥ ५॥ शिवण्या टिपण्या घातलेंसें पाणी। न पाहासी परतोनी घराकडे॥ ६॥ कैसी तुझी भक्ती या लौकिकावेगळी। संसाराची होळी केली नाम्या॥ ७॥ याची तुवां कैसी धरियेली कांस। हा तंव कवणास झाला नाहीं॥ ८॥ त्यातें जे अनुसरती त्यांचें नुरे कांहीं। देव नव्हे पाही हा घरघेणा॥ ९॥ गोकुळीं करी चोरी आपुलें पोट भरी। तो तुज निर्धारी देईल काई॥ १०॥ लक्ष्मीसारिखी सुंदर टाकोनी। ताटिका गौळणी गौळीयांच्या॥ ११॥ अष्टसिद्धी दासी जयाच्या कामारी। कल्पवृक्ष द्वारीं कामधेनु॥ १२॥ टाकोनी बळीचे द्वारीं भीक मागों गेला। धरोनी बांधला दारवंटा॥ १३॥ कुबजा कुरूप कंसाचीया दासी। जीवेंभावें तिसीं रतलासे॥ १४॥ यातें भजती त्याच्या संसाराची नासी। जडला जीवेसी नवजाय॥ १५॥ ठकोनियां येणें बहु नाडीयेलें। तैसें तुज झालें सत्य जाण॥ १६॥ गोणाई म्हणे नाम्या नाइकसी शिकविलें। घर त्वां बुडविलें कुळासहित॥ १७॥

१२९६. नामा म्हणे माते परियेसीं वचन। गुज मी सांगेन अंतरींचें॥ १॥ धरोनि माझी वृत्ती पाहें माझें सुख। मी सांगतों तें ऐक जननीये॥ २॥ कायावाचामनें ममत्व माझ्या ठायीं। तें तूं ठेवी पायीं विठोबाचे॥ ३॥ मग हा कृपासिंधु न विसंबेल तुज। अनाथाची लाज हाची राखे॥ ४॥ पाहें पां पशु मज जळचरें गांजीलें। सकळीं सांडीलें जीवलगीं॥ ५॥ पीतांबरासहित घालोनियां उडी। सोडविला पानेडी अनाथ म्हणोनी॥ ६॥ प्रल्हादा-कारणें झाला पैं पिसाट। धरीलें विकट रूप देवें॥ ७॥ विदारूनी दैत्य आवेशें बहुत। यानें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझा भक्त गांजीयेला॥ ८॥ पांडवांचें काज करितां नाहीं लाज। म्हणे शरण मज अनन्यभावें॥ ९॥ पाडसाकारणें जैसी कुरंगिणी। तैसा रानींवनीं सांभाळित॥ १०॥ जन्मोनियां माझे बहु लळे केले। अडचणी सांभाळिलें अनाथनाथें॥ ११॥ नामा म्हणे याचे दृढ धरिले चरण। कळीकाळापासोन सोडविलें॥ १२॥

१२९७. लाभाचिया लोभें मज म्हणसी आपुलें। परी नेणसी तापलें चित्त माझें॥ १॥ जन्ममरण दुःखें शिणलों यातायाती। ऐसी माझी खंती न विचारीसी॥ २॥ म्हणोनी विठोबाचा झालों शरणागत। तेणें माझें हीत ऐसें केलें॥ ३॥ पुत्र कलत्र सकळ भजती हितालागीं। दुःखाचे विभागी नव्हती कोणी॥ ४॥ जन्मोनी भजतां उचित एक चुके। तें होय पारिखें क्षणामाजीं॥ ५॥ नाना योनी हिंडतां आपुलें निज कर्म। मज होय श्रम तें तूं देईं॥ ६॥ परी माझ्या विठोबाची सेवा सुख गोडी। नाहीं एक घडी न देखों कोठें॥ ७॥ जाती कुळ माझें नाहीं विचारिलें। नेणों अंगिकारिलें कवण्या गुणें॥ ८॥ तुजवीण त्याचें हृदय कोंवळें। पाळी माझे लळे नानापरी॥ ९॥ शीणलिया बोभाय मग मी वाट पाहें। ये वो माझे माये पांडुरंगे॥ १०॥ शब्द माझा कानीं पडतां तत्क्षणीं। येतसे टाकोनी झेंपावत॥ ११॥ न सांगतां कांहीं सर्व जाणें जिवींचें। आणि ऐसें कैंचें लोभापर॥ १२॥ देऊनी अभयदान करें कुरवाळी। करीतसे साउली पीतांबरें॥ १३॥ मायबाप सखा जीवलग सोईरा। माझीया संसारा हाची एक॥ १४॥ नामा म्हणे माझ्या हृदयींचा विसांवा। गीतीं गातां जीवा गोड वाटे॥ १५॥

१२९८. गोणाई म्हणे नाम्या जल्पसी भलतें। तुज कोण्या दैवतें वोढियेलें॥ १॥ लाजिरवाणें तुवां केलें रे हें जिणें। हांसती पिसूनें देशोदेशीं॥ २॥ सांडी सांडी नाम्या तूं हें देवपिसें। बळें घर कैसें बुडवितोसी॥ ३॥ नवमास उदराभीतरीं वाहीला। माझ्या नेणत्या बाळा चालविलें॥ ४॥ तुझे द्वारीं बैसोनी उपवास करीन। नामा घेऊन जाईन गुणराशी॥ ५॥ येथें तें होईल लटिकेंची भांडण। नामा द्यावा म्हणे गोणाई माझा॥ ६॥ गोणाई म्हणे नाम्या कळेल तें करीं। स्वहित विचारी सांगों किती॥ ७॥

१२९९. पोर निर्दय झालें देवपिसें लागलें। लोकाचें गोविलें तेंहि पोर॥ १॥ नित्य करी अंघोळ धोत्रेंहि फाडिलीं। कळी मांडीयेली याहीं पोरें॥ २॥ गांवींचे महाजन करिती गुडघेस्नान। या पोरा व्यसन अंघोळीचें॥ ३॥ जन्मोजन्मीं नेणों आम्ही ह्या तुळसी। या पोरें विवसी मांडीयेली॥ ४॥ गोणाई म्हणे नाम्या तुवां भलें केलें। जया वश्य केलें विठोबासी॥ ५॥

१३००. ज्याचें दैव त्या सांगातें। मला नवल वाटतें॥ १॥ एक बैसती अश्वावरी। एक चालती चरणचालीं॥ २॥ एक जेविती मिष्टान्न। एकसा न मिळे कोरान्न॥ ३॥ गोणाई म्हणे धन्य देवा। नामयाचा संचित ठेवा॥ ४॥

१३०१. सोय सांडिली घराची। जोडी केली विठ्ठलाची॥ १॥ मायबापासी टाकिलें। ध्यान देवाचें लागलें॥ २॥ स्त्री पुत्र बंधु बहिणी। केली सर्वांची सांडणी॥ ३॥ गणगोत इष्टमित्र। सर्व जोडिलें विठ्ठलपात्र॥ ४॥ गोणाई म्हणे नामा। भली केली बा रे सीमा॥ ५॥

गोणाई व संत यांचा संवाद.

१३०२. नामयाची माता विनवितसे संता। म्हणे पुत्रनाथा काय करूं॥ १॥ नामा चाळविला पंढरीये नेला। विठ्ठलीं मीनला नामदेव॥ २॥ नेणें अन्नपाणी शिवणीं टिपणीं। अखंड चक्रपाणि हृदयीं वसे॥ ३॥ संत म्हणती गोणाई विपरीत अवधारी। नामा पंढरपुरीं वैष्णवांमाजीं॥ ४॥

१३०३. नामयासारिखें निधान तुझे कुसीं। धन्य तूं वो होसी जगामाजीं॥ १॥ धन्य याचें सुख देखियलें डोळां। प्रेमाचा जिव्हाळा अलौकिक॥ २॥ धन्य तुझें कुळ धन्य तुझा वंश। दीपासवें प्रकाश

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दिसे जेवीं ॥ ३ ॥ धन्य तुझी काया धन्य वाचा मन। करविलें स्तनपान नामयासी ॥ ४ ॥ धन्य हा दिवस तुवां केलें सार्थक। खेळविलें कौतुकें नामयासी ॥ ५ ॥ धन्य तुझें भोजन नाहीं नाम्याविण। धन्य उदकपान केलें तूंवां ॥ ६ ॥ धन्य विश्रांतीसी केलें त्वां शयन। वोसंगा घेऊन नामयासी ॥ ७ ॥ धन्य तुझे कर कुरवाळिला नामा। धन्य तो संभ्रमा स्नेह तुझा ॥ ८ ॥ धन्य कृपादृष्टी नाम्यातें पाहिलें। केंस कुर्वाळिले बाळपणीं ॥ ९ ॥ ऐसी तूं वो धन्य जन्मोनियां धन्य। तुझें नाम धन्य मिरवत ॥ १० ॥ धन्य तुझा नामा ज्याची भेटी आम्हां। धन्य त्याचा प्रेमा नित्य नवा ॥ ११ ॥

श्रीविठ्ठलानें मातृदैवताविषयीं नामदेवास केलेला बोध.

१३०४. मग पंढरीनाथ म्हणे नामयासी। तूं जाईं गोणाईसी घेऊनियां ॥ १ ॥ अतिशय कां इणें मांडिलासे फार। मातेसि निष्ठुर होऊं नये ॥ २ ॥ स्तनपान देऊनि मोहें पाळिलासी। अंतर तियेसी देऊं नये ॥ ३ ॥ नामा म्हणे शरण आलों जिच्या भेणें। तिचे हातीं देणें उचित नव्हे ॥ ४ ॥

श्रीविठ्ठल आणि गोणाई यांचा संवाद.

१३०५. देव झाला नामा नामा झाला देव। गोणाईचा भाव पहावया ॥ १ ॥ हा घे तुझा नामा काय चाड आम्हां। आनंदाचा प्रेमा गोणाईसी ॥ २ ॥ हातीं धरोनियां घेऊनी चालिली। फिरून पाहती झाली तंव तो देव ॥ ३ ॥ अगा माझ्या बापा तूं कोणा हवासी। मज दुर्बळासी काय होय ॥ ४ ॥ सोळा सहस्त्र मुख्य अष्ट तुझ्या कांता। त्या माझ्या घाता प्रवर्ततील ॥ ५ ॥ पुंडलिकासी तूंवां दिधली आहे भाक। गोणाई म्हणे ठक बहु होसी ॥ ६ ॥

१३०६. माझा नामा मज देईं। जीव देईन तुझे पायीं ॥ १ ॥ पुंडलीका भुलवीलें। तैसें माझें बाळ केलें ॥ २ ॥ तें गा नचले मजपासीं। देगा माझ्या नामयासी ॥ ३ ॥ तुज संगतीं जे लागले। ते त्वां जितेची मारिले ॥ ४ ॥ विठ्ठल म्हणे गोणाई। आपुला नामा घेऊनी जाईं ॥ ५ ॥ हातीं धरोनियां गेली। गोणाई तेव्हां आनंदली ॥ ६ ॥

१३०७. सुख पंढरीस पाहूं। आले भीमातीरीं बहू ॥ १ ॥ प्रेमें गर्जती हरिचे दास। मागें पंढरीनिवास ॥ २ ॥ मोक्ष पायीं लोळण घाली। देखोनी मुक्ताई निवाली ॥ ३ ॥ ज्ञानदेव सद्गदित। देखोनी गोणाई हांसत ॥ ४ ॥

दामशेटी व नामदेव यांचा संवाद.

(बाजारहाट)

१३०८. शिवणें टिपणें करोनि आपुलें। नित्य चालवणें संसारिक ॥ १ ॥ गणगोतांमाजीं बरें केलें नांव। माझें सत्त्व सर्व बुडविलें ॥ २ ॥ कवणें गुणें तुज पडिली बा भुली। सुख या विठ्ठलीं देखिलें काय ॥ ३ ॥ तूं भक्त निधडा हा देव धडफुडा। मेळाविला जोडा येरयेरां ॥ ४ ॥ यासीं नाहीं आप तुज नाहीं पर। आमुचा संसार विभांडिला ॥ ५ ॥ सरलें आयुष्य उरले थोडे दीस। थोर केली आस होती जीवीं ॥ ६ ॥ आमुच्या माघारें राखीसी वो नांव। त्वां तंव बरवें दैव काढियेलें ॥ ७ ॥ खांदीये भोंपळा गळां तुळसीमाळा। जपसी वेळोवेळां रामकृष्ण ॥ ८ ॥ तेणें छंद नयनीं अश्रूंचिया धारा। केली ख्याती गव्हरा जनांमाजीं ॥ ९ ॥ अरे ऐसें तूंवां बुडविलें कुळ। सांडिली सकळ लोकलाज ॥ १० ॥ बरवी धरिली दृढ सत्त्वाची पाउटी। शिकवी दामशेटी नामयासी ॥ ११ ॥

१३०९. बोले दामशेटी। नाम्या ऐकावी गोष्टी ॥ १ ॥ पाहे संसाराची सोय। हाटा बाजारासी जाय ॥ २ ॥ कुटुंब चालवणें तुज। वृद्धपण झालें मज ॥ ३ ॥ तुजसाठीं नवस केला। शेखीं हाची कामा आला ॥ ४ ॥ दामा म्हणे नामयासी। किती शिकवावें तुजसी ॥ ५ ॥

१३१०. केशवासी नामा सांगतसे भावें। व्यवसाय स्वभावें झाला तैसा ॥ १ ॥ मालिक गणोबा धोंडोबा जामीन। घोतलीसे पूर्ण निशाचिठी ॥ २ ॥ आठवड्याची बोली करूनियां आलों। नामा म्हणे धालों तुज पाहतां ॥ ३ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१३११. दामाशेटी म्हणे व्यवहार कोणासी। केला तो आम्हांसी सांग नाम्या॥ १॥ गणोबा नाईक नाम हें जयाचें। सावकार साचे पुरातन॥ २॥ तयांचे दुकानीं वेंचिलें कापड। आठांवारीं तोड ऐवजासी॥ ३॥ दामाशेटी म्हणे नामया सुजाणा। वेगीं द्रव्य आणा जाऊनियां॥ ४॥

१३१२. जावोनियां नामदेव। बोले गणोबासी भाव॥ १॥ द्रव्य द्यावें हो सत्वरीं। आम्ही जातों आपुल्या घरीं॥ २॥ मग म्हणे धोंडोबासी। तुम्ही जामीन ऐवजासी॥ ३॥ द्रव्य द्यावें हो लवकरी। नाहींतरी चलावें घरीं॥ ४॥ ऐसें बोलोनी धोंडोबासी। पुढें लोटिलें तयासी॥ ५॥ नामा पंढरीसी आला। संगें धोंडोबा आणिला॥ ६॥

१३१३. कुलूप अर्गळा घालोनि कोठडिसी। घातलें धोंड्याशीं बंदीखानीं॥ १॥ गोणाई दामशेटी नव्हतीं तेव्हां घरीं। गेलीं भीमातीरीं स्नाना-लागीं॥ २॥ नामदेव गेले राउळा त्वरित। सांगतसे मात केशवासी॥ ३॥ दामाशेटी आले स्नान सारूनियां। राजाई त्यां पायां लागूनि बोले॥ ४॥ ऐका हो मामाजी पुत्राची हे मात। धोंड्याशीं घरांत कोंडियलें॥ ५॥ दामाशेटी बोले नामा कोठें गेला। बोलवा तयाला झडकरी॥ ६॥ नारा महादा दोघे जाती राऊळासी। बोलाविती नाम्यासी चला घरीं॥ ७॥ मुखाकडे पाहे केशवाच्या नामा। घरीं जातां दामा मारील तो॥ ८॥ देव म्हणे नाम्या भिऊं नको मनीं। नाम हें निर्वाणी तारील तुज॥ ९॥ नामा घरा आला दामाशेटी पायीं। नमस्कारूनि त्यांही उभा पुढें॥ १०॥ दामाशेटी म्हणे नाम्या काय केलें। धोंड्याशीं कोंडिलें घरामध्यें॥ ११॥

१३१४. अरे नाम्या काय केलें। कासया धोंड्याशीं कोंडिलें॥ १॥ उदीम बरा फळा आला। हारविलें भांडवला॥ २॥ सांसारिक चतुर बहु। मातीसमान घेसी गहूं॥ ३॥ नामा म्हणे दामशेटी। माझी ऐकावी गोष्टी॥ ४॥

१३१५. ऐका दामशेटी सांगतों तुम्हासी। द्रव्यही कुळासी मागुन घ्यावें॥ १॥ मालधनी आलों घेऊनियां घरां। तुम्ही कां दातारा गांजितसां॥ २॥ नामदेव म्हणे धोंडोबा नाईका। मिती आणि पैका द्यावा वेगीं॥ ३॥

१३१६. धोंडबा नामदेवें काढिला बाहेरी। अंतर्बाह्याकारी सोनें झालें॥ १॥ दामशेटी पाहुनी नामयासी बोले। व्यर्थ म्यां छळिलें तुज बाळा॥ २॥ राजाई गोणाई धांवोनियां आली। विनत होऊनी बोली बोलताती॥ ३॥ आम्ही कुटुंब द्रव्य नाहीं घरीं। म्हणोनी श्रीहरी पावलासी॥ ४॥ गोणाई दामशेटी सांगे नामदेवा। न बोलावें भावा जन बापा॥ ५॥ जगा ऐसी मात कळलियावरी। घेतील हिरोनी सारीं धोंडोबासी॥ ६॥ नामदेव म्हणे आपुलें द्रव्य घ्यावें। उरलें तें धाडावें गणोबासी॥ ७॥

१३१७. ऐसें ऐकोनियां राजाई ते आली। रोषें येऊनी बोली बोलतसे॥ १॥ देवानें हें दिलें तुम्ही कां पाठवा। काशाचा गणोबा बोलतसा॥ २॥ ऐसे बोलोनियां हातें लोटी धोंडा। तुमचिया वितंडा कोण पुसे॥ ३॥ देवें मज दिलें तुम्ही कां मागतां। अलंकार आतां घडीन मी॥ ४॥ नामा म्हणे धन ज्याचें त्यासी द्यावें। आपुलें तें घ्यावें आपणची॥ ५॥

१३१८. क्षेत्रीं हा वृत्तांत कळला सर्वांशीं। आले पंचक्रोशी सभोंवतें॥ १॥ धोंडोबा गणोबा होते ज्याचे रानीं। ते आले धांवोनी मागावया॥ २॥ आपुलें द्रव्य घ्यावें धोंडोबाशीं द्यावें। नाहींतरी चलावें पंचाइतीं॥ ३॥ नामदेव म्हणे द्रव्य तुम्हीं द्यावें। आपुलें घेवोनी जावें धोंडोबाशीं॥ ४॥

१३१९. सकळ समुदाय मिळोनियां आला। द्रव्य देउनी नेला धोंडोबासी॥ १॥ धोंडोबाशीं सकळिकें ग्रामस्थीं आणिलें। पूर्ववत झाले दगडची॥ २॥ नामा म्हणे विठो पावला निर्वाणीं। भक्तां चक्रपाणि रक्षीतसे॥ ३॥

राजाई व नामदेव यांचा संवाद.

१३२०. आई जें शिकवी तीतें तुम्ही नाईका।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाहीं भय शंका लौकिकाची॥ १॥ लावोनी लंगोटी झालेती गोसावी। आमुची ठेवाठेवी कोण करी॥ २॥ ऐसी तुमची स्थिति विलग देखोनी। पडिले चिंतवनीं काय करूं॥ ३॥ धडची कांटींये घातलें हें कैसें। बळेंची आपणा पिसें लावियेलें॥ ४॥ सुखाचा संसार करोनी बारा वाटे। नांव केलें मोठें जगामाजीं॥ ५॥ तोडियेला मोह सांडियेली माया। भुलविलें तुमचीया चित्ता कोणें॥ ६॥ कवणें पुण्य ऐसी जोडियेली जोडी। केली बिघडाबिघडी आम्हां तुम्हां॥ ७॥ तुमचिये गती लेंकरें नेणती। कोण चालविती घराचार॥ ८॥ म्हणोनी माझें चित्त आपुलेनी उद्वेगें। कवणा जीवींचें सांगे सुखदुःख॥ ९॥ सर्वस्वें सांडोनी धरिला तुम्ही देव। येणे पुसिला ठाव संसारींचा॥ १०॥ आमची करुणा न वाटेची कांहीं। विनविते राजाई नामदेवा॥ ११॥

१३२१. घरधनी याणीं केला गुरू। बाई मी आतां काय करूं। असोनि नाहींसा संसारू। चमत्कार कृपेचा॥ १॥ धांवें पावें गे मेसाई। येथें कोणाचें न चले कांहीं। सत्यपण तुझे ठायीं। तरी हें नाहींसें करी गे॥ २॥ मंत्र घेतला जैसा। घरीं संतांचा वोळसा। वोस पडो हरिदासा। गेले नमत मागुतें॥ ३॥ काय सांगो याची रीती। सोसे सोसे पाये चरणाप्रती। अवघे भांवडभूत होती। नाचताती आनंदें॥ ४॥ लौकिकांत गेलीं वायां। एकाच्या एक पडती पायां। म्हणती येगा पंढरीराया। ब्रह्मानंदें डुल्लता॥ ५॥ भोळी सासू गोणाबाई। पांढरा स्फटिक व्याली पाही। त्यानें जोडिला शेषशाई। काय राजाई करूं म्हणे॥ ६॥

रखुमाईकडून विठोबाला राजाईचा निरोप.

१३२२. दोन प्रहर रात्र पाहोनी एकांत। राजाई वृत्तांत सांगे माते॥ १॥ अहो रखुमाबाई विठोबासी सांगा। भ्रतारासी कां गा वेडें केलें॥ २॥ वस्त्र पात्र नाहीं खाया जेवायासी। नाचे अहर्निशीं निर्लज्जसा॥ ३॥ चवदा मनुष्यें आहेत माझ्या घरीं। हिंडती दारोदारीं अन्नासाठीं॥ ४॥ बरा मार्ग तुम्ही उमजोनी सांगा। नामयाची राजा भली नव्हे॥ ५॥

१३२३. सावध सावध राजाई हो सुखें। नामयानें दुख निरसिलें॥ १॥ संसारसांते या येऊनि भाग्याचा। छंद विठ्ठलाचा लागला यासी॥ २॥ याचें नाम ऐसें न दिसे त्रिभुवनीं। नायको दुजें कर्णीं नाम्या ऐसें॥ ३॥ वैष्णवांचे गजर टाळघोष दिंडी। उभयतां ब्रह्मांडीं घोष गेला॥ ४॥ तयाच्या दर्शनें कलिमाजीं तारिलीं। भाग्यें विनटली विठ्ठलेंसी॥ ५॥ राजाई म्हणे माते रखुमाई बुद्धिवंते। आमुच्या अदृष्टातें लिहिलें कैसें॥ ६॥

१३२४. परियेसी रुक्माई जैसा बैसला पाटीं। दैन्य पैं न सोडी काय करूं॥ १॥ सदैवाच्या स्त्रिया अलंकारमंडित। मजवरी नाहीं प्रीत काय करूं॥ २॥ दरिद्रें विश्रांति घातली वो कैसी। सांगों कोणापाशीं माउलीये॥ ३॥ एकी दिव्य वस्त्रें नेसल्या परिकर। मज खंडे जर्जर मिळालेंसें॥ ४॥ मोडकें खोंपट वारा येतो भरभराट। बहुत होती कष्ट कोणा सांगों॥ ५॥ कैंची कुसुमसेज कैंचे पटकुळ। फाटकी वाकळ अंथरुणा॥ ६॥ कन्या आणि पुत्र झालीं उपवरी। अजोनी न धरी घर प्राणनाथ॥ ७॥ जनलोकांमाजीं केलें येणें हासें। म्हणती लागलें पिसें नामयासी॥ ८॥ जन्मीं न देखे उपाय येणें केले अपाये। कोणा सांगों माये सुखदुःख॥ ९॥ आमुच्या वडिला शस्त्र सुई आणि कातरी। हा बाण आणि सुरी वागवीतसे॥ १०॥ एकांतें भाकिलें रुदना करी त्याची नारी। वाहियेली सुरी नागनाथीं॥ ११॥ लज्जेचा हा गांव सांडियेला येणें। शिकवावें कोणें माउलीये॥ १२॥ संसाराचा येणें सांडिला पसारा। कणव स्त्री बाळा नये कैसी॥ १३॥ नसतां विठोबा नसतां पंढरी। तरी हा सुखें घरीं नांदतां कीं॥ १४॥ होणार होऊन गेलें शिकवूं आतां काई। विनविते राजाई रखुमाईसी॥ १५॥

१३२५. शिकवा वो रुक्माई आपुलीया

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कांता। कां आम्हां अनाथां कष्टवीतो॥ १॥ जन्मोनियां आमुची पुरविली पाठी। मोडिली राहाटी संसाराची॥ २॥ आतां आम्ही काय करणें माउलीये। बैसूं सावलीये कवणाचीये॥ ३॥ माझ्या भ्रतारासी लावियेला चाळा। क्षण जी वेगळा न करी त्यासी॥ ४॥ आमुचा वेव्हार विध्वंसिला पाहीं। करुणा माझी कांहीं नये त्यासी॥ ५॥ सकळाचें मूळ आपणा आधीन। केलें येणें जाणें पांडुरंगें॥ ६॥ आपुलें परावें मोहो हा सांडिला। आंगोठा मोडिला उपाधीचा॥ ७॥ उघडें घरदार लौकिक वेव्हारा। धरिला निर्धार याचे नामीं॥ ८॥ रात्रंदिवस जपे गोविंद हृदयीं। आमुची चिंता कांहीं नलगे त्यासी॥ ९॥ तुमचे सन्निधानें झालों आम्ही दीन। न वाटे निर्वाण कैसें तुम्हां॥ १०॥ संसाराची व्यथा नेणवे सर्वथा। होय तें उचिता करणें आम्हां॥ ११॥ धरी निरंतर एकची उत्तर। परि हा तुम्हीं विचार काय केला॥ १२॥ अनुभव अनुभवीं जाणें तुम्हीं समर्थपणें। सदा मुखीं म्हणे नामीं तुझ्या॥ १३॥ जन्मोनी अवघी तुमची पोसणी। नेणों तुम्हां वांचोनी कोणी दुजें॥ १४॥ कायावाचामनें तुमचीये पायीं। विनविते राजाई जीवलगा॥ १५॥

राजाईचा निश्चय.

१३२६. अंगोळिये विठा कडियेसी नारा। राजाई पंढरपुरा चालीयेली॥ १॥ भीवरा संपूर्ण जातसे भरली। राजाई बोलली कैसें झालें॥ २॥ एकली मी बाळें काय करूं आतां। आहा पंढरीनाथा काय केलें॥ ३॥ एक बांधिलें पाठीसी दुजें बांधिलें पोटासी। वेणुनादापार्शी वाहावत गेली॥ ४॥ हांबरडा हाणोनी बोभाय नामया। आवर्ती पड़ोनियां तळास गेली॥ ५॥ योगनिद्रा सारोनी देव जागा झाला। त्वरित पावला काढिलीं तिघें॥ ६॥ नारा विठा दोघे। कडियेसी घेतले। राजाईस धरिलें दक्षिण करीं॥ ७॥ आणिलीं महाद्वारां पुढें दे लेंकुरां। विठोबा सामोरा नामा आला॥ ८॥ बाबा बाबा म्हणोनी नारा धाविन्नला। नामा त्या बोलिला परते होईं॥ ९॥ देखोनी राजाईसी गहिंवरु पैं आला। अरे बा विठ्ठला काय केलें॥ १०॥ बाळेसहित विख घेईन मी आतां। पाहें पंढरिनाथा बुडवीन घर॥ ११॥ मेला सर्प होता तो ओटीये घेतला। खांडोनी घातला डेऱ्यामाजीं॥ १२॥ खालीं ज्वाळ घाली उकळी फुटली। पोटासीं धरिलीं दोघें बाळें॥ १३॥ देह विठोबासी समर्पण करूं। ऐसां पैं निर्धारू धरियेला॥ १४॥ रुक्मिणी म्हणे देवा अनर्थ मांडिला। नामा बाहेर गेला निश्चयेसी॥ १५॥ डेरा उघडोनी राजाई जंव पाहे। तोंडभरी भरलाहे अवघें सोनें॥ १६॥ राजाईनें धरिले नामयाचे चरण। कृपादृष्टि पाहणें आम्हांकडे॥ १७॥ विठ्ठल विठ्ठल ऐसें बोलियेला। निवांत राहिला घटका चारी॥ १८॥ कांपत कांपत महाद्वारां आला। तुझी माव विठ्ठला नकळे कांहीं॥ १९॥ अष्ट दिशा देवा वरुता आणि खालुता। तुजवीण सर्वथा भाव नाहीं॥ २०॥ तंव नामदेव निजला देखिला। अंतरीं उठिला विठ्ठल ध्वनी॥ २१॥ राजाई म्हणे प्रयत्न न चले तेथें आतां। प्रार्थूं पंढरिनाथा बहुतांपरी॥ २२॥ राजाईनें धरिले विठोबाचे पाय। कृपादृष्टि पाहें आम्हांकडे॥ २३॥

राजाईचे बंधु भेटण्यास आले असतां राजाईचा नामदेवाशीं झालेला संवाद.

१३२७. नामदेवा घरीं पाहुणे मेहुणे। आले दोघेजण पंढरीसी॥ १॥ राजाईनें बंधु देखुनी दृष्टीसी। उल्हास मानसीं थोर झाला॥ २॥ कडकडूनि भेटी लोभाची आवडी। टाकली घोंगडी बैसावया॥ ३॥ भ्रतार लागले विठोबाचे ध्यानीं। संसाराची मनीं आस्था नाहीं॥ ४॥ नाचतो निर्लज्ज होऊनि निःशंक। सांडिला लौकिक देहभाव॥ ५॥ ऐसें जंव सांगे राजाई बंधूसी। तंव आले घरासी नामदेव॥ ६॥ तयासी सोईरे अभ्युत्थान देती। न भेटे तयासी विष्णुदास॥ ७॥ देखुनि कांतेसी क्रोध आला फार। असोनि संसार नाहीं आम्हां॥ ८॥ अगडधूत येती घेऊनि टाळविणा। लागे त्यांचे चरणा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वेळोवेळां ॥ ९ ॥ जन्मामध्यें आले माझे सहोदर। न बोले उत्तर त्यांसी कांहीं ॥ १० ॥ भोंदू घरीं येती हरिनामें गर्जती। धुवूनि त्यांचें पिती पायावणी ॥ ११ ॥ माझे सखे बंधु घरा आले बाई। रामराम तोहि न घे त्यांचा ॥ १२ ॥ नामा म्हणे कांते राम हृदयांत। सांठवूनी तृप्त झालों आम्ही ॥ १३ ॥

१३२८. राजाई ते पुसे अहो नामयाला। करा जेवायाला कांहीं यांसी ॥ १ ॥ प्रातःकाळीं घरीं सारूनि भोजन। आले ते चालून माझे भेटी ॥ २ ॥ नामा म्हणे कांते दशमी एक भुक्ति। भोजन निश्चिती करूं नचे ॥ ३ ॥ उदईक हरिदिनीं उपवास जागरण। ऐकावें कीर्तन चार प्रहर ॥ ४ ॥ द्वादशी पारणें झालिया भोजन। ऐकोनी पाहुणे चिंतातूर ॥ ५ ॥ क्षुधातुर पोटीं निद्रा नलगे कांहीं। वर्षाएवढी पाही रात्र झाली ॥ ६ ॥

१३२९. ऐसी चिंताक्रांत मनीं दुःख धरिलें। म्हणे कां बापें दिधलें ऐशियासी ॥ १ ॥ खाया ना जेवाया लेया ना नेसाया। दैन्य भोगावया आलें जन्मा ॥ २ ॥ जयाची करी भक्ति त्याचेंचि करणें। घरोघरीं हिंडणें न चुके माझें ॥ ३ ॥ लाज सांडूनियां निलाजरा झाला। सूड पडसूड मारिला जोग ज्याणें ॥ ४ ॥ देवासुरीं वाहिली तेचि दैना आली। उचितें राहिलीं तैंहूनि ॥ ५ ॥ ऐसी भक्तकांता मनीं वाहे चिंता। काय झाला करितां पंढरीराव ॥ ६ ॥ वेष वाणियाचा सवें बैल द्रव्याचा। म्हणे नामा आमुचा केउतां गेला ॥ ७ ॥ बिदीं उभा राहिला घर पुसों लागला। म्हणे नामा राहिला कोणे ठायीं ॥ ८ ॥ सांगितलें बिराड तुळसीवन अपार। तेंचि जाणा घर नामयाचें ॥ ९ ॥ बाहेर तरी कोणी बैसलासे द्वारीं। बोलाविली नारी नामयाची ॥ १० ॥ अहो घ्याहो बाई हे ठेवावी गोणी। नामा ये तों परतोनि येईन मी ॥ ११ ॥ येरी म्हणे तुम्ही त्याचें काय जाणा। आपुली नाम खुणा सांगा तुम्ही ॥ १२ ॥ नामा पुसेल तरी केशवशेटी सांगावें। लागेल तितुकें वेंचावें हें द्रव्य ॥ १३ ॥ आणिक मज मागावें कांहीं न ठेवावें। माझें क्षेम सांगावें सखा म्हणोनि ॥ १४ ॥ इतुकें बोलुनि देव पाठमोरा झाला। सवेंचि घरा आला विष्णुदास ॥ १५ ॥ म्हणे कैंची गोणी टाकून गेला वाणी। परि आम्हीं कोणी ओळखूं ना ॥ १६ ॥ त्यानें नांव केशवशेटी म्हणितलें। तंव येरें जाणिलें माझा देव ॥ १७ ॥ कां गे धांवा केला देव माझा कष्टला। अपराध झाला तुजपाशीं ॥ १८ ॥ राजाई म्हणे आम्हां थोर लाभ झाला। बिडवई भेटला केशवशेटी ॥ १९ ॥

१३३०. वराईची गोणी कळली राजाईसी। नामा ब्राह्मणांसि बोलाविती ॥ १ ॥ इतक्यामध्यें होन मडकेभर काढियलें। गोणी ते शिविली होती तैसी ॥ २ ॥ द्विज मिळवूनि आला नामदेव। वांटियेलें सर्व द्रव्य त्यानें ॥ ३ ॥ नामा म्हणे द्रव्य ज्याचें त्या दिधलें। ऋण तें ठेविलें नाहीं कांहीं ॥ ४ ॥ राजाई ते होन राखावया गेली। हातां राख आली कोळशांची ॥ ५ ॥ कोळसे देखोनि खोंचियली मनीं। धन्य तुझी करणी पांडुरंगा ॥ ६ ॥ नामदेवा पुढें सांगे वर्तमान। चोरून म्यां होन ठेविले होते ॥ ७ ॥ पाहातां होनांचे झाले हो कोळसे। नामा पाहतां तें झालें सोनें ॥ ८ ॥ वांटिले ब्राह्मणां ते होन तयानें। फेडियेलें ऋण गोविंदाचें ॥ ९ ॥

१३३१. नामा म्हणे स्त्रिये तूंवां अनुचित केलें। कां माझ्या शिणविलें विठोबासी ॥ १ ॥ निंदेच्या उत्तरीं निषेधिलें मज। वाटली त्या लाज मायबापा ॥ २ ॥ मग तो माझा स्वामी झाला वेषधारी। तुजलागीं सुंदरी पुढारला ॥ ३ ॥ रत्नजडित मुगुट सत्वर फोडोनी। आलासे वेढोनी शुभ्र शेला ॥ ४ ॥ तेणें भारें त्याचा धगधगिला मस्तक। म्हणोनि मज शोक वाटतसे ॥ ५ ॥ कस्तुरी मळवट सुरेख पुसोनी। आलासे लावोनि विभूति भाळीं ॥ ६ ॥ रुद्राक्षाचे मणि लेवूनि कर्णपुटीं। कुंडलें गोमटीं लपविलीं ॥ ७ ॥ कौस्तुभ वैजयंती काढिली परती। बांधलेंसें प्रीति शिवलिंग ॥ ८ ॥ देखोनी रखुमाईस वाटलें उदास। हंसती उपहास केले त्याचे ॥ ९ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रमा शरणागतें आलिंगिली दोहीं तोहीं। कैसी गोणी तिहीं कवळिली॥ १०॥ सर्वांगीं साजिरी चंदनाची उटी। भ्रंशली गोमटी भ्रम झाला॥ ११॥ सोनसळापटा फेडोनि गोमटा। नेसला धुवटा बोटधारी॥ १२॥ इंद्रनील तनु रुळली असेल रजें। श्रीमुख रवितेजें कोमाईलें॥ १३॥ धन्य तुझे नयन देखिले श्रीचरण। परि जीवें निंबलोण नाहीं केलें॥ १४॥ द्रव्याचेनि लोभें भ्रांत झालें मन। हातींचें निधान हारपलें॥ १५॥ आतां आदिअंतीं पाहतां केवळ। मूळ आणि फळ दुःखरूप॥ १६॥ जाणोनि निवृत्ति धरली सज्जनीं। सांडिलें निर्वाणीं वमन ऐसें॥ १७॥ जाणसी तें करीं तूं आपुलें हित। म्यां ठेविलें चित्त त्याचे पायीं॥ १८॥ नामा म्हणे केशव न पाहे निर्वाण। माझा अभिमान आहे त्यासी॥ १९॥

१३३२. दोन्ही जोडुनी कर माथा ठेवी चरणीं। म्हणे परिसा विनवणी स्वामी माझी॥ १॥ मी तंव अज्ञान न कळे तुमचा महिमा। अपराध क्षमा करा माझा॥ २॥ अंतरींची खूण कांहीं सांगा मज। जें तुम्ही हृदयीं बीज धरूनि असां॥ ३॥ जेणें सुखें तुमचें चित्त निरंतर। आनंदें निर्भर सदा असां॥ ४॥ इच्छा तृष्णा देहीं मानवली कल्पना। सदा समाधाना इंद्रियांसी॥ ५॥ मायबापें मज दिधलें तुमच्या हातीं। जन्मोनि सांगाति लावियेलें॥ ६॥ देव द्विज गुरु साक्ष हे करूनी। स्वामीचे चरणीं जोडियले॥ ७॥ तुमची चित्तवृत्ति उदास देखोनी। पडिलें चिंतावनीं काय करूं॥ ८॥ मग तुमचा स्वामी कृपेचा कोंवळा। न धरत पातला अनाथबंधु॥ ९॥ मग त्या विश्वंभरें कृपेच्या सागरें। पुसिली आदरें तुमची गोष्टी॥ १०॥ तंव मी दुराचारें निर्भर्त्सिलें तुम्हां। ऐकोनि मेघश्यामा करुणा आली॥ ११॥ तंव तो जगज्जीवन बोले अमृतवाणी। लोटोनियां गोणी दारवंटा॥ १२॥ म्हणोनि हें द्रव्य तुम्हीं सर्वहि वेंचावें। आणिक मागावें लागेल तें॥ १३॥ सद्गदित कंठें सांगितलें तुम्हां। परि न कळे मज महिमा दैवहीना॥ १४॥ लोभाचा वोरसु कोणिये जन्मींचा। नकळे तुमचा ऋणानुबंधु॥ १५॥ पाहतां श्रीमुख निवालें माझें चित्त। मग हे मनोरथ विसरले॥ १६॥ क्षण एक आनंद झाला माझे जीवीं। उपमा कवणें द्यावी तया सुखा॥ १७॥ आतां ये संसारीं मीच धन्य जगीं। जें तुम्हां अर्धांगीं विनटले॥ १८॥ परी मला एक वेळ घाला विठोबाचे पायीं। विनविते राजाई नामदेवा॥ १९॥

नामदेव, राजाई व विठ्ठल यांचा संवाद.

१३३३. युक्तायुक्त ज्ञान वैराग्यसाधन। महातपोधन वरद योग्य॥ १॥ आनंदाचा ओघ भक्तीचा सोहळा। हरि वेळोवेळां जपत वाचे॥ २॥ नित्य हें पूजन करी नामदेव। विठ्ठलीं हा भाव ठेवूनियां॥ ३॥ नामयाची कांता क्रोधयुक्त बोले। भजन सोहळे तुम्हां गोड॥ ४॥ परी हा नावडे संसाराचा संग। अखंड पांडुरंग चिंतीतसां॥ ५॥ तुमची हे गति लेंकुरें नेणतीं। धान्य नाहीं नित्य भक्षावया॥ ६॥ ऐसा हा वेव्हार तुमचा जी स्वामी। आतां पुसेन मी पांडुरंगा॥ ७॥ माझिया संसारा घातलेंसें पाणी। नाचती रंगणीं विठ्ठलाच्या॥ ८॥ ऐसें देवा तुझें अघटित मत। म्हणोनि रडत देवापुढें॥ ९॥ देव म्हणे नाम्या अंगिकार इचा। करूनि देवाचा होईं सुखी॥ १०॥ नामा म्हणे देवा ऐका जी वचन। उबग कोण्या गुणें आला असे॥ ११॥ राहो हे पंढरी सुखें नांद देवा। मज नाहीं हेवा उणें कांहीं॥ १२॥ तुझिया कृपेचा अंकित मी होय। तुजवीण आहे मज कोण॥ १३॥ माझिया संसारा पाडियेलें पाणी। काय आहे वाणी गति कोण॥ १४॥ ऐसें असूनिया उबग केशवा। माझ्या आला दैवा कोण्या गुणें॥ १५॥ जन्मापासोनियां सेवेसीं लाविलें। निःसंतान केलें पांडुरंगा॥ १६॥ आतां मजलागीं लावियतां उद्वेगा। अगा पांडुरंगा मायबापा॥ १७॥ आतां मज म्हणसी संसार करावा। काय मी केशवा करूं आतां॥ १८॥ देवा ऐसी युक्ति उगा राहे आतां। समर्था केशिनाथा देवराया॥ १९॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मागूनि अंतरीं विचार पैं केला। चित्तीं पैं सांचला क्रोध फार॥ २०॥ म्हणोनियां आतां विठो सुखें राहें। मुख तुज पाहें दाखवीना॥ २१॥ देवाचे चरण पहावयासाठीं। संसाराची तुटी करावया॥ २२॥ ऐसें मी करीन जाण विठोराया। पंढरीचे ठायां मोडवीन॥ २३॥ राहें नामीं आतां जाईन दूर दशा। भक्तीची हे आशा सोडोनियां॥ २४॥ जाईल भिंवरा जाईल पुंडलिक। जाईल सकळीक महिमा तुझी॥ २५॥ ऐसें बा विठ्ठल त्वां दुखाविलें मज। सोडीना सहज पंढरीतें॥ २६॥ उदास हें चित्त माझें झालें देवा। जाईन केशवा मायबापा॥ २७॥ आतां असों द्यावा लोभ हाचि देवा। समर्था केशवा मायबापा॥ २८॥ आपुल्या सांगातें नेईन पंढरी। नेईन संतनगरीं भिंवराजना॥ २९॥ नेईन सांगातें महिमा येथींची। मागें हेत हाचि धरुनी राहे॥ ३०॥ चक्रतीर्थ आणि पद्माळें हें जाण। सर्वही करीन आपणापासी॥ ३१॥ आपणचि तीर्थ आपणचि व्रत। आपण दीनानाथ होईल मी॥ ३२॥ येथे हे पंढरी होती ऐसे लोक। म्हणतील देख पुढें देवा॥ ३३॥ बोलोनिया ऐसें पुढें चाले नामा। मग आला प्रेमा पांडुरंगा॥ ३४॥ पळतां पळतां नाटोपे जाणा। मागें देवराणा धांवतसे॥ ३५॥ धांवतां धांवतां भागला केशव। उभा राहे तंव हात कटीं॥ ३६॥ जें कां पंढरपूर वस्तीचें असणें। धरिला नामा तेणें पांडुरंगें॥ ३७॥ तंव तो पळत लोळणी घातली। त्या क्षणीं न बोले देवाशीं जो॥ ३८॥ देव म्हणे नाम्या पाहें परतोन। तुज मी शरण आलों असें॥ ३९॥ न करीं उदास चाल तूं पंढरीं। ऐसे बोले हरि नामयासी॥ ४०॥ तंव म्हणे नामा ऐसें मी करीन। पंढरी नेईन भिंवरेसहित॥ ४१॥ मोडीन महिमा तीर्थींचा केशवा। कळे तुज तेव्हां भक्त ऐसा॥ ४२॥ मग म्हणे विठ्ठल पुंडलिकासाठीं। चाल उठाउठीं पंढरीसी॥ ४३॥ पितृभक्त पाहीं तोचि पुंडलिक। ऐसा भाव देख जाणीवेचा॥ ४४॥ मग धरूनि मनगटीं चालविला नामा। मोठा आला प्रेमा विठोबासी॥ ४५॥ ऐसें हें आख्यान सारूनियां देवें। मग आले भावें पंढरीसी॥ ४६॥

श्रीनामदेव व श्रीज्ञानदेवादि संतांची भेट

अर्थात्

नामदेवाचा-भक्तिगर्व-परिहार.

१३३४. उठले निवृत्ति संतांच्या दर्शना। पंढरीच्या प्रेमा घरा आला॥ १॥ केली प्रदक्षिणा वंदिले चरण। झाला अभिमान नामयासी॥ २॥ देवाचे जवळी आम्ही निरंतर। यांसी अधिकार नमस्कारा॥ ३॥ नित्य समागम हरीच्या चरणीं। हे आणि आम्ही देवभक्त॥ ४॥ नामा म्हणे काय वंदूं यांचे चरण। अंगें परब्रह्म मजपाशीं॥ ५॥

१३३५. उठले ज्ञानेश्वर केलें तें वंदन। मस्तकीं चरण नमस्कारिले॥ १॥ नामा म्हणे आम्हां वडिल अधिकारू। यासाठीं नमस्कारू योग्य आहे॥ २॥ आम्ही देवापाशीं असतों सर्वकाळ। येउनी सकळ वंदिताती॥ ३॥ वैष्णवांचे भार देव सुरगण। येताती शरण पंढरीशीं॥ ४॥ नामा म्हणे आतां पाहिली मंडळी। यासाठीं वनमाळी स्फुंदूं लागे॥ ५॥

१३३६. आला तो सोपान वंदियेलें त्या पायीं। पांडुरंगा ठायीं मानियेला॥ १॥ रंजल्या-गांजल्यांचा घेतला समाचार। संतमाय थोर अनाथांची॥ २॥ आमचीं मायबापें भेटलींत आज। समाधान सहज आलिंगितां॥ ३॥ नामा म्हणे मज कळलें याचें प्रेम। देवें केले श्रम काय गुणें॥ ४॥

१३३७. अखंड जयाला देवाचा शेजार। कां रे अहंकार नाहीं गेला॥ १॥ मान अपमान वाढविसी हेवा। दिवस असतां दिवा हातीं घेसी॥ २॥ परब्रह्मा-संगें नित्य तुझा खेळ। आंधळ्या डोळे डोहळे कां बा झाले॥ ३॥ कल्पतरूतळवटीं इच्छिली ते गोष्टी। अद्यापि नरोटी राहिली कां॥ ४॥ घरीं कामधेनू ताक मागूं जाय। ऐसा द्वाड आहे जगामाजीं॥ ५॥ म्हणे मुक्ताबाई जाईं ना दर्शना। आधीं अभिमाना दूर करा॥ ६॥

१३३८. निवृत्ति ज्ञानदेव सोपान मुक्ताई।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizaction by eGangotri

म्हणती ज्ञान कायी कथूनियां॥ १॥ भक्तिचीया बळें देव पैं जिंकिला। ऋणाईत केला कैसा येणें॥ २॥ धन्य ते भाविक नामा आणि कबीर। रोहिदास चांभार बहिरा पिसा॥ ३॥ त्यांची पायधुळी वंदिता कपाळीं। वंशहि समुळीं उद्धरती॥ ४॥ नामा म्हणे मुक्ताबाई ऐका स्पष्ट। भक्तिहूनि श्रेष्ठ आणिक नाहीं॥ ५॥

१३३९. झालासी हरिभक्त तरी आम्हां काय। आंतली ती सोय न ठाऊकी॥ १॥ घेऊनी टाळ दिंडी हरिकथा करिसी। हरिदास म्हणविसी श्रेष्ठपणें॥ २॥ गुरुविण तुज नव्हेचि गा मोक्ष। होशील मुमुक्षु साधक तूं॥ ३॥ आत्मतत्त्वीं दृष्टी नाहींच पां केली। तंववरी ब्रह्मबोली बोलुनी काय॥ ४॥ तुझे रूप तूंवां नाहीं ओळखिलें। अहंतेतें धरिलें कासयासी॥ ५॥ आमुचें तूं मूळ जरी पुसतोसी। तुझें तूं आपैसी पाहुनी घेईं॥ ६॥ ऐक रे नामया होईं आत्मनिष्ठ। तरीच तूं श्रेष्ठ ज्ञानी म्हणे॥ ७॥

१३४०. बोलोनियां येणें वाढविला डांगोरा अंतरींचा कोरा गुरुवीण॥ १॥ संतांचा सन्मान कळेना जयासी। राहुनी देवापाशीं काय केलें॥ २॥ परिसा झांकण घातलें खापर। नाहीं झालें अंतर बावनकस॥ ३॥ खदिरांगारीं श्रृंगारी हिलाल। अंतरींचें काळें गेलें नाहीं॥ ४॥ म्हणे मुक्ताबाई अभिमानानें नेलें। सर्पा पाजियेलें विष तेंचि॥ ५॥

१३४१. अमृत टाकून कांजीची आवडी। साजेना झोंपडी काय त्याला॥ १॥ खरासी अखंड गंगेचें स्नान। गेलें वायांवीण जिणें त्याचें॥ २॥ पोंवळ्याहून अधिक दिसती रानगुंजा। श्रृंगाराच्या काजा विटंबिल्या॥ ३॥ अगारापरिस चोखट इंद्रावन। चवी कडुपण हीन त्यांचें॥ ४॥ रंगाची बाहुली दिसती साजिरी। बेगडाचे वरी नग ल्याली॥ ५॥ म्हणे मुक्ताबाई पुरे तें दर्शन। गुरुवीण संतपण आहे कोठें॥ ६॥

१३४२. उसाचे शेजारीं येरंडाचीं झाडें। नाहीं त्या चिपाडें गोडी आली॥ १॥ कर्पुरासी झाला दीपाचा शेजार। काय गुणें हीर राहिल त्याचा॥ २॥ सागरीं लवण टाकिलें नेऊन। काय गुण खडेपण उरलें त्याचें॥ ३॥ तैसा नामदेव विठोबाच्या जागां। काय गुणें या गा कोरेंपण॥ ४॥ म्हणे मुक्ताबाई चंदनाचें झाड। अहंता सर्प वेडे गुंडाळिले॥ ५॥

१३४३. संत पाहुणेरा सज्जनाचे घरीं। पूजा करितां वरी डोई काढी॥ १॥ करितां सन्मान अंगीं भरे ताठा। देवा पैं करंटा असुनी काय॥ २॥ अहंता हा खुंट वाढविला चित्तीं। न साहे संगती सज्जनाची॥ ३॥ पंढरीचें भूषण सांगतों जनांसी। नाहीं या मनासी तीळ बोध॥ ४॥ म्हणे मुक्ताबाई चांगदेवा वाणी। भजावा सज्जनीं नामदेव॥ ५॥

१३४४. चौदाशें वरुषें शरीर केलें जतन। बोधाविण शीण वाढविला॥ १॥ नाहीं गुरुमंत्र नाहीं उपदेश। परमार्थासी दोष लावियेला॥ २॥ स्वहिताचें कारण पडियेलें जेव्हां। शरण आला तेव्हां अलंकापुरीं॥ ३॥ गैनीनाथें गुज दिलें निवृत्तीला। निवृत्तीचा झाला ज्ञानदेव॥ ४॥ ज्ञानदेवीं बीज वाढलेंसें जनीं। तेंचि आम्हीं तुम्हीं संपादिलें॥ ५॥ म्हणे मुक्ताबाई तिहीं लोकीं ठसा। नामदेव ऐसा राहिला कां॥ ६॥

१३४५. निवृत्तिदेव म्हणें ऐसें म्हणों नये। धन्य भाग्यें पाहें संत आले॥ १॥ आपुलें स्वहित करावें आपण। संतांच्या सन्माना चुकों नये॥ २॥ धन्य हो ते नर राहती पंढरी। श्वान त्यांचे घरीं सुखें व्हावें॥ ३॥ या नामदेवासंगें देवाचा ओढा। प्रेमें केला वेडा पांडुरंग॥ ४॥ निवृत्तिदेव म्हणे त्यासी अरे तुरे। पायीं ठेवितां बरें डोई मांते॥ ५॥ म्हणे मुक्ताबाई घाला लोटांगण। आपणा दर्शन नलगे त्याचें॥ ६॥

१३४६. कुलालाचे कुंभ भाजल्याविण माती। काय साहे संगती पाणियाची॥१॥ मेणाची पुतळी घेतां करीं बरी। अग्नीचे शेजारीं राहे कैशी॥ २॥ तैसा अधिरासी काय संतसंग। मृगजळा तरंग

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येतील कैसे॥ ३ ॥ तें आजि नवल देखिलें डोळां। दगड जैसा जळां वेगळेपण॥ ४॥ म्हणे मुक्ताबाई जाऊं देऊं नये। ऐसें सरिसें काय भांडें करा॥ ५॥

१३४७. कुलाल आपुल्या घरीं भाजवी भाचरी। म्हणे जैं होईल हरि कृपावंत॥ १ ॥ हरीसी वरदळ लावितो निशिदिनीं। धाडिला म्हणोनि तुम्हांपाशीं॥ २ ॥ तुम्ही संतजन उद्धराल तत्काळ। नामा लडिवाळ विठोबाचा॥ ३ ॥ राखावें तें ब्रीद करावें पावन। धाडा बोलावणें गोरोबाला॥ ४॥ म्हणे मुक्ताबाई भाजलें कीं कोरें। काकाचें उत्तर सत्य मानूं॥ ५॥

१३४८. गोरा जुनाट पैं जुनें। हातीं थापटणें अनुभवाचें॥ १ ॥ परब्रह्म म्हातारा निवाला अंतरीं। वैराग्याचे वरी पाल्हाळला॥ २ ॥ सोहं शब्दें विरक्ती उरली अंबरीं। पाती अणुभरी पाहिलें पण॥ ३ ॥ म्हणे मुक्ताबाई घालूं द्या लोटांगण। जाऊं द्या शरण अव्यक्तासी॥ ४॥

१३४९. मोतियांचा चुरा फेंकिला अंबरीं। विजूचिया परी कीळ झालें॥ १ ॥ जरी पितांबरें नेसविलीं नभा। चैतन्याचा गाभा नीळबिंदू॥ २ ॥ तळीपरी परसे शून्याकार झालें। सर्पाचींहि पिलें नाचूं लागे॥ ३ ॥ कडकडोनी वीज निमाली ठायींचे ठायीं। भेटली मुक्ताबाई गोरोबाला॥ ४॥ ज्ञानदेव म्हणे कैसी झाली भेट। ओळखिलें अविट आपुलेंपण॥ ५॥

१३५०. निवृत्तिदेव म्हणे चला गुंफेमधीं। अचळ हे आदि समाधी असे॥ १ ॥ सद्गुरुप्रसादें बांधिली नेटकी। गुहे गौप्य ताटी आड केली॥ २ ॥ दंड चक्राकार बांधिली चहूंकून। आंत संतजन करिती वास॥ ३ ॥ ऐसे गुंफेमध्यें नाहीं नामदेव। म्हणूनि माझा जीव थोडा होतो॥ ४॥ गैनीची मिरास घेतली प्रमाण। पूर्वभूमी जतन करित आस॥ ५ ॥ निवृत्तिदेव म्हणे मुक्ताईच्या उत्तरें। भाजलें कीं कोरें कळों नेदी॥ ६ ॥

१३५१. परस्परें गुह्य करिती भाषण। म्हणती महाधन गांवा आला॥ १ ॥ रक्त श्वेत पीत नीळ वर्णाकार। नक्षत्राची वर पूजा केली॥ २ ॥ प्रकाशमय तत्त्व ज्योतिर्मय पहाणें। दीप त्रिभुवनीं एक झाला॥ ३ ॥ निवृत्तिदेव म्हणे कुलालाचें चक्र। अंतर बाहेर एक ऐसें झालें॥ ४॥

१३५२. हांसोनी सोपानें खुणाविल्या खुणा। नामदेव पाहुणा आला असे॥ १ ॥ तयासी हो पाक पाहिजे पवित्र। भाजलें कीं कोरें कळों नेदी॥ २ ॥ मुक्तिकेचे पारखी तुम्ही आहां देवा। भाजुनी जीवा शिवा ब्रह्म करा॥ ३ ॥ आनंदानें डुल्लती मारिती करावरी कर। नेणों राहिलें कोरें कोण्या गुणें॥ ४॥ निर्गुणा पासोनी सगुणाची संगती। नाहीं स्वरूपस्थिति अंगा आली॥ ५ ॥ म्हणे मुक्ताबाई हेरोनियां हेरा। हिरा किंवा गारा नेणों बापा॥ ६ ॥

१३५३. जव्हारियाचे पुढें मांडियेलें रत्न। आतां मोला उणें येईल कैसें॥ १ ॥ तैसें थापटणें पारखियाचा हात। वाफ झाल्या घात वांयां जाती॥ २ ॥ प्रथम थापटणें हाणिलें निवृत्तीच्या माथा। डेरा झाला निका परब्रह्म॥ ३ ॥ तेंचि थापटणें ज्ञानेश्वरावर। आतां कैंचें कोरें उरे येथें॥ ४॥ तेंचि थापटणें सोपानाचे डोईं। यांत लेश नाहीं कोरें कोठें॥ ५ ॥ तेंचि थापटणें मुक्ताबाईला हाणी। अमृत संजीवनी उतों आली॥ ६ ॥ तेंचि थापटणें नामदेवावर। डोई चोळूं मोहरे रडों लागे॥ ७ ॥ गोरा म्हणे कोरा राहिला गे बाई। शून्यभर नाहीं भाजिलें कोठें॥ ८ ॥

१३५४. संतसमागम फळला रे बा मला। सन्मानाचा झाला लाभ मोठा॥ १ ॥ अतिथि आदर केला मुक्ताबाई। लांकडानें डोई फोडिली माझी॥ २ ॥ देवानें गोंधळ घातला गरुडपारीं। भिजली पितांबरी अश्रुपातीं॥ ३ ॥ माझें माझें म्हणोनी गाईलें गाऱ्हाणें। कळलें संतपण हेंचि तुमचें॥ ४॥ भरी भरोनियां आलों तुमचे जवळीं। कैकाड मंडळी ठावी नोव्हे॥ ५॥ नामा म्हणे सन्मान पावलों भरून। करितां आगमन भलें दिसे॥ ६ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitization by eGangotri

१३५५. उद्विग्न मनीं करी दीर्घ ध्वनी। नाहीं माझे कोणी सखे ऐसे॥ १॥ वैराग्य कसोटी सोसवेना घाव। पळावया पाव मागें काढी॥ २॥ झाले चाळाचूळ मनांत चंचळ। युगा ऐसें पळ वाटतसे॥ ३॥ नामा म्हणे जावें पळोनियां आतां। संतसंग होतां भाजितील॥ ४॥ म्हणे मुक्ताबाई चैतन्याचा केर। ब्रह्म अग्नीवर चेतवावा॥ ५॥

१३५६. अंतर बाहेर भाजूं आम्ही कुंभ। भरूं निरालंब सगळेची॥ १॥ अहं सोहं दोन्ही ऊर्ध्व लावूं फुंकणी। नवद्वारें फुंकोनी जाळ करूं॥ २॥ जीवित्व काढूनि शिव घडूं अंगा। प्रिय पांडुरंगा आवडेल॥ ३॥ म्हणे मुक्ताबाई पळायाचा पाही। आसन स्थिर नाहीं नामयाचें॥ ४॥

१३५७. न पुसतां संतां निघाला तेथुनी। पैलपार इंद्रायणी प्राप्त झाला॥ १॥ मागें पुढें पाहे पळतो तांतडी। आला उडाउडी पंढरीसी॥ २॥ कवळोनी कंठीं विठ्ठल हे मूर्ती। नको देऊं होतीं निवृत्तीच्या॥ ३॥ ज्ञानदेव सोपान पाठविले कोरे। जुनाट म्हातारा जाळूं आला॥ ४॥ मुक्ताबाईनें तेथें माजविली कळी। हे संतमंडळी कपटी तुझी॥ ५॥ नामा म्हणे देवा आणिलें पूर्व दैवें। गेलों असतों जीवें सगळाची॥ ६॥

१३५८. पूर्वी केली सेवा उपयोगा आली देवा। दिलें असतें जीवा आहुतीलागीं॥ १॥ अनंत जन्मींचें कळलें अनुष्ठान। पाहिले चरण विठोबाचे॥ २॥ न जाणों माझ्या येतील पठोपाठीं। घालतील मिठी भिडें तुला॥ ३॥ त्यासी द्याल तुम्ही अगत्य उदारा। मज कां न मारा आपुले हातें॥ ४॥ नामा म्हणे तुझे न सोडी चरण। युगायुगी धरणें घेतलें असे॥ ५॥

१३५९. हातांत नरोटी जीर्णाचे ते भार। म्हणती सौदागार संत माझे॥ १॥ परळ भोपळ्याची गृहामाजीं संपत्ति। तुम्ही कां श्रीपति भूषण सांगा॥ २॥ भणंगाचे घरां नित्यची राजपट। सांगसी अचाट ब्रीद त्यांचें॥ ३॥ कैकाड्याचेवाणी करिती गुडगुड। मजला हें गूढ उमजेना॥ ४॥ नामा म्हणे गाती प्रकाशाचें गाणें। आम्हां अघोरवाणें दिसतसे॥ ५॥

१३६०. म्हणती घेतल्या आम्हीं धान्य कोडी। खर्चायाला कवडी थार नसे॥ १॥ हांसती रडती उडती एकमेकांवर। आनंदाला पार नाहीं म्हणती॥ २॥ काय गुणें देव रिझाला त्यावरी। नेसाया फटकुरी जन्म गेला॥ ३॥ पाहोन दरिद्र झालों कासावीस। केवळ परीस पांढऱ्याचा॥ ४॥ लहानशी मुक्ताई जैसी सनकाडी। केले देशोधडी महान संत॥ ५॥ सनळेंची काखेसी घेई ब्रह्मांड। नामा म्हणे पाखांड दिसतें मज॥ ६॥

१३६१. पांचा सातांचा एकाजागीं मेळ। केवळ चांडाळ दुर्बुद्धि ते॥ १॥ जातांनाच माझी केली विटंबना। म्हणोनि नारायणा मागें आलों॥ २॥ पाहिला तयाचा मानस आदर। जमा केला केर जाळावया॥ ३॥ त्यांच्या धाकें मागें आलों रे अनंता। येत तुझ्या चित्ता बरें त्यांचें॥ ४॥ नामा म्हणे जीवें आलों वांचवोनी। अझुनी तरी चक्रपाणि वांचवीं मज॥ ५॥

१३६२. आहे त्यांचे मनीं करावें आगमन। घेतील मागून तुजपाशीं॥ १॥ तयेवेळीं व्हाल तुम्ही बेइमान। तुम्ही द्याल काढून संतांपाशीं॥ २॥ खादल्या पिदल्याचें राखें बा स्मरण। तुला माझी आण पांडुरंगा॥ ३॥ चालविला लळा पुरविली आवड। आतां कां दगड जड झालों॥ ४॥ कां माझी चिंता सांडिली अनंता। संतांलागीं देतां हरुष वाटे॥ ५॥ नामा म्हणे काय करिसी अमंगळ। अडचणी राउळामाजीं झाली॥ ६॥

१३६३. वटारोनी डोळे पाहती आभास। मज त्याचा भास कळों नेदी॥ १॥ भाजा भाजा म्हणोनी उठली एकसरां। मग म्यां बाहेरां गमन केलें॥ २॥ आतां आजवरी द्याल त्यांचे हातीं। होऊं पाहाती माती जीवित्वाची॥ ३॥ अभयाचें दान द्यावें बा श्रीहरी। दुर्बळ बाहेरी घालूं नये॥ ४॥ समर्था लांच्छन लागतें नांवाचें। न जाणों

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देवाचें असेल कांहीं॥ ५॥ नामा म्हणे नांव पतीतपावन। ते या बोला उणें आणूं नये॥ ६॥

१३६४. संतांसी विन्मुख झाला जो गव्हार। नाहीं आतां थार इहपरलोकीं॥ १॥ नाहीं घेतला वेड्या संतांचा अंगवळा। झोंप बैसली डोळां अज्ञानाची॥ २॥ भ्रांतीनें तुझी पुरविली पाठी। सज्जनांच्या गोष्टी कडू झाल्या॥ ३॥ हाता आला लाभ गमाविला सारा। भुललासी गव्हारा भ्रमभूली॥ ४॥ मोह सर्पें तुझें व्यापियेलें अंग। म्हणे पांडुरंग काय आंतां॥ ५॥

गुरु करण्याविषयीं श्रीविठ्ठलांचा नामदेवास उपदेश.

१३६५. श्रीविठ्ठलें आपुल्या मुखवचनें। नामदेवासी करी आज्ञापन। होवोनी दीनाचे अति दीन। सद्‌गुरुसीं शरण रिघावें॥ १॥ जोडल्या सद्‌गुरु कृपालेश। मग सर्वत्र माझाची प्रकाश। तुज मज भेदाचा भास। तो निरसोन जाईल॥ २॥ नामा म्हणे तुजसी। पावावया सेविजे सद्‌गुरूसी। तो तूं रोकडा जोडिलासी। आतां सद्‌गुरूसी काय काम॥ ३॥ फळ तरूवर शिखरीं। म्हणोनी आरोहण कीजे त्यावरी। तें फळ अवचितां जोडिलें करीं। मग तयावरी कासया चढावें॥ ४॥ मग श्रीहरी म्हणे अज्ञान। सांडून सेविजे सद्‌गुरुचरण। तुझ्या प्रेमें माया सोंग धरून। लटिका तुजपाशीं मी खेळें॥ ५॥ जंव सद्‌गुरूचें नाहीं सेवन। तंव मी जैसें स्वप्नींचें धन। माझें न तुटे भवबंधन। सद्‌गुरू आज्ञेवांचूनी॥ ६॥ तेणें नामा सद्गदित झाला। विठोबाच्या चरणीं लागला। कोण गुरु पाहिजे केला। तें सांगिजे स्वामिया॥ ७॥ मग श्रीविठ्ठल म्हणे ऐक आतां। सांगेन सद्‌गुरूची गुणवार्ता। त्वां पाहोनी तत्त्वता। शरण तात्काळ रिघावें॥ ८॥ भक्तीचें नेणें लक्षण। कृपामंद दयाहीन। इतरांचे अवगुण। अखंड मुखीं जल्पती॥ ९॥ मी एक जाणता सर्वांठायीं। सर्व शिकविलें म्यांचि पाही। ऐसें बोलती जन प्रवाहीं। महंतीं लागी॥ १०॥ देखिलिया सज्जन। त्यासी करी सन्मान। सभा देखोनियां छळण। करी करवी तयाचें॥ ११॥ लांडें लटिकें गद्य पद्य। पुसोनी होती श्लाघ्या नेणे तरी हांसोनि निंद्य। बोलती ह्या गुरूसी॥ १२॥ तो जरी सांगे खरें। त्यासी बोलती बरें बरें। सभाजनांसी नेत्रद्वारें। अशुद्धता दाविती॥ १३॥ आपण न सांगती आपुलें गुज। पुढल्यासी म्हणती नकळे तुज। ऐसें संदेह करणीचें भोज। वाटे तया॥ १४॥ शिष्य करितां उल्हासती। शिष्य होईं म्हणोनी उपदेशिती। नानापरी बोधिती सेवेलागीं॥ १५॥ शिष्य करिती बहुवस। त्यांच्या सेवेची करिती आस। जो न भजे त्यास। शिव्या शाप देताती॥ १६॥ तंत्र मंत्र उपदेशिती। ध्यान आसनीं गोविती। देवा ब्राह्मणा न भजती। आचारभ्रष्ट जो॥ १७॥ धातु विद्येची धरिती गोडी। जारण मारणाची अति आवडी। विषयवासनेची हुंडी। अखंड जीवीं॥ १८॥ ज्ञान गर्वाचा महिमा बरवा। श्रीगुरु ऐशा अखंड भावा। शिष्यसमुदाय देखोनी गर्वा। थोरीवेचा मानिती॥ १९॥ असो बहु ऐसें कथन। परी सद्‌गुरु कृपाघन। त्याचें ऐक महिमान। सावध चित्तें॥ २०॥ ज्यासी गुरुत्वाचें काज। शिष्य भजतां वाटे लाज। उदास वृत्ति सहज। निर्मळ भोळा॥ २१॥ निंदा स्तुति समान। बोलती भेदिती कठीण वचन। कधीं न होती क्रोधायमान कवणाहीवरी॥ २२॥ जे नेणती खरें खोटें। समान वाटे सान मोठें। सुखदुःखांचे चेपटे। न शिवती कदाकाळीं॥ २३॥ शिष्य करितां आळस चित्तीं। केलिया सर्वस्व निरोपिती। कांहीं थोरीव नाहींच चित्तीं। महत्त्वाची॥ २४॥ सज्जन देखोनी आनंदती। त्याचे गुणागुण न विचारिती। जीवेंभावें इच्छिती। साधुसंग॥ २५॥ आपुला कष्टवूनी देहो। ज्ञान तर्काचा कलहो। साधुसेवेचा मनीं लाहो। करी सदा॥ २६॥ जें आंत बाहेरी भरोनी उरलें। अंतरीं निवोन विरालें। परब्रह्मीं सहजाविलें। नेणों काय॥ २७॥ ऐसें साधूचें महिमान। साधतां कैंचें उरेल मन। कल्पा अवघीं करितां कथन। नव्हे पूर्ण

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पूर्ण पूर्णता॥ २८॥ ऐसा साधु भेटेल तुज। तरी मीच होवोनी पावसी मज। जाईल सर्व संदेह आज। आपेंआप नाम्या॥ २९॥ मग नामदेव म्हणे देवा। ऐसा साधु भेटेल जेव्हां। तरी कैशापरी सेवावा। कृपानिधी तो॥ ३०॥ मग बोलिले श्रीरंग। दैवत बुद्धीचा होईल त्याग। तन मन धन अर्पोन चांग। शुद्ध सेवा करावी॥ ३१॥ तर्क बितर्क बाह्य मुद्रा। तेथें न चले गा भक्त नरेंद्रा। तारीं तारीं या भवसमुद्रा। म्हणोनी शरण रिघावें॥ ३२॥ ते अंतर्बाह्य व्यापक। जाणती सर्व लीलाकवतुक। जैसे त्यासी देखती देख। तैसे तयासी आज्ञापिती॥ ३३॥ भाग्यें जरी जोडती त्याचे चरण। तरी वर्तणूक आहे कठीण। ते तुज सांगतों गुप्त खूण। सावधान ऐक पां॥ ३४॥ शरीर वेंचिलें तरी वेंचिजे। परी सद्गुरुवचन नुल्लंघिजे। रात्रंदिवस राहिजे। आज्ञा संकेतीं॥ ३५॥ ज्यावरी गुरूची प्रीती। त्याची अनन्यभावें कीजे भक्ती। आज्ञेवांचोनी कल्पांतीं। विरोध कोणासी न करावा॥ ३६॥ कां जरी तो सर्वांतरी आहे। विरोध कोणाचा न साहे। विशेष सद्गुरु जरी होये। तरी खेद न कीजे॥ ३७॥ अरे विरोधभाव असतां। तें चढे सद्गुरूच्या माथा। जैसा घटभंग होतां। अमृत सांडे॥ ३८॥ ज्यासी सद्गुरूची कृपा असे। त्यासी मानावें आम्हां ऐसें। सर्वस्व जातां मानसे। न करीजे अंतर॥ ३९॥ देखे त्याचे हृदयांतरी। सद्गुरु वसे निरंतरीं। त्यासी खेद होतां भारी। अंतरे सद्गुरु॥ ४०॥ क्रोध हृदयीं भरला। तो आत्मस्थितीसी अंतरला। तोच गुरूचा घात केला। शिष्याहातीं॥ ४१॥ गुरुशिष्य तोची निजबंधु। त्यासी स्वप्नीं न कीजे विरोधु। करितां घडे गुरुवधु। शास्त्रवाक्य॥ ४२॥ तरी गा कार्याकारणें। बोलिजे तेंची घडावें वर्तणें। एक होतां कोपायमाने। एक समाधान त्यास द्यावें॥ ४३॥ जो आपुल्या गुरूची स्तुति करी। त्याचे चरण वंदावे शिरीं। निंदा बोलतीये अवसरीं। निघीजे तेथोनी॥ ४४॥ गुरुसमीप न बैसीजे। गुरूसी वचन न बोलिजे। आज्ञा मागोनी वंदिजे। कार्याकारणें॥ ४५॥ जे देशीं आहे सद्गुरु। तिकडे कीजे नमस्कारू। चंद्राकारणें चकोरू। तैसा भेटी इच्छिजे॥ ४६॥ गुरूसी अर्पिजे तन मन। गुरूसी अर्पिजे वित्त धन। गुरूसी अर्पिजे चैतन्य। आनंदरूप॥ ४७॥ गुरूचे दोष गुण। मनें न कीजे उच्चारण। जें जें गुरूचें आज्ञापन। मेरू ऐसें मानिजे॥ ४८॥ सज्जनाची संगति धरिजे। गुरुरूप विश्व मानिजे। चित्तानुसार अर्पिजे। साधुजनांसी॥ ४९॥ ज्यासी सद्गुरू कोपला। तो साधु असतां खर बागला। ईश्वर जरी साह्य झाला। तरी काढों न शके॥ ५०॥ सद्गुरु आधीन सकळ देव। गुरु आधीन पितर मानव। सद्गुरु पूजितां सर्व। आनंदातें पावती॥ ५१॥ ऐसें सद्गुरूचें महिमान। म्हणोनि ब्रह्म त्या आधीन। तो जरी पतितासी देईल मान। तरी ब्रह्म पूर्ण तो होय॥ ५२॥ ऐसें जेणें आचरावें। तरी सद्गुरूसी शरण जावें। नाहीं तरी करावें नामस्मरण माझें पैं॥ ५३॥ तेणेंकरून कांहीं एक। निवारूं शकेल जन्मदुःख। कोणें एक जन्मीं सद्गुरु देख। भक्ति करोनी पाविजे॥ ५४॥ चढाओढी गुरु करिती। मग सुबुद्धिही टाकिती। त्यासी यमघरीं प्राप्ति रवरवाची॥ ५५॥ सद्गुरुसेवा तें मोक्षपद। सद्गुरुसेवा तें आनंदपद। सद्गुरुसेवा तो ब्रह्मावबोध। कैवल्यप्राप्ती॥ ५६॥ असो ऐसिया परी। जो सद्गुरुवाक्य वाहे शिरीं। तोची ब्रह्मविद्येचा अधिकारी। हरिहरां वंद्य तो॥ ५७॥ ऐसें नामदेवाप्रती श्रीहरी। स्नेह साक्षेपें निरूपण करी। ऐकोनियां चरणांवरी। सद्गदित होउनी लोटला॥ ५८॥ देवा तूं होवोनी माझी दिवटी। गुरुनिधान दाखवीं दृष्टी। जेणें करूनी भवबंध गांठी। सुटेल सर्वथा॥ ५९॥ मग कळवळोनी श्रीहरी। नामदेवातें पोटासीं धरी। जाय पावशील झडकरी। हस्त विसा खेचराचा॥ ६०॥ तेणें नाम्यासी समाधान। देवही झाला सुखसंपन्न। नामा पावोनी ब्रह्मज्ञान। मिळशील माझ्या स्वरूपीं॥ ६१॥ ऐसें हें देवभक्त निरूपण। प्रथम शिष्यासी करी श्रवण।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मग दीजे पूर्णपण। म्हणे नामा॥ ६२॥

१३६६. देव आणि नामा उभे भीमातीरा। प्रेमें येरयेरां आळविती॥ १॥ देव म्हणे नाम्या ऐकें गुह्य गोष्टी। संसाराची तुटी जेणें होय॥ २॥ श्रीगुरुवांचुनी मुक्ति तुज नाहीं। भवनदी डोहीं नुतरसी॥ ३॥ शरण गुरूसी झालिया सप्रेमें। संसाराचा श्रम उतरूनी॥ ४॥ गुरुवांचूनियां कैंचा मुक्तिठाव। संसार हा वाव कैसा होय॥ ५॥ म्हणूनि नाम्या तुवां गुरूसि जावें शरण। तेणें भवबंधनें मुक्त होती॥ ६॥ ऐसें ऐकूनियां नामा थरारिला। मूर्च्छागत झाला भूमीवरी॥ ७॥ भूमी लोळे नामा कंठ सद्गदित। डोळियां स्त्रवत अश्रुजळ॥ ८॥ इतुकें देखोनियां द्रवला पुरुषोत्तम। नाम्यासि सप्रेमें उचलिलें॥ ९॥ नाम्या तुज काय वाटतसे दुःख। संसाराचें सुख तुज झालें॥ १०॥ नामा म्हणे देवा तुज ऐसा दाता। मज भवव्यथा कवणेपरी॥ ११॥

१३६७. अनाथांचा नाथ तुझी ब्रिदावळी। मज कां रे जाळी भवव्यथा॥ १॥ देव म्हणे नाम्या गुरुवांचूनियां। मुक्ति पावावया आन नाहीं॥ २॥ आन नेणें कांहीं करीसी विपत्ति। नव्हे माझी प्राप्ति गुरुवीण॥ ३॥ जाईं नाम्या जाईं गुरूसी शरण। तुटे भवबंधन तुझें वेगीं॥ ४॥ नामा म्हणे देवा कवणा शरण जाऊं। कोणा मी होऊं शरणागत॥ ५॥

१३६८. देव म्हणे नाम्या विसोबा खेचरासी। शरण तयासी जावें वेगीं॥ १॥ इतुकें ऐकोनि नेमियेलें देवा। चालियेला तेव्हां विसोबापाशीं॥ २॥ चिंताग्रस्त नामा आला आंवढ्यासी। पुढें देउळासी देखीयेलें॥ ३॥ नामा तये काळीं गेला देउळासीं। देउळीं कौतुकासी देखियेलें॥ ४॥

१३६९. देवावरी पाय ठेवूनि खेचर। निजेला परीकर निवांतचि॥ १॥ देखोनियां नामा पावला विस्मया। कैसा हा प्राणीया देवो नेणें॥ २॥ उठीं उठीं प्राण्या आंधळा तूं काय। देवावरी पाय ठेवियेले॥ ३॥ विसोबा खेचर बोले नामदेवा। उठविले जिवा कां रे माझ्या॥ ४॥ देवावीण ठाव रिता कोठें आहे। विचारोनी पाहे नामदेवा॥ ५॥ जेथें देव नसे तेथें माझे पाय। ठेवीं पां अन्वय विचारूनी॥ ६॥ नामा पाहे अवघा जिकडे तिकडे देव। कोठें रिता ठाव न देखेची॥ ७॥

१३७०. इतुकें देखोनियां चरणीं घाली मिठी। सांठवला सृष्टीं अवघा देव॥ १॥ तिहीं त्रिभुवनीं आपण व्यापूनी। आनंदें कोंदोनी राहियेला॥ २॥ श्रीगुरूचे पाय जीवें न विसंवत। मनोवृत्तिसहित ओंवाळीलें॥ ३॥ डोळियांचे डोळे उघडिले जेणें। आनंदाचें लेणें लेवविलें॥ ४॥ जन्ममरणाचें तोडिलें सांकडें। कैवल्यची पुढें दावीयेलें॥ ५॥ कैवल्याचा गाभा विटेवरी उभा। दिसे दिव्य शोभा पांडुरंग॥ ६॥ नामा म्हणे माझी भक्ति हे माउली। कृपेची साउली केली मज॥ ७॥

१३७१. सर्वकाळीं परमात्मा आहे सर्व देशीं। भावना हे अहर्निशीं दृढ धरी॥ १॥ संतसमुदाय मिळती जेथें जेथें। जाय तेथें तेथें लोटांगणीं॥ २॥ चिंता न करीं नाम्या येणें तरसी जाण। तुज सांगितली खूण निर्वाणीची॥ ३॥

श्रीविसोबा खेचर यांचा नामदेवास बोध.

१३७२. खेचरीं धरिली माव लिंगावरी ठेविला पाव। पहावया भाव नामयाचा॥ १॥ नामा तेथें आला देव नमस्कारिला। देखोन बोलला वचन त्यासी॥ २॥ लिंगावरोनी चरण काढाजी वहिले। दिसतां वरी भले करणी न कळे॥ ३॥ तंव येरू बोलिला नाम्या तूं भला। मज नाहीं कळला देव तुझा॥ ४॥ जेथें नाहीं देव तेथें ठेवीं पाव। सर्वज्ञ सदैव तूंची अससी॥ ५॥ मीपणें भुललों मज नकळेची कांहीं। देव नसे ते ठायीं पाय ठेवीं॥ ६॥ तंव नामा होय विचारितां शब्दाची कुसरी। पाहतां निर्धारी सान नोहे॥ ७॥ देवावीण ठाव हें बोलणेंची वाव। परतोनी संदेह पडला मज॥ ८॥ आपुलें उमाणें आपण उमगावें। मजसी तारावें भवसागरीं॥ ९॥ नामा धरी चरण अगाध तुमचें ज्ञान। आपुलें नाम कोण सांगा स्वामीं॥ १०॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येरू म्हणे खेचर विसा पैं जाण। लौकिकीं मिरविणें अरे नाम्या॥ ११॥ नाम आणि रूप दोन्ही जया नाहीं। तोचि देव पाहीं येर मिथ्या॥ १२॥ जळ स्थळ आणि काष्ट हे पाषाणु। पिंड ब्रह्मांड व्यापून अणुरेणु॥ १३॥ सर्वत्र साक्षभूत हें जाणोनि पाहो। खेचर म्हणे नाम्यातें अवघा देवो॥ १४॥

१३७३. नामदेवा काय करसी तीळ तुळसी। उभा गा ठेलासी दर्भ जैसा॥ १॥ भुका कागा मरसी जेथींचा तेथें। केशवराज तूंतें आतुडेना॥ २॥ नाहीं दया ध्यान ईश्वरीं भजन। वांयांवीण प्राण कां करितोसी॥ ३॥ हरिभक्तीवीण जन्मलासी नरू। म्हणे विसोबा खेचरू अरे नाम्या॥ ४॥

१३७४. तुझें निजमुख तुजपाशीं आहे। विचारुनी पाहें मनामाजीं॥ १॥ विवेक वैराग्य शोधूनियां पाहे। तेणें तुज होय ब्रह्मप्राप्ती॥ २॥ ज्ञानाचा प्रकार सहजची झाला। अहंभाव गेला गळोनियां॥ ३॥ खेचर विसा म्हणे जेथें ओंकार निमाला। सहजची झाला ब्रह्ममूर्ती॥ ४॥

१३७५. जरी म्हणसी देव देखिला। तरी हा बोल भला नव्हे नाम्या॥ १॥ जोंवरी मी माझें न तुटे। तंव आत्माराम कैसेनी भेटे॥ २॥ खेचर साह्यानें मीं कांहीं नेणें। जीवा या जीव इतुलें मी जाणें॥ ३॥

१३७६. सड ना सांजावण खुंटा ना दावें। गाये ना वांसरूं काय तेथें व्हावें॥ १॥ आपे गाय आपण। आपण दोहें आपण प्रकाश॥ २॥ खेचर विसा दोहे सांच ही गाई। लेकी नाहीं तेथें कैंचा घरजांवई॥ ३॥

१३७७. मेघेंवीण जळ कीं जळेवीण पूर। परि नाहीं उतार तेथें नख न भिजे॥ १॥ आहे ते तें बुडे नाहीं तें तें तरे। लटकीयाचें खरें वाढविशी॥ २॥ म्हणे खेचर विसा तूं झालासी पिसा। यदृश्याची आशा सांडी नाम्या॥ ३॥

१३७८. सुखाचें सुखरूप घेउनी जा तरी। विठ्ठलनामें भरी तिन्ही लोक॥ १॥ आशापाश याही वासना पोखी। विठ्ठलनामा शेखी येउनी राहें॥ २॥ न लगती सायास करणें काया क्लेश। आपण वैकुंठ येईल सवें॥ ३॥ नाठवी संसार नाठवी देहभाव। रोहिणीची माव नकळे काय॥ ४॥ कुल्लाळकसुरीं भ्रमत चक्र। आयुष्या आवर्त मापा करीं॥ ५॥ खेचर विसा म्हणे येथूनी काढिलें। तें तुज दिधलें जा रे नाम्या॥ ६॥

१३७९. भवजलधि अगाध तरावया दुस्तर। रचिलें पंढरपूर चंद्रभागा॥ १॥ तारूं पंढरीनाथ मोलेंविण उतरितु। उभला असे तिष्ठतु वाट पाहे॥ २॥ बुडतयाचें भय नाहीं संसारीं। कलीमाजीं पंढरी नाव थोर॥ ३॥ राव रंक दोन्ही बैसवूनी वरी। उतरी पैलतीरीं भरंवसेनी॥ ४॥ आठराही आवले जे नावेसि लागले। साही खण भरले मिरवताती॥ ५॥ चौमुखीं वर्णितां नकळे याचा पार। वेदां अगोचर सहस्त्रमुखा॥ ६॥ सडियांतें कांसे लावित आपण। कुटुंबिये जाण नावेवरी॥ ७॥ प्रेमाचे पेटे बांधोनियां पोटीं। उतरी जगजेठी पैलपारू॥ ८॥ आप आंगें उघाडी बुडत्यातें कडे काढी। ऐसे लक्षकोडी तारियले॥ ९॥ सहस्त्र नाम पेटे बांधे मज पोटीं। तरी जगजेठी लावी कांसे॥ १०॥ आदि करोनी सर्वही तारिले। उतरूनी तारिले पैलतिरीं॥ ११॥ ऐसे पक्षी कीट गुल्मल तारिले। खेचर विसा म्हणे तारी माते पुंडलिक॥ १२॥

१३८०. श्रवणीं सांगितली मात मस्तकीं ठेवियला हात। पदपिंडाविवर्जित केला नामा॥ १॥ खेचरू विसा प्रेमाचा पिसा। तेणें नामा कैसा उपदेशिला॥ २॥ तया सांगितलें गुज। आतां पाल्हाळीं तुज काय चाड॥ ३॥ मग खेचरु म्हणे मज ज्ञान हेंची गुरु। तेणें अगोचरु म्हणे केला नामा॥ ४॥

१३८१. सुखालागीं मन तुझें गिवसीत तळमळी। परी सुख आहे जवळी नकळे तुज॥ १॥ दर्पणी दीप्ति कीं दुग्धीं घृतशक्ति। परी करणीविण हातीं न लभेची जाण॥ २॥ सुखालागीं सुख सोय दाखवीन पाहें। अनुभवोनी होय सुखरूप॥ ३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सुख तें शांति सुख तें दया क्षमी। सुख तें उपदेश मी निर्विकारीं॥ ४॥ सुख तें नैराश्य सुख हरिदास्य। सुख तें विश्वास सदा वसे॥ ५॥ सुख तें सत्संगतीं सुख तें नामीं प्रीति। सुख तें विकृति विषयभोगीं॥ ६॥ सुख तें एकांतवास सुख तें लौकीक त्रास। सुख तें सौरस स्वस्वरूपीं॥ ७॥ म्हणे खेचर विसा परियेसी विष्णुदासा। न घडे भरंवसा तरी अनुभवणें॥ ८॥

१३८२. भक्ति त्रिविधा षड्‌विध नवविधा। यजन याजन करोनी जीवातें दंडिताती सदा॥ १॥ केशव परमात्मा नेणोनि याजीं पतीतें। पतनीं पडतां होतीं भूतें रया॥ २॥ नाहीं रूप स्थिति नाहीं शब्द स्थिति। नित्य तया वस्ती निरंजनीं॥ ३॥ एकलें परब्रह्म गुरुमुखें जाणावें। तरी चुकवावें पुनरावृत्ति रया॥ ४॥ ऐसें रे नामया वचन ऐक पुढें। हे तो देवाविषयीं श्रुतीचे निवाडे॥ ५॥ श्रुती नेती नेती परतोनि आलिया। खेचर पुढें सांगे नामया॥ ६॥

१३८३. आधीं चेतन्य अपैतें करोनी। मग संचरे तारुण्य वनीं। कामक्रोध तुज देखोनी। जाती पळोनी बारा वाटा॥ १॥ तुज पाठी कवण धांवे। कवण टाकी कवण पावे। कामक्रोधें जग मोहावें। कांसियासी खोववी पोटीं पाय॥ २॥ माया मोहजाळ तुटेल। पळेल पां काळ व्याळ। कां रे स्मरसी ना गोपाळ। मिथ्या व्याकुळ कांजेवीण॥ ३॥ वैराग्य दृढ होईं निरुता। कासया भितोसी चपेट घाता। परस्त्री तितुकी मानीं माता। विषयीं निमित्या आल्यासाठी॥ ४॥ धर्मांचेनी मार्गें निघाला कर्ण। शिबी चक्रवर्ती झाला जीवित्वहीन। तयामाजीं सांग नाडला कोण। लटकी झकवण कां बोलती॥ ५॥ इंद्रिया गोड तें अरोगिजे। मग धनीवरी धांवा पोखरिजे। काय सांगूं शहाणपण तुझें। खेचर विसा म्हणे अरे नामया॥ ६॥

१३८४. देश चत्वार कराचा नव आननाचा। त्रिविंश नयनाचा द्वीपुच्छ द्वेश्रृंगाचा। म्हणती ईश तो सरोज शयनाचा॥ १॥ नासापुट षोडश आठराचा। कर्णीं नवांश शिरसींचा। दहा पदें ही त्याला॥ २॥ कोण असा जी कथाजी सरसाचा। आंगुलांचा भुजा मुळु वदनाचा। उधानु नेत्राचा स्वामी माझा॥ ३॥ पोकू वेडावले सेली बोभावले। अन्य थक्कित झाले वर्णवेना॥ ४॥ केवळ काठीं मुगुट धूर्जटी। पाय तळवटीं चरण ज्याचे॥ ५॥ ढकार वदनाचा आला वर्णावया। जिव्हा चिरोनियां झाल्या दोन॥ ६॥ अवारू जोडोनी करितो विनवणी। खेचर विसा चरणीं विनटला॥ ७॥

१३८५. येथोनि तेथवरी धांवोनियां गेलों। कांहीं नाहीं तें पाहुनीयां आलों॥ १॥ कोठें गेलों कोठें धांवुनी आलों। कांहीं नाहीं तें पाहुनियां धालों॥ २॥ खेचर विसा म्हणे नामदेवा। कांहीं तें तुम्हीं मज दाखवा॥ ३॥

१३८६. पर्वतप्राय पापराशी होती दुग्ध। वाचेसी मुकुंद उच्चारितां॥ १॥ अच्युत श्रीहरी केशव नरहरी। माधव हरहरि रामकृष्ण॥ २॥ नामासी साधन करशील पूर्ण। तें प्रपंचाचें भान उरों नेदी॥ ३॥ उदासीन वृत्ति आचरावें कर्म। नाहीं देहधर्म गुण माया॥ ४॥ ऐसा हा अनकळीत मार्ग साधेल तुज। खेचर गुज सांगे नाम्या॥ ५॥

१३८७. आप तेज वायू पृथिवी गगन। मेलें तें कवण पांचामध्यें॥ १॥ आम्हां मरण नाहीं मरशील काई। आत्मवस्तु पाही श्रीगुरुमुखें॥ २॥ जिताची मरण आलेंसें हातां। मरण बोलतां लाज नये॥ ३॥ खेचर विसा म्हणे आम्हां मरण नाहीं। कैसें मरण पाही आलें नाम्या॥ ४॥

गुरुपदेशानंतरची स्थिति

१३८८. मरण सांगा स्वामी कवणीया गुणें। संसारीं मरणें उरलें नाहीं॥ १॥ आम्हां मरण नाहीं मेलें होतें काई। श्रीगुरूच्या पायीं राहें मना॥ २॥ मरणें हें काया मरणें हें माया। मरे हे छाया कवण्या गुणें॥ ३॥ भक्ति अमरकंदु रामनाम वंदूं। नामयासी छंदू विठोबाचा॥ ४॥

१३८९. नामा स्वयंपाक करोनि बैसला।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

केशव श्वानरूपें आला। रोटी घेऊनि पळाला। सर्वांभूतीं केशव॥ १ ॥ हातीं घेऊनि तुपाची वाटी। नामा लागला श्वानापाठीं। तूप घे गा जगजेठी। कोरडी रोटी कां खाशी॥ २ ॥ तंव श्वान हांसोनी बोलिले। नामया तुज कैसें कळलें। येरू म्हणे खेचरें उपदेशिलें। सर्वांभूतीं विठ्ठल॥ ३ ॥

गुरुस्तुति.

१३९०. सद्गुरुनायकें पूर्ण कृपा केली। निजवस्तु दाविली माझी मज॥ १ ॥ माझें सुख मज दावियेलें डोळां। दिधली प्रेमकळा ज्ञानमुद्रा॥ २ ॥ तया उतराई व्हावें कवण्या गुणें। जन्म नाहीं येणें ऐसें केलें॥ ३ ॥ नामा म्हणे निकी दावियेली सोय। न विसरावे पाय विठोबाचे॥ ४ ॥

१३९१. पाषाणाचा देव बोलेचि ना कधीं। हरि भवव्याधि केंवि घडे॥ १ ॥ दगडाची मूर्ति मानिला ईश्वर। परि तो साचार देव भिन्न॥ २ ॥ दगडाचा देव इच्छा पुरवीत। तरि कां भंगत आघातानें॥ ३ ॥ पाषाण देवाची करिती जे भक्ति। सर्वस्वा मुकती मूढपणें॥ ४ ॥ प्रस्तराचा देव बोलत भक्तांतें। सांगते ऐकते मूर्ख दोघे॥ ५ ॥ ऐशांचें माहात्म्य जे कां वर्णिताती। आणि म्हणविती तेणें भक्त॥ ६ ॥ परंतु ते नर पामर जाणावे। त्यांचे नायकावे बोल कानीं॥ ७ ॥ धोंडा घडोनियां देव त्याचा केला। आदरें पूजिला वर्षें बहु॥ ८ ॥ तरी तो उतराई होय केव्हां काई। बरवें हृदयीं विचारा हें॥ ९ ॥ धोंडापाण्याविण नाहीं देव कोठें। होतां सान मोठें तीर्थक्षेत्र॥ १० ॥ द्वादशीचे गांवीं जाहला उपदेश। देवावीण ओस स्थळ नाहीं॥ ११ ॥ तो देव नामया हृदयीं दाविला। खेचरानें केला उपकारू हा॥ १२ ॥

१३९२. नाचूं कीर्तनाचे रंगीं। ज्ञानदीप लावूं जगीं॥ १ ॥ सर्व सांडुनी माझाई। वाचे विठ्ठल रखुमाई॥ २ ॥ परेहून परतें घर। तेथें राहूं निरंतर॥ ३ ॥ सर्वांचें जें अधिष्ठान। तेंचि माझें रूप पूर्ण॥ ४ ॥ अवघी सत्ता आली हातां। नामयाचा खेचरी दाता॥ ५ ॥

१३९३. कृपेची साउली अखंड लाधली। खेचर माउली भेटलीया॥ १ ॥ आतां मज भय नाहीं पैं कोणाचें। जन्ममरणाचें दुःख गेलें॥ २ ॥ बंधमोक्षाची फिटली काळजी। समाधि लागली समाधीसी॥ ३ ॥ नामा म्हणे माझें सर्वही साधन। खेचरचरण न विसंबे॥ ४ ॥

१३९४. भक्ति हेंचि भावें परब्रह्म पक्वान्न। गुरुसुखें जेवण जेवीयेलें॥ १ ॥ अनुभव भात लय लक्ष कढी। जेवणार गोडी घेत असे॥ २ ॥ सुख शांति शाखा भावार्थ हा वडा। जेवणार गाढा आत्माराम॥ ३ ॥ दया क्षीरधारी शांति पूर्णपोळी। घृत हें कल्लोळी प्रेम माझें॥ ४ ॥ विषयाचा गुरळा थुंकोनि सांडिला। नामा आंचवला संसारासी॥ ५ ॥

१३९५. स्वानंदांत पडोनियां जाती। न संडी वासना चघळीत हस्ती॥ १ ॥ तैसें माझें मन मुरारी। वासना धांवे विषयांवरी॥ २ ॥ डोळियांचीं बुबुळें फुटोनियां जातीं। न संडी वासना हालवितो पातीं॥ ३ ॥ ढोराचें पुच्छ मोडोनियां चांगा। पुढती पुढती हालविती पैं गा॥ ४॥ वोढाळ ढोरा बांधियेलें काष्ठ। पुढती पुढती धरी तीच वाट॥ ५ ॥ नामा म्हणे माझी मुळीं वासनाच खोटी। खेचर विसा चरणीं घातलीसे मिठी॥ ६ ॥

१३९६. सूर्याचा प्रकाश सर्व सृष्टीवरी। धन्य तो अंतरीं सर्वकाळ॥ १ ॥ स्वर्गादि पाताळ सर्व पूर्ण जळें। चातका न मिळे मेघाविण॥ २ ॥ नारायण पूर्ण सर्वभूतां ठायीं। अभाग्यासी नाहीं तिहीं लोकीं॥ ३ ॥ नामा म्हणे गुरुकृपेचें अंजन। पायाळासी धन दिसे जैसें॥ ४ ॥

१३९७. सुखाचे सोयरे भेटती अंतरीं। बाहेरी भीतरीं दिधलें क्षेम॥ १ ॥ सुखाची गवसणी घालोनियां मना। विटली वासना वोल्हावली॥ २ ॥ वाचे उपरम मन झालें तन्मय। लागलासे लय पर लक्षीं॥ ३ ॥ शांति क्षमा दया देती आलिंगन। चित्त समाधान पावविलें॥ ४ ॥ परतलिया दृष्टी इंद्रियांच्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वृत्ती। पावली विश्रांति ठायीं ठायीं॥ ५॥ विष्णुदास नामा निजबोधें निवाला। खेचरें दिधला अभयकर॥ ६॥

१३९८. सद्‌गुरूचे पाय जीवें न विसंबावे। मन वळवावें वृत्तीसहित॥ १॥ डोळियाचे डोळे उघडिले जेणें। आनंदाचें लेणें लेवविलें॥ २॥ जन्ममरणाचें फेडिलें सांकडें। केवल्यचि पुढें दाखाविलें॥ ३॥ मोहरले तरु पुष्पफळभारें। तेचि निराकार सनकादिक॥ ४॥ नामा म्हणे स्वामी खेचर माउली। कृपेची साउली केली मज॥ ५॥

१३९९. वेदांसी न कळे शास्त्रें पैं भांडतीं। श्रुति विवादती ब्रह्मालागीं॥ १॥ तें अवघेंचि पैं मुक्त उपदेशधर्मे। हरतीं कर्माकर्म गुरुसेवें॥ २॥ सेवेपरतें साधन नाहीं पैं उपदेश। हरीसि सौरस आपेआप॥ ३॥ नामा म्हणे हरी गुरु आज्ञा काम। भजन निष्काम गुरुसेवा॥ ४॥

१४००. उपजोनि सभाग्य तेचि एक झाले। जींहीं विचारिलें आत्महित॥ १॥ सांडोनि भाषण सद्‌गुरूच्या चरणीं। लागलों संपूर्ण भावार्थेसि॥ २॥ तयाचें जें कांहीं सर्व मज ओझें। नाहीं मज दुजें त्यासि कांहीं॥ ३॥ तयाचे हृदयीं संतपण प्रगटे। द्वैतपण तुटे क्षणामाजीं॥ ४॥ नामा म्हणे आम्हां विठोबाचे बोल। सांपडली ओल तरावया॥ ५॥

१४०१. सद्‌गुरुसारिखा सोइरा जीवलग। तोडिला उद्वेग संसारींचा॥ १॥ काय उतराई होऊं कवण्या गुणें। जन्मा नाहीं येणें ऐसें केलें॥ २॥ माझें सुख मज दाखविलें डोळां। दिधली प्रेमकळा नाममुद्रा॥ ३॥ डोळियाचा डोळा उघडिला जेणें। लेवविले लेणें आनंदाचें॥ ४॥ नामा म्हणे निकी सांपडली सोय। न विसंबें पाय खेचराचे॥ ५॥

१४०२. सुखाचा सुखतरु सद्‌गुरु खेचर। स्वरूप साक्षात्कार दाखविला॥ १॥ विठ्ठल पाहतां मावळलें मन। ध्यानीं भरले नयन तन्मय झाले॥ २॥ मी माझें होतें तें मजमाजि निमालें। जळें जळ गिळिलें जयापरी॥ ३॥ तेथें आनंद आनंदु ओळला परमानंदु। नाम्या झाला बोधु विठ्ठलनामें॥ ४॥

१४०३. नाशवंत देतां ब्रह्म येईल हातां। ऐसी ज्याची कथा पुराणांत॥ १॥ सद्‌गुरूचे पायीं देहासि अर्पितां। तात्काळ मुक्तता हातां येते॥ २॥ माया देऊनियां ब्रह्म घ्यावें हातीं। ऐशा गुरूप्रति कां भजाना॥ ३॥ नामा म्हणे गुरूपायीं लाभ पाहे। मोक्ष तोही पाहे दास होतो॥ ४॥

नामदेवाचा कवित्वाविषयीं निश्चय.

१४०४. चंद्रभागेतीरीं आयकिल्या गोष्टी। वाल्मीकें शतकोटी ग्रंथ केला॥ १॥ माझिया चित्तासी फार झाले क्लेश। वृथा म्यां आयुष्य गमाविलें॥ २॥ जाऊनि राऊळा विठोसी विनविलें। वाल्मिकानें केलें रामायण॥ ३॥ असेन मी खरा तुझा भक्त देवा। सिद्धीस हा न्यावा पण माझा॥ ४॥ शतकोटी तुझे करीन अभंग। म्हणे पांडुरंग ऐक नाम्या॥ ४॥ तये वेळीं होती आयुष्याची वृद्धि। आतांची अवधि थोडी असे॥ ६॥ नामा म्हणे जरी न होतां संपूर्ण। जिव्हाळा उतरीन तुज पुढें॥ ७॥

नामदेवाचा निश्चय पाहून पांडुरंग स्वतः अभंग लिहिण्यास बसले.

१४०५. निश्चय पाहूनि उपजली दया। स्वामी देवराया पांडुरंगा॥ १॥ सारजेसी सांगे भीमातीरीं हरी। बैस जिव्हेवरी नामयाच्या॥ २॥ लाडकें लडिवाळ नामा माझें तान्हें। तयाला मजवीण कोण आहे॥ ३॥ मजवरी त्यांचें फार असे ऋण। होईन उत्तीर्ण येवढ्यानें॥ ४॥ नामा म्हणे हातीं बांधोनियां वह्या। बैसे लिहावया पांडुरंग॥ ५॥

अभंगवृत्तलक्षणाचें स्वप्न

१४०६. अभंगाची कळा नाहीं मी नेणत। त्वरा केली प्रीत केशीराजें॥ १॥ अक्षरांची संख्या बोलिले उदंड। मेरु सुप्रचंड शर आदी॥ २॥ सहा साडेतीन चरण जाणावे। अक्षरें मोजावीं चौकचारी॥ ३॥ पहिल्यापासोनी तिसऱ्यापर्यंत। अठरा गणित मोज आलें॥ ४॥ चौकचारी आर्धी बोलिलों मातृका। बावीसावी संख्या शेवटील॥ ५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दीड चरणाचें दीर्घ तें अक्षर। मुमुक्षु विचार बोध केला॥ ६॥ नामा म्हणे मज स्वप्न दिलें हरी। प्रीतीनें खेचरीं आज्ञा केली॥ ७॥

नामदेवाची शतकोटी अभंग करण्याची प्रतिज्ञा.

१४०७. खवळलों आतां न भिये रे तुज। सांडिली रे लाज लौकिकाची॥ १॥ आम्ही दीन शिंपी इये यातिहीन। दे माझें ठेवणें केशीराजा॥ २॥ साठ लक्ष संख्या चौऱ्यांशीं कोटि। त्यांत मी कवडी सोडूं काय॥ ३॥ आणिक याहून असेल वेगळें। घेईन तें बळें जाण आतां॥ ४॥ तुझें थोरपण ऐक हें देवा। दुर्बळाचा ठेवा अभिलाषी॥ ५॥ म्हणूनि पोरटा नामा खेचराचा। काय मनें वाचा सत्य करीं॥ ६॥

आत्मसुखप्राप्तीविषयीं आर्तोद्गार.

१४०८. देवा दिवस गेले वांयांविण। हरिसी न रिघतां शरण। बाळकत्व अज्ञानपण। तैं आठवण नव्हेचि॥ १॥ आला तारुण्याचा अवसरु। सर्वेचि विषयाचा पडिभरु। क्रोध मदमत्सरु। अति व्यापारु तृष्णेचा॥ २॥ सर्वेचि वृद्धत्व पातलें। सकळ इंद्रियें सांडियलें। देह न करी म्हणितलें। अंतर पडलें भक्तीसी॥ ३॥ देवा हित कांहीं नव्हेचि माझें। दास्यत्व न घडेचि तुझें। आयुष्य गेलें वांया काजें। धरणिये ओझें पैं झालें॥ ४॥ पुनरपि जन्मा येणें मागुता। कवण जाणे कैसी व्यवस्था। कैसा देह लाधेल अनंता। केव्हां तव चरणीं येईल॥ ५॥ आतां मजं करूं नको उदास। तुझिया नामाचा विश्वास। हृदयीं नांदे हृषीकेश। विष्णुदास म्हणे नामा॥ ६॥

१४०९. मज चालतां आयुष्यपंथें। तारुण्यवन पातलें तेथें। मदमत्सरादि श्वापदें बहुतें। आलीं कळकळीत मजपाशीं॥ १॥ तीं धांवतीं पाठोपाठीं। पाहे तंव विषयाचे घाटीं। काम क्रोध व्याघ्रांची वाटीं। देखोनि पोटी रिघाले पाय॥ २॥ मग स्वधर्ममार्गी रिघालों। तंव अहंकारतस्करें आकळिलों। राहें राहें म्हणोनि उभा केलों। तेणें अंतरलों स्वामिया॥ ३॥ जंव क्षण एक उघडिले डोळे। पाहे तंव कंठ व्यापिला व्याळें। मायामोहसर्पी डंखिलें। त्यांचिये गरळें झळंबलों॥ ४॥ जंव न पावेल शेवटील लहरी। तंव धांव उपाव करीं। विष्णुदास नामा धांवे पुकारी। माझा कैवारी केशिराज॥ ५॥

१४१०. तुज नेणों गा महेशा। म्हणूनि आलों गा गर्भवासा। अंध कूपीं पडिला जैसा। रात्रंदिवसा तो नेणे॥ १॥ तुझिया नामाची सांगडी। अखंड देईन ते खंडी। पावेन मी पैलथडी। त्यासाठीं आधारु॥ २॥ कामक्रोधादि जलचरीं। कासाविस जालों भारी। व्याकुळ होय चिंता लहरी। दुःखें भारी दाटलों॥ ३॥ कल्पना व्याळीं गुंडाळिलों पायीं। तेणें बुडालों विषयडोहीं। भवतें पाहें तंव कोणी नाहीं। मग तुज ध्यायीं विश्वेशा॥ ४॥ मज बांधुनी कर्मदोरीं। घातलें संसार दुर्धरी। मायानदीच्या महापुरीं। वाहावलों गा दातारा॥ ५॥ ऐसा खेदें क्षीण जालों बहुवस। न देखें विश्रांतीची वास। विनवी नामा विष्णुदास। गर्भवास पुरे आतां॥ ६॥

१४११. अंतकाळीं मी परदेशी। ऐसे जाणोनि मानसीं। म्हणोनियां हृषीकेशी। शरण तुजसी मी आलों॥ १॥ नवमास गर्भवासीं। कष्ट झाले त्या मातेसी। तें निष्ठुर झाली कैसी। अंतीं दूर राहिली॥ २॥ जीवीं बापासी आवड। मुखीं घालोनि करी कोड। जेव्हां लागली यमओढ। तेव्हां दुरी टाकिलें॥ ३॥ बहिणी बंधूचा कळवळा। तें तूं जाणसी रे दयाळा। जेव्हां लागली यमशृंखळा। तेव्हां दूर राहिलीं॥ ४॥ कन्या पुत्रादिक बाळें। हीं तंव स्नेहाचीं स्नेहाळें। तुझ्या दर्शनाहून व्याकुळ। अंतीं दूर राहिलीं॥ ५॥ देहगृहाची कामिनी। ते तंव राहिली भवनीं। मी तंव जळतसें स्मशानीं। अग्निसवें येकला॥ ६॥ मित्र आले गोत्रज आले। तेहि स्मशानीं परतले। शेवटीं टाकोनियां गेले। मजलागीं स्मशानीं॥ ७॥ ऐसा जाणोनि निर्धार। मग मज आला गहिंवर। तंव दाही दिशा अंधकार। मग मज कांहीं न सुचे॥ ८॥ ऐसें जाणोनि निर्वाण पाही। मनुष्यजन्म मागुता

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाहीं। नामा म्हणे तुझे पायीं। ठाव देईं विठोबा॥ ९॥

१४१२. परियेसी वासने संकल्प स्वरूपें। विश्व त्वां आटोपें वश केलें॥ १॥ ब्रह्मादिक तुझे इच्छेचें खेळणें। विषयाकारणें लोलिंगत॥ २॥ परि माझ्या मना सांडी वो समर्थें। देई मज दीनातें कृपादान॥ ३॥ वेदशास्त्रवक्ते व्युत्पन्न थोरले। तृणापरीस केले हळुवट॥ ४॥ कृपणाचे द्वारा होणार याचक। विसरले सकळिक आत्महित॥ ५॥ एके अभिमानें भ्रांत झालें चित्त। भजती इंद्रियांतें दिनरूपें॥ ६॥ शब्द स्पर्श रूप रसगंधें फांसा। गुंतले दुराशा तळमळित॥ ७॥ एकांतें लाविला पुत्र कलत्र धंदा। नेणती ते कदा सुखगोष्टी॥ ८॥ जन्ममरणांचे जुंपियले पांतीं। आकल्प भोगिती नाना योनी॥ ९॥ ऐसे तुझे संगें बहु झाले हिंपुटी। म्हणोनि पाडिली तुटी सतसंगा॥ १०॥ नामा म्हणे पुढती गांजिसील मज। येईल केशिराज सोडवणें॥ ११॥

१४१३. वीतभर पोट लागलेंसें पाठी। साधुसंगें गोष्टी सांगूं न देई॥ १॥ पोट माझी माता पोट माझा पिता। पोटानें ही चिंता लाविलीसे॥ २॥ पोट माझा बंधु पोट माझी बहीण। पोटानें हें दैन्य मांडिलेंसें॥ ३॥ विष्णुदास नामा पोटाकडे पाहे। अझून किती ठाये हिंडविसी॥ ४॥

१४१४. गर्भवास ऐसा मजसी भिवविती। गाई बैसविती व्याघ्रापुढें॥ १॥ नको हा संसार नको हा संसार। नको हा संसार देवराया॥ २॥ कोपें काळसर्पें धरिलें अजेसी। तेणें कासाविसी सांगों नेणें॥ ३॥ नामा म्हणे तुझें केशवा मी बाळ। ऐसा तू कृपाळ मायबापा॥ ४॥

१४१५. मन माझें चोरटें लागलें कुसंगीं। बांधिलें षड्वर्गीं धरोनि त्यातें॥ १॥ केउता गेलासि माझ्या कृपावंता। ये गा पंढरिनाथा मायबापा॥ २॥ वासनेची बेडी घालोनि माझे पायीं। विषयवज्रघायीं ताडितोसी॥ ३॥ आशा तृष्णा माया आणिक कल्पना। करिताती कामना नानाविध॥ ४॥ काम क्रोध दंभ लाविताती कळा। ये माझ्या गोपाळा सोडवणें॥ ५॥ नामा म्हणे माझें घेऊनि चित्तवित्त। करी बंधनमुक्त संसारीचें॥ ६॥

१४१६. विषयीं आसक्त झालें माझें मन। न करी तुझें ध्यान पंढरिराया॥ १॥ नाथिले संकल्प करीं नानाविध। तेणें थोर खेद पावतसे॥ २॥ ऐसा मी अपराधी दुराचारी देवा। भेटसी केशवा कवणे परी॥ ३॥ आयुष्य सरो परी न सरे कल्पना। भोगवी यातना नानाविध॥ ४॥ जन्म मरण कष्ट भोगितां संकटीं। होतसें हिंपुटीं येरझारीं॥ ५॥ माया मोह रत भ्रांत माझे चित्त। चुकला निजहित नारायणा॥ ६॥ तूं अनाथ कैवारी म्हणोनि धांवा करीं। सोडवीं मुरारी म्हणे नामा॥ ७॥

१४१७. मज गांजिल्याचा धांवा। सावधान परिसावा॥ १॥ विठो सुजाणाच्या राया। धांव माझ्या करुणालया॥ २॥ मोहोपाशीं मज बांधिलें। थोर वैर त्वां साधिलें॥ ३॥ माझें मन हें पामर। भ्रांत हिंडे दारोदार॥ ४॥ नामा म्हणे काय करूं। तुजविण भूमिभारू॥ ५॥

१४१८. ममता तुटेना मज केशिराजा। आंगीं भाव दुजा लागे पाठीं॥ १॥ शरीरीं तितिक्षा नाहीं क्षमा शांति। यालागीं श्रीपति वांयां गेलों॥ २॥ नामा म्हणे देवा तारिसी पतीता। म्हणोनियां सत्ता केली आम्हीं॥ ३॥

१४१९. आशा तृष्णा व्याघ्र देखोनियां डोळां। झालेंसें व्याकुळा चित्त माझें॥ १॥ पावें गा विठोबा पावें गा विठोवा। पावें गा विठोबा मायबापा॥ २॥ तूं भक्तकैवारी कृपाळुवा हरि। येई गा झडकरी देवराया॥ ३॥ नामा म्हणे आन नाहीं तुजवांचोनि। जनक जननी केशिराजा॥ ४॥

१४२०. वाघाचियां गळां शेळी बांधोनियां। तैसी तुझी माया लोभापर॥ १॥ कां मज संसारीं घालितोसि देवा। कैसें तुझिया जीवा गोड वाटे॥ २॥ विषयाचे कल्लोळ पाजिसी केवळ। हृदय कोमळ कैसें तुझें॥ ३॥ नामा म्हणे मज आदि अंत एकु।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizaqtion by eGangotri

जननी जनकु पंढरिरावो॥ ४॥

नवविधाभक्ति-श्रवण कीर्तन भावभक्त्युद्गार.

१४२१. माझे मनीं ऐसें होतसें गा देवा। देह समर्पावा तुझे पायीं॥ १॥ तंव या मायामोहें मजसी केला हेवा। लोटियेलें देवा भवजळामाजीं॥ २॥ आशा नदी पुरीं वाहविलें दुरी। काढीं मज हरी कृपाळुवा॥ ३॥ सरितामाजीं धरिलों मदनमगरीं। पुढारी माघारी होऊं नेदी॥ ४॥ न निघें न निघे आणिका पोहणार। सहित पितांबरें घालीं उडी॥ ५॥ थडीये उभया धांव गा श्रीहरी। हानि झाली थोरी सर्व गेले॥ ६॥ भक्ती नवरत्नाची बुडाली वाखोरी। काढीं वेगीं हरी कृपाळुवा॥ ७॥ धीर आणि विचार ह्या दोन्ही सांगडी। श्रद्धा पुढें दोरी तुटोनी गेली॥ ८॥ भावबळें सांपडलों दाटलों उभडी। वेगीं घालीं उडी कृपाळुवा॥ ९॥ नामा म्हणे भजनेंविण कोरडा गळा। नेतो रसातळा क्रोध मीन॥ १०॥

१४२२. नावडे प्रपंच तापत्रय माया। येई धांवोनियां केशिराजा॥ १॥ भवभयें फार भ्यालों जन्मांतरा। चौऱ्यांशींचा फेरा चुकवितो॥ २॥ सत्कथा श्रवण नाम संकीर्तन। न घडे भजन मज देवा॥ ३॥ नवविधा भक्ति कोणें केली कैसी। नामा म्हणे ऐसी दावीं सदा॥ ४॥

१४२३. भक्तीची अपेक्षा धरोनि अंतरीं। राहें भीमातीरीं पंढरीये॥ १॥ अठ्ठावीस युगें गेलीं विचारितां। निगम सर्वथा नव्हे देखा॥ २॥ कटीं कर उभा शिणलें शरीर। धरोनियां निर्धार भक्तिभावो॥ ३॥ नामा म्हणे आतां नको खटपट। आमुचे बोभाट नको पाहूं॥ ४॥

१४२४. भावेंविण भक्ति कशानें करावी। माया मोह वैरी देहामाजीं॥ १॥ तुझें नाम दिव्य रस जिव्हे स्वाद। काम क्रोध नाश करिती माझा॥ २॥ जे जे वस्तुसि मी नित्य नयनीं पाहे। त्या त्या विषया मन धांवताहे॥ ३॥ नामा म्हणे थोर उबगलों संसारीं। काळ वैरी पुढारां ग्रासूं पाहे॥ ४॥

१४२५. आम्हांपासीं काय मागसी तूं देवा। नाहीं भक्तिभाव भांडवल॥ १॥ भांडवल गांठीं देखोनि साचार। सुदाम्याची फार पाठ घेसी॥ २॥ घेसी सोडूनियां पोहे मुठीभर। हिडसावल्या कर नामा म्हणे॥ ३॥

१४२६. दंभें गर्वें मदें घेरलेंसें भारी। अनुसरलों केसरी पंचानना॥ १॥ तूंतें वेद नेणें तूंतें शास्त्र नेणें। तुझें नाम नेणें गातूं असें॥ २॥ त्रिविद्या तूं पारू दोहींचा वृत्तांतु। सत्त्व राहे ती तूं जयालागीं॥ ३॥ निर्गुण निराकार केशव उदार। नामा म्हणे पार उतरतील॥ ४॥

१४२७. उलिसा प्रपंच परि हा लटिका। तेणें तुज व्यापका झांकियलें॥ १॥ तैसियाच्या मज घालोनियां खेवा। स्वामिद्रोही देवा करिसी कैसा॥ २॥ मेरूचिया गळां बांधोनि मशक। पाहसी कवतुक अनाथनाथा॥ ३॥ नामा म्हणे देवा कळली तुझी माव। माझा मी उपाव करीन आतां॥ ४॥

१४२८. श्रीहरि श्रीहरि ऐसें वाचें म्हणेन। वाचा धरिसी तरी मी श्रवणें ऐकेन॥ १॥ श्रवणीं दाटसी तरी मी नयनीं पाहीन। ध्यानीं मी ध्याईन जेथें तेथें॥ २॥ जेथें जाये तेथें लागला हा आम्हां। न संडी तुझे वर्मा म्हणतसे नामा॥ ३॥

१४२९. आम्हां सांपडलें वर्म। करूं भागवत-धर्म॥ १॥ अवतार हा भेटला। बोलूं चालूं हा विसरला॥ २॥ अरे हा भावाचा लंपट। सांडुनि आलासे वैकुंठ॥ ३॥ संतसंगती साधावा। धरूनि ह्रुदयीं बांधावा॥ ४॥ नामा म्हणे केउता जाय। आमुचा गळा त्याचे पाय॥ ५॥

१४३०. काय गुण दोष आणितोसी मना। नको नारायणा अभक्तची॥ १॥ शरीर संबंधा सुचतीं अंतरें। काय म्यां पामरें आवरावें॥ २॥ नामा म्हणे मज नागविसी दातारा। नको बा अंतरा पाहों अंत॥ ३॥

१४३१. काय गुण दोष माझे विचारिसी। आहे मी तों राशी अपराधांची॥ १॥ अंगुष्ठापासोनी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मस्तकापर्यंत। अखंड दुश्चित आचरलों॥ २॥ स्वप्नीं देवा तुझी नाहीं घडली भक्ति। पुससी विरक्ति कोठुनियां॥ ३॥ तूंचि माझा गुरु तूंचि तारीं स्वामी। सकळ अंतर्यामीं गाऊं तुज॥ ४॥ नामा म्हणे माझें चुकवी जन्ममरण। नको करूं शीण पांडुरंगा॥ ५॥

१४३२. चोरां ओढोनियां नेईंजे जैं शुळीं। चालतां पाउलीं मृत्यु जैसा॥ १॥ तैसी परी मज झाली नारायणा। दिवसेंदिवस उणा होत असे॥ २॥ वृक्षाचिये मुळीं घालितां कुऱ्हाडी। वेंचे तैसी घडी आयुष्याची॥ ३॥ नामा म्हणे हेंही लहरीचें जळ। आटत सकळ भानुतेजें॥ ४॥

१४३३. संसारींच्या आद्या आहाळलों भारी। निववी गा श्रीहरी अमृतदृष्टी॥ १॥ अनाथ अपराधी दुबेळ दुराचारी। कृपाळु बा हरी तारीं मज॥ २॥ नामा म्हणे विठो कृपेचा कोंवळा। जाणसी कळवळा अनाथाचा॥ ३॥

१४३४. सांडोनि संसार झालों मी अंकित। ऐशियाचा अंत पाहूं नको॥ १॥ पातकी मी सत्य पातकी मी सत्य। पातकी मी सत्य पांडुरंगा॥ २॥ माझे गुणदोष न धरिसी चित्तीं। थोरपण ख्याति दावी आम्हां॥ ३॥ ऐसा अपराध आणूं नको मना। पंढरीचा राणा म्हणोनियां॥ ४॥

१४३५. देशीं परदेशीं झालों तुजवीण। माझें समाधान कोण करी॥ १॥ चातक चकोर परी पाहें वास। तूं कां हो उदास पांडुरंगा॥ २॥ नामा म्हणे चित्त देईं माझ्या बोला। जीव तो उरला निघों पाहें॥ ३॥

१४३६. वत्साकारणें मोहाळु गाय। अनुसरल्या पान्हाय॥ १॥ तैसें तुज वांसरूं बांधलों मी असें। मज लावीं कासें आपुलिया॥ २॥ मज बांधलें त्वां संसारखुंटीं। माझी माउली दूर वैकुंठीं॥ ३॥ थोरु करी मना लाहो। तंव आणिकें नेती पान्हावो॥ ४॥ थोरु नव्हे याचि परि। नामा विनवितसे मुरारी॥ ५॥

१४३७. आपुले रूपीं मज लपवी निरंतर। सबाह्यभीतर आड राखीं॥ १॥ परि तुज मज आसावा संवादु। भ्रांति माया बाधु काय करी॥ २॥ काम क्रोध लोभ दंड मद मत्सर। हे वैरी अपार मारी माझे॥ ३॥ नामा म्हणे आम्ही जन्मजन्मांतरींचे। पोसणें घरींचे दास तुझे॥ ४॥

१४३८. मुंगीचियां गळां बांधोनियां मेरु। तेणे हा प्रकारू कळों आला॥ १॥ माळियाचे पोरें लपविलें पोटीं। तेणें जगजेठी सुख मानी॥ २॥ कुलालाचें हातीं तुडविलें मूल। दाखवी नवल तयासाठीं॥ ३॥ मजसाठीं काय धरिलेंसि मौना। धांव नारायणा नामा म्हणे॥ ४॥

१४३९. विठ्ठल विद्गदे पुंडलीकवरदे। अनंत अभेदें रूपें तुझीं॥ १॥ येई गे विठ्ठले मजलागीं झडकरीं। बुडतों भवसागरीं काढीं मज॥ २॥ आकांता अवसरीं स्मरिलें गजेंद्रें। दीनानाथें ब्रीदें सत्य केलीं॥ ३॥ स्मरली संकटीं द्रौपदी वनवासी। धांवोनि आलासि लवलाही॥ ४॥ प्रल्हादें तुजलागीं स्मरिलें निर्वाणीं। संकटापासोनि राखियलें॥ ५॥ नामा म्हणे थोर पीडिलों गर्भवासें। अखंड पाहातसें वास तुझा॥ ६॥

१४४०. रमासिंधुमाजीं सौंदर्याची धणी। ब्रीदें चक्रपाणि मिरविसी॥ १॥ मेघदेहाकृति घनश्याम मूर्ति। नटतसे भक्तीं भक्तजनां॥ २॥ भाक देऊनियां गौळियाचे घरीं। गाई निरंतरीं चारीतसे॥ ३॥ इंद्र वेडावला मुनि थोर थोर। न कळेचि पार म्हणे नामा॥ ४॥

१४४१. पांचमुखीं रुद्र स्वयें करी स्तुति। चहूं मुखीं कीर्ति वर्णी ब्रह्मा॥ १॥ देवी देव सर्व विस्मयो पावती। विठोबाची ख्याती कोण वानी॥ २॥ परिक्षितीसाठीं प्राण त्यजी सर्व। रावणाचे गर्व स्वयें हाणी॥ ३॥ नामा म्हणे तुज सकळ समान। माझे दोष गुण मानी काय॥ ४॥

१४४२. गुण दोष माझे पाहों नको आतां। तारिसी अनंता मज आतां॥ १॥ अगाध तारिसी अनंता मज आतां॥ १॥ अगाध महिमा काय वाणूं हरी। गोकुळाभीतरीं गाई राखी॥ २॥ अंबऋषीसाठीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

जन्म सोशियले। महत्त्वाचे केले हूड स्वयें॥ ३॥ नामा म्हणे तुझे नामाचेनि बळ। प्रसादें केवळ लाधलों मी॥ ४॥

१४४३. मी तो तुझा दास न करीं उदास। मायामोहपाश तोडीं देवा॥ १॥ प्राण जावो परी नको करूं त्याग। करीं अंगसंग अंगिकार॥ २॥ अंगीकारीं आतां अजामेळ अंतीं। समान श्रीपती मज करी॥ ३॥ नामा म्हणे ऐसें वर्णावें म्यां किती। नामें केली ख्याती चराचरीं॥ ४॥

१४४४. वानरांच्या संगें स्वयें क्षेम देसी। मज हृषीकेशी न बोलावें॥ १॥ रिसांपाशीं सदास्वभावें तुम्ही खेळा। माझिया कपाळा नातुडसी॥ २॥ पक्षि जटायूचें लेंकरूं तूं होसी। माझ्या कां मनासी नातुडसी॥ ३॥ लावोनि चरण तारियली शिळा। कोळियाचा केला अंगीकार॥ ४॥ नामा म्हणे तुम्हां सांगावें म्यां किती। राग माना चित्तीं काय वाणूं॥ ५॥

१४४५. पतितपावना धांवसि निर्वाणी। ब्रीद चक्रपाणि सत्य केलें॥ १॥ काय अपराध कोणाचे पाहिले। नाहीं तूं त्यागिलें नष्टखळां॥ २॥ अजामेळासाठीं आहार वर्जिले। बीज तें भर्जिलें भवमूळ॥ ३॥ नामा म्हणे देवा नागवण बारे। आतां उणें पुरें पाहूं नको॥ ४॥

१४४६. विश्वंभर नाम तुझें कमळापती। जगीं श्रुति स्मृति वाखाणिती॥ १॥ गौळ्यांचे घरींचें दहीं लोणी चोरुनी। खातां चक्रपाणि लाजसी ना॥ २॥ आतां दीनानाथा तुझें ब्रीद साचें। तरी भूषण आमुचें जतन करीं॥ ३॥ येर ठेवा ठेवी कायसी आतां। तुम्हां विनवितो नामा केशिराजा॥ ४॥

१४४७. शरीराचा भाव तुज नाहीं देवा। तेथें मी केशवा काय बोलूं॥ १॥ अंगदाचे अंगीं बळ देसी फार। बहु उपकार कळों आले॥ २॥ तुम्हा नित्य न्याय नोव्हे साचरण। बळि तूंतें दान देऊनि ठके॥ ३॥ नामा म्हणे सदा काय म्यां गाऱ्हाणें। किती नारायणें देऊं आतां॥ ४॥

१४४८. जन्मल्यापासूनि सोशिले प्रवास। वियोग पहायास झाले आतां॥ १॥ आतां एक करीं धावणिया धावा। बुडतों केशवा काढीं मज॥ २॥ लाभ नव्हे हानी झाली भागाभाग। तूंचि पांडुरंग पुरविसी॥ ३॥ नामा म्हणे ऐसें सर्वस्वें रक्षिलें। पाषाण तारिले जळामार्जी॥ ४॥

१४४९. दुर्घट तें दुःख लागों नेदीं भक्ता। त्याची तुज चिंता असे फार॥ १॥ आणिक प्रकार जरूर निकट। पैठणीं प्रकट रूप दावीं॥ २॥ जेथूनी सत्वर निघाले स्वदेशा। मुक्त केलें महिशा मार्गी जाण॥ ३॥ जाणती प्रेमळ कीर्तनसि तर। समाधी निरंतर म्हणे नामा॥ ४॥

१४५०. हिरे जळामधीं भिजतील कधीं। तैसें कृपानिधीं केलें आम्हां॥ १॥ आमुचा विकल्प आमुचा विकल्प। आमुचा विकल्प आम्हां नाहीं॥ २॥ कामधेनुसंगें गाढव बांधिलें। तयाचे तें मोलें तुके केंवि॥ ३॥ काय म्यां करावें पाठीलागे भोग। नामा म्हणे योग तुझ्या हातीं॥ ४॥

१४५१. आशा मनिषा तृष्णा लागलीसे पाठीं। धांव जगजेठी स्वामी माझ्या॥ १॥ गेलासि केउता वाढिलें दुश्चिता। अगा कृपावंता, स्वामी माझ्या॥ २॥ नामा म्हणे मज नाहीं कोण गत। तारिसी अनंत स्वामी माझ्या॥ ३॥

१४५२. तुजविण आम्हां कोण हो पोशिता। अहोजी कृपावंता पंढरिराया॥ १॥ न करीं विठ्ठला आतां लाजिरवाणें। मी तुझें पोसणें पांडुरंगा॥ २॥ काकुळती कोणा येऊं हो मी आतां। अनाथाच्या नाथा विठ्ठला तूं॥ ३॥ एक वेळ आतां पाहें मजकडे। नामा म्हणे वेडे रंक तुझे॥ ४॥

१४५३. माझे मनोरथ पूर्ण कीजे देवा। केशवा माधवा नारायणा॥ १॥ नाहीं नाहीं मज आणिक सोयरा। न करीं अव्हेरा पांडुरंगा॥ २॥ अनाथाचा नाथ होशी तूं दयाळा। किती वेळोवेळां प्रार्थूं आतां॥ ३॥ नामा म्हणे जीव होतो कासावीस। केली तुझी आस आतां वरी॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१४५४. समर्थाचें बाळ पांघरे वाकळ। हांसती सकळ लाज कोणा॥ १ ॥ देव असतां दैन्य उरे कैंचें बापा। आम्हांसि तूं कैसा विसरलासी॥ २ ॥ ऐसा तूं अविनाश त्रिभुवनींचा राजा। नामा म्हणे माझा तूंचि स्वामी॥ ३ ॥

१४५५. आम्ही कांहीं नेणों तुझा अंत पार। होसी निरंतर निवारीता॥ १ ॥ बहू अपराधी जाण यातिहीन। पतितपावन पांडुरंगा॥ २ ॥ नामा म्हणे ऐसा पातकी पामर। करिसी उद्धार साच ब्रीद॥ ३ ॥

१४५६. नेणें घातपात नव्हे कळावंत। शास्त्रज्ञ पंडित तोही नव्हे॥ १ ॥ रंकाहूनि रंक संतांचा सेवक। मी नामधारक विठोबाचा॥ २ ॥ नव्हे बहुश्रुत दाता ज्ञानशील। नव्हे मी वाचाळ तर्कवादी॥ ३ ॥ नामा म्हणे राया विठोचा डिंगर। नामें पैलपार पावशील॥ ४ ॥

१४५७. तरी मी गाण नव्हे गाणीव करी। जेणें तुमतें हरी संतोष उपजे॥ १ ॥ जाण नव्हे मी तें जाणीव हे करी। जेणें तुमतें हरी संतोष उपजे॥ २ ॥ दाता नव्हे जें मी दातृत्व तें करी। जेणें तुमतें हरी संतोष उपजे॥ ३ ॥ बहुरूपि नव्हे जें अभिनव नट धरी। जेणें तुमतें हरी संतोष उपजे॥ ४ ॥ तरी योगी नव्हे जें मी ध्यान धरी। जेणें तुमतें हरी संतोष उपजे॥ ५ ॥ यावरी जाणसि तें तूं करीं अनंता। विष्णुदास संता विनवीतसे॥ ६ ॥

१४५८. लटिका मी गाणूं लटिका मी नाचणूं। संतांसि देखोनू लोचन लावी॥ १ ॥ लटिका माझा भाव लटिकी माझी भक्ति। तूं तंव श्रीपती कृपासिंधु॥ २ ॥ लटिकी माझी क्रिया लटिकें माझें कर्म। परि हें तुझें नाम गातु असें॥ ३ ॥ लटिकें माझें ध्यान लटिकें माझें ज्ञान। तूं तंव सहजगुण सत्यरूप॥ ४ ॥ लटिकी माझी पूजा लटिकें माझें पूजन। लटिकें माझे भजन भावहीन॥ ५ ॥ लटिकें वत्सप्रेम धेनू हे स्वीकारी। तैसें मज करीं म्हणे नामा॥ ६ ॥

१४५९. आधीं मी लटिका वरी लटिकी तुझी माया। भजन ऐसिया पाहसी काय॥ १ ॥ जाणतां नेणतां नाम तुझें देवा। गाईन केशवा तारीं मज॥ २ ॥ विषयीं आसक्त भ्रांत माझें मन। कैसें तुझें ध्यान घडेल यासी॥ ३ ॥ नाम म्हणे आतां जाणसी तें करीं। पतीतपावन हरि नाम तुझें॥ ४ ॥

१४६०. लटिकें तरी गायें तुझेंचि नाम। लटिकें तरी प्रेम तुझेंचि आणी॥ १ ॥ सहजेंचि लटिकें असे माझे ठायीं। तुझिया पालट नाहीं साचपणा॥ २ ॥ लटिकें तरी हरी करीं तुझें ध्यान। लटिकें माझे मन तुजचि चिंती॥ ३ ॥ लटिका तरी म्हणवी तुझाच मी दास। परि नामीं विश्वास सत्य आहे॥ ४ ॥ लटिका तरी बैसें संतांचे संगतीं। परि आहे माझे चित्तीं ध्यान तुझें॥ ५ ॥ ऐसें लटिकें माझें मन सफळ करीं देवा। नामा म्हणे केशवा विनवित आहे॥ ६ ॥

१४६१. नापिकाचे परी वरी वरी बोडी। परि अंतरीची वाढी उणी नव्हे॥ १ ॥ तैसें माझें मन न राहे समूळीं। प्रपंच कवळी दाही दिशा॥ २ ॥ भक्तिप्रेमभाव बरी वरी दावी। अंतरीं आठवीं घराचार॥ ३ ॥ ऐसा लटिका जाण असे परोपरी। तरीं भवसागरीं म्हणे नामा॥ ४ ॥

१४६२. वांसरू भोवें खुंटियाभोंवतें। आप-आपणियातें गोंवियेलें॥ १ ॥ तैसी परी मज झाली गा देवा। गुंतलों मी भावा लटिकिया॥ २ ॥ नामा म्हणे केशवा तोडी कां बंधनें। मी एक पोसणें भक्त तुझा॥ ३ ॥

१४६३. लोभियाचे घरीं लटिकेचि उपवास। मरे न हृषीकेश म्हणती जनीं॥ १ ॥ तूं तंव भावाचा अंकुर जी देवा। लटिका मी पहावा दास तुझा॥ २ ॥ लटकी पक्षियातें बोभाये कुंटणी। ते त्वां माझी म्हणोनि अंगिकारिली॥ ३ ॥ लटिका अजामेळ पुत्राचेनि मोहें। सोडिविला पाहे कैसा तूंवां॥ ४ ॥ त्या अवघ्याहूनि मी लटिका सहज गुणें। तारूनि कीर्ति करणें म्हणे नामा॥ ५ ॥

१४६४. तापत्रयअग्नीची जळतसे शेगडी।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आहाळोनि कोरडी झाका काया॥ १॥ केव्हां करुणाघना वोळसी अंबरीं। निवविसी नरहरी कृपादृष्टीं॥ २॥ शोकमोहाचिया झळंबलों ज्वाळीं। क्रोधाचे काजळी पोळतसे॥ ३॥ चिंतेचा वोणवा लागला चहूंकडां। जातो तळां बुडां धांव देवा॥ ४॥ धांव धांव करुणाघना तुजविण। नामा म्हणे प्राण जातो माझा॥ ५॥

१४६५. धांवुनि जाईन श्रीमुख पाहीन। ईडापीडा घेईन विठोबाची॥ १॥ तया सुखा दृष्टि लागेल वो झणी। मग मी साजणी काय करूं॥ २॥ म्हणोनि माझें चित्त व्यापिलें उद्वेगें। शिणलों मी उबगें जन्मोजन्मीं॥ ३॥ धरोनियां घालीं जीवाचे अंतरीं। आंतोनी बाहेरीं जाऊं नेदी॥ ४॥ वासना पापिणी करील पायरव। मग हा अनुभव कोठें पाहूं॥ ५॥ वृत्तिसहित करनी मनाचें सांडणें न विसंबें प्राणें म्हणे नामा॥ ६॥

१४६६. जीव तूं प्राण तूं। आम्हां तूं गा विठ्ठला॥ १॥ जनक तूं जननी तूं। सोयरा तूं गा विठ्ठला॥ २॥ माझा गुरु तूं गुरुमंत्र तूं। सर्वस्व तूं माझें म्हणे नामा॥ ३॥

१४६७. संसारसंकटें रिघालों पाठिसी। आतां झणीं देसी त्याचे हातीं॥ १॥ ब्रीद्रें बडिवार ऐकोनियां फार। रिघों आम्ही द्वार विठोबाचे॥ २॥ आणिकहि वार्ता सांगों काय आतां। पंढरीच्या नाथा परिसावें॥ ३॥ अमृत पाजणें प्रीतीनें भक्तासी। सत्य हृषीकेशी नामा म्हणे॥ ४॥

१४६८. कलियुगीं जन मूर्ख शून्यवृत्ति। तारिसी श्रीपति नाम घेतां॥ १॥ परम पावना पवित्रा निर्मळा। भक्ताचा सांभाळ करी देवा॥ २॥ देवा तूं दयाळ जिवलग मूर्ति। पुराणें गर्जती वेदशास्त्रें॥ ३॥ नामा म्हणे आतां नको भागाभाग। सखा पांडुरंग स्वामी माझा॥ ४॥

१४६९. देवा आम्हीं तुम्हां दिलें थोरपण। मानीं हें वचन सत्य माझें॥ १॥ पतित अमंगळ तुम्हां झालों सहाय्य। विचारूनि पाहें खरें खोटें॥ २॥ रोग व्याधि पीडा जनासि नसतां। कोण पाचारिता वैद्यालागीं॥ ३॥ कल्पनेचें भूत झपडी या संसारीं। मानें पंचाक्षरी पाचारितां॥ ४॥ नामा म्हणे विठो देव येतां घरा। नको लावूं दारा पांडुरंगा॥ ५॥

१४७०. जगत्रयजीवना अगा नारायणा। कां नये करुणा दासाची हे॥ १॥ अच्युता केशवा ये गा दीनानाथा। सर्वज्ञ समर्था कृपामूर्ती॥ २॥ चिद्घना चिद्रूपा विरंचीच्या बापा। करावी जी कृपा सर्वांभूतीं॥ ३॥ तुझें म्हणविलें उपेक्षिसी जरी। नामा म्हणे हरी ब्रीद काय॥ ४॥

१४७१. घालुनि आसन साधिला पवन। घेतलें जीवन अंतरिक्षीं॥ १॥ परहस्तें तृप्ति नव्हे जी दातारा। कृपा करूणा करा केशिराजा॥ २॥ जीवाचें जीवन सर्वांचें कारण। धांव मजलागून केशिराजा॥ ३॥ अनाथाचा नाथ हें ब्रीद साचार। झणीं माझा अव्हेर करिसी देवा॥ ४॥ विष्णुदास नामा अंकियेला तुझा। विनवी केशिराजा प्रेमसुखें॥ ५॥

१४७२. ज्याचिया रे मनें देखियेलें तुज। त्याची लोकलाज मावळली॥ १॥ नाहीं त्या क्रिया नाहीं तया कर्म। वर्णाश्रमधर्म सुख दुःख॥ २॥ नाहीं देहस्फूर्ति जाती कुळ भेद। अखंड आनंद ऐक्यतेचा॥ ३॥ नामा म्हणे त्याचे चरणरज व्हावे। हेंचि भाग्य द्यावें केशिराजा॥ ४॥

१४७३. येतां जातां थोर कष्टलों गर्भवासीं पडिलों गा उपवासी प्रेमेंविण॥ १॥ बहुतांचा सेवक झालों काकुळती। न पवती विश्रांती तयाचेनी॥ २॥ ऐसें माझें मन शिणलें नानापरी। घालीन आभारीं संतांचिया॥ ३॥ वियोगें संतांच्या व्याकुळ चिंतातूर। हिंडे दारोदार दीनरूपें॥ ४॥ परि कोणी संतांच्या न घालिती चरणीं। तळमळी अनुदिनीं अश्रांत सदा॥ ५॥ माझें माझें म्हणोनी जया घाली मिठी। दिसें तेचि घडी नाहीं होय॥ ६॥ तया शोकानळें संतप्त आंदोळे। गेलें तें न मिळे कदाकाळीं॥ ७॥ न देखत ठायीं देखावया धांवें। भ्रांती भुलले भावें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाना मार्गीं ॥ ८ ॥ तुझा स्वरूपानंदु नाहीं वोळखिला। झाली ते विठ्ठला हानि थोर ॥ ९ ॥ लोहाचा कवळु लागला परिसातें। पढिये सर्वांतें होय जेवी ॥ १० ॥ नामा म्हणे तैसी भेटी संतचरणीं। करूनि त्रिभुवनीं होईन सरता ॥ ११ ॥

१४७४. धांवोनी घालीन संतपायीं मिठी। तेणे ते धुर्जटी वंदीतसे ॥ १ ॥ विठोबाचे गांवा न्या रे एकवेळां। देह आहळला सर्वकाळ ॥ २ ॥ आतां केशिराजा देईं आलिंगनु। तेणें माझी तनु वोल्हावेळ ॥ ३ ॥ नामा म्हणे तूंचि कृपेची माउली। तेव्हां ते साउली करी मज ॥ ४ ॥

१४७५. वाल्मिकादि भीष्म द्रोण कृपाचार्य। द्रुपदतनया दिली भेटी ॥ १ ॥ उद्धव नारद अंबरिष शुक। बळी ध्रुवादिक आले भेटी ॥ २ ॥ देवी देवऋषी गोपाळांसहित। भाष्यकारें नीत शुद्ध केली ॥ ३ ॥ नामा म्हणे आतां पाहूं नको देश। पतितास यश तुझे नामीं ॥ ४ ॥

१४७६. भक्तांची आवडी मोठी त्या देवासी। सद्भक्तिप्रेमासी लांचावला ॥ १ ॥ काय सांगूं आतां तयाचें कौतुक। जेथें ब्रह्मादिक स्तब्ध ठेले ॥ २ ॥ गल आणि गणिका भिल्लिणी कुंटिणी। नेल्या त्या विमानीं बैसोनिया ॥ ३ ॥ अजामीळ खळ कोळी तो वाल्मिक। तारिले अनेक एकसरा ॥ ४ ॥ धर्माचिये घरीं उच्छिष्टें काढी। जाहला वराडी देवराव ॥ ५ ॥ नामा म्हणे कांहीं मागेना तो देव। मुख्य पाहे भाव दृढ त्याचा ॥ ६ ॥

१४७७. जैसा वृक्ष नेणे मान अपमान। तैसे ते सज्जन वर्तताती ॥ १ ॥ येऊनियां पूजा प्राणि जे करिती। त्याचें सुख चित्तीं तया नाहीं ॥ २ ॥ अथवा कोणी प्राणी येऊनि तोडिती। तया न म्हणती छेदूं नका ॥ ३ ॥ निंदास्तुति सम मानिती जे संत। पूर्ण धैर्यवंत साधु ऐसे ॥ ४ ॥ नामा म्हणे त्यांची जरी होय भेटी। तरी जीव शिवा गांठी पडूनि जाय ॥ ५ ॥

१४७८. मंत्रयंत्र दीक्षा सांगतील लक्ष। परि राम प्रत्यक्ष न करी कोण्ही ॥ १ ॥ प्रत्यक्ष दावील राम धरीन त्याचे पाय। आणिकांची काय चाड मज ॥ २ ॥ सर्व कामीं राम भेटविती मातें। जीवेंभावें त्यातें ओंवाळीन ॥ ३ ॥ नामा म्हणे आम्हां थोर लाभ झाला। सोयरा भेटला अंतरींचा ॥ ४ ॥

१४७९. कैसा पांडुरंगा करावा विचार। सांग बा निर्धार साक्षरूपा ॥ १ ॥ काय आलें देवा कैंचें थोरपण। आकारासि कोणीं आणियेलें ॥ २ ॥ आणियेलें आतां आपणासारिखें। गोपिकांसि रूपें दावी नामा ॥ ३ ॥ काय जीवेंभावें सकळां संमत। सगुण अनंत म्हणे नामा ॥ ४ ॥

१४८०. कांसवीचीं पिलीं राहातीं निराळीं। दृष्टि पान्हावली सुधामय ॥ १ ॥ तैसा जवळूनि असेन मी दुरी। दृष्टि मजवरी असों द्यावी ॥ २ ॥ तान्हें वत्स घरीं वनीं धेनू चरे। परी ती हुंबरे क्षणोक्षण ॥ ३ ॥ नामा म्हणे सत्ता करिती निकट। भक्तांसी वैकुंठपद देसी ॥ ४ ॥

१४८१. बाप संतसभा भली। बहुता पुण्यें जोडिली। हृदयींची गोवीं आपुली। संताप्रति निवेदीन ॥ १ ॥ आजि हरिभक्तीचा। हरि स्वभावें उच्चारु। बिठोबा ऋणियारे भक्तांचा। ऋण फेडिती भक्तांचें ॥ २ ॥ अरे हा अनादिचा लाग करी। अरे जन्माची उभरा भरी। आमुचा लागिया श्रीहरी। दों उत्तरीं निवडावा ॥ ३ ॥ आतां असो हें कर्मविभागु। आम्ही मार्गूं आपुला लागूं। जरी हा म्हणेल निःसंगु। तयासी आम्हांसी संबंध कायसा ॥ ४ ॥ जरि हा न लगे आमुचें ऋण। हातीं घेऊनि सुदर्शन। आम्ही करूं हरिकीर्तन। तेथें तिष्ठे कां उभा ॥ ५ ॥ मागें चाळाचिये रीती। परि आम्हांसि आलीया प्रचीति। ज्यासि हरीची सोय संगती। तयासि न मनें अन्य स्थळ ॥ ६ ॥ हरि कौसाळ मल्ल म्हणती। ते अवघी रे जाणावी भ्रांति। सेवा हरिची सांगताती। संत होती हरीकडे ॥ ७ ॥ आणिक एकू आम्हांसी आठवलें। आम्ही भांडूं कां रे एकले। आमुचें केलें काय चालें। या हरिभक्तांवांचूनि ॥ ८ ॥ जे हरि भक्तिविरहित। त्यांचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हरिचरणीं न बोधे चित्त। अवघे मिळूनि हरीचे भक्त। हरि व्हावा म्हणताती॥ ९॥ आणिक एक नवल परि। जो याची सेवा करी। त्याचें सर्वस्व हरी। आणि श्रीहरि नाम मिरवितु॥ १०॥ हरि आळवितां मागा उभा। आठवितां पुढें उभें उभा। हरि ध्यातां हृदयीं उभा। हें तंव सभा विचारा॥ ११॥ आमुचें हो तेंच तुम्हीं विनवावें। आम्हांसि मानलें आघवें। किती येरझारीं शिणवावें। शरण रिघावें श्रीहरि॥ १२॥ विश्व श्रीहरीचें आघावें। म्यां गाऱ्हाणें कवणाशीं द्यावें। लागे त्यासीच मागावें। हरिविण ठावो नसे वो॥ १३॥ वीरराया पंढारिनाथा। आतां अपंगावें शरणागता। जरी उपेक्षिसी सर्वथा। वाट कोणाची पहावी॥ १४॥ नको नको निंदा स्तुति। हाचि भावो वरी भक्ति। मज नेदी पुनरावृत्ति। विष्णुदास म्हणे नामा॥ १५॥

१४८२. तुझिया संतांची अंगसंगसंगति। ते पावलिया विश्रांति संसारिता॥ १॥ श्रवण कीर्तन ध्यान घडे अनायासें। भेदभ्रम नासे तेचि क्षणीं॥ २॥ ऐसें भाग्य मज देसी कवणें काळीं। होईन पायधुळी वैष्णवांची॥ ३॥ वदनीं तुझें नाम वसें निरंतर। राखीन त्याचें द्वार थोर आशा॥ ४॥ येतां जातां मज करिती सावधान। वदनीं कृष्ण कृष्ण म्हणविती॥ ५॥ कामधेनु घरीं असे प्रसवली। ते विकावया नेली दैवहतें॥ ६॥ पंथी पडिला पायां लागे चिंतामणि। पाषाण म्हणवूनि उपेक्षिला॥ ७॥ तैसी परी मज जाहली अधमा। चुकलों तुझ्या वर्मा केशिराजा॥ ८॥ नामा म्हणे थोर खंती वाटे चित्ता। कृपा करूनि माया ठेवी चरणीं॥ ९॥

१४८३. सर्वभावें तूंतें जे ध्याती दातारा। त्यांचिया संसारा तूंचि होसी॥ १॥ ज्याचे चित्तीं नाहीं आणिक कांहीं काम। त्याचा योगक्षेम तूंचि होसी॥ २॥ ऐहिक परत्र जें कांही देखिजे। तें तुवा होईजे मायबाप॥ ३॥ नामा म्हणे माझी भक्ति हे माउली। केशवा वाहिली क्षणमात्रें॥ ४॥

स्मरण.

नाम.

१४८४. अमृताहूनि गोड नाम तुझें देवा। मन माझें केशवा कां बा नेघे॥ १॥ सांग पंढरिराया काय करूं यासी। कां रूप ध्यानासी न ये तुझें॥ २॥ कीर्तनीं बैसतां निद्रें नागविलें। मन माझें गुंतलें विषयसुखा॥ ३॥ हरिदास गर्जती हरिनामाच्या कीर्ति। न ये माझ्या चित्तीं नामा म्हणे॥ ४॥

१५८५. जगदानिया हें ब्रीद आहे जगीं। तें आजि मजलागीं काय झालें॥ १॥ मज पाहतां विसरू पडिला नामाचा। कीं तुज आमुचा वीट आला॥ २॥ सुजाण्याच्या राया परिसें केशिराजा। भक्ताचिया काजा लाजों नको॥ ३॥ भक्तकाजकैवारी हें ब्रीद चराचरीं। तें ठेविलें क्षीरसागरीं लक्ष्मीपाशीं॥ ४॥ अज पाहतां अभिलाष धरिला मानसीं। मग तूं हृशीकेशी विसरलासी॥ ५॥ दीनानाथ ऐसें नाम बहुतांसी वाटिलें। निर्गुण तें उरलें तुजपाशी॥ ६॥ म्हणोनि केशिराजा विसरलासी आम्हां। विनवितसे नामा विष्णुदास॥ ७॥

१४८६. अपराध कोटि हेचि माझी जोडी। पावनत्व प्रौढि नाम तुझें॥ १॥ द्रौपदी-संकटीं वस्त्रें पुरविलीं। धांव त्वां घेतली गजेंद्रासी॥ २॥ उपमन्यालागीं आळी पुरविली। अढळपदीं दिधली वस्ती ध्रुवा॥ ३॥ नामा म्हणे करा करुणा केशवा। तूं माझा विसांवा पांडुरंगा॥ ४॥

१४८७. संसारसागरीं पडलों महापुरीं। सोडवण करीं देवराया॥ १॥ नामाची सांगडी देऊनियां माते। वैकुंठावरूतें नेउनि घाली॥ २॥ काम क्रोध मगर करिती माझा ग्रास। झणीं तूं उदार होशी देवा॥ ३॥ नामा म्हणे झणीं मोकलिसी मातें। नाम तुझें परतें धरलें एक॥ ४॥

१४८८. कीटकीतें भयें स्वयें भृंगी ध्यातां। तैसा तूं अनंता करी आतां॥ १॥ भजनें पाठविलें श्रीहरिरूपासी। नेतो वैकुंठासी नारायण॥ २॥ नाम नारायण अंतीं उद्धारक। नामा म्हणे देख

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भाक माझी ॥ ३ ॥

१४८९. काखे पान अंगणीं उभें उगें। भोजन मागें रामनाम ॥ १ ॥ आणिक नाहीं मज चाड। रामनाम गोड जेऊं घाला ॥ २ ॥ अन्नरस सोवितां मंद पडलें। तुझेंचि नामें रुचीस आलें ॥ ३ ॥ इच्छाभोजनीं तूं एक दाता। नामा विनवी पंढरीनाथा ॥ ४ ॥

१४९०. तान्हेलों भुकेलों तुझेनि नामें निवालों ॥ १ ॥ तहान नेणें भूक नेणें। अखंड पारणें नामीं तुझ्या ॥ २ ॥ अमृतलिंग केशव हा चित्तीं। तेणें नामया तृप्ति अखंडित ॥ ३ ॥

१४९१. मोह भुजंगें डंखिलें। विषय लहरी झांकोळिलें ॥ १ ॥ धांव धांव चक्रपाणि। आणिका न करवे धांवणी ॥ २ ॥ नामा म्हणे निर्विष झालों। केशवनामें उपचारिलों ॥ ३ ॥

१४९२. नाम गाऊं नाम ध्याऊं। नामें विठोबासी पाहूं ॥ १ ॥ आम्ही दैवाचे दैवाचे। दास पंढरिरायाचे ॥ २ ॥ टाळ दिंडी घेउनि हातीं। केशवराज गाऊं प्रीतीं ॥ ३ ॥ नामा म्हणे लाखोली सदा। अनंत नामें बाहूं गोविंदा ॥ ४ ॥

१४९३. नामें तरूं अवघे जन। यमपुरीं घालूं बाण ॥ १ ॥ करूं हरिनामकीर्तन। तोडूं देहाचें बंधन ॥ २ ॥ करूं हरिनामाचा घोष। कुंभपाक पाडूं ओस ॥ ३ ॥ ऐसा नामा यशवंत। बिठोबाचा शरणागत ॥ ४ ॥

१४९४. विठ्ठल आवडी प्रेमभावो। विठ्ठल नामाचा रे टाहो। तुटला हा संदेहो। भवभूळ व्याधीचा ॥ १ ॥ म्हणा उच्चार। कृष्ण हरी श्रीधर। हेंचि नाम आम्हां सार। संसार तरावया ॥ २ ॥ एकतत्त्व त्रिभुवनीं। हेंचि आम्हां हरिपर्वणी। जें गाईजे पुराणीं। वेदशास्त्रांसहित ॥ ३ ॥ नेघों नामाविण कांहीं। विठ्ठल कृष्ण लवलाही। नामा म्हणे तरलों पाहीं। विठ्ठल म्हणतांची ॥ ४ ॥

१४९५. जें जें घडेल तें तें घडो। देह राहो अथवा पडो ॥ १ ॥ नाम न सोडी सर्वथा। दीनबंधु पंढरीनाथ ॥ २ ॥ जैसा जैसा असेल भोग। तैसा तैसा घडेल योग ॥ ३ ॥ नामा म्हणे केशवातें। घडेल तें घडो या देहातें ॥ ४ ॥

१४९६. यज्ञ याग दान व्रत उद्यापन। हें नेणें मी साधन काय करूं ॥ १ ॥ तप जप होम स्वधर्मरक्षण। नव्हे तीर्थाटन काय करूं ॥ २ ॥ गये पिंडदान प्रयागींचे स्नान। कर्म अनुष्ठान नव्हे मज ॥ ३ ॥ भक्ति उपासना देवाचें पूजन। ध्यान उपोषण नव्हे मज ॥ ४ ॥ पृथ्वीचे जन भ्रमण अनुताप संपूर्ण। सारासार खूण नकळे कांहीं ॥ ५ ॥ पुण्य नाहीं गांठी पापाचें संचित। परम पतीत वाटे मज ॥ ६ ॥ माझा देह आहे पातकाचा थारा। मी अपराधी खरा कळलें मज ॥ ७ ॥ पुराणप्रसिद्ध नाम तुझें सार। ऐसें निरंतर बोलताती ॥ ८ ॥ अन्यथा वचन नव्हे हें प्रमाण। तरी ब्रीदें जाण सांडविलीं ॥ ९ ॥ तुम्हां ब्रीद आपुलें जन करणें। तरी नारायणें सांभाळावें ॥ १० ॥ नामेंविण कांही आम्हापाशीं नाहीं। विचारोनी पाहीं पांडुरंगा ॥ ११ ॥ धन वित्त सर्व आमची हे जोडी। नामा म्हणे गोडी नामीं तुझ्या ॥ १२ ॥

१४९७. लपालासि तरी नाम कैसें नेसी। आम्ही अहर्निशीं नाम गाऊं ॥ १ ॥ आम्हांपासूनियां जातां न ये तुज। तें हें वर्म बीज नाम घोकूं ॥ २ ॥ आम्हासी तों तुझें नामचि पाहिजे। मग भेटी सहजें देणें लागे ॥ ३ ॥ भोळीं भक्ते आम्ही चुकलों होतों वर्म। सांपडलें नाम नामयासी ॥ ४ ॥

१४९८. भोगावरी आम्हीं घातिला पाषाण। मरणामरण आणियेलें ॥ १ ॥ नाहीं यासी पतन न होय बंधन। नित्य हेंचि स्नान रामनामीं ॥ २ ॥ नामा म्हणे भाव सर्वांभूतीं करा। आणिक पसारा घालूं नका ॥ ३ ॥

१४९९. नलगे तुझी मुक्ति। नलगे तुझी भक्ति। मज आहे विश्रांति वेगळीच ॥ १ ॥ माझें मज कळलें माझें मज कळलें। माझें मज कळलें प्रेमसुख ॥ २ ॥ न करीं तुझें ध्यान नलगे ब्रह्मज्ञान।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझी आहे खूण वेगळीच॥ ३॥ न करीं तुझी स्तुति न वाखाणी कीर्ति। धरिलीसे ते युक्ति वेगळीच॥ ४॥ न करीं कायाक्लेश इंद्रियां निरोध। माझा आहे बोध वेगळाचि॥ ५॥ नामा म्हणे नाम गाईन निर्विकल्प। येसी आपोआप गवसीत॥ ६॥

१५००. क्रिया कर्म धर्म तूंचि होसी माझें। राखण मी तुझें द्वार देवा॥ १॥ मज पाळीसी तैसें पाळी दीनानाथा। न सोडीं सर्वथा नाम तुझें॥ २॥ गाईन तुझें नाम हृदयीं धरोनि प्रेम। हाचि नित्य धर्म सर्व माझा॥ ३॥ नामा म्हणे विठो कृपेच्या सागरा। तूं आम्हां सोईरा आदिअंतीं॥ ४॥

१५०१. अवघा संसार करीन सुखाचा। जरी झाला दुःखाचा दुर्धरू हा॥ १॥ विठोबाचें नाम गाईन मनोभावें। चित्त तेणें नावें सुखावेल॥ २॥ इंद्रियांचीं कोडें सर्वस्वें पुरती। मनाचे मावळती मनोधर्म॥ ३॥ श्रवणीं श्रवणा नामाचा प्रबंदा। नायकें स्तुतिनिंदा दुर्जनांची॥ ४॥ कुंडल मंडित श्रीमुख निर्मळ। पाहतां हे डोळे निवती माझे॥ ५॥ विटेसहित चरण धरींन मस्तकीं। तेणें तनु सुखी होईल माझी॥ ६॥ संतसमागमें नाचेन रंगणीं। तेणें हाईल धूणी त्रिविध तापा॥ ७॥ नामा म्हणे सर्व सुखाचा सोईरा। न विसंबे दातारा क्षणभरी॥ ८॥

१५०२. नमन करीन द्वारकानायका। पांडव पालका देवराया॥ १॥ आतां मी गाईन गुण नामकीर्ति। जेणें चारी मुक्ति दासी होती॥ २॥ साधक लोकांसी हेंचि पैं साधन। ब्रह्म सनातन वंश होय॥ ३॥ नामा म्हणे सर्व साराचें हें सार जेणें निरंतर सुख वाटे॥ ४॥

प्रेम.

१५०३. जीवन्मुक्त झाले नामाचे गजरीं। सर्वे अधिकारी वैकुंठीचे॥ १॥ देईं देवा मज प्रेमाचा जिव्हाळा। मुक्तिचा सोहळा अखंडीत॥ २॥ सगुणभक्तीस साक्ष काय जाण। कर्म नारायण कर्मनिष्ठ॥ ३॥ नामा म्हणे देवा न ये अनुमाना। वर्णितां पुराणां ठक पडे॥ ४॥

१५०४. मन नेणें तुझ्या मनाचा विश्वास। येर तो हव्यास गोड वाटे॥ १॥ तुझें प्रेम नेणें तुझें प्रेम नेणें। सांग काय करणें केशिराजा॥ २॥ घातलें संसारीं कर्माचे भांडारीं। कृपा नरहरी करीं मज॥ ३॥ नामा म्हणे मी ठायींचाचि अपराधी। केशवा कांहीं बुद्धि सांग मज॥ ४॥

१५०५. येईना अजुनी श्रीकृष्ण सदना। गोंवळा रक्षण मायबाप॥ १॥ कृपा करा देवा कृपा करा देवा। कृपा करा देवा पांडुरंगा॥ २॥ लावूनियां आशा फिरविशी दिशा। प्रेमभाव कैसा दावीं आतां॥ ३॥ बाळेभोळे जन करिती विनंति। मोकलिसी अंतीं म्हणे नामा॥ ४॥

१५०६. अगे तूं माउली संतांची साउली। आठवितां घाली प्रेमपान्हा॥ १॥ प्रेमपान्हा पाजीं अगे माझे आई। विठाईगे मायी बोरसोनी॥ २॥ येतों काकुळती प्रेम पान्ह्यासाठीं। उभा तो धुर्जटी मागें पुढें॥ ३॥ नामा म्हणे जिवें करीन लिंबलोण। ओंवाळीन चरण विटेसहित॥ ४॥

१५०७. विठ्ठल माउली कृपेची कोंवळी आठवितां घाली प्रेमपान्हा॥ १॥ मज कां मोकलिलें कवणा निरविलें। कठिण कैसें झालें हृदय तुझें॥ २॥ तुजवीण जिवलग दुजें कोण होईल। तें माझे साहिल जड भारी॥ ३॥ तूं माझी माउली मी वो तुझा वत्स। परतों परतों वाट पाहें तुझी॥ ४॥ माता मोहे कैसी न विसंबे सर्वथा। अंतरींची व्यथा कोण जाणे॥ ५॥ नामा म्हणे विठ्ठले कां गे रुसलीसी। केव्हा सांभाळिसी अनाथनाथे॥ ६॥

१५०८. डोळे शिणले पाहतां वाटुली। अवस्था दाटली हृदयामाजीं॥ १॥ तू माझी जननी सरसीये सांगातिणी। विठ्ठले धांवोनी घेईं क्षेम॥ २॥ तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज। क्षुधें पीडलों मज विसरलीसी॥ ३॥ तूं माझी कुरंगी मी तुझें पाडस। गुंता भवपाश सोडी माझा॥ ४॥ तूं माझी माउली मी तुझी तान्हुली। वोरस वो घालीं प्रेमपान्हा॥ ५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामा म्हणे आस पुरवावी माझी। तान्हुल्या पाजी प्रेमपान्हा ॥ ६ ॥

१५०९. येई गे विठ्ठले अनाथाचे नाथे। माझे कुळदैवते पंढरीये ॥ १ ॥ पंचही प्राणांचा उजळोनी दीप। सुंदर श्रीमुख ओंवाळीन ॥ २ ॥ मनाचा प्रसाद तुजलागी केला। रंगभोग आपुला घेऊनि राहे ॥ ३ ॥ आनंदाचा भोग घालीन आसनीं। वैंकुंठवासिनी तुझ्या नांवें ॥ ४ ॥ आपुलें म्हणवावें सनाथ करावें। भावें संचरावें हृदयघटीं ॥ ५ ॥ नामा म्हणे माझे पुरवीं मनोरथ। देईं सदोदित प्रेमकळा ॥ ६ ॥

१५१०. कृपावंत समर्थ म्हणूनि करीं आर्त। येईन सांवरत पांडुरंगे ॥ १ ॥ मज कां विसंबली विठ्ठल माउली। तनु तृषावली जीव प्रविण ॥ २ ॥ तूं माझें जीवन राम जनार्दन। हृदयीं भरी पूर्ण प्रेमरस ॥ ३ ॥ अमृताच्या करें कांसवीच्या भरें। कुरवाळीं त्वरें देह माझा ॥ ४ ॥ पूर्ण पान्हा देईं निववीं हृदयीं। येई वो कान्हाई सांवळिये ॥ ५ ॥ नामा म्हणे पावें जीवा शीण न साहे। वेगी लवलाहे पाजी पान्हा ॥ ६ ॥

१५११. तूं माझी माउली मी वो तुझा तान्हा। पाजीं प्रेम पान्हा पांडुरंगें ॥ १ ॥ तूं माझी माउली मी तुझें वासरूं। नको पान्हा चोरूं पांडुरंगे ॥ २ ॥ तूं माझी हरिणी मी तुझें पाडस। तोडी भवपाश पांडुरंगे ॥ ३ ॥ तूं माझी पक्षिणी मी तुझें अंडज। चारा घाली मज पांडुरंगे ॥ ४ ॥ नामा म्हणे होसी भक्तीचा वल्लभ। मागे पुढें उभा सांभाळिसी ॥ ५ ॥

१५१२. विसांवा विठ्ठल सुखाची साउली। प्रेमपान्हा घाली भक्तांवरी ॥ १ ॥ दाखवी चरण दाखवी चरण। दाखवी चरण नारायणा ॥ २ ॥ विठ्ठल आचार विठ्ठल विचार। दावीं निरंतर पाय आतां ॥ ३ ॥ नामा म्हणे नित्य बुडालों संसारीं। धांवोनियां धरीं हातीं मज ॥ ४ ॥

१५१३. घेसी तेव्हां देसी ऐसा अससी उदारा। काय जाऊनियां तुझे कृपणाचे द्वारां ॥ १ ॥ उच्छिष्टाचीं शितें न टाकिसी बाहेरीं। कोणीं दिधली देवा एवढी भूषणाची थोरी ॥ २ ॥ सोडीं ब्रीद देवा आतां नव्हेसी अभिमानी। पतितपावन नाम तुझें ठेवियेलें कोणीं ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा तुझे न लगे मज कांहीं। प्रेम असो द्यावें कीर्तनाचे ठायीं ॥ ४ ॥

१५१४. भुक्ति मुक्ति मागों तुज। माझे हांसती पूर्वज ॥ १ ॥ मज प्रेम पढियें देवा। न मागे आन कांहीं केशवा ॥ २ ॥ चाड धरीन ब्रह्मज्ञानीं। तरी मज व्यर्थ व्याली जननी ॥ ३ ॥ मोक्ष मागूं तुजप्रति। संत छळवादें हांसती ॥ ४ ॥ होऊं सिद्धीचा साधिता। दैवें सांडिलें सर्वथा ॥ ५ ॥ नामा म्हणे तूं जाणसी। माझा भाव हृषीकेशी ॥ ६ ॥

१५१५. असोनि न दिसे लौकिक वेव्हारीं। ऐसें निरंतरीं लपवीं मातें ॥ १ ॥ तुझे स्वरूपीं माझें असो अनुसंधान। वरी प्रेमजीवन देईं देवा ॥ १ ॥ मनाचिये वृत्ति अंतरापासूनि। झोंबों नेदी दोन्ही कामक्रोध ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसें पाळिशील मातें। तरी मी जीवें तूतें न बिसंवें ॥ ४ ॥

१५१६. उडाली पक्षिणी गेली अंतराळीं। चित्त बाळाजवळी ठेवूनियां ॥ १ ॥ तैसें माझें मन राहो कां ईश्वरीं। मग सुखें संसारीं असेन कां ॥ २ ॥ धेनु चरे वनीं वत्स असे घरीं। चित्त वत्सावरी ठेवूनि फिरे ॥ ३ ॥ दुडीवरी दुडी सखिसी गोष्टी करी। चित्त दुडीवरी ठेवूनियां ॥ ४ ॥ विष्णुदास नामा विनवी परोपरी। हें प्रेम श्रीहरी द्यावें मज ॥ ५ ॥

१५१७. येईं वो कृपावंते अनाथाचे नाथे। निवारीं भवव्यथे पांडुरंगे ॥ १ ॥ मी बालक भुकाळु तूं माउली कृपाळु। करीं माझा सांभाळु पंढरिराया ॥ २ ॥ माझें माहेर पैं नित्य आठवे अंतरीं। सखा विटेवरी पांडुरंग ॥ ३ ॥ मी देह तूं चैतन्य मी क्षुधार्थि तूं अन्न। तृषार्थि तूं जीवन पांडुरंगा ॥ ४ ॥ मी चकोर तूं चंद्र मी सरिता तूं सागर। मी याचक तूं दातार पांडुरंगा ॥ ५ ॥ मी धनलोभी शुद्ध तूं पूर्ण कनककुंभ। मी मगर तूं अंभ पांडुरंगा ॥ ६ ॥ मी चातक तूं मेघ मी प्रवृत्ति तूं बोध। मी शुष्कनदी तूं ओघ पांडुरंगा ॥ ७ ॥ मी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दोषी तूं तारक मी भृत्य तूं नायक। मी प्रजा तूं पाळक पांडुरंगा॥ ८॥ मी पाडस तूं कुरंगिणी मी अंडज तूं पक्षिणी। मी अपत्य तूं जननी पांडुरंगा॥ ९॥ मी भक्ति तूं निजसोय मी ध्यान तूं ध्येय। मी आडळ तूं साह्य पांडुरंगा॥ १०॥ ऐसी जे जे माझी विनंती ते तुजचि लक्ष्मिपती। नित्य सुख सांगाती पाडुरंगा॥ ११॥ शीघ्र येईं वो श्रीरंगे। भक्त मान मानसरंगे। प्रेमपान्हा दे गे पांडुरंगा॥ १२॥

१५१८. बहुत दिवस तुमचे गांवीं। आतां कृपा असों द्यावी॥ १॥ आम्ही जातों आपुल्या गांवा। विठोबा लोभ असों द्यावा॥ २॥ तुझे पायीं माझें मन। माझे ठायीं तुझा प्राण॥ ३॥ लिखित पत्र पाठवावें। माझें स्मरण असों द्यावें॥ ४॥ नामा म्हणे जी केशवा। अखंड प्रेमभाव द्यावा॥ ५॥

१५१९. प्रेमपिसें भरलें अंगीं। गीतसंगें नाचों रंगीं॥ १॥ कोणे वेळे काय गाणें। हें तों भगवंता मी नेणें॥ २॥ वारा वाजे भलतया। तैसी माझी रंग छाया॥ ३॥ टाळमृदंग दक्षिणेकडे। आम्ही गातों पश्चिमेकडे॥ ४॥ बोले बाळक बोबडें। तरी तें जननीये आवडे॥ ५॥ नामा म्हणे गा केशवा। जन्मोजन्मीं देईं सेवा॥ ६॥

१५२०. टाळ दिंडी हातीं उभा महाद्वारी। नामा कीर्तन करी पंढरीये॥ १॥ आवडीचेनि सुखें वोसंडतु प्रेमें। गातों मनोधर्मे हरिचे गुण॥ २॥ सांडोनि अभिमान नाचें धरोनि कान। अंतरीं ते ध्यान बिठोबाचें॥ ३॥ श्रीहरिचीं उत्तम जन्मकर्मनामें। घेतलीं त्या प्रेमें सुखरूपें॥ ४॥ संतांची विश्रांति ज्ञानियांचें गुज। जें कां मुक्तिबीज मोक्षदानी॥ ५॥ कृष्णा विठ्ठला हरी मुकुंदा मुरारी। अच्युता नरहरी नारायणा॥ ६॥ गोवर्धनधर गोपीमनोहर। भक्तकरुणाकर पांडुरंगा॥ ७॥ सकळ मंगळनिधी पातकभंजना। हरी जगजीवना परमानंदा॥ ८॥ तूंचि एक सकळ आदिमध्यअंतीं। नित्य सुखसंपत्ति सज्जनांची॥ ९॥ तूंचि माझा श्रोता तूंचि माझा वक्ता। तूंचि घेता देता प्रेमसुख॥ १०॥ विष्णुदास नामा विनवी पुरुषोत्तमा। सोडवी भवश्रमापासूनियां॥ ११॥

१५२१. तुझ्या पायीं चित्त रंगलेंसें माझें। नाहीं केशीराजें ऐसें केलें॥ १॥ उठवितां काय होईल संतोष। मज अभाग्यास मोकलीलें॥ २॥ प्रपंच काबाडी घाली मज दृढ। नको वाडेंकोडें क्षणीं देवा॥ ३॥ नामा शिंपियाचा विनवी समस्तां। नको भंगूं आतां प्रेम पान्हा॥ ४॥

१५२२. बोलूं ऐसे बोले। जेणें बोलें विठ्ठल डोले॥ १॥ प्रेम सर्वांगाचे ठायीं। वाचे विठ्ठल रखुमाई॥ २॥ नाचूं कीर्तनाचे रंगीं। ज्ञानदीप लावूं जगीं॥ ३॥ परेहुनि परते घर। तेथें राहूं निरंतर॥ ४॥ सर्व सत्ता आली हातां। नामयाचा खेचर दाता॥ ५॥

१५२३. आम्ही तुझे असों एकचि वोळघे। नित्य परमानंदें वोसंडित॥ १॥ या परपार न दिसे सर्वथा। केले येतां जातां गर्भवास॥ २॥ नामा म्हणे चित्तीं विठ्ठलाचें प्रेम। संकल्प विकल्प मन मावळलें॥ ३॥

१५२४. तुझें प्रेम माझे हृदया आवडी। चरण मी न सोडीं पांडुरंगा॥ १॥ कशासाठीं शीण थोडक्याकारणें। काय तुज उणें होय देवा॥ २॥ चंद्र चकोराचा पुरवी सोहळा। काय त्याच्या कळा न्यून होती॥ ३॥ नामा म्हणे मज अनाथा सांभाळीं। हृदयकमळीं स्थिर राहे॥ ४॥

१५२५. नामयाचें प्रेम केशवचि जाणें। केशवासी राहणें नाम्यापाशीं॥ १॥ केशव तोचि नामा नामा तोचि केशव। प्रेमभक्ति भाव मागतसे॥ २॥ विष्णुदास नामा उभा केशवद्वारीं। प्रेमाची शिदोरी मागतसे॥ ३॥

१५२६. प्रेमफांसा घालूनियां गळां। जित धरीलें गोपाळा॥ १॥ एक्या मनाची करूनि जोडी। विठ्ठल पायीं घातली बेडी॥ २॥ हृदय करूनि बंदिखाना। विठ्ठल कोंडुनी ठेविला जाणा॥ ३॥ सोहं शब्दे मार केला। विठ्ठल काकुलती जाला॥ ४॥ नामा म्हणे विठ्ठलासी। जीवें न सोडीं सायासी॥ ५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१५२७. विठ्ठल आमुचें सुखाचें जीवन। विठ्ठल स्मरण प्रेम पान्हा॥ १॥ विठ्ठलचि ध्यावों विठ्ठलचि गावों। विठ्ठलचि पाहों सर्वांभूतीं॥ २॥ विठ्ठलपरतें न दिसे सर्वथा। कल्प येतां जातां गर्भवास॥ ३॥ नामा म्हणे चित्तीं आहे सुखरूप। संकल्प विकल्प मावळती॥ ४॥

१५२८. व्यापकापरीस मन म्या केलें वाड। सांपडलें गोड प्रेमसुख॥ १॥ जिकडे पाहें तिकडे विठोबा अवघा। भीमा चंद्रभागा पुंडलीक॥ २॥ बाहेरीं भीतरीं सर्व निरंतरीं। हें ब्रह्माड पंढरी झाली मज॥ ३॥ महुरले तरुवर फळीं पुष्पीं भार। तेंचि निर्विकार सनकादिक॥ ४॥ आवडीचा आनंदु तोचि वेणुनादु। अनुभवें गोविंदु गोपवेषें॥ ५॥ नामा म्हणे विठो भक्तीच्या वल्लभा। मागे पुढें उभा सांभाळित॥ ६॥

१५२९. तूं आवकाश मी भूमिका। तूं लिंग मी साळुंका। तूं समुद्र मी द्वारका। स्वयें दोन्ही॥ १॥ तूं वृंदावन मी चिरी। तूं तुळशी मी मंजरी। तूं पांवा मी मोहरी। स्वयें दोन्ही॥ २॥ तूं चांद मी चांदणी। तूं नाग मी पद्मिणी। तूं कृष्ण मी रुक्मिणी। स्वयें दोन्ही॥ ३॥ तूं नदी मी थडी। तूं तारूं मी सांगडी। तूं धनुष्य मी भातोडी। स्वयें दोन्ही॥ ४॥ तूं वेद मी स्तविता। तूं शास्त्र मी गीता। तूं गंध मी अक्षता। स्वयें दोन्ही॥ ५॥ नामा म्हणे पुरुषोत्तमा। स्वयें जडलों तुझ्या प्रेमा। मी कुडी तूं आत्मा। स्वयें दोन्ही॥ ६॥

१५३०. जीवन्मुक्त केले नामाचे गजरीं। सेवक अधिकारी विठोबाचे॥ १॥ कांहीं उतराई होऊं तुज देवा। उदारा केशवा मायबापा॥ २॥ अंतरीं देऊनि प्रेमाचा जिव्हाळा। मुक्तीचा सोहोळा भोगविसी॥ ३॥ नामा म्हणे आम्हा दिनाचें माहेर। हृदयीं निरंतर ध्यान करूं॥ ४॥

आर्चन, वंदन, भेट.

१५३१. वारंवार काय विनवावें आतां। समजावें चित्ता आपुलिया॥ १॥ तूं काय म्हणसी कंटाळेल हाची। जाईल उगाचि उठोनियां॥ २॥ मजलागीं देवा जासी चुकवोनी। आणीन धरूनि तुजलागीं॥ ३॥ दृढ भक्तिभाव प्रेमाचा हा दोरा। बांधीन सत्वर तुझे पायीं॥ ४॥ नामा म्हणे बोल काय विठो आतां। भेटावें सर्वथा यांत बरें॥ ५॥

१५३२. संसारषड्चक्री पडिलों महाडोहीं। सोडवण्या येईं पांडुरंगा॥ १॥ दवडादवडी धांव दवडादवडी धांव। नको भक्तिभाव पाहों माझा॥ २॥ माझी चित्तवृत्ति अज्ञान हे गाई। व्याघ्रें धरिली आहे अहंकारें॥ ३॥ पंचाननीं मज घेतलें वेढोनि। नेताति काढोनि प्राण माझा॥ ४॥ गजेंद्राकारणें घातली तुवां उडी। तैसा लवडसवडी पावें मज॥ ५॥ नामा म्हणे मज तुझाचि आधार। पोसणा डिंगर जन्मोजन्मीं॥ ६॥

१५३३. येईं हो विठ्ठले भक्तजनवत्सले। करुणा कल्लोळें पांडुरंगे॥ १॥ सजलजलदघन पीतांबर परिधान। येईं उद्धरणें केशिराजे॥ २॥ नामा म्हणे तूं विश्वाची जननी। क्षिराब्धिनिवासनी जगदंबे॥ ३॥

१५३४. येईं वो विठ्ठले मजलागीं झडकरी। बुडतों भवसागरी काढी मज॥ १॥ आकांता अवसरी स्मरलासे गजेंद्रें। दीनानाथ ब्रिदें सत्य केलीं॥ २॥ द्रौपदी संकटीं स्मरलीसे वनवासी। धांवोनि आलासि लवडसवडी॥ ३॥ प्रल्हादें तुजलागीं स्मरिलें निर्वाणीं। संकटापासोनि राखियेलें॥ ४॥ नामा म्हणे थोर पीडिलों गर्भवासें। अखंड पाहतसे वाट तुझी॥ ५॥

१५३५. जननिये जिवलगे येवो पांडुरंगे। शिणलों भेटी दे गे एक वेळां॥ १॥ त्राहे त्राहे त्राहे कृपादृष्टी पाहें। येऊनियां राहें हृदयामाजीं॥ २॥ वासनेच्या संगें शिणलें माझें चित्त। विषयाचे आघात पडती वरी॥ ३॥ नाहीं तुझी सेवा केली मनोधर्में। संसार संभ्रमें भ्रांत सदा॥ ४॥ नाहीं तुझें नाम गाइलें आवडी। वाळली कुवंडी त्रिविधतापें॥ ५॥ नामा म्हणे आई धांवें लवलाही। बुडतों चिंताडोहीं तारीं मज॥ ६॥

१५३६. भेटीची आवडी उत्कंठित चित्त। न

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राहे निवांत एके ठायीं ॥ १ ॥ जया देखे तया हेचि पुसे मात। कां मज पंढरीनाथ बोलविना ॥ २ ॥ कृपेचा सागर बिठोबा लोभापर। माझा कां विसर पडिला त्यासी ॥ ३ ॥ माहेरीची आस दसरा दिवाळी। बाहे ठेवूनि निढळ वाट पाहे ॥ ४ ॥ सखे वारकरी पंढरीस जाती। निरोप तया हातीं पाठवीन ॥ ५ ॥ निर्बुजला नामा कंठीं धरिला प्राण। करीतसें ध्यान रात्रंदिवस ॥ ६ ॥

१५३७. केधवां भेटसी माझिया जिवलगा। ये गा पांडुरंगा मायबापा ॥ १ ॥ आशा धरूनि पोटीं दिवस लेखी बोटीं। प्राण ठेउनि कंठी वाट पाहे ॥ २ ॥ चित्त निरंतर ठेउनी महाद्वारीं। अखंड पंढरी हृदयीं वसे ॥ ३ ॥ श्रीमुख साजिरें कुंडलें गोमटीं। तेथें माझी दृष्टि बैसलीसे ॥ ४ ॥ आसवें दाटूनि पसरूनि बाहे। नामा वाट पाहे विठ्ठलाचि ॥ ५ ॥

१५३८. आस धरोनि पोटीं। दिवस लेखीं बोटीं। प्राण ठेऊनि कंठीं वाट पाहें ॥ १ ॥ भेटसी केधवां माझ्या जीवलगा। येईं पांडुरंगा मायबापा ॥ २ ॥ चित्त निरंतर तुझ्या महाद्वारीं। अखंड पंढरी हृदयीं वसे ॥ ३ ॥ श्रीमुख साजिरें कुंडलें गोमटी। तेथें माझी दृष्टि बैसलीसे ॥ ४ ॥ कटीं कर विटे समचरण साजिरे। देखावया झुरे मन माझें ॥ ५ ॥ असुखें दाटलीं नेत्रपात्रें वाहे। नामा वाट पाहे रात्रंदिवस ॥ ६ ॥

१५३९. तूं माझी जननी काय गे साजणी। विठ्ठले धांवोनि भेट देईं ॥ १ ॥ डोळे माझे शिणले पाहतां वाटोली। अवस्था दाटली हृदयामाजीं ॥ २ ॥ मी तुझे पाडस गुंतलों भवपाशीं। माते धीर तुजसी कैसा धरवला ॥ ३ ॥ तूं माझी पक्षिणी मी तुझा अंडज। क्षुधें पीडिलों मज विसरशी ॥ ४ ॥ तूं माझी माउली मी तुझें वोरस। पुढती पुढती वास पाहतसे ॥ ५ ॥ नामा म्हणे विठ्ठले आस पुरवीं माझी। ओरसे वेळा पाजीं प्रेमपान्हा ॥ ६ ॥

१५४०. मुक्तपण आम्हां नको देवराया। भेटी मज पायां पुरे बापा ॥ १ ॥ चातुर्यपणाची नको मज चाड। प्रेमभाव गोड पुरे बापा ॥ २ ॥ खाय भिल्लिणीचीं फळें आवडतीं। काम त्याचे चित्तीं दुजा भाव ॥ ३ ॥ भावापाशीं देव उभा सर्वकाळ। खेचरानें बळें दाखविला ॥ ४ ॥ नामा म्हणे मज सद्‌गुरूची सत्ता। आम्हांसि मुक्तता नको बापा ॥ ५ ॥

१५४१. तूं माय माउली म्हणोनि आस केली। विठ्ठलें पाहिली वाट तुझी ॥ १ ॥ मज कां मोकलिलें कवणा निरविलें। कठीण कैसें झालें हृदय तुझें ॥ २ ॥ तुजविण जिवलग मज कोण होईल। तो 'माझें जाणेल जडभारी ॥ ३ ॥ आम्ही अपराधी तुझे शरणागत। तुजविण माझें हित कोण करी ॥ ४ ॥ करुणा कल्लोळवाणी अमृतसंजीवनी। चिंतिल्या निर्वाणीं पाव वेगें ॥ ५ ॥ नामा म्हणे तुजवीण झालों परदेशी। केव्हां सांभाळिसी अनाथनाथा ॥ ६ ॥

१५४२. भवव्याघ्र देखोनि भ्याले माझे डोळे। झालेंसें व्याकुळ चित्त माझें ॥ १ ॥ पाव गा पाव गा पाव गा विठोबा। पाव गा विठोबा मायबापा ॥ २ ॥ तूं भक्तकैवारी कृपाळुवा हरी। येईं गा झडकरी देवराया ॥ ३ ॥ नामा म्हणे नेणें आन तुजवांचूनि। जनक जननी केशिराजा ॥ ४ ॥

१५४३. कां गा मोकलीलें माझिया विठ्ठला। धांवा तुझा केला मायबापा ॥ १ ॥ त्रितापें तापलों बहू गा पोळलों। चिखलीं पडिलों दिनानाथा ॥ २ ॥ यालागीं तुजला भाकितों करुणा। धांवसी निर्वाणा पांडुरंगा ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा अनाथाच्या नाथा। रुक्मिणीच्या कांता घालीं उडी ॥ ४ ॥

१५४४. वाढवेळ कां लाविला। कोण्या भक्तानें गोंविला ॥ १ ॥ झडकर ये बा विठ्ठला। कंठ आळवितां शोकला ॥ २ ॥ वाट पाहें दाही दिशा। जिवीं धरोनि भरंवसा ॥ ३ ॥ प्राण केव्हां येईल झामा। आलिंगीन चतुर्भुजा ॥ ४ ॥ नामा गहिंवरें दाटला। देह धरणिये लोटला ॥ ५ ॥

१५४५. जीवलग कोण तुजविण होईल। जें माझें जाणेल जडभारी ॥ १ ॥ अन्यायी अपराधी तुझा शरणागत। तुजवीण हित कोण करी ॥ २ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामा म्हणे आई धांवें लवलाही। बुडतों या डोहीं दंभाचिया॥ ३॥

१५४६. काय पांडुरंगा सांग म्यां करावें। शरण कोणा जावें तुम्हांविण॥ १॥ पाहतांना वाट भागले लोचन। कठिणच मन केलें तूंवां॥ २॥ ऐकिली म्यां कानीं कीर्ति तुझी देवा। उठलासे देवा त्याचि गुणें॥ ३॥ अनाथ अन्यायी काय मी करीन। दयावंत खूण सांगसी तूं॥ ४॥ नामा म्हणे आस पूर्ण कीजे देवा। रूपडें दाखवा नेटें पाटें॥ ५॥

१५४७. तूं माय माउली आस केली थोर। वास निरंतरी पंढरीये॥ १॥ रूपें तीं दखवीं एक वेळां मज। धरूं नको लाज केशिराजा॥ २॥ आपणा समान करी कोणे काळीं। तंव वनमाळी देव म्हणूं॥ ३॥ नामा म्हणे तुज भक्तिचिये पिसें। पुरविसी आस दुर्बळाची॥ ४॥

१५४८. मयुरध्वज राजा महापापी जाण। उभा नारायण जोडी हात॥ १॥ कर्वत आणिसी सकळां देखतां। कांतिसी तत्त्वता मांस त्याचें॥ २॥ कपोतणीमागें पारध्याचा वेष। दावी हृषीकेश रूप त्यासी॥ ३॥ नामा म्हणे तुझे करणें उचित। कां मज प्रचित नये देवा॥ ४॥

१५४९. अज्ञान बाळक कोमाइलें जनीं। जाणते जननी तान भूक॥ १॥ तैसें मजलागीं होऊनि कृपाळ। करीं गा सांभाळ अनाथाचा॥ २॥ वत्सालागीं धेनु येतसे वोरसे। पान्हा स्तनीं जैसे वोसंडती॥ ३॥ नामा म्हणे तुज हे न साहे उपमा। मी कुडी तूं आत्मा केशवराजा॥ ४॥

१५५०. अनाथ अनाथ म्हणती मातें। अनाथनाथ म्हणती तूंतें॥ १॥ आपुलें ब्रीद साच करीं। भेट मज एक वेळ मुरारी॥ २॥ पतीत पतीत म्हणती मातें। पतीतपावन म्हणती तूंतें॥ ३॥ दीन दीन म्हणती मातें। दीनानाथ म्हणती तूंतें॥ ४॥ आर्त आर्त म्हणती मातें। आर्तपरायण म्हणती तूंतें॥ ५॥ नामा म्हणे आइकें सुजाणा। नाइकसी तरी लाज कवणा॥ ६॥

१५५१. तुवां येथें कीं मज तेथें न्यावें। खंती माझ्या जीवें मांडियेली॥ १॥ माझें तुजविण येथें नाहीं कोणी। विचारावें मनीं पांडुरंगा॥ २॥ नामा म्हणे वेगीं यावें करुणाघना। जातो माझा प्राण तुजलागीं॥ ३॥

१५५२. बोलावूं पाठवूं एवढी कैंची शक्ति। या रंगा श्रीपती त्वां बा यावें॥ १॥ येईं गा विठ्ठला बाहातसें आतां। या रंगीं अनंता त्वां बा यावें॥ २॥ धांवत त्वां यावें धांवत त्वां यावें। या रंगी नाचावें पांडुरंगा॥ ३॥ तिन्हीं त्रिभुवनीं तुझीच करणी। ठाव मागे चरणीं नामदेव॥ ४॥

१५५३. दुरुनी आलों तुझे भेटी। सांगावया जीवींची गोष्टी॥ १॥ बोल गा बोल मजशीं कांहीं। दृष्टी वळवूनी मजकडे पाही॥ २॥ अरें तूं कृपाळु दीनांचा। महा उदार थोर मनाचा॥ ३॥ भक्तें पुंडलिकें गोविलासी लोभें। प्रीतीच्या प्रेमें वळलासी वल्लभे॥ ४॥ युगें अठ्ठावीस भरलीं। धणी अजुनी नाहीं पुरली॥ ५॥ प्राण होती माझे कासाविस। नामा म्हणे कां धरिलें उदास॥ ६॥

१५५४. कां हो मोकलिलें कवणा निरविलें। कठीण कैसें झालें चित्त तुझें॥ १॥ करुणा-कल्लोळणी अमृत संजीवनी। चिंतिल्या निर्वाणी पावें वेगीं॥ २॥ अपराधी अनाथ जरी झालें अमंगळ। करावा सांभाळ लागे त्याचा॥ ३॥ नामा म्हणे विठ्ठले आलों मी तुजपाशीं। केधवा भेटसी अनाथनाथा॥ ४॥

१५५५. कस्तुरीचा टिळा रेखिला कपाळीं। तेणें ते शोभली मूर्ति बरी॥ १॥ बरवा बरवा विठ्ठल गे बाई। वर्णावया साही शिणताती॥ २॥ श्रीवत्सलांछन वैजयंती गळां। नेसला पाटोळा तेजःपुंज॥ ३॥ पाऊलें समान विटेवरी नीट। नामा म्हणे भेट ध्यावी त्याची॥ ४॥

१५५६. नको गा मोकलूं दीना पंढरीनाथा। तुजविण आतां कोण धांवें॥ १॥ अपराधाच्या कोटी पाहूं नको कांहीं। ये गे विठाबाई झडकरी॥ २॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझ्या दोषासाठीं पाठमोरा होसी। पावन ब्रीदासी लागे बोल॥ ३॥ नामा म्हणे जननी तूंचि चराचर। तारिले अपार जड जीव॥ ४॥

१५५७. वेदपरायण मनीं तो ब्राह्मण। चित्त समाधान संतुष्ट सदा॥ १॥ येरा माझें नमन सर्वसाधारण। ग्रंथाचें राखण म्हणोनियां॥ २॥ शास्त्रज्ञपंडित तोचि मी बहुमानी। जो आपणातें जाणोनि तन्मय झाला॥ ३॥ पुराणिक ऐसा मानितो कृतार्थ। विषयीं विरक्त विधिपाळी॥ ४॥ मानीं तो हरिदास ज्या नामीं विश्वास। मी त्याचा दास देहभावें॥ ५॥ नामा म्हणे ऐसें कईं भेटविसी विठ्ठला। त्यालागीं फुटला प्राण माझा॥ ६॥

१५५८. भेटिलागीं माझा फुटतसे प्राण। काया वाचा मनें जीवेंभावें॥ १॥ जया देखे तया पुसें हेंचि मात। कैं मज अनंत बोलावील॥ २॥ संतसमागमें दसरा दिवाळी। ठेवूनि निढळी वाहे सदा॥ ३॥ सखे पंढरीचे येती वारकरी। आर्त निरंतरी त्यांचे पायीं॥ ४॥ नामा म्हणे ऐसे करी दंडवत। आमुचे पुनीत मायबापा॥ ५॥

१५५९. संसाराची सोय चुकले बापुडे। केशव मागें पुढें सांभाळित॥ १॥ आळीकर नामें खेळे महाद्वारीं। आंतून बाहेरी न वचे कांहीं॥ २॥ संतां तें देखोनी मिठी घाली चरणीं। कुरवंडी करुनी देह टाकी॥ ३॥ ऐसे निज बोधें राहिले निवांत नामा राहे एक केशवचरणीं॥ ४॥

१५६०. तळीयाचे पाळीं वृक्षावरी बैसुनी। कैसा चातक बोभाईतोरे। ताहाना फुटे परी उदक नेघे। मेघाची वाट पाही रे॥ १॥ तैसा येईं बा कान्हया येईं बा कान्हा। जीवींच्या जीवना केशीराजा रे॥ धृ०॥ टाळघोळ कल्लोळ नानापरीचीं वाद्यें। वाजती-वोजा रे। रानींच्या मयूरा नृत्य पैं न ये। तुजवीण मेघराजा रे॥ २॥ जलेवीण जळचर पक्षीवीण पिलीयासी। तैसें झालें नामयासीरे। शंख चक्र गदा पद्म पीतांबरधारी। अझूनि कां न पावशी रे॥ ३॥

१५६१. तुझा विष्णुदास म्हणताती जगीं। नाहीं माझे अंगीं प्रेमभावो॥ १॥ तेणें थोर लाज वाटे पंढरिराया। ये माझ्या हृदया एक वेळा॥ २॥ द्वैताद्वैतभाव आहे माझे ठायीं। अनुभव नाहीं स्वरूपाचा॥ ३॥ देखावेखीं बैसें संतांचे संगतीं। नाहीं माझे चित्तीं ध्यान तुझें॥ ४॥ नामा म्हणे माझा उजळ करीं माथा। भेटी देउनी संतां निरवीं मज॥ ५॥

१५६२. गरुडावरी हरी बैसोनीयां य़ावें। आम्हांसि रक्षांवें दीनबंधू॥ १॥ अच्युता केशवा मुकुंदा मुरारी। येईं लवकरी नारायणा॥ २॥ ऐकोनियां धांवा धांवला अनंत। उभा गरुडासहित मागें पुढें॥ ३॥ वैजयंती माळ किरीट कुंडलें। नामयानें केलें निंबलोण॥ ४॥

१५६३. नेत्र माझे रोडले आठवें माहेर। कैं भेटेन निरंतर बाईयांनो॥ १॥ चतुर्भुज विठ्ठल कैं देखेन डोळां। भक्तांचा जिव्हाळा जीव माझा॥ २॥ येणें शोकें रे वाळलों शरीरीं। आठव तो हरी मी काय सांगूं॥ ३॥ चारी भुजा उचलोनि क्षेम देईल। कैं मज नेईल पंढरपुरा॥ ४॥ काम चित्तीं नलगे आतां कांहीं मज। कैं भेटेल राजा पंढरीचा॥ ५॥ त्यासि आठवितां हृदय वो फुटे। तो कैं मज भेटे बाप माझा॥ ६॥ येणें देह न पवती मग काय येउनी करिती। सांगा काकुळती रखुमाईसी॥ ७॥ वामांगी रुक्मिणी कैं देखेन दोन्ही नयनीं। फेडीन पारणीं डोळियांचीं॥ ८॥ जंव जंव आठवती तंव तंव उभड येती। कोणी न सांगती विठ्ठलासी॥ ९॥ ऐसें श्रवणीचें सुख कैंचें नवो देखे। येथें येऊनि बहुतेकें काय करिती॥ १०॥ गरुडटके अवघे आकाशीं ओळले। येवोनी सांगितलें विष्णुलोकीं॥ ११॥ मग जावोनियां तया ठाया पाहु पंढरिराया। लागेन मी पायां तयाचिये॥ १२॥ याचि लागोनियां आलों लवडसवडी। सांडियेली थडी मग रोखिलासी॥ १३॥ गरुडावरी आरुढ बाप माझा झाला। मज न्यावया आला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बाईयांनो ॥ १४ ॥ येणें हर्षें संतोष कोठेंच न माये। भेटला विठ्ठल माय रुक्मिणीसहित ॥ १५ ॥ नामा जातसे माहेरा एकला पंढरपुरा। हरी दातारा संसारा वेगळें करीं ॥ १६ ॥

१५६४. पाहूं द्या रे मज विठोबाचें मुख। लागलीसे भूक डोळां माझ्या ॥ १ ॥ कस्तुरी कुंकुम भरोनियां ताटीं। अंगीं बरवी उटी गोपाळाच्या ॥ २ ॥ जाईजुई पुष्पें गुंफोनियां माळां। घालूं घननिळा आवडीनें ॥ ३ ॥ नामा म्हणे विठो पंढरीचा राणा। डोळियां पारणा होत असे ॥ ४ ॥

१५६५. तपें केलीं दाटोदाटीं। थोरा पुण्याचिया साठीं ॥ १ ॥ जन्मोजन्मींच्या संकटीं। विठो तुझी झाली भेटी ॥ २ ॥ दोन्ही चरण लल्लाटीं। नामा म्हणे न सोडीं मिठी ॥ ३ ॥

१५६६. महिमा अगाध यात्रा कार्तिकीये। आला पंढरीये नामदेव ॥ १ ॥ भक्तशिरोमणी पंढरीच्या नाथा। कृपाळु वा माता बाळकासी ॥ २ ॥ धन्य नामदेव धन्य नामदेव। जिवीं तुझे पाव न विसंबे ॥ ३ ॥ भक्त सप्रेमळ मिळाले अपार। करिती गजर हरिनामीं ॥ ४ ॥ नटे महाद्वारीं झळके पताका। करिती ब्रह्मादिक पुष्पवृष्टी ॥ ५ ॥ नामघोष कानीं समस्त ऐकती। पाषाण द्रवती तेणें प्रेमें ॥ ६ ॥ नामा म्हणे जीव निवालासे येथें। पहातां विठोबातें श्रमु नेला ॥ ७ ॥

१५६७. ऐसी चाल नाहीं कोठें। नमस्कारा आधीं भेटे ॥ १ ॥ मायबाप निर्विकारी। सखा नांदतो पंढरीं ॥ २ ॥ देव भक्तपण। नाहीं नाहीं त्यासी आन ॥ ३ ॥ नामा म्हणे आधीं भेटी। मग चरणां घालीन मिठी ॥ ४ ॥

पादसेवन

चरणसेवा

१५६८. बहुत जन्माशेवटीं तुजशीं झाली भेटी। बहु मी हिंपुटी झालों थोर ॥ १ ॥ बहुकीर्ति ऐकिली बहुतांचे मुखीं। बहुत केले सुखी शरणागत ॥ २ ॥ बहुतां आसक्त बहुतां ओळंगणा। बहुत विटंबना झाली माझी ॥ ३ ॥ बहु फेरे पाहिले बहु दुःख साहिलें। बहु चित्त वाहिलें दुर्भरचि ॥ ४ ॥ बहुत काळ गेले बहु अन्याय केले। बहु नाहीं जोडिलें नाम तुझे ॥ ५ ॥ नामा म्हणे केशवा एक उरली वासना। ध्यावी नारायणा चरणसेवा ॥ ६ ॥

१५६९. तान्होलिया जाय उदका लागोनी। पारधी देखोनी मुरडे वेगीं ॥ १ ॥ तैसे तुझे चरण विसरलों देवा। संसार केशवा देखोनियां ॥ २ ॥ तैसी परी मज झाली जाण देवा। नामा म्हणे केशवा विनवीतसें ॥ ३ ॥

१५७०. धरोनी हस्तक बैससी एकांतीं। भक्तासी श्रीपती सर्वकाळ ॥ १ ॥ दाखवीं चरण दाखवी चरण। दाखवी चरण धांव नेटें ॥ २ ॥ सर्व आचरण दाविसी प्रकार। कल्पना अंधार निमित्याचा ॥ ३ ॥ नामा म्हणे होसी चतुर आपण। आमुचें निर्वाण पाहूं नको ॥ ४ ॥

१५७१. बुद्धिहीन अती करितों हव्यास। उठती उद्देश नाना मतें ॥ १ ॥ एकापुढें एक नासोनियां जाती। सोशिली विपत्ति जन्ममरण ॥ २ ॥ वासनेचे संगें बुडालों मी वांयां। चुकवूं नको पायांसवें भेटी ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसे गेले बहुतेक। वैकुंठनायका तारीं मज ॥ ४ ॥

१५७२. अठ्ठावीस युगें उभा विटेवरी। मुद्रा अगोचरी लावूनियां ॥ १ ॥ ध्यान विसर्जन केधवां करिसी। नेणवे कवणासी ब्रह्मादिकां ॥ २ ॥ पाहतां तुजकडे माझें मीपण उडे। भेदाचें सांकडें हारपलें ॥ ३ ॥ तुजपाशीं आसतां मुकिजे जीवित्वा। ठकले तत्त्वतां नेणों किती ॥ ४ ॥ नामा म्हणे स्वामी कृपादृष्टि पाहें। मन पायीं राहे ऐसें कीजे ॥ ५ ॥

१५७३. माझी कोण गती सांगा पंढरिनाथा। तारीसी अनाथा की बुडविसी ॥ १ ॥ मनापासोनीयां सांग मजप्रती। पुसें काकुळती जीवीचिया ॥ २ ॥ न बोलसी कां रे धरीला अबोला। कोणासी विठ्ठला शरण जाऊं ॥ ३ ॥ कोणासी सांकडें घालावें हें सांगा। नको करूं रागा दीनावरी ॥ ४ ॥ बाळकासी जैसी एकलीच माय। तैंसे तुझे पाय आम्हांलागीं ॥ ५ ॥ नामा म्हणे देवा अनाथांच्या नाथा। कृपाळुवा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कांता रखुमाईच्या॥ ६॥

१५७४. नेत्र तान्हेले पाजी पाणी। पंढरपूरचे मायबहिणी॥ १॥ बाळ पालखीं करी सोर। माते आला निद्राभर॥ २॥ जागीं न होसी गे माय। प्राण जातो करूं काय॥ ३॥ नामा म्हणे चक्रपाणि। चरणीं घातली लोळणी॥ ४॥

१५७५. पक्षिणी प्रभातीं चारियासी जाये। पिलूं वाट पाहे उपवासी॥ १॥ तैंसे माझें मन करी वो तुझी आस। चरण रात्रंदिवस चिंतीतसे॥ २॥ तान्हें वत्स घरीं बांधलेंसें देवा। तया हृदयीं धांवा माउलीचा॥ ३॥ नामा म्हणे केशवा तूं माझा सोईरा। झणी मज न अव्हेरा अनाथनाथा॥ ४॥

१५७६. रात्रंदिवस खंतीं वाटे माझे जीवीं। अनुदिनीं आठवी चरण तुझे॥ १॥ नेरे पांडुरंगा आपुलिया गांवा। तूं माझा विसावा जीवलग॥ २॥ मी एक बापुडें रंकाहूनि रंक। त्रिभुवननायक कीर्ति तुझी॥ ३॥ मी तुझें पोसणें दास पैं दुर्बळ। तूं दीनवत्सल स्वामि माझा॥ ४॥ तुझें मी अनाथ चरणीं ठेवीं माथा। सांभाळीं समर्था ब्रीद तुझें॥ ५॥ नामा म्हणे विठो झालों कासावीस। पुरवीं माझी आस मायबापा॥ ६॥

१५७७. बाळका स्तनपान माता करविते। टाकिलें परतें चरणीं लोळे॥ १॥ हातीं घेऊनि शिपटी माय लागे पाठीं। चरणीं घाली मिठी परतें नोहें॥ २॥ तैसें माझें मन तुजलागीं देवा। न विसंबे केशवा क्षणभरी॥ ३॥ चातका नलभे पाणी तृषाक्रांत मनीं। वाट पाहे गगनीं जीवनाची॥ ४॥ निराळीं पीयूषें वर्षे तयालागीं। आळवितां वेगीं मेघराया॥ ५॥ वाळलें हें तृण नसंडी हो क्षीर। तैसें भक्तीं स्थिर मन राहे॥ ६॥ नामा म्हणे या जन्माचिया साठीं। चरणीं घाली मिठी परता नोहे॥ ७॥

५१७८. युक्तिप्रयुक्तीचें प्रमाण मी नेणें। केशवचरणें ध्यातों मनीं॥ १॥ आणिक साधन काय म्यां करावें। ब्रह्मादिक देव मौन ठेले॥ २॥ आतां मी कायसा करावा आधार। चरण निर्धार देवपूजा॥ ३॥ नामा म्हणे तुझा अंत नाहीं पार। काय म्यां पामर जाणों आतां॥ ४॥

१५७९. जाणीव शाहणीव वाहियेलें ओझें। तेणें चरण तुझे अंतरलें॥ १॥ आतां नेणतेंचि करीं मज हरी। लौकिका बाहेरी घाली मज॥ २॥ तुझिया नामाचें लागों दे गा पिसें। देहीं देह न दिसे ऐसें करीं॥ नामा म्हणे तुज एकातें मी जाणे। रहित कारणें कल्पनेसी॥ ४॥

१५८०. तुझें रूप माझ्या दाखवीं मनातें। मग तुझ्या चरणातें न विसंबे॥ १॥ कां मज शिणविसी थोडिया कारणें। काय तुझें उणें होईल देवा॥ २॥ चातकाची तहान पुरवी जळधर। काय त्याचें सरे थोरपण॥ ३॥ चंद्र चकोराचा पुरवी सोहोळा। काय त्याच्या कळा न्यून होती॥ ४॥ कूर्मी अवलोकीं आपुलिया बाळा। काय तिच्या डोळां दृष्टि नासे॥ ५॥ नामा म्हणे देवा तुझाचि भरंवसा। अनाथा कुंवसा होसी तूं चि॥ ६॥

१५८१. देह जावो अथवा राहो। पांडुरंगीं दृढ भावो॥ १॥ चरण न सोडी सर्वथा। तुझी आण पंढरिनाथा॥ २॥ वदनीं तुझें मंगळनाम। हृदयीं अखंडित प्रेम॥ ३॥ नामा म्हणे केशवराजा। केला नेम चालवीं माझा॥ ४॥

१५८२. माथां मोरपिसा वेळीं। श्रवणीं कुंडलें पदक कंठीं। हातीं घेऊनि वेताटी। गोधना पाठीं लागले॥ १॥ तुझीं पाउलें अनंता। न विसंबें गा सर्वथा। गोविंदा अच्युता। श्रीविठ्ठला॥ २॥ गाई गोवळी पावला। एक म्हणती वळावळा। विष्णुदास नामा चरणां जवळा। अखंड वळत्या देतसे॥ ३॥

१५८३. ऐसें माझें मना येतें पंढरीनाथा। न सोडी सर्वथा चरण तुझे॥ १॥ यासि काय करूं सांगा जी गोपाळा। कां स्नेह लावियेला पूर्वीहूनी॥ २॥ हृदयीं चित्तवृत्ति मनेंसि मिळोनी। अवघी तुझ्या चरणीं सुरवाडिली॥ ३॥ नामा म्हणे केशवा धरिली तुझी सेवा। सुखा अनुभवा अनुभविलें॥ ४॥

१५८४. कोण होईल आत्मज्ञानी। जो वा राहे त्याच्या ध्यानीं॥ १॥ मज तों चरणांची आवडी। जन्मोजन्मीं मी न सोडीं॥ २॥ होईल सिद्धिचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

साधक। त्यासि देईं स्वर्गसुख॥ ३॥ कोण होईल देहातीत। त्यासी करी संगरहित॥ ४॥ नामा म्हणे जीवें साठीं। तुज मज जन्में पडिली गांठी॥ ५॥

१५८५. ब्रह्म अविनाश आनंदघन। याहूनि चरण गोड तुझे॥ १॥ तें जीवें न सोडी अगा पंढरीनाथा। जाणसी तत्त्वतां हृदय माझें॥ २॥ परात्पर वस्तु जे कां अपरंपार। तियेचा साक्षात्कार पाय तुझे॥ ३॥ सच्चिदानंदघन जेथें हरपलें मन। त्याहुनि चरण गोड तुझे॥ ४॥ नामा म्हणे तुझीं पाउलें सुकुमार। तें माझें माहेर विटेवरी॥ ५॥

१५८६. तुझ्या चरणाचें तुटतां अनुसंधान। जाईल माझा प्राण तत्क्षणीं॥ १॥ मग हें ब्रह्मज्ञान कोणापें सांगसी। विचारी मानसीं पांडुरंगा॥ २॥ वदनीं तुझें नाम होतांची खंडणा। शतखंडरसना होईल माझी॥ ३॥ सांवळें सुंदर रूप पाहतां तुझे दृष्टी। न देखतां उन्मळती नयन हे॥ ४॥ तुज परतें साध्य आणिक नाहीं साधन। साधक माझें मन होईल भ्रांत॥ ५॥ नामा म्हणे केशवा अनाथाच्या नाथा। झणीं माझा अंत पाहसी देवा॥ ६॥

१५८७. देवा माझें मन करोनि स्वाधीन। निमोळी स्वामीपण भोगिसीना॥ १॥ फुकाचा कामारा वोळगे निरंतर। न घाली तुज भार कल्पनेचा॥ २॥ तुज नलगे देणें मज नाहीं सांगणें। असेन अनुसंधानें चरणाचेनि॥ ३॥ नामा म्हणे केशवा तूं सर्वथा जाणता। समर्यीच्या उचिता चुकों नको॥ ४॥

१५८८. तुझिये चरणीं असती दोनी भाव। तरीच हा जीव नरककुंडीं॥ १॥ बोले बोले एक मनीं असे आणिक। तरी तयासी देख दोन बाप॥ २॥ तुजवीण सुख आणिकांचें मानी। तरी मज जननी दोन देवा॥ ३॥ नामा म्हणे माझा सत्याचा साहाकारी। आस मी न धरी आणिकांची॥ ४॥

१५८९. पाहुनि न दिसे लौकिका व्यवहारीं। ऐसा तूं अंतरीं लावीं मज॥ १॥ परि तुझ्या चरणीं माझें अनुसंधान। तरी प्रेम पावन देईं देवा॥ २॥ मनाचिये वृत्ती अखंड तूं राहोनी। झेंपावती झणीं काम क्रोध॥ ३॥ नामा म्हणे ऐसे पावसी तूं मातें। तरी मी जीवें तूंतें न विसंबे॥ ४॥

१५९०. तुझे पायीं माझ्या मनें दिली बुडी। इंद्रियें बापुडीं वेडावलीं॥ १॥ इंद्रियें विषय जाणावें कवणें। जाणोनि कवणें स्वामी॥ २॥ देह सहजस्थिति पाहिलें निष्काम। हृदयीं सप्रेम वोसंडत॥ ३॥ नामा म्हणे भक्तजनवत्सला। क्षण जीवांवेगळा न करीं मज॥ ४॥

१५९१. आतां होणार तें हो कां पंढरिनाथा। न सोडी सर्वथा पाय तुझे॥ १॥ हृदयीं तुझें ध्यान मुखीं जपें नाम। हाचि नित्यनेम सर्व माझा॥ २॥ आम्हीं तुझी देवा धरियेली कास। न करीं उदास पांडुरंगा॥ ३॥ नामा म्हणे देवा भक्तजनवत्सला। क्षण जीवावेगळा न करीं मज॥ ४॥

१५९२. वांयां ताडातोडी केली माझ्या मनें। राहिलों लपोन तुझे पायीं॥ १॥ नको नको मज कल्पनेचा संग। आलासे उद्वेग नारायणा॥ २॥ काम क्रोध लोभ पाठीं लागो येती। झणों त्यांचे हातीं देसी देवा॥ ३॥ नामा म्हणे होसी अनाथांचा कैवारी। ब्रीदें चराचरीं वर्णिताती॥ ४॥

१५९३. अपत्याचें हित किजे त्या जनकें। जरी वेडे मुकें झालें देवा॥ १॥ तैसें मी पोसणें तुझे जीवलग। अंतरींचें सांग गुज कांहीं॥ २॥ राखीन मी नांव तुझें सर्वभावें। चित्त वित्त जीव देईन पायीं॥ ३॥ जरी देवा हीन म्हणसील मज। नामा म्हणे लाज येईल कोणा॥ ४॥

१५९४. देह जावो हेंचि घडी। पाय हरीचे न सोडीं॥ १॥ क्लेश हो नानापरी। मुखीं रामकृष्ण हरी॥ २॥ क्रीडों वैष्णवाचे मेळीं। हाक केशव आरोळी॥ ३॥ नामा म्हणे विठोबासी। तें तें घडो या देहासी॥ ४॥

१५९५. माझें सर्व भाग्य केशवाचे पायीं। आणिक उपाय नेणों आम्ही॥ १॥ पक्षी अवचित अंगणांत आला। घेऊनियां गेला चारा तेणें॥ २॥ हाटकरी आम्ही हाटासी पैं गेलों। फिरोनियां आलों गांवामाजीं॥ ३॥ नामा म्हणे नमूं सर्व जीवजंत। दिसे ते अनंत दृष्टीपुढें॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१५९६. मायबापाची सांडूनियां आस। धरिली तुझी कास पांडुरंगा॥ १ ॥ झणीं पांडुरंगा उपेक्षिसी मातें। तरी हांसती तूंतें संतजन॥ २ ॥ नामा म्हणे तुझीं पाउलें समान। तेथे माझें मन स्थिरावलें॥ ३ ॥

१५९७. तुजवांचुनि कांहीं गोड न वाटे जीवा। तुझे पाय मज दिव्य केशवा॥ १ ॥ लौकिकापासूनि कधीं सोडविसी। सांग हृषीकेशी उघडोनी॥ २ ॥ तुझे पाय दिव्य तुझे पाय दिव्य। तुझे पाय दिव्य रे दातारा॥ ३ ॥ नामा म्हणे जिव्हे काढीन मी रवा। तुझे पाय मज दिव्य केशवा॥ ४॥

१५९८. तुझिया पायांचे प्राण हे माझे। चरणकमळ तुझें विसंबेना॥ १ ॥ संसाराच्या गोष्टी कीट झाल्या पोटीं। रामकृष्ण कंठीं माळ घाली॥ २ ॥ दुरोनियां देखें गरुडाचें वारिकें। गोपाळा सारिकें चतुर्भुज॥ ३ ॥ नामा म्हणे विठो जन्मजन्मांतरी। ऋणि करुनि करीं घेईं मज॥ ४॥

१५९९. किती तुला देवा येऊं काकुलती। काय तें संचितीं लिहिलें असे॥ १ ॥ केली कां हो सांडी माझी हृषीकेशी। आम्ही कोणापाशीं तोंड वासूं॥ २ ॥ ब्रीदाचा तोडर गर्जे त्रिभुवनीं। तूंचि एक धनी त्रिलोकीचा॥ ३ ॥ समूळ घेतला पृथ्वीचा भार। माझाचि जंजार काय तुला॥ ४॥ नको पाहूं अंत पांडुरंगे आई। नामा विठोपायीं मिठी घाली॥ ५ ॥

१६००. गाणीं मी गाईलों भाटीं वाखाणिलों। जन्मोनियां झालों दास तुझा॥ १॥ आतां माझी लाज राखें नारायणा। झणीं केविलवाणा देशोदेशीं॥ २ ॥ माय दुन्हाविलों मोहें मोकलिलों। सोय पैं चुकलों संसाराची॥ ३ ॥ विषयां विटलों गोत्रजां तुटलों। जन्मोनि पैं आलों तुझे पायीं॥ ४॥ षड्वर्गी सांडिलों प्रवृत्ती दंडिलों। मीपणा मुकलों मायबापा॥ ५ ॥ नामा म्हणे तुझ्या चरणाची आवडी। लागली न सोडी चित्त माझें॥ ६ ॥

१६०१. हातीं विणा मुखीं हरी। गायें राउळाभीतरीं॥ १॥ अन्न उदक सोडिलें। ध्यान देवाचें लागलें॥ २॥ स्त्री पुत्र बाप माय। यांचा आठव न होय॥ ३॥ देहभाव विसरला। छंद हरीचा लागला॥ ४॥ नामा म्हणे हेंचि देईं। तुझें पाय माझे डोयीं॥ ५॥

१६०२. पाहतां तुझे चरण हरली भवव्यथा। पुढती एक चिंता वाटतसे॥ १॥ झणीं मुक्तिपद देसी पांडुरंगा। मग या संतसंगा कोठें पाहूं॥ २॥ मग हे पंढरी आनंद सोहळा। कवणाचे डोळा पाहूं देवा॥ ३॥ मग हे हरिकथा अमृत संजीवनी। कवणाचे श्रवणीं ऐकों देवा॥ ४॥ नामा म्हणे मज पंढरीची सोय। अनंत जन्म होय याचिलागीं॥ ५॥

१६०३. देवा माझें मन आणि तुझे चरण। एकत्र करोन दिधली गांठी॥ १॥ होणार तें हो गा सुखें पंढरीनाथा। कासया शिणतां वायांविण॥ २॥ माझिया अदृष्टीं ऐसेंचि पैं आहे। सेवावे तुझे पाय जन्मोजन्मी॥ ३॥ असतां निरंतर येणें अनुसंधानें। प्रारब्ध भोगणें गोड वाटे॥ ४॥ हृदयीं तुझें रूप वदनीं तुझें नाम। बुद्धि हे निष्काम धरिली देवा॥ ५॥ नामा म्हणे तुझीं पाउलें चिंतितां। झाली कृतकृत्यता जन्मोजन्मीं॥ ६॥

१६०४. तुझिया चरणाची न संडीं मी आस। होत गर्भवास कोठवरी॥ १॥ हेंचि मज देईं जन्मजन्मांतरीं। वाचे श्रीहरी नाम तुझें॥ २॥ तुझीया नामाचा करीन विसांवा। मनाचा हा ठेवा तुझे पायीं॥ ३॥ नामा म्हणे माझे हेचि मनोरथ। होईन शरणगत जन्मोजन्मीं॥ ४॥

दास्य.

शरणागतस्थिति.

१६०५. सांडोनि अभिमान झालों शरणागत। ऐसियाचा अंत पहासी काई॥ १॥ माझे गुण दोष मनीं गा न धरीं। पतीतपावन म्हणविसी॥ २॥ पडलिया पापराशी झणीं देसी देवा। ही लाज केशवा कोणास जी॥ ३॥ नामा म्हणे देवा चतुरा शिरोमणी। निकुरा होसी झणीं मायबापा॥ ४॥

१६०६. जाणसी तें करीं कृपाळुवा हरी। लाज सर्वांपरी आहे तुज॥ १॥ आरुष साबडें मी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कांहीं नेणों वेडें। जन्मोजन्मीं सांकडें केलें तुज॥ २॥ बहुकीर्ति ऐकिली बहुतांचे मुखीं। बहुत केले सुखी शरणागत॥ ३॥ नाहीं तुझी सेवा केली मनोभावें। लोभ दंभ गर्व भ्रांति सदा॥ ४॥ नामा म्हणे मज होताती विपत्ति। सोडवीं श्रीपति येथोनियां॥ ५॥

१६०७. भिऊनि रिघीजे समर्थाचे पोटीं॥ विषयाची तो भेटी नको मज॥ १॥ तैसा मी शरण आलोंसे केशवा। मज त्वां राखावें पायांतळीं॥ २॥ नको उदासीन राखों अभिमान। माझें आगमन विचारीं कां॥ ३॥ तुझेनि होईल तेंच मी मागेन न सोडीं चरण अहर्निशीं॥ ४॥ अविद्या अपार संचरली देवा। आम्हासि कुढावा नाहीं कोणी॥ ५॥ देवा आतां मज नको गर्भवास। नामा विष्णुदास विनवीतसे॥ ६॥

१६०८. आरुष सावडें नेणों कांही वेडें। जन्मोनि सांकडें केलें तुज॥ १॥ जाणसी तें करीं कृपाळु बा हरी। लाज सर्वांपरी आहे तुज॥ २॥ मी तंव अपराधी असें लक्षकोटी। म्हणतों जगजेठी दास तुझा॥ ३॥ नाहीं तुझी सेवा केली मनोभावें। लोभदंभगर्वें भ्रांत झालों॥ ४॥ कीर्ति म्यां ऐकिली बहुतांच्या मुखीं। केली बहु स्तुति शरणागतें॥ ५॥ नामा म्हणे मज मोकलिसी झणीं। अनाथ म्हणोनि शरण आलों॥ ६॥

१६०९. वासनेचा फांसा पडिला माझे कंठीं हिंडलों जगजेठी नाना योनी॥ १॥ सोडवीं गा देवा दीनदयानिधी। मी एक अपराधी दास तुझा॥ २॥ शरण आलियाचे न पाहसी अवगुण। कृपेंचे लक्षण तुज साजे॥ ३॥ त्रिभुवनीं समर्थ उदार मनाचा। कृपाळू दीनाचा ब्रीद तुझें॥ ४॥ गजेंद्र गणिकेची राखिली तूंवां लाज। उद्धरिला द्विज अजामेळ॥ ५॥ नामा म्हणे देवा अव्हेरसी मज। जगीं थोर लाज येईल तुला॥ ६॥

१६१०. देवा तुझी अवज्ञा घडे। तयाचे दांत होती वांकुडे। व्याधिविण देहीं पीडे। बुडे सागरीं चिंतेच्या॥ १॥ देवा तूं होसी उदासीन। तरी हांसती सकळ जन। जेथें जाय तेथें होय अनमान। जगाधीन होऊनि ठाके॥ २॥ देवा तूं नाहींस जयाचे चित्ती। सोनें धरिल्या होय माती। पीक न पिके तयाचें शेतीं। पेंवीं पाणी निघतसे॥ ३॥ सेवा करी जयाचे घरीं। तींचि होतीं पाठमोरी। इष्टमित्र सज्जन सोयरीं। आस वैरि होऊनि ठाके॥ ४॥ पाय ठेविका चुके आपण। मागतोचि मागे जाण। सत्यास घडे अपदास्थपण। बोल तितुके लटिकेची॥ ५॥ ऐसा अनुभव घडला मज। म्हणोनि बा शरण आलों तुज। नामा म्हणे केशीराज। कृपा करीं गा दातारा॥ ६॥

१६११. तुज गीतीं गातां नयेसी पांडुरंगा। प्रेमेंचि दडूं गा पायांपाशीं॥ १॥ वांकडें तिकडें जैसें आलें तैसें। गावया उल्हास उगवला॥ २॥ त्याचि भरें तोंडा आलें तें बोलतों। नाम मुखीं घेतों अखंडित॥ ३॥ तुझा म्हणवितों सांभाळावें देवा। नामया केशवा सर्वकाळ॥ ४॥

१६१२. अपराधाच्या कोडी हेचि माझी जोडी। पतीत पावन प्रौढी तुझी देवा॥ १॥ माझियानि दैवें ऐसेंचि घडलें। तूं तंव आपुलें न संडिसी॥ २॥ सहस्त्र अपराध घालीं माझे पोटीं। तारीं जगजेठीं म्हणे नामा॥ ३॥

१६१३. देवा माझें मन ठेवीं तुझे चरणीं। घालीं माझे मनीं रूप तुझें॥ १॥ मज या लोकांचा शीण असे मनांसु। तुजचि चिंतीतु हृदयकमळीं॥ २॥ चंदनाच्या दृतीं वेधले तरुवर। सबाह्य अभ्यंतर काय झालें॥ ३॥ सरिता सिंधुमाजीं मिळोनि लपाली। सागरची झाली एकसरें॥ ४॥ लवण जळाचें प्रसिद्धचि असे। ऐक्यभावें बसे न दिसे काहीं॥ ५॥ नामा म्हणे शरण आलों केशिराजा। ऐसा भावो माझा करीं वेगीं॥ ६॥

१६१४. तत्त्व पुसावया गेलों वेदज्ञासी। तंव भरले त्यापासीं विधिनिषेध॥ १॥ तया समाधान नुमजे कोणे काळीं। अहंकार बळि झाला तेथें॥ २॥ म्हणोनि तुझें नाम धरिलें सर्वभावें। उचित करावें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पांडुरंगा ॥ ३ ॥ स्वरूप पुसावया गेलों शास्त्रज्ञासी। तंव भरले तयापाशीं भेदाभेद ॥ ४ ॥ एकएकाच्या न मिळती मतासी। भ्रांत गर्वराशि भुलले सदा ॥ ५ ॥ पुराणिकासि पुसूं स्वरूपाची स्थिति। तंव त्यासी विश्रांति नाहीं कोठें ॥ ६ ॥ विषयीं ठेवुनी मन सांगति ब्रह्मज्ञान। तेणें समाधान नुपजे कदा ॥ ७ ॥ हरिदासासी पुसूं भक्तीचा उपाय। तंव तयापाशीं नाहीं भाव कोठें ॥ ८ ॥ वाचेनें सांगती नामाचा बडिवार। विषयी पडीभर सदाकाळीं ॥ ९ ॥ ऐसें विचारितां बहुत भागलों। म्हणोनि शरण आलों पांडुरंगा ॥ १० ॥ भयाभीत झालों संसार करितां नामा म्हणे आतां तारी मज ॥ ११ ॥

१६१५. संसारी गांजलों म्हणोनि शरण आलों। पाठीसि रिघालों देवराया ॥ १ ॥ कळिकाळा वास पाहों न देसी। भरंवसा मानसी आहे मज ॥ २ ॥ नामा म्हणे देवा स्वामिया तूं एक। आवडता सेवक करीं मज ॥ ३ ॥

१६१६. लाज सांडोनियां आलों शरणागत। ऐसियाचा अंत पाहसी झणीं ॥ १ ॥ गुण दोष माझे मनीं गा न धरीं। पतीतपावन जरी म्हणविसी ॥ २ ॥ पडलिया पाथरा लाथ देसी देवा। हे लाज केशवा कोणास जी ॥ ३ ॥ नामा म्हणे केशवा चतुरा शिरोमणी। मनीं मायबापा ॥ ४ ॥

१६१७. शरणागतासी नये मोकलावा। हें तरी केशवा जाणतोसी ॥ १ ॥ सांगणें नलगे सांगणें नलगे। सांगणें नलगे मायबापा ॥ २ ॥ सांगतां समर्थ सेंचि विसरे। त्याच्या अभ्यंतरीं नव्हे बोल ॥ ३ ॥ नामा म्हणे तैसा नव्हेचि शाहणा। अठराही पुराणां वेडाविसी ॥ ४ ॥

१६१८. काय अपराध पाहसी कोणाचे। धांवे भाविकांचे कामकाजीं ॥ १ ॥ काय केशीराजा वाणूं मी दुबळें। शरणागता लळे पुरविशी ॥ २ ॥ पतीतपावन ब्रीद चराचरीं। तेथें मी भिकारी कोणीकडे ॥ ३ ॥ नामा म्हणे तूंचि करिशी उद्धार। मज देवा पार नाहीं भाग्या ॥ ४ ॥

१६१९. शरण आल्याचा न पाहसी अवगुण। कृपेचें लक्षण सहज आहे ॥ १ ॥ गजेंद्र गणिकेची राखिली त्वां लाज। सोडविला द्विज अजामिळ ॥ २ ॥ सांगणें हें काय तुम्हीं दिलें देवा। उदारा केशवा मायबाप ॥ ३ ॥ नामा म्हणे झणीं अव्हेरिसी मज। जगीं होईल लाज थोर तुज ॥ ४ ॥

१६२०. जन्ममरणाचें मज भय दाविसी। तें म्यां हृषीकेशी स्वीकारीलें ॥ १ ॥ आतां माझी चिंता तुज कां पंढरिनाथा। असों दे भलता भलते ठायीं ॥ २ ॥ सुखदुःख भोगणें माझें मीच जाणें। तुज तंव सोसणें नलगे कांहीं ॥ ३ ॥ नाभा म्हणे माझे हेची मनोरथ। होईन शरणागत जन्मोजन्मीं ॥ ४ ॥

१६२१. तुझें नित्य सुख ध्यावें येणें मनें। असावें संधानें चरणाचेनि ॥ १ ॥ वासनेविरहित होऊनि एकवट। असावें निकट संतसंगें ॥ २ ॥ ऐशी मज कृपा करीं गा विठ्ठला। म्हणविसी आपुला दास जरी ॥ ३ ॥ श्रवणीं तुझे नाम ऐकावें आवडी। चित्ते देऊनि बुडी प्रेमडोहीं ॥ ४ ॥ नयनीं तुझें रूप देखावें सर्वत्र। व्हावें भूतमात्र सखे माझे ॥ ५ ॥ वदनीं तुझें नाम गावें निर्विकल्प। धरोनि तुझें रूप हृदयकमळीं ॥ ६ ॥ काया संतापायीं जावी लोटांगणीं। तें भाग्य अनुदिनीं देईं बापा ॥ ७ ॥ हेंचि माझें व्रत हेंचि तपतीर्थ। करावें दास्यत्व संतांचें हें ॥ ८ ॥ अनुदिनीं व्हावा संतांचा हा संग। असावा अनुराग कीर्तनाचा ॥ ९ ॥ मानाचा मज ओस अपमानीं उल्हास। देईं तुझा ध्यास सर्वकाळ ॥ १० ॥ नामा म्हणे विठोबा तरीच शरणागत। नाहीं तरी पतित म्हणति मज ॥ ११ ॥

१६२२. आम्हीं शरणागतीं केलासे सरता। येऱ्हवीं अनंता कोण जाणे ॥ १ ॥ वेदशास्त्र पुराणीं उबगोनि सांडिलासी। तो आम्ही धरिलासे हृदयकमळीं ॥ २ ॥ चतुरा शिरोमणी अहो केशिराजा। अंगीकार तुझा केला आम्ही ॥ ३ ॥ सहस्रैक नामें झालासि संपन्न। तरी हेंही भूषण आमुचेंचि ॥ ४ ॥ येऱ्हवीं त्या नामांची कोण जाणे सीमा। पाहें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मेघश्यामा विचारोनी॥ ५॥ होतासी क्षीरसागरीं अनाथाचे परी। लक्ष्मी तेथें करी चरणसेवा॥ ६॥ तेहि तंव जाण आमुची जननी। तूं तियेवांचोनी शोभसी कैसा॥ ७॥ तुज नाहीं नाम रूप जाति कूळ। अनादीचें मूळ म्हणती तुज॥ ८॥ आम्ही भक्त जरी तूं भक्तवत्सल। ऐसा प्रगट बोल जगामाजीं॥ ९॥ ऐसी आमुचेनि भोगिसी थोरीव। आमुचा जीवभाव तुझ्या पायीं॥ १०॥ नामा म्हणे केशवा जरी होसी जाणता। तरी या बोला उचिता प्रेम देईं॥ ११॥

१६२३. आम्ही शरणागतीं सांडिली वासना। ते त्वां नारायणा अंगिकारिली॥ १॥ म्हणोनी प्रसन्न व्हावया आमुतें। वोरसल्या चित्तें चालविसी॥ २॥ अज्ञान बाळकु ठकविला धुरु। तैसा मी अधिरु नव्हे जाण॥ ३॥ लंकापती केला तुवां बिभीषण। झालासी उत्तीर्ण वाचाऋणें॥ ४॥ उपमन्यें घेतला दुधाचाची छंद। तैसा बुद्धिमंद नव्हे जाण॥ ५॥ नामा म्हणे तैसा नव्हे मी अज्ञान। माग तुज देईन शरीर अवघें॥ ६॥

१६२४. आम्ही शरणागत परि सर्वस्वें उदार। भक्तीचे सागर सत्त्वशील॥ १॥ काया वाचा मनें अर्थ संपत्ति धन। दिधलें तुजलागुन पांडुरंगा॥ २॥ आम्हां ऐसें वित्त तुम्हां कैंचें देवा। हा बडिवार केशवा न बोलावा॥ ३॥ सत्त्वाचा सुभट बळि चक्रवर्ति। पहा पहा केवढी ख्याति केली तेणें॥ ४॥ त्रिभुवनींचें वैभव जोडिलें ज्या लागुनि। तें शरीर तुझ्या चरणीं समर्पिलें॥ ५॥ रावणा ऐसा बंधु सांडूनि सधर। ओळंगति परिवार ब्रह्मादिकां॥ ६॥ तें सांडोनि एकसर आलासे धांवता। झाला शरणागत बिभीषण॥ ७॥ हिरण्यकश्यपें तुझा वैरसंबंध। पाहें पां प्रल्हादा गांजियेला॥ ८॥ अजगर कुंजर करितां विषपान। परि तुझें स्मरण न संडीच॥ ९॥ पति पुत्र स्नेह सांडोनि गोपिका। रासक्रीडे देखा भूललीया॥ १०॥ एकी तुझें ध्यान करितां त्यजिले प्राण। सांग ऐसें निर्वाण कवणें केलें॥ ११॥ ऐसे मागा पुढां झाले असंख्यात। भक्तभागवत सखे माझे॥ १२॥ त्यांचेनि सरता झालासी त्रिभुवनी। विचारी आपुल्या मनीं पांडुरंगा॥ १३॥ आतां केलें उच्चारण बोलतां लाजिरवाणें। हांसती पिसुनें संसारींची॥ १४॥ नामा म्हणे केशवा अहो शिरोमणी। निकुरा जाले झणीं मायबापा॥ १५॥

प्रेमकलह.

१६२५. कागदीचें वित्त वेश्येसी दिधलें। तसें आम्हां केलें नारायणें॥ १॥ जोडिनियां हस्त बोले मढ्यापाशीं। तैसें तूं मजशीं केलें देवा॥ २॥ कडू भोपळ्याचा कोणता उपयोग। तैसे पांडुरंगें केलें जाण॥ ३॥ नामा म्हणे ऐसें करूं नको देवा। समागम व्हावा पायांसवें॥ ४॥

१६२६. दास झाल्यावरी करिसी उदास। मनीं तें तुम्हांस आणीं देवा॥ १॥ सोशिले प्रवास जन्मजन्मांतर। करिसी अव्हेर आम्हांलागीं॥ २॥ भार खांद्यावरी घेऊनी हिंडवी। होसी मजविशीं पाठमोरा॥ ३॥ श्रुति सावकाश गाती इतिहास। काय कासावीस होय तुम्हां॥ ४॥ नामा म्हणे नको वाउगे उदीम। न सोडीं मी नाम केल्या कांहीं॥ ५॥

१६२७. तुझा माझा देवा कां रे वैराकार। दुःखाचे डोंगर दाखविसी॥ १॥ बळें बांधोनियां देसी काळा हातीं। ऐसीं काय चित्तीं आलें तुझ्या॥ २॥ आम्हीं देवा तुझी केली होती आशा। बरवें हृषीकेशा कळों आलें॥ ३॥ नामा म्हणे देवा करा माझी कींव। नाहीं तरी जीव घ्यावा माझा॥ ४॥

१६२८. सकळ वैभव निजकर्म भोग। तो तुज उद्वेग दावी कांई॥ १॥ मीतूंपण असे तेथें मग कैंचें। निर्माण ठायींचें तोडी वेळे॥ २॥ आपुला करुनी ठेवा तुझे पायीं। थोरपण कांही नको मज॥ ३॥ नामा म्हणे तुझें सोलीन ढोपर। कासया विचार देखों आतां॥ ४॥

१६२९. कपटनाटका कल्लोळकरुणा। मजलागीं दीन होसी देवा॥ १॥ रात्रंदिस मज ठेवुनि जवळी। घालसी कवळी मुखामाजीं॥ २॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पेंद्या सुदाम्याचे कैवार। मजसी अंतर केलें आतां॥ ३॥ नामा म्हणे ऐसा करितों बोभाटा। भेऊं नको ठका पांडुरंगा॥ ४॥

१६३०. तुवां चाळविलें अनंत सेवकां। तोचि चाळा मज दाविमी तूं निका॥ १॥ आदि अंतीं तुझ्या जाणितल्या खुणा। आतां काय करिसी पंढरीच्या राणा॥ २॥ भला रे भला झालासि शहाणा। भेष पळविलें शास्त्रपुराणां॥ ३॥ नामा म्हणे केशवा मज मारून दवडी। पुढती धरावी सोय माझी सवडी॥ ४॥

१६३१. कटीं कर उभा ऐसा। पहा कैसा घरघेण्या॥ १॥ माझा हिशेब करीं हिशेब करीं रे केशवा। चौऱ्यांशीं लक्ष जन्म केली तुझी सेवा॥ २॥ माझें ठेवणें देईं गा देवा। नाहीं तर धरीन मी तुझ्या सेवा॥ ३॥ नामा म्हणे मज खवळिसी वांयां। पिसाळलों तरी झोंबेन तुझ्या पायां॥ ४॥

१६३२. साचपणें ब्रीदा सांडवीन तुझ्या। आतां केशिराजा पण हाचि॥ १॥ लबाड तूं देवा लबाड तूं देवा। लबाड तूं देवा ठावा आम्हां॥ २॥ काय मूर्खपणें सांगशील गोष्टी। थोरपणें मोठी पुरे आतां॥ ३॥ नामा म्हणे काय खवळिसी आम्हां। लाज नाहीं तुम्हां कोणेविशीं॥ ४॥

१६३३. कांहींच मी नव्हें ऐसें जरी केलें। तरि कां जन्मविलें पांडुरंगा॥ १॥ काय ब्रह्मज्ञान सांगशील मातें खातया न खाते न देखेचि॥ २॥ यातिहीन शिंपी अधिकारी कैंचा। हा धर्म तयाचा सांग त्यासी॥ ३॥ चतुर्थआश्रमी यति दिगांबर। अशक्त संसार सोसवेना॥ ४॥ तुझी सेवा सुरवर नेणती प्रेमगोडी। झाली देशधडी वांयांवीण॥ ५॥ नामा म्हणे हरि सखा चिंतामणि। मूर्ख समजावणी न करावी॥ ६॥

१६३४. काय थोरपण मिरविसी व्यर्थ। खोटेंपण स्वार्थ कळों आलें॥ १॥ हिता अनहिता केले आपस्वार्थ। वचन यथार्थ बोल आतां॥ २॥ होसी कलिमाजी कलिसारिखाची। भोळ्या भाविकांच्या भक्तिकाजा॥ ३॥ नामा म्हणे माळ घालिली स्वहस्तें करितोसि दंडवत निमित्यासी॥ ४॥

१६३५. काय केलें मागें कोणाचें तूं बरें। शेवटीं वान्नरें संग करी तें॥ १॥ संगें करूनियां हिंडे रानोरान। दशरथा खूण चुकविसी॥ २॥ काय काय तरी सांगों तुज गुण। भिल्लिणीची आण सत्य मानी॥ ३॥ सत्य मानी वाळी वसिष्ठासहित। नामा म्हणे मात ही पुरातन॥ ४॥

१६३६. काय तुज देवा आलें थोरपण। दाविसी कृपण उणें पुरे॥ १॥ पुरे आतां सांगों नको बा श्रीहरी। गोकुळाभीतरीं खेळ मांडी॥ २॥ हलाहल शांत करी तत्क्षण। अमृत जीवन नाम तुझें॥ ३॥ तुझें नाम सर्व सदा गोपाळासी। नामा म्हणे यासी काय झालें॥ ४॥

१६३७. निर्गुणपणाच्या घेसी अभिमाना। तुज नारायणा शोधीं नामीं॥ १॥ काय तुझी भीड धरावी म्यां आतां। कृपाळु अनंता म्हणे नामीं॥ २॥ पुंडलीकासाठीं उभा राहिलासी। ठकडा तूं होसी मजलागीं॥ ३॥ नामा म्हणे नको मज चाळवण। लवकरी चरण कां न दावा॥ ४॥

१६३८. कल्पतरुतळी बैसलिया। कल्पिलें फळ न पविजे॥ १॥ कामधेनू जरी दुभती। तरी उपवासी कां मरावें॥ २॥ उगे असा उगे असा। होणार तें होय जाणार तें जाय॥ ३॥ नामा म्हणे केशवा काय तुझी भीड। संतां महंतां देखतां सांगेन तुझी खोड॥ ४॥

१६३९. मुळींच मी जाणें तुझा ठेंगेपणा। काय नारायणा बोलसील॥ १॥ पुरे पुरे आतां तुमचे आचार। मजशीं वेव्हार घालूं नको॥ २॥ लालुचाईसाठीं मागे भाजी पाना। लाज नारायणा तुज नाहीं॥ ३॥ नामा म्हणे काय सांगों तुझी कीर्ति। वाउगी फजिती करूं तुज॥ ४॥

१६४०. सहस्त्र मिळणीं सिंधु जाहली जीं मुखें। ओघ तो उदक आन नाहीं॥ १॥ बीजाचिये पोटीं वटाचा विस्तार। सर्व तो आकार तुझा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

असे॥ २॥ नामा म्हणे तुझें अवघें करणें। खवळोनियां सुनें घेवों नको॥ ३॥

१६४१. तुझा दास मी तों राहिलों होवोनी। बोल चक्रपाणि पुरे आतां॥ १॥ जावो प्राण आतां न सोडीं मी संग। नव्हेची वाउगे बोल माझे॥ २॥ श्रुति स्मृति वेद काव्यें हीं पुराणें। तें तुज भाषणें सुखें मानूं॥ ३॥ काय हानि झाली सांगा मजपाशीं। उद्धरा जगासी नामा म्हणे॥ ४॥

१६४२. पंढरीनिवासा सख्या पांडुरंगा। करी अंगसंगा भक्ताचिया॥ १॥ भक्त कैवारिया होसी नारायणा। बोलतां वचना काय लाज॥ २॥ मागें बहुतांचें फेडियलें ऋण। आम्हांसाठीं कोण आली धाड॥ ३॥ वारंवार तुज लाज नाहीं देवा। बोल रे केशवा म्हणे नामा॥ ४॥

१६४३. देवा तूं प्रथम कर्म भोगिसी। सागरीं जळचरू मस्त्य झालासी। कमठे पाठी न संडी कैसी। कर्मे कासाविसी केलें तुज॥ १॥ अपवित्र नाम आधीं वराह। याहूनि थोर कूर्म कांसव। अर्ध सावज अर्ध मानव। हे भावाभाव कर्माचे॥ २॥ खुजेंपणें बळीसी पाताळीं घातलें। तेणें कर्में तयाचें द्वार रक्षिलें। पितयाचे वचनीं मातेसी वधिलें। तें कर्म जडलें परशुरामा॥ ३॥ श्रीरामा झाल्या आपदा बहुता। कर्म भोगविलें अंतरली सीता। भालुका तीर्थी बांधिलें अवचिता। नाम अच्युता तुज जाहलें॥ ४॥ ऐसा कष्टी होउनी बौद्ध राहिलासी। तूं कलंकी या लोकां कां मारिसी। आपुल्या दोषांसाठीं आणिका दंडिसी। निष्कलंक होसी नारायणा॥ ५॥ ऐसा तूं बहुतां दोषी बांधलासी। पुढीलाचीं जन्में अवगतोसी। विष्णुदास नामा म्हणे हृषीकेशी। तुझी भीड कायसी स्वामियाहो॥ ६॥

१६४४. मरणें पेरणें जन्म उगवणें। मायेची ते खूण सांगितली॥ १॥ संग तुझा पुरे संग तुझा पुरे। संग तुझा पुरे नारायणा॥ २॥ तूं तरी न मरे मी तरी न पुरे। भक्ति हे संचरे हाचि लाभु॥ ३॥ नामा म्हणे माझ्या ठायींचा मी नेणें। संसार भोगणें तुझी लाज॥ ४॥

१६४५. तुज विकोनी घातली वोरे। मज समोर बोलतोसी॥ १॥ उच्छिष्ट शिदोरी घेऊनियां करीं। भक्तांचा भिकारी तूंचि एक॥ २॥ चोर आणि शिनळू चाळविले गोंवळें। अनंत मर्दिले दुष्टकाळ॥ ३॥ नामा म्हणे केशवा सांगेन वर्म। ऐकतां न राहे संतांचें कर्म॥ ४॥

१६४६. उदार कृपाळ सांगशील जना। तरी त्या कां रावणा मारियेलें॥ १॥ नित्यानित्य पूजा शिर कमळावरी। तेणें तुझें हरी काय केलें॥ २॥ किती बडिवार सांगसील बां यां। ठावा पंढरीराया आहेसी आम्हां॥ ३॥ कर्णा ऐसा वीर झुंजार उदार। त्यासी त्वां जर्जर केलें बाणी॥ ४॥ पाडिले भूमीसी नयेचि करुणा। त्याचे नारायणा पाडिले दांत॥ ५॥ श्रियाळ बापुडें सात्त्विक निर्वाणीं। खादलें कापोनी याचें पोर॥ ६॥ ऐसा कठीण कोण होईल दुसरा। कांडियेलें शिरा उखळामाजीं॥ ७॥ शिबी चक्रवर्ती करितां यज्ञयाग। कापिलें त्याचे अंग ठायीं ठायीं॥ ८॥ जाचोनियां प्राण घेतला तयाचा। सांगसी वाचा बडीवार॥ ९॥ हरिश्चंद्राचें राज्य घेऊनिया सर्व। विकिला त्याचा जीव डोंबाघरीं॥ १०॥ बहुतचि श्रम दिधले तयासि। परी तो सत्त्वासि ढळेचिना॥ ११॥ पाडिला विघड नळादमयंती। ऐसी कृपामूर्ती बुद्धि तुझी॥ १२॥ आणिक तुझी कीर्ति सांगावी ती किती। केली ते फजिती माउशीची॥ १३॥ मारियेला मामा सखा पुरुषोत्तमा। नामा म्हणे सीमा फार केली॥ १४॥

१६४७. उदाराचा राणा म्हणविसी आपणा। सांग त्वां कवणा काय दिलें॥ १॥ उचिता उचित देसी पंढरीनाथा। न बोलों सर्वथा वर्मे तुझीं॥ २॥ वर्मे तुझीं कांहीं बोलेन मी आतां। क्षमा पंढरीनाथा करी बापा॥ ३॥ न घेतां न देसी आपलेंहि कोणा। प्रौढी नारायणा न बोलावी॥ ४॥ बालमित्र सुदामा विपत्तीं पिडला। भेटावया आला तुजलागीं॥ ५॥ तीन मुष्टि पोह्यांसाठीं मन केलें हळुवट। मग तया

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

उत्कृष्ट राज्य दिलें॥ ६॥ छळावया पांडव दुर्वास पातला। द्रौपदीनें केला धांवा तुझा॥ ७॥ येवढीया आकांतीं घेऊनि भाजीपान। मग दिलें अन्न ऋषिलागीं॥ ८॥ बिभीषणा दिधली सुवर्णाची नगरी। हे कीर्ति तुझी हरी वाखाणिती॥ ९॥ वैरियाचें घर भेदें त्वां घेतलें। त्याचें त्यासी दिधलें नवल काय॥ १०॥ ध्रुव आणि प्रल्हाद अंबऋषि नारद। हरिश्चंद्र रुक्मांगद आदि करूनी॥ ११॥ त्याचें सेवाऋण घेऊनि अपार। मग त्या देशी वर अनिर्वाच्य॥ १२॥ एकाचि शरीरसंपत्ति आणि वित्त। एकाचें तें चित्त हिरोनि घेसी॥ १३॥ मग तया देशी आपुलें तूं पद। जगदानी हें ब्रीद मिरविसी॥ १४॥ माझें सर्वस्व तूं घेईं तुझें नको कांहीं। मनोरथाची नाहीं चाड मज॥ १५॥ नामा म्हणे केशवा जन्मजन्मांतरीं। करीन मी हरी सेवा ऋण॥ १६॥

१६४८. मी तो तुझा दास न करीं उदास। माया मोहपाश तोडी देवा॥ १॥ प्राण जावो परी नको करूं त्याग। करी अंगसंग अंगिकार॥ २॥ अंगिकारी आतां अजामेळ अंती। समान श्रीपति सम करीं॥ ३॥ नामा म्हणे ऐसें वाणावें म्यां किती। नामें केली ख्याती चराचरी॥ ४॥

१६४९. निर्गुण नामाची अनंतकल्पना। धरूनि नारायणा व्यक्ति येसी॥ १॥ लाज लावियेली त्या निर्गुणपणा। श्रुतीच्या वचना वाखाणीत॥ २॥ तैसें न हो आम्ही करणीचे विलगट। नामाचे निकट दास तुझे॥ ३॥ चतुरा शिरोमणी नंदाचा खिल्लारी। हें अघटीत मुरारी नाम जरी॥ ४॥ तुमचे तुम्ही देवा सांगतां तें निकें। समर्थांसी रंके बोलिजे केवीं॥ ५॥ देवा मुगुटमणी हे बोलती पुराणें। आणि बळीचें राखणें द्वार काय॥ ६॥ अर्जुना सारथी रथ वागवीसी। उच्छिष्ट काढिसी धर्माघरीं॥ ७॥ विश्वंभर नाम तुझें कमळापति। जगीं श्रुति स्मृति वाखाणिती॥ ८॥ गौळियांचे घरीं दहीं लोणी चोरुनी। खातां चक्रपाणि लाजसी ना॥ ९॥ आतां दीनानाथ ब्रीद तुझें साचें। तरी भूषण आमुचें जतन करीं॥ १०॥ येर ठेवा ठेवी कायसी आम्हां आतां। नामा विनविता केशीराजा॥ ११॥

१६५०. अज्ञान बापुडें नेणें कांहीं वेडें। जन्मोनि सांकडें तुजचि देवा॥ १॥ जाणसी तें करीं कृपाळुबा हरी। लाज सर्वांपरी आहे तुज॥ २॥ मी तंव अपराधी आहें लक्षकोटी। परी म्हणवितों जगजेठी दास तुझा॥ ३॥ नाहीं तुझी सेवा केली मनोभावें। लोभ दंभ गर्वें भ्रांत सदा॥ ४॥ बहुतां मुखीं तुझी ऐकिली बा कीर्ति। दीनानाथ म्हणती आर्तबंधु॥ ५॥ नामा म्हणे मज मोकलिसी झणीं। अनाथ म्हणोनि पाळीं देवा॥ ६॥

१६५१. अनाथाचा नाथ दीनाचा दयाळ। भक्तांचा कृपाळ पांडुरंग॥ १॥ ये गा तूं विठ्ठला माझिया माहेरा। कृपेच्या सागरा पांडुरंगा॥ २॥ वर्णिती पुराणें न करीं लाजिरवाणें। बोलतीं वचनें सनकादिक॥ ३॥ कृपेचा सागरु कैवल्य उदारू। रखुमाईचा वरू पांडुरंग॥ ४॥ पुंडलिकाचे भेटी अससी वाळवंटीं। हात ठेवूनि कटीं विटेवरी॥ ५॥ भक्तिलागीं कैसा उभा असे तिष्ठत। असे वाट पहात भीमातीरी॥ ६॥ येऊनि जन्मासी पाहावी पंढरी। तेणें भवसागरीं तरतील॥ ७॥ नामा म्हजे मज हरीचा विश्वास। झाला असे दास जन्मोजन्मीं॥ ८॥

१६५२. काया हरपें फुटूं नेदी। टाळ दिंडी वाहिन खांदीं॥ १॥ तूं बा माझा तूं बा माझा। तूं बा माझा केशिराजा॥ २॥ आळवणीचा तूं बा वाचे। तेणें छंदें पैं बा नाचे॥ ३॥ तूं वा माझा मी दास तुझा। विनवितो नामा केशिराजा॥ ४॥

१६५३. निंदा आणि स्तुति तुझीच करणें। आणिकांचे कां घेणें गुणदोष॥ १॥ आतां माझे चित्त असो तुझे चरणीं। अगा चक्रपाणि पांडुरंगा॥ २॥ वैर अथवा सख्य करणें तुझे ठायीं। न पडो हृदयीं विसर तुझा॥ ३॥ दास्यत्व करावें गोपाळांचे परी। असो तुजवरी सर्व लोभ॥ ४॥ जीवणें अथवा मरणें तुमचिये द्वारीं। उदास नरहरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

झणीं करिसी ॥ ५ ॥ नामा म्हणे थोर शिणलों पंढरिनाथा। स्वामी तुझें नेणतां प्रेमसुख ॥ ६ ॥

१६५४. छंदाधिस्थ हें मन माझें पंढरिनाथा। न सोडीं सर्वथा पाय तुझे ॥ १ ॥ यासि काय करूं सांगा जी विठ्ठला। स्नेह कां लाविला पूर्वींहूनि ॥ २ ॥ कांसवीचीं पिलें राहोनि निराळीं। दृष्टि पान्हावली अमृतमय ॥ ३ ॥ तैसा मी जवळूनि असेन हो दूरी। दृष्टि मजवरी असों द्यावी ॥ ४ ॥ तान्हें वत्स घरीं वनीं धेनु चरे। परतोनि हंबरे क्षणक्षणां ॥ ५ ॥ नामा म्हणे सलगी करीन निकट। झणें मज वैकुंठपद देसी ॥ ६ ॥

सख्य.

करुणा.

१६५५. अनाथासी साह्य होसी नारायणा। करुणावचना बोलविसी ॥ १ ॥ पांडुरंगा कृपा करा मजवरी। पामर उद्धरीं पाहतांची ॥ २ ॥ गणिके सत्वर मोक्षपद देसी। उपमन्यु बाळासी क्षीरसिंधु ॥ ३ ॥ नामा म्हणे काय याति न विचारी। विदुराचे घरी खासी कण्या ॥ ४ ॥

१६५६. अनाथाचा नाथ भक्तांचा कैवारी पुराणीं हे थोरी आयिकिली ॥ १ ॥ ऐकोनियां कीर्ति आलों तुजपाशीं। निवारी दुःखासी केशिराजा ॥ २ ॥ त्रितापें तापलों दुःखें आहळलों। कासाविस झालों दयासिंधू ॥ ३ ॥ तुजवीण आतां कोणातें मी सांगूं। तोडीं हा उद्वेगु नारायणा ॥ ४ ॥ नामा म्हणे आतां नको पाहूं अंत। उद्धरीं त्वरित पांडुरंगा ॥ ५ ॥

१६५७. कृपा करोनी त्वां मज प्रसन्न व्हावें। आणि म्यां मागावें बुद्धिज्ञान ॥ १ ॥ ऐसी भुली मज न घाली पांडुरंगा। विघड सत्संगा न करी मज ॥ २ ॥ मोक्षासी साधन एक ते उपाधी। दाखवूनि बुद्धि भ्रंश केलें ॥ ३ ॥ एक पुत्र कलत्र राज्याचा संभ्रम। दावोनी दुर्गम भ्रम केला ॥ ४ ॥ नामा म्हणे तुझ्या प्रेमालागीं भक्ति। घेतली म्यां सुती जन्ममरण ॥ ५ ॥

१६५८. अनंत जन्मींचे चुकवी सांकडें। काय मी बापुडें विनवूं कैसे ॥ १ ॥ सगुण गुणाची बोलिलीसे मूर्ति। राहो माझे चित्तीं निरंतर ॥ २ ॥ माझा मीच झालों सकळ व्यापारी। संसाराबाहेरी कोण काढी ॥ ३ ॥ नामा म्हणे मज नको गोववूं आशा। पावन परेशा केशिराजा ॥ ४ ॥

१६५९. जेथें जेथें मन जाईल हो माझें। तेथें तेथे तुझें रूप असे ॥ १ ॥ ऐशी मज संवई लावी निरंतरी। जन्मजन्मांतरीं केशिराजा ॥ २ ॥ आपणांस काम जरूर कायसा। आतां पंढरीशा आटोपावें ॥ ३ ॥ नामा म्हणे नको पाहों माझी लाज। संसाराचें बीज मूळ खुडीं ॥ ४ ॥

१६६०. आम्ही छाक नेणों तुझा अंतपार। होसी निरंतर निवारितां ॥ १ ॥ बहु अपराधी जाणा यातिहीन। पतितपावन तुम्ही देवा ॥ २ ॥ नामा ऐसा पातकी पामर। करिसी उद्धार साच ब्रीद ॥ ३ ॥

१६६१. अग्निमाजि पडे बाळू। माता धांवे कनवाळू ॥ १ ॥ तैसा धांवें माझिया काजा। अंकिला मी दास तुझा ॥ २ ॥ सवेंचि झेंपावें पक्षिणी। पिलीं पडतांचि धरणीं ॥ ३ ॥ भुकेलें वत्सरावें। धेनु हुंबरत धांवे ॥ ४ ॥ वणवा लागलासे वनीं। पाडस चिंतीत हरणी ॥ ५ ॥ नामा म्हणे मेघा जैसा। विनविते चातक तैसा ॥ ६ ॥

१६६२. धेनु विये वनीं तीसि कैंची सुयणी। तरी तें वत्स स्तनीं लावी कवण ॥ १ ॥ भुजंगाचीं पिलीं उपजतांचि वेगळीं। त्यांसी डंखुं शिकविलें हो कोणीं ॥ २ ॥ सहज लक्षण जयाचिये ठायीं। तो आपुलीये सोई धांवतसे ॥ ३ ॥ उपजतांचि फूल मोगऱ्याच्या माथां। त्यासी परिमळता कोणें लावियेली ॥ ४ ॥ कडु दुध्याच्या आळयासी साखर दूध घातलें। तें अधिकची कडुवाळें कवणें केलें ॥ ५ ॥ गाळिला तोडिला खंड विखंडी। ऊंस न संडी सोय गोडीसी ॥ ६ ॥ नामा म्हणे तैसें आहे गा श्रीहरी। सोईचे व्यापारी घेईन तूंतें ॥ ७ ॥

१६६३. करीन म्हणसी व्यापार। नामा चोखट करी अक्षर ॥ १ ॥ देवा तुझा मी व्यापारी। सेवा करीन नानापरी ॥ २ ॥ धर्म खर्डा केला जमा। खर्च

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घातला पूर्वकर्मा ॥ ३ ॥ दीन्हीं रोजनामे महिन्याचे। एकादशी द्वादशी पोत्याचे ॥ ४ ॥ सेवेची घडली बा शिल्लक बाकी। भरत हुजत नेटकी ॥ ५ ॥ नाम्यानें मोह जबाब दिला। तो वैकुंठीं सरता केला ॥ ६ ॥

१६६४. माता पिता बंधु कुळगुरु दैवत। सखा सर्व गोत केशिराज ॥ १ ॥ जन्मोनि पोसणा तुझा मी अंकिला। अणिकांचा पांगिला न करीं देवा ॥ २ ॥ विष्णुदास नामा विनवितो केशवा। झणीं घालिसी देवा संसारासी ॥ ३ ॥

१६६५. दाविसी अनंता स्वरूपें अनेक। वाउगाचि शोक वाढविसी ॥ १ ॥ आपणा मानसीं विचारूनि पाहें। सावधान होये तुझे पायीं ॥ २ ॥ तूंचि परमार्थ भक्तां अंगसंगें। तारी पांडुरंगे बहुतांसी ॥ ३ ॥ नामा म्हणे हरी निर्वाणीचें बीज। मजसाठीं गुज सांगा वेगीं ॥ ४ ॥

१६६६. काय आम्हापाशीं आहे धन वित्त। दान तें उचित देऊं काय ॥ १ ॥ देतां घेतां आम्हां पुरें पुरें झालें। संगति त्यागिलें भिवोनियां ॥ २ ॥ काय वाणूं गुण भिकारपणाची। होसी पंढरीची नामनौका ॥ ३ ॥ नामा म्हणे पुढें दाखवी मारग। आम्ही तुज मागें येऊं सुखें ॥ ४ ॥

१६६७. देव दगडाचा भक्त हा मायेचा। संदेह दोघांचा फिटे कैसा ॥ १ ॥ ऐसे देव तेहि फोडिले तुरकीं। घातले उदकीं बोभातिना ॥ २ ॥ ऐसीं लोहदैवतें नको दावूं देवा। नामा म्हणे केशवा विनवितसें ॥ ३ ॥

१६६८. माझे गुणदोष आणशिल मना। सर्व नारायणा अपराधी ॥ १ ॥ सेवाहीन दीन पातकाची रासी। आतां विचारिसी काय ऐसें ॥ २ ॥ अंगुष्ठ मस्तकापर्यंत। अखंड दुष्कृत्य आचरलों ॥ ३ ॥ स्वप्नीं मज तुझी घडली नाहीं भक्ति। पुससी विरक्ति कोठोनियां ॥ ४ ॥ तूंचि माझा गुरु तूंचि माझा स्वामी। सकळ अंतर्यामीं वससी तूं ॥ ५ ॥ नामा म्हणे माझें चुकवीं जन्ममरण। न करीं उदासीन पांडुरंगा ॥ ६ ॥

१६६९. काय करूं आतां देवा विश्वंभरा। मजलागीं थारा नाहीं कोठें ॥ १ ॥ उबगति सोयरींधायरीं समस्त। काय करूं अंत पाहसी माझा ॥ २ ॥ तूंचि मातापिता गुरुबंधु होसी। जाऊं मी कोणासी शरण आतां ॥ ३ ॥ पायीं थारा मागे नाम्याची विनंति। चित्त द्या श्रीपति आतां वेगें ॥ ४ ॥

१६७०. आसनीं शयनीं भोजनीं गमनीं। तुझे पाय दोन्ही दावीं मज ॥ १ ॥ संसार कल्मष समूळ छेदिसी। दावीं अहर्निशीं पाय मज ॥ २ ॥ हरी ध्यानीं मनीं भक्तां तूं परेशा। अनाथा कोंवसा गोंवळिया ॥ ३ ॥ नामा म्हणे नाम ऐकों सर्वोत्तमा। संसारींच्या श्रमा वारी देवा ॥ ४ ॥

१६७१. नव्हे माझें कांहीं नेणों तुजविण। होसी नारायणा साहाकारी ॥ १ ॥ खांबसूत्रीं दावी अनेक पुतळे। नकळोचि खेळे खेळकरी ॥ २ ॥ दैत्य वृत्रासुर आपटी आकाशीं। आनंदें खेळविसी सुरवरां ॥ ३ ॥ नामा म्हणे तुझी नकळे करणी। जन्मोजन्मीं क्षणी दावीं पाय ॥ ४ ॥

१६७२. हत्तीच्या चरणावरी बैसे माशी। नमन तयासी करावया ॥ १ ॥ काय म्यां अन्याय केले तुजपाशीं। कैसे हृशीकेशी सांग बापा ॥ २ ॥ तैसें कायसें मी केवढें बापुडें। लागे कोणीकडे देवराया ॥ ३ ॥ नामा म्हणे तैसें मी एक दुबळें। चरणावेगळें करूं नको ॥ ४ ॥

१६७३. कृपणाचें धन असे भूमि आंत। जेथें जाय चित्त तेथें राखी ध्यान ॥ १ ॥ ऐसी मज देवा लावावी संवय। हेंचि मज द्यावें पांडूरंगा ॥ २ ॥ जेथें जेथें मन जाईल हें माझें। तेथें तेथें तुझें रूप भासे ॥ ३ ॥ नामा म्हणे सर्वांपर मी अज्ञान। विनवी आस करून पांडुरंगा ॥ ४ ॥

१६७४. तुझिया चरणाचें तुटतां अनुसंधान। नेलें माझें मन षड्वर्गीं ॥ १ ॥ धांव गा विठ्ठला सोडवीं आपुला दास। थोर कासावीस केलें बापा ॥ २ ॥ कर्म कुळाचार क्रोध हा अनिवार। मदें निरंतर भ्रांत केलें ॥ ३ ॥ मत्सरें तुजसी दुराविलें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देवा। लोभें केला गोंवा गर्भवासीं॥ ४॥ दंभ रसातळीं जातसे घेऊनि। विश्वचक्षु होऊनि पाहसी कैसा॥ ५॥ नामा म्हणे मज तुझाचि भरंवसा। अनाथा कुंवसा होसी देवा॥ ६॥

१६७५. मनीं जे जें देखें परी दृष्टी नेणें। प्रेमाची ते खूण सांगावया॥ १॥ काय करूं मायबापा गा विठ्ठला। मज कां अबोला धरिलासी॥ २॥ मानसीं बसणें प्रत्यक्ष पाहणें। तुझें नाम गाणें तरी साच॥ ३॥ नामा म्हणे किती सांगावें गा तुज। केशवा हें गुज पुरवीं माझें॥ ४॥

१६७६. पुंडलिक वरद आनंदें अभेद। विठ्ठल विद्गद नाम तुझें॥ १॥ पाव गा वेगीं मजलागीं झडकरी। बुडतों भवसागरीं तारी मज॥ २॥ आकांत अवसरीं स्मरिला गजेंद्र। दीनानाथ ब्रीद साच केलें॥ ३॥ स्मरली संकटीं द्रौपदी वनवासी। धांवूनि आलासी लवलाही॥ ४॥ प्रल्हादें तुजलागीं स्मरिलें निर्वाणीं। संकटापासूनि रक्षियलें॥ ५॥ नामा म्हणे थोर पिडिलों गर्भवासें। अखंड पाहातसे वाट तुझी॥ ६॥

१६७७. माझ्या बोबडिया बोला। चित्ता द्यावें बा विठ्ठला॥ १॥ वारा जाय भलत्या ठाया। तैसी माझी रागछाया॥ २॥ गातां येईल तेणेंची गावें। येरी हरी हरी म्हणावें॥ ३॥ तान मान नेणें देवा। नामा विनवितो केशवा॥ ४॥

१६७८. काया मनें वाचा नेणों भक्तिभाव। करिसी उपाव केशराज॥ १॥ थोरपणासाठीं मन हे हव्यासु। मी तो कासाविसु होय देवा॥ २॥ सर्वांभूतांमाजीं समत्व दिससी। नामा म्हणे ऐसी दावीं लीला॥ ३॥

१६७९. निर्गुण निराकार होतें शून्यपणें। आम्हासी असणें तेचि ठायां॥ १॥ आपुली करणी तुम्ही न विचारोनी। दुसरीया क्षणीं बोला ठेवा॥ २॥ सुखें एकरूप होतों तुझे पोटीं। कासया हे सृष्टी वाढविली॥ ३॥ विकाराचें मूळ दिधलें हें शरीर। तेणें कष्टी थोर झालों आम्ही॥ ४॥ पाप पुण्य दोन्हीं लाविलीं सांगातें। म्हणऊनि सुखातें अंतरलों॥ ५॥ यमलोकीं वास रौरव यातना। तेणें नारायणा धाक थोर॥ ६॥ खातों जेवतों तें न लागेच अंगीं। झालों तो उद्वेगी रात्रंदिवस॥ ७॥ ऐसे देह आम्हां कासया दिधले। काय मागितले आम्हीं तुम्हा॥ ८॥ सृष्टीपूर्वीं पाप नव्हतें गा हरी। कासया श्रीहरि कष्टी केलें॥ ९॥ वेदशास्त्रभय आम्हांसी लाविलें। तें तुम्हीं टाकिलें एडीकडे॥ १०॥ वेदशास्त्रवचन चुकल्या अवचिता। गोसावीजी होतां दंडावया॥ ११॥ मागां चुकलेती तें ठेवा एकीकडे। आतां तरी पुढें सांभाळावें॥ १२॥ एकरूप तुम्ही होतेती निर्गुणीं। तेथें आमुचें कोण्ही बोलों आलें॥ १३॥ निर्गुण सांडूनि तुम्हीं व्हावें जी सगुण। ऐसें तुम्हा कोण बोलाविलें॥ १४॥ आपुलीये इच्छें ब्रह्मांडें रचिलीं। काय सांगितली जी आम्ही तुम्हां॥ १५॥ लक्ष्मीचे विलास भरिले नाना वेश। हा काय उपदेश आम्हीं केला॥ १६॥ विश्व हें निर्मुनी झालेती गोसावी। हें काय सांगावी आम्हीं केली॥ १७॥ जें तुम्हां पाहिजे तें तुम्हीं निर्मिलें। आपणासवें केलें कष्टी आम्हां॥ १८॥ कल्पजन्मांतरीं योगयागांतरीं। जवळी श्रीहरि होतों आम्ही॥ १९॥ तुम्ही तेथें आम्ही आम्ही तेथें तुम्ही। विचारावें स्वामी पांडुरंगा॥ २०॥ तुम्हां आम्हां कांहीं वेगळीक नाहीं। बोलोनियां काईं दावूं आतां॥ २१॥ आम्हांसि तुम्ही काय सोसिलें अधिक। ठकितसां लोक कैसें नव्हे॥ २२॥ तुम्हांसी अवतार कोरडें कार्ष्टी। तुमच्या नामें दैत्यें कष्टी केलें॥ २३॥ तुम्हासी मातेनें धाडियलें वना। आमची विटंबना बहुत जाहली॥ २४॥ वल्कलें वेष्टोनी जालेती तापसी। वेष आम्हां देसी मर्कटाचे॥ २५॥ जवळीच असूनि हरविली कांता। आम्ही शुद्धिकरतां कष्टी झालीं॥ २६॥ तियेचे वियोगें शोक करा वनीं। वानरें होऊनि आम्हां मरण घडे॥ २७॥ तुम्हां स्वामीपणें बैसलिये ठायीं। आम्हीं शिळा डोईं वाहियेल्या॥ २८॥ लंकेपुढें आम्हीं वेंचियेले प्राण।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुम्ही ते दुरून बाण टाका॥ २९॥ अयोध्येचे राज्यीं तुम्हां सिंहासन। आमचे कपाळीं हीन चुकेचिया॥ ३०॥ वस्त्रें अलंकार तुम्हांसी ते घोडे। आम्ही ते उघडे पायीं चालों॥ ३१॥ चाड सरलीया नाहीं अडचण। कां हो लक्ष्मण दवडिला॥ ३२॥ लोक म्हणो तरी पाठीं सहोदर। जालेति निष्ठूर देवराया॥ ३३॥ तुम्हां एकलेनि न करावें गमन। सर्व अवघेजण आलों आम्ही॥ ३४॥ कंसाभेणें तुम्हीं राखियेल्या गाई। तेथें आम्ही काई नव्हतों देवा॥ ३५॥ भोगा स्वामीपण राखितां गोधनें। ठकोनियां खाणें आमच्या रोट्या॥ ३६॥ सर्पापोटी आम्ही घाबरलोसें विखें। तुम्ही आपुले सुखें वेगळेची॥ ३७॥ खेळतां यमुनेडोहीं टाकियेली उडी। आम्ही थडी थडी रुदन करूं॥ ३८॥ गोवर्धन गिरी आमुचिये शिरीं। तुम्ही नानापरि वेणू वाहा॥ ३९॥ आम्हां चोरून नेले वर्षभरी। तुम्ही आपुले घरीं सुखी असा॥ ४०॥ असो आतां चाड नाहीं येणेंवीण। आमुचें निर्वाण पाहूं नका॥ ४१॥ आमुचे दिवस काय वायां गेले। स्वामीया उगले राहा तुम्ही॥ ४२॥ कल्पाचे शेवटीं तुम्हां आम्हां भेटी। तेथें पैं ह्या गोष्टी कळों येती॥ ४३॥ नामा म्हणे आम्ही पाईक फुकाचे। धारक नामाचे दास तुझे॥ ४४॥

१६८०. नेणें भक्ति कांहीं करूं कैसी सेवा। हें तों मज देवा समजेना॥ १॥ करूं कैसा जप करूं कैसें ध्यान। नाहीं माझें मन स्थिर देवा॥ २॥ कामक्रोध यांची मोठी हे जाचणी। झालों वेडाराणी समजेना॥ ३॥ नामा म्हणे माझे सांवळे विठाबाई। येऊनियां राहीं हृदयामाजीं॥ ४॥

१६८१. तुज दिलें आतां यत्न करीं याचा। जीवभाव वाचा काया मनें॥ १॥ भागलों दातारा शीण झाला भारी। आतां मज तारी अनाथासी॥ २॥ नेणतां सोसिली तयांची आटणी। नव्हतीं हीं कोणी कांहीं माझी॥ ३॥ वर्म नेणें दिशा हिंडती मोकाट। इंद्रिय सुसाट सर्व पृथ्वी॥ ४॥ येरझार फेरा शिणलों सायासी। आतां हृषिकेशी अंगिकारी॥ ५॥ नामा म्हणे मन इंद्रियांचे सोयी। धांव यासी कायी करूं आतां॥ ६॥

१६८२. तुझे चरणीं चित्त रंगलें अनुरागें। बहुजन्मीं वियोगें शिणलें होतें॥ १॥ आहाळलें पोळलें तापत्रयीं वहिलें। तृष्णें विभांडिलें नानापरी॥ २॥ काम क्रोध लोभ दंभ मद मत्सर। इहीं निरंतर गांजावलों॥ ३॥ बुडतिया अवचटें लाभे तिया सांगडी। ते जीवें न सोडी तैसें जालें॥ ४॥ नामा म्हणे तुं केशव कृपेचा सागर। झणीं माझा अव्हेर करसी देवा॥ ५॥

१६८३. न विचारितां बळि घातला पाताळीं। सर्वेंची कणव उपजली तये वेळीं। द्वार न संडिसी कवणे काळीं ऐसी तुझी करणी दातारा॥ १॥ अगा केशवा सुजाणा। गाऱ्हाणें सांगूं कवणा। तुझीये नामें तुटे बंधना। देवकीनंदना वासुदेवा॥ २॥ वासुदेव बांदवडी। आपदा करोन एवढी। मग त्या कंसा केवी धाडी। मोक्ष तया दिधला॥ ३॥ सुदामा सांगातें जेवी। धान्य मागे गांवोगांवी। आपदा करोनी बहू ही। मग त्यासी राज्य दिधलें॥ ४॥ जोहरी सुदलें पांडवां। सर्वेंची उपजली कणवा। अग्नीपासोनी केशवा। रक्षियेलें तयांसी॥ ५॥ सभा पिसुनाची दाटली। द्रौपदी वस्त्रें आसुडली। एवढी आपदा करविली। मग वस्त्रें पुरविली तियेतें॥ ६॥ दैत्ये गांजियला प्रल्हाद। तुझ्या नामाचा घेतला छंद। एवढा करूनियां खेद। मग त्या दैत्या वध केला॥ ७॥ बिभीषणा हाणितल्या लाथा। लंका दिली त्या उचिता। समर्थे केलें तें बरवें आतां। तूं रघुनाथा ऐकें पैं॥ ८॥ आम्ही लाडके डिंगर। माझें बोलणें उद्धट फार। तूं तंव कृपेचा सागर। उतरी पार म्हणे नामा॥ ९॥

१६८४. प्रपंचाविषयीं नव्हतों आम्ही दीन। दीनानाथ कोण म्हणे तुज॥ १॥ सुष्ट दुष्ट तरी माझें आचरण। तें तुज भूषण झालें देवा॥ २॥ पतीतपावन कैसेनी जोडतें। जरी तें नव्हतें कर्म आड॥ ३॥ नामा म्हणे ऐसा आहेसी गा देवा। विचारिसी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

केशवा मायबापा॥ ४॥

१६८५. निरंजनी वनी पाषाण पैं व्हावें। परी जन्मा न यावें मग त्याच्या॥ १॥ राजाचें लेंकरूं पांघरे वाकळ। तेव्हां तें सकळ लाज कोणा॥ २॥ पोसवेना तरी दवडूनि देईं देवा। नामा तुज केशवा विनवीतसे॥ ३॥

१६८६. माझीया मनाचें बैसणें जे जे ठायीं। तेथें तेथें राही पांडुरंगा॥ १॥ भीमा चंद्रभागा वैकुंठ पंढरी। दावीं दृष्टीभरी निरंतर॥ २॥ पुंडलिका समोर लक्ष निरंतरी। तैसाची अंतरीं येऊनि राहें॥ ३॥ कटीं कर विटे समचरण गोमटें। पाहातां अति नेटकें हेंचि ध्यान॥ ४॥ पुरवीं माझी आस तूं बाप माउली। करीं मज साउली पद्मकरें॥ ५॥ नामा म्हणे झणीं करिसी उदास। होती कासावीस प्राण माझे॥ ६॥

१६८७. आसनीं शयनीं आठवीं अनुदिनीं। नित्य समाधानीं रूप तुझें॥ १॥ काम धाम कांहीं नलगे माझ्या चित्तीं। न देखें विश्रांति तुजवीण॥ २॥ तापत्रय ओणवा लागला चहूंकडे। न देखें विश्रांति तुजवीण॥ ३॥ तुजवीण ते जिवलग दुजे कोण होईल। तें माझे निवारील उद्वेग हे॥ ४॥ कृपेचा सागरू त्रिभुवनीं उदारू। न करी अव्हेरू अनाथाचा॥ ५॥ नामा म्हणे केशवा आस माझी पुरवीं। पाउलें दाखवीं एक वेळां॥ ६॥

१६८८. आतां माझी चिंता तुज नारायणा। रुक्मिणीरमणा वासुदेवा॥ १॥ द्रौपदी संकटीं वस्त्रें पुरविलीं। धांव त्वां घेतली गजेंद्रासी॥ २॥ उपमन्या आळी तुवां पुरविली। अढळपदीं दिली वस्ति ध्रुवा॥ ३॥ नामा म्हणे करुणा करिसी केशवा। तूं माझा विसांवा पांडुरंगा॥ ४॥

१६८९. विष पाजावया पूतना ते आली। ते तुवां तारिली काय म्हणुनी॥ १॥ पुसाया म्हणोनि वेश्या बोभाईली। ती तुवां तारिली काय म्हणुनी॥ २॥ पिंगळेची आख्या पुराणीं ऐकिली। ते तुवां तारिली काय म्हणुनी॥ ३॥ गौतमाचें शापें अहल्या शिळा झाली। ते तुवां तारिली काय म्हणुनी॥ ४॥ नामा म्हणे केशवा अकळ तुझी करणी। विसंबसी झणीं तूचि मज॥ ५॥

१६९०. तुझें गुणनाम ऐकतां श्रवण नाराध्ये। अवलोकन करितां नयन नाराध्ये। पूजन करितां कर नाराध्ये। ऐसीं आराणूक द्यावी कमळापती॥ १॥ नरहरी नरहरी या नामें उदंड। केव्हांही नसावें रिकामें तोंड। खांदीं सतत करंडा वाहे। मस्तकीं अखंड निर्माल्य राहे। नेत्रीं आनंदजळ वाहे। यामध्यें देवा झणें कांहीं उणें न होय॥ २॥ तुझेनी प्रसादें जठर पोसिलें। चरणोदकें तृष्णाहरण केलें। नामें नृत्य करितां मन हें निवालें। दंडवत घालितां श्रम हरले॥ ३॥ गतशयनीं विसर न द्यावा श्रीरामा। यापरी निश्चित परमात्मा। तूं आलिया निवारिसी श्रमा। ऐसें केशिराजा विनवितो नामा॥ ४॥

१६९१. तुझें नाम म्हणतां सुलभ अनंता। दुर्लभ म्हणतां अंतकाळीं॥ १॥ तैसें तुवां मज केशवा करावें। हृदयीं भेदावें नाम तुझें॥ २॥ मुके पशु पक्षी वृक्ष आणि पाषाण। तयां नारायणा गती कैसी॥ ३॥ नामा म्हणे कैसें केशवा सांगणें। अज्ञानी ते नेणें कवणें परी॥ ४॥

१६९२. देवा निढळावरी हात दोनी। पाहें चक्रपाणि वाट तुझी॥ १॥ धांव गा धांव सख्या पांडुरंगा। जीवीं जीवलगा मायबापा॥ २॥ तुजविण ओस दिसती दाही दिशा। धांव जगदीशा मजसाठीं॥ ३॥ नामा म्हणे काय बैसलों निवांत। धांवतो अनंत भक्तांसाठीं॥ ४॥

१६९३. भागलासी देवा धांव धांवणिया। दाखविसी पायां पांडुरंगा॥ १॥ गजेन्द्र गणिका तुम्हां श्रमविले। मी काय उगलें परदेशी॥ २॥ सोळा सहस्त्र गोपी त्या उद्धरती। माझी कींव चित्तीं कां बा नये॥ ३॥ नामा म्हणे आम्हां पुरे तुझा संग। वारंवार मग वारी कोण॥ ४॥

१६९४. केशवचरणी मनें दिली बुडी। इंद्रियें बापुडीं धांवती पाठीं॥ १॥ संसार संभ्रम नको सुखलेश। भातुकें सरीसें पाठवीसी॥ २॥ जन्म-

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जन्मांतरीं जाणावें कवणें। नेणोनि भोगणें कोणें स्वामी॥ ३॥ नामा म्हणे भक्तवत्सला केशवा। आम्हां साठीं धांवा घाली हरी॥ ४॥

१६९५. ऐशा विचारें समाधान करीं। गोविंद श्रीहरि नारायण॥ १॥ सर्वकाळ ऐसी वदो ही वैखरी। आणीक अंतरीं नाठवावें॥ २॥ आणीकासी गुज न बोले वदन। वदो नारायण सर्वकाळ॥ ३॥ रामकृष्ण माझ्या देवाचें स्तवन। शास्त्रेंही पुराणें भाट ज्याचीं॥ ४॥ नामा म्हणे आतां ऐसें करीं देवा हृदयीं केशवा राहें माझ्या॥ ५॥

मागणें

१६९६. पैल पिकली पंढरी। विठ्ठलरायाची नगरी॥ १॥ पाहा पाहा एकलें निरुतें। विश्व केलें हे मागुतें॥ २॥ केशव खळेदान देतां। नामा झलासे मागता॥ ३॥

१६९७. विटेवरी नीट उभा कटीं ठेवुनी कर। तो पुंडलिकाचे द्वारीं देखियेला॥ १॥ बहुली बहुली देहुडा पाउली। गुंजाहार गळां देखियेला॥ २॥ पुष्पवतीच्या संगमीं गोपाळ आश्रमीं। काला करितां आम्हीं देखियेला॥ ३॥ वेणु पाहतां चहूंकरीं नाद उठला अंबरीं। वासुरें तटस्थ हुंबरी होऊनि देखियेला॥ ४॥ अंगीं चंदनाची उटी मयूरपत्रांची दाटी। चेंडू खेळतां यमुनेतटीं देखियेला॥ ५॥ नामा म्हणे केशवा देखियेलें हृदयीं। जन्मवरी राहीं हेंचि मागें॥ ६॥

१६९८. बाहेरीं भीतरीं तुजचि मी देखें। चित्त तेणें सुखें वेडावलें॥ १॥ संतसंगें मज पालट हा झाला। पाहतां विठ्ठला रूप तुझें॥ २॥ मीपणासहित आनंदी बुडालें। न निघे कांहीं केलें चित्त माझें॥ ३॥ नामा म्हणे एक उरलीसे वासना। स्वामिसेवकपणा देईं देवा॥ ४॥

१६९९. मन माझें आंधळें कपटाचें कवाड। भक्ता केंवि उघडे ज्ञानेंविण॥ १॥ काय करूं देवा माझिया मी दैवा। अभक्तांसी भाव केंवि होय॥ २॥ हें माझे म्हणती कुबुद्धि लेंकुर। मागें काळ वैर पाहतसे॥ ३॥ नामा म्हणे केशवा सांडीं दुजा भाव। तुझे पायीं ठाव देईं देवा॥ ४॥

१७००. मी असें तेथें तूं कैंचा। हा उपजत ठायींचा तोडीं वेलू॥ १॥ आपुलें करोनी ठेवीं तुझे चरणीं। न मानिती कोणी क्षितीमाजीं॥ २॥ सेवा तुझी देईं नको दुजेपण। येर तो अभिमान खंडीं माझा॥ ३॥ देवा आवडसी माझिया जीवा। सुखरूप केशवा विठ्ठलराजा॥ ४॥

१७०१. मनें ध्यान करणें वाचें उच्चारणें। नयनें तुज पारणें हेंचि देईं॥ १॥ करें पूजा करणें माथा चरणीं ठेवणें। श्रवणीं गुण ऐकणें हेंचि देईं॥ २॥ षट्चक्रावरी मार्ग बावन्न अक्षरीं। निरालंब निरंतरीं भेटी देईं॥ ३॥ मनसा वाचा कर्म आणि दश इंद्रियें। तुझ्या चरणीं दृढ होय ऐसे करीं॥ ४॥ डावी उजवीकडे आणि मागें पुढें। अंती चरण जोडे ऐसें करीं॥ ५॥ नामा म्हणे केशव तुझी मज गोडी। जन्मोजन्मीं जोडी हेचि देईं॥ ६॥

१७०२. काळ देहासी आला खाऊं। आम्ही आनंदें नाचूं गाऊं॥ १॥ कोणे वेळे काय गाणें। हें तो भगवंता मी नेणें॥ २॥ टाळ मृदंग दक्षिणेकडे। माझें गाणें पश्चिमेकडे॥ ३॥ नामा म्हणे बा केशवा। जन्मोजन्मीं द्यावी सेवा॥ ४॥

१७०३. तूं एक सज्ञान मी एक अज्ञान। तुझें नाम जाण विस्तारीलें॥ १॥ आतां करिसी काय आतां करिसी काय। सांपडली सोय रामचंद्रा॥ २॥ चरणीं जे आहे ती माझी माय। ईश्वरू तो वाहे शिरकमळीं॥ ३॥ नामा म्हणे देवा न सोडीं मी भावा। जन्मोजन्मीं सेवा द्यावी तुझी॥ ४॥

१७०४. दास्यत्व न घडेची तुझें। आयुष्य वेंचिलेंवीण काजें। धरणीं ओझें पै झालें। तुझ्या प्रासिवांचोनि॥ १॥ पुनरपि जन्मा येईन मागुता। कवण जाणे कैसी व्यवस्था। तुज मी ध्याईन अनंता। ऐसा लाभ कैं होईल आतां॥ २॥ तुझ्या नामाचा वोरसु। तेणें चुकला गर्भवासु। नामा विनवी विष्णुदासु। देईं सौरसु आपुले नामीं॥ ३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१७०५. स्वामी एक व्हावा तुजचि सारिखा। करी निज सेवका जगद्वंद्य॥ १॥ देउनी प्रेमातें पाळिसी तूं बाळें। न करिसी जीवावेगळें क्षणभरी॥ २॥ बळी भीष्म नारद उद्धव रुक्मांगद। हनुमंत प्रल्हाद अंबऋषि॥ ३॥ नामा म्हणे हेंचि देईं जन्मोजन्मीं। मी दास तूं स्वामी केशिराजा॥ ४॥

१७०६. हेचि माझी संध्या हेंचि माझें ध्यान। तुझ्या पायीं मन लागो देवा॥ १॥ हेचि माझी ऋद्धि हेचि माझी सिद्धि। अखंड समाधी पाय तुझे॥ २॥ नामा म्हणे हेंचि देईं गा श्रीपती। कथेची-विश्रांति जन्मोजन्मीं॥ ३॥

१७०७. पंढरीचा वास चंद्रभागें स्नान। आणिक दर्शन विठोबाचें॥ १॥ हेंचि घडो मज जन्मजन्मांतरीं। मानणें श्रीहरी नाहीं दुजें॥ २॥ मुखीं नाम सदा संतांचें दर्शन। जनीं जनार्दन ऐसा भाव॥ ३॥ नामा म्हणे तुझें नित्य महाद्वारीं। कीर्तन गजरीं सप्रेमाचें॥ ४॥

१७०८. माता तेचि तात सोयरे हरिजन। यम नेम नेणें दोन गोष्टी॥ १॥ गोष्ट ते कोणती म्हणाल तुम्ही जरी। वाचे हरिहरि म्हणतसों॥ २॥ नामा म्हणे आम्ही मागतों देवासी। कीर्तनीं उपवासी करावें देवा॥ ३॥

१७०९. आम्हीं दिला जीव तुझिया कीर्तनें। पांगुळलीं मनें योगियांचीं॥ १॥ न बोलवे वाचा न बोलवे कांहीं। आपेआप पाहीं ठाकलोंसे॥ २॥ ऐसें तुझें नाम दे गोड गा देवा। घालीं बा केशवा हृदयामाजीं॥ ३॥ नामा म्हणें आम्हां सांपडलें वर्म। नित्य वाचें नाम रामकृष्ण॥ ४॥

१७१०. आठवितां मनीं तुझी ब्रीदावळी। येऊनि जवळी उभा ठाके॥ १॥ लाज धरोनिया होतोसी माघारा। तुजची दातारा दिसे शोभा॥ २॥ नामरूपासाठीं घेसी नाना सोंगे। भक्त जीवलगे अंतकाळीं॥ ३॥ नामा म्हणे मज नको हा संसार। मज निरंतर देईं संग॥ ४॥

१७११. हेंचि मगतसें तुज। वनीं जन्म देईं मज॥ १॥ सुखें करोनि राहेन। तुझे पाहीन चरण॥ २॥ शीण बहुत पावलों। आतां तुजपाशीं आलों॥ ३॥ न करीं अव्हेर। दास तुझा मी किंकर॥ ४॥ येत काकुळती। नामा म्हणे देवाप्रती॥ ५॥

१७१२. आसनीं शयनीं भोजनीं मनीं ध्यानीं। तुझे चरण दोन्ही मज देईं॥ १॥ पातक कल्मष समूळचि छेदूं। मन परमानंदु तुझे नामीं॥ २॥ ध्यानीं हृषीकेशा भक्तजनपरेशा। अनाथा कोंवसा गोवळिया॥ ३॥ विष्णुदास नामा विनवी मेघश्यामा। संसारींच्या श्रमा तारीं देवा॥ ४॥

१७१३. सगुण निर्गुण श्रुती ज्या बोलती। तो तूं माझे चित्तीं पंढरिराया॥ १॥ आहेसि तितुकें तूंचि सर्वांगत। मी काय अनाथ वर्णूं तुज॥ २॥ चरणींची आवडी नसंडावी मनें। यापरि पोसणें मायबापा॥ ३॥ साक्ष भीमरथी संत पुंडलीक। नाम्यातें आणीक नलगे कांहीं॥ ४॥

१७१४. श्रीमुखाची सोय पाहों म्हणों जरी। एवढा मी अधिकारी कैंचा देवा॥ १॥ चरणांजवळूनि नसावें जी दूरी। जन्मजन्मांतरीं हेंचि देईं॥ २॥ तुज देतां सोपें मज तृप्ति अल्प। सर्वज्ञा साक्षेप सांगतसें॥ ३॥ अनाथाचा नाथ हेंची ब्रीद साच। न करावें उदास नामा म्हणे॥ ४॥

१७१५. बाहेरीं भीतरीं पाहतां दिसे एकू। उभा असे व्यापकु पंढरीराव॥ १॥ पंढरीचा राणा विटेवरी जाणा। जीवींचिया खुणा भक्तां सांगे॥ २॥ गुतलों संसारीं भरलों कर्मभांडारीं। विषयामाझारीं मोहियेलें॥ ३॥ नामा म्हणे केशवा माझें उणें न पाहीं। चरण सेवा देईं जन्मोजन्मीं॥ ४॥

१७१६. हेंचि देवा पैं मागत। चरणसेवा अखंडित॥ १॥ वास द्यावा पंढरीचा। सदा संग हरिदासांचा॥ २॥ जन्म होका भलते याति। परि मी न चुकें हरिभक्ति॥ ३॥ नामा म्हणे कमळापती। हेंचि द्यावें पुढता पुढती॥ ४॥

१७१७. विणा घेऊनियां करीं। उभा राउळामाझारीं॥ १॥ तहान भूक हरपली। छंद लागला विठ्ठलीं॥ २॥ कन्या पुत्र बाप माय। त्यांचा आठव तो नये॥ ३॥ नामा म्हणे हेंचि देईं। तुझे पाय माझे डोईं॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१७१८. नेणें मन कांहीं विश्वास नामाचा। गोसावी आमुचा पांडुरंग॥ १॥ संसारीं पडलों कर्माचे भांडारीं। कृपा निरंतरीं करीं मज॥ २॥ नेणें तुझें ध्यान नेणें तुझें प्रेम। दावीं मज वर्म सेवकासी॥ ३॥ नामा म्हणे माझे गुणदोष कांही। ठाव तुझे पायीं देईं मज॥ ४॥

१७१९. होईन संतांचा वोळगणा। दास डिंगर पोसणा॥ १॥ प्रेम द्यावें नारायणा। भूतदया परिपूर्णा॥ २॥ संतचरणींचे रज। हेंचि सर्व तीर्थ मज॥ ३॥ सेवीन संतउष्टावळी। तेणें पवित्र माझी कुळी॥ ४॥ राखेन संतांचें मी द्वार। ते मज वैकुंठीहूनि थोर॥ ५॥ नामा म्हणे पंढरीनाथा। न मागे आन कांहीं सर्वथा॥ ६॥

१७२०. ऐकें मोक्षाची मी कथा। तेणें भय वाटे चित्ता॥ १॥ देवा कांहीं न मागें न मागें। मौन असे संतसंगें॥ २॥ ऐकें मुक्तीचिया गोष्टी। तेणें होतसें हिंपुटी॥ ३॥ ऐकें समाधिची गोडी। मन तुझे पायां ओढी॥ ४॥ ऐकें स्वर्गसुख थोरी। भेणें कांप येतो भारी॥ ५॥ नामा म्हणे अभयदान। देऊनि सांगें प्रेमखूण॥ ६॥

१७२१. साधुनि समाधी तुज म्यां चिंतावें। मग माझ्या यावें हृदयांत॥ १॥ तंव पांडुरंगा संतामाजीं उणें। तुजलागीं करीं देवा॥ २॥ तुजसी संबंध लौकिकावेगळा। पाळिसी गोपाळा लळे माझे॥ ३॥ उपजतां बाळ हितार्था लागोनी। प्रसन्न जननी होईं आधीं॥ ४॥ भीडेस्तव पान्हा फुटोनियां थानीं। पाहे त्या पाजुनि दिलें काय॥ ५॥ सूर्यास लागे विनवावा। यावें तुवां गांवा प्रकाशित॥ ६॥ मग तें तयानें निवारावें तमा। हें तो मेघश्यामा नाहीं श्रुत॥ ७॥ पृथ्वी भूतीं काय करावा आदरू। मग त्याच्या भारू चालवावा॥ ८॥ जीवना जीवन प्रार्थुनि आणावें। तेणें काय निववावें संत त्यासी॥ ९॥ सर्वज्ञ उदार होसी चक्रवर्ती। कार्या कारणांतीं नांद तुझी॥ १०॥ नामा म्हणे चित्त कृष्णाकार। करूनि निर्धार प्रेम देईं॥ ११॥

१७२२. आडलिया कोंवसा अनाथ कैवारी। व्रीद चराचरीं वर्णिताती॥ १॥ येईं बा श्रीहरी तूं आमुचा कैवारी। सुदर्शन करीं वेगीं येईं॥ २॥ दौपदीच्या आकांतीं पावलासी लौकरी। तैसा झडकरी शीघ्र येईं॥ ३॥ गजेंद्राकारणें कळवळा अगाध। जगा तुझें ब्रीद तैसा येईं॥ ४॥ सुदामा ब्राह्मण अनाथ दुर्बल। तेथे तूं केवळ अवतरलासी॥ ५॥ ध्रुवासी स्थापिलें उपमन्युकारणें। क्षीरसागर देणें तैसा येईं॥ ६॥ अंबऋषीसाठीं सोशी गर्भवास। दुर्वासा कासावीस तैसा येईं॥ ७॥ विदुरासी भक्तपण तूं उद्धवासी जवळीं। अर्जुना सर्वकाळीं तैसा येईं॥ ८॥ गोपाळा यशोदा नंदासी खेळसी। गाई रानीं चारिसी तैसा येईं॥ ९॥ नामा म्हणे मागेन सदा अभयकर। प्रेमाचा उद्धार तैसा येईं॥ १०॥

१७२३. प्रपंची कां मातें करिसी उदासीन। तरी तुझें ध्यान लागे मना॥ १॥ हेचि तुज मागणें जन्मजन्मांतरीं। न मागतां अंतरीं प्रगट होसी॥ २॥ इंद्रियांचे व्यापार अवघेचि तोडी। प्रेमरसगोडी देईं मातें॥ ३॥ नामा म्हणे शरण आलों मी केशवा। हाचि तूं पुरवावा मनोरथ॥ ४॥

१७२४. शरीर प्राणाचे देउनी बळीदान। साधावें निधान प्रेमभक्ति॥ १॥ हेंचि नित्य मागें तया श्रीवल्लभ। याहुनी दुर्लभ आन नाहीं॥ २॥ हरिदासांचा संग हरिकथा अनुराग। हेंचि परमभाग्य पुण्यरूप॥ ३॥ सर्वभावें करूनि सर्वभूतीं करूणा। सर्वत्र देखणा विठ्ठलरूप॥ ४॥ विषयी विकृति नामीं नित्य प्राप्ति। हृदयीं कृष्णमूर्ति वसे सदा॥ ५॥ नामा म्हणे मग तो केशव कृपासिंधु। देईल भक्तिबोधु प्रेमसुखें॥ ६॥

१७२५. वेणू वाहोनी सांवळा। गाई चारिसी गोवळा॥ १॥ कां बा न येसी धांवत। विठ्ठल माझें कुळदैवत॥ २॥ अंगीं चंदनाची उटी। पदक मिरवलें कंठीं॥ ३॥ गळां माळ वैजयंती। सुदर्शन घेऊन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हातीं॥ ४॥ कासे पितांबर शेला। विटेवरलिया विठ्ठला॥ ५॥ नामा म्हणे पीडिलों भुकें। देईं प्रेमाचे भातुकें॥ ६॥

१७२६. पुलक धर्म रोमांच नाहीं जंव उठले। सजळ नाहीं झाले नयन जंव॥ १॥ हरिभक्तिचें सुख कळलें जे म्हणती। लटिकें बोलिजेति अभयलोकीं॥ २॥ ऐसा भक्तिप्रेमा देईं जी देवा। सर्व भावें सेवा घडे तुझी॥ ३॥ श्रवणीं ऐकतां नाम वाचे भव बोले। नाहीं सुखावलें मन त्याचें॥ ४॥ श्रीहरीचें नाम म्हणवितां न म्हणे। सहज उच्चारणें कैंचें त्यासी॥ ५॥ दर्दुरा चोरापणी जिव्हा चटपटी। नाम सांडोनी गोष्टी राज्याची करी॥ ६॥ देवाच्या मूर्ती संत महंत देखोनी। न वचे लोटांगणीं भावें त्यासी॥ ७॥ न लावी त्यांचे रज टकमका पाहात। वुजवण जैसे शेत राखे तैसें॥ ८॥ ऐसे कैक प्राणी आहेत मूढमती। हीत सांगतां चित्तीं दुःख वाटे॥ ९॥ नामा म्हणे केशवा मी तुझें दीन। नेणें तुजवांचोन आन दुजें॥ १०॥

१७२७. पतीतपावन ब्रीद सोडवीन आतां। तरीच पंढरीनाथा दास तुझा॥ १॥ माझे गुण दोष न धरावे मनीं। तारिले मजहुनी वंद्य कोण॥ २॥ पितीया पतन स्वामिची करणी। गणिका विमानीं कीर्ति कोण॥ ३॥ अजामेळा अधिकार जावया वैकुंठा। माझीया अदृष्टा काय झालें॥ ४॥ शिशुपाळें शिव्या दिधल्या सभेआंत। त्यांहुनि पतित थोर झालों॥ ५॥ नामा म्हणे पुढती न बोले मी वर्म। अनुभवोनि प्रेम देईं मज॥ ६॥

१७२८. आणिक न मागें हें ब्रीद साजे चातका। भूमीच्या उदका न खालवी माथा॥ १॥ आणिकापुढें न गाय हें ब्रीद साजे कोकिळीये। वसंतऋतू स्वयें आळवितसे॥ २॥ आणिकापुढें न नाचे हें ब्रीद साजे मयूरा। वर्षला घन सारा वळोनियां॥ ३॥ एका लक्ष्मीपति वांचुनि न बैसे आणिकापुढें। हें ब्रीद साजे रोकडें गरुडासी॥ ४॥ आणिकांचा पांगिला न करीं गा देवा। नामा म्हणे केशवा रंक तुझा॥ ५॥

१७२९. काय देतील ते नर। जंव दिलें नाहीं रघुवीरें॥ १॥ आजि दिलें उद्यां नाहीं। ऐसियासीं मागों कांहीं॥ २॥ हात पसरूं ऐसें धुरें। दिलें कल्पांति न सरे॥ ३॥ नामा म्हणे देवाधिदेव। समर्थ दाता पंढरीराव॥ ४॥

१७३०. माझें तें किती। दाता लक्ष्मीचा पती॥ १॥ मेघ वर्षे शिळाधारी। तेथें चातक चंचुभरी॥ २॥ महाडोह गंगाजळ। तृप्त एखादा अंजुल॥ ३॥ साखरेची साठी। तेथें मुंगीची मुखवटी॥ ४॥ नामा म्हणे मी सेवेसी। तूं ते उदाराचा राशी॥ ५॥

१७३१. पतितपावन नाम ऐकुनी आलों मी द्वारा। पतीतपावन नव्हेसी म्हणुनी जातों माघारा॥ १॥ घ्यावें तेव्हां द्यावे ऐसा अससी उदार। काय धरूनि देवा तुझें कृपणाचें द्वार॥ २॥ सोडीं ब्रीद देवा आतां नव्हेसि अभिमानी। पतीतपावन नाम तुझें ठेवियलें कोणीं॥ ३॥ झेंगट घेउनी हातीं दवंडी पिटीन तिहीं लोकीं। पतीतपावन देवा परी तूं मोठा घातकी॥ ४॥ नामा म्हणे देवा तुझें न लगे मज कांहीं। प्रेम असों दे चित्तीं म्हणुनी लागतसें पायीं॥ ५॥

१७३२. राहोनि भोवतीं नामा वाटे पाहे। श्वास न समाये दुःखें पोटीं॥ १॥ म्हणती मायेनें वैर साधियलें। विषयीं बुडालों सांगों कोणा॥ २॥ भक्तां अंतरंग देतोसी तूं देवा। भेटसी केशवा पूर्ण स्थिती॥ ३॥ पूर्ण पान्हा धेनु घालीत वोरसें। वत्स थोर हर्षें पान करी॥ ४॥ देखोनि पैं स्वामी बळेंचि वोढिलें। तळमळीत ठेलें थोर आशा॥ ५॥ कृपणें संपत्ति जोडिलीया राशी। हिरोनियां घेती बळियानें॥ ६॥ आळवी करुणा धांवे दाही दिशा। तैसें हृषीकेशा झालें मज॥ ७॥ क्षुधाक्रांत जेंवि भोजनीं बैसलें। कोणासी न बोले मातु कांहीं॥ ८॥ उठविते वेळीं नव्हतांचि तृप्ति। तैसी दुःखप्राप्ति झाली मज॥ ९॥ अघोर संसार मोहो महापुरीं।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अखंड मुरारी सुखरूप॥ १०॥ नामा म्हणे विठो अनाथाच्या बंधु। देईं सुखसिंधु मज आतां॥ ११॥

१७३३. माझें व्रत एक चालवी विठ्ठला। सकळां घटीं तुला देखें ऐसें॥ १॥ तेव्हां माझें चित्त पावे समाधान। नाहीं तरी जिणें काय व्यर्थ॥ २॥ तुझी कास आणि बुडे महापुरीं। ऐसें होतां हरि लाज कोणा॥ ३॥ मागितलें फार तुज देवा। नको बा केशवा मीतूंपण॥ ४॥ नामा म्हणे माझा कैवारी सबळ। असोनियां काळ भोगूं काशा॥ ५॥

१७३४. मनुष्य करिसी तरी भक्तीचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करीं॥ १॥ श्वान करिसी तरी उच्छिष्टाचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करीं॥ २॥ पक्षी करिसी तरी चारियाचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करीं॥ ३॥ झाड करिसी तरी तुळसीचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करीं॥ ४॥ वृक्ष करिसी तरी मंडप मेखाचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करीं॥ ५॥ पाषाण करिसी तरी रंग शिळेचेनि मिषे। तुझें द्वारीं वसें ऐसें करीं॥ ६॥ उदक करिसी तरी सडियाचेनि मिषें। तूझे द्वारीं वसें ऐसें करीं॥ ७॥ नामा म्हणे विठो कीर्तनाचेनि मिषें। तुझे द्वारीं वसें ऐसें करी॥ ८॥

१७३५. काय मागूं विठ्ठल धुरे। एक तुळसीदळ पुरे॥ १॥ मागूं मुगुट माथाचा। तरी तो आणिला इंद्राचा॥ २॥ मागूं कुंडलें कर्णींचीं। तरी ती आणिलीं कर्णाचीं॥ ३॥ मागूं पितांबर शेला। तरी तो कासेसी कसिला॥ ४॥ मागूं पादुका चरणींच्या। तरी त्या आणिल्या शेषाच्या॥ ५॥ मागूं तोडर पायींचा। थाक जाईल असुरांचा॥ ६॥ मागूं जातां लक्ष्मीसी। ऋद्धिसिद्धी जिच्या दासी॥ ७॥ मागूं म्हणे शंख जरी। तरी तो मिरवे तुमच्या करीं॥ ८॥ मागों सुदर्शन दळ। त्या शस्त्राचें तुम्हां बळ॥ ९॥ मागों वैजयंती माळ। तरी शून्य दिसेल वक्षस्थळ॥ १०॥ कारण तेंचि मागितलें। नामया केशवाचें प्रेम दिलें॥ ११॥ नामा म्हणे कांहीं न मागों। तुझे चरणीं लक्ष लागो॥ १२॥

१७३६. भावें तुझे चरण धरिले विठ्ठला। आतां तूं पांगिला करूं नको॥ १॥ नलगे मज कांहीं ऋद्धिसिद्धी पाही। मुक्तिसुख तेंहि नलगे मज॥ २॥ नामा म्हणे मज जन्म दे अनंता। भक्तिविरहिता जन्म नको॥ ३॥

१७३७. मुक्तिपद मी गा अभिलाषी न चित्तीं। झणीं अंतरती पाय तुझे॥ १॥ निर्वासना चित्तें भजन तुझें करितां। झणीं सायुज्यता देसी मज॥ २॥ मग मी काय करूं वैकुंठनायका। ऐशा प्रेमसुखा कोठें पाहों॥ ३॥ ध्यान सुखी करूं पाहें हृदयकमळी। पक्षिणी ऐसी आळी करशी झणीं॥ ४॥ संकल्पें यावें वाटे चरणाजवळीं। विकल्प काळजी झणीं देशी॥ ५॥ नामा म्हणे आतां कांहींच मी न करीं। मज होत कोटीवरी गर्भवास॥ ६॥

१७३८. देव देवी देवतार्चन। तूंचि माझें पूर्णपण॥ १॥ न मगें न मगें विठ्ठला। येथूनियां राहें उगला॥ २॥ तुझी भक्ति हेचि गोड। आणिक आम्हां नाहीं चाड॥ ३॥ जप तप नेम निष्ठा। तुजचि जाणों गा वैकुंठा॥ ४॥ यज्ञ याग मंत्र तंत्र। तूंचि आमुचें कुळ गोत्र॥ ५॥ येथूनि पंढरीराय हरी। आम्हांसि तूं अंगिकरी॥ ६॥ आम्ही करितों कीर्तन। तारावे हे तुवां जन॥ ७॥ हेंचि मागेणें हो देवा। नामा म्हणे घ्यावी सेवा॥ ८॥

१७३९. वाणी गांधिपण पाही पसारा। घेवोनि संसारा आलों असे॥ १॥ पसारे करी पसारे करी। वायां उभाराउभरी करीतसें॥ २॥ रस रसायण आणि भाजीपाला। शकुन आम्हां झाला पुरता आहे॥ ३॥ वाटे एक खोटें दांडीचें पां नेटें। कवणेपरी न फिटे कुडेपण॥ ४॥ बोलतों पैं खोटें देतात पै उणें। वांयांच शिणें रात्रंदिवस॥ ५॥ विष्णुदास नामा विनवी केशवा। तोहिपरी देवा उद्धरावें॥ ६॥

१७४०. तुझे चरणीं सुख अनुपम आहे। तें तूं जाणसी काय केशिराजा॥ १॥ आम्हां व्हावें तेंचि एकांते मागावें। नकळे जीवेंभावें ब्रह्मादिकां॥ २॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चतुरा शिरोमणी आमुची जननी। जाणते रुक्मिणी चरणमहिमा॥ ३॥ चरणींचा प्रताप जाणे गौतमवधु। जे कां श्रापें बद्धु मुक्तशिला॥ ४॥ चरणींचा प्रताप जाणती वैष्णव। नल कुबेर मणिग्रीव सखे माझे॥ ५॥ नामा म्हणे तुझे चरणींची त्रिपथा। भूषण उमाकांता ऐसें झालें॥ ६॥

१७४१. निरंतर सुख द्यावें येणें मनें। पायीं समाधान व्हावें वेगीं॥ १॥ वासनेवेगळें होऊनि एकट। असावें निकट संतसंगीं॥ २॥ कृपा मजवरी करी बा विठ्ठला। म्हणवीं आपुला दास जगीं॥ ३॥ कानीं तुझें नाम ऐकेन आवडी। चित्त द्यावें बुडी प्रेमरस॥ ४॥ मुखीं तुझें नाम गाईन निष्काम। धरूनियां प्रेम हृदयांत॥ ५॥ नेत्रीं तुझें रूप पहावें सर्वत्र। व्हावें भूतमात्र सखे माझे॥ ६॥ मनाचाही त्रास अपमान तोष। अखंड उदास देहबुद्धि॥ ७॥ सर्वकाळ व्हावा भक्तांचिये संगें। सदा अनुराग तुझ्या नामीं॥ ८॥ हेंचि माझें तीर्थ हेची माझें व्रत। दास्य जें पवित्र संतसेवा॥ ९॥ नामा म्हणे देवा तारिसी अंकिता। नाहीं तरी पतिता तारी मातें॥ १०॥

आत्मनिवेदन

कृपादान.

१७४२. देहाभिमानें पुरविली पाठी। कां हो जगजेठी नये कृपा॥ १॥ स्वात्मसुखासाठीं स्तुति करी ब्रह्मा। व्याधा निजधामा स्थिर पद॥ २॥ काय करतसे मातृपितृभक्ति। तया जगत्पति नाचतसे॥ ३॥ नाचती वैकुंठीं सर्व ऋषेश्वर। नामा म्हणे पार नाहीं नाहीं॥ ४॥

१४४३. पूर्ण कृपा केली देवा। दिधली पादपद्मसेवा॥ १॥ पापें पळालीं पळालीं। नामकीर्तनकल्लोळी॥ २॥ द्वारीं तुळसी वृंदावन। अखंड नामसंकीर्तन॥ ३॥ रंगमाळा जागरणीं। तेथें मुक्ति वाहती पाणी॥ ४॥ जन्म वैष्णवकुळीं घ्यावा। घडो संतांचिये सेवा॥ ५॥ नामदेवाची आवडी। संतचरणीं देतों बुडी॥ ६॥

१४४४. जनार्दन कृपाळुवा हृषीकेशा। पुराणपुरुषा तुज नमों॥ १॥ अभिज्ञा क्षेत्रज्ञा अचिंत्या कूटस्था। त्रैलोक्याच्या नाथा तुज नमों॥ २॥ अनंत ब्रह्मांडें तुझिया उदरीं। मेघश्यामा हरी तुज नमों॥ ३॥ देवराया तुझें कोमळ हृदय। कृपादृष्टी पाहें मजकडे॥ ४॥ तुझा मी किंकर आहें वासुदेवा। अभय या जीवा देईं आतां॥ ५॥ नामा म्हणे घालीं चरणासी मिठी। बोले जगजेठी स्वामी माझा॥ ६॥

१७४५. शंख चक्र गदा पद्मेंसि अंकित। मी तुम्हां सांगात निरंतर॥ १॥ जिकडे जाल तिकडे मी तुमचा सांगाती। तुम्हांविण संपत्ति आणिक नाहीं॥ २॥ संसाराचें ओझें पडों नेदी कोणातें। या वैष्णवा सांगातें निरंतर॥ ३॥ आसनीं शयनीं ध्यानीं मज मनीं। योगक्षेम दोन्ही वाहे त्यांचे॥ ४॥ जें मज आवडे तें तुमचिये घरीं। म्हणोंनि तुमचे द्वारीं तिष्ठतसें॥ ५॥ विठोबा म्हणे नामा न विसंबें मातें। हेंचि वर्म तूंतें सांगितलें॥ ६॥

१७४६. तुझें भक्तिसुख द्यावें मज प्रेम। वसो तुझे नाम माझे मुखी॥ १॥ सद्भक्ति विचार राहो माझे चित्ती। हेंचि कृपामूर्ति द्यावें मज॥ २॥ तुझा दास जनी म्हणवितों विख्यात। पसरिला हात फिरवूं नको॥ ३॥ नामा म्हणे नामा इतुकें द्यावें मज। ऐकोनि केशवराज काय बाले॥ ४॥

१७४७. घेरे घेरे नाम्या दिलें माझें प्रेम। घोकीं माझें नाम सर्वकाळ॥ १॥ शिरावरी हात ठेवितसें माझ्या। अभिमान तुझा गेला म्हणूनि॥ २॥ भक्तिसुख देवें दिलें नामयातें। नामा परमामृतें तृप्त झाला॥ ३॥ नामा म्हणे देवा झालों मी पावन। तुझें तुजविण कोण आहे॥ ४॥

१७४८. अपराधी तरी केला अंगिकार। कासया विचार तुज माजी॥ १॥ लोहो होतें परि परिससंगतीं। तैसा तूं श्रीपती जगामाजीं॥ २॥ घुसळितां रवी नेणें लाभ हानी। तैसें चक्रपाणि होऊं नये॥ ३॥ हीन दीन सर्व तुझाच आधार। नामा म्हणे सार हेंचि आतां॥ ४॥

१७४९. मायबापांपरीस लोभ तुझा हरी। आहे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मजवरी केशिराजा ॥ १ ॥ आतां जाणसीतें कृपाळुवा करीं। लाज सर्व हरी आहे तुज ॥ २ ॥ माझें यातिकुळ नाही त्वां पुशिलें। अन्याय साहिले कोट्यानकोटी ॥ ३ ॥ जन्मोजन्मीं मज घातलें पाठीसी। संकटीं रक्षिसी नारायणा ॥ ४ ॥ देऊनि प्रेमभातें पाळिलें पैं मातें। साउली तळहातें केली देवा ॥ ५ ॥ जे खूण जाणती तेचि माझे सखे। मी तुझें लाडकें म्हणवीं देवा ॥ ६ ॥ नामा म्हणे कांही होऊं उतराई। पुढें जन्म नाहीं ऐसें केलें ॥ ७ ॥

१७५०. दाही दिशा पाहतां दिसती निर्मळ। स्फुरण वक्ष:स्थळ होत असे ॥ १ ॥ येईल माझा विठो देईल आलिंगन। जीवें निंबलोण करीन त्यासी ॥ २ ॥ प्रेमपूर भरतें सुखसिंधू लोटली। माउली भेटली जिवलग ॥ ३ ॥ धरूनि हनुवटी सांगेल गुज गोष्ठी। पाहील कृपादृष्टी माझें म्हणोनि ॥ ४ ॥ प्रीतीचे पडिभरें कुर्वाळील मज। सांगेन निजगुज संसारींचें ॥ ५ ॥ हर्षे निर्भर नामा निवाला निवाडे। नाचे संतांपुढें सांगेन गुज ॥ ६ ॥

१७५१. निर्गुण गुणासी आलें। परब्रह्म ठसाविलें। भक्त पुंडलिका लाधलें। गौप्य केलें प्रगट ॥ १ ॥ सेवा सेवा ब्रह्मरस। विठ्ठल पंढरीनिवास ॥ धु० ॥ निर्गुण गुणाकार। मूर्ति सांवळी सुंदर। सकलही गुणांचें माहेर। मुक्तिपेठ पंढरी ॥ २ ॥ धन्य धन्य भीमातट। चंद्रभागा ते निकट। जेथें विठ्ठल वीर प्रगट। नाम गर्जती हरिदास ॥ ३ ॥ धन्य धन्य पद्माळें। सभरा भरित आनंद जळें। स्नान केलिया निर्मळें। कोटी कुळें उद्धरती ॥ ४ ॥ धन्य धन्य मान देश। विठ्ठलें केला रहिवास। नामा म्हणे विष्णुदास। देईं उल्हास भक्तीचा ॥ ५ ॥

१७५२. पंढरी माहेर विठ्ठल माउली। धांवोनि हे बोली सांगावी जी ॥ १ ॥ संसारगांवी लेंकी असे तुमची। चिंता कां तियेची सांडियेली ॥ २ ॥ सासुरवासिणी पाहातसे वाट। सांगावे कष्ट विठोबा माउलीये ॥ ३ ॥ अव्हेर माझा असे अविचारु भावा। आशा तृष्णा लावा वहिनी कां ॥ ४ ॥ एकलीये माते खेदती बहुतें। एकांते तुमतें आठवीन ॥ ५ ॥ चांडाळी हे सासु तृष्णा पैं पापिणी। कांही केल्या धनी पुरों नेदी ॥ ६ ॥ रात्रंदिवस मज नाहीं कामाचा शेवट। जीवित्वाचा वीट येत असे ॥ ७ ॥ सखी सांगातिणी तिसी नाहीं भेटी। अज्ञान हें पोटीं वाढतसे ॥ ८ ॥ सुखाचे डोह दु:ख कां नावडे। ऐसें केवीं घडे तुजविण ॥ ९ ॥ नवां ठायीं तरळली चोळी असे लेइली। आपुलिये चांग अंगींची तें ॥ १० ॥ ती धाडी जों कां रुसलिये ऐसें सांगिजे तिजपाशीं। जेवीना कां भेटी वांचोनियां ॥ ११ ॥ चहूं पुरुषार्थी नाहीं मज चाड। सेवेचें काजें झडकरी मज पाठवावें ॥ १२ ॥ रखुमाई माता पांडुरंग पिता। मी त्याची दुहिता म्हणे नामा ॥ १३ ॥

१७५३. काशिये कनोजा द्वारके गुजरु। कानडा विठ्ठल पंढरीये ॥ १ ॥ मायबापें माझी विठ्ठल-रुक्मिणी। द्वारका पाटणी माहियेर ॥ २ ॥ पर्वत शिखरीं ब्रीद नारायण। सोयरा सज्जन पंढरीये ॥ ३ ॥ बारसी भगवंत तेरसी तिखया। विठ्ठलु सोयरीया पांडुरंगा ॥ ४ ॥ विटेवरी नीट समचरणी उभा। पुंडलिकाचे लोभा भक्तीलागीं ॥ ५ ॥ विष्णुदास नामा चरणीं उतावेळु। करावा सांभाळु अपत्याचा ॥ ६ ॥

१७५४. अपत्याचे परी सांभाळितो श्रीहरी। वाट निरंतरी पाहतु असे ॥ १ ॥ संसारांत कष्ट झाले बहू भारी। मज निववी हरी मायबापा ॥ २ ॥ गांव तें पंढरी भिंवरेच्या तीरीं। निरोप माहेरीं सांगें जो कां ॥ ३ ॥ क्षीरसागराभीतरी पहुडले श्रीहरि। कवण धाक करी कुमारीचा ॥ ४ ॥ पुंडलिकाची भक्ति मांडली चराचरीं। गुढिया निरंतरी उभारिल्या ॥ ५ ॥ संत सनकादिक ते माझे सज्जन। द्वारीं असें वाहन गरुडाचें ॥ ६ ॥ रखुमाई माता विठो माझा पिता। नामा म्हणे संतां भेटावया ॥ ७ ॥

१७५५. स्फुंदत स्फुंदत नामा उभा महाद्वारीं। दृष्टि पायावरी विठोबाच्या ॥ १ ॥ देखोनि केशवें उभारिल्या बाहे। पालवीतु आहे पीतांबरें ॥ २ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संसारावरी रुसलासे नामा। दाटलासे प्रेमा ओसंडत॥ ३॥ येईं नाम्या तुज धरीन पोटाशीं। कोणें गांजिलासि दुराचारें॥ ४॥ ऐके वो रुक्मिणी अंजारूनि तुम्हीं। वोसंगा घेऊनि आळवावा॥ ५॥ जगत्र जननी संभ्रमें करूनि। प्रीतिपान्हा स्तनीं वोसंडला॥ ६॥ वोरसला नामा घेतलासे करीं। मुख पितांबरें पुसीतसे॥ ७॥ कवणें तुझे चित्तीं लावियेला चाळा। न देखतां डोळां स्फुंदतसे॥ ८॥ बुझाविला नामा दाटलासे प्रेमा। हांसे सत्यभामा काय झालें॥ ९॥ कोण कुळीं नामा काय लोभ याचा। तूं स्वामी दीनांचा पांडुरंग॥ १०॥

१७५६. करुणेचीं उत्तरें बोले नामदेव। ऐकोनि पंढरीराव हांसिन्नले॥ १॥ मग हे विवंचना सांगे रखुमाईसी। म्हणे नामयासि आणा बेगीं॥ २॥ मग रखुमाई चरणीं ठेवूनि माथा। म्हणे आणाजी समर्था नामयासी॥ ३॥ मग पंढरीराव रखुमाई ज्ञानदेव। पुंडलीक समुदाय चालिलासे॥ ४॥ येऊनि नाम्यापाशीं उभे पैं ठाकले। पुंडलीक बोले नामयासी॥ ५॥ धन्य नामदेवा तुझा एक भाव। सहित पंढरीराव आले येथें॥ ६॥ पीतांबर छाया रूप प्रगट केलें। नामया आलिंगिलें पंढरीरायें॥ ७॥ कडे घेऊनि नामा रखुमाई जननी। प्रेमपान्हा वोसंडोनी पाजी तया॥ ८॥ नामयासि घेऊनि आले पंढरीसी। वैकुंठ ओवरीसि कळस केला॥ ९॥

१७५७. स्वरूपाकारणें विश्वरूप घेशीं। निर्गुणा दाविसी गुणराया॥ १॥ तत्त्वीं तत्त्वरवी उगवे मंडळीं। अवघें झोकोळी आपुल्यातें॥ २॥ दृश्याचिये दीप्ति दृश्यासी न दिसे। समरस असे तेज त्याचें॥ ३॥ चित्स्वरूपीं नांदे तत्स्वरूप भासे। आकारासरिसें तदाकार॥ ४॥ करुणा वोतिलें सप्रेम सुतेज। तेथें तूं विराज ज्ञानदेवा॥ ५॥ ज्ञान हेंचि तोय विज्ञान हे गंगा। प्रेमें प्रेमभागा स्नान करीं॥ ६॥ एकत्व आरामे शांति पूर्ण घरीं। श्रीहरी कामारी होतो तुझा॥ ७॥ स्वस्ती श्रीनिवृत्ति गुरुत्व उचित। लक्ष्मी अवचित नामदेवा॥ ८॥

१७५८. राजमंदिराभीतरीं रक्मिणी सेजेवरी। नामा परसासरी वोळगो आले॥ १॥ नामया देखोनी झडकरी उठली। आड उभी ठेली जाऊनियां॥ २॥ अचळ सरिसां करी श्रृंग मायावरी। पाहें पा निदसुरी होती कैसी॥ ३॥ मी म्हणे नावेक लागेल वेळ यातें। तंब अवचितें देखियेलें॥ ४॥ कनक परलेळीं घेउनी आरती करीं। ओवाळिले हरी नामयासहित॥ ५॥

१७५९. नाहीं भीड चाड बोलसी आगळें। तोंडाचेनि बळें अरे नाम्या॥ १॥ आपुलिया चाडें करीतसा सेवा। आभारू कां लावा आम्हांलागीं॥ २॥ माझ्या ठायीं काय उणें मज होतें। मज देउनी सरतें केलें तुम्हीं॥ ३॥ निर्गुण निराकारीं होतों निजानंदें। त्यासी तुम्ही भेद केला देखा॥ ४॥ संकल्प वासना नाना भजन मतें। शुद्ध स्वरूपातें भेद झाला॥ ५॥ वैकुंठ निजधाम सर्व सुखरासी। तें सांडोनी तुम्हांपाशीं येणें झाले॥ ६॥ शेषाच्या आरूवरीं निद्रा क्षीरसागरीं। सांडोनी वेषधारी झालों आम्ही॥ ७॥ दाहीं अवधारीं युग-युगांतरीं। अनुष्ठान थोरी केलें नाम्या॥ ८॥ अवतारीं कष्ट झाले थोर थोर। मारिले असुर तुम्हांलागीं॥ ९॥ नाना योनी दुःखें भोगा अनंत जन्में। निरसलीं नामें माझ्या एका॥ १०॥ विषय भोगितां रवरव वास। मन केलें उदास वैराग्येंसी॥ ११॥ प्रपंच प्रज्वाळ अग्नीचे कल्लोळ। सुखरूप सीतळ आत्मज्ञानें॥ १२॥ माया हे दुस्तर-नकळे-इचा पार। ते नदी उतार केली तुम्हां॥ १३॥ कामक्रोधादिक षड्वैरी विकार। महा थोर थोर वश्य केले॥ १४॥ परदारा परधन परनिंदा परपीडा। दिधलिया झाडा दयाधर्म॥ १५॥ अहंकार अविवेक निरसली भ्रांती। सुखस्वरूप शांती दिधली तुम्हां॥ १६॥ अविश्वास अलोट मेरुहुनी घटवट। देउनी भावार्थ पीठ केलें॥ १७॥ देऊनियां ज्ञान निरसिलें अज्ञान। येणें समाधान झालें तुम्हां॥ १८॥ अधर्म अन्याय अनाचारा मूळ। देउनी स्वधर्म तारीयेले॥ १९॥ ऐसें सर्वांपरी म्यां गोमटें। परी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शब्द उफराटे न संडीसी ॥ २० ॥ रात्रंदिवस तुज लागला छंद। आम्हांसी विनोद करों पाहसी ॥ २१ ॥ अवधिया परी तूं झालासी धीट। बोलसी वाईट अमर्याद ॥ २२ ॥ भक्तीचिया भीडा म्यां बहु साहिलें। त्वां नाहीं पाहिलें मागेंपुढें ॥ २३ ॥ जें आम्हीं पेरिलें तेंचि फल आलें। उफराटें झालें तुझिया कृपें ॥ २४ ॥ पहिलीच चुकी पडियेली थोरी। तुझे अधिकारी झालों आम्ही ॥ २५ ॥ खांदीं बैसलें ते नुतरे खालतें। तैसें हें आमुतें वोढवलें ॥ २६ ॥ सलगीं खेळवितां चुंबिता बदन। तें देतां टाकूनि मिठी घाली ॥ २७ ॥ तुझा त्याग करितां कोपतील संत। हांसती समर्थ पिसून लोक ॥ २८ ॥ सृष्ट्यादिक व्यापार राहिला परता। तुजसी बोलतां न पुरे वेळ ॥ २९ ॥ कांहीं न मागसी देतांही न घेसी। अखंड जीवेंसी जडोनी ठेला ॥ ३० ॥ वाढवितां भक्ति तुज नाहीं तृप्ती। काय करिसी अंतीं न कळे मज ॥ ३१ ॥ मागें भक्त आम्हीं बहुत देखिले। उठोनियां गेले क्षणामाजीं ॥ ३२ ॥ अवतार अवतारीं नव्हेसी परता। संबंध तुटतां न दिसे तुझा ॥ ३३ ॥ नामा म्हणे देवा होईं सावधान। परियेसीं वचन एक माझें ॥ ३४ ॥

१७६०. पितयाचें भाग्य पुत्रासि पैं नये। विरळा एखादा होय नांव राखा ॥ १ ॥ मी तंव अज्ञान झालों तुझे पोटी। तुझेनि आम्हां तुटी संसाराची ॥ २ ॥ होणार तें झालें न चुके कांहीं केलें। विठ्ठलें दुराविलें जीणें मरणें ॥ ३ ॥ माझिये अदृष्टीं ऐसेंचि लिहिलें। जें मज निर्मियलें चतुराननें ॥ ४ ॥ या विठोबाचे पाय हृदयीं धरावे। तेणें हें तरावें भवदुःख ॥ ५ ॥ नेणें पूजाविधि नेणें क्रियासिद्धि। ऐसा मी अपराधी तारी देवा ॥ ६ ॥ अनुपम्य सुख देखिलिया चरणीं। घातली लोळणी माझ्या चित्तें ॥ ७ ॥ बहुत देव माझ्या पाहियेलें जीवें। केले सर्वभावें कुटुंबदास्या ॥ ८ ॥ इहीं माझें चित्त केलें तडातोडी। नाहीं सुख घडी देखिलें कांहीं ॥ ९ ॥ मग या पांडुरंगें माझी राखियेली लाज। हा माझा पूर्वज प्राणसखा ॥ १० ॥ अंतरींचे गुज सांगितले मज। दिलें प्रेमबीज नामनिधि ॥ ११ ॥ सुखदुःखाची निवारिली बाधा। शरीरसंबंधा वेगळें केलें ॥ १२ ॥ आपलें म्हणोनि कृपेनें न्याहाळिलें। आवडी सांभाळिलें मायबापें ॥ १३ ॥ ऐसा मजलागीं स्नेहाळू विसंबें जीवें। म्यां काय याचे व्हावें उतराई ॥ १४ ॥ नामा म्हणे मज अनालागुनी। न विसंबे निर्वाणीं पंढरीराव ॥ १५ ॥

१७६१. पतीत अनेक पावन तूं एक। झालासी सुश्लोक कवणाचेनी ॥ १ ॥ पतीत मी भला कीं पावन तूं भला। सांग बा विठ्ठला मायबापा ॥ २ ॥ परिसाचें महिमान कैसेंनी वाढतें। निर्माण नसतें लोह जरी ॥ ३ ॥ कल्पतरूची कीर्ति कैसेनी वाढते। जरी कल्पना नसती याचकाची ॥ ४ ॥ प्रजेसी पोशिले शोभती राजेश्वर। तैसा हा विचार तुम्हां आम्हां ॥ ५ ॥ नामा म्हणे स्वामी आहे ते आमुचे। तुज देवा कैंचें क्रियाकर्म ॥ ६ ॥

१७६२. सर्व जीव तूं झालासी आपण। आम्ही कां पतीत तूं कैसा पावन ॥ १ ॥ मन इंद्रियें तुंचि झालासी चाळिता। आमुच्या ठायीं कोणें ठेविली सत्ता ॥ २ ॥ सुवर्णाच्या पोटीं झाला अलंकार। एकी भला साचार वाखाणिती ॥ ३ ॥ गंगासिंधु मिळणी झाली सहस्त्रमुख। ओघ तो उदक अन्य नाहीं ॥ ४ ॥ बीजाचिया पोटी वटाचा विस्तार। सर्व तो आकार तुझाची असे ॥ ५ ॥ नामा म्हणे सर्व तुझेंचि करणें। उगें खवळून घेऊं नको देणें ॥ ६ ॥

१७६३. विषयाचे आळुके जरी नव्हतों दीन। दीनानाथ कोण म्हणतें तुज ॥ १ ॥ सुष्ट दुष्ट तरी आमुचें आचरण। तें तुज भूषण झालें देवा ॥ २ ॥ पतितपावन ब्रीद कैसेनी जोडतें। जरी आम्ही नव्हतों कर्मजड ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसें आहे गा हें देवा। विचारी केशवा मायबापा ॥ ४ ॥

१७६४. आपुल्या सुखाचा देईन मी वांटा। जरी येसी वैकुंठा एक वेळ ॥ १ ॥ आपुलें निजपदीं तुज बैसवीन। उभा मी राहेन मागें पुढें ॥ २ ॥ पितांबर छाया करीन तुजवरी। जीवें क्षणभरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विसंबेना ॥ ३ ॥ अंबऋषि प्रल्हाद रुक्मांगद। त्याहूनि निजपाद देईन तुज ॥ ४ ॥ ऐसा धीर नाम्या होता माझ्या मनीं। परी तूं सर्वांहूनि उदासीन ॥ ५ ॥ नामा म्हणे केशवा नलगे माझ्या चित्तीं। मज आहे विश्रांति तुझ्या नामीं ॥ ६ ॥

१७६५. नेघें भूमंडळ न घालीं तुज कोड। तुजहूनि केवढी जोडी यांची ॥ १ ॥ चरण मी सेवीन गाईन तुझें नाम। हृदयीं धरोन प्रेम नाचेन सदा ॥ २ ॥ ऋद्धिसिद्धि नेघे कामना न लगती। तुजवीण श्रीपति अवघें व्यर्थ ॥ ३ ॥ रसातळ भूतळ वैकुंठासी नये। तुजविण न पाहे ठाव कोठें ॥ ४ ॥ विष्णुदास आम्ही भक्तिवीण नेघों। दारींच वोळगो तुझ्या देवा ॥ ५ ॥ नामा म्हणे हेचि चाड गा विठ्ठला। पुंडलिकें सांगितला निज ठेवा ॥ ६ ॥

१७६६. ऐसा नामा बोले आनंदें करोनी। तंव देव विचारून बोलियेले ॥ १ ॥ भला भला नाम्या शहाणा झालासी। करि हे न घेसी सांग मज ॥ २ ॥ येरू म्हणे अवघेंचि नश्वर। तूंचि एक सार पुरे आम्हां ॥ ३ ॥ अनंत ब्रह्मांडें कोटी वसति रोमरंध्रीं। त्या चरणाचे अग्रीं बसों आम्ही ॥ ४ ॥ पुंडलिक जाणे त्याचें गुह्य गुज। उपजोन तूज काय सांगों ॥ ५ ॥ नामा म्हणे धरूं मूळ सोय चोखडी। ब्रह्मांडायेवढी नलगे पृथ्वी ॥ ६ ॥

१७६७. प्रेम पडीभरु देवासी वोसंडे। नामा तयापुढें शोभतसे ॥ १ ॥ प्रेमाचें स्फुंदन न सांवरे नामया। पसरोनियां बाह्या क्षेम देत ॥ २ ॥ सावध रे नाम्या आलिंगिला बाहीं। आवडतें कांहीं सांग मज ॥ ३ ॥ उघडोनियां नयन पाहे दृष्टीभरी। वैकुंठाभीतरीं चाल जाऊं ॥ ४ ॥ ऐकोनियां नामा झालासे सावध। मग देतसे शब्द नारायणा ॥ ५ ॥ भक्तीवीण सुख न घे पैं वैकुंठ। पंढरी प्रगट परब्रह्म ॥ ६ ॥ हेंची गोड आम्हां आवडे हो हरी। वैकुंठाभीतरीं चाड नाहीं ॥ ७ ॥ सर्वकाळ सेवा करूं पैं कीर्तन। येणें माझें मन संतुष्ट सदा ॥ ८ ॥ संबोखिला नामा हृदयावरी हस्तक। येरू ठेवी मस्तक चरणांवरी ॥ ९ ॥ माग रे नामया आवडेल जितुलें। त्रिभुवनाइतुलें ब्रह्मसुख ॥ १० ॥ देईन अखंडीत सर्व काम जाणा। ऋद्धिसिद्धि पूर्ण अखंडीत ॥ ११ ॥ नामा म्हणे पंढरीं कीर्तन करीन। न सोडीं चरण परी तुझे ॥ १२ ॥

१७६८. घेऊनियां नाम्या बैससील किती। पहाशील स्थिति अंतरींची ॥ १ ॥ कांहींच न होसी विचारी मानसीं। चैतन्य तत्त्वासि शुद्धबुद्ध ॥ २ ॥ क्रिया कर्म कर्ता नव्हेसी सर्वथा। आहे सर्वगता रूप तुझें ॥ ३ ॥ भजतां भजन पूजिताती पूज्य। हेंही काय तुज अति चिंता ॥ ४ ॥ ज्ञाता ज्ञान ज्ञेय ध्याता ध्यान ध्येय। नाथिले उपाय नाहीं तुज ॥ ५ ॥ नामा म्हणे मज नकळेचि देवा। मज देईं सेवा जन्मोजन्मीं ॥ ६ ॥

१७६९. जन्मजन्मांतरीं घेतलें धरणें। सांग कवण्या गुणें विष्णुदासा ॥ १ ॥ कांहींच न घेसी कांहींच न मागसी। ऋणें किती करिसी सेवारूपें ॥ २ ॥ चतुर्विध मुक्ति अथवा धन संपत्ति। नलगे तुझे चित्तीं काय करूं ॥ ३ ॥ समुद्रवलयांकित अवघें भूमंडळ। अथवा रसातळ दुर्लभ कांही ॥ ४ ॥ भेटीलागीं आर्त आहे रे वैकुंठ। पाही तुझी वाट रात्रंदिवस ॥ ५ ॥ नामा म्हणे सर्व आंसंडिलें चित्तें। तुझिया चरणापरतें नलगे कांहीं ॥ ६ ॥

१७७०. माझिया मनासी म्यां केला विचार। तेणें मज निर्धार सांगितला ॥ १ ॥ मज नलगे मुक्ति नलगे ब्रह्मज्ञान। सांडोवा होईन पंढरीचा ॥ २ ॥ इंद्रियां मारितां येती काकुळती। तुज ओळगूं म्हणती ठायीं ठायीं ॥ ३ ॥ श्रवणीं श्रवण अखंड तुझी कीर्ति। विश्व विठ्ठलमूर्ति देखेन डोळां ॥ ४ ॥ नामामृतें रसना निवाली त्या सुखें। नाठवती दुःखें जन्मांतरींचीं ॥ ५ ॥ नामा म्हणे ऐसा कोण भाग्यहीन। जो धरी वासना वैकुंठींची ॥ ६ ॥

१७७१. निर्विकल्प नामा अनंत कल्पना। होसी नारायणा अव्यक्तेसी ॥ १ ॥ लाज ते लाविली निर्गुणपणासी। श्रुति पुराणासी साम्य दावी ॥ २ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चातुर्य सागरा नंदाचा खिल्लारी। गाई निरंतरी चारविसी॥ ३॥ सगुण संबंध पडिलासे गांठीं। कोण्या भक्तासाठीं काय धंदा॥ ४॥ तुझें देवपण मिरविसी निकें। नामा म्हणे सुख तुझे पायीं॥ ५॥

१७७२. जन्ममरणाच्या खुंटती लहरी। वांयां कां येरझारी सीणतोसी॥ १॥ सांगेन तें करीं मन मुळीं आंवरीं। एकांती क्षणभरी चल जाऊं॥ २॥ आकारलें तितुकें आहे नाशिवंत। देव आणि भक्त कैंचे तेथें॥ ३॥ नामा म्हणे केशवा असो तुझें गुज। तुजवांचोनि मज नकळे कांहीं॥ ४॥

१७७३. वर्तन आमुची मिरासी पंढरी। विठोबाचे घरीं नांदणूक॥ १॥ सेवा करूं नित्य नाचूं महाद्वारीं। नामाची उजरी जागऊं तेथें॥ २॥ साधुसंतां शरण जाऊं मनोभावें। प्रसाद स्वभावें देती मज॥ ३॥ नामा म्हणे आम्ही पायरीचे चिरे। संत पाय हिरे देती वरू॥ ४॥

१७७४. क्षण एक एकांती बैसोनि निवाडे। सांग मज पुढें आवडे जें जें॥ १॥ सीण भाग आपुला सांगे पैं वहिला। असेल जो वाटला मजविण॥ २॥ पुरवीन जीवींचे सर्व तुझें कोड। गगनाहूनि वाड असेल जरी॥ ३॥ वाटे माझें सर्व द्यावें तुझे हातीं। नामरूप वृत्ति सहिते मन॥ ४॥ परी सर्वभावें तुझें उदासीन चित्त। उरलें माझें आर्त कवण पुरवी॥ ५॥ म्हणोनि पांडुरंगे धरूनि हनुवटी। सांग जीवींच्या नाम्याजवळी॥ ६॥

१७७५. विचारितां सहज कोणी नव्हे माझें। म्हणोनि चरण तुझे दृढ धरिले॥ १॥ हेंचि माझें ज्ञान हाचि गुरुमंत्र। व्रत तप तीर्थ चरण तुझे॥ २॥ हेचि माझी क्रिया हेंचि माझें कर्म। हा माझा स्वधर्म चरण तुझे॥ ३॥ हेचि माझी पूजा हेंचि माझे पूजन। ध्याईन तुझे चरण हृदयकमळीं॥ ४॥ हाचि परमानंद हेचि योगसिद्धी। लय लक्ष समाधि चरण तुझे॥ ५॥ नामा म्हणे मनें मानिला निर्धार। तरला भवसागर याचीपरी॥ ६॥

१७७६. संकल्प विकल्प निरसूनियां भ्रांति। दावीन विश्रांति अभिनव तुज॥ १॥ सर्वभावें माझी धरूनि आवडी। आस तूं रे सोडी इंद्रियांची॥ २॥ जें जें विषयसुख लागेल तुझे मनीं। तें तूं खेवा घालुनी घेईं मज॥ ३॥ श्रवण घ्राण रसना त्वचा आणि लोचन। हे सकळ होऊनि मीचि भोगीं॥ ४॥ यातायाती तुज न घाली रे सायास। धरीं माझा विश्वास दृढ मनीं॥ ५॥ अंतरींचें गुज बोलुनी पंढरीनाथ। आलिंगन देत नामयासी॥ ६॥

१७७७. सहज तुझें सुख आहे तुजजवळीं। वांयां मृगजळीं बुडों नको॥ १॥ सोय धरीं वेगीं होय पां सावध। अनुभवी आनंद स्वस्वरूपीं॥ २॥ हा जगडंबर पसरला पाल्हाळ। मायामय सकळ स्वप्न सर्व॥ ३॥ शरीरसंपत्तीचा मानिसी निर्धार। तों हें क्षणभंगुर सत्य जाण॥ ४॥ आपुले साउलीं जासी बैसावया। कोण तापलीया निववी तुज॥ ५॥ नामा म्हणे केशवा असों तुझें ज्ञान। देवा तुजवांचून नकळे कांहीं॥ ६॥

१७७८. महाद्वारीं सुख असें या सुखाचें। लागती संतांचे चरणरज॥ १॥ म्हणोनियां स्थळ पाहिलें निवांत। झालें चित्त तेथें समाधान॥ २॥ सकळ वैष्णवांसहित बोळवण करा। तुम्ही हो दातारा मजलागीं॥ ३॥ देव म्हणे नाम्या राहे पक्षभरी। पुरतील अंतरीं कोड तुझें॥ ४॥

१७७९. माय मेली नाम्या पोरटें लहान। कवाड धरून उभे ठेलें॥ १॥ नेणतें बापुडें दारवंटा धरी। शेखीं आस करी भितरील॥ २॥ राउळीं म्हणती कैंचे हें भणंग। जंव तंव आंग चुकवितें॥ ३॥ जाति नाहीं त्यासि काइसी पंगती। म्हणोनी एकांतीं बैसविलें॥ ४॥ केशवाचे नामें बाह्य ठाकी पूजा। तेथें बऱ्या वोजा बैसविलें॥ ५॥ देव म्हणे नाम्या पोशीन मी तूंतें। नामामृतशितें देऊनियां॥ ६॥

१७८०. केशव पुसे नामयासी। तूझी नांदणूक कैसी॥ १॥ आम्हां काय उणें काय उणें। तुझेनि धर्में दातारा॥ २॥ तुम्हां घरीं बोचकें लुगडीं। आम्हां घरीं पोरें उघडीं॥ ३॥ तुम्हां दुर्ग दारवंटा।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आम्हां घरीं बारा वाटा ॥ ४ ॥ तुम्हां घरीं गाई म्हैशी। आम्हां घरीं उंदीर घुशी ॥ ५ ॥ तुम्हां घरीं बटकी दासी। आम्हां घरीं आहेत लांसी ॥ ६ ॥ तुम्हां घरीं शेजा बाजा। आम्हां घरीं तृणसेजा ॥ ७ ॥ तुम्हां घरीं सुवर्ण मडकीं। आम्हां घरीं खापरें फुटकीं ॥ ८ ॥ तुम्हां घरीं लेंकुरें वाडें। आम्हां घरीं तुळशी झाडें ॥ ९ ॥ नामा म्हणे तुमचे घरीं सोनें दाम। आमुचे घरीं तुमचें नाम ॥ १० ॥

१७८१. भक्त पुंडलिकें अससी उभा केला। त्याचेनि रागें मजसी धरिला अबोला ॥ १ ॥ मी तुझें पोसणें मी तुझें पोसणें। मी तुझें पोसणें पांडुरंगा ॥ २ ॥ तुझी कृपा नाहीं रे हें सत्य। मी तरी प्रत्यक्ष रूप अवलोकितों ॥ ३ ॥ नामा म्हणे केशवा तूं जाणतोसी मातें। उफराटें पाहोनी गिळतों मी तूंतें ॥ ४ ॥

१७८२. भक्ताचे हृदयींची जाणोनि अवस्था। आल्या शरणागता लोभापरु ॥ १ ॥ संतां पुसे माझा दाखवा रे नामा। तुम्हां समागमा खेळे सदा ॥ २ ॥ दृष्टिसी दाटलें कृपेचें भरितें। म्हणे तें आवडतें केउतें गेलें ॥ ३ ॥ निरंजलें नयनीं कोमायिलें वदनीं। आणा रे गवसुनी आळीकरा ॥ ४ ॥ तंव वाट पहात होता परलक्षी। भेटी देऊनि सुखी केला देवें ॥ ५ ॥ नामा म्हणे विठो माझा सुखराशी। झणीं दूर जासी हृदयींचा ॥ ६ ॥

१७८३. कां रे विष्णुदास कोमाइलें वदन। गांजिलासी कवणें दुराचारी ॥ १ ॥ क्षणएक जीव नलगे मज वेगळा। मीहि त्याजवळां सदां असे ॥ २ ॥ वैकुंठ भुवन नलगे माझे चित्तीं। झणीं याची खंति होईल तुज ॥ ३ ॥ लक्ष्मीचे विलासी न घडे माझें मन। झणीं याचे प्राण जांचावती ॥ ४ ॥ मी हो याचे प्राण हाही माझें मन। जाणती हे खूण भक्त माझे ॥ ५ ॥ म्हणोनि जवळीं बोलाविला केशिराजें। नामा धरी वोजे चरण दोन्हीं ॥ ६ ॥

१७८४. देवा ही विनंती माझी। म्यां सेवा करावी तुझी। आस न करावी दुजी। या अभिलाषाकारणें ॥ १ ॥ तुज म्यां जीवें अनुसरावें। आणि तुम्हीहि तैसेंचि अपंगावें। परी आणिकाचें न म्हणावें। जन्मोजन्मीं दातारा ॥ २ ॥ तुज न पोसवे दातारा। तरी आयुष्या घाली चिरा। एका या पोटा दुर्भरा। साठीं अव्हेरूं नको ॥ ३ ॥ वदनीं तुजची वर्णावे। श्रवणीं गुण नाम ऐकावें। नयनीं चरण न विसंबावे। क्षण एक दातारा ॥ ४ ॥ अगा येऊनियां संसारा। नवजावें आणिकाच्या द्वारा। इष्टमित्र सज्जन सोईरा। बंधु आदी करोनि ॥ ५ ॥ मज न म्हणोत सकळ जन। परि तूं नको गा उदासीन। तुझिया नामावांचून। आणीक नेणें मी दातारा ॥ ६ ॥ नाम विक्रय न करावा। दान प्रतिग्रह न घ्यावा स्वकष्टार्जित मेळवावा। तोचि ग्रास आपुला ॥ ७ ॥ नको दिवट्या छत्र घोडे। जेणें तुजसी अंतर पडे। तुझें नामची आवडे। मज बापुडें म्हणोत का ॥ ८ ॥ ऐसा अन्यायी अपराधी। अहो मज तारा कृपानिधी। तुझें नामची उच्चारीं आधीं। थोर अट्टाहास्य करुनी ॥ ९ ॥ विष्णुदास नामा म्हणे। आम्हां उपेक्षिसी झणे। जन्मोजन्मींचें पोसणें। केशवा उणें येऊं नेदी ॥ १० ॥

१७८५. कृपेच्या सागरा भक्तजन करुणाकरा। परियेसी उदारा केशिराजा ॥ १ ॥ मज घातलें संसारीं काळाचे आहारीं। करुणा कैसी हरी नये तुज ॥ २ ॥ माझी सोडवण करीं गा कृपानिधी। तोडीं हे उपाधि संसाराची ॥ ३ ॥ पुत्र कलत्र बंधु सांगाति देहाचे। मज बांधिलें मोहाचे वज्रपाशीं ॥ ४ ॥ तिहीं माझें चित्त केलें तडातोडी। नाहीं एक घड़ी सुखलेश ॥ ५ ॥ सकळहि सांगाती संभार कर्माचे। नेदिती नामाचें स्मरण कोणी ॥ ६ ॥ दुःखाचे डोंगर पडिले मजवरी। धांव बा श्रीहरि पांडुरंगा ॥ ७ ॥ ऐशा सुखगोष्टी मजसी न करिती कोणी। झालों चक्रपाणि परदेशी ॥ ८ ॥ शिणलिया न म्हणसी बैस घे विश्रांती। आठवी या श्रीपति पांडुरंगा ॥ ९ ॥ सकळांचें दास्यत्व केली थोर आशा। मानिला भरंवसा मज होती म्हणोनी ॥ १० ॥ तंव ते भजनीं आपुलिया हिता। न करती माझी चिंता

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परलोकीची॥ ११॥ ऐसा दुर्जनांचा धरोनि पातेरा। केला मी मातेरा आयुष्याचा॥ १२॥ कुटुंब कावाडी तुजसी कानकोंडा। झालों या ब्रह्मांडा भूमिभार॥ १३॥ ऐसी करुणेचीं उत्तरें ऐकोनी पंढरिरायें। कटिवरूनी बाहे उभारिली॥ १४॥ नाभी नाभी नामया भय न धरीं सर्वथा। माझ्या शरणागता कोण गांजी॥ १५॥

१७८६. माझिया भक्तां जे ठेविती दूषणा। तुटोनी रसना पडेल त्यांची॥ १॥ ऐसे दुराचारी असती जे नर। भोगिती अघोर सत्य जाणा॥ २॥ माझिया भक्तां जे करिती छळण बुद्धि। त्यांची वंशवृद्धि नव्हे कदा॥ ३॥ माझिया भक्तांचा करिती उपहास। त्यांचा समूळ वंश यमलोकीं॥ ४॥ केशव म्हणे नाम्या बोलिलों सत्यवाणी। लटिकें म्हणेल पतनीं पडेल पापी॥ ५॥

१७८७. केशव म्हणे नामयासी। जैं तूं दुरी धरिला होतासी। तैं तूं काकुळती भाकिसी। मजलागीं हिंडसी दाही दिशा॥ १॥ तुझें गाऱ्हाणें सांगो संतांपाशीं। तीहीं तुज सरतें केलें भक्तीसी। मी तंव वंद्य तिहीं लोकांसी। त्वां तंव मजशीं प्रजियेलें॥ २॥ आमुचीं वर्में कर्में बोलतोसी। सलगी करूनि फार जातोसी। उंच पदवी दिल्या पाइकासी। तरी काय स्वामीसी भिऊं नये॥ ३॥ मी विश्वासलो तुझिया भावासी। परि तूं शब्देंहि न पुससी। म्यां तंव अमतदृष्टीं पाहिलासी। अढळपदासी दावियलें॥ ४॥ मी तंव वंद्य त्रिभुवनासी। श्रुति स्मृति आगमासी। न कळे अठरा पुराणांसी। ऐसें त्वां मजसीं प्रजियेलें॥ ५॥ आतां असोत बहु बोलासी। शहाणे सिणले मानसीं। तप्तलोह उदक ग्रासी। तैसा होऊनि ठेलासी विष्णुदास नामयारे॥ ६॥

१७८८. भूमी लोळे नामा कंठ सद्गदित। डोळ्या स्त्रवत अश्रुजळ॥ १॥ इतुकें देखोनियां द्रवला पुरुषोत्तम। नाम्यासी सप्रेमें उचलिलें॥ २॥ नाम्या तुज काय वाटतसें दुःख। संसाराचा शोक तुज झाला॥ ३॥ नामा म्हणे देवा तुज ऐसा दाता। मज भवव्यथा कवणेपरी॥ ४॥

१७८९. स्फुंदस्फुंदोन नामा उभा महाद्वारीं। चित्त पायांवरी विठोबाच्या॥ १॥ उभा दीनानाथ उभारुनी बाहे। पालवीत आहे पीतांबरें॥ २॥ आरता येरे नामया धरिला पोटासीं। कोणें गांजिलासी दुर्जनानें॥ ३॥ अंतरींचे सांग पडे माझ्या मागें। कां करिशी उद्वेग संसारींचा॥ ४॥ नामा म्हणे बिठोबा असें मी नेणता। आठवीं पंढरिनाथा वेळोवेळां॥ ५॥

१७९०. तुझा तूं आहेसी एकला रे एकु। वांयां कां हा शोकु वाढविसी॥ १॥ आपणा मानसीं विचारोनी पाहीं। सावध नाम्या होईं सोय धरी॥ २॥ तुझा तूंचि देव तुझा तुंचि भक्त। पाहे पां सिद्धांत गुरुमुखें॥ ३॥ तुझा तूंचि पूज्य तुझा तूं पूजिता। भजन भजता तुझा तूंचि॥ ४॥ तुझा तूंचि गुरु तुझा तूंचि शिष्य। तुझा उपदेश तुज नाम्या॥ ५॥ नामा म्हणे केशवा हें सर्व माझें। हृदयीं चरण तुझे निरंतर॥ ६॥

१७९१. तुझ्या माझ्या शेता नाहीं पेंडवळा। दावियेला डोळा पांडुरंगा॥ १॥ कल्पनेची पेंडी पाप कुंदा काढी। काशा देशधडी लावियेल्या॥ २॥ त्रिगुण तिफणी धरोनी सूत्रधारी। वेद बैल चारी जुंपियेले॥ ३॥ अनाथाचें शेत प्रेमाचा ओलावा। शेत राखे देवा पांडुरंगा॥ ४॥ ब्रह्म नामबीज बांधोनियां ओटीं। पेरी दाटोदाटी नामदेव॥ ५॥

१७९२. परियेसी नाम्या सांगतों मी तुज। अंतरींचें गुज भक्तराया॥ १॥ तूं माझें आवडतें कृपेचें पोसणें। चित्ताचें बैसणें करीन तुज॥ २॥ येणें संतसंगें यावें माझ्या गांवा। भोगावें राणिवा वैकुंठींच्या॥ ३॥ माझिया कथेची ज्या बहु आवडी। माझी प्रेम गोडी पढीये जया॥ ४॥ त्याची पायधुळी लागावी सर्वांगें। म्हणोनी मागें हिंडतसें॥ ५॥ भक्त यातीचे भलतेनी भावें। भलते एक ध्यावें नाम माझें॥ ६॥ त्याचिया उपकारें दाटे मी सर्वथा। मुगुट करुनी माथां बाहीन त्यासी॥ ७॥ तनु मन प्राण दिधलें जेणें मातें। मजहूनि पढियंतें नाहीं त्यासी॥ ८॥ चिंता न करीं नाम्या नुपेक्षी सर्वथा।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभयकरू माथां ठेविला देवें॥ ९॥

१७९३. देवें चहूं भुजीं दिलें आलिंगन। कुरवाळिलें वदन चहूं करें॥ १॥ धरूनि हनुवटी पाहे कृपादृष्टि। केली सुखवृष्टि करुणाघनें॥ २॥ नामदेव ऐसें नाम त्या ठेविलें। तेणें अनुभवलें प्रेमसुख॥ ३॥ हे संत भागवत माझिये आवडी। माझ्या रूपीं बुडी देऊनि ठेले॥ ४॥ परि या सकळांहूनि तुझा भक्तिभावो। अमृत पान्हावो अधिक बोल॥ ५॥ ज्ञान विज्ञानाचें मंडण ज्ञानेश्वरु। वैराग्याचा मेरु निवृत्तिरावो॥ ६॥ स्वात्मसुखबोधाचा सिंधु हा सोपान। सर्वांत भूषण भक्तराय॥ ७॥ परमानंद जोगा जगन्मित्र नागा। वटेश्वर चांगा केशवदास॥ ८॥ सांवता बंका चोखा आणि रोहिदास। या सकळांहूनि विशेष महिमा तुझा॥ ९॥ हा दास खेचर नरहरि सोनार। आणि गोरा कुंभार भानुकुमार॥ १०॥ हे माझे आवडते महाभक्तराज। परि तुझेनि तृप्ति मज अधिक होय॥ ११॥ उद्धव रुक्मांगद भीष्म आणि नारद। बालकें ध्रुव प्रल्हाद प्रसिद्ध जगीं॥ १२॥ हे विषयीं विरक्त सहज जीवन्मुक्त। परी तुझा अधिक भाग्यमहिमा॥ १३॥ हे संत सोईरे जीवलग आमुचे। सांगाति जीवाचे आवडते॥ १४॥ परी तुझा आनंद सर्वांहूनि आगळा। मज असे मानला नामदेवा॥ १५॥

१७९४. जन्मोजन्मीं आम्हीं बहु पुण्य केलें। तेव्हां या विठ्ठलें कृपा केली॥ १॥ जन्मोनि संसारी झालों त्याचा दास। माझा तो विश्वास पांडुरंगीं॥ २॥ अनेक दैवतां नेघे माझें चित्त। गोड गातां बिठोबाचें॥ ३॥ भ्रमर सुवासीं मधावरी मासी। तैसें या देवासी माझें मन॥ ४॥ नामा म्हणे मज पंढरीस न्या रे। हडसोनी द्या रे विठोबासी॥ ५॥

१७९५. मीच माझा देव मीच माझा भक्त। मी माझा कृतार्थ सहज असें॥ १॥ बंध आणि मोक्ष मायेची कल्पना। पडली होती मना कैसी भ्रांती॥ २॥ विठ्ठलें विचारें दाखविलें सुख। होतें असंख्य हारपले॥ ३॥ नामा म्हणे सोय सांपडली निकी। झालों एकाएकीं हरीचा दास॥ ४॥

१७९६. अवघा संसार सुखाचा करीन। अवघ्या भावें धरिन विठ्ठल एक॥ १॥ अवघा शिणभाग हिरोन घेईन। अवघेंचि तोडीन मायाजाळ॥ २॥ अवघा जीवलग हाचि पैं होईल। अवघा घेईल भार माथां॥ ३॥ अवघा त्रिविधताप क्षणें मावळेल। अवघा चालवील योगक्षेम॥ ४॥ अवघ्या संसाराचें बैसणें मोडील। अवघेंचि तोडील मायाजाळ॥ ५॥ नामा म्हणे अवघी सांडी मिथ्या भ्रांति। विठ्ठलेंविण विश्रांति नाहीं कोठें॥ ६॥

१७९७. भीत नाहीं भीत नाहीं। अखंडहि सावध॥ १॥ उघड समाधि उघड समाधि। अंतर बुद्धि निर्मळ॥ २॥ गोंविसी कासया गोंविसी कासया। पंढरीराया सांभाळीं॥ ३॥ नामा म्हणे जगज्जीवना। नारायणा सांभाळीं॥ ४॥

१७९८. सांवळी श्रीमूर्ति हृदयीं बिंबली। तरी पालटली देहबुद्धि॥ १॥ धन्य माझा जन्म धन्य माझा भाव। ध्यानीं केशिराज नांदतसे॥ २॥ आशा तृष्णा कैशा मावळल्या देहीं। बुडोनियां पायीं ठेलें चित्त॥ ३॥ नामा म्हणे ऐशी विश्रांती पैं झाली। हृदयीं न्याहाळी केशीराज॥ ४॥

१७९९. निद्रिस्ताचे सेजे सर्प कां ऊर्वशी। पाहों विषयासी तैसें आम्ही॥ १॥ ऐसी कृपा केली माझ्या केशीराजें। प्रतितीचें भोजें एकसरां॥ २॥ शेण आणि सोनें भासतें समान। रत्न कां पाषाण एकरूप॥ ३॥ पायां लागो स्वर्ग वरी पडो आग। आत्मस्थिति भंग नोहे नोहे॥ ४॥ नामा म्हणे कोणी निंदा आणि वंदा। झालों ब्रह्मानंदाकार आम्ही॥ ५॥

१८००. मूर्खाहातीं दिलें रत्न पारखीसी। तयाच्या मोलासी घेऊं नका॥ १॥ आम्ही तैसें झालों आम्ही तैसें झालों। आम्ही तैसें झालों जाणतेची॥ २॥ आंगीं नाहीं बळ होड घाली राया। आम्ही गेलों वांयां तेणें न्यायें॥ ३॥ नामा म्हणे ऐसें केलें तयापरी। आम्ही निरंतर तुम्हांसवें॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१८०१. योगानें जोडिली सायासें। ते मज वोळली वोरसें॥ १ ॥ बरवी कामधेनु गाय। विठाबाई माझी माय॥ २ ॥ नसतां सरा सांठवण। तृप्त केलें त्रिभुवन॥ ३ ॥ कोटी कुळें वोरसलीं। पुरोनि अवघींच उरलीं॥ ४॥ न साहे अहंकाराचा वारा। आली दीनाचिया घरां॥ ५ ॥ नामा म्हणे हें दुभतें। जोडूनि दिधलें असे बापें॥ ६ ॥

१८०२. देह देव्हारा पाट हृदय संपुष्ट। मधीं कृष्ण मूर्त बसविली॥ १ ॥ प्रेमाचे पाण्यानें प्रक्षाळीन तुज। आत्मस्वरूप निज पांडुरंगा॥ २ ॥ भावें केलें गंध भक्तीची अक्षता। वाहिली निढळा देवावरी॥ ३ ॥ मन केला मोगरा चित केलें शेवंती। भक्तीची तुळसी अर्पियेली॥ ४॥ धूप दीप आर्ती ओवाळीन तुज। एक केशवराज सकळ सिद्ध॥ ५ ॥ त्रिवेणी पक्वान्न केलें ब्रह्मार्पण। वांच्छित भोजन अर्पियेलें॥ ६ ॥ नामा म्हणे देवा सेवा केली एका। पंचप्राण सखा विटेवरी॥ ७॥

१८०३. आषाढी कार्तिकी विसरूं नका मज। सांगतसें गुज पांडुरंग॥ १ ॥ पतितपावना मी तो आहें खरा। तुमचेनि बरा दिसतसें॥ २ ॥ तुम्ही जातां गांवा हुरहुर माझे जिवा। भेटेल केधवां मजलागीं॥ ३ ॥ धांवोनियां देव गळां घाली मिठी। स्फुंदस्फुंदून गोष्टी बोलतसे॥ ४ ॥ तिन्हीं त्रिभुवनीं मज नाहीं कोणी। म्हणे चक्रपाणि नामयासी॥ ५ ॥

आत्मज्ञानप्राप्ति.

१८०४. आत्मत्वाच्यायोगें पाहूं जातां। नाहीं निरंतर भिन्न दैवता॥ १ ॥ वर्णाश्रम याति कुळ गोत्र। भक्ति सदोदित नामापाशीं॥ २ ॥ नामा म्हणे भय मुळीं कांहीं नाहीं। अखंडित पाहीं भक्तिसार॥ ३ ॥

१८०५. आम्हासी चिंतन अवश्य श्रीरामा। आवडी आणिक आम्हां नाहीं दुजी॥ १ ॥ वोळगलों हरि भूतभावा निर्धारी। दिसे चराचरी भावरूप॥ २ ॥ जें जें पडे दृष्टी आणिक नाहीं सृष्टीं। हरिरूपीं भेटी हेंचि दिसे॥ ३॥ नामा म्हणे विठ्ठल सर्वांभूतीं आहे। आणिक उपाय न लगती॥ ४॥

१८०६. धन्य माझा जन्म धन्य माझा वंश। धन्य विष्णुदास स्वामी माझा॥ १॥ कामधाम माझें केशवाचे पायीं। दिननिसी पाहें हारपली॥ २॥ शुक सनकादिक जेणें सुखें धाले। तें सुख राहिलें माझ्या मनीं॥ ३॥ नामा म्हणे जगीं अलभ्य लाभ झाला। हरी सांपडला विटेवरी॥ ४॥

१८०७. तीर्थासी जाऊनि काय म्यां करावें। वाउगें हिंडावें पंथें तेणें॥ १ ॥ माझें तीर्थ क्षेत्र पंढरी पैं जाणां। उघडें निधान दृष्टीपुढें॥ २ ॥ मागें थोर थोरीं हेंचि पैं साधिलें। नाम्यासी दिधलें खेचर यानें॥ ३ ॥

१८०८. नामयानें बंदर घेतलें। विठ्ठलासी जीत धरिलें॥ १ ॥ नामा आला रे म्हणती। भेणें कळिकाळ कांपती॥ २॥ भाव भक्ति करोनि कडी। विठ्ठल पायी जडली बेडी॥ ३ ॥ देह करोनि बंदिखाना। विठ्ठल सांठविलें निधाना॥ ४॥ सोहं शब्दें मार केला। विठ्ठल काकुळती आला॥ ५॥ नामा म्हणे विठ्ठलातें। जीव गेल्या न सोडीं तूंतें॥ ६॥

१८०९. असो आतां किती हेचि ठेवाठेवी। कृपा विठ्ठल देवीं केली मज॥ १॥ अंतरींच्या सुखा नाचतसें भोजें। हेंचि निजकुल जाणवलें॥ २॥ नामा म्हणे अंतरींचें निजगुण। सांगितलें मज पांडुरंगें॥ ३॥

१८१०. कांसवीचीं पिलें पोशिलीं कृपेनें। तैसा पैं आत्मज्ञानें सुखी झालों॥ १॥ स्वप्नींचे संतोषें भुकें जेवीं उल्हासें। कीं सुखें हांसे नेणताची॥ २॥ पक्षी फळालागीं अंतराळीं उडाला। न कळे कोठें गेला भाग त्याचा॥ ३॥ नामा म्हणे खूण अनुभवीं जाणें। ब्रह्मत्वीं पाहाणें केशवचरण॥ ४॥

१८११. आम्हां जतन करावया उभा विटेवरी। तळुवटीं पंढरी ओढवली॥ १॥ तिहीं लोकीं पिकला असे जगजीवन। प्राप्ति पाहुन दान देत असे॥ २॥ चातका चिंतनीं जलधर गगनीं। पुढार देउनी पुंडलिका॥ ३॥ विष्णुदास नामा विनवी वेळोवेळां।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विठ्ठलीं जीवनकळा मुरालिसे ॥ ४ ॥

१८१२. तरावया संसार जडजीव प्राणी। नाव नवखणी नवही मुखें ॥ १ ॥ बैसा नावेवरी नाहीं भेदाभेद। श्रवणाचे छंदें नाव गेली ॥ २ ॥ अठराही आवले नावेसी लागले। साहि रंगें भरले मिरवताती ॥ ३ ॥ चहूं मुखें जयाचा नकळे विचार। सेवी अगोचर सहस्त्रमुखा ॥ ४ ॥ तारील तारील हाचि पैं निर्धार। नामा पैलपार उतरला ॥ ५ ॥

१८१३. माझा भाव तुझे चरणीं। तुझें रूप माझे मनीं ॥ १ ॥ सांपडलों एकमेकां। जन्मोजन्मीं नाहीं सुटिका ॥ २ ॥ त्वां मज केले रे विदेही। म्यां तुज धरिलें हृदयीं ॥ ३ ॥ त्वां तोडिली माझी माया। मी जडलों तुझ्या पायां ॥ ४ ॥ नामा म्हणे गा सुजाणा। सांगा ठेकिलें कोणकोणा ॥ ५ ॥

१८१४. मन झालें उन्मन वासना तल्लीन। देखिले हरिचरण सर्वांठायीं ॥ १ ॥ गुरुशिष्य मत हरपला दृष्टांत। प्रत्यक्ष त्वरित हरि झाला ॥ २ ॥ नामा पाहे देहीं तंव उभा चहूं बाही। दिशाद्रुमित दाही हरि दिसे ॥ ३ ॥

१८१५. आम्ही परीट चोखट। शुद्ध केलें खटनट ॥ १ ॥ बोध साबण लाऊनी ठायीं। डाग उडविला पाहीं ॥ २ ॥ शांति शिळेवरी धुतलें। ज्ञानगंगे निमर्ळ झाले ॥ ३ ॥ परब्रह्म होउनी ठेलों। नामा म्हणे सुखरूप झालों ॥ ४ ॥

१८१६. अठ्ठावीस युगें उभा चंद्रभागें। परी पालटची नेघे पांडुरंग ॥ १ ॥ उभा उगेपणें पुंडलिकाचेनी सुखें। आहे तेथें लक्षें जैसा तैसा ॥ २ ॥ प्रेमरसरंगें प्रीतीचेनी पांगें। सदों संतसंगें खेळ करी ॥ ३ ॥ जो नलभे योगें यागें आणि देहत्यागें। तो सांपडला सर्वांगें हृदयीं धरा ॥ ४ ॥ धुंडाळितां श्रुतिस्मृति जो नुमगे। तो भक्ता साहे मागें सांभाळित ॥ ५ ॥ योगियांच्या ध्यानीं क्षणएक न रंगें। तो सुखी गोष्टी सांगे नामयासी ॥ ६ ॥

१८१७. आम्ही देह केलें दुकान। तेथें सांठविलें ब्रह्मज्ञान ॥ १ ॥ एके खेपे पैं लाभ झाला। आम्हां पंढरीनाथ भेटला ॥ २ ॥ पुण्यसत्त्वाची केली सांगडी। ब्रह्म तुकून बांधली पुडी ॥ ३ ॥ तुझा दास मी वाणिया भला। नामा केशवचरणीं विनटला ॥ ४ ॥

१८१८. आतां मज भय नाहीं पैं कोणाचें। जन्ममरणाचें दुःख गेलें ॥ १ ॥ बद्ध मोक्षाची फिटली काजळी। समाधि लागली समाधीसी ॥ २ ॥ नामा म्हणे सर्वही साधन। खेचर चरण न विसंबें ॥ ३ ॥

१८१९. कोटी दिवाळया दसरे। आम्हां हेंचि झालें पुरें ॥ १ ॥ घरोघरीं ओंवाळणी। विठ्ठल देखिला देखिला नयनीं ॥ २ ॥ झाला सुखाचा शेजार। करा नामाचा गजर ॥ ३ ॥ नामयाचा स्वामी आला। ब्रह्मादिकां आनंद झाला ॥ ४ ॥

१८२०. मी माझे उरलें बाळक माय पोटीं। पाहे तंव कौतुकीं तेंही नाहीं ॥ १ ॥ तेथींचें तेथे दंपत्य लोपलें। कळिकाळें मंथिलें नामें थोर ॥ २ ॥ तेंचि घेऊनि ठेलों मी येथें लोपलों। ब्रह्मींच गुंतलों ब्रह्ममाळें ॥ ३ ॥ नामा म्हणे चैतन्य चैतन्या मिळालें अरूप रूप ठेलें आपणांमाजीं ॥ ४ ॥

१८२१. मज तुज निगदलें निगदलें। राहे काळिकाळा उगलें ॥ १ ॥ अरे खंडलें एके बोले। समर्थें होतां अंगिकारिलें ॥ २ ॥ नाम्यानें संसारिक जिंकिले। केशवचरणीं मन ठेविलें ॥ ३ ॥

१८२२. सहस्त्रनामाचें वाटगें। खांदीं घेतलें नेटगें ॥ १ ॥ देवा पाती तुझी देवा पाती तुझी। सरकत माझी भक्तिभावें ॥ २ ॥ पंढरीये गेलों हाटा। दुकान मांडिलें वाळुवंटा ॥ ३ ॥ वैष्णवांची भली सात। गिऱ्हाईक पातलें बहुत ॥ ४ ॥ विकरा होतसे नामाचा। लाभ झाला त्या विठ्ठलाचा ॥ ५ ॥ नामा देखुनि दुबळा। विठ्ठलें दिधलें भांडवला ॥ ६ ॥

१८२३. कोटी सूर्य प्रभादीप्ती। गगनीं झळकली अवचितीं ॥ १ ॥ संतनामया सांगती। पैल आला कमलापति ॥ २ ॥ वत्सालागीं जैसी धेनु। तैसा धावे जगज्जीवनु ॥ ३ ॥ गरुडाचे धुंदुवाती। दाही दिशा आक्रंदती ॥ ४ ॥ हरिकंठींची सुमनमाळा। सुटोनि आली भूमंडळा ॥ ५ ॥ सवें चाले सुदर्शन

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भक्ता करावया रक्षण॥ ६॥ उचलोनि दोन्हीं बाहीं। नामा धरिला हृदयीं॥ ७॥

१८२४. झणीं दृष्टि लागो तुझ्या सगुणपणा। जेणें माझ्या मना बोध केला॥ १॥ अनंता जन्मींचें बिसरलों दुःख। पाहतां तुझें मुख पांडुरंगा॥ २॥ योगियांच्या ध्यानीं ध्याता नातुडसी। तो तूं आम्हांपाशीं मागें पुढें॥ ३॥ नामा म्हणे जीवें करीन निंबलोण। विटेसहित चरण वोवाळीन॥ ४॥

भाग ४ था

उपदेश.

कलिप्रभाव.

१८२५. ऐका कलियुगाचा धर्म। पुत्र सांगे पितयास काम। ब्राह्मण त्यजिती ब्रह्मकर्म। ऐसें वर्तमान मांडलें॥ १॥ माया बहिणी दवडिती। स्त्री आपुली आणविती। ऐका ऐका नवल गती। अगा श्रीपति परियेसा॥ २॥ भार्या न करती पतिची सेवा। नाहीं कवणा धर्माचा हेवा। वर्ततसे पापाचा ठेवा। अगा केशवा परियेसी॥ ३॥ अरे वैराग्याचा घराचारू। आणि संन्यासा मोह थोरू। संता बहुत अहंकारू। रुसणें नलगे कोणासी॥ ४॥ झाला कलिचा प्रवेशु। तुम्हां नामाचा विश्वासु। हृदयीं हृषिकेशु। विष्णुदास नामा म्हणे॥ ५॥

१८२६. ऐका कलियुगींचा आचार। अधर्मपर झाले नर॥ १॥ मंचकावरी बैसे राणी। माता वाहतसे पाणी॥ २॥ स्त्रियेसी अलंकार भूषण। माता वळीतसे शेण॥ ३॥ स्त्रियेसी पाटावाची साडी। माता नेसे चिंध्या लुगडीं॥ ४॥ सासुसासऱ्यां योग्य मान। मायबापा न घाली अन्न॥ ५॥ साली सासवा आवडती। बहीणभावां तोंडी माती॥ ६॥ स्त्रियेसी एकांत गोडी। मातेसी म्हणे रांड वेडी॥ ७॥ म्हणे विष्णुदास नामा। ऐसा कलियुगींचा महिमा॥ ८॥

१८२७. कांहीं सांगोनि गेले वचना। कृष्ण उपदेशी पंडुनंदना येथे राहतां पाविजे बंधना। थोर वर्तमान कलियुगीं॥ १॥ ये कलिमाझारीं। पुत्र पित्याचे वैरी। घरची माता होय कामारी। पुरुषांतें नारी अव्हेरिती॥ २॥ न येती वृक्षा फळें आटती धेनु। न पिके मही न वर्षे घनु। यापरी आटेल सकळ जनु। ऐसे जगजीवनु। बोलिले॥ ३॥ आणिक एक वर्तेल अपवित्र। ब्राह्मण सांडितील वेदमंत्र। आचार सांडूनि होती शूद्र। ऐसे अपवित्र कलियुगीं॥ ४॥ थोर वर्तमान पडेल काळु। चहूं वर्णांचा होईल एकचि मेळु। कोणी कोणाचा न धरिती विटाळु। मग गोपाळु निघते झाले॥ ५॥ आतां वेळोवेळां सांगों किती। मोडला धर्म झाली प्रवृत्ति। विष्णुदास नामा येतो काकुळती। कैसेनि करूं भक्ति पंढरिराया॥ ६॥

१८२८. गृहस्थ बैसला ओसरीवरी। गृहस्वामिणी स्वयंपाक करी। तंव मार्गस्थ ब्राह्मण आला द्वारीं। अन्न द्यावें स्वामिया॥ १॥ पडली कुऱ्हाड कपाळीं। रागें सूप चाटू आफळीं। जळत काष्ठातें हातीं कवळी। जैसी आसाळी गर्जतसे॥ २॥ ब्राह्मणें घेतलें धरणें। तंव बाईलेसी गेला शरण। म्हणे माझ्या ग्रासांतून ग्रास देणें। लज्जा राखणें आजिची॥ ३॥ मग म्हणे वो बाईल। कैंचा आलासे बईल। तुजसारिखा असेल बैलासि बैल सोईरे॥ ४॥ गृहस्थें धरोनि वेणी। तिनें शेंडीस हात घालोनी। अंगजूट होऊनी। बाईल हुमण्या मारितसे॥ ५॥ त्याचे मागें सुटली शेंडी। सर्वेचि धरिलासे अंडीं। पडिली असे मुर्कुंडी। तोंडिच्या तोंडी मारीतसे॥ ६॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शेजारीं व्याही होता तो धांवला। येतांचि तोंडावरी मारिला। चौकीचा दांत पाडिला। केला बोचिरा व्याही तो॥ ७॥ आधींच व्याही होते रोडके। आणि हाणी तल्पठाण वईच्या बुडखे। निथळत निथळत बोडकें। घेऊनि सुडकें पुसितसे॥ ८॥ तिकडूनि धांवला मेहुणा। तोहि पाडिला उताणा। केला तिनें घोळाणा। तया मेहुण्याचा॥ ९॥ ब्राह्मणाकडे दांत रगडी। तंव ब्राह्मण हळुहळु पाय काढी। आल्या धोतराची घडी। पळतां वेंगडी वळतसे॥ १०॥ ऐसा ओलांडिला दारवंटा। तंव धांविन्नली पाठोवाटा। शीण घालून हाणिल्या बरोटा। कोठें थोट्या पळसील॥ ११॥ ऐसा कलियुगीं स्त्रियांचा विचार। एक बुडविती बेचाळीस नर। एक दाविती स्वर्गींचें द्वार। नामा निरंतर विनवीतसे॥ १२॥

१८२९. पाप्या नावडे संतसंगति। लोभिया नावडे उदारवृत्ति। व्यभिचारिणी नावडे पति। नावडे ज्योति उजियेडा॥ १॥ चांदणें नावडे तया चोरां। सावधान नावडे तया हेरां। सद्बुद्धि नावडे रांडपोरां। सत्य कुचरां आवडेना॥ २॥ तीर्थ नावडे तया दुष्टां। न्याय न आवडे सत्य नष्टां। कवण नावड तया पापिष्ठां। अभिमान नष्टां न सांडवे॥ ३॥ भक्ति नावडे तया खळा। पुण्य नावडे तया चांडाळा। देखत देखत जन आंधळा। कां रे घननीळा विसरलेती॥ ४॥ पारखी नावडे तया खोट्याला। स्नान नावडे तया विटाळा। सुसंग नावडे नाठाळा। न्याय तंटाला नावडे॥ ५॥ धर्म नावडे तया कृपणा। शुद्धि नावडे दुर्जना। कर्म नावडे अब्राह्मणा। ऐसी दुष्ट वासना पापियातें॥ ६॥ नाम नावडे तया नष्ट भक्ता। वृत्त नावडे तयां सर्वथा। नावडे भजन कैंची कथा। नाहीं पतिव्रता कलियुगीं॥ ७॥ ऐसा झाला कलिचा प्रवेश। धरा नामाचा विश्वास। जीवीं धरा हृषीकेश। विष्णुदास नामा म्हणे॥ ८॥

१८३०. देवा पाप छळें कांपते भेदिनी। षट्कर्मै सांडियेलीं ब्राह्मणीं। दैत्याचेनी भारें दाटली अवनी। प्रथम चरणीं कलियुगीं॥ १॥ लटिक्याचा साच जिंकियेला कली। पाखांडी वेदातें न मानिती बळी। अधर्म प्रवर्तला महीतळीं। ऐसीं पापें कळीं थोर झालीं॥ २॥ म्हणोनि करुणा भाकितु आहे। जैसी व्याघ्रें वेढिली गाय। तेंवि पंचानन ग्रामूं पाहे। तैसा दिसतो नारायणा॥ ३॥ भक्ति भावो नावडे पैं गा। जैसें कां अमृत मुखीं भुजंगा। डंख करूं आवडे जगा। ऐसें श्रीरंगा नवल चोज॥ ४॥ भ्रतारभक्ति सोडियली नारी। परपुरुषीं मन निर्धारीं। पितियासि पुत्र असों नेदी घरीं। नित्य निंदा करी रे अपमान॥ ५॥ म्हणोनियां जिवें त्रासु घेतला। सत्य लोपलें धर्म बुडाला। अझुनि काय पाहतोसि उगला। धांवें विठ्ठला म्हणे नामा॥ ६॥

१८३१. वेदावेगळें कर्म करी। मनीं पाखंड धरी। तो पचिजे अघोरीं। चिरकाळ वरी॥ १॥ तो न आणावा पैं दृष्टी। तोचि दोषी एक या सृष्टीं। तो होईल महा कष्टी। हरीसि न भजतां॥ २॥ संध्या स्नान नेणें दान। नेणें हरिकथा श्रवण। तोहि पतीत जाण। महापातकी चांडाळ॥ ३॥ सांडूनि ब्रह्मणपण। शूद्ररीती आचरण। तो दृष्टीं पडलिया जाण। महादोष घडेल॥ ४॥ निंदा करी जो संतांची। पूजा नेणें जो देवाची। तोचि राशि पापाची। प्रत्यक्ष जाणावी॥ ५॥ तीर्थ न करी हिंडतां। व्रत न करी बोलतां। पुराण नायके पाहतां। तो तंव राक्षस जाणावा॥ ६॥ सदा अमंगळ अशुची। गुरु आज्ञा भंगी साची। अखंड निंदा करी संतांची। तो स्वामिद्रोही जाणावा॥ ७॥ कपट शिके नानाविध। गोत्रजांशीं करी विरोध। तो जाणावा हें प्रसिद्ध। महापातकी चांडाळ॥ ८॥ गृहदारावरी नाहीं चित्त। परस्त्रियेसी करी स्तुत। तो प्रत्यक्ष महा दैत्य। त्याचें मुख पाहों नये॥ ९॥ नाठवी जो उपकार। स्वामीसी न करी जो नमस्कार। तो जन्मांतरींचा होय नर। पतीत चांडाळ बोलिजे॥ १०॥ पाखांड रची कवित्व। माता-पितियांचें न करी महत्त्व। पंच पातकी जिवित्स। तो पूर्वीचा बोका होता॥ ११॥ नामा म्हणे तैसे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दोषी। न आणावे पंढरीसी। काय करावें ते पाषाण जन्मासी। जे विठ्ठलनामासी मिळतीना॥ १२॥

१८३२. कृष्णाचें कीर्तन नावडे ज्या नरा। जन्मोनि अघोरा पडे नरकीं॥ १॥ कृष्णश्रवण नाइके जो कानीं। तयासि मेदिनीं ठाव कैंचा॥ २॥ कृष्णविष्णुकथा नावडे पैं नित्य। तयासी पैं सत्य ग्रह बाधी॥ ३॥ रामकृष्ण हरी न ध्याय जो मूर्ति। तया यम नेती अंतीं जाणा॥ ४॥ नामा म्हणे हे नर कलियुगीं उदंड। घरोघरीं पाखांड करिताती॥ ५॥

१८३३. पलंगीं नारी वैसबूनि। माये हातीं वाहे पाणी॥ १॥ ऐसा कलियुगीं आचार। क्रियाभ्रष्ट झाले नर॥ २॥ स्त्रीसी पाटावाची चोळी। माता सिविती सोंवळीं॥ ३॥ स्त्रियेचा कैवार वोढी। मातेसी म्हणे रांड वेडी॥ ४॥ स्त्रीचें ऐकोनि उत्तर। सख्य बंधूसि वाडी वैर॥ ५॥ म्हणे विष्णुदास नामा। ऐसा कलियुगाचा महिमा॥ ६॥

भक्तिस्तोम माजविणाऱ्या वेषधाऱ्यांस उपदेश.

१८३४. त्यागेंवीण विरक्ति। प्रेमावांचूनि भक्ति। शांति नसतां ज्ञप्ति। शोभा न पवे॥ १॥ दमनेवांचूनि यति। माना-विण भूमिपति। योगी नसतां युक्ति। शोभा न पवे॥ २॥ बहिर्मुख लावी मति। नेमावांचूनियां वृत्ति। बोधेंविण महंती। शोभा न पवे॥ ३॥ अनधिकारा व्युत्पत्ति। गुरू तो कनिष्ठ याति। माता नीच शिश्नवृत्ति। शोभा न पवे॥ ४॥ हेतुवांचूनि प्रीति। गुणरहित स्तुती। करणीवांचूनि कीर्ति। शोभा न पवे॥ ५॥ सत्समागमसंगती। बाणली नसतां चित्तीं। नामा म्हणे क्षिति। शोभा न पवे सर्वथा॥ ६॥

१८३५. निर्विकल्प ब्रह्म कशानें आतुडे। जंववरी न मोडे मी तूं पण॥ १॥ शब्द चित्रकथा सांगती पाल्हाळ। मन नाहीं निश्चळ हरिच्या पायीं॥ २॥ अणूच्या प्रमाण होतां दुजेपण। मेरूतें समान देईल दुःख॥ ३॥ नामा म्हणे ब्रह्म सर्वांभूतीं पाहीं। तरीच ठायींच्या ठायीं निवशील॥ ४॥

१८३६. सोंगाचें वैराग्य अनर्थ हें मूळ। आशा तें केवळ मिथ्या जाण॥ १॥ अंतरापासूनि नसतां विवेक। निभ्रांत चटक आशावरी॥ २॥ राजस तापस करोनियां गोळे। होताति आंधळे दाटोनियां॥ ३॥ नामा म्हणे ऐशा उदंड उपायें। विठोबाचे पाय अंतरिती॥ ४॥

१८३७. मुखीं नाहीं नाम। काय जपतो श्रीराम॥ १॥ काय आसन घालून। मुखीं नाहीं नारायण॥ २॥ टिळे टोपी माळा दावी। भोळया भाविकांसी गोवी॥ ३॥ नामा म्हणे त्याचा संग। नको चित्ता होय भंग॥ ४॥

१८३८. गोमुखीं गोवूनि काय जपतोसी। जपतप त्यासी विघ्न करी॥ १॥ नामसंकीर्तनें जळतील पापें। चुकतील खेपा चौऱ्यांशीच्या॥ २॥ करी उग्र अनुष्ठानी। तया चक्रपाणि अंतरतो॥ ३॥ नामा म्हणे ऐसे बहुतेक प्राणी। पचतील खाणी भ्रष्ट लोक॥ ४॥

१८३९. कांचनीक भक्ति सर्व काळ करी। बहुतांचे वैरी हित नेणें॥ १॥ लोकांपुढें सांगे आम्ही हरिभक्त। न होय विरक्त स्थिति ज्याची॥ २॥ असंतोषी सदां अतितासी जाळी। सुकृताची होळी स्वयें केली॥ ३॥ वेदमर्यादा सांडूचि चालती। हुंबतें घेती वाऱ्यासवें॥ ४॥ नामा म्हणे आतां असो याची मात। सुख नेणें हित कदा काळीं॥ ५॥

१८४०. सिबुर दावूनि बैसलें हातीं। सांगतांहे गोष्टी जाणीवेच्या॥ १॥ कापियेलें नाक झाले ते निःशंक। वारे भुरभुरां देख वाजतसे॥ २॥ दवडा दवडा परतें करील निंदा। घ्यावा कां कांदा मुळींहुनी॥ ३॥ नामा विनवीतसे केशवातें सत्ता। उरलें सुरलें आतां अवघे तासां॥ ४॥

१८४१. यज्ञादिक कर्म करूनि ब्राह्मण। दंभ आचरण दावी लोकां॥ १॥ लोकांसी दाविती मीच कर्मनिष्ठ। अभिमान खोटा वागविती॥ २॥ वागविती वाक्य जाण ऋषेश्वर। नको येरझार नानामतें॥ ३॥ नानामतें अधोऊर्ध्वसात जावीं। नको गोवागोवीं नामा म्हणे॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वैष्णवांसंबंधी उद्गार.

१८४२. वेदाध्ययन करिसी तरी वैदिकचि होसी। परी वैष्णव न होसी अरे जना॥ १ ॥ पुराण सांगसी तरी पुराणीकचि होसी। परी वैष्णव न होसी अरे जना॥ २ ॥ गायन करिसी तरी गुणीजन होसी। परी वैष्णव न होसी अरे जना॥ ३ ॥ कर्म आचरसी तरी कर्मठचि होसी। परी वैष्णव न होसी अरे जना॥ ४॥ यज्ञ करिसी तरी याज्ञिकचि होसी। परी वैष्णव न होसी अरे जना॥ ५॥ तीर्थ करिसी तरी कापडीच होसी। परी वैष्णव न होसी अरे जना॥ ६ ॥ नामा म्हणे नाम केशवाचें घेसी। तरीच वैष्णव होसी अरे जना॥ ७॥

१८४३. योगी ब्रह्मचारी सिद्ध ब्रह्मज्ञानी। ते तो तुज कोणी नयेती कामा॥ १ ॥ कोंडुनि इंद्रियें बैसती समाधि। हळूच तुझ्या पदीं झेपावती॥ २॥ एवढें विश्वरूप नाहीं ऐसें केलें। सकळ होऊनि ठेले आपणचि॥ ३॥ एसियाचा विश्वास न धरिसी देवा। नामा तुज केशवा विनवितसे॥ ४॥

१८४४. गोसावीपणाचा दाखविती वेष। नाहीं निदिध्यास हरिनामीं॥ १ ॥ वरी वरी आर्त दाविती झगमग। अंतरीं तो संग विषयाचा॥ २॥ व्यर्थ लोकांपुढें हालविती मान। विटंबन केली संसाराची॥ ३ ॥ नामा म्हणे मन गुंतेल पांडुरंगा। आतां ऐशा सांगा कोणा रीती॥ ४॥

१८४५. विष्णूसी भजला शिव दुराविला। अधःपात झाला तया नरा॥ १ ॥ शिवपूजा करी विष्णूसी अव्हेरी। तयाचिये घरीं यम नांदे॥ २॥ विष्णुकथा ऐके शिवासी जो निंदी। तयासी गोविंदी ठाव नाहीं॥ ३॥ नामा म्हणे असती शिवविष्णु एक। वेदाचा विवेक आत्माराम॥ ४॥

१८४६. डोई बोडून केली खोडी। काया वागविली बापुडी॥ १ ॥ ऐसा नव्हे तो संन्यास। विषय देखोनि उदास॥ २ ॥ मांजराचे गेले डोळे। उंदीर देखोनि तळमळे॥ ३ ॥ वेश्या झाली पटाची राणी। तिला आठवे मागील करणी॥ ४॥ नामा म्हणे वेष पालटे। परी अंतरींचें ओशाळपण न तुटे॥ ५॥

१८४७. पोटासाठीं जरी करी हरिकथा। जन रंजवितां फिरतसे॥ १ ॥ तेणें घात केला एकोत्तरशत कुळांचा। पाहुणा यमाचा श्रेष्ठ थोर॥ २ ॥ द्रव्याचिये आशें हरिकथा करी। तया यमपुरीं नित्य वास॥ ३॥ नामा म्हणे ऐसे होत जे रे कोणी। ते नर नयनीं पाहू नये॥

१८४८. हरिभक्त म्हणविणें हरिदर्शना नाहीं जाणें। बोलतां लाजिरवाणें अहो जी देवा॥ १॥ पतिव्रता म्हणविणें आणि परपुरुषीं विचरणें। बोलतां लाजिरवाणें अहो जी देवा॥ २ ॥ योगिया म्हणविणें आणि इंद्रियां नाहीं दमन। बोलतां लाजिरवाणें अहो जी देवा॥ ३ ॥ क्षत्रिय म्हणविणें आणि पाठिशीं घाय साहणें। बोलतां लाजिरवाणें अहो जी देवा॥ ४॥ पितृभक्त म्हणविणें आणि पितृआज्ञा न पाळणें। बोलतां लाजिरवाणें अहो जी देवा॥ ५॥ ऐसे भक्त किती गेले अधोगति नामा म्हणे श्रीपति दास तुझा॥ ६॥

१८४९. कडू वृंदावन साखरें घोळिलें। तरी काय गेलें कडूपण॥ १ ॥ तैसा तो अधम करो तीर्थाटण। नोहे त्याचें मन निर्मळत्व॥ २ ॥ बचनाग रवा दुग्धीं शिजविला। तरी काय गेला त्याचा गुण॥ ३ ॥ नामा म्हणे संतसज्जनसंगतीं। ऐशासही गती काळांतरीं॥ ४॥

१८५०. दावी जडीबुट्टी जारण मारण। नागवें हिंडणें काय काज॥ १ ॥ दावी उग्र तप केले उपवास। फिरतांही देश काय काज॥ २ ॥ काय काज तरी होसील फजीत। स्मरा रे अनंत सर्वकाळ॥ ३ ॥ नामा म्हणे नव्हे उदंड उपाय। धरीं आधीं पाय विठोबाचे॥ ४॥

१८५१. लांब लांब काय सांगशील गोष्टी। करा उठाउठी निरभिमान॥ १ ॥ मी तूं पण जंव दंभ गेला नाहीं। साधिलें त्वां न कांहीं तत्त्वसार॥ २ ॥ अहंभाव देहीं प्रपंचाचे दृष्टी। काय चाले गोष्टी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रोकडी ते॥ ३॥ नामा म्हणे ऐसे नेणती विचार। जाती निरंतर यमपंथें॥

१८५२. मी तूं हें कथन सांगती काबाड। विठ्ठल येवढें न सांगसी॥ १॥ ऐसें कांहीं सांग जेणें फिटे पांग। नित्य पांडुरंग भजन सोपें॥ २॥ मी आणि तूं हें वचन हो खोटें। विठ्ठलीं विनटे दिननिशीं॥ ३॥ नामा म्हणे भाव ऐसा धरीं सकळ। तुष्टेल गोपाळ न विसंबितां॥ ४॥

१८५३. मुखीं नाम हातीं टाळी। दया नुपजे कोणे काळीं॥ १॥ काय करावें तें गाणें। धिक् धिक् तें लाजिरवाणें॥ २॥ हरिदास म्हणोनि हालवी मान। कवडीसाठीं घेतो प्राण॥ ३॥ हरिदासाचे पायीं लोळे। केशीं धरोनि कापी गळे॥ ४॥ नामा म्हणे अवघे चोर। एक हरिनाम हें थोर॥ ५॥

१८५४. ताकहि पांढरें दूधहि पांढरें। चवी जेवणारे जाणवीते॥ १॥ केळाच्या पाटीवर ठेविला दोडका। तोहि म्हणे विका तेणें मोलें॥ २॥ ढोर म्हणती आम्हां हाकारलास। वारुवा सरसे खाऊं द्या घांस॥ ३॥ मंदल्याजेती घरोघरीं गाती। धृपदासाठीं ताक मागती॥ ४॥ नामा म्हणे सोपीं कवित्वें झालीं फुका। हरि हरि म्हणा आपुलिया सुखा॥ ५॥

१८५५. योग याग यज्ञ इच्छिसी कामना। परि केशव निधाना विसरसी॥ १॥ नेणेंचि हें मन भुललें अज्ञानें। यातायाति पतनें भोगूं पाहे॥ २॥ ज्याचेनि जाहलें तुझें हें शरीर। त्याचा नामोच्चार नये वाचें॥ ३॥ नामा म्हणे का रे नेणसी अझुनी। केशवचरणीं अनुसरे कां॥ ४॥

१८५६. गेला परमहंस परिवारासहित। कोल्हाळ करिती मायबहिणी॥ १॥ काया हे नगरी पांचही तराळ। निद्रेनें भ्रमले व्याकुळ झाले॥ २॥ गेला मागून दिसे कवणिये वाटे। नवहीं द्वारें सपाट पडलीं ओस॥ ३॥ नामा म्हणे चोरी एके अंगणांत। दिवसां रात्रीं पडत खाण तेथें॥ ४॥

१८५७. नाहीं परमार्थ पोटीं धनाचि आशा। धरूनि हव्यास धनमान॥ १॥ दंभमान दावी ज्ञानमार्ग मोठा। पुढिलांसी वाटा यमपंथें॥ २॥ पंथ न चुकती संतांवीण कधीं। संसारसंबंधीं तया नरा॥ ३॥ नामा म्हणे ऐसे बहू अभाविक। संतसंगसुख काय जाणे॥ ४॥

१८५८. तोंवरी रे तोंवरी वैराग्याचें ठाण। जंव कामिनी कटाक्ष बाण लागले नाहीं॥ १॥ तोंवरी रे तोंवरी आत्मज्ञान बोध। जोंवरी अंतरीं कामक्रोध उठले नाहीं॥ २॥ तोंवरी रे तोंवरी निरभिमान। तंव देहीं अपमान झाला नाहीं॥ ३॥ नामा म्हणे अवघी वचबच गाळी। विरळा तो जाळी द्वैत बुद्धि॥ ४॥

१८५९. चंद्रसूर्यादि बिंब लिहिताती सांग। परि प्रकाशाचें अंग लिहितां नये॥ १॥ संन्यासाचीं सोंगे आणिताति सांग। परि वैराग्याचें अंग आणितां नये॥ २॥ नामा म्हणे कीर्तन करिताती सांग। प्रेमाचें तें अंग आणितां नये॥ ३॥

१८६०. हरिभक्ति आथिले तेचि उत्तम। येर ते अधम अधमांहुनी॥ १॥ हरिभक्तीं सप्रेम तेंचि तैसें नाम। येर ते अधम अनामिक॥ २॥ नामा म्हणे जया नाहीं हरिसेवा। ते जितची केशवा प्रेत जाण॥ ३॥

१८६१. भुजंग विखार पवनाचा आहार। परि योगेश्वर म्हणों नये॥ १॥ पवनाच्या अभ्यासें काया पालटी। परि तो वैकुंठीं सरता नव्हे॥ २॥ शुद्ध करी मन समता धरोनि ध्यान। तरीच भवबंधन तुटेल रे॥ ३॥ पवित्र गंगाजळ मीन सेवा निर्मळ। परि दुष्ट केवळ कर्म त्याचें॥ ४॥ अवचिताची तो सांपडला गळीं। न सुटे तयेवेळीं तीर्थोदके॥ ५॥ घर सांडोनियां वन सेविताती। वनीं कां नसती रीस व्याघ्र॥ ६॥ काम क्रोध लोभ न संडवे मनीं। असोनिया वनीं कोण काज॥ ७॥ बहुरुप्याचा नटा माथां भार जटा। भस्म राख सोटा हातीं दंड॥ ८॥ धोति पोति कर्मावेगळा आदेसें। हुंबरत असे अंगबळें॥ ९॥ त्रिपुंड्र टिळे अंगीं चंदनाची उटी। घालोनियां कंठीं तुळसीमाळा॥ १०॥ व्यापक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हा हरि न धरिती चित्तीं। लटिकीयाची गति गातु असे॥ ११॥ मी तूं पण जरी हीं दोन्हीं सांडी। राखिसी तरी शेंडी हेंचि कर्म॥ १२॥ मनासी तूं मुंडीं देहभाव सांडी। वामनेसी दंडी आत्ममयें॥ १३॥ मन हें दर्पण करोनि निर्मळ। पाहे पां केवळ आत्मा स्वयें॥ १४॥ तुझा तूं केवळ तुजमाजीं पाहीं। नामा म्हणे ध्यायी केशिराजु॥ १५॥

१८६२. अहंकारें आथिलें ऐसें जे शरीर। तें जाणा मंदिर चांडाळाचें॥ १॥ आपुलिया मुखें सांगे पंढरिनाथ। नव्हेचि तो भक्त सत्य जाणा॥ २॥ नाम विटंबिती संतांसि हांसती। ते मूर्ख म्हणिजेति सर्पपिलीं॥ ३॥ तयांसि लक्ष्मीवल्लभ सांगे उपदेश। नामा विष्णुदास विनवीतसे॥ ४॥

१८६३. काय करूनि तीर्थाटणें। मन भरिलें अवगुणें॥ १॥ काय करावें तें तप। चित्तीं नाहीं अनुताप॥ २॥ मन संकल्पाचीं पापें। न जाती तीर्थाचेनि बापें॥ ३॥ नामा म्हणे सर्व सोपें। पाप जाय अनुतापें॥ ४॥

१८६४. करीना साधन जिवासी बंधन। कोणे काळीं मन नोहे शुद्ध॥ १॥ करूं जातां तप अभिमानरूप। त्रिविधादि ताप कैसा निवे॥ २॥ नित्यानित्य करी विवेक आपण। तेणें अभिमान वाढतसे॥ ३॥ नामा म्हणे जन्म विसरोनियां गेलों। मरोनि राहिलों देहातीत॥

१८६५. शिकला गाणें राग आळवण। लोकां रंजवण करावया॥ १॥ भक्ताचें तें गाणें बोबडिया बोली। तें तें हो विठ्ठलीं अर्पियलीं॥ २॥ बोबडिया बोली जे कोणी हांसती। ते पचिजेती रौरवीं॥ ३॥ नामा म्हणे बहुत बोलों आतां काय। विठोबाचे पाय अंतरती॥ ४॥

१८६६. राजसी तामसी जें गाणें। तोडी ताल मोडी मान॥ १॥ ख्याल गाये कंपस्वर। रिझवी दात्याचें अंतर॥ २॥ हे तों प्रीति धनावरी। अर्था अनर्थ तो करी॥ ३॥ नामा म्हणे शास्त्रार्थ। अर्थ तोचि होय स्वार्थ॥ ४॥

१८६७. सुवर्ण आणि परिमळ। हिरा आणि कमळ। योगी आणि निर्मळ। हें दुर्लभ जी दातारा॥ १॥ देव जरी बोलता। तरी कल्पतरु चालता। गज जरी दुभता। हें दुर्लभ जी दातारा॥ २॥ धनवंता आणि दयाळु। व्याघ्र आणि कृपाळु अग्नि आणि सीतळु। हें दुर्लभ जी दातारा॥ ३॥ सुंदर आणि पतिव्रता। सावधान होय श्रोता। पुराणिक तरी ज्ञाता। हें दुर्लभ जी दातारा॥ ४॥ क्षत्रिय आणि शूर भला। चंदन फुलीं फुलला। स्वरूपीं गुण व्यापिला। हें दुर्लभ जी दातारा॥ ५॥ ऐसा संपूर्ण सर्व गुणीं। केवी पाविजे शारंगपाणी। विष्णुदास नामा करी विनवणी। मुक्ति चरणीं त्याचिया॥ ६॥

१८६८. शब्दामृत मांडे येती भोजना। अभ्यासी अज्ञाना तरी फळे॥ १॥ मुंगीचे थडके फुटे जों आकाश। ब्रह्मत्वें सायास नये हातीं॥ २॥ मशका ओढी मेरू हाले बुडीं। जीवाचे ते जोडी ब्रह्म मिळे॥ ३॥ उदकीं जरी मासोळी सूर्यासी भेटे। वारियाचे कोठें दृष्टि पडे॥ ४॥ चंद्राचें चांदणें घेती जे पालवीं। मिथ्या माया देवी नामा म्हणे॥ ५॥

१८६९. नामाचें लेखन श्वानाचिये कानीं। धांवतसे घाणी चर्माचिये॥ १॥ विंचू म्हणतसे मी उदार दाता। उचित हें देतां नलगे वेळ॥ २॥ सूकर म्हणे गृहस्थ भला। शेखीं तयाचा डोळा विष्टेवरी॥ ३॥ नापिक म्हणे माझी नांदणूक मोठी। धोकटीमाझारी जन्म गेला॥ ४॥ नामा म्हणे माझी वासना हे खोटी। विठ्ठलचरणीं मिठी पडली असे॥ ५॥

१८७०. ओढाळ तें सुणें बैसे विहिरणी। तेथें गुणीं प्रगटेल॥ १॥ देव खादलें ते काय करी जाणा। सर्व अवगुण तयापासी॥ २॥ अवघी संतति कावळे पोशिले। जावोनि बैसले विष्टेवरी॥ ३॥ भुजंगाचे मुखीं अमृत घातलें। फिरोनि पाहिलें विषमय॥ ४॥ नामा म्हणे ऐसे अभक्त निर्लज्ज। त्यासि केशिराज उपेक्षील॥ ५॥

१८७१. कांडितांचि कोंडा न निघे तांदूळ। शेरा कैंचें फळ अमृताचें॥ १॥ कणहेरीच्या मूळा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सुगंध तो नाहीं। कसाबाची गाई जिणें कैंचें॥ २॥ रुई दूध जरी येईल भोजना। लोभियाच्या धना वेंच नाहीं॥ ३॥ निर्फळ हें जिणें भक्ताविण मन। नामा म्हणे जाण नये कामा॥ ४॥

१८७२. बुजगावणें शेतीं माणसें म्हणती। काय त्याचे हातीं शस्त्र शोभे॥ १॥ हंसासी विरोध करीत कावळा। नेणे त्याची कळा उंचपणें॥ २॥ अनामिकासंगें पाठवितां पंडिता। तो तयातें तत्त्वतां काय जाणे॥ ३॥ नामा म्हणे बापा करूं नको तैसे। विचार कायसे पाहसील॥ ४॥

१८७३. बेडूक म्हणजे चिखलाचा भोक्ता। क्षीर सांडूनि रक्ता गोचीड झोंबे॥ १॥ जयाची वासना तयासीच गोड। प्रेमसुख चाड नाहीं तया॥ २॥ वांझ म्हणे मी वाढवितें जोंझार। उघडावया कैवाड नाहीं कोणी॥ ३॥ अस्वलाशीं तेल माखियलें कानीं। तें म्हणे रानीं थोर सुख॥ ४॥ स्वामींचिया कानीं खोविली लेखणी। ते घेत असे धणी घरोघर॥ ५॥ गाढवासी लाविली तूप पोळी डाळ। भुंके आळोआळ लाज नाहीं॥ ६॥ सूकरा कस्तुरी चंदन लाविला। तो तेथोनि पळाला विष्ठा खाया॥ ७॥ नामा म्हणे माझें मन हें वोळलें। धरिलासे गोपाळें सोडिचिना॥ ८॥

१८७४. भूमीचें मार्दव। सांगे कोंभाची लवलव। तैसे आचार गौरव। सुकुलिन जनाचे॥ १॥ झाड जाणावें फुलें। मानस जाणावें बोलें। भोगें जाणावें केलें। जन्मांतरींचें॥ २॥ लोभ जाणावा उभय दृष्टी। क्रोध जाणावा भोवया गांठी। लटिका जाणावा बहु गोष्टी। नष्टप्रकृति ओळखावा॥ ३॥ द्वाही घातलिया जाणावा खरा। ढोकळ जाणावा कली अवसरा। परद्वारिणी जाणावी उण्या उत्तरा। कुश्चळी घरोघरीं हिंडतसे॥ ४॥ मृदंग जाणावा गंभीर नादें। गाणें जाणावें सुस्वर शब्दें। ओंकार जाणावा अक्षरभेदें। शहाणा शब्दें ओळखावा॥ ५॥ विष्णुदास नामा करी विनंती। या उत्तराची न मानावी खंती। केशवाचा प्रसाद आहे माझे चित्तीं। देवा काय करिसी तें न कळे॥ ६॥

१८७५. अंतरीं आवेश धरुनी कामाचा। लटकी जल्पे वाचा शब्दज्ञानें॥ १॥ बोलाचे पैं मांडे क्षीर घारी अन्न। तेणें समाधान केविं होय॥ २॥ बोलिल्यासारिखें न करी पामर। वृथाचि कुरकर वाढविली॥ ३॥ नाहीं जीव तया प्रेता आलिंगन। तैसें तें श्रवण केल्या होय॥ ४॥ नामा म्हणे त्याच्या संगे स्थिति दुषे। झाला लाभ नासे तेथें आतां॥ ५॥

१८७६. सोंवळीं पिळुनि कां घालिशी। मुद्रेनें आंग कां जाळिसी॥ १॥ कासया केली खोडी। काया विटंबिली बापुडी॥ २॥ कावळा प्रातःस्नान करी। जितें मेलें तें न विचारी॥ ३॥ मैंदें लावूनि द्वादश टिळे। तो फांसा घालूनि निवटी गळे॥ ४॥ सुसरी गंगें रहिवासु। बहुतां जीवातें करी ग्रासु॥ ५॥ गंगे गेल्या ज्ञान सांगे। मांजर मारिलें तें न सांगे॥ ६॥ बक ध्यान लावूनि टाळी। मौन धरुनियां मासा गिळी॥ ७॥ नामा म्हणे केशिराजा। ऐशिया जीवा लावी वोजा॥ ८॥

१८७७. आपलें हित आपण नेणती। पुढिलांतें सांगती बहू ज्ञान॥ १॥ नेणोनि परब्रह्म जाणते झाले । आभावें गुंतले मायाजाळीं॥ २॥ जीव आणि शीव एकरूप म्हणती। सेवेसी अंतरती केशवाचे॥ ३॥ नामा म्हणे तोचि केशवातें जाणता। केशव म्हणतां मुक्त होय॥

१८७८. उपाय असतां अपाय मानिती। तया अधोगति न चुकती॥ १॥ मनुष्यमाझारीं तो एक गाढव। तया अनुभव काय करी॥ २॥ नामा म्हणे देव ऐसियासी कैसा। काया मनें वाचा भेदवादी॥ ३॥

१८७९. जो कां करी संतनिंदा। त्यासि दंडावें गोविंदा॥ १॥ करी संतांसि पाखंड। त्याचें करावें त्रिखंड॥ २॥ निंदक दंडावे दंडावे। नेऊनि अंधारीं कोंडावे॥ ३॥ नामा म्हणे सांगेन एक। निंदक श्वानाचे ते लोक॥ ४॥

१८८०. हरिदासपणें उभविला ध्वज परि तें वर्मबीज न कळेची॥ १॥ काय करूं देवा जळो

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

याची बुद्धि। जोंवरी नाहीं शुद्धि परलोकाची ॥ २ ॥ मुद्रा धरूनि गळां घाली तुळसीमाळा। परि नाहीं जिव्हाळा स्वहिताचा ॥ ३ ॥ धरी बहु वेष वृथा करी दोष। नाम ब्रह्मरस अंगी नाहीं ॥ ४ ॥ दुसरा हरिदास देखूनियां रंगीं। धांवोनियां वेगीं ग्रासो पाहे ॥ ५ ॥ दुसरियाचें पद ऐकोनियां कानीं। क्रोधें पेटे वन्हि पर्वतींचा ॥ ६ ॥ दुर्जनाचे भयें पळती साधुवृंदें। जैसीं तीं श्वापदें व्याघ्रा भेणें ॥ ७ ॥ बोले नानायुक्ति वश करी सभा। दुसरा रंगीं उभा राहों नेदी ॥ ८ ॥ राजमानें श्रेष्ठ मोठे अधिकारी। त्यापुढें कुसरी करिताती ॥ ९ ॥ थातमात करी नटे नानापरी। चंचळ परनारी भुलवितो ॥ १० ॥ ऐसें नाम विटंबूनि करील जो हरिकथा। तेणें परमार्थां विघ्न केलें ॥ ११ ॥ जाई जुई उत्तम सुगंध कस्तुरी। विष्टेच्या उदरीं आंथुरिला ॥ १२ ॥ साडेपंधरा सोनें होतें पालवण्या। परि झालें हीण डांक लागे ॥ १३ ॥ द्यावें दिव्यौषध रोगियाचें हित। केलिया कुपथ्य वायां जाय ॥ १४ ॥ चतुर्विध अन्न षड्रस पक्वान्न। विटाळलें जाण श्वानमुखें ॥ १५ ॥ ऐसें म्हणतां माझी मळेल पैं वाचा। परि या वैष्णवांचा धर्म नव्हे ॥ १६ ॥ संसारसागरु हरिकथा तारू। तरिजे विचारू दुरी ठेला ॥ १७ ॥ जे कथा ऐकती पसरोनी बाह्या। शांति क्षमा दया येती तेथें ॥ १८ ॥ शांति क्षमा दया येती भेटावया। तेथें मोक्ष व्हावया विलंब काय ॥ १९ ॥ आनंद नामाचा ऐकूनि गजर। ब्रह्मादिक हरिहर येती तेथें ॥ २० ॥ खुंटला अनुवाद मावळला शब्द। अनिर्वाच्य बोध प्रगटला ॥ २१ ॥ वैकुंठ सांडून धांवे चक्रपाणि। कीर्तनाचा ध्वनि ऐकूनियां ॥ २२ ॥ तेथे श्रोते वक्ते होतील निःशाप। ऐशी पुण्यरूप हरिकथा ॥ २३ ॥ शून्याचें निःशून्य जेथें हरपलें। एकाग्र मन झालें ध्यान तेथें ॥ २४ ॥ नामा म्हणे माझी हरिकथा माउली। मोक्ष पान्हा घाली भक्तांलागीं ॥ २५ ॥

१८८१. देवाचिये चाडे भोप्याचे आर्जव। येरवीं त्याचें नांव कोण घेतें ॥ १ ॥ सीतज्वरामुळें खावी नंदपुडी। येर कडु पुडी कोण सेवी ॥ २ ॥ सद्बुद्धिकारणें संताचे गौरव। येरवीं त्यांचें नांव कोण पुसे ॥ ३ ॥ रोगामुळें पाहे वैद्याचें कारण। येरवीं कधीं कोण पुसे तया ॥ ४ ॥ तैसा नामा जगीं अगत्या अगत्य। असत्यासी सत्य न म्हणे कधी ॥ ५ ॥

१८८२. काय चाड आम्हां बाहेरल्या वेषें। सुखाचें कारण असे अंतरीं तें ॥ १ ॥ भीतरी पालट जंव नाहीं झाला। तोंवरी न बोला जाणपणें ॥ २ ॥ चंदनाचे संगतीं नीच महत्त्वा पावलीं। नांवें परि उरलीं पालट देहीं ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसें सांगा मज कोणी। जेणें केशव येऊनि हृदयीं राहे ॥ ४ ॥

१८८३. मांजरें केली एकादशी। इळवरी होतें उपवासी। यत्न करतां पारण्यासी। धांऊनि गिवसी उंदिर ॥ १ ॥ लांडगा बैसला ध्यानस्थ। तोंवरीं असे निवांत। जंव पेट सुटे जीवांत। मग घात करी वत्साचा ॥ २ ॥ श्वान गेलें मल्लिकार्जुना। देह कर्वतीं घातलें जाणा। आलें मनुष्यदेहपणा। परि खोडी न संडी आपुली ॥ ३ ॥ श्वानें देखिला स्वयंपाक। जोंवरि जागे होते लोक। मग निजालिया निःशंक। चारी मडकीं फोडिलीं ॥ ४ ॥ वेश्या झाली पतिव्रता। तिचा भाव असे दुश्चिता। तिसी नाहीं आणिक चिंता। परद्वारांचुनि ॥ ५ ॥ दात्यानें केली समाराधना। बहुत लोक जेविले जाणा। परि न संडी वोखटी वासना। खटनट चालितसे ॥ ६ ॥ ऐशा प्रकारच्या भक्ति। असती त्या नेणों किती। एक ओळंगा लक्ष्मीपति। म्हणे विष्णुदास नामा ॥ ७ ॥

१८८४. एकचि हें तत्त्व एकाकार देशीं। एक तो नेमेसी सर्व जनीं ॥ १ ॥ ऐसें ब्रह्म पाहा आहे सर्व एक। नलगे तो विवेक करणें कांहीं ॥ २ ॥ मिथ्या हें डंबर माया मथितार्थ। हरि हाचि स्वार्थ वेगीं करीं ॥ ३ ॥ नामा म्हणे समर्थ बोलिला तो वेद। नाहीं भेदाभेद ब्रह्मपणीं ॥ ४ ॥

अन्य दैवतांसंबंधी उपासकांस उपदेश.

१८८५. जाखाई जोखाई उदंड दैवतें। वाउगेंचि व्यर्थ श्रमतोसी ॥ १ ॥ अंतकाळीं तुज सोडविना

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कोणी। एक्या चक्रपाणि वांचोनियां ॥ २ ॥ मागें थोर थोर कोणें केलें तप। उद्धरीलें अमूप नारायणें ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसे बहु झाले भांड। न उच्चारी लंड नाम वाचे ॥ ४ ॥

१८८६. नानापरिचीं दैवतें। बहुत असतीं असंख्यातें ॥ १ ॥ सेंदुर शेरणीं जीं इच्छितीं। तीं काय आर्त पुरवितीं ॥ २ ॥ अंध नको होऊं आलीया। भज भज पंढरिराया ॥ ३ ॥ सोडूं नको विष्णु त्रिपारणिया। तोडी कुलूप पाठीं गळ टोचोनियां ॥ ४ ॥ बाळा अबळा मुकी मौळी। क्षूद्र देवता जीवदान बळी। तेणें न पावती सुखकल्लोळीं। एक विठ्ठल वांचूनियां ॥ ५ ॥ नाना धातूंची प्रतिमा केली। षोडशोपचारें पूजा केली। दुकळीं विकूनि खादली। ते काय आर्त पुरविती ॥ ६ ॥ आतां दृढ धरोनियां भाव। वोळगा वोळगा पंढरिराव। आपुले चरणीं देईल ठाव। विष्णुदास नामा म्हणे ॥

१८८७. खाटिकाप्रमाणें करिसी व्यापार। मनीं निरंतर धरोनियां ॥ १ ॥ दुष्ट दुराचारी दुर्बल घातकी। परम नाशकी पापिष्ट तो ॥ २ ॥ अपमानीं आशा धन मेळविसी। अंतीं नरकासी जासी जाण सत्य ॥ ३ ॥ नामा म्हणे जाण करूं मोटयाळें। जाऊनियां लोळे विष्टेमाजी ॥ ४ ॥

१८८८. आपुली करणी न विचारी मनीं। वांया काय ठेवूनि बोल जिवा ॥ १ ॥ खाटकी जो चेपी पशुची नरडी। अवचिता करंगळी सांपडली ॥ २ ॥ मेलों मेलों म्हणूनि गडबडां लोळे। परि कापी गळे आठवीना ॥ ३ ॥ आपुलें म्हणवुनि विव्हळतसे। खदखदां हांसे दुसऱ्यासी ॥ ४ ॥ वाटपाड्यानें घर खाणोनि घेतलें। जितुकें मेळविलें तितुकें नेलें ॥ ५ ॥ आपुलें नेलें म्हणऊनि खळखळां रडे। परि घेतां दरवडे आठवीना ॥ ६ ॥ सोनाराचे घरीं पडिलेसे खाण। चोरिलें सुवर्ण तेंहि नेलें ॥ ७ ॥ आपुलें नेलें म्हणवूनि मोकलितो धांवा। ठकविल्या आयाबाया तें आठवीना ॥ ८ ॥ तराळाचे घरीं आला असे जेव्हां। म्हणतसे देवा काय करूं ॥ ९ ॥ दुसऱ्यासी मागतां परम सुख वाटे। आपण देतां फुटे काळीज तें ॥ १० ॥ जन्मवरी पोशिलें लेंकुराचे परि। हातीं घेऊनि सुरी उभा राहे ॥ ११ ॥ गर्दन सुळीं देतां म्हणे काय केलें। पुढिल्यासि मारिलें आठवीना ॥ १२ ॥ नामा म्हणे विष्णुदास ऐसे जे निर्लज्ज। त्यांसी पंढरिराज केंवि भेटे ॥ १३ ॥

१८८९. अर्चन विष्णूचें नाहीं पूजन। तये गांवीचें अनामिक जन। भूतप्रेतांचें करिती भजन। तयांसि दंडन करी यम ॥ १ ॥ हरीचे वांचोनि सुकृत करी। तया नांव पुण्य ठेविजे जरी। तुटोनि पडो त्यांची वैखरी। अंतीं महा अघोरीं वास तया ॥ २ ॥ समारंभ करिती आणिक देवाचा। म्हणती येणें विष्णु तृप्त होय साचा। धिग् धिग् आचार जळो त्यांचा। वांयांवीण वाचा विटाळली ॥ ३ ॥ पहा हो नवही द्वारें एकचि देहीं। रसस्वाद कान देतील कांहीं। जयाचा मान तयाच्या ठायीं। येतसे पाहीं सेवितां ॥ ४ ॥ जो देवदेवां शिरोमणि। असुर रुळती जयाच्या चरणीं। तो सांडिती चक्रपाणि। भजना हातीं होईल तुझिया ॥ ५ ॥ विष्णुदास नामा विनवी जगा। अझुनि तरी हरीसि शरण रिघा। जे जे अपराध केले असतील मागा। ते ते नेईल भंगा स्वामि माझा ॥ ६ ॥

१८९०. व्यर्थ या व्युत्पत्ति लावितोसी श्रुति। विषयांची तृप्ति काय चाड ॥ १ ॥ मायेचा हा फांसो मोहजाळ सोसा। वांयां कासाविसा होसी झणीं ॥ २ ॥ टाकीं टाकीं असत्य विठ्ठल हेंचि सत्य। होईल सर्व कृत्य एका नामें ॥ ३ ॥ नामा म्हणे दैवत एक तो अच्युत। सांगितलें हित खेचर विसें ॥ ४ ॥

१८९१. या विठोबापरतें आन दैवत म्हणती। ते शब्द नायकवती कानीं माझ्या ॥ १ ॥ पाखांडी म्हणती उगेंचि असावें। हा ब्रह्मकटाह करूं शके न अनारिसा ॥ २ ॥ तोहि जरी म्हणेल अहंब्रह्मास। तरी न पहावी वास येही नयनीं ॥ ३ ॥ कोटी कोटी ब्रह्मांडें एक एक्या रोमीं। व्यापोनियां व्योमीं वर्ततसे ॥ ४ ॥ ऐसा माझा विठो सर्वांघटीं सम। न

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

संडावें वर्म नामा म्हणे॥

१८९२. केशवापरते देव आणिक आहेती। ऐसें श्रुति स्मृति बोलतील॥ १ ॥ तरी ते शब्द झणीं कानीं हो पडती। पाखांडी म्हणती सहावें तें॥ २॥ इंद्रियांसि तुम्ही करा रे जतन। भजावा निधान श्रीवुल॥ ३ ॥ छेदावया शिर हस्त सहस्त्रांचे। जरी बहुतांचे उगारिले॥ ४॥ परि तूंतें नाम आन न देवाचें। केशव परतें कैंचें असे ब्रह्म॥ ५॥ अंगें चतुरानना झालिया हो भेटी। तोहि जरी गोष्टी ऐसी करी॥ ६ ॥ तरी तो चळला पोटीं ऐसें जाण। एकीं दुजेपण दावी तरी॥ ७॥ ब्रह्मकटाह एक उल्लंघों शके ऐसा। वर्तोनि दाही दिशा वर्ते जरी॥ ८॥ केशव नव्हे तो होकां अनारिसा। म्हणोनियां वासा पाहों नका॥ ९॥ व्यसन भक्ति विरक्ति प्रौढी पुरुषार्थ पांचवा। जीवाचिया जीवा सेवा ना कां॥ १०॥ सर्वांभूतीं आहे केशव परमात्मा। न विसंबावें वर्मा नामा म्हणे॥ ११॥

खल-दुर्जनांस उपदेश.

१८९३. दुर्जनाची बुद्धि वोखटी दारुण। आपण मरून दुजया मारी॥ १ ॥ माशी जातां पोटीं मेली तेचि क्षणीं। प्राण्या वोकवूनि कष्टी करी॥ २॥ दीपकाची ज्योति पतंग नासला। अंधार पडिला जनांमध्यें॥ ३ ॥ तैसा नैसर्गिक स्वभाव दुष्टांचा। शेखीं ज्याचा त्यासी फळां येतो॥ ४॥ झाली सज्जनाची संगति कदापि। जाईना तथापि त्याची क्रिया॥ ५ ॥ सहज मळलें धुतां शुद्ध होय। बिबयाचा काय डाग जातो॥ ६ ॥ वज्रहि फुटेल नभहि तुटेल। भला तो होईल ऐसा जाणा॥ ७॥ नामा म्हणे कुंभ पाकींचा तो धर्नी। तयासी भल्यांनीं बोलूं नये॥

१८९४. दुष्ट तो दुर्जन दुरीच धरावा। संग न करावा पापियाचा॥ १ ॥ सर्पाचें पिलें सानें म्हणऊनि पोशिलें। त्यासी पान दिधलें अमृताचें॥ २॥ नव्हे तें निर्विष न संडी स्वभावगुण। घेऊं पाहे प्राण पोसित्याचे॥ ३ ॥ विष्णुदास नामा सांगतसे युक्ति। विवेक हा चित्ती दृढ धरा॥

१८९५. समर्थासी करीं क्रोध हे अहंता। अखंड ममता मानी सदा॥ १ ॥ आपुली आपण व्यर्थ सांगे स्तुति। वडिलांची कीर्ति भोग सांगे॥ २॥ वमन झालीया सांचितसे अन्न। काय तो दुर्जन भाग्यहीन॥ ३ ॥ नामा म्हणे जाण असतां शरीरीं। जातो यमपुरीं भोगावया॥ ४॥

१८९६. कोळशासी दूध मर्दोनियां धूतां। न पावे शुद्धता कांहीं केल्या॥ १ ॥ दुर्जनासी तैसा बोध परमार्थ। नवजायचि स्वार्थ कांहीं केल्या॥ २॥ सूकराचे परी नेणता मिष्टान्न। विष्टा तें भक्षण करिताती॥ ३ ॥ मोहियले प्राणी पाहतां पाहतां। काय सांगूं आतां नवलावो॥ ४॥ नामा म्हणे तया न होयचि मोक्ष। येवोनि पद्माक्ष केवि भेटे॥ ५॥

१८९७. वेडिया उपचार गाढवा गुऱ्हाळ। म्हैसिया बिऱ्हाड पुष्पवनीं॥ १ ॥ पद्मासनीं केंवि कुंजर हा बैसे। कोडिया न दिसे चंदन बरवा॥ २ ॥ तैसा नव्हे देव मूर्ख जनांच्या भक्ति। भल्याचा विरक्ति ज्ञानवांटा॥ ३ ॥ शेळीस ऊंस कळकटीया सुदिवस। सूकराप्रति रस आंबियाचा॥ ४॥ दर्दुरा क्षीरपान त्रिदोषिया मौन। मद्यपिया मन स्थिर नव्हे॥ ५॥ नामा म्हणे हरि सबाह्य भरला। भरोनि उरला दाही दिशा॥ ६॥

१८९८. थिल्लर तें नेणे सागराचा अंत। मुंगीस अग्नींत रीघ नाहीं॥ १ ॥ श्वान काय जाणे मेरूचें प्रमाण। कोसळल्या गगन न कळे त्यास॥ २॥ अंध काय जाणे कैसा उगवे दीन। पाषाणा पर्जन्य नकळे जेंवी॥ ३ ॥ देहवंत जीव काय जाणे देव। नामा म्हणे भाव काय तेथें॥

१८९९. जयाचे उदरीं जन्मला नर। पिडी तया थोर सर्वकाळ॥ १ ॥ मानिली अंतरीं सखी जीवलग। आत्महत्या मग घात करी॥ २ ॥ मानीना तो भक्ति भ्रष्ट आचरण। दोषी नारायण सदोदित॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसे पातकी चांडाळ। बुडविलें कुळ बेचाळिस॥ ४॥

१९००. अभक्ताचे स्थलीं भ्रांताची संगती।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परदारा चित्तीं परनिंदा ॥ १ ॥ नेणें भूतदया शांतीचें लक्षण। कार्याकारण बोलतसे ॥ २ ॥ हरीचिया दासा करिती मत्सर। करी निरंतर द्वेषबुद्धि ॥ ३ ॥ नामा म्हणे व्यर्थ पेटला पर्वत। नेणें अपघात स्वयें पावे ॥ ४ ॥

१९०१. मूर्ख बैसले कीर्तनीं। न कळे अर्थाची करणी ॥ १ ॥ घुबड पाहे भलतिकडे। नाइके नामाचे पवाडे ॥ २ ॥ पाहूं इच्छी परनारी। चित्त पादरक्षावरी ॥ ३ ॥ नामा म्हणे सांगूं किती। मूढ सांगितलें नाइकती ॥ ४ ॥

१९०२. कथे बैसोनि उठोनी जाती। खर होऊनि फिरती ॥ १ ॥ नाम नावडे नावडे। संग वैष्णवांचा न घडे ॥ २ ॥ नामा म्हणे सांगों किती। पूर्वजांसहित नरका जाती ॥ ३ ॥

जनांस उपदेश.

१९०३. देवा धर्मी नाहीं चाड। त्यासि पुढें आली नाड ॥ १ ॥ जैसें डोंगरींचें झाड। त्याचें जन्म झालें वाड ॥ २ ॥ नामा म्हणे भक्ति गोड। स्वानंद नेणती ते मूढ ॥ ३ ॥

१९०४. ज्यालागीं जोडिसी ते न येती तुजसरसीं। यम कासाविसी करी तये वेळां ॥ १ ॥ तूं तरी अज्ञान न देखसी डोळा। झालासि गोठोळा धनगरांसी ॥ २ ॥ चिरीरी घेतो सांपडलिया हातीं। अवघी त्याची पळती टाकोनियां ॥ ३ ॥ संतीं न म्हणावें वचन निष्ठूर। वेगीं ठाका द्वार केशवाचें ॥ ४ ॥ नामा म्हणे शरण रिघा हरिपायीं। तया शेषशायी न विसंबे ॥

१९०५. विषयांचें कोड कां करिसी गोड होईल तुज जोड इंद्रियबाधा ॥ १ ॥ सर्व हें लटिकें जाणूनि तूं निक। रामेंविण एक न सुटिजे ॥ २ ॥ मायाजाळमोहो इंद्रियांचा रोहो। परि न धरिसी भावो भजनपंथे ॥ ३ ॥ नामा म्हणे देवा करी तूं लवलाहो। मयूराचा टाहो घन गर्जे ॥ ४ ॥

१९०६. लव निमिष म्हणतां आहे नाहीं पाहतां। क्षण एक संपादितां विषयो हा ॥ १ ॥ स्वहित तें आचरा हित तें विचारा। नामीं भाव धरा जाणतेनी ॥ २ ॥ संपत्तीचें बळें एक जहाले आंधळे। वेढिलें काळिकालें स्मरण नाहीं ॥ ३ ॥ एक विद्यावंत जातीचा अभिमान। ते नेले तमोगुणें रसातळां ॥ ४ ॥ मिथ्या मायामोह करुनि हव्यास। वेंचिलें आयुष्य वायांविण ॥ ५ ॥ नामा म्हणे कृपा करूनि ऐशा जीवा। सोडवीं केशवा मायबापा ॥ ६ ॥

१९०७. देह पडे तंव देहाचा अभिमान। परि न करी अज्ञान आत्महित ॥ १ ॥ मी माझें म्हणतां गेले नेणों किती। रंक चक्रवर्ति असंख्यात ॥ २ ॥ क्षणक्षणा देह आयुष्य पैं काटे। वासना ते वाढे नित्य नवी ॥ ३ ॥ मोहाचीं सोयारीं मिळालीं चोरटीं। खाऊनि शेवटीं घर घेती ॥ ४ ॥ जंववरी संपत्ति तंववरी हे सखे। गेलीया तें भुंके सुणें जैसें ॥ ५ ॥ नामा म्हणे केशवा मी तों तुझा दास। मज आहे विश्वास तुझे नामीं ॥ ६ ॥

१९०८. भुलले हे लोक काळाचें कौतुक। सुरशक्रादिक पाहताती ॥ १ ॥ देवा तुझी माया अगम्य अगाध। प्रपंचाचा वेध सुटों नदी ॥ २ ॥ माझें घरदार माझा संसार। मी मोठा चतुर म्हणोनियां ॥ ३ ॥ आपण देखतां जाती तें पाहती। मीपणाची भ्रांति सुटों नेणे ॥ ४ ॥ नामा म्हणे आतां काय म्यां बोलावें। भोवत असावें चौऱ्यांशीला ॥ ५ ॥

१९०९. विषय सेवितां तुज। नव्हे पुढील काज। कदा न भेटे तुज। गरुडध्वज निश्चयेंसी ॥ १ ॥ काय करिसी खटपट। वांयां मार्ग दुर्घट। वरपडा होसील कष्ट। परि संसार न सुटेचि ॥ २ ॥ सुटकेचें मूळ जाण। रामकृष्ण नारायण। येणें तुटेल भवबंधन। जन्मा न येसी सर्वथा ॥ ३ ॥ साधन इतुकेंचि पुरे। न लागती मंत्रांचे भार। ते बुडविती साचार। परि तरो न देती ॥ ४ ॥ नामा म्हणे ते पामर। नेणतीच हा मार्ग सार। परि वाचे नाहीं उच्चार। तो जाणावा महादोषी ॥ ५ ॥

१९१०. मायेचा हा फांसा अहंकार वेळसा। परी हृषीकेशा भजतीना ॥ १ ॥ नव्हे हें सुटिका हा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बोल लटिका। केशवासी एका न भजाकारें॥ २॥ होतील त्या मुक्ती पुरतील त्या आर्ती। चरण हे चिंतीं विठ्ठलाचे॥ ३॥ नामा म्हणे केशव सर्वांभूतीं देव। ऐसा धरीं भाव भजनशील॥ ४॥

१९११. कां रे तूं शिणतोसि घरदार बंधनें। वांयांचि व्यसनें आणितेसी॥ १॥ भजें यादवराया लागें त्याच्या पायां। आणिक उपाया करूं नको॥ २॥ सर्वभावें हरिभजन तूं करीं। भक्ति हे पुढारी तारील सत्य॥ ३॥ नामा म्हणे दया मांडीं सोडीं माया। भजन लवलाह्या हरीचें करीं॥

१९१२. संग खोटा परनारीचा। नाश हाईल या देहाचा॥ १॥ रावण प्राणासी मुकला। भस्मासुर भस्म झाला॥ २॥ गुरुपत्नीशीं रतला। क्षयरोग त्या चंद्राला॥ ३॥ इंद्राअंगीं सहस्त्र भगें। नामा म्हणे विषयासंगें॥ ४॥

१९१३. लावण्य सुंदर रूपानें बरवी। पापीण जाणावी ते कामिनी॥ १॥ देखतां होतसे संगाची वासना। भक्ताच्या भजना नाश होये॥ २॥ ऐसी जे घातकी जन्म कासयासी। चांडाळीण तिसी नरक प्राप्त॥ ३॥ नामा म्हणे तिचें पाहूं नये तोंड। पापीण ते रांड बुडवी नरा॥ ४॥

१९१४. कायारूप जिचें हिनवट अती। माउली धन्य ती आहे नारी॥ १॥ तियेवरी मन कदापी नव जाये। भजना न होये कदा चळ॥ २॥ ऐसिये माउली परउपकारी। घात हा न करी भजनाचा॥ ३॥ नामा म्हणे तिचे चरण वंदावे। वदन पहावें माउलीचें॥ ४॥

१९१५. घरीं नांदतो बरवेपरी। म्हणूनि केलीसे अंतुरी। नित्य भांडण तया घरीं। आणिक कांहीं न देखों॥ १॥ दुसरी न करावी बाईल। भंड फजिती होईल। बोभाट वेसदारा जाईल। बायकाच्या पाणवथ्या॥ २॥ धाकटीकडे पाहतां कोडें। वडील धडधडां रडे। मेल्या तुझें गेलें मढें। तिकडे कां रे पाहतोसी॥ ३॥ वडील बाईल म्हणे उण्या। धाकटी बाईल केली सुण्या। लाज नाहीं तुझ्या जिण्या। काळतोंड्या बैसलासी॥ ४॥ वडील बाईल धरी दाढी। धाकटी ओढून धरी शेंडी। सांपडालासी यमझाडी। लाशीपरी पडलाशी॥ ५॥ सवतीसवतीचा करकरा। उभा शिणलों दातारा। भेटी करी वनींच्या व्याघ्रा। परी संसारा उबगलों॥ ६॥ सवतीसवतीची कैशी धरणी। कौतुक पहाती शेजारिणी। तया पुरुषाची विटंबनी। थोर जाचणी तयासी॥ ७॥ नामा म्हणे गा श्रीहरी। दोघी बायका ज्याचे घरीं। त्याचे नसावें शेजारीं। थोर दुःख तयाशी॥ ८॥

१९१६. पहा परदारा जननिये समान। परद्रव्य पाषाण म्हणोनि मानीं॥ १॥ निंदेसी तूं मुका होऊनि तत्त्वतां। परद्वेषीं निरुता न घालीं दृष्टि॥ २॥ ऐसें दृढ मनीं धरूनि राहसी। तरी माझें पावसी निजपद॥ ३॥ पराकारणें प्राण वेंचि जो सर्वथा। जाणें परव्यथा कळवळोनी॥ ४॥ परसुख संतोष धरी जो मानसीं। जरी परलोकासी जाणें आहे॥ ५॥ देहाचा अभिमान न धरावा चित्तीं। धरावी उपरति उपशमु॥ ६॥ सर्वकाळ प्रीति संतांचि संगति। गावीं अनुरागें प्रीति नामें माझीं॥ ७॥ सर्वांभूतीं देव ऐशी समबुद्धि। सांडावी उपाधि प्रपंचाची॥ ८॥ सर्वकाळ परमात्मा आहे सर्व देशीं। हे भावना अहर्निशीं दृढ धरीं॥ ९॥ संतसमुदाय मिळती जेथें जेथें। जावें तेथें तेथें लोटांगणीं॥ १०॥ चिंता न करीं नाम्या येणें तरसी जाण। तुज सांगितली खूण निर्वाणीची॥

१९१७. वासनेचा त्याग करा रे सर्वथा। त्या भावें अनंता शरण जावें॥ १॥ कृपेचा सागर नुपेक्षी निर्वाणीं। कलिकाळाहूनि सोडविलें॥ २॥ भक्तांचा पाळक अनाथांचा कैवारी। ब्रिदें चराचरीं वर्णिताती॥ ३॥ शरीरसंपत्तीचा सोडा अभिमान। मन करा लीन कृष्णरूपीं॥ ४॥ आसनीं शयनीं चिंतिता गोविंद। तेणें तुटे कंदु भवव्याधी॥ ५॥ परदारा परदासांचें पीडन। सांडूनि भजन करा त्याचें॥ ६॥ करा सर्वभावें संतांची संगति। नाहीं अर्थाअर्थी जन्मा येणें॥ ७॥ शुकसनकादिक प्रल्हाद

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जनक। परीक्षिती मुख्य बिभीषण॥ ८॥ भीम रुक्मांगद नारद उद्धव। शिबि कवि देव इत्यादिक॥ ९॥ शास्त्रांचें हें सार वेदांचें गव्हार। नाम परिकर कलियुगीं॥ १०॥ नामा म्हणे नको साधन आणिक। दिधली मज भाक पुंडलिकें॥ ११॥

१९१८. परदारा परधन परनिंदा परपीडण। सांडोनियां भजन हरींचें करा॥ १॥ सर्वांभूतीं कृपा संतांची संगति। मग नाहीं पुनरावृत्ति जन्ममरण॥ २॥ शास्त्रांचें हें सार वेदांचें गव्हार। तें नाम परिकर विठोबाचें॥ ३॥ नामा म्हणे नलगे साधन आणिक। दिधली मज भाक पांडुरंगें॥ ४॥

१९१९. चांदणें नावडे चोरा। सद्बुद्धि नावडे रांडेच्या पोरा। वृक्ष नावडे कुंजरा। सत्य कुचरा नावडे॥ १॥ चंदन जाणावा सुगंधाची धृति। कर्पूर जाणावा उत्तम याति। हंस जाणावा चालतिये गति। कोकिळ श्रुति ओळखावी॥ २॥ लांव जाणावी उफराटिये दृष्टी। क्रोधी जाणावा भोंवयांसी गांठी। लटिक्या जाणा बहुता गोष्टी। नष्ट कुचेष्टी ओळखावा॥ ३॥ नारी जाणावी भ्रतारभक्ति। आचारें जाणावी महा सति। धनुर्धर जाणावा संधानयुक्ति। संत तापसी ओळखावा॥ ४॥ जयीं घातलिया निघे खरा। ज्ञान जाणे तोचि चतुरा। शिंदळी जाणावी नीच उत्तरा। कुसळी घरोघरा फिरतसे॥ ५॥ इतुकिया बोलाची न मानावी खंति। विठ्ठलचरणीं ठेवूनियां मति। प्रसन्न होईल लक्ष्मीपति। म्हणे विष्णुदास नामा॥ ६॥

१९२०. धीर धरीं सत्य हें तो नारायणा। शुद्ध आचरणा न सांडावें॥ १॥ लौकिकाची कांहीं न धरावी लाज। हेंचि निजकाज साधावें तें॥ २॥ दंभ अभिमान सर्व त्यजोनियां। शरण त्या सखीया जावें आतां॥ ३॥ निंदा करिती तो मानावा आदर। स्तुति हें उत्तर नायकावें॥ ४॥ न धरावी चाड मानसन्मानाची। आवडी भक्तीची रूढवावी॥ ५॥ नामा म्हणे हेंचि रूढवावें मानसीं। क्षण एक नामासी विसंबूं नये॥ ६॥

१९२१. अंतींचा लाभु आधींच साधिजे। देह असतां कीजे हरिभक्ती॥ १॥ आदि मध्य अंतु तोचि हा व्यापकु। विश्वप्रतिपाळकु नारायण॥ २॥ विषय महापुरीं पतीत जीव भारी। तैशा परीहि हरिनाम घ्यावें॥ ३॥ नामा म्हणे हा दुर्लभ नरजन्मु। केशव मेघश्यामु अनुसरा वेगीं॥

१९२२. जंव हंसे काया नव जाय सांडोनी तंव घेईं ठाकोनि रामनाम॥ १॥ अंतकाळवेळीं तुझें नव्हें कोण्ही। मी माझें म्हणवूनि भुललासी॥ २॥ राहें निरंतर राघवाचे द्वारीं। तेणें भवसागरीं तरसी बापा॥ ३॥ नवमास मायें वाहिलासी उदरीं। आस केली थोरी होशी म्हणोनी॥ ४॥ स्तनपान देऊनि मोहें प्रतिपाळी। तेहि अंतकाळीं दूर ठाके॥ ५॥ सर्वस्व स्वामिणी म्हणवितसे कांता। तेहि केश देतां रडतसे॥ ६॥ म्हणे म्यां मेल्याचें सुख नाहीं देखिलें। तेणें तंव पाळिलें अर्धे प्राणें॥ ७॥ गाई घोडे म्हैसी आणिक त्या दासी। धन त्वां सायासी मेळविलें॥ ८॥ तुझिया धनाला नाहीं पार लेखा। एकलाचि मूर्खा जासी अंती॥ ९॥ हातींच्या मुद्रिका कानींचे ते नग। करोनि लगबग काढिती वेगीं॥ १०॥ अंगींचीं लुगडीं फेडोनियां घेतीं। तुज बांधोनियां नेती यमदूत॥ ११॥ भूमिभार झाला म्हणती वेग करा। नातळती शरीरा इष्टमित्र॥ १२॥ स्मशाना नेऊनि भडाग्नी देऊनि। येती परतोनि सकळ जन॥ १३॥ एकलेंचि येणें एकलेंचि जाणें। पहा दृढ ज्ञानें विचारोनी॥ १४॥ पापपुण्य दोन्ही अंतींची सांगाती। येरें तीं राहतीं जेथिंचीं तेथे॥ १५॥ ऐसा हा संसार माया वेष्टियला। म्हणोनि दुव्हाविला योगीजनीं॥ १६॥ विष्णुदास नामा विनवितसे तुम्हां। झणीं परब्रह्मा विसंरूं नका॥ १७॥

१९२३. अवचट देह लाधला प्राणिया। भक्तिवीण वांयां गेला जाण॥ १॥ धिक् त्याचें जिणें जन्मला कासया। जरी पंढरीराया विसरला॥ २॥ रामनामीं रत नव्हेचि बापुडें। जननिये सांकडें घातलें तेणें॥ ३॥ ऐसा जन्म नको नको गा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

श्रीरामा। म्हणे तुझा नामा विष्णुदास॥ ४॥

१९२४. जड हेंचि खळे आयुष्याची रासी। काळ माप रसी मवीतसे॥ १॥ माप तें लागलें माप तें लागलें। माप तें लागलें झडा झडा॥ २॥ मनोमय साक्ष माणिकाप्रमाणें। तूंचि नारायण काळ खंडी॥ ३॥ नामा म्हणे जावे शरण केशवा। सळेचा जो ठेवा न पवसी॥ ४॥

१९२५. अतिथी आलिया द्यावें अन्नदान। अर्पि जीव प्राण परमार्थी॥ १॥ तोचि एक नर श्रीहरिसमान। करी दूजा कोण नाहीं ऐसा॥ २॥ दीनासी समान करितां आदरा। त्याच्या उपकारा पार नाहीं॥ ३॥ नामा म्हणे असे खूण हे भाविकां। सर्वांभूतीं देवा पाहे ऐक्य॥ ४॥

१९२६. भूमिदानें होसी भूमिपाळु। कनकदानें कांति निर्मळु। चंदनदानें सदा शीतळु। जन्मोजन्मीं प्राणिया॥ १॥ अन्नदानें दूढायुषी उदकदानें सदासुखी। मंदिरदानें भुवनपालखीं। सुपरिमळू उपचार॥ २॥ वस्त्रादानें सुंदरपण। ताबूलदानें मनुष्यपण। गोपीचंदनें ब्राह्मणपण। अतिलावण्य सुंदरता॥ ३॥ जे वृक्ष लाविती सर्वकाळ। तयावरी छत्रांचें झल्लाळ। जे ईश्वरीं अर्पिती फळ। नानाविधि निर्मळ॥ ४॥ ऐशा दानाचिया पंक्ति। वेगळाल्या सांगों किती। एका ध्यारे लक्ष्मीपति। विष्णुदास नामा म्हणे॥ ५॥

१९२७. एकी एकादशी करितां काय वेचें। उपवासी राहतां काय वेचें॥ १॥ एक तुळसीदळ वाहतां काय वेचें। पाउलीं वंदितां काय वेंचे॥ २॥ तुज जागरणा जातां काय वेचें। हरि हरि म्हणतां काय वेंचे॥ ३॥ संतसमागमा जातां काय वेचें। चरणरज वंदितां काय वेंचे॥ ४॥ एक दंडवत करतां काय वेंचे। अपराधी म्हणवितां काय वेंचे॥ ५॥ एक प्रदक्षिणा करितां काय वेंचे। तीर्थयात्रेसी जातां काय वेंचे॥ ६॥ ऐसी निमाली भक्ति कां न करिसी निर्दैवा। नामा म्हणे केशवा अनुसर पां॥ ७॥

१९२८. एकादशी दिनीं खाईल जो अन्न। सूकर होऊनि येईल जन्मा॥ १॥ एकादशी दिनीं करील जो भोग। त्यासी मातासंग घडतसे॥ २॥ एकादशी दिनीं खेळेल सोंगटी। काळ हाणील खुंटी गुदस्थानीं॥ ३॥ रजस्त्री शोणीत सेविल्यासमान। तांबुल चर्वण करील जो॥ ४॥ नामा म्हणे नाहीं माझ्याकडे दोष। पुराणीं हें व्यासवाक्य आहें॥ ५॥

१९२९. निंदील हें जन सुखें निंदूं द्यावें। सज्जनीं क्षोभावें नये बापा॥ १॥ निंदा स्तुति ज्याला समान पैं झाली। त्याची स्थिति आली समाधीला॥ २॥ शत्रुमित्र ज्याला समसमानत्वें। तोचि पैं देवातें आवडता॥ ३॥ माती आणि सोनें ज्या भासे समान। तो एक निधान योगीराज॥ ४॥ नामा म्हणे ऐसे भक्त जे असती। तेणें पावन होती लोक तिन्हीं॥ ५॥

१९३०. भवसागर तोडितां कां रे करितसां चिंता। पैल उभा दाता पांडुरंग॥ १॥ निजाचें जें पीठ सोडूनि वैकुंठ। येथें वाळवंट आवडलें॥ २॥ देव गुज सांगे पंढरीसि यारे। प्रेमसुख घ्यारे नाम माझें॥ ३॥ तारीन भवसिंधु घ्यारे माझी भाक। साक्ष पुंडलीक करूनि सांगे॥ ४॥ काया वाचा मनें दृढ़ धरा जीवीं। मी त्याचा चालवीं भार सर्व॥ ५॥ हें जरी लटिकें नामया पुसा। आहे त्या भरंवसा नामीं माझे॥ ६॥

१९३१. एक तत्त्व त्रिभुवनीं। दुसरें न धरीं तूं मनीं॥ १॥ म्हणें कां नरहरी नारायण। मग तुज गांजिल कोण॥ २॥ दीन मनीं जरी तूं धरिसी। तरी वांयां दंडिला जासी॥ ३॥ त्रिविध भक्ति चराचरीं। तयामाजिल एक तूं करीं॥ ४॥ चहूं चेदीं जें बोलिलें। तें तूं करीं बा उगलें॥ ५॥ पंचइंद्रियांचा संग। त्यांचा नको करूं पांग॥ ६॥ साहि चक्री मन पवन। तेथें नव्हे आत्मनिधान॥ ७॥ सप्तस्वरीं करीं कीर्तन। आणिक न लगेरे साधन॥ ८॥ अष्टहि गुणी सात्त्विक पुजा। भावें भजा गरुडध्वजा॥ ९॥ नवहि द्वारें दंडिती। पुनरपि कोठें कैंचि भक्ति॥ १०॥ दहा दिशा अवलोकितां। दिवस गेले मोजितां॥ ११॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अकरा रुद्र जाले जरी। तरी एकचि श्रीहरी॥ १२॥ बारा मास आणि पक्ष। व्यर्थ जाती दे तूं लक्ष॥ १३॥ तेरा गुणांचे तांबूल। समर्पावें पुगीफळ॥ १४॥ चौदा भुवनें ज्याचे पोटीं। त्याचें नाम विचरा कंठीं॥ १५॥ पंधरा दिसवां एकादशी। करा जागर उपवासी॥ १६॥ षोडश उपचारें पूजा। भावें भजा गरुडध्वजा॥ १७॥ सत्रावी जीवनकळा। तिचा घे कां रे सोहळा॥ १८॥ अठरा पुराणें वर्णिती। निरंतर कृष्ण कीर्ति॥ १९॥ म्हणे विष्णुदास नामा। शरण जावें पुरुषोत्तमा॥ १९॥

१९३२. हरिनामीं उदास तो पतित निष्ठुर। तया यमकिंकर गांजितील॥ १॥ तोचि हरिचा दासु नामीं ज्या विश्वासु। तया गर्भवासु नाहीं नाहीं॥ २॥ मार्ग सांडोनिया आडमार्गें जाती। ते व्याघ्रा वरपडे होती क्षणामाजीं॥ ३॥ नामा म्हणे जिहीं नामीं आळस केला। तो येवोनि गेला व्यर्थ एक॥ ४॥

१९३३. रामनाम म्हणतां संसाराचें भय। म्हणती त्याच्या होय जिव्हे कुष्ट॥ १॥ अमृत सेवितां कैंचे ये मरण। जाणती हे खूण अनुभवी॥ २॥ ज्याची एकवृत्ति रामनामीं प्रीति। असतां कैसे होती गर्भवास॥ ३॥ नामा म्हणे नामीं दृढ भाव धरा। आत्महित करा जाणते हो॥ ४॥

१९३४. दिशा फेरफेरे कष्टशील सैरा। किती येरझारा कल्पकोटी॥ १॥ विठ्ठलाचे नामीं दृढ धरी भाव। येर सांडीं वाव मृगजळ॥ २॥ भक्ति मुक्ति सिद्धि जोडोनियां कर। करिती निरंतर वोळगण॥ ३॥ नामा म्हणे जना मानी पै विश्वास। मग तुज गर्भवास नव्हे नव्हे॥ ४॥

१९३५. सांडीं सांडी पसारा विषयाचा चारा। विठ्ठल मोहरा वोळगे वेगीं॥ १॥ होईल तुझे हित होसिल पूर्ण भरित। सर्वांभूतीं हित हेचि दया॥ २॥ वोळगें विठ्ठलरूपा मार्ग हाचि सोपा। विषयाच्या खेपा तुटतील॥ ३॥ नामा म्हणे केवळ आम्हां नित्य काळ। दिननिशीं पळ विठ्ठल देव॥ ४॥

१९३६. व्यर्थ कां हव्यासी करिसी परोपरी। नाम निरंतरीं न म्हणा कां रे॥ १॥ आयुष्य जाईल क्षणांत सरोन। पावसी पतन कुंभिपाकीं॥ २॥ नाम संकीर्तन नाइके स्वभावें। प्रत्यक्ष तें शव जगामाजीं॥ ३॥ नामा म्हणे ऐसें गेले बहुतेक। सांगे सकळिका हेंचि आतां॥ ४॥

१९३७. मूषक हव्यासें चालूनि भूमीतें। मांजर तयाते टपतसे॥ १॥ तैसा तुज काळ टपे वेळीवेळां। वेगीं त्या गोपाळा भजावें बापा॥ २॥ भानुचेनि मापें आयुष्य वोसरे। अवचितां कारे डोला झांकी॥ ३॥ नामा म्हणे अरे निश्चिती हे मूढा। हरीनाम दृढा सेवीसेना॥ ४॥

१९३८. पवित्र परिकर। उभविलें मंदिर। दीपेंविण मनोहर। शोभा न पवे॥ १॥ श्यामअंगीं तरुणी। सुंदर होय रमणी। पुरुषाविण कामिनी। शोभा न पवे॥ २॥ द्रव्याविण नर। जरी जाहला सुंदर। तो त्यावीण चतुर। शोभा न पवे॥ ३॥ योगिया आणि कठीण। इंद्रिया नाहीं दमन। षट्कर्मेविण ब्रह्मज्ञान। शोभा न पवे॥ ४॥ नामा म्हणे सुंदरा। रखुमादेवीवरा। तुजविण दातारा। शोभा न पवे॥ ५॥

१९३९. निरंतर तुम्ही करावा विचार। भवाब्धीचा पार होय कैसा॥ १॥ जन्म गेलें वायां विषयाचे संगें। भुलले वाउगे मायामोहें॥ २॥ अवघा करितां संसाराचा धंदा। वाचे वदा सदा हरिनाम॥ ३॥ सर्वभावें एका विठोबातें भजा। आर्तें करा पूजा हरिभक्त॥ ४॥ सर्व सुख होईं तुम्हांला आपैतें। न याल मागुते गर्भवासा॥ ५॥ नामा म्हणे तुम्ही विचारूनि पहा। सर्वकाळ रहा संतसंगें॥ ६॥

१९४०. न फिटे हें ओझें मायेचा गुंडाळा। एका तूं गोपाळा शरण जाईं॥ १॥ तुटेल बिरडें सुटेल हा मोह। केशवींच भाव असों देणें॥ २॥ कईंचे हे क्लेश उदासीन वांयां। भजणें यादवराया हेंचि सत्य॥ ३॥ नामा म्हणे सुफळ भजनचि करीं।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सर्वांभूतीं हरि भजनभावो ॥ ४ ॥

१९४१. कल्मश हरती जयाचेनि नामें। तें विसरोनि काय करावें ॥ १ ॥ संसारतारक विसांवा हरी। गर्भवास चुकवी तो मुरारी ॥ २ ॥ बाह्या उभारोनि घेतां रामनाम। वैकुंठींचा देव केशव परमात्मा ॥ ३ ॥

१९४२. उदारास भरण खळ बुद्धीसि कारण। त्याचें परिहरण रामनाम ॥ १ ॥ कामसंदीपन दोषआचरण। त्याचें परिहरण रामनाम ॥ २ ॥ दुर्वासना गहन दुर्बुद्धि आचरण। त्याचें परिहरण रामनाम ॥ ३ ॥ नामा म्हणे कारण संसारतारण। जरी मनीं निधान रामनाम ॥ ४ ॥

१९४३. देवो देवो बोले तूं जीवन भातें। मेहुडें दुभतें जना यया ॥ १ ॥ तैसें मना करा भजनभाव धरा। विषय पसारा टाका वेगीं ॥ २ ॥ उपावो न लगे दया ते धरावी। आपुली म्हणावी माय जगीं ॥ ३ ॥ नामा म्हणे बाप विठ्ठल तो आमुचा। कुळदेव साचा पुरातन ॥ ४ ॥

१९४४. स्वप्नींचिया परी देखिसी अभ्यास। न धरींच विश्वास चित्त तुझें ॥ १ ॥ वांझेचिया स्तनीं अमृताची धणी। मृगजळ पाणी तान्हा बोले ॥ २ ॥ तरी प्रेमाविण फळती क्रियाकर्म। हातां येतीं वर्में विठोबाचीं ॥ ३ ॥ दृष्टींतें देखणें श्रवणीं तें ऐकणें। मनाचें बैसणें एक होय ॥ ४ ॥ नामा म्हणे तरीच विठो येऊन भेंटे। कावळ पालटे कैवल्य होय ॥ ५ ॥

१९४५. गोळियाचे घरीं कैवल्याचे दानीं। परब्रह्म अंगणीं क्रीडतसे ॥ १ ॥ ऐसें कांहीं करा आलेनो संसारा। जेणें जोडे सोईरा पांडुरंग ॥ २ ॥ करितां त्याचें काज मनीं न धरीं लाज। म्हणे हे शरण मज सर्वभावें ॥ ३ ॥ राखे बळिचें द्वार पाहे त्याची वास। म्हणे हा माझा दास अंतरंगु ॥ ४ ॥ गौळियां उच्छिष्ट मनीं न धरी वीट। आवडी निकट गोपाळांची ॥ ५ ॥ तरी क्रिया कर्म केलें होय सफळ। जरी हृदयीं गोपाळ येऊनि राहे ॥ ६ ॥ येर ते मायावी जग भुलवणी। नित्य विभांडणी सर्वभावें ॥ ७ ॥ नामा म्हणे ऐसे संतांचिये सोई। विठोबाचे पायीं मन ठेवीं ॥ ८ ॥

१९४६. विठ्ठलाचे पाय मनीं धरोनि राहे। मग संसार तो काय करील तुझें ॥ १ ॥ संसाराचें भय नाहीं हरिच्या दासा। विठो आम्हां सरिसा निरंतर ॥ २ ॥ निरंतर वसे हरिभक्तांपाशीं। विसंबेना त्यासी कदाकाळीं ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसा विठ्ठल सांडोनि। व्यर्थ काय जनीं शिणताती ॥ ४ ॥

सांसारिकांस उपदेश.

१९४७. जन्मा येऊनियां काय पुण्य केलें। बाळपण गेलें वायांविण ॥ १ ॥ संतसंगें सुख हुंडारलें जाणा। नामसंकीर्तना ओळखत ॥ २ ॥ तरुणपणेंहि नाठवेचि देवा। वृद्धपणीं सेवा अंतरली ॥ ३ ॥ यापरी जन्मुनि गेलासिरे वांयां। पंढरीच्या राया नोळखतां ॥ ४ ॥ आलों मी संसारीं गुंतलों व्यापारीं। आझुनि कां श्रीहरि नोळखसी ॥ ५ ॥ सहस्त्र अपराध जरी म्यां केले। तारिलें विठ्ठलें म्हणे नामा ॥ ६ ॥

१९४८. बाळपणीं वर्षे बारा। तीं तुझीं गेलींरे अवधारा। तैं तूं धांवसी सैरा। खेळाचेनि विनोदें ॥ १ ॥ म्हणवोनि आहेस नागर तरुणा। तंव वोळगे रामराणा। आलिया म्हातारपणा। मग तुज कैंचि आठवण ॥ २ ॥ तुज भरलीं अठरा। मग तूं होसी निमासुरा। पहिले पंचविसीच्या भरा। झणे गव्हारा भूललासी ॥ ३ ॥ आणिक भरलिया सात पांचा। मग होसी महिमेचा। गर्वें खिळेल तुझी वाचा। देवा ब्राह्मणांतें न भजसी ॥ ४ ॥ त्वचा मास शिरा जाळी। बांधोनि हाडांची मोळी। लेखितोसि सदाकाळीं। देहचि रत्न आहे माझें ॥ ५ ॥ बहु भ्रम या शिराचा रे। म्हणे मी मी तारुण्याच्या भरें। ऐसा संशय मनाचा रे तूं संडीं रे अज्ञाना ॥ ६ ॥ माथवीय पडे मासोळी। ते म्हणे मी आहें प्रबळ जळीं। तैसी विषयाच्या पाल्हाळीं। भुललासि रे गव्हारा ॥ ७ ॥ तुज भरीलया सांठीं। मग तुझ्या हातीं येईल काठी। मग ती अडोरे लागती। म्हणती बागुल आलारे ॥ ८ ॥ म्हणती थोर रे म्हातारा। कानीं झालासि बहिरा। कैसें न

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ऐकसी परिकरा। नाम हरिहराचें॥ ९ ॥ दांतांची पाथी उठी। मग चाववेना भाकर रोटी। नाक लागलें हनुवटीं। नाम होटीं न उच्चारवे॥ १०॥ बैसोनि उंबरवाटिका तळवटीं। आया बाया सांगती गोष्टी। म्हणती म्हातारा बैल दृष्टी। कैसा अक्षयीं झाला गे॥ ११॥ खोकलिया येतसा खंकारा। म्हणती रांडेचा म्हातारा। अझूनि न जाय मरणद्वारां। किती दिवस चालेल॥ १२॥ ऐसा जाणोनि अवसर। वोळगा वेगें सारंगधर। विष्णुदास नामया दातार। वर विठ्ठल पंढरीये॥ १३॥

१९४९. संसारसागर भरला दुस्तर। विवेकी पोहणार विरळा संत॥ १॥ कामाचिया लाटा अंगीं आदळती। नेणों गेले किती वाहूनियां॥ २॥ भ्रम हा भोंवरा फिरवी गरगरा। एक पडिले घरा चौऱ्यांशींच्या॥ ३॥ नावाड्या विठ्ठल भवसिंधु तारूं। भक्तां पैलपारू उतरीतो॥ ४॥ नामा म्हणे नाम स्मरा श्रीरामाचें। भय कळिकाळाचें नाहीं तुम्हां॥ ५॥

१९५०. संसार करितां देव जैं सांपडे। तरि कां झाले वेडे सनकादिक॥ १॥ संसारीं असतां जरी भेटता। शुकदेव कासया जातां तपालागीं॥ २॥ घराश्रमीं जरी जोडे परब्रह्म। तरि कां घराश्रम त्याग केला॥ ३॥ ज्ञातीच्या आचारें सांपडे जरी सार। तरि कां निरहंकार झाले साधू॥ ४॥ नामा म्हणे आतां सकळ सांडोन। आलोंसे शरण विठोबासी॥ ५॥

१९५१. परब्रह्मींची गोडी नेणतीं तीं बापुडीं। संसारसांकडीं विषयभरित॥ १॥ तूंतें चुकलीरे जगजीवन रक्षा। अनुभवाविण लक्षा नयेचिरे कोणा॥ २॥ जवळी असतांचि क्षीर नव्हेसि वरपडा। रुधिर सेवितां गोचिडा जन्म गेला॥ ३॥ दर्दुरा कमळिणी एके ठायीं बिढार। वास वो मधुकर घेवोनि गेला॥ ४॥ मधुमक्षिया मोहोळ रचितां रात्रंदिवस। भाग्यवंत रस घेऊनि गेला॥ ५॥ शेळीस घातली उसांची वैरणी। घेऊं नेणें धणी त्या रसाची॥ ६॥ नामा म्हणे ऐसीं चुकलीं बापुडीं। अमृत सेवितां पुडी चवी नेणें॥ ७॥

१९५२. मिथ्या मायाजाळ बाधा। लागलासे धंदा संसारीया॥ १॥ आलेंरे आलेंरे हाकित टाकित। मूढा गिवसीत काळचक्रीं॥ २॥ बंधनापासूनि बांधलासे पायीं। बुडतों मी डोहीं निर्जळा ये॥ ३॥ कोण भरंवसा धरिलासे जिवीं बळींया सोडवी कदा काळीं॥ ४॥ पुत्र पत्नी बंधु म्हणसील झणी। धांवोनि निर्वाणीं पाव आतां॥ ५॥ नामा म्हणे वेगीं सावधान व्हावें। शरणही जावें पांडुरंगा॥ ६॥

१९५३. आलेनो संसार सोडवणें करा। शरण जा उदारा पांडुरंगा॥ १॥ प्रपंच न सरे कदा कल्पकोडी। वासनोचि बेडी पडे पायीं॥ २॥ व्यर्थ मायादेवी गर्भवास गोवी। नश्वर भोगावी नाना योनी॥ ३॥ नामा म्हणे पहा विचारूनि मनीं। स्मरावा निर्वाणीं पांडुरंग॥

१९५४. आलेनी संसारा उठा वेगें चला। जिवलग विठ्ठला भेटीलागीं॥ १॥ दुर्लभ मनुष्य जन्म न लभेरे मागुता। लाहो घ्या सर्वथा पंढरीचा॥ २॥ भावें लोटांगण घाला महाद्वारीं। होईल बोहरी त्रिविध तापा॥ ३॥ श्रीमुखाची वास पहा धणीवरी। आठवीं अंतरीं घडिये घडिये॥ ४॥ शुद्ध सुमनें कंठीं घाला तुळसीमाळा। तनमन ओवाळा चरणांवरूनि॥ ५॥ नामा म्हणे विठो अनाया कोवसा। पुढती गर्भवासा येऊं नेदी॥ ६॥

१९५५. अवघे निरंतर करा हा विचार। भवसिंधुपार तरीजे ऐसा॥ १॥ अवघे जन्म वांयां गेलें विषयसंगें। भुललेति वाउगें माया मोहा॥ २॥ अवघा वेळ करितां संसाराचा धंदा। वाचें वसों सदा हरीचें नाम॥ ३॥ अवघ्या भावीं एका विठ्ठलातें भजा। आर्तें करा पूजा हरिदासाची॥ ४॥ अवघें सुख तुम्हां होईल आपैतें। न याल मागुते गर्भवास॥ ५॥ नामा म्हणे अवघे अनुभवूनि पाहा। सर्वकाळीं राहा संतसंगें॥ ६॥

१९५६. अवघे सावधान होऊनि विचारा। सोडवण करा संसाराची॥ १॥ अवघा काळ वाचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणा नारायण। वांयां एक क्षण जाऊं न द्या॥ २॥ अवघें हें आयुष्य सरोनि जाईल। मग कोण होईल साह्य तुम्हां॥ ३॥ अवघा हा प्रपंच जाणोनि लटिका। शरण रिघा एका पंढरिराया॥ ४॥ अवघे मायामोहें गुंतलेति पहा। अवघे सहज आहां जीवन्मुक्त॥ ५॥ नामा म्हणे अवघे सुखाचेचि व्याल। जरी मन ठेवाल विठ्ठलपायीं॥ ६॥

१९५७. जळां बुडबुडे देखतां। क्षण न लागतां दिसेनाती॥ १॥ तैसा हा संसार पाहतां पाहतां। अंतकाळीं हातां काय नाहीं॥ २॥ गारुड्याचा खेळ दिसे क्षणभर। तैसा हा संसार दिसे खरा॥ ३॥ नामा म्हणे तेथें कांहीं नसें बरें। क्षणाचें हें सर्व खरें आहे॥ ४॥

१९५८. संसाराचें दुःख सुख म्हणों नये। पुढें दुःख पाहे अनिवार॥ १॥ तया दुःखा नाहीं अंतपार जाणा। काळाची यातना बहुतांपरी॥ २॥ संसाराची चिंता वाहतां जन्म गेला। सोस हा वाढला बहुतांपरी॥ ३॥ हितही बुडालें परत्र दुणावलें। नरदेह बुडविलें भजनाविण॥ ४॥ भजनाचा प्रताप दुःख दुरी जाय। जैसे अभ्र होय देशधडी॥ ५॥ वायूच्या झुंझाटें वृक्ष उन्मळती। परी माना गति तैसें दुःख॥ ६॥ नामा म्हणे नाम दुःखाचा परिहार। सुखाचा अनिवार पार नाहीं॥ ७॥

१९५९. प्रपंच घडामोडी न सरे कल्पकोडी। वासनेची बेडी पडली पायीं॥ १॥ सोडवण करा आलेनो संसारा। शरण जा उदारा विठोबासी॥ २॥ लटकी माया देवी गर्भवासीं गोंवी। नरक भोगवी नानायोनी॥ ३॥ नामा म्हणे तुम्हीं विचारावें मनीं। सोयरा निर्वाणीं पांडुरंग॥ ४॥

१९६०. प्रपंच स्वार्थासि चांग। वैराग्याचें अंग दाविसी जना॥ १॥ अनुताप नित्य नाहीं कदाकाळीं। मग संचिताची होळी कैसी होय॥ २॥ पवित्र ते वाचा कां रे गमाविसी। रामनाम न म्हणसी अरे मूढा॥ ३॥ नामा म्हणे जीव कासया ठेवावा। न भजतां केशवा मायबापा॥ ४॥

१९६१. स्वयं घरदार प्रपंच मांडिला। जोडूनियां दिला बाळा हातीं॥ १॥ तैसें सर्वांभूतीं असावें संसारीं। प्राचीनाची दोरी साक्ष आहे॥ २॥ वाटसरू वस्ती येऊनि राहिला। प्रातःकाळीं गेला उठोनियां॥ ३॥ नामा म्हणे आम्हां नाहीं प्रापंचिक। पंढरिनायक साह्य झाला॥ ४॥

१९६२. फुटल्या घड्याचें नाहीं नागवणें। संसार भोगणें तेणें न्यायें॥ १॥ स्वप्नींची मात जागृतीस सांगे। तैसा भवरोग प्रारब्धाचा॥ २॥ नामा म्हणे आतां जाणा तो संसार। वाउगा पसार जायजणा॥ ३॥

१९६३. जायजणा देह जाईल नेणसी। लौकिक मिरविसी लाजसी ना॥ १॥ माझें माझें माझें मानिसी निभ्रांत। करिसी अपघात रात्रंदिवस॥ २॥ सांग तूं कोणाचा आलासि कोठोनी। दृढ बुद्धि मनीं विचारी पां॥ ३॥ धन संपत्ति करोनि मदें मातलासी। पुढत पुढती पडसी गर्भवासी॥ ४॥ पुत्र कलत्र दारा यांचा झालासी म्हणियारा। यांच्या पातकाचा भारा वाहशील॥ ५॥ अंतीं यमापाशीं बांधोनियां नेती। कवतुक पाहती सकळ जन॥ ६॥ नानापरी तुज करिती यातना। सांग तेथे कोणा वोभाशील॥ ७॥ धन पुत्र दारा तुज नये कामा एका मेघश्यामा वांचोनियां॥ ८॥ विषयाचेनि संगें भुलशील झणे। भोगिसी पतन रात्रंदिवस॥ ९॥ नामा म्हणे एक ध्यायीं कमळापति। निजाचा सांगाति केशिराज॥ १०॥

१९६४. शरीर काळाचें भातुकें। तुम्ही नेणां कां इतुकें॥ १॥ माझा जन्म गेला वांयां। तुजविण पंढरिराया॥ २॥ आझुनि तूं का रे निचिंत। काळ जवळी हटकीत॥ ३॥ नामा म्हणे अवघीं चोरें। शेखी हरिनाम सोयरे॥ ४॥

१९६५. क्षणक्षणां देहीं आयुष्य हें काटे। वासना हे वाढे नित्य नवी॥ १॥ माझें मी म्हणतां गेले नेणो किती। रंक चक्रवर्ति असंख्यात॥ २॥ देह जाय तोंवरी अभिमान। न करीं अज्ञान

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आत्महित ॥ ३ ॥ मोहाचीं सोयरीं मिळोनि चोरटी। खाउनि करंटी घेतीं घर ॥ ४ ॥ जोंवरी संपत्ति तोंवरी हा निके। धनासवें भूंके तयामागें ॥ ५ ॥ नामा म्हणे झालों केशवाचा दास। दाखवी वोरस तुझ्या नामीं ॥

१९६६. औट हात घर जायाचें कोपट। दोन दिवस फुकट भोगा कां रे ॥ १ ॥ कवणाचें घर कवणाचें दार। भावें हरिहर ओळंगारे ॥ २ ॥ आढें मोडलें घर झांजर झालें। वारा आला तेणें मोडोनि गेलें ॥ ३ ॥ खचला पाया पडली भिंती। नामा म्हणे घर नलगे चित्तीं ॥ ४ ॥

१९६७. देह आहे तंव करारे धांवणी। शरण चक्रपाणि रिघा वेगीं ॥ १ ॥ येर ते लटिके इष्टमित्र सखे। हे तंव पारीखे सर्व चोर ॥ २ ॥ लावूनि मोहातें दास्यत्व करविती। अंतकाळीं होती पाठिमोरे ॥ ३ ॥ मायेचे भूलीनें भुललीं सकळ। हे तु न कळे कटकट ॥ ४ ॥ यापरी आयुष्य वेंचेलेरे जना। पुढें यमयातना न चुकती ॥ ५ ॥ धोतरा देऊनि चोर सर्व हरिती। नामा म्हणे गति तेचि झाली ॥ ६ ॥

१९६८. यम सांगे दूतां। तुम्हीं जावें मृत्युलोका। आपुलाला लोक जितुका। तितुका आणावा ॥ १ ॥ तुम्हां सांगतों कुळरंग। निंदा आणि द्वेष करिती राग। खरी खोटी चाइडी सांगे। तें कुळ आपुलें ॥ २ ॥ ज्याचें विषयावर ध्यान। परद्रव्य परस्त्री गमन। धर्मासी विन्मुखपण। तें कुळ आपुलें ॥ ३ ॥ भावेंविण भक्ति करिती। भक्तिविणें भाव दाविती। त्यांची तुम्ही फजिती। बहुतां प्रकारें करावी ॥ ४ ॥ मंत्रसंचारी जे लोक। देव सांडून देवता उपासक। झोटिंग वेताळ खेताळ देख। ते सखे बाप तुमचे ॥ ५ ॥ लटिके वासनेचा नवसा। करिती करविती पशुहिंसा। त्याचें बहुत दिवस भरंवसा। दिला आहे ॥ ६ ॥ घातकी पातकी गुरुद्रोही। हित सांगतां गुरूसी हेडवी। विष्णुदासा वेगळें करून पाहीं। सांगितले तितुके आणावे ॥ ७ ॥ नामा म्हणे एक्या पातकीयां दंडिती। नाना विपत्ति काय सांगूं किती। विष्णुदासाचे वंदिती। चरणरज ते यम ॥ ८ ॥

१९६९. दुर्लभ नरदेह झाला तुम्हां आम्हां। येणें साधूं प्रेमा राघोबाचा ॥ १ ॥ अवघे हातोहातीं तरों भवसिंधु। आवही गोविंदु गाऊं गीतीं ॥ २ ॥ हिताचिया गोष्टी सांगूं एकमेकां। शोक मोह दुःखा निरसूं तेणें ॥ ३ ॥ एकमेकां करूं सदा सावधान। नामीं अनुसंधान तुटों नेदूं ॥ ४ ॥ घेऊं सर्वभावें रामनाम दीक्षा। विश्वासें सकळिकां हेंचि सांगों ॥ ५ ॥ नामा म्हणे शरण रिघी पंढरीनाथा। नुपेक्षी सर्वथा दीनबंधु ॥ ६ ॥

१९७०. नाम म्हणावया तूं कां रे करंटा। काय तुझे अदृष्टां लिहिलें असे ॥ १ ॥ यमाचे यमपाश पडतील गळां। जाशील सगळा काळामुखीं ॥ २ ॥ शरीराची आशा बाळ हें तारुण्य। अवचित वृद्धपण येईल मूढा ॥ ३ ॥ लक्ष्मी धन मद पुत्र स्त्री घरदार। नेतां यमकिंकर न सोडिती ॥ ४ ॥ मायबाप सखी न येती सांगातें। जंव शरीरीं पुरतें बळ आहे ॥ ५ ॥ न येती सांगातें सज्जन सोयरीं। वानप्रस्थ ब्रह्मचारी श्रेष्ठ झाले ॥ ६ ॥ घेशील तूं सोंग संन्यास आश्रम। सांडोनि घराश्रम न सुटसी ॥ ७ ॥ नामा म्हणे नाम नित्य नरहरी। म्हणतां श्रीहरी तरशील ॥ ८ ॥

१९७१. बाळ वृद्ध तरुण काया हे जर्जर। वेगीं हा पामर आळशी झाला ॥ १ ॥ काय करूं देवा नाहीं यासि भावो। न करी हा उपावो तुझ्या भजनीं ॥ २ ॥ मन ठेवीं रंगें तूं श्रीरंगीं। गोष्टी त्या वाउगी बोलूं नको ॥ ३ ॥ नामा म्हणे श्रीरंगु चित्तीं पां चोखडा। उघडा पवाडा सांगितला ॥ ४ ॥

१९७२. धनमानबळें नाठविसी देवा। मृत्युकाळीं तेव्हां कोण आहे ॥ १ ॥ यमाचे यमदंड बैसतील माथां। तेव्हां तुज रक्षिता कोण आहे ॥ २ ॥ मायबापबंधु तोंवरी सोयरीं। इंद्रियें जोंवरी वाहतातीं ॥ ३ ॥ सर्वस्व स्वामिनी म्हणविसी कांता। तेहि केश देतां रडतसे ॥ ४ ॥ विष्णुदास नामा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जातांचि शरण। स्वप्नीं जन्ममरण नाहीं नाहीं ॥ ५ ॥

१९७३. भुक्ति मुक्ति सिद्धि यावया कारणें। सेवकासी देणें पांडुरंगा ॥ १ ॥ ऐसिया तुज सांगणें आपणातें म्हणविती। तया अधोगति कल्पकोडी ॥ २ ॥ देहो सरल्या मिळे ज्योतीस ज्योति। ऐसें म्हणतां किती सिंतरिले ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसें नाशिवंत शरीर। पूजा हरिहर एक वेळां ॥ ४ ॥

१९७४. विषयाचा आंदणा दिसे केविल वाणा। करीतसे कल्पना नानाविध ॥ १ ॥ कुटंब पाईक म्हणवी हरिचा दास। मागे ग्रासोग्रास दारोदारीं ॥ २ ॥ जळों त्याचें कर्म जळो त्याचा धर्म। जळो आश्रम तो जाणीवेचा ॥ ३ ॥ कल्पद्रुमातुळीं काखे घेऊनि झोळी। बैसोनि सांभाळीं भिक्षा अन्न ॥ ४ ॥ अधम पोटभरी विचार तो न करी। पुढती दारोदारीं हिंडों जाय ॥ ५ ॥ पोटालागीं करी नाना विटंबना। संतोषवी मना दुर्जनांच्या ॥ ६ ॥ न करी हरीचें ध्यान बैसोनि एकांतीं। जन्माची विश्रांति जेणें होय ॥ ७ ॥ द्रव्याच्या अभिलाषें जागे सटवीपाशीं। नवजे एकादशी जागरणा ॥ ८ ॥ उत्तम मध्यम अधम न विचारी ॥ २ ॥ स्तुति नाना करी आशाबद्ध ॥ ९ ॥ वैराग्याची वार्ता कैंची दैवहता। नुपजे सर्वथा प्रेमभाव ॥ १० ॥ नामा म्हणे ऐसें तारी एक्या गुणें। अजा आरोहण गजस्कंधीं ॥ ११ ॥

१९७५. देहाचें ममत्व नाहीं जों तुटलें। विषयीं विटलें मन नाहीं ॥ १ ॥ तंव नित्य सुख कैसेंनि आतुडे। नेणती बापुडे प्रेमसुख ॥ २ ॥ मीच एक भक्त मीच एक मुक्त। म्हणवी पतित दुराचारी ॥ ३ ॥ नामा म्हणे तुझे कृपेविण देवा। केंवि जोडे ठेवा विश्रांतीचा ॥ ४ ॥

१९७६. भक्तीविणें जिणें जळो लाजिरवाणें। संसार भोगणें दुःखरूप ॥ १ ॥ एक एक योनि कोटि कोटि फेरा। मनुष्य देहवारा मग लागे ॥ २ ॥ तीस लक्ष योनि वृक्षामध्यें घ्याव्या। जळचरीं भोगाव्या नव लक्ष ॥ ३ ॥ अकरा लक्ष योनी किरडामध्यें घ्याव्या। दश लक्ष भोगाव्या पक्ष्यांमध्यें ॥ ४ ॥ तीस लक्ष योनि पशूंचिये घरीं। मानवाभीतरीं चारी लक्ष ॥ ५ ॥ नामा म्हणे तेव्हा नरदेह या नरा। तयानें मातेरा केला मूढें ॥ ६ ॥

१९७७. शेवटिली पाळी तेव्हां मनुष्यजन्म। चुकलीया वर्म फेरा पडे ॥ १ ॥ एक जन्मीं ओळखी करा आत्मारामा। संसार सुगम भोगूं नका ॥ २ ॥ संसारीं असावें असोनि नसावें। कीर्तन करावें वेळोवेळां ॥ ३ ॥ नामा म्हणे विठो भक्ताचिये द्वारीं। घेऊनियां करीं सुदर्शन ॥ ४ ॥

१९७८. वावडी दुरीच्या दुरी उडतसे अंबरीं। हातीं असे दोरी परि लक्ष तेथें ॥ १ ॥ दुडी वरी दुडी पाण्या निघाली गुजरी। चाले मोकळ्या करीं परी लक्ष तेथे ॥ २ ॥ व्यभिचारी नारी परपुरुष जिव्हारी। वर्ते घराचारीं परि लक्ष तेथें ॥ ३ ॥ तस्कर नगरीं परद्रव्य जिव्हारी। वर्ते घरोघरीं परि लक्ष तेथें ॥ ४ ॥ धनलोभ्यानें धन ठेवियलें दुरी। वर्ते चराचरीं परि लक्ष तेथे ॥ ५ ॥ नामा म्हणे असावें भलतियां व्यापारीं। लक्ष सर्वेश्वरीं ठेवूनियां ॥ ६ ॥

१९७९. भक्तीविण मोक्ष नाहीं हा सिद्धान्त। वेद बोले हात उभारोनि ॥ १ ॥ तरी तेंचि ज्ञान जाणाया लागुनि। संता वोळगोनि वश्य किजे ॥ २ ॥ प्रपंच हा खोटा शास्त्रें निवडिला। पाहिजे साक्षिला सद्‌गुरु तो ॥ ३ ॥ नामा म्हणे सेवा घडावी संतांची घ्यावी कृपा त्याची तेंचि ज्ञान ॥ ४ ॥

१९८०. हरीविण जिणें व्यर्थचि संसारीं। जग अलंकारीं मिरवीत ॥ १ ॥ देवाविण शब्द लटकें करणें। भांडा रंजविणें सभेमाजीं ॥ २ ॥ आचार करणें देवावीण जो गा। सर्पाचिया अंगा मृदुपण ॥ ३ ॥ नामा म्हणे काय बहु बोलों फार। भक्तीविण नर अभागी तो ॥ ४ ॥

मुमुक्षूंस उपदेश

१९८१. तुम्हां हित करणें आहे। सेवा राघोबाचे पाय ॥ १ ॥ दुष्टबुद्धि दुरी करा। तोडा अविद्येचा थारा ॥ २ ॥ करा तुमचें मन। तुम्हां जवळी नारायण ॥ ३ ॥ नामा म्हणे दृढ धरा। तारी निर्वाणीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चाकरा ॥ ४ ॥

१९८२. मृगजळडोहो कां उपससी वायां। वेगीं लवलाह्या शरण रिघें ॥ १ ॥ भजे तूं विठ्ठला सर्वांभूतीं भावें। न लगति नांवे आणिकांचीं ॥ २ ॥ होईल सुटका घडेल भजन। नाम जनार्दन येईल वाचे ॥ ३ ॥ नामा म्हणे घडे भजन विठ्ठलीं। ऐसियेनि मोली भक्ति करीं ॥ ४ ॥

१९८३. हरिसी शरण निघा वहिलें। राहे कळिकाळ उगलें ॥ १ ॥ खंडलें एका बोलें। विठ्ठल समर्थें अंगिकारिलें ॥ २ ॥ नामयानें संसारा जिंकिलें। केशवचरणीं मन ठेविलें ॥ ३ ॥

१९८४. न लगती डोंगर चढावे। हळुच पाऊल धरावें ॥ १ ॥ विठ्ठलाचे पाय बरवे। गंगा विनविते स्वभावें ॥ २ ॥ नामा म्हणे तीर्थ बरवें। मुकुटीं धरिलें सदाशिवें ॥ ३ ॥

१९८५. आतां पांडुरंग स्मरा। जन्ममृत्यु चुकवी फेरा ॥ १ ॥ ऐसा कांहीं करा नेम। मुखीं स्मरा कृष्णराम ॥ २ ॥ चिंता ऐसें ध्यान। तेणें असा समाधान ॥ ३ ॥ नामा म्हणे हरिदास। त्यासि असावा अभ्यास ॥ ४ ॥

१९८६. हरिकथा ऐकतां अनन्य पैं गोष्टी। निधान त्या दृष्टी अंतरलें ॥ १ ॥ घडी घडी प्रेम अंतरूं न द्यावें। सावधान व्हावें रामनामीं ॥ २ ॥ यापरी स्वहितीं ठेवियलें लक्ष। ते पावती मोक्ष म्हणे नामा ॥ ३ ॥

१९८७. कासवीचे दृष्टी जें येईजे भेटी। तैं अमृताची वृष्टि घडे त्यासी ॥ १ ॥ तैसें हें भजन श्रीरामाचें ध्यान। वाचें नारायण अमृतमय ॥ २ ॥ धन्य त्याचे कुळ सदा पैं सुफळ। दिनदिशीं फळ रामनाम ॥ ३ ॥ नामा म्हणे चोखट भक्त तो उत्तमु। वाचेसी सुगमु रामनाम ॥

१९८८. कृष्णकथा सांग जेणें तुटे पांग। न लगे तुज उद्वेग करणें कांहीं ॥ १ ॥ समर्थ सोयरा राम हा निधान। जनीं जनार्दन एक ध्याईं ॥ २ ॥ नाम हेंचि सार नाम हेंचि सार। तराल निर्धार श्रुति सांगे ॥ ३ ॥ नामा म्हणे उच्चार रामकृष्ण सारा तुटेल येरझार भवाब्धीची ॥ ४ ॥

१९८९. एक वेळ नयनीं पहावा। मन जाईजे भलत्या गांवा ॥ १ ॥ आठवाल वेळोवेळां। विठोबा आहेरे जवळां ॥ २ ॥ हृदयीं मांडूनियां ठसा। नामा म्हणे केशव असा ॥ ३ ॥

१९९०. रामनाम वाचे बोल। तया पुरुषा नाहीं मोल ॥ १ ॥ धन्य तयाचें शरीर। बरे जना उपकार ॥ २ ॥ ऋणियां तो तारी। विश्वव्यापक तो हरि ॥ ३ ॥ नामा म्हणे स्वामी सुखें वसे अंतर्यामीं ॥ ४ ॥

१९९१. राम म्हणतां रामचि होसी। भाक घेईं मजपाशीं ॥ १ ॥ लवण समुद्रा जागा मागें। तेंहि समुद्र झालें अंगे ॥ २ ॥ वात दीपासंगें गेली। तेहि दीप अंगें झाली ॥ ३ ॥ नामा सांगे भाविक लोकां। नाम घेतां राहूं नका ॥ ४ ॥

१९९२. केशव म्हणतां जासी केशवपंथें। त्यांहूनि सरतें आणिक नाहीं ॥ १ ॥ वेद कां पढसी शास्त्र कां सांगसी। उदंड वाचेसी हरी म्हणतां ॥ २ ॥ पहा याहूनिया आन नाहीं दुसरें। भीष्में युधिष्ठिर उपदेशिला ॥ ३ ॥ नामा म्हणे धरीं केशवीं विश्वास। तरसी गर्भवास नामें एका ॥ ४ ॥

१९९३. गुळ गोड न लगे म्हणावा। तैसा देव न लगे वानावा ॥ १ ॥ सेवा तोचि चवी जाणे। येरा सांगतां लाजिरवाणें ॥ २ ॥ नामा म्हणे या खुणा। तुम्ही ओळखा पंढरिराणा ॥ ३ ॥

१९९४. मार्गीं चालतां उगलें न चालावें। वाचेसी म्हणावें रामकृष्ण ॥ १ ॥ हरि बा हरि हरि मुकंद मुरारी। माधव नरहरी केशिराज ॥ २ ॥ ऐसा छंद वाचें सर्वकाळ जयां। नामा म्हणे तयां दोष कैंचे ॥ ३ ॥

१९९५. देवा सन्मुख दीपमाळा। कोणी भक्त हो उजळा ॥ १ ॥ तेल घालारे फारसें। नामा म्हणे रे उल्हासें ॥ २ ॥ नामा दीपमाळ पाजळी। तेणें भक्ति त्यास झाली ॥ ३ ॥

१९९६. तो देव स्मरा रे अनंत। जो कां वैकुंठींचा नाथ। दृढ धरा रे हृदयांत। तेणें यमपंथ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

चुकेल॥ १॥ आकांतीं द्रौपदीये स्मरिला। तिचीं वस्त्रें आपणचि झाला। सभेमाजीं मान रक्षिला। काळ पैं झाला। सभेमाजीं मान रक्षिला। काळ पैं झाला कौरवांचा॥ २॥ विमार्जुन उन्मळिला। जरासंध तोही मारिला। कंसासुर निर्दाळिला। कान्हया झाला गोकुळींचा॥ ३॥ ध्रुव जेणें अढळपदीं बैसविला। नामें एके अजामिळ उद्धरिला। उत्तरेचा गर्भ रक्षिला। तैं सोडविला परीक्षिती॥ ४॥ जाति कुळ न पाहसी। नामें एकें उद्धरिलें गणिकेसी। त्या गोपाळाचें उच्छिष्ट खासी। गज सोडविसी पाणियाडें॥ ५॥ ऐसा तूं कृपाळु गा देवा। प्रसन्न झालासि पांडवा। विष्णुदास नामा विनवी केशवा। प्रेमभाव द्यावा मजलागीं॥ ६॥

१९९७. भक्त प्रल्हादाकारणें। त्या वैकुंठींहूनि धांवणें॥ १॥ नरहरी यातला पातला। महादोषा पळ सुटला॥ २॥ शंख चक्र पद्म गदा। नाभी नाभीं रे प्रल्हादा॥ ३॥ दैत्य धरी मांडीवरी। नखें विदारी नरहरी॥ ४॥ पावला गरुडध्वज। नामया स्वामी केशवराज॥ ५॥

१९९८. जागारे गोपाळांनो रामनामीं जागा। कळीकाळा आकळा महादोष जाती भंगा॥ १॥ सहस्त्रदल समान अनुहात ध्वनी उठी। नामाचेनि बळें पातकें रिघालीं कपाटीं॥ २॥ दशमी एक व्रत करा दिंडी दर्शन। एकादशी उपवास तुम्ही जागा जागरण॥ ३॥ द्वादशी साधन कोटीकुळें उद्धरती। नामा म्हणे केशव ठाव देईल वैकुंठीं॥ ४॥

१९९९. निर्वाणीची हे सांगितली खूण। कैवल्य चरण विठोबाचे॥ १॥ वेद शास्त्र स्मृति बदती पुराणें। पाहूनि जाणणें हेंचि सत्य॥ २॥ क्रिया कर्म धर्म ज्यालागीं करणें। ते खूण निर्वाण हेंचि असे॥ ३॥ जप तप अनुष्ठान कां करिजे साधन। तेंचि प्रत्यक्ष निधान हेंचि असे॥ ४॥ नामा म्हणे मज कळलें अनुभवें। न सोडीं हे जीवें चरण तुझे॥ ५॥

२०००. नामामृत सरिता चरणमृत माता। पवित्र हरिकथा मुगुटमणि॥ १॥ तेथें माझें मन हो कां क्षेत्रवासी। राहें संतांपाशीं सुख घेतां॥ २॥ अहिक्य परत्रें समतीरें साजिरीं परमानंद लहरी हेलावत॥ ३॥ मुक्तीची माउली मोक्षाची गाउली। शीणलिया साउली विषयताप॥ ४॥ तेथें सनकादिक प्रेमळ सकळ। राहिले निश्चळ करोनि चित्त॥ ५॥ नामा म्हणे माझे सखे हरीजन। तारूं त्याचे चरण दृढ धरा॥

२००१. नित्य नेम आम्हां चिंतन श्रीरामा। आणिक उपमा नेघों नेघों॥ १॥ वळघलों हरि भूतभाव निर्धारी। दिसे चराचरीं हरिरूप॥ २॥ जें जें पडे दृष्टी आणिक नाहीं सृष्टी। हरिरूपीं भेटी हेंचि दिसे॥ ३॥ नामा म्हणे विठ्ठल सर्वांभूतीं आहे। आणिक उपाय न लगती॥

२००२. एके हातीं टाळ एके हातीं दिंडी। म्हणे वाचा उदंडी रामनाम॥ १॥ श्रीहरिसारिखा गोसावी पैं चांगु। फेडिला पैं पांगु जन्मांतरींचा॥ २॥ ऐसें नृत्य करी वेडें वागडें। बदन वांकुडें करूनियां॥ ३॥ चुकलें पाडस कुरंगिणी गिवसिती। तैसा हृषीकेशी न्याहाळी तूंतें॥ ४॥ धेनु पान्हाय हुंबरे वत्सातें। तैसा वोरस तूंतें केशिराज॥ ५॥ नामा म्हणे इतुकें न करवें निर्दैवा। तरी वाचेसि केशवा उच्चारीं पां॥ ६॥

२००३. गुण दोष त्याचे म्हणतां श्लाघीजे। निर्वासन कीजे चित्त आधीं॥ १॥ गाऊं नाचूं आनंदें कीर्तनीं। भुक्ति मुक्ति दोन्हीं नको देवा॥ २॥ मनाची पैं वृत्ति बुडे प्रेमडोहीं। नाठवती देहीं दुजा भाव॥ ३॥ सगुणीं निर्गुण एकचि आवडी। चित्तीं दिली बुडी चिदानंदीं॥ ४॥ नामा म्हणे देवा मागणें ऐसी सेवा। द्यावी जी केशवा जन्मोजन्मीं॥ ५॥

२००४. तुमचें तीर्थ आम्हीं आदरें सेवावें। तेणें तें पावावें परब्रह्म॥ १॥ विश्वाकरवीं ब्रह्म म्हणवितां तुम्हीं। म्हणों जी माय आम्ही पिता तुम्ही॥ २॥ जो तुमचे चरणींचा तो नाहीं आम्हां। विष्णुदास नामा नसे तेथें॥ ३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२००५. उदाराचा राजा उभयांचि काजा। उभारोनि भूजा वाट पाहे॥ १ ॥ म्हणे घ्यारे सुख प्रेम अलौकिक। साधन आणिक न लगे कांहीं॥ २॥ मनाचेनि मानें हृदयीं मज धरा। वाचेसि उच्चारा नाम माझें॥ ३ ॥ जेणें कर्में मज साधिलें पुंडलीकें। तेंचि तुम्हां निकें सांगितलें॥ ४॥ अनुदिनीं आवडी करूनि नित्य नवी। मज धरा जिवीं सर्वभावें॥ ५॥ म्हणोनि पांडुरंग उभा भीमातीरीं। नामा निरंतरीं वोळगे चरण॥ ६॥

२००६. देवराज आले मंचकीं बैसले। भक्तांसि दिधलें अभयदान॥ १ ॥ दासहो तुम्ही सकळ सुखी रहा। सुखी राहोनियां आनंद करा॥ २ ॥ रात्रंदिवस माझें करारे चिंतन। यमाचें बंधन नाहीं तुम्हां॥ ३॥ विष्णुदास नामा गाऊनियां गेला। शेजे पहुडला देवराणा॥ ४॥

२००७. तप थोर देखिलें संसारीं। जो अखंड कीर्तन करी। त्याच्या तपा पुढारिले हरी। हें निर्धारें जाणा हो॥ १॥ धन्य धन्य विष्णुदास। ऐसा हरिनामीं सौरस। ते पितरांसहित वैकुंठ। सर्वकाळ क्रमिती॥ २॥ जप तप ज्ञान विठ्ठल। तयासि नाहीं काळवेळ। टाळी वाजवितांचि निर्मळ। महादोष हरतील॥ ३ ॥ जेथे रामकृष्ण उच्चार। सकळ मंत्रांत मंत्रसार। पांचांही वदनीं शंकर। नित्य रामनाम जपतसे॥ ४॥ तो हा पुंडलिकें उभा केला। आपण दृष्टिसमोर बैसला। कीर्तनें त्रैलोक्य तारिला। स्नानदानें पितरांसहित॥ ५॥ न लगे करावे यज्ञयाग। न लगे आणिक मंत्रलाग। एक सेविलिया पांडुरंग। अनंत तीर्थे घडतील॥ ६॥ पंचक्रोशी प्रदक्षिणा। नित्य नमस्कारीं विठ्ठल चरणां। तरी घडेल पृथ्वीप्रदक्षिणा कोटिच्या कोटी अनंत॥ ७॥ सप्तपुरीं द्वादश लिंगें। कीर्तनें डोलती लागवेगें। ऐसे भक्त तारिले पांडुरंगें। विटेवरी उभा नीट राहोनी॥ ८॥ नामा सांगें गुह्य गोष्टी। विठ्ठल तारक एक सृष्टी। पंढरी देखिलिया दृष्टी। वैकुंठपद पाविजे॥ ९॥

२००८. क्रिया कर्म धर्म तिहीं केलें सांग। जिहीं पांडुरंग देखियेला॥ १॥ ओळखोनि मनें धरिला मानसीं। उभा अहर्निशीं हृदयकमळीं॥ २॥ निजानंदबोधें नामाचेनि छंदें। डोलती आनंदें वोसंडत॥ ३॥ नाहीं देहस्मृति निमाली वासना। मावळली कल्पना भावाभाव॥ ४॥ अखंड विदेही रजतमावेगळे। भोगिती सोहळे प्रेमसुख॥ ५॥ त्याचिया द्वारींचा झालोंसे सांडोवा। म्हणोनि केशवा पढिये नामा॥ ६॥

२००९. अवघी चित्तवृत्ति एकवटोनि जेणें। अवघा धरिला मनें पांडुरंग॥ १॥ अवघें सुख एक तयासि फावलें। अवघें सफळ झालें जन्म त्याचें॥ २॥ अवघीं व्रतें दानें केलीं पैं तयानें। ज्याचें विठ्ठलीं ध्यान मन जडलें॥ ३॥ नित्य विठ्ठल नाम गर्जती सप्रेमें। अवघे नित्य नेम झाले त्यांचे॥ ४॥ अवघा इष्ट मित्र बंधु मातापिता। केला आवडता पांडुरंग॥ ५॥ नामा म्हणे ऐसे अवघे संप्रदाय। मिळोनि धरा पाय विठोबाचे॥ ६॥

२०१०. तेरामाजी तीन सात साक्षात्कार। आठवा निर्धार असीपद॥ १॥ नवमापासूनि दशमाचे अंतीं। बारावा निश्चिती योग जाणा॥ २॥ प्रथम अक्षरीं मध्यमा सूचना। नाम नारायणा अंतकाळीं॥ ३॥ नामा म्हणे तुम्ही नाम स्मरा मनीं। वैकुंठभुवनीं वास होय॥ ४॥

२०११. अनुसरे त्यासी फिरों नेदी मागें। राहे अंगसंगें समागमें॥ १॥ समागमें असे सर्व साक्षी देव। जैसा ज्याचा भाव तैसा राहे॥ २॥ सदा मुखीं नाम आळस न उच्चारी। प्रीति मानी हरि हास्यमुखें॥ ३॥ फळपाकीं सर्व देतील प्राणीया। नामा धरी पाया बळकट॥ ४॥

२०१२. नागवें कळिकाळां ब्रिदावळी पाही। तोचि लवलाहीं ध्यायिजेसु॥ १॥ स्मरण विठ्ठल चित्त पांडुरंग। नाहीं तया मग जन्ममरण॥ २॥ आपणचि नांदे भक्तांचिया घरीं। आपणचि करी सर्व कृत्य॥ ३॥ नामा म्हणे तो देव पंढरीनिवास। कळिकाळासी वास पाहों नेदी॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२०१३. भीष्मासी आपण पाडियले रणीं। गोविंदें निर्वाणीं भेटी दिली ॥ १ ॥ हरिश्चंद्र वाहे डोंबाघरीं पाणी। गोविंद निर्वाणीं भेटी दिली ॥ २ ॥ परीक्षिती बैसे मरण आसनीं। गोविंदें निर्वाणीं भेटी दिली ॥ ३ ॥ नामा म्हणे तुम्ही देव धरा मनीं। गोविंद निर्वाणीं भेटे तुम्हां ॥ ४ ॥

२०१४. हरीस श्रवणीं घ्यावो नित्य तुम्ही। ठसावेल ध्यानीं अवघा राम जनीं वनीं ॥ १ ॥ नयनीं सखा पहा कृष्ण न्याहाळुनी। प्रकाशलें तेज रवि गेला लपोनि ॥ २ ॥ हरिचरणीं लावी मन दर्शन। झालीया जाती त्रिविधताप हरपोन ॥ ३ ॥ तुळसीचा सुगंध मस्तकीं धरा। नामा म्हणे चरण दृढ धरा ॥ ४ ॥

२०१५. जिव्हे केशवाचें करितां कीर्तन। मिथ्या वदूं नको एक रामाविण ॥ १ ॥ म्हणऊनि हरिरंगीं रंगा। नाम घेतां महापातकें जातीं भंगा ॥ २ ॥ चित्तीं चिंतितां होई तद्रूप। मिथ्या विषयीं लुब्ध झालिया काय सुख ॥ ३ ॥ पूजन करा तुम्ही अच्युताचें। नामा म्हणे एकचित्तें साचें ॥ ४ ॥

२०१६. संसाराबंधन केलें जेणें शून्य। तयासी अनन्य शरण रिघा ॥ १ ॥ मायबाप सखा विठ्ठल विसांवा। त्याचे पायीं ठेवा सदा मन ॥ २ ॥ निजरूपबोध तोचि ज्ञानदीप। आनंदस्वरूप बाप माझा ॥ ३ ॥ नामा म्हणे त्याच्या संगतीचा वारा। पावे पैल पारा हेळामात्रें ॥ ४ ॥

२०१७. आगमीं नाम निगमीं नाम। पुराणीं नाम केशवाचें ॥ १ ॥ अर्थी नाम पदीं नाम। ध्रुपदीं नामा त्या केशवाचें ॥ २ ॥ अनुभवें भावें कपटें प्रपंचें। परि हरीचें नाम येऊं दे वाचे ॥ ३ ॥ नाम व्हावें नाम व्हावें। नाम व्हावें त्या केशवाचें ॥ ४ ॥ ऐसें नाम बहु सुंदर। नामीं तरले लहान थोर ॥ ५ ॥ नामा म्हणे अंतर। पडों नेदी याऊपर ॥ ६ ॥

२०१८. जें जें पुण्य जोडे हरिनाम गजरीं। त्याचे वांटेकरी दोघेजण ॥ १ ॥ सावधान श्रोता आणि प्रेमळ वक्ता। जो भजे अनंता निर्विकल्प ॥ २ ॥ तेणें सुखें सुख चढे नित्य नवें। जाणती अनुभवें संतजन ॥ ३ ॥ हातीं सुदर्शन आनंदें कीर्तनीं। उभा चक्रपाणि मागें पुढें ॥ ४ ॥ प्रीतिच्या वोरसें अभयदान देत। हृदयीं अलिंगित आपुल्या दासां ॥ ५ ॥ धर्म अर्थ काम मोक्ष आणि मुक्ति। टाकोनियां येती विश्रांतीसी ॥ ६ ॥ नामा म्हणे धन्य ते झाले संसारीं। न संडिती वारी पंढरीची ॥ ७ ॥

२०१९. अवघे ते संसारीं जाणावे ते धन्य। ज्यांचे प्रेम पूर्ण पांडुरंगीं ॥ १ ॥ अवघे ते दैवाचे विठ्ठल म्हणती वाचे। अवघें कुळ त्यांचें पुण्यरूप ॥ २ ॥ अवघ्यारूपीं एक विठ्ठल भाविती। अवघ्या मनें भजती अवघेपणें ॥ ३ ॥ अवघे मिथ्या जाणोनि अवघिया विठ्ठलें। अवघे विनटले विठ्ठलपायीं ॥ ४ ॥ अवघे पूर्ण बोधें भावें प्रेमें प्रीती। ध्यानीं गीतीं गाती केशिराज ॥ ५ ॥ अवघा हा विठ्ठल भोगूं दिनराती। वोळगें किंकरवृत्ति नामा त्यासी ॥ ६ ॥

२०२०. सर्व जिवां करी कारुण्य। वाचें सत्य उच्चारण। नित्यनामस्मरण। तोचि दास भगवंताचा ॥ १ ॥ धन्य धन्य भूमंडळीं। धन्य धन्य साधुवचन पाळी। वेदमर्यादा वेगळी। कार्यै न करी सर्वथा ॥ २ ॥ प्रातःकाळीं उठुनी। नरहरनाम उच्चारूनि। उभा राहूनि कीर्तनीं। जय जय नामें गर्जतसे ॥ ३ ॥ देवभक्ति आवडे ज्यासी। पुण्यप्रारब्ध म्हणती त्यासी। जो उपजोनि आपुले वंशीं। पूर्वजांसि उद्धारितो ॥ ४ ॥ तीर्थें एक भावभजन। नित्य सत्य तें पिंडदान। भूतदया तें भागीरथी स्नान। तेथ जनार्दन उभा उसे ॥ ५ ॥ देखिलिया ब्राह्मण। वेदांसमान देत गान। यथाशक्ति करूनि दान। अतिथिपूजन जो करी ॥ ६ ॥ नामा म्हणे तोचि तरे। वैकुंठ तेथें उतरे। तीथैं म्हणती तो त्वरें। पाहों दृष्टी एकवेळ ॥ ७ ॥

२०२१. ब्रह्म ते ब्राह्मण श्रुतीचें वचन। सर्व नारायण सर्वांभूतीं ॥ १ ॥ चहूं शिक्षा जनीं गुरु चालू वर्ण। प्रत्यक्ष पुराणें साक्ष देतीं ॥ २ ॥ हेळसुनी निंदी दुरावी ब्राह्मणा। सभेमाजीं जाणा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दुव्हाविती ॥ ३ ॥ त्याचें पाप नाहीं खंडण सर्वथा। म्हणोनि अनंता भय वाटे ॥ ४ ॥ कोपला प्रहर ब्राह्मणा मारिला। लक्ष वेडावलीं भूषण त्या ॥ ५ ॥ क्रोध अग्नि ज्वाळा झगटती जेथें। न उरती तेथे काडिमात्रें ॥ ६ ॥ उगेंच ब्राह्मणा सांबें छळियेलें। सर्व शांत झाले आपोआप ॥ ७ ॥ अपेक्षिती कोण्ही तेंचि तें होतें। न बोलावें तेथें बोल कांहीं ॥ ८ ॥ अग्नीसी लहान थोर न म्हणावा। पडे परिस्वाहा सर्व कांहीं ॥ ९ ॥ मार्कंडेय बुद्धि छळूनि ब्राह्मण। आयुष्य तें उणें होय माझें ॥ १० ॥ ब्राह्मणाचें वीर्य मातंगीचे पोटीं। त्याचि एका गोष्टी आशीर्वाद ॥ ११ ॥ आयुष्मानें कल्प सात चौदा होती। ऐकोनि विश्रांति कीर्तनानें ॥ १२ ॥ धन्य गोत वित्त स्त्रिया आणि पुत्र। सर्व व्हावें हित ब्राह्मणातें ॥ १३ ॥ कुळक्षयो व्हावें ऐसें वाटे जीवा। ब्राह्मणासी दावा नको बापा ॥ १४ ॥ नामा म्हणे ऐसें धन्य ते ब्राह्मण धरिले चरण माथां त्यांचे ॥ १५ ॥

२०२२. भक्त विठोबाचे भोळे। त्याचे पायीं ज्ञान लोळे ॥ १ ॥ भक्तिविण शब्दज्ञान। व्यर्थ अवघें तें जाण ॥ २ ॥ नाहीं ज्याचे चित्तीं भक्ति। जळो तयाची व्युत्पत्ति ॥ ३ ॥ नामा म्हणे ऐसें जाण। नाहीं भक्तासी बंधन ॥ ४ ॥

२०२३. पिता शिकवी पुत्रासी। नको जाऊं बापा हरिकथेसि। तेथें पांचा तोंडांची विवशी। ते वैष्णवें आणिली आहे ॥ १ ॥ तिचिया गळां रुंडमाळा। अंगीं स्मशानींचा उधळा। कंठीं सर्पाचें हळाहळा। गजचर्म पांघुरलें ॥ २ ॥ नको जाऊं बापा तेथें। मागुता न येशी रे येथें। जे जे पाहूं गेले तियेतें। ते आले नाहीं मागुते ॥ ३ ॥ चंद्र पाहों गेला तियेसी। ओढूनि बांधिला भाळेसी। तैसा पडसी अभरंवशी। मग मुकशी संसारासी बापा ॥ ४ ॥ वारितां वारितां ध्रुव गेला। तो नेऊनि अढळपदीं घातला। बळीस देशवटा दिधला। तो घातला पाताळीं ॥ ५ ॥ नारदा दिधली कांसवटी। हनुमान केला हिंपुटी। रुक्मांगदाची वैकुंठी। नगरी नेऊनि घातली ॥ ६ ॥ तिचें वैष्णव लहाणें। कळों नेदिती आपुलीं विंदानें। हरिकथारंगीं नाचणें। नामकल्लोळीं ॥ ७ ॥ तीस दहा हात अकरा डोळे। ती किती काळाची न कळे। भयानक श्रीमुख कमळें। हातीं घेऊनि हिंडतसे ॥ ८ ॥ भस्म डौर त्रिशूळ हातीं। ते न वर्णवे वेदश्रुतीं। तीसी नाहीं कुळ याती। आपपर ते कैंचे ॥ ९ ॥ ते वेदशास्त्रां अगोचर। ती सवें असे एक डोर। कोठें न मिळेची बिढार। म्हणोनि स्मशानीं बसतसे ॥ १० ॥ ऐसी ती थोर लांब। तिसी गोव ना शीव। कोठेंचि न मिळे ठाव। म्हणोनि समुद्रीं ॥ ११ ॥ तेथें सर्पाचे अंथरूण करी। निद्रा उदका भीतरीं। तया वैष्णवामाझारीं। निरंतरी वर्ततसे ॥ १२ ॥ सांगेन तें परियेसीं। आहे ती संत महंतापाशीं। आणि हरिकथेसी। बैसली असे ॥ १३ ॥ म्हणवोनी विश्वासें तूं जासी। मुकसी आपुल्या संसारासी। नामा विनवी श्रोतियांसी। हें बोलणें वेदांचें ॥ १४ ॥

२०२४. ऐसा आज्ञापी भक्तांसी आपण। त्यागा अभिमान तुम्ही जाणा ॥ १ ॥ जाणावें प्रत्यक्ष स्वरूप सगुण। सर्व नारायण तोचि दिसे ॥ २ ॥ दिसे गोपाळांसी गोपिकांसहित। आनंदें डुल्लत म्हणे नामा ॥ ३ ॥

२०२५. सांडूनि पंढरीची वारी। मोक्ष मागती ते भिकारी ॥ १ ॥ ताट वोगरिलें निकें। सांडुनि कवण जाय भिके ॥ २ ॥ जो नेणे नागमोडी। तोचि मुक्तितें चरफडी ॥ ३ ॥ आम्ही पंढरीचे लाटे। नवजों वैकुंठीचे वाटे ॥ ४ ॥ झणीं भ्याल गर्भवासा। नामा म्हणे विष्णुदासा ॥ ५ ॥

२०२६. पंढरीची वारी करील जो कोणी। त्याच्या चक्रपाणि मागें पुढें ॥ १ ॥ लोखंड असतां सोनें झालें कैसें। समागम मिषें गुणें त्याच्या ॥ २ ॥ तैसें एक वेळ करीं मायबापा। चुकवीं या खेपा चौऱ्यांशीच्या ॥ ३ ॥ नामा म्हणे असो प्रारब्ध सरे। होई कृपण निकुरें चरणाचे ॥ ४ ॥

२०२७. पंढरीस जावें जीवन्मुक्त व्हावें। विठ्ठला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भेटावें जिवलगा ॥ १ ॥ कायावाचामन चरणीं ठेवावें। प्रेमसुख घ्यावें सर्वकाळ ॥ २ ॥ सुखाचें साजिरें श्रीमुख पहावें। जीवें उतरावें निंबलोण ॥ ३ ॥ बाहेरी भीतरीं कैवल्य आघवें। वाचें न बोलावें ब्रह्मानंदु ॥ ४ ॥ चिरंजीव नामा कंठीं धरी प्राण। करी तुझें ध्यान रात्रंदिवस ॥ ५ ॥

२०२८. विचारूनि पाहा पंढरिचें पाडें। सुख होय थोडें क्षीरसिंधू ॥ १ ॥ सांडूनि वैकुंठ आले जगजेठी। वस्ती वाळवंटीं केली जाण ॥ २ ॥ भक्त सहाकारी ब्रीदें बडिवार। सेवा सुखसार पांडुरंग ॥ ३ ॥ जीवाचे सोयरे न मिळे वैकुंठीं। हरिदासा भेटी आडलिया ॥ ४ ॥ प्रीतीचे वोरस उभा मागें पुढें। जीवासी आवडे भक्त राणा ॥ ५ ॥ लक्ष्मीचा विलास न वाटे विश्रांती। आवडे श्रीपति भक्तीभावा ॥ ६ ॥ संगें सर्व काळ धांवे पाटो वाटी। घाली कृपादृष्टी तयावरी ॥ ७ ॥ अमृत सुरस नव्हेति पैं गोडी। म्हणोनि आवडी कालयाची ॥ ८ ॥ हरुषें निर्भर सुरवरा खेळे। वाळवंटीं लोळे संतसंगें ॥ ९ ॥ अठ्ठावीस युगें उभा विटेवरी। भक्तप्रिय हरि स्वामी माझा ॥ १० ॥ नामा म्हणे त्याचे सुखरूप पाय। क्षणेक न होय जीवाहुनी ॥ ११ ॥

२०२९. पुंडलिकें रचिली पेठ। संत ग्राहिक चोखट ॥ १ ॥ प्रेम साखरा वांटिती। नेघे त्यांचे तोंडीं माती ॥ २ ॥ समतेचे फणस गरे। आंबे पिकले पडिभरें ॥ ३ ॥ नामद्राक्षाचे घड। अपार रस आले गोड ॥ ४ ॥ नामा म्हणे भावें घ्यावें। अभक्तांचें मढें जावें ॥ ५ ॥

२०३०. कर्मजड मूढ पतीत पामर। भवसिंधु पार न टके जया ॥ १ ॥ यालागीं पंढरी केली मुक्ति पेठ। भक्तें भूवैकुंठ वसविलें ॥ २ ॥ हेंचि पुंडलिकें मागितलें निकें। जें सर्वथा परलोकें चाड नाहीं ॥ ३ ॥ भक्ति मुक्ति सिद्धि जें जया आवडे। तें तया पवाडे विठ्ठलनामें ॥ ४ ॥ न लगती सायास करणें कायाक्लेश। नामाचा विश्वास दृढ धरा ॥ ५ ॥ नामा म्हणे अवघे चला पंढरीये। भेटों मायबाप पांडुरंगा ॥ ६ ॥

२०३१. अठ्ठावीस युगें उभा ठेला द्वारीं। पुंडलीकावरी ठेवुनि लक्ष ॥ १ ॥ कृपेचा सागर भक्तजनवत्सल। आमुचा विठ्ठल मायबाप ॥ २ ॥ भक्तीसी भाळला अरूप रूपा आला। वेलाईत झाला भक्तांलागीं ॥ ३ ॥ भक्तीचिया रूपें न घडे तें केलें। वैकुंठा आणिलें भूमंडळीं ॥ ४ ॥ भक्ति मुक्ति सिद्धि त्यापायीं लागती। उद्धट गर्जती विठ्ठलनामें ॥ ५ ॥ नामा म्हणे केशव उदाराचा राव। सेवा चरणीं ठाव देईं आम्हां ॥ ६ ॥

२०३२. शब्दाचें सुख श्रवणाचेनि द्वारें। माझिया दातारें ऐसें केलें ॥ १ ॥ स्पर्शाचें सुख त्वचेचेनि द्वारें। माझिया दातारें ऐसें केलें ॥ २ ॥ रूपाचें सुख नेत्राचेनि द्वारें। माझिया दातारें ऐसें केलें ॥ ३ ॥ रसाचें तें सुख रसनेचेनि द्वारें। माझिया दातारें ऐसें केलें ॥ ४ ॥ गंधाचें सुख नाकाचेनि द्वारें। माझिया दातारें ऐसें केलें ॥ ५ ॥ नामा म्हणे ऐसे जयाचे उपकार। तयासी गव्हार विसरले ॥ ६ ॥

२०३३. आप तेज वायु पृथ्वी आणि गगन। त्यांचें केलें वा शरीरनिधान ॥ १ ॥ त्यामाजीं घातलें मन पवन। पिंडब्रह्मांड केली रचना ॥ २ ॥ काय सांगों तुझी करणी नारायणा। वेदपारायणा केशिराजा ॥ ३ ॥ पृथ्वीवरी तीर्थें आहेत अपार। परि पंढरीची सर एका नाहीं ॥ ४ ॥ जन्मोजन्मींच्या पातका दरारा। चुके येरझारा एके खेपे ॥ ५ ॥ ब्रह्मज्ञानेंवीण मोक्ष आहे भूतीं। वाचेसि म्हणती विठ्ठलनाम ॥ ६ ॥ बेचाळीसासहित जातील वैकुंठा। नामा म्हणे भेटा विठ्ठलदेवा ॥ ७ ॥

२०३४. साठी घडीमाजीं। एक वेंची देवकाजीं ॥ १ ॥ आराणूक सारूनि काजीं। सर्वभावें केशव पूजी ॥ २ ॥ हेंचि भक्तीचें लक्षण। संतोषला नारायण ॥ ३ ॥ कोटि कुळें पावन तुझीं। नामा म्हणे भाक माझी ॥ ४ ॥

२०३५. तुम्ही आम्ही जाऊं चला। भेटूं जिवलगा विठ्ठला ॥ १ ॥ विठो सांपडला फुका।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जो दुर्लभ तिहीं लोकां॥ २॥ वेदपुराणासी वाड। तो हा भाविकांसी भ्याड॥ ३॥ नामा म्हणे वंदूं चरण। कांही पुसूं जीवीची खूण॥ ४॥

२०३६. पैल दक्षिणेचा वारा। येतां देखिला सामोरा॥ १॥ चला चला पंढरपुरा। विठोबारायाच्या नगरा॥ २॥ पायीं संताच्या लागत। पाचारितो पंढरीनाथ॥ ३॥ नामा म्हणे वेग करा। विठ्ठल भक्तांचा सोईरा॥ ४॥

२०३७. पूर्ण परिपूर्ण हे पेठ। आपण वैकुंठ समचरण॥ १॥ ऐसें कांहीं करा नाम हेंचि धरा। विठ्ठल अपारा जप करा॥ २॥ करितां साधन नागवी अहंकार। विठ्ठल उच्चार पुण्य ओघें॥ ३॥ नामा म्हणे घेईं विठ्ठल कुळदेवो। सर्व हाचि भावो केशव ऐसा॥ ४॥

२०३८. न पढावे वेद नको शास्त्रबोध। नामाचे प्रबंध पाठ करा॥ १॥ जव्हे ब्रह्मज्ञान न होय वैराग्य। साधा भक्तिभाग्य संतसंगें॥ २॥ येर क्रियाकर्म करितां हो कली। माजीं कोण बळी तरले सांगा॥ ३॥ नामा म्हणे मज सांगितलें संतीं। यापरती विश्रांति आणिक नाहीं॥ ४॥

२०३९. विष्णूचें सेवन जये गांवीं पूजा। नित्य तया द्विजा समारंभु॥ १॥ घरीं वृंदावन नित्य अन्नदान। श्रीकृष्ण आपण तेथें असे॥ २॥ ऐसी ध्यानगती विष्णूचें पूजन। तयासि पतन नाहीं नाहीं॥ ३॥ नामा म्हणे करा विष्णुकथा नित्य। रामनाम सत्य वचन धरा॥ ४॥

२०४०. संतांचे घरीं जाहला पाहुणेर। नामाचा वोगर वाढियला॥ १॥ घ्या रे ताटभरी घ्या रे ताटभरी। जेवा पोटभरी रामनाम॥ २॥ पायरव होईल दुर्जना न सांगावें। एकांतीं सेवावें म्हणे नामा॥ ३॥

२०४१. तप न करिसी जप हृषीकेशी। नाम अहर्निशीं राघोबाचें॥ १॥ तीर्थाचें हें तीर्थ नाम हें समर्थ। होईल कृतार्थ रामनामीं॥ २॥ साधेल साधन तुटेल बंधन। वाचें नारायण सुफळ सदा॥ ३॥ नामा म्हणे हरिनाम तें उच्चारी। तरीच उद्धारी इहलोकीं॥ ४॥

२०४२. व्रत तप न लगे करणें सर्वथा। न लगे तुम्हां तीर्था जाणें तया॥ १॥ आपुलेच ठायीं असा सावधान। करा हरिकीर्तन सर्वकाळ॥ २॥ न लगे तें कांहीं वर्जावें अन्न जीवन। लावा अनुसंधान हरीचे पायीं॥ ३॥ न लगे योग याग न लगे संतत्याग। असों द्या अनुराग हरीचे पायीं॥ ४॥ न लगे निरंजनीं करणें वास तुम्हां। दृढ धरा प्रेमा हरीचे नामीं॥ ५॥ नामा म्हणे नाम दृढ धरा कंठीं। तेणें देईल भेटी पांडुरंग॥ ६॥

२०४३. तेहतीस कोटींची केली सोडवण। तो हा राम जपून धरा वेगीं॥ १॥ राघवाचें नाम वाचेसी उच्चारा। निजाचा सोयरा रामचंद्र॥ २॥ सागरीं ह्या शिळा तारिल्या अवलीळा। ब्रह्मयाची बाला उद्धरिली॥ ३॥ रावण कुंभकर्ण विदारिले बाणीं। दिधली राजधानी शरणागता॥ ४॥ वाल्मिक भविष्य कथूनियां गेला। रामें पवाडा केला तिहीं लोकीं॥ ५॥ नामा म्हणे रामनाम हें दुर्लभ। शिव स्वयंभ हेंचि जपे॥ ६॥

२०४४. अवघे हो ऐका अवघे श्रवणीं। अवघेचि होऊनि एकचित्त॥ १॥ विठोबाचें नाम अवघेंचि गोमटें। विचारीं नेटेंपाटें आपुल्या मनीं॥ २॥ अवघी हेचि क्रिया अवघें हेंचि कर्म। अवघा हा स्वधर्म सत्य जाणा॥ ३॥ अवघें हें सगुण अवघें हें निर्गुण। अवघें हें परिपूर्ण शुद्धबुद्ध॥ ४॥ अवघा हा आचार अवघा हा विचार। अवघा हा संसार सर्व काळ॥ ५॥ अवघा जेणें दुरी ठाके भवभ्रम। निरंतर नाम गाय नामा॥ ६॥

२०४५. गुरुराव गुण गंभीरवो वावो चैतन्य प्रकाशु। योगी सहज सुकामिनी विलासु॥ ध्रु०॥ चिदानंदघनु तनु सांवळावो हरि पाहतां निवती लोचन। तनुमन चरणीं वो गुंतलीं नाम गोपाळाचें अमृत समान॥ १॥ पितांबरशेला माळ कंठीं या रावो गोपाळा। मुगुटीं झळाळ सर्वांगीं कस्तुरीचें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विलेपन कटीं रुळे वनमाळा॥ २॥ येणेंचि जन्में पाविजे गोपाळासी आनु सार। श्रीवत्सलांछन हेचि खूण विष्णुदास नामयादातार॥ ३॥

२०४६. चेईला तो जाण रे सद्‌गुरुवचनीं निर्धार रे। विपरीत भावना विसर पडिला कंठीं जया परिहार रे॥ १॥ आपणा पैं पहावया कवण लावूं दिवा रे। चंद्र सूर्य जेणें प्रकाशे तो मी कैसा पाहूं रे॥ २॥ अंत त्यासी नाहीं रे स्थान मान काहीं रे। चेईला तेणें ओळखीला येरासी भाई रे॥ ३॥ पूर्व पश्चिम दक्षिण उत्तर नाहीं दाही दिशा रे। महालक्ष्मी सप्त सागर एक होती अनुभविया तो तैसा रे॥ ४॥ दाही दिशा व्यापूनियां तो अंधकार महा रे। रविप्रकाश जाहल्या आपेआप निसरला रे॥ ५॥ काष्ठीं पावक उपजला तोही तया सम रे। नामा म्हणे केशीराजा चेईल्या आम्हां तुम्ही रे॥ ६॥

२०४७. गुरूच्या वचनें होईल पैं ज्ञान। न कळे प्रेम खूण विठोबाची॥ १॥ वेदीं हें विचारा पुराणातें पुसा। विठोबाचा कैसा प्रेमभाव॥ २॥ साधकासी सिद्धि होईल पैं प्राप्ति। न कळे निरूति प्रेमखूण॥ ३॥ नामा म्हणे सोडा जाणीवेचा सीण। संतांची हे खूण जाणे संत॥ ४॥

२०४८. कृपेचा कोंवळा रघुनाथ दास। धरीन त्याची कास सर्वभावें॥ १॥ सांडूनि सर्व संगु होईन शरणागत। करिती मनोरथ पूर्ण माझे॥ २॥ भवसिंधूचा पार उतरोनि निर्धारी। त्यापरती सोयरीं नाहीं सृष्टी॥ ३॥ अंतरींचें गुज सांगती श्रवणीं। अमृत संजीवनी रामनाम॥ ४॥ तेणें त्रिविध ताप हरती मनींचे। जाणती जीवींचे झाले कष्ट॥ ५॥ तो जीवलग जननी परिस लोभापरु। सर्वस्व उदारु प्राणसखा॥ ६॥ नामा त्याचे बळें झेलतु यमासी। रिघोनि पाठीसी केशवाच्या॥ ७॥

२०४९. मी माझें म्हणतां अर्थ जोडितां साहिचक्र गेलें। नळ नीळ मांधाता पुरुषार्थी सारिखे तेहि काळें ग्रासीयले। कपील महामुनी सिद्ध विचारितां सगरराये पैं भंगा गेले। कुमार अंतःपूर सांडुनियां ते भक्तराज कायझालेरेरे॥ १॥ संसार स्वप्न जाणूनियां शरण रिघेपंढरिरायारेरे॥ ध्रु०॥ दुंदुभिरायें धर्म चालविला तेणें शांतिचा सागर म्हणविलें। अजपळ जैपाळ राजा दशरथ सूर्यवंशीं ते जन्मले॥ २॥ जळींचे तरंग जळींच निमाले नेणों तेथें काय झालें। राम लक्ष्मण भरत शत्रुघ्न सांग पां ते काय झालेरेरे॥ ३॥ सूर्यवंशीं राजा हरिश्चंद्र जन्मला स्वप्न तेणें काय साच केलें। स्त्रीपुत्रातें विकुनियां तेणें ब्राह्मणां सुखीया पैं केलें। शिबी चक्रवर्तीनें आपुले प्राण देऊनी जीव ते भक्तराज काय झालेरेरे॥ ४॥ शरीराचें मुद्गले सामास कवण वेंचि ऋषि भोजनासी आलें। स्त्रीपुत्रातें वेंचूनियां तेणें अतीता सुखी केलें। सत्त्व पहावया कैलासीचा राणा कांतीपूरनगरीं उजू ठेले। श्रीयाळ पोटींचें बाळक दिधलें सांग पां तें काय झालेरेरे॥ ५॥ कौरवां पांडवां अति दळ संग्राम अठरा अक्षौहिणी रणासी आले। नव वेळ नारायण आले गेले परी अकरा रुद्र गणतीसी आले। छप्पन्नकोटी यादवें तीं कृष्ण भालुका तीर्थी निमाले। नामा म्हणे ऐसे कल्पनेचे अवघे परंपरी भजिन्नले॥ ६॥

२०५०. तत्त्वमसी वाक्य उपदेशिलें तुज। तें तूं जीवीं कां अझून धरिसी दूर॥ ध्रु०॥ त्रिभुवनापरता धांवतोसी दुरी। आधीं तूं आपुली शुद्धि करीं। उदय अस्तु झाला कवणीये घरीं। पिंडामाझारीं पाहे पां॥ १॥ जाग्रतीमध्यें कवण जागतें। दोहीमाजीं स्वप्न कोण देखतें। सुषुप्तीमध्यें कोण नांदतें। मग अनुवादतें तें कवण॥ २॥ जाग्रती वरोनी करीं चिंतन। सुषुप्तीमाजीं रीघे ज्ञान। दोन्हींमाज़ीं स्वप्न देखे कवण। जीव कीं मन सांग पां॥ ३॥ निद्रा मरण हें एक स्थान। दोहींचा देखणा जाणें आपण। लहान सुईंच्या इंधनाहून। आढळलें मन पांचासीं॥ ४॥ इंद्रियें चपळ चेइलीं। जागत होतीं तीं कां परतलीं। जाऊनियां कवणा घरीं लपालीं। मना मिळालीं कवणें गुणें॥ ५॥ सांगतां तेथें अनुवाद कैंचा। नाहीं तूंपण खुंटली वाचा। विष्णुदासा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामा वोळिला साचा। परम पदीं बैसलासे॥ ६॥

२०५१. संसार सागरीं रे। माझें माहेर पंढरपुरीं। विठोबा बाप माझा। माता रखुमाई सुंदरी॥ १॥ पुंडलिक भाऊ माझा। तोही नांदे बरव्यापरी। सासुरें दुर्बळ भारी। मज मोकलीले दुरी॥ २॥ सुख दुःख कवणा सांगूं। माझें माहेर पंढरपुरीं॥ ध्रु०॥ भ्रतार निष्ठूर वो। काम क्रोध दोघे दीर। आशा हे सासू माझी। ते मज गांजितसे थोर॥ ३॥ तृष्णा हे नणंद सखी। तिनें व्यापियले घरीं। भक्ति हे माझी बहिणी। ते मज होईल निर्धारी॥ ४॥ वर्ष महिने दिवस घडिया। वाट पाहे अझुनी। देहामाजीं करिती देखा। न्यावया न पवे कोणी॥ ५॥ गजेंद्र हरिश्चंद्र त्यासी। सोडावया आला। प्रल्हाद अंबऋषि। तिहीं तुझा धांवा केला॥ ६॥ उपमन्यू दूध मागतां। क्षीरसागरु दिला। गजेंद्र अजामेळ। त्यांच्या सत्त्वा तूं पावला। नामया विष्णुदास। गीतीं गोविंदु गाईला॥ ७॥

२०५२. बोलवरी बोलती। श्रुति वाखाणिती। हरि पाविजे ती गति। वेगळी असे॥ १॥ तुज न पवे गा तें स्वप्न। हरिशब्द एकचि ब्रह्म। पाविजे तें वर्म। वेगळें असे॥ २॥ एक जाणीव खटपट। करिती ते सैराट। हरि पाविजे ती वाट। वेगळी असे॥ ३॥ एक आहेत तार्किक। चार्वाकादि वादक। हरि पाविजे तें सुख वेगळें असे॥ ४॥ एक चातुर्यवक्ते। व्युत्पन्न कवित्वें। संत रंजविते। लोकाचारी॥ ५॥ जिहीं तुज जाणितलें। तिहीं मौन धरिलें। नामा म्हणे ते पावले। भक्तियोगें॥ ६॥

२०५३. आम्हां संगती नावडे कांहीं। म्हणोनि झालों बा विदेहीं। दुःखमूळ संगतीचें। आम्ही नव्हों या गांवीचे॥ १॥ आम्हा नाहीं रूप गांव। वस्तीसी नाहीं एक ठाव। मग घ्या इच्छेसी धांव। आम्ही नव्हों त्या गांवीचें॥ २॥ स्नान केलें गंगातीरीं। गंध लाविलें पंढरपुरीं। संध्या केली कृष्णातीरीं। आम्ही त्या नव्हों गांवींचे॥ ३॥ भिक्षा केली कोल्हापुरीं। भोजन केलें महाद्वारीं। निद्रा केली माहुरीं। आम्ही नव्हों त्या गांवींचे॥ ४॥ ऐसियाची संगत करीं। त्याचे चरण हृदयीं धरीं। नामा म्हणे या संसारीं। आम्ही नव्हों त्या गांवींचे॥ ५॥

२०५४. कळावंतांच्या कळाकुसरी। त्या मी नेणें गा श्रीहरी॥ १॥ वारा धांवे भलत्या ठायां। तैसी माझी रंगछाया॥ २॥ प्रेमभातें भरलें अंगीं। तेणें छंदें नाचे रंगीं॥ ३॥ घातमात नेणें देवा। नामा विनवितो केशवा॥ ४॥

२०५५. पावावया ब्रह्मपूर्ण। सांडुनि देईं दोषगुण॥ १॥ सर्वांभूतीं समदृष्टी। हेचि भक्ति गोड मोठी॥ २॥ यावेगळें थोर नाहीं। बरवें शोधूनियां पाहीं॥ ३॥ येणें संसार सुखाचा। म्हणे नामा शिंपियाचा॥ ४॥

२०५६. भक्तिप्रतापें पावलों मी सुपंथ। सफळ निश्चित परमार्थ॥ १॥ देव सर्वांभूतीं असतां प्रगट। निर्वाणी चोखट भक्ति जाण॥ २॥ धरूनियां मनीं जपसील नाम। तेणें निजधाम पावसील॥ ३॥ जप तप ध्यान न लगे साधन। भक्ति ते कारण नामा म्हणे॥ ४॥

२०५७. माझिया मनें मज उपदेश केला। तो मज बिंबला हृदयकमळीं॥ १॥ निर्वाणींची एक सांगितली खूण। कैवल्य चरण केशवाचे॥ २॥ वेदशास्त्र श्रुति आणीक पुराणें। पढोनि जाणणें हेंचि सत्य॥ ३॥ क्रिया कर्म धर्म करणें ज्या कारणें। ते खूण निर्वाण चरण हेचि॥ ४॥ जप तप अनुष्ठान करोनि साधन। प्रत्यक्ष निधान चरण हेचि॥ ५॥ नामा म्हणे मज कळलें अनुभवें। न विसंबें चरण जीवें तुझे॥ ६॥

२०५८. अच्युता अनंत गोविंदा। अरे मेघश्यामा तूं आत्मया रामा रे॥ १॥ आत्मया तूं रामा रे। म्हणा म्हणा गोविंद नामा रे॥ २॥ ऐसें तुझें ध्यान लागों आम्हां रे। नामयाचा स्वामी पंढरीराणा रे॥ ३॥

२०५९. द्वारावती भुवना गेलों। शंख चक्र घेउनी आलों॥ १॥ वाटे प्रपंचें धरियेलों। रामनामें सोडविलों॥ २॥ शंखचक्र भरुनी केणें। द्वारावती

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

केलें पेणें ॥ ३ ॥ नामा म्हणे लाभ झाला । फुकासाठीं हरी जोडला ॥ ४ ॥

मनास उपदेश

२०६०. अरे अलगटा माझिया तूं मना। किती रानोराना हिंडविसी ॥ १ ॥ विठोबाचे पायीं दृढ़ घालीं मिठी । कां होसी हिंपुटी वांयांविण ॥ २ ॥ क्रिया कर्म धर्म तुज काय चाड । जवळी असतां गोड प्रेमसुख ॥ ३ ॥ संकल्प विकल्प सांडीं तूं समूळ। राहे रे निश्चल क्षणभरी ॥ ४ ॥ आपुलें निजहित जाण तूं त्वरित । वासनारहित होईं वेगीं ॥ ५ ॥ नामा म्हणे तुज ठायींचें कळतें । सोसणें कां लागतें गर्भवास ॥ ६ ॥

२०६१. दाही दिशा मना थांवसीं तूं सईरा न चुकती येरझारा कल्पकोटी ॥ १ ॥ विठोबाचे नामीं दृढ धरीं भाव। येर सांडीं वाव मृगजळ ॥ २ ॥ भुक्ति मुक्ति सिद्धि जोडोनियां कर । करिती निरंतर वळगणें ॥ ३ ॥ नामा म्हणे मना धरीं तूं विश्वास। मग गर्भवास नव्हे तुज ॥ ४ ॥

२०६२. अरे मना तूं मर्कटा । पापिया चांडाळा लंपटा। परद्वार हिंडसी सुनटा। अरे पापी चांडाळा ॥ १ ॥ अरे तुज पापावरी बहु गोडी। देवाधर्मी नाहीं आवडी । तेणें न पावसी पैलथडी । कर्म बांदवडी पडिसील ॥ २ ॥ अरे तूं अभिलाषिसी परनारी । तेणें सिद्धपंथ राहेल दुरी । जवळीं येईल यमपुरी । आपदा पावसील ॥ ३ ॥ आतां तुज वाटतसे गोड । अंतकाळीं जाईल जड । महादोषें येति सुख आड । करतील कईवाड यमदूत ॥ ४ ॥ माझें शिकविलें नाइकसी । आतां सांगेन बळिया केशवासी । धरूनि नेईल वैकुंठासी । चरणीं जडसी म्हणे नामा ॥ ५ ॥

२०६३. हें गे आयुष्य हातोहातीं गेलें । आंगीं आदळलें जन्ममरण ॥ १ ॥ कां रे निजसुरा दैवहत मना । आपुली सूचना न करिसी ॥ २ ॥ कां रे तुज भ्रांति पडलीसे मूढा । वेढी चहूंकडा काळ सैन्य ॥ ३ ॥ नानारोगें तुझी काया वेधियली । नरकाचीं भरलीं नवही द्वारें ॥ ४ ॥ पाळिलीं पोशिलीं आप्त माझीं सखीं । अंतीं तुज पारखीं होती जाण ॥ ५ ॥ नामा म्हणे तुज येतों लोटांगण। तारील नारायण भरंवशानें ॥ ६ ॥

२०६४. उत्कंठित तप एक विठ्ठलनाम । आतां क्रियाकर्म कोणालागीं ॥ १ ॥ राहे रे तूं मना राहे रे निवांत । ध्यायीं अखंडित नारायण ॥ २ ॥ संतसमागमें साधीं हें साधन । पावसी निर्वाण नित्य सुख ॥ ३ ॥ नामा म्हणे तूं सहज सुखरूप । होऊनि निर्विकल्प विचारी पां ॥ ४ ॥

२०६५. क्षण एक मना बैसोनि एकांतीं । विचारीं विश्रांति कोठें आहे ॥ १ ॥ लक्षचौऱ्यांशींच्या करितां येरझारा । शिणलासि गव्हारा वेळोवेळां ॥ २ ॥ अझूनि तुज लाज न वाटे पैं कैसी। नरकाचे द्वारासि जावें किती ॥ ३ ॥ दुर्लभ आयुष्य मनुष्य देहींचें । जातसे मोलाचें वांयांविण ॥ ४ ॥ खापराचे साठीं सांडिला परिस। गहिंवरें फुटतसे हृदय माझें ॥ ५ ॥ पुत्रकलत्रादिक सुखाचीं सोयरीं । त्यांची ममता थोरी धरिली तुवां ॥ ६ ॥ अनुदिनीं पाळितां अनुभवेंचि पाहे । कोण सुख आहे तयाजवळी ॥ ७ ॥ जगाचा जीवलग मायबाप आपुला। तो तुवां दुराविला केशिराज ॥ ८ ॥ स्वप्नींचिया धना लुब्धलासि काय । आलें काळभय हाकित तुज ॥ ९ ॥ संतापाचें सदन शोकाचे पुतळे। ते त्वां मानियले हितकारी ॥ १० ॥ कैंची सुखनिद्रा इंगळाचे शेजे । प्रलया आणूनि तुझे तूंचि पाही ॥ ११ ॥ तुज राखेल कोण येवढिये संकटीं। रिघसी ज्याचे पोटीं मरणाभेणें ॥ १२ ॥ आदि मध्य अवसानीं सोडविल निर्वाणीं। तया चक्रपाणि सेवि वेगीं ॥ १३ ॥ जो जो क्षण लाविसी हरिभजनाकडे । तो तो सांठी पडे सार्थकीं रे ॥ १४ ॥ नामा म्हणे तुजचि येतों काकुळती । सोडिं रे संगती वासनेची ॥ १५ ॥

२०६६. वासनेची करणी ऐकें तूं मना । या केली रचना ब्रह्मांडाची ॥ १ ॥ निर्गुण चैतन्य सदा सुखरासी । त्या दिली चौऱ्यांशी लक्ष सोंगें ॥ २ ॥ ऐसी हे लाघवी खेळे नाना खेळ। तेथें तूं दुर्बळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काय करिसी ॥ ३ ॥ क्षण एक चंचळ क्षण एक निश्चळ। क्षण एक विफळ सावध करीं ॥ ४ ॥ क्षण एक कृपाळ क्षण एक निष्ठुर। क्षण एक उदार कृपण करीं ॥ ५ ॥ क्षण एक सात्त्विक क्षण एक राजस। क्षण एक तामस करोनि सांडीं ॥ ६ ॥ क्षण एक विश्रांति तप्त करीं ॥ ७ ॥ क्षण एक आवडे क्षण एक नावडे। क्षण एक विघडे घडलें सुख ॥ ८ ॥ ऐसी लाघवी पाहतां क्षणभंगुर। ब्रह्मादि हरिहर ठकिले जेणें ॥ ९ ॥ नामा म्हणे तरीच इचा संग तुटे। दैवयोगें भेटे संतसंग ॥ १० ॥

२०६७. वेदीं तोचि शास्त्रीं सर्वांठायीं तोचि। पुराणांत तोचि अंतःकरणीं ॥ १ ॥ नाम सदा ध्यायीं नाम सदा ध्यायीं। रामनाम ध्यायीं अरे मना ॥ २ ॥ नामा म्हणे देह नाहीं पुनरुपें। केशवनाम सोपें उच्चारीं बापा ॥ ३ ॥

२०६८. धरीं रे मना तूं विश्वास या नामीं। अखंड रामनामीं ओळखी धरीं ॥ १ ॥ जप करी ऐसा अखंड खंडेना। निशिदिनीं मना होय जागा ॥ २ ॥ नामा म्हणे मना होईं रामरूप। अखंडित जप सोहं सोहं ॥ ३ ॥

२०६९. प्रेमामृत सरिता पवित्र हरिकथा। त्रिभुवनींच्या तीर्थां मुगुटमणि ॥ १ ॥ तेथें माझ्या मना होईं क्षेत्रवासी। राहें संतांपाशीं सुख घेतां ॥ २ ॥ ऐहिक्य परत्र दोन्हीं समतीरीं। परमानंदलहरी झेंपावत ॥ ३ ॥ मुक्तांचें जीवन मुमुक्ष माउली। शिणल्या साउली विषयासक्तां ॥ ४ ॥ परमहंसकुळ सनकादिक सकळ। राहिले निश्चळ करोनि चित्त ॥ ५ ॥ नामा म्हणे मना सोइरे हरिजन। तारक त्यांचे चरण दृढ धरीं ॥ ६ ॥

२०७०. अरे मना शोक करिसी किती। हें तंव वांयां धनसंपत्ति। आयुष्य भविष्य नाहीं तुझिये हातीं। हें अवघे अंतीं जायजणें ॥ १ ॥ एक अर्बुद साठी कोटि देखा। तीस लक्ष दहा सहस्त्र लेखा। सात शतें नवमास मापा। तया हिरण्यकश्यपा काय झालें ॥ २ ॥ चौदा चौकड्या लंकानाथा। नव्याण्णव सहस्त्र राया दशरथा। तेही गेले स्वर्गपंथा। मार्गे सर्वथा नुरलेचि ॥ ३ ॥ चौदा कल्प मार्कंडेया पडे। तैं लोमहर्षणाचा एक रोम झडे। बकदालभ्याचे निमिषें मोडे। गेले येवढे अरे मना ॥ ४ ॥ बदकालभ्याचे पुरे निमिषें। तें वटहंसाचें उपडे पिच्छ। तयासि होता मृत्युप्रवेश। तो एक श्वास भृशुंडीचा ॥ ५ ॥ मरणांत पुरे भृशुंडीचा। तैं एक दिवस कूर्माचा। नामा विनवी केशवाचा। वेगीं विठोबाचा पंथ धरा ॥ ६ ॥

२०७१. गणपति पूजिले तें दोंदिल भले। वैष्णव न भले अरे मना ॥ १ ॥ सीतळा पूजिली ते म्हइसे भले। वैष्णव न भले अरे मना ॥ २ ॥ मैराळ पूजिले ते वाघे भले। वैष्णव न भले अरे मना ॥ ३ ॥ सूर्य पूजिले ते घोडे भले। वैष्णव न भले अरे मना ॥ ४ ॥ नामा म्हणे जे कां विठ्ठलीं भजिले। ते वैष्णव भले सत्य मना ॥ ५ ॥

२०७२. धांवत धांवत जाईन वोरसे। दाटला उल्हासे कंठ माझा ॥ १ ॥ अंतरींचें गुज सांगेन आपुलें। हृदयीं दाटले प्रेमअश्रु ॥ २ ॥ पीतांबर छाया करुनि भक्तांसी। सांगेन मी खंती तयापुढें ॥ ३ ॥ संतसमागमें दावी कवतुक। पाठवी भातुकें देऊनियां ॥ ४ ॥ नामा म्हणे मज आहे भरंवसा। मना तूं विश्वास दृढ धरीं ॥ ५ ॥

२०७३. नको नको मना हिंडों दारोदारीं। कष्ट झाले भारी वांयांविण ॥ १ ॥ कल्पना सांडोनि संतसंगें राहीं। सर्व त्याचें पायीं सुख आहे ॥ २ ॥ ज्याचिया दर्शनें शोक मोह जळे। पाप ताप पळे काळभय ॥ ३ ॥ जवळीच देखती पायाळावांचून। तें सुख निधान वैकुंठींचे ॥ ४ ॥ नामा म्हणे आली शेवटील घडी। तों घेईं आवडी हाचि एक ॥ ५ ॥

२०७४. लाजो नको मना हरीच्या कीर्तना। संसार पाहुणा दो दिवसांचा ॥ १ ॥ कंठीं नाहीं आइती म्हणोनि सांडूं नको ज्योति। इतुकिये भ्रांति पडूं नको ॥ २ ॥ बाळकाचे बोल माउली प्रीति करी। तैसी कीर्ति हरी परिसे चित्तें ॥ ३ ॥ भलतियापरी बोले बा श्रीहरी। तो भवसागरीं तारील जाणा ॥ ४ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येणें तारुण्यपणें भ्रमलासि झणीं। भोगिसी पतनीं जन्मांतरीं॥ ५॥ तूं होय मागता हरि होय दाता। शरण जाईं अनंता म्हणे नामा॥ ६॥

२०७५. देवा तुझें मी चाटारु। सहस्रा एका हाकीं करूं। लाभ होतसे अपारु। घडी घडीये माझारी॥ १॥ तुझ्या पायांची जोडी। त्यासि होतसे परवडी। आवारु न लाहें एक घडी। नंदप्रिय होतसे॥ २॥ मुदल पुसतसे वेळोवेळां। हा मना रे पापी चांडाळा। सांगा चोविसां आगळा। कवणेपरी न धाय॥ ३॥ वासना मागतसे तुज। हे द्यावी जी मज। दाटणी होतसे सहज। म्हणवोनि मज अंकीतसे॥ ४॥ नामा म्हणे जी दातारा। तुझिये भेटी सारंगधरा। लाभ होतसे अपारा। घडी घडीये विठ्ठला॥ ५॥

२०७६. मन धांवे सैरावैरा। मन मारूनि केलें एकमोरा॥ १॥ मन केलें तैसें होय। मन धांवडिलें तेथें जाय॥ २॥ मन लांचावलें न राहे। तत्त्वीं बैसलें कधिं नव जाये॥ ३॥ नामा म्हणे सोहंशुद्धि। मन वेधलें गोविंदीं॥ ४॥

२०७७. सुख दुःख जिवाचें सांगेन आपुलें। हृदय फुगलें फुटो पाहे॥ १॥ धरूनि पीतांबर नेईन एकांतीं। सांगेन जीवींची खंती तयापुढें॥ २॥ संतसमागमें खेळवील कौतुकें। प्रेमाचें भातुकें देऊनियां॥ ३॥ अंतरींची आवडी तोचि जाणे एक। जिवलग जनक पंढरीराय॥ ४॥ नामा म्हणे ऐसा आहे पैं भरंवसा। मना तूं विश्वासा दृढ धरी॥ ५॥

२०७८. मनाचें मनपण सांडितां रोकडें। अंतरींचें जोडे परब्रह्म॥ १॥ नाथिला प्रपंच धरोनियां जीवीं। सत्य तें नाठवी कदाकाळीं॥ २॥ अझूनि तरी सांडी नाथिलें लटिकें। तरसील कवतुकें म्हणे नामा॥ ३॥

२०७९. परब्रह्म विश्वाकारें अवतरलें भक्तिकाजा। मूर्ति सुनीलु सावळी केशिराजु स्वामी माझा॥ १॥ गोविंदा रे तुझें ध्यान लागो मना। पाहिजे प्रेमपद निर्मळ होत ज्ञाना॥ २॥ मन हें वोवरी असे सुमनाचे चित्रशाळीं। दोन्ही चरण सुकुमारें वरी अष्टदळ कमळीं॥ ३॥ संध्याराग रातले सुनीळ दिशातळवटीं। ध्वज वज्रांकुश चिन्हें साजती गोमटीं॥ ४॥ इंदिरा तिथें थोकली तिच्या सुखा नाहीं पारु। ते चरणीं स्थिर झाली म्हणोनी म्हणती लक्ष्मीवरु॥ ५॥ घवघवीत वांकी चरणीं ब्रिदाचा तोडरु। नखप्रभा फांकली तिनें लोपला दिनकरु॥ ६॥ सृष्टि घडीत मोडीत उत्पत्ति स्थिति प्रळय अवघे नवें। तो चतुर्मुख ब्रह्मा चरण पूजितो स्वभावें॥ ७॥ देवाधिदेव शंभु कैलासींचा राणा। गंगा मुगुटीं धरिली तिचा जन्म अंगुळीं चरणा॥ ८॥ दैत्यकुळीं जन्मला देव पळती ज्याचेनि धाकें। पावो पाठिसी लागला म्हणऊनि दारवंटा राखे॥ ९॥ शेष वर्णितां श्रमला वेद परतले माघारी। नामा म्हणे अरे मना याचे चरण धरीं झडकरी॥ १०॥

२०८०. पृथ्वी ध्यासी तरी पृथ्वीचि होसी। केशव न होसि अरे मना॥ १॥ आप ध्यासी तरी आपचि होसी। केशव न होसि अरे मना॥ २॥ वायु ध्यासी तरी वायुचि होसी। परी केशव न होसि अरे मना॥ ३॥ आकाश ध्यासी तरी आकाशचि होसी। परी केशव न होसि अरे मना॥ ४॥ नामा म्हणे जरी केशवासी ध्यासी। तरी केशवचि होसी अरे मना॥ ५॥

२०८१. धणीवरी ध्यान करीं कां रे मना। या सुखनिधाना विठोबाच्या॥ १॥ पंढरीये तैसें सुख आहे त्याचे पायीं। अनुसरोनि राही एकवेळ॥ २॥ श्रीमुख साजिरें पाही दृष्टिभरी। जीवित्वाचें करीं निंबलोण॥ ३॥ जेणें लक्ष धरोनि आहे पुंडलीक। तोचि भाव एक दृढ धरीं॥ ४॥ नलगे गुरुमंत्र नलगे जप तप। उघडें स्वरूप विटेवरी॥ ५॥ नामा म्हणे जरी निकट संतचरण। तरीच प्रेमखूण पावसील॥ ६॥

२०८२. संसारीं असतां जीवन्मुक्त आम्ही। विठ्ठल हे नामीं विनटलों॥ १॥ काया क्लेश करणें शरीर दंडणें। न लगे हिंडणें दाही दिशा॥ २॥ कोण वाहे मंत्र वाउगी खटपट। गाऊं निष्कपट

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रामनाम॥ ३ ॥ नामा म्हणे मज आहे हा भरंवसा। मना तूं विश्वासा दृढ धरीं॥ ४॥

२०८३. शोधोनियां चारी वेद। सार काढोनियां भेद॥ १॥ मना जाण जाण जाण। विठोबाची प्रेमखूण॥ २॥ साहि शास्त्रांचे संमत। मंथूनि काढिलें यथार्थ॥ ३॥ याज्ञिकांची जीवनकळा। उन्मनीचा जो जिव्हाळा॥ ४॥ नामा म्हणे माझे बापें। साधियलें संतकृपें॥ ५॥

२०८४. बोलिलें वेदांतीं ऐकिलें सिद्धांतीं। बोल नेति नेति अनिर्वाच्य॥ १॥ तोचि हा बोल बोल रे मना। बोल नारायणा समर्पावे॥ २॥ माझा मायबापें सोडवूनि गळा। केशवीं बांधला बोला बोल॥ ३॥ नामा म्हणे बोल बोलतांहि बोला। खेंचरें दाविला प्रेमभक्ति॥ ४॥

समाधियोगनिषेध.

२०८५. मुख्य मातृकांची संख्या। सोळा अक्षरें नेटक्या॥ १॥ समचरणीं अभंग। नव्हे ताळ छंदोभंग॥ २॥ चौक पुलिता विसर्ग। गण यति लघु दीर्घ॥ ३॥ जाणे एखादा निराळा। नामा म्हणे तो विरळा॥ ४॥

२०८६. सोळा त्या समाधि औट पीठामाझारी। तेथें नरहरि देव नांदे॥ १॥ बारा गुंफेमाजीं भ्रमर गुंफे मध्यें। तेथें आत्मा शुद्ध ज्ञान नांदे॥ २॥ गोल्हाटाचा भेद असेची आघवा। शुद्ध ज्ञानदिवा अलक्ष तो॥ ३॥ नामा म्हणे आम्हां तेजाच्या उजेडा। देव केला घोडा बैसावया॥ ४॥

२०८७. समाधिस्थ सदा राहे समाधान। निःशब्द म्हणणें याचिलागीं॥ १॥ राम तें समान नव्हती समाधान। समाधि बैसणें एकचित्तें॥ २॥ उन्मनी उपासना प्रेमाची दाटणी। आत्मरूप जनीं दिसतसे॥ ३॥ नामा म्हणे रूप डोळ्यांतील बाहुली। तीचि जगीं जाहली जगदाकार॥ ४॥

२०८८. वामांगीं बाहुली तूर्या दावी कळा। ते लक्षी पाउलां रामरूप॥ १॥ माया निजरूप दक्षिणांगीं वसे। तूर्याचा हा भास मावळला॥ २॥ मी माया म्हणतां पाहे आपणांतें। आत्माराम तेथें ज्ञानजळीं॥ ३॥ नामा म्हणे ज्ञान माया ते आपण। दृष्टीचें देखणें आत्मरूप॥ ४॥

२०८९. सत्य ज्ञानानंत गगनाचें प्रावर्ण। नाहीं रूप गुण गुणातीत॥ १॥ नाद ना भेद ना छंदें निरंतर। दोहींच्या विचारें ब्रह्म नांदे॥ २॥ येकवटी ब्रह्म आत्माराम रूप। तें पाहा स्वरूप लावण्याचें॥ ३॥ नामा म्हणे केलें चैतन्य जवळ। मांडियेला खेळ संतीं तेथें॥ ४॥

२०९०. चैतन्याचा खेळ एकवट ब्रह्म। निर्गुणासी गुण रूप जाहलें॥ १॥ चैतन्य त्या कळा रूपा आले संत। निर्गुणाचा हेत रामकृष्ण॥ २॥ खेळ मांडियेला गोल्हाट शिखरीं। गोलांगुळांगुळीं समाधिस्थ॥ ३॥ समाधी साधन अखंड उन्मनी। औटपीठ ध्वनी नाद होय॥ ४॥ नामा म्हणे तेथें चौक्या ज्या रंगल्या। अरंग मिरवल्या संतसंगें॥ ५॥

२०९१. खेळ मांडियेला गोल्हाट शिखरीं। अर्ध चंद्रावरी शेखी याचा॥ १॥ चोवीस त्या गुंफा रुद्रलिंगीं नांदे। अभेद तो वेद बोले तेथें॥ २॥ तीही अक्षरांच्या वाटेच्या सेजारीं। सोळा चंद्र नारी भेदाभेद॥ ३॥ सूर्य एकवीस शोभती चहूंकडे। खेळती उघडे संत तेथें॥ ४॥

२०९२. दृष्टीचें देखणें तेचि रूपमाया। शब्द बोलावया ज्ञान झालें॥ १॥ ज्ञानाची जी जागा हृदयीं पाहावी। सत्रावीसी दावी खेळ तेथें॥ २॥ सत्रावी जीवन माया तिचे पोटीं। ज्ञान झाली दृष्टि देखावया॥ ३॥ देखणें सिद्धांत बोलणें वेदांत। शब्द तोचि हेत सत्रावीचा॥ ४॥ नाद आणि भेद देखणें सिद्धांत। बोलणें वेदांत हेंचि दोनी॥ ५॥ हेत तो अहंकार दोहींतें नाचवी। अविद्येसी दावी निजसुरा॥ ६॥ नामा म्हणे सिद्ध देखणें हा जन्म। डोळ्यांमाजीं वर्म बोलिलें तें॥ ७॥

२०९३. अंतःकरणीं विष्णु तोचीं आत्मा असे। चंद्रमा भासे मन तेंची॥ १॥ बुद्धि ब्रह्मदेव चित्त नारायण। अहंकार जाण रुद्ररूप॥ २॥ ज्ञान

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आत्मे पांच ज्ञानीं ओळखावे। पांच ते पाहावे कर्मस्थानीं॥ ३॥ नामा म्हणे कैसें दाखवूं उघडें। वाटतसे कोडें मज आतां॥ ४॥

२०९४. षड्चक्र भेदोनी जातां ऊर्ध्वपंथें। ध्वनि अनुहात उमटे तेथें॥ १॥ तये ध्वनीमाजीं मग्न होय मन। योगसिद्धि जाण कैसी घडे॥ २॥ तेही वोलंडितां सिद्धि आडव्या येती। घेऊनियां जाती आपुल्या पंथें॥ ३॥ तेथें गुंतोनियां विचरती योगीजन। योगासी साधून काय होतें॥ ४॥ आधि तो साधितां कष्टाचे संभार। होय चकनाचूर शरीराचा॥ ५॥ साधितीया पुढें ऐसीं विघ्नें येतीं। ठेऊनि मागुती फिरती मागें॥ ६॥ वारियाची मोट कैसी बांधवेल। भलत्यासी सांगतां वाटेल हें लटिकें॥ ७॥ नामा म्हणे तुम्ही सोडोनियां भक्ति। करितां नाना युक्ति मूर्खजन॥ ८॥

२०९५. साधनाच्या माजीं एक गजराजू। साधी त्यासी उजू होय पहा॥ १॥ नासिकाचें वारें कोंडोनियां प्राणें। उफराटें जाणें ऊर्ध्वपंथें॥ २॥ गुदस्थानीं टांच देऊनियां जाण। कासावीस प्राण होती पहा॥ ३॥ गोल्हाट भेदिसा कोल्हाटीच नाहीं। विठोबाची ग्वाही नामा म्हणे॥ ४॥

२०९६. त्रिकूट शिखरावरी पाहे पां नवल। परी अखंडित धार वर्षे अमृताची॥ १॥ त्रिवेणीसंगमीं गगन निर्मळ वाहे। तेथें स्नान करूं जाय आनंदमय॥ २॥ गुरुमुखें स्नान करी परब्रह्मीं लक्ष धरी। अनुहात ध्वनिथोरी नाद गर्जे॥ ३॥ उन्मनी जागृति गोल्हाट मंडळा जाय। तेथुनी निराळें पाहे निजतत्त्वा॥ ४॥ विष्णुदास नामा म्हणे अनुभवी तोचि जाणे। आम्हीं गुरुखुणें वर्ततसों॥ ५॥

२०९७. मायेसी रुसलें भावासी त्यागिलें। जाऊनि राहिलें काकापासी॥ १॥ काकी मुख दावा काकी मुख दावा। काकी मुख दावा बाईयांनो॥ २॥ काकीचें श्रीमुख गोरक्षा लाधलें। काकीनें पुसिलें गोरक्षासी॥ ३॥ नामा म्हणे आम्हां काकी पैं बोळली। सत्रावी दिधली दोहावया॥ ४॥

२०९८. मुंगीस तो मार्गु सांपडे गोडीचा। योगीया लक्षीचा ज्ञान ज्योती॥ १॥ तरीच ओळखीजे केशवचरण। त्या जन्ममरण मग कैंचें॥ २॥ मत्स्य नानापरी क्रीडा खेळे जळीं। आनंदकल्लोळीं योगीराय॥ ३॥ नामा म्हणे तोचि केशव जाणता। तया नाहीं व्यथा गर्भवासु॥ ४॥

२०९९. पृथ्वीमाजी पाहतां नाहीं म्यां देखिला। हस्तिसी उडवीला ऐसा कोण्ही॥ १॥ शोधितां आलों पंढरीसी। तेथें ज्ञानोबासी देखियेलें॥ २॥ मोक्षमार्गी देवें हा गजराज बांधला। तो ज्ञानीउडाला गोल्हाटासी॥ ३॥ पृथ्वीमाजीं पाहतां ज्ञानीच कोल्हाटी। ढिसाळ हे दृष्टि तृणप्राय॥ ४॥ उडोनियां तेणें दर्शन घेतलें। हस्तीसी जिंकिलें ज्ञानदेवें॥ ५॥ याचिया इशाळे करील जो मूर्ख। पाहोनियां दुःख कष्टी होय॥ ६॥ धन्य ज्ञानदेव योग साधूनियां। भक्ति आचरोनियां दावी लोकां॥ ७॥ नामा म्हणे सर्व खटपट सांडोनि। पांडुरंग मनीं भावें ध्यावा॥ ८॥

प्रारब्धगति.

२१००. कृष्ण सहाय्य पांडवांसी। ते भोगिती नष्टचर्यासी। साह्य केलें हरिहरासी। प्रारब्ध कोणासी टळेना॥ १॥ ऐसी प्रारब्धाची ठेव। झाले भिक्षूक पांडव। राज्य घोडे भाग्य सर्व। सांडियेला ठाव प्रारब्धें॥ २॥ शरीर संचिता आधीन। धर्मराज हिंडे वन। कर्मे बुडाला रावण। आणि दुर्योधन प्रारब्धें॥ ३॥ अभिमानें शिशुपाळ। कृष्णहस्तें झाला काळ। यादव निमाले सकळ। केलें निर्मूळ प्रारब्धें॥ ४॥ कर्मरेखा टळेना। बाण लागला जगज्जीवना। कृष्णें सांडिलया गोपांगना। हें नारायणा प्रारब्ध॥ ५॥ कामबुद्धीचें सुख। अति मानिती ते मूर्ख। चंद्रासी लागला कलंक। इंद्रासी दुःख प्रारब्धें॥ ६॥ हरिश्चंद्र तारामती। घोर जन्मांतर भोगिती। नळराव पुरुषार्थी। तयाच्या विपत्ति प्रारब्धें॥ ७॥ पतिव्रता सुशीळ। दमयंती पायें पोळे। ऐसें अनिवार कपाळ। भोगी दुष्काळ प्रारब्धें॥ ८॥ ऐसीं अनिवार जन्मांतरें। राज्य सांडिलें रघुवीरें। सर्वे मळवूनि वानरें। फिरवी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दिगांतरें प्रारब्धें॥ ९॥ फिरत असतां कायझालें। पुढें प्रारब्ध ओढवलें। जानकीस राक्षसें नेलें। कष्ट भोगविले प्रारब्धें॥ १०॥ कर्मा आधीन शरीर। पूर्ण ब्रह्म रामचंद्र। रघुपति विष्णूचा अवतार। पाठीं जन्मांतर नामा म्हणे॥ ११॥

२१०१. सगुण समान भजती अंतरीं। सर्व भूतांतरीं असे एक॥ १॥ पाहा कोळियांची काय सांगों कीर्ति। विद्या अभ्यासिती मूर्तिपुढें॥ २॥ द्रौपदीचे घरीं होते उपवासी। देंठही लाविती अकस्मात॥ ३॥ नामा म्हणे मुख्य प्रारब्ध कारण। पांडुरंगाविण गति नाहीं॥ ४॥

२१०२. झाला कासावीस बाण लागतांची। प्रारब्धाची गति चुकवेना॥ १॥ चुकतां ते रेखा। क्रियामाण जाण॥ २॥ बाणें पश्चात्ताप अर्जुनाचे मनीं। शस्त्र चक्रपाणि धरीं न मी॥ ३॥ नामा म्हणे धरूं ऐसे याचे संगा। तारूं पांडुरंगा उभा असे॥ ४॥

२१०३. काय सांगों कर्मभोग। पातलिंग शिवाचें॥ १॥ याच सुखें ब्रह्मामुख। उभा नख छेदिला॥ २॥ सुचिष्मत पंडुपुत्र। भिक्षापात्र हिंडती॥ ३॥ नामा म्हणे कर्मरेखा। देवादिकां चुकेना॥ ४॥

२१०४. हरिश्चंद्रराजा होता सत्त्वगुणी। वाहातसे पाणी डोंबाघरीं॥ १॥ सत्य पतिव्रता तारामति राणी। राहिली भोगोनी कायाक्लेश॥ २॥ भरत ऐकतां मातेचें वचन। श्रीरामदर्शन कैसें घडे॥ ३॥ माता पिता सर्व अव्हेरी जनक। नामा म्हणे भाक प्रारब्ध हें॥ ४॥

रूपकरूपी उपदेश.

गोंधळ.

२१०५. प्रथम अवतारीं आई थोर ख्याति केली वो। ब्रह्मयाच्या कैवारा आपण मत्स्यरूप झाली वो। धुंडाळिला सागर आई शंखासुरा मिठी घाली वो। वधियले राक्षस ब्रह्मपुरी त्वां स्थापिलें वो॥ १॥ ऐसीं बहु लोकांमाझारी आई खेळतसे गोंधळीं वो। तेहतीसकोटि देवता सर्वे मेळवुनी मेळीं वो। त्रासिले राक्षस भक्त जनां प्रतिपाळीं वो॥ २॥ कूर्म वेष धरूनी धरणी पाठीवरी धरिली वो। महेंद्र मंथन मेळीं आंबा वेगीसी पावली वो। समुद्रमंथन करितां आई बरवा गोंधळ घाली वो। नारायण विश्वरूप देवा जैं त्वांच दिधलें वो॥ ३॥ वराह रूप धरुनी आई थोरपवाडा केला वो। पृथ्वीच्या कैवारा घालिसी गोंधळ गाढा वो। वधिला हिरण्याक्ष त्याचा केला त्वां रगडा वो। खेचर देवता धरणीं धरियली दाढा वो॥ ४॥ विक्राळ रूप धरूनी स्तंभ फोडुनी निघाली वो। सिंहनादें गर्जतां हाक त्रिभुवनीं गाजली वो। वधिला हिरण्यकश्यप अंतरमाळा गळां घाली वो। प्रल्हादकारणें कैसी गोधळीं नाचली वो॥ ५॥ इंद्राच्या कैवारा आई सानें रूप धरिलें वो। बळिच्या द्वारा जाऊन भूमिदान मागितलें वो। त्रिलोक मोजितां बळीस पाताळीं घातलें वो। मागुता येईल म्हणवुनी त्याचें द्वार त्वां रक्षिलें वो॥ ६॥ जमदग्नि रेणुके कुशीं धरियेला अवतार वो। हातीं परशु घेउनी केला दैत्यांचा संहार वो। एकविस वेळ मेदिनी निःक्षत्रिय करुनी फेडिला भूमिभार वो। वधिला सहस्त्रार्जुन कामधेनूच्या कैवारा वो॥ ७॥ पितृवचनाकारणें आई वनवासासी गेली वो। अठरापद्में वानर मेळवूनी गोंधळ घाली वो। वधिला दशशिरा लंका शरणागता दिधली वो। कौसल्या माउलि देवा बंदी सोडी केली वो॥ ८॥ वसुदेवकुळटिळके तरी तूं कौरव संहारिके वो। पांडव प्रतिपाळके भक्तजनासी तारके वो। तुझा गोंधळ गातां अंबे कोण वर्णूं शके वो॥ ९॥ वेदमार्ग सांडुनि असुरें देवा गांजियलें वो। त्याचिया कैवारा आई त्वां सौम्यरूप धरिलें वो। बौद्धरूप धरुनी भक्तालागीं मोहिलें वो। कौसल्या देवता जे त्या रूपें त्वां दिधलें वो॥ १०॥ कलियुगाच्या अंतीं थोर होईल अन्नात्र वो। एके ठायीं होउनी खातील चारी वर्ण वो। तेव्हां पृथ्वी भारें तुजला येईल शरण वो। तेव्हां तूं पावसी कलंकी अवतार धरुनी वो॥ ११॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पुंडलिकाकारणें पंढरपुरीं केला वास वो। तुझा गोंधळ गातां थोर जिवा उल्हास वो। तूं माये माउली तुझा मज बहु विश्वास वो। विनवी विष्णुदास नामा तुझा दासाचा मी दास वो॥ १२॥

२१०६. विठाई सांवळे डोळस रंगा येईं हो॥ ध्रु०॥ कानीं कुंडलाची प्रभा। जैसे चंद्रसूर्य नभा हो॥ १॥ गळां वैजयंती माळा। कासे पीतांबर पिवळा हो॥ २॥ नामा म्हणे कृपावंता। झडकरी यावें पंढरीनाथा हो॥ ३॥

डांक.

२१०७. वाजविली डांक चौक ठेवियला वो। ठायीं पंढरीचे विठ्ठले तुज हाकारा केला वो॥ १॥ रंगा येईं वो खेचरें विठाई सुंदरी वो। तुझीं पाउलें गोजिरीं कैं मी दृष्टि देखेन वो॥ २॥ पाजळला दीपु फिटला अंधकारु वो। न लावा उशीरु पांडुरंगे माउलीये वो॥ ३॥ तमोगुणाचा रज जाळूनि धूप केला वो। उशिरु कां लाविला पांडुरंगे माउलीये वो॥ ४॥ तनुमनाची मूद टाकीन तुजवरोनी वो॥ ५॥ वैकुंठवासिनी पांडुरंगे माउलीये वो॥ ६॥ अहंकार दैवतें झडपिलें नामयासी वो। येऊनियां रंगासी रंग राखीं आपुला वो॥ ७॥

पांगुळ.

२१०८. जंबुया द्वीपामाजीं एक पंढरपुरगांव। धर्माचें नगर देखा विठो पाटील त्याचें नांव। चला जाऊं तया ठायां कांहीं भोजन मागाया॥ १॥ विठोबाचा धर्म जागो। त्याचे चरणीं लक्ष लागो॥ ध्रु०॥ ज्याशीं नाहीं पंख पाय तेणें करावें तें काय शुद्ध भाव धरोनियां पंढरीसी जाय। इच्छिलें फळ देतो यासी नवलाव तें काय॥ २॥ सुदामा ब्राह्मण दुःखें दारिद्रे पीडिला। मुष्टिपोहे घेऊनि त्याचे भेटीलागीं गेला। शुद्ध भाव देखोनियां गांव सोनियाचा दिला॥ ३॥ गण आणि गोत्रज सर्व हांसताती मज। गेलें याचें मनुष्यपण येणें सांडियेली लाज। विनवी तो शिंपी नामा संतचरणींचा रज॥ ४॥

वासुदेव.

२१०९. बाबा अहंकार निर्शी घनदाट। गुरु वचनीं फुटली पहाट। माता भक्ति भेटली बरवंट। तिनें मार्ग दाविला चोखट गा॥ १॥ नरहरी रामा गोविंदा वासुदेवा॥ ध्रु०॥ एक बोल सुस्पष्ट बोलावा। वाचें हरि हरि म्हणावा। संत समागमु धरावा। तेणें ब्रह्मानंद होय आघवा गा॥ २॥ आला सीतळ शांतीचा वारा। तेणें सुख झालें शरीरा। फिटला पातकांचा थारा। कळीकाळासी धाक दरारा गा॥ ३॥ अनुहात वाजती टाळ। अनुक्षीर गीत रसाळ। अनुभवें तन्मय सकळ। नामा म्हणे केशव कृपाळु गा॥ ४॥

पिंगळा.

२११०. पिंगळा बोले महाद्वारीं। निशा सरली दिशा चारी। उठा उठा हो श्रीहरी। उदयो प्रकाशला दिनकरी॥ १॥ देवा शकून ऐकावा॥ ध्रु०॥ संत साधु अपरमित। अवघा भरिलेला थाट। टाळ वीणे वाद्य वाजत। आवडी मंजुळ स्वरें गात॥ २॥ नादें अंबर दणाणलें। तेहतीस कोटी देव मिळाले। आवडी पहावया आले। स्वर्गसुखातें विसरले॥ ३॥ आई रखुमाई माते। उठवा उठवा श्रीरंगातें। नारद तुंबर गायनातें। कर जोडुनि हनुमंत॥ ४॥ उठिला सांवळा वनमाळी। आनंदली भक्तमंडळी। जयजयकारें पिटली टाळी। विठ्ठलनामें दिधली आरोळी॥ ५॥ पिंगळा आनंदला मनीं। तेज न माये गगनीं। हर्षें घातली लोळणी। शिंपी नामा तुझे चरणीं॥ ६॥

खेळिया.

२१११. नव्हे तेंचि कैसें झालें रे खेळिया। नाहीं तेंचि दिसूं लागलें रे। अरूप होतें तें रूपासि आलें। जीव शिव नाम पावलें रे॥ १॥ आपलिच आवडी धरून खेळिया। आपआपणातें व्यालें रे। जोपनाकारणें केली बायको। तिनें एवढें वाढविलें रे॥ २॥ ऐक खेळिया तुज सांगितलें ऐसें। जाणुनि खेळ खेळे रे॥ धृ०॥ ब्राह्मणाचें पोर एक खेळासि भ्यालें। तें बारा वर्षें लपालें रे। कांपत कांपत बाहेर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आलें। तें नागवेंचि पळून गेलें रे॥ ३ ॥ साहा तोंड्या एक संभूचें बाळ त्यानें। बहुताचि बळ आथियेलें रे। खेळ खेळतां दगदगी व्यालें। तें कपाट फोडुनि गेलें रे॥ ४॥ चहूं तोंड्याचा पोर एक नारयाहि जाण। तो खेळियामाजीं आगळा रे। कुचालि करुनि पोरें भांडवी। आपण राहे वेगळा रे॥ ५॥ गंगा गौरी दोघी भांडवी। संभ्यासी धाडिलें राना रे। खेळ खेळे परि ठायीं न सांपडे। तो एक खेळिया शाहाणा रे॥ ६॥ खेळियामाजीं हनुम्या शहाणा न पडे कामव्यसनीं रे। कामचि नाहीं तेथें क्रोधचि कैंचा तेथें कैंचें भांडणा रे। रामा गड्याची आवडी मोठी। म्हणूनि लंके पेणरे॥ ७॥ यादवांचा पोर एक गोप्या भला। तो बहूतचि खेळ खेळला रे। लहान थोर अवघे मारिलीं। खेळचि मोडूनि गेला रे॥ ८॥ ऐसे खेळिये कोट्यानकोटी गणित नाहीं त्याला रे। विष्णुदास नामा म्हणे वडील हो पहा देही शोधुनि रे॥ ९॥

कूट.

२११२. एका ब्राह्मणाचे घरीं खाण पडिलें। सातां चोरीं एक मुसळ नेलें। बापुडें ब्राह्मण नागविलें। धाऊनि आलें वोसगांवींचें॥ १॥ वोसगांवींचा हनुमंत खोटा। त्याचा बाप जुनाट चोरटा। मारूनि नेतो दाही वाटा। जन चोहटा नागविलें॥ २॥ नागविला चोहाटीचा वाणी। आणिक नेली प्रभुची गोणी। शेळी आली लांडगा घेउनी। गाढव बंदीखानीं बोंबलत॥ ३॥ एका संन्याशानें कुतरें खादलें। गांवच्या खाटका प्रायश्चित्त दिलें। बापुडे कुंभार नागविले। डोचकें फोडिलें म्हातारीचें॥ ४॥ ऐशा सिद्धांतीच्या खुणा। एक जाणे पंढरीराणा। विष्णुदास नामा करी विज्ञापना। संत प्रेमळ जाणती॥ ५॥

२११३. मुंगी उमगा मुंगी उमगा। मुंगीचे मुखीं त्रिवेणी गंगा॥ १॥ उदकाचें टवळें मसीची माती। अंधारीं मुंगीनें तेथें लाविली ज्योती॥ २॥ अवघें आकाश मुंगीये मागें। मुंगीये संसार सांडिला मागें॥ ३॥ विष्णुदास नामा मुंगीये मागें। मुंगी उमगली खेचरसंगें॥ ४॥

२११४. मुंगीनें आकाश कवळिलें बाही। तेथें एक नवल वर्तलें पाहीं॥ १॥ मुंगी उमगा मुंगी उमगा। मुंगीचे माथां त्रिवेणी गंगा॥ २॥ मुंगीचे गळां तुळईचा लोढणा। विष्णुदास नामा बोलिला खुणा॥ ३॥

२११५. समुद्राचें पाणी मुंगी मुखांतूनी। काढाया लागोनि श्रम थोडे॥ १॥ केशवाची भक्ति कठीण त्याहूनि। वांयां दंभपणीं नोहे नोहे॥ २॥ आकाश अंगुळें माप सुयेमनि। भूमींचें वजन पालडेनि॥ ३॥ नामा म्हणे वारा वळूं ये कदापि। केशवाचे रूपीं नव्हे बुद्धि॥ ४॥

२११६. आंधळ्यानें स्वरूप देखियलें नयनीं। मुकें बहिऱ्या कानीं गोष्टी सांगे॥ १॥ कांसवीचें दूध दुहितां भरणा। दुही त्याला जाणा हात नाहीं॥ २॥ वारियाच्या लोथा बांधोनियां माथां। वांझेचियां सुता बळिवंता॥ ३॥ मुंगीनें त्रैलोक्य धरियलें तोंडीं। नामा म्हणे पिंडीं प्रचीत आहे॥ ४॥

२११७. हाटकर कुणबी वाट मोडी। रिकामा ब्राह्मण करितो चहाडी॥ १॥ गुळेंविण शिंपी बोटें चाटी। प्रेमेंविण तेली क्षेम दे लाटी॥ २॥ जिताचि कोष्टी घातला खाचे। प्रेमेंविण कुंभार नाचे॥ ३॥ लोहार हिंवाविण तापे। सोनारा लागले धापे॥ ४॥ नामा म्हणे यातिचे चाळे। दुखणेंविण परीट विवळे॥ ५॥

२११८. अकरा लोचन त्याचे पांच मुख। आठ कान देख पुच्छ दोन॥ १॥ अरत अखंड निरत प्रचंड। उमाळ उदंड उभा फार॥ २॥ दहा पाय चहूं चालत ते जाय। नव्हेत ग माय सावज त्या॥ ३॥ नामा म्हणे त्याचा अर्थ करी चोख। पूर्वज पातक लया जाय॥ ४॥

२११९. बारा हात लुगडें एकचि नारी। पालऊं घातला खांदियावरी॥ १॥ जाईन त्या गोकुळां पाहीन त्या गोपाळा। तयालागीं उतावेळ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मन माझें॥ २॥ एका हातीं घातला तांबियाचा वाळा। हाळदुळी वांटुनी सुदलें मी डोळां॥ ३॥ एकली जातां नोळखे मातें। विष्णुदास नाम्यास नेईन सांगातें॥ ४॥

२१२०. राईयेवढें पांखरूं त्रिभुवनीं त्याचा फेरा रे। नर आणि नारी तया पांखराचा चारा रे। पिंडामध्यें आहे त्याचा शोध तुम्ही करा रे। मेरूच्या शिखरीं त्या पांखराचा थारा रे॥ १॥ येऊनि संसारा याचा अनुभव तुम्ही करा रे। चौऱ्यांशी लक्ष योनी चुकेल जन्माचा फेरा रे॥ ध्रु०॥ अठ्ठावीस योजनें तया पांखराचा फेरा रे। बत्तिसां मुखांनीं तें बा घेतसे चारा रे। अहं सभेमध्यें याचा शोध तुम्ही करा रे। अकराही लोचन तया चोंची असती फारा रे॥ २॥ एकवीस स्वर्गांहुनी तया पांखराची उंची रे। सप्तही पाताळाखालीं तया पांखराची नीची रे। नेत्रांतील बाहुली तया पांखराची निचीरे। उडालें पांखरूं सप्तही सागर घेऊन चोंची रे॥ ३॥ ऐसें तें पांखरूं दादा आहे सृष्टीवरी रे। मेरु आणि मांदार तया पांखराचे उदरीं रे। शिवाचें आसन दादा कवणिये परी रे। पिंडीं आणि ब्रह्मांडीं म्हणती दशवें द्वारीं रे॥ ४॥ ऐसें तें पांखरूं गोरक्षरायें वळखिलें रे। पिंडीं आणि ब्रह्मांडीं मच्छिंद्र नाथें देखियेलें रे। त्याचियेनी अंगसंगें सद्गुरुनाथें दाखविलें रे। त्याचियाचि प्रसादें नामा शिंप्यानें गाईलें रे॥ ५॥

२१२१. प्रळयाचे काळीं ब्रह्मांड जळालें। कोण त्यांत उरलें सांगा मज॥ १॥ प्रभा ते फांकली जाती ते गुंतली। सांग मज खोली स्वरूपाची॥ २॥ ब्रह्मांडाची जेव्हां राख जळून झाली। कोणी ती लाविली अरूपरूपीं॥ ३॥ विष्णुदास नामा म्हणे सांगा हेंचि गूढ। नाहीं तरी मूढ होऊनि राहें॥ ४॥

२१२२. मेलें जित्यासी सांगे गोष्टी। आंधळें ओंवी सुवर्णाच्या गांठी। पांगुळ लागे पवनाच्या पाठीं। बाळका पोटीं माय वाढे॥ १॥ थोट्यानें धवलार रचियेलें। मुकें पुराण सांगूं बैसलें। सर्वेचि बहिरें ऐकों ठेलें। वेडें हांसलें शहाणीयासी॥ २॥ आणिक एक नवल सांगूं काई। जीत वाघ शलभानें भक्षिला पाहीं। मुंगीनें पर्वत उचलिला बाहीं। माशी करी साही सूर्यांसी पैं॥ ३॥ मृदंगें वाहिला गुरव राणा। वांझेच्या स्तनीं संचरला पान्हा। माथां फुलें खोऊं नाचे दवणा। जाण सुजाणा न कळेची॥ ४॥ मुरकुटें सगळा सागर शोषिला। माशानें पारधी मारिला। सशानें सिंह भोवंडिला। वेदांपुराणां न कळेची॥ ५॥ हें तुम्ही म्हणाल उमानें। हें तंव उरफाटें दृष्टी पाहाणें। विष्णुदास नामा म्हणे। अनुभवी या खुणा जाणती॥ ६॥

२१२३. नीर समुद्र तो कोण। कोठें क्षीराब्धि आसन॥ १॥ दुधि समुद्र कोण्या ठायीं। खारा समुद्र कोण्या गृहीं॥ २॥ रत्न समुद्र तो कोण। कोठें मदनाचें आसन॥ ३॥ मन समुद्र कोठें आहे। नामा म्हणे शोधून पाहे॥ ४॥

२१२४. नेत्र नीर समुद्र देखा। क्षीर सत्रावी ओळखा॥ १॥ दधिसमुद्र नाकीं आहे। खारा शरीरीं तो पाहें॥ २॥ नाभीं रत्नाकर देखा। माथां मदन ओळखा॥ ३॥ नामा म्हणे सांगूं काय। मन समुद्र हृदयीं आहे॥ ४॥

२१२५. राधा वनींच्या पुत्रास धन बहुत झालें। तो म्हणे आतां धर्म करीन। बापाचिया श्राद्धा आवंतिले ब्राह्मण। एक जेवण सदामाचें॥ १॥ कैसी नागवण आली रे बापा। वेंचा परते पाप आणिक नाहीं॥ ध्रु०॥ सहाजणां ब्राह्मणां सवा सवा शेराचा भात। कढींत हिंग जिरें मिरें बहुत। त्यावरीं घातलें मुगाचें वरणां। येवो का मरण जेवित्यासी॥ २॥ सहाजणां ब्राह्मण घातले सहा वडे। घालितां रडे उकसाबुकसी। त्यावरी घातलें तूप लोणकडें। जावो कां मढें या जेवित्यांचें॥ ३॥ सगळ्या गव्हाची रांधिली क्षीरी। ही एक महामारी आली देखा। त्यावरी घातला साखर गुळ। उठो कां पोटशूळ जेवित्यांसी॥ ४॥ जेवणें झालें दहींभात आला। तंव आत्मा लागला ब्रह्मांडासी। बहुतेक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दिवसासी। अंतर पडिला। समुळीं नागविला म्हणे नामा।

२१२६. मुंगी व्याली शिंगी झाली तिचें दूध किती। सतरा रांजण भरून गेले पेले बारा हत्ती॥ १॥ आम्ही लटिकें न बोलूं वर्तमान खोटें॥ ध्रु०॥ लटिकें गेलें कटकें तेथें गाडग्याएवढे राळे। उडत चिमणी चरत चाले तिचे वाटीएवढे डोळे॥ २॥ शेळी करी घुसळण तेथें मांजर काढी लोणी। उंदीर गेले देशांतरा ताकें भरल्या गोणी॥ ३॥ पाण्यांत कांसव गीत गाय वनांत कोल्हा नाचे। सावज मनीं संतोषला खोकड पुस्तक वाचे॥ ४॥ कांतणी घरीं लग्न लागलें सरडा कणीक कांडी। बागुल वंध्या कण्या परणी घुबड मांडे रांधी॥ ५॥ बाभुळीचे खोडीं माशानें केलें कोटें। सशानें सिंह ग्रासिला बेडुक आले लोटें॥ ६॥ विष्णुदास नामा म्हणे ऐका त्यांची ख्याती। लटिकें म्हणतील त्यांचें पूर्वज नरका जाती॥ ७॥

२१२७. त्रिभुवनांची परी मांडिली शरीरीं। गोकुळाभीतरीं उभारिलें॥ १॥ शेषाचीये दृष्टी मूळ भूमिका चोखटी। तेथुनी मूळ दृष्टी आरंभिली॥ २॥ मन विंदानीं आणि कुंडलणी चतुर्दळांपासुनी। पवनवेगीं टाकुनी पति समया स्वाधिष्ठानी॥ ३॥ मणीपूरपर्यंत कळवट शोभिवंत। तेथुनी टाकितसे नीट कर्मभूमीं॥ ४॥ बारा सोळा नारी श्रीपति मुरारी। हृदयमंदिरीं गोपिराजु॥ ५॥ कनक घाटेवरी सत्रावी सुंदरी। चाले उन्मत्त भारी चंद्रकळा॥ ६॥ तेथें रोवियला दारवंटा दावी त्याच्या वाटा। जावया वैकुंठा गौळियांसी॥ ७॥ मृत्युलोकींचिया सैंवरा आल्या ज्या चौबारा। देखिल्या त्या घरां चौघीजणी॥ ८॥ त्या चिपोळीयां वाहती मिळोनियां येती। चालती मागुती पश्चिमपंथीं॥ ९॥ अनुहतावरी वाट करुनी नीट। विशुद्ध नगरा येती धीट॥ १०॥ तेथुनी वाट असे नीट दारवंटा। तेथुनी जावें ब्रह्मरंध्र कपाटां॥ ११॥ हेंचि परब्रह्मराऊळ तेथुनी। जाऊं नये पुढारी सांडुनी राया॥ १२॥ तेथें रविशशीवरी आणि ब्रह्मरश्मी स्वरूप। एकांत ओवरी आहे अमूप॥ १३॥ विष्णुदास नामा सांगें निर्वाणीच्या खुणा। अनुभवी तोचि जाणे येरा चोजवणा॥ १४॥

शेत

२१२८. संसार शेत सुलभ थोर भूमी वाहिली नवही द्वारें। पांचही आउतें मेळवुनी तेथें जुंपियेलीं दोन्हीं ढोरें। उखीतें करी येति जाती भारि नव्हती कोण्हि स्थिरें। बुनादि शेत वाहिलें तें काय सांगूं अपार रे॥ १॥ संसार शेत करि का रे आल्या देहाचिया लाहेपरि। भक्ति उंच माळा उभा राहुनि हरिनाम सोंकारि रे॥ २॥ हरिश्चंद्र राजा सात्त्विक भला तेणें बाहो केला। सत्त्व नांगर त्रिगुण तिफणि निर्वाण कुळव धरिला। भक्ति कुऱ्हीवरी उभा राहूनियां बहुत भाग्य पिकला। खळेदाणे तेणें दिधलें ब्राह्मण युगायुगीं तरला रे॥ ३॥ शिराळशेटी कुळवाडी मोठा बहु सोसियेल्या वेठी। आलिया गेलिया जेवती राड भक्ता देतो थोर सृष्टी। भला भला म्हणोनि जगीं वाखाणिला देव आला त्याचे भेटी। मुक्ति शेत तया इनाम दिधला ठाव दिला वैकुंठीं॥ ४॥ रावणाचें शेत चवदा चाहूर दाटल्या दुर्बुद्धि पेढी। गर्व अहंकार दाट खुंट झाडें शेत आलें तेणें पडी। कर्मकांड किडा मुळिं जो बैसला बीज गेलें तेणें वोढी। बटकर जाण अंगीं जो सेकला तोहि झाला देशधडी रे॥ ५॥ अवघी कुळवाडीकौरवें केली नाटोपेचि दुर्योधन। अर्ध वांटेकरी धर्म दुराविला शेतासि नाहीं रक्षण। अधर्म टोळीं शेत जें खादलें बिज गेलें चौपट होऊन। हरिभक्तिविण फलकट जालें न जोडे कृष्ण निधान रे॥ ६॥ पांचही पांडवीं नवाट कांढिलें वाहिलें अद्वैत वन। निरंजन वन शेत जें पिकलें आपण कृष्णरक्षण। द्रौपदी सुंदरी डाहोरा जो केला दुर्वासा दिधलें भोजन। अनंत खंडी सांजे जे पिकली जोडलें कृष्ण निधान रे॥ ७॥ ज्ञानदेव चांगदेव वटेश्वर निवृत्ति मुक्ताई सोपानदास। परसा भागवत सावता सालया रसाळ चोखा मुधेश।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

परमानंदजोगा जगमित्र नागा गोरा दामा कूर्मदास। इतके शेतकरी त्याचा अंगे वाटेकरी नामा विष्णुदास रे॥ ८॥

२१२९. याहो क्षेत्र केलें जुंपिलीं आउतें। अठरा धान्यें तेथें पेरियेलीं॥ १॥ मेघश्याम मेघ वर्षे सर्वां धारीं। बीज विटेवरी सासिन्नलें॥ २॥ जगाचें जीवन पंढरी पिकली। चराया सोकलीं भूतें जाणा॥ ३॥ घालूनियां माळा रक्षी कळिकाळा। काय कलिमळा संसाराची॥ ४॥ पापा सोंकरणें भक्ति हे गोफण। भूस सांडी कण वेंचिताती॥ ५॥ वेदशास्त्र ऐसे बोल बोलविता। गूढ वेगळितां लाभ होती॥ ६॥ नामा म्हणे स्वामी विठ्ठल सुकाळ। अन्न ब्रह्म फळ त्रिभुवनीं॥ ७॥

कुळवाडी.

२१३०. चालती कुळवाडी नटके। उपकें घेतलीसे नाकें। चार वर्षे पिकलें निकें। त्यांचे कण सांचले॥ १॥ पुढें एक निपाणीक पडिलें। त्या कणाचें द्रव्य सांचलें। कृपणाचें घर भरिलें। वंचक झाला भक्तांसी॥ २॥ स्त्रियांबाळां खाऊं नेदी। धर्म न करीच निशुद्धी। डोईस बांधलीसे चिंधी। खांदीं रकटें ठिगळांचें॥ ३॥ त्या द्रव्याचें करी काळांतर लेखा। सजगाणीस देईं रुका। रुक्यास घेईं पैका। आठा दिवसांचा बोला॥ ४॥ सवाई दिडिदुणी। अकर्तांच घरीं आणी। तो न भजे चक्रपाणि। पाप दुणी होतसे॥ ५॥ तंव एक अतीत घरासी आला। बाईलीनें त्यासी स्वैंपाक केला। तंव आपण उठून जागला। झडकरी आला दारासी॥ ६॥ कोणें दाखविलें माझें घर। त्यावरी घेईन जहर। कोठें गेला सुना मोगर। अरगळा कोणें काढिली॥ ७॥ ऐसा तो ब्राह्मण चडफडत गेला। आपण परतोन माघारा आला। धांवोनी घाव हाणितला। डोई फोडिली बायलेची॥ ८॥ कैसी केली बोहरी। बीज नाहीं तुझे घरीं। नागविलें इया पोरीं। तीन वेळां खाताती॥ ९॥ ऐसी गजबज ऐकोन। शेजारी आला धांवोन। त्यासी हातीं धरोन। गृहाभितरीं हिंडविला॥ १०॥ त्यासी बैसावया दिला पिढा। तों स्वैंपाक आणोनी पुढां। पहा तो बायलेचा थाडसा केवढा। ऐका तुम्ही दादोजी॥ ११॥ ऐसीं पूर्ण अकरा वर्षे भरलीं। बारा वर्षांची साउली पडली। या रीतीनें गुजराण झाली। तंव अग्नि लागला गृहासी॥ १२॥ शेतांतून कुळवाडें केली चोरी। पाणी निघालें पेवाभितरीं। सुनेनें घालून घेतलें विहिरीं। ऐसेपरी नागवलों॥ १३॥ ऐसे जे नर असती। ते जन्मोजन्मीं नागवती। त्यांची न चुके यातायाती। विष्णुदास म्हणे नामा॥ १४॥

२१३१. आम्ही कीर्तन कुळवाडी। आणिक नाहीं उदीम जोडी॥ १॥ वाचा पिकली पिकली। हरिनामाची वृष्टि झाली॥ २॥ दशमी एकादशीच्या दिवशीं। झाल्या कैवल्याच्या राशी॥ ३॥ संत म्हणती नामा भला। हरिनामाचा सुकाळ झाला॥ ४॥

उदीम

२१३२. जन तुम्ही करा रे उदीम। वाचे स्मरा नारायण। तो तुम्हां चुकवील जन्ममरण। मायाभ्रमण चुकवील॥ १॥ तारूं करूनीं शरीराचें। केणें भरिलें हरिनामाचें। शिड उभविलें सत्त्वाचें। वल्हें पडती धर्माचें॥ २॥ आत्मयांची करुनी कुवे काठी। वारा लागतो जगजेठी। तारूं चाले थोरां नेटी। विठ्ठल भेटी पंढरीये॥ ३॥ तारवासांपडलें बंदर। राया विठोबाचें नगर। तें बा संतांचें माहेर। विष्णुदास म्हणे नामा॥ ४॥

चाटापरी.

२१३३. जन्मासी येवोनी जाहलों मी चाटा। गेलों होतों हाटा पंढरीये॥ १॥ गुंड गे करीं गुंड गे करीं। बैसलों द्वारीं पंढरीये॥ २॥ शनिवारीं पुंडलिकापाशीं। चंद्रभागेसी स्नान केलिये॥ ३॥ आदित्यवारीं करीं पद्माळें। कळीकाळा न भीयें तयाचेनी बळिये॥ ४॥ सोमवारीं वेणुनादींच्या हाटा। जातसे चाटा उभवोनी गुढीये॥ ५॥ विष्णुदास नामयानें उभवोनी गुढी। विकलीसे प्रौढी केशीराजें॥ ६॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घोंगडें.

२१३४. चौऱ्यांशी लक्ष जन्म हिंडतां। घोंगडें अनंता जर्जर झालें॥ १॥ जेथें जाय तेथें तुटचि हे पडे। मुद्दल न घडे काय करूं॥ २॥ संचित आटलें व्यवसाय खुंटले। म्हणोनि ठाकलें द्वार तुझें॥ ३॥ नामा म्हणे विठोबा जरी होसी जाणता। तरी या बोला उचिता प्रेम देईं॥ ४॥

२१३५. घोंगडें हें नव्हे धडूत पैं माझें। पांघुरता ओझें होत असे॥ १॥ घे आपुलें घोंगडें देईं माझा पांवा। अझुनि कां चाळवा केशिराजा॥ २॥ विष्णुदास नामा केशवा विनवी। ऐहिक्य परत्र नाहीं चाड मज॥ ३॥

२१३६. औट हात घोंगडें दिधलें हरी। पांघरलों नाहीं धणीवरी॥ १॥ माझें घोंगडें कृष्णा गा जतन करीं। नागविलें थोरीं पांचाजणीं॥ २॥ साठी तीनशें दसोडी। पदरीं औट कोडी रोमावळी॥ ३॥ बहात्तर गांठी सोळा फुंदणी। घोंगडी दाटणी होत असे॥ ४॥ त्रिगुणी दोरिया जाणा। घोंगडें पांघरवी पंढरीराणा॥ ५॥ त्याचें घोंगडें त्यासी दिधलें। उघडें नामें भक्ती पांघरविलें॥ ६॥

२१३७. पाटोळा तिमलारे मजवरी घालीं कांबळें॥ ध्रु०॥ आषाढमासिचा रे कैसा शीतळ वारा। वर्षतो मेहुलारे कैशा शीतळ धारा॥ १॥ झिरमिर झिरमिर रे कैसा वर्षतो मेघू। जाळीचें घोंगडें बा मजवर घालीं सेवूं॥ २॥ प्रेमाचें भरतें गा कैसा महापूर आला। नामया विष्णुदास केशवराजीं मिनला॥ ३॥

स्वप्न.

२१३८. देह मंदिराभीतरीं। शेजे सूदला श्रीहरी। निद्रा उन्मनीचे भरी। तें म्यां स्वप्नीं देखिलें॥ १॥ स्वप्नीं भुललें बाई। मागील नाठवेचि कांहीं। हा जीव परवस्तूच्या ठायीं। तनुमनें आटला॥ २॥ स्वप्न सांगूं कोणासी। विवेक करिती तयासी। हें कोडें अज्ञानासी। संतावांचुनी नुगवे॥ ३॥ ध्यानीं पहूडला सांवळा। जवळी नारी बारा सोळा। विंजणें वारिती सकळां। सोहं शब्द जागरणीं॥ ४॥ धिं धिं तुरे वाजती। अनुहात ध्वनि गर्जती। तेथें निद्रा ना सुषुप्ती। चंद्र सूर्य मावळले॥ ५॥ मना पवना नाहीं भेद। तया स्वामी हा गोविंद। तेथें खुंटला अनुवाद। वेदश्रुति श्रमल्या॥ ६॥ म्हणे निष्णुदास नामा। जन्ममरण नाहीं आम्हां। कृपा केली मेघश्यामा। संतसंगें तारिलों॥ ७॥

धेनु.

२१३९. वेणुनादीं चरे पाणी पी भीवरे। ते धनु हुंबरे वत्सालागीं॥ १॥ वाणें ते सांवळी नामें ते श्रीधरा। चरे वसुंधरा चवदा भुवनें॥ २॥ केशव नामें गाय माधव नामें गाय। विठ्ठल नामें गाय कामधेनु॥ ३॥ प्रेमें ते पान्हावे भक्ता घरीं जाय। भुकेलिया खाय पातकीसा॥ ४॥ नामा म्हणे गाय भाग्यवंता घरीं। पाप्या जन्मवरी पाठीलागे॥ ५॥

२१४०. परा पश्यंति मध्यमा वैखरी। तें गाय दुभे वैष्णवाघरीं॥ १॥ ते एके विठ्ठलें पंढरी राखिली। दुभावया दिधली पुंडलिका॥ २॥ चाऱ्ही वेद मुखीं धरूनियां राहे। विठ्ठलाचे द्वारीं नामा गाये॥ ३॥

हरिजागर.

२१४१. कैलास भुवनीं। देव बैसले सिंहासनीं। आपण भवानी। कर जोडुनी उभी असे॥ १॥ भक्तिरस द्यावा। तेथील अनुभव घ्यावा। नित्य हरिजागरू सांगावा। कोण फळ तयाचें॥ २॥ तंव चंद्रचूड संतोषला। देवी प्रश्न बरवा केला। अमृतवोघ प्रवर्तला। दुजें बोलती व्यापकें॥ ३॥ या हरिजागराचें फ़ळ। तुज सांगेन सोज्वळ। महादेव ऐसें बोलिले। प्रेमभावें गिरजेसी॥ ४॥ परिसा हरीजागरू। गिरजेसी सांगे महेश्वरू। नवविधा भक्तीचा प्रकारु। शिवतत्त्वीं बोलतों॥ ५॥ प्रथम अश्विनीचा भरू। पूर्ण तिथी जी शंकरू। करुनी व्रतांचा स्वीकारु। मास दीनपर्यंत॥ ६॥ मग मिळोनि संतसज्जन। करावें हरिजागरण। गीतवाद्य सुलक्षण। नृत्यविलास तांडव॥ ७॥ मग सारोनि देवासी मार्जन। वरी गंगोदकें स्नान। मग वस्त्रें परिधान। देवासी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करावीं ॥ ८ ॥ यज्ञोपवीत अलंकार। करोनि पूजा नमस्कार। आणि नैवेद्य नाना प्रकार। भगवंतासी अर्पावा ॥ ९ ॥ सद्यस्तृप्त घृत पूर्ण। वरी षड्रस पक्वान्न। भावें सर्वांसी पूजोन। नमस्कार भावें करावा ॥ १० ॥ मग करावी वैष्णवांची पूजा। मनीं भाव न धरावा दुजा। स्वयंभ मूर्ती मीच सहजा। सदा संतां जवळिकें ॥ ११ ॥ संत मार्जनादि भेदु। जैंवि मिळणी गंगासिंधु। अखंड वाचे परमानंदु। हरीकीर्तन करावें ॥ १२ ॥ त्या हरीजागराचें महिमान। दुजें नाहीं समाधान। सकळ तीर्थ केलिया पुण्य। परी सरी न पवशी ॥ १३ ॥ सकळ तीर्थांचा परवडी। दान देतां पृथ्वी थोकडी। या हरीजागराची प्रौढी। ते तयाहुनि अधिक ॥ १४ ॥ पहिलें पक्षु मज अर्पिला। दावा विष्णु थोर झाला। दुजा पक्षु सांगाजी वहिला। म्हणोनि नमस्कारिलें शंकराशीं ॥ १५ ॥ परीसे गिरिजे देवी। कथा सांगेन बरवी। फळ पावती मानवी। अंतःकरणीं कल्पिलें ॥ १६ ॥ दुजा पक्षु प्रथम तिथी। वैश्वानरसी प्रीत्यर्थी। बीज ब्रह्मया सांगती। ऋषीसहित उपचार ॥ १७ ॥ पंचमी अष्टमी नागकुळा। शेषादिका सकळां। प्रीत्यर्थ पावो नागकुळा। षष्ठी स्वामि कार्तिक ॥ १८ ॥ भानु सप्तमी जागरी। जैसा समुद्र सरिता सागरीं। अष्टमीची अवधारी। माझारी मृत्युलोक ॥ १९ ॥ नवमीच षष्ठी योगिनी। आणि चार कोटी कात्यायनी। दुर्गेसहित भवानी। दशमी यम पवित्र गुणी ॥ २० ॥ तेहतीस कोटी एकादशी। ब्रह्मां हरीहर वोरसी। नंदी धेनु तेरसी। आणि चतुर्दशी परियसा ॥ २१ ॥ पौर्णिमा चंद्रतारा। इंद्रादिकां देवां सकळां। इत्यर्थ पावो देवां सकळां। जे बोलिया वेदश्रुति ॥ २२ ॥ संतोषोनि उमापती। ऐसें पुराणें बोलती। या हरिजागराची स्थिति। तुजप्रति सांगितली ॥ २३ ॥ हें सकळ मीच भोक्ता। येर परिवार देवता। भ्रांति मीच भाविता। भावेंविण न कळे मी ॥ २४ ॥ जेथें भाव तेथें देवो। आन न धरावा संदेहो। विश्वसृष्टी एकचि पहा हो। तरी मी असें जवळीकें ॥ २५ ॥ विष्णुदास नामयासी। हरिचें नाम सदा मानसीं। राम हा मंत्र उपदेशी। भवसागर तरावया ॥ २६ ॥

हिंदुस्थानी पदें

२१४२. उत्तम नरतनु पायारे भाई। गाफल क्यौं हुवा दिवाने जू ॥ १ ॥ सावध सावध भजले रे राजा। नहीं आवे ऐशी घडी जू ॥ ध्रु० ॥ जिन्न जन्म डारा है तुजकूं। बिसर गया उनका ध्यान जू ॥ २ ॥ फिर पस्तायेगा दगा पायेगा। निकल जायेगा अवसान जू ॥ ३ ॥ क्या करना सो आजि करले। फीर नहिं ऐसी जोडी जू ॥ ४ ॥ हंस जायेगा पिंजरा पडेगा। तुज कैसी भूल पडी जू ॥ ५ ॥ सुन्नेका मंदिर मेहेल बनाया। धन संपत नहि तेरीजू ॥ ६ ॥ मा मैन और जोरु लडके। सुखके खातर सारे जू ॥ ७ ॥ अकेले आना अकेले जाना। सब झुटी माया पसरी जू ॥ ८ ॥ लख चौऱ्यांसीका फेरा आवेगा। तब चुपी दमता बंदे जू ॥ ९ ॥ फिरता फिरता जीव दमता है बाबा। कोन रखे तेरे तनकू जू ॥ १० ॥ जिस माय उदरी जन्म लीयेगा। तेरे संगत दुःख उनकू जू ॥ ११ ॥ गरभीकी यातना सुनले रे भाई। नवमास बंधन डारे जू ॥ १२ ॥ नहीं जगा हलने चलनेकु बाबा। छुडानेकु कोई नहीं आवे जू ॥ १३ ॥ आग लगी क्या देखत अंधे। कायके खातर सोया जू ॥ १४ ॥ ऐसी बात सुनके नामा सावध हुआ। गुरुके पाव मिठी डारी जू ॥ १५ ॥ मैं अनाथ दुबले शरण भये तुजकू। आप जो मेरी लाज राखी जू ॥ १६ ॥

२१४३. ज्यो कोई वसुधा दान दे आवे। पूर्ण यज्ञ करे करावे। तीरथ बरथ करे स्नान। नहीं नहीं हरिनाम समान ॥ १ ॥ ज्यो कोई ज्यावे हीमालय गले। काशी करवत लेकर मरे। दसवे द्वारे काढे प्राण। नहीं नहीं नहीं हरिनाम समान ॥ २ ॥ काया कष्टवे कलेवर जीवे। ना कुछ खावे ना कुछ पीवे। गगन मंडळमों जोग ध्यान। नहीं नहीं हरिनाम समान ॥ ३ ॥ आगली पिछली बात बनावे। नेम धरममें मन छुपावे। च्यारो बेद पढे पुरान। नहीं नहीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हरिनाम समान॥ ४॥ सद्गुरुकी जब कृपा भई। प्रेम भगद हरदे थर लाई। कहे नामदेव भज भगवान। नहीं नहीं हरिनाम समान॥ ५॥

२१४४. जहां तुम गीरीवर ताहां हम मोरा। जहां तुम चंदा तहां मैं चकोरा॥ १॥ जहां तुम तरुवर तहां मैं पंछी। जहां तुम सरोवर तहां मैं मच्छी॥ ध्रु०॥ जहां तुम दीवा तहां मैं बत्ती। जहां तुम पंथी तहां मैं साती॥ २॥ बेलके पाती शंकर पूजा। नामदेव कहे भाव नहीं दुजा॥ ३॥

२१४५. हीन दिन जात मोरी पंढरीके राया। ऐसा तुमने नामा दरजी कायकू बनाया॥ १॥ टाळ विना लेके नामा राऊलमें आया। पूजा करते बह्मन उन्नें बाहेर ढकाया॥ २॥ देवलके पिछे नामा अल्लक पुकारे। जिदर जिदर नामा उदर देऊळही फिरे॥ ३॥ नाना वर्ण गवा उनका एक वर्ण दूध। तुम कहांकि बह्मन हम कहांके सूद॥ ४॥ मन मेरी सुई तनो मेरा धागा। खेचरजीके चरनपर नामा सिंपी लागा।

२१४६. दूध पियो गोविंद लाला॥ ध्रु०॥ काला बछरा कपिला गाई। दूध दुवाहत नामा जाई॥ १॥ सोनेका गडबा दूधने भरिया। पिवो नारायण आगे धरिया॥ २॥ परभुवनकी मूरत दूध न पिबत। सीर पछार नामा रोवत॥ ३॥ ऐसा भगत मैं कबु न पाया। नामदेवने देव हसाया॥ ४॥

२१४७. सुलतान पुछे सुनरे नामा। देखो राम तुमारे कामा। नामा सुलतानें बांधा। देखो तेरा हर विठा। विस्मील्लह गौ देव जिवाय। नहिं तो गर्दन मारूं ठाय॥ १॥ बादशाह ऐसी क्यौं होय। बिस्मिल्ल कीय न जिवे कोय। मेरा किया कछु न होय। कर है राम होय है सोय॥ २॥ बादशाह चढ्यो हंकार। गजहस्ती दियो चमकार। रुदन करे नामेकी माय। छोड राम किन भजे खुदाय॥ ३॥ ना हूं तेरा पुंगडा ना तूं मेरी माय। पिंड पडे तो हरगुन गाय। करे गजेंद्र सोंडकी चोट। नामा उभरे हरकी ओट॥ ४॥ काजी मुल्ला करे सलाम। ईन हिंदु मेरा मल्या मान। बादशाहो बिनति सुनये हो। नामे शेरभर सोना लेव। माल लेवूं तो दोजक परूं। दीन छोड दुनियाका भरूं॥ ५॥ पावो बेडी ह्राथो ताल। नामा गवो गुण गोपाल। गंगा जमना जब उलटी बहे। तो नामा हर करता रहे॥ ६॥ सात धरी जब बिती सुनी। अबहून आयो त्रिभुवन धनी। पांखतन बाज बजाईला। गरुड चढे गोविंद आइला॥ ७॥ आपने भक्तकी करी प्रतिपाल। गरुड चढे आये गोपाल। कहत धरनन कोडी करू। कहत लेकर उपर धरूं॥ ८॥ कहत मुई गौ दोहु जबाय। सब कोई देखे पति आय। नामा परवणेसेलम सेल। गौ दुराई बछरा मेल। दूध दोह जब मटकी भरी। ले बादशाहके आगे धरी॥ ९॥ बादशाह महलमें जाय। और घटकी घट लागी जाय। काजी मुल्ला बिनति फर्माय। बक्षीस हिंदु मैं तेरी गाय॥ १०॥ नामा कहे सुनो बादशाह। यह कुछ पतिया मुझे दिखाय। ईस पतियाका यह प्रमाण। साच सील चालो सुलतान॥ ११॥ नामदेव सब रह्यो समाय। मिल हिंदु सब नामें पह जाय। जो अबकी बार न जीवे गाय। नामदेवका पतिया जाय॥ १२॥ नामे की कीरत रही संसार। भक्त जना ले उधरा पार। सकल क्लेश निंदक भया खेद। नामें नारायण नहीं भेद॥ १३॥

२१४८. हम तो भूले ठाकुर जाने। तुम क्यौं भाई झूट दिवाने॥ १॥ नाला अपआप सागर हुआ। काहेके कारण रोता है कुवा॥ २॥ चंदनके साती लिंब हुवा चंदन। क्यौं कर रोवे देखो ए हिंगन॥ ३॥ गुरुके मेहेरसे नामा भये साधु। देखत रोने लगे जन हे भोंदू॥ ४॥

२१४९. सब चतुरता बरते अपना ऐसा न कोई। नीरपख है खेले ताथे मिटे अंतर पद्मी॥ १॥ अंतर कुटील रहत खचरमती। उपरी मज नकरी दिन खपती॥ २॥ ऐसा न कोई नीरपख है खेले। प्रभुबिना ऐर रेनी दिन सुपनी॥ ३॥ सोई साध सोई सुनी ग्यानी। ज्याकी मिलागी रहिल्यो रसनी।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भणत नामदेवनी नीतीथी पाई। जाकई रामनाम निज रजनी॥ ४॥

२१५०. तू अगाध वैकुंठनाथा। तेरे चरण मेरे माथा॥ १॥ जब भुले नाना पेषु। जंत्र जाऊं संत्र तू ही जुं पेषू॥ २॥ जल थल महीथल काष्ट पाषाण। आगम निगम बार बेद पुराण॥ ३॥ मैंने निखा जन मानीर बधन ज्वाला। नामा काटा कुर दिनदयाला॥ ४॥

२१५१. राम आपणा पयाणाराम आपण-पयाणा। नामदेव मूरख लोग सयाना॥ १॥ जब हम हिरदे प्रित बिचारी। रजबल छांडीके भये भिखारी॥ २॥ जब हरी कृपा करी हम जाणा। तब था चेरा अब भये राणा॥ ३॥ नामदेव कहे मैं नरहरी गावो। पद खोवत परमारथ पावो॥ ४॥

२१५२. रामनाम जपी वै श्रवणसुनीवो। सलील मोह्ये मैं ही जाईवो॥ १॥ अकथ कथ्यो न जाई कागदी लिख्यों न भाई। सकळ भुवनपती मिल्यो सहज भाई॥ २॥ राम माता राम पिता राम सबही जीव दाता। म्हणत नामा यो छीयो कहेरे पुकारी गीता॥ ३॥

२१५३. धिग् तो वक्ता धिग् तो सुरता। प्राणनाथको नाम नहिं लेता॥ १॥ नाद बेद सब गनीक पुराण। रामनामको मरम न जान॥ २॥ पंडित होई सो बेद बखाणो। मूरख नामदेव रामहि जाणो॥ ३॥

२१५४. जन नामदेव पायो नाऊं हरी। जम आइका करी हबौरी इब मोरी छुटी परी॥ १॥ भाव भगतकी नाना बिधि किन्ही फळका कोन करी। केवळ ब्रह्म निकटी लीव लागी मुक्ति कहव परी॥ २॥ नाम लेत सनकादिक तारे पार न पायो तास हरी। नामदेव कहे सुनोरे संतो। इब मोही समाझी परी॥ ३॥

२१५५. रामसमाना नामही रामा। तू साहेब मैं सेवक स्वामी॥ १॥ हरी सरवर जग तरंग कहावे। सेवग हरी तजी कहुं कत जावे॥ २॥ हरी तरवर जग पंखी छाया। सेवग हरी भजी आवे गवाया॥ ३॥ नामा कहे मैं नरहरी पाया। राम रमे मैं रमी राम समया॥ ४॥

२१५६. राम बोले राम बोले। राम बिना कोऊ न बोलेरे भाई॥ १॥ एकल मिठी कुंजर चिटी भाजन है बहु नाना। स्थावर जंगम कीट पतंगा सब घट राम समाना॥ २॥ एकल चीता रहीले नीता और छुटीले सब आसा। प्रणवत नामा भये नेहि कामा तुम ठाकुर मैं दासा॥ ३॥

२१५७. राममें रमी राम संभारे। मैं बलिताका छीनन बिसारे॥ १॥ राम रमे रमीदी अईतारी। वैकुंठनाथ मीले बनवारी॥ २॥ राम रमे रमी दीजे हरी। लाजनकी अई पसवा करी॥ ३॥ सरीर सभागा सो मोही भाये। पार ब्रह्मका जे गुन गावे॥ ४॥ सरीर धरेकी इहे बढाई। नामदेव नाऊ न बिसरी जाई॥ ५॥

२१५८. गरुड मंडल आव। पृथ्वीपति गरुड मंडल आव॥ १॥ तूं पृथ्वीपति जागृत केला। मैं गरुड गुन नागर चेला॥ २॥ नामदेव कहे बालक तेरा। भक्ति दान दे साहेब मेरा॥ ३॥

२१५९. माझा प्राणोत विठ्ठला। पैडी अटकी हो बांधला॥ १॥ कली पोटीं कुसमल कली काल। मेरे बंधमो चहूं श्रीगोपाल॥ २॥ काटी नारायण भवके बंध। समृध दृढ करी वोडो कंद॥ ३॥ नामदेवका नराईन किन्ही सार। चले प्रोहण उतरो पार॥ ४॥

२१६०. राम साधन ताके काहा वथोरो। अष्ट सिध्दि नवनिधि करत नीहारो॥ १॥ हरणकसीप वध करीअधपती देही। इंद्रको बीभो प्रहलाद न लेही॥ २॥ देव दानव जाही संपदा करी मानो। गोष्पद सेवगताही त्रापदा करी जानो॥ ३॥ अर्थ धर्म काम की कदा मोषी मागो। दास नामदेव प्रेम भगती अंतरी जो जागो॥ ४॥

२१६१. राम नाम खेती राम नाम वारी। हमारे धन बाबा बनवारी॥ १॥ या धनकी देशहु आधी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काई। तसकर हारे नलगे कोई॥ २॥ दहदिसीं राम रह्या भरपुरी। सतनी नीयरे झाकत दुरी॥ ३॥ नामदेव कहे मेरे करम न सोई। कतम साईसी करे न कोई॥ ४॥

२१६२. ऐसो राम राय अंतर जानी। जैसे दरपर माह बदन परवानी॥ १॥ बसे घटाघट लीप न झिपे। बंधन मुक्त जात न दिसे॥ २॥ पानी माहे देख मुख जैसा। नामेको स्वामी विठ्ठल ऐसा॥ ३॥

२१६३. मीको तूना वसार तूना। वसार तूना वसारे रामैया॥ १॥ अलापवंति हि धर्म जो हे मुजउपर सब कोपला। सुद सुद कर मार उठायो। काहा करो बाप विठ्ठला॥ २॥ मुयेहुये जो मुक्ति देउगे मुक्ति ना जाने कोयला। ए पंडिया मोको धेड कहत है तेरी पैज पछोडी होयला॥ ३॥ तू जो दयाल कृपाल कहत है अति भुज आपाराला। फेर दिया देहुरा नामेको पडियानको पिच्छ वारला॥ ४॥

२१६४. सेवियले गोपालराय अकल निरंजन। भक्त दान दिजे ज्याके संतजन। ज्याके घर दिगज दिसे सरायचा। वैकुंठभवन चित्रशाला। सप्तलोक समान पूरियले ज्याके घर लक्ष्मी कुवारी चंद्र सूरज दीवडे। कौतक काल वरपडा कोटवाल कोतवाल सो कारागरीसो ऐसा राजा श्रीनरहरी। ज्याके घर कुलाल ब्रह्मा चतुरमुख दावडा। जन विश्व संसार राखियले ज्याके घर ईश्वर बागला। जगद्गुरु तत सरिखा जा ग्यान भाकियले पाप पुण्य याचे धाडिया। द्वारें चित्रगुप्त लेखिया। धर्मराय परलीपर प्रतिहार। तू ऐसा राजा श्रीगोपाल। ज्याके घर गण गंधर्व ऋषि बापडे धाडिया। गांवात आछे सर्व शास्त्रे बहु रुपीया आन गर्वा आखाडा मंडलीकबोल बोल आछे। चौर धुले है ज्याचे पवन चेरी सकत जी ले भवन। अंडटूक ज्याके भस्मति सौ ऐसा राजा त्रिभुवनपती। ज्याके घरी कूर्मपाल सहंस फणी वासत सज वालूवा। अठारे धार वनस्पति मालनी। छिनमें करोडी मेघ माला पानी हारिया नख प्रवेश ज्याचे सुरसरी। सप्त समुद्र ज्याके घड थली। एते जीव ज्याचे वर्तनीं। सो ऐसा राजा त्रिभुवनधनी। ज्याके घर निकटवर्ती अर्जुन ध्रुव प्रल्हाद अंबरिष नारद लेजे सिद्ध बुद्ध गणगंधर्व बान बहेला। एथे जीय ज्याके है घरीं सर्वव्यापक अंतर हरी। प्रणवे नामदेव त्याची आन। सकल भक्त ज्याके निशान।

२१६५. मन पंछीया मत पड पिंजरे। संसार मायाजाळ रे॥ १॥ तन जोबन रूप कारण। न कर गर्व गव्हार रे॥ २॥ एक दिनमो तिन विरिया। सदा झमकत काल रे॥ ३॥ कुंभ काच्या निर भरिया। बिनसत नहि बार रे॥ ४॥ कहत नामदेव सुन भई साधु। साधु संगत धरना रे॥ ५॥

२१६६. कहां करूं जाती कहां करूं पाती। राजाराम सेऊं दीन राती॥ १॥ मन मेरो गंगा मन मेरो कासी। राम रमे काटू जमकी फांसी॥ २॥ शिवणा सीवणा शिव सिऊ। राम बिना हूं कैसे जीऊं॥ ३॥ अनंत नामका सिऊ वागा। जो सीवत जमका डर भागा॥ ४॥ सुरतकी सुई प्रेम का धागा। नामेका मन हरिसो लागा॥ ५॥

२१६७. ऐसे मन रामनामें बेधिला। जैसे कनक तुला चित राखीला॥ १॥ आणीले कागद साजीले गुडी आकाश मंडल छोडी। पांच जनासो बाह बा ताउवो चिंतसो डोरी राखिला॥ २॥ आणिले कुंभ भरा ले उदक राजकुंवारी पुलंदरीये। हस्त विनोद देत करताली चितस्यो घागरी राखिला॥ ३॥ मंदीर एक द्वार दस जाके गऊ चरावण चालीला। पाच कोपर चरावे चित सौंवाछा राखीला॥ ४॥ भणत नामदेव सुनो त्रिलोचन वाळी पालणी पौटिला। आपण मंदिर काजई करती चित्तसो बालीक राखिला॥ ५॥

२१६८. जौलग राम नामें हेत न भयो। तौलग मेरी करत जनम गयो॥ १॥ लागी पंक पकले धोवो। नृमल होवे जब मयी गोवो॥ २॥ भीतरी मैला बाहेरी चोखा। पाणी घ्यंड पखाले धोखा॥ ३॥ नामदेव कहे सुरही पर हरीये। भेट पुछकेस

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भवजल तीरीये॥ ४॥

२१६९. काना चिता का गाइला। का घसी घसी चंदन लाविला॥ १ ॥ अपापर नाहीं चिन्हीला। तो चित्त चितारे डहकीला॥ २॥ करीतन आगे नाचे लाई। स्यभ देव चिन्हें नहीं कोई॥ ३ ॥ स्यभ देवकी सेवा जाणे। तो देव दृष्टि है सकल पछाने॥ ४॥ नामदेव भणे मेरे यही पूजा। अतमराम अवर नहीं दुजा॥ ५॥

२१७०. रामची भगती दुहेली रे बापा सकळ निरंतर चिन्हीले आपा॥ १ ॥ बाहेरा उजेला भीतरीं मैला। वाणी पडपखाल न गहिला॥ २॥ पुतली देवकी पाती देवा। दुही बीध नाम न जानई सेवा॥ ३ ॥ पाखंड भगती राम नहीं रीझे। बाहरी अंधा लोग पतीजे॥ ४॥ नामदेव भणे मोरा नेत्र पलटा। राम चरणा चित्त बहु पैठा॥ ५॥

२१७१. काहेकू कीजे ध्यान जपना। जो मन नाहे सुध आपना॥ १ ॥ साप काचली छांडे बीसही न छांडे। उदकमें बक ध्यान मांडे॥ २॥ स्यभके भोजन कहा लुकाता। तैसे बछटे देव पुजाना॥ ३ ॥ तेरी पूजा सेवा एरे। प्रोजी पराई काठी देरे॥ ४॥ नामदेवका स्वामी भानी लई न्हागरा। रामभाई न परी भगरा॥ ५॥

२१७२. भगत बला बाबा काडला। वीन परती तइ पुजाइ सीता॥ १॥ न्हावे धोवे करे सनान। हीरदे अखी न माघे कान॥ २॥ गल पेहेरे तुलसीकी माला। अंतर गती कोई लाभाकाला॥ ३॥ नामदेव कहीये पेठावलू। भीतरी लाख उपरि हिंगळू॥ ४॥

२१७३. साईं मेरी रीझई साची। दडे कपटी न जाई राची॥ १ ॥ कोई बहु गावे कोई बहु नाचे। जबलग नहीं हीरदे साचे॥ २ ॥ अनेक सीगारे बहु कामनी। नहीं न पीव मनीं भावे भामिनी॥ ३॥ पतीवरता पतीहीकू जाने। नामदेव कहे हरि नहींकू माने॥ ४॥

२१७४. रतन परखु नीरारे। मुलमा मही हीरारे॥ ध्रु० ॥ संक पारखु नीर खीरा जोई। बैरागर क्या खोटा होई॥ १ ॥ कालकुष्ट बीख बाधो गाठी। कहां भयो नहीं खायो वाटी॥ २॥ खायो बिख किन्हो बिस्तार। नामदेव भयो हरि गरुड बार॥ ३॥

२१७५. कलंक रहो रामनाम लेतही। पतीत पावन भये राम कहतही॥ १ ॥ राम संगीना नामदेव जीनहू प्रतीती आई। एकादशी व्रत करे काहेकु तीर जाई॥ २ ॥ भणत नामदेव सुमती सुकृत आई। राम कहत जन कोन वैकुंठ जाई॥ ३॥

२१७६. रामनाम नरहरि श्रीबनवारी। सेइथें निरंतर चरण मुरारी॥ १ ॥ गुरुको सबद वैकुंठनी सरणी। हीरदे प्रीयाग प्रेमरस बहनी॥ २॥ ज्या कारणें त्रिभुवन फीर आय। सो निधान घट भीतरी पाय॥ ३ ॥ नामदेव कहे कहु आय न जाय। अपनो राम घरीं बैठे गाय॥ ४॥

२१७७. भले बिराजे लंबकनाथ॥ ध्रु० ॥ धरणी पाय स्वर्गलोक माथ। योजन भरके हाथ॥ १॥ शिव सनकादिक पार न पावे। अनगन सखा बिराजत साथ॥ २॥ नामदेवके आपही स्वामी। कीजे मोही सनाथ॥ ३॥

२१७८. राम विठ्ठला देव विठ्ठला। हम तुमारे सेवक॥ १ ॥ बालक बेला माई विठ्ठल बाप विठ्ठल। जाती पाती गुरुगोत विठ्ठल॥ २॥ ग्यान विठ्ठल ध्यान विठ्ठल। नामाका स्वामी प्राण विठ्ठल॥ ३॥

२१७९. रामनाम बीन और नहीं दुजा। कृष्ण देवकी करीहूं पूजा॥ १ ॥ रामही माई रामही बाप। राम बीना कुणा ठाईं पाप॥ २॥ संपत्ती विपत्ती रामही होई। राम बिना कुण तारी हे मोही॥ ३॥ भणत नामा अमृतसार। सुमरी सुमरी उतरे पार॥ ४॥

२१८०. संतसु लेना संतसु देना। संत संगतीनी दुस्तर तरणा॥ १ ॥ संतकी छाया संतकी माया। संतसंगती वैकुंठ पाया॥ २॥ कहां करूं जम देखत अंधा। तेजी आनंद बिचारे धंदा॥ ३ ॥ असंत संगतीं नामा कबहु न जाई। संगतीमें रह्या समाई॥ ४॥

२१८१. लटकी ना बोलों बाप वर्तमान

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गाढा ॥ ध्रु० ॥ कोल्या येव्हडा मोतीडा। मैं माझे डोलें देखिला ॥ १ ॥ छेली बेली बांध जाईला मंजरीया मैं दुडे। उडत पंख मैल परपरे। वानर लीजे व्हौ ठाडे ॥ २ ॥ बावलीयाचें खोटें माखणीयाचे पोटे। संषे सुणहा मारिला। तहां मैंडक अभीला लोटे ॥ ३ ॥ अह्म जुगैला विराट देस। गाढी दूध कैला। सरबे अटे गाझीला तहा। चहुदह रजन भरीला ॥ ४ ॥ लटक्यो गाईयो गठीया। जोले गठीयो इव डौराले। उडत पंखीमें मुंगी पेखी। वाटीं इवटीं कोले ॥ ५ ॥ विष्णुदास नामदेव इम प्रणवे। यछे जीवची उक्ती। लटिकी अछे सांगितला। छे मोख न मुक्ती ॥ ६ ॥

२१८२. जब देखा तब गावा तो जना धिरज पावा। नाद समाई लोरे सद्‌गुरु भेटले देवा ॥ १ ॥ जैं जिनमिल कारजिसंता तहे। अनाहद शब्द बिजंता ॥ २ ॥ जोति जोत समानी। मैं गुरु प्रसादी जानी ॥ ३ ॥ रतन कमल कोठडी चमकार बिजल तहीं नहीं दूर। निज आत्मा मेरा है रह्या भरपूर ॥ ४ ॥ जहे अनाहद सूर उजाडा। तहे दीपक जले छंछारा ॥ ५ ॥ गुरुप्रसादी जान्या। जन नामा सहज समान्या ॥ ६ ॥

२१८३. परब्रह्म जे चितसी आसा ते न भावसी। रामभगत चेतियके अर्चित मन रासी ॥ १ ॥ कैसे मन करेगारे संसारसागर बिखैको बना। झूठी माया देखके भुलारे मना ॥ २ ॥ सिंपिके जन्मदेला गुरूपदेश भला। संतके प्रसाद नामा हरसे मिला ॥ ३ ॥

२१८४. सांप कुच छोडे बिख नहीं छांडे। उडुक भाहे जैसे बक ध्यान मांडे ॥ १ ॥ काहेको किजे ध्यान जपना। जब ते सूध नहीं मन अपना ॥ २ ॥ सिंग अच भोजन जो नर जाने। ऐसेही फल देव बराने ॥ ३ ॥ नामेके स्वामी लाहके झगडा। राम रसायन पिवो दे रगडा।

२१८५. मन मेरे गज जिव्हा मेरी काती। माप माप काटो जमकी फासी ॥ १ ॥ कहां करूं जाती कहां करूं पाती। रामको नाम जपो दीन और राती ॥ २ ॥ रागबिन रागो सिवबिन सीवो। रामनाम बिन कहीं न जीवो ॥ ३ ॥ हम तो भगति करूं हरीके गुन गाऊं। आठ प्रहर आपना खसमकूं त्यागु ॥ ४ ॥ सोनेकी सुईं रूपेका धागा। नामाका चित्त हरसूं लागा ॥ ५ ॥

२१८६. लेआईके कुंभ भलाईके उदक ठाकुरके स्नान करो ॥ १ ॥ ब्यालीस लख जी जलमे होते विठ्ठल भला कसे क्या जत्र जाव तत्र विठ्ठल भला महा आनंद करो ॥ २ ॥ सब केला ले आइके फूल पेहराइके ठाकूरकी मैं पूजा करे पहले बास लई है भवरे विठ्ठल भला क्या करे ॥ ३ ॥ ले आइके दूध रंधाईके खीर ठाकुरको नैवेद करे पहिले दूध बटाऱ्यो बचरे विठ्ठल भला क्या करे ॥ ४ ॥ इसमें विठ्ठल उसमें विठ्ठल विठ्ठल बिन संसार नहीं। थान नंतर नामा परथवे पूर रह्यो तूं सर्व मही ॥ ५ ॥

२१८७. एक अनेक व्यापक पूरक जद देखो तद सोई। माया चित्रविचित्र विमोहेत बिर्ला बुझे कोई ॥ १ ॥ सब गोविंद है सब गोविंद है गोविंद बिन नहीं कोई। सूत एक मनसतसहंस है जैसे ओतप्रोत प्रभु सोई ॥ २ ॥ जलतरंग और फेन बुदबुदा जलते भिन्न न कोई। यह प्रपंच परब्रह्मकी लीला और बिचारत आन न होई ॥ ३ ॥ मिथ्या परम अर सुपन मनोरथ सत पदारथ जान्या। सुकिर्त मनसा गुरूपदेशी जागतीही मन मान्या ॥ ४ ॥ कहत नामदेव हरीकी रचना देखा हृदय बिचारी। घटघट अंतर सर्व निरंतर केवळ एक मुरारी ॥ ५ ॥

२१८८. सुफल जन्म मोको गुरू किना। दुःख बिसार सुख अंतर दिना ॥ १ ॥ ग्यान जन मोको गुरू दिगा। रामनाम बिना जीवन मन हिना ॥ २ ॥ नामदेव स्मरण कर जाना। जगजीवनसे जीव समाना ॥ ३ ॥

२१८९. मैं अपराधी बाप मैं अपराधी। साचली तुम्हारी भक्ति न साधी ॥ १ ॥ घणो अग्यान आगीना भंगी। कीय काम कुसुगा संगी ॥ २ ॥ यहु अग्यान इही वरी घाटो। निखर कमाई न छट नाटो ॥ ३ ॥ कीया दानगोविंद सब जाने। पैटा परबस मेर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रवाने ॥ ४ ॥ नर नीर दोष नरायन नामीं। ऐसा बबक हमारा स्वामी ॥ ५ ॥ नरक निवार नरहरी नामा। कीलेमें कसराह दिवाना ॥ ६ ॥

२१९०. लोक एक अनंत वाणी। सहीजीवन सारंगपाणी ॥ १ ॥ जिहीं जिहीं रंगें लोकाराता। वाहा रंगीं जन नरा चाला। जिहीं जिहीं मारग संसा जाइला सोपथ दे रे वचिला ॥ २ ॥ नीवो नई नई कोई एक चिन्हें झुटे भ्रमी भुले इला। प्रणवत नामो परम तंतरे सद्‌गुरु निकट बताईला ॥ ३ ॥

२१९१. राम जुहारी न ऐर जुव्हारू। जीवन जाई जनम कत हारू ॥ १ ॥ आनंदें वस्योरी नन भाखू। राम रसायन रसना चाखू ॥ २ ॥ थावर जंगम कीट पतंगा। सत्य राम सब हीतके संगा ॥ ३ ॥ भणत नामदेव जीवनी रामा। अन देव फोकट बेकामा ॥ ४ ॥

२१९२. जा दीन भगता अईला। चारू मुगती पाइला ॥ १ ॥ दरसन धारवा भागिला। कोई अहू सुकृत जागिला ॥ २ ॥ सनमुख दरसन देखिला। तब जनम सुफळ करी लेखिला ॥ ३ ॥ वैष्णव हीरदे रेखिला। जन नामदेव आनंदें गाईला ॥ ४ ॥

२१९३. परहरि धंदाकार सबैला। मेरी चिंता राम करेला ॥ १ ॥ नारायण माता पिता। वैष्णव जन परवार सहिता ॥ २ ॥ केशोके बहुघत भयला। तापे नामदेव ऐकत देला ॥ ३ ॥

२१९४. माई गोव्याद बाप गोव्यदा। जाती पाती गुरुदेव गोव्यदा ॥ १ ॥ गोव्यद ग्यानदेव ध्यान। सदा आनंदी राजाराम ॥ २ ॥ गोपद गावे गोव्यद नाचे। गोव्यद भव सदा तृति काछे ॥ ३ ॥ गोव्यद पाती गोव्यद पूजा। नामो भणौ येरे देव न पूजा ॥ ४ ॥

२१९५. माई तू मेरे बाप तू। कुटुंबी मेरा विठ्ठला तू ॥ १ ॥ हरी हमारी नावरी। हरी उतार पैल तीरीं ॥ २ ॥ साध संगती मिली पहचार। केसो नामदेवका दातार ॥ ३ ॥

२१९६. हीरदे माला हीरदे गोपाला। हीरदे सिष्टीको दीनदयाला ॥ १ ॥ हीरदे रंग हीरदे छाया। हीरदे रैणी पाणी नीकथा ॥ २ ॥ हीरदे दीपक धरी उजाला। पुटीकी बार तटी गण ताला ॥ ३ ॥ हीरदे रंग राम नहीं जाती। रंगीरे नामा हरीके भाती ॥ ४ ॥

२१९७. अवनी बीसारू राम संभारू। जो रवीसारू तो सबहारू ॥ १ ॥ तन मन हरी परीछीन वारी। घडी घडी महुरत पल नहीं डारी ॥ २ ॥ सुमीरन स्वासा भरी भरी पीऊ। रंक राम गुड खाईर जीऊ ॥ ३ ॥ अगे मांडी राम रटी लेहू। जौर बीसारू तौ रोईं देहू ॥ ४ ॥ नामदेव कहे ऐर असन करीहू। राम नाम धन लागो ही मरीहू।

२१९८. पंढरीनाथ विठाई बतावो मुजे पंढरीनाथ विठाई ॥ ध्रु० ॥ माय बापके सेवा करीये पुंडलीक भक्त सवाई। वैकुंठसे विष्णु लाये खडे करकर बतलाई ॥ १ ॥ चंद्रभागा बालबंटपर कबिरा धुम चलाई। साधु संतकी हो गयी गर्दी भजन कुटाई खुब खाई ॥ २ ॥ त्रिगुणामें रेनु वेनु बजावे सागरका जबाई। दहीं दुधकी हंडी फुट गई भर भर दुधया पाई ॥ ३ ॥ नामदेव देवके गुरू शिखावें खेंचरी मुद्रा गाई। कृष्णजीकी बारबार गावे हरिनाम बढाई ॥ ४ ॥

२१९९. जत्र जाऊ तत्र विठ्ठल भैला। विठ्ठल लियो राजाराम देवा ॥ ध्रु० ॥ आणली कुभरा लियो उदका। बाल गोघड न्हान चारउ। पहिली नीरजु मछली ठैरा। झुटणी भैला काय करूं ॥ १ ॥ अनले केसर सुटकी समसरी। बालगोविंदही बोली। सुपही त्रास भुपन मीलनी। झुटणी भैला काय करूं ॥ २ ॥ अणिले पहुप उबालय माला। बालगोविंदकू माल दचु। पहिली वास जू भौरा लीनी। झुटणी भैला काय करूं ॥ ३ ॥ अणीले घृत जोले वाती। बाल गोविंद दीप रचु। पहिली जोती नामा देखी हूं। झुटणी भैला काय करूं ॥ ४ ॥ अणिले अग्र जोले धुपा। वालगोविंद दीप रचू। पहिली बासना सीका अले। झुटणी भैला काय करूं ॥ ५ ॥ अणीले तंदुला रांधीले खीरा। बालगोविंद ही खीर रचू। पहिली जुवछे वाघे। झुटणी भैला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काय करूं॥ ६॥ आउत विठ्ठल जाउत विठ्ठल। विठ्ठल व्यापक माया। नामाका वित्त हरिको लागा। तातें परम पद पाया॥ ७॥

२२००. अण बोता चरण नहीं छारू। मैं तुमारी अन बाबा विठ्ठला॥ १॥ टगमग टगमग क्या चौघता। एक बोल बोलूं बोलता॥ २॥ कैधुकृतेल कैधुबली। प्रणव पे नामदेव पुर बहुरली॥ ३॥

२२०१. देवा मेरी हीन जाती हो। काहुपे सहीयन जाती हो॥ १॥ मैं नहीं मैं नहीं तू है मैं नहीं हो। तू एक अनेक हो विस्तारो मेरी चरम न साई हो॥ २॥ जसे नदीया समदीस मावी धरणी बहती हो। तुम्हारी कृपाथे नीच उंच भये तू कालकी काती हो॥ ३॥ नामा कहे मेरदेवीन देवा संग न साती मी तुला। तुम्हारे सरनहु भजी दुव्यो बहुद छोडीव बा विठ्ठला॥ ४॥

२२०२. देवातरी भगतीनमों पैं होइजी। जिहीं सेवा साहिब भल मानइ करी नहीं जाने कोइजी॥ १॥ सुमृत कथा होत नहीं मो पेइ कुथु तो होई अभिमानजी। जोई जोई करूसो मोही वाधई त्राही त्राही भगवानजी॥ २॥ जामें सकल जीवकी उतपती सकल जीवमें अपजी। माया मोहकरी सकल भुलाणा तू घटी घटी व्यापक बापजी॥ ३॥ सो वैकुंठ कहो धो कैसा। खंडख स्वाजहा जाइन। यहु परतीती होत नहीं मोपें जिवंत मुगती न पाइयेन॥ ४॥ मैं जन जीव ब्रह्म तू माधो विनदेख्या दुःख पाइये। साखे सम पके हे जन नामा संगी मिलावन गाईये॥ ५॥

२२०३. पुरीख हजारी बरण नहीं। दुरी ठठा बोले माहि॥ १॥ ग्यान ध्यान रहीत खेले। अदृष्टी माहे दृष्टि मेले॥ २॥ सगीलागा मेख काछे। सारीखा अगे अरो पाछे॥ ३॥ पुज जाणी रमीजे कोई। तो हरी समीप न्हेन जन सोई॥ ४॥ नीगंध रूप विवर्जित वासा। प्रणवत नामा हरिका दासा॥ ५॥

२२०४. बाजी जा मन बाजी रची। मैं बली ताकिजीनी खची॥ १॥ बाजी जा मन बाजी मरण। वाजी लागी रहिरे मन॥ २॥ बाजी मनमें सोची बिचारी। अपे सुन अपे सुभधारी॥ ३॥ नामदेव कहे मैं तेर शरणा। मीठी घाली जा मन अरु मरणा॥ ४॥

२२०५. संत प्रबाणी भगति अपीला। नहीं अपीला प्राण त्यगीला॥ १॥ हमची थाती तुम्हवसी थैला। हम वाजविला तुम चित्त लगीला॥ २॥ चारी मुगती आठही सिद्धि आया। भगती न अपो दास न मैया॥ ३॥ नामदेव विठ्ठल सनमुख बोलिला। भगती अपीला मुगती त्यगिला॥ ४॥

२२०६. मैंको माधो मळसूत्रधारी। मैं काहां जानो सेवा तुम्हारी॥ १॥ तुम्हारे घरको भांडवी दावत। घरको तुम्हारे अदि कलावत॥ २॥ नामदेव कहे देवनीके देवा। सुरन न फुगीन तुम्हारी सेवा॥ ३॥

२२०७. इतनो कहत तोही कहा लागत। रामरटी सोवत जागत॥ १॥ ध्रुव प्रल्हाद इही गुन तारे। रामनाम अक्षर दो उच्चारे॥ २॥ रामनाम सनकादिक रोता। रामनाम निर्भय पद दाता॥ ३॥ भणत नामदेव वीसो वीसा। जैसी मनसा तैसी दसा॥ ४॥

२२०८. ऐसे जगमें दास नीयारा। बेद पुराणा पढो किन सो चौपंडित करा बिचारा॥ १॥ दधि बिलोई जैसे घृत लीजे बहुरी नएकट थाई। पावक दार जतन करी काधौ बहुरी न कष्ट समाई॥ २॥ पारस परसी होत जैसे कंचन बहुरी न त्र्यंबक होई। अक पलास वेधीय चंदन काष्ट कहीं न काई॥ ३॥ रामहि जपहि रामहि जाने छोडी करमकी आसा। रामहि भज तंई रामहि होई प्रणवे नामा दासा॥ ४॥

२२०९. काल भई बापा सह्या न जाई। महा भैभीत जगत कृत खाई॥ १॥ अनेक मुनेश्वर उझो जाई। सुरनर थाके करत उपाई॥ २॥ कंपे पीर पेगंबर देव। रीखी कंपे चौरासी देव॥ ३॥ चंद सुरज घर पवन आकाश। पाणी कंपे अगनीगरास॥ ४॥ कंपे लोक लोकांतर खंड।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तेभी कंपे असथीर ष्यंड॥ ५॥ अवीचल अभै नारायण देव। नामदेव प्रणवे अलख अभेव॥ ६॥

२२१०. कैसे तीरत बहू कुटील भयो। कली कह चीहन देसी नहीं नडीयो॥ १॥ कैसी सेवा कैसे ध्यान। जैसे उजल बग उनमान॥ २॥ भाव भुजंग भणयौ हारी। सुरतीसी बाणा मती मजारी॥ ३॥ नामदेव भणे बहु इही गुणी बाध्य। डाईणी घ्रभ सकल गजर वाध्य॥ ४॥

२२११. बाप माझा समझीन परई। साच उटारी अइर कछ भरई॥ १॥ पाणीका चित्त पवनका थंबा। कृत उपायो रचो अरंभा॥ २॥ इहाका उपजाई हा बिलाना। बोलन हरा काहा समाना॥ ३॥ कहई नारायण सुनी जन नामा। जहां सुरती तहां पुरवण कामा॥ ४॥ जीवत राम न भयो प्रकासा। भणत नामदेव भूवो कैसी असा॥ ५॥

२२१२. तुन बीसारी तुन बीसारी। मैता बीसारी स्वामी मोरी॥ १॥ अखील भवन पती गरडी ग्रामीं। अती काल हरि अंतरजामी॥ २॥ जामन मरण बीसर जन पूजा। तुम सादेव अवर नहीं दुजा॥ ३॥ तुजु विश्व रमई जन नामा। सकल संतनके पुरवन कामा॥ ४॥

२२१३. बीहू बीहू तेरी सबल माया। अगे इनी अनेक भरमाया॥ १॥ मायाके अंतर ब्रह्म न दीसई। ब्रह्मके अंतर माया न दीसई॥ २॥ भणत नामदेव अये बीबी धाना। देहू घोडावर चढाई कान्हा॥ ३॥

२२१४. रामराई उलगु अन जानु। अनंत जाऊ भले जाऊ॥ १॥ जोग जुगती कछु मुगती न भाखुं। हर नाम हर नाम हीरदे भाखुं॥ २॥ रामनाम नामदेव अनहद अछे। भगती प्रेमरस गावे नाचे॥ ३॥

२२१५. दास अनंत मेरो निजरूप। दर्शन निमष तापत्रय मोचन परसन मुक्त करत ग्रहे कूप॥ १॥ मेरी बांधी भक्त झुडावे बांधे भक्त न छुटे मोहे। एक समय मोको ग्रहे बांधे तो फिर मुपे जबाब न होये॥ २॥ मैं गुणबंद सकलकी जीवन मेरी जीवन मेरे दास। नामदेव जाके जी ऐसी तैसो ताको प्रेम प्रगास॥ ३॥

२२१६. बदो कीन हो माधो मोसो। ठाकूर ते जन जन ते ठाकूर खेल परो है तोसू॥ १॥ आपण देव देहुरा आपण आप लगावे पूजा। जल ते तरंग तरंग ते है जल कहत सुननको दुजा॥ २॥ आपे गावे आपे नाचे आपे बजावे तुरा। कहत नामदेव तू मेरो ठाकूर जन उरा तू पुरा॥ ३॥

२२१७. काहेरे मन बिखया बन जाय। भुलोरे ठग मुरी खाय॥ १॥ जैसे मीन पानीमें रहे। काल जाल की सुध नहीं लहे॥ २॥ जिव्हा स्वादी जीवत लोह। ऐसे कनक कामिनी बांदे मोह॥ ३॥ जूं मधमाखी संचे अपार। मध लीनो मुख दीनी छार॥ ४॥ गऊ बांछको संचे खीर। गला बांधकर दोह लेत अहीर॥ ५॥ माया कारन सरम अति करे। सो माया ले गाडे धरे॥ ६॥ अति संचय समजे नहीं मूढ। तन धरती धन हो गयो दूर॥ ७॥ काम क्रोध तृष्णा अति जरे। साध संग कबहू नहीं करे॥ ८॥ कहत नामदेव उसकी आन। निरभय होये भजे भगवान॥ ९॥

२२१८. सेहेज अवल धुंडी मनी गाडी चालती। पिछे तिनका लेकर हाकती॥ १॥ जैसे पनकर तुटत हाकथी। सर धोबन चाली लाडथी॥ २॥ धोबी धोवे विरहे विरहता। हर चरन मेरा मन राता॥ ३॥ भणत नामदेव रम रह्या। अपने भगतपर कर दया॥ ४॥

२२१९. लोभ लहेर अति निझर बाजे। काया डुबे केशवा॥ १॥ संसार समुद्रे तारक गोविंदे। तारले बाप विठ्ठला॥ २॥ आन लवेडा हो खेवट न साको। तेरा पार न पाया विठ्ठला॥ ३॥ होऊ द्या दल सद्गुरु मिलवो। तू मोको पार उतार केशवा॥ ४॥ नामा कहे हो तरभी न जानो। मोको वाह दे बाप विठ्ठला॥ ५॥

२२२०. साहेब संकट व्हैस सेवक भजे। चिरकाल न जीवे दौ कुल हसे तेरी भक्ति न

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

छोडूं भावसे भजे ॥ १ ॥ चरण कमल मेरे हिया बसे जैसे अपने धनी प्राणी मरण मांडे। तैसे संतजन रामनाम न छोडे ॥ २ ॥ गंगा गया गोदावरी संसारके कामा। नारायण सो प्रसन्न होये तो सेवक नामा ॥ ३ ॥

२२२१. जो गुरुदेवत मिले मुरार। जो गुरुदेवत उतरे पार ॥ १ ॥ जो गुरुदेवत वैकुंठ तरे। जो गुरुदेवत जीवन मरे ॥ २ ॥ सत सत सत गुरुदेव। झुट झुट झुट आन सब सेव ॥ ३ ॥ जो गुरुदेवत नाम दृढावे। जो गुरुदेव न दहदिस थावे ॥ ४ ॥ जो गुरुदेव पंचते दूर। जो गुरुदेव न मरबो झूर ॥ ५ ॥ जो गुरुदेवत अमृतवाणी। जो गुरुदेवत अकथ कहाणी ॥ ६ ॥ जो गुरुदेवत अमृतदेह। जो गुरुदेव नाम जप लेह ॥ ७ ॥ जो गुरुदेव भुवनत्रय सुझे। जो गुरुदेव उंच पद बुझे ॥ ८ ॥ जो गुरुदेवत सिस आकास। जो गुरुदेव सदासा वास ॥ ९ ॥ जो गुरुदेव सदा बैरागी। जो गुरुदेव परनिंदा त्यागी ॥ १० ॥ जो गुरुदेव बुरा भला एक। जो गुरुदेव ललाटे लेख ॥ ११ ॥ जो गुरुदेव कंद नहीं हीरे। जो गुरुदेव देहुरा फिरे ॥ १२ ॥ जो गुरुदेवत छापर छाई। जो गुरुदेव सहज निकसाई ॥ १३ ॥ जो गुरुदेवत आठसट नाया। जो गुरुदेवत चक्र लगाया ॥ १४ ॥ जो गुरुदेव द्वादश सेवा। जो गुरुदेव सवें दुःख मेवा ॥ १५ ॥ जो गुरुदेवत संशय तुटे। जो गुरुदेवत जमते झुटे ॥ १६ ॥ जो गुरुदेवत भवजल तरे। जो गुरूदेवत जन्म न मरे ॥ १७ ॥ जो गुरुदेव अठदस बिवहार। जो गुरुदेव उतारे भार ॥ १८ ॥ बिन गुरुदेव आवर नहीं जाई। नामदेव गुरुकी सर नाई।

२२२२. संटा मरका जाय पुकारे। पडे नहीं हमही पच हारे ॥ १ ॥ राम कहे कर जाल बजारे। चटीया सवे बगारे ॥ २ ॥ राम नाम जप गोकरे। हिरदें हरजीको स्मरण धरे ॥ ३ ॥ वसुधा वसकीनी सब राजे विनती करे पटरानी। पुत प्रल्हादका कहीं नहीं माने तिन तो और ठानी ॥ ४ ॥ दुष्ट सभा मिल मंत्र उपाया करस है औद घनेरी। गिर तर जल ज्वाला भय राख्यो राजाराम माया फेरी ॥ ५ ॥ काड खड्ग काल भय कोप्ये मोह बतावो जो तोह राखे। पीत पीतांबर त्रिभुवन धनी स्तंभ माह हर भाखे ॥ ६ ॥ हर नाकस जीन नखो बिदार्‍यो सुर नर किये सनाथा। कहे नामदेव हम नरहर ध्याते। राम अभयपद दाता ॥ ७ ॥

२२२३. घरकी नार त्यागे अंधा। परनारीसे घाले धंदा ॥ १ ॥ जैसे सिंबल देख सुवा बिगसाना। अंतकी बार मुवाल पटना ॥ २ ॥ पापीका घर अग्नीमाह। जलत रहे मिटवे कवना ॥ ३ ॥ हरकी भक्त न देखे जाय। मारग छोड अमारग पाय ॥ ४ ॥ भूलोभूला आवे जाय। अमृत डार लादविस खाय ॥ ५ ॥ ज्यौन वेस्वाके परे अखारा। कापड पहर करे श्रृंगारा ॥ ६ ॥ पुरे ताल निहाले सास। वाके गले जमका है फास ॥ ७ ॥ जाके मस्तक लिखो कर्मा। सो भज पर है गुरुकी शरणा ॥ ८ ॥ कहत नामदेव यह बिचार। इनविद संतो उतरो पार ॥ ९ ॥

२२२४. जैसी भुके प्रति अनाज। तृखावंत जलसे ती काज ॥ १ ॥ जैसी मूढ कुटुंब परायण। तैसी नामें प्रीत नारायण ॥ २ ॥ जैसी पर पुरुखा रत नारी। लोभी नर धनका हितकारी ॥ ३ ॥ कामी पुरखा कामिनी प्यारी। ऐसी नामीं प्रीत मुरारी ॥ ४ ॥ साई प्रीत जे आभलाये। गुरु प्रसादी दुधाजाये ॥ ५ ॥ कबहून तुटस रह्या समाये। नामें चितलाय सचनाये ॥ ६ ॥ जैसी प्रीत बारक आरमाता। तैसा हेरसती मनराता ॥ ७ ॥ परनवे नामदेव लागी प्रीत। गोविंद बसे हमारे चित ॥ ८ ॥

२२२५. चार मूर्त चार सिद्ध। मिलके दुलहू प्रभुकी शरण पर्‍यो। मुक्त भयो चहूं जुगजान्यो। जस कीरत माथे छतर धर्‍यो ॥ १ ॥ राजाराम जपत कोन कोन तर्‍यो। गुरुपदेस साधकी संगत भक्त भक्त ताको नाम पर्‍यो। शंख चक्र माला तिलक विराजत। देख प्रताप जम डर्‍यो ॥ २ ॥ निर्भय भये राम बल गर्जत। जन्ममरण संताप हर्‍यो। अंबरीखको

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दियो अभयपद। राज बिभीखन अदक कर्‍यो॥ ३॥ नौनिध ठाकूर दई सुदामे। ध्रुव अचल अजुन ठर्‍यो। भक्त हेत मार्‍यो हरनाखुष। नृसिंहरूप हो देह धर्‍यो। नामा कहे भक्त उसके सब। अजहू बलके द्वार ठर्‍यो॥ ४॥

२२२६. बनारसी तप करे उलट तरिथ मरे अग्नी दहे काया कल्प किजे अस्मेद यज्ञ किजे। सोना गर्भदान दिजे। राम नाम सर तो न पुजे। छोड छोडरे पाखंडी। मन कपट न कीजे॥ १॥ हरका नाम नित्य नित्य लीजे। गंगा जो गोदावरी जाईये कुंभ जो किनारे नाईये गोमती सहस्त्र गौदान दीजे कोट जो तीरथ करे तनजो हिमाले गाले॥ २॥ राम नाम सर तौ पूजे असदान गजदान सेजानारी भुमदान ऐसों दान नित्य नित्य ही कीजे। आत्मजो निर्मल किजे आप बराबर कंचन दिजे। राम नाम सर तो न पूजे॥ ३॥ मन न कीजे रोष। जमें न दिजे दोष। निर्मल निर्वाण पद चीत दीजे। दसरथ राय नंद राजा मेरा रामचंद्र परणवे नामा तत रस अमृत पीजे॥ ४॥

२२२७. माय न होती बाप न होता। कर्म न होती काया। हम नहीं होते तुम नहीं होते। कवण कहासे आया॥ १॥ राम कोईना किसई केरा। जैसे तरुवर पंख बसेरा। चंद्र न होता सूरज न होता। पानी पवन मिलायां॥ २॥ शास्त्र न होता वेद न होता। कर्म कहासे आया। खेचर भूचर तुलसी माला। गुरुप्रसादी पाया। नामा परणवे परम तत्म है सद्‌गुरु होई लखाया॥ ३॥

२२२८. वेद पुराण शास्त्र या अनंता। गीत कवित्व न गावोंगी। अखंड मंडल निरंकारमें नाहद बन बजावोंगी॥ १॥ बैरागी रामे गावोंगी शब्द अतीत अनाहद राता। अकलके घर जावोंगी॥ ध्रु०॥ ईडा पिंगला और सुखमना कोने बंद रहावोंगी। चंद्र सूरज दोई संकर राखूं ब्रह्मजोत मिल जावोंगी॥ २॥ तीरथ देखन जलमें पैसो जिया जंत न सतावोंगी। अटसट तीरथ गुरू दिखाये। घटही भीतर नावोंगी॥ ३॥ पंच सहायी जनकी शोभा। भलो भलोना कहावोंगी। नामा कहे जित हरसु राता। सुन समाध समावोंगी॥ ४॥

२२२९. आणीयले कागद काढीयले गुडीया। आकाशमध्यें भ्रमिले। पंच जनासो बात बतौआ। चित्तसुदोरी राखीयले। मन रामनाम वेधियले। जैसे कनक कला चित्त मांडियले॥ १॥ आणिले कुंभ भराईले उदक। राजकुमार पुरंदरीये। हस्त विनोद बिचार करत है। चित्त सुगागर राखीयले॥ २॥ मंदर एक द्वार दस जाके गौचरावन छाडीयले। पांच कोसपर गौ चरावत चित्त सुबछरा राखीयले॥ ३॥ कहत नामदेव सुनो तर लोचन बालक पालन पौढियले। अंतर बाहर काज विरुधी चित्त सुबारक राखीयले॥ ४॥

२२३०. आज नामें विठ्ठल देख्या मूरखको समझ्यावोरे॥ ध्रु०॥ पांडे तुमरी गायभी लोधेको खेत खाती थी। लेकर ठेंगा तंगरी तोरी। लांगत लांगत जाती थी॥ १॥ पांडे तुमरा महादेव धवले बलद चढ आवत देख्या था। मोदीके घर खाना पाका वाका लडका मार्‍या था॥ २॥ पांडे तुमरा रामचंद्र सो भी आवत देख्या था। रावन सेती सरवर होई घरकी जोय गवाई थी॥ ३॥ हिंदु अंधा तुरक काणा दो हाते ग्यानी श्याना। हिंदू पूजे देहुरा मुसलमान मसीद नामें सोई सेव्या जह देहुराना॥ ४॥

२२३१. भैरो भूत शितला धावे। खर बाहनको राछ उडावे॥ १॥ हूं तो एक रमाया लेहू। आन बदलावन देहूं॥ २॥ सिव सिव करके जो नर ध्यावे। वर्द चढे डमरूं डमकावे॥ ३॥ माहा माईकी पूजा करे। नर ते नार होय उतरे॥ ४॥ तूं कहियत है आद भवानी। मुक्त की बरीया कहा छपानी॥ ५॥ गुरूमत रामनाम गुहुमिता। परणवे नामा यौं कहे गीता॥ ६॥

२२३२. हरहर करत मीटे सब भर्मा। हरको नाम ले उत्तम धर्मा॥ १॥ हरहर करत जात कुलहरी। सो हर आंधलेकी लकरी॥ २॥ हरे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नमस्ते हरे नमः हरहर करत नहीं दुःखजन। हर हरनाखुष हरे प्राण अजामिल कियो वैकुंठ थान॥ ३॥ सुवा पढावत गणका तरी। सो हर नैनोंकी पुतरी॥ ४॥ हरहर करत पूतना तरी। बात घातनी कपटे भरी॥ ५॥ स्मरण द्रोपद सुत धरी। गौतमसती शिला निसतरी॥ ६॥ केसी कंस मथन जिन किया। जिया दान कालीको दिया॥ ७॥ परणवे नामा ऐसो हरी। जस जपत भये अपदा डरी॥ ८॥

२२३३. मेरे अंधेकी टेक तेरा नाम खुंद कारा। मैं गरीब मैं मसकीन तेरा नाम है अधारा॥ १॥ करीमा रहिमा अल्लाह तू गनी। हाजरा हजूर दर पेस तू मनीं॥ २॥ दरियाव तू हिंदद तू बिसवायार तू धनी। देह लेह एक तू दिगर का नहीं॥ ३॥ तू दाना तू बिना मैं बिचार क्या करी। नामेके स्वामी बकसिंद तू हरी॥ ४॥

२२३४. मारवार जैसे नीर वाल्हा। बेल वाल्हा कर हला। जो कुरंगनसे नाद वाल्हा। मेरे मन रामैया॥ १॥ मेरा मन रूढो अन्योतरंग रूढो मेरो रामैया॥ ध्रु०॥ ज्यो धरणीको इंद्र वाल्हा। कुसम वास जैसे भवरला। जूं कोकल को अंव वाल्हा। तो मेरे मन रामैया॥ २॥ चतवीको जैसे सूर वाल्हा। मानस सरोवर हंसला। जूं तरणींको कंत वाल्हा। त्यूं मेरे मन रामैया॥ ३॥ बालक को जैसे खिर वाल्हा। चातक मूख जैसे जलधरा। मछरीको जैसे नीर वाल्हा। त्यूं मेरे मन रामैया॥ ४॥ साधक सिद्ध सकल मुनी चाहे। विरले काहु दीठला। सकल भवन तेरो नाम वाल्हा। त्यूं नामे मन विठ्ठला॥ ५॥

२२३५. कोई बोले निरवा कोई बोले दूर। जलकी मछरी चले खजूर॥ १॥ काहेरे बकवा दलायो। जिन हर पायो तिने छपायो॥ २॥ पंडत होके बेद बखाने। मूरख नामदेव रामरामही जाने॥ ३॥ कानको कुलंक रह्यो रामनाम लेत ही। भयो पतत पवित्र भये। राम कहीतही॥ ४॥ राम संग नामदेव जिनको प्रत्यय आयी। एकादशीव्रत रहे काहेको तिरथ जाई॥ ५॥ भणत नामदेव सुकृत सुमत भये। गुरुमत राम कहेबिन कोन वैकुंठ गये॥ ६॥

२२३६. दर बरागने मुह बसकिनी। पंच हुकामिट नावो। सतर दोय भरे अमृत सर। बिखको मार कठावो॥ १॥ पाछे बहूरन आवन पावो। अमृत बानी घटते उचरो आत्मको समझावो॥ २॥ बजर कुठार मोहे हरी छीना। कर मिनत लग पावो। संतनके हम उलटे सेवक। भगत न ते डर पावो॥ ३॥ हितकर भगत करे जो तिन भव सगल चुकाई ये। कहत नामदेव बाहर क्या भरमो। इत संजम हर पाईये॥ ४॥

२२३७. गहेरी करके बिन खुदाई। उपर मंडप छाये मारकंडे ते कवन काई॥ १॥ जीन तीर्णधर मूढ बुलाए। हमरो कर्ता राम सनेहि। काहेरे नर गर्व करत है। बिनस जाय कुठी देहीं॥ २॥ मेरी मेरी कयरो करते दूर जो धनसे भाई। बारह जो जन छत्र चळे था। देही गिरजन खाई॥ ३॥ सब सोनेकी लंका होती। रावणसे अदकाई। कहाभयो दरबाधे हाती खीनमें भई पराई॥ ४॥ दुर्वासासी करत ठगोरी जादव यह फल पाये। किरपा करी जिन अपने उपर। नामदेव हर गन गाये॥ ५॥

२२३८. अन मडका मंदल बाजे। बिन श्रवण घर हर गाजे॥ १॥ बादल बिन बरखा होई तो तद बिचारे कोई॥ २॥ मोको मिलीयो राम सनेही। जहे मिली है देहसो देही॥ ३॥ मिल पारस कंचन होया। मुक मनसा रतन परोया॥ ४॥ निजभाव भया परम भागा। गुरु पुछे मनपती यागा॥ ५॥ जल पितर कुंभ समान्या। सब राम एक कर जान्या॥ ६॥ गुरु चेले है मनमान्या। जीन नाम तत पछाना॥ ७॥

२२३९. पाडपडोसन पुछले नामा। काप है छानछवाई हो। तो पैं दुगुणी मजुरी देऊं। नाको बेडी देऊं बताई हो॥ १॥ रिबाई बेडी देनन जाई। देख बेडी रह्यो समाई॥ ध्रु०॥ हमारे बेडी प्राण धारा बेडी प्रत। मजुरी मागे जो कोई छान छवाने

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हो। लोककुटुंब सब हूते तोरे। तो आपन बेडी आवे हो॥ २॥ ऐसा वर्णन साकू। सब अंतर सब ठायीं हो। गुंगे महा अमृत रस चाख्या। पुछे कहन न जाई हो॥ ३॥ बेडीके गुण सुनरी बाई। जलद बाण ध्रुव थाप्यो हो। नामके स्वामी सिया बहोरी। लंका बिबिखन आप्यो हो॥ ४॥

२२४०. जो राज दे तब कबन बढाई। जो भीक मंगावे तब क्या घटा जाई॥ १॥ तू हर भज मन मेरे पद निर्वाना। बहूर न होये तेरा आबज जोना॥ २॥ सब ते उपाई परम पुलाई। जिस तू देवे तिसे भुजाई॥ ३॥ सतगुरु मिले तब संसार जाई। किसहू पुजूं दुजा नजर न आई॥ ४॥ एके पाथर किजे भाव। दुजे पाथर धरिये पाव॥ ५॥ जे वह देवतो हमबी देव। कहे नामदेव हम हरीकी सेव॥ ६॥

२२४१. मोको तारले रामा वारले। मैं अजान जन तर बिन जानो बाप विठ्ठला बाह दे नरदेह सुर होई॥ १॥ जात निमखमें सत्‌गुरु बुध सिखलाई। नरतें उपज स्वरगको जीत्यो सो ओखद मैं पाई॥ ध्रु०॥ जहां जहां ध्रुव नारद टेके नेके टकावो मोही। तेरे नाम अब लंब बहुत है नामेकी निजमत एही॥ २॥ मोह लाभती ताला बेली। बछरे बिन गाय अकेली॥ ३॥ पानीया बिन मीन तलफे ऐसें राम नाम बिन बापरो नामा॥ ४॥ जैसे गायका बाछा छूटका। थान चोखत माखन घुटका॥ ५॥ नामदेव नारायण पाया। गुरु भेटत अलख लखाया॥ ६॥ जैसे विखे हेतपर नारी। ऐसे नामे प्रीत मुरारी॥ ७॥ जैसे तापते निर्मल घामा। तैसे बाम नामबिन बापरो नामा॥ ८॥

२२४२. असभेद जगमें तुला पुरख दाने प्राग म्रानें। तो न पुजे हर किरत नामा आपने॥ १॥ राम भज रे मन आळसिया॥ ध्रु०॥ गया पिंड भर्ता बनारस अस वस्ता मुखवेद चतुर पढता। सकळ धर्म इच्छिता गुरु ग्यान इंद्रिय दृढता खट कर्म सहत रहता॥ २॥ सिव्ह संगत संवादं मन छोड छोड सकल भेदं। स्मर स्मर गोविंदं भज नामा तरसहं भवसिंधुं॥ ३॥ नाद भरमें जैसे मृगाये। प्राण त्यजे वाको ध्यान न जाये॥ ४॥ ऐसे रामा ऐसे हेरो। राम छोड चिंत अंत न फेरो॥ ५॥ जूं मिना हे रे पसू आरा। साना घडते हरे सुनारा॥ ६॥ जूं बिरवी हेरे परनारी। कोंडा डारत हिरे जुवारी॥ ७॥ जैं जैं देखो तैं तैं रामा। ताके चरण नित्य ध्याये नामा॥ ८॥

२२४३. तीन छंदे खेलों अच्छे। कुंभारके घर हंडी अच्छे॥ ध्रु०॥ राजाके घर सांडीगो। बाबनके घर रांदी अच्छे॥ १॥ रांदी सांदी हांदी गो। वानीके घर हिंग अच्छे॥ २॥ भहिसर माथे सिंगगो। देबल मध्य लिंगया अच्छे॥ ३॥ लिंग सिंग हिंग गो। तेलीको घर तेल अच्छे॥ ४॥ जंगलमध्ये बेल गो। मालीके घर केल अच्छे॥ ५॥ केल बेल तेल गो। संतांमध्यें गोविंद अच्छे॥ ६॥ गोकलमध्यें श्याम गो। नामेमध्यें राम अच्छे॥ ७॥ राम श्याम गोविंद गो॥ ८॥

भाग पांचवा

पौराणिक चरित्रें व कथानकें

दशावतारवर्णन.

२२४४. मीनरूप झाला प्रथम तो हरी। ज्याचा चराचरीं वास होता॥ १॥ मार्कंडेयालागीं दाखविली माया। वटपत्रीं तया रूपासी हो॥ २॥ बाळमुकुंदानें स्वरूप दावितां। श्वासोच्छ्‌वास घेतां चौदा कल्प॥ ३॥ पाहोनियां माया अंतरीं निमाला। घाबरा तो झाला ऋषिराज॥ ४॥ अश्वासून तया दाखविली माया। धन्य देवराया नामा म्हणे॥ ५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२२४५. उनकीं बुडतां क्षिति तारियेली। भूतें सारियलीं दाढेवरी॥ १॥ अद्यापि तूं होसी ऐसा हृषीकेशी। धरूनि मारिसी बळिवंत॥ २॥ नामा म्हणे धन्य अघटित करणी। दाढेसी धरूनि वराह तूं॥ ६॥

२२४६. प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार। भक्त राजेश्वरी म्हणताती॥ १॥ जळीं स्थळीं आहे सर्वां ठायीं हरी। प्रत्या तूं न्याहारी स्तंभामाजीं॥ २॥ ऐकतांचि वाणी क्रोधासी चढला। खड्ग तो काढिला कोषांतून॥ ३॥ तयेकाळीं हाक मारिली प्रचंड। फोडिलें ब्रह्मांड नरसिंहें॥ ४॥ धरूनियां दैत्य वेगीं मांडीवरी। नखानें तो चिरी पोट त्याचें॥ ५॥ जयजयकार झाला ब्रह्मादि पातला। इंद्रादिक आला देवांसहित॥ ६॥ करूनियां स्तुति देव शांतविला। प्रल्हाद तो झाला पूर्ण भक्त॥ ७॥ नामया हो झाली पायबाप भेटी। लाभ उठाउठी आनंदाचा॥

२२४७. बळीराजा दैत्य बहुत मातला। संपत्ति हरिल्या देवांचिया॥ १॥ तयाकाळीं जे जे देव आठविती। प्रार्थना करीती देवदेवा॥ २॥ तयाकाळीं तुवां अदिती उदरीं। अवतारधारी बटु झाला॥ ३॥ छळूनियां बळी पाताळीं घतला। आपण राहिला तया द्वारीं॥ ४॥ देव देवपदीं बैसऊनि सारे। राखीतसे द्वार नामा म्हणे॥ ५॥

२२४८. मारावया राजे ब्राह्मणाचे घरीं। रेणुकाजठरीं अवतार॥ १॥ करूनियां पृथ्वी निःक्षत्रिय बहुवेळां। दान ते सकळां विप्रां दिली॥ २॥ खुंटविला चिरंजीव अद्यापि तो आहे। आत्मरूपीं पाहे निजानंदीं॥ ३॥ दाशरथी रामा झाला समागम। तेणें एक बाण दिल्हा म्हणे नामा॥ ४॥

२२४९. दशरथ राजा संतान तें नाहीं। म्हणोनियां पाही ऋषेश्वरीं॥ १॥ करूनि विनंति पुत्रेष्टी हे केली। पुरोडाश भक्षिली पत्नियांनी॥ २॥ तयाच्या सामर्थ्यें पुत्र चार झाले। अविनाश आले अवतारासी॥ ३॥ रघुपति रामें पूर्ण मुसावलें। चैतन्य प्रगटलें कौसल्येसी॥ ४॥ तेणें केली ख्याति राक्षस मारिले। रामराज्य केलें त्रैलोक्यांत॥ ५॥ नामा म्हणे मज नाम गोड आहे। त्यालागीं तूं पाहे विचारुनी॥ ६॥

२२५०. श्रीकृष्ण लीलामृत बाणतांचि गोडी। कथेचि वरपडी आवडती॥ १॥ तयाचा विस्तार तोचि बोलविता। आहे सर्व सत्ता त्याचे हातीं॥ २॥ तेथें मी पामर काय बोलूं वाणी। दिसे केविलवाणी संतांपुढें॥ ३॥ म्हणोनी विस्तार आटोपिला नाहीं। वेदांसी तें नाहीं पुरतें ठावें॥ ४॥ नामा म्हणे नामें आठवा अवतार। पूर्ण ब्रह्म साचार कृष्णरूप॥ ५॥

२२५१. मध्यें झालें मौन देव निजध्यानीं। बौध्य ते म्हणोनी नांवें रूप॥ १॥ पाखांडें बहुत कलिमाजीं झालीं। वर्णाश्रम सकळीं बुडविले॥ २॥ पापाचिया राशी जळतील नामीं। निश्चय हरिनामीं नामा म्हणे॥ ३॥

२२५२. कलीचिये अंतीं होणार कलंकी। मारील म्लेंछ कीं घोड्यावरी॥ १॥ करील धर्माची उभारील गुढी। कृतयुगा प्रौढी करी तोचि॥ २॥ तोंवरी साधन हरिनाम कीर्ति। संतांची संगती नामा म्हणे॥ ३॥

शुकाख्यान.

२२५३. ॐ नमोजी ब्रह्म अवतारू। शिष्य अभय करू। तो वंदिला श्रीगुरु। श्रीरामकृष्ण॥ १॥ म्हणतां वाचेसी श्रीराम। रसनेसी न पडे श्रम। राम नाम उत्तमोत्तम। सर्व नामांमध्यें॥ २॥ पाहतां दोन अक्षरें। वेदशास्त्रें पुराण सारें। श्रीराम नामें उतरे। भवसागर॥ ३॥ तारावया संसार आयती। नौका श्रीरामगुरु उपदेशिती। श्रीकृष्ण उपदेश शुकाप्रति। शास्त्रें असती प्रमाण॥ ४॥ ऐसी नमिली श्रीगुरु देवता। तेणें प्रसन्न जाहली वाग्देवता। मग ठेवी माझिये माथां। अभय करू॥ ५॥ गुरुवचन लाधलें। तेणें ज्ञानु प्रकाशलें। मन माझें समरसलें। श्रीरामचरणीं॥ ६॥ आतां श्रोते हो समस्त। तुम्हीं व्हावें एकचित्त। ऐकावें हरिचरित्र। धर्मकथा॥ ७॥ वरि एक असे जी बोलणें। तुम्ही संभाळूनि घेणें। माझें वेडेंवाकडें बोलणें। क्षमा करणें अपत्या॥ ८॥ इक्षुदंड असे वांकुडा। परि शुद्ध जाणिजे चोखडा। तैसा शब्द माझा बोबडा। परि कथा गोड असे॥ ९॥ ही कथा जे ऐकती। ते मुक्तपदातें पावती। ऐसी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हो। लोककुटुंब सब हूते तोरे। तो आपन बेडी आवे हो॥ २॥ ऐसा वर्णन साकू। सब अंतर सब ठायीं हो। गुंगे महा अमृत रस चाख्या। पुछे कहन न जाई हो॥ ३॥ बेडीके गुण सुनरी बाई। जलद बाण ध्रुव थाप्यो हो। नामके स्वामी सिया बहोरी। लंका बिबिखन आप्यो हो॥ ४॥

२२४०. जो राज दे तब कबन बढाई। जो भीक मंगावे तब क्या घटा जाई॥ १॥ तू हर भज मन मेरे पद निर्वाना। बहूर न होये तेरा आबज जोना॥ २॥ सब ते उपाई परम पुलाई। जिस तू देवे तिसे भुजाई॥ ३॥ सतगुरु मिले तब संसार जाई। किसहू पुजूं दुजा नजर न आई॥ ४॥ एके पाथर किजे भाव। दुजे पाथर धरिये पाव॥ ५॥ जे वह देवतो हमबी देव। कहे नामदेव हम हरीकी सेव॥ ६॥

२२४१. मोको तारले रामा वारले। मैं अजान जन तर बिन जानो बाप विठ्ठला बाह दे नरदेह सुर होई॥ १॥ जात निमखमें सत्गुरु बुध सिखलाई। नरतें उपज स्वरगको जीत्यो सो ओखद मैं पाई॥ ध्रु०॥ जहां जहां ध्रूव नारद टेके नेके टकावो मोही। तेरे नाम अब लंब बहुत है नामेकी निजमत एही॥ २॥ मोह लाभती ताला बेली। बछरे बिन गाय अकेली॥ ३॥ पानीया बिन मीन तलफे ऐसें राम नाम बिन बापरो नामा॥ ४॥ जैसे गायका बाछा छूटका। थान चोखत माखन घुटका॥ ५॥ नामदेव नारायण पाया। गुरु भेटत अलख लखाया॥ ६॥ जैसे विखे हेतपर नारी। ऐसे नामे प्रीत मुरारी॥ ७॥ जैसे तापते निर्मल घामा। तैसे बाम नामबिन बापरो नामा॥ ८॥

२२४२. असभेद जगमें तुला पुरख दाने प्राग म्रानें। तो न पुजे हर किरत नामा आपने॥ १॥ राम भज रे मन आळसिया॥ ध्रु०॥ गया पिंड भर्ता बनारस अस वस्ता मुखवेद चतुर पढता। सकळ धर्म इच्छिता गुरु ग्यान इंद्रिय दृढता खट कर्म सहत रहता॥ २॥ सिव्ह संगत संवादं मन छोड छोड सकल भेदं। स्मर स्मर गोविंदं भज नामा तरसहं भवसिंधुं॥ ३॥ नाद भरमें जैसे मृगाये। प्राण त्यजे वाको ध्यान न जाये॥ ४॥ ऐसे रामा ऐसे हेरो। राम छोड चिंत अंत न फेरो॥ ५॥ जूं मिना हे रे पसू आरा। साना घडते हेरे सुनारा॥ ६॥ जूं बिरवी हेरे परनारी। कोंडा डारत हिरे जुवारी॥ ७॥ जैं जैं देखो तैं तैं रामा। ताके चरण नित्य ध्याये नामा॥ ८॥

२२४३. तीन छंदे खेलों अच्छे। कुंभारके घर हंडी अच्छे॥ ध्रु०॥ राजाके घर सांडीगो। बाबनके घर रांदी अच्छे॥ १॥ रांदी सांदी हांदी गो। वानीके घर हिंग अच्छे॥ २॥ भहिसर माथे सिंगगो। देबल मध्य लिंगया अच्छे॥ ३॥ लिंग सिंग हिंग गो। तेलीको घर तेल अच्छे॥ ४॥ जंगलमध्ये बेल गो। मालीके घर केल अच्छे॥ ५॥ केल बेल तेल गो। संतांमध्यें गोविंद अच्छे॥ ६॥ गोकलमध्यें श्याम गो। नामेमध्यें राम अच्छे॥ ७॥ राम श्याम गोविंद गो॥ ८॥

भाग पांचवा

पौराणिक चरित्रें व कथानकें

दशावतारवर्णन.

२२४४. मीनरूप झाला प्रथम तो हरी। ज्याचा चराचरीं वास होता॥ १॥ मार्कंडेयालागीं दाखविली माया। वटपत्रीं तया रूपासी हो॥ २॥ बाळमुकुंदानें स्वरूप दाविता। श्वासोच्छ्वास घेतां चौदा कल्प॥ ३॥ पाहोनियां माया अंतरीं निमाला। घाबरा तो झाला ऋषिराज॥ ४॥ अश्वासून तया दाखविली माया। धन्य देवराया नामा म्हणे॥ ५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२२४५. उनकीं बुडतां क्षिति तारियेली। भूतें सारियलीं दाढेवरी॥ १॥ अद्यापि तूं होसी ऐसा हृषीकेशी। धरूनि मारिसी बळिवंत॥ २॥ नामा म्हणे धन्य अघटित करणी। दाढेसी धरूनि वराह तूं॥ ३॥

२२४६. प्रल्हादाकारणें स्तंभीं अवतार। भक्त राजेश्वरी म्हणताती॥ १॥ जळीं स्थळीं आहे सर्वां ठायीं हरी। प्रत्या तूं न्याहारी स्तंभामाजीं॥ २॥ ऐकतांचि वाणी क्रोधासी चढला। खड्ग तो काढिला कोषांतून॥ ३॥ तयेकाळीं हाक मारिली प्रचंड। फोडिलें ब्रह्मांड नरसिंहें॥ ४॥ धरूनियां दैत्य वेगीं मांडीवरी। नखानें तो चिरी पोट त्याचें॥ ५॥ जयजयकार झाला ब्रह्मादि पातला। इंद्रादिक आला देवांसहित॥ ६॥ करूनियां स्तुति देव शांतविला। प्रल्हाद तो झाला पूर्ण भक्त॥ ७॥ नामया हो झाली पायबाप भेटी। लाभ उठाउठी आनंदाचा॥

२२४७. बळीराजा दैत्य बहुत मातला। संपत्ति हरिल्या देवांचिया॥ १॥ तयाकाळीं जे जे देव आठविती। प्रार्थना करीती देवदेवा॥ २॥ तयाकाळीं तुवां अदिती उदरीं। अवतारधारी बटु झाला॥ ३॥ छळूनियां बळी पाताळीं घतला। आपण राहिला तया द्वारीं॥ ४॥ देव देवपदीं बैसऊनि सारे। राखीतसे द्वार नामा म्हणे॥ ५॥

२२४८. मारावया राजे ब्राह्मणाचे घरीं। रेणुकाजठरीं अवतार॥ १॥ करूनियां पृथ्वी निःक्षत्रिय बहुवेळां। दान ते सकळां विप्रां दिली॥ २॥ खुंटविला चिरंजीव अद्यापि तो आहे। आत्मरूपीं पाहे निजानंदीं॥ ३॥ दाशरथी रामा झाला समागम। तेणें एक बाण दिल्हा म्हणे नामा॥ ४॥

२२४९. दशरथ राजा संतान तें नाहीं। म्हणोनियां पाही ऋषेश्वरीं॥ १॥ करूनि विनंति पुत्रेष्टी हे केली। पुरोडाश भक्षिली पत्नियांनी॥ २॥ तयाच्या सामर्थ्यें पुत्र चार झाले। अविनाश आले अवतारासी॥ ३॥ रघुपति रामें पूर्ण मुसावलें। चैतन्य प्रगटलें कौसल्येसी॥ ४॥ तेणें केली ख्याति राक्षस मारिले। रामराज्य केलें त्रैलोक्यांत॥ ५॥ नामा म्हणे मज नाम गोड आहे। त्यालागीं तूं पाहे विचारुनी॥ ६॥

२२५०. श्रीकृष्ण लीलामृत बाणतांचि गोडी। कथेचि वरपडी आवडती॥ १॥ तयाचा विस्तार तोचि बोलविता। आहे सर्व सत्ता त्याचे हातीं॥ २॥ तेथें मी पामर काय बोलूं वाणी। दिसे केविलवाणी संतांपुढें॥ ३॥ म्हणोनी विस्तार आटोपिला नाहीं। वेदांसी तें नाहीं पुरतें ठावें॥ ४॥ नामा म्हणे नामें आठवा अवतार। पूर्ण ब्रह्म साचार कृष्णरूप॥ ५॥

२२५१. मध्यें झालें मौन देव निजध्यानीं। बौध्य ते म्हणोनी नांवें रूप॥ १॥ पाखांडें बहुत कलिमाजीं झालीं। वर्णाश्रम सकळीं बुडविले॥ २॥ पापाचिया राशी जळतील नामीं। निश्चय हरिनामीं नामा म्हणे॥ ३॥

२२५२. कलीचिये अंतीं होणार कलंकी। मारील म्लेंछ कीं घोड्यावरी॥ १॥ करील धर्माची उभारील गुढी। कृतयुगा प्रौढी करी तोचि॥ २॥ तोंवरी साधन हरिनाम कीर्ति। संतांची संगती नामा म्हणे॥ ३॥

शुकाख्यान.

२२५३. ॐ नमोजी ब्रह्म अवतारू। शिष्य अभय करू। तो वंदिला श्रीगुरु। श्रीरामकृष्ण॥ १॥ म्हणतां वाचेसी श्रीराम। रसनेसी न पडे श्रम। राम नाम उत्तमोत्तम। सर्व नामांमध्यें॥ २॥ पाहतां दोन अक्षरें। वेदशास्त्रें पुराण सारें। श्रीराम नामें उतरे। भवसागर॥ ३॥ तारावया संसार आयती। नौका श्रीरामगुरु उपदेशिती। श्रीकृष्ण उपदेश शुकाप्रति। शास्त्रें असती प्रमाण॥ ४॥ ऐसी नमिली श्रीगुरु देवता। तेणें प्रसन्न जाहली वाग्देवता। मग ठेवी माझिये माथां। अभय करू॥ ५॥ गुरुवचन लाधलें। तेणें ज्ञानु प्रकाशलें। मन माझें समरसलें। श्रीरामचरणीं॥ ६॥ आतां श्रोते हो समस्त। तुम्हीं व्हावें एकचित्त। ऐकावें हरिचरित्र। धर्मकथा॥ ७॥ वरि एक असे जी बोलणें। तुम्ही संभाळूनि घेणें। माझें वेडेंवाकडें बोलणें। क्षमा करणें अपत्या॥ ८॥ इक्षुदंड असे वांकुडा। परि शुद्ध जाणिजे चोखडा। तैसा शब्द माझा बोबडा। परि कथा गोड असे॥ ९॥ ही कथा जे ऐकती। ते मुक्तपदातें पावती। ऐसी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझी विनंती। भाविक साधुसंतां ॥ १० ॥ जे कर्मी परिपूर्ण। वेदशास्त्रीं निपुण। त्यांसी ही माझें नमन। ब्रह्म मुहूर्ता ॥ ११ ॥ आतां शुकदेव आख्यान। श्रीगुरुकृपेनें करी कथन। जें जनमेजयाप्रति वैशंपायन। सांगतां झाला ॥ १२ ॥ व्यासऋषीची कांता। सुळजा नामें पतिव्रता। जे धरूं जाणे चित्ता। वचन भ्रताराचें ॥ १३ ॥ जें कांहीं बोले पति। तेंचि धरी चित्तीं। सुळजा नामें सति। जगीं कीर्ति तियेची ॥ १४ ॥ पति बोले उत्तर। तें मानी साचार। भ्रतारसेवेसी तत्पर। अंतर पडों नेदी सर्वथा ॥ १५ ॥ आतां सति या असत् कलियुगीं। आपुलिया स्वार्थालागीं। डंभाई करिती वाउगी। उतावळया ॥ १६ ॥ न करिती भ्रताराची भक्ति। पतीचें उत्तर नाहीं चित्तीं। लटकीच करिती भक्ति। अभावेंचि जाणावी ॥ १७ ॥ एक डोळे मोडिती। बोल मंजुळ बोलती। म्हणती तुमचेनि सर्व तृप्ति। प्राणेश्वरा ॥ १८ ॥ एक म्हणती प्राणेश्वरा। घरीं वरी नाहीं अवधारा। काय खाती निष्ठुरा। बालकें माझीं ॥ १९ ॥ एकी तेलमीठाकारणें। करिती पतिप्रती भांडणें। म्हणती तुझेनि भ्रतारपणें। काय काज ॥ २० ॥ वरी आपलें आपण चोरिती। रांधितां उभ्याच खाती। जारणिसी गुज बोलती। पतीचें आपुलें ॥ २१ ॥ रात्रंदिवस भांडण। पतीसी करिती जाण। म्हणती तुमचें शहाणपण। पुरें आतां ॥ २२ ॥ घरींचीं वडिलें न साहती। उगाची लेंकरासि मारिती। त्या परपुरुषा अभिलाषिती। रात्रंदिवस ॥ २३ ॥ भ्रतारा देखोनि पृष्ठि देती। तयातें देखुन वस्तु खाती। बाळकातें अंतर देती। महापापिणी त्या ॥ २४ ॥ ऐशा अधर्मी नारी। असती कलियुगाभितरीं। तैसें ते नव्हे सुंदरी। सुळजा पतिव्रता ॥ २५ ॥ बोलों जाणें बरवें। सेवा करी मनोभावें। सुळजा सती नांवें। जगीं विख्यात ॥ २६ ॥ ते पतिव्रता सुंदरी। व्यास ऋषीची स्त्री। ते झाली गरोदरी। शुकमाता ॥ २७ ॥ प्रसूत न होय अवधारा। जहालीं वरुषें बारा। शुकदेव कुमारा। ज्ञानी असे ॥ २८ ॥ ऐसी ते गरोदरी। थोर व्यथा होतसे उदरीं। काय कवणीये परी। आथिचना ॥ २९ ॥ कष्ट देखतां तियेचे। लोक म्हणती हिचा जीव न वांचे। आम्हां देखतां बहुतांचे। जीव गेले ॥ ३० ॥ ऐसें पुत्रवत्या नारी बोलती। करुणावचनें भाकिती। आणि बांझा करिती। हास्य तियेचें ॥ ३१ ॥ एक म्हणति वो निसुगे सुंदरे। काय करावी कन्या कुमरें। सर्व इच्छा भ्रतार भोगी पुरे। मरण आदरें तुज आलें ॥ ३२ ॥ एवढी जोडिली जोडी। सासूसासरा वृद्ध बापुडीं। त्यांसी आभाची आवडी। पडसी तूं ॥ ३३ ॥ वृद्ध जाहला ऋषीश्वर। परी त्यासी पुत्राचा शोक फार। हा गर्भ दुर्धर। कवणें निस्तारावा ॥ ३४ ॥ ऐसें बोलती नरनारी। सुळजेतें व्यथा होतसे भारी। आकांत होतो ऋषीच्या मंदिरीं। ते समयीं परियेसा ॥ ३५ ॥ ज्ञानी म्हणती पाचारा अनंत। तो सांगेल याचा वृत्तांत। मग ऋषि मनामाजीं विचारित। मग स्मरे अनंता ॥ ३६ ॥ व्यास हृदयीं चिंतिता झाला। श्रीहरि त्वरित पावला। मग पुसता झाला। श्रीकृष्ण व्यासाप्रति ॥ ३७ ॥ श्रीकृष्णाचें आगमना। उत्साव झाला सर्वजना। झालें देवदर्शना। विघ्नें दारुण नासती ॥ ३८ ॥ श्रीहरि व्यासगृहासी आले। साधुसंतां मानवले। मग बैसों घातलें। आंथरीय ॥ ३९ ॥ ऋषि म्हणती श्रीहरि। द्वादश वर्षे जाहलीं पुरीं। प्रसूत न होय स्त्री। काय तें उदरीं कळेना ॥ ४० ॥ मग देव म्हणती ऐका। आड धरा जमनिका। विचारूनि गर्भ बाळका। काय आवांका तयाचा ॥ ४१ ॥ श्रीकृष्णवचन पडतां कानीं। वाचा झाली गर्भालागुनी। मग करसंपुष्ट गर्भ जोडोनि। विनविता जाहला ॥ ४१ ॥ म्हणे देवाधिदेवा दंडवत। देव चिरंजीव म्हणत। बारे शिणलासी बहुत। गर्भवासीं ॥ ४३ ॥ बाळां आतां रिघें बाहेरीं। माता शिणली भारी। सुखें असें संसारीं। क्रीडा करी तूं ॥ ४४ ॥ मातेची सेवा किजे। पितृवचन पाळिजे। पावलासी सहजें। मनुष्य देहो ॥ ४५ ॥ अद्यापि तरी ज्ञान धरी। आपणातें उद्धरीं। किती दिवस अघोरीं। क्रमिसी बाळा ॥ ४६ ॥ सांडी हें अघोरपण। बाळा भोगी सुख संपन्न। जन्मा येऊनि सुख जाण। आणिक नाहीं ॥ ४७ ॥ मज बाळपणीं गोरस खातां। खेळवी यशोदा माता। नंदाचें सुख सांगतां। आनंद मज

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वाटे ॥ ४८ ॥ आणि मातेचेनि हातें। षड्रसीं तृप्ति होय मातें। खेळवी मज सांगातें। पाळण्यांत निजवी ॥ ४९ ॥ यावरी तारुण्य आलें जिवीं। गोपी गोवळयांमाजीं खेळवी। माता दधिभात जेववी। आपुलेनि हातें ॥ ५० ॥ मी खेळलों गोकुळीं। गोवळ्यांचे खेळींमेळीं। प्रणिली भीमकरायाची बाळी। राज्य केलें द्वारकेचें ॥ ५१ ॥ सोळा सहस्र अंतःपुरें। साठीं सहस्र कन्याकुमरें। रथ गज सैन्य अपारें। गणीत नाहीं वैभवा ॥ ५२ ॥ दैत्यांचें निर्दाळण केलें। इंद्रादि देव स्वस्थानीं बैसविले। एकछत्रीं राज्य केलें। राज्यीं स्थापिलें धर्मराया ॥ ५३ ॥ या उपरी तूं राज्य करी। निघें उदरा बाहेरीं। सुख अपार संसारीं। ऋषिनंदना ॥ ५४ ॥ कांहीं नको धरूं भये। लवकरी बाहेरी ये। हें ऐकोनि शुकदेवराये। बोलता जाहला ॥ ५५ ॥ देवां तुम्ही बोलिलें। म्यां बहुत जन्म भोगिले। आतां फार जर्जर जाहलें। देह माझें ॥ ५६ ॥ आतां विनंति परियेसी। जगज्जीवना हृषीकेशी। सुख दुःख तुजपाशीं। निवेदितों ॥ ५७ ॥ मागें जन्म जन्मांतरीं। कष्ट भोगिलें शरीरीं। तें दुःख मुरारी। काय सांगों ॥ ५८ ॥ येथूनि परिसें परिकरू। नावेक सांगेन मनहरू। तेथें होतां ऋषीश्वरू। व्यासऋषि ॥ ५९ ॥ तेही ग्रंथ केले अनेक। अठरा पर्व भारत देख। वेदादी पुराणें देख। वेदांतसूत्रें ॥ ६० ॥ प्रथम जन्म ब्राह्मणकुळीं। तेणें संध्यास्नान त्रिकाळीं। आतिथ्य कवणे काळीं। अथीचना ॥ ६१ ॥ जेथें देवधर्म चुकलों। आशा मोहपरि गुंतलों। कर्म करों लागलों। अनेकांचें ॥ ६२ ॥ दोघी स्त्रिया होत्या घरीं। त्यांतें सोडोनी परद्वार करीं। मन माझें कवणेपरी। स्थीर नोहे ॥ ६३ ॥ प्रीति असे एकीवरी। दुसरी ते दूर धरी। वस्त्रें अलंकारीं भेद करीं ।ऐसीपरी घडली ॥ ६४ ॥ एकी आवडी जीवाहूनि। दुजेची गोष्ट नायकें कानीं। तिनें पतिसुख स्वप्नीं। देखिलें नाहीं ॥ ६५ ॥ ते काय करील अबळ। माझी मति चंडाळ। सदा करि तीसीं कळ। सुख तिळ न जाणें ॥ ६६ ॥ दिवस क्रमी ती ऐसिया रीति। रात्रीं ऋतु नेदी तिजप्रति। तेणें उलथों पाहे क्षिती। तियेचे दुःखास्तव ॥ ६७ ॥ मासाचे सोळा ऋतु। तयातें चुकवी अवचितु। तेरा बारा ब्रह्महत्या पडतु। पुरुषावरी ॥ ६८ ॥ ऐशा हत्या नित्य बारा। जन्मावरि पडिल्या शारंगधरा। त्या पापाचे डोंगर। जाले देवा ॥ ६९ ॥ ऐसिया पापास्तव देवा। हीनयाति जन्मलों केशवा। पुनरपि जन्म माधवा। पावलों मी ॥ ७० ॥ शुद्रयाति मी जन्मलों। कृषिकर्म आचरों लागलों। देवा तुज चुकलों। खळीं झाडितां ॥ ७१ ॥ त्या पापास्तव श्रीपति। जन्म पावलों मातंग जाति। मातंगी जननी रमापति। झाली माझी ॥ ७२ ॥ ते नगरीचा राजा। प्रतिपाळ करी माझा। तयाचे स्वामिकाजा। तेथें पुरुवनीं अनुसरलों ॥ ७३ ॥ कवण एके अवसरीं। परचक्र आलें राज्यावरी। राजा निघाला बाहेरी। युद्धालागीं ॥ ७४ ॥ तेथें म्यां सैन्य मारिलें। रायें मज वेतन केलें। वैरियातें निर्दाळिलें। अर्धपळ न होतां ॥ ७५ ॥ तें युद्ध दारुण। सर्वांगी खोंचले बाण। मग म्यां सोडिला प्राण। स्वामिकार्या ॥ ७६ ॥ तेथें सुकृत साधलें। शिव शंभु प्रसन्न झाले। स्वामिकाज तपआगळें। संपादिलें म्यां ॥ ७७ ॥ मग जन्मलों राजकुळीं। प्रजाजनांतें पीडा केली। राजसभा कोणे काळीं। जाणेचिना ॥ ७८ ॥ ऐसे कित्येक संवत्सर लोटले। द्रव्य अपार मिळविलें। परी नाहीं कार्य केलें। न पुजिलें शिवलिंग ॥ ७९ ॥ पवित्र ब्राह्मणावरी कोपतां। मागें पुढें न पाहिलें सर्वथा। वृत्ति भूमि हिरोनि घेतां। वेळ न लागे मजलागीं ॥ ८० ॥ ऐशा पातकांच्या राशी। पर्वत झाले आकाशीं। पुनरपि हृषीकेशी। जन्म पावलों मी ॥ ८१ ॥ जन्मोनी झालों मी वैश्य। द्रव्याचा हव्यास। द्रव्य जोडावयाचा सोस। कमी तोळें म्यां केलीं ॥ ८२ ॥ नाणें खरें खोटें। दांडी पारडें लहानमोठें। झोंक मारी नेहटें। अभिलषी बुद्धि ॥ ८३ ॥ वैश्य जन्म सरला। पापाचा संचितार्थ जाहला। पुढती जन्म पावलों। मनुष्य देह ॥ ८४ ॥ मग जन्म पांचाळ वंशीं। निरंतर चोरी धातुसी। सोनार धर्म हृषीकेशी। करीत होतों ॥ ८५ ॥ नित्य सुवर्ण चोरणें। रात्रंदिवस डांक लावणें। बहु असत्य बोलणें। आणिक द्यूतकर्म खेळणें ॥ ८६ ॥ ऐशापरी मेळविलें। वेश्या जारिणीतें वेंचिलें। खोटें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नाणें केलें। राजमुद्रेचें॥ ८७॥ तें नाणें वावरें बाजारां। मग धरून नेती राजद्वारा। शिक्षा लाविती सुवर्णचोरा। तें दुःख मी काय सांगों॥ ८८॥ ऐसिया पापें अगणती। म्हणोनी येतों काकुळती। पुनरपि गा श्रीपति। जन्म झाला॥ ८९॥ ऐसें जन्म सांगतां। तरी विस्तारें जाईल कथा। पुढें ऐकावी श्रोतां। रसाळ कथा शुकवाणी॥ ९०॥

२२५४. शुक म्हणे गा श्रीहरि। एका मनुष्य अवतारामाझारीं। अनंत जन्म पावलों मुरारी। अठरा पगड याति पाहिल्या॥ १॥ रजक आणि चर्मक। कुलाल आणि नापिक। चांडाळ आणि अनामिक। जन्म पावलों दयाळा॥ २॥ तेली तांबोळी सुतार। गुरव साळी विणकर। शिंपी खाटिक धनगर। बुधले ऐसें जन्म पावलों॥ ३॥ परि न चुके येरझार। सुखदुःख करकर। जन्मा आलिया व्यापार। कांहीं केला पाहिजे॥ ४॥ घरीं स्त्री पुत्र कलत्र। मातापिता कुटुंब गोत्र। कर्माचा अधिकार। दुःखदाता हा जन्म॥ ५॥ ऐसे कष्ट भोगितां। कर्म न सरे गा अनंता। रोगाविण कष्ट पावतां। वेळ न लगे॥ ६॥ ऐसिया दुःखाचे सागरीं। पडिलों येरझारीं। मन स्थिर करूं कवणीये परी। कृपावंता बापा॥ ७॥ ऐशी कर्मे करितां। पालट न पडे माझिया चित्ता। पापाचा संग्रह मागुता। न करी मी देवा॥ ८॥ एका पोटाकारणें। नाना प्रकारीं जोडणें। मागे पुढें न पाहाणें। कर्म करितां॥ ९॥ ऐसे जन्म लोटले। पापाचे डोंगर जाहले। दिवसेंदिवस उणें होत चाललें। पुण्य देखा॥ १०॥ अंडज आणि जारज। स्वेदज आणि उद्भिज। ऐसें जन्म केशवराज। पावलों मी॥ ११॥ श्वापद तृणचरें। तरुवर शिळा शिखरें। कूपें पुष्करणीं सरोवरें। आणि सरिता नदिया॥ १२॥ ऐसे पावतां जन्म अपार। क्षीण झालें माझें शरीर। व्यथा ती मुर्कुट गा प्रती अपार। पक्षि याती॥ १३॥ ऐसियापरी संसारीं। दुःख अती या शरीरीं। व्यर्थ तुजवीण श्रीहरी। जन्म घेणें घडे॥ १४॥ सदा अपार दुःख भोगिजे। तें सर्व सुख मानिजे। गोड करूनियां जेविजे। संसारू हा॥ १५॥ पूर्वकर्म करोनि। पाविजे हीन योनी। तेंचि सुखदुःख मानी। जनलोक॥ १६॥ तें वाटे बरवें। आतां वीट घेतला जिवें। हें ऐकुनी केशवें। काय बोलिलें॥ १७॥ अगा तूं आपलें दुःख सांगसी। पुढलांची व्यथा नेणसी। बारा वर्षें मातेसी। कां कष्टविलें॥ १८॥ प्रसूत समईंचे कहाडे। तूं नेणसी गा बापुडें। मातेचें दुःख धडफुडे। नवल बालका॥ १९॥ तंव शुक बोलिले। ऐसेंच मागें भोगिलें। मृगजन्म जाहलें। मज देवा॥ २०॥ व्याधें बाण लावुनी कानाडी। श्वानें लाविलीं पाठमोरीं। मी त्रासानें पळालों परी न सोडी। मारिले कांटे॥ २१॥ तो संधान करी निष्ठुर हातें। न पळलों भुललों दिशांतें। दुष्टासी वारी ऐसें सांगातें। नाहीं कोणी॥ २२॥ तेथें आकांत जाहला। व्याधें वणवा लाविला। धुरें निर्बुजला। प्राण माझा॥ २३॥ तेथें काकुळती येत थोरी। प्रसूत माता न होय झडकरी। मग दोघे मेलों ते अवसरीं। ऐसी गर्भाची परी। गा केशवा॥ २४॥ आणिक कष्ट झाले देवा। ते परियेसीं गा केशवा। ऐशा ऐशा योनी जिवा। जन्म माझा॥ २५॥ तेथें स्त्रियांची नाहीं गणती। कन्या कुमर जन्मती मरती। देखत देखत संपत्ति। गेली माझी॥ २६॥ मज देखतां माझीं बाळें। गांजिलें धिवरें जाळें। उदर आपुलें भरलें। ऐशापरी॥ २७॥ ऐसें कित्येक वेळीं। समयो पुरला मीनकुळीं। गांजिलें धिवरें जाळीं। शिक्षावती॥ ॥२८ प्रतिदिनीं होतसे आकांत। माझे बाळकाचा घात। स्त्रिया माझ्या गळा झोंबत। त्या दुःखास्तव॥ २९॥ ते अवस्था सांगतां। न पुरे गा कृष्णनाथा। मज बाहेर येतां। लाज वाटे॥ ३०॥ आणिक जन्म निष्ठुर। आपलिया अपत्याचा संहार। रूपें धरिलीं रानमांजर। आणि सर्प विंचू॥ ३१॥ व्याघ्र होवोनि मारीं गाय। तेथें पातक होय। मांस त्याचें खाय। ऐसीं दुष्टकर्मे॥ ३२॥ पशुयोनी अघोर। येरयेरासी वैर। ऐसा दुर्घट संसार। जन्म माझा॥ ३३॥ एकमेकांचा धाक वनीं। सदा भ्रमणें घोर वनीं। तिळ एक सुख लोचनीं। देखिलें नाहीं॥ ३४॥ आणिक जन्म झाला देवा। तो परियेसीं गा केशवा। थोर माझिया जीवा। झाले ऐसे॥ ३५॥ नीच योनीं जन्मलों। कोळ्याचे घरीं वाढलों। शिरीं काष्ठें वाहतां

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भागलों। तें काय सांगों अनंता ॥ ३६ ॥ शिरीं काष्ठांचा भारा। जात होतों नगरशहरा। उष्णकाळीं श्रम शरीरा। ते दातारा काय सांगों ॥ ३७ ॥ मार्गी चालतां घामेलों। मस्तक पुसों लागलों। तेणें प्राण व्याकुळ झालों। उदक मागें भलतयां ॥ ३८ ॥ डोईंत ऊ सांपडली। तेणें माझी तनु गांजिली। ते बोटीं रगडिली। कांहीं केल्या न सोडी ॥ ३९ ॥ ऐसे जन्मजन्मातरीं। कष्ट झाले फार या शरीरीं। ते किती सांगों केसरी। तुजप्रति ॥ ४० ॥ ऐसे कष्ट फार साचे। ते न बोलवती वाचे। मार्गी चिंतिले चरण तुमचे। देवाधिदेवा ॥ ४१ ॥ मग कित्येक काळा। बैल जन्म पावलों गोपाळा। गोधनामाजीं सकळां। चरत होतों ॥ ४२ ॥ मग नांगरीं जुंपिलें। खांदीं किडे पडले। तेथें कागें बगें टोचिलें। तें दुःख न सांगवें ॥ ४३ ॥ तेथें प्रचाजनाची झोडी। मग लागली वांकुडी। मग हिंडलों झाडी। वेळुवाचे ॥ ४४ ॥ रात्र समयीं भुकेलों। मग पिंडीवरील बेलपत्री भक्षूं लागलों। हिंवानें फार कष्टलों। मग रिघालों देउळीं ॥ ४५ ॥ ऐसें हिंडतां वनस्थळीं। विश्रामलों देउळीं। तेथें होते चंद्रमौळी। ज्योतिर्लिंग ॥ ४६ ॥ अंगीभरला वारा। बसो जाता परभारा। झोक न साहवे शरीरा। मग पडलों दातारा। शिवलिंगीं ॥ ४७ ॥ मज निद्रा लागली। मुखींची पत्री कळाली। शंभूनें पूजा मानिली नंदी म्हणोनि ॥ ४८ ॥ तें सुकृत मज लाधलें। शिवशंभू प्रसन्न झाले। तेणें पुन्हां जन्म पावलों। मनुष्य देह ॥ ४९ ॥ पहा मनुष्यदेहाभीतरीं। प्राणी आपली सोय न धरी। तरी आणिके शरीरीं। सिद्धि नाहीं ॥ ५० ॥ गर्भी प्राणि असतां। तुझें स्मरण गा अनंता। गर्भाबाहेर पडतां। भूली पडे ॥ ५१ ॥ धरणी वायु लागतां। स्मरण निसरे तत्त्वतां। वोळखूं लागे मातापिता। आणि कोहं कोहं रडे ॥ ५२ ॥ बहुत जनम येरझारी। क्रमिले बहुतां प्रकारीं। तितकींच सखीसोयरीं। काय झालीं माझीं ॥ ५३ ॥ म्हणोनी हें मिथ्याजाळ। लटकेची पाल्हाळ। वांयांचि नर व्याकुळ। होती देखा ॥ ५४ ॥ क्रमिले बहुत दिवस। करूनि नाना हव्यास। देवा आतां सायास घालूं नको ॥ ५५ ॥ भय आणि कष्ट चिंता। यावेगळा करी जी अनंता। तुज शरण जी कृष्णनाथा। करी मज जन्मावेगळें ॥ ५६ ॥ उपजलिया संसारीं। तूंतें विसरती वरिच्यावरी। संसार व्यापारीं। लुब्ध होती ॥ ५७ ॥ जोडावया धनसंपत्ति। सदा घोकणी चित्तीं। कवण्यापरि गा श्रीपति। जोडसी तूं ॥ ५८ ॥ एक संपत्तीची आशा। पडती मोहफांशा। मग परमपुरुषा। न ओळखती ॥ ५९ ॥ पाहतां कवणाचें धन। नाहीं चिरंजीव राहणें। सवेचि जन्ममरण। न सरे देवा ॥ ६० ॥ वर्णितोसी आतां पुरे। साठी सहस्त्र कन्याकुमरें। ते अनंत योनी शरीरें। देखिले देवा ॥ ६१ ॥ देवा हें तुज साजें। आणिकांसी न साजे। आतां पुरे तुझे। चरणीं ठाव देईं ॥ ६२ ॥ मग बोलिला श्रीहरी। बा हें बंधन अवधारीं। आतां निघे बाहेरीं। योगिया ॥ ६३ ॥ तुझे मनींचे मनोरथ। सिद्धी पाववीन समस्त। बाहेर यावें निभ्रांत। श्रीव्याससुता शुका ॥ ६४ ॥ तुज उपदेशितों ज्ञान। अनंतचरणीं होय लीन। पुढती जन्ममरण। तुज नाहीं ॥ ६५ ॥ सांडीं आशा भेदतृष्णा। न करीं भेदाभेद विवंचना। कामक्रोध कल्पना। येऊं नेदी ॥ ६६ ॥ दंभ अहंता अहंकार। तयाचा न करी अंगिकार। विटंबिती संसारीं। ज्ञानदृष्टि ॥ ६७ ॥ कांहीं चिंता न धरीं मनीं। पापगोष्टी नायके कानीं। परनिंदा मुखवचनीं। बोलूं नको ॥ ६८ ॥ धरावा साधुसंतांचा संग। सांडावा कुसंग। गुरुवचनाचा भंग। कदा न करीं तूं ॥ ६९ ॥ ऐसा विवेक धरी मनीं। तरी महापातकें जातीं पळोनी। हरिचरणीं दृढ मनीं। चालवी संसार ॥ ७० ॥ आपआपणातें पाहीं। सोहं संन्यासी होईं। अजपा मंत्र घेईं। बीजाक्षरें ॥ ७१ ॥ निराकार मूर्ति ध्यायीजे मनीं। बुद्धि ठेविजे गुरुचरणीं। सर्वांघटीं आत्मा जाणोनि। होय सुखी ॥ ७२ ॥ आपआपणातें पाहीं। दुजें कोणी नाहीं। एकतत्त्वीं राही। भुलों नको ॥ ७३ ॥ सर्वां ठायीं हरी। ऐसा मनीं दृढ धरी। भेदाभेद सारी करूं नको ॥ ७४ ॥ यावरी शुकदेव बोले। राउळें ज्ञान उपदेशिलें। परि स्वामी एक असे बोलणें। केशवराया ॥ ७५ ॥ माझी विनंती परियेसी। बारा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वर्षें झालीं जन्मासी। नग्न आहे शरीरासी। कसें यावें बाहेरीं॥ ७६॥ आतां स्वयंभ कासोटि। देईं मज जगजेठी। लाज राखे सृष्टि। पैं माझी॥ ७७॥ इतुकें शुकदेव बोलिला। देवें स्वयंभ कौपीन दिला। मग शुक श्रवणद्वारीं बाहेर आला। योगिराज॥ ७८॥ शुकयोगी ब्रह्म परिपूर्ण। सुळजेसी जाहला हर्ष पूर्ण। येरु स्मरे नारायण। धरिले चरण कृष्णाचे॥ ७९॥ देवें हस्त ठेविला माथां। तैसाच निघाला तीर्थां। मागें न पाहे सर्वथा। शुकदेव योगी॥ ८०॥ निघाला तो लवलाहे। मार्गे पुढें न पाहे। सुईण म्हणे वो माय। गर्भांतून भूत कायसें आलें॥ ८१॥ हें अद्भुत लेंकरूं। करी राम नाम उच्चारू। याचे नाभीचा जारू। वाळला नाहीं॥ ८२॥ लेंकरूं नव्हे हें सांचा। राक्षस हा मायेचा। न करावा गजर लेंकराचा। हें अपूर्व चोज जाणा॥ ८३॥ गेला तरी सुखी जावो। राहतां तरी अनर्थ पैं हो। सुळजा वांचली हें अपूर्व। माना सकळां॥ ८४॥ व्यासा चंद्रबळ लाधलें। किंवा सुकृत फळासी आलें। येवढें विघ्न वारिलें। कुळदेवतेनें॥ ८५॥ एकी अबाळा वांचिलों म्हणती। एकी जितावण करिती। एकी क्षेमा आळंगिती। आप्तवर्गासी॥ ८६॥ मग म्हणे सुळजा। आतां मज दावा पुत्र माझा। द्वादश वरुषें कष्टलीं वोजा। वाहिला उदरीं॥ ८॥ करुणा करी लवलाही। म्हणे पुत्रा स्तनपान घेईं। बारे काटे खडे रुतती पायीं। परतोनी येईं लवकरी॥ ८८॥ तुजलागीं रे कुमरा। स्तनीं लागल्या पयोधारा। बारे येईं सामोरा। घेईं स्तनपान॥ ८९॥ ऐसी करुणा करीमाता सती। थोर येतसे काकुळती। परी शुक न धरी चित्तीं। दूर गेला॥ ९०॥ आतां काय करूं वो साजणी। शुक न ये परतोनी। योगी राजा कृष्ण वचनीं। पुत्र माझा॥ ९१॥ पोटीं वागविला वर्षें बारा। थोर कष्ट झाले माझिया शरीरा। शेवटीं माझिया पुत्रा। निराशा जाहली॥ ९२॥ बारे तूं तप तीर्थ काय जाणसी। कवणें चालविलें तुजसी। जवळी होता हृषीकेशी। तेणें नवल काय केलें॥ ९३॥ आतां न जाईं तूं तपा। उष्णें करोनी श्रम पावसी बापा। मार्गी चोरां सर्पां करुणा नाहीं बाळा॥ ९४॥ मग विनवीत भास्करू। म्हणे माझें तान्हें लेंकरूं। तूं देवा तपो नको उग्रू। माझ्या बालकावरी॥ ९५॥ अगा देवा करुणा। लेंकराची करावी जाणा। अति कोमल चरणा। न पोळावे देखा॥ ९६॥ अहो वसुंधरे माते। जतन करीं शुकातें। वंदीन तुझ्या चरणांतें। विनंति सुळजेची॥ ९७॥ तूं कृपाळू परियेसी। उदरीं राखिलें सीतेसी। बाळ तैसें माझें अपत्यासी। जतन करीं॥ ९८॥ विनंति सिंह सर्पा। रिसा अस्वला वृश्चिका। तुम्हीं करावें कृपा। राखा बाळ माझें॥ ९९॥ ऐसी ती सुंदरी। कर जोडोनि विनंति करी। तो शुक गेला दुरी। ध्यान करी हरीचें॥ १००॥ या उपरी म्हणे पिता व्यास। पुत्र चालिला कर्मत्रासें। थोर होती आस। पितृगोत्र रक्षील॥ १॥ तूं धाकुटे लेंकरूं। परी मज होता आधारु। तुजविण हा संसारु। व्यर्थ गेला॥ २॥ मातापिता सांडिजे। योग साधन करिजे। हें कोणे शास्त्रीं बोलिजे। सांग बा मज॥ ३॥ तपें होय सुकृत। ऐसें मनीं धरिसी निभ्रांत। मातापिता संतोषें सुकृत। हें वेदशास्त्रीं बोलिलें॥ ४॥ सांडुनि जाई मातापिता। त्याचा संन्यास व्यर्थता। तीर्थे कंटाळती सर्वथा। त्याचे स्नानें दर्शनें॥ ५॥ पितृवचन न पाळिजे। मातेसी अंतर देती जे। ते प्राणी पातकी म्हणिजे। यमदंड पावती॥ ६॥ पुंडलिका सेवा करितां। पितयासी झोंप आली तत्त्वतां। तंव विष्णु आले त्वरितां। चित्त पहावया तयाचें॥ ७॥ देव येऊनि उभा दारीं। परी येरु ये न बाहेरी। सेवा पितयाची करी। एक भावें॥ ८॥ ऐसा पितृभक्तीचा रंग। न करी देवाचा पांग। पितयाची निद्रा होईल भंग। म्हणोनि न पाहे माघारा॥ ९॥ तेणें अंतरीं ओळखिलें। मज देव भेटीं आले। पितृसेवें पुण्य जोडलें। फळ लाधलें पांडुरंगा॥ १०॥ मग माघारीं वीट झोंकिली। ते चरणीं देवाचे लागली। देवें पूजा मानिली। समचरणीं उभा राहे॥ ११॥ हात ठेवूनि कटावरी। युगें अठ्ठावीस उभा हरी। पुंडलिकाची

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भक्ति भारी। हा उपदेश म्हणे श्रीव्यास॥ १२॥ दृष्टांत ते आईका। पितृवचनीं राम निका। बारा वर्षे देखा। वनवास क्रमिला॥ १३॥ तेणें पितृवचन पाळिलें। सापत्निक मातें समाधान केलें। कीर्तीचें फळ जोडिलें। पुराणप्रसिद्ध॥ १४॥ वृद्धे श्रवणाची पितृ जोडी। ती बैसवुनि कावडी। खांदीं वाहे पवरडी। वाराणसी॥ १५॥ मार्गी जातां तृषा लागली। कावडी वृक्षा लाविली। करीं झारी घेतली। उदकाकारणें॥ १६॥ श्रावण उदक भरितां। झारी झाली बुडतांबुडतां। चाउलि झाली दशरथा। संधान लावितां तो जाहला॥ १७॥ श्वापद उदकासी पातलें। ऐसें जाणूनि संधान केलें। ते येऊनि कंठीं लागले। श्रावणाचें॥ १८॥ जवळी येऊनि पाहे। तंव मनुष्य पडिलें आहे। मग संकोचित होय। राजेंद्र॥ १९॥ तयासी पुसे तूं कवण। येरू म्हणे मी श्रावण। वृक्षासी पितृकावडी लावुन। उदकासी आलों॥ २०॥ तूं राजा सूर्यवंशी। उदक देईं जा वृद्धांसी। कावडी पैल वृक्षासी। टांगली असे॥ २१॥ हृदयीं मातापित्यांसी स्मरोन। श्रावणें त्यजिला प्राण। पावला पद निर्वाण। सायुज्य मुक्तीतें॥ २२॥ ऐसें पितृवचन पाळिलें। कीर्तिमुक्तिस जोडिलें। हे तपाहूनि आगळें। पितृवचनें॥ २३॥ मग रायें दशरथें। झारी घेऊनि हातें। पाणी द्यावया वृद्धांतें। वृक्षाजवळी पातला॥ २४॥ उदक प्या म्हणत। शब्द ओळखिला त्वरित। श्रावण नव्हे सत्त्वस्थ। कोण आहे॥ २५॥ मग पुसत तूं कोण। येरु म्हणे मी दशरथ जाण। श्रावणाचें वर्तमान। सांगतां झाला॥ २६॥ आतां उदक श्रावणाविण। आम्हीं न घेऊं जाण। ऐसें म्हणोन प्राण। सोडिला त्यांहीं॥ २७॥ पुत्राकारणें पाही। शोक लागला देहीं। भेटी देऊनि जाई। योगेश्वरा॥ २८॥ आतां पुत्रपण सत्य करीं। माता पिता सुखी करी। पाहा त्या सगरीं। काय केलें॥ २९॥ साठींसहस्त्र संवत्सर। युद्ध केलें नृपवरें। सूर्यवंशीं महावीर। पवित्र राजा॥ ३०॥ त्यांनी अश्वमेध मांडिला। श्यामकर्ण वारु आणिला। तो पृथ्वीवरी सोडिला। युद्धालागीं॥ ३१॥ ते इंद्रें ऐकिली मात। अश्वमेध करिती सगरसूत। मग मंत्र एक त्वरित। रचितां झाला॥ ३२॥ त्यावरी इंद्रें घोडा चोरिला। अदृश्य रूपें नेला। नेऊनि गुंफेमाजीं बांधिला। मुनीचिया॥ ३३॥ पाताळीं कपिल मुनी। सगरीं खणिली मेदिनी। अंबरीं जाहली आकाशवाणी। सांभाळा रे सांभाळा॥ ३४॥ बृहस्पति सगराचा मामा। तो म्हणे रे उत्तमा। कां आलासी आश्रमा। या ब्राह्मणाचिया॥ ३५॥ तुम्ही म्हणाल मेदिनी। येथें आहे कपिल मुनी। तो भस्म करील शोधोनि। सांडा गर्व॥ ३६॥ येरुसी न आवरे कोपु। मेदिनी खणिती थोर मापु। प्रवेशले एकाएकु। पाताळ भुवनीं॥ ३७॥ ऐकोनि तयाचा गजरु। दचकला तो ऋषीश्वरू। येरि म्हणती हाचि तस्करु। धरा वहिला॥ ३८॥ यावरी कोपला महामुनि। तयासी शापिलें वचनीं। सागरु जाले तेच क्षणीं। भस्म देख॥ ३९॥ वडिलांचें वचन न ऐकती कानीं। आपणचि म्हणती ज्ञानी। तरी मूर्ख ते गांजणी। जाणावी गा॥ ४०॥ एक सहस्त्र वर्षे जाहलीं सुमित्र। तयाचे वंशीं जाहला पुत्र। अत्रिनें दिधला एक मंत्र। तयाचा भगिरथ॥ ४१॥ गंगा स्वर्गाहुनी आणिली। ते मंदाकिनी स्वर्गा झाली। पाताळीं प्रगटली। ते भोगावती॥ ४२॥ हिमाचलामाजीं लपाली। येतां न देखेचि वहिली। मग बुद्धि विचारिली। तया भगीरथें॥ ४३॥ राजा इंद्र विनविला। तेणें ऐरावती दिधला। पर्वत फोडोनि टाकिला। गंगाओघें॥ ४४॥ सगरु जळत होते। विझविले गंगासुतें। ऐसें पुत्रपण तया भगीरथें। साच केलें॥ ४५॥ अरे पुत्रा आमुते संतोषवीजे। मातापिता उद्धरिजे। डोळे झांकती मग जाइजे। हा धर्म चोख॥ ४६॥ पुत्रा कष्ट झाले गा थोर। मातेचें गांजिलें बा शरीर। अद्यापि कां निष्ठुर। बोलसीना॥ ४७॥ ऐसें ऐकतां नेटकें। शुकदेव पुढें चमके। यावरी दृष्टि देखे। वनस्थळीं॥ ४८॥ शुकदेव अदृश्य झाला। व्यास त्वरित धरणीं पडला। थोर दुःखें आक्रंदला। व्याकुळ प्राण तयाचा॥ ४९॥ पुत्राविणें संसारु। तो केवळ भूमिभारु। माझें उतारवयाचें तारूं। दूरि गेलें॥ ५०॥ आतां कायसें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जिणें। शोक दुर्ग जाणणें। व्यर्थ जिणें पुत्राविणे। जाण माझें॥ ५१ ॥ निपुत्री जन मज म्हणती। देव पितर स्वर्गी कष्टती। ऐसें काय केलें गा श्रीपती। मजलागीं॥ ५२ ॥ शुक नये काकुलती। वनांत हिंडतो मोह चित्तीं। पुत्रा पुत्रा हें वदती। साद देती श्वापदें॥ ५३ ॥ पूर्व जन्मींचा तो पिता। काय पाळिलें ताता। कर्मावसानीं आतां। आम्ही वृद्ध झालों॥ ५४॥ ऐसी ऐकोनि वाग्वाणी। नाद न माय गगनीं। मग व्यासऋषि तेथुनी। परतला मागे॥ ५५॥ इतुका वृत्तांत झाला। व्यास आश्रमा आला। शुकदेव पावला। सुख सरोवरां॥ ५६॥ योगेश्वरीं देखिला। धांवोनियां आलिंगिला। आपुले आश्रमासी आणिला। तापसी जाणोनियां॥ ५७॥ तये गुंफे भीतरीं। तेजोरूप अवघ्या नारी। एकीहुनी एक सुंदरी। परी विकल्प अंतरीं। येऊं न दे॥ ५८॥ मग निघोनियां बाहेरी। वस्त्रें टाकिती सुंदरी। शुक देवासी कवणीये परी। मानविती॥ ५९॥ मग शुके अर्घ्यदान केलें। दर्भासन घातलें। त्यावर आपण बैसले। ऋषिसुत॥ ६०॥ यज्ञ विभूति आणिली। शुकें सर्वांगीं लाविली। मग वस्त्रें घेतलीं। भगवानरूपें॥ ६१ ॥ वृक्ष चंपके बेलपत्रीं। गुंफेमाजीं मिरवती। विश्रांत वनीं विज्ञानवल्ली। ते स्वीकारी तळभरीं॥ ६२॥ शुक आसनीं बैसला। ध्यानीं निश्चल राहिला। आवर्ण आपण विसरला। ब्रह्मयोगी॥ ६३॥ शुकदेवें मांडिलें ध्यान। मुखीं धरिलें मौन्य। नासाग्रीं लोचन। लक्षीत असे॥ ६४॥ ब्रह्मनिष्ठ निरंतरीं। वनामाजीं तप करी। एक चरणांगुष्ठवरी। करी निद्रा॥ ६५॥ ऐसा ब्रह्मयोगी निरंतरीं। वनामाजी तप करी। व्यास घरीं चिंता करी। शुकदेवाची॥ ६६॥ यावरी प्रार्थितो इंद्रासी। येरे नाभिकार दिधला तयासी। मग तप ढळावयासी। इंद्रें रचिला उपाय॥ ६७॥ इंद्रानें रंभेसी केला हाकार। तंव ते पावली सत्वर। जियेचा महा थरार। तापसीयांसी॥ ६८॥ तिनें नमिला इंद्रराज। म्हणे कां जी पाचारिलें मज। जें असेल योजिलें काज। तें सांगा स्वामिया॥ ६९॥ तीतें सांगे इंद्रराव। निर्भय तप करीतसे शुकदेव। त्याच्या तपाचा करावा क्षय। त्वां जाउनी॥ ७०॥ तंव बोलली ते सुंदरी। विडा दीजे माझे करीं। आतां शुकदेव सत्वरीं। आणिन मी तुम्हांपुढें॥ ७१॥ इंद्र म्हणे गे सुंदरी। शुका आणसी जरी। तरी तुज अमरपुरीं। मानवती जन॥ ७२॥ मग तियेसी विडा दिधला। रंभेनें शिरीं वंदिला। मग श्रृंगार केला। नानापरीचा॥ ७३॥ अंग तियेचें पातळ। गौरवर्ण विशाळ भाळ। नेत्र जैसे अंबुजदळ। चंपकवर्ण तियेचा॥ ७४॥ कांसे कसूनियां वीरगुंठी। बरवी वेणी रुळे पृष्ठीं। कटि सामावे मुष्ठीं। तये रंभेची॥ ७५॥ बाहु दंड सरळा। बरवी शोभे मेखळा। कांसे कसिला पिंवळा। पीतांबर॥ ७६॥ अंगीं सुवास कस्तुरिची उटी। मुक्तमाळा रुळे कंठीं। टिळा केशराचा लल्लाटीं। तये रंभेचे॥ ७७॥ हातीं रत्नजडीत कंकणें। गळां नवरत्नांचीं भूषणें। व्यंकट दृष्टि पाहणें। अळूमाळ॥ ७८॥ कानीं तानीवडे जडीत। सांखळ्या नाग मिरवत। भोंवऱ्या शोभिवंत। हिरे जडिले॥ ७९॥ माथां मोतियांची जाळी। दोहींकडे शोभे हसळी। तेज झळके गंडस्थळीं। मिरवे रंभा॥ ८०॥ सुवर्ण कनकाची झारी। हातीं मिरवे सुंदरी। परम चतुर मनोहरी। कामरूपा॥ ८१॥ नाकीं जडित मुक्ताफळ। तेज मिरवे सुढाळ। मुखीं शोभे तांबुल। तेरा गुणांचा॥ ८२॥ दंतपक्ति तेज देखा। त्याची चंद्रासारखी शुभ्रता। हिरे जडिले मुखा। रंभेचिया॥ ८३॥ अति सुंदर पुष्प जाती। चंपके बकुलें शेवंती। तयावरी मिरवे सोनकेतकी। आणिक मोगरी॥ ८४॥ करीं चंदनाची उटी। अंगीं कंचुकी गोमटी। तयावरी मिरवे पत्रवेटी। चंपकाचे पानांची॥ ८५॥ चरणीं वांक्या तोडरू। अंदुवाचा गजरू। अंगीं तारुण्याचा भरू। अनुपम्य॥ ८६॥ चाले डोले स्तिनी गति। विद्युल्लतेप्रमाणें नेत्र लवती। तयासी देखोनी गिरजापति। भूलों शके॥ ८७॥ ऐसी ते महा खेंचरी। निघाली झडकरी। सिंधुवनामाझारीं। प्रवेशली॥ ८८॥ तये वनीं वक्ष खजुरी पोफळी। फणस महालुंगी नारळी। आणि द्राक्ष मंडप स्थळोस्थळीं। डुल्लताती॥ ८९॥ गगनचुंबित ताड। आम्रवृक्ष जांभुळी उदंड। केळी जांभ अंजिर

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रगड। बागशाई॥ ९०॥ मालती आणि शेवंती। पाडाळा जाई अनंत जाती। तया वनीं केतकी शोभती। आणिक बहु पुष्पलता॥ ९१॥ तया वनीं जाळीं। रंभा वृक्ष न्याहाळी। आणि सिंह शार्दुल तये स्थळीं। गर्जना करिती॥ ९२॥ तेथें गाई म्हैशींचे थवे। तृणें भक्षिती बरवें। अवघ्यांशी शुकदेवें। ज्ञान उपदेशिलें॥ ९३॥ पशुपक्षी होऊनि एकरूप। उदक पिती सांडुनी विकल्प। परम तयातें सुख। क्रीडा करितां॥ ९४॥ मूषक मांजरें एके ठायीं। नकुळा सर्पा वैर नाहीं। अवघियांचे ठायीं। हरीचें प्रेम॥ ९५॥ ऐसी ते वनस्थळी। रंभा दृष्टी न्याहाळी। मग पावली जवळी। शुकदेवाश्रमीं॥ ९६॥ डावें घालुन शुक आसनास। पूर्वद्वारीं करी प्रवेश। सन्मुख देखे योगिराजास ती रंभा॥ ९७॥ लक्ष लाविलेसे ऊर्ध्व दृष्टी। स्वयंभ असे कासोटी। सर्वांगी शोभे उटी। यज्ञ विभूतीची॥ ९८॥ तंव लावण्य खेंचरी। आपुले मनीं विचार करी। नेत्र हा उघडील जरी। तरी मी थोर दैवाची॥ ९९॥ आनंदें घातली कास। गायन आरंभीं सुरस। सप्तस्वर केदारास। आळवी रंभा॥ १००॥ नृत्य करावया उठली। नाना भाव करिती जहाली। परी शुकाची नाहीं विसर्जिली। योगमुद्रा॥ १॥ आलाप करी सुंदरी। नाना प्रबंध कुसरी। तंव योगियाची झाली पुरी। ध्यानमुद्रा॥ २॥ शुकानें नेत्र उघडिले। रंभेसि पुढें देखिले। येरीनें कर जोडले। केलें नमन॥ ३॥ शुकें नमस्कारिली खेंचरी। बैसविली गुंफेमाझारीं। येरी देखोनि हास्य करी। सुमनें मुखीं उपजती॥ ४॥ रंभा व्यंकट दृष्टि पाहे। हावभाव दाविताहे। मंजूळ स्वर गाये। सानुराग॥ ५॥ तारुण्याचेनि भरें। हावभाव दावी भृकुटी भारें। तंव शुकदेव म्हणे सुंदरे। हरिचरित्र गाइजे॥ ६॥ मागे तप करितां चंद्रमौळी। तंव ऐसीच एक प्रवेशली। तयाची समाधि लागली। कामबुद्धि॥ ७॥ रुक्मांगद नृपवरा। मोहोनि घाली मंदिरा। ते मारविती जाहली कुमारा। धर्मांगदा॥ ८॥ तैसी रंभा वना प्रगटली। इंद्रायें पाठविली। काय करील हे माऊली। तें सुचेना॥ ९॥ इयेचेनें काय होईल। शुकाचें तप अढळ। कां कष्टविली अंबा केवळ। वेदव्यासें॥ १०॥ शुक म्हणे विचारूं इयेसी। म्हणे तूं अससी कवणे देशीं। कीं देवकन्या म्हणविसी। कीं मानवीन॥ ११॥ कीं या वनीं वनदेवता। कीं योगिनी तूं तत्त्वतां। तूं सिद्ध आहेस माता। खेंचरीये॥ १२॥ तुझें नाम काय। कवण बापमाय। कवण ठायीं आहे। आश्रम तुझा॥ १३॥ येथें यावया काय कारण। काय अपेक्षित तुझें मन। हें सकळ वर्तमान। सांगे मज॥ १४॥ मग बोलली ती खेंचरी। मी देवकन्या निर्धारी। असे या वनाभीतरीं। क्रीडा करीत॥ १५॥ आजि देखिली शुकाची मूर्ति। मज आली करुणा चित्तीं। तूं धाकुटा योग स्थिति। कां कष्टसी॥ १६॥ तूं नेणसी तप प्रमाण। कां वांयांच कष्टविसी प्राण। आंगीं असे तारुण्यपण। सुंदर तूं॥ १७॥ तुझी मंद असे दशा। दिससी लावण्य राजसा। मदना परीस सुरसा। सुकुमारा॥ १८॥ तप तुंवा आदरिलें। तुज कवणें उपदेशिलें। तुझें कार्य नासिलें। सुखभोगाचें॥ १९॥ तप सांडीं अमंगळ। दोघें असो कुशळ। बरवीं वस्त्रें सर्वकाळ। शेजेवरी पांघरवीन॥ २०॥ मस्तक तुझें विघरलें। विभूतीनें आंग मळलें। मी पुसींन करतळें। सुकुमार वस्त्रें॥ २१॥ बरवें चंदन शीतळ। त्यांत नाना परिमळ। पुष्पांची शेज कुशळ। निद्रेलागीं करीन॥ २२॥ चांपा आणि शेवंती। दवणा मरवा पुष्पजाती। तितुक्या अर्पिन तुजप्रति सुगंधाकारणें॥ २३॥ याउपरि दह्याची वाटी। अमृता ऐसी निकटी। षड्रस पक्वान्नें गोमटीं। वाढीन तुज॥ २४॥ कळीया जैशा मोगरीच्या। तैसा भात उष्ण जिरेसाळीचा। त्यावरी ओगर डाळीचा। साजूक तूप वाढीन॥ २५॥ नाना परीचीं लोणचीं। लिंबें आवळे मिरची। आणि कढी ताकाची। जेवी रुचिकरे॥ २६॥ पुरीया फेणीय तेलवडे। खाजी गुरोळ्या मांडे। देईन रुचिकर सांडगे। मेथकुटें रायतीं॥ २७॥ उत्तम खांडवी साजिरी। मृदूपणें अंतर बाहेरी। घालोनि दूध साखरी। आटवीन अमृतापरीच॥ २८॥ सरवळे बोटवे कानवले। थिजल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

घृतीं तळिले। माझे हातीं मिळविले। तुजकारणें सुकुमारा ॥ २९ ॥ आंब्याचे रस पिंवळे। परमामृताचे घेतले। मधुमिश्रित वाढिले। इच्छा पूर्ण होईल ॥ ३० ॥ ऐसी आरोगणा पाविजे। मग स्वस्थानीं बैसिजे। कर्पुरसहित विडा घेईजे। मनोहर ॥ ३१ ॥ नाना परीची वळवटी। मुखीं वोटीं पडेल मिठी। नाना पत्रशाखा सुभटी। ताटाकाठीं वाढीन ॥ ३२ ॥ आलें सुरण बेळें। भोंकर आणि मायमुळें। दृष्टि देखिल्या जिव्हाळें। अरोगणी समयीं ॥ ३३ ॥ काकडें आणि करंदें। वर भोंकरें आनंदें। जेवितां वाढीन विनोदें। योगीया तुज ॥ ३४ ॥ आंबे निंबुवांचीं लोणचीं। रायतीं नाना परीचीं। तुमचे जिव्हे रुची। ग्रासोग्रासीं ॥ ३५ ॥ पापड आणि मिरंगुडे। जेवितां रुचि वाढे। आणिक कोल्हाळ वडे। ऐशी जेवण परी ॥ ३६ ॥ ऐसी अरोगण कीजे। कर्पूरविडा लवंगीं भक्षिजे। कर्पुरासहित विडा घेईजे। मनोहर ॥ ३७ ॥ माजघरा डोल्हारां बांधिला। वरी चांदवा लाविला। वर क्षीरोदक आथुरिला। जरितारी ॥ ३८ ॥ तेथें सुखें निद्रा करी। सेवा करिती चतुर्विध नारी। मजहुनी सुंदरी। लावण्यवतिका ॥ ३९ ॥ अंगनांसवे वसंता आतु। खेळ खेळें समस्तु। सकळ नारी सवे हेतु। पूर्ण करीं स्वानंदें ॥ ४० ॥ परिमळा नाहीं मिती। आम्हां घरीं सर्व संपत्ति। ऐसें सुख योगियाप्रती। नाहीं त्रिजगतीं जाणिजे ॥ ४१ ॥ आतां सांडीं मनींची भ्रांती। तप करोनी काय प्राप्ती। संसार भोगी संपत्ति। यासारिखें सुख नाहीं ॥ ४२ ॥ कोण तपाचा सौरसु। कवणें तुज दिधला उपदेशु। जे लाविती राखेसू। ते भूत पिशाच्च जाणावे ॥ ४३ ॥ कवण तुज भेटला गुरु। त्याचे वचनीं हरविसी संसारु। तो माझे चित्तीं आहे शत्रू। बहुत जन्मींचा ॥ ४४ ॥ तूं नेणसी बुद्धी। तुझी भांबावली शुद्धी। ठाकीत आली अवघी। दैवगतीचा ॥ ४५ ॥ तुज ज्ञान नाहीं धडपुडें। कां हिंडतोसी वनझाडें। तुझें फेडीन मी सर्व सांकडें। क्षणामाजी ॥ ४६ ॥ नेणसी तुज पडिली भूलिभ्रम। आतां सांडीं वनाश्रम। वरा करीं घराश्रम। भोगी निजसुखवृत्ती ॥ ४७ ॥ ऐसें तप कोण करी। जो सदाचा भिकारी। मायबाप नाहीं संसारीं। तो आदरीत ये भिक्षा ॥ ४८ ॥ ऐसा जो एकटा एकला। शीत उष्ण पर्जन्यांत बैसला। तयांचिया बोला। लागूं नको ॥ ४९ ॥ माझें वचन ऐक आतां। मी सांगतें हिता। मज रंभेतुल्य वनिता। अनायासें जोडते ॥ ५० ॥ मग बोलता झाला शुकदेव। श्रोतीं देउनी चित्त ऐका प्रभाव। रंभेचा फिटे अहंभाव। ऐसें बोले व्याससुत ॥ ५१ ॥ मग वदला शुकदेव। भला सांगसी प्रभाव। शाहाणी चतुर तूं हो। रंभिका ॥ ५२ ॥ तुजवरी कासया कोपावें। आमचें दैव असेंचि बरवें। जेवीं तव स्वामी भावे। तें तूं बोलसी ॥ ५३ ॥ बहुत चतुर तूं होसी। स्वामीकार्या झळकसी। ऐसें पुनरपि कोणासी। बोलूं नको ॥ ५४ ॥ येरी म्हणे जी योगिया। तुम्ही कोपलेती कवणें कार्या। तें उत्तर स्वामीया। जाणवीजे ॥ ५५ ॥ शुकदेवें कर जोडिले। नमन करूनि बोलिले। रंभे ऐक म्हणितलें। योगिरायें ॥ ५६ ॥ आतां परियेसी विनवणी। तूं आटोप आपली वाणी। ऐसीं भ्रष्ट बोलणीं। मी कर्णी नायकें ॥ ५८ ॥ त्वां संसारू वाणिला। तो म्यां बहुत जन्मीं भोगिला। आतां झणीं वीट आला। मज तयाचा ॥ ५९ ॥ हे शरिरीं दुःख पाहे। सुटण्यास अन्य नाहीं उपाय। मग मीं धरिले पाय। श्रीकृष्णदेवाचे ॥ ६० ॥ आतां असो सर्व स्नेहो। हरिस्मरणीं भाव राहो। ऐसा मनींचाहावो। धरिला म्यां ॥ ६१ ॥ आतां न सोडीं हा मार्ग। धरिला साधुचा संग। न करीं मी निश्चयभंग। जाण रंभे ॥ ६२ ॥ मज नाहीं वस्त्राची चाड। नग्न रहावें हेंचि गोड। धनादि सुखाचें कोड। मनीं आथींचना ॥ ६३ ॥ मी जन्मलों ते वेळां। देवेंकौपीन दिधला। वस्त्राचा पांग फिटला। जाण रंभे ॥ ६४ ॥ पाटावू आणि सारळें। तेणें मन माझें कंटाळलें। स्वयंभ दिधलें गोपाळें। जें न मिळे कदापि ॥ ६५ ॥ राम सकळ परिमळाचें भांडार। विभूतीहुनी नाहीं थोर। अंगीं चर्चितां सुकुमार। दुर्गंधी नासे ॥ ६६ ॥ विभूति अंगीं चर्चिती। तयांसी जन मानिती। शिवरूप त्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भाविती। पूजा करिती मनोभावें॥ ६७॥ विभूतीनें देव जाहले। विभूती नाम विष्णु बोले। विभूत लाविता पिसें गेलें। विभूत भैरव॥ ६८॥ तूं आणितेसी पुष्पजाती। त्यां सर्वेंचि कोमती। बरवें चर्म पशुपती। पांघुरला आवडी॥ ६९॥ अति सुरंग रातोत्पळें। हरिचरणींचीं चरणकमळें। तेंचि अति प्रेमळें। जाण रंभे॥ ७०॥ म्हणसी षड्रस भोजन। तरी हरिचरणीं अमृतपान। करोनी तृप्त झालें मन। अमरत्व पावलें॥ ७१॥ तेणें सर्व सुख लाधलें। तृप्त होऊन राहिलें। तें तुज अंतरलें। बुद्धिमंदे॥ ७२॥ आणिक लक्ष्मी नारायण। अपरिमित त्याचें सदन। रत्नकीलेचे मंचक पूर्ण। तेथें शयन शुक योगी॥ ७३॥ मुखीं रंगला श्रीरंग। तो केवळ कर्पूर विडा सुरंग। पिकदाणी धरिती मुख रंग। तुज ऐशा वामांगी॥ ७४॥ इतुकें शुक वदला। मग उगाची राहिला। बोलाचा शब्द सरला। वदतसे रंभा यावरी॥ ७५॥ मग ते म्हणेरे बुद्धिहीना। महा मूर्खा पुरुषत्वहीना। स्त्रीसुख सोडोनि वनामरणां। इच्छिलें त्वां॥ ७६॥ मिथ्या तूं जन्मलासी। वांयां येथें कष्टसी। तारुण्य व्यर्थ दवडिसी। स्त्रीभोगाविणें॥ ७७॥ भोगिजे द्वादश वरुषांची नारी। षोडश वर्षांची सुंदरी। गौर वर्णाचे परिकरी। सुगंध युवती॥ ७८॥ एकाहूनि एक साजिऱ्या। चंद्रवदनी गोजिऱ्या। माझियाहूनि सकुमाऱ्या। मृगनयनी॥ ७९॥ बोले जाणती बरवें। सेवा करिती मनोभावें। जयांचा माज दृष्टि भावे। पद्मिणी ऐशा॥ ८०॥ शुकें इतुकें ऐकिलें। मग प्रतिउत्तर बोलिलें। तें ऐका तुम्हीं वहिलें। योगि जन॥ ८१॥ शुक म्हणे सत्य सत्य। आम्ही एकपत्नी व्रतस्थ। रंभे दुजें बोलसी व्यर्थ। सत्रावी भोगितो सुंदरी॥ ८२॥ नारी सत्रावी भोगिजे। हें सुख गुरुवचनीं लाहिजे। तियेसंगें पाविजे। मोक्ष सायुज्यता॥ ८३॥ तिचे प्रसंगीं घर। चुकूनि संसार येरझार। ते नारी सुंदर मनोहर। पुरोन उरली॥ ८४॥ येरी तुम्ही नाशिवंत शरीरीं। दुर्गंधी मळमूत्र अघोरी। शरीरीं काम लक्ष त्यावरी। ते सुंदरी नावडे॥ ८५॥ तंव रंभा म्हणे अवधारीं। तुज कष्ट सदा संसारीं। सुख नेणसी तिळभरी। योगिया तूं॥ ८६॥ कष्ट भोगी अष्टमा सिद्धी। आमच्या घरीं नवविधी। हे कां नावडे तुज बुद्धी। ओढवली असे॥ ८७॥ सुख राज्य संपत्ति। चारी पदार्थ असती। धर्मकाम कर्म राज्य प्राप्ती। यज्ञ भोगदान॥ ८८॥ गाई ब्राह्मणांचें पाळण। लोकांचें सांभाळण। ये जा म्हणती देशगुण। ऐसें न सांडी मी सांगतें॥ ८९॥ उपकार करिसी लोकां। ओळखी पडेल मंडळिका। राजासारिखे सुखा। नसे जाणा॥ ९०॥ सकळ धर्म जोडिसी। राया इंद्रातें मानसी। सर्व सुखभोगा लाभ तुजसी। मी नाचेन गायनीं॥ ९१॥ मग शुक म्हणे चतुरी। तूं बोलसी वैखरी। नावडे मज अंतरीं। राज्यांतीं सुख नाहीं॥ ९२॥ राज्यपद करितां। पाप होतसे निभ्रांता। महादोष पावतां। वेळु न लगे॥ ९३॥ राज्य करूनि नरकप्राप्ती। ऐसा कोण करूनि तरला क्षिती। सुकृतांच्या राशी नासती। राज्य करूनि जाण पां॥ ९४॥ राज्य करितां सरे धर्म। राज्य करी घडे अधर्म। राज्य करोनि पाविजे श्रम। निभ्रांत जाणा॥ ९५॥ अगे सुकृत जोडावें नानापरी। तें हारवी राज्यांतरीं। तें तू नेणसी गे सुंदरी। बुद्धिहीने॥ ९६॥ म्हणोनि धर्मासी जतन करावें। सर्व सुखपदार्थ त्यजावे। हरिचरण सेवावे। जन्मोजन्मीं॥ ९७॥ जाण हरिचंद्रायें आपण। राज्य दिधलें ब्राह्मणां। मुक्तपद निर्वाण। धरिलें निरंतरीं॥ ९८॥ पाहे पां राज्याभीतरीं। राज्य पृथ्वीचें करी। तें तुजवांचोनि सुंदरी। नेणें कांहीं॥ ९९॥ राज्यें नव्हे चिरंजीवित्व जाणा। ऐसें आलें माझिया मना। यास्तव सांडूनियां वना। निघतां झालों॥ ३००॥ औट पाद भूमिका। दिधली ब्राह्मणा एका। सत्त्वा न ढळे देखता। म्हणोनि पृष्ठीं ओढली॥ १॥ राज्यपद नको गे सुंदरी। तूं नेणसी आमुची थोरी। आम्ही जाण ब्रह्मचारी। सुखी असों॥ २॥ तेंच राज्य अढळ असे। तंव रंभा ऐकोनि हांसे। म्हणे लागलें पिसें। वायांविण॥ ३॥ बरवें ठीक लेणें। नाना अलंकार भूषणें। यावरी शुकदेव म्हणे। हें वानूं नको रंभे॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तूं नेणसी माझे अलंकार। किती लेणें अपार। शंखचक्र याहूनि थोर। काय असे ॥ ५ ॥ शृंगारिजे येणें शरीर। शंखचक्र आम्हांसी पवित्र। काय करसील लेणीं फार। तीं पाषाण ॥ ६ ॥ शृंगार मुद्रा जाण धन। शरीरीं भार होय जेणें। आम्हां त्यांसी काय कारण। सांग तूं अंगने ॥ ७ ॥ संपत्ति जोडावी म्हणसी। तरी करीन तपाच्या रासी। म्हणऊनियां सर्वांसी। मज चाड नाहीं ॥ ८ ॥ तप धन कधींच न सरे। सवेच करितां उदंड उरे। आम्हां हेंच धन पुरें। लक्ष कोटी ॥ ९ ॥ एक मूर्ख असती। अनंत द्रव्य मिळविती। मग नेऊनियां पुरिती। भूमिमाजीं ॥ १० ॥ माझें माझें म्हणती मनीं। तेंच करिती घोकणी। तेणें कारणें फजित होउनी। जोडिलें धन ॥ ११ ॥ पिता पुत्र भांडणें। स्त्रियें बाळकासी बोलणें। तें जाय क्षणामाजीं जाणे। हानि होतां ॥ १२ ॥ या धनासाठीं कैसे करिती। इष्टमित्रांसी दुःख देती। विश्वास न मानिती। प्राणिमात्रांचा ॥ १३ ॥ अग्नीपासोनि वांचे जरी ठेवा। तरी राज उपद्रव घडे देवा। नाहींतरी चोरांपासूनि हानि व्हावा। ऐसें होय ॥ १४ ॥ ऐसें भलत्यापरि जतन करितां। परि जाईगा निभ्रांता। दुःख होय त्वरितां। पाहे गे तूं सुंदरी ॥ १५ ॥ मग मनीं धरिती संताप। म्हणती द्रव्य गेलें आपोआप। बहु जोडिलें पाप। तें मेळवितां ॥ १६ ॥ मार्गे धर्म जरी करितों। अथवा अपंगासी देतों। अथवा अपत्यवर्गासी वेंचितों। तरी बरें होतें ॥ १७ ॥ ऐसी करितां चिंतनीं। रात्रंदिवस घोकणी। म्हणोनी तपाची सांठवणी। कदांचि न सरे ॥ १८ ॥ आतां तूं जाय गा येथुनी। आम्ही ब्राह्मण निष्ठुर ज्ञानी। मग बोलिली परतोनि। रंभा त्यासी ॥ १९ ॥ अगा तूं शहाणा होसी। पाहें बा माझिया रूपासी। आलिये तुजपासीं। योगिराया ॥ २० ॥ केले बहुत सायास। आतां पाहे माझी वास। पुरवावी माझी आस। तुंवा शुकदेवा ॥ २१ ॥ तूं आहेसी शाहणा चतुर। पाहें माझें स्वरूप शृंगार। आतां होईं कृपासागर। ऋषिनंदना ॥ २२ ॥ तुंवा देख देखसी। देखण्या बहुत पाहसी। तरी मज ऐसी सरिसी। निधान न सांपडेल ॥ २३ ॥ बरवें माझें लावण्य। देवीं पाठविलें सगुण। तुज जोडलें निधान। आपोआप ये ठायीं ॥ २४ ॥ अगा तुझे तपा आलें फळ। आतां तुज घालीन मी माळ। पाहे पाहा भरुनी डोळे। लावण्य रूप माझें ॥ २५ ॥ रूप स्वरूप सुंदरी। शहाणी आहे सकुमारी। मजहूनि सेजे ऐसी नारी। आणिक नाहीं ॥ २६ ॥ काय वानूं आपआपणा। तूं तरी चतुरांचा राणा। ऋतुसमयींच्या खुणा जाणसी तूं ॥ २७ ॥ अथवा नेणसी तरी सांगेन। मज असे कोकशास्त्राचें ज्ञान। अनुसरलिया मन। तुज ज्ञान होईल ॥ २८ ॥ सोडोनियां लाज। करितां ध्यान सहज। तप हें काय भोज। जोडलें तुज ॥ २९ ॥ जया राग नाहीं मनीं। तया बोलती महाज्ञानी। जेणें काम क्रोध झणीं। जिंकिला असे ॥ ३० ॥ मदन तोंडघसीं रिघाला। काळ मरणें जिंतला। तो वेळ न लागतां पातला। स्वर्गभुवनासी ॥ ३१ ॥ देव पाहों लागले गगनीं। अमर दाटले विमानीं। बोलों आरंभिलें मग वचनीं। योगिरायें ॥ ३२ ॥ तूं भली वो शहाणी। म्हणत होतीसी योगिनी। न डचकसी अझुनी। मनामाजीं ॥ ३३ ॥ किती वाणिसी आपआपणा। बोलसी ऋतुसमयींच्या खुणा। ऐसें अपूर्व दारुणा। देखिलें असे ॥ ३४ ॥ नवद्वारीं निरंतर। सदा दुर्गंधी अपार। वोखटें हें कलेवर। वानूं नको रंभे ॥ ३५ ॥ बाहेर बरवें शृंगारिजे। आणि वस्त्रें अलंकार लेइजे। दृष्टी पाहतां देखिजे। नर्क कोटि ॥ ३६ ॥ शरीर मळमूत्राचा मेळा। अस्थिचर्मांचा गुंडाळा। मग तयासि नांवाथिला। पिंड ऐसा ॥ ३७ ॥ कृमिकीटकांचें घर। सकळ दुर्गंधी अपार। ऐसें हें असें शरीर। नाशिवंत ॥ ३८ ॥ घडीभरी न करितां क्षालन। तरी दुर्गंधीचा कल्होळ जाण। म्हणोनि केलें परिमळ स्नान। शुद्धतेलागीं ॥ ३९ ॥ झणीं तूं मुख वाखाणिसी। तंव तें वाहात असे श्लेष्मासी। ऐसें विचारितां मानसीं। पाहे पां रंभे ॥ ४० ॥ शुकदेव

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणे वो सुंदरी। अमृत कैसें तंव अधरीं। विषय लहरीच महापुरीं। बुडालीसे कामिनी॥ ४१॥ डोळे म्हणती अति रसाळ। हें तों आहे पापाचें मूळ। म्हणऊनियां काजळ। लेईलें असे॥ ४२॥ तयाचें काळेपण न विटे। कुंकुम नाहीं तो कधीं फिटे। अंकित करोनि विटे। वानूं नको तूं रंभे॥ ४३॥ योगीं संन्यासीं निंदिजे। तें बरवें नाहीं जाणिजे। म्हणून तुझें मुख लाजें। काळें झालें॥ ४४॥ तपाचें बरवेंपण। आम्हां नाहीं कारण। म्हणोनि कामबाण। वानूं नको रंभे॥ ४५॥ मग या वचनावरी। रंभा स्वदेह विदारी। नखें घालूनि उदरीं। चिरिती झाली॥ ४६॥ तेव्हां शुक म्हणे तिजप्रती। तूं शीण व्यर्थ करिसी। कारण नाहीं मजसी। तुझिया उदराचें॥ ४७॥ पाहें पाहा ऋषिराया। कैसी माझी निर्मल काया। अव्हेर केलासी वांयां। न विचारितां॥ ४८॥ पाहें पां उदराभीतरीं। परिमळ नानापरी। जवादि अंबर कस्तुरी। आणि अगर चंदन॥ ४९॥ ऐसी गा मी रंभा पवित्र। सुगंधाचें भांडार। देवऋषि मुनीश्वर। करिती आस माझी॥ ५०॥ ऐसें मी जाणतों गे सुंदरी। तरी येतों तुझिया उदरीं। माता शिणविली येरझारीं। नरदेहीं॥ ५१॥ तुझिया कुळीं जन्मतों। कडेसी वो खेळतों। सुखें स्तनपान करितों। आनंदें करोनियां॥ ५२॥ तुज ऐसी माता। केविं होय पतिव्रता। पूर्वसुकृतावांचोनि सर्वथा। प्राप्त नव्हे॥ ५३॥ तूं माझी वो जननी। कष्टविली दुष्ट वचनीं। हें वचन ऐकोनि। तेच क्षणीं उठली रंभा॥ ५४॥ मग निघाली तेथोनी। पावली इंद्रभुवनीं। राया इंद्रासी भेटोनी। बोलती जाहली॥ ५५॥ म्हणे जी इंद्रराया। गेली या ऋषिच्या ठायां। बहुतप्रकारें तया। बोलिलें म्यां॥ ५६॥ तपें शब्दें प्रसवे कामधेनु। तृण चरे पंचाननु। पश्चिमेस उगवे भानु। जाण राया॥ ५७॥ ऐसें जाण गा नृपति। कवणें समयीं होती। परि शुकदेवाचिये चित्तीं। अविनाश॥ ५८॥ ऋषि मुनि संन्यासी। मज देखोन ढळती तापसी। तैसी परी शुकदेवासी। नव्हे जाण॥ ५९॥ तैसा तो नव्हेजी योगिराजा। मनीं भाव न करी दुजा। म्यां गेलिया ज्या काजा। तें सिद्धिं न पावलें॥ ६०॥ शुकदेव नमस्कार करूनि। अदृश्य झाला तेथूनि। देव अंतरीं विमानीं। पहात ठेले॥ ६१॥ सुरवर करिती पुष्पवर्षाव। तपा न ढळे शुकदेव। देवगणांचा संदेह। फिटला तेणें॥ ६२॥ तप सुरवरासि मानलें। शुकदेव अलक्ष्य जाहले। तेजीं तेज निमालें। निवडेचिना॥ ६३॥ उतरला पैलपार। संसारींचा भवसागर। दुस्तर आणि दुर्धर। लोका तरावया॥ ६४॥ दोहों वातीचा दीपकू। प्रजळला एकरूपू। हरीहर स्वरूपू। एक झाले॥ ६५॥ ऐसें शुकदेव चरित्र। ऐकतांचि पुण्यपवित्र। वर्णितां जाणा विचित्र। तिहीं लोकीं॥ ६६॥ जे पढती नित्य नेमीं। ते होती मुक्तज्ञानी। तें फळ पावतां निर्वाणीं। झाला शुकदेव॥ ६७॥ श्रोते जे ऐकती। तया होय फळप्राप्ती। हरिहर चरित्र क्षितीं। पुण्य पावन॥ ६८॥ विनवी विष्णुदास नामा। शुकदेवें केली सीमा। चौऱ्यांशी लक्ष योनींचे जन्मा। सार्थक केलें॥ ६९॥ ऐसें शुकदेवचरित्र। अगाध आणि विचित्र। विष्णुदास नामा विनवित। भक्तांप्रति॥ ७०॥ मन्मथ संवत्सर पौष्य मासीं। सोमवार अमावास्येच्या दिवशीं। पूर्णता आली ग्रंथासी। श्रोते सावकाशी परिसीजे॥ ७१॥

ह्याळसेन कथा (द्रोणपर्व.)

२२५५. तयेवेळीं तो ह्याळसेनू। श्रीकृष्णासी नमस्कारानू। पांडवासी वंदनू। मग सकळिकां रायांसी॥ १॥ मग रायांसी स्वधर्मे। तेणें आलिंगिलें अनुक्रमें। संतोषोनी राया धर्मे। बैसविला॥ २॥ बंदीजन पवाडे पढती। अगाध ब्रीदें वाखाणती। सकळ परिवारासहिती। ह्याळसेनाचा॥ ३॥ धन्य धन्य अर्जुनाचें झालें। पूर्व पुण्य फळासी आलें। एकाहून एक झालें। अधिकाधिक॥ ४॥ तंव दुर्योधन म्हणे वीरा। आतां चलावें मेळीकारा। बैसोनी एक वाट विचारा। योजावें कांहीं॥ ५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ह्याळसेनु विनवी श्रीहरी। स्वामी जावें मेळीकारीं। दिनु मावळलियावरी। येईन देवा॥ ६॥ आजी कौरवाची पैज। जंववरी मावळेल सूर्य। तंववरी घेईन झुंज। रणामाजीं॥ ७॥ जंव असे आस भरोवरी। तंव घेईन झुंजारी। रेखा पुसलिया संसारीं। कवणु वांचे॥ ८॥ जंव मावळे दिन। तंववरी वांचेल प्राण। तरी देखेन तुझे चरण। नारायण॥ ९॥ नातरी पितयाचे कारणीं। माझे प्राण वेंचिती रणीं। तरी सदैव मजवांचुनी। दुजा नाहीं॥ १०॥ आणि कोटी जन्मांचें पुण्य। जे देखिले तुझे चरण। तरी मज वैकुंठभुवन। वस्ति करी॥ ११॥ तंव बोलिला शारंगपाणी। जे जे इच्छा धरिसी मनीं। तितकी पावसी निर्वाणीं। संदेहो नाहीं॥ १२॥ ऐसें बोलोनी निघाला। सैन्या पुढचा भवंडिला। श्रीकृष्ण पांडवासी आला। मेळीकारीं॥ १३॥ मग पाठविलें बंदीजना। जाउनी सांगा दुर्योधना। केंवि सांडोनी अभिमाना। जात असां॥ १४॥ न जिंकतां पुढील वैरी। कैसें जातां मेळीकारी। ऐशी नव्हे भरोवरी। क्षात्रधर्माची॥ १५॥ मेळीकारी जातां सैन्य। तंव पातले बंदीजन। तेहीं देउनी आशिर्वचन। ब्रह्मावो केला॥ १६॥ म्हणती दुर्योधना राजाधिराजा। क्षात्रपणाची घेउनी पैजा। तरी कां आणितसा लाजा। क्षात्रपणासी॥ १७॥ रणीं वैरिया देऊन पाठीं। न घालितां पुरुषार्थाची गाठी। गेळीकारा उठाउठी। केंवी जातां॥ १८॥ नातरी सांडुनी हातीयेरा। राज्य द्यावें युधिष्ठिरा। जावें आपुलिया घरा। कुटुंबामाजीं॥ १९॥ मनामाजीं न धरावी लाज। सांडावी वांटिवेची पैज। तरी तुमचें निके काज। फळासी येईल॥ २०॥ जरी क्षात्रधर्माची आयनी। पुरुषार्थ कराल समरांगणीं। तरी भटाची कास धरूनि। युद्धासी चला॥ २१॥ ऐसीं तिखट उत्तरें करून। बोलते जाले बंदीजन। तेणें खोंचलें मन। महा वीरांचें॥ २२॥ मग कुंचा भवंडिला जाणा। सैन्य लागलें भेरी निशाणा। शंख नादाचें स्फुरणा। रणतुराचें॥ २३॥ वीर सिंहनादें गर्जती। कुंजर किंकाळिया देती। रथचक्रें घडघडती। थोर नादें॥ २४॥ उन्नत जालिया आरणी। कौरव उभे ठेले रणीं। भाटा दिधली पेटवणी। बोलावी वेगीं॥ २५॥ भाट जाऊनि वेगेसि। सांगती ह्याळसेनासी। कौरव प्रवर्तले युद्धासी। आले वेगीं॥ २६॥ मग चालिले दळभार। चालिले पायाचे मोगर। तेथें तुंबळ झालें थोर। दोहीं दळीं॥ २७॥ महींद्र मंथनीचे हल्लाळ। तैसें उसळलें पायदळ। अशुद्धाचें खल्लाळ। रणामाजीं॥ २८॥ मग उठावलें असिवार। तेंही भंगविले पायाचे मोगर। रणकंदन केलें थोर। समरंगणीं॥ २९॥ मग कुंजरभार उठावले। तेही असिवारां भंगिले। रक्तमांस कालविलें। चिखलु झाला॥ ३०॥ मग उठावले रहंवर। तेही पळविले कुंजरभार। शस्त्रीं न दिसे दिनकर। अभ्रामाजीं॥ ३१॥ तेथें तुटले शरजाळ। बाणीं व्यापिलें अंतराळ। उठती उग्रीचे कल्लोळ। दाही दिशा॥ ३२॥ तंव कर्णू उठावला। तेणें सबळ वाहानु पाचारिला। म्हणे साहें साहें वहिला। जासी झणीं॥ ३३॥ म्हणे साहें साहें गा वीरा। झणी सरसील माघारा। माझिया घायाचा दरारा। लागला तुज॥ ३४॥ हें परिसोनियां उत्तर। कोपें खवळला महावीर। मग चालिला समोर। कर्णाउजु॥ ३५॥ म्हणे एक वेळां पडिलासी। रणभूमि सांडूनि पळसी। मुख दाखवितां न लाजसी। निर्लज्जा तूं॥ ३६॥ रणभूमि सांडूनि पळिजे। तेणें मुख केंवि दाखविजे। हृदय फुटोनि मरिजे। तरीच भलें॥ ३७॥ अपकीर्तीसी जिणें। तें अप्रयोजक मी म्हणें। मुख दाखवितां लाजिरवाणें। वीरांमाजीं॥ ३८॥ ऐसें म्हणोनियां गुणीं। विंधिला खडतर बाणीं। जैसा कोपला शूलपाणी महाभूतीं॥ ३९॥ कर्णू तोडी वरिच्यावरी। परी कासावीस केला भारी। सारथी आणि वारू चारी। पाडिले भूमीं॥ ४०॥ बाण घातीं विकळ केला। मूर्च्छागत भूमीं पडला। तंव अश्वत्थामा पावला। सांवरा वीरा॥ ४१॥ मग संधानाच्या शरीं। अश्वत्थामा येतां दुरी। तो भेदिला शरधारीं।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विकळ केला ॥ ४२ ॥ तंव पावला दुःशासन। तेणें खडतर घातले बाण। झाकुळले रविकिरण। आच्छादिले दिसे ॥ ४३ ॥ तयाचे शर तोडुनी। मग विंधिला अनिवार बाणीं। दुःशासन पळविला रणीं। रथेसहित ॥ ४४ ॥ भूरिश्रवा सोमदत्तु। तेही पाचारिला वीरनाथु। तुझा थोर पुरुषार्थु। देखिला आम्हीं ॥ ४५ ॥ कृतवर्मा आणि पोंडरिकू। भगदत्तु पिंगाक्षू। अनंतविजयो बाहाळिकू। उठावले ॥ ४६ ॥ तये वेळीं सबळ वाहानु। वीरक्षत्रिया पंचाननु। तेणें तोडिलें बाणें बाणु। पडिले भूमीं ॥ ४७ ॥ मग तेही सकळ वीरीं। रघु घातला माझारीं। वर्षताती शरधारीं। मेघ जैसे ॥ ४८ ॥ प्रळयकाळीं जळधार। वर्षती अखंड धार। जैसा झाकोळला दिनकर। अभ्रामाजीं ॥ ४९ ॥ बापु येकला वीर राणा। सावरितु असे त्याचिया बाणा। ते न साहवेचि ह्याळसेना। महावीरा ॥ ५० ॥ मग लोटिला रहंवरु। जैसा तृणावरी वैश्वानरु। कीं तमावरी दिनकरु। उदय करी ॥ ५१ ॥ कीं महाभूतावरी रुद्रु। कीं प्रळयकाळीं समुद्रु। कीं दैत्यसैन्यावरी इंद्रु। वज्रघातें ॥ ५२ ॥ तैसा रथ घडघडितु। जैसा काळावरी कृतांतु। कीं राक्षससैन्यावरी जैसा हनुमंतु। तैसियापरी ॥ ५३ ॥ वर्षताती खडतर बाणीं। सैन्य घायवटलें थोर रणीं। वीरासी झाली भंगणी। क्षणामाजीं ॥ ५४ ॥ करीं घेऊनियां गदा। रथ घोडे करी चेंदा। केला महा वीरासी धोदा। रणामाजीं ॥ ५५ ॥ सारथी आणि महारथी। थोर घाई पाडिले क्षितीं। रथ सैरा धांवती। रणामाजीं ॥ ५६ ॥ कर्णाचा मनोरथु। पुरविला मोडुनि रथु। कर्णु करूनि विरथु। चरणीं चाले ॥ ५७ ॥ दुःशासनु गदें हाणितला। तो मूर्च्छागत पाडिला। सकळ देखोनी पळाला। सांडुनी रथू ॥ ५८ ॥ मग घेउनी रथ बाण। खडतर करितसे संधान। तें सपिच्छी खडतरोन। विसंसर होती ॥ ५९ ॥ सैन्य पळालें गेलें भंगीं। आपण उभा रणरंगीं। जैसा माया त्यजुनी योगी। निर्विकारू ॥ ६० ॥ तें न साहत तेणें। मग घातले खडतर बाण। व्यापुनी ठेविले रविकिरण। अभ्रामाजीं ॥ ६१ ॥ आणिक सोडिले शर। अति तिखट अनिवार। जैसे उलथले डोंगर। कल्पांतसमयीं ॥ ६२ ॥ तें देखोन ह्याळसेन। केलें शंखाचें स्फुरण। मग पाचारिला द्रोण। समरांगणीं ॥ ६३ ॥ म्हणे कालच्या दिवशीं गुरू। सांडुनी पळालेती रहंवरू। मागुता घेतला विचारू। झुंजावयासी ॥ ६४ ॥ तंव द्रोणु आवेशला। अग्निशस्त्रेंकरुनी हाणितला। जैसा त्रिनेत्र उघडिला। महारुद्रें ॥ ६५ ॥ अग्नि प्रजळला अंबरीं। जे प्रळयकाळची लहरी। ह्याळसेन सैन्यावरी। झेंपावला ॥ ६६ ॥ तें देखिलें ह्याळसेनें। शस्त्रें सोडिलें पर्जन्यें। चाऱ्ही मेघ अव्हानुन। एके ठायीं ॥ ६७ ॥ धन्य पावन पांगुळला। गगनीं चहूं मेघांचा मेळा। उदक वाहाताहे खळाळा। रणामाजीं ॥ ६८ ॥ सैन्यक वीर पुरीं वाहत। मेघ मुसळधारी वर्षत। ऐसें वर्तलें झुंजात। कौरवसैन्यीं ॥ ६९ ॥ तंव द्रोणें काय केलें। वायो अस्त्र मोकलीलें। मेघमंडळ विध्वंसिलें। क्षणामाजीं ॥ ७० ॥ उडताती गिरिकंदरें। पाषाण गोटी तरुवरें। जेवीं प्रळयकाळीं वसुंधरें। कंपू होय ॥ ७१ ॥ उडती रथचिया मोडूनी। भ्रमतसें अंतराळीं। जेवीं गिधाची हाऊळीं। तैसें दिसे ॥ ७२ ॥ ध्वजस्तंभ मोडले। रथाचे साटे सोडले। पताकांचे मडे झाले। भूमंडळीं ॥ ७३ ॥ तें देखोन ह्याळसेन। काढिला नवनीसीतुबाण। पन्नग अस्त्र अभिमंत्रून। लाविलें गुणीं ॥ ७४ ॥ सर्प चालिले लक्ष कोटी। फणिया उभारिल्या अंबरीं। गरळ वमिताती त्रिकुटीं। जैशा अग्निज्वाळा ॥ ७५ ॥ एक शत फणीयाचे। एक शत सहस्त्र लक्ष कोटीचे। जैसे डोंगर असीचे। उसळले गगनीं ॥ ७६ ॥ वायो भक्षितां न लागे वेळ। मुखें वमताती हळाहळ। तेणें जळताहे अंतराळ। अग्निज्वाळीं ॥ ७७ ॥ तंव द्रोणु आवेशला। बाणु गुणीं लाविला। गरुडास्त्र जपिन्नला। मंत्रसिंधु ॥ ७८ ॥ गरुड चालिले असंख्यात। नखीं पक्षीं विदारीत। सर्पा वर्तलें झुंजात। तये वेळीं ॥ ७९ ॥ न लागतां

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अर्ध घडी। सर्प नेले तडातोडी। मग चालिले लक्ष कोडी। रणामाजीं॥ ८०॥ तंव ह्याळसेनें काय केलें। पर्वतास्त्र मोकलिलें। तेथें पर्वत चालिले। गगनमार्गें॥ ८१॥ असो हें मज पाहतां। पूर्वी पंख होते पर्वता। ते चालले असंख्यात। धर्मकाजा॥ ८२॥ तेणें गरुड रगडिले भारी। पाहिले रणामाझारीं। मग कौरवसैन्यावरी। वर्षताती॥ ८३॥ तंव कोपला द्रोण गुरु। तेणें गुणीं लाविला शरु। तो बाणु आणि वारु। कृतांतु जैसा॥ ८४॥ वज्र अस्त्र प्रजिलें। तेणें पर्वत कुट केलें। ठिकरीया करूनि सांडिलें। क्षणामाजीं॥ ८५॥ तंव तेणें ह्याळसेनें। इंद्रास्त्र सोडिलें त्राणें। वज्र गेलें पळोन। गगनपंथें॥ ८६॥ इंद्रास्त्र सत्राणें। विस्तारिलें सहस्त्र गुणें। तें करीतसें संहारणें। कौरवासी॥ ८७॥ तें द्रोणें देखोन नयनीं। विष्णुशस्त्र लाविलें गुणीं। तें नेलें पिटोनी। इंद्रशस्त्रातें॥ ८८॥ मग चालिले गजवदन। विकट शुंडा दंड दारुण। फरशघातें संहारून। वैरियासी॥ ८९॥ तंव ह्याळसेन कोपोनि। गदास्त्र लाविलें गुणीं। तेणें नेलें पिटोनि। विष्णुस्वरूपा॥ ९०॥ तया गजाचा प्रतापू। वरी द्रोणाचार्यांचा कोपू। तो धनुर्वाडियाचा बापु। काय करी॥ ९१॥ सिंहास्त्र दारुण। बाण सोडिला शीत ओढून। गजासुरा निःपातुन। क्षणामाजीं॥ ९२॥ तंव कोपला ह्याळसेनू। गुणीं लाविला चामुंडाबाणु। अठरा भुजा दारुणु। बाबरझोंटी॥ ९३॥ मुख विक्राळें ताणीत। डोळे गरगरां भवंडित। कौरवा वर्तलें। युगांत। तये वेळीं॥ ९४॥ तंव द्रोण कोपला महावीरू। गुणीं लाविला एक शरू। मैराळ अस्त्र विक्राळु। गगनामाजीं सोडिलें॥ ९५॥ शस्त्रें शस्त्र विलया गेलें। तेजें तेज हारपलें। तंव ह्याळसेनें विंधिलें। सातें बाणें॥ ९६॥ चारी चहुं वारुयासी। एक भेदिले सारथियासी। दोनी भेदिलें द्रोणासी। तये वेळीं॥ ९७॥ द्रोणु आला मूर्च्छागतु। ह्याळसेनें सांडिला रथू। आला गदा भवंडितू। कर्णावरी॥ ९८॥ गदाघात रथु हातिला। कर्णु दुसरिया रथावरी गेला। तोही रथु चूर्ण केला। भूमंडळीं॥ ९९॥ कर्णु पळाला घायत्राणें। मग लक्षिला दुःशासनें। तोहीं गदाघातें म्हणोन। लोळवीला॥ १००॥ मना पवना वेगु नाहीं। तैसा धांवतु असे पाहीं। संहारितु गदाघाई। कौरवांसी॥ १॥ अश्वत्थामा केला विरथू। कृपाचार्य सांडी रथू। सबळु पळाला जीवंतू। देखोनियां॥ २॥ मग पाचारिला दुर्योधनू। आतां राखें आपुला प्राणू। नातरी रिघावें शरणू। युधिष्ठिर॥ ३॥ तंव पावला दुर्मदू। एकवटले दोघे बंधू। करूनि सिंहनादू। मिसळले घाईं॥ ४॥ दुर्मदु म्हणे ह्याळसेनासी। बहु बोलतां पार जासी। आपणा कडे न पाहसी। मी कवणु ऐसें म्हणोनि॥ ५॥ सुखें असतां आपुले ठायीं। नेणसी सुखदुःखा कांहीं। तो तूं मराया आपुल्या पायीं। आलासी येथें॥ ६॥ पुरे आयुष्याची विधी। जेविं सर्पु पानधी। तुज कवणें शिकविली बुद्धी। मतिहीनें॥ ७॥ जरी चिरकाळ असे जिणें। तरी जाय नगर टाकून। वृथा वेंचूनि प्राण। कासया जासी॥ ८॥ आम्हीं तरी आपुले गांठीं। बांधली मरणाची खुंटी। विधि पुरलिया शेवटीं। वांचुन तेणें॥ ९॥ पाहें पां कालचे दिवसीं। जे परी झाली बा अभिमन्यासी। तरी ओकूनियां कां प्राण देसी। वृथा काजें॥ १०॥ तंव बोलिला ह्याळसेनू। हें जाणें भेडसावणें। आधीं गांठीं बांधोन मरण। आलों येथें॥ ११॥ परी देख तुझें अंतरंग तूं। या अकरा क्षोणि सहितू। तुम्ही पावाल मृत्यु। एकेएकु॥ १२॥ तुमचे निर्वंश होती। हें देखतसे अंतर्गती। पांडव राज्य करिती क्षिती। निश्चयेंसी॥ १३॥ धन्य धन्य अभिमन्य। तेणें रणीं वेंचिले प्राण। अंतीं तुष्टला नारायण। मुक्तिदाता॥ १४॥ आजी पितयाचे कारणीं। माझे प्राण वेंचले रणीं। परीं सदैव मजहुनी। दुजा नाहीं॥ १५॥ असो तुम्हांसी काय नीती। तुम्ही असा पापमूर्ती। तुम्हांसी कैंची गती। भूमिभार॥ १६॥ ऐसें बोलोनी खडतरी। दुर्मदु विंधिला दाही शरीं। ते बाण नव्हेती मलाही। यमदंड॥ १७॥ तंव दुर्मदें केलें संधान। चारी सांडुनी तोडून। सहा बाण तिष्टपणें। पावलें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वेगीं ॥ १८ ॥ चारी चहूं वारुयांसी। एकु भेदला सारथीयासी। एकु भेदला दुर्मदासी। एकु पडला रणीं ॥ १९ ॥ तें देखोन दुर्योधन। पळाला रथ मुरडुन। हासिन्नला ह्याळसेन। म्हणे परतोन पाहें ॥ २० ॥ तंव द्रोणु सावधु झाला। दळभारु एकवटला। तेथें संग्रामु झाला। अति दारुण ॥ २१ ॥ कृपाचार्य आणि द्रोणू। अश्वत्थामा आणि सूर्यनंदनू। भूरिश्रवा विकर्णू। सोमदत्त ॥ २२ ॥ सोरट आणि पढीवारू। चीन चीनमोठ आणि बर्बरू। परी एकला न सावरू। बागड राये ॥ २३ ॥ अतिबळ आणि सबळ। कळाईत। निकुंभ अनिळ। ऐसें एकवटलें दळ। कौरवांचें ॥ २४ ॥ सैन्या कुंचा भवंडिला। शंखनादें कोंदाटला। येथें सवेचि पावला। दुर्योधनू ॥ २५ ॥ तंव ह्याळसेनाचिया सैनीं। अंबर गर्जिन्नला निशाणीं। शंखनादाचिया ध्वनी। नाद कोंदे ॥ २६ ॥ अतिरथी आणि महारथी। वीर घालाघाली करिती। ते सिंहनादें गर्जती महावीर ॥ २७ ॥ वीरसेनु दळभंजनू। वीरबाहो सबळ वाहानू। अग्निकेतु रणमर्दनू। पराजितु ॥ २८ ॥ ऐसें सैन्यकहो वीर। सौरपणें रणरंगधीर। जेही जिंकिले नृपवर। मेदिनीचे ॥ २९ ॥ ऐसें सैन्य चालिलें रणीं। मागुती परतली आयिनी। पुढती द्वंद्वयुद्धें मांडोनी। तुंबळ झालें ॥ ३० ॥ वीर पेटले महामारी। वरुषताती खडतर शरीं। तेथें जुगांत बालें भारी। कौरवसैन्या ॥ ३१ ॥ तया कौरवसैन्या आंतू। थोर हलकल्लोळ होतू। जैसा मांडिला आवर्तू। प्रळयकाळीं ॥ ३२ ॥ तंव कर्ण द्रोणें वाहले। कौरवसैन्य एकवटलें। तेथें घोरांदर झालें। महा दारुण ॥ ३३ ॥ बाणजाळ सुटलें कैसें। सूर्यमंडळीं अभ्र जैसें। सूर्यकिरण न दिसे। अंधकारीं ॥ ३४ ॥ बाणीं खोंचलें सकल सैन्य। परी न भंगेची दारुण। तें देखताहे ह्याळसेन। महावीरु ॥ ३५ ॥ मग तेणें पेलिला रथू। जेवीं काळावरी कृतांतू। कीं चंद्रावरी राहुकेतु। पर्वसमयीं ॥ ३६ ॥ कीं काळावरी महाकाळू। कीं दैत्यसैन्यावरी रणकंदोळू। कीं मनामाजीं परिवळू। दाहो जैसा ॥ ३७ ॥ कीं सृष्टि संहारितां तये वेळीं। जैसा विखें चंद्रमौळी। कीं वडवानल समुद्रजळीं। दाहो करी ॥ ३८ ॥ तैसा तो ह्याळसेन। संहारी कौरवसैन्य। बाण नव्हती ते दारुण। काळदंड ॥ ३९ ॥ ना आणिकु एक मज गमत। खेळ खेळताहे श्रीअनंत। ह्याळसेनें निमित्यें। कौरवांसी ॥ ४० ॥ ऐसा उठावला महावीर। फांकले तेजाचे अंकूर। पळोन गेला अंधकार। रविबिंब जैसें ॥ ४१ ॥ शंख वाहिला घनघोषू। गर्जिन्नला स्वर्गलोकू। पाताळभुवनीं शेषू। कांपिन्नला ॥ ४२ ॥ जेणें रथासि वेगु देऊनि। पावला टाकितु आरणी। कौरवसैन्य भंगुनी। सैन्यका वीरा ॥ ४३ ॥ देखोनि कुंजरांचा भारू। खवळिला महावीरू। करितां झाला घोरू। गदाघातें ॥ ४४ ॥ एकातें धरितु चरणीं। एकातें टाकितु गगनीं। कुंजरभर संहारूनि। चालिला पुढा ॥ ४५ ॥ पुढा देखोनि असिवारा। प्रवर्तला महा मारा। तंव पुढा रमावरा। देखतां झाला ॥ ४६ ॥ मग रथें रथु हाणें। घे घे पुढिलातें म्हणे। आकाशीं टाकी सत्राणें। टाकी यासी ॥ ४७ ॥ तो मनातें टाकी मागें। पवन आटोपे वेगें। जैसा मीनु तरंगे समुद्रजळीं ॥ ४८ ॥ तो सैरावैरा धांवतु। पाठी येताहे रथु। तयाचा वर्णितां पुरुषार्थु। खुंटली वाणी ॥ ४९ ॥ तंव द्रोणासि देखोनि नयनीं। तो धाविन्नला चरणीं। गदाघातें संहारूनि चारी वारू ॥ ५० ॥ द्रोणु बाणीं वरुषत। ते सर्वांगीं खडतरत। अशुद्धाचे पुर वाहत। तये वेळीं ॥ ५१ ॥ परी न मानी तयाचिया मना। जंव गदाघातु द्यावा द्रोणा। तंव कर्णे केलें संधाना। तयेवेळीं ॥ ५२ ॥ तैसाच दिधला अवघातू। मोडिला कर्णाचा रथू। तये वेळीं तो सूर्यसुतु। चरणीं चाले ॥ ५३ ॥ कर्ण द्रोण वरुण चाली। वरुषताती शरधारी। तेथें खोचे जिव्हारी। महावीरु तो ॥ ५४ ॥ कृपाचार्य अश्वत्थामा। थोर पेटले संग्रामा। दुःशासन साउमा। पावला तेथें ॥ ५५ ॥ ऐसें कौरवसैन्य मिळालें। शरधारी वरुषले। जैसे अभ्रामार्जी। झांकुळलें। रविबिंब ॥ ५६ ॥ ते वेळीं तो ह्याळसेनू। करीं घेउनी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

धनुष्यबाणू। करिता जाला संधानू। वीरराजु॥ ५७॥ तेणें शरजाळ तोडुनी। धनुष्य पाडिलें धरणीं। खंड विखंड अरणी। कौरवसैन्य॥ ५८॥ मग मुद्गल हातीं घेतला। चरण चाली उतरला। गुरु हाणितला। मस्तकावरी॥ ५९॥ घाईघाई आली कळवळी। मूर्च्छा येऊनि पडला भूमंडळीं। तंव पिटिली एक टाळी। कौरवसैन्यीं॥ ६०॥ मागुता आला रथावरी। कर्णु विंधिला दाही शरीं। सारथि आणि वारू चारी। पडिले रणीं॥ ६१॥ सवेचि गदा घेऊनि। धाविन्नला चरणीं। अश्वत्थामा हाणोनि। पडिला धरणीं॥ ६२॥ तयाची वरी कृपाचारी। गदाघातें हाणितला शिरीं। पाडिला धरणीयेवरी। मूर्च्छागतु॥ ६३॥ तें देखोन दुर्योधनू। पळाला रथ घेऊनि। सबळु आणि दुःशासनू। पळती पुढा॥ ६४॥ तंव समसप्तकु पाचारिला। नीरा राहे राहें सैरा। तेथें दोघां संग्रामु झाला। घोर देखा॥ ६५॥ हरी शिरीं कपाळीं। जानु जांग वक्षस्थळीं। दोघे वीर महाबळी। लोटती एकमेकां॥ ६६॥ तंव तेणें ह्माळसेनें। समसप्तकु हाणितला त्राण। थोर मूर्च्छा आली तेणें। पडला धरणीं॥ ६७॥ देखोनि सैन्या सुटला पळू। कौरवसैन्यामाजीं हलकल्लोळू। तो खवळला महाकाळू। अंगवेना॥ ६८॥ कौरवसैन्य पुढें पळत। थोर हाहाकार होत। तेथें वर्तलें जुगांत। महावीरा॥ ६९॥ तंव बोलिला दुर्योधनु। श्रीगुरु कोठवरी पळोन। यापुढें नाहीं जाणें। सर्वथा आम्ही॥ ७०॥ हा कपटिया नारायणू। येणें रचिलेसें निर्वाणू। नातरी कैंचा ह्माळसेनू। कोठुनी आला॥ ७१॥ न कळती या कृष्णाचें मत। एकएकासी निर्माण करीत। जय देणें पांडवांस। भलतीयेपरी॥ ७२॥ पहाजी सोळा वरुषाचा वीरु। अभिमन्यू धाकुटें लेंकरूं। तेणें केला संहारू। महावीरांचा॥ ७३॥ तंव बोलले द्रोणगुरु। इतुका जाणसी विचारु। तरी कां करिसी वैराकारु। राज्य नेदिसी त्यांचें॥ ७४॥ देवो तयाचा सारथी। ऐसें जाणसी निगुती। तरी कां धरितोसी अनिती। विचारूं दुजा॥ ७५॥ ऐसें जाणतां मनीं। पांडवा सारथी चक्रपाणि। तरी कासया निर्वाणी। येतां तुम्ही॥ ७६॥ तया सारथी देवरावो। तो पांडवांसी देईल जयो। कौरवांसी करी क्षयो। हें निभ्रांत जाणा॥ ७७॥ धरूनि मच्छाचा वेषू। दैत्य वधिला तो शंखू। कूर्मवेषें भूमि गोळकू। धरिला पुष्टीं॥ ७८॥ जैं वराहरूप नटला। तो हिरण्याक्षु दैत्य वधिला। हिरण्यकश्यपू वधिला। नरसिंहवेषें॥ ७९॥ जें खुजें रूप धरूनि। बळी पाताळीं घालुनि। पृथ्वी निःक्षेत्री करुनी। परशरामें॥ ८०॥ विरोचनाची होऊनि नारी। मग तो निर्दाळिला वैरी। ऐसा कपटी श्रीहरी। नेणसी राया॥ ८१॥ पहिलाचि घेतला विचारू। तरी कासया होता संहारू। भीष्म देवासारखा वीरू। कासया पडता॥ ८२॥ कासया पडता लक्ष्मण। जयद्रथा होतें कां निर्वाण। ऐसें तुझें मूर्खपण। दुर्योधना॥ ८३॥ आतां सांगसी विचारू। तोचि आम्ही करूं। वांयां करितोसी संहारू। महावीरांचा॥ ८४॥ पाहें तुझिये कारणीं। वीर पडती रणीं। ऐसी तुझी करणी। दुर्योधना॥ ८५॥ ऐसें द्रोणगुरु बोलिला। दुर्योधनु काळवंडला। उगाची तो राहिला। मौनरूपीं॥ ८६॥ तंव बोलिला कृपाचारी। गूढा असे याच्या शरीरीं। श्रीगुरु तुमच्या उत्तरीं। न बोले कांहीं॥ ८७॥ तंव बोलिला गुरुरावो। तुवां कां धरिला मौनभावो। जो सांगसी उपावो। तोचि करूं॥ ८८॥ तंव बोलिला दुर्योधनू। या वीरासी संहारून। यामार्गे जीवूं कीं मरून। भलतेंचि घडो॥ ८९॥ तंव द्रोणू बोलिला रायासी। ब्रह्मशस्त्र आहे मजपाशीं। येणें शस्त्र अर्जुनाशीं। घातु असे॥ ९०॥ हें शस्त्र गा दुर्योधना। घातुक याचिया प्राणा। उदैक पार्थाचिया प्राणा। घेऊं आम्ही॥ ९१॥ तंव दुर्योधन म्हणे गुरूसी। यापुढां जेव्हां वांचसी। मग अर्जुनातें वधिसी। समरांगणा॥ ९२॥ प्रस्तुत चुकवावें मरण। रात्रीं आडतें कायसें विघ्न। हें कार्य अवश्य करून। यासी वधावें॥ ९३॥ श्रीगुरु बोले उत्तरीं। अभिमन्यु

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मारिला जया परी। तैसेंचि करावें वीरीं। आजीं देखा॥ ९४॥ मग एकवटले वीर। चालिला कौरवांचा भार। शस्त्राअस्त्रीं अंधकार। पडिला तेथें॥ ९५॥ तें देखिलें ह्याळसेनें। तेणें पाचारिला द्रोणें। तुम्हां लाज नाहीं मी म्हणे। पळतां रणीं॥ ९६॥ वीर म्हणवितां भारतीचे। थोर पुरुषार्थ तुमचे। महत्त्व न राखा नांवाचें। पळतां रणीं॥ ९७॥ क्षेत्रीं झुंजतां रणीं। पाठी देउनी पळे प्राणी। तो पडे यमवदनीं। कोटि वरुषें॥ ९८॥ नातरी पळतियासी मारी। कीं निःशस्त्रिया अवधारी। कीं शरणागतासी वधारी। तो अप्रयोजकू॥ ९९॥ एकवळा कीं करुनी। एकलियासी वधिती रणीं। तयासी होय यमजाचणी। चंद्रार्क वरी॥ २००॥ तरी तुम्ही कालच्या दिवशीं। रणीं वधिलें अभिमन्यूसी। तें मूळ आहे तुम्हांसी। यमयातना॥ १॥ असो तुम्हांसी काय सांगणें। तुम्ही ठायींहूनि कपट करणें। तैसेंच भोगाल पतनें। सत्य जाणा॥ २॥ ऐसें बोलोनी घेतले बाण। तोडिलें तयाचें संधान। तंव आणिक आलें तीव्रपणें। तेंहि तोडिलें॥ ३॥ तितकीया वीरांचें संधान। एकलाचि सांवरी त्राण। जैसें नपूंसकाचें जिणें। निरर्थक॥ ४॥ मग एक वेळा करुनी। रणाभोवतीं वेढा घालुनी। मग वरुषताती बाणीं। जलधारा जैसे॥ ५॥ कर्णु म्हणे देख देख। हें सांवरी माझें लक्ष। म्हणोनि विंधिलें धनुष्य। तुटलें शीत॥ ६॥ तंव तें वज्रापासाव कठोर। काय करी कर्णाचा शर। मांडीं देउनी महावीर। चढविलें सीत॥ ७॥ मग घेउनी गदेतें। कर्ण हाणितला अव्हाटे। कूट करूनि रथांत। पाडिला भूमि॥ ८॥ अश्वत्थामा तये क्षणीं। चारी वारु खिळले बाणीं। ते देखोनियां नयनीं। तोडिले वीरें॥ ९॥ तयाच्या संधाना आंत। लखलखीत बाण सात। अश्वत्थामा करूनि विरथ। पाडिला रणीं॥ १०॥ तयेच वेळीं कृपाचारी। आखु छेदावया दाखवी दाही शिरीं। येतां दाखिलें दुरी। ह्याळसेनें॥ ११॥ ते बाणें बाण तोडिले। मग कृपाचारी तें लक्षिलें। मूर्च्छित पाडिलें। मोडिला रथू॥ १२॥ तंव दुःशासनु पातला। तेणें ध्वजास्त देखिला। तो वज्रापासावो घडिला। केंवी तुटे॥ १३॥ मग सोडिला बाण। हृदयीं विंधिला दुःशासन। पडला मुरकुंडी येऊन। तये वेळीं॥ १४॥ मग म्हणे जी जी श्रीगुरु। तुम्ही कां न करा हातीं येरू। एवढा वाटीवेचा बडिवारू। वृथा जातु॥ १५॥ आवेशोनी द्रोणाचारी। ह्याळसेनु विंधिला दाही शिरीं। तंव द्रुम दुहाकारी। साहे मातें॥ १६॥ तंव पावला सबळू। झणें होसी बरळू। आतां करीन हलकल्लोळू। वीरा तुज॥ १७॥ कर्णू अश्वत्थामा पावला। कृपाचारी विकर्ण आला। शैल्य सोमदत्तु धांविन्नला। थोर क्रोधें॥ १८॥ ते देखोनियां वैरी। जैसा सिंह गजावरी। मग गदा घेऊनियां करीं। उतरे चरणीं॥ १९॥ वीर बाहो सबळ वाहानु। वीरसेनु दळभंजनु। अग्निकेतु रणमर्दनु। पावले वेगीं॥ २०॥ शरधारी वरुषती। तयाचीं संधानें तोडिती। ह्याळसेनु करील ख्याती। महावीरेंसी॥ २१॥ कर्णु गदें करून हाणितला। विकर्णु क्षितीवरी पाडिला। अश्वत्थामा पावला। चरण चाली॥ २२॥ पुढा देखोनी कृपाचारी। तयातें घावो देखोनि शिरीं। सबळासी केली परी। ते सांगवेना॥ २३॥ द्रुपदासी धरुनी चरणीं। तयासी भवंडिलें गगनीं। रथेसी दिधला टाकोनी। शैल्यावरी॥ २४॥ तंव पुढा देखिला सोमदत्तु। तयाचा मोडूनियां रथू। भूरिश्रवाचा पुरुषार्थू। भंगिला तेणें॥ २५॥ तो खवळला महाबाहो। रथ घोडिया एकचि घावो। फेडीतु वैरियांचा ठावो। महावीरू॥ २६॥ मागें ह्याळसेनाचे वीर। तेहि भंगिले कौरवांचे भार। थोर होताहे हलकल्लोळ। रणामाजीं॥ २७॥ पुढें पळे कौरवसैन्य। पाठीं धांवे ह्याळसेन। थोर होताहे कंदन। कौरवांचें॥ २८॥ तंव दुर्योधनु बोले। गुरु तुम्हीं विचारिलें। कीं हा मेलिया भलें जालें। सकळिकांचें॥ २९॥ दुर्योधनाचे नांवें। तेचि पांडव जाणावे। जरी हा न वांचला जिवें। रणामाजीं॥ ३०॥ मज घातु जालियावरी। तुम्ही वोळंगावें माझे वैरी। ऐसें खडतर उत्तरीं।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

खोंचला द्रोणु ॥ ३१ ॥ म्हणे तूं होसी कुळहीनु। म्हणोनि बोलतोसी उणें। तुझें तुज साजें बोलणें। बोलतां मज ॥ ३२ ॥ गांधारिया सहजा सांगितलें। तेंचि आजीं आठवलें। तुझे प्रसूतसमयीं शब्द झाले। जुंबकाचे ॥ ३३ ॥ तेंच म्यां वर्तिलें वर्तन। कुळक्षयो याचेन गुण। तेंचि आलें वचन। पुढें देखा ॥ ३४ ॥ अरे तुझीये चरणीं। येथें अनार्थे पाडिलीं रणीं। शेवटीं पुढें निवारणीं। तूंहि जासील प्राणा ॥ ३५ ॥ हा सर्वगतु श्रीहरी। सर्वत्र सर्वांच्या उदरीं। एकमेकां करूनि वैरी। संहारीवो ॥ ३६ ॥ आमुचें सहजीं वृद्धपणें। यावरी कीर्ति जिणें। तरी तुमचा कां जी प्राण वेंचणें। सत्य जाण ॥ ३७ ॥ इतकें बोलोनि वचन। गुणी लाविला रुद्रबाण। पाचारिला ह्माळसेन। तये वेळीं ॥ ३८ ॥ राख राख आपुलिया प्राणा। म्हणोनि सोडिलें रुद्रबाणा। तेणे तेजे गगना। उजेडु आला ॥ ३९ ॥ तें ह्माळसेनें देखोनि नयनीं। वैष्णवास्त्र लाविलें गुणीं। तेणें नेलें पिटोनि। रुद्रशस्त्रातें ॥ ४० ॥ तेजें तेज हारपलें। शस्त्रें शस्त्र विलया गेलें। तंव ह्माळसेनें देखोनि नयनीं। वैष्णवास्त्र लाविलें गुणीं। तेणें नेलें पिटोनि। रुद्रशस्त्रातें ॥ ४० ॥ तेजें तेज हारपलें। शस्त्रें शस्त्र विलया गेलें। तंव ह्माळसेनें पाचारिलें। द्रोणाचार्यासी ॥ ४१ ॥ मग हाणितला पांच बाणीं। चारी वारु पाडिले रणीं। सारथी बाणें खडतरोनि। पडला देखा ॥ ४२ ॥ ते वेळीं द्रोणू विरथू जाला। आणिका रथावरी गेला। गदाघातें चूर्ण केला। तोही रथु ॥ ४३ ॥ मग पळतसे चरणचाली। थोर होतोहे मारी। मग द्रोणु विचारी। मनामाजीं ॥ ४४ ॥ आतां करावें निर्वाण। नाहीं तरी नाहीं जिणें। मग काढिला बाण। निर्वाणीचा ॥ ४५ ॥ ब्रह्मअस्त्र लाविलें गुणी। तयासी प्रार्थना करूनि। वैरियासी संहारुनि रणीं। क्षणामाजीं ॥ ४६ ॥ पळत पळतां सोडिला बाणू। देखतें व्यापिलें गगन। तें ह्माळसेनाचें सैन्य। देखतें जालें ॥ ४७ ॥ वरुषती शस्त्रधारीं। शर पडती धरणीवरी। परी ह्माळसेनाचे शरीरीं। धाकु नाहीं ॥ ४८ ॥ गदाघातु जेथ देत। वारू मारी मोडी रथ। उलंडले मदोन्मत्त। गिरी जैसे ॥ ४९ ॥ कोटि सूर्यांचा प्रकाशू। तैसा गगनीं आयासू। करावया प्राणनाशु। वैरीयांचा ॥ ५० ॥ धगधगीत तत्क्षणीं। शस्त्र आलें गगनीहुनी। तें हाणितलें गदेंकरोनी। थोर निघातें ॥ ५१ ॥ घायें उसळला बाण। गेला रविमंडळा भेदून। पुनरपि मावळतां दीन। उतरलें भूमीं ॥ ५२ ॥ रणीं भीडतां महावीरा। धांवो लागला पाठीमोरा। बाण खडतरला सामोरा। हृदयावरी ॥ ५३ ॥ बाण हृदयीं खडतरला। मूर्च्छामतु भूमीं पडला। जैसा मेरु उलंडला। पृथ्वीवरी ॥ ५४ ॥ रामकृष्ण गोविंद म्हणत। धरणीं झाला मूर्च्छागत। हृदयीं आला श्रीअनंत। अविनाश मूर्ति ॥ ५५ ॥ काळें सलिला महाकाळु। कीं सागरें दाहिला वडवा नळु। कीं उलथला भूमिगोळु। येरी वाही ॥ ५६ ॥ तैसा उलंडला धरणी। हाहाकारु झाला सैनी। एक टाळी आरणी। गर्जिन्नली ॥ ५७ ॥ तंव ह्माळसेनाचे वीर। विंधितले समोर। जैसे वर्षताती जलधर। प्रळयकाळीं ॥ ५८ ॥ ब्रह्मशस्त्राचा प्रतापू। वरी द्रोणाचार्यांचा कोपू। रणीं मालविला दिपू। अर्जुनाचा ॥ ५९ ॥ सूर्योदय होऊनी मावळला। त्रैलोक्या अंधार पडिला। तैसा पांडवकुळीं झाला। अंधकारु ॥ ६० ॥ वीर चालिले थोर रणीं। तेही भंगीलिया आरणी। कौरव गेले पळोनि। मेळीकारा ॥ ६१ ॥ मग तेहि सैन्यकीं वीरी। ह्माळसेनु घातला रथावरी। वेगीं आले मेळीकारीं। पांडवांचें ॥ ६२ ॥ आणुनी घातला श्रीकृष्णाचे चरणीं। तो पांडवीं देखिला नयनीं। आंग टाकिलें धरणीं। पांचही जणीं ॥ ६३ ॥ तंव ह्माळसेनु सावधु झाला। तेणें श्रीकृष्ण विनविती। चरणीं स्थापावें घननीळा। कृपानिधी ॥ ६४ ॥ आजीं पितयाच्या काजा। प्राणु वेंचला माझा। अंतकाळीं वैकुंठराजा। भेटला मज ॥ ६५ ॥ आजीं धन्य मी ये सृष्टीं। मज जोडला जगजेठी। पावन झालों वैकुंठी। कल्प कोटी ॥ ६६ ॥ ऐसें बोलतां बोलतां। प्राण गेला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अवचिता। ते देखोनि पंडुसुता। दुःख झालें॥ ६७॥ तंव बोले सारंगधरु। याचा शोक नका करूं। तुम्ही घ्यावा विचारु। अंतर्गतु॥ ६८॥ ब्रह्मशास्त्र दारुण। घेते पांचाजणांचे प्राण। तें झालें निर्माण। ह्याळसेनासी॥ ६९॥ यासी संस्कारु किजे। ऐसें बोलोनि गरुडध्वजें। म्हणे सकळ जनीं निघिजे। भागीरथीसी॥ ७०॥ तयासी संस्कारु करुनी। मग तिलांजली देऊनी। मेळीकारासी येउनी। रात्रीमाजीं॥ ७१॥ पांडवांसी दुःख झालें। अन्न उदक वर्जिले। पाहा वो कैसें झालें। ह्याळसेनासी॥ ७२॥ मग बोलिले नारायण। धन्य या कौरवांचें जिणें। नित्य होताहे संहारणें। महावीरांचें॥ ७३॥ मागुतें संग्रामीं येती। परी साभिमानु न सांडिती। तुम्ही वांयांविण चित्तीं। दुःख धरितां॥ ७४॥ कर्वतु जातसे सैरा। परी कर्वताती दोन्ही धारा। तैसा संग्रामु अवधारा। परस्परें॥ ७५॥ स्मशान वैराग्य धरणें। तरी कायसें राज्याचें कारणें। मागुता वनवासु सेवणें। साही जणीं॥ ७६॥ आमुची संगति ऐसी। जें दुःख न धरावें मानसीं। ऐसें बोले हृषीकेशी। तयाप्रती॥ ७७॥ तंव भीम बोलिला वचनीं। हे सर्व माया तुझी करणी। जें जें असेल तुझ्या मनीं। तैसें वर्तुं आम्ही॥ ७८॥ तंव ह्याळसेनाचा वीरीं। तेंहि विनविला श्रीहरी। तूं अव्यासु मुरारी। परमपुरुषू॥ ७९॥ आतां आम्हां आशिर्वाद देणें। तुवां पांडवाचें साह्य करणें। अनाथांसी रक्षणें। तुझ्या चरणीं॥ ८०॥ मग तेहि आज्ञा घेऊनी। पांडवांसी पुसोनि। मागा काय करील करणी। नारायणु॥ ८१॥ नामा विष्णुदास विनवितु। तो लाघवी श्रीअनंतु। कौरवां करूनि निःपातु। जय देणें पांडवां॥ ८२॥

हरिश्चंद्रराजाचें चरित्र

२२५६. सत्त्वाचा सागर राजा हरिश्चंद्र। स्वप्नीं हें समग्र दिलें राज्य॥ १॥ ब्राह्मणासी सुवर्ण दिलें औटभार। संकल्प हा त्वरें सोडियेला॥ २॥ जागृतीमाजीं येऊनि ब्राह्मण। मागती सुवर्ण राजयासी॥ ३॥ वंदूनि चरण राजा बोले त्यांसी। चला आश्रमासि स्वामी आतां॥ ४॥ समारंभें रूपें घेऊनि ब्राह्मण। अयोध्येकारणें आले तेव्हां॥ ५॥ राजद्वारापाशीं येऊनि ब्राह्मण। मागत सुवर्ण राजयासी॥ ६॥ भांडारियासी आज्ञा करी हरिश्चंद्र। आणा वेगीं त्वरें सुवर्ण हें॥ ७॥ ऐकूनियां शब्द क्रोधें तो ब्राह्मण। करीत ताडण राजियासी॥ ८॥ माझें मज देसी काय समजोनि। विचार हा मनीं कैसा केला॥ ९॥ वंदूनि चरण बोले हरिश्चंद्र। कृपेचे सागर स्वामी तुम्ही॥ १०॥ कृपा करूनियां केले हें सावध। करा अपराध क्षमा माझे॥ ११॥ तारामती त्यासी करी विनवणी। धरूनियां वेणी मारी तिसी॥ १२॥ रोहिदास बोले वंदूनि चरण। ऐकीं विज्ञापना एक माझी॥ १३॥ स्वामीपाशीं मी तो रहातों गहाण। देऊनि सुवर्ण जाऊं आम्ही॥ १४॥ राजा बोले स्वामी द्यावी जी अवधि। तुम्ही कृपानिधि महाराजा॥ १५॥ नवखंडा वेगळी असे वाराणसी। विकूनि देहासी देऊं आम्ही॥ १६॥ वोलावूनि मंत्री सांगे हरिश्चंद्र। करा कारभार स्वामीपाशीं॥ १७॥ स्वामी सांगतील तेंच करा मान्य। कार्य विचारूनि करीत जावें॥ १८॥ आम्ही जातों आतां कृपा असों द्यावी। सकळां सांगावी विनंति माझी॥ १९॥ ठेवूनियां सर्व अलंकार भूषण। झालीं तिघेजण मार्गस्थही॥ २०॥ राजा हरिश्चंद्र मागें तारामती चिमणीही मूर्ति रोहिदास॥ २१॥ पाहूनियां लोक करिताती शोक। पशुपक्ष्यादिक सर्व तेही॥ २२॥ कृपेचा सागरा राजा हरिश्चंद्रा। कां आम्हां सर्वत्रां मोकलीसी॥ २३॥ लेंकुराचेपरी केलासे सांभाळ। मातेविण बाळ राहे कैसें॥ २४॥ लागेल तें द्रव्य घेईं आम्हांपाशीं। देईं या विप्रासी महाराजा॥ २५॥ येती काकुलती करिती नमस्कार। नको तूं अंतर देऊं आम्हां॥ २६॥ विप्रासी त्या लोक येती काकुळती। देईं हा नृपति आम्हांलागीं॥ २७॥ द्विगुणी सुवर्ण देतों तुज आतां। सोडीं कृपावंता हरिश्चंद्रा॥ २८॥ स्वामी तुम्ही करा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

राज्यकारभार। ठेवा हरिश्चंद्र आम्हांपाशीं॥ २९॥ नका करूं गाईवत्सा ताडातोडी। येती घडोघडी काकुळती॥ ३०॥ ऐकोनियां बोले क्रोधें तो ब्राह्मण। जा राजा त्वरेनें येथूनियां॥ ३१॥ राजियानें केली सर्वां विनवणी। निघाला तेथूनी हरिश्चंद्र॥ ३२॥ आदित्यासी तेव्हां सांगे विश्वामित्र। तपा तुम्ही तीव्र सोळा कळा॥ ३३॥ वरुणासी सांगे आटवावें पाणी जळशोष मेदिनी पाडियेला॥ ३४॥ वायुलागीं सांगे नका येऊं येथें। जात तया पंथें हरिश्चंद्र॥ ३५॥ वृक्ष हे जळाले पाषाण उलले। त्या पंथें चालिले तिघेजण॥ ३६॥ शरीरें तिघांचीं करपोनियां गेलीं। तृषा ते लागली रोहिदासा॥ ३७॥ रोहिदास बोले माते दे जीवन। कासावीस प्राण होतो माझा॥ ३८॥ तशामध्यें वृद्ध ब्राह्मण होऊनि। आला तया वनीं विश्वामित्र॥ ३९॥ येऊनि राजास आशिर्वाद केला। सत्त्वधीर भला राया तूं॥ ४०॥ आम्ही तिघेजण पुत्र आणि दारा। जात हरिश्चंद्रा भिक्षेलागीं॥ ४१॥ उष्णकाळदीन पायां आले फोड। देईं चर्मजोडे तिघांजणां॥ ४२॥ ऐकतांच ऐसें केलें त्या अर्पण। झालीं तिघेजण मार्गस्थही॥ ४३॥ पायां आले फोड वाहती रुधिर। राजा हरिश्चंद्र चालतांना॥ ४४॥ रोहिदास बोले ताता पाजी पाणी। बोलतां वदनीं शब्द नये॥ ४५॥ कडे घेऊनियां रोहिदास बाळ। धुंडितसे जळ वनामाजीं॥ ४६॥ विश्वामित्रें वनीं लाविला वणवा। चुकली हे तेव्हां तारामती॥ ४७॥ घाबरी ते झाली पाहे वेड्यावाणी। न दिसे नयनीं हरिश्चंद्र॥ ४८॥ कृपेच्या सागरा राजा हरिश्चंद्रा। कां मज उदारा मोकलीलें॥ ४९॥ रोहिदास बाळ घेऊनि सांगातें। गेलां कोण्या पंथें महाराजा॥ ५०॥ तृषाक्रांत झालें होतें माझें तान्हें। पाजिलें जीवन कोठें त्यासी॥ ५१॥ तारामती शोक करी त्या वनांत। आले अकस्मात विश्वामित्र॥ ५२॥ कोणाची तूं कांता फिरसी या वनीं। बोले त्यालागूनी तारामती॥ ५३॥ भ्रतार हरिश्चंद्र रोहिदास बाळ। चुकले भूपा वनामाजीं॥ ५४॥ येरु बोले दोघे नेले आहाळोनी। प्रेतें तिसी दोन्ही दाखविलीं॥ ५५॥ पाहूनियां प्रेतें पिटीलें वदन। आक्रोशें रुदन करी तेव्हां॥ ५६॥ कां हो स्वामी मज सांडियेलें येथें। धरियला पंथ वैकुंठींचा॥ ५७॥ रोहिदास बाळ सांगातें घेऊनि। मजला कां वनीं सांडियेलें॥ ५८॥ सुकुमार शरीर पंथीं झाले क्लेश। म्हणोनी उदास झाला तुम्ही॥ ५९॥ तशामध्यें तुम्हां साह्य झाला अग्नि। माझें कां स्मरण विसरलां॥ ६०॥ सवें असे बाळ हळू चाला पंथ। येतें मी धांवत मागें आतां॥ ६१॥ रोहिदास बाळ घेतला ओसंगा। कांहो पांडुरंगा ऐसें केलें॥ ६२॥ कांहो चुकविलें माझिया पाडसा। पाहूं राजहंसा कोठें आतां॥ ६३॥ तृषाक्रांत झालें होतें माझें तान्हें। मिळालें जीवन नाहीं त्यासी॥ ६४॥ पतिपुत्र दोघे गेले निजधामा। भेट मेघश्यामा करीं माझी॥ ६५॥ वनीं ऐसा शोक करी तारामती। गेला तो गभस्ती अस्तमाना॥ ६६॥ विश्वामित्र म्हणे ऐकें आतां बाई। होणार तें कांहीं न चुकेची॥ ६७॥ देईं यांसी अग्नी झालीसे यामिनी। भय या काननीं श्वापदांचें॥ ६८॥ बोले तारामती ऐका तुम्ही ताता। पतिसवें आतां अग्नि द्यावा॥ ६९॥ येरु म्हणे तुझा पति आहे ऋणी। ऐकिलें श्रवणीं आम्हीं ऐसें॥ ७०॥ पतीचें जें ऋण फेडी पतिव्रता। गोष्ट हे अनंता मानता हे॥ ७१॥ बोले तारामती ऋणी तिघेजण मागुती हें येणें जन्मलागीं॥ ७२॥ ताता तुम्ही आतां अग्नि द्यावा त्वरें। करुनी अव्हेर गेला तेव्हां॥ ७३॥ दोन प्रहर रात्र झालीसे यामिनी। व्याघ्र हा होउनी आला तेथें॥ ७४॥ ओढी रोहिदासा करुनी गर्जना। आली ते मूर्च्छना सतीलागीं॥ ७५॥ गेली ती यामिनी अरुणोदय झाला। अकस्मात आला हरिश्चंद्र॥ ७६॥ सवे असे त्याच्या रोहिदास बाळ। भेटला वेल्हाळ मातेलागीं॥ ७७॥ तिघांसही तेव्हां झालें समाधान। वसिष्ठ चरण आठविती॥ ७८॥ एकामागें एक चालताती पंथ। देखियलें तेथें अन्नछत्र॥ ७९॥ रम्य स्थळ जागा अपूर्व ते फार।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

सुगंध तरुवर डोलताती ॥ ८० ॥ विश्वामित्रें तेथें केलेंसें निर्वाण। होताती भोजन ब्राह्मणांचें ॥ ८१ ॥ त्याची पंथें जाण राजा हरिश्चंद्र। येऊनियां विप्र बोले त्यासी ॥ ८२ ॥ चला महाराज माझ्या आश्रमासी। करा भोजनासी आवडीनें ॥ ८३ ॥ राजा म्हणे नव्हे आमुचा हा धर्म। नका करूं श्रम तुम्ही आतां ॥ ८४ ॥ वंदुनी चरण पुढें चाले पंथ। आली अकस्मात तारामती ॥ ८५ ॥ विश्वामित्रें तेथें केलेंसे विचित्र। मायेचा हरिश्चंद्र निर्मियेला ॥ ८६ ॥ आणिक प्रकारें विलास भोगीत। असे हर्षयुक्त आनंदानें ॥ ८७ ॥ येऊनियां विप्र बोले सतीलागीं। चला बाई वेगीं आश्रमासी ॥ ८८ ॥ अन्नोदक सेवीं रुचेल हें तूतें। असे तुझा कांत तेथें बाई ॥ ८९ ॥ बोलाविती तुज पाहे विलोकुनी। देखे त्या नयनीं तारामती ॥ ९० ॥ स्मरूनियां तेव्हां वसिष्ठचरणा। कां गा नारायणा ऐसें केले ॥ ९१ ॥ पूर्वेचा हा सूर्य पश्चिमे उगवेल। समुद्र सांडील मर्यादेसी ॥ ९२ ॥ ऐसेंही घडेल कळेल कोणकाळें। परी सत्त्वासी न ढळे हरिश्चंद्र ॥ ९३ ॥ दीपक हा कैसा अंधारीं पडला। वायुसुत भ्याला भूतालागीं ॥ ९४ ॥ ऐसें सांगा कोठें झालें विपरीत। तैसा नव्हे सुत शिबीचा हा ॥ ९५ ॥ तैसा हरिश्चंद्र नोहे हा निश्चित। चाले पुढें पंथ तारामती ॥ ९६ ॥ ताता तुम्ही आतां नका करूं श्रम। नोहे ऐसा धर्म आमुचा हा ॥ ९७ ॥ रोहिदास बाळ आला तयेवेळीं। ऋषि त्या जवळी पातलासे ॥ ९८ ॥ हातीं घेऊनियां उदकाची झारी। प्राशन तूं करीं बाळा आतां ॥ ९९ ॥ तुझी मातापिता असे अन्नछत्रीं। बोलाविती नेत्रीं पाहें आतां ॥ १०० ॥ पाहूनियां त्यानें विस्मय तो केला। अगस्ती ग्रासिला समुद्रानें ॥ १ ॥ ऐसें कोठें नाहीं झालें विपरीत। दोघेंहि निश्चित नोहेती हे ॥ २ ॥ आमुचा हा धर्म नोहे ऐसा स्वामी। कृपा आतां तुम्ही आसों द्यावी ॥ ३ ॥ विस्मय तो ऋषि करितो मनांत। नाहीं सिद्धि जात पण माझा ॥ ४ ॥ मार्ग हा क्रमितां तिघां भेट झाली। वार्ता सांगितली एकमेकां ॥ ५ ॥ हरिश्चंद्रा बोले नेणें मी हें कांहीं। लक्ष असे पायीं वसिष्ठच्या ॥ ६ ॥ पुढें देखियेलें वोस तें नगर। असे भयंकर पिशाच्च तें ॥ ७ ॥ तेथें स्मरूनियां वसिष्ठ चरण। ध्यानीं नारायण आठविती ॥ ८ ॥ पुढें देखियली नगर वाराणसी। वंद्य सर्वांसी ते देवादिकां ॥ ९ ॥ भूमीवरी शिवें आणिलें कैलास। करिताती वास पुण्यप्राणी ॥ १० ॥ काळबहिरवाची तेथें कोतवाली। भय नाहीं बोली यमाची ते ॥ ११ ॥ पवित्र हे वाहे भागिरथीचें जल। हरती सकळ दोष सर्व ॥ १२ ॥ देखोनि हरिश्चंद्रे केला नमस्कार। पोहोंचले तें तीर भागिरथीचें ॥ १३ ॥ तिघांजणीं तेव्हां केलें तेथे स्नान। आला तो ब्राह्मण तेचि वेळां ॥ १४ ॥ धुंडितांनां तुम्हां मोठा झाला श्रम। कासयासी धर्म केला ऐसा ॥ १५ ॥ हरिश्चंद्रे केलें त्यासी दंडवत। असावें सांगात स्वामी आतां ॥ १६ ॥ तिघांजणीं माथां बांधोनियां तृण। बैसलीं जाऊन हाटवटीं ॥ १७ ॥ पाहती सकळ नगरींचे लोक। अयोध्येचा नृप हरिश्चंद्र ॥ १८ ॥ सुकुमार त्याची कांता तारामती। सगुणही मूर्ति रोहिदास ॥ १९ ॥ ब्राह्मणासी यानें राज्य दिलें दान। राहिलें सुवर्ण याचें कांहीं ॥ २० ॥ म्हणेनियां उभीं केलीं हीं बाजारीं। प्रारब्धाची दोरी पाहें कैसी ॥ २१ ॥ विकावया आणिली लावण्य वनिता। समजली वार्ता वेश्येलागीं ॥ २२ ॥ येऊनि ब्राह्मणा पुसे तिचें मोल। सुवर्ण एक तुळ घेऊं इचें ॥ २३ ॥ मानली हे गोष्टी वेश्येचिया चित्ता। घेतली हे आतां तारामती ॥ २४ ॥ चाल बाई आतां माझिये सदनीं। होशील स्वामिनी तूं ॥ २५ ॥ आवडे तितुके लेईं अलंकार। विलास समग्र भोगीं आतां ॥ २६ ॥ देखूनि लावण्य आतां तुझें रूप। वश्य होईल भूप नगरीचा ॥ २७ ॥ हरलें हें दैन्य आतां तुझें बाई। नाहीं तुज कांहीं भय चिंता ॥ २८ ॥ ऐकोनियां शब्द तेव्हां तारामती। येती काकुळती विप्रालागीं ॥ २९ ॥ नका इसी देऊं मज महाराजा। नोहे धर्म माझा ऐसा ताता ॥ ३० ॥ तथापिही तुम्हीं दिलें इचे हातीं। प्राण हा निगुती देईन मी ॥ ३१ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

करा उपकार विकावें आणिका। तुम्ही मायबापा कृपावंता॥ ३२॥ वेश्येचें हें द्रव्य दिलें तें माघारें। आला एक विप्र घ्यावयासी॥ ३३॥ दशग्रंथीं निपुण षडशास्त्रीं प्रवीण। धर्मपरायण महाराज॥ ३४॥ काळ हें कौशिक नाम तयाप्रती। त्यानें तारामती घेतली है॥ ३५॥ पाकशाळेमाजीं करावया अन्न। घेतली अन्नपूर्णा ब्राह्मणानें॥ ३६॥ धर्माची तूं कन्या माझिये तूं बाई। सुखें आतां राहीं अन्नछत्रीं॥ ३७॥ तारामती करी दोघां नमस्कार। कृपा दिनावर असों द्यावी॥ ३८॥ विलोकिलें तेव्हां नृपाचें वदन। कधीं हे चरण पाहीन आतां॥ ३९॥ मुक्ताफळ झालें समुद्राचे पोटीं। परी झाली तुटी प्राक्तनानें॥ ४०॥ विचित्र हा असे प्रारब्धाचा खेळ। काय तळमळ करूनियां॥ ४१॥ येतें स्वामी आतां कृपा असों द्यावी। सांड न करावी पुन्हां माझी॥ ४२॥ दीपक प्रकाश नोहे हा वेगळा। तैसी मी दयाळ जडलें अंगीं॥ ४३॥ हेंचि जन्मोजन्मीं दे गा चक्रपाणि। चालिली तेथूनि तारामती॥ ४४॥ रोहिदास बाळ धांवे तिचे मागें। आवरीत अंगें राजा त्यासी॥ ४५॥ घेऊनियां येतों मातेंचें दरूशन। विलोकी वदन तारामती॥ ४६॥ प्रेमपान्हा तेव्हां आला तिचे स्तनीं। पाजी त्यालागुनीं बैसूनियां॥ ४७॥ पाहुनी सर्वांचें सद्गद अंतर। बोलतां उत्तर नये वाचें॥ ४८॥ नको करूं देवा मायबाळा तुटी। पाहावेना दृष्टी कोणासी हें॥ ४९॥ काळ कोशिकासी बोले तारामती। ऐकावी विनंति एक ताता॥ ५०॥ घ्यावा रोहिदास करील हा सेवा। तुम्ही कृपार्णवा महाराज॥ ५१॥ ऐकोनियां ऐसें विप्रासी तो बोले। काय याचें मोल सांगा स्वामी॥ ५२॥ अर्ध तुक हेम घेऊं येचि क्षणीं। दिलें त्यालागुनी कौशिकानें॥ ५३॥ तारामती आणि रोहिदास बाळ। घेउनी दयाळ गेला तेव्हा॥ ५४॥ हाटवटीं उभा असे हरिश्चंद्र। आला तो महार वीरबाहू॥ ५५॥ ब्राह्मणासी पुसे काय याचें मोल। हेम दोन मोल घेऊं याचें॥ ५६॥ मानली हे गोष्टी डोंबाचिया चित्ता। घेतला हा आतां हरिश्चंद्र॥ ५७॥ विप्राचे चरणीं नृप ठेवी माथां। कृपा दयावंता असों द्यावी॥ ५८॥ घेउनी हरिश्चंद्र गेला आश्रमासी। सांगतो कांतेसी वीरबाहु॥ ५९॥ सांगा यासी काम आणिला चाकर। पाहूनि उत्तर करी कांता॥ ६०॥ कृश सुकुमार आणिला कासया। काय द्रव्य वांयां जात होतें॥ ६१॥ सांगती त्या काम डोंबाच्या कामिनी। जाय आणी पाणी हरिश्चंद्र॥ ६२॥ त्वरें करूनियां भरी हे रांजण। दिला उचलुनी कुंभ हातां॥ ६३॥ जळ आणावया गेला हरिश्चंद्र। मागें विश्वामित्रें काय केलें॥ ६४॥ छिद्र पाडियेलें रांजणाचे तळीं। कुंभ तयेवेळीं फटिन्नला॥ ६५॥ ताडण करिती डोंबाच्या कामिनी। दिला उचलोनी दुजा कुंभ॥ ६६॥ दोन प्रहर त्यानें वाहिलें उदक। नसे एक थेंब रांजणांत॥ ६७॥ वीरबाहूनें त्या केलेंसे ताडण। दिलें तेव्हां धान्य कोरडें तें॥ ६८॥ दळूं कांडूं लागे करी सर्व धंदा। ध्यानीं त्या गोविंदा आठवीत॥ ६९॥ भागिरथीचे तीरीं करीं स्वयंपाक। आला तेव्हां एक विप्र तेथें॥ ७०॥ घालीं महाराजा मज आतां अन्न। बैसला येऊन त्याजपाशीं॥ ७१॥ हरिश्चंद्रें त्यासी केला नमस्कार। वैसा क्षणभर स्वामी येथें॥ ७२॥ हरिश्चंद्रें केले दोन भाग अन्न। ब्राह्मणाकारणें दिला एक॥ ७३॥ खाऊनियां अन्न पाहे दुजाकडे। ठेवी तयापुढें हरिश्चंद्र॥ ७४॥ नित्यानित्य तेथें जेवीतसे विप्र। घडे निराहार हरिश्चंद्रा॥ ७५॥ शरीर झालें कृश अंगीं नसे शक्ति। तयासि बोलती वीरबाहू॥ ७६॥ स्मशानीं रक्षण करीं तूं हें आतां। अवश्य म्हणे ताता हरिश्चंद्रा॥ ७७॥ म्हसणखांबा नाम ठेविलें तयासी। राहे दिवसनिशीं स्मशानीं तो॥ ७८॥ द्रव्यावांचोनियां जाळों न देईं प्रेत। अहोरात्र ध्यात देवाजीशीं॥ ७९॥ काळकौशिकाचे घरीं तारामती। वाढीतसे पंक्ति ब्राह्मणांच्या॥ ८०॥ उत्तम स्वादिष्ट पवित्र तें अन्न। जेविती ब्राह्मण आवडी प्रेमें॥ ८१॥ रोहिदास करी कौशिकाची सेवा। तुळसी पुष्पें दुर्वा आणितसे॥ ८२॥ फुलें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तोडितसे रोहिदास बाळ। दंश केला व्याळें त्याजलागीं॥ ८३ ॥ सांगातीयांस तेव्हां बोले रोहिदास। सांगावा मातेस नमस्कार॥ ८४॥ नाशिवंत देह गेलासे विलया। नको शोक वांयां करूं याचा॥ ८५॥ वारंवार तिच्या संबोखावें मना। तुम्हांसी प्रार्थना। हेचि माझी॥ ८६ ॥ ऐकोनि सांगाती करिती रुदन। सोडियेला प्राण रोहिदासें॥ ८७॥ पाकशाळेमाजीं होती त्याची माता। श्रुत केली वार्ता सांगात्यांनीं॥ ८८ ॥ ऐकोनियां ऐसें चिंतावली मनीं। कांहो चक्रपाणि ऐसें केलें॥ ८९ ॥ आटोपोनि सर्व तेथील हा धंदा। निघाली ती शोधा बाळकाच्या॥ ९०॥ झालीसे यामिनी कांहीं न दिसे वाट। मोडताती कांटे पायांलागीं॥ ९१॥ नाहीं त्याची शुद्ध चालली धांवतां। लागलें तें प्रेत पायां तिच्या॥ ९२ ॥ ओळखूनि तिनें पिटिलें कपाळ। आलिंगिला बाळ हृदयीं तिनें॥ ९३ ॥ दर्दरुनी तिचे स्तनीं आला पान्हा। पाजूं आतां कोणा रोहिदासा॥ ९४॥ सखया रोहिदासा कां बा रुसलासी। टाकूनि गेलासि मजलागीं॥ ९५॥ पहात मी होतें नित्य तुझें मुख। विसरलें दुःख भ्रताराचें॥ ९६॥ घड़ी घड़ी माझा हरिसी तूं श्रम। फुटकें हें कर्म माझें देवा॥ ९७॥ काय घडले दोष कीं दैवाची मी हीन। हरपलीं रत्नें दोन माझीं॥ ९८॥ कंठूं आतां काळ कवणाचिये बळें। जाहलें हें निर्मूळ वंशाचें की॥ ९९ ॥ आक्रोशें करून हृदय पिटित। आले अकस्मात विश्वामित्र॥ २००॥ सांगा बाई कैसें झालें वर्तमान। केलें हें श्रवण त्याजलागीं॥ १॥ नको करूं बाई शोक कांहीं आतां। समजेल ही वार्ता आतां डोंबा॥ २॥ द्रव्याविण तो हा जाळों नेदी प्रेत। नको करूं मात प्रगट ही॥ ३॥ आणितों साहित्य अग्नि दे झकडकरी। आली तेव्हां तिरीं भागिरथीच्या॥ ४॥ पेटवूनि अग्नि करी ते रुदन। आला तो धांवून म्हसणखांब॥ ५॥ न देतांना द्रव्य जाळिसी तूं प्रेत। मारीतसे हातें तिजलागीं॥ ६॥ विखरूनी त्यानें दिला तेव्हां अग्नि। घालूनि जीवन विझावला॥ ७॥ प्रेत घेऊनियां रडे तारामती। प्रारब्धाची गती कैसी देवा॥ ८॥ सत्त्वाचा सागर राजा हरिश्चंद्र। त्याचा कीं हा पुत्र रोहिदास॥ ९॥ अंतकाळीं यास ठाव अग्नि नेदी। स्पर्शला येऊन अनामिक॥ १०॥ काय ऐसें कर्मी लिहिलें विधीनें। झाल्या तिघां तीन वाटा देवा॥ ११॥ भ्रतार हरिश्चंद्र गेला कोणीकडे। दुःख कोणापुढें सांगूं आतां॥ १२॥ ऐकोनी हरिश्चंद्र खोंचला तो मनीं। आला तो धांवुनी तिजपाशीं॥ १३॥ सांगे वर्तमान बोले गहिवरून। करी निवेदन तारामती॥ १४॥ सांगितला त्यासी सकळ वृत्तांत। हृदय पिटीत हरिश्चंद्र॥ १५॥ येरी म्हणे कोण सांग तूं हें आतां। श्रुत केली वार्ता मुळींहुनी॥ १६॥ तुम्हां दोघां दिलें कौशिकाचे घरीं। दास्यत्व मी करीं डोंबाचें हे॥ १७॥ म्हसणखांबा नांव ठेविलें हें त्यानें। करितों रक्षण म्हसणामाजीं॥ १८॥ अद्याप सेविलें नाहीं म्यां हें अन्न। शरीर कृश तेणें झालें माझें॥ १९॥ ऐकोनियां दुःखें पडली विकळ। घेतला बाळ हरिश्चंद्रें॥ २०॥ सख्या रोहिदासा कां बा रुसलासी। टाकूनि गेलासी मजलागीं॥ २१॥ मजपाशीं तुझें गुंतलेंसें मन। म्हणुनी धांवून आलासी तूं॥ २२॥ अंतकाळीं केल्या तिघांसही भेटी। दैवाची करंटी आम्ही दोघें॥ २३॥ कैसें झालें माझें हृदय पाषाण। दिलें म्यां लोटून तुजलागीं॥ २४॥ जळोत हे हात जावो माझा प्राण। व्यर्थ हा वांचून काय आतां॥ २५॥ आक्रोशें करुनी हृदय पिटीत। त्यासी संबोखीत तारामती॥ २६॥ नका स्वामी शोक करूं कांहीं आतां। होतें जें संचिता झालें माझें॥ २७॥ धन्यापाशीं आतां आज्ञा घ्या मागून। द्यावयासी अग्नि महाराजा॥ २८॥ आज्ञा मागावया गेला हरिश्चंद्र। मागें विश्वामित्र काय करी॥ २९॥ एकली तूं येथें लावीचें हें भय। देऊळांत राहे क्षणभरी॥ ३०॥ ऐकोनि देउळीं गेली तारामती। निद्रा तयेप्रती लागलीसे॥ ३१॥ विश्वामित्र तेव्हां आले देउळांत। काढोनियां आर्त बाळकाची॥ ३२॥ रक्त मांस

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तिच्या लाविलें मुखासी। सांगत लोकांसि लाव आली ॥ ३३ ॥ बाळ भक्षितसे देउळाभीतरीं। देखोनियां दुरी पळालों मी ॥ ३४ ॥ धीट धीट लोक आंत प्रवेशोनि। बांधिलें ते क्षणीं तारामती ॥ ३५ ॥ श्रुत केली वार्ता गांवींच्या राजाला। तो म्हणे लावेला जीवें मारा ॥ ३६ ॥ बोलाविला त्यानें वीरबाहू डोंब। सांगतसे अंगें राजा त्यासी ॥ ३७ ॥ चालविली तेव्हां भागिरथीचे तीरीं। पाहती नरनारी दृष्टी तेव्हां ॥ ३८ ॥ काळकौशिकाचे घरीं हे देखियेली। नाहीं समजली तेव्हां कोणा ॥ ३९ ॥ एकमेकां ऐसें करिती उत्तर। आला तो महार वीरबाहू ॥ ४० ॥ म्हसणखांबा त्यानें बोलाविला त्वरें। छेदी इचें शिर आज्ञा केली ॥ ४१ ॥ ओळखिली त्यानें तेव्हां तारामती। प्रारब्धाची गति कैसी देवा ॥ ४२ ॥ घालियेलें तिसी भागिरथीचें स्नान। करीं तूं स्मरण देवाजीचें ॥ ४३ ॥ काय इच्छा असेल माग तुझे मनीं। पुरवील चक्रपाणि तुझी आशा ॥ ४४ ॥ स्वर्गी सुरवर वैसोनि विमानीं। पाहती नयनीं कवतुक ॥ ४५ ॥ भ्रतार हरिश्चंद्र रोहिदास बाळ। मागता स्नेहाळ विश्वामित्र ॥ ४६ ॥ श्रीगुरु वसिष्ठ कृपेचा सागर। असो त्याचा कर मस्तकीं हा ॥ ४७ ॥ हेंचि जन्मोजन्मीं दे गा नारायणा। नाहीं हे वासना आणिकांची ॥ ४८ ॥ तारामती म्हणे एक्या घायें हाणीं। लक्ष हे चरणीं वसिष्ठांच्या ॥ ४९ ॥ उचलितां कर आले नारायण। धरी आलिंगून हरिश्चंद्रा ॥ ५० ॥ पितांबरधारी सगुण मेघश्याम। योग्याचा विश्राम तोचि बाप ॥ ५१ ॥ त्यानें कृपादृष्टि विलोकिलें तिघां। पुढें असे उभा रोहिदास ॥ ५२ ॥ विश्वामित्र तेव्हां संतोषले चित्तीं। आलिंगिलें प्रीतिं तिघांजणां ॥ ५३ ॥ पुष्पवृष्टी केली स्वर्गी सुरवरांनीं। धन्य त्रिभुवनीं कीर्ति ज्याची ॥ ५४ ॥ श्रीगुरु वसिष्ठ आले तयेवेळां। सवे असे मेळा ऋषींचा तो ॥ ५५ ॥ त्यानें आलिंगिलें तिघां कृपादृष्टि। धेनुवत्सा भेटी झाली जैसी ॥ ५६ ॥ तिघांजणीं केला तेव्हां नमस्कार। प्रेम अश्रु नीर वाहे डोळां ॥ ५७ ॥ हृदयीं धरुनी आलिंगिली त्यानें। मायबाळ तान्हें न विसंबे ॥ ५८ ॥ काळ तो कौशिक वीरबाहू डोंब। विमानीं श्रीरंगें बैसविलें ॥ ५९ ॥ कोटि वरुषें तप विश्वामित्रें केलें। तें समग्र अर्पिलें हरिश्चंद्रा ॥ ६० ॥ समारंभें नेलीं अयोध्येसी तिघें। बैसविलीं अंगें राज्यास्थानीं ॥ ६१ ॥ साठ सहस्र वरुषें राज्य करा सुखें। दिला हा स्वमुखें आशिर्वाद ॥ ६२ ॥ सत्त्वधीर राजा सत्त्वाच्या ह्या कीर्ति। ऐकतांचि जाती दोष भंगा ॥ ६३ ॥ नामदेव यासी लागली ती गोडी। वर्णितो आवडी गुण त्यांचे ॥ ६४ ॥

श्रीयाळ चरित्र.

२२५७. सूर्यवंशीं राजा असे तो श्रीयाळ। पंच वरुषीं बाळ चिलिया त्यासी ॥ १ ॥ पतिव्रता कांता नाम ते चांगुणा। अतिथी भोजन घाली नित्य ॥ २ ॥ कैलासीं नारद वर्णी यांची कीर्ति। सत्त्व पाह्याप्रती आले शिव ॥ ३ ॥ जाहलासे अतिथरूप तें कुश्चल। रक्त पू हा गळे सर्वांगासी ॥ ४ ॥ आला तो अतिथ श्रीयाळाचे घरीं। नमस्कार करी राजा त्यासी ॥ ५ ॥ येऊनि चांगुणा वंदिती चरण। बहुत सन्मान केला त्याचा ॥ ६ ॥ उष्णोदकें त्यासी घालियलें स्नान। केलेंसें पूजन अतिथीचें ॥ ७ ॥ म्हणे महाराजा करावें भोजन। पतीता पावन करा तुम्ही ॥ ८ ॥ येरु म्हणे माझें शरीर हें रोगी। नरमांस वेगीं देईं मज ॥ ९ ॥ चांगुणा ती म्हणे देतें माझें मांस। नये उपयोगास आमूचिया ॥ १० ॥ राजा म्हणे माझें मांस मान्य करा। न लगे उदारा तुझें मज ॥ ११ ॥ पंच वरुषीं बाळ तुझा हा चिल्हाळ। मांस हें सकळ देईं त्याचें ॥ १२ ॥ पाक हा करुनी घालीं मज आतां। खेद काय चिंता करूं नये ॥ १३ ॥ करितां हा खेद जाईन उठोनी। सत्त्वांची हे हानी करूनियां ॥ १४ ॥ तेव्हां ते चांगुणा म्हणे अतिथीतें। करितें पाकातें सिद्ध आतां ॥ १५ ॥ बोलविला तेव्हां तिनें तो चिल्हाळ। वचन कोमल बोले त्यासी ॥ १६ ॥ तुज हा अतिथ आलासे पाहून। मागती भोजन तुजलागीं ॥ १७ ॥ होईं बा उदार अर्पी हें शरीर। संतोषला वर पार्वतीचा ॥ १८ ॥ ऐकोनी चिलिया

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बोले मातेप्रती। संतोष हा चित्तीं माझे असे॥ १९॥ नाशवंत देह नाहीं राहणार। सार्थक समग्र करीं याचें॥ २०॥ सांडीं हे ममता होईं तूं उदार। कैलासीं शंकर संतोषेल॥ २१॥ घेऊनि चिलिया गेली पाकशाळे। कापियेलें बाळ चांगुणेनें॥ २२॥ शीर त्याचें तेव्हां ठेविलें झांकोन। शरीराचा तिनें पाक केला॥ २३॥ तेव्हां तो अतिथ बोले चांगुणेसी। वस्तु हे कार्याची ठेवियेली॥ २४॥ मीही आतां जातों आपुल्या आश्रमा। कासयासी श्रम करितेसी॥ २५॥ तुज हे ममता झालीसे उत्पन्न। वाहतसे आण चांगुणा ते॥ २६॥ म्हणे महाराजा सांगाल तें मान्य। वंदित चरण चांगुणा ते॥ २७॥ पाकामाजी घालीं शीर हें कांडोनी। रसिक गाय गाणीं आवडीनें॥ २८॥ चांगुणेनें शीर घातिलें उखळीं। ओव्या ते वेल्हाळी गात असे॥ २९॥ सत्त्वधीर राजा स्वामी हा श्रीयाळ। धन्य त्याचा बाळ चिलया तूं॥ ३०॥ अतिथीच्या वेशें आला असे शिव। देखोनियां भाव दृढ तुझा॥ ३१॥ आवडीनें तुज ठेवितों उदरीं। पुण्याची सामोग्री मोठी तुझी॥ ३२॥ माझे पोटीं तुवां घेतला अवतार। दाविलें चरित्र जगामाजीं॥ ३३॥ येऊनि वंशाचा केला त्वां उद्धार। मित्र केला वर पार्वतीचा॥ ३४॥ तुझी माता मज म्हणती हे जन। पूर्वीचें हें पुण्य फळा आलें॥ ३५॥ तुज हा प्रसन्न जाहला सदाशिव। मागसी वैभव देईल तो॥ ३६॥ मज बाळा तुवां सांडियेलें येथें। कैलासीचा पंथ धरीयेला॥ ३७॥ अतिथ गेलीया सांडीन मी प्राण। येईन धांवोन तुजमागें॥ ३८॥ तुझी माझी भेट होईल कैलासीं। सांग शिवापाशीं नमस्कार॥ ३९॥ धैर्याचा उखळ वैराग्य मुसळ। घेतलें सबळ चांगुणेनें॥ ४०॥ कांडूनियां शीर केला पाक तिनें। अतिथाकारणें भोजनासी॥ ४१॥ म्हणे महाराजा करावें भोजन। वंदित चरण चांगुणा ते॥ ४२॥ येरु म्हणे बाई पात्रें वाढी तीन। पंक्ति यजमान बैसा तुम्ही॥ ४३॥ ऐकोनी श्रीयाळ सद्गद अंतरीं। जाला असे भारी मोठा तेव्हां॥ ४४॥ तेव्हां ते चांगुणा म्हणे श्रीयाळासी। बैसावें पंक्तीसी स्वामी आतां॥ ४५॥ नवमास बाळ ठेविला उदरीं। एक दिन भारी काय झाला॥ ४६॥ अतिथा संतोष होय ऐसें करा। मान्य गिरिजावर होईल तो॥ ४७॥ सिद्ध झाली तेव्हां दोघें भोजनासी। अतिथ तयासी पुसतसे॥ ४८॥ काय तुम्हां आतां असे हो संतान। केलें शिवार्पण म्हणती ते॥ ४९॥ निपुत्रिकाचे घरीं न घे मी हें अन्न। चालिला उठोन अतिथ हा॥ ५०॥ श्रीयाळ चांगुणा वंदिती चरण। फुटकें प्राक्तन आमुचेंचि॥ ५१॥ चिलयासारिखा गेला तोही सुत। विन्मुख अतिथ जातो तोही॥ ५२॥ आतां कासयासी ठेवावा हा प्राण। करावा अर्पण शंकरासी॥ ५३॥ ऐकोनियां ऐसें अतिथ तो भ्याला। चांगुणे पुत्राला बाहे आतां॥ ५४॥ येईं बा चिलया धांव तूं त्वरित। न जेवी अतिथ तुजवीण॥ ५५॥ राखीं आतां सत्त्व येईं तूं धांवोनी। तेव्हां शूळपाणि प्रगटले॥ ५६॥ पंचमुख अंगीं विभूत चर्चित। अर्धांगीं शोभत पार्वती ते॥ ५७॥ मुगुटीं जयाचे शोभतसे गंगा। कोण वर्णी शोभा स्वरूपासी॥ ५८॥ धांवतची आला तेव्हां तो चिल्हाळ। आलिंगी स्नेहाळ सांभ त्यासी॥ ५९॥ श्रीयाळ चांगुणा बैसवी विमानीं। बाळ राजस्थानीं स्थापियेला॥ ६०॥ अखंड कैलासीं असे त्यांचा वास। धन्य तेचि दास सांभयाचे॥ ६१॥ नामदेव त्याचे आठवीत गुण। करीत कीर्तन प्रेमभावें॥ ६२॥

प्रल्हाद चरित्र

२२५८. दैत्य राजा थोर महा बळिवंत। जगीं तो विख्यात हिरण्यकश्यप॥ १॥ करूनियां तप तोषवी ब्रह्माया। मागे वर तया दैत्यराव॥ २॥ वरदान मागे नसावा तो मृत्यु। कवणाचे हातु देव सुरां॥ ३॥ गंधर्व मानव सकळांचें भय। नसावें तिळप्राय कवणेकाळीं॥ ४॥ दिवसां ना रात्रीं तिथी हो नक्षत्रीं। अंतरिक्ष क्षितीं मरण नसो॥ ५॥ घरीं राजधानीं चोहटा मंदिरीं। कवणे ते स्थळी मृत्यु नसो॥ ६॥ ऐसा वर मागे दिला ब्रह्मदेवें।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तपाचे स्वभावें तये काळीं॥ ७॥ वर मागूनियां हरियलें पद। देवांसहित इंद्र स्थानभ्रष्ट॥ ८॥ तयेकाळीं देव लपोनियां हरी। स्तविती अंतरीं पाहीं पाहीं॥ ९॥ देवराया आली कृपा ते समयीं। म्हणे सर्व होई काळयोगें॥ १०॥ तयाचे उदरीं भक्तराजराणा। प्रल्हाद सुजाणा होईल तो॥ ११॥ तयासी छळितां पावेल शासन। हाचि भरंवसेन नेम आहे॥ १२॥ नामा म्हणे देवें केलें समाधान। आनंदें निमग्न आले स्थाना॥ १३॥

२२५९. ऐसे हो असतां देव खेळें मेळा। सहित गोपाळा चाल केली॥ १॥ भय तें मानूनी स्त्री पाठवी माहेरा। होता तो उदरा भक्तराज॥ २॥ अकस्मात वाटे नारद भेटला। उपदेश केला दैत्यपत्नी॥ ३॥ हरिमंत्र शुद्ध पडतां श्रवणीं। गर्भस्थ ते क्षणीं स्वहित मानी॥ ४॥ आठवीत नाम हृदयगुंफेंत। कालें तो प्रसुत होता झाला॥ ५॥ आनंदें भरित मेदिनी भरली। राजा मात आली पुत्र झाला॥ ६॥ भिकाऱ्यासी दान सभाग्यें करूनि। संतोषला मनीं दैत्यभूप॥ ७॥ देव होते करीत अनुष्ठान सिद्धी। झाला भक्तनिधी महाराज॥ ८॥ स्वर्गी ध्वज केले उभे देवें सर्व। आनंद वैभव संतोषोनी॥ ९॥ ऐशापरी बाळ पावतां वृद्धीसी। पंच कर्म त्यासी संस्कार॥ १०॥ मग करवी त्याला विद्या अभ्यासाला। गुरु शुक्र झाला सांगावया॥ ११॥ शंडामर्क नामें शिक्षेसी ठेविला। पढूं तो घातला कुमरवर॥ १२॥ समस्त ते बाळ पढती जें कांहीं। गुरूचे ते ठायीं भावयुक्त॥ १३॥ प्रल्हादासी पूर्वी गर्भवास झाला। उपदेश फळला नारदाचा॥ १४॥ त्याचि छंदें गात हरिनाम अंतरीं। वाचेमाजीं हरि आठवीत॥ १५॥ गुरू वैरभाव सांगत हरीचा। न मानी तयाचा उपदेश॥ १६॥ समस्तां बाळकां सांगे हरिनाम। प्रेमें तो आपण वाखाणीतो॥ १७॥ तेणें तीं लेंकुरें हरिरूप जपतांचि। हरिरूप सांची पाहा हो॥ १८॥ गुरु करी चिंता काय रायाप्रती। जाऊनि निगुती सांगों आतां॥ १९॥ आपण तो कांहीं न शिके बोलिले। समस्त लेंकुरे नाशियेलीं॥ २०॥ जाऊनि हे मात रायासी निवेदी। कोप करूनि आधीं राजा बोले॥ २१॥ मग म्हणे आणा अधमासी येथें। गुरुराज पंथे नेत जात॥ २२॥ नाहीं कांही भय चिंतनीं हरीचे। आनंद करीत साचें चालिला तो॥ २३॥ नामा म्हणे ऐसा भक्तराज बळी। स्मरे वनमाळी हृदयांत॥ २४॥

२२६०. घेऊनियां गुरु आले राजसभे। वंदूनियां उभे सन्मुख तो॥ १॥ म्हणे काय पढसी तूं सांग। म्हणे लागवेगें हरीहरी॥ २॥ ऐकतां वचन बोले क्रोधावोनि। पापीयासी झणी नको येथें॥ ३॥ माझा जो वैरी तया आठवितो। कुळघात हेतो ऐशानेंचि॥ ४॥ म्हणूनि समुद्रीं नेऊनियां टाका। अग्नींत लोटा कां दुराचारी॥ ५॥ शस्त्रघाव वरी माररे अधम। काळाग्नीतें सम विष पाजा॥ ६॥ पर्वतावरी नेऊनियां टाका। प्राण याचा घ्या कां अवघे दूत॥ ७॥ राजआज्ञा होतां संकोचित दूत। राजा बोले त्यातें काय पाहतां॥ ८॥ दूतीं राजाज्ञेनें धरूनि हो नेतां। मुखीं त्या अनंता आठवितो॥ ९॥ तयेकाळीं भक्त उभा निर्भय चित्त। काय हो करीत हरि माझा॥ १०॥ नेऊनियां तिरा समुद्राचे पाही। म्हणती आतांही ऐक बापा॥ ११॥ येरु म्हणे हरि असे नारायण। तो मजलागून तारील हो॥ १२॥ टाकितां उदकीं वरतीच राहे। म्हणती हा पाहें पोहतसे॥ १३॥ तेथूनि काढितां अग्नींत टाकीला। शीतळ हो झाला अग्नीस्पर्शें॥ १४॥ हरिदास काय शक्ति हो जाळाया। म्हणोनियां पायां वंदितसे॥ १५॥ मुखीं हरिहरि उच्चार नामाचा। गर्जे भक्त साचा सर्वांठायीं॥ १६॥ अग्नि तो शीतळ होतां मात राया। म्हणे जादु केली या दुर्जनानें॥ १७॥ विष हळाहळ करूनियां वाटी। नेऊनियां होटीं लाविताती॥ १८॥ भोक्ता नारायण म्हणोनियां प्याला। अमृत तो झाला प्रल्हादासी॥ १९॥ पर्वत शिखरीं बैसऊनि खालें। लोटितां हो बोले सर्व सत्ता॥ २०॥ जळीं स्थलीं व्यापी आहे नारायण।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तेथें काय होणें भय दुःख ॥ २१ ॥ पडतांचि खालीं उठोनियां उभा। पाहतां हो सभा भय दुःख मानी ॥ २२ ॥ म्हणे मारायाला शास्त्रघाय वरी। धांवोनियां चिरी महाबळें ॥ २३ ॥ हाणितां शस्त्रानें न लागती कांही। मुखीं हरि पाही आठवीत ॥ २४ ॥ म्हणे गजपायीं बांधोनियां मारा। कुंजर ते आणा बोले राजा ॥ २५ ॥ आणोनियां हत्ती घातील हो वर। पाहे तो समोर विक्राळ सिंह ॥ २६ ॥ दाहि दिगंतर उल्लंघुनी गेले। उपाय न चाले कांहीं त्यासी ॥ २७ ॥ श्रमयुक्त झाला राजा कांहीं केल्या। भक्त राजा भला न ढळेचि ॥ २८ ॥ नामा म्हणे भक्त निर्भय सर्वांसी। काय हो तयासी उपेक्षी हरी ॥ २९ ॥

२२६१. आघात न चले आणवी जवळी। म्हणे कोण बळी साह्यकर्ता ॥ १ ॥ कोठें रहातो कैसा कोण सांग। येरु म्हणे वेग नाहीं कोठें ॥ २ ॥ सर्वांठायीं आहे व्यापुनी सगळा। नाहीं तो निराळा कोठें पाहतां ॥ ३ ॥ जळीं काष्ठीं आहे माझें अंतरंग। सखा पांडुरंग मायबाप ॥ ४ ॥ ऐकतांचि बोले राजा कोपावत। म्हणे तो निश्चीत काष्ठीं आहे ॥ ५ ॥ सभास्तंभीं आहे संदेह तो काय। ऐकतां स्वयंमेव उठीयला ॥ ६ ॥ काढूनि खड्गासी मारीत स्तंभासी। करीत नादासी हरिरूप ॥ ७ ॥ भक्ताच्या वचना कोरडिया काष्ठीं। सत्य करी गोष्टि नारायण ॥ ८ ॥ महानाद झाला त्रिभुवन भ्याला। गर्भपात झाला स्वर्गलोकीं ॥ ९ ॥ फुटों पाहे अंड बुडों पाहे क्षिती। ऐसी होती गति तये काळीं ॥ १० ॥ स्तंभ तो चिरला नरहरी देखिला। भयाभीत झाला राजा तेव्हां ॥ ११ ॥ परी शूर क्षेत्रीं न टाकी धैर्यासी। घेऊनि खड्गासी धाविन्नला ॥ १२ ॥ धांवोनियां जातां धरिला तात्काळ। चिरीतां ते वेळ मांडीवरी ॥ १३ ॥ नखें घाय केला हृदयीं चिरीला। काढी अंत्रमाळा पोटांतुनी ॥ १४ ॥ रुधिर जिव्हेनें चाटी करी शोष। भय बहु त्रासे उग्ररूपीं ॥ १५ ॥ मानव शरीर सिंहवदन हरी। गुरगुर तो करी देवराव ॥ १६ ॥ अवतार वेळा वैशाख मासीं। चतुर्दशी संधीसी अर्धबिंबी ॥ १७ ॥ दिवा रात्रीं जाणा स्वाती नक्षत्रासी। प्रगटला ज्योतीसी दैत्यहर्ता ॥ १८ ॥ घरीं ना मंदिरीं सभे ना बाहेरीं। उंबरीयावरी मारीयेला ॥ १९ ॥ शास्त्रानें न मरे ऐसा वर होता। म्हणोनि नखें त्याचा अंत केला असे ॥ २० ॥ वर राखोनियां केला वध पाही। दासाची नवाई वाढवीत ॥ २१ ॥ शब्द जो कां झालां प्रगटतां रूप। तेणें अंतराळीं अमूप नाद भरे ॥ २२ ॥ नक्षत्रें पडती भूमीं रिचवती। भयेंचि खालतीं आघात ते ॥ २३ ॥ ब्रह्मादिकां भय त्रास उपजला। धांऊनियां आला दर्शनासी ॥ २४ ॥ सहित देवगण करीत स्तुतीसी। न होय शांतीसी कांही केल्या ॥ २५ ॥ रमा पूर्ण माये आली ते समयीं। तिस मे वैभवीं साहवेना ॥ २६ ॥ तये काळीं देवीं प्रल्हाद प्रार्थिला। सन्मुख तो गेला उग्ररूप ॥ २७ ॥ प्रेत टाकियेलें शांतरूप झाला। प्रल्हाद पावला आनंदातें ॥ २८ ॥ पाहतांचि बाळ वोसंगा घेतला। हातें कुर्वाळिला भक्तराज ॥ २९ ॥ देव सुरराज्यीं बैसऊनि हरी। स्वरूप संहरी उग्रभाव ॥ ३० ॥ राज्यीं बैसविला प्रल्हाद निजभक्त। केली जगीं ख्यात नामा म्हणे ॥ ३१ ॥

२२६२. वर्णावया रूप कांहीं स्फूर्ति देई। नरसिंह तूं होईं साह्यभूत ॥ १ ॥ मुख तें सिंहाचें शरीर मानवाचें। भयंकर देवाचें रूप असे ॥ २ ॥ अनंत भूषणें जडित बाहूंचीं। गळां पदकाची थाटी बहू ॥ ३ ॥ केशर चंदन लावियलें अंगा। अखंड श्रीरंगा देवाजीचे ॥ ४ ॥ नवनीत तुळशीचीं सुगंधित फुलें। माळा गुंफियलें चंपकानें ॥ ५ ॥ कासे पीतांबर जडित सुंदर। कडदोरा अपार शोभिवंत ॥ ६ ॥ तोडर ब्रीदाचा विराजत भारी। आनंदला हरि नामा म्हणे ॥ ७ ॥

२२६३. अज्ञान बाळके तुझा प्रल्हाद धांवा करितां। आणि त्रिभुवन देवता नाभीं रे आतां। माझा प्रल्हादु असे वो केउता। तो कवणें पां

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गांजिला ॥ १ ॥ वदन पसरूनि विक्राळ। झरझरीत झरे लाळ। नेत्र जैसे वडवानळ। शोषु पाहे जलनिधी ॥ २ ॥ संहार झालें नागकुल। भ्याले अष्ट लोकपाळ। स्वर्गी सुटली खळबळ। अमरावती इंद्रासी ॥ ३ ॥ मग दैत्यातें पाचारितु। लोह खणखणा वाजतु। धाकें अंबर गर्जतु। तेणें कपि मेदिनी ॥ ४ ॥ वेटाळूनि चहूं हातीं। विदारिला चपेट घातीं। जैसा रुद्र प्रळयान्तीं। तैसा हरी दिसतसे ॥ ५ ॥ दैत्य न मरे कवणेपरी। मग धरिला जानूवरी। नखें उदर फाडूनि सत्वरीं। अस्थिचूर्ण केलिया ॥ ६ ॥ भोजें नाचत देवता। मुक्ति झाली दैत्यनाथा। नामया स्वामी वरदहस्ता। अभयदाता भक्तांसी ॥ ७ ॥

ध्रुवचरित्र

२२६४. राजयासी सर्व वृत्तांत ठाउका। असोनी बाळका पाहीना तो ॥ १ ॥ कामीक जगासी कामचि आवडे। स्त्रीमोहानें वेडे झाले बहु ॥ २ ॥ रावणानें वेदां ऋचा पदें केलीं। सीतेलागीं आली भ्रांति कैसी ॥ ३ ॥ पाराशरा ऐसा दासिसी शयन। हें नव्हे बोलणें अश्चार्याचें ॥ ४ ॥ विश्वामित्र झाला रंभेपाठीं श्वान। सांडोनि अभिमान तपाचाहि ॥ ५ ॥ नामा म्हणे कोण तयासी टाळील। प्रारब्ध करील तेचि खरें ॥ ६ ॥

२२६५. पतीव्रता मोठी सुमती सुंदरी। वाचे न उच्चारी गुणदोष ॥ १ ॥ संचित क्रियामाण बाहोनियां सकळ। प्रारब्ध केवळ सारीतसे ॥ २ ॥ गातें हरिनाम अखंड अंतरीं। प्राणेश्वरावरी भाव निका ॥ ३ ॥ बाळकाची कळा ठाउकी तियेसी। जीवें प्राण पोसी निरंतर ॥ ४ ॥ नामा म्हणे काळ कल्याणाचा तिला। म्हणोनि जाहला हरिभक्त ॥ ५ ॥

२२६६. लागलें वरुष पांचवें बाळासी। खेळे तो मुलांसी नेटेंपाटें ॥ १ ॥ पाहाती ते लोक विस्मय पावती। त्याची अंगकांति कोण वाणी ॥ २ ॥ चंद्रा ऐसें मुख पंकजलोचन। धैर्यासी मंडण तोचि एक ॥ ३ ॥ सांवळा सुकुमार उद्धार गोजिरा। बुद्धीचा अंतरा बोधवीत ॥ ४ ॥ वीर्य धैर्य भाव पाइक जयाचा। नामा म्हणे वाचा वर्णवेना ॥ ५ ॥

२२६७. मातेलागीं पुसे पिता माझा कोण। ते म्हणे वचन ऐक बाळा ॥ १ ॥ क्षिराब्धीपासोनि चंद्रमा कां जैसा। होसी तूंहि तैसा राजपुत्र ॥ २ ॥ तरी कां आम्हां त्यानें टाकिलें निवडोन। संचित ते म्हणे पूर्वकर्म ॥ ३ ॥ जाऊं भेटूं त्याला बोलवू कां मागें। नको बा तुज काय उणें असें ॥ ४ ॥ नामा म्हणे ऐसा दोघांचा संवाद। झाला मनीं खेद सुमतीसी ॥ ५ ॥

२२६८. कोणे एके दिवशीं खेळत खेळत। गेला सभेआंत राजयाच्या ॥ १ ॥ पाहिलें राजानें ओळखिला पुत्र। झळंबलें गात्र आवडीनें ॥ २ ॥ गोजिरा गोमटा शाहाणा चपळ। नेत्र ते विशाळ पुंजाळलें ॥ ३ ॥ नामा म्हणे चंद्र पूर्णिमेचा पाहातें। समुद्रा ये भरते तैसें झालें ॥

२२६९. पाचारिलें ध्रुवा जवळी त्या रायानें। जाणोनि सन्मानें आला पाशीं ॥ १ ॥ संतोष तो कांही बोलवेना वाचें। उदार प्रेमाचें झळंबती ॥ २ ॥ अंकीं बैसवितां कैसा तो शोभला। कोंदण रत्नाला जयापरी ॥ ३ ॥ चुंबोनियां मुख पुसतो मंजुळ। मी कोण तें न कळे तुज कांहीं ॥ ४ ॥ तो म्हणे आहेसी तात तूं निष्ठूर। आम्हांसी बाहेर ठेवियेलें ॥ ५ ॥ राजा म्हणे काय जाहालें तयासी। होसी तूं राज्यासी अधिकारी ॥ ६ ॥ नामा म्हणे ऐसा दोघांचा उद्गार। लोटों आला पूर आनंदाचा ॥ ७ ॥

२२७०. सापत्न माउली होती वोंवरीत। ऐकिला भावार्थ दोघांचाहि ॥ १ ॥ बुद्धीचा कांतर बुद्बुदला मोठा। चावीतसे ओठा खेद बहु ॥ २ ॥ निघूनी ते वेगीं आली रायापाशीं। म्हणे या पोरासी कां घेतलें ॥ ३ ॥ मांडी बैसवीसी लाडानें बोलविसी। पाहूं आतां कैसी लोचनीं मी ॥ ४ ॥ शरीर त्यागावें कीं त्यासी मारावें। हेंचि जीवें भावें वाटे मना ॥ ५ ॥ मागेंपुढें कांहीं न पाहे दृष्टीस। लोटिलें बाळक पायें तिनें ॥ ६ ॥ नामा म्हणे राजा तियेचा अंकिला। झाला चाकाटला आपुल्या ठायीं ॥ ७ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२२७१. बाईल आधीन होती जे कां नर। ते म्हणो पामर श्वानरूपें॥ १ ॥ नेणती स्वहित कामाचिया वृत्ती। प्रवृत्ति निवृत्ति सोडोनियां॥ २ ॥ इष्ट मित्र गुरु ऐसा कैसा भाव। सर्वंहि निर्वाह तेचि एक॥ ३ ॥ नाचविले तिणे तैसे ते नाचती। माकडाच्या गति गारुड्याच्या॥ ४ ॥ नामा म्हणे राजा गुंतला तियेसीं। शेंबुडातें माशी हालूं नेणें॥ ५ ॥

२२७२. उठवितां बाळ आक्रंदलें पोटीं। निघे उठाउठी चमत्कारें॥ १ ॥ आवसेचा शशी तैसा राजा झाला। येरु हा निघाला कळावंत॥ २ ॥ आळवावा तरी धाक बाईलेचा। तेणें त्याची वाचा चाकाटली॥ ३ ॥ हृदय फुटलें प्रेमही दाटलें। तरी काय चाले तियेपुढें॥ ४ ॥ सूर्यासी पडलें निधानासी भूत। तैसी झाली मात राजयासी॥ ५ ॥ नामा म्हणे मोह खोटा हा दुर्धर। त्यागावा निर्धारें वेदांतीच्या॥ ६ ॥

२२७३. चालिलें बाळक रुदन करीत। देखोनी गांवांत हाहाकार॥ १ ॥ पाहा हें रायानें मांडिलें अनुचित। कासया तो भ्रांत झाला नेणों॥ २ ॥ देवोनियां रत्न घेतला चिंचोका। दिला कवडी एक चिंतामणी॥ ३ ॥ कामधेनु नेघे पोशिले बोकड। अस्पदे माकड पाळावया॥ ४ ॥ कल्पतरु मोडी शेता कुंपण करी। तैसी झाली परी आजीची हे॥ ५ ॥ नामा म्हणे तिचा मोह हा दारुण। राजा तो आधीन झाला तैसा॥ ६ ॥

२२७४. घरा येतां बाळ देखिलें मातेनें। दाटली दुःखानें बोलवेना॥ १ ॥ आक्रंदोनी पुढें मोकलोनी धायें। नेणो कैसें काय झालें यासी॥ २ ॥ घालोनियां कव घेतां कडेवरी। दोन्ही नेत्र करीं पुसीतसे॥ ३ ॥ काय झालें बाळा सांग बा वृत्तांत। वा कोण तूंतें पाहों नेणें॥ ४ ॥ नामा म्हणे असो प्रेमा तो अपार। पुढील विचार बोलिजेला॥ ५ ॥

२२७५. न कळतां मुलांसंगें मी खेळत। गेलों सभेआंत राजयाच्या॥ १ ॥ काय सांगों माये जाहला अपमान। तेणें माझें मन दुखावलें॥ २ ॥ माते प्रेमभावें रायें आळविलें। मांडीं बैसविलें सन्मानेशीं॥ ३ ॥ आली अकस्मात दुर्धर कोपोन। लांस कीं ते कोण मी तो नेणें॥ ४ ॥ ताडोनियां पायीं मज उठविलें। निघालों मी सहजें तत्क्षणीं॥ ५ ॥ कोणी नुठवी ऐशा ठायीं म्यां बैसावें। तें कोणा मागावें सांग माये॥ ६ ॥ नामा म्हणे दिसे पाहातां बाळक। ज्ञानाची निष्टंक मुसावलें॥ ७ ॥

२२७६. ऐकोनियां वाणी पातली ते रमा। बोलिली विश्रामा जीवाचिया॥ १ ॥ दुर्जनाचा भाव ऐसाचि वोखटा। दर्प त्याचा मोठा आवरेना॥ २ ॥ दुसऱ्याचें बरें तें कैसें सोशिती। बळें निखंदिती साटोपानें॥ ३ ॥ दीपाचा प्रकाश सोशीना पतंग। जळतांही अंग झेंप घाली॥ ४ ॥ चंद्रोदया आधीं फुटतील डोळे। ते काय कावळे पाहातील चंद्र॥ ५ ॥ आधींच सावत्र संबंधी पापीण। राजाही आधीन जिच्या झाला॥ ६ ॥ सिंहासनीं याच्या मांडीये बैससी। हें ते कैसें सोसी निसंगळ॥ ७ ॥ दैवहीन आम्ही देवचि कोपला। आपुला तो झाला परावा की॥ ८ ॥ देवें द्यावें तेव्हां भोगावें सकळ। न चले कदा बळ दुसऱ्याचें॥ ९ ॥ कासया तूं बाळा स्फुंदसी दुःखानें। देवाहून कोण सखे आम्हां॥ १० ॥ नामा म्हणे हित ऐकतां मायेचें। चित्त त्या बाळाचें उठावलें॥ ११ ॥

२२७७. पूर्वजन्मीं त्यानें साधियेला योग। कांहींसा वियोग झाला होता॥ १ ॥ कैसा नेटेपाटे उन्मेख फुटला। बालपणीं त्याला ज्ञान झालें॥ २ ॥ विरक्ती वोळंगे पाइक होउनी। शांती पुढारुनी माळ घाली॥ ३ ॥ शम दम अंकित पुढारले बळें। योग तो अढळ सदा तेथें॥ ४ ॥ मान गर्व मनाचा खुंटला विचार। थिता अहंकार तोहि गेला॥ ५ ॥ नामा म्हणे बाळ बोलिलें जाणोनी। माउली हांसोनी काय बोले॥ ६ ॥

२२७८. संकल्पाचा मळू नेत्रीं निडारला। त्यालागीं तो डोळा काय दिसे॥ १ ॥ जेथें देखों तेथें तोचि तो कोंदला। विश्वामाजीं भरला विश्वंभर॥ २ ॥ मोठे थोर थोर तापसी नाडिले।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कामानें ओढिले माघौतेची॥ ३॥ वेदाचें पुनीत यज्ञशील सारें। झकवती बारे वास नेणे॥ ४॥ दांभीक मगरीं गिळिलें सर्वांसीही। त्यालागीं तो नाहीं ऐसा भासे॥ ५॥ नामा म्हणे ऐसी बोलली जननी। बाळ मोठा ज्ञानी जाणवला॥ ६॥

२२७९. केला नमस्कार मातेला उठोनी। निघाला तेथुनी लागवेगें॥ १॥ वर्नीं बैसोनियां धरोनी विश्वास। आळवावा ईश ऐसें चित्तीं॥ २॥ हांक मारीत मागें माउली चालली। तियेसवें बोली करीना ते॥ ३॥ एकाकी तो नीट चालीला त्वरेनें। पाहोनियां जन स्वब्ध झाले॥ ४॥ बोलवितां कांहीं बोलेना कोणासी। अघोर स्थळासी प्रवेशला॥ ५॥ मातेसी ठाउकें तयाचें अंतर। म्हणोनी ते स्थिर झाली ठाईं॥ ६॥ नामा म्हणे पूर्व पुण्याचिया बळें। मन त्याचें झालें स्थीर तेथें॥ ७॥

२२८०. नगरीं नरनारी समस्तही। म्हणती झालें कांहीं राजयाला॥ १॥ बाळ तें केवढें धाडीलें वनासी। याचीया धैर्यासी दुजा नाहीं॥ २॥ मागें बहु झालें नाहीं हें देखीलें। हें तों नव्हे भले विचारितां॥ ३॥ सर्वांदिकीं त्यासी सांगितलें वृत्त। कां रे तूं निवांत बैसलासी॥ ४॥ नामा म्हणे राजा ध्रुवापाठीं गेला। काय तो बोलिला ऐका त्यासी॥ ५॥

२२८१. म्हणे बा आतां करिशील कायी। एकला ये ठायीं येऊनियां॥ १॥ वय हें केवढें बुद्धि हे केवढी। वांयां काढाकाढी तपाची कां॥ २॥ व्याघ्र आणि सिंह जंबुक विखार। नांदती या घोर वनामाजीं॥ ३॥ म्हैषा म्हसको भूतें वसती रानीं। तुज माये रानीं झोंबतील॥ ४॥ नको बा या ठाईं राहू चाल घराप्रती। जाऊं जे कां प्रीति तेचि देऊं॥ ५॥ नामा म्हणे ध्रुव पाहेना बोलेना। आपुलिया ध्यानामाजीं मग्र।

२२८२. मधुवन चांगलें लोचनीं देखिलें। तेथें मन रंगलें बाळकाचें॥ १॥ राहूं येथें करूं देवाची प्रार्थना। म्हणोनियां मना बोधवीत॥ २॥ सरोवर दिव्य त्यामाजीं कल्हारें। भोंवताले मयुर नाचताती॥ ३॥ साउली सुंदर सुमनें मनोहर। देवाचा विहार तये ठायीं॥ ४॥ नामा म्हणे ऐसा निश्चय नेमून। ध्रुव तये वनीं स्थिरावला॥ ५॥

२२८३. राजा म्हणे बाळा देतों पंच ग्राम। तो म्हणे आत्माराम देता आहे॥ १॥ आशा सांडोनियां निराश जाहला। शरण देवाला जावयासी॥ २॥ चतुर्थ भागानें राज्य घे वांटोनी। म्हणे चक्रपाणि देता आहे॥ ३॥ अर्धें भूमंडळ घेईं उदारा म्हणे विश्वंभरा लाज माझी॥ ४॥ संपूर्ण हे मही तुजचि वोपीन। म्हणे नारायण सांभाळील॥ ५॥ नामा म्हणे ऐसा गणीना भूपातें। निश्चय चित्तांत एक झाला॥ ६॥

२२८४. बाळकाच्या बोला राजा भांबावला। म्हणे झालें याला ज्ञानगम्य॥ १॥ शांती याचे अंगीं बाणलीसे नीट। तेणें नेटेपाटे पुढारला॥ २॥ मी तों झालों वांयां कामाचा किंकर। केला म्यां अव्हेर बाळकाचा॥ ३॥ कीर्ति हे त्यागोनी दुर्दशा आणिली। ऐसी होऊं सरली बुद्धी फिकी॥ ४॥ नामा म्हणे राजा लाजला चित्तांत। प्राणावीण प्रेत तयापरी॥ ५॥

२२८५. ठेवुनी भोंवताले रक्षणाला दूत। सांगतो तयातें सत्तारूपें॥ १॥ तुम्हीं आतां याचें करावें रक्षण। व्याघ्र सिंह येणें बाधा नव्हे॥ २॥ क्षणक्षणा मातें सांगावा वृत्तांत। वनीं भूत प्रेत हिंडताती॥ ३॥ चोर हेर खळ रात्रिचीये वेळे। रहावें भोंवतालें सावधान॥ ४॥ नामा म्हणे ऐसें सांगे त्या दूतांसी। आपण घरासी येता झाला॥ ५॥

२२८६. येरु तो निवांत होउनी त्या ठायीं। राहोनियां कांहीं करिता झाला॥ १॥ न कळे भक्तिभाव ध्यावें कैसें त्यासी। देव कोण त्यासी ठावें नाहीं॥ २॥ भावार्थानें सर्व इंद्रियें खुंटलीं। प्रारब्धानें दिली वाट तया॥ ३॥ साध्यसाधनाचा उपाव कळेना। ध्यान तो धारणा कैंचि तेथें॥ ४॥ नामा म्हणे गुरु करावा तें नेणें। अद्‌भुत विंदान मांडियेलें॥ ५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२२८७. वाचितां अध्यात्म जाणितांही अर्थ। गुरुवीण व्यर्थ सर्व कांहीं॥ १॥ करावा तो आधीं सद्‌गुरु प्रसन्न। त्याचिये कृपेनें सर्व साधे॥ २॥ योग याग तपें चित्त शुद्ध होय। गुरुवीण नये मोक्ष हातां॥ ३॥ निर्मळ जीवन तीर्थावीण पावन। तैसा गुरु जाण साधकांसी॥ ४॥ नामा म्हणे गुरु कृपेचिया बळें मूर्खही तरेल भाक माझी॥ ५॥

२२८८. एकाएकीं दैव उदेलें ध्रुवाचें। येणें नारदाचें झालें तेथें॥ १॥ देखियेलें पोर टाकलेंसें बनीं। भावना धरोनी अपसया॥ २॥ साधूचा भाव उदकाचिया परी। लव तेथें भरी उणें नाहीं॥ ३॥ आर्तीचा हे आर्त पुरवावा हा नेम। साधूचा निःसीम स्वभाव कीं॥ ४॥ गिरी देखे मग तो कैसा थोर। तैसे ते उदार साधुसंत॥ ५॥ आतां या बाळाचा योगक्षेम कैसा। पुसावया धिंवसा नामा म्हणे॥ ६॥

२२८९. धन्य धन्य साधु वर्तति भूतळीं। जे कां भाळींभोळीं तारावया॥ १॥ जयाच्या दर्शनें पातकाची धुणी। होय तो सज्जनीं मान्य सदा॥ २॥ विश्वीं विश्वंभर दाखविती पूर्ण। भवाचें बंधन तोडोनियां॥ ३॥ जाती विजाती व्हावया प्रज्ञानहो। एक मग मोहो सोडविती॥ ४॥ नामा म्हणे सदा साधूसी वाणितां। वाचें पवित्रता अखंडित॥ ५॥

२२९०. नारदें पाहिली बाळकाची स्थिती। त्याच्या चित्तीं शांती भरली दिसे॥ १॥ कल्पनेचा दाणा म्हणे तयालागीं। बाळा कवणालागीं आठविसी॥ २॥ वय तरी थोडें भावना उदंड। काय तुज चाड सांग आतां॥ ३॥ न बोलसी तरी साधेना हें काज। अंतरीचें नीज मज कळे॥ ४॥ आला लाभ काळ फळलीसे भावना। उघडोनी लोचना पाहीं मज॥ ५॥ ऐकोनी ध्रुवानें सज्जनाची वाणी। नेत्र विकामोनी पाहे तदा॥ ६॥ पुढें उभा मुनि लावण्याचा गाभा। आपुलिया लाभालागीं नाचे॥ ७॥ नामा म्हणे ध्रुवें वंदिलें चरण। बोलिलें वचन ऐका आतां॥ ८॥

२२९१. बैसायासी गेलों पितीयाचे अंकीं। उठविलें एकी माउलीनें॥ १॥ सरेना सरेना कोणी उठवीना। ऐसा ठाव जाणा वांछितसे॥ २॥ उपाय न कळे मागावें कोणासी। भावना आपैसी उठावली॥ ३॥ नामा म्हणे शब्द ऐके देवऋषी। मग त्या बाळकासी आश्वासीले॥ ४॥

२२९२. ब्रह्मांड जयाच्या पोटीं सांठवलें। तेंचि साकारलें ध्रुवापाशीं॥ १॥ कैसें तें बोलावें कैसें तें वानावें। वेदासही ठावें नोहे जें कां॥ २॥ निलोत्पल रवि गगनाही हिनावी। ऐसी शोभा दावी इंद्रीनीळ॥ ३॥ मरगजालागीं जोडलें सौरभ्यें। आनंदाचे कोंब चारी भुजा॥ ४॥ मुगुट कुंडलें सर्वांगीं भूषण। लेणीयासी लेणें अंगाचिया॥ ५॥ इंद्रधनुष्याची मांडणी मेणाची। माळ वैजयंतीची गळां रुळे॥ ६॥ कस्तुरी कपाळीं रेखलीसे भाळीं। उटी ते पिवळी सर्वांगासी॥ ७॥ सायुध सुंदर शोभताती कर। प्रभा ते अपार कोंदाटली॥ ८॥ अभय हस्त एक पुढें तुकावला। आपुल्या भक्ताला सांभाळाया॥ ९॥ गोजिरी गोमटी ध्यानीं उभी ठेली। नामया माउली माथा ठेवी॥ १०॥

२२९३. ऐसें कांहीं एक अपूर्व देखिलें। हृदयीं कोंदाटलें मूर्तिरूप॥ १॥ परी तें कांहीं तैसें न राहे निश्चळ। चित्त तें चंचळ माघारलें॥ २॥ पुढती सायास करी नानापरी। न राहे अंतरीं साचोकारें॥ ३॥ आवडीनें जीव झाला कासावीस। तंव त्या परेशास कृपा आली॥ ४॥ ब्राह्मणांचे रूप उभा ठेला पुढें। निजभक्तांचे कोडें पुरवावया॥ ५॥ कपोलासी शंख लाविला स्वहातें। तेव्हांचि तयातें ज्ञान झालें॥ ६॥ वैकुंठपिठींचे अधिष्ठान साचें। तें रूप तयाचें दृष्टीं पडे॥ ७॥ नामा म्हणे काय सांगावा नवलावो। भक्तांलागीं देवो साहकारी॥ ८॥

२२९४. स्तवीतसे वाचें जोडोनियां कर। वेदां अगोचर ऐसें कांहीं॥ १॥ धन्य धन्य आतां उद्धरलो स्वभावे। माझें मज ठावें झालें निज॥ २॥ विश्वाच्या जिवाचिया जीवा। देवाचिया देवा दिनानाथा॥ ३॥ तूंचि सर्वां आदिमायेची अवधी। तुजविण कधीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दुजें नाहीं ॥ ४ ॥ एक तूं अनेक अनेकीं तूं एक। येणेंही साशंक बोलवेना ॥ ५ ॥ दातृत्वाची आदी कल्याणाचा निधी। चित्त मन बुद्धि सर्व तूंची ॥ ६ ॥ तुझीये कृपेनें गेले भावाभाव। आणिक मागावें ऐसें नाहीं ॥ ७ ॥ कधींही कोणता चळेना ढळेना। मातें ऐशा स्थाना बैसवावें ॥ ८ ॥ नामा म्हणे ऐसी करीत प्रार्थना। घाली लोटांगणा पायांवरी ॥

२२९५. आश्वासोनी देव बोलिले ध्रुवासी। इच्छा तुझी जैसी तेसें करूं ॥ १ ॥ सहज सत्तेनें ऐसें कांही जहालें। अढळ दिधलें बैसावया ॥ २ ॥ चंद्र सूर्य तारा शशि ऋषी थोर। हे ज्या आधारें हिंडताती ॥ ३ ॥ ब्रह्मलोक साचे परी ते न नासें। ऐशा परी त्यास बैसविलें ॥ ४ ॥ क्षतेचा दिवस योजनें उन्नती। बैसवी श्रीपति ध्रुवालागीं ॥ ५ ॥ सर्वी सर्वत्रांच्या लोचना गोचर। रमणीये अपार वर्णवेना ॥ ६ ॥ नामा म्हणे दुजें वैकुंठ केवळ। भक्तालागीं केलें देवरायें ॥ ७ ॥

२२९६. ऐसें झालें पूर्ण ध्रुवाचें आख्यान। ऐकती जर जन एका भावें ॥ १ ॥ तयावरी कृपा देवाची होईल। केलें तें लाभेल सर्व काज ॥ २ ॥ पुत्राभिष्ट पुत्र धनाभिष्ट धन। जैसें ज्याचें मन तेसें होय ॥ ३ ॥ नामा म्हणे तया कल्याण सर्वदा। चिंतियां गोविंदा काम पुरे ॥ ४ ॥

उपमन्यूचें चरित्र

२२९७. ऐका श्रोते सावधानता। सांगेन उपमन्यूची कथा। एक्या भावें परिसतां सायुज्यता पाविजे ॥ १ ॥ बाळ तो लडिवाळ तान्हा। वाढे मातेचिया स्तनपाना। परि ते असे दुर्बळपणा। उपमन्यु नांव तयेचें ॥ २ ॥ उपमन्यें मागितलें। कृष्णें तयासी काय दिधलें। तें सांगेन वहिलें। चित्त देउनी परियेसा ॥ ३ ॥ ब्राह्मणासी एक पुत्र झाला। पितयानें संतोष मानिला। थोर कष्टें वाढविला। तयाचें पुत्रपण फिटलें ॥ ४ ॥ बाळ जाहला जाणता। पितयासी उपजली दुधाची चिंता। दूधच ऐकिलें बोलतां। तेंचि मातेसी मागत ॥ ५ ॥ मग कणी कांडोनी जनक जननी। त्याचें केलें शुभ्रपाणी। बाहेर दूध म्हणउनी। वाटींत भात कालविला ॥ ६ ॥ तंव शेजारी ब्राह्मणानें श्राद्ध केलें। तयानें तया बाळकास जेवावयास नेलें षड्रस पक्वान्ना वाढिले। दूध क्षीर नाना परीचे ॥ ७ ॥ तयासी वाढिली दूध क्षीरी। बाळक जेविलें पोटभरी। पुसोनियां तये घरीं। मातें मागूं जेवावया ॥ ८ ॥ गेला आपुलिया घराप्रती। बाळ तो निद्रा करी रातीं। प्रातःकाळीं भूक लागे मागुती। मागे दूधभात जेवावया ॥ ९ ॥ पुढती कनी वाटूनी जननी। त्याचें काढिलें शुभ्र पाणी। येरें टाकिलें थुंकोनी माते दूध कालचें नव्हे ॥ १० ॥ बारे त्या समर्थाचे घरीं। देवे दिधलें दूध क्षीरी। आम्हां दुर्बळाचे घरीं। तें दूध कोठूनि मिळेल ॥ ११ ॥ कोठें आहे तो श्रीहरी। तो मज दावीं वो झडकरी। दूध मागेन निर्धारीं। क्षुधा अंतरीं बहु पीडी ॥ १२ ॥ देव्हारां श्रीहरीची मूर्ती। नेउनी दाखविली बाळाप्रती। बारे हा लक्ष्मीपती। दूध याप्रती मागावें ॥ १३ ॥ बाळ खळ घेउनी बैसला तेथें। देवा दूध पोटभर दे मातें। मी कोठें जाऊं नेदी तूतें। दूध घेतल्यावांचोनी ॥ १४ ॥ ऐसे तिघां तीन उपवास पडती। माता पिता चिंता करिती। लोकीं मिळोनी बहुतीं। उठवूं पहाती बाळकातें ॥ १५ ॥ बाळा तुजकारणें। एक गाय देतों आणून। येरु न मानी त्यांचें वचन। म्हणे देईल लक्ष्मीरमण मजलागीं ॥ १६ ॥ माता समजावी बहुता वचनीं। त्या ब्राह्मणाचें दूध देतें आणूनि। हें पाहें पां चाखोनी। दूध कालचें होय कीं नव्हे ॥ १७ ॥ दूध आणिलें भीक मागुनी। संतोष न वाटे माझे मनीं। देव देईल मजलागुनी। तरी दुध सेवीन ॥ १८ ॥ देवे धुरूसी अढळपद दिलें। तैसेंच दूध देईं मज संचलें न देतां अव्हेरिलें। तरी प्राण देईन निर्धारीं ॥ १९ ॥ देवा दुधाची शिधोरी। कां मज न देसी श्रीहरी। आळ पुरवीं बा मुरारी। दूध पोटभरी मज देईं ॥ २० ॥ मज बहु लागलीसे क्षुधा। अझुनी कां न पावसी गोविंदा। तुज मागत नाहीं धनसंपदा। एका

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दुधावांचोनी॥ २१॥ देवा नको पाहूं निर्वाण। देह करवतीं घालीन। प्राण तुज समर्पीन। सत्य वचन पाहें माझें॥ २२॥ देखोनी बाळकाचें अंत:करण। कळवळिका नारायण। सांडोनी क्षीरसागर शेषशयन। येत धांवून बाळकाप्रती॥ २३॥ सुदर्शन घेऊनि हातीं। पावला उपमन्यु आकांतीं। प्रगट झाली विष्णुमूर्ति। निजरूप दाविलें॥ २४॥ बाळ येऊनि लागला चरणीं। देवें हृदयीं धरिला आलिंगुनी। वरदहस्तें कुरवाळूनी। कृपादृष्टीं अवलोकी॥ २५॥ सांग बाळा प्रसन्न झालों तूंतें। काय संकल्प तो माग मातें। येरू म्हणे दूध द्यावें कृपावंतें। जें कल्पांतींही न सरेची॥ २६॥ हांसून बोले वैकुंठरमण। पहा वो बाळ केवळ अज्ञान। म्हणे मी झालों आतां प्रसन्न। काय दूध तुवां मागावें॥ २७॥ देवा या दुधाचि कारणें। एवढें केलें म्यां निर्वाण। सहित माता पिता तिघेजण। क्षीर भोजन मज द्यावें॥ २८॥ माता पिता उपमन्य। तिघे गरुडपृष्टीं वाहवून। क्षीरसागरीं ठेवी नेऊन। दूध प्राशन सुखें करा॥ २९॥ राज्य देउनी क्षीरसागरींचें। अमर शरीर केलें त्याचें। अखंड दर्शन श्रीहरीचें। सायुज्यपद त्या दीधलें॥ ३०॥ जावें विठोबासी शरण। आर्त मनोरथ पूर्ण। निजभक्ताचें करीतसे॥ ३१॥ विष्णुदास नाम्याचा स्वामी। तो श्रीहरी वोळंगा तुम्ही। जें जें इच्छिलें अंतर्यामीं। इच्छादानी पुरवील॥ ३२॥

सुदामाचरित्र

२२९८. सुदामा ब्राह्मण होता तो दुर्बळ परि चित्तीं गोपाळ दृढ धरिला॥ १॥ तयाचें चरित्र ऐका सावधान। तेणें जन्ममरण दूर होती॥ २॥ सत्त्वाचा सागर धैर्याचा मांदार। भक्तीच निर्धार तयापाशीं॥ ३॥ हालेना चालेना चळेना ढळेना। आणिक कल्पीना इच्छा कांहीं॥ ४॥ सदा सर्वकाळ समाधी लागला। प्रपंचा सांडिला छेदूनियां॥ ५॥ नामा म्हणे तोचि योगियांचा राजा। ज्ञान्याचीया पूजा पुजितसे॥ ५॥

२२९९. प्रारब्धाच्या बळें देहाचें वर्तनें। काळचक्र भोवनें जैसें कांहीं॥ १॥ तैसाची तो साधु जाणावा प्रसिद्ध। देहाचा संबंधु नेणे कांहीं॥ २॥ वारे वाजूनियां जातां वृक्ष डोले। मर्यादेवेगळें होत जाय॥ ३॥ नामा म्हणे होणें जाणें नाहीं तयां। संचिता साराया लागोनियां॥ ४॥

२३००. ऐसा तो ब्राह्मण दरिद्रें पीडीला। सदा स्वरूपीं झाला अखंडीत॥ १॥ न करीच खंतीं कांहीं तो अंतरीं। वाचें तो उच्चारी रामकृष्ण॥ २॥ नाहीं धड घर केवळ जर्जर। चंद्र प्रभाकर उगवती॥ ३॥ बाळें पांच सात बाहाती झोंबती। भुकें तळमळिती सर्वकाळ॥ ४॥ उष्णों पोळे वारा येतसे भरारा। मेघाचिया धारा घरामाजीं॥ ५॥ नामा म्हणे त्यानें प्रपंच सांडिला। परमार्थ मांडिला अखंडित॥ ६॥

२३०१. तयाची सुंदरा शांतीची बाहुली। आणिक जीभली बोलों नेणें॥ १॥ सेवेसी सादर होऊनियां राहे। भुकची ते खाये भुकेलिया॥ २॥ नित्य नैमित्तिक कांहींच न म्हणे। अंतरीची खूण जाणोनियां॥ ३॥ नामा म्हणे न्यून पूर्ण सर्व हरी। आणिका विचारीं गुंतेचिना॥

२३०२. एके दिनीं भार्या भावें तें मानवी। भ्रतारा विनवी नम्रतेनें॥ १॥ तुमचा सोईरा आहे नारायण। अखंडित ध्यान करितां त्याचें॥ २॥ तयाचिये भेटी जावें लवकरी। तो आहे कैवारी दीनालागीं॥ ३॥ भेटतांचि नासे अज्ञान दारिद्र। सुखाचा समुद्र पांडुरंग॥ ४॥ नामा म्हणे देव भक्ता साहाकारी। सर्व सिद्धि घरीं वोळंगती॥ ५॥

२३०३. ऐकतां वचन मानलें तयासी। पुढें कल्पनेसी ठांव नाहीं॥ १॥ तेथें म्यां मागावें हें कांहीं न कळे। निवतील डोळे दर्शनानें॥ २॥ परी तया भेटी न्यावें कांहीबाही। परंतु तें नाहीं लेश घरीं॥ ३॥ नामा म्हणे द्विज वांच्छी दरुषण। रिकाम्या हातानें जातां लाजे॥ ४॥

२३०४. जाणवला भाव तया सुंदरीसी। म्हणते पतीसी नम्रतेनें॥ १॥ जावें आतां तुम्ही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देवाचे भेटीसी। उठली वेगेंसी सन्मानानें॥ २॥ आणिते मागुनी भक्तीतें भातुकें। जेणें यदुनायक तोष पावे॥ ३॥ नामा म्हणे घरीं पदार्थ तो नाहीं। प्रेमच तो पाहीं उगवला॥ ४॥

२३०५. पाहे चहुंकडे धुंडोनि सुंदरी। देखे मुष्टी चारी तंदुळिका॥ १॥ तोचि शुद्ध भाव उगवला पुढें। सर्वहि तें कोंडे देवालागीं॥ २॥ अहं सोहं वृत्ति तेथें एक झाली। दृष्टीनें देखिली पोह्यांकडे॥ ३॥ नामा म्हणे सर्वरूपी नारायण। बोलाया कारण नाही तेथें॥ ४॥

२३०६. तेचि भक्तिभावें पतीपुढें ठेवी। पाहोनि गौरवी ब्रह्मनिष्ठा॥ १॥ तया योग्य नव्हेचि गे हा पदार्थ। आमुचिया आर्त तुळसीदळ॥ २॥ द्रौपदीच्यासाठीं भाजीपान खाये। तेणें त्याची काय भूक गेली॥ ३॥ नामा म्हणे हें तो कोड कौतुक। थोडेंहि अधिक देव करी॥

२३०७. शुद्ध भावार्थाचे पाहोनियां पोहे। आनंदला भाव योगियाचा॥ १॥ म्हणे आतां भेटूं बाळमित्र हरी। भक्तांचा कैवारी कृष्णनाथ॥ २॥ बांधावया वस्त्र केवळ जर्जर। त्यामाजीं न थरे गुंडाळितां॥ ३॥ नामा म्हणे द्विज आनंद पावला। मुहूर्त नेमियेला प्रयाणासी॥

२३०८. वाचें नाम गात चालिला तो द्विज। एकाचें तें चोज शुद्ध भावें॥ १॥ जीवशिव एकाकार झाली वृत्ति। नाहीं कांहीं चित्तीं शम दम॥ २॥ हात पाय नळ्या वळती फेंगड्या। भावार्थाच्या गुढ्या उभारीत॥ ३॥ नामा म्हणे वाट चालतां समाधि। सोहं स्वरूपी बुद्धि ठसावली॥ ४॥

२३०९. शुभ सुचिन्हें होताती शकुन। तेणें तो ब्राह्मण आनंदला॥ १॥ म्हणे थोर लाभ आजिचा दिसतो। आनंद वाटतो मनामाजीं॥ २॥ उडती उजवे काग ते जोड्यानें। भरल्या कुंभानें नारी देखे॥ ३॥ तास भारद्वाज वामभागीं जाती। मयुर नाचती उत्साहानें॥ ४॥ नामा म्हणे सर्व प्रश्नांचाही प्रश्न। वाचें नारायण नाम गातो॥ ५॥

२३१०. द्विज म्हणे जातां मनीं। कैसा भेटे चक्रपाणि॥ १॥ काय होईल न कळे। म्हणोनि हृदयी कळवळे॥ २॥ येवढा ज्याचा राज्यकारभार। मी तो केवळ फकीर॥ ३॥ कोठें तयाला आठव। बाळपणींचें माझें नांव॥ ४॥ तैं तो होता गौळ्याघरीं। आतां त्रैलोक्याधिकारी॥ ५॥ नामा म्हणे ऐसें। करितचि निजध्यासें॥

२३११. दुलोनि देखिलें द्वारकानगर। अवघें कनकाकार वोतियेलें॥ १॥ जेथें देवराया नांदतो तो ठाव। काय म्यां वर्णावें मंदमति॥ २॥ हिरे चिरे रत्नें झगमग दिसती। घोंस ते लोंबती मोतियांचे॥ ३॥ वैकुंठीचें सर्व वैभव आणिलें। शोभेसी शोभलें आपेआप॥ ४॥ गुढीया गोपुरें झळकती पताका। वाजताहे डंका चौवेदांचा॥ ५॥ साहाजण भाट उभे महाद्वारीं। अठरा वारकरी मोकाशांचे॥ ६॥ नामा म्हणे ऋद्धिसिद्धीचें भांडार। देखिलें नगर ब्राह्मणानें॥

२३१२. झांकावले डोळे शंका करी मनीं। दिवस की यामिनी हें न कळे॥ १॥ महा तेजः पुंज फांकती सकळ। सिंधूचा झळाळ भोंवताला॥ २॥ गोमती ते नदी निर्मळ वाहात। बहु घुमघुमीत सुमनें भार॥ ३॥ जाईजुई आणि कमळ कल्हारी। भ्रमर झुंकारी गुंजारव॥ ४॥ नामा म्हणे मुनि पातला पूर्वद्वारा। पुढिल्या विचारा चित्त द्यावें॥ ५॥

२३१३. चहूंकडे स्वर गाताती गायनें आणिक पुराणें ठाईं ठाईं॥ १॥ गीतनृत्य नाना करिती तनाना। होतसे झणाणा टाळघोळ॥ २॥ श्रवणाचें सुख घेतसे ब्राह्मण। नामाहि गर्जना करीतसे॥ ३॥

२३१४. नारायण नाम तारक सर्वांसी। तें मुनीं मनासी धरिलें असे॥ १॥ कापुराची राशी अग्नीचाहो कण। तैसें नाम जाण पातकासी॥ २॥ अंतरी ते क्षुधा लागली द्विजासी। पाहीना नगरीसी सावचीत॥ ३॥ नामा म्हणे द्विज उमा महाद्वारीं। केवळ भिकारी राजयोगी॥ ४॥

२३१५. नाहीं देवाचिये द्वारीं आडकाठी। हे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तो आहे गोष्ठी सिद्धांताची॥ १ ॥ भावाविरहित मार्गाची न फुटे। फुटल्या न सुटे मागुता तो॥ २ ॥ नामा म्हणे ऐसा लौकिक वेव्हार। तेथें तो निर्धार कांहीं नाही॥ ३ ॥

२३१६. चालिला देवांचे भेटीला सन्मुख। ब्राह्मणाचा हरिख न समाये॥ १ ॥ पाहातां लोचनीं राजीवलोचन। भावाचें मोचन तेचि काळीं॥ २ ॥ सभा ते साजिरी रत्न सिंहासनी। देव चुडामणी शोभतसे॥ ३ ॥ राईरखुमाई चामरें ढाळिती। राधा उभी हाती घेउनी छत्र॥ ४॥ समारंभें पुढें गरुड तो उभा। शोभतसे शोभा दिव्य कांही॥ ५ ॥ यादवांची सभा दाटलीसे भारी। नाना उपचारी ऋद्धि सिद्धि॥ ६ ॥ उद्धव अक्रूर उभे पायांपासी। देवाधि-देवासी विडे देत॥ ७॥ नामदेव तेथें उभा होता निका। घेऊनि पादुका दोन्ही हातीं॥ ८ ॥

२३१७. पुढें तो भिकारी जाता झाला वेगें। आपुलिया रंगें रंगूनियां॥ १ ॥ येकाकार करी चित्त आणि वृत्ति॥ पाहे लक्ष्मीपति दुरोनियां॥ २ ॥ तटस्थ जाहाला चालला त्वरित। मुखी नाम गात गोविंदाचें॥ ३ ॥ नामा म्हणे नीर पाझरें लोचनी। समाधी लागुनी मुनी ठेला॥ ४ ॥

२३१८. देखिला सावळा राजा द्वारकेचा। सर्वही सुखाचा ठेवा दिसे॥ १ ॥ माथां तो मुगुट कुंडलें श्रवणीं। प्रभा दिनमणी तुच्छ जेथें॥ २ ॥ कोटि मन्मथांची झाडणी करावी। ऐसी ते बरवी अंगकांती॥ ३ ॥ श्रीमुख शोभलें पूर्णचंद्रा ऐसें। देखतांचि दोष सर्व जाती॥ ४॥ केशराची उटी कस्तुरी मळवटी। माळ रुळे कंठीं वैजयंती॥ ५ ॥ श्रीवच्छलांछन मुद्रिका भूषण। झळकती जाण भुजादंड॥ ६ ॥ नामा म्हणे ऐसा देखियेला देव। तयाचा अनुभव काय वानूं॥ ७ ॥

२३१९. देखिला सुदामा आपुल्या नयनीं। मग चक्रपाणि उठे त्वरें॥ १ ॥ सिंहासनाखाली टाकोनियां उडी। करद्वय जोडी नमनालागीं॥ २ ॥ भेटूनियां तेव्हां धरिला हस्तकी। बैसवी मंचकी वैडुर्याच्या॥ ३ ॥ म्हणे रुक्मिणीसी आणीं उदकाला। पुजूं या द्विजाला सन्मानेसी॥ ४॥ नामा म्हणे देवें चरण प्रक्षाळिले। आंचळीं पुसीले आपुलिया॥ ५ ॥

२३२०. स्नानालागीं उठा म्हणे नारायण। आणविलें उष्ण पाणी तेव्हां॥ १ ॥ सोळा सहस्त्र स्त्रिया उटणीं लाविती। अक्षवाण आरती करिताती॥ २ ॥ करविलें स्नान पीतांबर परिधान अलंकार भूषणें दिली त्यासी॥ ३ ॥ स्वइच्छा भोजन वाढिलें तयासी। नामाही पंक्तिसी बैसविला॥ ४ ॥

२३२१. सोळा सहस्त्र ताटें द्विजालागी आलीं। अमृताची गेली चवी तेव्हां॥ १ ॥ पक्वान्नाचा तरी वाढवूं विस्तार। होईल उशीर कथेलागी॥ २ ॥ हरिरुचि जेवण सुदामा जेविला। वेगीं आंचवला संसारासी॥ ३ ॥ नामा म्हणे त्यासी देवें दिला विडा। रंगला तो जोडा वैराग्याचा॥ ४ ॥

२३२२. काय वहिनीनें दिधलें आम्हांसी दाखवा वेगेंसी कृष्ण म्हणे॥ १ ॥ सेडियेली तेव्हां मुष्टी तंदुलिका। रुक्मीणीनायका पुंढें ठेवीं॥ २ ॥ घेऊनि ते पोहे मुखामाजीं टाकी। मागे ते भीमकी धरोनी हात॥ ३ ॥ ब्रह्मादिक देव उभे पोह्यांसाठीं। नाहीं त्या लल्लाटीं नामा म्हणे॥ ४ ॥

२३२३. भक्षुनियां पोहे संतुष्ट जाहला। मग आनंदला नारायण॥ १ ॥ विश्वकर्म्यालागीं तेव्हां आज्ञा केली। क्षणांत रचिली सुदामपुरी॥ २ ॥ सर्व सुवर्णाची द्वारकेप्रमाणें। ब्राह्मणासी दान गुप्त दिल्हें॥ ३ ॥ नामा म्हणे दुजा नाहीं देवावीण। देतां घेतां जाण पांडुरंग॥ ४ ॥

२३२४. सुदामा म्हणे अनंता। आम्हा आज्ञा द्यावी आतां॥ १ ॥ जाऊं घरासी सत्वर। येऊनि दिवस झाले चार॥ २ ॥ सर्व ठेउनी जातां बरें। वाटे मारिती तस्कर॥ ३ ॥ ऐसी ऐकोनी वचनें। सर्व काढिलीं भूषणें॥ ४ ॥ आज्ञा घेउनी चालिला। देव बोळवीत आला॥ ५ ॥ नामा म्हणे चोर। याचा उफराटा व्यापार॥ ३ ॥

२३२५. नाही आमुचे दैवीं त्याणें कोठोनी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

द्यावें। व्यर्थ कां रुसावें देवावरी॥ १ ॥ न करितां खेद पुढें वाट चाले। गौरक्षक भेटले तयालागीं॥ २ ॥ पुसतसे त्यासी कोणाचें नगर। ते म्हणती घर सुदाम्याचें॥ ३ ॥ सुदाम्याची तुम्ही हेळणा करितां। तयाच्या संचीता प्राप्त कैंचें॥ ४॥ मानुनी असार नगरद्वारा गेला। प्रचीती तयाला नयेचि ते॥ ५ ॥ जेव्हां वेषधारी मुजरा करिती। चरणांसी लागती सुदाम्याच्या॥ ६ ॥ सुदामदेव तेव्हां मंदिरासी गेला। मग ओंवाळिला सुंदरीनें॥ ७॥ समाधानी झाला सुदामा ब्राह्मण। करा रे कीर्तन नामा म्हणे॥ ८ ॥

भीष्मप्रतिज्ञा.

२३२६. मारिले ते वीर माव करी करी। मृषा ते वैखरी केली जगीं॥ १ ॥ पण केला होता न धरीं शस्त्रासी। भीष्म तो तयासी स्मरणवंत॥ २ ॥ महामारी धरी अर्जुन वीरासी। नये सावरासी कांहीं केल्या॥ ३ ॥ अश्व ते मारिले रथ ते सारिले। घाय वरी केले वीर पार्था॥ ४॥ पार्थाचें शरीर पुष्प पळसाचा। ऐसा वर्ण त्याचा जाणोनियां॥ ५ ॥ सावध तो नाहीं वीर रणांगणी। विचारिलें मनी जगन्नाथे॥ ६ ॥ नाहीं पळ एक सावध हा वीर। बाणांचे ते भार भीष्म टाकीं॥ ७॥ देखोनि निदान प्रतोद ठेवून। प्रथित हो रथचक्र होतें॥ ८ ॥ घेऊनिवां करी उठे लागवेगें। धांवतां निजांगें देखियेलें॥ ९॥ कांसे पितांबर सुटला तो करें। सांवरून वरें धांवतसे॥ १०॥ भीष्म म्हणे देवा माझी सत्य केली। प्रतिज्ञा हरली आपुली हो॥ ११ ॥ जरी तुझे चित्तीं असे तें मारणें। कवण तो रक्षण करील माझें॥ १२॥ येऊनि लवकरी बैसे रथावरी। खड्ग तुझ्या करीं देत आहे॥ १३॥ ऐकतां हा बोल झाला लज्जामान। दिलें तें टाकून चक्र हातें॥ १४॥ जयजयकार झाला रणीं तो भीष्माचा। पण केला साचा देवराया॥ १५॥ नामा म्हणे ऐसी भक्ताची ही चाड। आपण लबाड झाले देव॥ १६॥

२३२७. करितां तें युद्ध नऊ दिवस झाले। संकट पडलें पांडवांसी॥ १ ॥ एक वेळ ऐसी केली मात भारी। नेम दिवस सारी एक बाकी॥ २॥ संग्रामी पांडव करितां विचार। चिंतातूर फार देखोनियां॥ ३ ॥ तेव्हां कृष्ण म्हणे चला अवघे जन। भीष्मा लागोन विचारासी॥ ४ ॥ कृष्ण परमात्मा धर्मराजासहित। भीष्म शिबिरांत जाते झाले॥ ५॥ करूनि वंदन पितामहालागीं। बोलती ते वेगीं कैसी परी॥ ६ ॥ नेम दिवस दाहा त्यामाजिं ते नव। झाले ते स्वभावें कांही नव्हे॥ ७॥ जयाचिया कांक्षा धरूनि तें मनीं। आलों समरांगणी हेंचि ठावें॥ ८॥ तुजसी झुंजतां नये यश आम्हां। तुझी ते महिमा अगाध हो॥ ९ ॥ भार्गव राम बळी युद्धीं जिंकवेना। तया तोषवेना युद्ध बळें॥ १०॥ ऐसी यासी कैसें मरावें तें रणीं। न करितां हो येक्षणीं जय कैसा॥ ११ ॥ याचि हो विचारें आलों तुझ्या घरा। सांगे जय नरा प्राप्ति घडे॥ १२॥ ऐकोनियां बोला मनीं आनंदला। भीष्म महा भला काय बोले॥ १३ ॥ जोंवरी जीवंत तोंवरी जयवंत। आहे हें निश्चित्त कळों आलें॥ १४॥ परंतु पुसतां विचार मजला। तरी ऐका बोला सांगिजतो॥ १५ ॥ तुमच्या हो दळीं शिखंडी नामक। राजा नपूंसक पुरुष आहे॥ १६ ॥ तया करा पुढें मागून अर्जुन। बाणांचे संधान करावें कीं॥ १७॥ माझी ते प्रतिज्ञा षंढावरी शस्त्र। न धरीं तें अस्त्र प्राण गेल्या॥ १८॥ ऐसी युक्ति करा रणीं मग मारा। यश येईल घरा आपेआप॥ १९ ॥ ऐकोनि विचार आलें निजस्थाना। नामदेवीं जाणा विचार केला॥ २०॥

रावण-मंदोदरीसंवाद

२३२८. मंदोदरी सांगे रावणाप्रती। स्वप्न देखिलें म्यां मध्यरातीं। नेणों वान्नर मिळाले किती। शिळा सागरू बांधिला॥ १ ॥ दोघे धनुर्धर वीर वान्नर। उतरोनि आले पैलसागर। एकापरीस एक गा वीर। ते बडियार बोलताती॥ २ ॥ नेणों त्याचा बळीया आला। लंकेभोंवता वेढा घातला। सभामंडप उडोनि गेला। जो केला त्रिकुटासी॥ ३ ॥ लंकेभोंवता रुधिराचा पूर। रणीं पडिला कुंभकर्ण वीर। तो

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तुमचा सखा सहोदर। निद्रा करी सामास॥ ४॥ सत्य तुझी छेदिली दश शिरें। येणें रामें रणरंगधीरें। लंका जाळोनि केली जोहरें। अंबरीं तुरे गर्जताती॥ ५॥ हें स्वप्न सत्य होईल जाणा। लंका दान बिभीषणा। शरण जाई रघुनंदना। नामयाच्या स्वामीसी॥ ६॥

२३२९. विनंति करी मंदोदरी। परिसा स्वामी दशकंधरी॥ १॥ वांयां आणिली जानकी घरी। लाज झाली तिहीं लोकीं॥ २॥ मज पाहातां हे विवसी। क्षय आणिला कुळासी॥ ३॥ अभिलाषितां पर सती। हे तों नव्हे राजनीती॥ ४॥ कोण आमुचा हितकरू। सांगे निर्मळ विचारू॥ ५॥ नामया स्वामीसी शरण जावें। स्वहित आपुलें करावें॥ ६॥

२३३०. ज्यातें ध्यानीं ध्याती योगी। तो मज येतो भेटीलागीं॥ १॥ तया रामासी विन्मुख होणें। जळो जिणें लाजिरवाणें॥ २॥ व्रतें तपें ज्या साधिती। तो मज नित्य ध्यातो चित्तीं॥ ३॥ जो अगम्य वेदपुराणां। तो मज येतो समरंगणा॥ ४॥ नामया स्वामीच्या दर्शनें। मग कैंचि भववंधनें॥ ५॥

२३३१. मंदोदरी करी विनंती। परिसा स्वामी लंकापती॥ १॥ सोंडा रामाची अंतुरी जंव तो राम आहे दुरी॥ २॥ उदकीं तारिले पाषाण। हा तो प्रताप नव्हे सान॥ ३॥ झाला बिभीषण शाहाणा। देखोनी तुमच्या दुश्चितपणा॥ ४॥ जाउनी रामासी भेटला। मृत्युपासूनि सुटला॥ ५॥ नामयास्वामी रघुनंदन। वेगीं करावा प्रसन्न॥ ६॥

२३३२. म्हणसी बिभीषण शाहाणा। परि तो महामूर्ख जाणा॥ १॥ काय तो रामासी भेटला। अवघा रामचि नाहीं झाला॥ २॥ कोण हित केलें तेणें। राम नाकळीचीं मनें॥ ३॥ राम दृष्टी देखतांची। पदवी न घेववे त्याची॥ ४॥ म्हणशी झाला लंकापती। नाश पावेल कल्पांतीं॥ ५॥ नामया स्वामीतें जिंकोन। अवघा रामचि मी होईन॥ ६॥

नक्रोद्धार

२३३३. नक्र बोले ऐकें हृषिकेशी। नाममात्रें तारिले गजेंद्रासी। काय कृपें झालें मजविशी। आतां कैसा बा मोकलूनि जासी॥ १॥ कळलें तुझें देवपण आतां। सोडीं ब्रीद आपुलें दीनानाथा॥ ध्रु०॥ दीनानाथ म्हणविसी कशासाठीं। द्वैतभाव त्वां घरियेला पोटी। कैसें पाप लाविलें माझे पाठीं। तुझें रूप देखिलें आजि दृष्टि॥ २॥ दीनानाथ बोलती वेद चारी। साधुसंत गाताती नानापरी। सत्य ब्रीद मिरवत चराचरी। सोडी ब्रीद आपुलें झडकरी॥ ३॥ रजमात्रें तारिली अहिल्या शिळा। नामें करूनि उद्धरिले अजामेळा। पापी कैसा मी घननीळा। तुझें रूप देखिलें म्यां आजि डोळां॥ ४॥ न्याय ब्रीद घेईन तुझें आतां। पापी कैसा मी सांग दीनानाथा। कैसें पाप मारिलें माझ्या माथां। अझूनि लाज कां नये तुझ्या चित्ता॥ ५॥ नक्र बोले देवासी हांसूं आलें। निंदा नोहे स्तवन माझें केलें। दीनानाथें तात्काळ उद्धरिलें विष्णुदास नामा कौतुक बोले॥ ६॥

संतचरित्रें.

कबीर.

२३३४. आतां ऐका कवित कबीरा। रामसेवेसी तत्परा। संत साधु आलिया घरा। कदा पाठमोरा नव्हेची॥ १॥ कोणी एके अवसरी। आहे जी माध्यान रात्रीं। मिळोनि संतमांदी वरी। आले घरीं कबीराचे॥ २॥ तंव स्त्रीसहित उठोनी। लागे संतांचे चरणीं। आमुचें परम भाग्य म्हणोनी। जाली भेटी स्वामींची॥ ३॥ मोडकें खोपट जर्जर। तेथें कैंचें भिंती आकार। वरूविण उपवासी पोर। नांदणूक थोर कबीराची॥ ४॥ तंव बैसावया कारण। संतांसी घातलें आसन। काढिला बोऱ्या मुलें उठवून। सर्वेचि आपण उभा ठेला॥ ५॥ कबीर म्हणे स्त्रियेसी। कांही नैवेद्य करावा देवासी। अवश्य म्हणोनी तेवरेंसी। अंगिकारिती पैं झाली॥ ६॥ बहुत संकट पडलें नारी। पाहातां घन न दिसे घरीं। दोन प्रहर लोटली रात्री। बाजारी कोणी असेना॥ ७॥ मेघ वर्षती दारुण। काळोखी पडली अति कठीण। अंतरी स्मरे रामनिधान। मग झडकरी जाण निघाली॥ ८॥ सत्वर योउनी वाणिका आळीसी।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तंव कुलुपें जालीं दूकानांसी। कोणी न बोलती कोणासी। जननिद्रेसी प्रवर्तले॥ ९॥ मग झाली हृदयी चिंताक्रांत। नामस्मरण करीत। एका दुकानाआंत। काय म्हणत परियेसा॥ १०॥ मग जाउनी दुकाना-जवळी। उघडी होती एक फळी। वाणी जागत तये वेळीं। अकस्मात बाळी तेथें आली॥ ११॥ वाणी पुसे तूं कवणाची कवण। कां आलीस रात्र करून। कवण कृत्य असें तें निरोपण। श्रुत करणें आम्हांलागी॥ १२॥ ऐके वाणीया देऊनि चित्त। कबीर जाणिजे माझा कांत। घरी पाहुणे आले साधुसंत। म्हणोनि त्वरित पाठवीलें॥ १३॥ पाहिजे सामग्री आम्हांसी। विलंब न करावा द्यावयासी। लेख होईल ते आम्हांसी। तंव दुकानासी नेलें तें॥ १४॥ तंव तो नष्ट दुराचारी। जाला असे कामातुर भारी। कुवासना धरिली अंतरी। म्हणे ऐक सुंदरी वचन माझें॥ १५॥ जें सांगेन तें अंगिकारावें। मग लागेल तितुकें न्यावें। मनी कांही न धरावें। नाही तरी जावें आले वाटे॥ १६॥ तंव ते सत्त्वधैर्याची पेटी। देखुनी त्याची चंचळ दृष्टी। मग म्हणे बरवें गा सेटी। वेगीं उठी देई सर्वदा॥ १७॥ आधी सामग्री देई आम्हांसी। कार्य संपादुन येईन त्वरेसी। हें बोलणें माझें सत्य परियेसी। या वचनासी न टळें गा॥ १८॥ तंव तो अविश्वासी नर। तयास कैसी बुद्धि विचार। म्हणे मज भाक देई वो सत्वर। तरीच खरें वाटे गे आम्हांलागीं॥ १९॥ मग भाक देऊनियां नारी सर्व सामग्री घेतली पदरीं। तेथून निघाली झडकरी। आली घरी तात्काळ॥ २०॥ मग उभयवर्ग मिळून। केलें संतचरणक्षालन। घेतली तीर्थें समाधान। पूजाविधान आरंभिलें॥ २१॥ केल्या गंधाक्षता समस्तांसी। धूप दीप ओवाळिले संतांसी। झाला नेवेद्य अवघियासी। मग नमस्कारासी प्रवर्तले॥ २२॥ केले नमस्कार एकंदर। मनीं आनंदला कबीर। म्हणे धन्य भाग्य आजी थोर। करून नमस्कार प्रवर्तले॥ २३॥ सर्व सांग विधि झाली। आनंदाची घडी लोटली। संतवृंदें संतोषली। समाधिस्थ झालीं सुखें॥ २४॥ ऐसा संतसत्कार सांभाळिला। मग कबीर स्त्रियेनें खुणविला। आतां पाहिजे निरोप दिघला। शब्द गुंतला आजी माझा॥ २५॥ तुम्ही आसीजे संतांपासीं। मज सत्य करणे वचनासी। भाक देऊनियां वाणीयासी। सामग्रीसी आणिलें॥ २६॥ त्याचे मनोरथ पूर्ण करणें म्हणोनि लागे मज जाणे। उशीर होतां उगवेल दिन। शिणतील नयन वाणीयाचे॥ २७॥ कबीर म्हणे वो कांते। मी येईन तुजसांगातें। मेघ वर्षती अपरमिते। निसी बहुत झाली असे॥ २८॥ त्या वाणीयाचा उपकार। आम्हांवरी झाला थोर। मग स्कंधी वाहीन सुंदर। वेगें सत्वर निघाला॥ २९॥ उभयतां करताती स्मरण। हृदयी आठविला रघुनंदन। घरी समाचार न घेतां जाण। कोपती सज्जन आम्हांवरी॥ ३०॥ मग येऊनि दुकानापार्शी। आणोनि सोडिलें स्त्रियेसी। म्हणे सत्य करावें भाकेसी। वाणीयासी सुख द्यावें॥ ३१॥ वाणी पाहात होता वाट। म्हणे रात्री येऊनियां धीट। कैसी ठकून गेली नष्ट। तंव अवचट आली पुढें॥ ३२॥ मग हर्ष झाला वाणीयासी। भीतरी येई वो गुणरासी। तंव आशंका झाली मानसी। नवल तुजपासीं दिसतसे॥ ३३॥ बैसलीं स्वस्थानीं दोघेजणें। उपरी आरंभिलें बोलणें। कोरडी आलीस कवण्या गुणें। मृत्तिका चरणीं न लागेची॥ ३४॥ वरुनी वर्षताती मेघ। जाला कर्दम वाहाती वोघ। कैसें कौतुक झालें तें सांग। आतांवेगें करुनियां॥ ३५॥ ऐक गा सेटीया धर्मवंता। बोलती झाली गा कबीर कांता। तुझा उपकार नये सांगतां। साधुसंतां तृप्त केलें॥ ३६॥ झालें संतसमाधान। हें तंव तुझेंचि पुण्य। मी नव्हे उपकारा उत्तीर्ण। सत्त्वरक्षण तुझेनी॥ ३७॥ कबीर जीवाचा जिवलग। मज स्कंधी वाहुनी चांग। वारूनी झांकिलें सर्वांग। आणिलें वेगें तुजपाशीं॥ ३८॥ आपण गेले हो त्वरित। घरी एकले साधुसंत। आतां सांडी गा चित्ताची भ्रांत। पुरवी मनोरथ आपुले॥ ३९॥ ऐसें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

बोलतांच सुंदरा। तंव वाणी कांपतसे थरथरा। धिक् माझें जन्म दातारा। विषय व्यभिचारा प्रवर्तलें॥ ४०॥ मी मतीहीन अज्ञान भारी। कुबुद्धि अमंगळ शरीरी। व्यर्थ भूमीभार संसारीं। मग अंतरी पस्तावला॥ ४१॥ होता विषयभाव मनी। तो गळीत झाला तत्क्षणी। मग धांवुनी लागला चरणीं। मजलागुनी उद्धरावें॥ ४२॥ अन्याय झाला माते। सर्व शब्द क्षमा करी वो दुरितें। हे माते पुण्य पवित्रे धैर्यवंते। मी मोहीत मूढमति म्हणोनियां॥ ४३॥ आतां मज आणि कबीरासी। भेट करवी दोघांसी। मज उद्धरावे त्वरेंसी। म्हणोनि चरणा मिठी घाली॥ ४४॥ मग म्हणे भला भला गा शेटी। बरवा भाव धरिला पोटीं। आतां चला उठाउठी। करीन भेंटी कबीरासी॥ ४५॥ मग उठोनि दोघेजण। त्वरें आटोपिलें दुकान। वेगें चालिलें टाकिलें भुवन। देखिले चरण कबीराचे॥ ४६॥ घातले दोघें दंडवत नमस्कार। म्हणे मी अपराधी थोर। माझा करावा जी उद्धार। अभयकर ठेवूनियां॥ ४७॥ कबीर अंतरज्ञानी पूर्ण। ओळखिलें तयाचे चिन्ह। मग स्वकरें कुरवाळून। दिधलें दान अभयीं॥ ४८॥ कबीरभक्त ज्ञान विश्वासी। सदा संतुष्ट आणि उदासी। झाला रूप स्वयंप्रकाशी। उडाला भाव द्वैताचा॥ ४९॥ येथून कथा रसाळ पुढती। एकाग्र होवोनी परिसिजे श्रोत्री। नामा सांगे भक्तांची विभूति। होय सुखप्राप्ति स्वानंदे॥ ५०॥ इति श्री ग्रंथनामावळी। जे प्रार्थना करती प्रातःकाळी। तयाच्या पापाची होय होळी। होय अक्षयी दास रामाचा॥ ५१॥

कमाल.

२३३५. कबीराचे घरी आले संतजन। रात्र झाली जाण प्रहर एक॥ १॥ उठोनी कबीर संतां नमन केलें। बैसावया दिलें तृणासन॥ २॥ कांतेसी म्हणत संत उपवासी। यासी भोजनासी घालावें हो॥ ३॥ अवश्य म्हणे कांता एक युक्ति करा। कमाल दुसरा घेऊनि संगें।॥ ४॥ ऐशा समयांत वाणी ते निद्रिस्य। चला जाऊं तेथें चोरीलागी॥ ५॥ चोरूनियां धान्य घेऊनियां यावें। संतांसी घालावें भोजनासी॥ ६॥ घेऊनियां शस्त्र उभयतां निघाले। घर तें फोडिलें वाणियाचें॥ ७॥ प्रथम देखिली द्रव्याची ते रासी। नये उपयोगासी आमुचिया॥ ८॥ पुढें तें देखलिं डाळ आणि पीठ। आनंदलें मोठें मन त्यांचें॥ ९॥ सर्वही साहित्य होते वाण्याघरीं। कमाल अंतरी संतोषला॥ १०॥ संतांचे पुरती सामोग्री घेतली। मोट ते बांधिली वरी तेणें॥ ११॥ घेऊनियां मोट गवाक्षद्वारें। कबीराचे करें दिली तेणें॥ १२॥ मोकळ्या पडल्या द्रव्याचिया रासी। सावध वाण्यासी करूनि येतो॥ १३॥ येवोनी कमाल वाणियासी बोले। सांभाळ आपुलें द्रव्य आतां॥ १४॥ आइकोनी शब्द वाणी जागा झाला। कमाल चालिला तेथोनियां॥ १५॥ तांतडीनें निघतां गवाक्षाचे द्वारें। अर्ध तें शरीर गुंतलेंसें॥ १६॥ त्वरें करोनियां वाणी तो धांवला। कमाल धरिला पायी तेणें॥ १७॥ तेव्हां तो कमाल म्हणे कबीरासी। न सोडी मजसी वाणी आतां॥ १८॥ आतां ताता तुम्ही कापा माझें शीर। जावें हो सत्वर धांवोनियां॥ १९॥ न कापितां शीर होईल फजिती। घरासी न येती संत कोणी॥ २०॥ खरें मानूनियां काढियेलें शस्त्र। कापियेलें शीर कमालाचें॥ २१॥ त्वरें करोनियां कबीर चालिला। आश्रमासी गेला आपुलिया॥ २२॥ झाला जो वृतांत सांगे कांतेलागी। येरी म्हणे स्वामी बरें केलें॥ २३॥ धन्य तो कमाल धन्य त्याची भक्ति। देह संतांप्रती अर्पियेला॥ २४॥ याचा खेद स्वामी न धरावा चित्ता। सामोग्री हे संतां अर्पा तुम्ही॥ २५॥ देवीनी सामोग्री संतांसी तो म्हणे। करावें भोजन स्वामी आतां॥ २६॥ घेवीनी सामोग्री केलेंसें भोजन। करिती कीर्तन नामघोष॥ २७॥ इकडे वाणियानें केलासे गलबला। चोर धरियेला धांवा धांवा॥ २८॥ धांवोनिया आले नगरीचे लोक। पाहाती अनेक तयालागीं॥ २९॥ रुंड असे तेथें त्यासि नाहीं शीर। करिती विचार एकमेक॥ ३०॥ म्हणती वाण्यासी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काय तुझें नेलें। शोधोनि पाहिलें मग त्यानें॥ ३१॥ सर्वस्वही आहे नेलें डाळ पीठ। साहित्य तें मिष्ट भोजनाचें॥ ३२॥ श्रुत झाली वार्ता गांवीच्या राजाला। म्हणे त्या चोराला शुळीं घाला॥ ३३॥ राजदूत तेव्हां आले धांवोनियां। रुंड घेवोनियां चालिले ते॥ ३४॥ शूळ तो रोंविला भागीरथी तीरीं। रुंड तयावरी घातलें तें॥ ३५॥ पाहाती ते जन सर्व नागरिक। करील कवतुक पांडुरंग॥ ३६॥ कबीरासी संत आशिर्वाद देत। कृपा सदोदित असों द्यावी॥ ३७॥ वैष्णवांचा मेळ पुसोनि चालिला। कबीर निघाला बोळवीत॥ ३८॥ करिती गजर हरिच्या नामाचा। पंथ भागिरथीचा धरिला त्यांनी॥ ३९॥ भागिरथी तीरीं रोंविलासे शूळ। नयनीं सकळ पाहाती संत॥ ४०॥ शूळावरी रुंड देखिलें नयनीं। हात जोडुनी दोन्ही नमस्कारी॥ ४१॥ सर्वत्रीं देखिलें आपुलिया डोळां। जीव निर्जिवाला आला कैसा॥ ४२॥ वैष्णव पुसती कबीरालागोनी। विपरीत करणी कैसी झाली॥ ४३॥ तेव्हां तो कबीर बोलतसे संतां। चोर हा देखिला हरिभक्त॥ ४४॥ तुम्हांपाशीं त्याचें गुंतले संचित। म्हणूनि दंडवत केलें त्यानें॥ ४५॥ तंव त्या संतांनी घेतलीसे आळी। उठवीं वनमाळी यासी आतां॥ ४६॥ तंव त्या कबीरें श्रुत केली वार्ता। तेव्हां त्या हो संतां समजलें॥ ४७॥ तेव्हां ते वैष्णव बोलती सकळ। आणा शिरकमळ तुम्ही येथें॥ ४८॥ इकडे मातेनें कमालाचें शीर। घेवोनी धणीवर पाहे दृष्टी॥ ४९॥ म्हणे धन्य बाळा येउनी पोटाशीं। उभय कुळांसी उद्धरिलें॥ ५०॥ संतांचिया काजा वेंचिलासी प्राण। जगीं तूंचि धन्य म्हणविलें॥ ५१॥ वैकुंठीचा वासी झालासी मिरासी। आम्हां पतितांसी सोडियेलें॥ ५२॥ तुजसवें मज जावें बा घेवोनी। करी विनवणी पांडुरंगा॥ ५३॥ तुजविण मज न गमे सखया। येईं तूं तान्हया धांवोनियां॥ ५४॥ हरणी चुकली जैसी कां पाडसा। दश दिशा ओसा तिजलागीं॥ ५५॥ तेंसें मज झालें न गमेचि कांही। भेट माझे आई कमाला तूं॥ ५६॥ काय तुझे गुण आठवूं मी आतां। सत्त्वधारी सुता कबीराच्या॥ ५७॥ नाशवंत देह त्याचा केला त्याग। धन्य हें वैराग्य तुझें बापा॥ ५८॥ ऐसी तेही माय करितसे शोक। अकस्मात देखे कबीराला॥ ५९॥ झालें वर्तमान सांगितलें तिसी। चिंता हे मानसी करूं नको॥ ६०॥ वेगीं देईं शीर उठला कमाल। संतांचा हा बोल सत्य असे॥ ६१॥ संभाळित शीर घेऊन कबीर। संतांचिया करें दिलें तेव्हां॥ ६२॥ उतरुनी रुंड वैष्णवांनी शीर। ठेविलें झडकरी नामघोषें॥ ६३॥ भावाचा तो देव भक्तीचा अंकिला। कमाल उठिला तेचि वेळीं॥ ६४॥ हरि नामघोषें करूनि गजर। संतां नमस्कार केला तेणें॥ ६५॥ ऐसें सकळ जनी पाहिले कौतुक। संतांचा अधिक महिमा असे॥ ६६॥ नामा म्हणे त्याचा होईन मी दास। शरण तयांस वारंवार॥ ६७॥

मिराबाई.

२३३६. राजियाची कन्या नाम मिराबाई। विठोबाचे पायीं रत सदां॥ १॥ मायबाप तिचे करिती कृष्णसेवा। आवडीनें देवा पूजिताती॥ २॥ सवें मिराबाई जात असे नित्य। वेधलेंसें चित्त कृष्णपायीं॥ ३॥ मिरा गुणवंती लावण्याची खाणी। आवडे ती मनीं मायबापां॥ ४॥ म्हणती देवा इचा करावा सांभाळ। हांसे ते वेल्हाळ मिराबाई॥ ५॥ मायबापें मज केलें कृष्णार्पण। हरुषलें मन फार तिचें॥ ६॥ वरिला म्यां आतां द्वारकेचा नाथ। समाधान चित्त झालें माझें॥ ७॥ आनंदानें करी देवाचें पूजन। नाचे उल्हासानें प्रेमें डोले॥ ८॥ संत आणि साधु येती कीर्तनासी। आनंद मानसीं होय तिच्या॥ ९॥ संतांचिया पायीं मिरा असे लीन। अहोरात्र ध्यान देवाजीचें॥ १०॥ समारंभ ऐसा होतां नित्यानित्य। आनंदभरित मायबाप॥ ११॥ धन्य मिराबाई भक्तीची आवडी। लागलीसे गोडी देवाजीची॥ १२॥ सज्जन अंतरी संतोष मानिती। निंदक निंदिती तिजलागीं॥ १३॥ राजियानें कन्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देखीनि उपवर। द्यावें इशीं घर करोनियां॥ १४॥ बोले मिराबाई ऐका तुम्ही ताता। वरिला म्यां आतां चक्रपाणि॥ १५॥ उभयतां तुम्ही केलें कृष्णार्पण। तें कां हो स्मरण विसरलें॥ १६॥ त्यानें केला असे माझा अंगिकार। नका पाहूं वर दुजा आतां॥ १७॥ देवाविण मज नावडे आणीक। मोठे आहे सुख देवापायीं॥ १८॥ फार गोडी त्यातें वर्जितांचि नये। बोलूं आतां काय एक मुखें॥ १९॥ तेव्हां मातापिता करिती उत्तर। बौद्ध अवतार देव झालें॥ २०॥ नामी रूपीं त्याच्या असों द्यावें चित्त। असे सर्व हित प्रपंचाचें॥ २१॥ ओळखुनि रूप करावा संसार। सर्व व्यवहार असे त्याचा॥ २२॥ ऐकोनियां ऐसें स्वहिताचे ठायीं। बोले मिराबाई पितयासी॥ २३॥ आधीं ज्यानें केलें अमृत प्राशन। नावडे त्या धुवण कदाकाळी॥ २४॥ मुंगिवे लागली साखरेची गोडी। आवडीनें उडी घालीतसे॥ २५॥ राजहंस पक्षी मोतीयांचा चारा। आणिक इतरा न सेविती॥ २६॥ तैसा म्यां वरिला असे हा गोविंद। नका करूं शोध आणिकांचा॥ २७॥ हरिविणें कांहीं नेणें मी आणीक। सर्वही जनलोक माझे बाप॥ २८॥ तुम्ही म्हणा बौद्ध झाले चक्रपाणि। संशय हा मनीं न धरावा॥ २९॥ भाविकासी दृश्य अभाविका बौद्ध। मोठा हा सावध नारायण॥ ३०॥ लक्ष असे ज्याचें देवाजीचे पायीं येऊनियां राही हृदयांत॥ ३१॥ त्याचा सर्व धंदा करी चक्रपाणि। बोलिले पुराणीं व्यासादिक॥ ३२॥ संशय चित्तांत नका धरूं आतां। सर्व हा जाणता पांडुरंग॥ ३३॥ नाम्यासंगें जेवी आवडी हा जाणा। कैसें तया म्हणा बौद्ध आतां॥ ३४॥ कबीराचे मागी विणितसे शेले। जाटाचें राखिलें शेत तेणें॥ ३५॥ आणिकही कामें भक्तांघरीं करी। काय त्याची थोरी वर्णूं आतां॥ ३६॥ राजा म्हणे मिरा समजली पूर्ण। परी जग दूषण ठेविताती॥ ३७॥ म्हणेनियां त्यानें केली बंदोबस्ती। प्रवेश तो संतीं न होयची॥ ३८॥ मिराबाई म्हणे अहो पांडुरंगा। कांहो संतसंगा अंतरलें॥ ३९॥ संतांचे संगतीं आनंदसोहळा। दाखवाल डोळा केव्हां देवा॥ ४०॥ कनवाळू मोठी सांवळी विठाई। नेई मिराबाई कीर्तनासी॥ ४१॥ श्रुत झाली वार्ता तेव्हां राजियासी। जाते कीर्तनासी मिराबाई॥ ४२॥ क्रोधावून नृप बोले त्या कांतेला। देईं विषप्याला मिरालागीं॥ ४३॥ लौकिकाची लाज सोडियेली तिणें। उपाय करणें हाचि आतां॥ ४४॥ तेचि वेळीं प्याला भरोनियां विष। आली मंदिरास तेव्हां तिच्या॥ ४५॥ येई मिराबाई लाविलें दूषण। ऐसें सर्व जन बोलताती॥ ४६॥ म्हणोनियां नृपें दिला विषप्याला। कुळासि लाविला डाग तुवां॥ ४७॥ बोले मिराबाई सांवळ्या अनंता। तूं एक जाणता पांडुरंगा॥ ४८॥ गेला तरी जावो सुखें माझा प्राण। निवारी दूषण राजियाचें॥ ४९॥ म्हणेनियां नृपें दिला विषप्याला। ही लाज तुजला देवराया॥ ५०॥ मिरा त्याचे पोटीं झाली अपवित्र। बोलती सर्वत्र जग ऐकें॥ ५१॥ कळेल हो तैशी राखी याची लाज। वारंवार तुज काय सांगूं॥ ५२॥ करूनियां तेव्हां कृष्णाचें चिंतन। प्याली आवडीनें विष प्याला॥ ५३॥ नाहीं बाधा झाली तयाची ते वेळीं। मूर्ति झाली काळी देवाजीची॥ ५४॥ येऊनियां नृपें विलोकिलें डोळां। आणिक सकळा जनांनी ते॥ ५५॥ धन्य मिराबाई वंदिती चरण। जन्मलें निधान वंशामाजीं॥ ५६॥ मिरा वनमाळी नव्हेचि वेगळी। निश्चय सगळीं अंतीं केला॥ ५७॥ बोले मिराबाई अहो चक्रपाणि। कां तुम्ही जाचणी सोसितसां॥ ५८॥ प्रेमें अश्रुनीर वाहे तिचे डोळां। माझा कळवळा तुम्हां आला॥ ५९॥ सांवळे सुकुमार गोजिरे चरण। इच्छितसे मन पहावया॥ ६०॥ भक्तांची आवही पुरवी केशव। पूर्ववत देव झाला तेव्हां॥ ६१॥ निळी रेषा असे अद्याप ते कंठीं। देतां प्रीति मिठी पाहती लोक॥ ६२॥ धन्य मिराबाई धन्य तिची भक्ति। करिताती स्तुति साधुसंत॥ ६३॥ संतांचा तो दास बोले शिंपी नामा। त्यानें दिला प्रेमा सदां मज॥ ६४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भानुदास

२३३७. पंढरीसी यात्रा मिळाली अपार। नाहीं तो सुंदर पांडुरंग॥ १ ॥ म्हणती संतजन काय झाला देव। पडलासे संदेह सकळांसी॥ २ ॥ कांहो उपेक्षिलें कृपाळु अनंता। भेट देई संतां आपुलिया॥ ३ ॥ आयोध्या नगरासी नेला पंढरीराय। कळला अभिप्राय सकळांसी॥ ४ ॥ ऐसा कोणी भक्त आहे पराक्रमी। रुक्मिणीचा स्वामी आणी येथें॥ ५ ॥ ऐकोनियां मात कोणीच न बोले। म्हणीन उपेक्षिलें पांडुरंगा॥ ६ ॥ बोले भानुदास अणितों मी देव। कैसा पंढरीराव गेला पाहीं॥ ७ ॥ भानुदासें केलें सकळिकां नमन। मग आज्ञा घेऊन चलिला तो॥ ८ ॥ अयोध्या नगरासी गेला भानुदास। पंढरीनिवास पाहावया॥ ९ ॥ दुंदुभी वाजती वाजंत्रीची ध्वनि। परी चक्रपाणि दृष्टी नये॥ १० ॥ प्रातःकाळीं पूजा केली रामरायें। आणिका न होय दर्शनची॥ ११ ॥ कवाडें अर्गळा कुलुपे असती द्वारीं। करूनियां भितरीं पांडुरंगा॥ १२ ॥ देखोनि कवतुक बोले भानुदास। भला बसलास देवा येथें॥ १३ ॥ भाग्यवंत देव झालासि तूं आतां। दुर्बळ अनाथा कोण पुसे॥ १४ ॥ तेव्हां झाली रात्र पडिला अंधकार। जोडोनियां कर विनवितंसे॥ १५ ॥ आतां देवा तुम्ही चलावें येथूनि। नाहीं तरी आम्ही भले नाहीं॥ १६ ॥ आम्हांसि टाकूनि येथें वैसलासी। पोटच्या पोरासी कोण पोसी॥ १७ ॥ आम्हां वांचोनियां नाही तुम्हां गति। न करीं फजिती जगामध्यें॥ १८ ॥ करुणा वचन भाकोनियां येथें। केलासे उपाय भानुदासें॥ १९ ॥ कुलुपें कवाडा बंधन उघडती। देखिली श्रीमूर्ति भानुदासें॥ २० ॥ राउळाभीतरीं गेला भानुदास। साष्टांगीं चरणादास नमन केलें॥ २१ ॥ सद्गदीत कंठ झाल्या दोघां भेटी। आनंद तो पोटीं सामावेना॥ २२ ॥ देवा तुम्ही कांहो सोडिली पंढरी। लागलीसे गोडी वैभवाची॥ २३ ॥ म्हणे पांडुरंग बंदीं मी पडिलों। भिमा अंतरलों चंद्रभागा॥ २४ ॥ नवरत्नांची माळा घालूनियां कंठीं। म्हणे द्यावी भेटी प्रातःकाळीं॥ २५ ॥ देउळाबाहेरी गेला भानुदास। कुलुपे कवाडास बंधन झालें॥ २६ ॥ प्रातःकाळीं दर्शन भानुदास करी। आठवी श्रीहरि हृदयामाजीं॥ २७ ॥ घालूनि आसन बैसला ध्यानस्त ठेवोनियां चित्त पांडुरंगीं॥ २८ ॥ प्रातःकाळीं पूजा करावया आला। रामराय न देखे माळा रत्नाचि ते॥ २९ ॥ कोणी नेली माळा झालासे बोभाट। ताडिलें सत्वर पुजाऱ्यासी॥ ३० ॥ चोर पहावयासी सेवक धांवती। माळा दिसे कंठीं भानुदासा॥ ३१ ॥ त्यासी देखूनि ताडिती प्रसिद्ध। म्हणती हाचि पक्का मैंद चोर असे॥ ३२ ॥ चोर धरूनियां रायापाशीं नेला। म्हणती यासी घाला सुळावरी॥ ३३ ॥ शूळ तासोनियां खांदीं जो दिधला। मागें चालविला भानुदास॥ ३४ ॥ भानुदास म्हणे ऐकावें वचन। भेटी मी घेईन विठोबाची॥ ३५ ॥ आला भानुदास देवा नमन केलें। शिक्षेसी लाविलें म्हणें आम्हां॥ ३६ ॥ अगा तुम्ही देवा लोभ असो द्यावा। आठव धरावा हृदयांमध्यें॥ ३७ ॥ तुजमज वियोग केंवि होय देवा। न सोडूं कोशवा चरण तुझे॥ ३८ ॥ शूळ नेवोनियां वेसीबाहेर रोविला। म्हणती आतां याला वर घाला॥ ३९ ॥ तेव्हां भानुदास आठवी विठ्ठला। म्हणति लवकर घाला सुळावरी॥ ४० ॥ भक्ताचा कळवळा पांडुरंगा आला। कंठ तो फुगला सद्गदित॥ ४१ ॥ नेत्रीं अश्रुधारा कांपतो थरथरी। भक्ताचा कैवारी धांविन्नला॥ ४२ ॥ शूळा अकस्मात पाला तो फुटला। फळें पुष्पें तो झाला घवघवीत॥ ४३ ॥ शूळ वृक्ष झाला सांगती रायाला। विस्मय वाटला सकळिकांसी॥ ४४ ॥ भानुदासा नमन केलें रामरायें। म्हणे हा अन्याय घडिला आम्हां॥ ४५ ॥ पांडुरंगापाशीं आले दोघे भक्त। प्रेमें सद्गदित झाला कंठ॥ ४६ ॥ पांडुरंग म्हणे कोणी गांजिले माझ्या भक्तां। सांग भानुदासा काय झालें॥ ४७ ॥ आमचा कैवारी कृपाळु श्रीहरि। असतां साहाकारी कोण गांजी॥ ४८ ॥ आतां तुम्ही देवा बसावें खांदेसी। नेईन मी तुम्हांसी पंढरीसी॥ ४९ ॥ रामराय म्हणे मज उपेक्षिले। येथोनियां वहिले तुम्ही

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जातां ॥ ५० ॥ आपुलें वचन सत्य केलें देवा। लोभ आम्हांवरी असो द्यावा ॥ ५१ ॥ घेवोनी खांदेसी देव बैसविला। पंढरीसी आला भानुदास ॥ ५२ ॥ झालीसे दाटणी करिती नमस्कार। मोठा संतभार जमला तेथें ॥ ५३ ॥ नामदेव म्हणे संतांचे संगती। अधमही होती संतजन ॥ ५४ ॥

जगमित्र नागा.

२३३८. परळीं वैजनाथीं जगमित्र नागा। ध्यानीं पांडुरंगा आठवीत ॥ १ ॥ सर्वाभूतीं त्यासी दिसे वासुदेव। नाहीं दुजा भाव त्याचे मनी ॥ २ ॥ निंद्य आणि वंद्य लेखितो सारिखें। पाहे ब्रह्मरूप सर्वत्रांसी ॥ ३ ॥ रात्रंदिवस करी हरीचें भजन। सुखें आनंदानें राहतसे ॥ ४ ॥ सज्जन हे त्यासी बहुत मानीति। दुर्जन द्वेषिती त्याजलागीं ॥ ५ ॥ परि त्याचे चित्तीं वाटेना हें दुःख। मानी प्रेमसुख आनंदानें ॥ ६ ॥ दुर्जनांनीं त्याच्या घरासी तो अग्नि। लाविला येऊनि रात्रीमध्यें ॥ ७ ॥ अग्नि मोठा तेव्हां प्रदिप्त तो झाला। वृत्तांत कळला सज्जनांसी ॥ ८ ॥ धांवूनि ते आले पाहती नयनीं। कांहो चक्रपाणि ऐसें केलें ॥ ९ ॥ तुजविण कोण राखे यासी आतां। धांव तूं अनंता योचि वेळां ॥ १० ॥ पांडव राखिले लाक्षांतून जोहरी। तैसी करीं परी नागयासी ॥ ११ ॥ येथें नाहीं देवा कोणाचा उपाय। घालीं आतां धांव पांडुरंगा ॥ १२ ॥ प्रल्हाद रक्षिला अग्नि तो माझारी। तैसी करी परी यासी आतां ॥ १३ ॥ ब्रीद हें सांभाळी आपुलें अनंता। राखी आतां भक्तां आपुलिया ॥ १४ ॥ ऐकोनियां स्तुति आलें नारायण। शांत झाला अग्नि तेचि वेळां ॥ १५ ॥ स्वस्थ असे नागा आनंदानें सुखें। पाहती सर्व लोक परळीचे ॥ १६ ॥ सज्जन संतोष अंतरीं मानिती। धांवण्या श्रीपति धांविन्नला ॥ १७ ॥ भक्तां सहकारी असे नारायण। केलें निवारण। विघ्नाचें त्या ॥ १८ ॥ दुर्जनांची तेव्हां तोंडें जाहलीं काळीं। साह्य वनमाळी भक्तांलागीं ॥ १९ ॥ चाहुर एक भूमी इनाम त्या दिली। पत्रिका लिहिली त्याच्या नांवें ॥ २० ॥ ग्रामवासी त्यासी पिकवुनी धान्य। देती तें नेऊन नाग्या घरीं ॥ २१ ॥ वारषिक नेम चालविती लोक। आला नवा एक अमलदार ॥ २२ ॥ करोनि पाहणी मागतसे सारा। नायके विचारा कोणाचिया ॥ २३ ॥ तयासी उत्तर करिती ग्रामवासी। नवासिलें देवासी सर्वत्रांनीं ॥ २४ ॥ जगमित्र नागा हरिचा तो भक्त। सांगती वृत्तांत त्याजलागीं ॥ २५ ॥ याचे मनीं नाहीं कांहीं दुजाभाव। सर्वांभूतीं देव पहातसे ॥ २६ ॥ कृपावंत असे यासी चक्रपाणि। नका तुम्ही मनीं आणूं दुजें ॥ २७ ॥ मनामाजीं त्यानें केला तो विचार। पाहूं चमत्कार याचा आतां ॥ २८ ॥ जगमित्र नागा त्यानें बोलाविला। बोलता त्या झाला सुभेदार ॥ २९ ॥ आमुचिया घरीं मुलीचें तें लग्न। व्याघ्राचें कारण असें आम्हां ॥ ३० ॥ घेऊनियां आतां यावा तुम्ही व्याघ्र। म्हणवितां जगमित्र पाहूं कैसें ॥ ३१ ॥ व्याघ्ररूप असे माझा नारायण। येतों मी घेऊनी आतांची हा ॥ ३२ ॥ आनंदानें नागा निघाला तेथुनी। आला असे वनीं अरण्यांत ॥ ३३ ॥ धांवूनियां तेथें आले पांडुरंग। पुसतसे अंगें त्याजलागीं ॥ ३४ ॥ कोठें जासी बापा घोर अरण्यांत। भय असे तेथें श्वापदांचें ॥ ३५ ॥ मारतील तुज फिर तूं माघारीं। येरू म्हणे हरि रक्षी आम्हां ॥ ३६ ॥ सुभेदार माझा असे परममित्र। पाहिजे हा व्याघ्र त्याजलागीं ॥ ३७ ॥ येरु म्हणे सुभेदार आहे नष्ट। काय त्याची गोष्ट ऐकसी तूं ॥ ३८ ॥ तया चांडाळासी वधितों मी आतां। झाला तो बोलता जगन्मित्रा ॥ ३९ ॥ तूंचि हा चांडाळ बोलसी या गोष्टी। नको करूं कष्टी मित्र माझा ॥ ४० ॥ जाय तूं वाटेनें आपुल्या या आतां। होतसे बोलतां उशीर मज ॥ ४१ ॥ व्याघ्र तेचि वेळां जाहले नारायण। धरी आलिंगुनी नागा त्यासी ॥ ४२ ॥ गळां त्याचे तेव्हां बांधिले अंगवस्त्र। घेऊनियां व्याघ्र आला नागा ॥ ४३ ॥ भयाभीत झाले तेव्हां ग्रामवासी। लावियेल्या वेशी गांवाचिया ॥ ४४ ॥ ग्रामवासीयांनीं लावियेलें द्वार। करी सुभेदार विचार तेव्हां ॥ ४५ ॥ करीत गर्जना

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

भयानक व्याघ्र। कांपती थरथर सकळ लोक ॥ ४६ ॥ जगमित्र नागा आला वेसीपाशीं। उघडा द्वारासी हांका मारी ॥ ४७ ॥ ऐकोनियां कोणी न देती उत्तर। मोडियेलें द्वार व्याघ्रानें तें ॥ ४८ ॥ प्रवेशला नागा सुभेदारा घरीं। हांका त्यासी मारी यावें आतां ॥ ४९ ॥ करा कार्यसिद्धि घेऊनियां व्याघ्र। हांका वारंवार मारीतसे ॥ ५० ॥ द्वारपाळ त्याचे नुघडिती द्वार। मोडोनियां व्याघ्र शिरे आंत ॥ ५१ ॥ करीत गर्जना आपटूनि पुच्छ। जाहले भयाभीत सकळ लोक ॥ ५२ ॥ सुभेदार होता जया मंदिरांत। व्याघ्र नागा आंत गेले दोघे ॥ ५३ ॥ सुभेदार बोले द्वाराचे आंतून। देई जीवदान मज आता ॥ ५४ ॥ पतीत मी पापी तुझा शरणागत। होईं कृपावंत जगमित्रा ॥ ५५ ॥ कर जोडोनियां करितों विनंती। अज्ञानाची भ्रांति झाली मज ॥ ५६ ॥ वारंवार तुज येतीं लोटांगणीं। देई वा सोडोनी वनीं व्याघ्र ॥ ५७ ॥ कृपावंत साधु वर्णिताती वेद। करी अपराध क्षमा माझा ॥ ५८ ॥ ऐकोनियां व्याघ्र गर्जना करीत। भक्षावया धांवत त्याजलागीं ॥ ५९ ॥ जगमित्र नागा आवरीत त्यासी। चाल तूं वनासी मायबापा ॥ ६० ॥ घेऊनियां व्याघ्र चालिला जगमित्र। पाहती सर्वत्र लोक तेव्हां ॥ ६१ ॥ भक्तांनीं जिंकिला भाव बळें देव। घालीतसे धांव संकटीं तो ॥ ६२ ॥ संतांचा महिमा न वर्णवे कांहीं। जाहला लीन पायीं नामदेव ॥ ६३ ॥

संताजी पवार.

२३३९. रांजण गांवामध्यें संताजी पवार। असे तो सरदार नामांकित ॥ १ ॥ स्वामीकाजामध्यें असे तो सावध। भावें हा गोविंद आठवीत ॥ २ ॥ शास्त्र भागवत करितां श्रवण। समजलें पूर्ण मनामाजीं ॥ ३ ॥ नाशवंत सर्व आहे हा संसार। नाम एक सार विठोबाचें ॥ ४ ॥ ऐसें कांहीं आतां करावें साधन। रामनामीं मन लागेल तें ॥ ५ ॥ कासियासि आतां हा पाहिजे उद्योग। घेतलें वैराग्य तेचि वेळां ॥ ६ ॥ मातेलागीं तेव्हां केला नमस्कार। निघाले हे त्वरें तेथूनियां ॥ ७ ॥ बाबा संतराजा कां बा केला त्याग। घेतलें वैराग्य कासयास ॥ ८ ॥ काय जडभारी पाडियलें तुज। सांग कैसें गुज मजलागी ॥ ९ ॥ नको नको माते या संसाराची बेडी। फारच आहे गोडी हरिनामांत ॥ १० ॥ नामामृत पान करीन हें आतां। समाधान चित्ता होय माझ्या ॥ ११ ॥ करूं दे सार्थक आलिया देहास। नको भव फांस घालूं आतां ॥ १२ ॥ वारंवार तुज हेचि विज्ञापना। पाहूं दे चरणा देवाजीच्या ॥ १३ ॥ कृपा करूनियां देई आशिर्वाद। सखा हा गोविंद करी माझा ॥ १४ ॥ करुनी प्रार्थना निघाले तेथुनी। चालिले ते वनीं अरण्यांत ॥ १५ ॥ नको नको मज भव हा संसार। उतरावें पार मजलागीं ॥ १६ ॥ धांविन्नली कांता तेव्हां त्याचे मागें। न्यावें स्वामीसंगें मजलागीं ॥ १७ ॥ गंगेचा हा ओघ सागरासी गेला। नाहीं परतला मागुता तो ॥ १८ ॥ ऐसे महाराज तुम्ही कृपावंत। समाधान चित्त करा माझें ॥ १९ ॥ येईन सांगातें करीन हे सेवा। मान्य हे केशवालागीं असे ॥ २० ॥ पहा महाराज तुम्ही कृपादृष्टी। कां मज हिंपुटी करीतसां ॥ २१ ॥ जळा तो वेगळा कैसा राहे मीन। जाईल हा प्राण तेचि वेळां ॥ २२ ॥ तुमचे चरणीं बहु आहे सुख। नको भवदुःख संसार हा ॥ २३ ॥ सार रामनाम फार आहे गोड। पुरवा आवड माझी आतां ॥ २४ ॥ आवडीचें लेणें द्यावें मज आतां। तुम्ही प्राणनाथा कृपासिंधु ॥ ५ ॥ रामनाम अंगी लेववा भूषण। तेणें समाधान होय माझें ॥ २६ ॥ दीपक ही प्रभा नव्हेचि वेगळी। पाहूं वनमाळी संगें दोघे ॥ २७ ॥ तेव्हां संतराज करिती उत्तर। न धरवे धीर तुजलागीं ॥ २८ ॥ न सोसवे तुज कठीण वैराग्य। नको येऊं मागें माझ्या आतां ॥ २९ ॥ सांडोनियां द्यावी देहाची हे आस। तेव्हां तुटेल फांस संसाराचा ॥ ३० ॥ काम क्रोध यांसी देऊं नये थार। लीन व्हावें फार संतांपायी ॥ ३१ ॥ वस्त्रें भूषणांची धरूं नये चाड। घ्यावें नाम गोड गोविंदाचें ॥ ३२ ॥ लौकिकाची कांही धरूं नये

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लाज। बोलावें हें गुज देवाजीसी॥ ३३॥ द्वैत कल्पनेचा नसे जेथें ठाव। तोचि झाला देव स्वयें अंगें॥ ३४॥ ऐकोनियां ऐसें बोले कांता त्यासी। आनंद मानसीं हाचि माझ्या॥ ३५॥ तेचि वेळां केला भूषणाचात्याग। घेतलें वैराग्य पतिसंगें॥ ३६॥ पांडुरंग ध्यानी पांडुरंग मनीं। राहती ते वनीं आनंदानें॥ ३७॥ तेव्हां संतराज बोले कांतेलागीं। भिक्षेलागीं वेगीं जावें आतां॥ ३८॥ पारगांव असे भीमे पलीकडे। कोणासी सांकडें न घालावें॥ ३९॥ संतोषानें जें कां देतील पदरीं। म्हणावें श्रीहरी अर्पण तें॥ ४०॥ आनंदानें तेव्हां निघाली तेथुनी। वाचें नारायण गात असे॥ ४१॥ भिक्षा मागतांना नणंद भेटली। तिणें ओळखिली भावजई॥ ४२॥ कासयासी बाई घेतलें वैराग्य। कां गे केला त्याग संसाराचा॥ ४३॥ सांडोनियां सर्व हें राज्य संपत्ती। उदास कां चित्तीं झालां तुम्ही॥ ४४॥ ऐकोनियां येरी करीत उत्तर। सांपडलें सार संसारीचें॥ ४५॥ सार नामामृत गोड आहे फार। प्राशन चतुर करिताती॥ ४६॥ सद्गुरुकृपेचा वर्षाव जाहला। प्रसाद लाधला भ्रतारासी॥ ४७॥ त्यांतील हें शेष त्या पात्रीं राहिलें। आवडीं सेविलें माझ्या मनें॥ ४८॥ गोडी त्याची फार सांगतां हे नये। वर्णू आतां काय एक्या मुखें॥ ४९॥ अखंड सेविती नित्य साधुसंत। भाग्य नाहीं अंत त्यांचीया तो॥ ५०॥ येरी म्हणे बाई करावें भोजन। भिक्षा जा घेऊन येथूनियां॥ ५१॥ आग्रह करून दोन पोळ्या आतां। घांतल्या झोळींत न कळतां॥ ५२॥ आज्ञा घेऊनियां निघाली तें त्वरें। पोहोंचली तीरा भीवरेचे॥ ५३॥ भीवरे उगमीं पर्जन्य पडीला। पूर तेथें आला अकस्मात॥ ५४॥ पलीकडे जाण्या न दिसे तीर। झाली चिंतातुर मनामाजी॥ ५५॥ स्वामी माझा तेथें असे उपवासी काय हृषीकेशी करूं आतां॥ ५६॥ ऐकोनियां कोळी झाला नारायण। नेलें उतरून पार तीतें॥ ५७॥ पतीलागीं तिनें केला नमस्कार। ठेविली समोर भिक्षा त्याचे॥ ५८॥ येरु म्हणे कैसी आलीस तूं पार। कोळीयानें त्वरें उतरीली॥ ५९॥ साचा कोळी तेथें आले पांडूरंग। धन्य तुझें भाग्य भेट झाली॥ ६०॥ प्रेमअश्रु डोळां वाहे त्याचे नीर। भेट द्यावी त्वरें पांडूरंगा॥ ६१॥ भेटी वांचूनियां न करी भोजन। करीतसे ध्यान देवाजीचें॥ ६२॥ वाणी एक होता रांजणगांवांत। जाहला दृष्टांत त्याजलागीं॥ ६३॥ बोले पांडुरंग करुनी पक्कान्न। घालावें भोजन संतराजा॥ ६४॥ करुनी पाकसिद्धि वाणी गेला तेथें। सांगे तो वृत्तांत त्याजलागीं॥ ६५॥ येरु म्हणे तुज देवाजी भेंटले। निष्ठुर कां झाले मजविसी॥ ६६॥ करीन भोजन देवा तुझ्या हातें। कांहो माझें चित्त पाहातसां॥ ६७॥ पतीत मी पापी तुझा शरणागत। समाधान चित्त करा माझें॥ ६८॥ न मागें मी कांही देवां तुज आतां। भेट तूं अनंता एक वेळा॥ ६९॥ भाकितां करुणा आले नारायण। करी बा भोजन संतराजा॥ ७०॥ आलिंगूनि दोघां धरिलें हृदयीं झाली विठाबाई कृपावंत॥ ७१॥ काय इच्छा असे मागा तुम्ही आतां। नामी हे अनंता प्रीति देई॥ ७२॥ भिक्षेचें पवित्र भक्षिताती अन्न। अहोरात्र ध्यान देवाजीचें॥ ७३॥ आषाढीची यात्रा जात पंढरीसी। आनंद मानसी जाहला त्यांचे॥ ७४॥ भेटतील आतां माझे दिनानाथ। आणीकही संत साधुजन॥ ७५॥ समारंभें जाती करीत गजर। पोहोंचले तीर भीवरेचें॥ ७६॥ व्रत एकादशी होती तेचि दिनीं। भीवरी भरोनि चाललीसे॥ ७७॥ नामाचेनि छंदे जाहला ब्रह्मानंद। चालिले आनंदें त्याची पंथें॥ ७८॥ कूर्मरूप तेव्हां जाहला नारायण। नेलें उतरून पार त्यातें॥ ७९॥ स्वर्गी सुरवर बैसोनि विमानीं। पाहती नयनीं कवतुक॥ ८०॥ धन्य साधुसंत भाग्यां नाहीं पार। वाहे पृष्ठी भार देव त्यांचा॥ ८१॥ भीमा उतरूनि आले पंढरीसी। आनंद मानसी सर्वत्रांचे॥ ८२॥ आणीकही भार यात्रेचा तो आला। त्यानें हा देखिला नवलावो॥ ८३॥ म्हणती संतराजा नेई आम्हां पार। भेंटवीं हा वर रखुमाईचा॥ ८४॥ कृपावंत साधु आले धाऊनियां।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

म्हणती पंढरिराया सांभाळावें ॥ ८५ ॥ भावाची ही पेठ बांधा बळकट। मार्ग धरा नीट भक्तीचा हा ॥ ८६ ॥ संतांचा हा संग धरावा सप्रेम। न बाधी हा श्रम तुम्हांलागीं ॥ ८७ ॥ रामनाम संगें धरावें भांडवल। वस्तु हे अमोल येईल हातां ॥ ८८ ॥ सभाग्य हे साधु त्यांनी केला सांठा। देतील ते वांटा तुम्हांलागीं ॥ ८९ ॥ नावाचें तें रूप असे सर्व सृष्टी। दाविती ते दृष्टी ज्ञानाची हे ॥ ९० ॥ तेव्हां तुझ्या मना होईल आनंद। तेचि ब्रह्मानंद ओळखावा ॥ ९१ ॥ द्वैत कल्पनेसी नसे जेथें ठाव। आला तोचि देव स्वयं अंगें ॥ ९२ ॥ सद्गुरुकृपेनें हरेल हा भ्रम। दिसेल हें ब्रह्म जग सारें ॥ ९३ ॥ त्याजविण कोठें रिता नाहीं ठाव। धरा नामीं भाव विठोबाच्या ॥ ९४ ॥ उतरूनि भीमा गेले पैलतीरा। भेटावया वरा रखुमाईच्या ॥ ९५ ॥ ब्रह्मानंद झाला सर्वांचे अंतरीं। आनंदें श्रीहरि आठविती ॥ ९६ ॥ पंढरीच्या सुखा भाग्या नाहीं अंत। जाणताती संत साधुजन ॥ ९७ ॥ नित्यानित्य घडे चंद्रभागे स्नान। अखंड दरुशन देवाजीचें ॥ ९८ ॥ तयाचिया भाग्या अंत नाही पार। राहिला सार संतोबा तो ॥ ९९ ॥ नामदेव तेथें याचक भिकारी। हाका त्यासी मारी वारंवार ॥ १०० ॥ कांहीं मज द्यावें तुमचें उच्छिष्ट। भरेल हे पोट तेणें माझें ॥ १०१ ॥ कृपावंत साधु आली त्या करुणा। वंदितो चरणा नामदेव ॥ १०२ ॥

बोधलेंबोबा

२३४०. धामणगांवामध्यें माणकोजी बोधला। आवडे देवाला प्राणाहुनी ॥ १ ॥ बिठोबाचे नामीं रंगलें हें मन। मिळालें जीवन सिंधुमाजीं ॥ २ ॥ आवडीनें केला त्यानें अंगिकार। कृपेचा सागर पांडुरंग ॥ ३ ॥ गुणदोष त्याचे न पाहे चक्रपाणि। बोलिले पुराणी व्यासादिक ॥ ४ ॥ सत्य हेंचि असे सांगतों प्रमाण। भावें करा ध्यान विठोबाचें ॥ ५ ॥ तैसा बोधराज प्रेमळ हा भक्त। भावें आठवीत देवाजीसी ॥ ६ ॥ रात्रीं शेतामाजीं करीत रक्षण। गात नारायण आवडीनें ॥ ७ ॥ राळेरास त्याच्या सासऱ्याचा गांव। त्यांची याची सींव एक असे ॥ ८ ॥ तयाचिया घरीं हांसी कुणबीण। करीत रक्षण शेतामाजी ॥ ९ ॥ बोधराज भावें आळवीत देवा। हांसीचिया जीवा सुख वाटे ॥ १० ॥ विठोबाचे नामीं वेधलेंसे मन। आली ती शरण बोधराजा ॥ ११ ॥ म्हणे बापा मज द्यावा उपदेश। तोडावा हा फांस संसाराचा ॥ १२ ॥ हांसीची तो भाव जाणुनी पवित्र। सांगितला मंत्र त्रिअक्षरीं ॥ १३ ॥ विठ्ठल हें नाम अहोरात्र ध्याई। मग तुला नाहीं भय चिंता ॥ १४ ॥ हरिदिनीं व्रत करी एकादशी। जागर कथेसी करीत जावा ॥ १५ ॥ हांसीचिया मना झाला तो आनंद। भावें हा गोविंद आळवी ती ॥ १६ ॥ चालवीत व्रत नेम एकादशी। जागर कथेसी धामणगांवीं ॥ १७ ॥ बोधराज भक्त भाविक प्रेमळ। कीर्तन रसाळ आवडीचें ॥ १८ ॥ श्रवणासी ते येती गांवीचे ते लोक। वाटतसे सुख तयालागीं ॥ १९ ॥ भवर गांवीचे कीर्तनास आले। त्यांत काय झालें एक ऐका ॥ २० ॥ मार्गी चालतांना सर्पदंश झाला। तेचि वेळां गेला प्राण त्याचा ॥ २१ ॥ सांगात्यांनीं तेव्हां विचार करुनी। आणियेला त्वरें कथेमाजीं ॥ २२ ॥ बैसाविलें त्यासी भिंतीसी टेकुनी। करिती श्रवण हरिकथा ॥ २३ ॥ नामामृत भावें वाढीत बोधला। घ्यारे सर्वत्रांला सांगतसे ॥ २४ ॥ करावी पुरती तुम्ही सांठवण। जगीं हें भरूनि उरलेंसें ॥ २५ ॥ स्वर्ग मृत्युलोकीं असे तो पातळीं। आणिला जवळी पुंडलीकें ॥ २६ ॥ समपदीं कटीं ठेऊनियां कर। उभे विटेवर राहिले ते ॥ २७ ॥ तयाची हे गोडी बोधल्या सांपडली। तेचि म्यां वाढिली तुम्हांपुढें ॥ २८ ॥ श्रवणद्वारें तुम्ही जेवा सावकाश। होईल उल्हास माझे जीवा ॥ २९ ॥ नामघोषें तुम्हीं वाजवावी टाळी। होईल हे होळी पातकांची ॥ ३० ॥ श्रोते बोलताती तेव्हां बोधल्यास। करा उपदेश या गृहस्थासी ॥ ३१ ॥ वाजवीना टाळी करीना भजन। कांहो यानें मौन धरियेलें ॥ ३२ ॥ बोधराज करी त्यासी विनवणी। बोला चक्रपाणि

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आवडीनें॥ ३३ ॥ कथेलागीं तेव्हां येती आनंदानें। कांपे तया भेणें कळीकाळ॥ ३४॥ सांडुनि अहंता यावें कीर्तनास। तेणें हृषिकेशी संतोषतो॥ ३५॥ म्हणोनियां कोणीं न करावा आळस। बोलवा उल्हासें पांडुरंग॥ ३६॥ ऐकोनियां ऐसें तेव्हां नारायण। परतविला प्राण तेचि वेळां॥ ३७॥ कथेमाजीं जें कां बैसविलें प्रेत। तें आनंदें नाचत नामघोषें॥ ३८॥ समजलें तेव्हां श्रोत्यां त्या सकळां। महिमा आगळा हरिनामाचा॥ ३९॥ बोधल्यासी तेव्हां श्रुत झाली मात। उठविलें प्रेत पांडुरंगें॥ ४०॥ प्रेमअश्रु आले बोधल्याचे डोळां। पाळिसी तूं लळा पाडुरंगा॥ ४१॥ जाणूनि अंतर होसी सहाकारी। लज्जा त्वां श्रीहरि रखियेली॥ ४२॥ बालकाचे बोल मातेसी आवड। पुरवीत कोड आनंदानें॥ ४३॥ समजलें मज आतां विठाबाई। काय उतराई होऊं तुज॥ ४४॥ बोधल्यासी बोले विठोबा सांवळा। आवडी प्रेमळा तुझी मज॥ ४५॥ आनंदें जागर होत एकादशी। कीर्तनांत हांसी होती तेव्हां॥ ४६॥ हांसीचे ते धनी विभक्त ते झाले। विकरा घातिलें हांसीलागीं॥ ४७॥ हांसीलागीं तेव्हां श्रुत झाली वार्ता। खेद करी चित्ता आपुलिया॥ ४८॥ काय जन्मांतर कैसें हें प्राक्तन। स्वामीचे चरण अंतरती॥ ४९॥ बोधराज माझी पांडुरंग मूर्ती। वाटेल ही खंती त्याची मज॥ ५०॥ होऊनियां श्रमी धामणगांवा गेली। वार्ता सांगितली बोधराजा॥ ५१॥ बाबा तुम्हीं आतां द्यावें मज मोल। श्रुत तेव्हां केलें ममताईसी॥ ५२॥ जाणूनि अंतर राळेरास आले। मेहुण्यास बोले बोधराज॥ ५३॥ हांसिसी विकितां म्हणूनि ऐकिलें। सांगा इचें मोल काय आतां॥ ५४॥ येरू म्हणे हांसी देऊं आणिकासी। देऊं जा तुम्हासी बोलूं नका॥ ५५॥ हांसीलागीं तेव्हां श्रुत झाली वार्ता। खेद करी चित्ता आपुलिया॥ ५६॥ बोधराज तेव्हां समजावी तिसी। सांगतों देवासी नेतील तुज॥ ५७॥ सांगूनियां ऐसें धामणगांवा गेले। तों हांसीलागीं आलें गिन्हाईक॥ ५८॥ पंचवीस होन केलें तिचें मोल। लिहून घेतलें खरिदखत॥ ५९॥ द्रव्य घातियेलें तयाच्या पदरांत। तों आले अकस्मात पांडुरंग॥ ६०॥ हांसे तुजलागीं बोलावी बोधला। शब्द हा ऐकिला सर्वत्रांनीं॥ ६१॥ हांसी आणि मूल तेव्हां जालें गुप्त। केला हा वृत्तांत पांडुरंगें॥ ६२॥ बोलवितां हांसी न दिसे तयाला। कज्जा तो लागला दोघांजणा॥ ६३॥ भांडत हे गेले तेव्हां दिवाणांत। सांगती वृत्तांत दोघेजण॥ ६४॥ फजीत होऊनि तेव्हां दरबारीं। दिलें तें माघारीं द्रव्य त्याचें॥ ६५॥ संताचें नायके नाडला तो खर। दोहींकडे थार नाहीं त्यासी॥ ६६॥ संतांसी शरण असे दास नामा। अखंडित प्रेमा त्याचे नामीं॥ ६७॥

जनजसवंत.

२३४१. जनजसवंत भला। देव त्याचे घरा गेला॥ १॥ येऊन राहातो चाकरी। पोटा मागतो भाकरी॥ २॥ स्त्री ते वाढावया गेली। वरचेवर विठ्ठल झेली॥ ३॥ काम सांगा सहज कांहीं। करितों मी लवलाही॥ ४॥ मागें उरों नेदी कांहीं। कशाला गे माणुस बाई॥ ५॥ दुबळ्याचे घरची नागवण। भाग्या गरची सांठवण॥ ६॥ शेतांतील काम करी। विठो माझा नांगर धरी॥ ७॥ खुटें पालव्या तोडी। साठ चाहुर पाणी झोडी॥ ८॥ देव लाकडांसी गेला। परत घेऊनियां आला॥ ९॥ पांचा साता गांवा गेला। लेंकी गुना घेऊन आला॥ १०॥ खांद्यावरी आणिल्या पाहीं। नवल याचें सांगों काई॥ ११॥ मायलेंकी केल्या भेटी। ऐशा विठोबाच्या गोष्टी॥ १२॥ कैसा प्रगट रे झाला। विठो माझा निघोन गेला॥ १३॥ आठवा आठवा माझा सखा। नामा सांगे सर्व लोकां॥ १४॥

जनाबाई.

२३४२. नामयाचे घरीं असे दासी जनी। तिनें चक्रपाणि वश केला॥ १॥ करितां कामधंदा ध्यानीं नारायण। करीत चिंतन अहोरात्र॥ २॥ देखोनियां भाव तिचा पांडुरंग। काम करूं लागे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जनीलागां ॥ ३ ॥ रात्रीं येऊनियां जनीचिया घरी। दळूं लागे हरी तिजलागीं ॥ ४ ॥ दळितां काढिली माळ वैजयंती। ठेविली परती शालजोडी ॥ ५ ॥ जनीचें आवडे देवाजीस गाणें। झालासें तल्लीन पांडुरंग ॥ ६ ॥ प्रातःकाळ झाला तेव्हां त्या समयासी। जात हृषीकेशी तांतडीनें ॥ ७ ॥ घेऊनियां गेले जनीची वाकळ। विसरले माळ शालजोडी ॥ ८ ॥ तेव्हां पुजाऱ्यानें उघडिलें द्वार। पाहिला तो वर रुक्मिणीचा ॥ ९ ॥ देवाच्या अंगावर देखिली वाकळ। नाहीं गळां माळ शालजोडी ॥ १० ॥ एकमेकां तेव्हां पुसती पुजारी। कोणें केली चोरी देवाजीची ॥ ११ ॥ शोध करितांना जनीची वाकळ। आले ते सकळ तिच्या घरीं ॥ १२ ॥ शालजोढी माळ होती तिच्या घरीं। दाविती पुजारी सर्वांलागीं ॥ १३ ॥ बांधियेली तेव्हां त्यांनी दासी जनी। नामयालागुनी श्रुत केलें ॥ १४ ॥ नामा म्हणे जने कां गे केली चोरी। बोलतसे खरें जनी त्यासी ॥ १५ ॥ रात्रीं माझ्या घरा आले पांडुरंग। दळितां श्रीरंगा घाम आला ॥ १६ ॥ काढियेली माळ तेव्हां शालजोडी। गातसे आवडी मजसवें ॥ १७ ॥ प्रातःकाळी देव गेले ते उठोनी। न कळे करणी कैसी केली ॥ १८ ॥ बापा मी सांगतें हेंचि हो प्रमाण। पुसावें जाऊन पांडुरंगा ॥ १९ ॥ नामा म्हणे तुम्हां कळेल तैसें करा। नका या विचारा पुसों मज ॥ २० ॥ नामा म्हणे जने केलें असें कर्म। जाणे एक वर्म पांडुरंग ॥ २१ ॥ धमकावुनी नेली त्यांनी दासी जनी। सकळ ब्राह्मणी मिळोनियां ॥ २२ ॥ श्रुत केली वार्ता गांवीच्या राजाला। ते म्हणे जनीला सुळीं द्यावें ॥ २३ ॥ सुळ तो रोंविला चंद्रभागेतीरीं। पाहती नरनारी दृष्टी तेव्हां ॥ २४ ॥ जनी आठवीत तेव्हां पांडुरंगा। कां गा तूं श्रीरंगा मोकलिसी ॥ २५ ॥ घडी घडी येत होतासी तूं देवा। आज कां केशवा निद्रा आली ॥ २६ ॥ कोठे गुंतलासी भक्तीचिया काजा। यावें महाराजा येई आतां ॥ २७ ॥ प्रल्हादाकारणें नृसिंह झालासी। स्तंभीं प्रगटसी क्षणमात्रें ॥ २८ ॥ दीनांचा दयाळ तुझें नांव बापा। कां हो अवकृपा केली मज ॥ २९ ॥ द्रौपदीनें केला जेव्हां तुझा धांवा। आलासी केशवा क्षणामाजीं ॥ ३० ॥ माझा तुज देवा आला हो कंटाळा। आळ हा घातला मजवरी ॥ ३१ ॥ समजले मज होतें तुझे मनीं। नसावी हे जनी पांडुरंगा ॥ ३२ ॥ करितां कामधंदा तुज आला शीण। कंटाळलें मन देवा तुझें ॥ ३३ ॥ कासयासी बोल ठेवूं तुज देवा। प्रारब्धाचा ठेवा फळा आला ॥ ३४ ॥ आतां ऐक माझी हेचि विनवणी। भेट चक्रपाणि एक वेळां ॥ ३५ ॥ न मानें मी कांही देवा तुज आतां। पायां पैं अनंता ठाव देई ॥ ३६ ॥ ऐकोनियां ऐसी जनीची विनवणी। आले चक्रपाणि धांवोनियां ॥ ३७ ॥ जनीच्या सांगातें होते राजदूत। नेली ते त्वरित शुळापाशीं ॥ ३८ ॥ जनीनें तो शूळ पाहातां नयनीं। अकस्मात पाणी झालें त्याचें ॥ ३९ ॥ शस्त्रें जीं कां होतीं राजदूतां करीं। विरालीं ती सारीं पाणी झालें ॥ ४० ॥ विठोबानें तेव्हां आलिंगिली जनी। म्हणे मायबाहिणी श्रमलीसी ॥ ४१ ॥ जनी म्हणे देवा तूं पाठीसी असतां। नाही भय चिंता आम्हांलागीं ॥ ४२ ॥ श्रुत झाली वार्ता राजयालागोनी। सुळासुद्धां पाणी शस्त्रें झालीं ॥ ४३ ॥ समजलें तेव्हां तयाचे अंतरीं। जनीला श्रीहरि सांभाळितो ॥ ४४ ॥ चला जाऊं आतां जनीच्या दर्शना। सिद्ध झाली सेना पायचाली ॥ ४५ ॥ क्षमा करी माते आमुचे अन्याय। कृपादृष्टी पाहे आम्हांकडे ॥ ४६ ॥ देऊनियां वस्त्रें भूषणें जनीसी। गेला आश्रमासी राजा तेव्हां ॥ ४७ ॥ समजलें तेव्हां पंढरीच्या लोकां। जनीचा हा सखा पांडुरंग ॥ ४८ ॥ जनीचे अभंग लिहीत नारायण। करिती श्रवण साधुसंत ॥ ४९ ॥ धन्य तेचि जनी धन्य तिची भक्ति। नामदेव स्तुति करीतसे ॥ ५० ॥

२३४३. सोयरिक सांडियली सर्वांची। जोडी केली विठ्ठलाची ॥ १ ॥ लोभ सांडिला सर्वांचा। संग धरिला विठोबाचा ॥ २ ॥ झालो निधडा निःशंक।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गायनाचें कौतुक ॥ ३ ॥ प्रेमभरित सर्वदा। मुखीं नाम हरि गोविंदा ॥ ४ ॥ ऐसा सर्वकाळ गाय। ध्यावें विठोबाचे पाय ॥ ५ ॥ नामा म्हणे ऐकें हरीं। दासी जनीची वाट करी ॥ ६ ॥

सावता माळी

२३४४. धन्य तें अरण रत्नाची खाण। जन्मला निधान सांवता तो ॥ १ ॥ सांवता सागर प्रेमाचा आगर। घेतला अवतार माळ्या घरीं ॥ २ ॥ धन्य त्याची माता धन्य त्याचा पिता। सांठविला दाता त्रैलोक्याचा ॥ ३ ॥ नामा म्हणे त्याचा जन्म सुफळ झाला। वंश उद्धरिला माळियाचा ॥ ४ ॥

गोरोबा कुंभार

२३४५. प्रेम अंगी सदा वाचें भगवंत। प्रेमळ तो भक्त कुंभार गोरा ॥ १ ॥ असे घराश्रमी करीत व्यवहार। न पड़े विसर विठोबाचा ॥ २ ॥ कालवुनी माती तुडवीत गोरा। आठवीत वरा रखुमाईच्या ॥ ३ ॥ प्रेम आंगी असे झांकुनी नयन। करीत भजन विठोबाचें ॥ ४ ॥ तयाचिये कांता आणूं गेली जळ। खेळतसे बाळ आंगणांत ॥ ५ ॥ रांगत लेंकरूं गेलें असें तेथें। तुडविलें त्यातें न कळतां ॥ ६ ॥ तत्क्षणीं त्याचा गेला तेव्हां प्राण। घेउनी जीवन आलीं कांता ॥ ७ ॥ पाहतीं तों चिखलांत दिसे रक्तमांस। केला तो आक्रोश मोठा तिनें ॥ ८ ॥ पिटीयेलें तेव्हां आपुलें वदन। जळो हें भजन तुझें आतां ॥ ९ ॥ डोळे असोनियां जाहलासी आंधळा। कोठोनी कपाळा पडलासी ॥ १० ॥ कसावासी तरी कांही येती दया। कां रे बाळराया तुडविलें ॥ ११ ॥ विठोबानें कैसें लावियेलें वेड। नाही मागेंपुढें पाहिलेंसी ॥ १२ ॥ निर्दयाची तुज लागली संगती। अधर्मी श्रीपति देखियेला ॥ १३ ॥ काय तुझा यानें केला असे अन्याय। दूर परता होय चांडाळा तूं ॥ १४ ॥ हातीं लोटोनियां केला तो परता। आग लाव आतां विठोबासी ॥ १५ ॥ ऐकूनियां शब्द सावध तो जाहला। कां गे भंग केला भजनाचा ॥ १६ ॥ विठोबासी माझ्या कां गे त्वां गांजिलें। कर्म ओढवलें बाळकाचें ॥ १७ ॥ सांग मज ऐसें कोणाचें तें जालें। पुण्य फळा आलें लेंकुराचें ॥ १८ ॥ याजसाठी माझ्या गांजिलेंसे देवा। पाठीलागे तेव्हां मारावया ॥ १९ ॥ हात बोंट मज लावशील आतां। आण तुज सर्वथा विठोबाची ॥ २० ॥ ऐकतांचि ऐसें ठेवियेली काठी। राहिला उगाची गोरा तेव्हां ॥ २१ ॥ न करी तो कांही तयेसी भाषण। वर्जियेली तेणें कांता तेंचि ॥ २२ ॥ विनवित कांता गोरियालागुनी। न मोडी मी आण विठोबाची ॥ २३ ॥ झालीं तेव्हां श्रमी वंश बुडविला। विठोबा कोपला मजवरी ॥ २४ ॥ मनामाजी तिणें केला तो विचार। करावें दुसरें लग्न याचें ॥ २५ ॥ बोलाविला तिनें आपुला तो पिता। सांगितली वार्ता त्याजलागीं ॥ २६ ॥ कनिष्ठ हे कन्या दे माझ्या भ्रतारा। नको या विचारा पाहूं आतां ॥ २७ ॥ अवश्य म्हणूनियां विनविला गोरा। लग्नाची हे त्वरा केली तेव्हां ॥ २८ ॥ लग्न झाल्यावरी घाली वोसंगळा। दोघीसही पाळा समानची ॥ २९ ॥ न पाळितां आण तुम्हां विठोबाची। धरा या शब्दाची आठवण ॥ ३० ॥ अवश्य म्हणोनियां निघाला तो गोरा। आला असे घरा आपुलिया ॥ ३१ ॥ कनिष्ठ स्त्रियेसी आलें असें न्हाण। न करी भाषण तिसी कांही ॥ ३२ ॥ येरु म्हणे बाई कैसा हा भ्रतार। करूं मी विचार कैसा आतां ॥ ३३ ॥ पहिली ती कांता विनवी गोरोबातें। अंगिकारा इतें स्वामी आतां ॥ ३४ ॥ मामानें ही मज घातलीसे आण। दोघीचें पाळण समान करा ॥ ३५ ॥ गेला तरी आतां जावो माझा प्राण। न मोडी मी आण विठोबाची ॥ ३६ ॥ जाहल्या दोघी श्रमी कपाळ पिटिती। पुरविली पाठी विठोबानें ॥ ३७ ॥ वंश बुडविला ह्या मेल्या काळ्यानें। जळो थोरपण याचे आतां ॥ ३८ ॥ वेडे मेले लोक घेती दरुशन। नसावें भाषण यांसी कांही ॥ ३९ ॥ होवोनियां श्रमी बैसलयि घरांत। काढियेली युक्ति कनिष्ठेनें ॥ ४० ॥ म्हणे बाई आतां मोडूं याची आण। करील भाषण आपणची ॥ ४१ ॥ निजतो

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हा जेथें तेथें हो जाऊन। करावें शयन दोघींनी तें॥ ४२॥ निद्रेमाजी उरस्थळीं याचे हात। ठेऊ अवचित आपुलिया॥ ४३॥ मग हा करील सहजचि भाषण। नलगे सांगणें कोणासी तें॥ ४४॥ निद्रेमाजी गोरा जाहला तो निमग्न। दोघींनीं शयन केलें तेथें॥ ४५॥ उचलोनियां कर ठेविले शरीरीं। नाहीं देहावरी गोरा तेथें॥ ४६॥ सावध होवोनी पाहियेलें तेणें। अन्याय हातानें केला माझ्या॥ ४७॥ विठोबाची माझ्या मोडियेली आण। टाकावे तोडून हातचि हे॥ ४८॥ घेऊनियां शस्त्र तोडियेले कर। आनंदला फार गोरा तेव्हां॥ ४९॥ समजलें तेव्हां लोकां त्या सकळां। भक्त हा आगळा देखियेला॥ ५०॥ कैसा बाई आतां करावा विचार। बुडाला संसार सर्वस्वें हा॥ ५१॥ आतां शरण जाऊं तया पांडुरंगा। करील तो चिंता आमुचीये॥ ५२॥ सांगूं वर्तमान रुक्मिणीजवळी। विनवीं वनमाळी आम्हांविसीं॥ ५३॥ शरणागतां हरी नेदीच अंतर। वर्णिताती शास्त्रें मोठीं मोठी॥ ५४॥ संत हें गाताती बाई सदोदित। पाहूं तों अनंत कैसा असे॥ ५५॥ दोघी तेव्हां गेल्या रुक्मिणीजवळी। विनविली वाळी रुक्मिणी ते॥ ५६॥ सांगितला तिसी सकळ वृत्तांत। विनवी हा कांत आम्हाविसीं॥ ५७॥ ऐकेल गे बाई तुझें तो वचन। समजलें पूर्ण आम्हांलागीं॥ ५८॥ करीं मातें आम्हां येवढा उपकार। न पडे विसर जन्मोजन्मीं॥ ५९॥ करुनी प्रार्थना आल्या त्या आश्रमा। उभा होता नामा कीर्तनासी॥ ६०॥ आवडीनें गोरा करीत श्रवण। आणीक सज्जन हरिभक्त॥ ६१॥ नामयानें टाळी पिटीली गजरें। गोरियासी कर फुटले ते॥ ६२॥ रांगत लेंकरूं आलें तयावेळीं। मातेच्या जवळी आनंदानें॥ ६३॥ आलिंगुनी तिणें धुरिलें हृदयीं। झाली विठाबाई कृपावंत॥ ६४॥ आलिंगुनी गोरा बोले मेघश्याम। करीं घराश्रम सुखें आतां॥ ६५॥ संशयाची जात नको धरूं चित्ता। आण तुज आतां माझी असे॥ ६६॥ ऐकोनियां गोरा वर्ते घराश्रमीं। लक्ष असे नामीं विठोबाच्या॥ ६७॥ ऐसिया संतांचे आठवितां गुण। जाती हे जळोन सर्व दोष॥ ६८॥ नामदेव त्यासी करी विनवणी। ठाव द्या चरणीं तुमचिया॥ ६९॥ हेंचि तुम्हीं आतां मज द्यावें दान। आठवीन गुण वारंवार॥ ७०॥

२३४६. आषाढी पर्वणी आला यात्राकाळ। निघाले सकळ वारकरी॥ १॥ यांचे समागमें जात असे खुळें। स्मरे वेळोवेळे विठ्ठलासी॥ २॥ धन्य पुण्यतिथि आली एकादशी। पावले क्षेत्रासी विश्वजन॥ ३॥ स्नानविधि करोनि समस्तां भेटला। कीर्तनी बैसला हरिदास॥ ४॥ निवृत्ति ज्ञानदेव सोपान सांवता। नामयाची कथा ऐकताती॥ ५॥ तंव तो म्हणे करा नामाचा उच्चार। टाळीचा गजर करूनियां॥ ६॥ गोरियाचे नेत्रीं आले जळबिंदु। मज कां गोविंदु विसरला॥ ७॥ कां गा केशिराजा मोकलिलें मातें। शरण कोणातें जाऊं आतां॥ ८॥ तुजविण मज न दिसे निर्वाणीं। माय बाप धनी गण गोत॥ ९॥ आतां माझी लाज राखें पंढरीनाथा। तुजविण आतां कोणी नाहीं॥ १०॥ अनाथाचा नाथ दिनाचा कैवारी। पावला झडकरी आपुल्या दासा॥ ११॥ गोरियाचे हात आले ततक्षणीं। गर्जोनि नामध्वनी उभा ठेला॥ १२॥ सकळ संतजनीं देखोनि नयनीं। टाळिया पिटोनि गर्जताती॥ १३॥ निधडा म्हणती भक्त हा वैष्णव। अघटीत भाव न कळे याचा॥ १४॥ कैसा येणें केला ऋणी पंढरीनाथा। आहे पंढरीनाथ याचे उदरीं॥ १५॥ पूर्वी तो प्रल्हाद श्रवणीं ऐकिला। किंवा हा देखिला संतांमधीं॥ १६॥ नामा येऊनियां चरणासी लागला। हृदयीं आलिंगिला भक्तराज॥ १७॥

२३४६. कां गा केशिराजा मोकलीलें मातें। शरण मी कोणातें जाऊं आतां॥ १॥ तुजविण मज न दिसे निर्वाणीं। मायबाप धणी गणगोत॥ २॥ आतां माझी लाज राखें पंढरीनाथा। तुजविण अनंता आणिक नाहीं॥ ३॥ अनाथांचा नाथ दीनांचा कैवारी। पाव झडकरी आपुल्या दासा॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गोरियाचे हात आलेचि तत्क्षणीं। नामा कीर्ति वर्णी विठोबाची॥ ५॥

२३४७. माती तुडवितां नाहीं देहस्थिती। आठवीत चित्तीं पांडुरंग॥ १॥ गोरोवाची कांता पाणियासी जातां। पुत्राला पाहतां खेळतसे॥ २॥ दृष्टी असों द्यावी स्वामि बाळावरी। नाहीं कोणी घरीं सांभाळाया॥ ३॥ नामा म्हणे नाहीं गोरा देहावर। सर्वही निर्धार पांडुरंगीं॥ ४॥

राका कुंभार.

२३४८. कुंभार तो राका कांता त्याची बंका। कन्या नाम वंका तिघेजण॥ १॥ पंढरीक्षेत्रांत राहती आनंदें। वाचेनें गोविंद गोविंद आळविती॥ २॥ करिती आपुला स्वकर्म व्यवहार। वाचें निरंतर रामनाम॥ ३॥ घडोनि भाजणें ठेविली घरांत। व्याली डेरियांत मांजर ते॥ ४॥ न देखितां त्यानें आवा तो रचिला। अग्नि तो लाविला तेचि वेळां॥ ५॥ फिरूनि मांजर घरासि ते आली। नाहींत तो पिल्लीं डेरा तोही॥ ६॥ आव्यापाशीं तेव्हां आली ती धांवत। ओरडत फिरत भंवतालीं॥ ७॥ पाहूनियां राका समजला मनीं। आहा चक्रपाणि काय केलें॥ ८॥ जळो जळो माझा प्रपंच व्यवहार। नाहीं म्यां विचार केला देवा॥ ९॥ करावया गेलीं प्रपंचाचें हित। पापांचे पर्वत झाले माथां॥ १०॥ अज्ञान हीं बाळें जळतील आतां। धांव पंढरीनाथा येचि वेळां॥ ११॥ पांडव ते रक्षिले लाक्षाते जोहरी। तैंसी करी परि पिल्लियांसी॥ १२॥ आगीमाजीं तुवां प्रल्हाद रक्षिला। अगाध हें तुला काय झालें॥ १३॥ रक्षी यासी आतां येऊनियां अंगें। घेईन वैराग्य नवस हाचि॥ १४॥ तिघांजणीं तेव्हां त्यजिलें अन्नपाणी। धांव चक्रपाणि लवलाहीं॥ १५॥ तीन रोज झाले शांत झाला अग्नि। पाहाती उकलूनि आवा तेव्हां॥ १६॥ सर्वस्व भाजणें भाजूनियां गेलीं। खेळताती पिल्लीं डेरियांत॥ १७॥ कच्चा असे डेरा नसे आंच त्याला। माझे नवसास पावला पांडुरंग॥ १८॥ पाहती सकळ पंढरीचे लोक। अगाध कवतुक देवाजीचें॥ १९॥ आनंदोनी राका बोलवी ब्राह्मण। दिलें तें लुटून घर तेव्हां॥ २०॥ वेंचुनियां चिंध्या लाविती ढुंगासी। भावें हृशीकेशी आळविती॥ २१॥ जाऊनियां वनीं वेंचिताती काष्ठें। उदरापुरतें विकिताती॥ २२॥ अखंड करिती नामाचा गजर। ध्यानीं मनीं वर रखुमाइंचा॥ २३॥ बंका गेली असे चंद्रभागे स्नाना। नामयाचि कन्या धुया आली॥ २४॥ बंका बोले बाई सिंतोडे येतील ऐकुनियां बोले येरी तिसी॥ २५॥ जातीयी कुंभार कामीक वैराग्य। घेतलेंसें सोंग कासियासी॥ २६॥ ऐकुनियां बंका करीत उत्तर। बौद्ध अवतार पांडुरंग॥ २७॥ रडका हा नामा घेतलीसे आळी। त्यानें वनमाळी बोलाविला॥ २८॥ अधील हा देव बोलविला यानें। काय थोरपण आलें यासी॥ २९॥ वाढविली कीर्ति जगांत डांगोरा। बोलविला खरा पांडुरंग॥ ३०॥ चंद्रभागे तीरीं जाहला वृत्तांत। श्रुत झाली मात नामयासी॥ ३१॥ नामदेव तेव्हां आले राउळासी। विनंती देवासी करुनी बोले॥ ३२॥ राका कुंभारानें घेतलेंसें वैराग्य। कांहो केला त्याग संसारीचा॥ ३३॥ बोले पांडुरंग निष्काम हे भक्ति। दावितों प्रचिती तुजलागीं॥ ३४॥ विठ्ठल रखुमाई नामा असे संगें। आली तेव्हां तिघें वनाप्रती॥ ३५॥ रुक्मिणीनें तेव्हां काढूनी कंकण। ठेवलें झांकुन काष्ठामाजी॥ ३६॥ राका बंका वंका वेंचिताती काष्ठ। आली अवचित तया ठायां॥ ३७॥ उचलितां काष्ठ देखिलें कंकण। दिलें तें टाकून तेचि वेळां॥ ३८॥ म्हणतां याजलागीं विटाळ जाहला। न घेती तयाला म्हणेनियां॥ ३९॥ पाहुनी रुक्मिणी विस्मय करीत। निष्काम हे भक्त देखियेले॥ ४०॥ बोले रखुमाई अहो पांडुरंगा। भेटावें श्रीरंगा याजलागीं॥ ४१॥ नामा म्हणे देवा वंदितों मी चरण। धरा आलिंगनी तिघां जणां॥ ४२॥ होती हे आवडी देवाजीचे चित्तीं। आलिंगिलीं प्रीतीं तिघेजण॥ ४३॥ राका बंका वंका वंदिती चरण। कांहो येणें केलें देवराया॥ ४४॥ उष्णकाळ दिन श्रमली माझी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

आई। बैसा रखुमाबाई छायेखालीं॥ ४५ ॥ ऐसी असे ज्याची देवावरी माया। करी त्यासी दया पांडुरंग॥ ४६ ॥ नामदेव बोले त्यांचा मी हा दास। शरण तयास वारंवार॥ ४७ ॥

नरसी मेहता.

२३४९. नरसी मेहता होता सावकार। जुनागडी घर महाभक्त॥ १ ॥ वडील तयाचे करिती व्यापार। गजी सावकार द्रव्य ध्यानी॥ २ ॥ तया कुळीं झाला भक्तराज पाहीं। धन तें सर्वही धर्म केलें॥ ३ ॥ अकस्मात नगरीत यात्रेकरी आले। द्वारके चालिले देवकाजा॥ ४ ॥ मार्गी बहु कष्ट चोरीव आगळी। म्हणोनि मंडळी भयाभीत॥ ५ ॥ समागमें द्रव्य निभावे कैसेनि। यालागीं चिंतन हुंडियेचे॥ ६ ॥ ग्रामाचे भीतरी हिंडती घरोघरी। हुंडी द्यावी वरी द्रव्य घेई॥ ७ ॥ ऐसें ऐकतां ते लबाड छळक। उत्तर हो देख देते झाले॥ ८ ॥ नरसी मेहता परम भक्त थोर। आहे सावकार हुंडीवाला॥ ९ ॥ तयाचे निकटीं जावें बहु त्वरें। तुम्हांसी तो खरे वांटे लावी॥ १० ॥ म्हणोनि प्रेमाचे यात्रेकरी साचे। पुसत मेहेताचे घरा आले॥ ११ ॥ देखतांचि मेहता समोरा उठोन। येऊनि नमन करिता झाला॥ १२ ॥ करूनि पूजन धूपदीप सारे। समर्पण वरे उपचार॥ १३ ॥ मग करी प्रश्न काय काजा बोला। आम्हां योगें भला असे तोचि॥ १४ ॥ यात्रेकरी म्हणे जाणें द्वारकेसी। म्हणोनि हुंडीसी करणें असे॥ १५ ॥ तीन शतें साठ रुपये टाकिलें। येरु म्हणे भलें देई हुंडी॥ १६ ॥ तयेकाळीं हुंडी लिहिली द्वारकेसी। नामा म्हणे साची पेठ खरी॥ १७ ॥

२३५०. स्वास्ति श्रीनगर द्वारकापुरीचे। श्रीरणछोडजीचे सेवेमध्यें॥ १ ॥ दासानुदास चरणरज साचार। विनंति अपार लिहितसे॥ २ ॥ यात्रेकरी यानें राखिले रुपये। तीन शतें साठ द्यावें यांसी॥ ३ ॥ ऐसें पत्र दिलें हुंडी ते लिहून। नगरीचे ब्राह्मण पाचारिले॥ ४ ॥ बोलावुनी त्यांसी वांटी दक्षिणेसी। यात्रेकरी यासी विस्मय वांटे॥ ५ ॥ म्हणती धर्मात्मा सुशील मेहता। दानशूर दाता जगीं खरा॥ ६ ॥ घेवोनी द्रव्यातें दिलें ब्राह्मणासी। लिहून हुंडीसी दिधलें तेणें॥ ७ ॥ नामा म्हणे धन्य नरसी मेहता। ऋणी देव होता हुंडी भरी॥ ८ ॥

२३५१. चालली ते यात्रा गेली द्वारकेसी। करूनि स्नानासी नगरामध्यें॥ १ ॥ पहावया घर दुकान हुंडीचें। न दिसे हो साचें तत्क्षणीं॥ २ ॥ सायंकाळ पडला सांपडिना कोठें। प्राणासी संकट देणें आलें॥ ३ ॥ देश दूर झाला नसे खर्ची कांही। देहपात पाही करीन आतां॥ ४ ॥ करूनि नेमासी प्राण ते द्यायासी। समीप तीर्थासी केलें असे॥ ५ ॥ ऐसा भाव देव पाहूनि त्वरित। आला हुडकीत तीर्थाजवळी॥ ६ ॥ हुंडी कोठें आहे नरसी मेहत्याची। रुपये साठींची तिनशें वरी॥ ७ ॥ रणछोड़ आहे नाम माझें पाही। रुपये ते घेई देतों तुज॥ ८ ॥ ऐकतां वचन संतोषला मनीं। धरिलें चरणीं प्रेमभावें॥ ९ ॥ धन्य धन्य तूं रे पाहातां मजला। घेऊनि द्रव्याला आलासी रे॥ १० ॥ देऊनी रुपये दर्शन दाविलें। जगविख्यात केलें मेहत्यासी॥ ११ ॥ करूनि यात्रेंसी जुनागडी आला। भावें हो वंदिला मेहता तो॥ १२ ॥ म्हणे तुजयोगें झाले मज पाहीं। दर्शन तें ठायीं रणछोड॥ १३ ॥ ऐकतांच वाणी प्रेम मनी भरे। धरिले चरण त्वरें तयाचें हो॥ १४ ॥ नामा म्हणे ऐसा देव ऋणी भक्तां। पुरवित होता सर्व ठायीं॥ १५ ॥

चोखामेळा.

२३५२. चोखमेळियानें पाजियेलें दही। पडों दिलें नाही उणें त्याचें॥ १ ॥ तयाचें चरित्र परिसावें सादर। करितों नमस्कार संतजनां॥ २ ॥ तयाची जे कांता तयाच सारिखी। भावार्थे नेटकी आवडीची॥ ३ ॥ साधन द्वादशी आली एके काळीं। उठोनि प्रातःकाळीं काय बोले॥ ४ ॥ उठीं उठीं कांतें स्वयंपाक करीं। आतां येतील हरि पारण्यासी॥ ५ ॥ तंव एक्या ब्राह्मणें आइकिली मात। तेणें दिवाणास सांगितलें॥ ६ ॥ दिवाणानें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दूत पाठविलें त्यासी। चोखामेळीयासी धरूनि आणा॥ ७॥ दूती जाऊनियां धरूनि आणिले। म्हणे काय झालें चोखामेळा॥ ८॥ विठोबासी दहीं पाजीत असतां। कांहो माझ्या हातां ओसंडीलें॥ ९॥ रडतो हा कां रे सभेसी पुसती। तो म्हणे वृत्तांत ऐसा झाला॥ १०॥ रुसूनियां विठो गेला म्हणऊनि। रडे दीर्घध्वनी करूनिया॥ ११॥ म्हणती या महारानें देव बाटविला। जिवें मारा याला बैल जुंपा॥ १२॥ बांधोनियां पाय हांकियले बैल। धरूनि शिवळ विठो उभा॥ १३॥ उडती आसूड बैलांचे पाठीं। मारितां हिंपुटी थोर झाली॥ १४॥ तयाची ते कांता उभी राहूनियां। म्हणे देवराया हात काढी॥ १५॥ खाइलें जेविलें त्याचा हा उपकार। दुबळीचा भ्रतार मारूं पाहसी॥ १६॥ पाळिलें पोसिलें माझिया धन्यासी। उतराई झालासी ओढावया॥ १७॥ अन्नाची त्वां क्रिया नाहीं रे राखिली। रांडकी त्वां केली चोखियाची॥ १८॥ काढी हात आतां जाय परता उसण्या। जाय पोट पोसण्या येथूनियां॥ १९॥ चोखा म्हणे रांडे विश्वाचा पोसणा। संताचा देखणा विठो माझा॥ २०॥ जन लोक पुसती कोणा बोलतीस। ते म्हणे तुम्हांस काय दिसे॥ २१॥ अनंत ब्रह्माडें जयाचे उदरी। त्यानें चहूंकरीं धरियेलें॥ २२॥ पीतांबरधारी घनश्याम मूर्ती। रखुमाईचा पति विठ्ठल हा॥ २३॥ समस्तांसी तेव्हां दिलें दरुशन। केलें समाधान नामा म्हणे॥ २४॥

चोखोबाच्या स्त्रीचे बाळंतपण

२३५३. चोखोबाची कांता असे ती गर्भिण। झाले तीस पूर्ण नव मास॥ १॥ करूनि विनंती पतिसी बोलत। असावें साहित्य घरामाजीं॥ २॥ ऐकूनियां चोखा करीत विचार। कोणें ऐसा घोर वागवावा॥ ३॥ न पुसतां गेला बहिणीच्या गांवा। आनंदें केशवा आळवीत॥ ४॥ दोन प्रहर झाले न येती भोजना। कांता विचारणा करीतसे॥ ५॥ शोध करितांना संध्याकाळ झाला। पति माझा गेला कोणीकडे॥ ६॥ विरक्तासी मी तों सांगितलें काम। कैसा झाला भ्रम माझे बुद्धी॥ ७॥ अहो पांडुरंगा आणा त्यासी आतां। न सांगे मी वार्ता संसाराची॥ ८॥ झाली तेव्हां श्रमी प्रसूत वेळा आली। विठाई धांवली तेचि वेळां॥ ९॥ चोखोबाची बहिण झाला सारंगधर। वहिनी उघडा द्वार हांका मारी॥ १०॥ दोघीही भेटल्या तेव्हां आनंदानें। आलें तें रुदन चोख्याकांते॥ ११॥ बरें बाई तुम्हां देवानें धाडिलें। पती माझा गेला कोणीकडे॥ १२॥ चाणाक्ष बायका तुम्ही अनिवार। अज्ञान भ्रतार तुमचे गांवी॥ १३॥ म्हणोनियां तुम्ही सांगतां त्या काम। विरक्तासी श्रम वाटतसे॥ १४॥ दादा माझा सुज्ञ आधींच हें श्रुत। होयाचें तें होत आपणची॥ १५॥ केली त्वां सूचना आला माझ्या घरा। त्यानें केली त्वरा मजलागी॥ १६॥ सर्वहि साहित्य दिलें म्हणे आतां। नका करूं चिंता वहिनी कांहीं॥ १७॥ सर्वहि साहित्य होतें तिजपाशीं। ऋद्धिसिद्धि दासी तयाचिया॥ १८॥ प्रसुत ते झाली पुत्र झाला तिला। आनंद वाटला पांडुरंगा॥ १९॥ वांटिली शर्करा सर्वत्र यातीसी। माझ्या चोखोबासी पुत्र झाला॥ २०॥ लावूनि उटणें न्हाणियेलें तिला। श्रम तिचा गेला सर्वांगाचा॥ २१॥ पांचवीही केली तिनें आनंदानें। घातलें भोजन यातीलागी॥ २२॥ तेरावे दिवशीं बाळ ते पाळणां घालितसे राणा वैकुंठींचा॥ २३॥ साडी आणि चोळी आंगडें टोपडें। आणियलें कोणें रखमाईनें॥ २४॥ बोलावूनि सुवासिनी पाळणां घातलें। नाम तें ठेविलें कर्ममेळा॥ २५॥ बारसेंही केलें तिनें आनंदानें। घातलें भोजन सर्वयाती॥ २६॥ चोखोबासी मास झाला बहिणीघरीं। विचारी अंतरींचोखा तेव्हां॥ २७॥ सोडोनियां आलों प्रपंचाचें भयें। अंतरले पाय देवाजीचे॥ २८॥ सद्‌गदित झालें तयाचें अंतर। प्रेम अश्रुनीर वाहे डोळां॥ २९॥ येती बाई आतां कृपा असों द्यावी। सांगोन पाठवी आपल्या हातें॥ ३०॥ आतां जातें वहिनी आपुल्या गांवाला।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

रागें भरतील मला धनी माझे॥ ३१॥ ऐकूनियां बोले चोखोबाची कांता। नका जाऊं आतां बाई तुम्ही॥ ३२॥ येऊं द्या घरधनी करतील बोळवण। काय मी उत्तीर्ण होऊं आतां॥ ३३॥ काय काय आठवूं तुमचे उपकार। न पडे विसर जन्मोजन्मी॥ ३४॥ दादा माझा असे पांडुरंग भक्त। सदा त्याचें चित्त देवावरी॥ ३५॥ मान्य करी वहिनी तयाचें वचन। तेणेंचि कल्याण असें तुमचें॥ ३६॥ सद्गदित झालें दोघींचें अंतर। प्रेम अश्रुनीर वाहे डोळां॥ ३७॥ सांभाळीं हा आतां माझा कर्ममेळा। येईल चोखामेळा घरी आतां॥ ३८॥ थांबा बाई आतां शिविंतें मी चोळी। न लगे वनमाळी बोलतसे॥ ३९॥ पुसोनि सर्वांसी गेला तो सांवळा। आला चोखामेळा धरालागीं॥ ४०॥ येवोनियां कांता वंदित चरण। दिलें उचलोन बाळ हातीं॥ ४१॥ बाई आतां गेल्या भेटल्या वाटेसी। खंता या जिवासी वाटे त्याची॥ ४२॥ सांगितला त्यासी सकळ वृत्तांत। सद्गदित चित्त चोखा झाला॥ ४३॥ कैंची बाई येथें आले पांडुरंग। धन्य तुझें भाग्य भेटी झाली॥ ४४॥ सद्गदित झालें दोघांचें अंतर। प्रेम अश्रुनीर वाहे डोळां॥ ४५॥ भक्तांसी संकट पडों नेदी देव। घालीतसे धांव त्यांच्या काजा॥ ४६॥ विष्णुदास नामा वंदी त्याचे चरण। वर्णितसे गुण वारंवार॥ ४७॥

चोखामेळ्याच्या समाधीचे अभंग

२३५४. मंगळवेढ्याभोंवतें कुसूं घालावया। माहारासी न्यावया दूत आले॥ १॥ महारासमागमें चोखामेळा गेला। काम तें लागला करावया॥ २॥ सर्वकाळ वाचें विठ्ठल नामछंद। आठवी गोविंद वेळोवेळां॥ ३॥ चार महिनें याचि रीतीनें लोटिले। कुसूं कडाडिलें अकस्मात॥ ४॥ तयाखाली महार वहु चुर झाले। चोखयानें अर्पिले प्राण देवा॥ ५॥ देव म्हणे नाम्या त्वां जावें देथे। त्याच्या अस्थि येथें घेऊनि याव्या॥ ६॥ नामा म्हणे देवा कैशा ओळखाव्या। विठ्ठलनाम जयामध्यें निघे॥ ७॥

२३५५. ऐकोनियां कानीं अचळीं भराव्या। आणोनियां द्याव्या आम्हांपाशीं॥ १॥ शालिवाहन शके बाराशें साठ। प्रमाथी नाम संवत्सर॥ २॥ वेशाख वद्य पंचमी सुदीन। गुरवारीं प्रयाण करी चोखा॥ ३॥ चोखा माझा जीव चोखा माझा भाव। कुळ धर्म देव चोखा माझा॥ ४॥ काय त्याची भक्ति काय त्याची शक्ति। मीहि आलीं व्यक्ति तयासाठी॥ ५॥ माझ्या चोखियाचें करिती जें ध्यान। तया कधीं विघ्न पडों नेदी॥ ६॥ नामदेवें अस्थि आणिल्या पारखोनी। घेत चक्रपाणि पितांबरी॥ ७॥

२३५६. देवाचे अंचळीं उठिला गजर। विठ्ठलनामे अंबर गर्जतसे॥ १॥ संत समुदाय पताकांचे भार। लोटले गजर ऐकावया॥ २॥ वद्य त्रयोदशी वैशाख शुक्रवार। नामाचा गजर महाद्वारीं॥ ३॥ ऐसी आनंदानें नामाच्या गजरीं। दिली माहाद्वारीं समाधि त्या॥ ४॥ अस्थि निक्षेपण आपुलिया हातें। करूनि अनंतें पाषाण ठेवी॥ ५॥ राही रखुमाई कुर्वंडी करिती। सत्यभामा आरति ओवाळीत॥ ६॥ नामा म्हणे धन्य विठोबाची कृपा। जाईन माझ्या बापा ओंवाळून॥ ७॥

भूपाळ्या

२३५७. उठाउठा प्रभात जाहली। चिंता श्रीविठ्ठल माउली। दीन जनांची साउली। येई धांउनी स्मरतांचि॥ १॥ पंढरपुरीं जे भीमातटीं। सुंदर मनोहर गोमटी। दोन्ही कर ठेवोनियां कटीं। भेटीसाठीं तिष्ठतसे॥ २॥ किरीट कुंडलें मंडित। श्रीमुख अति सुंदर शोभत। गळां वैजयंती डुल्लत। हार मिवत तुळशीचा॥ ३॥ सुरेख मुर्ति सगुण सांवळी। कंठीं कौस्तुभ एकावळी। केशर उठी परिमळ आगळी। बुका भाळी विलसतसे॥ ४॥ पीत पीतांबर कसला कटीं। अक्षयीं वीट चरण तळवटी। सकळ सौंदर्य सुखाची पेटी। इंद्रिय संपुष्टी आठवा तें॥ ५॥ अति प्रिय आवडे तुळसी बुका। तसीच प्रीति करी भोळ्या भाविका नामा पदपंकज पादुका। शिरी मस्तकी वंदीतसे॥ ६॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२३५८. उठा जागे व्हारे आतां। स्मरण करा पंढरिनाथा। भावें चरणीं ठेवा माथा। चुकवी व्यथा जन्माच्या॥ १॥ धन दारा पुत्रजन। बंधु सोयरे पिसून। सर्व मिथ्या हे जाणून। शरण रिघा देवासी॥ २॥ मायाविघ्नें भ्रमलां खरे। म्हणतां मी माझेनि घरें। हें तों संपत्तीचें बारें। साचोकारें जाईल॥ ३॥ आयुष्य जात आहे पहा। काळ जपतसे महा। स्वाहिताचा घोर वहा। ध्यानी रहा श्रीहरीच्या॥ ४॥ संतचरणीं भाव धरा। क्षणक्षणा नाम स्मरा। मुक्ति सायोज्यता वरा। हेंचि करा बापांनो॥ ५॥ विष्णुदास विनवी नामा। भुलूं नका भवकामा। धरा अंतरीं निज प्रेमा। न चुका नेमा हरिभक्ति॥ ६॥

२३५९. उठा उठा साधुसंत। साधा आपुलें हित। गेला गेला हा नरदेह। मग कैंचा भगवंत॥ ध्रु०॥ उठुनी वेगेसी। चला जाऊं राउळासी। जळती पातकांच्या राशी। काकड आरती देखिलिया॥ १॥ उठोनियां पहांटे। विठ्ठल पहा उभा विटे। चरण तयाचे गोमटे। अमृत दृष्टि अवलोका॥ २॥ जागे करा रुक्मिणीवरा। देव आहे निदसुरा। वेगें लिंबलोण करा। दृष्ट होईल तयासी॥ ३॥ पुढें वाजंत्रें वाजती। ढोल दमामे गर्जती। होते काकड आरती। पांडुरंगरायाची॥ ४॥ सिंहनाद शंख भेरी। गजर होतो महाद्वारीं। केशवराज विटेवरी। नामा चरण वंदितो॥ ५॥

२३६०. राम राजीवलोचना करुणानिधी भक्तजना। यातायातीनिवारणा तूं पावना स्वामिया॥ १॥ जगद्रूपा जळदगहना। जगद्गुरु सीतापती जगज्जीवना। काय वाणूं तुझीया रे गुणा। अवघ्या जनां आवडसी॥ २॥ रामा त्र्यंबकभंजना। दशकंठ तूं छेदना। मधुकैटभ निर्दळणा। गरुडवाहना वासुदेवा॥ ३॥ रामा दशरथनंदना। योगिजन मनरंजना। अभयवरद वैष्णवजना। विभीषणा स्थापियलें॥ ४॥ जयजय श्रीवत्सलांछना। ब्रह्मपदाचिया भूषणा। अहिल्याकष्ट निर्दळणा। नारायणा परियेसी॥ ५॥ म्हणउनी तुझें मी पोसणें। हें ऐकें रघुनंदनें। येणेंचि कारणें आलों शरण। विष्णुदास म्हणे नामा॥ ६॥

२३६१. आजिचा दिवस आम्हां सोनियाचा। गोवळु भेटला कान्हो नंदाचा॥ १॥ कान्होबा पेंढारी येईल यमुने। तयावीण मज घडी न गमे॥ २॥ सोळा सहस्र गोपी म्हणति अगा जगजीवना। एके वेळीं भेटी देई नंदनंदना॥ ३॥ उजळुनी आरती करूं कुरवंडिया। शेज अरूं नाम्या स्वामी वनमाळीचा॥ ४॥

२३६२. लाजले गे माय आतां कोणा ओवाळूं। जिकडे पाहावें तिकडे चतुर्भुज गोपाळू॥ १॥ ओवाळूं मी गेलें माय गेलें द्वारके। जिकडे पहावें तिकडे चतुर्भुज सारिखें॥ २॥ ओवाळूं मी गेलें माय सखिया माझारीं। जिकडे पहावें तिकडे चतुर्भुज नरनारी॥ ३॥ ओवाळूं मी गेलें माय सारंगधरा। जिकडे पहावें तिकडे चतुर्भूज परिवारा॥ ४॥ वैजयंती गळां श्रीवत्सलांछन। विष्णुदास नामा येणें दाविली खूण॥ ५॥

२३६३. उठा पांडुरंगा आतां दर्शन द्या सकळां। झाला अरुणोदय सरली निद्रेची वेळा॥ १॥ संत साधु मुनि अवघे झालेती गोळा। सोडा शेजेसुख आतां पाहूं त्या मुखकमळा॥ २॥ रंगमंडपीं महाद्वारीं झालीसे दाटी। मन उताविळ रूप पाहावया दृष्टी॥ ३॥ राही रखुमाबाई तुम्हां येऊं द्या दया। शेजें हालउनी जागा करा देवराया॥ ४॥ गरुड हनुमंत पुढें पहाती वाट। स्वर्गींचे सुरवर घेउनी आले बोभाट॥ ५॥ झालें मुक्तद्वार लाभ झाला रोकडा। विष्णुदास नामा उभा घेऊनि काकडा॥ ६॥

आरत्या

काकडआरती.

२३६४. उठा अरुणोदय प्रकाश जहाला। घंटा गजर गर्जिन्नला। हरि चौघडा सुरू झाला। काकड आरति समयाचा॥ १॥ महाद्वारीं वैष्णव

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जन। पूजा सामग्री घेऊन। आलें द्यावें तयासी दर्शन। बंदीजन गर्जती॥ २॥ सभामंडपीं कीर्तनघोष। मृदंग टाळ विणे सुरस। आनंदें गाती हरीचे दास। परम उल्हास करूनियां॥ ३॥ चंद्रभागे वाळवंटी। प्रात:स्नानाची जनदाटी। आता येतिल आपुले भेटी। उठीं उठीं गोविंदा॥ ४॥ ऐसें विनवी रुक्मिणी। जागृत जाहाले चक्रपाणि। नामा बद्धांजुळी जोडुनी। चरणां माथा ठेवितसे॥ ५॥

आरती

२३६५. प्रेम सप्रेम आरती। गोविंदातें ओंवाळिती॥ १॥ धन्य धन्य ते लोचन। नित्य करिती अवलोकन॥ २॥ बाळा प्रौढा आणि मुग्धा। ओंवाळिती परमानंदा॥ ३॥ नामा म्हणे केशवातें। देखुनी राहिलीं तटस्थें॥

विठ्ठलाची आरती.

२३६६. युगें अठ्ठावीस विटेवरी उभा। वामांगीं रखमाई दिसे दिव्य शोभा। पुंडलिका भेटी परब्रह्म आलें गा। चरणीं वाहे भीमा उद्धरी जगा॥ १॥ जयदेव जयदेव जय पांडुरंगा। रखुमाईवल्लभा राहीच्या वल्लभा पावें जिवलगा॥ ध्रु०॥ तुळसी माळा गळां कर ठेवून कटीं। कासे पीतांबर कस्तुरी लल्लाटीं। देव सुरवर नित्य येती भेटी। गरुड हनुमंत पुढें उभे राहती॥ २॥ आषाढी कार्तिकी भक्त जन येती। चंद्रभागेमाजीं स्नानें जे करिती। दर्शन हेळामात्रें तयां होय मुक्ति। केशवासी नामदेव भावें ओवाळिती॥ ३॥

आरती.

२३६७. ऐशी आरती तनमन गाये। पलख न बिसरूं सारंगपाणी॥ ध्रु०॥ जो नरहरजीकी आरती गाये। बसत वैकुंठ फिर नहीं आये॥ १॥ कहत नामदेव भली भली गाये। बसत वैगुंठ फिर नहीं आये॥ २॥

संतांची आरती

२३६८. गुण आणि गंभीर रणधीर। तया योग्य साजे केशव शरीर। तैसा अमृतराज हा विसोबा खेचर। बोलोनि अबोलणा न कल्पी ऐसा सार॥ १॥ जयजय आरतीं या हरिदासांच्या भक्ता। दिंडी पुढें डोलत गाती पंढरिनाथा॥ ध्रु०॥ हरीदासा महिमा न वर्णवे वाचा। पतिता उद्धरण जाणविला साचा। त्याचा दासीपुत्र होय तो दैवाचा। म्हणोनि संतचरणीं भाव धरावा साचा॥ २॥ साधु संतांघरीं श्वान मी होईन। मग त्यांच्या पायीं नित्य लोळेन। हरिभक्ति सोय ते मी लाभेन। त्यांचें पोसणें कैं मी होईन॥ ३॥ दूध देखोनि जैसी मांजर सोय। तैसे न संडवती या संतांचे पाय। चालतां तया संगें मद मत्सर जाय। म्हणोनि आवडी त्यांचे धरावे पाय॥ ४॥ तैसी आरती हे अमृतराज। गातां उन्मेष उन्मनी सहज। सत्रावीचें वोळलें अमृत मज। धन्य तृप्तितीर जोडलें सहज॥ ५॥ यांची कृपा तरी सार्थक जन्म। नाहीं तरी निरर्थक होईल जाण। विष्णुदास नामा म्हणे नेणते अज्ञान। केशव चरणीं ठेवूनि केलें सार्थक निर्वाण॥ ६॥

२३६९. क्षार उदक देउनी मधुरता आली। तैसी लवणस्थिति अमृत खोली। तयांच्या अंतरीं प्रवृत्ति मुराली। परी साखरेची मौल्यता कवणें आणिली॥ १॥ जयजय आरती प्रेम सिंधुपुरा ऐक्या ऐक्य केलें तुवां येकसरा॥ ध्रु०॥ नित्य नेमें जागती जागरणी जागा। आणिक उद्धरण जगासी सांगा। येकि येकादशी पुण्य आलें तें पाहा गा। द्वादशी लाधली ते भक्तासी मागा॥ २॥ ऐसे परउपकारी लोळावें त्यांचे द्वारीं। तेंचि केशवध्यान येर लटिकें संसारीं। त्यांचे रंगणीची शीळा देवा मज करीं। नाहीं तरी व्यर्थ जन्मोनी पशुपरी॥ ३॥ पूर्वज उद्धरण दिसे वैकुंठ वाटे। हरिदासांचे भार मीरवती गरुड टके गोमटे। धन्य तृप्तितीर बरवें वाळुवंटें। वैष्णव रंगी नाचती हर्ष बहू वांटे॥ ४॥ लाघलों समसुख काशीये जातां। विश्वनाथ प्रेम प्रेमाचिया सत्ता। बाणली वीरश्री पंढरीनाथा। जिकडे तिकडे देखें हरीदास गर्जतां॥ ५॥ निवृत्ति सोपान हे ज्ञानेश्वरु। चांगदेव मुक्ताई

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वटेश्वरु। अवघीया अवघा साक्षात्कारु। सद्गुरु जाण तो विसोबा खेचरू॥ ६॥ त्याचे चरणीचा रजरेणु हा नामदेव शिंपा। पाहातां अनुभव सकळार्थ सोपा। विठ्ठल कृपेस्तव यांची मजवरी कृपा। हे एकची मूर्ति पावलों ऐसें देखोपां॥ ७॥

आरती ज्ञानदेवाची.

२३७०. इंद्रायणीचे तटीं धरिला रहिवास। विश्व तारावया लक्ष्मीनिवास। ज्ञानेश्वररूपें धरिलें निज वेष। वर्म जाणें तया सद्गुरु उपदेश॥ १॥ जयदेव जयदेव जय ज्ञानदेवा। जीवा शिवाचा आदि परब्रह्म ठेवा॥ ध्रु०॥ कृष्ण एकादशी कार्तिकमासीं। आपण पंढरिनाथ सनकादिकांसी। यांत्रेंसी येताती स्वानंदरासी। दर्शन घडे तया निजमुक्ति देसी॥ २॥ म्हेसिक पुत्र केला वाचक वेदाचा। प्रतिष्ठानीं गर्व हरिला विप्रांचा। विशेष अर्थ केला भगवद्गीतेचा। प्रत्यक्ष द्वारीं शोभे पिंपळ कनकाचा॥ ३॥ सनकसिद्ध गणांमाजीं तूं श्रेष्ठ। ज्ञानावरी माजी ज्ञानवरिष्ठ। अनुताप दीप्ति विश्व घनदाट। नामयावरी लोटे प्रेमाचा लोट॥ ४॥

शेजारत्या

२३७१. चंदनाची ओवरी उदविली प्रकारीं। कनकाचा मंचक शेजे सुमनें वरी॥ १॥ ओंवाळूं आलिया शेजे आरती। निद्रा करीं बापा लक्ष्मीपती॥ २॥ संत सनकादिक यांतें आज्ञा दिजे। शुकादिक ज्ञानी यांचा नमस्कार घेजे॥ ३॥ बाळा प्रौढा मुग्धा यातें आज्ञा दीजे। मज सेवका सन्निध पहुडविजे॥ ४॥ विष्णुदास नामा राहिला द्वारां नेहटीं। जयजयकार करित देतसे घिरटी॥ ५॥

२३७२. पहुडा पहुडा जी कान्हा कमलदळ-लोचना। श्रमलेती शयना करा वेंगीं॥ १॥ पहुडावें आतां दीनानाथा। सुखशयना करावें जी॥ ध्रु०॥ लक्ष्मीसहित देवा निद्रा करावी। राधिकेसहित देवा निद्रा करावी॥ २॥ जाई जुई मोगरा मालती। कोमाइल्या पुष्पजाती जी॥ ३॥ ब्रह्मादिक उभे सनकादिक उभे। आज्ञा द्यावी त्यांसी जावयासी॥ ४॥ गोपाळ गेले निजमंदिरा। सेवा जाणवितो नामया जी॥ ५॥

२३७३. घालीन लोटांगण वंदीन चरण। डोळयांनी पाहीन रूप तुझें॥ १॥ प्रेमें आलिंगीन अनंत पूजीन। भावें ओंवाळीन म्हणे नामा॥ २॥

भाग सहावा

जनाबाईचे अभंग.

नामसंकीर्तन–माहात्म्य.

१. गाता विठोबाची कीर्ती। महापातकें जळतीं॥ १॥ सर्व सुखाचा आगर। उभा असे विटेवर॥ २॥ आठवितां पाय त्याचे। मग तुम्हां भय कैंचें॥ ३॥ कायावाचामनें भाव। जनी म्हणे गावा देव॥ ४॥

२. जन्मा येऊनियां देख। करा देहाचें सार्थक॥ १॥ वाचें नाम विठ्ठलाचें। तेणें सार्थक देहाचें॥ २॥ ऐसा नामाचा महिमा। शेषा वर्णितां झाली सीमा॥ ३॥ नाम तारक त्रिभुवनीं। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

३. नाम फुकट चोखट। नाम घेतां नये वीट॥ १॥ जड शिळा ज्या सागरीं। आत्मारामें नामें तारी॥ २॥ पुत्रभाव स्मरण केलें। तया वैकुंठासी नेलें॥ ३॥ नाममहिमा जनी जाणे। ध्यातां विठ्ठलांचे होणें॥ ४॥

४. एक नाम अवघे सार। वरकड अवघें तें असार॥ १॥ म्हणोनियां परतें करा। आर्धी विठ्ठल

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हें स्मरा॥ २॥ जनी देवाधिदेव। एक विठ्ठल पंढरीराव॥ ३॥

५. काय हें करावें। धनवंतादि अवघे॥ १॥ तुझें नाम नाहीं जेथें। नको माझी आस तेथें॥ २॥ तुजविण बोल न मानीं। करीं ऐसें म्हणे जनी॥ ३॥

६. विठ्ठल नामाची नाहीं गोडी। काळ हाणोनि तोंड फोडी॥ १॥ गळां बांधोनि खांबासी। विंचू लाविती जिव्हेसी॥ २॥ ऐसा अभिमानी मेला। नर्ककुंडीं थारा त्याला॥ ३॥ नामा बोध करी मना। दासी जनी लागे चरणा॥

७. तो हा भक्तांचे तोडरीं। वाचें उच्चारितां हरी॥ १॥ काम होऊनि निष्काम। काम भावभक्ति प्रेम॥ २॥ तो हा पूर्ण काम होय। अखंडित नाम गाय॥ ३॥ काम निष्काम झाला मनीं। वंदी नाचे दासी जनी॥ ४॥

८. नाम विठोबाचें घ्यावें। मग पाऊल टाकावें॥ १॥ नाम तारक हें थोर। नामें तरिले अपार॥ २॥ आजामेळ उद्धरिला। चोखामेळा मुक्तीस नेला॥ ३॥ नाम दळणीं कांडणी। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

९. निराकारीचें नाणें। शुद्ध ब्रह्मीचें ठेवणे॥ १॥ प्रयत्नें काढिलें बाहेरी। संतसाधु सवदागरीं॥ २॥ व्यास वसिष्ठ नारदमुनी। टांकसाळ घातली त्यांनीं॥ ३॥ उद्धव अक्रूर स्वच्छंदीं। त्यांनीं आटविली चांदी॥ ४॥ केशव नामयाचा शिक्का। हारप चाले तिन्ही लोकां॥ ५॥ पारख नामयाची जनी। वरती विठोबाची निशाणी॥ ६॥

१०. माझा शिणभाग गेला। तुज पाहतां विठ्ठला॥ १॥ पाप ताप जाती। तुझें नाम ज्याचे चित्तीं॥ २॥ अखंडित नामस्मरण। बाधूं न शके तया विघ्न॥ ३॥ जनी म्हणे हरिहर। भजतां वैकुंठीं त्या घर॥ ४॥

११. नाम विठोबाचें थोर। तरला कोळी आणि कुंभार॥ १॥ ऐसी नामाची आवडी। तुटे संसाराची बेडी॥ २॥ नाम गाय वेळोवेळां। दासी जनीसी नित्य चाळा॥ ३॥

१२. मारूनियां त्या रावणा। राज्य दिधलें बिभीषणा॥ १॥ सोडवूनि सीता सती। राम अयोध्येसी येती॥ २॥ ख्याती केली रामायणीं। म्हणे नामयाची जनी॥ ३॥

१३. येऊं ऐसें जाऊं। जनासंगें हेंचि दाऊं॥ १॥ आपण करूं हरिकीर्तन। जाणोनी भक्तीचें जीवन॥ २॥ नाम संशयछेदन। भवपाशाचें मोचन॥ ३॥ जनी म्हणे हो देवासी। होईल त्याला कसणी ऐसी॥ ४॥

१४. हरिहर ब्रह्मादिक। नामें तरले तिन्ही लोक॥ १॥ ऐसा कथेचा महिमा। झाली बोलायाची सीमा॥ २॥ जपें तपें लाजविलीं। तीर्थें शरणागत आलीं॥ ३॥ नामदेवा कीर्तनीं। ध्वजा आल्या स्वर्गाहुनी॥ ४॥ देव श्रुती देती ग्वाही। जनी म्हणे सांगूं कायी॥ ५॥

१५. व्हावें कथेसी सादर। मन करूनियां स्थीर॥ १॥ बाबा काय झोंपी जातां। झाले चौऱ्यांशीचे खाता॥ २॥ नरदेह कैसा रे मागुता। भेटी नव्हे त्या सीताकांता॥ ३॥ आळस निद्रा उठाउठी। त्यजा स्वरूपीं घाला मिठी॥ ४॥ जनी म्हणे हरिचें नाम। मुखीं म्हणा धरूनि प्रेम॥ ५॥

विठ्ठलमाहात्म्य.

१६. पुंडलिक भक्तबळी। विठू आणिला भूतळीं॥ १॥ अनंत अवतार केवळ। उभा विटेवरी सकळ॥ २॥ वसुदेवा न कळे पार। नाम्यासवें जेवी फार॥ ३॥ भक्त भावार्था विकला। दासी जनीला आनंद झाला॥ ४॥

१७. भला भला पुंडलिका। तुझ्या भावार्थाचा शिक्का॥ १॥ भलें घालूनियां कोडें। परब्रह्म दारापुढें॥ २॥ घाव घातला निशाणीं। ख्याति केली त्रिभुवनीं॥ ३॥ जनी म्हणे पुंडलिका। धन्य तूंचि तिन्ही लोकां॥ ४॥

१८. पंढरीचें सुख पुंडलिकासी आलें। तेणें हें वाढिलें भक्तालागीं॥ १॥ भुक्ति मुक्ति वरदान

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

दिधलें। तेंहि नाहीं ठेविलें आपणांलागी॥ २॥ उदार चक्रवर्ती बाप पुंडलिक। नामें विश्वलोक उद्धरिलें॥ ३॥

१९. अरे विठ्या विठ्या। मूळ मायेच्या कारट्या॥ १॥ तुझी रांड रंडकी झाली। जन्मसावित्री चुडा ल्याली॥ २॥ तुझें गेलें मढें। तुला पाहून काळ रडे॥ ३॥ उभी राहूनी आंगणीं। शिव्या देत दासी जनी॥ ४॥

२०. जन्म खातां उष्टावळी। सदा राखी चंद्रावळी॥ १॥ राहीरुक्मिणीचा कांत। भक्तिसाठीं कण्या खात॥ २॥ देव भुलले पांडुरंग। ऐसा जाणावा श्रीरंग॥ ३॥ जनी म्हणे देवराज। करी भक्ताचें हो काज॥ ४॥

२१. ऐसा आहे पांडुरंग। भोग भोगूनि निःसंग॥ १॥ अविद्येनें नवल केलें। मिथ्या सत्यत्व दाविलें॥ २॥ जैसी वांझेची संतति। तैसी संसार उत्पत्ति॥ ३॥ तेथें कैंची बा धरिसी। ब्रह्मी पूर्ण जनी दासी॥ ४॥

२२. स्मरतांचि पावसी। तरी भक्तांसी लाधसी॥ १॥ ऐसें कांही न घडे देवा। वांयां कोण करी सेवा॥ २॥ न पुरतां आस। मग कोण पुसे देवास॥ ३॥ कोठें चक्रपाणि। तुज आधीं लाही जनी॥ ४॥

२३. बाप रखुमावाई वर। माझें निजाचें माहेर॥ १॥ तें हें जाणा पंढरपुर। जग मुक्तीचें माहेर॥ २॥ तेथें मुक्ति नाहीं म्हणे। जनी न पाहे त्यांची वदनें॥ ३॥

२४. अनंत लावण्याची शोभा। तो हा विटेवरी उभा॥ १॥ पितांबर माळ गांठी। भाविकांसी घाली मिठी॥ २॥ त्याचे पाय चुरी हातें। कष्टलीस माझे माते॥ ३॥ आवडी बोले त्यासी। चला जाऊं एकांतासी॥ ४॥ ऐसा ब्रह्मींचा पुतळा। दासी जनी पाहे डोळां॥ ५॥

२५. देव देखिला देखिला। नामें ओळखुनी ठेविला॥ १॥ तो हा विटेवरी देव। सर्व सुखाचा केशव॥ २॥ जनी म्हणे पूर्ण काम। विठ्ठल देवाचा विश्राम॥ ३॥

२६. योगी शीण झाला। तुजवांचुनी विठ्ठला॥ १॥ योग करितां अष्टांग। तुजविण शुका रोग॥ २॥ बैसला कपाटीं। रंभा लागे त्याच्या पाठीं॥ ३॥ तई त्वांचि सांभाळिला। जेव्हां तुज शरण आला॥ ४॥ सांगोनी पुत्रातें। त्वांचि छळिलें कश्यपातें॥ ५॥ अमराच्या राया। म्हणे जनी सुखालया॥ ६॥

२७. आळवितां धांव घाली। ऐसी प्रेमाची भुकेली॥ १॥ ते हे यशोदेच्या बाळा। बरवी पाहातसें डोळां॥ २॥ विटेवरी उभा नीट। केली पुंडलिकें धीट॥ ३॥ स्वानंदाचें लेणें ल्याली। पाहून दासी जनी धाली॥ ४॥

२८. स्तन पाजायाशी। आली होती ते माउशी॥ १॥ तिच्या उरावरी लोळे। विठो माझा क्रीडा खेळे॥ २॥ मेल्यें मेल्यें कृष्णनाथा। सोडीं सोडीं रे अनंता॥ ३॥ लिंग देह विरविरलें। जनी म्हणे या विठ्ठलें॥ ४॥

२९. अहो यशोदेचा हरी। गोपिकांसी कृपा करी॥ १॥ वेणु वाजवितो हरी। सर्व देवांचा साह्यकारी॥ २॥ धांवे धांवे गाईपाठी। जनी म्हणे जगजेठी॥ ३॥

३०. विठो माझा लेंकुरवाळा। संगें लेंकुरांचा मेळा॥ १॥ निवृत्ती हा खांद्यावरी। सोपानाचा हात धरी॥ २॥ पुढें चाले ज्ञानेश्वर। मागें मुक्ताई सुंदर॥ ३॥ गोरा कुंभार मांडिवरी। चोखा जीवा बरोबरी॥ ४॥ बंका कडियेवरी। नामा करांगुळी धरी॥ ५॥ जनी म्हणे गोपाळा। करी भक्तांचा सोहळा॥ ६॥

३१. नोवरीया संगें व्हाडीया सोहळा। मांडे पुरणपोळ्या मिळे अन्न॥ १॥ परीसाचेनि संगे लोहो होय सोनें। तयाची भूषणें श्रीमंतासी॥ २॥ जनी म्हणे जोड झाली विठोबाची। दासी नामयाची म्हणोनियां॥ ३॥

३२. तुझ्या निजरूपाकारणें। वेडावलीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

षडदर्शनें ॥ १ ॥ परि सोय न कळे त्यांसी। समीप असतां देवासी ॥ २ ॥ चारीश्रमें हो कष्टती। वेदशास्त्रें धुंडाळिती ॥ ३ ॥ परि कवणें रीति तुला। न जाणवे जी विठ्ठला ॥ ४ ॥ तुझी कृपा होय जरी। दासी जनी धुपद करी ॥ ५ ॥

३३. पंढरी सांडोनी जाती वाराणसी। काय सुख त्यांसी आहे तेथें ॥ १ ॥ तया पंचक्रोसी म्हणती मरावें। मरोनियां व्हावें जीवन्मुक्त ॥ २ ॥ नको गा विठोबा मज धाडूं काशी। सांगेन तुजपाशीं ऐक आतां ॥ ३ ॥ मरचीमात्र वेरण स्तंभी घाली। घालोनियां गाळी पापपुण्य ॥ ४ ॥ जावोनियां तेथें प्रहर दोन रात्रीं। सत्य मिथ्या श्रोती श्रवण करा ॥ ५ ॥ आई आई बाबा म्हणती काय करूं। ऐसें दुःख थोरू आहे तेथें ॥ ६ ॥ इक्षुदंड घाणा जैसा भरी माळी। तैसा तो कवळी काळनाथ ॥ ७ ॥ लिंगदेहादिक करिती कंदन। तेथील यातना नको देवा ॥ ८ ॥ न जाय तो जीव एकसरी हरी। रडती नानापरी नानादुःखें ॥ ९ ॥ अमरादिक थोर थोर भांबावले। भुलोनियां गेले मुक्तीसाठीं ॥ १० ॥ ती ही मुक्ति माझी खेळे पंढरीसी। लागतां पायांसी संतांचिया ॥ ११ ॥ ऐसिये पंढरी पहाती सिखरी। आणि भीमातीरीं मोक्ष आला ॥ १२ ॥ सख्या पुंडलकि लागतांचि पाया। मुक्ति म्हणे वायां गेलें मी कीं ॥ १३ ॥ घर रिघवणी मुक्ति होय दासी। मोक्ष तो पाठीसी धांव घाली ॥ २४ ॥ मोक्ष सुखासाठी मुक्ति लोळे। मीं नेघे कोणी कदा काळीं ॥ १५ ॥ मोक्ष मुक्ति जिहीं हाणितल्या पायीं। आमुची तो काय धरिती सोयी ॥ १६ ॥ समर्थाचे घरी भिक्षा नानापरी। मागल्या पदरीं घालिताती ॥ १७ ॥ अंबोल्या सांडोनी कोण मागे भीक। रामराज्याचें सुख तुझें ॥ १८ ॥ जनी म्हणे तुज रखुमाईची आण। जरी मज क्षण विसंबसी ॥ १९ ॥

करुणा.

३४. पाय जोडूनि विटेवरी। कर ठेउनी कटावरी ॥ १ ॥ रुप सांवळें सुंदर। कानीं कुंडलें मकराकार ॥ २ ॥ गळां माळ वैजयंती। पुढें गोपाळ नाचती ॥ ३ ॥ गरुड सन्मुख उभा। म्हणे जनी धन्य शोभा ॥ ४ ॥

३५. येगे माझे विठाबाई। कृपादृष्टीनें तूं पाहीं ॥ १ ॥ तुजविण न सुचे कांहीं। आतां मी वो करूं कांहीं ॥ २ ॥ माझा भाव तुजवरी। आतां रक्षीं नानापरी ॥ ३ ॥ येई सखये धांउनी। म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

३६. हात निढळावरी ठेवूनी। वाट पाहें चक्रपाणि ॥ १ ॥ धांव धांव पांडुरंगे। सखे जिवलगे अंतरंगे ॥ २ ॥ तुजवांचुनि दाही दिशा वाट पाहातें जगदीशा ॥ ३ ॥ हांसें करूं नको जनासी। म्हणे नामयाची दासी ॥ ४ ॥

३७. सख्या घेतलें पदरीं। आतां न टाकावें दुरी ॥ १ ॥ थोरांची उचितें। हेंचि काय सांगों तूंतें ॥ २ ॥ ब्रह्मियाच्या ताता। सज्जना लक्ष्मीच्या कांता ॥ ३ ॥ आपुली म्हणवूनि। आण गावी दासी जनी ॥ ४ ॥

३८. गंगा गेली सिंधूपाशीं। त्याने अव्हेरिलें तिसी ॥ १ ॥ तरी तें सांगावें कवणाला एसें बोलें बा विठ्ठला ॥ २ ॥ जळ कोपे जळचरा। माता अव्हेरी लेंकुरा ॥ ३ ॥ जनी म्हणे शरण आलें। अव्हेरितां ब्रीद गेलें ॥ ४ ॥

३९. माझी आंधळ्याची काठी। अडकली कवणे बेटीं ॥ १ ॥ आतां सांगूं मी कवणासी। धांवें पावें हृषीकेशी ॥ २ ॥ तुजवांचूनी विठ्ठला। कोणी नाहीं रे मजला ॥ ३ ॥ माथा ठेवीं तुझे चरणीं। म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

४०. कां गा न येसी विठ्ठला। ऐसा कोण दोष मला ॥ १ ॥ मायबाप तुंचि धनी। मला सांभाळीं निर्वाणीं ॥ २ ॥ त्वां बा उद्धरिलें थोर। तेथें किती मी पामर ॥ ३ ॥ दीनानाथा दीनबंधु। जनी म्हणे कृपासिंधू ॥ ४ ॥

४१. अगा रुक्मिणीनायका। सुरा असुरा प्रिय लोकां ॥ १ ॥ ते तूं धांवें माझे आई। सखे साजणी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विठाबाई॥ २॥ अगा शिवाचिया जपा। मदन ताता निष्पापा॥ ३॥ आपुली म्हणवुनी। अपंगावी दासी जनी॥ ४॥

४२. नाहीं केली तुझी सेवा। दुःख वाटतसे माझे जिवा॥ १॥ नष्ट पापीण मी हीन। नाहीं केलें तुझें ध्यान॥ २॥ जें जें दुःख झालें मला तें त्वां सोसिलें विठ्ठला॥ ३॥ रात्रंदिवस मजपाशीं। दळूं कांडूं लागलासी॥ ४॥ क्षमा करावी देवराया। दासी जनी लागे पायां॥ ५॥

४३. येरे येरे माझ्या रामा। मनमोहन मेघश्यामा॥ १॥ संतमिसें भेटी। देई देई कृपा गोष्टी॥ २॥ आमची चुकवी जन्मव्याधी। आम्हां देई हो समाधी॥ ३॥ जनी म्हणे चक्रपाणि। करी ऐसी हो करणी॥ ४॥

४४. अहो नारायणा। मजवरी कृपा कां कराना॥ १॥ मी तो अज्ञानाची रासी। म्हणोन आलें पायांपाशीं॥ २॥ जनी म्हणे आतां। मज सोडवी कृपावंता॥ ३॥

४५. आधीं घेतलें पदरीं। आतां न धरावें दुरी॥ १॥ तुम्हां थोराचें उचितें। हेंचि काय सांगूं तूंतें॥ २॥ अहो ब्रह्मियाच्या ताता। सखया लक्ष्मीच्या कांता॥ ३॥ दयेच्या सागरा। जनी म्हणे अमरेश्वरा॥ ४॥

४६. आम्ही जावें कवण्या ठाया। न बोलसी पंढरीराया॥ १॥ सरिता गेली सिंधूपाशीं। जरी तो ठाव न दे तिसी॥ २॥ जळ कोपलें जळचरासी। मादता न घे बाळकासी॥ ३॥ म्हणे जनी आलें शरण। जरी त्वां धरिलेंसें मौन्य॥ ४॥

४७. ऐक बापा हृषीकेशी। मज ठेवीं पायांपाशीं॥ १॥ तुझें रूप पाहीन डोळां। मुखीं नाम वेळोवेळां॥ २॥ हातीं धरिल्याची लाज। माझें सर्व करीं काज॥ ३॥ तुजविण देवाराया। कोणी नाहीं रे सखया॥ ४॥ कमळापति कमळा पाणि। दासी जनी लागे चरणीं॥ ५॥

४८. पोट भरूनी व्यालासी। मज सांडूनी कोठें जासी॥ १॥ धिरा धिरा पांडुरंगा। मज कां टाकिलें निःसंगा॥ २॥ ज्याचा जार त्यासी भार। मजला नाही आणिक थार॥ ३॥ विठाबाई मायबहिणी। तुझे कृपें तरली जनी॥ ४॥

४९. अविद्येच्या वो रात्रीं। आडकलों अंधारीं॥ १॥ तेथुनी काढावें गोविंदा। यशोदेच्या परमानंदा॥ २॥ तुझे सन्निधेचे पाशीं। ठाव नाहीं अविद्येसी॥ ३॥ तुझे संगतीं पावन। उद्धरिलें ब्रह्में पूर्ण॥ ४॥ अजामेळ शुद्ध केला। म्हणे दासी जनी भला॥ ५॥

५०. धन्य कलत्र माय। सर्व जोडी तुझे पाय॥ १॥ सखा तुजवीण पाहीं। दुजा कोणी मज नाहीं॥ २॥ माझी न करावी सांडणी। म्हणे तुझी दासी जनी॥ ३॥

५१. रुक्मिणीच्या कुंका। सुरां अमरां प्रिय लोकां॥ १॥ तूं धांव माझे आई। सखे साजणी विठाबाई॥ २॥ शिवाचिया जपा। मदनताता ये निष्पापा॥ ३॥ दयेच्या सागरा। म्हणे जनी अमरेश्वरा॥ ४॥

५२. मी वत्स माझी गायी। नये आतां करूं काई॥ १॥ तुम्ही तरी सांगा कांहीं। शेखी विनवा विठाबाई॥ २॥ येई माझिये हरणी। चुकलें पाडस दासी जनी॥ ३॥

५३. सख्या पंढरीच्या राया। घडे दंडवत पायां॥ १॥ ऐसें करीं अखंडित। शुद्ध प्रेम शुद्ध चित्त॥ २॥ वेध माझ्या चित्ता। हाचि लागो पंढरीनाथा॥ ३॥ जावें ओंवाळुनी। जन्मोजन्मीं म्हणे जनी॥ ४॥

५४. कां गा उशीर लाविला। माझा विसर पडिला॥ १॥ तुजवरी संसार। बोळविलें घरदार॥ २॥ तो तूं आपुल्या दासासी। म्हणे जनी विसंबसी॥ ३॥

५५. किती सांगूं तूंतें। बुद्धि शिकवणें हें मातें॥ १॥ सोमवंशाच्या भूषणा। प्रतिपाळीं हर्षें दीनां॥ २॥ शिकवावें तूंतें। हाचि अपराध आमुतें॥ ३॥ स्वामीलागी धीट ऐसी। म्हणती

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

शिकवी जनी दासी॥ ४॥

५६. शिणल्या बाह्या आतां। येऊनियां लावी हाता॥ १॥ तूं माझें वो माहेर। काय पहातोसी अंतर॥ २॥ वोंवाळुनी पायां। जीवेंभावें पंढरिराया॥ ३॥ धर्म ताता धर्म लेंकी। म्हणे जनी हें विलोकीं॥ ४॥

५७. योग न्यावा सिद्धि। सकळ गुणाचिया निधी॥ १॥ अरूपाच्या रूपा। सांब राजियाच्या बापा॥ २॥ ब्रह्मीयाच्या ताता। म्हणे जनी पंढरिनाथा॥ ३॥

५८. माय मेली बाप मेला। आतां सांभाळी विठ्ठला॥ १॥ मी तुझें गा लेंकरूं। नको मजसीं अव्हेरूं॥ २॥ मतिमंद मी तुझी दासी। ठाव द्यावा पायांपाशी॥ ३॥ तुजविण सखे कोण। माझें करील संरक्षण॥ ४॥ अंत किती पाहासी देवा। थोर श्रम झाला जीवा॥ ५॥ सकळ जीवाच्या जीवना। म्हणे जनी नारायणा॥ ६॥

५९. अहो सखीये साजणी। ज्ञानाबाई हो हरणी॥ १॥ मज पाडसाची माय। भक्ति वत्साची ते गाय॥ २॥ कां गा उशीर लाविला। तुजविण शिण झाला॥ ३॥ अहो बैंसलें दळणीं। धांव घाली म्हणे जनी॥ ४॥

६०. काय करूं या कर्मासी। धांव पाव हृषीकेशी॥ १॥ नाश होतो आयुष्याचा। तुझें नांव नये वाचा॥ २॥ काय जिणें या देहाचें। अखंड अवघ्या रात्रीचें॥ ३॥ व्यर्थ कष्टविली माता। तुझें नाम नये गातां॥ ४॥ जन्ममरणाचें दुःख। म्हणे जनी दाखवी मुख॥ ५॥

६१. अहो ब्रह्माडपाळका। ऐकें रुक्मिणीच्या कुंका॥ १॥ देवा घेतलें पदरीं। तें तुं टाकूं नको दुरी॥ २॥ होतें लोकांमध्यें निंद्य। तें त्वां जगांत केलें वंद्य॥ ३॥ विनवीतसें दासी जनी। परिसावी माझी विनवणी॥ ४॥

६२. येई जीवाचिया जीवा। रामा देवाचिया देवा॥ १॥ सर्व देव बंदी पाडिलें। रामा तुम्हीं सोडविले॥ २॥ मारूनियां लंकापती। सोडविली सीता सती॥ ३॥ देवा तुमची ऐसी ख्याती। रुद्रादिक तें वर्णिती॥ ४॥

६३. अहो देवा हरिहर। उतरी आम्हां भवपार॥ १॥ देवा आम्ही तुझे दास। करूं वैकुंठी वो वास॥ २॥ जनी म्हणे कल्पवृक्ष। देव दुष्टासी पें भक्ष॥ ३॥

६४. शरण आलों नारायण। आतां हो पावना॥ १॥ शरण आला मारुतिराया। त्याची दिव्य केली काया॥ २॥ शरम प्रल्हाद तो आला। हिरण्यकश्यपू मारिला॥ ३॥ जनी म्हणे देवा शरण। व्हावें भल्यानें जाणोन॥ ४॥

६५. ऐका बापा माझ्या पंढरीच्या राया। कीर्तना आल्यें या आर्तभूतां॥ १॥ माझ्या दुणेदारा पुरवीं त्याची आस। न करीं निरास आर्तभूतां॥ २॥ त्रैलोक्याच्या राया सख्या उमरावा। अभय तो द्यावा कर तयां॥ ३॥ जैसा चंद्रश्रवा सूर्य उच्चैश्रवा। अढळपद ध्रुवा दिधलेंसें॥ ४॥ उपमन्यु बाळका क्षीराचा सागरू। ऐसा तूं दातारू काय वानूं॥ ५॥ म्हणे दासी जनीं आलें या कीर्तनीं। तया कंठाळुनी पिटूं नका॥ ६॥

६६. गजेंद्रासी उद्धरिलें। आम्ही तुझें काय केलें॥ १॥ तारिली गणिका। तिही लोकीं तुझा शिक्का॥ २॥ वाल्हा कोळी अजामेळ। पापी केला पुण्यशीळ॥ ३॥ गुणदोषमना नाणीं। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

६७. राजाई गोणाई। अखंडित तुझे पायीं॥ १॥ मज ठेवियलें द्वारीं। नीच म्हणोनि बाहेरी॥ २॥ नारा गोंदा महादा विठा। ठेवियलें अग्रवाटा॥ ३॥ देवा केव्हां क्षेम देसी। आपुली म्हणोनि जनी दासी॥ ४॥

६८. काय करूं पंढरीनाथा। काळ साह्य नाहीं आतां॥ १॥ मज टाकिलें परदेशीं। नारा विठा तुजपाशीं॥ २॥ श्रम बहु झाला जीवा। आतां सांभाळीं केशवा॥ ३॥ कोण सखा तुजविण।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माझें करी समाधान॥ ४॥ हीन दीन तुझे पोटीं। जनी म्हणे द्यावी भेटी॥ ५॥

भेट

६९. तुझे पाय रूप डोळां। नाहीं देखिलें गोपाळा॥ १॥ काय करूं या कर्मासी। नाश होतो आयुष्यासी॥ २॥ जन्मा येऊनियां दुःख। नाहीं पाहिलें श्रीमुख॥ ३॥ लळे पुरविसी आमुचे। म्हणे जनी ब्रीद साचें॥ ४॥

७०. वाट पाहतें मी डोळां। कां गा न येसी विठ्ठला॥ १॥ तूं वो माझी निज जननी। मज कां टाकियलें वनीं॥ २॥ धीर किती धरूं आतां। धाव घाली पंढरिनाथा॥ ३॥ मला आवड भेटीची। धनी होईन पायांची॥ ४॥ सर्व जीवांचे स्वामिणी। म्हणे जनी मायबहिणी॥ ५॥

७१. येग येग विठाबाई। माझे पंढरीचे आई॥ १॥ भीमा आणि चंद्रभागा। तुझे चरणींच्या गंगा॥ २॥ इतुक्यांसहित त्वां बा यावें। माझे रंगणीं नाचावें॥ ३॥ माझा रंग तुझिया गुणीं। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

७२. आतां वाट पाहूं किती। देवा रुक्माईच्या पती॥ १॥ येई येई पांडुरंगे। भेटी देई मजसंगें॥ २॥ मी बा बुडतें भवजळीं। सांग बरवी ब्रीदावळी॥ ३॥ राग न धरावा मनीं। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

७३. विठोबारायाच्या अगा लेकवळा। जाऊनी कळवळा सांगा माझा॥ १॥ विठोबारायाच्या अगा मुख्य प्राणा। भेटवी निधाना आपुलिया॥ २॥ अगे क्षेत्र माये सखे पंढरीये। मोकलिते पाय जीव जातो॥ ३॥ विश्वाचिये मातें सुखाचें अमृत। सखा पंढरीनाथ विनवी तरी॥ ४॥ तूं मायबहिणी देवांचे रुक्मिणी। धरोनियां जनी घाली पायीं॥ ५॥

७४. कां गे निष्ठुर झालीसी। मुक्या बाळातें सांडिसी॥ १॥ तुज वांचोनियां माये। जीव माझा जावो पाहे॥ २॥ मी वत्स माझी माय। नये आतां करूं काय॥ ३॥ प्राण धरियेला कंठीं। जनी म्हणे देई भेटी॥ ४॥

७५. माझिये जननी हरिणी। गुंतलीस कवणे वनीं॥ १॥ मुकें तुझें मी पाडस। चुकलें माये पाहे त्यास॥ २॥ चुकली माझिये हरिणी। फिरतसे रानोरानीं॥ ३॥ आतां भेटवा जननीं। विनवितसे दासी जनी॥ ४॥

७६. धन्य ते पंढरी धन्य पंढरिनाथ। तेणें हो पतित उद्धरिले॥ १॥ धन्य नामदेव धन्य पंढरिनाथ। तयानें अनाथ उद्धरिले॥ २॥ धन्य ज्ञानेश्वर धन्य त्याचा भाव। त्याचे पाय देव आम्हां भेटी॥ ३॥ नामयाची जनी पालट पैं झाला। भेटावया आला पांडुरंग॥ ४॥

७७. चिंतनीं चित्ताला। लावी मनाच्या मनाला॥ १॥ उन्मनीच्या मुखा आंत। पांडुरंग भेटी देत॥ २॥ कवटाळुनी भेटी पोटीं। जनी म्हणे सांगूं गोष्टी॥ ३॥

७८. देहाचा पालट विठोबाचे भेटीं। जळ लवणा गांठी पडोन ठेली॥ १॥ धन्य मायबाप नामदेव माझा। तेणें पंढरिराजा दाखविलें॥ २॥ रात्रंदिवस भाव विठ्ठलाचे पायीं। चित्त ठायींचे ठायीं मावळलें॥ ३॥ नामयाचे जनी आनंद पैं झाला। भेटावया आला पांडुरंग॥ ४॥

७९. पुंडलिकें नवल केलें। गोपि-गोपाळ आणिलें॥ १॥ हेंचि देई हृषीकेशी। तुझें नाम अहर्निशीं॥ २॥ नलगे आणिक प्रकार। मुखीं हरी निरंतर॥ ३॥ रूप न्याहाळिन डोळां। पुढें नाचेन वेळोवेळां॥ ४॥ सर्वांठायी तुज पाहे। ऐसे देऊनि करीं साह्य॥ ५॥ धांवा करितां रात्र झाली। दासी जनीसी भेट दिली॥ ६॥

भक्तवत्सलता.

८०. झाडलोट करी जनी। केर भरी चक्रपाणि॥ १॥ पाटी घेऊनियां शिरीं। नेऊनियां टाकी दुरी॥ २॥ ऐसा भक्तिसी भूलला। नीच कामें करूं लागला॥ ३॥ जनी म्हणे विठोबाला। काय उतराई होऊं तुला॥ ४॥

८१. पूर्वी काय तप नेणें पैं हो केलें। निधान

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जोडिलें पंढरीचें॥ १ ॥ येऊनियां देव दळूं लागे अंगें। रखुमाईचा संग दूर केला॥ २॥ तैसाचि पैं संगें येऊनि बाहेरी। वेचोनियां भरी शेणी अंगें॥ ३॥ ओझें झालें म्हणूनि पाठी पीतांबरी। घेऊनियां घरीं आणितसे॥ ४॥ ऐसें जेथें काम करी चक्रपाणि। तेथें कैंची जनी नामयाची॥ ५॥

८२. एकटी तूं गाणें गासी। दुजा शब्द उमटे पाशी॥ १॥ कोण गे तुझ्याबरोबरी। गाणें गाती निरंतरीं॥ २॥ पांडुरंग माझा पिता। रखुमाई झाली माता॥ ३॥ ऐशियाच्या घरीं आलें। जनी म्हणे धन्य झालें॥ ४॥

८३. जनी डोईनें गांजलीं। विठाबाई धांविन्नली॥ १॥ देव हातें बुचडा सोडी। उवा मारीतसे तांतडी॥ २॥ केश विंचरुनी मोकळे केले। जनी म्हणे निर्मळ झालें॥ ३॥

८४. जनी बैसली न्हायाला। पाणी नाहीं विसणाला॥ १॥ घागर गेऊनि पाण्या गेली। मागें मागें धांव घाली॥ २॥ घागर घेऊनियां हातीं। पाणी रांजणांत ओती॥ ३॥ ऐसा येरझारा केल्या। रांजण घागरी भरिल्या॥ ४॥ पाणी पुरे पांडुरंगा। दासी जनीच्या अंतरंगा॥ ५॥

८५. एके दिवशी न्हावयास। पाणी नव्हतें विसणास॥ १॥ देव धांवोनियां आले। शीतळ उदक घे घे बोले॥ २॥ आपुल्या हातें विसणी। घाली जनीच्या डोयीं पाणी॥ ३॥ माझ्या डोईच्या केसांस। न्हाणें नव्हतें फार दिवस॥ ४॥ तेणें मुरडी केसांस। कां म्हणे उगीच बैस॥ ५॥ आपुल्या हातें वेणी घाली। जनी म्हणे माय झाली॥ ६॥

८६. तुळशीचे बनीं। जनी उकलीत वेणी॥ १॥ हातीं घेऊनियां लोणी। डोई चोळी चक्रपाणि॥ २॥ माझे जनीला नाहीं कोणी। म्हणूनि देव घाली पाणी॥ ३॥ जनी सांगे सर्व लोकां। न्हाऊं घाली माझा सखा॥ ४॥

८७. साळी सडायास काढी। पुढें जाउनी उखळ झाडी॥ १॥ कांडितां कांडितां। शीण आला पंढरिनाथा॥ २॥ सर्वअंगी घाम आला। तेणें पितांबर भिजला॥ ३॥ पायीं पैंजण हातीं कडीं। कोंडा पांखडुनि काढी॥ ४॥ हाता आला असे फोड। जनी म्हणे मुसळ सोड॥ ५॥

८८. ज्याचा सखा हरी। त्यावरी विश्व कृपा करी॥ १॥ उणें पडों नेदी त्याचें। वारें सोसी आघाताचें॥ २॥ तयावीण क्षणभरी। कदा आपण नव्हे दुरी॥ ३॥ आंगा आपुले ओढोनी। त्याला राखे जो निर्वाणीं॥ ४॥ ऐसा अंकित भक्तांसी। म्हणे नामयाची दासी॥ ५॥

८९. पक्षी जाय दिगंतरा। बाळाकांसी आणी चारा॥ १॥ घार हिंडते आकाशीं। झांप घाली पिल्लांपासी॥ २॥ माता गुंतली कामासी। चित्त तिचें बाळापाशीं॥ ३॥ वानर हिंडे झाडावरी। पिलीं बांधुनी उदरीं॥ ४॥ तैसी आम्हांसी विठ्ठल माये। जनी वेळोवेळां पाहे॥ ५॥

९०. भक्त जें जें कर्म करिती। तें तूं होसी कृपामूर्ती॥ १॥ हें तों नवल नव्हे देवा। भुललासी भक्तिभावा॥ २॥ वाग्दोर धरुनी दांतीं। चारी घोडे चहूं हातीं॥ ३॥ धूतां लाज नाहीं तुला। दासी जनी म्हणे भला॥ ४॥

९१. देव भावाचा लंपट। सोडुनी आला हो वैकुंठ॥ १॥ पुंडलिकापुढें उभा। सम चरणांवरी शोभा॥ २॥ हातीं चक्र पायीं वांकी। मुख भक्ताचें अवलोंकीं॥ ३॥ उभा बैसे न सर्वथा। पाहे कोठें भक्तकथा॥ ४॥ सर्व सुखाचा सागर। जनी म्हणे सारंगधर॥ ५॥

९२. दुःशासन द्रौपदीसी। घेउनी आला तो सभेसी॥ १॥ दुर्योधन आज्ञा करी। नग्न करावी सुंदरी॥ २॥ आतां उपाय कृष्णा काय। धांवें माझे विठ्ठल माय॥ ३॥ निरी ओढतां दुर्जन। झालें आणिक निर्माण॥ ४॥ ऐसां असंख्य फेडिलीं। देवीं तितुकीं पुरविलीं॥ ५॥ तया संतां राखिलें कैसें। जनी मनीं प्रेमें हांसे॥ ६॥

९३. ब्राह्मणाचें पोर। मागे दूध रडे फार॥ १॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

माता म्हणे बालकासी। दूध मागें देवापाशीं॥ २॥ क्षीराब्धींची वाटी। म्हणे जनी लावी ओंठीं॥ ३॥

९४. पंढरीच्या राया। माझी विनवणी पायां॥ १॥ काय वर्णूं हरिच्या गोष्ठी। अनंत ब्रह्मांडें याचे पोटीं॥ २॥ सेना न्हावी याचे घरीं। अखंड राबे विठ्ठल हरी॥ ३॥ राम चिंती ध्यानी मनीं। म्हणे नामयाची जनीं॥ ४॥

९५. भिल्लणीची फळें कैशीं। चाखोनी वाहातसे देवासी॥ १॥ भावें तिचीं अंगिकारी। सर्वांहुनी कृपा करी॥ २॥ गुज वान्नरांसी पुसावें। राक्षसातें हो जिंकावें॥ ३॥ वान्नर अवघे भुभुःकार। बोलताती रामासमोर॥ ४॥ आज्ञा करावी आम्हांसी। रावण आणितों तुम्हांपासीं॥ ५॥ तुझ्या नामाच्या प्रतापें। हनुमंत गेला जी संतापें॥ ६॥ सीताशुद्धि करुनी आला। दासी जनीस आनंद झाला॥ ७॥

९६. यातिहीन चोखमेळा। त्यासी भक्तांचा कळवळा॥ १॥ त्याचा झाला म्हणीयारा। राहे घरीं धरी थारा॥ २॥ देह बाटविला त्याणें। हांसे जनी गाय गाणें॥ ३॥

९७. चोखामेळा संत भला। तेणें देव भुलवीला॥ १॥ भक्ति आहे ज्याची मोठी। त्याला पावतो संकटीं॥ २॥ चोख्यामेळ्याची करणी। तेणें देव केला ऋणी॥ ३॥ लागा विठ्ठलचरणीं। म्हणे नामयाची जनीं॥ ४॥

९८. माळियाचा लेक झाला। सेखीं कुर्म्यालागीं गेला॥ १॥ चांभाऱ्यानें जानव्यासी। काढोन दाविलें भटांसी॥ २॥ तुरका घरीं विणी। म्हणे नामयाची जनी॥ ३॥

९९. माझा लोभ नाहीं देवा। तुझी करीं ना मी सेवा॥ १॥ नाहीं अंगी थोरपण। मिथ्या धरिसी गुमान॥ २॥ रागा येऊनि काय करिसी। तुझें बळ आम्हांपासीं॥ ३॥ नाहीं सामर्थ्य तुज हरी। जनी म्हणे धरिला चोरीं॥ ४॥

१००. द्रोपदीकारण। पाठीराखा नारायण॥ १॥ गोरा कुंभाराच्या संगें। चिखल तुडवूं लागे अंगें॥ २॥ कबिराच्या बैसोनि पाठीं। शेले विणितां सांगे गोष्टी॥ ३॥ चोख्यामेळ्यासांठीं। ढोरें ओढी जगजेठी॥ ४॥ जनीसंगें दळूं लागे। सुरवर म्हणती धन्य भाग्यें॥ ५॥

१०१. देव भक्तांचा अंकित। कामें त्याची सदा करित॥ १॥ त्याचें पडों नेदी उणे। होय रक्षिता आपण॥ २॥ जनी म्हणे भक्तिभाव। देवदास ऐक्य जीव॥ ३॥

१०२. बाळेभोळे ठकविशी। तें तंव न चालें आम्हांपाशीं॥ १॥ गर्व धरिसी नामाचा। सोहं सोहं गर्जे वाचा॥ २॥ आशा तृष्णा तुम्हांपांशीं। नाहीं म्हणे जनी दासी॥ ३॥

१०३. जेवीं जेवीं बा मुरारी। तुज वाढिली शिदोरी॥ १॥ कनकाचे तार्टीं। रत्नजडित ठेविली वाटी॥ २॥ आमुचें ब्रह्म सारंगपाणी। हिंडतसे रानोरानीं॥ ३॥ गोपाळांचे मेळी। हरि खेळे चेंडूफळी॥ ४॥ तुळसीचे बनीं। उभी राहे दासी जनी॥ ५॥

१०४. जनी म्हणे पांडुरंगा। माझ्या जीवीच्या जीवलगा। विनवितें सांगा। महिमा साधुसंतांचा॥ १॥ कैसी वसविली पंढरी। काय महिमा भीमातीरीं। पुंडलिकाच्या द्वारीं। कां उभा राहिलासी॥ २॥ कैसा आला हा गोविंद। कैसा झाला वेणुनाद। येउनी नारद। कां राहिला॥ ३॥ कृपा करा नारायणा। सांगा अंतरीच्या खुणा। येऊं दे करुणा। दासी जनी विनवितसे॥ ४॥

१०५. दुर्योधना मारी। पांडवासी रक्षी हरी॥ १॥ पांडव वनवासी जाये। तयापाठीं देव आहे॥ २॥ उणें न पडे तयांचें। काम पुरवी हो मनाचे॥ ३॥ जनी म्हणे विदुराच्या। कण्या भक्षी हो प्रीतीच्या॥ ४॥

१०६. स्कंधी ऋषि तो वाहिला। बळीनें द्वारपाळ केला॥ १॥ भक्ता आधीन होसी। त्याच्या वचनी वर्तसी॥ २॥ तयाचे गर्भवास सोसी। कष्टी होत अंबऋषी॥ ३॥ सर्व दुःखासी साहिलें। जनी म्हणें बरवें केलें॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१०७. भक्तिसाठीं याति नाहीं। नाहीं तयासी तें सोई॥ १॥ रोहिदास तो चांभार। त्याचा करी कारभार॥ २॥ जो कां भक्त यातिहीन। देव करी त्याचा मान॥ ३॥ त्यासी भक्ताचा आधार। वाट पाहे निरंतर॥ ४॥ जनी म्हणे भक्तासीठीं। विठो सदा गोण्या लोटी॥ ५॥

१०८. चोखामेळा अनामिक। भक्तराज तोचि एक॥ १॥ परब्रह्म त्याचे घरीं। न सांगतां काम करी॥ २॥ रोहिदास तो चांभार। पाहे मोमिन कबीर॥ ३॥ नेमी जनी नीच दासी। रंगी वेढी नागर पिशी॥ ४॥

१०९. देव तारक तारक। देव दुष्टांसी मारक॥ १॥ गीतेमध्यें आदि अंत। ऐसें बोले तो भगवंत॥ २॥ शत्रुलागीं आधीं मारी भक्तसंकटी रक्षी हरी॥ ३॥ जनी म्हणे कृपा करी। भाव पाहोन अंतरी॥ ४॥

११०. पांडवांचे घरीं। रात्रंदिवस मुरारी॥ १॥ तेंच सखा नामयाचा। एके ठायीं जेवायाचा॥ २॥ त्याच्या उच्छिष्टाचा ग्रास। जनी हात उचली त्यास॥ ३॥

१११. भूत झालें ऋषि पोटीं। लावियेलें मृगापाठीं॥ १॥ विश्वामित्रा घाला घाली। पोटीं शकुंतला आली॥ २॥ भगांकित केला। इंद्र भूतानें झडपिला॥ ३॥ तेंचि झालें हें भारत। म्हणे जनी केली मांत॥ ४॥

११२. दोहींकडे दोही जाया। मध्यें गोरोबाची शय्या॥ १॥ गोरा निद्रिस्त असतां। कपट करिती त्याच्या कांता॥ २॥ गोरोबांचे दोन्ही हात। आपुल्या हृदयावरी ठेवित॥ ३॥ जागा झाला गोरा भक्त। जनी म्हणे त्या निद्रित॥ ४॥

११३. अहो द्रौपदीच्या बंधू। तारक देवा कृपासिंधू॥ १॥ पांचाळीसी वस्त्रें देत। पुरवितो जगन्नाथ॥ २॥ जनी म्हणे भाग्यवंत। तिच्या भावाचा अंकित॥ ३॥

११४. बाप श्रोतियाचा राजा। कैसी उभारिली ध्वजा॥ १॥ एक झाला परिक्षिती। ऐसे पवाडे गर्जिती॥ २॥ भागवती रससुखें। द्रौपदी वाढी सावकाशें॥ ३॥ ज्याची ऐकतां गर्जना। कंप काळाचिया मना॥ ४॥ सात दिवस वृष्टि झाली। जनी म्हणे मात केली॥ ५॥

११५. मांडियेला डाव। कौरवांनीं दुष्ट भाव॥ १॥ टाकियेला फांसा। पांडव गेले वनवासा॥ २॥ वना गेले पांडवबळी। दिनकरें दिधली थाळी॥ ३॥ पांडवाची कृष्णाबाई। जनी म्हणे माझी आई॥ ४॥

११६. कोणे एके दिवशीं। विठो गेला जनीपाशीं॥ १॥ हळूच मागतो खायासी। काय देऊं बा मी तुसी॥ २॥ हातीं धरून नेला आंत। वाढी पंचामृत भात॥ ३॥ प्रेमसुखाचा ढेंकर दिला। जनी म्हणे विठो धाला॥ ४॥

११७. एके दिवशीं वाडियांत देव आले अवचित॥ १॥ अवधीं पायांस लागली। देवें त्यांवरी कृपा केली॥ २॥ बाहेर कामासी गुंतल्यें। देवें मजला विचारिलें॥ ३॥ बाहेर आहेस वो बोलती। देव मजला हाटकिती॥ ४॥ हात धुऊनि जवळ गेल्यें। कोण गे जनी हांसून बोले॥ ५॥

११८. दळण्याच्या मिषें। विठ्ठल सावकाशें॥ १॥ देहबुद्धीचें वैरण। द्वैत खडा रे निसून॥ २॥ एकलीच गातां। दुजा साद उमटतां॥ ३॥ कोण तुझे बरोबरी। साद देतो निरंतरी॥ ४॥ खूण कळली नामदेवा। विठ्ठल श्रोता जनीच्या भावा॥ ५॥

११९. मग हांसोनि सकळी। पाहूं देव कैसा बळी॥ १॥ आले नामदेवा घरी। प्रेमें झुललासे हरी॥ २॥ घाली जातिया वैरण। गाय आवडीचें गाणें॥ ३॥ पुढें देखे ज्ञानेश्वरा। देव झालासे घाबरा॥ ४॥ जनी म्हणे पंढरिनाथा। जाय राउळासी आतां॥ ५॥

१२०. निवृत्ति पुसत। कोठें होते पंढरिनाथ॥ १॥ खूण कळली हृषीकेशी। सांगों नके निवृत्तीसी॥ २॥ उत्तर दिलें ज्ञानदेवें। नवल केवढें सांगावें॥ ३॥ शिव बंदी पायवणी। नये योगियांचे ध्यानीं॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

द्वारीं उभे ब्रह्मादिक। गुण गाती सकळिक॥ ५॥ जनीसवें दळी देव। तिचा देखोनियां भाव॥ ६॥

१२१. काकड आरती। करावया कमळापती॥ १॥ भक्त मिळाले सकळ। रितें देखिलें देऊळ॥ २॥ ज्ञानेश्वर बोले। आतां देव कोठें गेले॥ ३॥ ठावें जाहलें अंतरीं। देव दळी जनी घरी॥ ४॥

१२२. जाय जाय राउळासी। नको येऊं आम्हांपाशीं॥ १॥ जाऊं आम्ही बरोबर। झाला तिया हो चाकर॥ २॥ तिजसंगें काम करी। ऐसे जाणा देव हरी॥ ३॥ चहूं हातीं धुणें केलें। जनी म्हणे बरें झालें॥ ४॥

१२३. आतां पुरे हा संसार। कोठें फेडूं उपकार॥ १॥ सांडूनियां थोरपण। करी दळण कांडण॥ २॥ नारिरूप होउनी हरी। माझें न्हाणें धुणें करी॥ ३॥ राना जाये वेंची शेणी शेखी वाहे घरीं पाणी॥ ४॥ ठाव मागें पायापाशी। म्हणे नामयाची दासी॥ ५॥

१२४. धुणें घेऊनि कांखेसी। जनी गेली उपवासी॥ १॥ मागें विट्ठल धांवला। म्हणे कां ठाकिलें मला॥ २॥ कां गा धांवोनि आलासी। जाय जाय राउळासी॥ ३॥ चहूं हातें धुणें केलें। जनी म्हणे बरें झालें॥ ४॥

१२५. जनी जाय शेणासाठी। उभा आहे तिच्यापाठीं॥ १॥ पितांबराची कांस खोवी। मागें चाले जनाबाई॥ २॥ गौऱ्या वेंचूनि बांधिली मोट। जनी म्हणे द्यावी गांठ॥ ३॥ मोट उचलून डोईवर घेई। मागें चाले जनाबाई॥ ४॥

१२६. राना गेली शेणीसाठीं। वेंचूं लागे विठोपाठीं॥ १॥ पितांबर ओंचे खोंवी। पायी शोभा पारखावी॥ २॥ रिती बांधितांचि मोट। जनी म्हणे द्यावी भेट॥ ३॥

१२७. जनीचिया बोलें करू नित्य काम। वसवी तिचें धाम लक्ष्मीसी॥ १॥ जनीचिया गोष्टी प्रेम ज्याचे मनीं। तयाचे चरणी ओढवी माया॥ २॥ महेशादि देव तेहि तया ध्याती। जे आवडे गाती जनी ध्याती॥ ३॥

१२८. आई मेली बाप मेला। मज सांभाळी विठ्ठला॥ १॥ हरी रे मज कोणी नाही। माझी खात असे डोई॥ २॥ विठ्ठल म्हणे रुक्मिणी। माझे जनीला नाही कोणी॥ ३॥ हातीं घेउनी तेलफणी। केंस विंचरून घाली वेणी॥ ४॥ वेणी घालुन दिधली गांठ। जनी म्हणे चोळ बा पाठ॥ ५॥ जनी म्हणे बा गोपाळा। करी दुबळीचा सोहळा॥ ६॥

१२९. एक प्रहर रात्र झाली। फेरी विठ्ठलाची आली॥ १॥ नामा म्हणे जनी पाहे। द्वारीं उभा कोण आहे॥ २॥ प्रभा घरांत दाटली। एक सराद सुटली॥ ३॥ एकमेकां आलिंगन। नामा म्हणे जनी धन्य॥ ४॥

१३०. जनी जाय पाणीयासी। मागें धांवे हृषीकेशी॥ १॥ पाय भिजों नेदी हात। माथां घागरी वहात॥ २॥ पाणी रांजणांत भरी। सडासारवण करी॥ ३॥ धुणें धुऊनियां आणी। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

१३१. शेट्या झाला हरी। द्रव्य गोणी लोटी द्वारीं॥ १॥ बुद्धि सांगे राजाईसी। तुम्ही न छळावें नाम्यासी॥ २॥ अवघ्या वित्तासी वेंचावें। सरल्या मजपाशीं मागावें॥ ३॥ विठ्ठलशेट नाम माझें। नामयाला सांगावें॥ ४॥ आतां उचित दासा! ऐसें बोले राजाईसी॥ ५॥ ऐसें बोलोनियां गेला। जनी म्हणे नामा आला॥ ६॥

१३२. नामदेवाचे घरीं। चौदाजण स्मरती हरी॥ १॥ चौघे पुत्र चौघी सुना। नित्य स्मरती नारायणा॥ २॥ आणिक मायबाप पाहीं। नामदेव राजाबाई॥ ३॥ आऊबाई लेकी निंबाबाई बहिणी। पंधरावी ती दासी जनी॥ ४॥

१३३. माझा नामा मज देई। जीव देईन तुझे पायीं॥ १॥ पुंडलिका भुलविलें। तैसें माझिया बाळा केलें॥ २॥ तें गा न चले मजपाशीं। दे गा माझ्या नामयासी॥ ३॥ तुझ्यासंगें जें जे गेलें। ते

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्वां जितेंचि मारिले ॥ ४ ॥ विठ्ठल म्हणे गोणाबाई। नामा तुझा घेवोनियां जाई ॥ ५ ॥ हातीं धरोनियां आली। दासी जनी आनंदली ॥ ६ ॥

१३४. धरा सतराचा हो मेळा। कारखाना झाला गोळा। वाजविती आपुल्या कळा। प्रेमबळा आनंदें ॥ १ ॥ झडतो नामाचा चौघडा। ब्रह्मी ब्रह्मरूपीचा हुडा। संत ऐकताती कोडां। प्रेमबळा आनंदें ॥ २ ॥ नामा दामा दोनी काळू। नामा विठा दमामे पैलू। चौघी सुना चारी हेलू। कडकडां बोल उमटती ॥ ३ ॥ गोंदा म्हादा करणी करी। नादें दुमदुमली पंढरी। आऊबाई तुतारी। मंजुळ उमटती स्वरी ॥ ४ ॥ गोणाबाई नोबतपल्ला। नाद अंबरी कोंदला। राजाई झांज मंजुळ बोला। मंजुळस्वर उमटला ॥ ५ ॥ जनाबाई घड्याळ मोगरी। घटका भरतां टोला मारी। काळ व्यर्थचि गेला तरी। गजर आनंदें करी ॥ ६ ॥

१३५. विठोबा चला मंदिरांत। गस्त हिंडती बाजारांत ॥ १ ॥ रांगोळी घातली गुलालाची। शेज म्यां केली पुष्पांची ॥ २ ॥ समया जळती अर्ध रात्रीं। गळयामध्यें माळ मोत्यांची ॥ ३ ॥ नामदेवाला सांपडलें माणिक। घेतलें जनीनें हातांत ॥ ४ ॥ घेउनी गेली राउळांत। गस्त हिंडती हकिमाची बाजारांत ॥ ५ ॥

१३६. लोलो लागला अंबेचा। विठाबाई आनंदीचा ॥ १ ॥ आदि ठाणें पंढरपूर। नांदे कान्हाई सुंदर ॥ २ ॥ गोणाईनें नवस केला। देवा पुत्र देई मला ॥ ३ ॥ शुद्ध देखोनियां भाव। पोटी आले नामदेव ॥ ४ ॥ दामाशेटी हरुषला। दासी जनीस आनंद झाला ॥ ५ ॥

१३७. नामदेवा पुत्र झाला। विठो बारशासी आला ॥ १ ॥ आंगडें टोपडें पेहरण। शेला मुंडासा घेऊन ॥ २ ॥ माझ्या जीवीच्या जीवना। नाम ठेवी नारायणा ॥ ३ ॥ जनी म्हणे पांडुरंगा। नांव काय ठेऊं सांगा ॥ ४ ॥

१३८. हाटीं जायचि तांतडी। नामा होता पैलथडी ॥ १ ॥ म्हणे जा गे आणा त्यासी। नाही तरी मी उपवासी ॥ २ ॥ जनी धांवत चालली। मागें विठ्ठल माउली ॥ ३ ॥

१३९. पुंडलिकापाशी। नामा उभा कीर्तनासी ॥ १ ॥ येऊनियां पांडुरंगें। स्वयें टाळ धरी अंगें ॥ २ ॥ गाऊं लागे बरोबरी। नाहीं बोलायाची उरी ॥ ३ ॥ स्वर देवाचा उमटला। दासी जनीनें ओळखिला ॥ ४ ॥

१४०. ऐसी कीर्तनाची गोडी। वैकुंठीहुनी घाली उडी ॥ १ ॥ आपण वैकुंठीच नसे। भक्तापासीं जाण वसे ॥ २ ॥ जनी म्हणे कृपानिधी। भक्तभावाची मांदी शोधी ॥ ३ ॥

१४१. राधा आणि मुरारी। क्रीडा कुंजवनीं करी ॥ १ ॥ राधा डुल्लत डुल्लत। आली निजभुवनांत ॥ २ ॥ सुमनाचे सेजेवरी। राधा आणि तो मुरारी ॥ ३ ॥ आवडीनें विडे देत। दासी जनी उभी तेथ ॥ ४ ॥

१४२. विठ्ठलाचा छंद। वाचें गोविंद गोविंद ॥ १ ॥ हाचि बोला हो सिद्धांत। देव सांगे हो धादांत ॥ २ ॥ जनी म्हणे सांगेन आतां। कृपें ऐका पंढरिनाथा ॥ ३ ॥

१४३. जनीनें बोलिलें तैसेंच लिहिलें। साध्य परिसिलें तुम्हीं संतीं ॥ १ ॥ अहो ज्ञानदेवा असावें तुम्हां ठावें। येणें काय लहाणीव आणिली आम्हां ॥ २ ॥ माझी मज आण सांगतें प्रमाण। सेवितें चरण तुझे स्वामी ॥ ३ ॥ जनीचे हो बोल स्वानंदाचे डोल। स्वामि मुखीं बोल दुणावती ॥ ४ ॥ शुद्ध सत्त्व कागद नित्य करी शाई। अखंडित लिही जनीपाशीं ॥ ५ ॥ हांसोनि ज्ञानदेवें पिटियेली टाळी। जयजयकार सकळीं केला थोर ॥ ६ ॥

१४४. जिव्हा लागली नामस्मरणीं। रित्या मापें भरी गोणी ॥ १ ॥ नित्य नेमाची लाखोली। गुण आज्ञेनें मी पाळी ॥ २ ॥ मज भरंवसा नामाचा। गजर नाम्याच्या दासीचा ॥ ३ ॥ विटेवरी ब्रह्म दिसे। जनी त्याला पाहातसे ॥ ४ ॥

१४५. सोंगा सोंगा जाय। नवल जाऊनी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

हांसताहे॥ १॥ हांसोनियां बडवी टिरी। कोण नाठवी हे परी॥ २॥ हा नाठवी आपणा। म्हणे जनी भुलले जाणा॥ ३॥

१४६. देहभाव सर्व जाय। तेव्हां विदेही सुख होय॥ १॥ तया निद्रें जे पहुडले। भवजागृति नाहीं आले॥ २॥ ऐसी विश्रांति लाधली। आनंदकळा संचरली॥ ३॥ त्या एकी एक होतां। दासी जनी कैंचि आतां॥ ४॥

१४७. एके रात्रींचे समयीं। देव आले लवलाहीं॥ १॥ सुखशेजे पहुडले। जनीसवें गुज बोले॥ २॥ गुज बोलतां बोलतां। निद्रा आली अवचिता॥ ३॥ उठा उठा चक्रपाणि। उजाडलें म्हणें जनी॥ ४॥

१४८. पदक माळा सकलादे। तेथें टाकिली गोविंदें॥ १॥ देव तांतडी निघाले। वाकळ घेउनी पळाले॥ २॥ भक्त येती महाद्वारीं। चोर पडले देव्हारीं॥ ३॥ नवल झालें पंढरपुरीं। देव राबे दासी घरीं॥ ४॥ त्रिभुवनांत मात गेली। दासी जनी प्रगटली॥ ५॥

१४९. पदक विठ्ठलाचें गेलें। ब्राह्मण म्हणती जनीनें नेलें॥ १॥ अंगे शिंपियाचे जनी। नेलें पदक दे आणुनी॥ २॥ देवासमोर तुझें घर। तुझें येणें निरंतर॥ ३॥ म्यां नेलें नाही जाण। सख्या विठोबाची आण॥ ४॥ धोतर झाडूनि पाहती। पडलें पदक घेऊनि जाती॥ ५॥ जनीवरी आली चोरी। ब्राह्मण करिती मारामारी॥ ६॥ धांविन्नले चाळीस गडी। जनीवरी पडली उडी॥ ७॥ दंडी लाविल्या काढण्या। विठोबा धांवरे धांवण्या॥ ८॥ चंद्रभागे रोविला शूळ। जनाबाईस आलें मूळ॥ ९॥ हातीं टाळी वाजविती। मुखीं विठ्ठल बोलती॥ १०॥ विलंब लागला ते वेळीं। म्हणती जनिला द्यारे सुळीं॥ ११॥ ऐसा येळकोट केला। जनी म्हणे विठो मेला॥ १२॥ तेव सुळाचें झालें पाणी। धन्य म्हणे दासी जनी॥ १३॥

१५०. प्रेमभावें तुम्ही नाचा। रामरंगें रंगों वाचा॥ १॥ हेंचि मागों देवाजीला। आवडी शांति खरें बोला॥ २॥ जैसी माय तान्हयातें। खेळउनी चुंबी त्यातें॥ ३॥ तेविं तुम्ही संतजना। सर्वी धरावी भावना॥ ४॥ हरि कोठवळा झाला। म्हणे जनी भक्तीं केला॥ ५॥

१५१. अर्थ जे काढिती उपनिषदांमाजीं। सांडोनियां गोड भाजी घेती माठ॥ १॥ भूगोलाचा स्वामी सुप्रसन्न झाला। त्यासी मागे गोळा भाजीचा तो॥ २॥ पुंडलिकें धन जोडिलें असतां। प्रार्थोनियां देतां न घेती हे॥ ३॥ मग गडी हो पाहे देवचि येथोनी। जवळी होती जनी फावलें तिये॥ ४॥

१५२. ऋषि म्हणती धर्मदेवा। आमचा आशिर्वाद घ्यावा॥ १॥ पांडवपालक गोविंद। तिहीं लोकीं गाजे ब्रिद॥ २॥ भक्तिभावें केला वश्य। हरि सांभाळा तयास॥ ३॥ रात्रंदिवस तुम्हांपासीं। दुजा ठाव नाहीं त्यासी॥ ४॥ देव द्रौपदीतें सांभाळी। उभा पाठीसी वनमाळी॥ ५॥ वनीं सांभाळी पांडवांसी। सुदर्शन त्याजपाशीं॥ ६॥ हरिभक्ति जाहला ऋणी। म्हणे नामयाची जनी॥ ७॥

१५३. वेदांती हें बोलिले। सिद्धांतीं हे नेमियले॥ १॥ लागा लागा भक्तिवाटा। धरा हेंचि नेमनिष्ठा॥ २॥ देवबाह्य तें कर्म। सांडी न करी अधर्म॥ ३॥ तोचि एक होय ज्ञानी। देवनिष्ठ म्हणे जनी॥ ४॥

१५४. जनीचें बोलणें वाची नित्य कोणी। तयाचे आंगणीं तिष्ठतसे॥ १॥ जनीचिया पदां अखंडित गाये। तयाचे मी पाये वंदी माथां॥ २॥ जनीचें आवडे जयासी वचन। तयासी नारायण कृपा करी॥ ३॥ पांडुरंग म्हणे ऐक ज्ञानदेवा। ऐसा वर द्यावा जनीसाठीं॥ ४॥

मागणें.

१५५. ऐसा वर देईं हरी। गाईं नाम निरंतरीं॥ १॥ पुरवीं आस माझी देवा। जेणें घडे तुझी सेवा॥ २॥ हेंचि आहे माझे मनी। कृपा करी चक्रपाणि॥ ३॥ रूप न्याहाळूनियां डोळां। मुखीं नाम लागी चाळा॥ ४॥ उदाराच्या राया। दासी जनी लागे पायां॥ ५॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१५६. साधु आणि संत। जन्म द्यावा जी कलीत॥ १ ॥ मागणें तें हेंचि देवा। कृपा करीं हो केशवा॥ २॥ संत दयाळा परम। तया साक्षी नारायण॥ ३ ॥ जनी म्हणे ऐसे साधु। तयापाशीं तूं गोविंदु॥ ४॥

१५७. विटेवरी ब्रह्म दिस। साधु संतांचा रहिवास॥ १ ॥ देव भावाचा अंकित। जाणे दासाचें तें चित॥ २ ॥ भक्ति जनी मागे देवा। तिचा मनोरथ पुरवा॥ ३ ॥

१५८. देवा देई गर्भवास। तरीच पुरेल माझी आस॥ १ ॥ परि हे देखा रे पंढरी। सेवा नामयाचे द्वारीं॥ २॥ करी पक्षि कां शुकर। श्वान श्वापद मार्जार॥ ३ ॥ ऐसी आशा हे मानसी। म्हणे नामयाची दासी॥ ४॥

१५९. ऐसा पुत्र देई संतां। तरी त्या आवडी पंढरिनाथा॥ १ ॥ गीता नित्य नेमें। वाची ज्ञानेश्वरी प्रेमें॥ २ ॥ संतांच्या चरणा। करी मस्तक ठेंगणा॥ ३॥ कन्या व्हावी भागिरथी। तुझें प्रेम जिचे चित्तीं॥ ४॥ ऐसे करी संतजना। दासी जनीच्या निधाना॥ ५॥

१६०. माझें दुःख नाशी देवा। मज सुख दे केशवा॥ १ ॥ आम्हां सुख ऐसें देई। तुझी कृपा विठाबाई॥ २ ॥ चरणी अनन्य शरण। त्यासि नाहीं जन्ममरण॥ ३ ॥ जनी म्हणे हेंचि मागें। धण्या सर्व तुज सांगें॥ ४॥

१६१. रुक्माई आईचें आहि ऐसें भाग्य। असावें आरोग्य चिरकाल॥ १ ॥ सख्या पुंडलिका आवडतें स्थळ। असावें चिरकाळ स्वस्ति क्षेम॥ २॥ अहो संतजन घ्या आवडतें धन। असावें कल्याण चिरकाळ॥ ३ ॥ जन्मोजन्मी हेंचि मागें गोविंदासी। म्हणे जनी दासी नामयाची॥ ४॥

१६२. परधन कामिनी समूळ नाणी मना। नाहीं हे वासना माया केली॥ १ ॥ तृष्णा हे अधम न व्हावी मजला। प्रेमाचा जिव्हाळा देई तुझ्या॥ २॥ निरपेक्ष वासना दे गा मज देवा। आणि तुझी सेवा आवडीची॥ ३ ॥ शांतीची भूषणें मिरविती अंगी वैष्णव आणि योगी म्हणावे ते॥ ४॥ असो तो अकुळी असो भलते याती। मायां वंदी प्रीती जनी त्यासी॥ ५॥

१६३. द्वारकेच्या राया। बुद्धि दे गा नाम गाया॥ १॥ मतिमंद तुझी दासी। ठाव देई चरणांपासी॥ २॥ तुझे पदरीं पडलें खरी। आतां सांभाळ करीं हरी॥ ३॥ न कळे हरीची करणी। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

संतस्तुति.

१६४. संतांचा तो संग नव्हे भलतैसा। पालटावी दशा तात्काळिक॥ १॥ चंदनाचे संगें पालटती झाडें। दुर्बळ लांकडें देवामाथां॥ २॥ हें कां ऐसें व्हावें संगती स्वभावें। आणिके न पालटावें देहालागीं॥ ३॥ तैसा निःसंगाचा संग अग्रगणी। जनी ध्याय मनीं ज्ञानेश्वरा॥ ४॥

१६५. संत हे कोण तरी देवाचे हे डोळे। पूजेविण आंवळे देवाचिये॥ १॥ कोण्या नेत्रें देव पाहे तुजकडे। यासाठीं आवडे संत करी॥ २॥ संत ऐसे करी देवाचे कान। सांडियेल्या ध्यान कोण ऐके॥ ३॥ संत पुसती तरी देवाचे ते पाय। आगमा न गमे सोय मागाडीये॥ ४॥ संत पुससी तरी देवाचें तें पोट। धरूनियां बोट दाविती हरी॥ ५॥ संत म्हणसी तरी देवाचा हा गळा। जेणें रस आगळा वेदादिकां॥ ६॥ संत जरी पुससी तरी देवाचें वदन। माझें तें वचन संत झाले॥ ७॥ पराविया चारी सांडूनि मीपणीं। संता बोले वाणी विठोबाची॥ ८॥ परेचिया चारी आनंदामाझारीं। संत झालें अंतरीं पडजीभ देवा॥ ९॥ क्षर जे नासिलें अक्षर तें काढिलें। निःसब्दाचें झालें बोले संत॥ १०॥ शब्द तो उडाला नाद तो बुडाला। भेद तो आटला माया भावीं॥ ११॥ विठो वटावरीं पारंबिया झाले। केश तें वाढले माय संत॥ १२॥ कुरळ होऊनियां देती ते सुढाळ। म्हणे जनी वोवाळ जीवेंभावें॥ १३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१६६. या वैष्णवाच्या माता। तो नेणवें देवां दैतां॥ १॥ तिही कर्म हें पुसिलें। अकर्म समूळ नाहीं केलें॥ २॥ कानाचे हे कान। झालें धरूनियां ध्यान॥ ३॥ डोळियाचा डोळा। करुनी धाले प्रेम सोहळा॥ ४॥ तोही वश्य नरदेहीं। जनी दासी वंदी पायीं॥ ५॥

१६७. भक्तांमाजीं अग्रगणी। पुंडलिक महामुनी॥ १॥ त्याचे प्रसादें तरलें। साधुसंत उद्धरिले॥ २॥ तोचि प्रसाद आम्हांसीं। विटेवरी हृषीकेशी॥ ३॥ पुंडलिक बापमाय। दासी जनी वंदी पाय॥ ४॥

१६८. अळंकापुरवासिनी समिप इंद्रायणी। पूर्वेसी वाहिनी प्रवाह तेथें॥ १॥ ज्ञानाबाई आई आर्त तुझे पायीं। धांवानियां येई दुडदुडां॥ २॥ बहु कासाविस होतो माझा जीव। कनवाळ्याची कीव येऊं द्यावी॥ ३॥ नामयाची जनी म्हणावी आपुली। पायी सांभाळिली मायबापें॥ ४॥

१६९. आंधळयाची काठी। अडकली कवणें बेटीं॥ १॥ माझिये हरणी। गुंतलीस कोणे रानीं॥ २॥ मुकें मी पाडस। चुकलें भोवें पाहें वास॥ ३॥ तुजवीण काय करूं। प्राण किती कंठी धरूं॥ ४॥ आतां जीव जाऊं पाहे। धांव घालीं माझे आये॥ ५॥ माझी भेटवा जननी। संतां विनवी दासी जनी॥ ६॥

१७०. पाहतां पंढरिराया। त्याच्या मुक्ति लागे पायां॥ १॥ पुरुषार्थे चारी। त्याचें मोक्ष आर्जव करी॥ २॥ धन संपत्तीचा दाता। होय पाहतां पंढरिनाथा॥ ३॥ संताचे चरणीं। लोळे नाचे दासी जनीं॥ ४॥

१७१. विष्णुमुद्रेचा अंकिला। तोचि वैष्णव एक भला॥ १॥ अहं जाळोनी अंगारा। सोहं भस्मीं तीर्थ सारा॥ २॥ विष्णु माया द्वारावती। भक्तिमुद्रा त्या मिरवती॥ ३॥ पंचायतन पूजी भावें। अहं सोहं भस्मी नांवें॥ ४॥ प्रेमतुळसी कानीं। म्हणे नामयाची जनी॥ ५॥

१७२. वैष्णव तो कबीर चोखामेळा महार। तिजा तो चांभार रोईदास॥ १॥ सजण कसाई बाया तो कसाब। वैष्णव तो शुद्ध एकनिष्ठ॥ २॥ कमाल फुलार मुकुंद जोहरी। जिही देवद्वारीं वस्ति केली॥ ३॥ राजाई गोणाई आणि तो नामदेव। वैष्णवांचा राव म्हणवितसे॥ ४॥ वैष्णवांचरणीं करी ओवाळणी। तेथें दासी जनी शरीराची॥ ५॥

१७३. वैष्णव तो एक इतर तीं सोंगें। ठसे देउनी अंगें चितारिती॥ १॥ जिचे योनि जन्मला तिसी दंडू लागला। तीर्थरूप केला देशधडी॥ २॥ नाइकोनी ब्रह्मज्ञान जो का दुराचारी। अखंड द्वेष करी सज्जनांचा॥ ३॥ विद्येच्या अभिमानें नाइकें कीर्तन। पाखांडी हे म्हणे करिती काई॥ ४॥ पंचरस पात्रा कांता हे बुडविती। उद्धरलों म्हणती आम्ही संत॥ ५॥ कीर्तनाचा द्वेष करी तो चांडाळ। तयाचा विटाळ मातंगीसी॥ ६॥ वैष्णव तो एक चोखामेळा महार। जनी म्हणे निर्धार केला संतीं॥ ७॥

१७४. पंढरीचा वारकरी। त्याचे पाय माझे शिरीं॥ १॥ हो कां उत्तम चांडाळ। पायी ठेवीन कपाळ॥ २॥ वंद्य होय हरिहरा। सिद्ध मुनि ऋषीश्वरा॥ ३॥ मुखी नाम गर्जे वाणी। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

१७५. आले वैष्णवांचे भार। दिले हरिनाम नगार॥ १॥ अवघी दुमदुमली पंढरी। कडकडाट गरुडपारीं॥ २॥ टाळ मृदंग धुमाळी। रंगणीं नाचे वनमाळी॥ ३॥ ऐसा आनंद सोहळा। दासी जनी पाहे डोळां॥ ४॥

१७६. स्त्री जन्म म्हणवुजी न व्हावें उदास। साधुसंतां ऐसें केलें जनीं॥ १॥ संतांचे घरची दासी मी अंकिली। बिठोबानें दिली प्रेमकळा॥ २॥ विदुर सात्त्विक माझिये कुळीचा। अंगिकार त्यांचा केला देवें॥ ३॥ न विचारितां कुळ गणिका उद्धरिली। नामें सरती केलीं तिहीं लोकीं॥ ४॥ ऋषींचीं कुळें उच्चारिली जेणें। स्वर्गावरी तेणें वस्ती केली॥ ५॥ नामयाची जनी भक्तीनें सादर। माझें तें साचार विटेवरी॥ ६॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१७७. संतभार पंढरींत। कीर्तनाचा गजर होत॥ १ ॥ तेथें असे देव उभा। जैशी समचरणांची शोभा॥ २॥ रंग भरे कीर्तनांत। प्रेमें हरिदास नाचत॥ ३ ॥ सखा विरळा ज्ञानेश्वर। नामयाचें जो जिव्हार॥ ४॥ ऐसा संतां शरण जावें। जनी म्हणें त्याला ध्यावें॥ ५॥

आत्मस्वरूपस्थिति

१७८. सांवळी ते मूर्ति हृदयी बिंबली। देहो बुद्धि पालटली माझी साची॥ १॥ धन्य माझी भक्ति धन्य माझा भाव। हृदयी पंढरिराव राहतसे॥ २॥ आशा तृष्णा कैशा मावळल्या दोन्ही। चिंता विठ्ठलचरणी जडोनी ठेली॥ ३॥ नामयाचे जनी विश्रांति पैं झाली। हृदयीं राहिली विठ्ठलमूर्तीं॥ ४॥

१७९. वामसव्य दोहींकडे। देखूं कृष्णाचें रूपडें॥ १ ॥ आतां खाले पाहूं जरी। चहूंकडे दिसे हरी॥ २॥ चराचरी जें जें दिसे। तें तें अविद्याची नासे॥ ३॥ माझें नाठवें मीपण। तेथें कैचें दुजेपण॥ ४॥ सर्वांठायीं पूर्ण कळा। दासी जनी पाहे डोळां॥ ५॥

१८०. धरिला पंढरीचा चोर। गळां बांधोनियां दोर॥ १॥ हृदय बंदिखाना केला। आंत विठ्ठल कोंडिला॥ २॥ शब्दें केली जवाजुडी। विठ्ठल पायीं घातली बेडी॥ ३॥ सोहं शब्दाचा मारा केला। विठ्ठल काकुलती आला॥ ४॥ जनी म्हणे बा विठ्ठला। जीवें न सोडीं मी तुला॥ ५॥

१८१. दळूं कांडूं खेळूं। सर्व पाप ताप जाळूं॥ १॥ सर्व जिवामध्यें पाहूं। एक आम्ही होउनी राहूं॥ २॥ जनी म्हणे ब्रह्म होऊं। ऐसें सर्वांघटीं पाहूं॥ ३॥

१८२. चरण विठोबांचे देखिले। साही रिपु हारपले॥ १ ॥ नाहीं नाहीं म्हणती आम्ही। सांगसी त्या लागूं कामी॥ २ ॥ नाहीं तरी जाऊं देशीं। जनी नामयाची दासी॥ ३॥

१८३. भ्रांति माझें मन प्रपंचीं गुंतलें। श्रवण मनन होऊनी ठेलें॥ १ ॥ बापें बोधिलें बापें बोधिली बोधुनी कैसी तद्रूप झाली॥ २॥ निजध्यासें कैसा अवघाचि सांपडला। कीं विश्वरूपीं देखिला बाईयांनो॥ ३॥ नामयाची जनी स्वयंबोध झाली। अवघाचि पुसिला ठाव देखा॥ ४॥

१८४. संतमहानुभाव येती दिगंबर। नम्रतेचें घर विरळा जाणें॥ १ ॥ निवालें मीपण तें जें ठायी नाहीं। सोहं शब्द सोई तेथें कैंची॥ २॥ पाहतां हा कोण दावितां हा कोण। पाहातां दावितां हे खूण विरळा जाणें॥ ३॥ नामयाची जनी निज वस्तु झाली। अवघ्यासी बुडाली परब्रह्मीं॥ ४॥

१८५. त्या वैष्णवांच्या माता। तो नेणें देव ताता॥ १ ॥ तिही कर्में हें पुसिलें। अकर्म समूळ नाहींसें केलें॥ २॥ कानाचा हो कान। झालें धरूनियां ध्यान॥ ३ ॥ डोळियाचा हो डोळा। करुनि झालें प्रेमसोहळा॥ ४॥ तोहि वसे नरदेहीं। जनी दासी वंदी पायीं॥ ५॥

१८६. देहभाव प्राण जाय। तेव्हां हें धैर्य सुख होय॥ १॥ तया निद्रे जे निजले। भाव जागृती नाहीं आले॥ २॥ ऐसी विश्रांति लावली। आनंद कळा संचरली॥ ३॥ तेथें सर्वांग सुखीं झालें। लिंग देह विसरलें॥ ४॥ त्या एकी एक होता। दासी जनी नाहीं आतां।

१८७. जोड झाली रे शिवासी। भ्रांत फिटली जिवांची॥ १ ॥ आनंदची आनंदला। आनंद बोधचि बोधला॥ २॥ आनंदाची लहरी उठी। ब्रह्मानंदें गिळिला पोटीं॥ ३॥ एकपण जेथें पाहीं। तेथें विज्ञप्ति उरली नाहीं॥ ४॥ ऐसी सद्गुरूची करणी। दासी जनी विठ्ठल चरणीं॥ ५॥

१८८. बाई मी लिहिणें शिकलें सद्गुरुरायापाशीं॥ ध्रु०॥ ब्रह्मी झाला जो उल्लेख। तोचि नादाकार देख। पुढें ओंकाराची रेख। तुर्या म्हणावें तिसी॥ १ ॥ माया महत्तत्त्वाचें सुभर। तीन पांचाचा प्रकार। पुढें पंचविसांचा भार। गणति केली छत्तीसी॥ ६ ॥ बारा सोळा एकविस हजार। आणिक सहाशांचा उबार। माप चाले सोहंकार।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ओळखिले बावन्न मात्रेसी ॥ ३ ॥ चार खोल्या चार घरीं। चौघे पुरुष चार नारी। ओळखुनी सर्वांशीं अंतरीं। राहिले पांचव्यापासी ॥ ४॥ पांच शहाणे पांच मूर्ख। पांच चाळक असती देख। पांच दरवडेखोर आणिक। ओळखिलें दोघांसी ॥ ५ ॥ एक बीजाचा अंकुर। होय वृक्षासी विस्तार। शाखापत्रें फळ फुलभार। बीजापोटी सामावें ॥ ६ ॥ कांतीण तंतूशीं काढून। वरी क्रीडा करिती जाण। शेवटीं तंतूशीं गिळून। एकटी राहे आपैसी ॥ ७॥ वेदशास्त्र आणि पुराणा। याचा अर्थ आणितां मना। कनकी नगाच्या भूषणा। अनुभव वाटे जीवासी ॥ ८ ॥ नामदेवाच्या प्रतापांत। शिरी विठोबाचा हात। जनी म्हणे केली मात। पुसा ज्ञानेश्वरासी ॥ ९ ॥

१८९. नम्रतेविण योग्यता मिरविती। ते केवी पावती ब्रह्मसुख ॥ १ ॥ लटिकें नेत्र लावूनि ध्यान पैं करिती। ते केवीं पावती केशवातें ॥ २ ॥ एक संत म्हणविती नग्न पैं हिंडती। अंतरींची स्थिति खडबड ॥ ३ ॥ झालेपणाचे गुण दिसताती सगुण। वस्तु ते आपण होऊनि ठेली ॥ ४॥ सागरीं गंगा मिळोनि गेली जैसी। परतोनियां तियेसी नाम नाहीं ॥ ५ ॥ नामयाची जनी निर्गुणीं वोधिलीं। ठेवा जो लाधली पांडुरंग ॥ ६ ॥

१९०. शब्दाचें ब्रह्मा लौकिकीं हो दिसे। जैसे ते फांसे मयंदांचें ॥ १ ॥ ज्ञानी तो कोण विज्ञानी तो कोण। दोहांचा आपण साक्षभूत ॥ २ ॥ स्वयें सुंखें धाला आपणातें विसरला। तो योगि राहिला नाहीं येथें ॥ ३ ॥ नामयाची जनी सागरीं मिळाली। परतोनि मुळीं केवीं जाय ॥ ४ ॥

१९१. अखंडित ध्यानीं। पांडुरंग जपे वाणी ॥ १ ॥ पांडुरंग नाम जप। हेंचि माझें महा तप ॥ २ ॥ ऐसें आलें प्रत्ययासी। सहज तेणें तत्त्वमसी ॥ ३ ॥ पावलिया हो स्वपद। सहज विराला तो शब्द ॥ ४ ॥ संदेह अवघाचि फिरला। जनी म्हणे उदयो झाला ॥ ५ ॥

१९२. देव खातें देव पितें। देवावरी मी निजतें ॥ १ ॥ देव देतें देव घेतें। देवासवें व्यवहारितें ॥ २ ॥ देव येथें देव तेथें। देवाविणें नाही रितें ॥ ३ ॥ जनी म्हणे विठाबाई। भरूनि उरलें अंतरबाहीं ॥ ४ ॥

१९३. श्रीमूर्तीं असे बिंबली। तरी हे देहस्थिती पालटली ॥ १ ॥ धन्य माझा इह जन्म। हृदयीं विठोबाचें नाम ॥ २ ॥ तृष्णा आणि आशा। पळोन गेल्या दाही दिशा ॥ ३ ॥ नामा म्हणे जनी पाहे। द्वारीं विठ्ठल उभा आहे ॥ ४ ॥

१९४. जनी दृष्टी पाहे। जिकडे तिकडे हरी आहे ॥ १ ॥ मग म्हणे वो देवासी। तुमच्या नामयाची दासी ॥ २ ॥ नामयाचा प्रसाद। झाला जनीला आनंद ॥ ३ ॥

१९५. झाली पूर्ण कृपा आहे। ऐसा पूर जो कां पाहे ॥ १ ॥ ऐसा पूर जोकां पाहे। स्थापिला तोचि होय ॥ २ ॥ पूर्णपदीं जो गुरुपुत्र। जनी म्हणे धन्य झाला ॥ ३ ॥

१९६. नित्य हातानें वारावें। हृदय अंतरीं प्रेरित जावें ॥ १ ॥ ऐसा स्वरूपाचा पूर। आला असे नेत्रावर ॥ २ ॥ स्वरूपाचा पूर आला। पाहतां डोळा झाकुळला ॥ ३ ॥ जनी म्हणे ऐसा पूर। पाहे तोचि रघुवीर ॥ ४ ॥

१९७. गगन सर्वत्र तत्त्वतां। त्यासी चिखल लावूं जातां ॥ १ ॥ तैसा जाण पांडुरंग। भोग भोगुनी निःसंग ॥ २ ॥ सिद्ध सनकादिक। गणगंधर्व अनेक ॥ ३ ॥ जैसी वांझेची संतती। तैसी संसार उत्पत्ती ॥ ४ ॥ तेथें कैंचें धरिसी ध्यान। दासी जनी ब्रह्म पूर्ण ॥ ५ ॥

१९८. काळाचिये लेख। नाहीं ब्रह्मा विष्णु मुख्य ॥ १ ॥ युगा एक लव झडे। तोही न सरे काळापुढें ॥ २ ॥ अविद्येनें नवल केलें। मिथ्या देह सत्य केलें ॥ ३ ॥ महीपाळ स्वर्गपाळ। तेही ग्रासले समूळ ॥ ४ ॥ वर्म चुकलीं बापुडीं। दासी जनी विठ्ठल जोडी ॥ ५ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

१९९. रक्तवर्ण त्रिकुट स्नान। श्रीहाट पाहे श्वेतवर्ण॥ १॥ श्यामवर्ण तें गोलाट। निळबिंदु औट पीट॥ २॥ वरि भ्रमर गुंफा पाहे। दशमद्वारीं गुरु आहे॥ ३॥ नवद्वारातें भेदुनी। दशमद्वारीं गेली जनी॥ ४॥

२००. शून्यावरी शून्य पाहे। तयावरी शून्य आहे॥ १॥ प्रथम शून्य रक्तवर्ण। त्याचें नांव अधःशून्य॥ २॥ ऊर्ध्वशून्य श्वेतवर्ण। मध्यशून्य श्यामवर्ण॥ ३॥ महाशून्य वर्ण नीळ। त्यांत स्वरूप केवळ॥ ४॥ अनुहात घंटा श्रवणीं। ऐकुनी विस्मय जाहाली जनी॥ ५॥

२०१. ज्योत पहा चमकली। काय सांगूं त्याची बोली॥ १॥ प्रवृत्ति निवृत्ति दोघीजणी। लीन होती त्याच्या चरणीं॥ २॥ परापश्यंती मध्यमा। वैखरेची झाली सीमा॥ ३॥ चारी वाचा कुंठित जाहाली। सोहं ज्योत प्रकाशली॥ ४॥ ज्योत परब्रह्म जाणा। जनी म्हणे निरंजना॥ ५॥

२०२. ज्योत परब्रह्मी होय। खेचरी दर्पणीनें पाहे॥ १॥ इडा पिंगळा सुषुम्ना। तिन्ही पाहे हृदयभुवना॥ २॥ हळ हळ रीघ करी। सूक्ष्म हृदय अंतरी॥ ३॥ हृदय कमळावरी जासी। जनी म्हणे मुक्त होसी॥ ४॥

२०३. नाहीं आकाश घडणी। पाहा स्वरूपाची खाणी॥ १॥ स्वरूप हें अगोचर। गुरु करिती गोचर॥ २॥ गोचर करिताती जाणा। दृष्टि दिसे निरंजना॥ ३॥ नाहीं हात पाय त्यासी। जनी म्हणे स्वरूपासी॥ ४॥

२०४. माझे मनीं जें जें होतें। तें तें दिधलें अनंतें॥ १॥ देह नेउनी विदेही केलें। शांति देउनी मीपण नेलें॥ २॥ मूळ नेलें हें क्रोधाचें। ठाणें केलें विवेकाचें॥ ३॥ निज पदी दिधला ठाव। जनी म्हणे दाता देव॥ ४॥

जनाबाईचा निश्चय.

२०५. दळितां कांडितां। तुज गाईन अनंता॥ १॥ न विसंबें क्षणभरी। तुझें नाम गा मुरारी॥ २॥ नित्य हाचि कारभार। मुखीं हरि निरंतर॥ ३॥ मायबाप बंधुबहिणी। तूं बा सखा चक्रपाणि॥ ४॥ लक्ष लागलें चरणासी। म्हणे नामयाची दासी॥ ५॥

२०६. चला पंढरीसी जाऊं। रखुमादेवीवर पाहूं॥ १॥ स्नान करूं भिवरेसी। पुंडलिका पायांपाशीं॥ २॥ डोळे भरून पाहूं देवा। तेणें ईश्वर जीवाभावा॥ ३॥ ऐसा निश्चय करुनी। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

२०७. जनी म्हणे नामदेवासी। चला जाऊं पंढरिसी॥ १॥ आला विषयाचा कंटाळा। जाऊं भेटूं त्या गोपाळा॥ २॥ आवडीनें गुज कानीं। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

२०८. तुझा लोभ नाही देवा। तुझी करिना मी सेवा॥ १॥ नाहीं अंगी थोरपण। मिथ्या करिसी गुमान॥ २॥ रागा येउनी काय करिशी। तुझें बळ आम्हांपाशीं॥ ३॥ नाहीं सामर्थ्य तुज हरी। जनी म्हणे धरिली चोरी॥ ४॥

२०९. तुझे चरणी घालीन मिठी। चाड नाहीं रे वैकुंठी॥ १॥ सर्वभावें गाईन नाम। सखा तूंचि आत्माराम॥ २॥ नित्य पाय वंदिन माथा। तेणें नासे भवभय व्यथा॥ ३॥ रूप न्याहाळीन दृष्टी। सर्व सुखें सांगेन गोष्टी॥ ४॥ दीनानाथा चक्रपाणि। दासी जनी लावी ध्यानीं॥ ५॥

२१०. आतां भीत नाहीं देवा। आदि अंत तुझा ठावा॥ १॥ झालें नामाचेन बळकट। तेणें वैकुंठ पायवाट॥ २॥ ज्ञान वैराग्य विवेक बळें। तें तंव आम्हांसवें खेळें॥ ३॥ दया क्षमा आम्हांपुढें। जनी म्हणे झाले वेडे॥ ४॥

२११. माझें चित्त तुझे पायीं। ठेवी वेळोवेळां डोई॥ १॥ मुखी उच्चार नामाचा। काया मनें जीवें वाचा॥ २॥ धरणें तें ऐसें धरूं। जनी म्हणे विठ्ठल स्मरूं॥ ३॥

२१२. आम्ही पातकांच्या राशी। आलों तुझ्या पायांपाशीं॥ १॥ मना येईल तें तूं करी। आतां तारीं

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अथवा मारीं॥ २॥ जनी म्हणे सृष्टीवरी। एक असशी तूं बा हरी॥ ३॥

२१३. मना लागो हाचि धंदा। रामकृष्ण हरि गोविंदा॥ १॥ जिव्हे करूं नित्य नेम। सदा विठोबाचें नाम॥ २॥ नामामध्यें नामसार जप करी निरंतर॥ ३॥ म्हणे जनी नाम घेणें। नाममंत्रें शंकर होणें॥ ४॥

२१४. स्मरण तें हेंचि करूं। वाचें रामराम स्मरूं॥ १॥ आणिक न करूं तें काम। वाचें धरूं हाचि नेम॥ २॥ सुकृताचें फळ। जनी म्हणें हें केवळ॥ ३॥

२१५. मनामागें मन लावूं। तेथें सर्व सुख पाहूं॥ १॥ मग आम्हां काय उणं। दया करी नारायण॥ २॥ जनी म्हणे ऐसें मन। करूं देवा हो आधिन॥ ३॥

२१६. सत्त्वरजतमें असे हें बांधिलें। शरीर दृढ झालें अहंकारें॥ १॥ सांडीं अहंकार धरीं दृढ़भाव। हृदयीं पंढरिराव धरोनियां॥ २॥ नामयाची जनी भक्तीसी भुलली। ते चरणीं राहिली विठोबाचे॥ ३॥

२१७. नित्य सारूं हरीकथा। तेथें काळ काय आतां॥ १॥ वनवासी कां धाडिलें। कृपाळें बा हो विठ्ठलें॥ २॥ आशा मनशा तृषा तिन्हीं। ह्या तो ठेविल्या बांधोनि॥ ३॥ काम क्रोध विषय झाले। हें तों मोहोनि राहिले॥ ४॥ अवलोकूनि कृपा दृष्टि। जनी म्हणे देई भेटी॥ ५॥

२१८. करूं हरीचें कीर्तन। गाऊं निर्मळ ते गुण॥ १॥ सदा धरूं संतसंग। मुखी म्हणूं पांडुरंग॥ २॥ करूं जनावरी कृपा। रामराम म्हणवूं लोकां॥ ३॥ जनी म्हणे कीर्ति करूं। नाम बळकट धरूं॥ ४॥

२१९. आनंदाचे डोहीं। जो कां समुळ झाला नाही॥ १॥ कीर्तनें जन्मला। हरीभक्तिनें शिंपिला॥ २॥ आळवितसे अंतवरी। वाचा नाम लाहो करीं॥ ३॥ समूळ झाला नाही। देहें जनी विठ्ठल पायीं॥ ४॥

२२०. आम्हीं स्वर्ग लोक मानूं जैसा ओक। देखोनियां सुख वैकुंठीचें॥ १॥ नलगे वैकुंठ न वांछूं कैलास। सर्वस्वाची आस विठोपायीं॥ २॥ नलगे संतति धन आणि मान। एक करणें ध्यान विठोबाचें॥ ३॥ सत्य की मायीक आमुचें बोलणें। तुमची तुम्हां आण सांगा हरी॥ ४॥ जीवभाव आम्ही सांडूं ओंवाळूनि। म्हणे दासी जनी नामयाची॥ ५॥

२२१. आतां येतों स्वामी। कृपा असो द्यावी तुम्हीं॥ १॥ बहु दिवस सांभाळ केला। पुन्हां जन्म नाहीं दिला॥ २॥ थोर सुकृताच्या राशी। तुमचे पाय मजपाशीं॥ ३॥ ऐसा नामदेव बोले। ऐकोनी दासी जनी डोले॥ ४॥

२२२. मी तो समर्थाची दासी। मिठी घालीन पायापासीं॥ १॥ हाचि माझा दृढभाव। करीन नामाचा उत्सव॥ २॥ आम्हां दासीस हें काम। मुखी विठ्ठल हरिनाम॥ ३॥ सर्व सुख पायीं लोळे। जनीसंगें विठ्ठल बोले॥ ४॥

२२३. नामयाचें ठेवणें जनीस लावलें। धन सांपडलें विटेवरी॥ १॥ धन्य माझा जन्म धन्य माझा वंश। धन्य विष्णुदास स्वामी माझा॥ २॥ कामधाम माझे विठोबाचे पाय। दिवसनिशी पाहे हारपली॥ ३॥ माझ्या वडिलांचें दैवत तो हा पंढरिनाथ। तेणें माझा अर्थ पुरविला॥ ४॥ संसारीचें सुख नेघे माझे चित्तीं। तरीच पुनरावृत्ति चुकविल्या॥ ५॥ नामयाचे जनी आनंद पैं झाला। हृदयीं बिंबला पांडुरंग॥ ६॥

२२४. धन्य ज्याचे चरणीं गंगाओघ झाला। मस्तकीं धरिला उमाकांतें॥ १॥ धुंडितां ते पाय शिणला तो ब्रह्मा। बोल ठेवीं कर्मा आपुलीया॥ २॥ शुक सनकादिक फिरती हरिजन। नारदादि गाणें जयासाठीं॥ ३॥ ते चरण आम्हांसी गवसले अनायासी। धन्य झाली दासी जनी म्हणे॥ ४॥

२२५. डोईचा पदर आला खांद्यावरी भरल्या बाजारी जाईन मी॥ १॥ हातीं घेईन टाळ खांद्यावरी वीणा। आतां मज मना कोण करी॥ २॥ पंढरिच्या पेठें मांडियेलें पाल। मनगटावर तेल घाला तुम्ही॥ ३॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जनी म्हणे देवा मी झालें येसवा। निघालें केशवा घर तुझें॥ ४॥

जातें.

२२६. जात्यावरील गीतासी। दळणमिशें गोविंदासी॥ १॥ देह बुद्धीचें वैरण। बरवा दाणा हो निसून॥ २॥ नामाचा हो कोळी। गुरुआज्ञेतें मी पाळीं॥ ३॥ मज भरंवसा नाम्याचा। गजर दासी जनीचा॥ ४॥

२२७. सुंदर माझें जातें गे फिरे बहुतेकें। ओंव्या गाऊं कौतुकें तूं येरे बा विठ्ठला॥ १॥ जीवशिव दोनी खुंटे गे प्रपंचाचे नेटें गे। लावुनी पांचीं वोटें गे तूं येरे बा विठ्ठला॥ २॥ सासु आणि सासरा दीर तो तिसरा। ओंव्या गाऊं भ्रतारा तूं येरे बा विठ्ठला॥ ३॥ बारा सोळा गडणी अवघ्या कामिनी। ओंव्या गाऊं बसूनि तूं येरे बा विठ्ठला॥ ४॥ प्रपंचदळण दळिलें पीठ भरिलें। सासुपुढें ठेविलें तूं येरे बा विठ्ठला॥ ५॥ सत्त्वाचें आधण ठेविलें पुण्य वैरिलें। पाप तें उतूं गेलें तूं येरे बा विठ्ठला॥ ६॥ जनी जातें गाइल कीर्त राहिल। थोडासा लाभ होईल तूं येरे बा विठ्ठला॥ ७॥

२२८. वैराग्य अभिमानें फिरविलें जातें। म्हणवोनि यातें भाव खुंटा॥ १॥ संचित मातृका वैरण घातली। अव्यक्ति दळिलीं व्यक्ताव्यक्त॥ २॥ नामरूपा आदि दळियेलें सर्व। पीठ भरी देव पंढरीचा॥ ३॥ नवल हा देव बैसला दळणीं। नाहीं केली जनी नामयाची॥ ४॥

उपदेश.

२२९. भक्तिभावें वळे गा देव। महाराज पंढरिराव॥ १॥ पंढरीसी जावें। संतजनीं भेटावें॥ २॥ भक्ति आहे ज्याचे चित्तीं। त्याला पावतो निश्चिती॥ ३॥ भाव धरा मनीं। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

२३०. बांधोनियां हात गयावळ मारिती। दंड ते करिती मोक्षासाठीं॥ १॥ गेले ते पितर मोक्षालागीं तुझे। आतां देईं माझे दक्षिणेसी॥ २॥ बापुडें केंश बोंडिती मिशी दाढी। मग दक्षणा हिरडी खातसे हे॥ ३॥ फार काय सांगूं मेल्याविण मुक्ती। नाहीं ते वांछिती स्वप्नसुख॥ ४॥ अनंत जन्म मृत्यु होतां जैसें दुःख। त्याहूनि अशेष आहे तेथें॥ ५॥ भांबावले जन धांवे आटाआटी। सोडूनियां कोटि अनंत पद॥ ६॥ नलगे गाळावें नलगे तळावें। नलगे मरावें मुक्तीसाठीं॥ ७॥ मुक्ति लागे पायां जाऊनियां पाहे। जीव जातां देह जनी नाहीं॥ ८॥

२३१. धनियाचें पडपें गेला। जीव जिवें जीव झाला॥ १॥ देही देह हारपले। गेह गेहातीत झालें॥ २॥ झाला आश्रम आश्रमा। जनी म्हणे धरा प्रेमा॥ ३॥

२३२. झाली जगाचिये सीमा। वस्तुभाव येर व्योमा॥ १॥ पहा हो अधिकारी। नको असोनी भिकारी॥ २॥ पट तंतूंचा घडला। घट मृत्तिकेचा झाला॥ ३॥ पहा श्वानसमची पंडित। जनी म्हणे एकचि मात॥ ४॥

२३३. नाद पडे कानी। मृग पैज घाली प्राणी॥ १॥ आवडी अंतरीं। गज मेला पडे गारी॥ २॥ चोख पाहे अंग। दिपे नाडला पतंग॥ ३॥ गोडी रसगळा। मच्छ अडकला गळा॥ ४॥ गंधें अलि नेला। म्हणे जनी तोचि मेला॥ ५॥

२३४. भृंगीचिया अंगी कोणतें हो बळ। शरिरें अनाढळ केली आळी॥ १॥ काय तिनें तपमुद्रा धरियेली। म्हणोनियां झाली भृंगी अंगें॥ २॥ अरे वा शहाणिया तैंसा करी जप। संतयोगें पाप नाहीं होय॥ ३॥ नामयाची जनी पिटिती डांगोरा। संदेहन धरा करा पूजा॥ ४॥

२३५. जहाज तारिलें तारिलें। शेवटीं उगमासी आलें॥ १॥ भाव शिडासी लाविला। नाम फरारा सोडिला॥ २॥ कथा भरियेलें केणें। घ्या रे नका दैन्यवाणें॥ ३॥ एका मनाचा विसार। आधीं देउनी निर्धार॥ ४॥ कोण देतो फुकासाठीं। आर्तभूत व्हावें पोटीं॥ ५॥ आर्तभूत व्हा रे। जनी म्हणे केणें घ्यारे॥ ६॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२३६. हेंचि देवांचें भजन। सदा राहे समाधान॥ १॥ येर अवघे संसारिक। इंद्र देव ब्रह्मादिक॥ २॥ वरकडाचा पाड किती। जनी देवास बोलती॥ ३॥

२३७. चोरा संगतीनें गेला। वाटें जातां नागवला॥ १॥ तैसी सांडोनियां भक्ती। धरी विषयाची संगती॥ २॥ अग्निसवें खेळे। न जळे तो परी पोळे॥ ३॥ विश्वासला चोरा। जनी म्हणे घाला बरा॥ ४॥

२३८. जगीं विठ्ठल रुक्मिणी। तुम्ही अखंड स्मरा ध्यानीं॥ १॥ मग तुज काय उणें। झाले सोयरे त्रिभुवनें॥ २॥ साराचें जें सार। भवसिंधु उतरी पार॥ ३॥ मन ठेउनी चरणीं। म्हणे नामयाची जनी॥ ४॥

२३९. सुखें संसार करावा। माजीं विठ्ठल आठवावा॥ १॥ असोनियां देही। छाया पुरुष जैसा पाहीं॥ २॥ जैसा सूर्य घटकाशीं। तैसी देही जनी दासी॥ ३॥

२४०. अंगी हो पैं शांती। दया क्षमा सर्वाभूतीं॥ १॥ जेथें जाऊन पाहे देवा। ब्रह्मादिक करिती सेवा॥ २॥ आवडी असे पैं कीर्तनी। लवे संतांचे चरणीं॥ ३॥ जैसी दया पुत्रावरी। तेंचि पाहे चराचरीं॥ ४॥ बहु अपराध केला। म्हणे जनी तो रक्षिला॥ ५॥

२४१. मृदु वाहे पाणी। व्रज मानी ऐसें लोणी॥ १॥ क्षमा ऐसी जिवीं। क्रोधभूत हे पृथ्वी॥ २॥ गंधमाती सरी। करूनी आपुली कस्तुरी॥ ३॥ गुणदोष मना नाणी। म्हणे बहिरी होय जनी॥ ४॥

२४२. आपणची सारा। पाहावें की नारीनरां॥ १॥ पटाकारणें हे जनी। पांडुरंग तंतु मनीं॥ २॥ भावेंवीण भजलें। भिऊनियां झांकी डोळे॥ ३॥ म्हणे काय पाहूं येथें। भिन्न नव्हे वस्तु जेथें॥ ४॥ भिन्नाभिन्न नाही मनीं। म्हणे नामयाची जनी॥ ५॥

२४३. आक्रोशें ध्यानासी आणी पुरुषोत्तमा। पृथ्वीयेसी क्षमा उणी आणी॥ १॥ अखंडित शुद्ध असावें अंतर। लोणिया कठोर वाटे मनीं॥ २॥ बोलें तें वचन बहु हळुवट। सुमना अंगी दाट जडभार॥ ३॥ नाम तें स्मरण अमृतसंजिवनी। म्हणे दासी जनी हेंचि करा॥ ४॥

२४४. आम्ही आणि संत संत आणि आम्ही। सूर्य आणि रश्मि काय दोन॥ १॥ दीप आणि सारंग सारंग आणि दीप। ध्यान आणि जप काय दोन॥ २॥ शांति आणि विरक्ति विरक्ति आणि शांति। समाधान काय तृप्ति दोन॥ ३॥ रोग आणि व्याधी व्याधी आणि रोग। देह आणि अंग काय दोन॥ ४॥ कान आणि श्रोत्र श्रोत्र आणि कान। यश आणि मान काय दोन॥ ५॥ देव आणि संत संत आणि देव। म्हणे जनी भाव एक ऐसा॥ ६॥

२४५. संत आणि देव मानी जो वेगळे। तेणें येथें आगळे केले दोष॥ १॥ माता ते वेगळी कुच ते उरीचे। म्हणोनियां त्याचें मर्दन करी॥ २॥ पाप तें वेगळें पुण्य तें आगळें। म्हणोनी गरळें पितो मद॥ ३॥ दिवस उगवतां पाहों नये त्यातें। जेणें हो संतातें द्वेषियेलें॥ ४॥ तयाचा विटाळ वाहे रजस्वला। म्हणे जनी चांडाळा बोलावूं नका॥ ५॥

२४६. पाणी तेंचि मेघ मेघ तेंचि पाणी। काय या दोन्हीपणीं वेगळीक॥ १॥ माती तेचि धूळ धूळ तेचि माती। भेंडा आणि भिंती काय दोन॥ २॥ साखरी गोडी साखरेसी। थिजलें तुपासी काय दोन्ही॥ ३॥ डोळा तें बुबुळ बुबुळ तो डोळा। शांति ज्ञानकळा काय भिन्न॥ ४॥ वदन ते ओंठ ओंठ ते वदन। क्षेम आलिंगन काय दोन॥ ५॥ जीभ ते पडजीभ पडजीभ ते जीभ। आशा आणि लोभ काय दोन॥ ६॥ संत तेचि देव देव तोचि संत। म्हणे जनी मात गोष्टी भिन्न॥ ७॥

२४७. प्रपंचीं जो रडे। ब्रह्मवन त्यातें जडे॥ १॥ ऐसा अखंडित ब्रह्मीं। विठ्ठला जो कर्माकर्मीं॥ २॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

पुत्रदेह ध्याया ध्यानीं। कांता धन वो कामिनी ॥ ३ ॥ सिंधूसी सांडावा। जनी म्हणे गा सदैवा ॥ ४ ॥

२४८. काम लागे कृष्णापाठीं। केलीं स्मशानाची गांठी ॥ १ ॥ परम कांमें भुलविला। कृष्ण स्मशानासी नेला ॥ २ ॥ भुलविला मनी। रुद्र पाहोनी मोहनी ॥ ३ ॥ कन्येचिये पाठीं। ब्रह्म लागे हतवटी ॥ ४ ॥ काम पराशरालागीं। ज्ञानासी लाविली आगी ॥ ५ ॥ कांम गेला शुकापाठीं। म्हणे जनी मारी काठी ॥ ६ ॥

२४९. भजन करी महादेव। राम पूजी सदाशिव ॥ १ ॥ दोघे देव एक पाही। तयां ऐक्य दुजें नाहीं ॥ २ ॥ शिवा रामा नाही भेद। ऐसे देव तेही सिद्ध ॥ ३ ॥ जनी म्हणे आत्मा एक। सर्व घटी तो व्यापक ॥ ४ ॥

२५०. पतंग सुखावला भारी। उडी घाली दीपावरी ॥ १ ॥ परि तो देहांती मुकला। दोही पदार्थीं नाडिला ॥ २ ॥ विषयांचे संगतीं। बहू गेले अधोगती ॥ ३ ॥ ऐसे विषयानें भुलविले। जनी म्हणे वांयां गेले ॥ ४ ॥

२५१. येऊनियां जन्मा एक। करा देहाचें सार्थक ॥ १ ॥ वाचें नाम विठ्ठलाचें तेणें सार्थक जन्माचें ॥ २ ॥ ऐसा नामाचा महिमा। शेष वर्णितां झाली सीमा ॥ ३ ॥ नाम शास्त्रीं त्रिभुवनीं। म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

२५२. विवेकाची पेठ। उघडी पंढरीची वाट ॥ १ ॥ तेथें नाहीं कांहीं धोका। उठाउठी भेटे सखा ॥ २ ॥ मरोनियां जावें। शरण विठोबासी व्हावें ॥ ३ ॥ म्हणे नामयाची जनी। देव करा ऐसा ऋणी ॥ ४ ॥

२५३. शरीर हें जायाचें नश्वर आणिकांचें। म्हणाल जरी त्याचें काय काज ॥ १ ॥ आंबरसें चोखिला बिजसालें सांडिला। पुंढें तेणें उभविला दुजा एकू ॥ २ ॥ समूळ साल माया सांडूनियां दिजे। परि अहं बीज जतन करा ॥ ३ ॥ तें बीज भाजोनि करा ओंवाळणी। संतांचे चरणीं समूळ देह ॥ ४ ॥ पुढें त्या बीजांची न करावी दुराशा। न धरावी आशा पुढिलांची ॥ ५ ॥ आहे नाहीं देह धरीं ऐसा भाव। म्हणे जनी देव सहज होती ॥ ६ ॥

२५४. नाना व्रत तप दान। मुखीं हरीस्मरण ॥ १ ॥ येथें असों द्यावा भाव। पुरवी अंतरीचें देव ॥ २ ॥ हाचि विश्वास धरुनी। कृपा करील चक्रपाणि ॥ ३ ॥ भक्तिभाव ज्याचा पुरा। त्यांसी धांवतो सामोरा ॥ ४ ॥ लक्ष लावा पायांपाशीं। म्हणे नामयाची दासी ॥ ५ ॥

२५५. शूराचें तें शस्त्र कृपणाचें धन। विध्वंसिला प्राण हातां नये ॥ १ ॥ गजमाथां मोतीं सर्पाचा तो मान। गेलीयाही प्राण हातां नये ॥ २ ॥ सिंहाचें तें नख पतिव्रतेचें स्तन। गेलियाही प्राण हातां नये ॥ ३ ॥ विराल्यांवांचुन देह अहंभाव। जनी म्हणे देव हातां नये ॥ ४ ॥

२५६. संसारी निधान लाधलें जनां। सद्गुरुचरणा सेवीं बापा ॥ १ ॥ कायावाचामनें तयास देवावीं। वस्तु मागून घ्यावी अगोचर ॥ २ ॥ तें गोचर नव्हे जाण गुरुकृपेवीण। एऱ्हवीं तें आपणामाजीं आहे ॥ ३ ॥ असतां सम्यक परि जना चुकामुक। भुलली निष्टंक मंत्रतंत्रे ॥ ४ ॥ माळ वेष्टण करी टापोर घेतीं शिरीं। नेम अष्टोत्तरीं करिताती ॥ ५ ॥ जो माळ करविता वाचेसि वदविता। तया हृदयस्था नेणे कोणी ॥ ६ ॥ सोहं आत्मा प्रगट जो दाखवी वाट। सद्गुरु वरिष्ठ तोचि जाणा ॥ ७ ॥ तया उत्तीर्णता व्हावया पदार्था। न देखों सर्वथा जनी म्हणे ॥ ८ ॥

२५७. कीर्तनासी जातां मार्गं टाकी पाय। अमर देह होय कळे त्यासी ॥ १ ॥ ओखद तरी तेथें घडे हिंसा। जन्मवेद भाषा वेदापाशीं ॥ २ ॥ गंगा वाराणसी धरोनि पदरीं। चाललीसे नारी दोहीकडे ॥ ३ ॥ आमच्या बापाची ऐकावया कीर्ति जाऊं म्हणोन घेतीं ऐक्य कथीं ॥ ४ ॥ क्रीर्तनासी जावें कैसें कोणेपरी। असूं द्या अंतरीं गोष्ट हित ॥ ५ ॥ वऱ्हाडी धांवे जैसा प्रयोजनीं। तान्हेलें तें पाणी पुसावया ॥ ६ ॥ व्याकुळ तें एक चुकलें बाळक।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

त्या धांवे शोक हांका मारी ॥ ७ ॥ अशी कंथे जातां गंगा त्या चरणी । म्हणे दासी जनी भाक मानी ॥ ८ ॥

२५८. कीर्तनाचा रस आवंडे नरासी । लागती पायांसी मुक्ति चाऱ्ही ॥ १ ॥ वारी पंढरीची निश्चय म्यां केला । वारकरी झाला पंढरीचा ॥ २ ॥ मोक्षाचा जो मोक्ष मुक्तीची जे मुक्ति । जनी म्हणे किती सांगूं फार ॥ ३ ॥

कृष्णजन्म, बालक्रीडा व काला.

२५९. गौळण म्हणे गौळणीला । पुत्र जाहला यशोदेला ॥ १ ॥ एक धांवे एकीपुढें । तार्टी वाटीं सुंठवडे ॥ २ ॥ सुइणीची गलबल झाली । दासी जनी हेल घाली ॥ ३ ॥

२६०. मग म्हणे नंदाजीला । पुत्रमुख पाहूं चला ॥ १ ॥ स्नान घालूनि त्यासी । वस्त्रें दिधलीं ब्राह्मणांसी ॥ २ ॥ परब्रह्म तें पाहुनी । ब्रह्मीं मिळे दासी जनी ॥ ३ ॥

२६१. आलिया ब्राह्मणासी दान । द्रव्य दिधलें अपार जाण ॥ १ ॥ गाईम्हसींचीं खिल्लारें । ब्राह्मणा दिधलीं अपारें ॥ २ ॥ काम धेनूची उभनी । कल्पवृक्षाची दाटणी ॥ ३ ॥ ऐसा आनंदसोहळा । दासी जनी पाहे डोळां ॥ ४ ॥

२६२. वैकुंठींचा हरी । तान्हा यशोदेच्या घरीं ॥ १ ॥ रांगातसे हा अंगणीं । माथा जावळाची वेणी ॥ २ ॥ पायीं पैंजण आणि वाळे । हातीं नवनीताचे गोळे ॥ ३ ॥ धन्य यशोदा ते माय । दासी जनी वंदी पाय ॥ ४ ॥

२६३. ब्रह्मा वंदी ज्याचे पाय । त्याची यशोदा ते माय ॥ १ ॥ सामराज्याचा जो दानी । मागे यशोदेसी लोणीं ॥ २ ॥ क्षीरसागर ज्याचे चरणीं । त्याला पायावरतें न्हाणी ॥ ३ ॥ देव ब्रह्मांड पालकीं । त्याची टाळू हातें माखी ॥ ४ ॥ शुक सनकादिक योगी । जनी म्हणे दळूं लागी ॥ ५ ॥

२६४. अहो गोकुळींच्या देवा । आदि अंत तुम्हां ठावा ॥ १ ॥ न लगे पुसावें हो कोणा । आदि अंत हो सुजाणा ॥ २ ॥ जनी म्हणे वो गोकुळीं । किती खासी उष्टावळी ॥ ३ ॥

२६५. असो थोरथोरांची मात । तूंचि मिळालासी गोपाळांत ॥ १ ॥ त्यांच्या शिदोऱ्या सोडिसी । ग्रासोग्रासीं उच्छिष्ट खासी ॥ २ ॥ न म्हणे सोंवळें ओंवळें । प्रत्यक्षचि तें ओंवळें ॥ ३ ॥ स्वानंदाचें डोहीं हात । धुतले सर्वांही निश्चित ॥ ४ ॥ हातीं काठ्या पायीं जोडे । दासी जनी वाट झाडे ॥ ५ ॥

२६६. एकच टाळी झाली चंद्रभागे वाळवंटीं । माझा ज्ञानराज गोपाळाशीं लाह्या वाटी ॥ १ ॥ नामदेव कीर्तन करी पुढें नाचे पांडुरंग । जनी म्हणे बोला ज्ञानदेवा अभंग ॥ २ ॥ अभंग बोलतां रंग कीर्तनीं भरला । प्रेमाचेनि छंदें विठ्ठल नाचूं लागला ॥ ३ ॥ नाचतां नाचतां देवाचा गळला पितांबर । सावध होई देवा ऐसा बोले कबीर ॥ ४ ॥ साधु या संतांनीं देवाला धरिला मनगटीं । काय झालें म्हणूनी दचकले जगजेठी ॥ ५ ॥ ऐसा कीर्तन महिमा सर्वांमाजी वरिष्ठ । जड मूढ भाविका सोपी केली पायवाट ॥ ६ ॥ नामयाची जनीं लोळे संतांच्या पायीं । कीर्तन प्रेमरस अखंड देईं गे विठाई ॥ ७ ॥

ज्ञानेश्वरस्तुति.

२६७. भाव अक्षराची गांठी । ब्रह्माज्ञानानें गोमटी ॥ १ ॥ ते हे माया ज्ञानेश्वरी । संतजनां माहेश्वरी ॥ २ ॥ ज्ञानेश्वर मंगल मुनी । सेवा करी दासी जनी ॥ ३ ॥

२६८. गीतेवरी आन टीका । त्यांनी वाढियेली लोकां ॥ १ ॥ रानताटामाजीं । त्यानें वोगरिलें कांजी ॥ २ ॥ या ज्ञानेशावांचोनी । म्हणे नामयाची जनी ॥ ३ ॥

२६९. ज्ञानाचा सागर । सखा माझा ज्ञानेश्वर ॥ १ ॥ मरोनियां जावें । बा माझ्या पोटा यावें ॥ २ ॥ ऐसें करी माझ्या भावा । सख्या माझ्या ज्ञानदेवा ॥ ३ ॥ जावे वोवाळुनी । जन्मोजन्मीं दासी जनी ॥ ४ ॥

२७०. मायेहूनि माय मानी । करी जिवाची ओंवाळणी ॥ १ ॥ परलोकीचें तारूं । म्हणे माझा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ज्ञानेश्वरू॥ २॥ वित्त गोत चित्त पाहे। सत्य वंदी गुरुचे पाय॥ ३॥ पतिव्रते जैसा पती। जनी म्हणे सांगों किती॥ ४॥

२७१. संत राउळा चालिले। ज्ञानेश्वर तंव बोले॥ १॥ केवढें नवल सांगावें। दासी जनीचें पद ल्याहावें॥ २॥ पाय जोडुनी विटेवरी। कटी हात उभा हरी॥ ३॥ रूप सांवळें सुंदर। कानीं कुंडल मनोहर॥ ४॥ सोनसळा वैजयंती। पुढें गोपाळ नाचती॥ ५॥ गरुडपारीं सन्मुख उभा। जनी म्हणे धन्य शोभा॥ ६॥

२७२. ज्ञानेश्वर अभंग बोलिले ज्या शब्दां। चिदानंद बाबा लिही त्यांस॥ १॥ निवृत्तीचे बोल लिहिले सोपानें। मुक्ताईची वचनें ज्ञानदेवें॥ २॥ चांगयाचा लिहिणार शामा तो कांसार। परमानंद खेचर लिहित होता॥ ३॥ सांगे पूर्णानंद लिही परमानंद। भगवंत भेटी आनंद रामानंद॥ ४॥ सांवत्या माळयाचा काशिबा गुरव। कर्म्याचा वसुदेव काईत होता॥ ५॥ चोखामेळ्याचा अनंतभट्ट अभ्यंग। म्हणोनी नामयाचे जनीचा पांडुरंग॥ ६॥

२७३. सदाशिवाचा अवतार। स्वामी निवृत्ति दातार॥ १॥ महाविष्णुचा अवतार। सखा माझा ज्ञानेश्वर॥ २॥ ब्रह्मा सोपान तो झाला। भक्तां आनंद वर्तला॥ ३॥ आदि शक्ति मुक्ताबाई। दासी जनी लागे पायीं॥ ४॥

२७४. सोपानाची ऐशी मूर्ति। विश्वकर्ता ब्रह्म म्हणती॥ १॥ ऐसे बोले पुराणांत। सृष्टिकर्ता जो भगवंत॥ २॥ जनी म्हणे हा सोपान। ब्रह्मा अवतरला पूर्ण॥ ३॥

२७५. नामयाचा गुरु। तो हा सोपान सद्गुरु॥ १॥ कन्हेवरी करुनी वस्ती। ब्रह्मपुरी तिशीं म्हणती॥ २॥ माझ्या जिवींच्या जीवना। हृदयीं राहें तूं सोपाना॥ ३॥ चित्त उद्धव ज्याची सत्ता। जनी म्हणे माझ्या ताता॥ ४॥

२७६. वाचें म्हणतां सोपान। प्राप्त वैकुंठचि जाण॥ १॥ सोपानदेव करितां जप। समूळ नासे त्रिविधताप॥ २॥ सोपानदेव धरितां ध्यानें। पुनः जन्मा नाहीं येणें॥ ३॥ दासी जनी तल्लिन झाली। सोपानचरणीं विनटली॥ ४॥

२७७. शालिवाहन शके अक्राशें नव्वद। निवृत्ति आनंद प्रगटलें॥ १॥ त्र्याणणयाच्या साली ज्ञानेश्वर प्रगटले। सोपान देखिले शाणणवांत॥ २॥ नव्याणणवाच्या सालीं मुक्ताई देखिली। जनी म्हणे केली मात त्यांनी॥ ३॥

सेना न्हावी चरित्र.

२७८. सेना न्हावी भक्त भला। तेणें देव भुलविला॥ १॥ नित्य जपे नामावळी। लावी विठ्ठलाची टाळी॥ २॥ रूप पालटोनि गेला। सेना न्हावी विठ्ठल झाला॥ ३॥ काखें घेउनी धोकटी गेला राजियांचे भेटी॥ ४॥ आपुले हातें भार घाली। राजियाची सेवा केली॥ ५॥ विसर तो पडला रामा। काय करूं मेघश्यामा॥ ६॥ राजा अयनियांत पाहे। चतुर्भुज उभा राहे॥ ७॥ दूत धाडूनियां नेला। राजियानें बोलाविला॥ ८॥ राजा बोले प्रीतिकर। रात्री सेवा केली फार॥ ९॥ राजसदनाप्रती न्यावें। भीतरींच घेउनी जावें॥ १०॥ आतां घरा विचार नाहीं। सेना म्हणे करूं काई॥ ११॥ सेना न्हावी गौरविला। राजियानें मान दिला॥ १२॥ कितीकांचा शीण गेला। जनी म्हणे न्हावी झाला॥ १३॥

श्रीनामदेवचरित्र.

२७९. गोणाईनें नवस केला। देवा पुत्र देई मला॥ १॥ ऐसा पुत्र देई भक्त। ज्याला आवडे पंढरीनाथ॥ २॥ शुद्ध देखोनियां भाव। पोटी आले नामदेव॥ ३॥ दामशेटी हरुषला। दासी जनीनें ओवाळिला॥ ४॥

२८०. गोणाई राजाई दोघी सासू सुना। दामा नामा बाप लेंक॥ १॥ नारा विठा गोंदा महादा चवघे पुत्र। जन्मले पवित्र त्याचे वंशी॥ २॥ लाडाई गोडाई येसाई साखराई। चवघी सुना पाहीं नामयाच्या॥ ३॥ लिंबाई ती लेकी आऊबाई बहिणी। वेडीपिशी जनी नामयाची।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

२८१. सुंबाचा करदोडा रकट्याची लंगोटी। नामा वाळवंटीं कथा करी॥ १॥ ब्रह्मादिक देव येवोनि पाहातीं। आनंदें गर्जतीं जयजयकार॥ २॥ जनी म्हणे त्याचें काय वर्णू सुख। पहाती जे मुख विठोबाचें॥ ३॥

२८२. मागें संत झाले। नाम्या ऐसें कोण बोले॥ १॥ नामा जातां राउळासी। देव बोले अवघियांशी॥ २॥ केवढें नवल सांगावें। दासी जनीचें पद लिहावें॥ ३॥

२८३. पूर आला पंढरीसी। पाणी लागे पायरीसी॥ १॥ संतजन हो मिळाले। उठुनी नाम्याजवळी गेले॥ २॥ नामा सांगे विठोबासी। उतार द्यावा भिंवरेसी॥ ३॥ दीनवत्सल महाराज। जनी म्हणे केलें काज॥ ४॥

२८४. सण दिवाळीचा आला। नामा राउळासी गेला॥ १॥ हातीं धरूनीं देवासी। चला आमुच्या घरासी॥ २॥ देव तेथुनी चालिले। नामयाच्या घरा आले॥ ३॥ गोणाईनें उटणें केलें। दामशेटीनें स्नान केलें॥ ४॥ पदर काढिला माथ्याचा। बाळ पुशिला नंदाचा॥ ५॥ हाती घेउनी पंचारती। चक्रपाणि ओंवाळती॥ ६॥ जेऊनियां तृप्त झाले। दासी जनीनें विडे दिले॥ ७॥

२८५. वोढिला ताडिला। देव भक्तीनें फाडिला॥ १॥ एका प्रेमा नामासाठीं। भक्ति काढियला कंठीं॥ २॥ झाला नाम्याचा मजूर। मोल्याबांधाट्याचा थर॥ ३॥ भिंती चांदया रचिले। त्याचें छप्पर शेकारिलें॥ ४॥ वरी सोडूनियां पाणी। धन्य भक्त म्हणे जनी॥ ५॥

२८६. वारा पाणी मुसळ धारा। तेणें मोडिलें छपरा॥ १॥ मग विठाई धांवली। हातीं चक्र धांवत आली॥ २॥ वासे लाविले चौफेर। क्षणामध्यें केलें घर॥ ३॥ जागा झाला नामदेव। द्वारीं उभे पंढरिराव॥ ४॥ डोयीं ठेवून पायावरी। दासी जनीं चरण चुरी॥ ५॥

२८७. ज्ञानेश्वर म्हणे नाम्यासवें जेविसी। नाहीं हृषीकेशी म्हणतसे॥ १॥ सांगितलें एक भलतेंचि बोलसी। आहे याचि भ्रांति ज्ञानेश्वरा॥ २॥ वाहियेलें त्वरें ऐसें कांही काम। उठे मेघश्याम तांतडीनें॥ ३॥ निरोप येवोनि सांगावा एकांतीं। म्हणे जनीप्रति पांडुरंग॥ ४॥ देव म्हणे नाम्या ऐकावें वचन। येईल साधोन वेळ तुझी॥ ५॥ जनी म्हणे आतां समजलें मज। धरीन उमज येथोनियां॥ ६॥

२८८. आषाढी एकादशी। नामा होता उपवासीं॥ १॥ देवें गरुडा धाडिला। वेगी बोलाविलें त्याला॥ २॥ राही म्हणे पांडुरंगा। कोणा बोलाविलें सांगा॥ ३॥ माझ्या जीवीचें जीवन। त्यासी बोलाविलें जाण॥ ४॥ ऐसा भक्तराज निका। दासी जनीचा आत्मसखा॥ ५॥

२८९. नामा येऊनियां पाहे। आजि कौतुक दिसताहे॥ १॥ व्रत निवेदी राजाई। लागे नामयांचे पायी॥ २॥ नामा म्हणे या द्रव्यासी आम्ही नातळों मानसीं॥ ३॥ वेंगीं बोलवा ब्राह्मण। करूं आतां संतर्पण॥ ४॥ हातीं टाळ दिंडीगान। हेंचि आमुचें सर्व धन॥ ५॥ ऐसें आश्चर्य देखोनी। जनी हांसतसे मनीं॥ ६॥

२९०. करुनी आरती। नामा आला घराप्रती॥ १॥ तेणें धरियेलें व्रता। अन्न न घ्यावें सर्वथा॥ २॥ ऐसा जाणोनियां नेम। अनुभवी पुरुषोत्तम॥ ३॥ आषाढी एकादशी। विप्रवेषें हृषीकेशी॥ ४॥ आला नामयांचे सदनीं। नाम गाय दासी जनी॥ ५॥

२९१. नमुनी ब्राह्मण। म्हणे मज द्यावें अन्न॥ १॥ नामा म्हणे एकादशी। इच्छित द्यावें फराळासी॥ २॥ अन्नावांचोनी आतां। मज नकोरे सर्वथा॥ ३॥ हातापायांची बेगडी। विप्रें घातली मुरकुंडी॥ ४॥ जीव सोडी चक्रपाणि। म्हणे नामयाची जनी॥ ५॥

२९२. जनसमुदाय मिळाला। धिक्कारितीं नामयाला॥ १॥ विप्र बोलावुनी वेगें। प्रेत नेलें चंद्रभागे॥ २॥ मठें रचुनी सरण। मध्यें निजविला

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

ब्राह्मण ॥ ३ ॥ शय्यागमनीं पहुडला। म्हणे अग्नि द्या आम्हांला ॥ ४ ॥ अग्नि दिला जयाप्रती। देव विमानीं पाहती ॥ ५ ॥ विस्मित झाला चक्रपाणि। प्रगट होय म्हणे जनी ॥ ६ ॥

२९३. अग्नी लागतां अंगासी। घाबरला हृषीकेशी ॥ १ ॥ निजरूपें प्रगटला। चरणीं मस्तक ठेविला ॥ २ ॥ सोनसळा वैजयंती। कोटि सूर्य ते लोपतीं ॥ ३ ॥ नामा म्हणे विठोबाला। भला अंत रे पाहिला ॥ ४ ॥ हाती धरूनी नामयासी। पाठ थोपटी हृषीकेशी ॥ ५ ॥ गेला राउळीं चक्रपाणि। भावें वंदी दासी जनी ॥ ६ ॥

२९४. ऐका हो नामयाचा जन्म मूळसंचित ॥ ध्रु० ॥ हिरण्यकश्यपकुळीं नामा प्रल्हाद। पद्मीणी नाम माझें श्रेष्ठ दासीचें पद ॥ १ ॥ दूसरा जन्म याचा अंगद रामभक्त। मंथरा नाम माझें भरतें मारिली लाथ ॥ २ ॥ द्वापारीं कृष्णसेवा उद्धव जन्मला। कुबज्या नाम माझें देवें उद्धार केला ॥ ३ ॥ कलींत नामदेव विठ्ठलचिंतनी। त्याचीच सेवेलागीं दासी जन्मली जनी ॥ ४ ॥

हरिश्चंद्र आख्यान.

२९५. अपूर्व कोणे एके काळीं। देव सभेच्या मंडळी ॥ १ ॥ करी त्रैलोक्यभ्रमणा। करी वाहे ब्रह्मवीणा ॥ २ ॥ देती सर्वही सन्मान। सिद्ध साधू योगी जन ॥ ३ ॥ सांगे अपूर्व कहाणी। म्हणे नामयाची जनी ॥ ४ ॥

२९६. नारद सांगे मृत्युलोकी। हरिश्चंद्र पुण्यश्लोकी ॥ १ ॥ कैसा सत्त्वाचा समुद्र। ऐसा नाहीं नृपवर ॥ २ ॥ नारदाची ऐकून गोष्ट। सुखावला तो वसिष्ठ ॥ ३ ॥ कोप विश्वामित्रा आला। कैसा वाढविता शिष्याला ॥ ४ ॥ तपतेजें सूर्यराशी। छळीन म्हणे हरिश्चंद्रासी ॥ ५ ॥ उदय पश्चिमे दिनकर। सत्त्व ढाळीना नृपवर ॥ ६ ॥ वसिष्ठाच्या ऐकुनी बोला। विश्वामित्रा क्रोध आला ॥ ७ ॥ जरी उतरेल माझ्या तुकीं। देईन आपुल्या तपासी ॥ ८ ॥ ऐसा दोघांचा संवाद। होता उठला नारद ॥ ९ ॥ इंद्र म्हणे कां निर्फळ। शब्दाशब्दी वाढेल कळ ॥ १० ॥ ऐसें ऐकतां वचन। जनी म्हणे केलें गमन ॥ ११ ॥

२९७. इंद्रसभे झाला वाद। करूं रायासी सावध ॥ १ ॥ येरीकडे ब्रह्मऋषी। कृपें बोलला सिष्यासी ॥ २ ॥ नवी व्यालीं जैसी गाय। पक्षी अंडजी झेपाय ॥ ३ ॥ बाप माझा तैशापरी। होय शिष्याचा साहाकारी ॥ ४ ॥ येऊनियां मागेल तूतें। छळ करील गाधिसुत ॥ ५ ॥ बापा सावध अंतरी। सत्त्व ढाळील नानापरी ॥ ६ ॥ धरी श्वापदांच्या झुंडी। तुझ्या देशांत भवंडी ॥ ७ ॥ मानी शब्दाला आमुच्या। वना न जावें ऋषीच्या ॥ ८ ॥ ऐसें बोलोनी रायासी। गेला वसिष्ठ तपासी ॥ ९ ॥ तुझ्या सत्त्वालागीं हानी। करूं इच्छी म्हणे जनी ॥ १० ॥

२९८. विश्वामित्रें तत्क्षणीं। सिद्ध आश्रमा येउनी ॥ १ ॥ बैसे येउनी आश्रमासी। करी मातंग यागासी ॥ २ ॥ सहस्त्र अवदान आहुती। होतां प्रगटली शक्ति ॥ ३ ॥ विश्वामित्रें तये वेळे। देवी वरदानाचे बळें ॥ ४ ॥ व्याघ्र हिंडती रानें रानें। बंद केलें येणें जाणें ॥ ५ ॥ कृषा न जाती कृषिक। तीर्थयात्रेसी पांथिक ॥ ६ ॥ धेनु न जाती वनासी। वाट नाहीं वेव्हारासी ॥ ७ ॥ प्रजा जाऊन राजसभे। हात जोडोनियां उभे ॥ ८ ॥ ऐसी प्रजेची हे वाणी। राजा विचारितो मनीं ॥ ९ ॥ गुरुवचन धरितां चित्ती। माझी होईल अपकीर्ति ॥ १० ॥ राव निघाला स्वारीसी। म्हणे नामयाची दासी ॥ ११ ॥

२९९. नाना वाजंत्र्यांच्या ध्वनी। राजा आरूढला वहनी ॥ १ ॥ राव प्रवेशला वनीं। अवघीं श्वापदें मारुनी ॥ २ ॥ आश्रमीं आणायासी राव। केलें ऋषीनें लाघव ॥ ३ ॥ मृग कनकाचा साजरा। आला रायाच्या सामोरा ॥ ४ ॥ गुणी लाविलासे बाण। घेऊं पाहे त्याचा प्राण ॥ ५ ॥ येरु कीलान मारुनी जाय। धरणीं न ठेवी तो पाय ॥ ६ ॥ राव लागे तया पाठीं। दम न समावे पोटीं ॥ ७ ॥ प्रवेशला तये वनीं। देखे अपूर्व नयनीं ॥ ८ ॥ धेनुव्याघ्र एके स्थानीं। चाटी एकमेकां दोन्ही ॥ ९ ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

निर्वैर श्वापदगण। राव विस्मय करी देखोन॥ १०॥ पुढें जातां सुगंध पाणी। राव स्नानातें करूनी॥ ११॥ भावें पुजिला गिरिजावर। नमन केलें जोडुनी कर॥ १२॥ विश्वामित्रें तया वनीं। दोघी रूपसा नयनीं॥ १३॥ रायापुढें नृत्य करी। टाळ विणा झणत्कारीं॥ १४॥ द्रव्य आणविलें अपारें। राव देती आपुल्या करें॥ १५॥ नाही द्रव्यासी कारण। तुझ्या स्वरूपासी लीन॥ १६॥ बोले मुनिवर्य दासी। राजा कोपला मानसी॥ १७॥ आज्ञा केली प्रधानासी। मारा बाहेर घाला याशी॥ १८॥ रक्तवदन आश्रमासी। म्हणे नामयाची दासी॥ १९॥

३००. ऋषिअंगणी कामिनी। लोळती येऊनी दोघीजणी॥ १॥ तुम्हां दिला कोणे त्रास। त्याचा करीन मी ग्रास॥ २॥ आम्ही बोलिलों रायासी। घेत नाहीं उचितासी॥ ३॥ ऐसें बोलतां वचन। राव कोपला दारुण॥ ४॥ केलें प्रधानें ताडण। बाहेर घातलें मारून॥ ५॥ त्यांच्या परिसोनी बोला। विश्वामित्र कोपें आला॥ ६॥ म्हणे रायासी अधमा। माझी प्रताप महिमा॥ ७॥ वसिष्ठाच्या पडिभारें। मातलासी द्रव्यें थोरे॥ ८॥ निर्वैर श्वापदांसी। कां रे मारिलें तयासी॥ ९॥ वधूनियां शेवटी त्यासी। मारियेल्या तापस दासी॥ १०॥ पुढें रसाळ आहे कथा। निद्रा लागेल नृपनाथा॥ ११॥ स्वप्नीं मागेल दानासी। म्हणे नामयाची दासी॥ १२॥

३०१. विश्वामित्र द्विजचिन्ह। स्वप्नीं प्रगटे आपण॥ १॥ देखोनियां द्विजवरातें। नमियेलें जोडुनी हातें॥ २॥ राव बोले उदारपणीं। काय इच्छा आहे मनीं॥ ३॥ दयावंत धर्ममूर्ती। तुझी तिही लोकी कीर्ति॥ ४॥ अंकुश कडिया लेखणी। राया वोपी माझ्या पाणी॥ ५॥ उदारपणें देसी जरी। उदक घालीं माझे करीं॥ ६॥ कृपा करुनी आम्हांवरी। आलें पाहिजे नगरी॥ ७॥ येथें संकल्पावांचून। नाहीं होत माझें येण॥ ८॥ रायें घेऊन जीवन ऋषिहस्तकी घालून॥ ९॥ एक नवल देखे दृष्टी। काळपुरुष उभा पाठीं॥ १०॥ लोहदंड घेउनी करी। घालूं पाहे त्याचे शिरीं॥ ११॥ तेणें झाला भयाभीत। राव स्वप्नांत वरळत॥ १२॥ राव बैसला उठोन। करी देवाचें स्मरण॥ १३॥ तारामती पुसे राया। कांहो बरळलां स्वामिया॥ १४॥ राज्यदान सुकृतकोटी। एक काळपुरुष पाठीं॥ १५॥ लोहदंड घेऊन करीं। घालूं पाहे माझे शिरीं॥ १६॥ येरु म्हणे या जीवनीं। करा स्नानातें जाउनी॥ १७॥ अग्निमुखीं द्यावें दान। स्वप्नदोष नासती जाण॥ १८॥ म्हणे प्रधान महाराजा। दान करा काही द्विजा॥ १९॥ ऐसें बोलतां वचन। आला विश्वामित्र जाण॥ २०॥ राजा बोले कर जोडून। शयनीं देखियेलें स्वप्न॥ २१॥ ह्याच स्वरूपा प्रमाण। ऐसा देखिला ब्राह्मण॥ २२॥ सिंहासन समेदिनी। राया दे गा मजलागोनि॥ २३॥ आतां मागें दक्षिणेसी। म्हणे नामयाची दासी।

३०२. ऋषि म्हणे रे समर्था। असो स्वप्नींची हे वार्ता॥ १॥ इच्छा धरून आलों येथें। औट तुक दे कनकातें॥ २॥ कृपा करून द्याल जरी। उदक घाली माझे करी॥ ३॥ दया करा आम्हावरी। आलें पाहिजे नगरीं॥ ४॥ येथें संकल्पावांचून। नाही होत माझें येणें॥ ५॥ रायें घेऊनी जीवन। ऋषिहस्तकी घालून॥ ६॥ विश्वामित्र शिबिकासनी। राव चालिला घेऊनी॥ ७॥ मार्गी वाद्यांचा लाघव। अयोध्येसी आला राव॥ ८॥ राव प्रवेशला नगरी। विश्वामित्र बैसला द्वारीं॥ ९॥ दंड पडताळूनि हातीं। लक्षियेली तारामती॥ १०॥ उभी थरथरां कांपत। राजा जाणविली मात॥ ११॥ राव म्हणे ऋषेश्वर। कोण्या अन्यायानें मार॥ १२॥ केला संकल्प आम्हांसी। नाही दिलें दक्षणेसी॥ १३॥ दान न देतां आम्हांसी। तूं कां गेलासी सदनासी॥ १४॥ हात बांधोनिया राया। दंडहस्तें मारी तया॥ १५॥ तंव आला रोहिदास। चरणी ठेवी मस्तकास॥ १६॥ येरु रक्तांबर नयन। पुसे कवणाचा कवण॥ १७॥ राव म्हणे कुळभूषण। आहे आमुचा नंदन॥ १८॥ राजा पाचारी भांडारी। आणा कनकातें झडकरी॥ १९॥ मज दिलें राज्यदान। तेंचि घेसी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

तूं परतोन॥ २०॥ छत्र मुद्रा सिंहासन। ऋषि हस्तकी वोपून॥ २१॥ हें तो आलें राज्यदानें। औट भार कनक देणें॥ २२॥ धनवंत सौदागर। उभे रायाचे समोर॥ २३॥ धन देती जी अपार। सोडा रायाला सत्वर॥ २४॥ विश्वामित्र म्हणे त्यांसी। काय करावें द्रव्यासी॥ २५॥ क्षितिवरी जितकें धन। तेंहि माझेंचि संपूर्ण॥ २६॥ नाहीं कोणाचा उपाय। जनी म्हणे रक्षील देव॥ २७॥

३०३. राव म्हणे अहो ऋषि। काशीखंड वाराणसी॥ १॥ तेथें जाऊनियां आम्ही। ऋण फेडूं तुमचे स्वामी॥ १॥ एक मासाची अवधी। तुम्ही द्यावी कृपानिधी॥ ३॥ ऋषि म्हणे खरें बोला। नातरी शापीन तिघांला॥ ४॥ रोहिदास म्हणे त्यासी। गहाण राहीन तुम्हांपाशी॥ ५॥ पितृवचनाचें ऋण। त्यांचा उतराई होईन॥ ६॥ ऋण हत्या आणि वैर। नाहीं चुकत मेल्यावर॥ ७॥ ऐसी बाळकाची वाणी। ऐकूनि दचकला मनीं॥ ८॥ ऋषि बोलला नृपासी। नको राहूं आमुचे देशीं॥ ९॥ निघे निघे त्यासी म्हणे। बाहेर आलीं तिघेजणें॥ १०॥ वनीं निघाला त्वरित। झाला लोकांचा आकांत॥ ११॥ लोट पूर जाती पळा। नेत्रीं उदक ढळढळां॥ १२॥ कैसा ब्राह्मण पहा हो। नृपचंद्रालागीं राहो॥ १३॥ राजा बाहेर दवडूनी। पाहे आमुचाचि धणी॥ १४॥ नगरलोकांसी फिरवुनी। राव निघाला तेथुनी॥ १५॥ अलंकार देखियेला। मागें विश्वामित्र आला॥ १६॥ माझ्या राज्यांतील संपत्ती। तारामती धरिली हातीं॥ १७॥ घेई भूषण उतरोनि। म्हणे नामयाची जनी॥ १८॥

३०४. विश्वामित्रें जाऊनि पुढें। वणवा लाविला चहूंकडे॥ १॥ धूम्रें दाटलें अंबर। ज्वाला येती भयंकर॥ २॥ विश्वामित्रें काय केलें। राया बाळातें चुकविलें॥ ३॥ दोघे न पडती दृष्टी। होवोनियां परम कष्टी॥ ४॥ म्हणे अहा कटकटा। काय लिहिलें अदृष्टा॥ ५॥ मेले वणव्यांत जळोनी। ऐसें आलें तिचे मनीं॥ ६॥ पिटी लल्लाट करतळें। अंग टाकी धरणीं लोळे॥ ७॥ म्हणे बाळा रोहिदासा। भेट देईं गा पाडसा॥ ८॥ सूर्यवंशी चुडारत्ना। प्राणपति गा निधाना॥ ९॥ राव दृष्टि न पडतां। अग्नि खाईन तत्त्वतां॥ १०॥ ऐसें विचारिलें मनी। म्हणे नामयाची जनी॥ ११॥

३०५. धर्मशिळे आली राणी। ऋषि दचकला मनीं॥ १॥ अग्नि विझवोनी अंगें। सतीपुढें आला रागें॥ २॥ म्हणे कवणाची कवण। अग्नि खासी कवण्या गुणें॥ ३॥ येरी म्हणे पांथिकातें। पति बाळ चुकलें मातें॥ ४॥ तुम्हीं असतील देखिलें। मज सांगा जी वहिलें॥ ५॥ ऋषि बोले तिजलागून। मेले अग्नींत जळून॥ ६॥ तारामती नेउनी तेथें। दाखविलीं दोन्ही प्रेतें॥ ७॥ त्वचा अंगींची जळाली। हात पाय गोळा झालीं॥ ८॥ देखे नृपाचें तें मढें। पांहे वल्लभा मजकडे॥ ९॥ रुसूं नका बोला वेगें। गुजगोष्टी मजसंगें॥ १०॥ रोहिदास कवळी पोटीं। लावी लल्लाट लल्लाटीं॥ ११॥ शोक करी तारामती। अस्त झाला तो गभस्ती॥ १२॥ प्रेत कवळी कां निर्फळ। गेला गेला हंसनीळ॥ १३॥ आतां प्राप्त झाली निशी। व्याघ्र भक्षील तिघांसी॥ १४॥ सति पुढोनियां प्रेत। नेलें ओढोनी परत॥ १५॥ उदर फोडोनी त्वरित। टाकियेलें काढुनी आर्त॥ १६॥ रागें गुरगुरी तो जाणा। भय दावी क्षणक्षणां॥ १७॥ येरी नेत्र झांकियेले। पंचप्राण आकर्षिले॥ १८॥ तारामती सांडील प्राण। लटिकें प्रतिज्ञा वचन॥ १९॥ पतिपुत्र दोघेजण। आला घेउनी ब्राह्मण॥ २०॥ नाहीं व्याघ्र ना वणवा। मृगजळाचा हेलावा॥ २१॥ तिघेंजणें एक झालीं। दासी जनी आनंदली॥ २२॥

३०६. पंथ क्रमितां तिघांसी। आडवा आला कपटवेषी॥ १॥ होवोनियां वृद्ध विप्र। हातीं काठी भार्याकुमर॥ २॥ म्हणे धन्य रे नृपेशा। तुझा कीर्तिघोष ठसा॥ ३॥ भेरी गर्जती त्रिभुवनी। धांवून आलों मी ऐकुनी॥ ४॥ आज्ञा करावी जी स्वामी। तुमचे शरणागत आम्ही॥ ५॥ करुणा दाखवी रायासी। दीन आम्ही तीर्थवासी॥ ६॥ पुढें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

प्रवास कठीण। पायी नाही पायतण॥ ७॥ तियां वोपोनियां जोडे। जनी म्हणे जाती पुढें॥ ८॥

३०७. आज्ञा करुनी सूर्यासी। तपवी द्वादश कळेसी॥ १॥ बाप तपाच्या सामर्थ्यें। आज्ञा वंदिली आदित्यें॥ २॥ पर्वताच्या लाह्या होती। असा प्रकाशला गभस्ती॥ ३॥ रोहिदास म्हणे तात। बहू झालों तृषाक्रांत॥ ४॥ भाकितसें हो करुणा। सत्वर मेळवीं जीवना॥ ५॥ प्राप्त न होतां जरी तोय। जीव माझा जाऊं पाहे॥ ६॥ बाळ कडे घेऊनियां। पैल दिसे तेथें छाया॥ ७॥ उदक प्राशन करुनी। पंथ क्रमूं म्हणे जनी॥ ८॥

३०८. पुढें जातां कष्टप्रेम। तिर्मी पोह्याचा आश्रम॥ १॥ धर्मपोहेची कुसरी। शोभा रमणीय साजिरी॥ २॥ वृक्ष लागले अंबरीं। डोलताती नानापरी॥ ३॥ फणस कर्दळी गंभेरी। आंबे नारळ खर्जूरी॥ ४॥ चिंचा पपया जांभळी। गुंज खिरण्या रायकेळी॥ ५॥ सीताफळें कवटें निंब। बोरें परीच्या दाळिंब॥ ६॥ जाई मोगरा सेवंती। चांपा बकुल मालती॥ ७॥ पारिजातक हे चमेली। झेंडू गुलबास मखमली॥ ८॥ तुळसी मंजुळ शोभती। नानापरी पुष्पजाती॥ ९॥ प्राप्त वसंताचा काळ। मधु कुंजती कोकिळ॥ १०॥ रंभा ऐशा देवांगना। सर्व शृंगारी भूषणा॥ ११॥ वेलवाळा तोथें सारी। उभ्या तिष्ठताती द्वारीं॥ १२॥ सुगंध वनीं शीतळ जळ। ऐसें शोभे रम्य स्थळ॥ १३॥ ऐसी देखीनी वाटिका। चोज नाहीं नृपनायका॥ १४॥ म्हणती हे धर्मपोये। जनी म्हणे पुढें जाये॥ १५॥

३०९. पाई अव्हेरितां राये। मागें ऋषि धांवताहे॥ १॥ धन्य धन्य रे नरेंद्रा। हाती धरी हरिश्चंद्रा॥ २॥ उष्ण न ध्यानीं कहार। मार्गीं श्रम झाला फार॥ ३॥ करा आश्रम पुण्यता। आम्हां घडों द्यावें तीर्था॥ ४॥ येथें केलिया आराम। व्यर्थ जाती वांयां श्रम॥ ५॥ क्रमीं चार दिवस। पाहा पोईचा हा वास॥ ६॥ द्यावी आम्हां सर्व जोडी। कृपा कराल ती थोडी॥ ७॥ करा आनंदें भोजन। सेवा सिद्ध उदकपान॥ ८॥ म्हणे जावें आश्रमाला। पुढें पंथासी लागला॥ ९॥ त्राहें त्राहें रे जगदीशा। सत्त्व रक्षिसील कैसा॥ १०॥ ऐसा छळक हा ऋषि। नेणों पार कैसा नेशी॥ ११॥ आमची चिंता तुज़ला हरी। जनी म्हणे कृपा करी॥ १२॥

३१०. ऋषि आश्रमा येउनी। येतां देखे ताराराणी॥ १॥ माव करूनि तात्काळ। कैसा निर्मिला नृपाळ॥ २॥ येऊनि आश्रमासी पाहे। डोळां देखियेला राय॥ ३॥ शुद्ध सुमन सेजे नीरा। घालिताती विंझणवारा॥ ४॥ सुगंध चंदन चर्चिती। नानापरींच्या उट्या देती॥ ५॥ रत्नखचिताची झारी। राय घेऊनियां करीं॥ ६॥ करी आनंदें प्राशन। पुढें दिव्यान्न भोजन॥ ७॥ ऐसें करितां अवलोकन। राजा पाहे श्यामवदन॥ ८॥ नव्हे तेंचि कैसें झालें। सूर्या अंधत्व आलें॥ ९॥ पुष्पभार शेषावरी। कैसा आजि झाला भारी॥ १०॥ ध्रुव मेरु गजबजिला। तैसी परी झाली रायाला॥ ११॥ जोडोनियां करपद्मा। म्हणे करी केली सीमा॥ १२॥ ऐसें होतें जरी मनीं। तरी कां राज्य दिलें दानीं॥ १३॥ बुद्धि भविष्यानुसार। मी तों आहे येथें स्थिर॥ १४॥ म्हणोनियां पुढें जाय। अव्हेरिलें धर्मपोय॥ १५॥ मार्गी देखियेलें राया। जनी म्हणे लागे पायां॥ १६॥

३११. येतां देखोनियां बाळ। ऋषि धांवला तात्काळ॥ १॥ कडे घेऊनि तयाला। ऋषि आश्रमासी आला॥ २॥ तुझें मायबापीं प्रेम। होय पाहोनी आराम॥ ३॥ सुखें करुनी भोजन। सुवासित उदकपान॥ ४॥ करुनी क्रमियेलें पंथा। तिहीं सांगितली वार्ता॥ ५॥ बाळ येतसे मागून। त्याचा परामर्श करणें॥ ६॥ म्हणोनी सारिलें विंदान। पुढें वाढिले दिव्यान्न॥ ७॥ रडे मोकलुनी धाय। येथें कल्पांतीं न राहे॥ ८॥ पुढें लागला पंथासी। ऋषि तटस्थ मानसीं॥ ९॥ वदनीं बोट घाली वोजा। ऋषि करितसे चोजा॥ १०॥ ऐसें सत्त्वादिकांपुढें। तप खद्योत बापुडें॥ ११॥ काय करणें ऐशियांसी। व्यर्थ मुकलों तपासी॥ १२॥ मार्गी तियें एक

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

झालीं। दासी जनी आनंदली॥ १३॥

३१२. ऐसें क्रमितां अवधारीं। विश्वेश्वराचे नगरीं॥ १॥ देखियेली वाराणसी। थोर आनंद मानसी॥ २॥ म्हणती ध्यावें शिवदर्शन। तेणें श्रम निवारण॥ ३॥ बाप येऊनि चौबारा। उभा धरूनि पदरा॥ ४॥ म्हणे कोठें रे दक्षणा। बरा होसी चुकवणा॥ ५॥ जो कां राजा सूर्यवंशी। छत्र चामर जयासी॥ ६॥ माथां बांधोनियां तृण। घाली विक्रया आपण॥ ७॥ राणी म्हणे प्राणेश्वरा। आधीं विक्रा माझा करा॥ ८॥ रोहिदास कर जोडुनी। चरणीं मस्तक ठेवुनी॥ ९॥ आधीं विक्रा माझिया द्रव्यासी। तुम्ही द्यावें कौशिकासी॥ १०॥ ऐसें दोघांचे उत्तर। नवल करी ऋषीश्वर॥ ११॥ काय करा याच्या बोला। म्हणे वजनीं सोनें घाला॥ १२॥ अग्निहोत्री तो ब्राह्मण। उभा रायापें येऊन॥ १३॥ देई तारामती तुक। एक भार हा कनक॥ १४॥ रोहिदास म्हणे ताता। मातां स्नेह माझ्या चिता॥ १५॥ राव बोलिला वचन। शीघ्र यावें बा भेटोन॥ १६॥ उभी राहोनी वेल्हाळा। पोटीं बाळाचा उमाळा॥ १७॥ अश्रु ढाळिती लोचन। हा हा शब्दें करी रुदन॥ १८॥ बोले कौशिक ये माते। स्नेह सोड चाल पंथें॥ १९॥ करूनियां ताडातोडी। पाहे कवतुक आवडी॥ २०॥ माता म्हणे बाळकासी। ममता असूं दे मजपाशीं॥ २१॥ रोहिदास ताराराणी। तेही घेतली ब्राह्मणी॥ २२॥ मोल देऊनियां दुणें। राव घेतला डोंबानें॥ २३॥ घेऊनियां घरा आला। येऊन सांगतो भार्येला॥ २४॥ सेवक आणिला तुम्हांसी। सेवा घ्यावी आवडेल तैसी॥ २५॥ घागर घेऊनियां हातीं। पाणी आणी शीघ्र गति॥ २६॥ कुंभ घेऊनि चालिला। खडा हाणोनि फोडिला॥ २७॥ रिक्तपाणी येतां त्यासी। अवघे घुमसिती रायासी॥ २८॥ हा तो पहिलाच शकून। पुढें येणें काय करण॥ २९॥ म्हणती हा तो नव्हे भला। यासी ठेवा स्मशानाला॥ ३०॥ राय रक्षी स्मशानासी। म्हणे नामयाची दासी॥ ३१॥

३१३. अनामिक त्यासी पुसे। तुमचे भोजनाचें कैसें॥ १॥ कर संपुष्ट जोडुनी। राव विनवी मधुर वचनीं॥ २॥ जेणें निघे तुमचें काम। राखा माझाही स्वधर्म॥ ३॥ नृपा दिलें कोरें अन्न। सुखें करावें भोजन॥ ४॥ धान्य घेऊनियां करीं। राव आला गंगातीरीं॥ ५॥ स्नान संध्या नेम सारी। राजा स्वयंपाक करी॥ ६॥ गाय अग्नीचा पैं ग्रास। ठाव वाढिला धर्मास॥ ७॥ ग्रास घालावा वदनीं। आला विश्वामित्र मुनी॥ ८॥ बैसावें जों भोजनासी। अकस्मात पावे ऋषी॥ ९॥ एक भाग भक्षियला। दुजा राजाचा उचलिला॥ १०॥ तृप्त होवोनि ऋषेश्वर। उठे देउनी ढेंकर॥ ११॥ पदर कसुनी कटासी। सदा सादर सेवेसी॥ १२॥ निराहार शक्तिहीन। दिसे जैसा रंक दीन॥ १३॥ ऐसा छळी प्रतिदिनीं। म्हणे नामयाची जनी॥ १४॥

३१४. येरीकडे ताराराणी। द्विजा घरीं वाहे पाणी॥ १॥ छिद्र पाडोनि रांजणा। पाणी त्यामध्यें थारिना॥ २॥ नानापरीचें गांजणें। देती गाळी हो प्रदानें॥ ३॥ पाणी वाहणें कीं खळां। होऊं आली सांजवेळा॥ ४॥ काळ कौशिक ब्राह्मणें। नित्य अग्निहोत्र करणें॥ ५॥ रोहिदासा आज्ञा करी। समिधा आणाव्या झडकरी॥ ६॥ संगें घेऊनियां गडी। वना चालिला तांतडी॥ ७॥ धरूनियां सर्पवेष। रोहिदासा केला दंश॥ ८॥ येउनी सांगती मातेस। सर्पें खादलें पुत्रास॥ ९॥ गेला चंद्र उतरोनी। दिसे जैसी म्लान वदनीं॥ १०॥ करुणा आली ब्राह्मणासी। जाय सांभाळी पुत्रासी॥ ११॥ रडे मोकलोनी धाय। म्हणे आतां मी करूं काय॥ १२॥ काय करूं आतां कैसें। कोठें गेलें हो पाडसे॥ १३॥ प्राण राहिला संकटीं। करा पाडसाची भेटी॥ १४॥ निबिड अंधार काळोख। दीर्घ स्वरें मारी हांक॥ १५॥ ठेंचा पायीं अडखळत। पुढें पायासी लागत॥ १६॥ बाळ कवळोनी हात। जनी म्हणे शंख करीत॥ १७॥

३१५. वेष घरोनी ब्राह्मण। तिसी करी संभाषण॥ १॥ खेद न करी मानसीं। काय करणें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

होणारासी ॥ २ ॥ वेगीं संस्कारीं याला। दिवसा मागतीं जा कामाला ॥ ३ ॥ घेउनियां प्रेतासी। वेगीं चेतवी अग्नीसी ॥ ४ ॥ ज्वाळा अवलोकितां नयनीं। राव आला तत्क्षणीं ॥ ५ ॥ म्हणे कोण गे तूं येथें। येरी म्हणे तुमचा सुत ॥ ६ ॥ कैंचा सुत कैसा काय। आमचा हक्क कोठें आहे ॥ ७ ॥ करुणा म्लानी करी त्याची। म्हणे गोष्ठ हे तों कैंची ॥ ८ ॥ बरेंपणें जाई आतां। दंड बैसतील माथां ॥ ९ ॥ घेई प्रेत ओसंगळी। वेगें प्रवेशे देउळीं ॥ १० ॥ आवडें प्रेत झोपीं जाय। ऋषि धांवे लवलाहे ॥ ११ ॥ उदर चिरोनियां नखीं। मांस कवळें घालीं मुखीं ॥ १२ ॥ येऊनियां नगरनारी। जनी म्हणे शंख करी ॥ १३ ॥

३१६. धांवा धांवा नगरवासी। लास भक्षिते लेंकुरासी ॥ १ ॥ अवघे होऊनियां गोळा। कोणी न जाती देउळा ॥ २ ॥ बाळ करोनी पाहती। शेण धुळी धोंडे माती ॥ ३ ॥ मारोनी बाहेर घातली। केली डोंबाचे हवालीं ॥ ४ ॥ हिच्या करा शिरच्छेदाला। तंव तो आज्ञापी रायाला ॥ ५ ॥ रायें घेऊनियां तिला। आणियेलें ठिकाणाला ॥ ६ ॥ म्हणे करीं हो स्मरण। तुझें कुळदैवत कोण ॥ ७ ॥ खड्ग पुसोनियां धारा। घाव घाली जो शिरा ॥ ८ ॥ ऋषि धांवला सत्वरी। वरच्यावरी कर धरी ॥ ९ ॥ म्हणे माग मी प्रसन्न। येरी बोले हास्यवदन ॥ १० ॥ रोहिदासा ऐसा पुत्र। हरिश्चंद्र राजा भ्रतार ॥ ११ ॥ याचक विश्वामित्रा ऐसा। जन्मोजन्मी दे जगदीशा ॥ १२ ॥ बापा भली केली सीमा। तप कोपितों मी तुम्हां ॥ १३ ॥ गगनीं विमानें दाटती। सुमनभार वरुषती ॥ १४ ॥ वेगीं उतरलें विमान। नामयाची जनी म्हणे ॥ १५ ॥

३१७. दूत विनविती कर जोडुनी। म्हणती आरुढावें विमानीं ॥ १ ॥ ऋषि म्हणे न घडे ऐसें। ह्याची तृप्ति नाही आस ॥ २ ॥ टपावरोनी काढिला। पटीं बैसवीन ह्याला ॥ ३ ॥ थोर वाजत गाजत। विप्र मंत्रघोष करीत ॥ ४ ॥ विजयी झाला हरिश्चंद्र। आडवा पावला परिकर ॥ ५ ॥ लक्षानुलक्ष आरत्या करिती। नगरनारी वोवाळिती ॥ ६ ॥ ऋषि अभिषेकिती रायाला। थोर मनीं आनंदला ॥ ७ ॥ राया प्राप्ती जाला पट। गुडी उभवी वसिष्ठ ॥ ८ ॥ येथुनी हरिश्चंद्र आख्यान। नामयाची जनी म्हणे ॥ ९ ॥

थालीपाक.

३१८. थालीपाक ऐकतां। हरि वारी जन्मव्यथा ॥ १ ॥ दुर्योधनाच्या घरासी। आला दुर्वास हो ऋषी ॥ २ ॥ सेवें बहुत तोषविला। वर माग तूं इच्छिला ॥ ३ ॥ शिष्यांसह रानी जावें। इच्छाभोजन मागावें ॥ ४ ॥ अंतर शाप द्यावा। आतां जातों वर द्यावा ॥ ५ ॥ हर हर शब्द थोर केला। झाला वनांत गलबला ॥ ६ ॥ नकल सर्वांसी वाटलें। जनी म्हणे ऋषी आले ॥ ७ ॥

३१९. मध्यरात्रीं ऋषिसहित। वना आले अकस्मात ॥ १ ॥ पंडुसुत जमा झाले। ऋषि समस्त वंदिले ॥ २ ॥ धर्म भीमाकडे पाहे। सत्त्वहानि होत आहे ॥ ३ ॥ द्रौपदीनें धांवा केला। देव जेवितां उठिला ॥ ४ ॥ ऋषि तृप्त केले वनीं। म्हणे नामयाची जनी ॥ ५ ॥

३२०. करचरण प्रक्षाळुनी। उभी ठेली वृंदावनी ॥ १ ॥ जोडोनियां करकमळ। म्हणे धांवरे गोपाळ ॥ २ ॥ कृष्णा पाहतोसी काय। सत्त्वहानि होत आहे ॥ ३ ॥ ऋषि स्नानासी कोपिष्ठ। गेले सांगोनियां स्पष्ट ॥ ४ ॥ दिवसा कर्माचा उगाणा। सर्व सारोनियां जाणा ॥ ५ ॥ आतां येतो शीघ्र गती। अन्नें वाढा पात्रावरुती ॥ ६ ॥ अन्न न देखतां डोळां। भस्म करीन सकळां ॥ ७ ॥ गेला घालोनि संकटीं। लाज राखें जगजेठी ॥ ८ ॥ कोणी नाहीं रे निर्वाणी। म्हणे नामयाची जनी ॥ ९ ॥

३२१. ताट विस्तारी रुक्मिणी। देव बैसले भोजनी ॥ १ ॥ इतुक्यामध्यें अकस्मात। ध्वनि उमटला कानांत ॥ २ ॥ धांवा ऐकतां श्रवणी। ताट लोटी चक्रपाणि ॥ ३ ॥ उठिला खड बडोनि कैसा। पावे बहिणीचिया क्लेशा ॥ ४ ॥ उभी वृंदावनीं बाळा। पुढें देखिला सांवळा ॥ ५ ॥ मुगुट कुंडलें मेखळा। वैजयंति वनमाळा ॥ ६ ॥ शंख चक्र आयुधें करीं। दिसे घवघवीत हरी ॥ ७ ॥ झळके पीतांबर कासे।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नयनी कोंदला प्रकाशे॥ ८॥ पाहतां आनंदली मनीं। म्हणे नामयाची जनी॥ ९॥

३२२. रत्नाचे मंचकी पहुडे चक्रपाणि। चोळीत रुक्मिणी चरणांबुज॥ १॥ कानीं पडियेले द्रौपदीचे बोल। उठे घननीळ तांतडीनें॥ २॥ रुक्मिणी म्हणे ऐक एक गोष्ट। पडिलें संकटीं तान्हें माझें॥ ३॥ टाकिला गरुड अनवाणी पाय। जनी म्हणे माया धांविन्नली।

३२३. वंदोनी श्रीकृष्णचरण। हरुषें घाली लोटांगण॥ १॥ म्हणे तुंचि माझ्या मना। स्वस्थ करीं गा नारायणा॥ २॥ आश्रमासी येतां ऋषि। तोंवरी आयुष्य प्राणासी॥ ३॥ ऐकतांचि हांसे देव। न दिसे प्राप्तीचा उपाव॥ ४॥ अवकाळीं कैंचें अन्न। विचारितां दिसे विघ्न॥ ५॥ त्यांचे असो बळ तैसें। कांही वोपावें आम्हांस॥ ६॥ स्वस्थ नव्हे माझें मन। क्षुधा लागली दारुण॥ ७॥ तार्टी विस्तारिला मेवा। तुझा ऐकोनियां धांवा॥ ८॥ न जेवितां आलों येथें। बहु झालों क्षुधाक्रांत॥ ९॥ सत्वर मेळवीं भोजनीं। म्हणे नामयाची जनी॥ १०॥

३२४. हांसें आलें द्रौपदीसी। बापा वचन परियेसी॥ १॥ सर्व अरिष्ट भंजना। तुजलागी बाहो कोणा॥ २॥ एक भाव तुझे पायीं। यांवेगळें कांही नाहीं॥ ३॥ थाळीमाजी पाहतां अन्न। होय क्षुधेचें हरण॥ ४॥ थाळी दाखवी देवासी। कैंचा विश्वास तुजसी॥ ५॥ धांडोळितां कष्टें बहुतें। किंचित शाखापत्र तेथें॥ ६॥ निर्मी कैवल्याचा दानी। म्हणे नामयाची जनी॥ ७॥

३२५. कर पसरिला भगवंतें। घाली द्रौपदी देठातें॥ १॥ म्हणे पावो विश्वंभर। बोले द्रौपदी सुंदर॥ २॥ देतां तृप्तीचा ढेंकर। धालें त्रैलोक्य अपार॥ ३॥ दावी कौतुक श्रीपती। पर्वत अन्नाचे पाहाती॥ ४॥ उष्ण घवघवीत कैसी। वाफा उठती आकाशीं॥ ५॥ नाना परिचीं दिव्यान्नें। डोळां दावी नारायणें॥ ६॥ चोज सर्वीचिया मनी। म्हणे नामयाची जनी॥ ७॥

३२६. येरीकडे गंगातीरीं। कवतुक दाखवी श्रीहरि॥ १॥ धर्मासहित साहीजण। ऋषिलागीं देती अन्न॥ २॥ रत्नखचित मंडपा आंत। पंगती बैसल्या आनंदभूत॥ ३॥ नानापरिचें दिव्य अन्न। वाढीं द्रौपदी आपण॥ ४॥ मिठी पडलीं वदनीं। म्हणे नामयाची जनी॥ ५॥

३२७. म्हणती माथां असतें तोंड। अन्नें भक्षितां उदंड॥ १॥ कैंची पोटें आमुची लहान। गोड धर्माघरचें अन्न॥ २॥ उदरें सागराच्या ऐसी। करुनी यावें धर्मापाशीं॥ ३॥ तृप्ति द्रौपदीच्या हातें। नित्य भक्षाया अन्नातें॥ ४॥ वदन करवेना तळीं। वरुची चंद्राची मंडळी॥ ५॥ चंद्री लागलीसे नेत्रा। कोण सांभाळितें धोत्रा॥ ६॥ तरी आवडी भोजनीं। म्हणे नामयाची जनी॥ ७॥

३२८. ऐशा धाल्या ऋषिपंक्ति। ढेंकर आनंदाचे देती॥ १॥ तृप्ति बाणली सर्वांसी। तरी आवड अन्नापाशीं॥ २॥ उठले हात प्रक्षाळुनी। विडे घेतले सर्वांनीं॥ ३॥ न बैसवे सुखासनीं। अवघे प्रवर्तले शयनीं॥ ४॥ ते देखोनि निद्रिस्त। साही जणें झालीं गुप्त॥ ५॥ माया निर्मियेली जैसी। आतां गुप्त झाली तैसी॥ ६॥ कोणा न कळे याची करणी। म्हणे नामयाची जनी॥ ७॥

३२९. म्हणे पाचारा भूदेवा। धर्म म्हणे जावें भीमा॥ १॥ गंगातिरासी येऊन। नमियेले ऋषिजन॥ २॥ त्वरा करा ऋषिजन। पात्रीं विसतारलें अन्न॥ ३॥ म्हणती बापा ऐसें नव्हें। पोट आहे किंवा काय॥ ४॥ आतां स्वस्थ प्रसादें। तृप्त झालीं ऋषिवृंदें॥ ५॥ कैचा नष्ट दुर्योधनें। आम्हां धाडिलें दुर्जनें॥ ६॥ कष्टी करितां अंबऋषी। चक्र लागलें पाठीसी॥ ७॥ तेचि गोष्टी झाली आतां। शीघ्र पळावें तत्त्वतां॥ ८॥ माझा आशीर्वाद धर्मा। नित्य कल्याणचि तुम्हां॥ ९॥ ऋषि निघाले तेथुनी। म्हणे नामयाची जनी॥ १०॥

३३०. ऐशापरी पांडवातें। रक्षियेलें दीनानाथें॥ १॥ शंखचक्र आयुधें करीं। छाया पितांबर करी॥ २॥ हस्त ठेऊनियां माथां। सुखी असा निर्भय चित्तां॥ ३॥ आज्ञा घेउनी सर्वांची।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

देव गेले द्वारकेसी ॥ ४ ॥ सरला थालिपाक आतां। पुढें सावधान श्रोता ॥ ५ ॥ कथा पुढील गहन। घोषयात्रा निरूपण ॥ ६ ॥ येथुनी अध्याय कळस। जनी म्हणे झाला रस ॥ ७ ॥

३३१. ऐसा योग घडे ज्यातें। धन्य माता आणि तात ॥ १ ॥ अखंड वासना। ब्रह्मार्पण देवार्चना ॥ २ ॥ ब्रह्मभावें हो देवा। ऐसा पूजी जो भूदेवा ॥ ३ ॥ नम्रता चरणी। म्हणे जनी सरली मनीं ॥ ४ ॥

तीर्थावळी.

३३२. जावोनी राउळा जोडूनियां हात। बोले ज्ञानेश्वर विठोबासी ॥ १ ॥ करावीं हीं तीर्थें आवड अंतरीं। घ्यावें बरोबरी नामदेवा ॥ २ ॥ ऐकतांचि ऐसें म्हणे पांडुरंग। न धाडितां राग येईल तुज ॥ ३ ॥ तयाविण मज घडी जरी जाय। युगा ऐसी होय ज्ञानेश्वरा ॥ ४ ॥ जनी म्हणे मग नामया पाचारी। कृपाळुवा हरि मायबाप ॥ ५ ॥

३३३. जाय बरोबरी नामया तूं जाय। न चले उपाय कांहीं येथें ॥ १ ॥ करूं काय मज पाडिलें सांगडें। उल्लंघेना भीड मज याची ॥ २ ॥ नामा म्हणे ऐका स्वामी नारायणा। एक विज्ञापना परिसावी ॥ ३ ॥ कटावरी कर नाही ज्या देवाचे। न घे मी तयाचें दरुशन ॥ ४ ॥ मारितांचि हाक यावें त्वां झडकरी। बरें म्हणे हरि नामयासी ॥ ५ ॥ निवृत्ति ज्ञानेश्वर सोपान चांगया। जनी म्हणे तया सांगतसे ॥ ६ ॥

३३४. तुम्ही सकळिक संत आहांत सज्ञान। हें माझें अज्ञान फार आहे ॥ १ ॥ याजबरोबर चालावी हो वाटे। मोडतील कांटे सांभाळावें ॥ २ ॥ हळुहळु जावें करूं नका घाई। चालायाची नाहीं संवय त्यासी ॥ ३ ॥ लागतांचि भूक न धरी हा निर्धार। घ्यावा समाचार क्षणक्षणां ॥ ४ ॥ जनी म्हणे ऐसें बोलिला घननीळ। नेत्रींहुनी जळ वाहतसे ॥ ५ ॥

३३५. वियोग नाम्याचा न साहे गोपाळा। न जाय राउळा पांडुरंग ॥ १ ॥ पद्माळ्यांत तेव्हां राहे विश्वंभर। कळे समाचार रुक्मिणीसी ॥ २ ॥ चलावें मंदिरीं स्वामी पुरुषोत्तमा। येईल गे नामा माझा जेव्हां ॥ ३ ॥ तयाविण मज दाही दिशा ओस। न लगे चित्तास गोड कांहीं ॥ ४ ॥ जनी म्हणे ऐसी आवड नाम्याची। म्हणोनियां त्याची झालें दासी ॥ ५ ॥

पाळणा.

३३६. जो जो जो जो रे गोरक्षा। जगदोद्धारा जगदीशा ॥ १ ॥ शुद्ध सुमनांची सेज। भक्तिभावें आंत नीज ॥ २ ॥ माता उन्मनी केवळ। निजीं निजले गोपाळ ॥ ३ ॥ मागें घालुनी आनंदा। सुखें निजे बा गोविंदा ॥ ४ ॥ अद्वय नाम गीतीं गातां। दासी जनी कैंची आतां ॥ ५ ॥

पदें.

३३७. पुण्यवंत पाताळ लोकीं नेला। दरिद्री तो भाग्यवंत केला। चोरट्याचा बहुमान वाढविला। कीर्तिवानाचा अपमान केला ॥ १ ॥ धुंद झाला तुझा दरबार ॥ ध्रु० ॥ वैरियासी दिधली मोक्षसिद्धि। कपटिया दिधली महानिधी। सेवकाच्या ढुंगा न मिळे चिंधी। चाळकासी त्रैलोक्य भावें वंदी ॥ २ ॥ पतिव्रता ती वृथा गुंतविली। वेश्या गणिका तो सत्यलोका नेली। कळी स्वकुळा लावियेली। यादववृंदा ही गोष्ट बरी नाहीं केली ॥ ३ ॥ सत्ववानाचा बहु केला छळ। कीर्तिवानाचें मारियलें बाळ। सखा म्हणविसी त्याचें नासी बळ। जनी म्हणे मी जाणें तुझे खेळ ॥ ४ ॥

३३८. माझें अचडें बचडें छकुडें गे राधे रूपडें। पांघरूं घालीतीं कुंचडें ॥ ध्रु० ॥ हरि माझा गे सांवळा। पायीं पैंजण वाजे खुळखुळा। यानें भुलविल्या गोपिबाळा ॥ १ ॥ हरि माझा गे नेणता। करी त्रिभुवनाचा घोंगता। जो कां नांदे त्रिभुवनीं ॥ २ ॥ ऐसे देवाजीचे गडी। पेंद्या सुदामाची जोंडी। बळिभद्र त्याचा गडी ॥ ३ ॥ जनी म्हणे तूं चक्रपाणि। खेळ खेळतो वृंदावनीं। लुब्ध झाल्या त्या गौळणी ॥ ४ ॥

३३९. विठोबा मला मूळ धाडा। धांवत येईन दुडदुडां। चरणीं लोळेन गडबडा। माझा जीव झाला वेडा ॥ १ ॥ कर ठेवुनि कटावरी। उभा राहिला विटेवरी। मुगुट घातला सरीं। कलगी खोविली वरी ॥ २ ॥ पितांवर नेसूनियां पिंवळा।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

गळां पैं तुळसीच्या माळा। की रूप सुंदर सांवळां। तेज झळके झळाळा॥ ३॥ नामदेवाचें कौतुक। मला सांपडलें माणीक। विठोबा पाहुनी तुं मुख। हारपली माझी तहानभूक॥ ४॥ विठोबा तुझी संगत बरी। जैसा चंदन मैलगिरी। संत चालले पंढरी। निशाण पताका जरतारी॥ ५॥ जसी मोहोळासी लुब्ध मासी। तसी तूं सखी माझी होसी। सुख दुःख सांगेन तुजपासी। माझा जीव होईल खुषी॥ ६॥ काळी मध्यान रात्र झाली। फेरी विठ्ठलाची आली। जनी म्हणे चूक पडली। भेट नाहीं विठ्ठलाची झाली॥ ७॥

३४०. नवल वर्तलें नवल वर्तलें नवल गुरूचे पायीं। कापूर जळूनि गेला तेथें काजळी उरलीं नाहीं॥ १॥ साखर पेरूनी ऊंस काढिला कान झाला डोळा। निबर बायको भ्रतार तान्हा सासरा तो भोळा॥ २॥ नवल वर्तलें नवल वर्तलें नवल चोजवेना। डोहामाजीं मासोळीनें वांचविलें जीवना॥ ३॥ नवल वर्तलें नवल वर्तलें अनाम चक्रपाणि। गोकुळ चोरून नेलें तेथें कैंचि दासी जनी॥ ४॥

३४१. खंडेराया तुज करितें नवसू। मरूं देरे सासू खंडेराया॥ १॥ सासू मेल्यावरी तुटेल आसरा। मरूं दे सासरा खंडेराया॥ २॥ सासरा मेलिया होईल आनंद। मरूं दे नणंद खंडेराया॥ ३॥ नणंद मरतां होईन मोकळी। गळां घालीन झोळी भंडाराची॥ ४॥ जनी म्हणे खंडो अवघे मरूं दे। एकटी राहूं दे पायापाशीं॥ ५॥

दशावतारवर्णन.

३४२. ऐसा हा देवानें थोर पवाडा केला। पूर्व अवतारीं झाला हयग्रीव॥ १॥ मग अंबऋषीसाठीं पडियेला संकटीं। मच्छ झाला पोटीं समुद्राच्या॥ २॥ होउनी कच्छप पर्वत धरिला। वराहें मारिला दैत्य भार॥ ३॥ तयाचा सहोदर मृत्यु नाहीं ऐसा वर। तेव्हां अवतार नारसिंह झाला॥ ४॥ अर्धनारी नटेश्वर दुसरा तो वामन। भार्गव तो निधान दाशरथी॥ ५॥ होऊनियां कृष्ण कंस वधियेला। आतां बुद्ध झाला सखा माझा॥ ६॥ लीला अवतारीं हरि करी खेळ नाना। म्हणे जनी जाणा तैं मी होत्यें॥ ७॥

प्रारब्धगति.

३४३. बघायाला गेले क्रियमाण शिडी। घालूनियां उडी तेथें आले॥ १॥ पुरवी या नवसा म्हणवी गा देवा। टोंचियेलें जीवा गळ देहीं॥ २॥ आठ चारी फेरे फिरविती त्यासी। पाहती नवसासी पुरलें नाहीं॥ ३॥ दुःख सुख तेथें पाहुनी प्रमाण। करिती समान क्रीयमाण॥ ४॥ दुरुनी पाहती दावी जनी दासी। म्हणे नामयासी पहावें स्वामी॥ ५॥

३४४. शेष पुसतां बाणातें। कोणे काजा आला तेथें॥ १॥ बाण करी अहाकार। मुखें पडलीया धूर॥ २॥ वृक्ष पाडी हो मक्षिका। तैसें येथे झालें देखा॥ ३॥ काय शिखंडीचे बाण। करिती भीष्माचें पतन॥ ४॥ तेथें मागितलें पाणी। म्हणे नामयाची जनी॥ ५॥

नामदेवाचे गोणाईशी भाषण.

३४५. माझा हा विठोबा येईल गे केव्हां जेवीन मी तेव्हां गोणाबाई॥ १॥ जाउनी राउळा तयासी तुं पाहे। लवकरी बाहे भोजनासी॥ २॥ भरलिया रागें क्रोध त्याचा साहे। लवकरी वाहे भोजनासी॥ ३॥ ज्ञानेश्वराघरीं असेल बैसला। जाउनी विठ्ठला पाहें तेथें॥ ४॥ जनी म्हणे देवा चला पुरुषोत्तमा। खोळंबला नामा भोजनासी॥ ५॥

कूट

३४६. अहो मांडियला खेळ। बुद्धि रंग बुद्धिबळ॥ १॥ कैंचा शह आला। प्याद्याखालीं फरजी मेला॥ २॥ शहबाजू झाली। जनी म्हणे मात केली॥ ३॥

भक्तिस्वरूप.

३४७. भक्ति ते कठीण इंगळाची खाई। रिघणें त्या डोहीं कठीण असे॥ १॥ भक्ति ते कठीण विषग्रास घेणें। उदास पैं होणें जीवें भावें॥ २॥ भक्ति ते कठीण भक्ति ते कठीण। खड्गाची धार बाण न सोसी तया॥ ३॥ भक्ति ते कठीण विचारूनि पाहे जनी। भक्तियोगें संतसमागमीं सर्व सिद्धी॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

काकड आरती.

३४८. उठा पांडुरंगा प्रभातसमयो पातला। वैष्णवांचा मेळा गरुडपारीं पातला॥ १॥ वाळवंटापासूनि महाद्वारापर्यंत। सुरवरांची दाटी उभे जोडूनि हात॥ २॥ शुकसनकादिक नारद तुंबर भक्तांच्या कोटी। कवाडाआडूनि पाहताती जगजेठीं॥ ३॥ सुरवरांची विमानें गगनीं दाटलीं सकळ। रखुमाबाई माते वेगीं उठवा घननीळ॥ ४॥ रंभादीक नाचती उभ्या जोडुनि हात। त्रिशूळ डमरू घेउनि आला गिरजेचा कांत॥ ५॥ पंचप्राण आरत्या घेऊनियां देवस्त्रिया येती। भावें ओवळिती राही रखुमाईचा पती॥ ६॥ अनंत अवतार घेसी भक्ताकारणें। कनवाळु कृपाळु दीनालागीं उद्धरणें॥ ७॥ चौयुगांचा भक्त नामा उभा कीर्तनीं। पाठीमागें डोळे झांकुनी उभी ते जनी॥ ८॥

नाराचे अभंग

करुणा.

१.देवा माझें मीपण ठेवीं आपुले चरणीं। घालीं माझे मनीं रूप तुझें॥ १॥ मग मी लोकाचारी असेन वर्तता। राहीन चिंतितां चरण तुझे॥ २॥ चंदनाची वृत्ति वेधले तरुवर। सबाह्य अभ्यंतर काय झालें॥ ३॥ सरिता सिंधूसी मिळोनि हरपली। सागरची झाली एकसरें॥ ४॥ लवण जळाचे प्रवृत्ति जसे। ऐक्यभावें न दिसे वेगळें कांहीं॥ ५॥ नारा म्हणे शरण आलों केशिराजा। ऐसा भाव माझा करीं मा वेगीं॥ ६॥

२. तुज मी अनन्य शरण। सर्व पांडुरंगा जाण॥ १॥ माता बाळा कोपे रागें। द्यावें आहारातें मागे॥ २॥ जाय कडीयेसी नेघे। परी तिच्या अंगसंगें॥ ३॥ झणे खटी परतें लोटी। परि सदा पायीं घाली मिठी॥ ४॥ नारा म्हणे नामयाचा। बापा सांभाळावी वाचा॥ ५॥

३. तुज भांडवल मोक्ष एक गांठी। तो केला पावन तुझ्या नामें॥ १॥ आतां गौप्य काय आहे तुझ्यापाशीं। जें तूं मज देशी पांडुरंगा॥ २॥ चतुर्विध मुक्ति दृष्टि वोळंगती। ध्यातां तुझे चित्ती चरणकमल॥ ३॥ आणिका ऋद्धि सिद्धि दाखविसी आस। या दासीचा अभिलाष कोण करी॥ ४॥ भूतळीचें वैभव निजकर्मभोग। तें तुज उद्वेग करणें बहू॥ ५॥ नारा म्हणे नाम्यानें सांगितलें बीज। तेंचि मजसी गुज बोल कांहीं॥ ६॥

४. मी आहें तेथें मग तूं कईचा। हा उपजन्माचा तोडी वेळ॥ १॥ आपुला करोनि ठेवी तुझ्या चरणीं। न मानिती कोणी क्षिती नाहीं॥ २॥ सेवासुख देई हेंचि दुणेपण। येर तो अभिमान खंडी देवा॥ ३॥ नारा म्हणे अससी माझिया जिव्हाळा। सुखरूपा विठ्ठला केशीराजा॥ ४॥

५. तुझे चरणी चित्त रंगलें अनुरागें। बहू जन्म वियोगें शिणलो होतों॥ १॥ उठवितां येथुनी मुरकुंडी घालीं। कृपेची साउली देखुनी तुझी॥ २॥ आहाळले पोळले तापत्रय विराले। तृष्णा विभांडीले नानापरी॥ ३॥ कामक्रोध मदमत्सरु अहंकार। देह निरंतर जाजावलें॥ ४॥ बुडतीया जरी अवचितां सांगडी। तें जीवें न सोडी तैसें झालें॥ ५॥ विनवी नामयाचा विष्णुदास नारा। वंशपरंपरा दास तुझा॥ ६॥

६. माझ्या विठोबाचें श्रीमुख साजिरें। झळकती कुंडलें मनोहर॥ १॥ मना तें तूं आठवी आसनीं शयनीं। भोगिसी जन्मनी सहज सुख॥ २॥ गगनीं असा पें न येतो मार्तंडू। तैसें अखंडू करीं ध्यान॥ ३॥ कमल कळिके जैसा भ्रमर आसक्त। तैसा तूं निश्चित राहें चरणीं॥ ४॥ जैसा कां समंधु जीवन जळचरें। येणेंचि निर्धारें दृढ धरीं॥ ५॥ नारा म्हणे माझ्या बापाचें साधन। सांपडली खूण अंतरीची॥ ६॥

७. तापत्रया तापलें देहे असे पीडिलें। वासना विभांडिलें मन माझें॥ १॥ विठोबावेगळें न देखें मी सुख। पाहेन तुझें मुख एक वेळ॥ २॥ सुखाची साउली पाहीन दृष्टीभरी। जाईन महाद्वारी लोटांगणी॥ ३॥ हारला शीणभाग जन्मजन्मांतरीचा। नारा नामयाचा शरणागत॥ ४॥

८. पुंडलिकाद्वारीं होतसे वेव्हार। नामयाची पोरें भांडतातीं॥ १॥ येऊनियां चौघे उभे ठेले सत्वर। बोलताती पोरें नामयाची॥ २॥ आमुचा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अंकी लागताती पुराणी। नामयाचे ऋणीं बांधलासी॥ ३॥ नामयाचा नारा बैसलासे दारी। विठोबावरी आळ आला॥ ४॥

९. कैंचें आम्हां जाति कुळ। कैंचे आम्ही धर्मशीळ॥ १॥ तुझ्या नामीं अनुसरलों। तिही लोकी सरते झालों॥ २॥ नारा विनवी विष्णुदास। आमुचे वंशी हा विश्वास॥ ३॥

१०. आम्हां व्रत एकादशी। देव केशव तीर्थ तुळशी॥ १॥ अनेक नेणों बा साधन। आमचा विषय हरिकीर्तन॥ २॥ संतसंगती निरंतर। प्रेमधन हें भांडार॥ ३॥ विनवी विषणुदास नारा। आमची ऐसी परंपरा॥ ४॥

११. कोटी यज्ञांची ही फळें। त्यांहुनी हरिनाम आगळें॥ १॥ तें फळ वेगळें सांगावया। नाही उपमा द्यावया॥ २॥ महापातकांचिया राशी। नामें पावती मोक्षासी॥ ३॥ दोन अक्षरांसाठी। गणिका घातली वैकुंठी॥ ४॥ हरिनामाचा संग्रह करा। म्हणे विष्णुदास नारा॥ ५॥

१२. काळा अलोट अभंग। हरीचे दास अंतरंग॥ १॥ हाकारिती वेळोवेळां। कृष्णा गोविंदा गोपाळा॥ १॥ कंठी तुळशीच्या माळा। नेत्रीं अश्रुचिया किळा॥ ३॥ गुढिया झळकती रोमांकुरीं। कंप न धरेचि शरीरीं॥ ४॥ आंतु बाहेरी निरंतरी। मागा पुढां अवघा हरी॥ ५॥ संतचरणींचा रजःकण। नारा नामयाचा प्राण॥ ६॥

१३. सुख दुःखा भेटों गेलें। चित्त चैतन्या मिळालें॥ १॥ आला अनुभव नामाचा। ठेवा लाधला प्रेमाचा॥ २॥ जन्ममरणाची काजळी। तुटोनी गेली तये वेळीं॥ ३॥ सरले संकल्प विकल्प। हृदयीं देखिलें विठ्ठलरूप॥ ४॥ शून्य जाले भावाभाव। अवघा आंतुडला केशव॥ ५॥ नारा म्हणे नामयाचा। मज विश्वास नामाचा॥ ६॥

महादाचा अभंग

१. यादवांचे कुळीं झोंड जें जन्मलें। नाहीं ऐसें केलें मागें पुढें॥ १॥ देईंगा विठोबा आमुचे ठेवणें। लोकांचें तूं ऋण नेदों पाहसी॥ २॥ आमुचे साधु आहेत सज्जन। तुमचा जमान कोठें देवा॥ ३॥ नामयाचा महादा बळकट झाला। विठोबा आणिला चौबारांत॥ ४॥

गोंदाचे अभंग.

श्रीनामदेवाचें चरित्र.

१. नैवेद्याचा नेम असे दामाजीसी। नित्य विठ्ठलासी न्यावें बोणें॥ १॥ बोणें दाखवावें मग अन्न घ्यावें। ऐसा तो सद्भाव त्याचे मनीं॥ २॥ ऐसें करितां दिन कांहीं क्रमिले। दामाजी चालिले ग्रामांतरा॥ ३॥ दामशेटी काय म्हणे गोणाईसी। नित्य विठोबासी न्यावें बोणें॥ ४॥ गोणाई बोलिली सांगा नामदेवा। करील तो सेवा विठ्ठलाची॥ ५॥ दामाजीनें पुत्र बोलाविला नामा। करीं मेघश्यामा सेवा नित्य॥ ६॥ नित्यानित्य न्यावें विठोबासी बोणें। मग अन्न घेणें आज्ञा केली॥ ७॥ अवश्य म्हणोनि लागला चरणासी। धरिलें पोंटासी नामदेवा॥ ८॥ नामदेवा हाती समर्पिलें बोणें। गेला तो तेथुनी गोंदा म्हणे॥ ९॥

२. नामदेवा कैसा हा रे नफा केला। नेवेद्य तो नेला विठ्ठलासी॥ १॥ नैवेद्य नेऊनि ठेवियेला पुढें। प्रेमें बोले गोड नामदेव॥ २॥ नामदेव म्हणे जेवावें विठ्ठला। माथा ठेवियेला चरणांवरी॥ ३॥ नामदेव माथा ठेवी चरणांवरी। न जेवीच परी पांडुरंग॥ ४॥ न जेवी म्हणोनी नामा शोक करी। मुख पाहे हरि प्रीति करोनी॥ ५॥ प्रेमें नामा काय म्हणे विठ्ठलासी। कां रे न जेविसी मायबापा॥ ६॥ माझे पितयांचे हातें तूं जेविसी। मज दुजें पाहसी पांडुरंगा॥ ७॥ घरासी मी आतां बोणें नेऊं काई। मारील गोणाई मज आतां॥ ८॥ काय करूं आतां देवा हो श्रीहरि। नामा विनंति करी गोंदा म्हणे॥ ९॥

३. विनवितो देवा बहुत प्रकारी। जेवावें श्रीहरि मायबापा॥ १॥ दोनी कर जोडोनी घाली लोटांगण। द्यावें जीवदान देवराया॥ २॥ अझुनी नये तुज बा करुणा। काय नारायणा करूं आतां॥ ३॥ मारील गोणाई घेईल माझा जीव। काय तरी कींव नये माझी॥ ४॥ काय करूं आतां

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विठ्ठल रुक्माई। मारील गोणाई मजलागीं॥ ५॥ असे तुज कांही कीव माझी पाहीं। वाहीन आतां पाही शिरकमळ॥ ६॥ वाहीन शिरकमळ म्हणे नामदेव। धरिला सद्भाव ऐसा मनीं॥ ७॥ देहत्याग त्यानें मांडिला शरिरी। फांसा करुनी दोरी लावियेली॥ ८॥ गळां घालूनि फांस बांधिला काष्ठासी। त्यागितां प्राणासी धरिलें देवें॥ ९॥ उठविला नामा पाडुरंगें करी। आलिंगी श्रीहरि गोंदा म्हणे॥ १०॥

४. आलिंगिला नामा हृदयी विठ्ठलें। ताट विस्तारिलें रुक्माईनें॥ १॥ विठ्ठल रुक्माई तिसरा नामदेव। जेंवियेलें भावें तिघेंजण॥ २॥ जेवूनियां त्यांनी विडा तो घेतला। नामा सुखी केला पांडुरंगें॥ ३॥ देव त्यास म्हणें जाहलों समाधान। घाली लोटांगण नामदेव॥ ४॥ मनोरथ माझा पुरविला देवा। नित्य ऐसी सेवा घडवावी॥ ५॥ ऐसी मज भाक देई नारायणा। करावी वासना तृप्त माझी॥ ६॥ विठ्ठलानें भाक दिली नामयासी। नित्य सेवा ऐसी दिधली तुज॥ ७॥ ऐसें भाष्यवचन करोनी देवासी। लागला चरणांसी नामदेव॥ ८॥ आज्ञा घेऊनियां नामा तो चालिला। मंदिरासी आला गोंदा म्हणे॥ ९॥

५. नामा आला घरा पुसत गोणाई। उशीर कां पाही लावियेला॥ १॥ ताट जों पाहिलें रिकामें देखिलें। बोणें काय केलें पुसतसे॥ २॥ नामा म्हणे बोणें देव जेवियेला। म्हणोनि लागला उशीर मज॥ ३॥ बोणें कोठें देव जेवितां देखिला। त्वां दिलें पोरांला नामदेवा॥ ४॥ ऐसें नित्य बोणें देशी तूं पोरांसी। सोंग घेऊन येसी मजपाशी॥ ५॥ काढुनी चराट नामा टांगियेला। बहुत ताडिला गोणाईनें॥ ६॥ रागें रागें त्याला अधिक अधिक मारी। मिळोनी शेजारी सोडविला॥ ७॥ आण वाहे नामा म्हणे गोणाईसी। जेविले हृषीकेशी पांडुरंग॥ ८॥ नको मारूं आई दिलें नाही कोणा। लागत चरणा गोंदा म्हणे॥ ९॥

६. नामयाचा नेम पाहों आदरिला। मनामध्यें केला नेम तिनें॥ १॥ मनामध्यें म्हणे आणिक द्यावें बोणें। पहावी हे खूण कैसी आहे॥ २॥ एके दिवसे बोणें दिल्हें नाम्यापाशीं। न्यावें हें देवासी म्हणे माय॥ ३॥ नामा म्हणे आई जेवील हृषीकेशी। आणिक मारिसी मज काय॥ ४॥ न मारी म्हणोनि बोलिली गोणाई। माथा ठेवूनि पायी चालीयेला॥ ५॥ नैवेद्य घेऊनि गेला विठूपासीं। बैसले सुखेसी तिघेंजणें॥ ६॥ तिघेंजणें एके ठायीं ते जेविलीं। गोणाई आवचित आली तेथें॥ ७॥ कवाडा आडुनी पहात गोणाई। तिघे एके ठायीं जेवितातीं॥ ८॥ जेवितां देखिलें आली ते घरासी। साक्ष आली तिसी गोंदा म्हणे॥ ९॥

७. साक्ष आल्यावरी कष्टी जहाली मनीं। मारिलें पापिणी नामयासी॥ १॥ मारिलें म्हणोनि महा शोक करी। जेवूनियां घरीं आला नामा॥ २॥ नामा आला घरा पाहे मातेकडे। आनंदानें रडे गोणाबाई॥ ३॥ नामा विनवीत दोन्ही कर जोडोनि। लागला चरणीं गोणाईच्या॥ ४॥ नामा म्हणे माते कां शोक करिसी। सांग मजपाशीं काय जाहालें॥ ५॥ माता म्हणे आतां काय सांगूं नाम्या। साक्ष माझ्या मना आली आजी॥ ६॥ कवाडा आडून देखियेलें आम्हीं। जेवियेलां तुम्ही तिघेजण॥ ७॥ व्यर्थ मी मारिलें केला जाच तुज। ऐसा भक्तराज गांजियेलां॥ ८॥ आतां मज देव कोपेल विठ्ठले। ऐसी माता बोले गोंदा म्हणे॥ ९॥

८. नामयाची माता काय म्हणे देवा। मज तूं केशवा कोपूं नको॥ १॥ मज कोपूं नको देवा पांडुरंगा। गोणाई गोविंदा विनवीतसे॥ २॥ न कळतां देवा मारिला मी नामा। मज करीं क्षमा मायबापा॥ ३॥ सर्वस्वीं मी अपराधी पंढरीच्या राया। नाम्याविषयीं दया असों द्यावी॥ ४॥ घातलें तयासी तिनें लोटांगण। केलें समाधान विठ्ठलानें॥ ५॥ नामा आलिंगिला हृदयीं मातेने। जोडला सज्जन देव तुज॥ ६॥ तुज हा जोडला पंढरीचा राव। जाहला बरवा ठाव नामदेवा॥ ७॥ बहुत पूर्वपुण्य होतें तुझें गांठी। पडली हे मिठी विठ्ठलासी॥ ८॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

नामा विठ्ठलासी नाहीं द्वैतपण। धरीत चरण गोंदा म्हणे॥ ९॥

९. विठ्ठल रुक्माई भक्त नामदेव। नित्यानि सद्भावें जेवितसे॥ १॥ सेवा करितां बहु दिवस क्रमिले। नागवन आलें फार दिवसें॥ २॥ कांही नाहीं घरीं द्रव्य आणि धन। राजाई ते म्हणे गोंणाईसी॥ ३॥ काय खावें आतां असे कोणे परी। लाविलें दारोदारीं विठ्ठलानें॥ ४॥ उपवास सोसूं किती आतां दिवस। घालूं या पोरास काय आतां॥ ५॥ विठ्ठलानें कांहीं बरें नाही केलें। नाम्या वेडें केलें पांडुरंगें॥ ६॥ वेडें करूनि आम्हां जाच तूं करिसी। पोट मारविसी मायाबापा॥ ७॥ किती दुःख सोसूं आतां या शरीरीं। करीन निर्धारीं जीवघात॥ ८॥ चौपोरांसहित घालीन भीमे उडी। लागेन पैलथडी गोंदा म्हणे॥ ९॥

१०. दोघेजण बाळ नारा म्हादा तान्हें। बांधियेलें तिनें मागें पुढें॥ १॥ उडी ते घातली भींवरेचे डोही। आला लवलाहि पांडुरंग॥ २॥ येऊनी शिरला भींवरेचे डोही। ओढोनी राजाई ठेवी कांठीं॥ ३॥ पहि तों राजाई कांठी उभी आहे। क्रोधें बोलताहे विठ्ठलासी॥ ४॥ क्रोधें म्हणे देवा करि जाचितोसि। लल्लाट महिशी आपटिलें॥ ५॥ क्रोधें ते आणिक टाकियली उडी। नेली पैलथडी विठ्ठलानें॥ ६॥ मग ते राजाई चालिली घरासी। देखिला वाटेसी मेला सर्प॥ ७॥ सर्प तो घेउनी वेगी आली घरासी। ठेवी शिजावयासी चुलीवरी॥ ८॥ सर्प हा शिजला खाऊं पांचजणें। केला विचार तिनें गोंदा म्हणे॥ ९॥

११. शिजला तो सर्प काढिलें झांकण। पाहे तो सुवर्ण तोंडावरी॥ १॥ सुवर्ण देखोनि सुखी जाहली मनी। बाई हरिखोनी सांगें नाम्या॥ २॥ सांगितलें वर्तमान नाम्यापाशीं। नामा म्हणे तिसी पाहूं सोनें॥ ३॥ सुवर्ण आणूनि ठेवियेलें पुढें। काय केलें वेंडे नामा म्हणे॥ ४॥ कशासाठीं माझ्या स्वामिसी पीडिलें। कांगे कष्टी केलें देवराया॥ ५॥ मेळविले द्विज तया नामयानें। वांटियलें सोनें ब्राह्मणांसी॥ ६॥ तेव्हां राजाईनें आकांत मांडिला। नामा वेडा केला पांडुरंगें॥ ७॥ सुवर्णासारखी वस्तु ते वांटिली। भूली ते घातली नामयासी॥ ८॥ नामदेवा तिनें बहु जाच केला। कृपाळु पावला गोंदा म्हणे॥ ९॥

१२. जाच केला म्हणोनि चालिला श्रीहरि। भक्तांचा कैवारी पांडुरंग॥ १॥ पंढरीचा वाणी झाला केशवशेट। लावियेला मूठ ढवळा नंदी॥ २॥ वराईची गोणी घालून त्यावरी। आणून नाम्याघरी उतरलीं॥ ३॥ पुसता तो नामा गेला अंघोळीसी। सांगे राजाईसी केशवशेट॥ ४॥ धनाची हे गोणी वेंचा तुम्ही घरीं। सांगा बहुतापरी नामयासी॥ ५॥ नामदेव माझा मित्र आहे सखा। केशवशेटी सांगा दिल्ही गोणी॥ ६॥ वचन सांगोनी केशवशेट गेला। नामदेव आला मंदिरासी॥ ७॥ येउनी पुसत कवणाची गोणी। तुमचा मित्र वाणी कोशवशेट॥ ८॥ नामा पाहे तंव वराईची गोणी। दुःखी जाहला मनीं गोंदा म्हणे॥ ९॥

१३. वराईची गोणी कळली राजाईसी। नामा ब्राह्मणांसी बोलावीत॥ १॥ इतुक्यामध्यें होन मडकेंभर काढिले। गोणी ते शिविली होती तैसी॥ २॥ द्विज मेळवुनि आला नामदेव। वांटियेलें सर्व द्रव्य त्यानें॥ ३॥ नामा म्हणे द्रव्य ज्याचें त्या दिधलें। ऋण तें ठेविलें नाहीं कांही॥ ४॥ राजाई ते होन सांभाळाया गेली। हातां राख आली कोळशाची॥ ५॥ कोळसे देखोनि कोंचली ते मनीं। धन्य तुझी करणी पांडुरंगा॥ ६॥ नामदेवापुढें सांगे वर्तमान। चोरोनियां होन म्यां ठेविले होते॥ ७॥ पाहतां त्या होनाचे जाहले कोळसे। नामा पाहतसे जाहलें सोनें॥ ८॥ वांटिले ब्राह्मणां तेही होन त्यानें। फेंडियलें ऋण गोंदा म्हणे॥ ९॥

१४. राजाईचा संशय फेडिला मनींचा। कळला पूर्ण साचा पांडुरंग॥ १॥ भावें ते राजाई म्हणे नामदेवा। सज्जन हा ठावा पांडुरंग॥ २॥ विठ्ठलावांचूनी आणिक नाहीं थोर। धरिला निर्धार राजाईनें॥ ३॥ विकल्प साडूनी मन केलें शुद्ध। धरिला गोविंद मनामाजीं॥ ४॥ नामा तें राजाई जाहला एकभाव।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लावियेला जीव विठ्ठलपायीं॥ ४॥ नारा विठा गोंदा माहादा आउबाई। त्यांनी धरिला पायीं पांडुरंग॥ ६॥ नामयाची दासी नागी दुसरी जनी। त्यांनी सेवा करूनि केला देव॥ ७॥ एकभाव पहा लाविला विठ्ठला। त्यांनी जवळ केला पांडुरंग॥ ८॥ विठ्ठलावाचोनी दुजें नाहीं मनीं। गेले लोटांगणी देवराया॥ ९॥ ऐसा त्याचा भाव कळला देवासी। सकळ वैकुंठासी पाठविले॥ १०॥ अंतकाळीं नामा धरिला हृदयीं। ठेवियेला पायीं गोंदा म्हणे॥ ११॥

१५. ऐसा नामा भक्त पूर्ण केली सेवा। उद्धरिलें जीवां संगतीच्या॥ १॥ आवडला नामा देवा विठ्ठलासी। ठेवी चरणापासीं अखंडित॥ २॥ नामयाची कुडी घातली पायरी। येतां जातां हरी पाय देती॥ ३॥ आणिकहि पाय देती साधुसंत। ऐसा पूर्ण भक्त उद्धरिला॥ ४॥ सोडी विठ्ठल नामयासी घडी। बहु त्याची गोडी विठ्ठलासी॥ ५॥ गोडी हे म्हणोनि ठेविलें चरणीं। आहे तो भजनी नामदेवा॥ ६॥ ऐसा पांडुरंग भक्तांची माउली। करितो साउली मायबाप॥ ७॥ नरदेहा आलिया भजावा हा देव। मनी दुजाभाव धरूं नये॥ ८॥ भजावें भजन नामयाचे परी। होय साहाकारी गोंदा म्हणे॥ ९॥

१६. भावें भक्तिवादें करावें कीर्तन। आशाबद्ध मन करूं नये॥ १॥ निष्कामें करावें देवांचें कीर्तन। भय हें सांडून शरीराचें॥ २॥ रणामध्यें कैसा भिडतो रणशूर। होवोनी उदार जीवावरी॥ ३॥ तैसा पांडुरंगीं धरा हो निर्धार। उतरा हा पार भवसिंधु॥ ४॥ सिंधु उतरोनी लावा जगढाल। पाहा तें नवल विठ्ठलाचें॥ ५॥ देव जोडियेला तया काय उणें। गोंदा म्हणे मन धीट करा॥ ६॥

१७. साठी नव लक्ष चोऱ्याण्णव कोटी। पापाची हे जोडी देई देवा॥ १॥ जमान देउनी नाहींसें तूं करीं। वायां येरझारीं शिणवितोसी॥ २॥ आमुचे जमान देवा तुमचे पाये। तुझा कोठें आहे जमान सांगें॥ ३॥ नामयाचा गोंदा बळकट धरितां झाला। विठोबा आणिला चौबारांत॥ ४॥

भाट.

१८. गजानन गौरीसूत। लाल अंगपर बभूत। तेरे मुख वचनामृत। उसे मजदूत भागत हैं॥ १॥ विद्या भरी दुंदुल पेट। उसपर सापकी लपेट। बिघन करत हैं चपेट। पकड फेट कालकी॥ २॥ नामा दर्जी जालम। विठू राजाका गुलाम। हुवा दुनियामें बदनाम। उने नाम डुबाया॥ ३॥ नामा प्यारा है भगत। उसे जानत है जगत। बम्मन आया धुंडत धुंडत। लगत लगत गांवमो॥ ४॥ बम्मन कहे नामदेव। मुजे पूजना भूदेव। इति बात मुजे देव। बहा देव गंगामो॥ ५॥ मानो बिनती महाराज। चला पतीतनके काज। नामा कहे बम्मनराज। न बाजे इत बातनसो॥ ६॥ नामा नहीं माने बात। बम्मन बैठा दिनरात। हुक्म दिया दिनानाथ। तब संग चल दिया॥ ७॥ चले मजल दरमजल। आया बेदरके मिसल। व्हां हुई सो नक्कल। वो सकल तुम सुनो॥ ८॥ कोस आदे कोसपर। नामदेव का लष्कर। बादशहा बैठा निकलकर। नजरकर देखते॥ ९॥ कहे कासीपंडत। लाल झेंडे बहुत। पायदल जावे तहत। क्या सरयत खबर लाव॥ १०॥ करी कुरान सो सलाम। भेजो फौज वो तमाम। कोन क्या करेगा काम। तुम बेफाम मत रहो॥ ११॥ आयी फौज किया कोट। जैसा खेतका सगोट। कहे कहांके तुम भट। थाट बाध जाहो॥ १२॥ नामा कहे सुनो भाई। येतो बम्मन गदाई। नामदेव कोन हे। बेदरशाही ज़ानते॥ १३॥ उसे कहे नामदेव। राहा छोडो जाने देव। कहे हुकुम आने देव। फेर देव जाने कू॥ १४॥ अर्जी लीखी फौजदार। ले पोंचे जिलिबदार। जाके देव दरबार। चौपदार के कहिने॥ १५॥ कासीपंडतके पास। आन पोहोंची इतलास। नजर गुजराई रूयास। करे ख्यास पूछके॥ १६॥ पंडत करे जिकीर। सुनो हिंदू फकीर। हम लोकनके पीर। पंढरपूरमें रहते हैं॥ १७॥ बादशहा करे गलत। होते पीर आजमत। बुला लाव इसवख्त्। करामत देखणें॥ १८॥ पंडत करे तसलीमात। हजरत भली नहीं बात। नामदेव कहे मात। किसननाथ

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

कन्हैया ॥ १९ ॥ उसका नाम मत लेव। उसकी रहा मत् जाव। मेरा कहना खातर लाव। नहीं तो नांव डुबेगी ॥ २० ॥ उसे करो गे बदफैल। बुरी होयेगी नक्कल। अब जावेगी अक्कल। सकल राज डुबेगा ॥ २१ ॥ हत्ती घोडे दौलत। दख्खन मुलूख बाछायत। बेदर सरीखा वख्त। इस वक्त जायेगा ॥ २२ ॥ बादशहा करे गल्लत। सरक चल मादर बख्त। पंडत कहे आयी मोल। गई कुवत अक्कलकी ॥ २३ ॥ कुटल सामने सेटल। जा दूर हो निकल। भेजी दसवीस मोंगल। बम्मन सकल पकड लाव ॥ २४ ॥ नामा लाया दरबार। सात बम्मन दोसो चार। सारे दरबारमों पुकार। मारा-मार बम्मनकू ॥ २५ ॥ अर्जी पोंचावे हुजूर। नामदेव लाया नजर। इसके बाबे क्या मजकूर। करी अर्जी अर्ज वेगें ॥ २६ ॥ बादशहा कहे जलदी जाव। गाई कसाईकू बुलाव। नामदेवकू बिठलाव। नियत पोंचावे गांवकू ॥ २७ ॥ उसके आगे काटी गाय। बम्मन करे हाय हाय। नामा कहे प्रभुराय। ए बलाय तुम सुनो ॥ २८ ॥ बादशहा कहे लाव जान। नही तो करूं मुसलमान। झुटा करता है तुफान। फिर फिकिर कहेलावते ॥ २९ ॥ किदर रह्या पंढरपूर। मेरा वसीला है दूर। कौन कहेगा हुजूर। ये जरूर हकीकत ॥ ३० ॥ ये तो पापी चंडाल। इन्नें बुरे किया हाल। मेरे अब्बुका काल। तुम गोपाललाल जलदी आव ॥ ३१ ॥ नामा रोवे झुरझूर। बहे अश्रुनका पूर। बिठू पसिनेंमें चूर। पंढरपूरमें हुवे हैं ॥ ३२ ॥ रुक्मिण चुरती पद्मपाव। घबर गये बिठूराव। रुक्मिण कहे प्रभुराव। क्या बलाय मुझे कहो ॥ ३३ ॥ देव करे आटोप्रांत। करे घबरे घबरे बात। नामदेवकी कहत। हकीकत बुरी है ॥ ३४ ॥ रुक्मिणी कहे जलदी जाव। नामदवेकू मनाव। उस पापीकू जलाव। जाव जाव सितावी ॥ ३५ ॥ नामा लडका अजान। बहुत हुवा हयरान। अबी छोडेगा जान। मुसलमान बेकदर ॥ ३६ ॥ अकस्मात् हुयी बात। उठकर बैठे दिनानाथ। चल दिया उसी वख्त। मै दीनानाथ आयाहूं ॥ ३७ ॥ बिठू कहे नामदेव। उस गायकू हात लगाव। जान उसकी खुलाव। जलदी जाव गाय उठेगी ॥ ३८ ॥ उठकर खड़ी रहे गाय। हरहर बोले वम्मनराय। नामदवेकु लगाय। बिठूराय गलेसे ॥ ३९ ॥ नामा रोवे आलफ। उसे समझावे माबाप। उसके हवेलीमें साप। हाका हाक पडी है ॥ ४० ॥ हत्ती घोडेकू काट। लिया आदमीकी पाठ। जिधर उधर न हाटा नाट। खट उपर खटारे ॥ ४१ ॥ बेदरशहा हुवा दंग। काशी पंडत करे जंग। अब कैसा हुवा रंग। बुरे रंग क्या हुवे ॥ ४२ ॥ बादशहा कहे जलदी जाव। काशी पंडतकु बुलाव। मेरे जानकू बचाव। सच्चा देव उनोका ॥ ४३ ॥ काशी पंडत प्यारे लाल। मेरे जानकू संबाल। फीर फकीर हकूलाल। बालोबाल गुन्हेगार हूँ ॥ ४४ ॥ कासीपंडत धरो पाव। बहोत तन्हेसे मनाव। नामदेव भगतराव। ये बला दूर करो ॥ ४५ ॥ पंडत तुम बडा सुजान। तुम जानो उसका ग्यान। हमने किया है तुफान। अब जान बचाव ॥ ४६ ॥ काशीपंडत बहु भला। कदमकदम जा मिला। नामदेव आन मिला। लगाया गला गलोसो ॥ ४७ ॥ बादशहाके आडे। जिधर उधर खडे। उने हातपांव जोडे। पकडे पांव तुमारे ॥ ४८ ॥ मानो बिनती महाराज। चलो पतीतनके काज। नामा कहे पंडतराज। मत् बाजो इस बातसो ॥ ४९ ॥ नामदेव बडे दयाल। हांसे किया जबाब सवाल। पंडत जा रहो खुशाल। फिर व्हांसे चल दिया ॥ ५० ॥ मेहेरबान नामदेव। विठूराय जान देव। उसका राज्य उसकू देव। बुला लेव सबकू ॥ ५१ ॥ इतनी बात बोलकर। चला उनका लष्कर। पंडत आये फिर कर। साप नजर न आवे ॥ ५२ ॥ उसकू करकर सनाथ। नामदेव दीनानाथ। ओ गाई लियी साथ। उस वख्त चल दिये ॥ ५३ ॥ बादशहा करे जीकीर। सच्चा हिंदु फकीर। ब्रह्म ज्ञानीमें तीर। रणधीर आये हैं ॥ ५४ ॥ गोंदा लडका अजान। करे रात दिन ध्यान। सरज होय मेहेरबान। दिया ग्यान बालककू ॥ ५५ ॥

१९. सेज सिद्ध झाली निजा श्रीधरा। आज्ञा द्यावी लोकां जाती आपुल्या घरा ॥ १ ॥ रात्र बहुत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

जाहालीं देवा चला मंदिरा। राहि रखुमाबाई वाट पाहाती सुंदरा॥ २॥ तुम्हां समोरास देवा झाली पंढरी। विनटला चरणी गोंदा उभा राहिला द्वारीं॥ ३॥

विठाचे अभंग

निजठेवाप्रासीविषयीं विठ्याचें धरणें

१. साधुसंतजना करितों प्रार्थना। भेटवा देवराणा द्वारकेचा॥ १॥ तनमन प्राण वेधले त्यांचे पायीं। येऊनियां राही हृदयकमळीं॥ २॥ गोपाळाचे मेळी खेळे वनमाळी। यमुने पाबळी वेणु वाहे॥ ३॥ शंख चक्र करी मोरपिच्छ शिरीं। कानी मकारकारी मुक्ताफळें॥ ४॥ गळां वनमाळा कांसे सोनसळा। देखुनि व्रजबाळा तन्मय झाल्या॥ ५॥ नंदाचे नंदनें मोहियेलें मन। लागलेंसें ध्यान गोविंदाचें॥ ६॥ विठा नामयाचा चरणींचा रज। भेटवा यादवराज द्वारकेचा॥ ७॥

२. मग साधुसंत म्हणती विठ्या जाय। मग तूं याचे पाय सोडूं नको॥ १॥ अठ्ठाविस युगें एकाचें धरणें। तेथें हें मागणें दुसरें कोठें॥ २॥ एकाची मागणी मागें पैं होईल। मग तुजसी येईल बोलतां दुःख॥ ३॥ म्हणोनी पंढरिनाथु खूणची दावीतु। नामयाचा विठा पुसतू वेव्हारी धीटु॥ ४॥

३. विठा नामयाचा आला पंढरपुरा। भेटला सोयरा विटेवरी॥ १॥ सुखदुःख अवघें सांगितलें श्रीहरि। धरणें तुझे द्वारीं घेईन देवा॥ २॥ नामयासारिखा आणिक कोणी आहे। सृष्टिमाजीं पाहे विचारूनी॥ ३॥ नामा माझा सखा जिवाचा तो जीव। त्याचा आहे भाव माझे ठायीं॥ ४॥ मजवाचूनि नामा दुजें नेणें कांहीं। मी त्याचे हृदयी सदा असे॥ ५॥ नामयानें नाम जोडिलें निधान। ठेविलें सर्व धन तुझ्या पायीं॥ ६॥ समर्थासी कांही बोलूं नये आतां। ठेवणें कृपानाथा देई वेगीं॥ ७॥ चहूं युगी नामा सांगतेंचि आहे। वेगळा कांही नोहे क्षणभरी॥ ८॥ माझिया बापाची तुजजवळ ठेवी। विठा म्हणे द्यावी केशीराजा॥ ९॥

४. पूर्वजन्मीं आराधितां। तुझें वर्म आलें आमुच्या हातां। नामदेवें सांगितलें जातां। तें सर्वथा देईजे॥ १॥ आमुचे वडिलीं गा जोडिलें। तें तुझे पायीं गा ठेविलें। गौप्य करितां नोव्हे गा भलें। दे उगलें गा दातारा॥ २॥ आमुचें आम्हांसी गा देतां। कां बा नये तुझिया चित्ता। गाऱ्हाणें देईन संता। चौघां देखतां घेईन॥ ३॥ तुझा दारवंटा राखेन हरी। तुज रीघों नेदी बाहेरी। मोकलिसी अधांतरीं। तरी हे लाज कवणातें॥ ४॥ आणिक कांही न मांगें तूंतें। सेवावृत्ति द्यावी मातें। मज निरवावें संतातें। आपुला दास म्हणेन॥ ५॥ नामयाचा विठा म्हणे। यांत कांही करिसी उणें। तरी आमुच्या वडिलांचें निरुपणें। बांधलासी गा विठ्ठला॥ ६॥

५. आमुचा नामा तुज गेला निरवुनी। मीं तुजवाचोनी नेणें कवणा॥ १॥ कायावाचामनें जोडिलें जें बायें। तें दिधलें तुज पैं ठेवावया॥ २॥ तें देगा आमुचें नको करूं विचारू। नामा तुझा डिंगरू त्याचे आम्ही॥ ३॥ जुनें नाणें आमुच्या वडिलांचें ठेवणें। बहुता कष्टीं तेणें जोडियेलें॥ ४॥ तें आम्हांलागोनी ठेविलें तुझ्या पायीं। आमुचें आम्हां देई केशीराजा॥ ५॥ तूं अनाथ कोंवसा दीनाचा कृपाळ। तरी आमुचा सांभाळ करीं कां वेगें॥ ६॥ आमुचें संचितार्थ आम्हांसी देऊनी। यश घे त्रिभुवनीं म्हणे विठा॥ ७॥

६. आमुचें ठेवणें जुगादीचें नाणें। जातां नामयानें सांगितलें॥ १॥ इतके दिवस पाहिली तुझी वाट। परि तूं उदास न बोलसी॥ २॥ तुजवांचोनी आम्हां कोण असे पोशितां। देई कृपावंता नामप्रेम॥ ३॥ आम्ही तुझी सेवकें रंकाहुनी रंक। कठीण बोलणें निकें वदें तुज॥ ४॥ म्हणोनि वेळोवेळां लागें तुझ्या पायीं। लटकीच गोवाई करूं नको॥ ५॥ तुज आम्हांसी वेगळीक नाहीं। तरी तुं न धरी कांहीं दुजाभाव॥ ६॥ आपुलें म्हणावें अंधारी ओळखावें। नामप्रेम द्यावें म्हणे विठा॥ ७॥

७. हरिनामाचा ध्वनि ऐकोनी श्रवणी। जाईन लोटांगणीं तेथवरी॥ १॥ माझे सखे अवघे वैष्णवजन। त्यांचे मज दर्शन कैं होईल॥ २॥ एक उभे गाती

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

एक बैसुनी ऐकती। हृदयीं आलिंगिती गोपिनाथु॥ ३॥ ऐशियांचे संगतीं आहे बाप माझा। विनवितो विठा सहज नामयाचा॥ ४॥

८. आमुचा बाप अग्रज तुझा। तूं बा आम्हां होसी आजा॥ १॥ कैसें आम्हां धरिलें दुरी। सांग कृपाळुवा हरी॥ २॥ तूं आमुचा मुळपुरुष। आम्ही अवघे तुझे अंश॥ ३॥ आम्ही तुझी तिसरी पिढी। संत जाणताती प्रीढी॥ ४॥ अरे कायशी शतें लोटली। कैशी लाघावळी तुटली॥ ५॥ हांसोनि बोले केशीराज। विठ्या अवघें घेई मज॥ ६॥

९. माझिया बापाचा तुजपाशी ठेवा। विठो म्हणे द्यावा केशीराजा॥ १॥ ठेविलें ठेवणें झडकरी देई। वेव्हार कांही लावूं नको॥ २॥ आपुलें मागतां कोण येईल। आतां जाणवेल तुझें माझें॥ ३॥ विटेसहित चरणीं घालीन मिठी। करीन संवसाटी जन्मोजन्मी॥ ४॥ विठा म्हणे मज खवळिसी वांयां। पिसाळलिया पायां झोंबेन तरी॥ ५॥

१०. मायबापें काय नसती आमुची। लेंकरें आमची त्याचे हाती॥ १॥ माझें देई माझ्या हातीं लवलाही। होई उतराई केशिराजा॥ २॥ तुझ्या पायी माझा बांधीन गळा। न भियें कळिकाळा सत्य जाणा॥ ३॥ जितुकें देणें तितुकें मी घेईन आतां। नामयानें जातां सांगतिलें॥ ४॥ रगळ्या पाठोळ्यासी पडियेली मिठी। आतां जगजेठी तुज मज॥ ५॥ बोरी काटे कांहो केळी आहो फाटे। नामयाचे विठे खवळलें॥ ६॥

११. खवळलें आतां न भियेरे तुज। सांडियेली लाज लौकिकाची॥ १॥ आम्ही दीन शिंपि यातीचे हो हीन। दे माझें ठेवणें केशीराजा॥ २॥ साठी लक्ष चौऱ्याण्णव कोटी। त्यांतून एक कवडी न सोडी मी॥ ३॥ आणिक याहुनी असेल आगळें। तें घेईन बळें न सोडीं तुज॥ ४॥ तुज थोरपण काईगा हें देवा। आम्हां दुर्बळाचा ठेवा अभिलाषसी॥ ५॥ पोरटीं म्हणोनी अभिलाष करिसी। तें कोठें निस्तारिसी म्हणे विठा॥ ६॥

१२. तुज काय देवा न पुरतें आलें। विश्वासें ठेविलें अभिलाषसी॥ १॥ लाजिरवाणें नको करूं देवा आतां। देईगा कृपावंता नामप्रेम॥ २॥ शरणागता शरणागता वज्रपंजर म्हणवीसी। तरी कां तूं न देसी आम्हां आमुचें॥ ३॥ माझ्या नामयानें जन्मोनि जोडिलें। तें दे गा वहिलें म्हणे विठा॥ ४॥

१३. उदार चक्रवर्ती लक्ष्मीचा पती। तरी कां काकुळती चित्ती वाहासी॥ १॥ आम्हां दुर्बळाचें ठेवणें कां ठेविलें। दिवाळें निघालें काय तुझें॥ २॥ ज्याचें घेसी त्याचें ऐसेंचि करिसी। तें न चले मजपाशीं केशीराजा॥ ३॥ चौघाचारीं तुज वेढीन आतां। मग बैसेल माथां अपकीर्ति॥ ४॥ अठराही बोलती साही सत्य वाचा। उदार ठायीचा कां न होसी॥ ५॥ देणें घेणें तुज न सुटे सर्वथा। विचारूनि आतां पाहें मनीं॥ ६॥ नामयाचें ठेवणें तुजजवळीं आहे। न सोडीं तुझे पाय म्हणे विठा॥ ७॥

१४. माझिया बापाची मिराशी गा देवा। तुझी चरणसेवा पांडुरंगा॥ १॥ उपास पारणें राखें दारवंटा। केला भोगवटा आम्हांलागी॥ २॥ तुजपरतें दुजें नेणें आणिक कांहीं। देखें सर्वांठायीं रूप तुझें॥ ३॥ तुझ्या सुखें धाला तुजमाजीं निवाला। आपुल्या विसरला देहभाव॥ ४॥ आम्हांसी घातलें तुझीये आभारीं। विठा म्हणे अंगिकारीं नारायणा॥ ५॥

१५. हाट करी आम्ही आठवडे मुळीचे। पंढरपुरीचे वारकरी॥ १॥ खेप ठिकाणाची वस्तु सवंगाची। सवाई निढळाची उणी नव्हे॥ २॥ चोहाटा चौकाचा दुकान नाक्याचा। जागा मिराशीचा पुरातन॥ ३॥ हरिनाम घेणें नित्य हमेशाई। तेव्हां तोटा नाहीं कोणें काळीं॥ ४॥ विठा म्हणे वजन केली वैकुंठीची। गुणीं निर्गुणींची कडासन॥ ५॥

१६. माझिया बापासी तुझाचि विश्वास। म्हणवी तुझा दास अंतरंग॥ १॥ वृत्ति सहित मन ठेवुनी तुझ्या पायीं। तुजपरतें कांही जाणेचिना॥ २॥ तों आम्हांलागीं शब्दें न पुससी। विसरोनी गेलासी दीनानाथा॥ ३॥ जागे ठाणांतरीं पंढरी चोहोटा। राखे दारवंटा रात्रंदिवस॥ ४॥ छत्र चवर धरूं हाडपी डोळे करूं। जाणवी आवसरू सेवा

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

विधी ॥ ५ ॥ शरीर प्राणाचा देऊनियां बळी। धरिले हृदयकमळीं चरण तुझे ॥ ६ ॥ विठा म्हणे तुज नाहीं आठवण। सहज तूं निर्गुण पंढरिराया ॥ ७ ॥

१७. भूतळींचीं तीर्थें नामा जंव करी। गांजीयेलें पोरी नामयाच्या ॥ १ ॥ तुमचें ठेवणें खेचराचे पायीं। आणिकाचे वाहीं पडों नका ॥ २ ॥ वायां मृगजळ दाविसील आम्हां। सर्वथा पुरुषोत्तमा न सोडीं मी ॥ ३ ॥ झोंडाचें ठेवणें ठेवावें कवणें। झोंडापरिस होणें झोंड जेणें ॥ ४ ॥ नामयाचा विठा झोंड पैं झाला। विठो उभा केला भक्तिसुखें ॥ ५ ॥

१८. माझ्या ठेवी दाखवीं लवलाही। बांधीन मी पायीं जीव तुझ्या ॥ १ ॥ सिद्धच ठेवणें नामयानें ठेविलें। त्यासी कां लाविलें आडवें हैं ॥ २ ॥ दोहीं कटांवरी ठेऊनियां हात। कैसा हा पहात घर घेणें ॥ ३ ॥ तुझिया पायासीं बांधीन मी गळा। न भीयें कळिकाळा सत्य जाण ॥ ४ ॥ दारकोंड करोनि बैसेन दारवंटा। नामयाचा विठा हालों नेदी ॥ ५ ॥

१९. पंढरीराया माझिया बापें। प्रसन्न केलें तुजप्रतापें ॥ १ ॥ आम्हां दिलें तुझे हातीं। पाळीं म्हणे प्रेमभक्ती ॥ २ ॥ तृप्तिसहित माझिया मना। क्षेम घालीन तुझिया चरणा ॥ ३ ॥ तुझें गुणनाम कीर्तन। हें मज देईंगा जीवदान ॥ ४ ॥ देऊनियां प्रेमाचें भातुकें। खेळविसी त्या कौतुकें ॥ ५ ॥ विठा म्हणे नामयाचा। प्रसाद तुझीये कृपेचा ॥ ६ ॥

२०. तुझ्या प्रेमाचें कारणें। म्हणे म्यां घेतलें धरणें ॥ १ ॥ विठा देगा झडकरी। मी तर न सोडी निर्धारी ॥ २ ॥ शीर फोडीन कर्वतीं। नये तुज काकुळती ॥ ३ ॥ देह घालीन गोरांजनीं। मोकलिसी मजलागोनी ॥ ४ ॥ तुझे द्वारीं देईन प्राण। तरी तूं पाहासी निर्वाण ॥ ५ ॥ विठा म्हणे पंढरिनाथा। शिणवूं आम्हां नको वांयां ॥ ६ ॥

२१. तुजसारिखा पंढरिनाथा। स्वामि शिरावरी असतां ॥ १ ॥ तरी मी आणिकांचा मागता। लाज कोणासी समर्था ॥ २ ॥ असोनी क्षीरसिंधु जवळी। क्षुधाक्रांत तळमळी ॥ ३ ॥ कामधेनूतें वोळंगतां। न पुरे कामना सर्वथा ॥ ४ ॥ विठा म्हणे नारायणा। आतां शरण जाऊं कोणा ॥ ५ ॥

२२. जननी बाळका कोपे रागें। परि ते आहार तिसची मागे ॥ १ ॥ तैसा तुज मी शरण। पंढरिराया निरुता जाण ॥ २ ॥ खेटी म्हणोनि परतें लोटी। परी ते चरणीं घाली मिठी ॥ ३ ॥ टाकोनी जाय कडीये नेघे। परि तें धांवे तियेचि मागें ॥ ४ ॥ विठा म्हणे पंढरिनाथा। आम्हां नुपेक्षीं सर्वथा ॥ ५ ॥

२३. हिंडतां श्रमलों बहु श्रम झाला। अजूनि माझी तुला करुणा नये ॥ १ ॥ मज काय देतां होईल तुझें उणें। किती होसी कृपण पांडुरंगा ॥ २ ॥ घेउनी धरणें बैसलों महाद्वारीं। झालों पैं भिकारी पंढरीचा ॥ ३ ॥ विठा म्हणे देवा माझें मज देया। लौकिक कां वांयां करितोसी ॥ ४ ॥

२४. जननी बाळकांचें जीवन। जरी तें नेणें भूकतहान ॥ १ ॥ तरी तें कशानें वांचती। विचारावें कमळापती ॥ २ ॥ वत्सालागीं तान्हीं। लागूं नेदी आपुल्या स्तनीं ॥ ३ ॥ कूर्मी आपुलिया बाळा। नावलोकीं वेळोवेळां ॥ ४ ॥ विठा म्हणे जगज्जीवना। आतां नुपेक्षावें दीना ॥ ५ ॥

२५. आमुचा बाप आम्हां सांगे। भाक दिधली पांडुरंगें ॥ १ ॥ तुम्हां न विसंवे सर्वथा। तुमचा भार माझ्या माथां ॥ २ ॥ करीन तळहात साउली। तुमची अवघी वंशावळी ॥ ३ ॥ विठा म्हणे विसरलासी। आम्हां शब्दीं न पुससी ॥ ४ ॥

२६. पितृभजन जरी पुंडलिक न करितां। तरी कां हा झोंड येतां पंढरीसी ॥ १ ॥ वेव्हार करितां आम्हांसी जिंकिलें। जन्ममरण केलें देशधडी ॥ २ ॥ विठा म्हणे यानें बुडविले अपार। पुढती हा चोर कबुल नाहीं ॥ २ ॥

२७. माझे बापाचेनि धनें बडिवार बोलसी। ते तूं घेवोनि आलासी उजागरपणें ॥ १ ॥ उगलाचि देई लावूं नको दावा। केशवासी ठावा आहे तुझा जीवभाव ॥ २ ॥ सरता पुरता आमुचेनि झालासी। तें तू आणिका सांगसी कोण्या तोंडें ॥ ३ ॥ सांगतां बहुत होईल पैं व्याजें। मग सोई मज तुज लाविती कां ॥ ४ ॥ ते म्हणती ऋणबोडा हा ठायींचा। अहो

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

यासी बोला वाचा बुद्धिवंती॥ ५॥ तूं नामयाच्या विठ्या धीर आणि चतुर। तुजसी खेचर काय बोलिला॥ ६॥

२८. उदमाचा करून झाडा। कर्म कदंबा अवघा फाडा॥ १॥ मग येणें जाणें नाही। पुढें वेव्हार न लगे कांहीं॥ २॥ व्याज मुद्दल देऊन उजू। तिहीं लोकीं व्हावें रुजू॥ ३॥ केशव म्हणे लिगाड तोडा। सुखसागर विठ्ठल जोडा॥ ४॥

२९. निज आत्मज्ञान डोहीं। जे बुडोन गेले पाहीं॥ १॥ तनुत्याग होतां त्यांची। मग सगुणा भेटी कैंची॥ २॥ अहंभाव वांटून प्याले। तें जिवंतचि मुक्त झाले॥ ३॥ केशव म्हणे डोळां। ते पहावें वेळोवेळां॥ ४॥

३०. तुझे पाय माझिया गळयासी। करीन एक मग उगलाची देसी॥ १॥ आपुलें मागतां झणें धिक्कारिसी। चोरासी सांगसी निजगुज॥ २॥ सांपडलीया लाथ बुक्की साहावी। जीवीं धूर धरावी विठो ऐसी॥ ३॥ मग होणार तें हो या शरीरा सांपडलीया धरा जीवें भावें॥ ४॥ धुरेसी झगडा कराया सैरा। या रांडपोरां खवळसी काय॥ ५॥ केशव म्हणे विठा झूंजार तूं भला। खेचरू दाखविला ठेवा तुझ्या बापाचा॥ ६॥

३१. खेचरापासी जाय पुससी मागसी तें आहे। येरा आणिका काय उमगेना॥ १॥ जाय जाय वेगी लवलाहे पाहें। खेचरांचे पाय सोडूं नको॥ २॥ तो सांगेल तें उचलेंच घेई। आणिकाचें वाहीं पडूं नको॥ ३॥ केशव म्हणे नामयाच्या विठ्या भक्तराया। आलिंगुनी चहूं बाह्या दिधलें क्षेम॥ ४॥

३२. तंव धांवुनी गेला चरणीं लागला। देव तूं दाखविला ठेवा माझ्या मायबापाचा॥ १॥ जाऊन तो धरीन न सोडी मी आतां। जे मज पंढरिनाथा ग्वाही दिघली॥ २॥ तंव खेचरु तेथें स्नानसंध्या करी। तंव ओढोनी पाय धरी विठा नामयाचा॥ ३॥ तंव तो अवचिता खडबडोनी भ्याला। कोठोनी घाला पडिला धार्डी मजवरी॥ ४॥ उठी परतां तूं कोणाचारे काय। ठाई ठाई राहें हालूं नको॥ ५॥ तुझिया वडिलासी जाब देईन। धरोनी नेईन हें पोर कोणाचें॥ ६॥ लाडिकें लडिवाळ आपुलें बा धांवें पायीं। तुज कोणी नाहीं मग तूं निलाजिरे॥ ७॥ छंद ना बंद झोंबतोंसी धीटा। बांधेन चोहटा चौघाचारी॥ ८॥ फजीत करतील तुज कीं मज जाण। खेंचर विसोबा म्हणती जा तुज विठोबाची आण॥ ९॥

३३. केशवाचे पाय जाणें मी आणिक कांही नेणें। म्हणोनी जीवेंप्राणें अनुसरलों॥ १॥ पाय ते अतू पाय ते अतू। पाय ते अतू खेंचराचे॥ २॥ पायांपरतें सुख आणिक नाहीं। विटेवरी पाय ध्येई मज॥ ३॥ म्हणोनी पुढतां पुढती विठा लागे पायीं। म्हणे खेचर आई विनंती ऐका॥ ४॥

३४. चराचरी जाणा एक खेचरू। त्याचीं पाउलें साचारू धरिली आम्हीं॥ १॥ आतां पाउलें न सोडूं। पाउलें न सोडूं वेव्हारू विठा॥ २॥ या पाउलांकारणें व्यवहारु झाला। खेचर वदला विठ्ठल साक्ष॥ ३॥ तेंचि पाऊलें साधुसंत आम्हां। विठा म्हणे परब्रह्मा पावन केलें॥ ४॥

३५. तंव खेंचरू ऐसी शिकवण बोली। कैसी खूण लाधली सांग विठ्या॥ १॥ जयाचा तुज जाहला बहुत। तो झाला शरणागत विठोबासी॥ २॥ वेद पुराणें शास्त्रें ते साक्ष देती। जें खेचर म्हणती ब्रह्म बीज॥ ३॥ भारत आणि भागवत जया मुखें पाठ। संध्या गायत्री निष्ठा त्रिकाळ जप॥ ४॥ जें केशवासी न कळे अखंड दंडे। ऐसी बोलणी उदंडें बोलोनी जाती॥ ५॥ जाती आणि गोत वडील लहान थोर। अवघें पंढरपूर साक्ष देती॥ ६॥ साधुसंतजन आणि महानुभाव। हरीचे दास सर्व सांगताती॥ ७॥ जें खेचर विसोबा ज्ञानधन लाधला। ठेवा तो दिधला नामयासी॥ ८॥

३६. सुखाचा निज ठेवा तुमचा केशवा। भाग्यें नामदेवा जोडलासी॥ १॥ तेणें तुझी सेवा केली मनोभावें। म्हणोनियां देवें घेतली धांव॥ १॥ उदंड हें निधन निक्षेपें ठेविलें। थोडें बहुत दिधलें

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

भागयवंता॥ ३॥ अभिलाषी वस्तु तुझे पायी ठेविली। ते आम्हां उगवली म्हणे विठा॥ ४॥

३७. माझा बाप माय विठोबा रखुमाई। वडील बंधु भाई पुंडलिक॥ १॥ साधुसंत जन सोईरे हे जाण। वंदीन चरण भावें त्यांचे॥ २॥ निजाचे सोईरे कां गा नोळखसी। भ्रमें भुललासी मायाजाळीं॥ ३॥ पाळिलों पोसिलों जन्मोनी जयाचा। उतराई त्याचा काई होऊं॥ ४॥ पाहे पां परतोनी मुळिंचा तूं कोण। सद्गुरुशीं शरण रिघें वेगी॥ ५॥ सद्‌गुरु दयाळे लेवविलें अंजन। मज जनार्दन अवघा भासें॥ ६॥ विठा म्हणे तारीं आपुल्या शरणागता। अनाथाच्या नाथा पांडुरंगा॥ ७॥

करुणापर मागणें.

३८. न लागे आयुष्य भविष्य संपत्ति। नाम लक्ष्मीपति द्यावें मज॥ १॥ तेणें तिहीं लोकीं होईन सरता। आणिक कृपावंता न मागें कांही॥ २॥ नामयाचें प्रेम मज देई देवा। न घालावें खेंपा संसारासी॥ ३॥ वडिलाचें ठेवणें तुवां अभिलाषिलें। तें देई वहिलें पांडुरंगा॥ ४॥ संसारतारका भक्तजन पाळका। यादवकुल टिळका केशवराया॥ ५॥ भवमूलछेदका गोपीमनरंजका। होसी बंधुसखा यादवकुळां॥ ६॥ विठ्याचा तूं स्वामी भक्तिप्रेम सुख। यदुवंशटिळक यादवराया॥ ७॥

३९. तुजवीण जिवलग सोईरे। मज नाहीं बा दुसरे॥ १॥ विठो धांवे दवडा दवडी। भक्त आपुला सोडवी॥ २॥ बहुत गांजिलों संसारीं। जोजावलों मदमत्सरीं॥ ३॥ विषयसर्पे डंखियला। लोभदंभें भक्षियला॥ ४॥ कामक्रोधाचीये धाडी। पडिलोंसें बांदवाडी॥ ५॥ विठा म्हणे राखें लाज। होसी आमुचा पूर्वज॥ ६॥

४०. बोलूं रे वेदांतीं बोलूं रे सिद्धांतीं। बोलूं नेती नेती अनिर्वाच्य॥ १॥ बोल बोल रे तूं मना। बोल नारायणा समर्पिला॥ २॥ माझा बाप बोल बोलूनियां गेला। केशव बांधिला बोल बोलें॥ ३॥ नामयाचा विठा बोल नाहीं विसरला। केशव उभा केला भक्तिसुखें॥ ४॥

४१. बोल तो सधरू बोले तो उदारू। बोल राज्यधरू धीर धर्म॥ १॥ बोल तो न कळे बोल तो न कळे। बोल तो न कळे जाणतेया॥ २॥ बोलाच्या आधारें बोलाच्या विचारें। बोले सर्व सार जिणोनियां॥ ३॥ बोले जें अव्यक्त स्वरूपें विचारू। ब्रह्म बोल सारू विठा म्हणे॥ ४॥

४२. तूंचि येसी तूंचि जासी। तूंचि भोगिसी गर्भवास॥ १॥ नेणों आम्ही आणिक बापा। तुम्ही याची कृपा चिरंजीव॥ २॥ बाप दोन्ही तूंचि भोगिसी। आमुचा न देसी भक्तिवांटा॥ ३॥ नामयाचा विठा म्हणे केशवराजा। मी दाईज तुझा वाटेकरी॥ ४॥

४३. पायीं घातला तोडरूं। देखूनि पळाला संसारू॥ १॥ आलें हरीदास नेटकें। भेणें पळालीं पातकें॥ २॥ गळां घालूनि तुळसी माळ। वीर करिती कोल्हाळ॥ ३॥ हांकारिती सहस्रनामें। रंगी नाचताती प्रेमें॥ ४॥ पताका झळकती अंबरीं। वैष्णव नाचतीं गजरीं॥ ५॥ विठा केशवाचा नटू। बोले कळिकाळासी धटू॥ ६॥

४४. मी तुझा पोसणा अगा नारायणा। झणीं केविलवाणा दिसों दिसी॥ १॥ तुझा म्हणवितां आणिकां शरण जातां। लाज माझ्या चित्ता वाटे थोर॥ २॥ राबावा सेवक रंकाचिये द्वारीं। फिरतां घरोघरीं लाज कोणा॥ ३॥ विठा म्हणे देवा मी तुझा शरण। मागतसें दान नाम तुझे॥ ४॥

४५. जावोनी वेव्हार सांगेन पंढरीं। जेथें पुंडलिक द्वारीं उभा केला॥ १॥ देवोनी जाय कां घेवोनी जाय। आतां न सोडीं पाय केशवाचे॥ २॥ एक अंगेसी एक जांगेसी। तरी जीवें हृषीकेशी न सोडीं तुज॥ ३॥ वेव्हारा सन्निधी पुंडलिक लोभा। विठा म्हणे उभा तेणें केला॥ ४॥

४६. उभया धरणें आपण बैसला। म्हणोनी भला भला वेव्हारू हा॥ १॥ आमुच्या वेव्हारी साक्ष हा एकु। पुंडलिकें लोकु उद्धरिला॥ २॥ नाहीं तरी वेव्हारु अवघाचि खोटा। पुंडलिकाचे

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

चोहटा उभा असे॥ ३॥ ऐसें सात पांच वेव्हारी बुडविलें येणें। विठा म्हणे धरणें जीवीं पाय तुझे॥ ४॥

४७. मी तुझा अंकिला अगा पंढरिनाथा। ब्रीद आपुलें आतां साच करीं॥ १॥ पतित पावन ऐसें बोलती पुराणें। तारियले हीन अनंत यातीं॥ २॥ म्हणोनी ब्रीदाचा तोडर तुझ्या पायीं। गर्जताती घाई वेदश्रुती॥ १॥ विठा म्हणे मज देई चरणसेवा। आणिक केशवा न मागें कांही॥ ४॥

४८. तीर्थ तपें व्रतें देवातें जोडिलें। तें नामदेवासी दिधलें प्रेमसुख॥ १॥ ऐक्यसुख परब्रह्म साधिलें। यश जें जोडिलें त्रिभुवनींचें॥ २॥ धन्य तुझें नाम धन्य तुझें नाम। धन्य देवा प्रेम तुझे पायीं॥ ३॥ नामा गोतामाजीं पायाळु जन्मला। देव भावें आला भूमंडळीं॥ ४॥ स्वर्गीचें ठेंवणें उमगिलें तेणें। केशवनाम नाणें अगणित॥ ५॥ नेत्रीं लेईला भक्तीचें अंजन। उमगिलें निधान नामनाणें॥ ६॥ विठा म्हणे देवा तें प्रेम पायीं। न मागतां देई केशिराजा॥ ७॥

४९. भिऊनियां निघे समर्थाचे पाठीं। वैरियाची भेटी न करी तया॥ १॥ तैसा तुज आलों शरण केशवें। मज त्वां राखावें चरणांजवळी॥ २॥ न करा उदास न राखा अभिमान। माझें आगमन विचारी कां॥ ३॥ तुझेनि जें होईल तें मी मागेन। चरणसेवा करीन अहर्निशीं॥ ४॥ अविद्या अपार संचली हें देवा। याचा मजकूर दावा नाहीं कोणी॥ ५॥ देवा मज आतां नको गर्भवास। विठा विष्णुदास विनवीतसे॥ ६॥

५०. दासी देवा अनुसरावें। कां आणिकां शरण जावें॥ १॥ लाभालाभ जेथींचा तेथें। श्रम अन्यथा तो व्यर्थ॥ २॥ पुण्योदक भागीरथी। नदी चातकाची तृप्ती॥ ३॥ सेवित स्तवितां चकोर। काय वर्षे अमृतधारा॥ ४॥ कासवीविण कोण बाळा। पाळी निज दृष्टि स्नेहाळा॥ ५॥ स्वामीचिया मनोभावा। करणें ते परम सेवा॥ ६॥ दास विठा म्हणे मीन। कैसा वाचे उदकेविण॥ ७॥

५१. घेतां देतां तू तिही लोकी उदार। माझा कां अव्हेर केला बापा॥ १॥ तुझी सेवा देईं तुझी सेवा देईं। तुझी सेवा देई श्रीविठ्ठला॥ २॥ विठा म्हणे केशवा नको हा संसार। तुझे चरणीं अभ्यंतर ध्यान देईं॥ ३॥

५२. कीर्तनाची ध्वनि पडली माझ्या कानीं। जाईन लोटांगणीं तेथवरी॥ १॥ माझें सुख तें पहा वैष्णव जन। तयांची दर्शनें कैं होतील॥ २॥ उभ्या गाती आणि कीर्तन ऐकती। हृदयीं आळविती केशीराज॥ ३॥ ऐसीयाचे संगती होता बाप माझा। म्हणतसे राजा विठा नामयाचा॥ ४॥

५३. विश्वंभरा तुझें नाम गा दुर्लभ। परी केलें सुलभ नामदेवें॥ १॥ नामाची सांगडी लावूनियां कांसे। नामदेवें कैसें उतरिलें॥ २॥ नाम मज देईं आणिक न मागों काई। प्रेम तुझे पायीं असों द्यावें॥ ३॥ पतितपावन देवकी नंदना। हरि नारायणा पद्मनाभा॥ ४॥ मुखीं तुझें नाम आवडी प्रेमाची। मग वैकुंठीची चाड नाहीं॥ ५॥ सुखाच्या सागरा केशवा उदारा। तो आम्हां सोयरा जिवलगू॥ ६॥ द्यावा प्रेमसौरसु नामामृतरसु। विठा विष्णुदासु विनवीतसे॥ ७॥

५४. माय वेल्हाळी वेल्हाळी। ब्रह्मरसा पान्हावली॥ १॥ दोहणार चवघेजण। धार सुटेना अझून॥ २॥ साहा लागले कासेसी। अठरा करिती निदिध्यासी॥ ३॥ न कळे ब्रह्मादिकां वाटा। नामयाचा विठा॥ ४॥

५५. आनंदें नाचत पंढरीसी जाऊं। गीतीं गुण गाऊं विठाबाचे॥ १॥ पंढरी पावन पुण्यभूमि जाणें। विठ्ठलदर्शनें दोष जाती॥ २॥ आनंदें हो प्रेमें नाचों महाद्वारीं। आठवूं अंतरीं घडोघडी॥ ३॥ आम्हां वैष्णवांचा कुळधर्म कुळीचा। घोष हरिनामाचा सदा वाचें॥ ४॥ विठा नामयाचा चरणीं झाला लीन। सांपडलें धन विटेवरी॥ ५॥

५६. विठोबाचे बहु उपकार शिरीं। चुकविली फेरी चौऱ्यांशींची॥ १॥ भ्रमणा दुःखाच्या बहुत

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

वेदना। म्हणोनी नारायणा शरण आलों ॥ २ ॥ अनाथाच्या नाथा तूं दीनाचा गोसावी। तोडर तुझ्या पायी शोभे देवा ॥ ३ ॥ कर्ता करविता सर्व तुझी सत्ता। विश्वाचा चाळिता चित्तवृत्ती ॥ ४ ॥ विठा म्हणे नाम स्मरे त्याचे मुखीं। बहु केलें सुखी शरणागतें ॥ ५ ॥

५७. पतितपावन ऐकिलासे कानीं। म्हणोनी चक्रपाणि शरण आलों ॥ १ ॥ जपतप नेणें मूढ मतिहीन। बोबडें गाईन नाम तुझें ॥ २ ॥ मग कृपाळुवा जी वोळला संपूर्ण। वोलावलें मन भक्तिबोधें ॥ ३ ॥ विठा म्हणे पूर्वपुण्य कांहीं होतें। तरीच पंढरिनाथें अंगिकारिलें ॥ ४ ॥

५८. ऐसें सुख कोठें आहे। मुक्ति मागोन करिसी काय ॥ १ ॥ सांडोनी पंढरीची वारी। मोक्ष मागे तो भिकारी ॥ २ ॥ सांडोनी वाळवंट। कां बा इच्छिसी वैकुंठ ॥ ३ ॥ मुखी कवळ काल्याचे। ऐसे वैकुंठीं बा कैंचे ॥ ४ ॥ नामयाचा विठा खेळे। बाप नामची माझें भोळें ॥ ५ ॥

५९. धरोनी हनुवटी मेळवीन दृष्टादृष्टी ॥ १ ॥ म्हणे मी ऐशाचि पाहीन। चरण धरोनी राहीन ॥ २ ॥ जेवीं कमळणी दीनकरा। चातका वरुषे जळधारा ॥ ३ ॥ बाळक जननी ये भावीं। चकोर चंद्रातें आळवी ॥ ४ ॥ कृपणाचें ठेविलें धन। तेथुनी न निघे त्याचें मन ॥ ५ ॥ विठा विनवी अनुसंधानें। तुज असतां मज काय उणें।

६०. नामयाचे वंशी मैंद जन्मला। मार्ग हा पाडिला वैकुंठींचा ॥ १ ॥ सतरावीचे पाश घेऊनियां हातीं। वाट दिवसरातीं पाडीतसे ॥ २ ॥ मैंदाच्या हाता आला सावकार। भांडारी कुबेर घरीं ज्याचे ॥ ३ ॥ नामचाया विठा सत्य हा मैंद। भुलवुनी गोविंद म्हणवी तुझें ॥ ४ ॥

६१. नामचाये वंशी जन्मले लबाड। साधिलें घबाड विटेवरी ॥ १ ॥ प्रपंचासी आम्ही सोडिलें उदक। वैकुंठनायक आप्त केला ॥ २ ॥ लौकिकाची लाज निश्चयें सोडिली। दृढ मिठी दिली विठोपायीं ॥ ३ ॥ लबाड म्हणती निर्माण पैं झालें। तेथें बुडविलें मीतूंपण ॥ ४ ॥ नामयाचा विठा सत्याचा लबाड। प्रपंच काबाड ब्रह्म केलें ॥ ५ ॥

६२. नामयाचे वंशी जन्मा आलें सुनें। बडिलाचें ठेवणें प्राप्त झालें ॥ १ ॥ संतसज्जनांचें राखितसें द्वार। सुनें सारासार म्हणती मज ॥ २ ॥ प्रपंच थोरला घालोनि आसन। आवडें पैं ध्यान विठोबाचें ॥ ३ ॥ गुरुगुरु ऐसा शब्द माझा पाड। घातलें कवाड यमलोकीं ॥ ४ ॥ नामयाचा विठा सुनें सुनें एका। पूजिल्या निष्टंका परब्रह्म ॥ ५ ॥

६३. मरण हें पेरणें जन्म हें उगवणें। हें मायेची खूण जाणीतली ॥ १ ॥ संग तुझा पुरे संग तुझा पुरे। संग तुझा पुरे नारायणा ॥ २ ॥ तूं तरी न मरें मी तरी न मरें। भक्ति हे संचरे हाचि लाभू ॥ ३ ॥ विठा म्हणे केशवा ठाईंचा मी नेणें। गर्भवास भोगणें तुझी लाज ॥ ४ ॥

६४. वैकुंठनायका आनंदपददायका। यादवकुळटिळका केशीराजा ॥ १ ॥ संसारतारका भक्तजनपाळका। यादवकुळटिळका केशीराजा ॥ २ ॥ भवमुक्तिदायका गोपीमनरंजका। यादव कुळटिळका केशीराजा ॥ ३ ॥ विठ्याचा स्वामी भक्तप्रेम सुखा। यादवकुळटिळका केशीराजा ॥ ४ ॥

६५. एक होतें ते द्वैत पैं झालें। एक पाहतां द्वैत कैंचें उरलें ॥ १ ॥ द्वैताचाभास मृगजळीं दिसें। पाहूं गेलें तेथें भास भासे ॥ २ ॥ चहूंचें बोलणें सहाची नेणीव। अठरांची जाणीव कैंची तेथें ॥ ३ ॥ नागरीचा भाव विठोबाचा दिसे। परत्रींचें पिसें लागुनी ठेलें ॥ ४ ॥ नामयाचा विठा नामी विनटला सर्वस्व हरपला भेदभाव ॥ ५ ॥

उपदेश

६६. देहसमय अंती इष्टमित्र मिळती। सांभाळा म्हणती मुलें माझीं ॥ १ ॥ स्त्री धनधान्य ते निरवूनी जात। आपुलें स्वहित विचारीना ॥ २ ॥ गाडे घोडे म्हैसी सेवक आणि दासी। सांडोनियां जासी एकलाची ॥ ३ ॥ मी कोण रे काय कसा आलों

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

येथें। हित की अनहित करोनी जातों॥ ४॥ हें तंव सुचेना नाठवे ज्याच्या मना। जुंपिलें ते घाणा चौऱ्यांसीच्या॥ ५॥ विठा म्हणे तया कोण सोडविता। वेगीं पंढरिनाथा शरण जावें॥ ६॥

६७. माळा मुद्रा सोंग घेऊनि होती संत। सदा विषयांत चित्त त्यांचें॥ १॥ पोटासाठीं एक घेऊनियां वेष। ठकविती देश रांडापोरें॥ २॥ पाषाण बांधोनी नदीये निघाला। सांगा कोण गेला पैलतींरा॥ ३॥ ब्राह्मणाचे परी मैंद वेष धरी। घालावया करीं फांसे जैसे॥ ४॥ विठा म्हणे संत न म्हणा तयासी। जाती नरकासी अधःपाता॥ ५॥

६८. उदर भरावया घेऊनियां सोंग। घरोघरीं बोंब उपदेशाची॥ १॥ आपणा कळेना लोकां सांगे ज्ञान। धरूनियां ध्यान बक जैसा॥ २॥ आपण बुडाले आणिकां बुडविती। हात धरूनी जाती यमलोका॥ ३॥ दुरी पंथ जाणे तया यमपुरी। पापाची शिदोरी बांधोनियां॥ ४॥ विठा म्हणे काय करूं त्याच्या कपाळा। पापाचा कंटाळा न धरिती॥ ५॥

६९. मांजराचे डोळे गेले। उंदिर धराया तळमळे॥ १॥ तैसा नव्हे रे संन्यास। धांवे विषयावरीं हव्यास॥ २॥ वेश्या झाली पट्टराणी। स्मरेना पूर्वील करणी॥ ३॥ सर्प प्रतिवर्षी पालटे। परि अहंकार न पालटे॥ ४॥ पहिलें पोशिलें मर्कटा। कोणें शिकविल्या चेष्टा॥ ५॥ म्हणे नामयाचा विठा। वज्र लागो या लल्लाटा॥ ६॥

७०. कामधेनु गाई घालोनी बाहेरी। ताक घरोघरी मागतसे॥ १॥ कल्पतरु वृक्ष असे ज्याचे घरीं। तो कां दारोदारीं भीक मागे॥ २॥ ऋद्धि आणि सिद्धि विठोबाच्या दासी। तया हृषीकेशी शरण जावें॥ ३॥ इंद्र आणि चंद्र विठोबाचे किंकर। देव सुरवर ध्याती ज्यातें॥ ४॥ राव आणि रंक विठोबाचे मागते। ते कायरे तूंतें देती बापा॥ ५॥ ऐसा कोण आहे सर्व पुरविता। एका भगवंता वांचोनियां॥ ६॥ मुखी नाम असें पुण्य ज्या पदरीं। कळीकाळावरी सत्ता त्याची॥ ७॥ विठा म्हणे शरण जाय हृषीकेशी। मग निज सुखासी पावसील॥ ८॥

७१. जाति ज्ञान नाही मति ज्ञान फार। फुंजे दंभाकार लौकिकांत॥ १॥ तेथें माझ्या मना नव्हे समाधान। न पाविजे खूण संतांवीण॥ २॥ संत तेचि जाणा शांत ज्यांचें मन। अणूचें प्रमाण दुजें नाहीं॥ ३॥ विठा म्हणे तेथें स्थिरावलें मन। झालें समाधान त्याचे संगें॥ ४॥

७२. अनंत अपरंपार नाम हें सधर। नाम सुखसागर अमृत लहरी॥ १॥ नाम हेंचि तारु नाम हेंचि तारक। भवमूळ छेदक नाम तुझें॥ २॥ नाम हेंचि जीवन नाम हें निधान। नाम हें कारण आनंदाचें॥ ३॥ नाम हे सांठा तोचि वैकुंठींचा मोठा। म्हणतसें विठा नामयाचा॥ ४॥

७३. नाम तारी पतितासी। तें कां अव्हेरी भक्तांसी॥ १॥ प्रेमळ देवाचें लडिवाळ। करी निजांगें प्रतिपाळ॥ २॥ सेवाऋणें वागवी भार। जन्मोजन्मींचा दातार॥ ३॥ स्वामी स्वयें अंगिकारी। वोळगा कां हो दारोंदारी॥ ४॥ निष्ठुर नव्हे कोणे काळी। कृपाकटाक्षें कुरवाळीं॥ ५॥ दास विठा म्हणे वेगें। यात्रे जावें माझ्या संगें॥ ६॥

७४. हरि म्हणा हरि म्हणा अहो जन। आणिक बोलाल तरी विठ्ठलाची आण॥ १॥ अहिल्या पाषाण अजामेळ कुळहीन। उद्धरिला दर्शनें वाल्मिक जाण॥ २॥ नामयाचा विठा संतचरणीं ठेवोनि माथा। कीर्तनेंविण वृथा नको गोष्टी॥ ३॥

७५. धर्म अर्थ मोक्ष काम। हाकारितां रामराम॥ १॥ जें जें आवडे मनासी। त्यानें जावें पंढरीसी॥ २॥ चला आनंदें कौतुकें। पेठ भरली पुंडलिकें॥ ३॥ न चले कोणाची थोरी। राया रंका एकी सरी॥ ४॥ सांडोनियां अहंभाव। हाचि करावा व्यवसाव॥ ५॥ विठा म्हणे विष्णुदास। आणिक न लगे सायास॥ ६॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

७६. बरवें बरवें वाळवंट। काय इच्छिसी वैकुंठ॥ १॥ हें सुख तेथें नाही। मुक्ति घेउनी करिसी काई॥ २॥ म्हणे नामयाचा विठा। बापा नको जाऊं वैकुंठा॥ ३॥

७७. देखुनी पंढरीच्या सुखा। मोक्षपद आलें फुका॥ १॥ अवघें विठ्ठलचि झालें। येणें पुंडलिकें केलें॥ २॥ ऋद्धि सिद्धि पंढरपुरी। होवोनी वोळती कामारी॥ ३॥ मुक्ति वागती अंगणी। घरोघरी वाहे पाणी॥ ४॥ तीर्थ चिंतवणी करिती। पुढें आमुची कोण गती॥ ५॥ आला कळिकाळा त्रासु। विठा म्हणे विष्णुदासु॥ ६॥

७८. बहूतां पुण्याचे कष्ट। त्यासी प्राप्त हें वैकुंठ॥ १॥ तैसी नोहें ही पंढरी। पतित पापियातें तारी॥ २॥ बहुता तपाचें प्रत्यक्ष। त्यासी अपकारी मोक्ष॥ ३॥ जेणें केलीं तप तीर्थें। तोचि आवडे मुक्तीतें॥ ४॥ देह यासी नानाविधि। त्यासी प्राप्त होय सिद्धि॥ ५॥ विठा म्हणे नामघोष। पळ काढील महादोष॥ ५॥

७९. ज्यासी नावडे पंढरी। तोचि वसेल अघोरीं॥ १॥ त्यासी जाची यमदूत। सकळ पूर्वजांसहित॥ २॥ जया नावडे हरिनाम। तया कुंभपाकीं धाम॥ ३॥ जया नावडती संत। ते चालती यमपंथ॥ ४॥ जया नावडे भीमरथी। तेचि अघोरीं पचती॥ ५॥ या बोलाचा धरीं विश्वास। विठा म्हणे विष्णुदास॥ ६॥

८०. हरिकथा ऐकतां संसार आठविती। तयाच्या सुकृति अवघा नाश॥ १॥ निश्चिंत होऊनि ऐकतां श्रवणी। यमाची करणी न लगे कांहीं॥ २॥ आतां रामकृष्ण म्हणे कां रे वाचा। कळिकाळ मोचा वाहतील॥ ३॥ विठा म्हणे संतीं अवधान द्यावें। हृदयी धरावें केशवनाम॥ ४॥

८१. काय गाणीव काय जाणीव। काय शहाणीव कीर्तनाची॥ १॥ थाक तोडिलें डोळे मोडिले। लोकां मानवलें बरें गाती॥ २॥ हरिचें नाम तूं नेणसी। वांयां कीर्तनी उभा ठाकसी॥ ३॥ हरीचें नाम तुम्ही गा रे प्रेमें। विठा म्हणे माझ्या बापाच्या नांवें॥ ४॥

८२. जैसा आंबा वर्षत पाडी। तैसी धरीं गोडी कीर्तनीं नाचे॥ १॥ न करी घातमात न लावी वेळू। तेणें हा गोपाळू अंतरला॥ २॥ दूधावरील साय मथेसी गोडी। तैसी धरी आवडी रामनामीं॥ ३॥ जतीचा साटा तो वैष्णव लाटा। म्हणतसे विठा नामयाचा॥ ४॥

८३. यात्रे बोलवितो हरी। कां हो नवजा पंढरी॥ १॥ विठोबा कृपेचा कोंवळा। बहु भक्तांचा कळवळा॥ २॥ भक्त आठवती चित्ती। देवा वाटे परम खंती॥ ३॥ देव अवज्ञा अनुचित। पृथक सत्ता आत्मघात॥ ४॥ ऋण वारी भगवंत। दुबळा नव्हे लक्ष्मीकांत॥ ५॥ दास विठा म्हणे त्वरा। यात्रा पंढरीचीं करा॥ ६॥

८४. द्रौपदीचें थालीपात्र। त्यांत कैंसें शाखापत्र॥ १॥ माव याची अभिन्नव। वाव मानसी उपाव॥ २॥ जंव लाधला तो आपण। केलें तृप्त त्रिभुवन॥ ३॥ सेवा घेऊनी सारी काम। अंगें चैतन्य निष्काम॥ ४॥ याच्या छळे आकर्षिला। बळिचा द्वारपाळ झाला॥ ५॥ भक्तियोगें द्वेषेंभयें। वेध लावुनी सन्मुख होये॥ ६॥ दोही बाही आपण देव। काय नेणा पंढरीराव॥ ७॥ दास विठा म्हणे धंदा। कृपा देवाची संपादा॥ ८॥

गौळण.

८५. कृष्ण गौळियाचें लोणी चोरी। तंव अवचिता शेंडी सांपडली हरी। घेवोनि आलिया बाहेरी। तंव यशोदे वोसंगा॥ १॥ चाकाटलिया गौळणी। देवो विसरल्या गाऱ्हाणीं। लाजे मौन्य धरोनि। अवलोकिती गोविंदा॥ २॥ आम्हां अवघियांसी असे। पैल यशोदा वोसंगा दिसे। हें स्वप्न की साच असे। म्हणती मानसें वेडावलीं॥ ३॥ ऐशा अनेक परिच्या वेदश्रुती। वाचें वर्णावया न येती। विठा विनवी विष्णुदासाप्रती। ऐसा यशोदेच्या कान्हया॥ ४॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गोंधळ

८६. त्रैलोक्यामाझारी एक विठाबाई सुंदरी हो। पुंडलिकाकारणें तिष्ठत भीमातीरी हो॥ १॥ उदो बोला उदो बोला विठाबाई माउलीचा हो॥ ध्रु०॥ मांडिला देव्हारा तुझा त्रिभुवनामाझारी हो॥ २॥ चौक साधियला नामी कळस ठेविला वरी हो॥ ३॥ गोंधळ्यामाझारी एक पुंडलिक नेटका हो। घातला गोंधळ विठाई दाविली तिहीं लोकां हो॥ ४॥ गोंधळ घालीत गेली कैसी रावणाच्या घरा हो। शरणागत रक्षिलें वधियलें दशशिरा हो॥ ५॥ आषाढी कार्तिकी तुझा गोंधळ वाळवंटीं हो। येती सनकादिक गरुडटकेयांची दाटी हो॥ ६॥ करुनी गोपाळकाला गोंधळ घाली वेणूनादीं हो। गोपिकांसहित सवें गोपाळांची मांदी हो॥ ७॥ नामयाचा विठा कैसा गोंधळी नेटका हो। वडिलांची विठाई कुलस्वामिनी अंबिका हो॥ ८॥

आऊबाईचा अभंग

१. शून्य साकारलें साध्यांत दिसे। आकार नासे तेथें शून्याकार दिसे॥ १॥ शून्य तें सार शून्य तें सार। शून्यी चराचर सामावलें॥ २॥ नामयाची बहिण आऊबाई शून्यीं सामावली। विठ्ठलीं राहिली चित्तवृती॥ ३॥

लिंबाईचा अभंग

१. तारीं मज आतां रखुमाईच्या कांता। पंढरीच्या नाथा मायबापा॥ १॥ अनाथांचा नाथ ऐकियेलें कानी। सनकादिक मुनि बोलताती॥ २॥ त्याचिया वचनाचा पावोनी विश्वास। धरिली तुझी कास पांडुरंगा॥ ३॥ नामयाची लेकी लिंबाई म्हणे देवा। कृपाळू केशवा सांभाळावें॥ ४॥

लाडाईचा अभंग

१. पूर्वसंबंधें मज दिधलें बापानें। शेखी काय जाणें कैंसें झालें॥ १॥ प्रसुतीलागीं मज आणिलें कल्याणा। अंतरला राणा पंढरीचा॥ २॥ मुकुंदें मजशीं थोर केला गोवा। लोटियलें भव नदीमाजीं॥ ३॥ ऐकिला वृत्तांत सर्व झालें गुप्त। माझेंचि संचित खोटें कैसें॥ ४॥ द्वादशबहात्तरीं कृष्ण त्रयोदशी। आषाढ हें मासी देवद्वारीं॥ ५॥ सर्वांनीं हा देह अर्पिला विठ्ठली। मज कां ठेविलें पापिणीसी वेगळी॥ ६॥ लाडाई म्हणे देह अर्पीन विठ्ठला। म्हणोनी आदरिला प्राणायाम॥ ७॥

परसा भागवताचे अभंग

परसा भागवत व नामदेव यांचा संवाद

१. परसा म्हणे नामयासी। अरे नामदेवा परियेसी। तूं तंव दवडिल्या न जासी। मनीं न लाजसी अजुनी॥ १॥ परसा वदे नामयासी। तुझे पूर्वज माझे चरणापाशीं। जरी तूं हरिदास झालासी। तरी याती हीनची॥ २॥ तुवां कोठवरी काय देखिलें। नाहीं वेदशास्त्र म्हणीतलें। एक तुजची जाणीतलें। इतुकें झाले सांगावया॥ ३॥ आणिक सांगेन एक। तूं जर ठायींचाची वासनीक। मातें लाविसी मौन टिलक। तेथें पाईक काय करी॥ ४॥ तयासी त्यां कौटिल्य केलें। सहस्त्र वैष्णवांमाजी भुरळें ठेलें। तंव तें उमगो लागले। मग भुलले आपोआप॥ ५॥ ऐसा तूं कवटाळिया पाही। तुझे पूर्वज माझे पायी। मग शंका धरिसी कांही। अझुनी तरी विचारी पां॥ ६॥ तुजसी करितां वादक। तरी हे शंकतील लोक। तूं तंव माझाची सेवक। विष्णुदासा म्हणे परसा॥ ७॥

२. यावरी नामदेव काय बोलला। आजि मनीं संतोष फार झाला। शब्द पूर्वजांचा ऐकिला। आनंदें भरला सागर॥ १॥ परसोबास म्हणे नामा। चरणतीर्थ द्यावें आम्हां। तुमचे चरणींचा महिमा। माझ्या पूर्वजा आतुडला॥ २॥ इतुके दिवस गिवसितां पाहीं। परी हे व्यवस्था न पडे ठावी। पूर्वज आहेत तुझे पायीं। तें म्यां आजि जाणितलें॥ ३॥ तयासी आपुले चरणीं रहाविलें। म्यां काय पूर्वी कर्म केलें। त्वां मज वेगळें धरियेलें। थीतें अंतरलें चरणतीर्थ॥ ४॥ ब्राह्मण क्षत्रिय वैश्य समस्त। हे तंव तुमच्या पायां पडत। तया दंडवत घडत। दोष जाती तयांचे॥ ५॥ ऐसें ठायींचेंच जाणतों। तरी

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

कासया हिंडतों। चरण धरूनीच रहातों। विष्णुदास म्हणे नामा॥ ६॥

परसा भागवताचा गर्वपरिहार.

३. परसा सांगे स्त्रियेपाशीं। अवो अपूर्व वर्तलें पंढरीसी। मज आणि नामयासी। झाला विवाद परस्परें॥ १॥ परसा सांगे आपुली महिमा। आजि फजीत केला नामा। पुढती शरण आला आम्हां। सकळ जना देखतां॥ २॥ आम्ही तयासी निर्भर्त्सिलें। परी ते आमच्या पायीं लागलें। काकुळती शरण आले। मग सोडिलें तयातें॥ ३॥ आम्हीं साक्षात विष्णुदास। त्यानें म्हणवावें विप्रदास। ऐसें असावें प्रत्यक्ष। विष्णुदास कां म्हणवी॥ ४॥ तूं म्हणसी एक नामा। येर वाउगीच उपमा। त्यापाशीं असतां परमात्मा। तरी कां आम्हा शरण येता॥ ५॥ खालील पायरी तयाची जाण। वरी आम्हासी महिमान। आमुच्या हृदयीं परमात्मा आपण। सदा जागृत वसतसे॥ ६॥ धन्य धन्य माझें कुळगोत्र। नाम पावलों भागवत। केलिया पुण्या नाहीं मीत। आणि वेदांत मी जाणें॥ ७॥ यातिहीन विष्णुदास म्हणविती। तेणें ते नर भय पावती। तयासी न चुके पुनरावृत्ति। विष्णुदास म्हणे परसा॥ ८॥

४. यावरी काय बोलली पतिव्रता। विनंती करितें कोपूं नका। तुम्हासी गर्व जरी नसता। तरी घरीं भेटता परमात्मा॥ १॥ तुम्ही ब्राह्मण पवित्र धन्य। मुखीं वेद हरीचें नाम। वरी गर्व अवलक्षण। सकळही धर्म लोपले॥ २॥ अमृत घातलें पाषाणावरी। वरी वरी आला कोरडा भीतरी। तैसा घात तुमच्या शरीरी। गर्वे हरि न भेटेची॥ ३॥ गाय ते सर्वांठायीं पवित्र। परि तिचि वासना अपवित्र। तेसें तुमचें धन्य कुळगोत्र। सर्व अपवित्र सांडा जी॥ ४॥ तुम्हासी चाड जरी हरीसी। तरी मत्सरु करूं नका नामदेवासी। तो आलिया घरासी। हरि तुम्हासी भेटेल॥ ५॥ आतां आदर करोनी आणाल नामा। तयासवें येईल परमात्मा। भेट होईल तुम्हा आम्हा। त्या नामयाचेनी प्रसादें॥ ६॥ आणखी एक अवधारी। राउळा येत होते हरी। नामा होता बरोबरी। अंचळ सरसावी रखुमाई॥ ७॥ आणखी एक वृत्तांत ऐकिला। कीर्तनासी नामदेव आला। द्वारकेचा भोपा पोळला। तो बुझविला येथोनी॥ ८॥ आणिक महादेवद्वारीं कीर्तन मांडिलें। हें आंवढ्यासी वर्तलें। देऊळ तयाकडे फिरलें। भलें नवल नामयाचें॥ ९॥ ऐसें बोलली कमळजा। तुम्ही स्वामी मी तुमची भाजा। गर्व सांडाजी वोजा। तरी पंढरिराज भेटील॥ १०॥

परसा भागवत न नामदेव यांचा संवाद.

५. भूवैकुंठ जागा क्षेत्र हे पंढरी। नांदे तेथें हरि द्वारकेचा॥ १॥ तेचि गांवीं असे परसा भागवत। करितसे भक्ति रुक्मिणीची॥ २॥ आदिमाया जाहली ती प्रसन्न। दिला त्याकारणें परिस एक॥ ३॥ लोहासी लावुनि सुवर्ण तो करी। सुखें हा संसारी राहतसे॥ ४॥ नित्य महाद्वारीं वाची रामायण। करिती श्रवण साधु-संत॥ ५॥ भजन करूनि नामा येत तेथें। पुसतसे अर्थ त्याजलागीं॥ ६॥ सांगा कैसी आहे लंकेची रचना। कोण कोणत्या स्थाना राहताती॥ ७॥ बाबा तेचि सांगा मजलागीं खूण। बोलत प्रमाण नामा त्यासी॥ ८॥ शास्त्र पाहोनियां करितो उत्तर। आणिक विचार पुसे त्यासी॥ ९॥ दोघांचा संवाद होतां महाद्वारीं। विस्मय अंतरीं करिती संत॥ १०॥ परसोबा सांगत रुक्मिणीलागून। करितो अपमान नामा माझा॥ ११॥ ऐक मति माझी हेचि विज्ञापना। दावी तूं रचना लंकेची हे॥ १२॥ पाहोनियां लंका येईन मी माये। समाधान होय नामयाचे॥ १३॥ सांगेन तयासी सकळ वृत्तांत। पुरवीं हा हेत आतां माझा॥ १४॥ लेंकुराचे कोण पुरवील लळे। घेतली म्यां आळ तुजपाशीं॥ १५॥ करीं माते माझें आतां समाधान। वंदीत चरणा परसा तेव्हां॥ १६॥ अवश्य म्हणोनियां दिलें तें वचन। आनंदला पूर्ण भागवत॥ १७॥ बैसविलें तिनें त्यासी हातावरी। दाविली नगरी बिभीषणाची॥ १८॥ पाहें बापा आतां होऊनियां स्वस्थ। पुरवी हा हैत आपुला तूं॥ १९॥ पाहोनियां

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

लंका आनंदला मनीं। धन्य हे करुणी करत्याची॥ २०॥ रम्य स्थळ जागा अपूर्व ते फार। होतसे गजर नामघोष॥ २१॥ घरोघरीं होय वेदपारायण। रामनामीं मन सर्वत्रांचें॥ २२॥ सर्व पाहोनियां लंकेची रचना। आला तो सदना बिभीषणाच्या॥ २३॥ पाहातो तो नामा उभा कीर्तनास। गुण गात असे देवाजीचे॥ २४॥ शरण जे गेलें माझ्या पंढरीनाथा। नाहीं भय चिंता त्यांस कांहीं॥ २५॥ विस्मय तो करी परसोबा अंतरीं। फिरला माघारी तेथूनियां॥ २६॥ बैसविला तेव्हां रुक्मिणीनें करीं। आणिला पंढरी क्षेत्रामाजीं॥ २७॥ समजलें तेव्हां नामयालागुनी। पुसतसे खूण तुजलागीं॥ २८॥ परसोबा सांगत त्यासि सविस्तर। बिभीषण मंदिर कैसें असे॥ २९॥ ऐकोनियां ऐसें न करी उत्तर। कां रे अहंकार धरिलासी॥ ३०॥ हाती तुझ्या आला होता चिंतामणी। कैसा तो गोफणी लाविलासी॥ ३१॥ कल्पवृक्ष तुझ्या आंगणीं लाविला। कैसा उपडिला अभागिया॥ ३२॥ अमृताचा घड हातासी लाधला। कैसा उलंडिला वेडिया तूं॥ ३३॥ तैसा महाराज तोचि बिभीषण। ज्याचे हृदयीं रामचंद्र। दुजा कां विचार धरिला तेथें॥ ३५॥ अहंकारें मोठे मोठे नाडलेती। सांगसी त्या तूं युक्ती शास्त्राच्या ते॥ ३६॥ तोचि अहंकार धरिलासी अजून। होई आतां लीन संतांपायीं॥ ३७॥ तेणें हा झडेल अंतरींचा मळ। दिसेल सकळ ब्रह्मरूप॥ ३८॥ समजला तेव्हां परसोबा तो मनीं। न कळे करणी नामा तुझी॥ ३९॥ गळोनियां गेला त्याचा अभिमान। झाला तेव्हां लीन संतापायीं॥ ४०॥ संतांची करणी असे अघटित। करी दंडवत नामदेव॥ ४१॥

६. माते डावा डोळा उजवा हे सारिखे। एक समतुके पाहे दोन्ही॥ १॥ नावें वेगळालीं इतकेंचि जाण। परी काय केलें येणें सांग मातें॥ २॥ नाहीं जाणत न घडे तूं कैसी माउली। म्हणवोनी देह घाली चरणावरी॥ ३॥ वांयांविण सीण धरसीरे कासया। ऐकरे परसया सांगेन तुज॥ ४॥ नाम्याच्या खांद्यावरी ठेवोनियां हात। आपण पंढरीनाथ येत होते॥ ५॥ नाम्यासह तें भ्रांति पडली चित्तीं। म्हणवोनी एकांतीं राउळीं पुशिलें॥ ६॥ देव गुह्य बोलिले मीं तें चित्तीं ठेविलें। दुजे वरीयेलें भक्तिलागीं॥ ७॥ त्यापासूनि नाम्याची शंका येतसे आम्हां। अखंड परमात्मा जयाजवळी॥ ८॥ नाम्यासी देखोनी लोटांगणीं जावें। दुजें न धरावें आन चित्तीं॥ ९॥ इतुकें ऐकोनी परसा विनवितां झाला। काय बोलियेला रुक्माईसी॥ १०॥ माते पांडुरंगी मज भेट करावी। धरीन मी जीवीं चरण त्याचे॥ ११॥ नेणेंची हें कर्म माझी मूढमती। मज करा विश्रांति विठ्ठलचरणीं॥ १२॥ तंव ते आदिमाता सांगे परसोबासी। दैवें हें आम्हासी दिधलें नाहीं॥ १३॥ भेटवावें तुज आज्ञा नसतां मज। कोपतील सहज देवराव॥ १४॥ तूं नाम्या विनवी निरभिमान होईं। तो दाखवील सोई देवाजीची॥ १५॥ मागें होतें तें अवघेंचि विसरलों। लोटांगणीं आलों नामयासी॥ १६॥ परसा म्हणे नाम्या तुझें बरवें गाणें। जैसें कां नाणें टांकसाळींचें॥ १७॥

परसा भागवतानें केलेली नामदेवाची स्तुति.

७. कीर्तनाच्या वेळे अति सप्रेमेची। प्रत्यक्ष हृषीकेशी अवतरले॥ १॥ धन्य तुझें जिणें धन्य माता पिता। धन्य ते सरिता सागरेसी॥ २॥ तुम्ही जातीचे ब्राह्मण मी आहे शिंपी। मज काय देतोसी उपमा येवढी॥ ३॥ चरणींचा रज सेवकही संतांचा। विशेषही तुमचा आज्ञाधार॥ ४॥ नाठविसी लटिके देसी थोरपण। तुम्ही अहा ब्राह्मण आंम्ही शिंपी॥ ५॥ शास्त्रें पुराणें आसतीं तुमचीये घरीं। होती निरंतरी अध्ययनें॥ ६॥ पढतमूर्ख आम्हां न कळेची भेद। मज तो गोविंद वश्य कैंचा॥ ७॥ मी तुमचा सेवकु अंगलग पाईकु। मज आहे उपदेशु तुमचाच कीं॥ ८॥ धोतरें प्रक्षाळणें लाविणें पत्रावळी। तुमची उष्टावळी प्रसाद मज॥ ९॥ थोरत्वातें मानोनी थेरपणें गेलों। जीवनें साडिलों मच्छ जैसा॥ १०॥ करी तळमळ मज आतां सांभाळीं। भेटी करीं विठ्ठलीं नाम्या

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

मज॥ ११॥ रखुमाईचा वर आहे तुम्हांपाशीं। जाईजे तियेसी पुसावया॥ १२॥ जें सांगेल तूंतें दावील केशवातें। भक्तवत्सल जेथें तेथें असे॥ १३॥ रखुमाईनें मज सांगितली मात। तुझिया खांद्या हात श्रीहरिचा॥ १४॥ तो दाखवील तूंतें सांगेल केशवातें। माझी आण त्यातें घालोनियां॥ १५॥ पूर्वी प्रसन्न मज नागनाथीं झाला। मस्तकीं ठेविला हात तेणें॥ १६॥ तेंचि रूप पाहीं धरोनियां राहीं। शंका न धरीं कांहीं आण माझी॥ १७॥ मागें एक नाम बोलिलों उत्तर। तेणें तुझें जिव्हार दुखविलें॥ १८॥ पूर्वज पायातळीं बोलिया ब्रीदावळी। एकाएकी आकळी बुद्धि ठेली॥ १९॥ रामचरणीं शिळा उद्धरिली पहातां। ते नेली तत्काळतां परलोकासी॥ २०॥ तैसा मी पाषाण नुद्धरशील जाण। खंती करसी तरी आण विठोबाची॥ २१॥ भुजंग चाली तो नाम्यानें दाविला। तंव येरू गेला धरावया॥ २२॥ परसा पळे कैसा लागला पाठी। परतोनि पाहे दृष्टि तो अदृश्य झाला॥ २३॥ ज्ञानी ज्ञानदेव ध्यानीं नामदेव। भक्ति चांगदेव पुढारले॥ २४॥ या तिन्हीं मूर्ती एकचि पैं असती। यांची कांहीं भ्रांति न धरावी॥ २५॥ परसा म्हणे जैसी सरिता सागरीं। तैसे ते श्रीहरि मिळोनि गेले॥ २६॥

८. परसा म्हणे नाम्या मीं तुज देखिलें। प्रत्यक्ष विठ्ठलें ऐसें जाण॥ १॥ तुंच तूं विठ्ठल तूंच तूं विठ्ठल। हाचि सत्य बोल जाण आम्हां॥ २॥ तुवां पदें केलीं राऊळें सांगितलीं। येरी कवित्वें केलीं आपल्या मतें॥ ३॥ तूं शिंपी नामा आम्ही उत्तम याती। वांयां अहंवर्ती पडलों देखा॥ ४॥ आम्ही एक आपुलें दृष्टीनें देखिलें। देवभक्त झाले दोन्ही एक रूप॥ ५॥ तुझें नाम जपतां महा पातकें जातीं। तेणें होय मुक्ति म्हणे परसा॥ ६॥

९. कवित्वापरीस कवित्व आगळें पैं आहे। परि ते न कळे सोय नामयाची॥ १॥ नाम बरवें नामदेव बरवा। एकत्व बरवा परमात्मा॥ २॥ दुधावरील साय तें मी वाणूं काय। तैसें गाणें गाय नामदेव॥ ३॥ नामा तोचि कुडी केशव तोचि देव। तेथील अनुभव परसा म्हणे॥ ४॥

१०. कविरस वाटोनी क्षीरीस हिंगाची फोडणी। भक्तीवीण आळवणी तैसी कैंवी रुचे॥ १॥ तैसें रसाळ अमृत नामयाचें गीत। अनुभवी जाणत तेथेंची गोडी॥ २॥ दुधातुपाची वाटी लावोनियां होटीं। कांजी तया पोटीं कैंवि रुचे॥ ३॥ धायवरी जेवीजे तुपेसी क्षीरी। त्यावरी भाकरी नाचण्याची॥ ४॥ तैसें केशवाचें प्रेम नामदेव जाणे। तेथील अनुभव परसा म्हणे॥ ५॥

११. केशव परीसता नामा परिसविता। तयाचिया चित्ता एक आला॥ १॥ कायसी आम्ही केली बापुडी। नामयाची घडी एक नये॥ २॥ धिग् धिग् जीवित्व वायां गेलें। नामया फावलें परसा म्हणे॥ ३॥

१२. गंगातीरा तप तुवां काय केलें। योगिया सरीसें फळ लाधलें॥ १॥ नामयारे तुवां कोणें योगें साधिलें। निजरूप ठाकलें परब्रह्म॥ २॥ आधल्या जन्मीं दशमी दिंडी आणि जागरण। तेणें प्रेमें लाधले चरण केशवाचे॥ ३॥ मज पाहतां स्वामीकार्जी वेंचलासी। करवतीं धारातीर्थी नाहलासी॥ ४॥ जती पद देवोनी द्रवपण पावलें। केशवराजें मज कांहीं नाहीं वंचिलें॥ ५॥ नामा आणि केशव एकची जाणावे। परसा भागवत बोलिला स्वभावें॥ ६॥

१३. तुम्हीं गावें तेचि आम्हीं अंतरीं ध्यावें। म्हणोनी स्वभावें भावाभाव नाहीं येथें॥ १॥ आम्ही तुम्ही कांहीं नाहीं बा वेगळे। ऐसा खेळेमेळे दिवस चारी॥ २॥ जाणें तें न चुके अपकीर्ति कायसी। नामा परसोबासी विनवी तसे॥ ३॥

१४. वैष्णावांचा थाट पताकांचे भार। करिती जयजयकार नामघोष॥ १॥ पुष्पांचा वर्षाव विमानांची दाटी। नामघोष सृष्टि न समाये॥ २॥ ऋषिगण गंधर्व इंद्र प्रजापती। धन्य धन्य म्हणती नामयासी॥ ३॥ देव वेळाईत केलासे बा ऋणें।

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अनन्य अनन्य भक्ति याची ॥ ४ ॥ अलंकापूर ज्ञानिया इंद्रनील सोपान। निवृत्तीसी जाणा त्रिंबकेश्वरीं ॥ ५ ॥ नामा महाद्वारीं श्रेष्ठ हे पंढरी। प्रत्यक्ष भूमिवरी वैकुंठ हें ॥ ६ ॥ देवें नामयासी पोटासीं धरिलें। नेत्रोदकें क्षालिलें सर्वांग हें ॥ ७ ॥ जन्मोनि सार्थक तुवां बरवें केलें। वनीं मोकलीलें मजलागीं ॥ ८ ॥ तंव राहीरुक्माई सत्यभामादि प्रभृत्ती। नामा आलिंगिती प्रेमेंकरून ॥ ९ ॥ धन्य दिन सुखाचा वेदघोष विप्रांचा। वैष्णवीं नामाचा घोष केला ॥ १ ॥ तेथें पूजा नमस्कारें परसा यानें केली। हृदयीं धरिलीं चरणकमळें ॥ ११ ॥

१५. टाळ मांदळी नाहीं चाड। नाम गोड विठोबाचें ॥ १ ॥ वाहो टाळियां नाचों बागडें। गांवों नामें गोड विठोबाचीं ॥ २ ॥ परसा म्हणे येर अवघी उपाधी। नाम गातां सिद्धि होईल रोकडी ॥ ३ ॥

१६. पैल मेळारे कवणाचा। नामा येतो केशवाचा ॥ १ ॥ ब्रीद दिसतें अंबरीं। गरुड टके याच्या परी ॥ २ ॥ परसा येतो लोटांगणीं। नामा लागला त्याचे चरणीं ॥ ३ ॥

१७. कृतायुगीं नामा प्रल्हाद पैं झाला। स्तंभी अवतरला नारायण ॥ १ ॥ त्रेतायुगीं नामा अंगद कपि असे। रामचंद्रें त्यासी आलिंगिला ॥ २ ॥ धन्य तो नामा धन्य तो नामा। पढिये पुरुषोत्तमा जीवाहुनी ॥ ३ ॥ द्वापारीं नामा ऊद्धव गहन। नारायण क्षण न विसंबे ॥ ४ ॥ कलियुगीं नामा संत साकार। न कळे तो पार ब्रह्मादिका ॥ ५ ॥ चहूं युगीं नामा वेगळा नाहीं झाला। म्हणवुनी पुरला नारायण ॥ ६ ॥ विष्णुदास नामा केशवीं रंगला। देव आत्मा झाला म्हणे परसा ॥ ७ ॥

१८. अणुमाजीं राम रेणुमाजीं राम। तृणकाष्ठीं राम वर्ततसे ॥ १ ॥ बाहेरी भीतरीं राम चराचरी। विश्वीं विश्वाकारीं वर्ततसे ॥ २ ॥ रामेंविण स्थळ रितेंचि पैं नाहीं। वर्ते सर्वांठायीं रामींराम ॥ ३ ॥ परमा भागवत कायावाचामनें। श्रीरामावांचून अन्य नेणें ॥ ४ ॥

१९. इंद्रनील तनु प्रसन्न वदन। दशन दीप्ति जाण हीरयाचे ॥ १ ॥ अडोनियां सरा पाहूं या गोपाळ। डोळिया सुकाळ होईल आजी ॥ २ ॥ कंठी वैजयंती नयन पुंजाळती। आरत्या ओवाळिती गोपबाळा ॥ ३ ॥ काळासी अटक योगियांचें हीत. परसा भागवत जवळी उभा ॥ ४ ॥

विसोबा खेचराचे अभंग

१. जें जें असेल प्रारब्धीं। तें न चुके कर्म कधीं। होणारासारखी बुद्धि। कर्मरेषा प्रगटे ॥ १ ॥ न कळे पुढील होणार। भूत भविष्य हा विचार। कर्मधर्म तदनुसार। भोगणें लागे सर्वथा ॥ २ ॥ ऐसा लिहून गेला विधाता। मग कासया करावी चिंता। आपुलिया संचिता। कर्मरेषा प्रमाण ॥ ३ ॥ जैसें असेल आचरण। घडलें असेल पापपुण्य। तैसें सानुकूल होतील कर्म। मान अपमान जन करिती ॥ ४ ॥ काळ अनुकूल अथवा प्रतिकूळ। परि साडूं नये आपुलें धैर्यबळ। अनाचारी मन केवळ। नये बाटवूं सर्वथा ॥ ५ ॥ अखंड वाणी हरिस्मरणीं। मुख विश्रांति कीर्तनीं। खेचर विसोबा म्हणे प्राणी। मनुष्य देह दुर्लभ ॥ ६ ॥

२. छंदे छंदे तीर्था जासी। परि अविद्यासी न सांडिसी। वांयां आत्मरूप कष्टविसी। तेणें न पावसी रे नित्यसुख ॥ १ ॥ ध्यान धारणा मुद्रा जप। यम नियम करिसी तप। तेणें तुझी न चुके खेप। आराधी स्वरूप एकभावें ॥ २ ॥ परस्त्री तितुकी जाण रे माता। ऐसें मनीं मानी रे तत्त्वतां। परद्रव्य येऊं देऊं नको रे चित्ता। मग गुरुनाथा सेवी तया ॥ ३ ॥ तो सांगेल गर्भखूण। तेणें तुज होईल आत्मज्ञान। फिटेल भ्रांति देखसी निरंजन। शून्य भुवन देहामाजीं ॥ ४ ॥ तेथून सुनीळ प्रकाशु। सोहं गर्जना रात्रंदिवसु। आणिला राजा परम पुरुषु। भोगी रहिवासु आत्मज्ञानी ॥ ५ ॥ हे जरी सत्य न मानिती मनीं। ते नर पुढती येती ये जनीं। खेचर विसा करी विनवणी। कोप न धरी रे नामया ॥ ६ ॥

॥ पुंडलीक वरदे हरिविट्ठल ॥

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

श्रीनामदेवमहाराज

यांच्या

अभंगांचा वर्णानुक्रम

अभंग	अभंगांक
ॐ, अ.	
ॐ नमोजी	२२५३
अकरा लोचन	२११८
अकस्मात तेथें	२१६
अक्रूराच्या घरीं	२०८
अखंड जयाला	१३३७
अखंड मुखीं	६७३
अगणित गुण	४५५
अगम्य सामर्थ्य	५१९
अगाध भवजळ	४०३
अगाध महिमा	१२६१
अगा पांडुरंगा	१२४१
अगा ये विठोबा	१२७८
अगे तूं माउली	१५०६
अग्निमाजी पडे	१६६१
अग्नी जाळी तरी	६५८
अर्चन विष्णूचें	१८८९
अच्युता अनंता	४६७
अच्युता अनंता	२०५८
अठ्ठावीस युगें	१५७२
अठ्ठावीस युगें	१८१६
अठ्ठावीस युगें	२०३१
अडखळुनि	१५
अण बोता चरण	२२००
आणिमादि सिद्धां	४८३
अतिथी आलिया	१९२५
अधरीचें अमृत	४६१
अन मडका	२२३८
अनाथ अनाथ	१५५०
अनाथांचा नाथ	१३६७
अनाथांचा नाथ	१६५१
अनाथांचा नाथ	१६५६
अनाथासी साह्य	१६५५
अनिर्वाच्य ब्रह्म	३२३
अनुभव हा	१०५७
अनुसरे त्यासी	२०११
अनेक पुष्पांच्या	९६
अनंत जन्मींचें	१६५८
अनंत जन्में	६९१
अनंत तीर्थांचें	४०८
अनंत ब्रह्मांडें	३०५
अनंत ब्रह्मांडें	६९३
अनंत म्हणती	३८४
अनंत हे कळा	४७२
अनंता श्रीधरा	४६३
अपत्याचें हित	१५९३
अपराध कोटी	१४८६
अपराधाच्या	१६१२
अपराधाविण	४८०
अपराधी तरी	१७४८
अभक्ताचें स्थळीं	१९००
अभिमानें घाला	१६०
अभिमानें लोक	४३८
अभंगाची कळा	१४०६
अभ्यासिले वेद	७१७
अमराचें ठेवणें	३४१
अमृत टाकून	१३४१
अमृताहूनि गोड	१४८४
अयुत गायी ब्राह्म-	३३
अरूप रूपासी	४२८
अरे अरे कान्हया	२९३
अरे अलगटा	२०६०
अरे नामदेवा	१२६९
अरे नाम्या काय	१३१४
अरे मना तूं	२०६२
अरे मना शोक	२०७०
अरे विठोबा आतां	१२९३
अलक्ष्यी अच्युता	५२३
अलंकापुरीस	१२२०
अल्याड पल्याड	१०४३
अवघा संसार	१७९६
अवघा संसार	१५०१
अवधिया आचार	७१९
अवधि हे पंढरी	४०७
अवधि हे पंढरी	४१७
अवधि जयजय	११०२
अवधि चित्तवृत्ति	२००९
अवघें तें दैवाचे	८३३
अवघे ते संसारीं	२०१९
अवघे निरंतर	१९५५
अवघे समाधान	१९५६
अवघे हो ऐका	२०४४
अवघे तीर्थ	३८२
अवघे हें पवित्र	४१८
अवघ्या विद्येचा	११५४
अवचट देह	१९२३
अवतरले हरी	२२१
अवताराची राशी	४४५
अवती बिसारु	२१९७
अवश्य म्हणोनी	२०९
अविट बोलणें	११९४
अव्यक्त परब्रह्म	२८२
अष्टोत्तरशें तीर्थें	१०३७
अष्टोत्तरशें वेळ	१०७७
असभेद जगमें	२२४२
असो आतां किती	१८०९
असतां सुखरूप	८९४
असत्याचे मळ	६५२
असोनि न दिसे	१५१५
अहर्निशीं कंस	१४१
अहो त्रिभुवना	३८६
अहो सदाशिवा	६०७
अहंकार पोटींचें	१०५८
अहंकारें आथिलें	१८६२
अज्ञान बापुडें	१६५०
अज्ञान बाळक	१५४९
अज्ञान बाळक	२२६३
अज्ञान बाळकें	४८२
आ.	
आई जें शिकवी	१३२०
आई मज म्हण-	२२९
आकल्प आयुष्य	८८३
आकारिक नाम	६९९
आकाश गड-	२३७
आकाशींची वाणी	२३
आकाशीं पुष्पक	१२३६
आगमीं नाम	२०१७
आघात न चले	२२६०
आचमन करूनि	११७०
आज नामें विठ्ठल	२२३०
आजि आंवतणें	१२६०
आजिचा दिवस	२३६१
आजि महासुखें	८४३
आठवितां मनीं	१७१०
आडलिया को-	१७२२
आणा उचित	२४१
आणिक न मागे	१७२८
आणिक वाढें	१०७३
आणीक ही मंत्र	६६०
आणीयले का-	२२२९
आणूनि सुरभि-	१४२
आतां आहे	७४४
आतां ऐका कवित्व	२३३४
आतां जावें वेगीं	९३६
आतां पदपदां	१०३६
आतां पांडुरंग	१९८५
आतां मज भय	१८१८
आतां माझी चिंता	१६८८
आतां स्तुति पुरे	११३५
आतां होणार	१५९१
आत्मत्वाच्या-	१८०४
आदरें जपतां	७६७
आंधळ्यांनें	२११६
आधींच कृपाळु	६०२
आधीं चैतन्य	१३८३
आधीं मी लटिका	१४५९
आधीं रचिली	४१६
आनंदें खेळत	११२
आनंदें वनांत	१४४
आपण कर्ता	३३१
आपण वेगळा	१२७६
आप तेज वायु	१३८७
आप तेज वायु	२०३३
आपत्याचे परि	१७५४
आपुलिया अंगें	१२०२
आपुली करणी	१८८८
आपुली पदवी	७०३
आपुल्या सुखाचा	१७६४
आपुलें रूपीं	१४३७
आपुलें शरीर	८८०
आपुलें हित	१८७७
आमुचा विठ्ठल	३७०
आमुच्या स्व-	११८४
आह्मांवरी करि	१६२

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक
आह्मां कीर्तन	१२५५	इ.		उपमन्यु बाळा	५३८	ऐका कलियुगाचा	१८२५
आह्मां जतन	१८११	इच्छामात्रें मोडी	१९०	उपाधि निर्मळ	३४४	ऐका कलियुगाचा	१८२६
आह्मांपाशीं	१४२५	इतनो कहत	२२०७	उपाय असतां	१८७८	ऐका दामशेटी	१३१५
आह्मां सांपडलें	१४२९	इतुकियासाठीं	५७४	उभयतां तेव्हां	७९	ऐकां पंढरीचें	४०२
आह्मांसी चिंतन	१८०५	इतुकें देखोनियां	१३७०	उभयतांनीं नमन	११३८	ऐकावें चरित्र	१५२
आह्मां संगती	२०५३	इतुकें मागतसें	११०	उभा भीमातिरीं	४८९	ऐका श्रोतेसान	२२९७
आह्मी कांहीं नेणों	१४५५	इंद्राचा विभाग	१३४	उभा विटेवरी	४६४	ऐका सावधान	५५७
आम्हीं कीर्तन	२१३१	इंद्रायणीचे तटी	२३७१	उभें वृंदावन	६१४	ऐकें गोणाई म्हणे	१२८३
आम्ही छाक नेणों	१६६०	उ		उलिसा प्रपंच	१४२७	एकें मोक्षाची	१७२०
आम्ही तुझे असो	१५२३	उगमापासुनी	१०७२	उसाचे शेजारी	१३४२	ऐकोनियां कानीं	२३५५
आम्हीं दिला जीव	१७०९	उगवला दीन	१०३१	ऋ		ऐकोनियां वाणी	५५६
आम्ही देह केलें	१८१७	उघडिल्या दिशा	११८८	ऋषि म्हणती हरी	११८७	ऐकोनिया	२२७६
आम्हीं परीट	१८१५	उचलिला कम-	३६	ए.		ऐकोनीं ऐसी	९०६
आम्ही बिठोबाचे	७४५	उचितानुचिता	५०६	एक अनेक	२१८७	ऐशा दोघीजणी	५९०
आम्ही शरणा-	१६२२	उठले निवृत्ति	१३३४	एक एकादशी	४२७	ऐशा विचारें	१६९५
आम्हीं शरणा-	१६२३	उठले वैष्णव	११४९	एक अंजनी	५०४	ऐशी स्तुति नमना	१०१८
आम्हीं शरणा-	१६२४	उठले ज्ञानेश्वर	१३३५	एक गोप तेव्हां	७३	ऐशी प्रदक्षिणा	१०००
आम्हीं स्वर्गसुख	४४१	उठवितां बाळ	२२७२	एक गोक्षीर	४७९	ऐसा आज्ञापी	२०२४
आम्हीं हाटा जाऊं	१२४८	उठा अरुणोदय	२३६५	एकचि हें तत्त्व	१८८४	ऐसा कळवळा	१००६
आरुष साबडें	१६०८	उठा उठा प्रभात	२३५७	एकचि क्षरलें	७७५	ऐसा तो ब्राह्मण	२३००
आला जगदो-	४३	उठा उठा साधु-	२३६०	एरट येकला	६९६	ऐसा नामा बोले	१७६६
आला तो सोपान	१३३६	उठाउठी जावों	४३०	एक तत्त्व एका	३३२	ऐसा नित्यानित्य	८८९
आला द्वारावती	८८८	उठा जागे व्हा रें	२३५९	एक तत्त्व त्रि-	१९३१	ऐसा निवृत्ति	१०२६
आला वनमाळी	१२०	उठा पांडुरंगा	२३६४	एक तत्त्व हरी	७७७	ऐसा सोपान	११०९
आला वैष्णवांचा	८४५	उठियले देव	११५९	एकदां श्रीकृष्ण	७६	ऐसियांचें जो	१०३४
आलासि आरतें	३९२	उठिले वैष्णव	११३२	एक भानु अवघा	८६५	ऐसी आरती	२३६८
आलिंगन पडलें	९९६	उठिले वैष्णव	११२९	एकमेळी जेविती	११६०	ऐसी ऐकोनी	९२६
आलिया संसारीं	८१५	उठोनि प्रातःकाळी	९४	एक म्हणे धरी	६५	ऐसी चाल नाहीं	१५६७
आला गोकुळा	५४	उठोनियां प्रातः-	९५	एक वाहूं तुळ-	५३२	ऐसी चिंताक्रांत	१३२९
आलेनो संसारा	१९५३	उठोनियां प्रातः	६१८	एक वेळ नयनीं	१९८९	ऐसी ते जेवणी	९४३
आलेनो संसारा	१९५४	उठोनियां प्रातः	१२५९	एक वेळ भेटी	३८९	ऐसें अलंकापुर	१०१६
आवडे जें जीवा	३६८	उडाली पक्षिणी	१५१६	एक संवत्सर	१०२	ऐसें असतां	५६८
आशा तृष्णा माया	५४०	उतरिलीं विमानें	११११	एकाएकीं दैव	२२८८	ऐसें ऐकोनि	९१५
आशा तृष्णा व्याघ्र	१४१९	उत्कंठित तप	२०६४	एकांत एकला	७७३	ऐसें ऐकोनिया	१३१७
आशा नाहीं ज्याला	८५३	उत्तम नरतनु	२१४२	एकादशीं दिनीं	१९२८	ऐसें काहों एक	२२९३
आशा मनीषा	१४५१	उत्तम हा चैत्र	३०२	एका ब्राह्मणाचे	२११२	ऐसें जगमें	२२०८
आश्रमविधि करावें	८९०	उदकीं बुडतां	२२४५	एकी एकादशी	१९२७	ऐसें झालें पूर्ण	२२९६
आश्वासोनि देव	२२९५	उदरास भरण	१९४२	एके ठायीं करुनी	१२३	ऐसें तीर्थ कोणी	४०९
आषाढीं कार्तिकीं	१८०३	उदार कृपाळ	१६४६	एके दिनीं भायां	२३०२	ऐसी तीर्थ कोणी	४३३
आषाढीं कार्तिकीं	३६७	उदाराचा राजा	२००५	एके दिनीं रत्न	५५४	ऐसें तीर्थ सर्वो-	१०२३
आषाढी पर्वणी	२३४६	उदाराजा राणा	१६४७	एके हातीं टाळ	२००२	ऐसें देखिलें	१००४
आस धरोनि पोटीं	१५३८	उदित कमळें	११८२	ऐ.		ऐसे नित्यानंद	९२३
आसनीं शयनीं	८१७	उदित झालें मन	१०४७	ऐकता कीर्तन	६८५	ऐसें परिसलें	९९४
आसनीं शयनीं	१६७०	उद्विग्र मनीं करीं	१३५५	ऐकतांचि जीव	५८७	ऐसे पांडुरंग	१००९
आसनीं शयनीं	१६८७	उपजोनि सभा-	१४००	ऐकतांचि शब्द	५६७	ऐसें बहुत काळ	५६४
आसनीं शयनीं	१७१२	उपदेश विठ्ठल	७१४	ऐकतां निरोप	१२३५	ऐसें बोलोनियां	१००३
आहे त्यांचे मनीं	१३६२	उपदेश सुगम	७७४	ऐकतां वचन	२३०३	ऐसे भक्त जेवुनि	१००५

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

अभंग	अभंगांक
ऐसे मन राम	२१६७
ऐसें माझें मनीं	१५८३
ऐसें वदोनी	१०२१
ऐसें संतोषले	१०१४
ऐसें सुखरूप	९२१
ऐसें स्वर्गवासी	१०१२
ऐसें हो असतां	२२५९
ऐसो राम राय	२१६२
ओ.	
ओढळ तें सुणें	१८७०
ओळखे बापाला	१०४
औ.	
औट हात	१९६६
औट हात घों-	२१३६
अं.	
अंगाची सेज	४५१
अंगोळिये विठा	१३२६
अंतकाळीं मी	१४११
अंतर बाहेर	१०७०
अंतर बाहेर	१३५६
अंतरयामीं जाणे	२०१
अंतरीं आवेश	१८७५
अंतींचा लाभु	१९२१
अंतःकरणीं	२०९३
अंबऋषि रुक्मां-	५१३
क.	
कटीं कर उभा	१६३१
कडू वृंदावन	१८४९
कये बैसोनि	१९०२
कर्दळीं फळ	८४०
कपटनाटका	१६२९
कपटाचें कुपथ्य	८६८
कपाळीं कपाळ	५८८
कबीराचे घरीं	२३३५
कमळगर्भा मनीं	३४७
कर्मजड मूढ	२०३०
कर जोडोनियां	१०१९
करावया वन-	५१
कराव सार्थक	८९७
करितसे स्नान	३०६
करितां तें युद्ध	२३२७
करितां वेदाध्ययन	८२८
करितां हरिकथा	७३८
करिती गायन	१७४
करीं घेऊनि	६५७
करीन ह्मणसी	१६६३
करीना साधन	१८६४
करील जो प्रश्न	२०
करुणा बहुत	४७५
करुणेचीं उत्तरें	१७५६
करुनियां स्नान	४२
करूं हें कीर्तन	७८९
कलियुगीं जन	१४६८
कलीचिये अंतीं	२२५२
कलंक रहो	२१७५
कल्पतरुतळीं	१६३८
कल्मष हरती	१९४१
कल्याणीचा शिंपी	१२४४
कस्तुरी कुंकुम	३५१
कस्तुरीचा टिळा	१५५५
कहां करूं जातो	२१६६
कळवळी मन	११३३
कळावंताच्या	२०५४
कां करितोसी	७९८
कां करीसी सोस	६७१
कां करीसी हव्यास	७१०
काकुलती येती	१३५
काखे पान अंगणीं	१४८९
कागदीचें वित्त	१६२५
कागाचिये विष्टे	१२५३
कां गा केशिराजा	२३४७
कां गा मोकलीलें	१५४३
कांचनीक भक्ति	१८३९
कांचीपुरी राजा	५६०
कांडितांचि कोंडा	१८७१
कां हो तुम्हीं गर्वें	१२४३
काढीतसे दृष्टी	१९९
कार्तिकी एकादशी	४२६
काता चिता गाईला	२१६९
कान्हा तूं आजी	२६७
कान्होबा निवडी	२९२
कापड घेऊनी	१२७०
काय अपराध	१६१८
काय आह्मांपाशी	१६६६
काय करूं आतां	१६६९
काय करूनि	१८६३
काय केलें मागें	१६३५
काय गुणदोष	१४३१
काय गुणदोष	१४३०
काय चाड आह्मां	१८८२
काय तुज देवा	१६३६
काय देतील	१७२९
काय देशील	१११
काय थोरपणा	१६३४
काय पांडुरंगा	१५४६
काय पुण्य केलें	४२४
काय मागूं विठ्ठल	१७३५
काय माझा आतां	११
काय म्यां बोलावें	१२१७
कायरे गडगडीत	५१०
काय वहिनीनें	२३२२
काय वाणूं आतां	४८८
काय सांगूं तुझी	४१०
काय सांगों देवा	१०५६
काय सांगों कर्म	२१०३
काया मनें वाचा	१६७८
कायारूप जिचें	१९१४
काया हरपें	१६५२
कां रे तूं शिण-	१९११
कारे विष्णुदासा	१७८३
काल भई बापा	२२०९
कालिंदीचे डोहों	११३
कालिंदीचे तिरीं	१२७
काशिये कनोजा	१७५३
काशीराज क्षेत्रीं	४२५
काशी हे पंढरी	४१२
काशी अग्री असे	३३८
कांसवीचीं पिली	१४८०
कांसवीची पिलीं	१८१०
कांसवीचे दृष्टी	७१२
कांसवीचे दृष्टी	१९८७
कासवीस प्राण	१०५९
कांहींच मी नव्हें	१६३३
कांही दिवस	७५
कांही सांगोनि	१८२७
काहेकु किजे	२१७१
काहे रे मन	२२१७
कां हो मोकलिलें	१५५४
काळ देहासी	१७०२
काळ वेळ नसे	६८७
काळ गे दादुला	३४८
काळे गोरे धनु-	३१५
किती तुला देवा	१५९९
किटकीते भयें	१४८८
कीर्तनाच्या सुखें	६८६
कुंकुम केशराचें	११६६
कुटिल कुबुद्धि	७५८
कुटुंबासहित जावें	८९३
कुबेराचे पुत्र	६९
कुंभार तो राका	२३४९
कुलाल आपुल्या	१३४७
गुलालाचे कुंभ	१३४६
कुलूप अर्गळा	१३१३
कुश्चळ भूमिवरी	१२५२
कुस्ती खेळतां	२९१
कुळगुरु वसिष्ठ	२९४
केधवां भेटसी	१५३७
केला नमस्कार	२२७९
केशव आराध्य	३८३
केशव कैवल्य	७५४
केशव चरणीं मनें	१६९४
केशव नाम गाय	७६६
केशव नारायण	८००
केशव पुसें नाम-	१७८०
केशव पैं मुक्ति	५४१
केशव म्हणतां	१९९२
केशव म्हणतां	७६८
केशव म्हणे ना-	९३३
केशव म्हणे	९३४
केशव म्हणे	९६१
केशव म्हणे ना-	१७८७
केशवाचे प्रतापें	७९७
केशवाचें प्रेम	१२५६
केशवाच्या नामीं	३५८
केशवा परतें	१८९२
केशवा माधवा	१२४६
केशवासी नामा	१३१०
केशवासी पाहे	८०३
केशिराजा आदि	४७१
कैलासभुवनीं	२१४१
कैलासाचा वास	१०४४
कैलासीचा देव	५५२
केसा पांडुरंगा	१४७९
कैसे तीरत बहु	२२१०
कोई बोले निरवा	२२३५
कोकिळे चित्कळा	२५३
कोटिशा आदित्य	३२
कोटि दिवाळ्या	१८१९
कोटी सुर्यप्रभा	१८२३
कोण जाणे माझे	१०५५
कोण होईल-	१५८४
कोणी एके दिवशीं	८३
कोणे एके दिवशीं	२२६८
कोल्हीं काय को.	५३५
कोळशाशीं दूध	१८९६
कौतुकानें तेथें	११४७
कौस्तुभ सोज्वळ	४९२
कंस धाडी अघा	९८

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभंग	अभंगांक
कंसचिया घरा	१७७
कंसासूर सारे	१८१
कंसा हातीं विडा	२२४
कंसें पाठविला	५३
कंसें पाठविली	४८
क्रिया कर्म धर्म	१५००
क्रिया कर्म धर्म	२००८
कृत त्रेता द्वापार	४१४
कृपणाचें धन	१६७३
कृपा उपजली	६८
कृपा करोनि	१६५७
कृपावंत झाली	११५५
कृपावंत समर्थ	१५१०
कृपेचा कोंवळा	२०४८
कृपेची साउली	१३९३
कृपेच्या सागरा	१७८५
कृपेच्या सागरे	९६८
कृष्ण अनुसंगें	२८४
कृष्णकथा सांगें	६७७
कृष्ण डोलतु	२६०
कृष्णनाम श्रेष्ठ	७००
कृष्णभक्तिवीण	१०८
कृष्णराम लीला	२१३
कृष्ण सहाय्या	२१००
कृष्णाचें कीर्तन	१८३२
कृष्णातें चैतन्य	२४०
कृष्णा पांच खाणी	१३१
कृष्णा लावितसे	४९
ख.	
खगावरी स्वारी	४९१
खवळतों आतां	१४०७
खाटिकाप्रमाणें	१८८७
खांद्यावरी पांवा	२३१
खेचरी धरिली	१३७२
खेद दुःख करी	१०५०
खेळ मांडियेला	२०९१
खोल बुद्धीचा	४५६
ग.	
गगनपंथें शुभ्र	१०१३
गगनीं ध्रुव तुंवा	४९०
गडियांसी तेव्हां	१३२
गडी आणि रमा-	९९
गड्यांनो राजा	२४२
गणपति पूजिले	२०७१
गणेश नमूं तरी	३
गर्भवास ऐसा	१४१४
गरुडपाराजवळी	१२६२
गरुड मंडल	२१५८
गरुड हनुमंत	१०९६
गरुडावरी हरी	१५६२
गरुडासी मग	१२३४
गहिनीनाथें मज	११९६
गहेरी करके	२२३७
गाण जरी म्हणो	४
गाणी मी गाईलों	१६००
गाणें गातीरे-	७३२
गायी गोप तेव्हां	१४५
गायी घेवोनियां	१६५
गायीवत्सगोपाळ	१०१
गाऱ्हाणें सांगाया	६४
गीता गीता गीता	९१०
गीता गीता म्हणता	९११
गीता हेंचि गंगा	६८८
गुंडाळिल्या जटा-	३१८
गुण आणि गंभीर	२३६९
गुण दोष त्याचे	२००३
गुण दोष माझे	१४४२
गुरुराव गुण	२०४५
गुरूच्या वचनें	२०४७
गुळ गोड न लगे	१९९३
गेला परमहंस	१८५६
गेलिया वृंदावना	२४६
गेले दिगंबर	१२१४
गोकुळा येवोनी	१७८
गोकुळीं अनर्थ	९०
गोकुळीं गोपिका	४२९
गोणाई म्हणे	१२६७
गोणाई म्हणे	१२७५
गोणाई म्हणे	१२९५
गोणाई म्हणे	१२९८
गोदातीरीं उत्सव	११५१
गोपाळाशीं खेळती	२७८
गोपिका म्हणती	८२
गोपिकेचा मेळा	१७५
गोपी गोप तेथें	८०
गोपीनें घृतासी	७४
गोमुखीं गोवुनी	१८३८
गोरा जुनाट पैं जुनें	१३४८
गोरे सांवळे	३१६
गोवळे म्हणती	२३३
गोविंद गुणाचें	४७७
गोविंद गोपाळ	७२८
गोविंदा माधवा	१४०
गोसावीपणाचा	१८४४
गोक्षीर लाविलें	६४९
गौतम वसिष्ठ	८६१
गौळणी ठकविल्या	२६३
गौळियांचीं पोरें	१००
गौळियांचे घरीं	१९४५
गौळियांचें घरीं	२१७
गौळी म्हणती	१४८
गंध आणि अक्षता	१०६१
गृहस्थ बैसला	१८२८
घ.	
घरकी नार	२२२३
घरधनी यांणीं	१३२१
घरा जावें ऐसें	१३३
घरा येतां बाळ	२२७४
घरीं नांदतो	१९१५
घागरिया छंद	२५९
घालितसे पंथ	१९६
घालितसे वेढे	११५
घालीन लोटांगण	२३७४
घालूनि आस	१४७१
घाव घालूं जातां	५७९
घेऊनियां गुरु	२२६०
घेऊनियां नाम्या	१७६८
घेऊनियां पत्र	९९८
घेरे घेरे नाम्या	१७४७
घेसी तेव्हां देशी	१५१३
घोंगडें हें नव्हे	२१३५
च.	
चक्रतीर्थी पाहा	१०५४
चक्रवाक पक्षी	१०
चण्डभिल्ल तेणे	५८४
चतुर्भुज दिसे	१०३
चतुर्भुज शाम-	१०१५
चरणाशीं शरण	१६१
चवदाशें वर्षे	११५२
चहूंकडे स्वर	२३१३
चांगदेव योगी	११५८
चांगा वटेश्वर	११३१
चातुर्यसागरा	५२६
चांदणें नावडे	१९१९
चार मूर्त चार	२२२५
चारी वेद गात	५२७
चारी वेद तुझ्या	४५२
चारी वेदां ज्याचा	१९५
चालती कुळवाडी	२१३०
चालली ते यात्रा	२३५२
चाल सखिये	२६१
चालियेले तेव्हां	९३
चालिला देवाचे	२३१६
चालिले घेऊनि	११४८
चालिलें बाळक	२२७३
चाळक माझें	३५७
चिंतातुर देहीं	६४८
चिदानंदघन	२७६
चिदानंद चिद्रूप	२७५
चिदानंद दोंदिल	२७३
चिदानंद दों	२७४
चेईला तो जाण रे	२०४६
चेंडू देखोनिया	८९
चैतन्याचा खेळ	२०९०
चैतन्याश्रम सं-	९००
चोखामेळियानें	२३५३
चोखोबाची कांता	२३५४
चोरां ओढोनिया	१४३२
चोरूनि खादलें	५१७
चौदाजणी ज्याच्या	१८२
चौदा भुवनें	१९१
चौदाशें वरुषें	१३४४
चौऱ्यांयशीं लक्ष	२१३४
चंदनाची ओवरी	२३७२
चंद्रतारांगण	६६८
चंद्रबिंबासरी	२५८
चंद्रभागे तिरीं	८३१
चंद्रभागे तिरीं	१४०४
चंद्र सूर्यादि	१८५९
चंद्राच्या प्रभेनें	१५३
छ.	
छत्र चामरें	१०७१
छंदा धिस्थ हें	१६५४
ज.	
जगजेठी तेव्हां	११४
जगत्रजीवना	१४७०
जगत्रय जीवन	८८४
जगदानिया हें	१४८५
जगीं पेठा जाण	३९६
जड हेंचि खळें	१९२४
जत्र जाउ	२१९९
जनजसवंत	२३४१
जन तुह्मी करा	२१३२
जन नामदेव	२१५४
जननिये जिवलगे	१५३५
जनार्दन कृपाळुवा	१७४४
जनिता जीवविता	१२७२
जन्म गेले याचे	२३८

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभंग	अभंगांक
जन्मजन्मांतरीं	१७६९
जन्मजन्मांतरीं	५५
जन्ममरणाचें	१६२०
जन्ममरणाच्या	१७७२
जन्मल्यापासुनी	१४४८
जन्माचें कारण	७२७
जन्मा घेऊनिया	१९४७
जन्मासी येऊनि	१२६८
जन्मासी येऊनि	२१३३
जन्मोजन्मीं आह्मी	१७९४
जप तप अनुष्ठान	६८०
जब देखा तब	२१८२
जयजयकारें टाळी	११४२
जयजयकारें	१२१३
जय विठ्ठल श्री	५५१
जयाचें उदरीं	१८९९
जयाचें दर्शन	९०७
जयाचेनि तीर्था	८५९
जयालागीं हृदय	३६९
जयासी लागली	७६१
जरी म्हणसी	१३७५
जव्हारियाचे पुढें	१३५३
जहां तुम गीरिवर	२१४४
जळाचा जळ	७९५
जळीं बुडबुडे	१९५७
जाऊं पाण्या	२४८
जाऊं म्हणतां	४३९
जाखाई जोखाई	१८८५
जागारे गोपाळांनो	१९९८
जाणावला भाव	२३०४
जाणसी ते करा	१६०६
जाणीव शहाणीव	१५७९
जाणोनियां यम	५७६
जातीचे हे शिंपी	९४४
जांती ब्रह्मादिक	११२६
जादीन भगता	२१९२
जानकी शुद्धी	८९२
जाय जणा देह	१९६३
जायांचें सोंवळें	८७१
जाये जाये जाये	२५०
जावोनियां नांम	१३१२
जिव्हें केशवाचें	२०१५
जीव तूं प्राण	१४६६
जीवन्मुक्त केलें	१५३०
जीवन्मुक्त झालें	१५०३
जीव प्राणें एक	३७२
जीवलग कोण	१५४५
जीव विठ्ठल	३६१
जींव शिवग्रामीं	६९७
जीवींचें गुजगौप्य	९५९
जीवींचें गुज	९५४
जेऊनियां स्वस्थ	१०८३
जेऊनियां हाती	१२४७
जें जें घडेल	१४९५
जें जें पुण्य जोडे	२०१८
जें जें सुख आम्हीं	११९५
जेथें जेंथें मन	१६५९
जेथें नाहीं कांहीं	३२८
जैसा वृक्ष नेणें	१४७७
जैसी भुकेप्रति	२२२४
जा कां करी	१८७९
जो गुरुदैवत	२२२१
जो जो जो जा	२८७
जोडोनियां करा	१८८
जोडोनियां हात	१५५
जोडोनियां हात	५७७
जो भक्तजन	२७७
जो राज दे	२२४०
जौलग राम	२१६८
जंबुया द्वीपा-	२१०८
जंव हंस काया	१९२२
ज्याचिया रे मनें	१४७२
ज्याचें दैव त्या	१३००
ज्याचें मुखीं नाम	७८५
ज्यातें ध्यानीं	२३३०
ज्यालागीं जोडिशी	१९०४
ज्यासीं विन्मुख	७४६
ज्यो कोई वसुधा	२१४३
झ.	
झणी दृष्टी लागो	१८२४
झळकती पताका	४२३
झांकावलें डोळे	२३१२
झाला अभिमान	१५१
झाला अस्तमान	१२१
झाला कासावीस	२१०२
झालासी हरिभक्त	१३३९
ट.	
टाकियेलें आह्मी	१६७
टाळ दिंडी हातीं	१५२०
टाळ विणे मृदंग	१०७५
टाळ विणे मृदंग	११८५
टाळ हे मृदंग	११९३
ठ.	
ठायींहूनि जाती	५९
ठेउनी भोंवताले	२२८५
ड.	
डवरला गिरी	५५३
डोई बोडून	१८४६
डोलत डोलत	३४३
डोहामाजी वास	२३५
डोले शिणिले	१५०८
त.	
तडक फुटला	५०९
तत्व पुसावया	१६१४
तत्वमसी वाक्य	२०५०
तनु हें आकाश	१८४
तप तीर्थ दान	७६५
तप थोर देखिलें	२००७
तप न करिसी	२०४१
तपांचें पैं तप	७९०
तपें केलीं दाटो-	१५६५
तपें दाने व्रत्तें	६६७
तयाची सुंदरा	२३०१
तयाचे मस्तकीं	११८
तयेकाळीं देव	२१८
तयेवेळीं तो	२२५५
तरले तरती	६६५
तरावया संसार	१८१२
तरीच येईन	१२२२
तरी मी गाण-	१४५७
तळवे तळहात	२४५
तळीयाचे पाळी	१५६०
ताकहि पांढरें	१८५४
तांतडीनें जाती	३८
तान्हेलिया जाय	१५६९
तान्हेलों भुकेलों	१४९०
तापत्रय अगनीची	१४६४
तापीचीये तीरीं	११७९
तीघांजनांलागीं	१०६६
तिन्ही देव जैसे	९०९
तीर्थ तपरासी	६६६
तीर्थयात्रेप्रति	९१८
तीर्थ विठ्ठल	३६२
तीर्थासी जाऊनि	१८०७
तीर्थे करोनी	९३२
तीन छंदे खेलो	२२४३
तुज गीता गातां	१६११
तुज दिले आतां	१६८१
तुज नेणों गा	१४१०
तुजवांचुन कांहीं	१५९७
तुजवांचोनियां	१६६
तुज विकोनि	१६४५
तुजविण आह्मां	१४५२
तुझाचि अहंकार	८२१
तुझा तूं आहेसी	१७९०
तुझा दास मी	१६४१
तुझा नामा तुज	१२७९
तुझा माझा देवा	१६२७
तुझा मोडिला	१४१
तुझा विष्णुदास	१५६१
तुझिया चरणाची	१६०४
तुझिया चरणाचें	१६७४
तुझिया नाम्यानें	१२८१
तुझिया पायांचे	१५९८
तुझिय पुत्रासी	५८
तुझिया सत्तेनें	४६६
तुझिया संतांची	१४८२
तुझिये चरणीं	१५८८
तुझे कीर्तना	५१८
तुझे गुणनाम	१६९०
तुझें चरणीं चित्त	१६८२
तुझे चरणीं सुख	१७४०
तुझें तुज सांकडें	७८३
तुझें नाम म्हणतां	१६९१
तुझें निजसुख	१३७४
तुझें नित्य सुख	१६२१
तुझें पायीं माझ्या	१५९०
तुझें प्रेम माझे	१५२४
तुझें भक्तिसुख	१७४६
तुझे भेटीविण	१६८
तुझें रूप माझ्या	१५८०
तुझ्या चरणाचें	१५८६
तुझ्या पायीं चित्त	१५२१
तुझ्या माझ्या शेता	१७९१
तुटे मायाजाळ	८०९
तुटोनि आकाश	५४४
तुतारे भोंवरें	४४
तुन बीसारी	२२१२
तुमचें तीर्थ आम्ही	२००४
तुम्हां हित करणें	१९८१
तुम्ही आम्ही जाऊं	२०३५
तुम्हीं सदाचार	९५०
तुवां चाळविलें	१६३०
तुवां येथें यावें	१५५१
तुळशीची सेवा	६१५
तुळशीचें हत्यार	६१७
तुळसी पुष्पांहूनि	६१३
तुळसी बेल	१२०३

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभंग	अभंगांक
तुळसीविण ज्याचें	६११
तुळसीवृंदावन	६१२
तूं अवकाश मी	१५२९
तूं अगाध वैकुं	२१५०
तूं एक सज्ञान	१७०३
तूं जाऊं नको	४१९
तूं तांव नेणता	७३४
तूं माझी जननीं	१५३९
तूं माझी माऊली	१५११
तूं माय माउली	१५४१
तूं माय माउली	१५४७
तूं सद्गूरू आनंद-	१११४
तेचि भक्तिभावें	२३०६
तेज स्पर्शे ज्योतीं	१२३०
तेणें उपदेशें	६०३
तेथोनि वैष्णव	११७२
तेरा माजी तीन	२०१०
तेव्हां प्रश्न करी	५५५
तेहतीस कोटींची	२०४३
तोचि पुराणिक	८६२
तोडी हें बिरडें	७७०
तो देव स्मरा	१९९६
तोंवरी रे तोंवरी	१८५८
तंव आणिमादि	९३८
तंव म्हणती	९४९
तंव अंतरिक्ष	१०२०
तंव अंतरिक्ष	९९०
तंव आध्यात्मिक	९३७
तंव ते आवडते	९२०
तंव ते जगन्माता	९३५
तंव तें नवल	९९८
तंव तें भाग्याचें	९६७
तंव तें सकळिक	९६०
तंव दिव्य रत्न-	९६५
तंव नावेक श्री-	९२
तंव निज भुवनीं	९३०
तंव निवृत्तिसी	९८४
तंव पुंडलिक	३९४
तंव पुंडलिक पुढारला	१०२८
तंव पुसती होय	९८८
तंव बोलत	९९९
तंव म्हणती	९४९
तंव म्हणती ना	६५७
त्यागेंविण वि-	१८३४
त्या तुवां कैसा	१२८५
तृणाचिया लाभें	१२४
त्रिकुट शिखरा	२०९६
त्रिभुवनाची	२१२७
त्रिभुवनींचें जी-	२३९
त्रिभंगी देहुडे	१२५
त्रिविधतापें प्राणी	१६४
त्रेतायुगीं ख्याति	१४६
त्वरें धांवोनियां	१८
थ.	
थितें माझें प्रेम	१२८७
थिल्लर तें नेणें	१८९८
द.	
दग्धही होतसे	६६३
दुर्दराचें पिलूं	४९३
दया हेचि	७०८
दर बरागने	२२३६
दश चत्वार	१३८४
दशमीचे दिवशीं	१०७६
दशमीचे दिवशीं	११५०
दशरथ राजा	२२४९
दशरथ राजा	२९७
दशरथें मारिला	३१
दामोशेटी ह्मणे	१३११
दामोदरा केशवा	७०
दाविसी अनंता	१६६५
दावी जडीबुट्टी	१८५०
दास अनंत	२२१५
दास झाल्यावरी	१६२६
दास्यत्व न	१७०४
दाही दिशा मना	२०६१
दाही दिशा	१७५०
दिशा फेरफेरे	१९३४
दिसंदिस कैंसा	५१५
दीनाची माउली	३६६
दुःखाची निवृत्ती	२५७
दुःखाची निवृत्ती	४६९
दुर्घट तें दुःख	१४४९
दुर्जनाची बुद्धी	१८९३
दुरुनी आलों	१५५३
दुरोनि ओळगिल्या	४८१
दुरोनि देखिलें	२३११
दुर्लभ नरदेह	१९६९
दुष्ट तो दुर्जन	१८९४
दुष्ट दुराचारी	१२२
दुसरी जे होती	५८५
दूध पियो	२१४६
देई भक्तरस	१२३२
देउनि भातुकें	५३४
देउनियां प	९०५
देउनियां वर	५७८
देखतांचि कांता	५८२
देखती तीं दोन्ही	५९५
देख देख देख	३३७
देखिला सांव	२३१८
देखिला सुदामा	२३१९
देतसे दर्शन	१६९
देव आणि नामा	१३६६
देव आपण	४७६
देव कळवळले	१२३३
देवकी कवण	२२०
देवकीचें तेज	२८
देवकी रोहिणी	२१०
देव गुज सांगे	४४४
देव झाला नामा	१३०५
देव दगडाचा	१६६७
देव दयानिधी	७०५
देव दाखवी	४७३
देव देवी देवता	१७३८
देव देव्हारा-	१८०२
देव निवृत्ति	११००
देव म्हणे असे	१०६९
देव ह्मणे ऐसे	१०९१
देव ह्मणे नामया	१०४९
देव ह्मणे नामया	९८२
देव म्हणे नाम्या	१११७
देव म्हणे नाम्या	१३६८
देव म्हणे नाम्या	१२२६
देव म्हणे राहणें	११७३
देवराज आले	२००६
देव रुक्माबाई	१०९५
देवलोकीं इंद्र	५६६
देवसमागमें पर	११०३
देव सांगे तुह्मी	२२७
देव क्षिराब्धीशी	२१५
देवा आदि देवा	८
देवा आम्ही तुम्हां	१४६९
देवाचिये चाडे	१८८१
देवाचे अंचळी	२३५७
देवाचे हे आत्मे	८३२
देवाचें हें गुज	६५५
देवातरी भग	२२०२
देवा तुझी अवज्ञा	१६१०
देवा तुझें मी	२०७५
देवा तूं जया	४८४
देवा तूं प्रथम	४४८
देवा तूं प्रथम	१६४३
देवा दिवस गेले	१४०८
देवा धर्मी नाहीं	१९०३
देवाधिदेवा	५४३
देवा निढळावरी	१९९२
देवा पांडुरंगा	४९४
देवा पाप छळे	१८३०
देवा माझें मन	१६१३
देवा माझें मन	१५८७
देवा माझें मन	१६०३
देवा मेरी हीन	२२०१
देवावरी पाय	१३६९
देवा सन्मुख	१९९५
देवासी कळलें	९८१
देवा ही विनंती	१७८४
देवी देवेश	११९७
देवे चहूंभुजीं	१७९३
देवें समाधान	११६९
देवो देवो बोले	१९४३
देवो ह्मणती	९८७
देश चत्वार कराचा	१३८४
देशीं परदेशीं	१४३५
देह आहे तंव	१९६७
देह जावो अथवा	१५८१
देह जावो हेंचि	१५९४
देह देव्हारा	१८०२
देह पडे तंव	१९०७
देह मंदिरा	२१३८
देहाचें ममत्व	१९७५
देहाभिमानें पुर	१७४२
देहीं धर्मी हित	८२२
देहुडा चरण	४५९
दैत्य राजां थोर	२२५८
दोंदील दोंदील	२२३
दोन प्रहर रात्र	१३२२
दोन्ही जोडुनी	१३३२
दोन्ही हात ठेउनीं	३८१
दंभें गर्वें मदें	१४२६
दृष्टि उघडूनि	१२६२
दृष्टिचें देखणें	२०९२
द्रव्य द्यावयासी	४७
द्वापारींची ठेव	१४७
द्वारावती भुवना	२०५९
द्विज ह्मणे जातां	२३१०
ध.	
धणीवरी ध्यान	२०८१
धन मान बळें	१९७२
धन्य अलंकापुरी	११०४

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक
धन्य आमुचें	११२७	न पुसतां संतां	१३५७	नामयाचें घरीं	२३४१	नाहीं भीड चाड	१७५९
धन्य इंद्रायणी	१०४२	न फिटे हें	१९४०	नामयाचें प्रेम	१५२५	निर्गुण गुणासी	१७५१
धन्य कऱ्हेचे	१११६	नबोलेचि कांहीं	२९८	नामयाचें भेटी	९१३	निर्गुण नामाची	१६४९
धन्य गोकुळ	३४२	नमन करीन	१५०२	नामयाचें मुखी	९४२	निर्गुण निराकार	१६७९
धन्य ते अरण	२३४४	नमो अगणित	११०८	नामयातें आम्हीं	९४५	निर्गुणपणाचा	१२८८
धन्य ते संसारी	३११	नमो अगणित गुणा	११३४	नामयानें बंदर	१८०८	निर्गुणपणाच्या	१६३७
धन्य तोचि देश	८६७	नमो अनादि	११६३	नामयासारिखें	१३०३	निर्गुण सगुण	५०५
धन्य त्या गोपिका	१०९	नमो कालकौतुहल	१०१७	नाम वाचे उ	६८२	निर्गुण सगुण	३४०
धन्य धन्य साधु	२२८९	नमो गणपति	१२०६	नामाचा गजर	१२४३*	निर्गुण सगुण	३३०
धन्य नरदेहीं	८६६	नमो ज्योतिर्मय	११३६	नाम हें अमृत	८१४	निर्गुणींचें वैभव	३२१
धन्य पुण्यभूमि	१२४०	नमो नमो गण-	११३७	नामाचा धारक	७२४	निघोनिया देखा	५९१
धन्य पंढरीचे	४०४	नरसी मेहेता	२३५०	नामाचा प्रताप	७५९	निज गुजर	९५८
धन्य महाराज	८५४	न लगती कथा	७३५	नामाचा प्रताप	६५९	नित्य अनुष्ठान	१०२२
धन्य माझा जन्म	१८०६	न लगती डोंगर	१९८४	नामाचा महिमा	६४४	नित्य आम्हां सुख	५४९
धन्य ही यमुना	१८३	न लगे तुझी मुक्ति	१४९९	नामाचा महिमा	७११	नित्य नेम आम्हां	२००१
धर्मशास्त्री ऐसें	५८०	नव जावें तेथें	५४६	नामाचा महिमा	६०५	नित्य प्रेमाचे	४४३
धरीरें मना	२०६८	न वर्णवे वाचे	१२	नामाचें चरित्र	६८९	नित्य सर्व काळ	८६४
धरोनी हस्तक	१५७०	नवमास वरी	१२६५	नामाचेनि पाठें	७८४	नित्य सर्वगत	७२३
धाऊनियां मिठी	४३२	न विचारिता	१६८३	नामाचें लेखन	१८६९	नित्य हे दिवाळी	४०६
धामणगांवा-	२३४०	नव्हे तुज हित	७५०	नामाचें सामर्थ्य	६५६	निंदा आणि स्तुति	१६५३
धांवत धांवत	२०७२	नव्हे तेचि कैसें	२१११	नामा न राहे	९९३	निंदील हें जन	१९२९
धांवुनि जाईन	१४६५	नव्हे माझें कांहीं	१६७१	नामापरता	६७०	निद्रिस्ताचे सेजे	१७९९
धांवोनियां नंदें	२०४	नागवे कळि	२०१२	नामासुत गोडी	७१८	निद्रिस्थ सकळ	१७३
धांवोनीं घालीन	१४७४	नाचतां ठडतां	७३७	नामामृत सरिता	२०००	निर्धन धनातें	५४५
धिग् तो वक्ता	२१५३	नाचूं कीर्तनाचे	१३९२	नामा ह्मणे देवा	१२२१	निंबलोण करूं	३९९
धिग् धिग् तो	७१५	नाथा नकोरे	१२३८	नामा म्हणे मातें	१२७१	निरोप हा माझा	२११
धीर धरी सत्य	१९२०	नांदतसे नाम	६६४	नामा म्हणे माते	१२९६	निरंजनीं वनीं	१६८५
धूप आणि दीप	११४१	नानागंधे तुळसी	१००७	नामा म्हणे स्त्रिये	१३३१	निरंतर तुम्हीं	१९३९
धूपपंचारती	१२०७	नाना दुःख माया	११५३	नामावांचूनि	७३१	निरंतर नाम	५०७
धेनु विये वनीं	१६६२	नानापरि खेद	१२१५	नामा शिंपे नामा-	१२४९	निरंतर सुख	१७४१
धोंडोबा नामदेवें	१३१६	नानापरिची	१८८६	नामा स्वयंपाक	१३८९	निर्वाणींची हे	१९९९
ध्यान धारणा	३७७	नानापरी मन	१०६०	नामा हें वदतां	१२२५	निर्विकल्प नामा	१७७१
ध्यान सांवळें	२५२	नामिकाचे परी	१४६१	नामीं नारायण	७४२	निर्विकल्प निरा	३२२
ध्यानीं ध्यातां	२५४	नाम एकचि	७३३	नामें तरूं अवघे	१४९३	निर्विकल्प ब्रह्म	१८३५
ध्वजा कुंचे	८४४	नाम गाऊं नाम	१४९२	नामें तो सरता	६४७	निवृत्तिदेव म्हणे	१०९३
न.		नाम घेतां भग-	७५७	नामें सदा शुद्धी	६४६	निवृत्तिदेव म्हणे	१०९४
न करूं आम्ही	५९८	नामचि तो	६६१	नारदें पाहिली	२२९०	निवृत्तिदेव म्हणे	१३४५
न कळतां मुला-	२२७५	नामचि हें आहे	६५०	नारा महादा गोंदा	१२१०	निवृत्तिदेव म्हणे	१३५०
नको गा मोकलू	१५५६	नाम जीहीं उच्चा-	७६२	नारायण नाम	२३१४	निवृत्तिदेवा योग्य	११४६
नको नको मना	२०७३	नाम तेंचि रूप	६९०	नारा विठा गोंदा	१०७८	निवृत्ति देवासाठीं	१२०५
नको नको माया	७८८	नामदेव म्हणे	१२३१	नावडे निजांगना	८५२	निवृत्तिदेवासंग	११४५
नक्र बोले ऐके	२३३३	नामदेवा काय	१३७३	नावडे प्रपंच	१४२२	निवृत्तिमुक्ता	१०८१
नग जो तें सोनें	१२२९	नामदेवा घरीं	१३२७	नाशवंत देतां	१४०३	निवृत्ति मुक्ताईनें	११४०
नगरीं नरनारी	३२८०	नाम न म्हणे	७६०	नाहीं आमुचे	२३२५	निवृत्ति मुक्ता	११५७
नग्न होवोनियां	१२८	नाम फुकाचें	७०६	नाहीं देवाचिये	२३१५	निवृत्ति मुक्ता	११६१
न पढावे वेद	२०३८	नाम ह्मणावया	१९७०	नाहीं परमार्थ	१८५७	निवृत्ति मुक्ता	११७५
न पाहे गे माय	३७३	नामयाची माता	१३०२	नाहीं भक्ती नामीं	८१३	निवृत्ति ह्मणे	११२५

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक
निवृत्तिराज बे-	१२०९	परब्रह्म पूर्ण	३००	पाला खाऊनियां	४८७	पोर निर्दय झालें	१२९९
निवृत्तिराज म्हणे	११७८	परब्रह्म पूर्ण तु-	२१२	पावावया ब्रह्म	२०५५	पोसिशी शरीर	७०९
निवृत्तिराज	११८६	परब्रह्ममूर्ति	३५०	पाषाणाचा देव	१३९१	पंचशतामाजी	५६२
निवृत्तिराज म्हणे	११९१	परब्रह्म विश्वा-	२०७९	पाहतां तुझे	१६०२	पंढरीचा देव	४६८
निवृत्ति सोपान	१०६४.	परब्रह्मींची गोडी	१९५१	पाहतां येपरी-	८०५	पंढरीचा देव	४९७
निवृत्ति सोपान	१०६५	परमामृत सागरु	९६९	पाहतां देऊळाची-	४१३	पंढरीचा देव ब-	४९६
निवृत्ति सोपान	१०८७	परसा भागवत	१२११	पाहातील ग्रंथ	९०१	पंढरीचा पोहा	१०३९
निवृत्ति सोपान	१०८०	परसा भागवतें	१०९९	पाहिली गे माय	११७६	पंढरीचा राजा	८१०
निवृत्ति ज्ञानदेव	१३३८	परस्परें गुह्य	१३५१	पहिलें श्रीशैल्य	८९१	पंढरीचा वास	१७०७
निवृत्ति ज्ञानदेव	१०७४	परहरि धंदा-	२१९३	पाहुनि न दिसे	१५८९	पंढरीची वारी	४३६
निवृत्ति ज्ञानेश्वर	९६४	परळी वैजनाथीं	२३३८	पाहूं द्यारे मज	१५६४	पंढरीची वारी	२०२६
निवृत्तीनें एकांत	११८३	परा पश्यंति	२१४०	पाहे चंहूकडे	२३०५	पंढरीचे जन	४०५
निवृत्तीनें बाहेर	११०१	परियेसी नाम्या	१७९२	पिंगळा बोले	२११०	पंढरीचें प्रेम	४३७
निशी प्राप्त होतां	७८	परियेसी रुक्माई	१३२४	पितयाची भक्ति	३८७	पंढरीचें सुख	३९८
निश्चय पाहुनी	१४०५	परियेसी वासने	१४१२	पिता शिकवी	२०२३	पंढरींचें सुख	४००
निसंगासीं संग	१०६७	परिसाचेनि संगें	८७४	पितियाचें भाग्य	१७६०	पंढरींचें सुख पा	४०१
नीर समुद्र तो	२१२३	परिसासीं लोह	१२५०	पुंडलिकाचे	४५८	पंढरीच्यां सुखा	४३५
नीसुगा निदसुरा	७९६	परिसुनी तैं गोष्टी	९२४	पुंडलिकें धरिला	११६५	पंढरीनाथ वि	२१९८
नेघें भूमंडळ	१७६५	परीक्षिती राया	६०	पुंडलिकें रचिली	२०२९	पंढरीनिवास	१६४२
नेणें घात पात	१४५६	पलंगीं नारीं बैस-	१८३३	पुंडलिकालागोनी	३८८	पंढरी माहेर	१७५२
नेणें भक्ति कांहीं	१६८०	पवित्र आणि	१९३८	पुंडलीक वरद	१६७६	पंढरीस जावें	२०२७
नेणें मन कांहीं	१७१८	पवित्र परिकर	६९८	पुढें उभे वेशी-	९७२	पंढरीसी यात्रा	२३३७
नेणें साही शास्त्रें	४८६	पर्वतप्राय पाप	१३८६	पुढें चालिला	९९५	पंढरी हें क्षेत्र	३९७
नेत्र तान्हेले	१५७४	पश्चिम प्रभास	९२८	पुढें तो भिकारी	२३१७	पंढरी ज्ञानिया	५४८
नेत्र नीर समुद्र	२१२४	पहा परदारा	१९१६	पुढें ज्ञानेश्वर	१०८९	पृथ्वी ध्यासी तरी	२०८०
नेत्र माझें रोडले	१५६३	पहाहो कडक-	५११	पुण्यवंता दावी	५०	पृथ्वीमाजी पाहतां	२०९९
नेत्रीं अश्रुधारा	५८३	पहिला बागुल	२८९	पुराणीं पवाडे	५७२	प्रतिदिनीं स्वधर्म	८५५
नंद म्हणे माझें	११७	पहुडा पहुडा	२३७३	पुरीख हाजारी	२२०३	प्रथम अवतारीं	४४९
नंदाचिये घरीं	८१	पक्षिणीं प्रभातीं	१५७५	पुलक धर्म रो-	१७२६	प्रथम अवतारीं	२१०५
नंदाच्या घराला	३५	पांच दिवस उत्सव	१२१२	पुण्यकर्णिच्या कां-	१२०४	प्रथम नमन करूं	१
नंदालागीं तेव्हां	१९४	पांचमुखीं रुद्र	१४४१	पुष्पक विमाना-	९८९	प्रथम नमूं गज	२
नंदें सोडविलें	७२	पाचारिलें ध्रुवा-	२२६९	पुष्पासी परिमळु	३२९	प्रपंच घडामेडी	१९५९
प.		पांच सातांचा	१३६१	पुसताती संत	१०४५	प्रपंच स्वार्थासि	१९६०
पट्टाची मी राणी	५८९	पाटावरी बैसविती	४६	पूजियेली तापी	११९०	प्रपंचाविषयी न-	१६८४
पडियेली जेव्हां	२०५	पाटोळा तिंबला	२१३७	पूर्ण कृपा केली	१७४३	प्रपंचीं कां मातें	१७२३
पडे प्रायश्चित्त	१३०	पाडपडोसन	२२३९	पूर्ण परिपूर्ण	२०३७	प्रल्हाद नारद	७
पतितपावन नाम	१७३१	पांडवा भाग्याची	४८५	पूर्णब्रह्म मानी	३७	प्रल्हाद रक्षिलें	५०३
पतितपावन धाव-	१४४५	पांडुरंग निवृत्ती	१०८८	पूर्वकथा संव	११११	प्रल्हादाकारणें	२२४६
पतीत अनेक	१७६१	पांडुरंग म्हणे	११२८	पूर्वजन्मीं त्यानें	२२७७	प्रल्हादादिकांचें	५३१
पतीतपावन ब्रीद	१७२७	पांडुरंगाचें नाम	४२९	पूर्वी केली सेवा	१३५८	प्रसन्न वदन	७७६
पतीव्रता मोठी	२२६५	पांडुरंगा नमूं	५००	पूर्वी तूं अनुज	२५	प्रळयाचे काळीं	२१२१
पत्रावळी काढी	८६३	पांडुरंगें प्राप्त	७९९	पैल आला राम	३१३	प्रातःकाळीं उद्धव	२०६
पदतिर्थ दान हे	७६५	पपिष्टाचें जिणें	५९७	पैल गरुडांचे	५१४	प्रातःकाळीं गडी	१८९
परदारा परधन	१९१८	पापीं जे अभक्त	२१	पैल ते पंढरी	४२२	प्रातःकाळीं प्रहरा	२७९
परब्रह्म जें	२१८३	पाप्या नावडे	१८२९	पैल दक्षिणेचा	२०३६	प्रातःकाळीं मात	१८६
परब्रह्म निष्का-	२४३	पारधियासी तेव्हां	५९९	पैल पिकली	१६९६	प्रातःकाळीं मोठा	२२६
परब्रह्म परम-	१०२४	पारधी तो झड	५९२	पोटासाठीं जरी	१८४७	प्रातःकाळीं मुलें	९२

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitization by eGangotri

अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक
प्रातःकाळीं राधा	८६	बीहु बीहु तेरी	२२१३	भक्ति करूनियां	६५४	भोगावती तीरीं	११२०
प्रातःकाळीं सांगें	१२९	बुजगावणें शेतीं	१८७२	भक्ति त्रिविधा	१३८२	भोगावरी आम्ही	१४९८
प्रार्थुनी सकळिकां	९५१	बुडविली क्रीया	१२८२	भक्तिप्रतापें पा-	२०५६	भोंवताले जाळें	५७०
प्रारब्धाच्या बळें	२२९९	बुद्धिहीन अती	१५७१	भक्ति हेंचि भावें	१३९४	भोळ्या भावि-	८७३
प्रेम अंगीं सदा	२३४५	बेडूक म्हणजे	१८७३	भक्तीची अपेक्षा	१४२३	**म.**	
प्रेमपडिभरु	१७६७	बेद पुराण	२२२८	भक्तीविण मोक्ष	१९७९	मग अष्टदिशा	१०१०
प्रेमपिसें भरलें	१५१९	बैसलीं दोघें	८८६	भक्तीविणें जिणें	१९७६	मग उड्डाण	११०६
प्रेमफांसा घालूं-	१५२६	बैसायासी गेलों	२२९१	भगत वला बा-	२१८२	मग केशव	९४६
प्रेम सप्रेम	२३६६	बैसोनि एकांता	८८५	भगवंत ह्मणे ना	१०३३	मग झाला स्वयं	९३९
प्रेमळ तूं भक्ता	१२२८	बोलवरी बोलती	२०५२	भजन करा रे	७०१	मग नारदानें	९५६
प्रेमामृत सरिता	२०६९	बोलावुनी अव-	३९	भजूं एका वि-	३७१	मग पंढरीनाथ	१३०४
फ.		बोलावूं पाठवूं	१५५२	भरतें त्यागिली	४९५	मग प्रश्न आद-	९९१
फार आठवतें	१०६८	बोलिले वेदांतीं	२०८४	भला तूं हरी	२७०	मग म्हणे सर्वदा	९८३
फुकाचिया तुळशी	६१६	बोलूं ऐसे बोले	१५२२	भले विराजे	२१७७	मग विनवी	१०३०
फुटल्या घड्याचे	१९६२	बोले दामशेटी	१३०९	भवजलधि अगा	१३७९	मग व्यासपूजा	१०११
फुलले अनेक	११८०	बोलोनियां येणें	१३४०	भवव्याघ्र देखो-	१५४२	मग लावूनियां	९२९
फेडूनि पीतांबर	४५७	बंधनी गुंतला	५८१	भवसागर तो	१९३०	मग सकळ	९८०
ब.		ब्रह्म अविनाश	१५८५	भवसिंधु तराया	१०७	मग सारोनी	१०२९
बदो कीन हो	२२१६	ब्रह्म ते ब्राह्मण	२०२१	भवसिंधूचा पार	८०७	मग संतोष	१००२
बनारसी तप	२२२६	ब्रह्मनिष्ठ तेव्हां	१८७	भवसिंधूचा पार	८०८	मग ज्ञानदेव	९१६
बरवें गा शंकरा	६०८	ब्रह्ममूर्ति संत	८३८	भवाब्धि तारण	७६४	मज गांजिल्या-	१४१७
बरवेपणें बरवा	३६४	ब्रह्मांड जया-	२२९२	भस्म तो होतसे	८७८	मज चालतां	१४०९
बरवें बरवें बाळ	२२२	ब्रह्मांडनायक	७५३	भक्षूनियां पोहे	२३२३	मज तुज निगदलें	१८२१
बहुत जन्मा	१५६८	ब्रह्मादिक तेथें	१०८५	भागलासि देवा	१६९३	मजसाठीं काय	५३७
बहुत दिवस तुमचे	१५१८	ब्रह्मादिकां पाहतां	२३६	भांडारी येऊनि	३०८	मत्स्य कच्छ	४५०
बहुत दिवस भरले	१२८६	ब्रह्मीं ब्रह्म एक	३३४	भावेंचि भजन	७९३	मधुवन चांग	२२८२
बहुरुप्या ब्राह्मणा	८७०	ब्राह्मण आशिर्वाद	४५	भावें तुझे चरण	१७३६	मध्यान्हकाळीं	८८
बळीराजा दैत्य	२२४७	ब्राह्मण व शूद्र	७५१	भावेंविण भक्ति	१४२४	मध्यें झालें मौन	२२५१
बाई कशाच्या	३०७	ब्राह्मण हो तुम्ही	७४८	भिऊनि रिघीजे	१६०७	मन करी आपुलें	७२१
बाई कौसल्येचा	३१०	ब्राह्मणांची इच्छा	३०९	भिन्न रात्रीं मा	२८५	मन झालें उन्म-	१८१४
बाईल आधीन	२२७१	ब्राह्मण न कळे	७४९	भीत नाहीं भीत	१७९७	मन धांवे सैरा	२०७६
बाजी जा मन	२२०४	**भ.**		भीष्मासीं आपण	२०१३	मन नेणें तुझ्या	१५०४
बांधिले राहीना	३७६	भक्त अमर	१००१	भुक्ति मुक्ति मा-	१५१४	मन पंछीया	२१६५
बाप आर्तबंधु	९६३	भक्त केशवाचे	८४६	भुक्ति मुक्ति सिद्धी	१९७३	मन माझें आ-	१६९९
बाप भक्तप्रीय	९६६	भक्तजनवत्सल	९६२	भुजंग विखार	१८६१	मन माझें चौ-	१४१५
बाप माझा समझी	२२११	भक्त पुंडलिका	५२५	भुलले हे लोक	१९०८	मन मेरे गज	२१८५
बाप संतसभा	१४८१	भक्त पुंडलीकें	१७८१	भूचरीं खेचरीं	११६८	मनाचें मनपण	२०७८
बाबा अहंकार	२१०९	भक्त प्रल्हादा	१९९७	भूमिदानें होशी	१९२६	मनीं जें जें देखें	१६७५
बारा हात लुगडें	२११९	भक्त भागवत	९२७	भूमिभार झाला	२१४	मनुष्य करिसी	१७३४
बाहुबळें तुवां	१३	भक्त विठोबाचे	२०२२	भूमीचें मार्दव	१८७४	मनें ध्यान क-	१७०१
बाहेरी भीतरीं	१६९४	भक्त पुंडलिका	५२५	भूमि लोळे नामा	१७८८	ममता तुटेना	१४१८
बाहेरी भीतरी	१७१५	भक्तचिया भावा	१२५८	भेट देईं मज	१८५	मयुरध्वज राजा	१५४८
बाळकाच्या	२२८४	भक्तांची आवडी	१४७६	भेटीलागीं माझा	१५५८	मयुरादि पक्षी	३०
बाळका स्तनपान	१५७७	भक्ताचें तें साह्य	१११८	भेटीची आवडी	१५३६	मरण सांगा स्वा-	१३८८
बाळपणीं वर्षे	१९४८	भक्तांचे हृदयीं-	१७८२	भेदवादी जन	५५९	मरणें पेरणें	१६४४
बाळ वृद्ध तरुण	१९७१	भक्तसमागमें	११०७	भैरो भूत शि-	२२३१	मला तूं हरि	२७०
बाळ सगुण	२६५	भक्तांसाठीं देव	४४६	भोगाची नवाळी	५६१	मल्हार महुडें	२५१

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक
मस्तकीं ठेवूनिया	२८०	माय न होती	२२२७	मूर्खा हातीं दिलें	१८००	यज्ञ याग दान	१४९७
महा उत्साह	९७७	मायबापाची	१५९६	मूषक हव्यासें	१९३७	यज्ञादिक कर्म	१८४१
महाद्वारीं सुख	१७७८	मायबापांपरीस	१७४९	मेघः शाम वर्ण	१०६	यारे नाचों प्रेमा-	४२१
महा मुक्ति क्षेत्र	९४७	मायभूमि पाहूं-	११७४	मेघोवीण जळ	१३७७	या विठोबापरतें	१८९१
महिमा अगाध	१५६६	माय मेली नाम्या	१७७९	मेरे अंधेकी	२२३३	याहो क्षेत्र केलें	२१२९
माई गोव्याद	२१९४	माया पुरातनु	८०१	मेलें जित्यासी	२१२२	युक्तायुक्त ज्ञान	१३३३
माई तुं मेरे	२१९५	मायेचा कळव-	८०२	मैं अपराधी	२१८९	युक्तिप्रयुक्तीचें	१५७८
मार्गशीर्ष मासीं	१२६	मायेचा हा फांसा	१९१०	मैंको माधो	२२०६	युग ऐसें पळ	१७
मार्गही राहिला	५६९	मायेचा भूचर	६७५	मैरो भूत सितला	२२३१	युगांबरोबरी	२००
मार्गी चालतां	१९९४	मायेसी रुसलें	२०९७	मोको तारले	२२४१	युगें अठ्ठाविस	२३६७
मागोनियां गोपी	१५४	मारवार जैसें	२२३४	मोको तूंना	२१६३	येईना अझुनी	१५०५
मांजरें केली.	१८८३	माराया कृष्णाशी	१७९	मोतियांचा चूरा	१३४९	येई गे केशवे	६१९
माझा नामा जंव	१२८०	माराया राजे	२२४८	मोर पिसा कुंचे	२३०	येई गे माधवे	६२१
माझा नामा मज	१३०६	मारिले ते वीर	२३२६	मोह भुजंगें	१४९१	येई गे विठ्ठले	१५०९
माझा प्राणोत	२१५९	मिथ्या माया जाळ	१९५२	मंगळमूर्ति सुख-	१०३५	येई जनार्दने	६३९
माझा भाव तुझे	१८१३	मिळवूनि सौंगडे	६३	मंगळवेढ्या-	२३५५	येई तूं उपेंद्रे	६४०
माझिया पितयाची	३९१	मी असे तेथें	१७००	मंत्र मंत्र दीक्षा	१४७८	येई तूं कृपाळे	६३१
माझिया भक्तां	१७८६	मीच माझा देव	१७९५	मंत्रांचा पैं मंत्र	७३६	येई तूं गोविंदे	६२२
माझिया मनाशीं	१७७०	मी माझें उरलें	१८२०	मंथना आरंभ	८७	येई तूं प्रद्युम्ने	६३३
माझिया मनाचें	१६८६	मी माझें भावितां	७१३	मंदिरा नेवोनि-	८४	येई तूं शारंगे	६३२
माझिया मनें	२०५७	मी माझें म्हणतां	२०४९	मंदोदरी करी	२३३१	येई तूं हरी	६४१
माझी कोण गती	१५७३	मी तूं हें कथन	१८५२	मंदोदरी सांगे	२३२८	येई वो अच्युते	६३८
माझे गुणदोष	१६६८	मी तो तुझा	१४४३	मृगजळा डोहो	१९८२	येई वो अधीक्षजे	६३६
माझें घर त्वां	१२८९	मी तो तूंझा दास	१६४८	मृगचिये शृंगें	६१	येई वो अनिरुद्धे	६३४
माझें जन्मपत्र	१२५४	मीनरूप झाला	२२४४	ह्मणतां नाम	७०२	येई वो केसरी	६३७
माझे भक्त मज	९१९	मी म्हणतां अहंता	७७१	ह्मणतां वाचे	६४५	येई वो कृपावंते	१५१७
माझे मनीं ऐसें	१४२१	मुक्तपण आम्हां	१५४०	ह्मणतां वाचे	८३५	येई वो तूं कृष्णे	६४२
माझे मनोरथ	१४५३	मुक्ताई उदासी	११७७	ह्मणतीं घेतल्या	१३६०	येई वो त्रिवि-	६२५
माझे मागणें	१७३०	मुक्ताई म्हणे	१०२७	ह्मणती सकळ	९०२	येई वो पद्मनाभे	६२९
माझे मायबाप	८८२	मुक्ताफळ नथ	२७१	ह्मणसी बिभी-	३१७	येई तूं पुरुषोत्तम	६३५
माझें मी करितां	६७६	मुक्ताबाईनें	११६२	म्हणसी बिमिषण	२३३२	येई तूं मधुकरे	६२४
माझें व्रत एक	१७३३	मुक्तिपद मी गा	१७३७	ह्मणा श्रीराम	७९१	येई वो दामो-	६३०
माझें सर्व भाग्य	१५९५	मुक्तिप्रद आहे	८२७	ह्मणे दीनबंधु	८३६	येई वो वामने	६२६
माझ्या बोबडिया	१६७७	मुखी नाम हातीं	१८५३	ह्मणे पुंडलिक	३९३	येई वो विठ्ठले	१५३४
माझ्या मनें तुझ्या	३५३	मुखीं नाहीं नाम	१८३७	ह्मणे बा आतां	२२८१	येई विठ्ठले हो	१५३३
मांडीवरी घेत	५२	मुख्य मातृकां-	२०८५	ह्मणे विठोजी	१०२५	येई बा श्रीधरे	६२७
माता तेचि तात	१७०८	मुंगी उमगा	२११३	य.		येई हृषिकेशी	६२८
मातापिता घरीं	८९८	मुंगीचिया गळां	१४३८	यम सांगू	८४७	घेउनी आळंकावती	८९५
माता पिता बंधु	१६६४	मुंगीनें आकाश	२११४	यम सांगे दुता	८४८	येऊनियां यम	५७५
माता पिता बंधु	३६३	मुंगी व्याली शिंगी	२१२६	यम सांगे दूता	१९६८	येऊनि सुसारां	७५५
माता म्हणे नामा	१२६६	मुंगीस तो मार्गु	२०९८	यमाचिया नगरीं	१९८	ये गे नारायणी	६२०
माता वाट पाहे	१२६४	मुगुट मनोहर	१०८४	यमुने पाबळीं	३४५	येत येत उभा	२४९
माती तुडवितां	२३४८	मुंग्याचिये विवरीं	१०९८	यशोदा घुसळीत	६७	येतसे दशरथ	२९६
मातेलागीं पुसे	२२६७	मुतूनिया हातें	६२	यशोदा व्याकुळ	११६	येतां जातां थोर	८७५
माथां पडतां	५७३	मुलें सांगताती	६६	यशोदे घराकडे	२४४	येता जाता थोर	१४७३
माथां मोरपिसां	१५८२	मुळींच मी जाणे	१६३९	यशोदेचा बाळ	२५६	येतियां पुसे	३७८
मान तोडावया	३७५	मूर्ख बैसले	१९०१	यशोदे भोंवत्या	७७	येथोनि तेथवरी	१३८६

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक
येरी म्हणे काय	५८६	राम राजीव	२३६१	व.		विठोजी म्हणे	९७६
येरु तो निवांत	२२८५	राम विठ्ठला	२१७८	वटारूनि डोळे	१३६३	विठोबाचे पाय	८२०
येरे येरे देवा	१६	रामसमाना	२१५५	वटेश्वरें वृत्तांत	११२१	विठोबाच्या गांवा	४३१
योग याग यज्ञ	१८५५	राम सोधन	२१६०	वडील कुरंगी	५९३	विठ्ठल आमुचें	१५२७
योगानें जोडिली	१८०१	राम हेंचि स्नान	८२५	वडील वडील	१२७७	विठ्ठल आवडी	१४९४
योगि मुनि जन	५२४	रामची भगंती	२१७०	वर्णावया रूप	२२६२	विठ्ठल कानडें	३७४
योगियांचें ब्रह्म	३५५	रावणा मारून	२७२	वतन आमुची	१७७३	विठ्ठलनामी आळस	७८२
योगी परम घ्या-	९३१	रावणे हें केलें	२९९	वत्साकारणें	१४३६	विठ्ठल माउली	४७८
योगी ब्रह्मचारी	१८४३	राष्ट्र करी पाप	५६३	वदनीं तुझें नाम	८१२	विठ्ठल माउली	१५०७
योगी हे शिणती	५३६	राहा वाज तळीं	१३७	वन वृक्ष वल्ली	१०५३	विठ्ठल रुक्मिणी	१०३८
र.		राहिला पाऊस	१३८	वनामध्ये कांगे	१५०	विठ्ठल विद्गदे	१४३९
रकार मकार	७२६	राही रखुमाई	११३०	वराईचा गोणी	१३३०	विठ्ठल विसांवा	३८०
रखुमाई माता	१२४२	राही रखुमाई	१२९२	वसुदेवा देत	२६	विठ्ठलाचें नाम	६९२
रखुमाइ म्हणे	८९६	राहूं नका येथें	११९	वांकडें पाहणें	४४०	विठ्ठलाचे पाय	१९४६
रतन परखु	२१७४	राहोनि भोंवती	१७३२	वाघाचिया गळां	१४२०	विठ्ठलासी पाहे	७८०
रमासिंधु माजी	१४४०	रुक्माई म्हणे	९५५	वाघाचिया गळां	१२७४	विठ्ठलेंविण जया	३७९
रमेच्या वल्लभे	१९२	रुणझण पायीं	१४	वाचितां अध्यात्म	२२८७	विणा घेउनियां	१७१७
रवि रश्मि धरोनि	८४२	रूपांसी रूपस	६८३	वाचेचेनि बळें	१२९०	विधि वेद विरुद्ध	९०३
राईएवढें पंखरूं	२१२०	रूपें शामसुंदर	२८१	वाचे नाम गात	२३०८	विनविती संत	१०६३
रांजणगांवामध्यें	२३३९	ल.		वाचें म्हणतां गंगा	६४३	विनंति करी	२३२९
राजमंदिराभि-	१७५८	लटकी ना बोलों	२१८१	वाजविली डांक	२१०७	विप्र वेष तेव्हां	५७
राजयासीं सर्व	२२६४	लटिका मी	१४५८	वाजवोनी वेणू	१६३	विमानांची दाटी	२९
राजसी तामसी	१८६६	लटिकें तरी	१४६०	वाढवेळ कां	१५४४	विमानी बैसली	११९२
राजाई ते पुसे	१३२८	लपालासि तरी	१४९७	वाढों लागे हरी	२२५	विरंचीचा बाप	३०१
राजा म्हणे इच्छा	२९५	लव निमिष	१९०६	वार्णी गांधिपण	१७३९	विश्वजम मोहना	१२८४
राजा म्हणे बाळा	२२८३	लक्षवरी बिल्व	५७१	वानराच्या संगें	१४४४	विश्वाचा जो बाप	४१
राजियाची कन्या	२३३६	लागली उन्मानी	१०४१	वामांगीं बाहुली	२०८८	विश्वाच्या मोहना	५२८
राज्यीं स्थापियेला	१९३	लागलें वरुष	२२६६	वायां ताडातोडी	१५९२	विश्वंभर नाम	१४४६
रात्रीं काळी घागर	२५५	लांचावलें ब्रह्म	२६४	वारीं वो दशवंती	२६६	विष पाजावया	१६८९
रात्रंदिवस खंती	१५७६	लाजलें गे माय	२३६३	वारंवार काय	१५३१	विषय खटपट	७७२
राधा वनींच्या	२१२५	लाज सांडोनिया	१६१६	वालियाकादी भीष्म	१४७५	विषय सेवितां	१९०९
राधेप्रती अनया	८५	लाजों नको मन	२०७४	वावडी दुरिच्या	१९७८	विषयाचा आंदणा	१९७४
राम आपणा	२१५१	लांब लांब काय	१८५१	वासनेचा त्याग	१९१७	विषयाचे आळुके	१७६३
रामकृष्ण माळ	७८७	लाभाचिया लोभें	१२९७	वासनेचा फांस	१६०९	विषचायें कोड	१९०५
राम जोहारी	२१९१	लावण्य सुंदर	१९१३	वासनेची करणी	२०६६	विषयीं आसक्त	१४१६
रामनाम खेती	२१६१	लावियेला दीप	१०८६	वासनेविरहित	८७७	विष्णुनाम श्रेष्ठ	७४०
रामनाम जपी	२१५२	लाविली कौपीन	११६४	वासरूं भोवे	१४६२	विष्णु विष्णु हरी	६२३
रामनाम नरहरी	२१७६	लावोनि भवभय	१२९१	वासुदेवा ह्रषि-	२२	विष्णुचें सेवन	२०३९
रामनाम बीन	२१७९	लिंगपुराणीं हा	६०६	वाहातसे नेत्रीं	१३९	विष्णुसी भजला	१८४५
रामनाम म्हणतां	१९३३	लेआईके कुंभ	२१८६	वाळवंटीं उभा	४७४	विसांवा विठ्ठल	१५१२
रामनाम वाचे	१९९०	लोक एक अनंत	२१९०	विचारित हो	९१	विसांवा विश्वाचा	८२४
राम पिता सिता	३१४	लोखंडाचा विळा	१२५१	विचारितां सहज	१७७५	वीतभर पोट	१४१३
राम बोले राम	२१५६	लोपतां आदित्य	१४९	विचारूनि पाहा	२०२८	वेडावली वाचा	३२६
राममें रमी	२१५७	लोभ लहेर		विटेवरी उभा	३६५	वेडिया उपचार	१८९७
राम मंत्राचिया	८१८	आति	२२१९	विटेवरी नीट	१६९७	वेणुनादीं चरे	२१३९
राम म्हणतां	१९९१	लोभियाचे घरीं	१४६३	विटेवरी समचरण	३४६	वेणु वाहुनि चित्त	३५९
रामराई उलगु	२२१४	लंबोदरा तुझां	५	विठाई सांवळे	२१०६	वेणु वाहोनी	१७२५

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक
वेदपरायण मनीं	१५५७	शास्त्राचें हें सार	८२६	सकळांची इच्छा	१७०	सर्वकाळीं पर-	१३७१
वेदाचें महिमान	८०४	शिकला गाणें	१८६५	सकळांचें तुझ्या	१५८	सर्व जीवा करी	२०२०
वेदाचें हें सार	९७०	शिकवा वो रुक्माई	१३२५	सकळिकां तेव्हां	१३६	सर्व जीवा तूं	१७६२
वेदां जन्मस्थान	५१६	शिंपियाचे कुळीं	१२४४	सकळिकां नम-	९४०	सर्व तीर्थें मिळालीं	१००८
वेदाध्ययन करिशी	१८४२	शिव ऐसा शब्द	५५८	सकाम निष्काम	९४८	सर्व देवांमाजी	५२०
वेदाध्ययन केलिया	९८६	शिवणें टिपणें	१३०८	सगुण तें ब्रह्म	४९८	सर्व पाप पुण्य	५४७
वेदां न कळे	४५३	शिवरात्री कथा	६०४	सगुण निर्गुण	१७१३	सर्वभावें तूंतें	१४८३
वेदवेगळें कर्म	१८३१	शिवादिक ज्याचे	९७	सगुण समान	५०१	सर्व सुखरासी	४३४
वेदासी अगोचर	३२५	शिशुपालादि-	४९९	सगुण समान	२१०१	सर्व स्वस्ति क्षेम	१०९७
वेदासी कानडा	५४२	शुक ह्मणे राया	४०	सगुण संपन्न	५५०	सर्वांग साजिरी	६८४
वेदाशीं न कळे	१३९९	शुक सनकादिक	८५६	सड न सांजा-	१३७६	सर्वाभूतीं नांदे	५३०
वेदी तोचि शास्त्रीं	२०६७	शुक म्हणे गां	२२५४	सत्य संकल्पचा	४६५	सर्वाभूतीं पाहे	८५१
वेळोवेळां तुज	१९	शुकादिक ज्या-	२०२	सत्यज्ञानानंत	२०८९	सर्वांभूतीं भजन	७९४
वैकुंठ तें घर	४६२	शुद्ध फाल्गुन	११७१	सत्यसमाधानि	८६०	सर्वांभूतीं भज	८३४
वैकुंठासीं आम्हां	४४२	शुद्ध भावार्थाचे	२३०७	सत्वाचा सागर	२२५६	सर्वांभूतीं हरी	६७९
वैकुंठाहुनि केलें	५०८	शुभसुचिन्हें	२३०९	सद्गुरुचे पाय	१३९८	सर्वांमाजी सार	७२०
वैकुंठिहुनी	५१२	शेतीं बीज नेतां	७६९	सद्गुरुनायकें पूर्ण	१३९०	सर्वांमाजीं सार	७७९
वैकुंठी पाहें	३३९	शेंदूर पारवे	११२४	सद्गुरुवांचूनि नाम	८३०	सव्य हातें नगर	११४४
वैष्णव तो बळी	६५३	शेवटची समाधि	१२१६	सद्गुरु सखया	१२१९	सहज तुझें सुख	१७७७
वैष्णवा घरीं	८४१	शेवटली पाळी	१९७७	सद्गुरु सागरा	१११३	सह समुदायेसी	१२०१
वैष्णवांचे घरीं	८५०	शेषशायी हरी	२१९	सद्गुरुसारिखा सोइ-	१४०१	सहस्र आठ्यायंशी	३९५
वैष्णवांनीं केली	११४३	शेषाप्रती बोले	२४	सदा पैं परिपूर्ण	७२५	सहस्र तोंडांचा	४५४
वैष्णवामाजी	८५७	शेळ्य मेंढियाचे	१८०	सदा फळ सुफळ	७४३	सहस्र दळांत	३४९
वोसंडोनि निवृत्ति	१०९०	शोधोनीयां चारी	२०८३	सदा विचरती	८५८	सहस्र दळांमधून	६७४
वोसंडोनि हरि	१०५२	शंख चक्र गदा	१७४५	सदाशिवापुढें	७५२	सहस्र नामाची	५०२
वंदावें तें काय	३३५	शंभु उपदेशी	७२९	सदा सोमवरीं	६१०	सहस्र नामाचे	१८२२
वंदिली अंबिका	११९९	श्रवणमात्रें जळती	१०५	सनकादिकीं	९७८	सहस्र मिळणी	१६४०
व्यर्थ कां हव्यासी	१९३६	श्रवणी सांगितली	१३८०	ससशृंगालागीं	११९८	साई मेरी	२१७३
व्यर्थ या व्युत्पत्ती	१८९०	श्रीकृष्ण जन्मला	५६	सब चातुरता	२१४९	सांगताती दायां	३०४
व्यापक तें नाम	८१६	श्रीकृष्ण लीलामृत	२२५०	समर्थाचें बाळ	१४५४	साचपणें ब्रीदा	१६३२
व्यापकापरीस	१५२८	श्रीधरा अनंता	४७०	समर्थासी करी	१८९५	साठी घडीमाजीं	२०३४
वृषभाच्या वेषें	१७६	श्रीपाद म्हणती	८९९	समस्त भक्तमंडळी	९५२	साठीसहस्र	६०९
व्रत तप दान	७२२	श्रीमुख साजिरें	३५६	समस्त मिळोनि	२९०	सांडी सांडी पसारा	१९३५
व्रत तप न लगे	२०४२	श्रीमुख सुंदर	२३२	समस्तांचें त्यानें	२०७	सांडुनि पंढरीची	२०२५
व्रतबंध दीक्षा	८८७	श्रीमुखाची सोय	१७१४	समक्षं सांगतीं	७१	सांडुनी वैकुंठ	३९०
श.		श्रीराम सोयरा	३१९	समाधि परिपूर्ण	११०५	सांडुनी पंढरी	४११
शब्दाचें सुख	२०३२	श्रीविठ्ठलें आपल्या	१३६५	समाधि श्रवण	१२१८	सांडेतीन पाउलें	१०५१
शब्दामृत मांडे	१८६८	श्रीहरि श्रीहरि	१४२८	समाधिस्थ सदा	२०८७	सांडोनि अभिमान	१६०५
शरण आल्याचा	१६१९	श्रोते म्हणती	४१५	समाधीच्या पाळीं	१२०८	सांडोनि नित्य	८४९
शरणांगता ता-	१५९	ष.		समाधीसी शेज	११६७	सांडोनि संसार	१४३४
शरणागतासी न-	१६१७	षड्गुणसंपन्न	५२१	समुद्राचें पाणी	२११५	सातवा जो	२७
शरीर काळाचें	१९६४	षड्चक्र भेदो-	२०९४	समुदांत पुत्र	१९७	साधन साधितां	८०६
शरीर प्राणाचें	१७२४	स.		सरस्वती तीरीं	१७२	साधनाच्या माजी	२०९५
शरीर संपत्ती	७७८	सकळ वैभव	१६२८	सरस्वती माते	६	साधनांत सोपें	६९५
शरीराचा भाव	१४४७	सकळ समुदाय	१३१९	सरोवरी कमळें	१५६	साधवया आत्म-	१२७३
शांति भीमातीरीं	३५४	सकळ साधनाचें	७८६	सर्वकाळ पुण्याच्या	७४१	साधावया स्वरूप	७०७
शाममूर्ति डोळस	३६०	सकळ संतजन	८३७	सर्वकाळ हरी	६८१	साधूनि समाधी	१७२१

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक	अभंग	अभंगांक
सांप कुच छोडे	२१८४	सोपान समाधी	१११२	स्नानालागीं	२३२०	हात पाय सर्व	३३६
सांपत्न माउली	२२७०	सोपा हा उगम	७९२	स्पष्ट जोडोनियां	१११५	हातांत नरोटी	१३५९
साराचेंही सार	६६२	सोयरा सुखाचा	७०४	स्फुंदत स्फुंदत	१७५५	हातीं घेवूनियां	२६२
सारथ्यासी सांगे	२०३	सोयरिक सांडि-	२३४३	स्फुदास्फुंदोन	१७८९	हातीं विणा मुखीं	१६०१
सार पैं नाम	७८१	सोय सांडिली	१३०१	स्मरण करितां	६७८	हांसोनि पंढरीनाथ	९१७
सार पैं सांगत	६७२	सोंवळीं पिळूनि	१८७६	स्वर्ग मृत्यु पाताळ	९९७	हांसोनि सोपानें	१३५२
सारासार विचार	१०४८	सोवळ्यानें हरि	१०७९	स्वस्ति श्रीनगर	२३५१	हिरे जळमधीं	१४५०
सावध सावध	१३२३	सोळा त्या समाधि	२०८६	स्वप्नीचिया परी	१९४४	हित दिन जात	२१४५
सांवळा श्रीमूर्ति	१७९८	सोळा सहस्र तांटें	२३२१	स्वयें घरदार	१९६१	हीरदे माला	२१९६
साहेब संकट	२२२०	संकल्प विकल्प	१७७६	स्वरूपाकारणें	१७५७	हुंबरीच्या मिषे	२३४
सिबुर दावूनि	१८४०	संकल्पाचा मळु	२२७८	स्वानंदांत पडो-	१३९५	हेचि आम्हां श्रेष्ठ	९०४
सुकुमार सांवळे	१५७	संग खोटा पर-	१९१२	स्वानंदें स्वभावें	१०४६	हे गे आयुष्य	२०६३
सुख तें आपुलें	७१६	संटा मरका	२२२२	स्वामी एक व्हावा	१७०५	हेंचि देवा पैं	१७१६
सुख दुःख जीवाचें	२०७७	संतापायीं माया	८६९	**ह.**		हेंचि मागतसे	१७११
सुख दुःख दोन्ही	१२५७	संत पाहुणेरा	१३४३	हडबडलीं पातक	६५१	हेंचि माझी संध्या	१७०६
सुख पंढरीस	१३०७	संत प्रबाणी	२२०५	हतीच्या चरणा	१६७२	होईल संतांचा	१७१९
सुख शेजारीं	९५३	संत समागम	३१२	हनुमंत गेला	३२०	होवोनियां तुम्ही	५९४
सुख सांगावें	८७६	संत समागमें	१३५४	हम तो भुले	२१४८	होऊनि हरण	५६५
सुखाचा सुखतरु	१४०२	संतसु लेना	२१८०	हरणी सांगे	५९६	होतां प्रातःकाळ	१७१
सुखाचा सोहळा	६६९	संतसंगातीचें	८७२	हरहर करत	२२३२	होसी भक्तांचा	४४७
सुखाचें सुखरूप	१३७८	संतांचा महिमा	८३९	हरिकथा ऐकतां	१९८६	**क्ष.**	
सुखाचे सोयरे	१३९७	संतांची विश्रांती	५३३	हरिकथाश्रवण	७४७	क्षण एक एकांतीं	१७७४
सुखाचें हें सुख	३५२	संताचें घरीं	२०४०	हरि गातां बरवा	५३९	क्षण एक मना	२०६५
सुखालागी जरी	४२०	संतांचें लक्षण	८८१	हरिदासापणें	१८८०	क्षणक्षणां देहीं	१९६५
सुखालागीं मन	१३८१	संतांच्या चरणा	८७९	हरिनाम गातां	७५६	क्षणक्षणां पंढरी	१०३२
सुंदर नारायण	१२००	संतांसी विन्मुख	१३६४	हरिनाम गोड	२४७	क्षार उदक	२३७०
सुदामा ब्राह्मण	२२९८	संतोषाकारणें	५२२	हरिनाम पाठ	७६३	क्षीरसागरांत	९
सुदामा म्हणे	२३२४	संपूर्ण विश्वाचा	३८५	हरिनाम उदास	१९३२	क्षेत्री हा वृत्तांत	१३१८
सुफल जन्म	२१८८	संसार करितां	१९५०	हरिपाठ गजरें	११५६	**ज्ञ.**	
सुलतान पुढे	२१४७	संसार घन घन	२८८	हरिभक्त म्हण-	१८४८	ज्ञानदेव आले	९७१
सुलभ सोपारें	८२३	संसार परजनीं	२८३	हरिभक्ति आथिते	१८६०	ज्ञानदेव उभा	९७५
सुवर्ण आणि परि-	१८६७	संसार पाल्हाळ	७३०	हरि भोळा हरि	४६०	ज्ञानदेव पाहतां	१२३७
सुवार्णाचा शोभे	३०३	संसार शेत	२१२८	हरिश्चंद्र राजा	६०१	ज्ञानदेव पहावा	१२२३
सुवर्णाचे ताट	९४१	संसार षड्चक्रीं	१५३२	हरिश्चंद्र राजा	२१०४	ज्ञानदेव माझें	१२२४
सूर्यवंशी राजा	२२५७	संसार सागर	१९४९	हरिस श्रवणीं	२०१४	ज्ञानदेव म्हणे तूं	९१४
सुर्याचा प्रकाश	१३९६	संसार सागरीं	१४८७	हरिसी शरण	१९८३	ज्ञानदेव म्हणे परि-	९२२
सेवियले गोपा-	२१६४	संसार सागरीं रे	२०५१	हरिहर ब्रह्मा	८११	ज्ञानदेव म्हणे वि-	९७४
सेहेज अवल	२२१८	संसार संकटें	१४६७	हरिहर विधाता	१०४०	ज्ञानदेव म्हणे शंका	९२५
सोंगाचें वैराग्य	१८३६	संसाराची सोय	१५५९	हरिचिया दासा	१२३९	ज्ञानदेवापुढें	१२२७
सोडीं कान्हा रवि	२६९	संसाराचें दुःख	१९५८	हरि तुझी ऐसी	२६८	ज्ञानदेवालागी	१०८२
सोडीं सोडीं मिठीं	३४	संसारा बंधन	२०१६	हरि त्वां कोणाचें	१२९४	ज्ञानदेवें देवा	१०९२
सोडोनियां गळा	६००	संसारीं असतां	२०८२	हरिविण जिणें	१९८०	ज्ञानराज माझी	९१२
सोनियाचीं झाडें	११८१	संसारीं गांजलों	१६१५	हरिविण देह	७३९	ज्ञान व्हावें आधी	६९४
सोपानदेवें ग्रंथ	११३९	संसारींच्या आद्या	१४३३	हवा हवा म्हण-	३२७	ज्ञान सत्य मुक्त	३३३
सोपान म्हणे	१११०	स्तवीतसे वाचे	२२९४	हस्त ठेविला	९८५	ज्ञान ध्यान जप	८२९
सोपान वटेश्वर	११२३	स्त्री गरवार	२८६	हाचि नेम सारी	८१९	ज्ञानियांचे ज्ञेय	३२४
सोपान वटेश्वर	११२२	स्नानविधि केली	९७९	हाटकर कुणबी	२११७	ज्ञानेश्वरा तुम्हीं	११८९

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

अभंग	अभंगांक
ज्ञानेश्वरापाशीं	१०६२
ज्ञानोबाचा हात	९७३
जनाबाई	
अ.	
अखंडित ध्यानीं	१९१
अगा रुक्मिणी	४१
अग्नी लागतां	२९३
अर्थ जे काढिती	१५१
अनामिक त्यासी	३१३
अनंत लावाण्याची	२४
अपूर्व कोणे एके-	२९५
अरे विठ्या विठ्या	१९
अलंकारपुरवासी	१६८
अविद्येच्या वो	४९
असो थोरथोरां-	२६५
अहो गोकुळींच्या	२६४
अहो देवा हरि	६३
अहो द्रौपदीच्या	११३
अहो नारायणा	४४
अहो ब्रह्मांड	६१
अहो मांडियला	३४६
अहो यशोदेचा	२९
अहो सखीय	५९
आ.	
आई मेली बाप	१२८
आक्रोशें ध्याना-	२४३
आतां पुरे हा	१२३
आतां भीत नाहीं	२१०
आतां येतों स्वामी	२२१
आतां वाट पाहूं	७२
आंधळ्याची काठी	१६९
आर्धी घेतलें	४५
आनंदाचे डोहीं	२१९
आपणची सारा	२४२
आम्ही आणि संत	२४४
आह्मी जावें कवणा	४६
आम्ही पातकां-	२१२
आम्ही स्वर्ग लोक	२२०
आलिया ब्राह्म-	२६१
आले वैष्णवांचे	१७५
आषाढी एका-	२८८
आळघितां धांव	२७
आज्ञा करुनी	३०७
इ.	
इंद्रसभे झाला	२९७
उ.	
उठा पांडुरंगा	३४८
ऋ.	
ऋषि आश्रमा	३१०
ऋषिअंगणीं	३०२
ऋषि म्हणतीं	१५२
ऋषि म्हणे रे	३०२
ए.	
एकच टाळी	२६६
एकटी तूं गाणें	८२
एक नाम अवघें	४
एक प्रहर रात्र	१२९
एके दिवशीं न्हाव-	८५
एके दिवशीं वोडि-	११७
एके रात्रीचे	१४७
ऐ.	
ऐक बापा माझ्या	६५
ऐखा बापा ह्यषि-	४७
ऐका ही नाम-	२९४
ऐशा धाल्या	३२८
ऐशापरीं पांड-	३३०
ऐसा आहे पांडुरंग	२१
ऐसापुत्र देई	१५९
ऐसा योग घडे	३३१
ऐसा वर देई	१५५
ऐसा हा देवानें	३४२
ऐसी कीर्तनाची	१४०
ऐसें क्रमितां	३१२
अं.	
अंगीं हो पैं	२४०
क.	
करचरण प्रक्षा-	३२०
कर पसरिला	३२५
करुनी आरती	२९०
करूं हरीचें कीर्तन	२१८
कांकड आरती	१२१
कां गा उशीर	५४
कां गा न येसी	४०
कां गे निष्ठुर	७४
काम लागे कृष्णा-	२४८
काय करूं पंढरी-	६८
काय करूं या	६०
काय हें करावें	५
काळाचिये लेख	१९८
किती सांगूं तूंतें	५५
कीर्तनाचा रस	२५८
कीर्तनासी जातां	२५७
कोणे एके दिवशीं	११६
ख.	
खंडेराया तुज	३४१
ग.	
गगन सर्वत्र	१९७
गजेंद्रासी उद्धरिलें	६६
गातां विठोबाची	१
गीतेवरी आन	२६८
गोणाईनें नवस	२७९
गोणाई राजाई	२८०
गौळण म्हणे	२५९
गंगा गेळी सिंधु-	३८
च.	
चरण विठोबाचे	१८२
चला पंढरीसी	२०६
चिंतनीं चित्ताला	७७
चोखामेळा अना-	१०८
चोखामेळा संत	९७
चोरा संगतीनें	२३७
ज.	
जगीं विठ्ठल	२३८
जनसमुदाय मि-	२९२
जनीचिया बोले	१२७
जनीचे बोलणें	१५४
जनीं जाय पाणी-	१३०
जनी जाय शेणा-	१२५
जनी डोईनें गां-	८३
जनी दृष्टी पाहे	१९४
जनीनें बोतिलें	१४३
जनी बैसली न्हा-	८४
जनी म्हणे नाम-	२०७
जनी म्हणे पांडु-	१०४
जन्म खातां उष्टा-	२०
जन्मा येऊनियां	२
जहाज तारिलें	२३५
जात्यावरील	२२६
जाय जाय राउ-	१२२
जाय बरोबरी	३३३
जावोनी राउळा	३३२
जिव्हा लागली	१४४
जेवी जेवी बा	१०३
जो जो जो जो	३३६
जोड झालीं रे	१८७
ज्याचा सखा हरी	८८
ज्योत परब्रह्मीं-	२०२
ज्योत पहा चम-	२०१
झ.	
झाडलोट करी	८०
झाली जगचिये	२३२
झाली पूर्ण कृपा	१९५
ड.	
डोईचा पदर	२२५
त.	
ताट विस्तारी	३२१
तुझा लोभ नाहीं	२०८
तुझे चरणीं घालीन	२०९
तुझे पाय रूप	६९
तुझ्या निजरूपा-	३२
तुम्हीं सकळीक	३३४
तुळशीचे बनीं	८६
तो हा भक्तांचे	७
त्या वैष्णवांच्या	१८५
थ.	
थालीपाक ऐकतां	३१८
द.	
दळणाच्या मिषें	११८
दळितां कांडितां	२०५
दळूं कांडूं खेळूं	१८१
दुर्योधना मारी	१०५
दुःशासन द्रौप-	९२
दूत विनविती	३१७
देव खातें देव	१९२
देव तारक तारक	१०९
देव देखिला दे-	२५
देव भक्तांचा	१०१
देव भावाचा	९१
देवा देई गर्भ	१५८
देहभाव प्राण	१८६
देहभाव सर्व	१४६
देहाचा पालट	७८
दोहीकडे दोही	११२
द्रौपदीकारण	१००
द्वारकेच्या राया	१६३
ध.	
धनियाचें पडपें	२३१
धन्य कलत्र माय	५०
धन्य ते पंढरी	७६
धन्य ज्याचे चरणीं	२२४
धर्मशिळे आली	३०५
धरा सतराचा हो	१३४
धरिला पंढरीचा	१८०
धांवा धांवा न-	३१६
धुणें घेऊनि कां	१२४
न.	
नमुनी ब्राह्मण	२९१

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitization by eGangotri

अभंग	अभंगांक
नम्रतेविण यो-	१८९
नवल वर्तलें न-	३४०
नाद पडे कानीं	२३३
नाना वाजंत्र्या-	२९९
नाना व्रत तप	२५४
नामदेवाचे घरीं	१३२
नामदेवा पुत्र	१३७
नाम फुंकट चोखट	३
नामयाचा गुरु	२७५
नामयाचें ठेवणें	२२३
नाम विठोबाचें	८
नाम विठोबाचें	११
नाम घेऊनियां	२८९
नारद सांगे मृत्यु	२९६
नाहीं आकाश	२०३
नाहीं केलीं तुझी	४२
नित्य सारूं हरी-	२१७
नित्य हातानें	१९६
निराकारीचें नाणें	९
निवृत्ति पुसत	१२०
नोवरीयासंगे	३१
प.	
पतंग सुखावला	२५०
पदक माळा	१४८
पदक विठ्ठलाचें	१४९
परधन कामिनीं	१६२
पक्षी जाय दिगं-	८९
पांडिवाचें घरीं	११०
पाणी तेंचि मेघ	२४६
पाय जोडूनि	३४
पाहतां पंढरीं-	१७०
पुंडलिक भक्त	१६
पुंडलिकापासीं	१३९
पुंडलिकें नवल	७९
पुढें जातां कष्ट-	३०८
पुण्यवंत पाताळ	३३७
पुर आला पंढ-	२८३
पूर्वी काय तप	८१
पोई अव्हेरितां	३०९
पोट भरूनि	४८
पंढरीचा वार	१७४
पंढरीचें सुख	१८
पंढरीच्या राया	९४
पंढरी सांडोनी	३३
पंथ क्रमितां	३०६
प्रपंची जो रडे	२४७
प्रेमभावें तुझी	१५०
ब.	
बघायाला गेले	३४३
बाई मी लिहिणें	१८८
बांधोनियां हात	२३०
बाप रखुमाबाई	२३
बाप श्रोतियाचा	११४
बाळे भोळे ठक	१०२
ब्रह्मा वंदी ज्याचे	२६३
ब्राह्मणाचें पोर	९३
भ.	
भक्त जें जें कर्म	९०
भक्तामाजी अग्र-	१६७
भक्ति ते कठींण	३४७
भक्तिभावें बळे	२२९
भक्तिसाठीं याति	१०७
भजत करी महा-	२४९
भला भला पुंड-	१७
भाव अक्षराची	२६७
भिल्लणीचीं फळें	९५
भुत झालें ऋषि	१११
भृंगीचिया अंगीं	२३४
भ्रांति माझें मन	१८३
म.	
मग म्हणे नंदा-	२६०
मग हांसोनि स-	११९
मध्यरात्रीं ऋषि	३१९
मनामागें मन	२१५
मना लागो हाचि	२१३
मागें संत झाले	२८२
माझा नामा मज	१३३
माझा लोभ	९९
माझा शिणभाग	१०
माझा हा विठो-	३४५
माझिये जननी	७५
माझीं आंधळ्याची	३९
माझें अचडें	३३८
माझें चित तुझें	२११
माझें दुःख नाशी	१६०
माझे मनीं जें	२०४
मांडियेला डाव	११५
माय मेली बाप	५८
मायेहूनि माय	२७०
मारूनियां त्या	१२
माळियाचा लेक	९८
मी तो समर्थाची	२२२
मी वत्स माझी	५२
मृदु वाहे पाणी	२४१
म्हणती माथां	३२७
म्हणे पाचारा	३२९
य.	
यातिहीन चोखा	९६
या वैष्णवांच्या	१६६
येई जीवाचिया	६२
येऊं ऐसे जाऊं	१३
येऊनियां जन्मा	२५१
येग येग विठाबाई	७१
येगे माझे विठाबाई	३५
येतां देखोनियां	३११
येरीकडे गंगा	३२६
येराकडे तारारा-	३१४
येरे येरे माझ्या	४३
योग न्यावा सिद्धी	५७
योगी शीण झाला	२६
र.	
रक्तवर्ण त्रिकुट	१९९
राजाई गोणाई	६७
रत्नाचे मंचकीं	३२२
राधा आणि मु.	१४१
राना गेली शेणी	१२६
राव म्हणे अहो	३०३
रुक्माई आईचें	१६१
रुक्मिणीच्या कुंका	५१
ल.	
लोलो लागला	१३६
व.	
वाचें म्हणतां	२७६
वाट पाहतें मी	७०
वामसव्य दोहीं	१७९
वारा पाणीं मुस-	२८६
विटेवरी ब्रह्म	१५७
विठोबा चला	१३५
विठोबा मला	३३९
विठोबारायाच्या	७३
विठो माझा लेंकुर-	३०
विठ्ठलनामाची	६
विठ्ठलाचा छंद	१४२
वियोग नाम्या-	३३५
विवेकाची पेंठ	२५२
विश्वामित्रें जा-	३०४
विश्वामित्रें तत्क्ष-	२९८
विश्वामित्रें द्विज-	३०१
विष्णुमुद्रेचा अं-	१७१
वेदांतीं हें बोलिले	१५३
वेष धरोनी	३१५
वैकुंठीचा हरी	२६२
वैराग्य अभि-	२२८
वैष्णव तो एक	१७३
वैष्णव तो क-	१७२
वोढिला ताडिला	२८५
वंदोनी श्रीकृष्ण	३२३
व्हावें कथेसी सा-	१५
श.	
शब्दाचें ब्रह्म	१९०
शरण आलों नारा-	६४
शरीर हें जा-	२५३
शालिवाहन शके	२७७
शिणल्या बाह्या	५६
शून्यावरी शून्य	२००
शूराचें तें शस्त्र	२५५
शेट्या झाला हरी	१३१
शेष पुसतां	३४४
श्रीमूर्ती असे वि-	१९३
स.	
सख्या घेतले	३७
सख्या पंढरीच्या	५३
सण दिवाळीचा	२८४
सत्त्वरजतमें	२१६
सदाशिवाचा अ-	२७३
साधु आणि संत	१५६
सांवळीं ते मूर्ति	१७८
साळी सडायास	८७
सुखें संसार	२३९
सुंदर माझें	२२७
सुंबाचा करदोडा	२८१
सेना न्हावी	२७८
सोंग सोंग जाय	१४५
सोपानाची ऐशी	२७४
संत आणि देव	२४५
संतभार पंढरींत	१७७
संतमहानुभाव	१८४
संत राउळा	२७१
संत हे कोण	१६५
संतांचा तो संग	१६४
संसारी निधान	२५६
स्कंधीं ऋषी तो	१०६
स्तन पाजायासी	२८
स्त्री जन्म ह्मण-	१७६
स्मरण तें हेंचि	२१४
स्मरतांचि पाव-	२२
ह.	
हरिहर ब्रह्मादिक	१४

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain. Digitizagtion by eGangotri

अभंग	अभंगांक
हातीं जायचि	१३८
हात निढळावरी	३६
हांसें आलें	३२४
हेंचि देवांचें भ-	२३६
ज्ञ.	
ज्ञानाचा सागर	२६९
ज्ञानेश्वर अभंग	२७२
ज्ञानेश्वर म्हणे	२८७
नारा.	
आम्हां व्रत एका-	१०
काळा आलोट	१२
कैचें आम्हां जाति-	९
कोटी यज्ञांची हीं	११
तापत्रया तापलें	७
तुज भांडवल	३
तुज मी अनन्य	२
तुझे चरणीं चित्त	५
देवा माझें मीपण	१
पुंडलिका द्वारीं	८
माझ्या विठोबाचें	६
मी आहें तेथें	४
सुख दुःखा भेटों	१३
महादा.	
यादवाचे कुळीं ड	१
गोंदा.	
आलिंगिला नामा	४
ऐसा नामा भक्त	१५
गजानन गौरी	१८
जाच केला म्हणुनी	१२
दोघेजण बाळ	१०
नामदेवा नाम कैसा	२
नामयाचा नेम	६
नामयाची माता	८
नामा आला घरा	५
नैवेद्याचा नेम	१
भावे भक्तिवादें	१६
राजाईचा संशय	१४
वराईची गोणी	१३
विठ्ठल रुक्माई	९
विनवितों देवा	३

अभंग	अभंगांक
शिजला तो सर्प	११
साठीं नव लक्ष	१७
साक्ष आल्यावरी	७
सेज सिद्ध झाली	१९
विठा.	
अनंत अपरंपार	७२
आनंदें नाचत	५५
आमुचा नाम तुज	५
आमुचा बाप अग्रज	८
आमुचा बाप आम्हा	२५
आमुचें ठेवणें	६
उदमाचा करून	२८
उदर भरावया	६८
उदार चक्रवर्ती	१३
उभया धरणें	४६
एक होतें तें द्वैत	६५
ऐसें सुख कोठें	५८
कामधेनु गाई	७०
काय गाणीव	८१
कीर्तनाची ध्वनि	५२
केशवाचे पाय	३३
कृष्ण गौळियाचें	८५
खवळलें आतां	११
खेचरापासी जाय	३१
घेतां देतां तूं	५१
चराचरीं जाणा	३४
जननी बालका	२२
जननी बालकांचें	२४
जाति ज्ञान नाहीं	७१
जावोनि वेव्हार	४५
जैसा आंबा वर्षत	८२
ज्यासी नावडे	७९
तीर्थ तपें व्रतें	४८
तुज काय देवा	१२
तुजवीण जिवलग	३९
तुजसारिखा पंढरि-	२१
तुझे पाय माझिया	३०
तुझ्या प्रेमाचे का-	२०
तूंचि येसी तूंचि	४२
तंव खेचरु ऐसी	३५
तंव धाऊनी गेला	३२
त्रैलोक्या माझारी	८६

अभंग	अभंगांक
दासी देवा अनु-	५०
देखुनी पंढरीच्या	७७
देहसमय अंतीं	६६
द्रौपदीचें थाली-	८४
धर्म अर्थ मोक्ष	७५
धरोनी हनुवटी	५९
न लगे आयुष्य	३८
नाम तारी पति-	७३
नामयाचें वंशीं ज-	६१
नामयाचें वंशीं ज-	६२
नामयाचे वंशीं मैंद	६०
निज आत्मज्ञान	२९
पतितपावन ऐकि-	५७
पायीं घातला	४३
पितृभजन जरी	२६
पूर्वजन्मीं आराधि-	४
पंढरीराया माझि-	१९
बरवें बरवें बाळ-	७६
बहुता पुण्याचें	७८
बोल तो सधरु	४१
बोलूरे वेदांतीं	४०
भिऊनियां निघे	४९
भूतळींचीं तीर्थें	१७
मग साधुसंत	२
मरण हें पेरणें	६३
मांजराचे डोळे	६९
माझा बाप माय	३७
माझिया बापाचा	९
माझिया बापाची	१४
माझिया बापासी	१६
माझे बापाचेनि	२७
माझ्या ठेवी दा-	१८
मायबापें काय	१०
माय वेल्हाळीं	५४
माळा मुद्रा सोंग	६७
मी तुझा अंकिला	४७
मी तुझा पोसणा	४४
यात्रें बोलावितो	८३
विठा नामयाचा	३
विठोबाचे बहु	५६
विश्वंभरा तुझें	५३

अभंग	अभंगांक
वैकुंठनायका	६४
साधुसंतजना करि-	१
सुखाचा निज	३६
हरिकथा ऐकतां	८०
हरिनामाचा ध्वनि	७
हरि ह्मणा हरि	७४
हाटकरी आम्ही	१५
हिंडतां श्रमलों	२३
आऊबाई.	
शून्य साकारलें	१
लिंबाई.	
तारीं मज आतां	१
लाडाई.	
पूर्वसंबधें मज दिधलें	१
परसा भागवत.	
अणुमाजीं राम	१८
इंद्र निळ तनु	१९
कवित्वापरीस क-	९
कविरस वांटोनि	१०
कीर्तनाच्या वेळे	७
केशव परीसता	११
कृतायुगीं नामा	१७
गंगातीरीं तप	१२
टाळ मांदळी	१५
तुझी गावें तेंचि	१३
परसा म्हणे नाम-	१
परसा म्हणे नाम्या	८
परसा सांगे स्त्रिये	३
पैल मेळारे	१६
भूवैकुंठ जागा	५
माते डावा डोळा	६
यावरी काय	४
यावरी नामदेव	२
वैष्णवांचा थाट	१४
विसोबा खेचर	
छंदे छंदे	२
जे. जे. असेल	१

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi

CC0. In Public Domain, Digitizagtion by eGangotri

गीताप्रेस गोरखपुर

पो० गीताप्रेस—२७३००५
गोरखपुर, फोन (०५५१) २३३४७२१

Dr. Urmila Sharma Collection, Varanasi